ऐतिहासिक शब्दकोश

य. न. केळकर

ऐतिहासिक शब्दकोश

भाग १ ला

य. न. केळकर



किंमत १५ रुपये

प्रकाशक :
ग. ल. ठोकळ, बी. ए., बी. टी.
ठोकळ प्रकाशन,
६१ बुधवार, पुणें २.

एकमेव विक्रेते :
श्री लेखन वाचन भांडार
लक्ष्मी रोड, पुणें २.

पहिली आवृत्ति १९६१

मुद्रक :
मा. प. तळेकर,
श्री दत्त मुद्रणालय,
३३५ शनवार, पुणें २.

प्रस्तावना

सन १८७८ च्या सुमारास काव्येतिहास-संग्रहानें इतिहास-साधन-प्रकाशनाचा पहिला पद्धतशीर पाया घातला. आधुनिक काळांतील मराठी इतिहास-साधन-प्रसिद्धीचा तो उषःकालच असल्यामुळें कै. सान्यांनीं त्या साधनांचा परिचय करून देतांना जुन्या अवघड किंवा अपरिचित शब्दांची शक्य तितकी फोड करून व अर्थाच्या टीपा देऊन तीं सुलभ केली. त्यांनी तसें केलें नसतें तर त्यांनीं छापलेल्या बखरी किंवा पत्रे यादी वगैरे वाचकांना सुबोध झालीं नसतीं. काव्येतिहाससंग्रहाच्या जन्मानंतर खरे, राजवाडे यांचे मराठी इतिहास-साधन-संशोधनाचे प्रचंड उद्योग सुरू झाले आणि त्यांच्या कार्यानें प्रभावित होऊन मराठी इतिहाससंशोधनाचा एक महान् उद्योग महाराष्ट्रांत सुरू झाला व आजतागायत तो विविध शाखांनीं अगदी भरगच्च झाला आहे. इतका कीं, मराठी इतिहाससाधन-ग्रंथांची अद्यावत् मोजदाद करावयाची म्हटल्यास तीं हजारांनीं करावी लागेल.

अशी स्थिति असली तरी ती पर्वतप्राय साधन-संपत्ति अद्यापही सर्वसामान्य सुशिक्षितांना सुबोध होऊं शकत नाहीं हीहि गोष्ट अनुभवांतील आहे. याचें मुख्य कारण म्हटले म्हणजे एकतर मूळ साधनें ज्या लिपींत मुख्यत्वें लिहिलेलीं असतात ती लिपी मोडी असते. भाषाही अर्थातच जुनी अपरिचित असते आणि फिरून त्यांत परकी फारशी मुसलमानी शब्दांची कमालीची समृद्धि आढळते. सान्यांनीं सुरुवातीसच शब्दार्थ व टीपा देण्याचा अभिनंदनीय उपक्रम केला, तो पुढील काळांत साधनें प्रसिद्ध करणारांनीं तसा कटाक्षाने अवलंबिला नाहीं. राजवाड्यांसारख्या जबरदस्त संशोधकानें संशोधनकार्यास वाहून घेऊन ऐतिहासिक कागदपत्रें संशोधून जगापुढें आणण्याचा विक्रमच सुरू केला. काळाच्या भक्ष्यस्थानीं पडूं नयेत म्हणून मिळतील तीं साधनें आधीं प्रकाशित करून तीं शाश्वत करून ठेवण्याची त्यांची दृष्टि असल्यामुळें ती साधनें सामान्यांना सुबोध करण्याची खटपट त्यांचेकडून झाली नाहीं. तथापि प्रसिध्द होणाऱ्या साधनांचा बोध व उलगडा नीट व्हावयासाठीं एखादा 'ऐतिहासिक शब्दांचा कोश' अवश्य उपयोगी पडेल

असें त्यांनाही वाटत होतें यांत शंका नाहीं. त्यांनीं १८९८ सालीं म्हणजे काव्येतिहाससंग्रहाच्या जन्मानंतर २० वर्षांनीं प्रसिध्द केलेल्या पहिल्या पानपतच्या खंडांत असा उल्लेख केलेला सांपडतो.

" या खंडाच्या पत्रांतील कठीण शब्दांचे अर्थ प्रायः मीं दिलेले नाहींत; कारण अलीकडील वीस वर्षांत काव्येतिहाससंग्रहाशीं महाराष्ट्र वाचकांचा बराच परिचय झाला असल्यामुळें तें काम आतां न केले असतां चालण्यासारखें आहे. शिवाय आमचे एक मित्र १७ व १८ व्या शतकांतील ऐतिहासिक लेखांतून आलेल्या कठिण शब्दांचा कोश तयार करीत आहेत व लवकरच तो छापून तयार होईल असा अजमास आहे."

राजवाड्यांनीं निर्देश केलेला त्यांचा कोशकार कोण असेल तो असो. दुर्दैवानें त्याचा तो कोश कधीच प्रसिध्द झाला नाही आणि सामान्य अभ्यासकाची कुचंबणा कायमच राहिली. त्यानंतरच्या काळांत तर इतिहास-साधन-प्रसिध्दीला महापूर आल्यासारखा झाला व तो आजतागायत तसाच टिकून आहे. यामुळें ती कुचंबणाही शतपटीनें वाढतच गेलेली आहे. ती दूर करण्याचा एक महत्वाचा अभिनंदनीय उपक्रम कै. माधवराव पटवर्धन यांनीं आपला फारशी-मराठी कोश प्रसिध्द करून केला. इतिहाससाधनें अभ्यासणारांवर त्यांनीं मोठाच उपकार केला. ज्या काळीं त्यांनीं हें काम केलें त्या वेळेपुरतें तें उत्तम गरज भागविणारें ठरलें. तथापि मराठी इतिहाससाधनप्रसिध्दीचा वेग व ओघ वाढतच राहिल्यामुळें त्यांचा तो कोशही लवकरच अपुरा भासूं लागला. १९२५ सालीं त्यांचा कोश प्रसिध्द झाला. त्यानंतर १९३०सालीं पेशवे-दप्तर-संशोधनाचें प्रचंड काम सुरू होऊन ४५ साधनग्रंथ प्रसिध्द झाले. त्या वेळीं सरदेसायांचा सहकारी म्हणून मीही तेथे संशोधक म्हणून काम करीत होतों तेव्हां आम्हां संशोधकमंडळींना पटवर्धनांचा कोश ठायीं ठायीं किती अपुरा म्हणून निरुपयोगी ठरला त्याचा प्रत्यय प्रत्यक्षच येत गेला.

पटवर्धनांचा कोश फारशी शब्दांपुरता झाला; परंतु मराठींतीलच शेंकडो अपरिचित शब्द आढळत. त्यांचाही अर्थ लागण्याची पंचाईत होई. कारण सर्व ऐतिहासिक साधनांचा उपयोग करून त्यांत आलेल्या कठिण शब्दांचा केलेला असा कोणताच कोश उपलब्ध नव्हता. १९३० सालीं जी अडचण कायम

होती ती आजतागायतही तशीच कायम आहे म्हणून ती कायमची दूर करता आली तर पहावी ह्या हेतूनें माझ्या या ऐतिहासिक शब्दकोशाचा उपक्रम झालेला आहे.

या शब्दकोशांत सुमारें पंधरा हजार ऐतिहासिक शब्द समाविष्ट आहेत. छापील साधनांत शब्द जसा आढळला तसाच तो स्वीकारला आहे व अर्थ देतांना त्याचें चुकीचें वाचन झालेलें असल्यास मूळ शुध्द स्वरूप काय असावें तें निर्दिष्ट केलें आहे. तसेंच अर्थ देतांना पुष्कळ ठिकाणीं अनेक जुने समानार्थक प्रतिशब्दहि दिले आहेत. सगळ्यांत महत्वाची गोष्ट ही कीं प्रायः अस्सल साधनांतील अवतरणांशिवाय शब्द दिलेला नाहीं. कारण नुसत्या शब्दाच्या मोघम अर्थापेक्षां तो शब्द कसा व कोणत्या अर्थच्छटेनें वापरला आहे हें समजणें अधिक महत्वाचें होय. आतांपर्यंत छापलेल्या विविध साधनग्रंथांना क्वचित कोठें कोठें शब्दकोश जोडलेले आहेत. परंतु बारकाईनें छाननी करतां अनेक ठिकाणीं अदमासानें दडपून अर्थ दिले आहेत. शब्दाचा दिलेला किंवा सुचविलेला जो अर्थ असेल तो बरोबर आहे कीं नाहीं हें तो शब्द असलेल्या वाक्याचें अवतरण उध्दृत करण्यानेंच चांगलें कळू शकतें.

या कोशाचा आणखी एक विशेष हा कीं जेथें प्रयत्न करूनही अर्थ लागला नाहीं तेथे तेथें स्पष्टपणें प्रश्नचिन्ह करून ठेविलें आहे. त्याचा हेतु हा कीं तज्ञांकडून त्याची चर्चा होऊन खरा शब्दपाठ उन्नीत व्हावा. स्वतःला न उलगडलेले शब्द गाळून टाकण्याची एक साळसूद किंवा संभावित पद्धति रूढ आहे. परंतु ती हानिकारक व प्रगतीला मारक वाटते. उलटपक्षीं मी आंगिकारिलेली प्रामाणिक पद्धति स्वीकारल्यामुळें पुढे मागे, न लागलेल्या शब्दांचे अर्थ तज्ञांच्या चर्चेत लागले जाऊन, विषयाची प्रगतिच होईल.

या कोशास आधारभूत ग्रंथांची विस्तृत सूचि जोडली आहे. तीवरून असें दिसून येईल कीं बहुधा आतापर्यंत मराठींत छापलेल्या एकूण एक ऐतिहासिक साधनग्रंथांचा आणि त्याचप्रमाणे उपलब्ध सर्व लहानमोठ्या मराठी व फारशी शब्दकोशांचा परिश्रमपूर्वक उपयोग या कोशांत केलेला आहे. एकंदरींत शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांपासून तो पी. एच. डी. प्रोफेसरांपर्यंत, तसेंच भाषाशास्त्रज्ञ आणि वाङ्मयसेवक किंवा साहित्यिक या सर्वांनाच हा कोश फार उपयुक्त ठरावा अशी अपेक्षा आहे.

हें कोशकार्य अत्यंत महत्त्वाचें व उपयुक्त असतांही त्याला प्रकाशक मिळणें दुर्घट झालें ! आधीं त्याचें महत्वच कोणास समजेना किंवा उमजलें तरी त्याच्या प्रकाशनासाठीं मोठी रक्कम गुंतविण्याची हिंमत कोणास होईना. यामुळें माझे सर्व श्रम निष्फळच झाले होते. परंतु सत्कृत्य निष्फळ ठरूं नये अशी ईश्वराची इच्छा होती खास. म्हणूनच श्री. बाबूराव ठोकळ हे अखेर मला प्रकाशक लाभले. बाबूराव स्वतः रसिक, साहित्यिक व विद्येचे मोठे भोक्ते आहेत; म्हणूनच त्यांनीं, इतरांनीं उपेक्षिलेलें हें प्रकाशनजबाबदारीचें काम मोठ्या उमेदीनें अंगिकारिलें. अर्थात या ग्रंथाबाबत कृतज्ञतापूर्वक आभार मानावयाचे तर प्रथमतः त्यांचे एकट्याचेच. ग्रंथ सुरवातीस इतका मोठा होईल अशी त्यांची कल्पना नव्हती. परंतु तो पुढें वाढला तरी त्यांनीं हिम्मत सोडली नाहीं. पण आठनऊशें पृष्ठें छापून झाल्यावर त्यांना स्वाभाविकच चिंता उत्पन्न झाली. कारण किती केलें तरी तेथें साक्षात पैशाचा प्रश्न येत होता. आधींच त्यांना या ग्रंथापायीं दहा-बारा हजार रुपये बुडीत गुंतवून पाडावे लागले आहेत व असे कोशग्रंथ कितीहि महत्त्वाचे असले तरी ते खपून मुद्दल सुटून येण्यास किती कालावधि लागेल याची निश्चिति नसते. यामुळें त्यांनीं नाइलाजानें ग्रंथांत संक्षेप करण्याची सूचना केली आणि मलाही ती नाइलाजानें मान्य करणें भागच होतें. अशी स्थिति प्राप्त झाल्यामुळें सुमारे २१०० शब्द प्रेसकॉपींतून वगळावे लागले. वास्तविक असलीं कोशाचीं मोठीं कामें सरकारचीं किंवा विद्यापीठांचीं असतात. पण त्यांचेकडून तीं न झालीं तर निदान दुसऱ्या कोणी तीं केलीं तर तें आपलेंच काम अशा बुद्धीनें उदार मदत व्हावी. श्री.ठोकळ यानीं असल्या मदतीसाठी प्रयत्न केला; परंतु तो निष्फळ ठरला ! त्यांना वरील दोघांपैकीं कोणाकडून कांहीं मदत मिळाली असती तर हा कोश १५०० पानांऐवजी २००० पृष्ठांचा, अधिक भरदार व त्यांतल्या त्यांत अधिक परिपूर्णही झाला असता. पण त्याला इलाज नाहीं. कारण सगळीं सोंगें आणतां येतात, पैशाचें सोंग मात्र आणतां येत नाहीं.

हा कोश मी कोणाचीही मदत न घेतां एकाकी एकट्यानें तयार केला आहे. अर्थात त्यांतील दोष किंवा उणीवा यांची जाणीव इतरांपेक्षां मलाच अधिक आहे. ते दोष, त्या चुका, त्या उणीवा या कोशाचे वाचक पुढें दाखवितील त्यांचा कृतज्ञतापूर्वक स्वीकार करून पुढील आवृत्तीचा योग आल्यास त्या दुरुस्त करतां येतीलच. निर्दोष, निर्व्यंग व संपूर्ण अशी कृति होईल तेव्हांच ती प्रसिद्ध करीन अशी

एखाद्या भाषाकोशाबाबत प्रतिज्ञा कोणी करील तर ती कधींच सफळ होऊं शकणार नाहीं. फार काय त्यासाठीं एखादें 'महामंडळ' स्थापिलें आणि 'तज्ज्ञांचा' तांडा संपादकमंडळावर नियुक्त करण्यांत आला तरीही अखेर काय स्थिति होते व त्या कृती अशुद्ध व अपूर्णच कशा राहतात तें मराठींतील कोशांच्या अभ्यासू वाचकांना पूर्ण परिचित आहे. कोश कितीही मोठा केला तरी भाषेंतली सर्व शब्दसंपत्ति त्यांत कधींच सामाऊं शकत नाहीं आणि संपादक कितीही विद्वान किंवा व्युत्पन्न झाले तरी भाषेंतील प्रत्येक शब्दाचा निश्चित अर्थ किंवा त्या शब्दाच्या विविध छटा त्यांना संपूर्ण अवगत झाल्या असें होऊं शकत नाहीं. यामुळें अपूर्णता राहावयाचीच व तें स्वाभाविक होय. कारण मनुष्याचें श्रम करणारें शरीर आणि अर्थ करणारें मन हीं दोन्हीही मापें खरोखर फार क्षुद्र आहेत. यामुळें ज्याचें जेवढें लहानमोठें भांडें असेल तितक्या प्रमाणांतच अगाध भाषासमुद्रांतील पाणी त्याच्याकडून उपसलें जाणार.

'आकाशअंत न कळोनहि अंतरिक्षीं ।
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी ॥'

असा प्रकार असल्यामुळें परिश्रमांत कसूर न करतां ज्यानें त्यानें आपलें काम सादर केलें म्हणजे तें त्याच्यापुरतें पूर्णच समजावें. निर्दोष, निर्व्यंग व संपूर्ण असाच शब्दकोश तयार झाल्याखेरीज मी तो प्रसिद्ध करणार नाहीं, अशी कोणी प्रतिज्ञा करून बसेल तर नदीचें पाणी सर्व वाहून गेल्यावरच ती ओलांडून जाण्याची इच्छा धरणारांत त्याची गणना होईल व प्रगतिच खुंटून जाईल. हें लक्षांत ठेऊनच हा प्रकाशनाचा उद्योग केला आहे.

या कोशप्रकाशनांत तज्ज्ञता किंवा विद्वत्ता मिरविण्याची भूमिका नसून प्रामाणिक जिज्ञासापूर्तीचा तो एक उद्योग आहे. आपल्याला जें उपयुक्त ठरेल तें इतरांनाहिं तसेंच उपकारक ठरेल अशी धारणा असल्यामुळें

"पीऊनि निरवशेषा कुसुमरसा आपुल्या कुशलतेनें
गुंजन भृंग करी जें इतरांचें कार्य सफलते तें ने !"

असा दुहसबी उपयोग होणार आहे.

सर्व कामें एकाकी एकट्यानें उरकावयाचीं असल्यामुळें मुद्रण तपासणींत बरेच प्रमाद राहून गेले आहेत. मुद्रणासाठीं ज्या वळणाचा टाईप निवडण्यांत

आला तो वाईट वळणाचा निघाल्यामुळें कितीही वारकावा प्रूफ वाचनांत केला तरी मुद्राराक्षसांच्या लीला संपेनात. तथापि त्या मुद्राराक्षसांच्या लीला सुज्ञ वाचकांना सहज उमजण्यासारख्या आहेत. मुद्दाम दुरुस्तच केल्या पाहिजेत अशा चुकांचें शुद्धिपत्र तयार करण्याचे कामीं माझे स्नेही श्री. नागेश माधव खुपेरकर यानीं पुष्कळ मदत केली. त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. तसेच कोशांतील कांहीं न लागलेल्या पर्शिअन सारख्या भासणाऱ्या शब्दांच्या अर्थाबद्दल चिकित्सा पर्शियनतज्ज्ञ श्री. गो. त्रि. कुलकर्णी यांचे मदतीनें केली. कुळकर्णी यांनीं माझे-करतां जे पांच दहा तास खर्च केले त्याबद्दल त्यांचेही आभार आहेत.

असो. या कोशाचे मूळ बीज प्रथम १९२३–२४ सालीं कांहीं निराळ्या स्वरूपांत माझ्या मनांत पडलें. जुन्या वाङ्मयांतील पुन्हा उपयोगांत आण-ण्यासारखे चांगले शब्द निवडून त्यांचा एखादा छोटा कोश रचण्याचे तेव्हां मी ठरविलें होतें व त्यासाठीं कांहीं तयारीही केली होती. पण तें कार्य तेव्हां अपुरेंच राहिलें. तथापि त्या कल्पनेचा बीजसंस्कार ज्या शक्तीनें प्रथम माझ्या मनांत केला त्याच बीजाचा आज इतक्या वर्षांनंतर अनेक स्थित्यंतरांच्या आणि आशानिराशांच्या फेऱ्यांतून शेवटीं हा एवढा भरगच्च वेलविस्तार झालेला दिसत आहे. म्हणून त्या शक्तीलाच मनानें ही कृति समर्पण करीत आहे.

प्रजासत्ताक दिन
२६–१–६२

—य. न. केळकर

आधारग्रंथ-सूचि व संक्षेप

१	(विविधज्ञान विस्तार पुस्तकमाला) आज्ञापत्र रामचंद्रपंत अमात्यकृत	आज्ञा
२	ऐतिहासिक जुने लेख, पुस्तक २ रें चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती व यादी–सनदा–पत्रे. सं. वा. स. कुलकर्णी	ऐ. जु. ले.
३	नाशिक व्यंकटेश बालाजी संस्थानचा इतिहास सं. गोसावी	बा. सं. इ.
१५	शिवचरित्र साहित्य अकरा खंड	शि. च. सा. खं.
१६	पेशवाईच्या सावलींत. सं: ना. गो. चापेकर	
१७	कुलाबकर आंग्रे सरखेल आंग्रे घराण्याचा इतिहास संपा : दा. गो. ढब्बू	कु. आं. ढ.
१८	पंतप्रधान पेशवे यांच्या सालवार कारकीर्दी	
१९	श्री शिवाजी प्रताप बखर प्र. पुराणेतिहास प्रकाशक मंडळी	शि. प्र. ब.
२०	मल्हार रामराव चिटणीसविरचित श्रीमंत	म. रा. चि.
२१	छत्रपति धाकटे रामराजे व धाकटे शाहू महाराज यांचीं चरित्रें चतुरसिंग राजे ह्यांच्या हकीकती सुद्धा	धा. रा. धा. शा.
२२	रघुनाथ यादव विरचित पाणिपतची– बखर संपा :— का. ना. साने	पाणि. ब.
२३	खरड्याच्या स्वारीची बखर सं:– साने	खर्डा ब.
२४	होळकरांची कैफियत. संपा:– साने	हो. कै.
२५	श्रीमंत भाऊसाहेब यांची कैफीयत	भाऊ कै.
२६	सेनापती दाभाडे व गायकवाड याची हकीकत. संपा:– साने	से. दा. गा

२७	नारायणराव पेशवे यांची बखर	नारा. पे. बखर
२८	विठ्ठल शिवदेव विंचुरकर बखर	वि. शि. विं. ब.
२९	कृष्णाजी अनंत सभासदविरचित शिवाजीची बखर	सभा. ब.
३०	चित्रगुप्तविरचित शिवाजी बखर	चित्रगुप्त शि. ब.
३१	जयरामस्वामी वडगांवकर बखर	जयराम ब.
३२	मराठी साम्राज्याची छोटी बखर	म. सा. ब.
३३	साष्टीची बखर	साष्टी ब.
३४	भाऊसाहेबांची बखर	भा. ब.
३५	सनपुरी बखर संपाः– हैद्राबाद सरकार	सनपुरी
३६	मल्हार रामराव चिटणीस विरचित थोरले शाहू महाराज यांचें चरित्र. संपा– साने	म. रा. चि. थो. शा. शा. म. च.
३७	मल्हार रामराव चिटणीस विरचित श्रीमंत छत्रपति संभाजी महाराज व थोरले राजाराम यांची चरित्रे.	म. रा. व. चि. सं. म. रा. चि. रा.
३८	का. रा, गुप्तेविरचित नागपूरकर भोसल्यांची बखर संपाः– वा. दा. ओक–प्रका. साने	—ना. भो. ब.
३९	मंत्री दत्ताजी त्रिमल वाकेनिविसविरचित शिवछत्रपतीची ९१ कलमी बखर संपाः– वि. स. वाकसकर	
४०	सोहनीविरचित पेशव्यांची बखर.	पे. ब.
४१	पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा इतिहास, खंड पहिला संपाः– गजानन गोंविंद नाईक	पा. क्ष. ज्ञा. इ.
४२	चंद्रचूड दफ्तर कला पहिली संपादक :– द वि. आपटे.	चं. चू. द.
४३ ते ५७	ऐतिहासिक लेखसंग्रह, खरे, १५ खंड	
५८ते१०२	पेशवे दप्तर भाग १ ते ४५	
१०३ते१०५	मराठी दफ्तर रुमाल, तीन खंड सं: वि. ल. भावे	म. द. रु.

१०६व१०७	पेठे दफ्तर भाग १ व २ सं:- वि. सि. चितळे	पेठे द.
१०७ते१०९	पुरंदरे दफ्तर भाग १, २ व ३ सं:- कृ. वा. पुरंदरे	पुरं. द.
११०ते१११	हिंगणे दफ्तर खं. १, २ सं. ग. ह. खरे	हिं. द.
१११ते११३	पुणे अखबार भाग १, २ व ३ सं:- हैद्राबाद सरकार	पुणे अख.
११४ते११५	होळकरशाहीच्या इतिहासाचीं साधनें- पत्रव्यवहार पूर्वार्ध, खंड पहिला व खंड १२	हो. इ. सा. प.
११६	पराग मासिक सं:- य. न. केळकर, दीक्षित व- जोशी	पराग
११७	शिंदेशाही इतिहासाचीं साधनें भाग १ सं:- आनंदराव फाळके	शिंदे. इ. सा.
११८	कोल्हापूर व कर्नाटक प्रांतातील राज्यें व संस्थाने यांचा इतिहास उत्तरार्ध भाग १	को. क. प्रा. इ.
११९	कोल्हापूर राज्याचा इतिहास. सं:- बा. प्र. मोडक	
१२०	महादजी शिंदे यांचीं कागदपत्रें सं:- सरदेसाई	म. शिं. यां. का.
१२१	सावंतवाडी संस्थानचा इतिहास सं:-पिंगुळकर	सा. सं. इ.
१२२	साष्टीची बखर ऊर्फ वसईचा दुर्धर धर्मसंग्राम संपा:—ग. गो. नाईक	
१२३	सातारचे श्रीमंत छत्रपति शिवाजीमहाराज यांचे वंशाचा व प्रतिनिधि आणि अष्टप्रधान यांचा इतिहास अष्ट. इ. संपा:— वि. गो. भिडे.	
१२४ते१२८	बडोदे राज्य दफ्तरांतील ऐतिहासिक वेचे खं. १, २, ३, ४, ५	ब. रा. द. वे.

१२९	पोंक्षे कुलवृत्तांत सं. भा. सी. पोंक्षे	पों. कु. वृ.
१३०	आपटे घराण्याचा इतिहास	आपटे घरा. इ.
१३१	पेंडसे कुलवृत्तान्त	पेंडसे कु. वृ.
१३२	भांबोरकर भोसले दप्तर	भां. भो. द.
१५८	मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड २६ सं राजवाडे	म. इ. सा.
१५९	विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांचें चरित्र ले. ह. र. गाडगीळ	वि. शि. विं. च.
१६०	श्रीमंत धारकर पवारांच्या इतिहासाचीं साधनें, खंड ३ रा, भाग १ ला	धा. प. इ. सा. खं.३.
१६१	दसपटीचे शिंदे मोकाशी इनामदार यांचा इतिहास, ले. जनरल नानासाहेब शिंदे	द. शिं. मो. इ.
१६२	शिवछत्रपतीचे सप्तप्रकरणात्मक चरित्र	म. रा. चि. छ.
१६३	कायस्थ प्रभूंच्या इतिहासाचीं साधनें पुस्तक १, अंक ६ व ९	का. प्र. इ. सा.
१६४व१६५	नागपूरकर भोसले यांचीं पत्रें, २ खंड, शेजवलकर	नाग. भो.
१६६	मराठ्यांचें आरमार, द. ब. पारसनीस	मरा. आर.
१६७	रामदास रामदासी — अधिकारीदप्तर	रा. रा. अधि.
१६८	जंजिरा संस्थानचा इतिहास बा. के. भोसले	जं. सं. इ.
१६९	लेखरत्नमाला अथवा नाना फडणविसांचे लेख निवडक पत्रांचा संग्रह अं. रा. हर्डीकर.	लेखरत्न
१७०	नारायण दीक्षित पाटणकर चरित्र वा. बा. दीक्षित	ना. दी. पा.
१७१	सुबोध कायदा पुस्तक पहिलें के. वा. गजेंद्रगडकर	सुबो. काय.
१७२	श्रीशांता दुर्गा संस्थानचा संक्षिप्त इतिहास—शेळडेकर	शां. दु. सं. इ.
१७३	शास्त्री दप्तरातील वेंचे	शा. द. वे.

२००	दिल्ली येथील मराठ्यांची राजकारणें	इ. सं. दि. म. रा.
२०१	भोसल्यांचे कुलाचार	इ. सं. भो. कु.
२०२	ऐति. स्थळें	इ. सं. ऐ. स्थ.
२०३	जुन्या ऐ. गोष्टी	इ. सं. जु. ऐ. गो.
२०४	ऐति. चर्चा	इ. सं. ऐ. च.
२०५	ऐतिहासिक काव्यें	इ. सं. ऐ. का.
२०६	होळकरांची कैफियत	इ. सं. हो. कै.
२०७	आंगरे यांची हकीकत	इ. सं. आं. यां. ह.
२०८	मुंगीकर राजे भोसले यांचे कागदपत्र	इ. सं. मुं. भो.
२०९	चिनापट्टणाकडील राजकारणें	इ. सं. चि. रा.
२१०	जोधपूर येथील राजकारणें	इ. सं. जो. रा.
२११	पेशवे दप्तरांतील सनदापत्रांतील माहिती	इ. सं. पे. द. स. प. मा.
२१२	पेशवे दप्तरातील निवडक कागदपत्र	इ. सं. पे. द. नि. का.
२१३	गोमांतकाच्या इतिहासाचीं साधनें	इ. सं. गो. इ. सा.
२१४	हैदर व टिपू यांचा दरबारांतील पेशव्यांचे वकील	इ. सं. है. टि.
२१५	ब्रह्मेंद्रस्वामीचरित्र	ब्र. च.
२१६	भारतवर्ष ऐ. पत्रें यादी वगैरे	भा. व. ऐ. प. या. व.
२१७	भारतवर्ष सरदार पानसे यांच्या घराण्याची कैफियत	भा. पा. घ. कै.
२१८	भारतवर्ष होळकरांची कैफियत	भा. व. हो. कै.
२१९	भारतवर्ष हैदर व टिपू यांची कैफियत	भा. व. है. टि.
२२०	भारतवर्ष अमात्य बावडेकर यांची कैफियत	भा. व अ. बा. कै.
२२१	भा. व. दखनचे प्राचीन देशविभाग	भा. व. द. प्रा. दे.
२२२	भा. व. शिवछत्रपतीची ९१ कलमी बखर	भा. व. शि. छ. ब.
२२३	भा. व. गोविंदपंत बुंदेल्याची कैफियत	भा. व. गो. बुं. कै.
२२४	भा. व. गो. खं. चिटणीसकृत श्री शाहू महाराज यांची बखर	गो. खं. चि. शाहू ब.

२२५	भा. व. ब्रम्हेंद्रस्वामी यांच्या निधनाची बखर		ब्र. ब.	
२२६	भा. व. जंजिरेकर सिद्दी		भा. व. जं. सि.	
२२७	भा. व. सोंडूरकर घोरपडे		भा. व. सोंडू घो.	
२२८	भा. व. जुन्या ऐति. गोष्टी		भा. व. जु. ऐ. गो.	
२२९	जिवबादादा केरकर चरित्र, राजाध्यक्ष		जि. के. च. रा.	
२३०	भा. व. महाराष्ट्रमंडळाची बखर		भा. व. म. मं. ब.	
२३१	भा. सं. मंडळ अहवाल		शके	१८३२
२३२		,,	,,	१८३३
२३३ ते ३६	वार्षिक इतिवृत्त			
	भा. इ. सं. मं.		शके	१८३४
		,,	,,	१८३५
		,,	,,	१८३६
		,,	,,	१८३७
२३७	प्रथम संमेलन वृत		शके	१८३५
	द्वितीय संमे. वृत	,,	,,	१८६६
	तृतीय	,,	,,	१८३७
	पंचम	,,	षष्ठ	१८३९
२४१	सप्तम	,,	,,	१८४०
२८१	त्रैमासिक ४० वर्षाचे अंक			१८४१
२९२	ऐ. संकीर्ण सा. खंड ११ खंड			
३०२	होळकरशाहीतील पोवाडे सं. गुप्ते		हो. के.	
३०३	दाभाडे दप्तर खंड १			
३०६	पुणें नगर संशोधन ३ खंड			
३०७	आंग्रेकालीन पत्रव्यवहार, आवळसकर			
३०८	संस्थान देवास थोरले पाती पवार घराण्याच्या इतिहासाचीं साधनें —मा. वि. गुजर		प. घ. इ. सा.	
३०९	ऐतिहासिक पोवाडे सं. केळकर खंड १		ऐ. पो. के	
३१०	ऐतिहासिक पोवाडे सं. केळकर खंड २		ऐ. पो. के.	

३११ ऐतिहासिक पत्रव्यवहार (१६०० ते १८६७) सं. सरदेसाई — ऐ. प.
३१२ काव्येतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेले ऐति० लेख पत्रें यादी वगैरे सं. सरदेसाई — का. सं.
३१८ पेशवा रोजनिशा वाड संपादित सहाखंड — पे. रो.
319 The Judicial System of the Marathas by —V. T, Gune
३२० इतिहास ऐतिहासिक — इ. ऐ.
३२१ प्रभाकर लावण्या-पोवाडे — प्रभा-
३२२ अनंतफंदी लावण्या-पोवाडे — अनंतफंदी
३२३ इतिहास मंजिरी, आपटे — इ. मं.
३२४ गांवगाडा, आत्रे — गा. गा.
३२५ माझा प्रवास, गोडसे भटजी — मा. प्र. गो.
३२६ मेस्तक पुस्तक लेखनाधिकार — मे. पु.
३२७ राजवाडे चरित्र, भट — राज. च.
३२८ संशोधकाचा मित्र, खरे — सं. मि.
३२९ ऐतिहासिक गोष्टी, लोकहितवादी भाग ३ — ऐ. गो.
३३० केळकर संग्रह कुवलदत्पर — के. सं.
३३१ एक्पँशन ऑफ दि मराठा पॉवर — E. M. P.
३३२ शिवचरित्र साधन खंड — शि. च. सा.
333 The army of the Indian moghuls by William Irvine — आयर्विन

आधारग्रंथ कोश

३३४ मोल्सवर्थ मराठी इंग्रजी कोश
३३५ कँडी इंग्रजी मराठी कोश
३३६ गीर्वाणलघुकोश, ओक, आवृत्ति शके १८२७
३३७ संस्कृत व प्राकृत कोश
३३८ जुना शास्त्री कोश

३३९ महाराष्ट्र शब्दकोश
३४० फार्शी-मराठी कोश पटवर्धन
३४१ उर्दू, हिंदी, मराठी शब्दकोश. म. तु. कुलकर्णी
३४२ देवनागरी उर्दू, हिंदी, कोश संपादक रामचंद्र शर्मा
३४३ मुधोळसंस्थानच्या घोरपडे घराण्याचा इतिहास या पुस्तकास जोडलेला ' फर्मानांतील शब्दांचा कोश ' खरे ग. ह.
344 Concise Dictionary, English, Persjan by-E. H. Palmer
345 A Glossary of Judicial and revenue terms by Wilson
346 The student's Practical Dictionary of the Hindi language by Ram Narain Lal.
३४७ सरस्वति कोश भिडे

य. न. केळकर यांचे इतर ग्रंथ

(१) **गीत छिद्रुल**–(काव्यसंग्रह) पृष्ठें ६४. प्रकाशक य. न. केळकर किं. ८ आ.
(२) **गीतगुंफा**–(काव्यसंग्रह) पृष्ठें १०३. प्रकाशक य. न. केळकर. किं. १२ आ.
*(३) **ऐतिहासिक पोवाडे किंवा मराठ्यांचा काव्यमय इतिहास**, खंड १ला. पृष्ठें ६००. प्रकाशक य. न. केळकर.
(४) **ऐतिहासिक पोवाडे किंवा मराठ्यांचा काव्यमय इतिहास**, खंड २ रा. पृष्ठें ३००. प्रकाशक य. न. केळकर.
*(५) **इतिहासांतील सहली**–पृष्ठें ३४५. प्रकाशक य. न. केळकर. किं. ४ रु.
*(६) **भूतावर भ्रमण**–पृष्ठें ३३०. प्रकाशक य. न. केळकर. किं. २॥ रु.
(७) **विषयांतर अथवा विनोदलहरी**–पृष्ठें १३७. प्रकाशक ल. स. कोकाटे. हनुमान प्रेस, पुणें. किं. १। रु.
(८) **केळकरांचा खाजगी पत्रव्यवहार**–पृष्ठें ३६०. प्रकाशक य. न. केळकर किं. ६ रु.
(९) **तंतकवि तथा शाहीर**–पृष्ठें १०२. प्रकाशक दि टीचर्स आयडियल पाब्लिशिंग हाउस लि. ७७ शनिवार पेठ, पुणें २. किं. १४ आणे.
(१०) **अंधारांतील लावण्या**–पृष्ठें २९१. प्रकाशक ग. ल. ठोकळ, ठोकळ प्रकाशन, ६२ बुधवार, पुणें २. किं. ४ रु.
(११) **केळकर-कुल-वृत्तांत**–सी. वि. केळकर व य. न. केळकर. पृष्ठें ७५२. प्रकाशक–सी. वि. केळकर, ७४९ ब, सदाशिव, पुणें २. किं. ११ रु.
(१२) **होळकरांची कैफियत**- पृष्ठें २४०. प्रकाशक स. ल. कोकाटे, हनुमान प्रकाशन कार्यालय, पुणें २. किं. ५ रु.
*(१३) **वसईची मोहीम**–डेमीसाइज. पृष्ठें ३१२. प्रकाशक य. न. केळकर.
(१४) **चित्रमय शिवाजी**–प्रकाशक. भा. इ. सं. मंडळ, पुणें २.
(१५) **तिसऱ्या महायुद्धाच्या छायेंत**–पृष्ठें ३००. प्रकाशक मनोहर ग्रंथमाला, पुणें २.
(१६) **वाङ्मयाचा वाफा**–प्र. य. न. केळकर. किं. ५ रु.

---

*अशी खूण केलेलीं पुस्तकें आतां पूर्णपणें दुर्मिळ झालीं आहेत. परंतु अद्यापहि त्यांस फार मागणी आहे. कोणी प्रकाशक लाभल्यास त्यांच्या द्वितीयावृत्ति काढावयाच्या आहेत.

ऐतिहासिक शब्दकोश

भाग १ ला

[अ पासून पा पर्यंत]

ऐतिहासिक शब्दकोश

अ

अइंद--पुढील सालीं.

सरकारचे वचनाची कायेमी कशी आहे हें अइंद जवारांत येईल. (जवारात---जहुरात म्ह० जाहिराण्यांत)

--म. शि. यां. का. पृ. १६६.

अईबदार---व्यंग असलेला, अयबदार.

स्वामीकडून हत्ती आला आहे तो माहातारा अईबदार आहे किंवा ज्वान बेअईब आहे ते महातास बोलावून परीक्षा करून लेहून पाठविणें.

--पे. द. भा. ३० पृ. २०८

अईन--(आईन) चाल, रीत, नियम.

आईने अकबरी--अकबराचा कायदा.

अऊड---नांगर, औत. अऊडभर म्हणजे औतभर, नांगराच्या लांबीइतकें अंतर.

इकडे प्रतापवंत यांचा (हत्ती) अऊडभर पुढें ढळला इतकियात जोडगोळचाने प्रतापवंताचें डोसकें उडालें.

--स. ब. पृ. ३१

अक्करमाही--बारा महिने नोकरी करून फक्त अकरा महिन्यांचाच पगार देण्याचा करार करून नोकर ठेवण्याची एक जुनी पद्धति. (विल्सन)

अक्सर---बहुश:, सर्वसाधारणपणें.

सखारामपंत कितेक काम आपले तरफेचे अकसर कृष्णराव याजकडून घेत होते.

--पुणें अखबार भाग १. पृ. १०४

जुबानी वर्तमान कारपरदाजास सांगितलें व कनोळकर वकीलानेंही अकसर लिहलं असेल.

--पुणें अख. भाग २. पृ. १३०

अकर्म---व्यभिचार.

सटवोबा महाजन याची बहीण विधवा तिणे अकर्म केले.

-ज्यू. पृ. ३६३

अकदस--(आक्‌दस) अत्यंत पवित्र, पुण्यशील.

अकब--मागून, नंतर.
अकब अंदाज आशूरा. --साने प. या. व. ३८५
•**अकबन् अझ् अशूरा**--(अशूऱ्यानंतर)

अकबार--अखबार, हकीकत, बातमी.
रागे रागे काय पाहतोस ? तुझे मागें आठ महिने खराब आहो. श्रीमंतांनी आम्हांस उभयतांस पाठविलें होतें. रोजची अकबार त्याजकडेस पोचवीत होतो. आज उघडे होऊन (प्रकट होऊन, प्रकटपणें) तुजला किल्लेदाराचे जिमेस करून हुजूर जातो. --हो. कै. पृ. ५२

अकलमंद--बुद्धिमान्; शहाणा.

अकलेच्या वाटेनें पाहणें--तर्क करणें, विचार करणें.
गुडीबिडद्यास पुढें फौज असतां बेदडे येऊन ठरणार नाहींत, हें अकलेच्या वाटेनें पाहतां दिसतें. --ऐ. ले. सं. १७०३

अकलेचे सागर--गाढ शहाणें.
अंताजीपंत कितीकसे मर्द माणोस व अकलेचे सागर आहेत ते कललेच आहेत. --पुरं. द. भाग १ पृष्ठ २३२

अकस्मातर--अकस्मात; अकस्मात्र; आगाऊ न कळवितां.
पथकांची गणती घ्यावयाकरितां अकस्मातर जाऊन, बातमी न कळवितां, गणतीस गांठावें (गणती घेणाऱ्या कारकुनास गांठावें) असा बेत होऊन यांची रवानगी जाली आहे. करारप्रमाणें फौज ठेविली नाहीं. अकस्मातर जाऊन गांठावें, फौज नसल्यास पैका घ्यावा, असें कारभारी यांचें ध्यान आहे. --ऐ. ले. सं. ४२५१

अकसत--('किस्त' या शब्दाचें अनेक वचन) वार्षिक वसुलाची हप्तेबंदी.
--विल्सन

अकारीक--(अरबी-अकारीब) आप्त; कारभारी किंवा स्नेही.
संध्याकाळीं राजश्री आबाजी माहादेव याजला निंबाबाईनीं बोलाऊन बोललें जें, आमचे अकारीक रा. साबाजो सिंदे व चिंतोबा यैसे हिंदुस्थान प्रांतात आहेत ते चाकरीवर आहेत. ते आलियावर पुढें आनखी फौज ठेविणें तें ठेविली जाईल. परंतु माहादजी सिंदे याचे अनकूल पडत नाहीं यैसे पष्ट बोलली. --पे. द. भाग २९ पत्र नं. ११

अकारीब--जवळचे लोक, नातलग.
१ हुजूरचे अकारीब. --राजवाडे खंड १५.
२ तुम्ही सर्व त्या प्रांतीचे अकारीब. जावें न जावें.
--राजवाडे खंड १ पृ. २८१

अकीन (यकीन) --खात्री, दृढमत.

अकीलदाना--सर्वज्ञ.

दराज काये लिहिणे आमोहिबापन्हा अकीलदाना आहेती.

--शि. च. सा. खं. ५ पृ. २६

अखबार--वर्तमान, बातमी पत्र, हकीकत.

छ २० जिल्हेजची अखबार सरकारांत आलीजे.

--खरे ऐ. ले. सं. पृ. ४२२७

अखवती--(?)

कोट जंजिरा कुलाबा येथें गलबत वेताळप्रसाद याजवर अखवतीस जिन्नस

४॥· दारु	१० गोले तोफा
४४।· काबाल वुंच	१५० गोले
----	----
४॥४	१६०

या शिवाय कलफतास जिन्नस लागला तो खर्ची पडलेला आहे

४॥३ तेल

४४४।९ कापूस

४४४॥ कारी

कु आं ढ ३९९

अखवानजी-- पंतोजी.

आमच्या अखवानजीला व्याकरण किंवा गणित फार चांगले येत होते असे नाही.

--अरुणोदय पृष्ठ १८

अग्निडाग--अगिनडाव, अग्निदाह, दहनविधी.

जमातदार पडले होते ते रणातून शोधून काढून कोणास पुरविले व कोणास अग्निडाग दिले व ज्यांची ओळख पुरली नाही असे जे सरदार चाकरमाने होते त्यांस एकेक्या गर्तेत शेपन्नास घालून खांचा बुजविल्या.

--पाणि. बख, पृ. २७

अगत्य-सागत्य—आगत-स्वागत.

दोनचार रोज राहून अगत्य-सागत्य बोलणें झालें छ २२ जिलकादी चिंतामण नाईक ओंकार यास वस्त्रे देऊन बराबर पहारा देऊन काशीकडे रवाना केले.

--नाग २ पृ. १५४

अगत्या-अगत्य—अगत्यापुरता, जरूर तितका.

सारांश हा ऐवज सत्वर आणऊन आगत्याअगत्य फौजेच्या समजाविशीस खर्च करणें.

E. M. P. पृ. ४२

अग्रवादी—फिर्यादी किंवा वादी.

येणेप्रमाणे उभयता अग्रवादी व पश्चिमवादी यांचे राजीनामे लिहून घेतले आणि उभयतांस बहुडा दिधला.

—मा. स. प. भा. पृ. ११७

अंग देणें (एखाद्याकडे)—एखाद्याकडे फितूर होणें किंवा त्याच्या पक्षास जाऊन मिळणें.

भितरवार (भदावर?) गढी मातबर, जागा कठिण, एक-रूखी लढाई. त्यात भगीरथ शिंद्यानीं अंग भितरवारकराकडे दिलें. मग तर भितरवारकर फारच बहकला. — म. शि. यां. का. पृ. ५४२

वादज सैद इसूफ फौजदार आम्हाकडील याने सावनूरकरांकडें अंग देऊन बेइमान होऊन तमाम किल्ल्यांतील लोक फोडून दगा करून आम्हास कैद करून किल्ला सावनूराकडे द्यावासा मनसुबा केला.

—पे. द. २८ पृ. २४३

अगाध—कठीण; अवघड; तुंबळ; घोर.

त्याचे पारिपत्यास अगाध नाहीं. परंतु पुण्याचीं पत्रें मळमळीत येतात. म्हणोन उतावळी करितां येत नाहीं.

—ऐ. ले. सं. पृ. ३९४०

त्याणे तोफा लाविल्या युद्ध मांडले. यांची अगाध युद्धाची तजवीज नव्हती परंतु तो चालोनच आला, सबब करणे लागले.

—ऐ. ले. सं. पृ. ८०५

अगारी—आघाडी, पुढाकार.

हिंदुस्थानांत तो यैसा कोण्ही दिसत नाही की अगारी घेऊन स्वामीवर यावे.

—पे. द. १५ पृ. २६

अगिनडाव—अग्निडाव, अग्नि देणे.

राजे याचा मुरदा चारी प्रहर दिवसपर्यंत होता. मग सुभेदारांनीं कारभारी आपले मातबर दोघे पाठऊन व सेला पाठऊन अगिनडाव दिधला.

—हो. कै. पृ. १९७

अचगुल—अचकूल, अशक्त, जखमी झालेले.

माणकर यांहीं सांगितलें कीं आजारी अचगूळ लोक असले तर तुम्हीं जिथीचे किल्लेचे भरतीस ठेवणें व तेथील लोक स्वारीस घेणें.

—पे. द. ३४ पृ. ३७

अचेष्ट—अतिशय, कमालीची, नितांत.

जर सोडुन अनंतपूर फिराल माघार।

तुझ्या आईच्या लावशिल हात निरीला म्होरं ।
तेव्हा निपाणकराला अचेष्ट पडली इर (ईर्षा)

—ऐ. पो. के. खं. २ ा १११

अचंबर—आश्चर्यकारक, अचंबा वाटण्याजोगे.

आवतरणासाठी बोडद शब्द पहा. —ऐ. पो. के. ख. २ पृ. २१०

त्यानी बोलाविले बहु कोरवी बेलदार ।
खंदकाचें लाविलें काम अचंबर ।

—ऐ. पो. के. खं. २ पृ. १८६

अज् कदीम—पूर्वी पासून.

अज् कदीम इनायत असे. —वाड मा १ पृ. ६५

अज्म— निश्चय, बेत.

हुजूरीहून हैदरअलीखानाची तंबी करावयाचाच अज्म होऊन त्याचे पारिपत्य जाहाले पाहिजे. —पुणें अखबार भाग–१ पृ. ११८

अज्यजादी—अजनाबी—अपरिचित (मूळशब्द अजनबी ?)

पैकी दोन राहिले त्यास ततबीर नाहीं. आपण बाहीर ततबिरीस फिरत होतो त्यास अंज्यजादी हिंडता पुढें ततबीर कोठे नव्हे. मग आपण तुम्हापासी नगरास आलो. येऊन होन घेऊन सदरपैकी आपण तुम्हास मोकदमो निमे तवरत (तवरख) बंध दिधली आहे.

—शि. च. सा. खं. ५ पृ. १३

अज्याईब—अजब, अनपेक्षित, अपूर्व.

नबाबसाहेबानीं हुसेनखान दिवाण याचे मारीफितीनें मुलाजमतीस येणें म्हणून फर्मावलें, हें अज्याईब गोष्ट जाली. —पे. द. २५ पृ. ११

अज—पासून, मुळें.

अजचैन— सरस कट कत्तल.

छ ८ सफरी शहरांत अजचैन जाले. कतलेमधे तीन चार लक्ष माणसे कतल जाली.

—पुरं. द. भा.३ पृ. १६७।६८

अजतरफ—बाजूने, कडून.

अजतरीक मेहर्बानी—कृपापूर्वक.

अजतरीक मेहर्बानी दरखास्त करितात की व्याज माफ करावे–रे. अ. ६१

अजबायस, अजबायेस—कारणामुळे, कारणानें.

अजबायेस बिमारी (आजारामुळें) —पा. म. प. व. पृ. ११४

अजमाईसीस येणें—निदर्शनास येणें किंवा अनुभवास येणें.

शिरके यांजकडोन किला घेतला असला तर त्याचा इलाज होईल. अमा तुम्हाकडोन ही गोष्ट जाली नसावी सेवक बोलिलो कीं आमचे

तर्फेनें हें गोष्ट येकंदर जाली नाहीं. पुढें आपले अजमाईसीस येईल.
--पे. द. २५ पृ. ३४

अज्रा; अज्राहे--रस्त्यानें; मार्गे; पूर्वक--

अज्राएख्लास--स्नेहपूर्वक.

पारचे पाठविले असे अज्राएख्लास घेतला पाहिजे.
--राजवाडे १० पृ. ११८

अज्रा मन्हामत--कृपेने; कृपादत्त; बक्षीस.

हे वतन....यास अज्रामन्हामत वतन करून दिलें असे.
--राजवाडे ८ पृ. ४७

आज्राहे-खानगी--घरोब्याचे रीतीनें.

आम्हाकडे अज्राहे-खानगी सांगून पाठविले होते.
--राजवाडे ५ पृ. ८५

अज्राहे-दोस्ती--मैत्रीपूर्वक.

परंतु अज्राहे-दोस्ती तुम्हास गोश्गुजार करून ठेवितो हे निमित्य उलट येईल.
--राजवाडे ५ पृ. १६४

अजनुजवे--?

शेटचांजी हणमंतराव निंबाळकर याकडे चाकर होते ते समयी आपण अजनुजवे मुकासबावेचे खंडणीबद्दल निंबाळकराकडे गेलो होतो.
--ज्यू २७६

अजब करणे--आश्चर्य करणें.

नामदेव शिंपी काशी--यात्रेस जात होता या-सवे पोहा होता तो मोगले आडविला आणि त्यास बोले तूं भूतखाना पूजितोस--मग कंदोरी आणवून नाम्यास खायास बैसविले--वरला रुमाल का तां फुलें झालीं--मग पातशाहा अजब करी.
बिब. १६

अजरा-मन्हामत--कृपेने, कृपेने दिलेला--लें बक्षीस.

हें वतन यांस अजरा मन्हामत वतन करून दिल्हे असे.
--रा. खं. ८ प. ४७

अजराह--अज्राहे.-अजराहें म्हणजे पूर्वक किंवा मार्गानें.

निळो वामन एक सक्स त्यापाशी होता. त्याच्या सांगितल्यावरून अजराह कावीस (काविशीच्या मार्गानें म्हणजे लबाडीच्या मार्गानें) आपणास पुरसीस करूं लागले.
--म. द. रु. ३ पृ. २९

अजराहदोस्ती--मैत्रीपूर्वक.

दोस्तीनामा पोहचोन खुशवख्ती जाली. शादीमुबारक हो सबकतशार, (बखत्-वार-सुदैव संपन्नता) हरिसिंग यांबाा कपडे खलअत बमोजीब

याददस्त अलाहिदे पाठविले असत. अजराहदोस्ती (मैत्रीपूर्वक) कबूल करणें मुबारक हो दराज काय लिहिणे मुस्ताक जाणिजे हे किताबती.
--राजवाडे खंड ११ पृ. २९

अज्-सबब--कारणानें.
अज्-सबब दूरी राह-रस्त्याच्या लांबीमुळें --प द म व ११२

अजम--निश्चय; मोठेपणा; अभिमान.
ऐशा समयास नबाब मौसूफ यांनीं अजम केल्यास पातशाही दाव व बहुत कामें घडून येतील. --दिमरा १ पृ. ४९
यास तर्वारीचा व जम्यतीचा अजम. --हो. कै. ६

अजम--सर्वश्रेष्ठ.
अजम चापलीन साहेब यांणीं दुववता फर्माईष केली. --पे. द.

अजहतीदार--मुतालिक, मुखत्यार, प्रतिनिधी.
मुधाजी मायदेऊ इही गोद गावडीयास धरून माफ करून करार होन बांधले यास जमान काटेदेशमूख याचे अजहतीदार जमान देऊन सोडिला.
--म. द. रु. ३ पृ. ३५

अजहदअदीक--प्रारंभापासून शेवटापर्यंत.
मुलकात मुराररावजीचा फिसाद अजहदअदीक. त्याजकरिता मुलुक तमाम पलतो. त्यामुल तहशील बंद होऊन सिपाह लोकास केली तनखा न पावता उठोन येताती. या मुलकातून मुराररावा जाऊन केली तनखा सिपाह लोकास नीरपाऊन --E. M. P. पृ. १३९

अजाईब, अजायब--अजब, ताजूब.
तुम्ही ऐशा गोष्टी करिता अज्याईब् आहे. --राजवाडे १ पृ. ५२

अजात--मुक्त.
त्यांचें देहावसान जालें ते समयीं तुम्हांस माथा तेल घालून अजात केले असे. --वाड शा. छ. २१३

अजान--प्रार्थनेच्या वेळी निमंत्रणादाखल होणारा पुकारा.

अजबाब किंवा अस्बाब किंवा अज्बाब--सामुग्री, सामान, सरंजाम, चीजवस्त.
खान मजकूर अजबाबसहित गिरफदार करून किल्ल्यांत रवाना केले.
--पे. द.

अजाप-- (क्रि. वि.) अल्लाद, अलगत.
जरा पाय पुढें टाकला असता कीं गडी अजाप उचलला असता.
--पे. द.

अजी--यापासून, यापुढें.
अजीपासून कुसुर न कीजे. --रा. खं. १ पृ. २४८

अजीदास्ते--या करितां, म्हणून.
—पे. द.
अजीबाद--यापुढें, या नंतर, अगदी, बिलकूल.
आम्हांकडे हंदराचा वकील आला होता. दोन लक्ष रुपयांची निशा करावी म्हणत होता. आम्ही नादी मात्र लाविलें आहे. जरी यांनीं अजीबाद दिल्हे, तरी शेवट कोणते तऱ्हेस जाईल पहावें! यास्तव गुंतत नाहीं.
—ऐ. ले. सं. १४३६
अजीबाद चेनापट्टणाकडे जाण्यास दिवसगत न लागावी; असी (अवधि) बहुत कमी राहीला.
—राजवाडे १० पृ. १६७
अजीबाद होईल ते नमूदास येईल.
--राजवाडे १० पृ. १९३
अजीबायस--यांकरितां; म्हणून.
अजीबायेस अर्ज ऐसाजे, साहेबानें फैजबक्षी करून लवकर जाब पाठवावया— विषयीं आहल्कारास आज्ञा सादर जाली पाहिजे.
--पद्मव ११२
अजीम— (वि.) अपार, अफाट.
दुतर्फा फौजा अजीम मिळाल्या आहेत.
--पे. द. भाग ३८ पत्र नं ५८
अजी सबब--याकरिता, म्हणून.
--पे. द.
अजींसोब--या मार्गें; या करितां.
--का. प्र. ई. सा. २२
अजुरदार–अजुरा घेऊन टपाल पोचविण्याचें काम करणारा जासूद किंवा कासीद.
हल्लीं त्या जासुदाची जबानी घेतली ते व जासूद गाडदी नि॥ राघो विश्वनाथ याजबरोबर पाठविला आहे. पावेल. याचे जबानींत विशेष काही नाहीं, फक्त अजुरदार आहे !
--पे. द.
अजुरा--जासूदकासिदांचा पगार.
रु. ४४ जयनगर ते पुणे २२ रोज
२६ पुणियाहून बेलूर १३ रोज
---
७० ३५
पैकी वजा ज्याजती रोज ६ येकुण रु. १२
बाकी कराराप्रमाणे अजुरा ५८ रु. देणे
--पे. द.
शिवराम नाईक भिडे याणी दुसरा अजूरदार करून आज्ञापत्रांचा लाखोटा व नासरजंगाची थैली यैसी सेवकाकडे पाठविली त्यास काय अजुरा दिला हें लिहिलें नाही
--पे. द. भा. २५ पृ. ४७
अजोरा--अजुरा, पगार, करणावळ.
१४५ रुपये किल्ले पुरंदर ब ॥ देणें भोई सरकारांत लग्नसंबंधें पालख्या

३ करून दिल्या होत्या त्याच्या अजोऱ्याबद्दल देणें निघालें तें.
—पे. सा. पृ. ४

अझाझ—मान, लक्ष्य.

अट्टाश—अट्टाहास; अत्याग्रह.
गंगाबाईनें सती जाण्याचा अट्टाश केला. मस्तक फोडून घेतलें, तेव्हां खोलींत घालून कडी घातली. —ऐ. ले. सं. ११९९

अटक—तुरुंग.
यादी बंदीवान अटकांत, किल्ले मिरज.
—ऐ. ले. सं ३७२०

अटक—(वि.) अवघड, दुष्प्राप्य.
तीर्थरूप राजेश्री रायांचा पुण्यप्रभाव विचित्र. तत्प्रभावेकडून मोठेहि अटक कर्म स्वल्पायासें होते. —पे. द. १० पृ. ४६.

अटकळ—विचार; समजूत.
कारभारी यांच्या अटकळेस आलें तर सलुख होईल.
—ऐ. ले. सं. २७०७

अटकळेस येणें—योग्य वाटणें; विचारास येणें.
हैदरखानाकडील लबाड कारभारी, त्यांस निरोप दिला. उत्तम केलें. उगीच नादीं लावून ठेवावें असा इतर सरदारांचा दरक, तो कामाचा नाहीं. अटकळेस आलें तरी विल्हे लावावें. लबाड बोलूं लागला तरी निरोप द्यावा, हें फार उत्तम, असें श्रीमंत बोलिले.
—ऐ. ले. सं.११७८

जन त्रिविध आहे. स्वामीचे अटकळेस आले तरी सल्ला करणे.
—ऐ. ले. सं. पृ. १३६५

अटसटा—अवाका, गवस, तावडी, हकटक, अटोका, अडसट्टा.
जर आपले अटसटीयात गोष्टी आली तर वेलास न चुकावे.
—पे. द. १५ पृ. १७

अटीचा रुपया—आटविण्यास योग्य असे खराब झालेले रुपये.
बापूजी नाईक भिडे यानी दिकत लिहिली आहे कीं रुपये आटीचे येतील त्यास बटा पडणार तर तेथील सावकारासी तुम्ही अटीच्या रुपयास बटा पडेल तो समजोन घेणे.
—शि. शा. इ. सा. भा. १ पृ. १०

अडखला— अडथळा, व्यत्यय.
फिरंगीनिवीस याचा माणूस आणीत होता. त्यास वाटेस चौकीस अडखला जाहाला. —पे. द. ३३ पृ. १२६

अड खाणें—आड खाणें; अडकाठी घालणें; हटून बसणें.
पुढें पागेचींच घोडीं, पडल्या घोड्यांचे ऐवजीं देणार, याकरितां लोक अड खातात. रोखच रुपये द्यावयाचा पंथ (वहिवाट) पहिल्यानें घातला, आतां पागेचीं घोडीं देणार, तेव्हां लोक अड खातात.

ऐ. ले. सं १८२८

अडत—अट.
मीं यात्रा केल्याचें पुण्य त्याजपाशी गहाण ठेवून तीनशें रुपये घेऊन वाटेस खर्च करीत आलों आणि त्याजला अडत लिहून दिल्ही आहे की आम्ही तुमचे व्याजसुद्धा रुपये दिल्यास यात्रेचें पुण्य आम्हांस मिळावें.

—जयराम स्वामी बखर पृ ३

अडत करणें—नेम किंवा व्रत करणें.
आम्हीं कोंकणांत कुलदेवतेस जाण्याचा नवस केला होता. त्यास एक अडत केली आहे जे दर्शन घेतल्याखेरीज कोठें भोजनास जावयाचें नाही.

—हरिवंशबखर पृ. ४७

अडशेरी— १ नोकराला दरमहाच्या उपजीविकेसाठीं देण्यांत येणारे धान्य
२ अडीच शेराचें एक वजन.
३ अर्ध्या पायलीचे एक माप.

अडसट्टा—अंदाज किंवा ठोकळ अंदाज, मोघम अंदाज. —विलसन

अडाणगावीक—शेती नसलेले किंवा शेती न करणारे गांवकरी. —विलसन
आम्हामध्यें कसवेमजकूरचें जोतीष देव दिवाण अडाणगावीक एकूण कलमें चार याच्या बोलण्याविसी कलह लागला.

—ऐ. सं. सा. खं. ४ पृ. ८५

अडाव—वाटेल ते हत्यार घेऊन लढणारा, आडहत्यारी.
असामीं एकूण बेचाळीस. अठरा अडाव, चोवीस बरकंदाज.

—पे. द. ३३ पृ १८५

अडावणी—गलबताचें सर्व बांधकाम झाल्यावर मालाचे सोईसाठीं आणखी एकदोन फळ्या वर मारतात अगर साठ विणतात त्याला अडावणी म्हणतात. 'अडावणीला येणें' म्हणजे जहाजाला जहाज, अडावणीला अडावणी, भिडवून लढाई करणें.
लोक म्हणती न येऊं शरणा। करु पेशव्याची नामना
सती होऊन बसलो सरणा। ये रे टोपीवाल्या अडावणीला।
आम्ही पेशव्याचे शिपाई निमक दाऊ तुजला.

—ऐ. पो. के. खं. २ पृ. २११

अडावणी करणें--गलबताला गलबत भिडवून हल्ला करणें.

त्याचेवस्तू श्यामलाचें (शिद्दीचे) गलबतासी अडावणी करवत नाहीं. —पे. द. ३३ पृ. ३८

अडिकंप--एडीकँप, शरीर संरक्षक.

टिपू सुलतान याजवर लाट कारनावालीस साहेब व अडिकंप मिस्तर पेरी साहेब व जनरल मेडूस साहेब व पेशवे सरकारातून हरिपंत वगैरे हरसरमोहीम तें साली तहनामे तीन्ही दौलतीचे ठरले.

—द. स. कै. या. पृ १००

अडीर—अडील, हटवादी.

शिंदेही अजिंठ्याचे घाटची लढाई वसली साहेबाची खाऊन पुरकस गळाठयांत आले पण तेही अडीरच होते. त्याकडे यशवंतराव होळकरास पंत मशारनिल्हे घेऊन आले. —हो. कै. पृ. १६७

अडु किंवा अड़--दोन तुळया अगर चिरेबंदी फरशी यांत मजबुतीसाठीं मारलेली लोखंडी पट्टी.

मालवण किल्ला बांधण्याचा मुहूर्त केला. पाथरवट असामी ५०० लोहार २०० आणून लोखंड २०० खंडी खरीद करून टावया, हातोडे, पहारा, अडु वगैरे तयार करविले (चित्रगुप्त)

--म. आ. पा. पृ. २४

अणी चोरणें--ऐन वेळीं माघार घेणें.

काटचादाटचांत गनीम सांपडला आणि अनी चोरली म्हणजे जीव जाग्यानिसी जाल यैसी ताकीद समजोन वर्तणूक करणें.

—पे. द.

अणीसी अणी भिडणें.--अणी म्ह. लगामाचे हातांत धरावयाचें टोंक किंवा शेवट. त्यावरून अंगाला अंग भिडणें.

दिवसांत वजीर व गाजुद्दीखान यांत मोठे जुंझ पडल्याखेरीज राहत नाही. आणीसी अणी तर येऊन भिडली आहे.

--हिं. द. खंड १ पृष्ठ ६७

अत्रक—अडथळा.

जुवा केळोशी साष्ठ (हा गाव) आपण अणभवीत होतो हली श्री चे सेवेठायी अर्पण केला त्याची कमाविशी महाजनी, आपण करीत असावी. आम्हाकडून किंवा वंशपरंपरेस (वंशजाकडून) सदरहू ठिकाणास अत्रक होणार नाहीं. आमच्या धोंदेवंशाचा नांवचा मेन कोणीही आल्यास उत्पन्नास (त्यास) प्रसादग्रहणी मात्र निर्दोषता असावी.

—शांतादुर्गा सं. इ. परिशिष्ट पृ. १२

अत्लस—काळसर लाल साटीण.

अत्लस हात चौदा

राजवाडे —३ पृ. १९

अतकाद—विश्वास.

अतकारी—रेशीम विणकरांची दक्षिणेंतील एक जात.

—(विल्सन)

अतजाद—मदत करणें.

अतलाद—नेमस्त.

अतियात— कृपा.

अद्यावत—अद्यापपर्यंत.

अमृतराव यांस आणावयास यांजकडून गेले आहेत. अद्यावत् आले नाहीं.

—ऐ. सं. सा. खंड ५ पृष्ठ ५७

अद्यावर—अद्यापवत, अद्यापपर्यंत.

पारावा आपल्या माहेरास जाऊन गोसावीण होऊन तिकडेच राहिली ती अद्यावर जिवंत आहे.

—ऐ. सं. सा. खं. ४ पृ. १३४

अदना—अडाणी, अज्ञानी, कनिष्ट, नीचतम.

आमचे नांवें मिरजेंतील अदना मनुष्य देखील दगड फोडीत असतो. त्यास एवढी समजूत जर आपण केलीत, तर मोठी गोष्ट होईल.

—ऐ. ले. सं. ६४१८

प्रस्तुतचा रंग तर असा दिसतो जे अल्ला व अदना खावींदापाशी बराबर.

रा. खं. ५ पृ. ९

अदब—अदबी, मुलाहीजा.

त्यांस याचा अदब ठेवितील तें करणें.

—हिं. द. खंड १ पृ. ५८

अदबखाना—तुरुंग, कैद.

यैसे बोलता मग अदबखाना घातले. तेथून बांदजी पलोन खोजेचे वाडीस गेला.

—शि. च. सा. खंड ५ पृ. १६४

अदब बजावणें—आदर दर्शविणें.

पाटीलबुवांनीं ५१ मोहरा नजर श्रीमंतांस करून अदब बजाविली.

—ऐ. ले. सं. ४६२३

अदमीयेत—अदमीयता, माणुसकी.

दीपसिंगजीनी स्तुति करतां महाराजाची किंवा स्वामीची फार केली तेव्हां त्यावरून नबाव दिलगीर जाहला. म्हणो लागला जे मजवर बाजीरायाचा इतबार अगर अदमीयेतेची वचनाची सत्यता वाटत नाहीं.

—पे. द. भा. १० पृ. ५८

अदलणें--बुडणें.

यंदा सेतेही अदललीं. दिवाणचा धारा वारतां संकट झालें असे. सारा लुकसानी धंदा झाला असें; आपणास गांवाहून निघालियावाचून उजगिरी होत नाहीं. --वै. ४ स. १७४३ पृ. ३६

अदवानी—होनाचा एक प्रकार.

—ऐ. ले. सं. ५६२७

अदा—वसूल.

अधवड—(१) अधोड. चामडें. म्हशीचें किंवा बैलाचें न कमावलेलें कातडें. (२) गुराचें कातडें घेण्याचा एक हक्क.

राजश्री तुकोजी धुमाल यांसी मुकासा दिल्हा आहे. तरी मुकासबाबेचा वसूल मशारनिल्हेचा देवणे व अधवड बकरे ऐसे देवणें.

—पे. द. ३१ पृ. ६

अधिवासन—देवतेची प्राणप्रतिष्ठा किंवा स्थापना करण्यापूर्वी आदल्या दिवशी तिला अक्षतांवर किंवा पाण्यामध्यें ठेवणे.

श्रीगणपतीची प्रतिष्ठा सप्तमीस निर्विघ्न झाली. शुक्रवारीं अधिवासन झालें. ऐ. ले. सं. ११९७

अन्करीब—जवळ, लवकर.

अन्जाम—निकाल, व्यवस्था.

अन्जुमन—सभा.

अन्नाचें खोबरें होणें—अन्न दुर्मिळ होणें. अन्नास महाग होणें.

वडलामाघरिया आम्हास अन्नाच खोबरं परंतु आम्ही आपले मेहनतीनें वा मर्दुकीनें जितराब मिळविलं त्यात वाटा देणार नाहीं.

—ऐ. सं. सा. खं. ४ पृ. १३६

अन्याय बक्षिस करणें—अन्याय माफ करणें.

त्याजउपरीं कृष्णशाहा सरकारांत येऊन पदरीं पडले. तेव्हां अन्याय बक्षिस करून फिरून त्यांची स्थापना केली.

—ऐ. सं. सा. खं. ३ पृ. २५९

अन्याय मागून घेणें—आपला गुन्हा कबूल करून तो माफ करवून घेणे.

त्यास आपण दरम्याने घालून आपला अन्याये मागोन घेऊन.

—पे. द. ३१ पृ. १७४

अन्योविन्य—अद्वातद्वा, भरमसाट अनन्वित.

जिकारनामक याची उमेद भारी. त्यांनीं बहुत उमेदीच्या गोष्टी अन्योविन्य बोलले. —ऐ. ले. सं. ५३४७

श्रीमंतांनीं या मार्गे बहुत उपेक्षा केल्या, त्यामुळें राज्य या थरास आलें. राजा कनवाळू कार्याचा नाहीं. ब्राह्मण कर्माविषयीं कनवाळू नसावा. पुढें अन्योविन्य होणार. एकवेळ निर्भीडपणें शासन करावें.

—ऐ. ले. सं ९८०

अन्वर—तेजस्वी.

अननगण—अन्नान्नगत.

वाळू मिया जंजिरेत हरएक जिन्नस जाऊं देत नाहीं. आणखी ४ महिने अशी मजबुती राखिली म्हणजे किल्ल्यास अननगण होईल.

पराग वर्ष १ अंक ११ पृ. २८

अनवळता—अचानक, न कळतां.

मारी अनवळता हात वर्शा हातचा उडाला. —ऐ. पो. के. खं. २ पृ. २७

अनवा—मसुदा.

पत्रें अगत्यरूप पाठवून द्यावीं. पत्राचा अनवा पेशजी पाठविलाच आहे.

—ऐ. ले. सं. २८६५

अनविश्वास—अविश्वास.

याणीं आमचे ठायी अनविश्वास धरिला ! यैसा कालगतीचा महिमा !

—पे. द. २६ पृ. १४७

अन्सार—नासिर, मदतगार.

अन—पासून.

अनसूट—अनुच्छिष्ट, एकदम ताजे तरुण.

अशा आवेशाचे पुरुष हजारो सिद्ध झाले. अनसूट, नव्या उमेदीचे, शिपाई-गिरीची शर्थ व्हावी म्हणून उमेदवारीने बिरदे बांधून घोड्यांस थापटून उभे राहिले.

—पाणि. बख. पृ. २३

अनमाहित—अपरिचित, माहिती नसलेले.

आप्पाजी कृष्णराव कारभारी झाले. परंतु या दौलतीस अनमाहित. तथापि सौजन्यतेचे पोटी सर्वांस आपलेसे करून दौलतीस आळा घातला.

—हो. कै. पृ. १९५

अनकरीब—ताबडतोब, जवळ, लौकर.

आम्हीं निमकहरामासी तंबी करणेंबद्दल भारी फौजसुद्धां अनकरीब येऊन पोंचत असों.

—ऐ. ले. सं. ६७३६

अनभोग—भोगवटा.

सदर लिहिलेप्रमाणें आम्हास वतन व इनामगांव अनभोग जाहले. त्यात तफावत नाहीं. लिहून दिली कैफियत.

—द. स. कै. या. पृ. २५४

अनमान—अदमास, अंदाज.

मोडाभौवता अनमाने अदसेरेक वजन सुरण ठेवून तो लावावा. म्हणजे फिरोन जेव्हढयाचा तेव्हढा भुईमध्यें होतो. —पे. द. ९. पृ. ४५

अनभव—भोगवटा, भोगण्याचा हक्क, अम्मल किंवा ताबा.

अवघे किल्लेदारांचे मनोगत (कीं) या देशामध्ये महाराजाचा अमल जाहलियाने आपल अनभव जाईल. नानापरी विचारांत पडले आहेत,

E. M. P. पृ. १५१

अनन्तर—नंतर.

मीं वारंवार विनंती केली कीं, पहिली चाकरी आम्ही करितों. अनन्तर दुसरी. पहिली सिद्ध जाहले व्यतिरिक्त दुसरी करीत नाहीं, ऐसे बोलिलों.

—ऐ. ले. सं. ६३५०

अनाज—धान्य.

अंजनवेलीचे वर्तमान तर (तेथें) अनाज नाहीं.

—पे. द. ३३ पृ. २७५

अनाझ—धान्य. —(विलसन)

अनार—डाळिंब.

विलायती अनारे या दिवसात तेथवर गरमीमुळें न पावतील.

—दिल्ली येथील म. रा. पारसनीस भाग १ पृ. ३३

अनास—अकस्मात्.

बरें श्रीहरी आहे ! ८–१५ दिवसांत सारें समजतें, तसें करावयासी येईल. अनास एकेकडून हैदरखान उठेल. तिकडून तसी गत असे. तेपक्षीं केवळ जमाव सोडिवतांहि येत नाहीं. —ऐ. ले. सं. ३२५०

अन्नास यजित होणें—अन्नास महाग होणे पारखें होणे.

घरेदारे प्रपंच केला तो सर्वस्वी हरण होऊन अन्नास यजित जाहालों.

—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. २८

त्या आतां यजित अन्नास दैन्य भाकिती ।

—प्रभाकर पोवाडा—सवाई माधवराव मृत्यु.

अनाहूत करणें—अकर्म किंवा अत्याचार करणें.

कांहीं गांवांस आग लाविली. वडरहटी येथील एक दोन बाइका नासल्या. फार अनाहूत केलें. ऐ. ले. सं. ४०८१

भालवणीस शिंद्याच्या लोकांनीं फार अनाहूत केलें. या धास्तीमुळें पंढरी, कासेगांव अगदी ओस जाहले. —ऐ. ले. सं. ५८२२

अनाहूत होणें--बंडखोर, अन्यायी, कायद्याबाहेरचा ठरणें.

धोंडजी बावास सामील झाल्यामुळें डबळ घेतल्यावर नाईक दोषारोपण होऊन अनाहूत जाहला. त्यासी धरून गळी दिल्हे.

--द. स. कै. या. पृ. २५९

अनीन--लगाम.

एकदांच घोडयाच्या अनीना उचलून मोहळाच्या माशा उडतात त्याप्रमाणें सर्वत्रांनीं उडी घातली.

--पा. व. ४५

अनुत्पन्न—गरीव, अकिंचन.

त्यावरून मनास आणिता ब्रह्मपुरीकर ब्राह्मण अग्नीहोत्री विद्यावंत कुटुंबवत्सल अत्यंत अनुत्पन्न यांचा सदरहू पाच चांवराही योगक्षेम सुखरूप चालत नाहीं म्हणून ब्रह्मपुरी इनाम दिधला. —मा. स. प. मा. पृ. १३९

ब्राह्मण अनुत्पन्न आहे, तैनात करून दिल्यास योगक्षेमाचें चालेल.

—केळकर संग्रह, लेले दप्तर

अनुपत—आपत्ती, अडचण, तोटा, संकट, सबब, तुटवडा, दुर्दशा.

चोहोंकडून अनुपत एकदांच आली आहे; कालाचें महात्म्य आहे.

—ऐ. ले. सं. २९९३

अशा नाना प्रकारच्या अनुपती मागतो सर्व सांगून नरसिंगराव-बावास त्रिवर्गकारभारी-याकडे रवाना करावे असें योजिलें आहे.

—ऐ. ले. सं. पृ. ३५०२

हल्ली या दौलतीस ज्या अनुपती प्राप्त झाल्या आहेत तशा मागेही झाल्या नाहींत व पुढेही होणार नाहीत.

—ऐ. ले सं. ८७

फौजेच्या खर्चाच्या वगैरे अनुपती लिहिल्या त्या तितक्या खऱ्या परंतु नाइलाज. ईश्वर सुवत्ता करील तेव्हां करो.

—ऐ. ले. सं. पृ. ५४६४

पितळेचें भांडें मिळतें परंतु चार मास भांडें टिकत नाहीं हे अनुपत राव मजकुरानी पाहिली तेव्हां उत्तम भांडी खोटीची (चांगल्या धातूच्या गोळ्यापासून बनवलेलीं) कल्याणीहून सुदृढ आणविणें.

—पे. द. भा. १८ पृ. १००

अनुपत्य—चणचण, दुष्काळ.

सबब इंगळे यांनीं आपले अंग काढून सरदारी राजाराम रणसोडदास याचे गळा घातली. नित्य गाड घोडे खर्चाची अनुपत्य जाणून येथें राहण्यांत आपली पुरें पडत नाहीं.

—इ. सं. हो. कै. पृ. १६.

सेवकाचा अनुपत्ये विचार. दूर करणार स्वामी धणी आहेत.

—पे. द. २६. पृ. १७०

अनुपती—अनुत्पत्ति; ओढ; चणचण; दुर्दशा.

तुमच्या खर्चाची अनुपती हें आम्हांस कळतें. परंतु आम्हांपाशीं आहे नाहीं, हेंहि तुम्हांस कळतच आहे. असतें तरी पाठवितों.

—ऐ. ले. सं. ४०९

श्रीमंतांनीहि सर्व लोकांची अनुपत्ती पहावी, आणि दोन महिने कृपा करून परत बोलवावें. —ऐं. ले. सं. १८५३

अनुफा अडिश्री—उल्का. पोटास धान्य.

जे शिपाई लोक सर्कार इंग्रजाकडून राहतील त्यास अनुफाअडिश्री श्रीमंत महाराज राजे देतील. —प. या. व. (काव्ये) ४०१

अनुभव भोगणे—प्रत्यय येणे, अनुभव येणे.

कोणाचाहि विस्वास धरू नका म्हणोन आम्हास आमचे आप्त आहेत ते सुचवितात. आम्हासहि अनुभव भोगतो.

—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. ७६

अनुष्टुप असणें—बिलकुल नसणें; फारच थोडें असणें.

आंत दारूगोळीचा आभाव आहे. मुख्य मीठ नाहीं. पाणीहि अनुष्टुप आहे. अवसानाची कमती दिसती. —ऐ. ले. सं. ६३६४

अनुषंग—सोबत. बरोबरचा जमाव.

तोतयास धरण्याचा हुकूम होताच शिंदे कूच करून गेले. होळकरास जाण्यास अनुषंगावरोधें-करून (बरोबरीच्या शिलेदारांनी पगाराकरतां धरणें धरून अवरोध केल्यामुळें) अवकाश लागला.

—हो. कै. पृ. ६९

अनुसंग, अणुसंग, आणुसंग—सूत्र, दळणवळण, दोरा, पैरवी, शिलशिला; धोरण.

कर्णेल कलुस याजकडील आणुसंग कसा ? येक दोन बैठकीही झाल्या असतील. खंडो महादेव याचे आणुसंग ठेऊन पत्राच्या रवानग्या पैदरपै करीत जाणे. —हो. इ. सा. प. खंड १ पृ. १४२

अनुसंकट—संकट.

या वितिरिक्त सोंधेकराचा (व) त्याचा एक सूत्र अंतरंगीत. बाह्यरंगी मात्र आम्हाकडे. नानाप्रकारें अनुसंकट येऊन पडले.

—E. M. P. पृ. १९७

अनुसंग— आश्रय. सोबत, संगत.

आम्हास या पायाखेरीज दुसरा अनुसंग आहे नाहीं हेही स्वामीस विदित आहे. —म. शि. यां. का. पृ. २५५

अनुसर होणें—कबूल होणें.

मग शिंद्यानी आपसांत समेट घालून मल्हारजी होळकर यांनी ठराव केला

त्यास अनुसर होऊन राजाच्या कारभाऱ्यास (दत्रावणी दिल्ही)
—ह्री. कै. पृ. १६

अनुसंगे करून—१ तर्फेने २ दिमतीस.
सदाशिव माणकेश्वर हे सवाई माधवराव पेशवे सरकार यांचे कारकीर्दीत व हीलीचे वगैरे राजकारणाचे लिहिण्यांत गोविंदराव पिंगळे यांचे अनुसंगे करून सरकारकामात वागत होते. —द. स. कै. या. पृ. ११५

अनोपाय— निरुपाय.
प्रस्तुत आमचा अनोपाय जाला आहे.
—पे. द. २९ पत्र नं. ९५

अत्रत्य—येथील किंवा इकडील.
दंडवत प्रणाम विनंति उपरी अत्रत्य कुशल पौष वहुल सप्तमी गुरुवासर पर्यंत असे. —पे. द. २६ पृ. १६६

अंत्र—सूत्र, संधान.
खानदौराचे व आणिक अमिरांचे अंत्र उडवावे ते कांहींच होत नाहीं.
—पे. द. ३० पृ. १०५

अत्राब—अत्राफ. जवळचे. नातलग.
रावजीनी बुणग्यांची निवड करून अत्राब, कारखाना व पांच हत्ती उज्जयनीस रवाना केले. —म. शि. यां. का. पृ. १७०

अंत्राय—विक्षेप, हरकत.
ऐसीयासी स्वामीसेवेत अंत्राय पडो पाहतो हेंच दुःख विशेष जाले आहे.
—पे. द.

अतलस—साटीन; रेशमी कापड.
सणगें पाठविली तीन—१ अतलस हात १४. १ पातळ पैठणी हात १६. १ सोळें काढावयाचें १. —रा. खं. ३ पृ. १९

अंतर—दोष, चक गुन्हा, आरोप.
पाटील बावांनीं बोलावून सांगितलें जे पुणेकरांकडे अंतरें दादासाहेब यांची वस्तभाव लुटून सरकारांत नेली. टिपूस खातरजमेचे पत्र पाठविलें. फरासिसाकडे वकील करून पाठविला, अशी अंतरे बोलून दाखविली.
—म. शि. यां. का. पृ ४०४

आम्हाकडे अंतर पोर मारल्याचें नाहीं. चौकशी करावी असे बोलत होते.
—ऐ. ले. सं. पृ. ५६६७

अंतर घेणें—अदमास पहाणें. अंतरंगाचा कयास घेणें. मनांतला भाव किंवा हेतु समजणें.
त्यांनीं येऊन निजामअल्ली यास मजकूर सांगितला की जाणूजी निंबाळ-

कर याणी बहुता प्रकारे खातरजमा केली अस्ता जाधवराव याजकडे जाऊन त्याचें अंतर घतो. —स. ब. पृ. २६

अंतरमाळा—आंतडी.

कोणाची शिरें तुटोन धडावेगळीं झालीं, कोणाची उदरें फुटोन अंतरमाळा लोंबू लागल्या. पाणि. बख. पृ ४१

अंतरविचार—अंतर्विचार. मनांतला. हातचा ठेवलेला, किंवा कपट.

त्यांचाही आम्हांसी कांहीं अंतरविचार नाहीं. —ऐ. ले. सं. पृ. ५५६

अंतर शीतल होणें—तळीराम गार होणें. आतून लाच खाणें.

नबाब शेवट करितील हा भरवसा आम्हास नव्हताच. नवाब मार्गें अंतर शीतल जाल्यावाचून माघारी कूच केले नसेल.

—म. शि. यां. का. पृ ६४६

अंतस्थ—लांच.

उदेपूरची खंडणी ऐन ५० लक्ष रु. व दरबारखर्च अंतस्थ १० लक्ष एकूण ६० लक्ष खडणी जाहली. —ऐ. ले. सं. १४३८

अंतरा—अंतर; फासला.

प्रसंग कोणते वेळस कसा पडेल हें न कळे. याजमुळें अलिजाबहादूर यांजकडील जमेत आहे, यांस अंतरा पाडावा हें ध्यानीं आणून कूच केलें.

ए. ले. सं. ६३६४

अतायत—ताकीद (?)

तुम्ही आपल्या पुत्रास व दामोदरपंतास पाठवून अतायत देणें. न यैकतील तर मी निघन. —हिं. द. खंड १ पृष्ठ ५८

अतिदेश—अतिदंश, व्देष; आकस.

चि. चिंतामणरावआप्पासुध्दां किती जमाव आहे हा आविर्भाव पहावा. कृष्णा उत्तरतीरास आप्पा आलेअसतां पलटणवाले गालब त्यांजवरच होतील. या पूर्वीचे अतिदेश आहेत. न व्हावे तरी संकट. या दोन्ही फौजा समीपच आहेत. ऐ. ले. सं. ६५२८

अतिवाद—व्देष, आकस.

आता सर्व लौकीक की, राजे आईसाहेब येकमत. तुम्ही आपले बलें हरामखोरीनें गडास वेढा घालता अशा वेढियानें अतिवाद मात्र वाढेल कार्यसिध्दी होणार नाही. पुरं. द. भाग १ पृष्ठ १८६

अतिशय— आग्रह. हट्ट. राग. उत्कट इच्छा.

त्यांचा अन्याय जाला तर तुम्ही क्षमा करावी हे तुम्हा योग्यच आहे. बहुतसा अतिशय न करावा. –शेंदुर्णी संबंधीं महत्त्वाचे कागदपत्र

—भाग १– पृ. ४

मोंगलाच्या लष्करांत महागाई. बहुत हयारानगतीत आला आहे. परंतु पुणीयासी यावे हा फारच अतीशय आहे. कलावे म्हणून लिहिले आहे.
--ऐ. सं. सा. खं. ३ पृ. ९९

अतिशय—अत्याचार.
" टिपूनें गांव मारले; ब्राह्मणांस मारिलें, कांहीं निर्नासिक केले, बायका धरून नेल्या, असा अतिशय केला. " —ऐ. ले. सं. १६२३

अंतीमती—अखेरीस; निदानीस.
तुम्हीं लिहिलें ज, श्रीरामेश्वराचे व कान्होबाचे पुण्येंकरून नसरूड गर्दीस मेळवितों. तर ही गोष्ट खरीच. तूं तैसाच बापापरीस कर्ता, पुरुषार्थी. किती केलीत तरी अंतीमती क्षेत्राचा धनी व कोंकणचा धनी श्री भार्गव आहे. हबशी याची गत कशी झाली?" —ब्र. च. पृ. २९४

अतुल—लबाडी, विश्वासघात, प्रतारणा.
तेव्हां आम्ही विनंती केली जे बाळाजीराव हजरतचा असा फिदवी आहे जे त्याचा भाऊ अथवा त्याचा लेक हजरतसी अतुल करील तर त्याचाही मुलाहिजा करणार नाहीं. --हिंगणें दप्तर खंड २ पृ. २४

अतोर्ध्वहि—त्यानंतरहि.
बादशाही कारभाराची दाटी अतिशय असते. गोसाव्याचे खलबत, उदय-अस्तमान, किंबहुना अतोर्ध्वहि. नित्यक्रम पाटीलबावांचा चालला आहे"
--म. शि. यां. का. पृ. ५०९.

(एखाद्याच्या) अन्नाचा असणें—एखाद्याचा आश्रित असणें.
स्वामीच्या पायासी विनंती पूर्वी केली आहे. कुटुंबी आहे. स्वामीचें अन्नाचा पुरातन आहे. आता दुसरें कोठे जाऊ? —पे. द. १० पृ. ३७

अप्रमाण—खोटपणा.
ऐसे केलीयानें अप्रमाण आपले पदरी येते ती गोष्ट फटकाळ. —पे. द.

अप्रमाद—दंगा, बंडाळी किंवा जोरा.
या प्रांतीं गोसावी यांनीं बहुत अप्रमाद मांडलो होती. याजकरिता येथून स्वारी पाठविणें जरूर झालें. —पे. द.

अप्रसिका—हरकत, अडथळा.
सरकारच्या सनदा सरदारांस आल्या कीं, ठाणीं मशारनिल्हेच्या स्वाधीन करणें म्हणोन. परंतु नवलगुंद तालुक्यास होळकर यांचें ठाणें बसलें आहे, त्याची मात्र अप्रसिका आहे कीं नवलगुंद तूर्त आम्हीं देत नाहीं.
—ऐ. ले. सं. ४१०३

अप्रसीका—शंका, आक्षेप.
ते सांगूं लागले जे फडणीसांनीं लाखच रुपये घ्यावे, बाकी जास्ती आकार

सरकारांत द्यावा, अशी अप्रसीका काढली. —ऐ. ले. सं. ६१४
(अप्रसिका हीं ४ अक्षरें एका श्लोकाच्या ४ चरणांच्या आरंभीचीं असून तो श्लोक कालिदासचातुर्यासंबंधीचा आहे)

अप्रसिका मांडणें—अडथळा किंवा तक्रार करणें.
त्याजकडे आमचा कब्जा आहे याजकरिता हवेलीस खगत्या न लावणें म्हणून अप्रसिका मांडली आहे. —पे. द.

अप्रसिध—अप्रसिद्ध, गुप्तपणें.
मुंबई व सुरतेस अप्रसिध तेथील वर्तमानाकरता पंतप्रधानाचे खिदमतगार व जासूद सदैव तेथे राहात आहेत. —पुणें अखबार भाग २ पृ. ८

अप्राथित—आगंतूक; अनपेक्षित, आकस्मिक.
दरम्यान गलबली ज्या ज्या प्रकारच्या अप्राथित पडतात तर पडोत. —नाग. १ पृ. ६०

अपभ्रंशीं पाडणें—भ्रष्ट करणें, कुळास कलंक निर्माण करणें.
साहेबीं (म्ह. ताराबाईने) आज्ञा निरोपिली की आधी पुर्ता शोध होऊं द्या मग प्रायश्चित द्या. तेहि कोणाच्या चित्तास नये. तोही विधी केला. नंतर मुंजीबंधन व शरीरसंबंधाच्या निकडी होऊं लागल्या ते समयीहि आज्ञा करीतच गेलों की त्वरा कार्याची नाहीं कार्यभागी (कारभारी) न समजेत. ऐसी वर्तणूक करून अपभ्रंशी पाडिले. गोतपत आरंभिली! —इ. सं पे. द. स. प. मा. पृ. ७

अपराधकर्म—व्यभिचार, बदअम्मल.
कोंडो मल्हाराची भावजई विधवा इजपासून अपराधकर्म घडलें सबब गुन्हेगारी ८०० रुपये. —ज्यू. ३६४

अपलौकिक—दुलौंकिक.
इंग्रजानें वसईस वेध लावून घेतली हे अपलौकिक लोकांतरीं काय आहेत (ते) श्रवण करावे." —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १०५

अपस्वार्थ—स्वत:चा वैयक्तिक स्वार्थ.
श्रीमंतांचे राज्यांत फळी बांधून (स्वतंत्र एक पक्ष निर्माण करून) धनी माथ्यावर नसता अपस्वार्थाकरितां बखेडा करावा हे नेकसल्ला नाहीं. —हो. कै. पृ. ६१

अपसव्य—आबा पुरंदऱ्याचे सांकेतिक नांव.
श्रीमंत मुख्या जवळी त्या ज्ञातीचे निकटवर्ती आहेत. अपसव्य केवळ आप्त-वर्गांत. तैशीच एकबोटच्याची वत्सें (मुलें बाळें) निकटवर्ति. —ऐ. ले. सं. पृ. १०४

अपसानी—हबसाणी; कागदाचा एक प्रकार.

पत्रें येतील तीं माना (मायना) नीट लिहून सलाम लिहीत जावा. आणि गौल्यता नीट पत्रांत असावी. थैल्या चांगल्या व अपसानी कागद या प्रमाणें पत्रें येत जावीं.

—ऐ. ले. सं. ८२२८

(एखाद्याचा) अपाय होणें—ठार होणें.

नागोजी आंग्रे व लोक २० असामी यांचा अपाये जाला. हल्ली विसाजीपंत व राव ठाकूर देसाई यांजवर तुफान आले. राव ठाकूर पळाले. कबिला धरून विजेदुर्गास नेला ऐसी तुलाजी आंग्रे यांनीं बेकैदी केली त्यांचें पारपत्य नाहीं.

—वै. ४ स. १७४३ पृ. ५

अफगन्दन—टाकणें.

अफ्जाल—फज्ल, प्रावीण्य.

अफ्ज़ूनी—अधिकता.

अफ्ताब—सूर्य.

अफताब अस्तास कां जात नाहीं? —चिटणीसकृत थोरले शाहू च. पृ. ६१

अफ्तर होणें—नासणें; बिघडणें.

गायकवाड तो सर्व देश लुटीत सातारियासच आला. याजमुळें भागानगर व कर्नाटक प्रांतींचीं कामें अफ्तर जाहालीं. --रा. खं. ३ पृ. १२०

अफजायश—वाढ, आधिक्य.

हुजूर जाऊन इनायत ताजी संपादलिया अफजायश आबरु आहे.

—पुणें अख. भाग १–पृ. २६३

अफ्राद—नोकर, परिचारक.

—रा. व्य. को.

अफरातफरी होणें—परागंदा, उध्वस्त.

गोपालराव याच्या अमलांत परगणे बडवे व खांडवे येथील रयत अफरातफरी जाली त्यामुळें प्रगणे खराबाखाली आले

—पे. द. भाग २९ पत्र नं १३१.

अप्तर—दोषयुक्त; बिघडलेले.

तितका बयान श्रीमंतास लिहिला असता तर बाजी अप्तर होती

—राजवाडे ५ पृ. १६६

श्रेष्ठ स्थलचे नृपास पैत्य भ्रमाचा उपद्रव फार जाहला होता सबब पांच महिने काम अप्तर जाहले.

—राजवाडे १० पृ. २८०

अप्तरी—बिघाड; नुकसान.

यांत कांहीं विपरीत दिसल्यानें अधिक सावधगिरी जाली म्हणजे गोष्ट बहकण्यांत येऊन अप्तरी होईल.

—राजवाडे ७ खलप २ पृ. ११६

अफ्तरी—दैन्यावस्था.

राज्याची अफ्तरी. —इ. पु. स्त्री. पो. २३१

अफ्राद—एकटा.

हल्ली विसाजीराम, कृष्णाजी वाबदेऊ याचा फर्जंद हा अफ्राद देशपांडेगिरीचा वारीसी होय. —भा. इ. सं. मं. १८३४ अह. पृ. ५७

अफ्लाद; अफ्वाद; अहफाद—मलीची प्रजा.

अव्लाद अफ्वाद (वंशपरंपरा) देविले असे —राजवाडे १५ पृ. १५९

औलाद व अहफाद चालविजे —राजवाडे २० पृ. १४१

अफराद—चाकर, नोकर.

या कामास अफराद पाठविले आहेत यांस वेतनास खर्च दहा रास देविले असें. —ऐ. सं. सा. खं. १ पृ. ११३

या कामास लखमोजी चव्हाण व रायाजी पवार अफराद दि॥ लबे (टपाल) पाठविले आहेत. यासी वेतनास रुपये ४ रास देविले असे. —पे. द. भाग ७ पृ. ५

पागेबरोबरच्या बाजे लोकांच्या यादीत.

रु. १४ अफराद

,, १८ शालोत्री (घोडवैद्य),

,, २२ जाजुनगो (?) इ. लोक आहेत. —पे. द.

अफ्वाज—फौज, सैन्यें.

अफजाईस—वाढ. —पे. अ. ६१.

अफरातफ्रीक; अफरातफरा—विकीर्ण; परागंदा; बेपत्ता; नष्ट.

हिंदू माणूस होते तेही अफरातफरा जाले. —राजवाडे १० पृ. २९८

अस्सल तहनामे विठ्ठल सुंदर यांचे गारतीचे वेळेस अफरातफ्रीक जाले. —राजवाडे ७ पृ. २२३

अफरातफर—लवाडीनें केलेला अपहार.

किल्ल्यावर लोकांचा ऐवज नक्त वगैरे असेल त्याची अफरातफर होऊं न देतां जप्त करून ठेवणें. —वाड स. मा. ३ पृ. ६५

अफलातून—मूळ शब्द ॲरिस्टॉटल. त्यावरून पर्शियन भाषेंत अति बुद्धिमान्, विचारी, हुशार अशा अर्थी अफलातून शब्द रूढ झाला आणि त्या शब्दाला पुढें लक्षणेंनें अगदीं विरुद्ध असा अर्थ प्राप्त झाला! तो अर्थ म्हणजे विक्षिप्त, माथेफिरू, बेछूट. आपणाकडे बृहस्पति शब्दाची अशीच परवड झालेली आहे. "फौजेत बैदा, तथापि आज वीस हजार तरवार नागवी, लोक एका परीस

एक अफलातून, फकीर होऊन (मोहरमात) मागावयास आले. हेंही एक नांव आहे." (अशा लोकांना खूष केल्यास एकदम आपला लौकिक वाढल.) —हो. कै. पृ. १०२

अफवाई वर्तमान—लोक बोलतात तें. अफवेचे.
विजयदुर्गास धरलेल्या जहाजात पावने तीन लक्ष पुतळ्या आहेत यैसे अफवाई वर्तमान. —पुणें अखबार, भाग १ पृ. २३१

अफसाणी किंवा हबसाणी कागद—सोन्याचा वर्ख लावलेला सोनेरी बुट्ट्याचा विशिष्ट कागद. मातब्बर लोकांना पत्रें लिहावयाचीं असतां अशा उंची कागदाचा उपयोग करीत. —(विल्सन)

अफसोस—आक्रोश, हायहाय.
श्रीमंत त्याविशीं खटे जाले आहेत. हरघडीस तोच अर्थ ध्यानास येऊन अफसोस करितात. —पे. द. २६ पृ. १७८

अफूचा गाळावा—गाळलेली अफू किंवा अफूची गोळी.
तेव्हां राठोडांनीं घोडे कसे घातले ? अफूचा गाळावा घेऊन ! उजवे हातीं हुक्का (हातगोळा किंवा हातबाँव) डावे हातीं अनीन, अशा चालीनें गेले. रणगाडे तरवारीनें तोडून, तोफावर तरवार चालविली. —हो. कै. पृ. १०५

अफूचा गाळावा घेणें—पैजचा विडा उचलणें किंवा आण प्रमाण करणें. अशा वेळीं अफू गाळून प्यावयाचा कांहीं विधि रजपुतांत होता.
--इंद्रसिंग (सवाईसिंगाचा भाऊ) व शिवचंद भंडारी व बुधसिंग सर्व एकत्र होऊन परस्परें निखालसता करून अफीम गाळून प्याले. आणभाष क्रिया केली जे, सवाईसिंगांनी बक्षीसी दगा करूं नये. बक्षीनें सवाईसिंगासी नासूं नये. —हो. कै. पृ. २१८

अब्कार—मद्यें दारू तयार करणारा. (विलसन्)

अब्नाल—म्यानाची सांखळी. —राव्यको

अब्लक, अब्लख—काळे व पांढरे ठिपके असलेला (घोडा).

अबचक—पाणी वाहून नेणारी मोरी. (विलसन)

अबदकरार—शाश्वत.

अबदी—शाश्वत.

अबद पैवंद—शाश्वत.
दौलत अबद पैवंद —रा. खं. २० पृ. २८६

अबूतर—अपतर, बिघडलेले दोषयुक्त.
नवाबसाहेब हुजरत फिरदोस आरामगाहासी किबले यांत विरोध पडला, याकरितां हिंदुस्थानचें काम अबतर झाले. --हिं. द. खंड १ पृष्ठ ५९

अबरवां-वाहणारे पाणी. त्यावरून सरळ, अखंडितपणें.
आपले काम अबरवां चालो नेदीता कुसूर करू लागले.
--शि. च. सा. खंड ५ पृ. १६९

अबाजा-संबंध, हक्क, अधिकार, तालुका (संबंध).
नवीं जिकीर करून मठानजीक माती खणावया तुमचे काय अबाजा आहे ?
—रा. खं. १५ पृ. ५९

अबाब-वसुली जमाखर्चांत येणारी एक बाब .
धान्य गोळा केल्यानंतर त्यांतून निरनिराळ्या हक्कदारांचे हिस्से वजा केल्यानंतर शिल्लक राहणारा सरकारच्या मालकीचा धान्याचा हिस्सा
(विलसन)

अबीर—एक सुगंधी मिश्रण.

अबू— बाप.

अबूदियत—स्वामीनिष्ठा (?)
हरी गोविंद राजे यासी हजूर पाठविले बहुत बरे केले. यावरून नकश अबूदियतेचा कलला. तुमचे वडिलावडिलापासून सिवायेखानजादगी गोष्ट जाहली नाही.
—हिंगणे दप्तर खंड २ . १९

अभक्त—नावड; तिरस्कार.
सरकारचे दौलतींतील मागील मातबर मुत्सद्दी आहेत, त्यांचे जागा श्रीमंतांची अभक्त. सहजांत निर्माल्य होतील तिकडून करावें; हा भाव सात पडद्या आंत आहे.
---ऐ. ले. सं. ६७९६

अभक्त---रुष्ट.
आता ऐकतो कीं तुम्ही नानावर अभक्त जाहला आहा.
--पे. द. ८ पृ. ३१

अभय डिंडिम---एखादें शहर काबीज केल्यानंतर रयतेला अभय दिलें आहे असें जाहीर करण्याकरितां नगारा वाजवून दिलेली इषारत. (विलसन)

अभर---(वि.) तृप्त.
अटेरीस युध्दच थोर जाले. श्रीमंतांचा जय झाला. लष्कर अभर जाले. (लुटीमुळें)
--पे. द. १५ पृ. २९

अभर, अभार---गांवचा वसूल. कच्चा अभर किंवा अभार—(याचा अर्थ) कांहीं वजा न देतां एकूण जमा केलेला वसूल.
(विलसन)

अभाव--भाव; भास; भीति; संशय; हेतू; डाव; देखावा.
कुडाळकर सरदेसाई पंतप्रधान यांच्या तालुक्यास उपद्रव करणार म्हणोन लिहिलें. तर लिहिला मजकूर आज दिवसपर्यंत दृष्टीस पडोन आला नाहीं. उगाच अभाव मानावा ऐसें नाहीं.
—ऐ. ले. सं. ३६६८

त्याचा अभाव (भाव) मामलत फेदीस पाडावी, मागील रुपया बुडवावा, व पुढेंही कोणे गोष्टीचा थाक नाहीं असें करावें. हें योजिलें आहे.

—ऐ. ले. सं. ९९२

याप्रमाणें मसलती करतात. कित्तूर प्रांतांत जावयाचा अभाव झाला असतां, आतां बंकापूरचा किल्ला बांधावयास काढिला आहे.! !

—ऐ. ले. सं. ५७४०

वाडीचा आपणास अभाव पडला असेल की आम्ही त्यांत काही खाल्ले असेल ! तर ही (गोष्ट) घडावयाची नाही.

—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. ७८

अभिमानास झोंबणें—मनःपूर्वक अभिमान धरणें.

आपण आजतागायत इकडील साभिमानास झोंवतां व आम्ही येथील विचार आपल्यावरच सोंपविला असतां, या लक्षांत दुसरा लक्ष कसा कामास येईल ?

—ऐ. ले. सं. १४६७

अभोगत—मोघम (?) स्वाधीन (?)

शिवनेर किल्ला त्यांजकडे (मोरोबादादांकडे) आहे, त्याचें अभोगत आहे. परंतु घ्यावा असें यांचें मानस आहे. घेतील असें वाटतें.

—ऐ. ले. सं. ३३११

अमृत—विष.

आप्पा बळवंत यासी घाटगे पैका मागूं लागले. पुढें कसें घडतें तें समजेना. (म्हणून) त्यांणीं रात्रौ अमृतप्राशन केलें व देवाधीन झाले.

—ऐ. ले. सं. ५३८४

अमृत महाल—म्हैसूरकडील बैलांची एक नामांकित जात. म्हैसूर प्रान्तात लष्कराला लागणाऱ्या गुरांसाठीं किंवा बैलासाठी जीं खास कुरणें राखलेली असतात त्यांनाहि अमृतमहाल अशी संज्ञा आहे. (विलसन)

अम्न—सुरक्षितता.

अम्मा, अमा—पण; लेकिन्; परंतु.

अमदानी—मुक्काम; वस्ती; आवक. स्वारी.

प्रस्तुत पंतप्रधान यांची अमदानी कोणते ठिकाणीं झाली, नदी कोणते उतारास उतरतात हें लिहावें.

—ऐ. ले. सं. ११८४

कदाचित् आवंदा कर्नाटकास अमदानी न होय, तेव्हां भारी मनसुबा येऊन पडेल.

—ऐ. ले. सं. १४१०

अमल कलम—क्रियालेख. लेखी करार.

अमलनालास, अमलनालीस—फिर्याद.
अवतरणासाठीं ' फिकरा ' शब्द पाहा.
—पुणें अखबार, भाग १ पृ. ११०
बोलण्यांत गोष्टी आल्या असतील परंतु दस्तैवज अथवा वचन शपथक्रिया अमल कलम असें कांहीं झालें नाहीं. —रा. खं. ५ पृ. १५.

अमला—(अमील्चें अनेकवचन) कारकून.
तालुक्यांस अमेला योजून बंदोबस्त पोक्ता करावा.
—रा. खं. ७ पृ. ४५

अमल फर्माईश—गांवच्या एकूण वसुलांतून वसुलीअधिकाऱ्यांना द्यावयाची फी वजा टाकतात ती. (विलसन)

अमली—सर्कारताब्यांतील.
हिंदुस्थान गुजराथपर्यंतचा मुलूख अगदीं अमली आहे आम्हीं वाटेनें काय खावें ? —खरे १ पृ. ७९

अमले फाले—अमलाफैला, कार्कून, कामकरी, नोकरचाकर.
खान मजकूर दरजबाब आरज करून पाठविले की ३० रुपये सालखर्चास महाराजाचे बहादरानी करार करुन दिल्हे आहे. माह बमाह पोचतात आणि अमलेफाले हुजूरचे मुखत्यार आहे.
—हिंगणे द. भाग २ पृ. ८१

अमवाल—द्रव्य, संपत्ति.
येलची याही बादशहासी बहुत सख्त रदबदली करून शुजाउद्दोलाचा अमवाल इच्छून, काही द्रव्य घेतले व बहुत तगादा केला.
—हिंगणे दप्तर भाग २ खंड ५.

अमसर— फार.
खान अलीशान गोरीखान फौजदार ठाणे मजकुरास येऊन पोहोचले. पाहाड मजकुरे दरवाजे बंद करून सिदतीजंग केली. किल्ल्यावरून पथरबाजी केली. खानाचे लोक अमसर जखमी जाले. जरूर जाणोन खानाचे लोकांनी तीर तुफंगाची मार केली.
—शि. च. सा. खं. २ पृ. १३२.

अमीर अकारिब—सरदार व नातलग आणि आप्त.
मग मसनदेवर जाऊन बैसिले. तमाम अमीर अकारिबाहीं नजरा दाखविल्या. —पे. द. २५ पृ. ९५.

अंमलदखल—अंमल.
आपला अंमलदखल परस्तुत (सध्या) तेथें चालत आहे.
—पे. द. १४ पृ. ११

अमला फैला—१ सरकारी राज्यखात्यांतील लहानमोठे अधिकारी; २ अंमल.
दिगर हिमाती निलो सोनदेऊ अजदिवाण शिवाजीराजे भोसले यांचे सगेसोयरे सदरहू अमलाफैला असता दिलीहून पातशाही फौजा दक्षिणेवरी मोहीमदारी
—पे. द. ३१ पृ. १७१

जंजिरियांतील हवसियासी रायेगडचा मजकूर करावा तरी ते मान्य करून यास आत घेत नाहीत (बरे) याची स्थापना करावी (तर) याचा अमलाफैला जालियावर मग हा रायेगड देईन म्हणतो.
—पुरं. द. भा. १ पृ. ७५

यांचें पारिपत्य करून धाराउज्जन येथें अमलफैला तुमचा होऊन, पुढें चाल चालू झाली म्हणजे एकसमयावच्छिन्न लहानमोठे रजवाडेयांचे वकील तुम्हापासी आणतो.
—हो. कै. पृ. ८.

अमा—पण, परंतु.
शिरके यांजकडोन किला घेतला असला तर त्याचा इलाज होईल. अमा तुम्हाकडोन ही गोष्ट जाली नसावी ? सेवक बोलिलो कीं आमचे तर्फेनें हें गोष्ट येकंदर जाली नाहीं. पुढें आपले अजमाईसीस येंईल.
—प. द. २५ पृ. ३४

हे जागा बंधारीया ल्याख आहे मेहनत वहुत आहे टक्का खर्च होईल अमा पानी पोहचल
—ऐ. सं. सा. खं. १ पृ. ११२

अमनचैन—अमनचमन, शांति, समृद्धि, मौज.
—पे. द.

अमल किंवा अमाल—१. कार्य किंवा कार्यवाही २. गुंगी. ३. वेळ.
१. पुढे अमलात येईल ते मागाहून विनंती लिहूं.
—पा. दि. म. रा. भा. १

२. फुलसरा पिऊन शिपाई झोंपलेस त्या अमलांत शत्रूचे लोक येऊन त्यांची लांडगेतोड झाली.
—पे. द.

३. साखरा वाटून दीड प्रहरचे अमलात तोफांचे बार पांच करविले.
—ऐ. ले. सं. ५६९६

अमली मुलुख—अम्मल असलेला किंवा ताब्यांत असलेला मुलूख.
हिंदुस्थान गुजराथपर्यंतचा मुलूख अगदीं अमली आहे आम्ही वाटेनें काय खावें ?
—ए. ले. सं. पृ. ७९

अमान—सुरक्षितता, कौल.

अमानत—१ ठेव. २ जप्त. सकारजमा.
कृष्णमाचो अमानत साहुकार वगैरे जेथे जेथे जसी त्याचाही शोध करून तगादा होत आहे.
—राजवाडे ७ पृ. १२९

जयदेवरावास हरामखोरी लावून देशमुखी अमानत केली.
—इ. मं. ३३

अमानतदार—ठेव सुरक्षित ठेवणारा; ट्रस्टी; अमीन.
अमानतनामा—ठेवपत्र.
अमानी—गैरइजारा, गैरमक्तेदारी, रयतवारी.
तालुक्यावर ताहूद केले ते मोडावे आणि अमानी करावी
--रा. खं ५ पृ. २३

अमारत—महानुभावित्व.
अमारतपन्हा—अमीर; एक पदवी. —राजवाडे ३ पृ. ५५
अमासिल—अम्साल, बरोबरीचे लोक.
अमासुस्त—थंड, आळशी.
मोगलाई कारभार अमासुस्त.
—रा. खं. १ पृ. १४७

अमीन,—विश्वासूक; दिवाण; कारभारी; ट्रस्टी; अमानतदार.
(१) असफजा यांचे बाप यांची रवानगी बादशहानी दक्षणेस केली त्याजवर अमीन तुरक ताजखा करून बराबर दिल्हे.
—द. स. कै. या पृ. २३०
(२) वारिसदार समयीं हजर नसेल तर ती जिनगी अमीन याचे ताब्यात देऊन, त्या जिनगीचा तप्शील हुजूर सर्कारांत कोतवालानें करीत जावा.
—ऐ. स्फु. ले. ५८

अमीर—आज्ञा करणारा अधिकारी; सर्दार, श्रेष्ठ पुरुष.
अमीरी सामान—सरदारांना किंवा राजांना लागणारे सामान साहित्य.
रायगडावर नाना जाणार म्हणोन गल्ला व दारू व अमीरी सामान व जकेरा किल्ल्यावर चढविला आहे. —ऐ. ले. सं. ४८७८
अमू—चुलता.
अय्याम—काल.
अयश—चैन.
पातशहा बदस्तूर दिल्लीत अयश करून आहेत.
—दि. म. रा. भा. १ पृ. ९१

अयान; अयां—व्यक्त; श्रुत.
मुकद्दमे इजहार केले अयां जाले. —का. प. या. व. ४९०
अयार—पुरावा, चिन्ह.
अयालत—महत्त्व.
अर्क—निष्कर्ष.

अर्क—पोट किल्ला.

या खेरीज येथे किल्लें अर्कात तोफा पांच-सात आहेत.

—राजवाडे १ पृ. १८

मंगळवेढ्यास श्रीमंत आले श्री काशीविश्वेश्वराचे दर्शन घेऊन अर्क किल्ल्यांत आले तों कृष्णंभट बापाजी यांनीं चौकांत सामोरे येऊन आशीर्वाद करून नारळ हातांत दिला. —हरि वं. व. पृ. १०

अर्कान—अर्कान दौलत, दौलतीचा आधारस्तंभ, थोर सरदार.

असा डौल घातला तेव्हा पातशाहानी अवघ्या अर्कान वगैरेपासून मुचलके घेतले जे यास सर्वथैव मारावे. —हिंगणें दप्तर, खंड २ पृ. २४

अर्कान दौलत—राज्याचे आधारस्तंभ.

राव मात्र गेले परंतु सर्व अर्कान दौलत व सरदार फौज कुल आहे ते आहेच.

—हिं. द. खंड १ पृ. १७

अर्कांनी दौलतानी—राज्याचे खांब. —इ. मं. २३६

अर्गजा—केशर, अगरु, कापूर, चंदन व कस्तुरी यांचें समभाग चूर्ण.

—रा. व्य. को.

अर्गलेत असणे—प्रतिबंधांत किंवा कैदेंत असणें.

माधवराव निळकंठ पुरंद्र्यास कारभाऱ्यानी पाचारिले आहे परंतु ते येणार नाहीत; कारण की बजाबा पुरंदरे अर्गलेत आहेत! त्याची सुटका झाल्याखेरीज हे मदत कां करतील?

—पुणें अख़. भाग २ पृ. ८४

अर्गीनर्गी—जखडबंदी, महसरा, कोंडी.

आम्हीं नबाबास कोंडून करोलांचा मार देत आहोंत. मोंगलांचा अर्गीनर्गी केला आहे. दाणागल्ला वैरणकाडी कुल बंद झाली आहे.

ब्र. च. पृ. ५५

अर्जमन्द—प्रिय, सुखी.

अर्ज—मारूज; श्रुत.

हे खबर श्रीमंत खुदावंत यास अर्ज होताच.

—का. प. या. व. ४८२

अर्जबागे-अर्जबेगी—लोकांचे अर्ज हुजुरांस सादर करणारा.

लोकांची लिहीणी अर्जबागे येत गेली तेव्हां मनोधारण दिल्लीश्वराचें राखावयासी सोय न पडली. —म. शि. यां. का. पृ. ३९९

अर्जबाब—पगाराच्या ठराविक हप्त्याखेरीज शिपायाने अर्ज करून मागितलेला पैसा.

राजेश्री विष्णुपंताकडे अर्जबाबची वरात देविली पाहिजे. कारण आम्ही लोकासी कबूल केले आहे कीं घाटावरी गेलीयावरी कांहीं अर्जबाब नालमेखेस देतो. —पे. द. १६ पृ १००

अर्जबाब—तैनातीशिवाय कारणपरत्वें श्राध्दपक्षास किंवा लग्नकार्यास वगैरे सरकारांतून बक्षीस देत असत; त्यास अर्जबाब असें म्हणत असत. —ऐ. स्फु. ले. ७३

अर्जबेगी—धन्यास लोकांचे अर्ज वाचून दाखविणारा अधिकारी.

आपण ऐकिले कीं नवाब नासरजंग याजकडून अर्जबेगी साहेबाकडे येणार आहे. —पे. द २८ पृ १९

अर्जमन्दी—प्रियता. सौख्य.

अर्ज मारुज करणें—विनवणी, शिफारस श्रुत करणें.

नजीबखानाविषयीं बहुता प्रकारें अर्ज मारुज केली. —पे. द. भाग २९ पत्र नं. १३८

अर्जल—कनिष्ठ. अप्रसिद्ध.

२७ सरदार नामी मारिले, दीडशे सरदार अर्जल जखमी केला. —जो. राजकारणे पृ. ९०

अर्जवस—(?)

त्यास नबाबास समजलें कीं वरकड रुकनुद्दौला आदिकरून जे जाहले ते श्रीमंताचे अर्जवस पाहून होते. जंग श्रीमंतांचें अर्जव करीत कोणाची पर्वा धरीत नाहीं. —नाग १ पृ. ४८

अर्जानी—मिळालेला, दत्त, प्राप्त.

हल्लीं साहेबासी मुकासा अर्जानी जाला आहे. —इ मं पृ. ४४

अर्जीइल्तमास—विनंती.

नबाब व राजेबहाद्दर यास माघारे फिरल्यावरी अर्जीइल्तमास लिहावी कीं —खरे २ पृ. ४७९

अर्जीमर्जी—स्नेह.

अर्जीमर्जी मध्ये विकल्प उडवा. --परशराम १६४

अर्जुकी—आर्जव.

आम्ही निघालो ते इंग्रजांशीं बहुत रदबदली व अर्जुकी चालली कीं जाऊं नये. अधिकहि खर्चास देऊं. —म. द. रु. ३ पृ. ७८

अर्जुदा—अजुर्दा; कष्टी.

लोक फार अर्जुदे आहेत. गोपाळराव गेल्यामुळें साऱ्यांच्या शक्ती गेल्या आहेत. --ऐ. ले. सं. १७७०

अर्जुनी—आर्जवानें, दीनवाणीनें.

कृष्णराव बल्लाळ यास निजाम बहुत बहुत अर्जुनी बोलले की राव पंडित प्रधान याचे फौजेचा कसेही करून येथून कूच करवा. त्याजवरून कृष्णराव याणी मधे डवला मिरवून दादासाहेब व रावसाहेब यास समजावले की नबाब व आपण एकच. दरमियान विठ्ठल सुंदर यांनीं वाकडे आणिले याणे दौलत गारद जाली. त्यास आतां आपला कांहीं उपकार ठेवावा. तेव्हां पेशव्यांनी दहालक्षाच्या जहागीर सनदा नबावास करून देविल्या.

—स. ब. पृ. ३२

अर्जू—तयार, मान्य.

आज दोन सालापासून चेनापट्टणकराचा दोस्तीचा इरादा. खुद्द एक पालखी व दहा जवानांनसी येण्यास अर्जू. लेकीन जात मकरी !

—म. शि. यां. का. पृ. १६६

अर्थेप्राणें—तनुमनधनें करून.

आम्ही रात्रंदिवस अर्थेप्रमाणे कष्ट भोगून वडिलांच्या मर्जीस येकहि प्रकार न यावा !

—पे. द. भाग २१पत्र नं. १८१

अर्दास--अर्जदास्त.

यास गोही मोकावले पुसता सदरहू अमल खरा म्हणौऊन ठाणेमधे अर्दास लेहून पाठविले.

--शि. च. सा. खंड ५ पृ. १६६

अर्धोदकी पडणें—मध्यंतरीच पाण्यांत पडणें; आरोपार न लागणें; मध्यंतरीच गोत्यांत येणें.

निदानी श्रीमंत आम्ही एक होऊं. तुम्हांस मात्र अर्धोदकीं पडणें लागेल.

--पे. द. भाग ३८ पत्र. नं. १६०

अर्फअ—उच्चतर-तम.

अर्बईन--चाळीस.

अर्बा--चार.

अर्बा अशर--चौदा.

अर्बा मया--चारशे.

अर्बैन--चाळीस.

अर्सा--अवधी.

अजीबात चेनापट्टणाकडे जाण्यास दिवसरात न लागावी अर्सा बहुत कमी राहिला.

--राजवाडे १० पृ. १६७

लाड कारणवालीस, सर्हद्देस दाखल होण्यास अर्सा फार थोडा.

--खरे ८ पृ. ४४३४

अरका— (वि) लहान.

हजरत जिलसुभानी छायाखाले येऊन सर्व लहानथोर यांस देखतां (यांज देखतां) बोलीलें कीं मी आपल्यास रामचंद्रपंतास सोपीले आहे, बरे करोत अथवा वाईट करोत. त्यावरोन निजामन मुलूक बोलीले जे हजरतजी आपल्यास ज्याचे हवालीं केलें इतका तफजूल त्याचे हकांत हजरतचा त्यास पाहिजे, जे आम्ही अरकानाहीं त्यासी किबलेकावे जाणावे: मग वझीर मुमालीक व अमीर उमराव याणीहि बहुतसी तारीफ केली. त्यास निजामन मुलुकाची सरदारी आहे. ते वडिलांची आहे. पातशहापासी सुरुखुरु करणार वडील समर्थ आहेत.

—पे. द. १५ पृ. ८०

अरगल्यांत बसविणें—बंदोबस्तांत ठेवणें, कैदेंत ठेवणें.

त्याजपासी कांहीं घेऊं नयें: अरगल्यांत बसवावा असें असतां त्यास जाऊ देता या अर्थी हे कष्टी आहेत —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ४९

अरगला करणें—कैद, अडथळा, बंधन.

शहानवाजखान यास अरगला केली.

—पे. द. भाग २५ पत्र नं. १७७

अरदळ—अर्धेली; अर्धा विभाग.

महमूद भाई यांनीं इमामदीन थोर होय पावेतों अरदळ तुम्हांस देत जाऊं म्हणून आईजवळ घोडीं मागून घेतलीं. ऐ. ले. सं. ३६८०

अरवज—पकडणें, हस्तगत करणें.

अरस्तु—ॲरिस्टॉटलसारखा नीतिमान.

(अवतरणासाठीं ' बफजलइलाही शब्द पहा)

—पुणें अखबार भाग १ पृ. ११०

अरसा—अवधी, अंतर.

याणी त्याणी नेमले मसलतेस जावे त्यास अरसा–हैदरखान अदवानीचा अरसा लवकर उठविनात. नाग १ पृ. २२७

बहाद्दर निरोप न घेतां कूच करणार आणि यांचेंहि पत्र यावे म्हणून अगोदर गेले होते आणि बहाद्दराचे पत्र कूच करून येतो म्हणून आले यांसी अरसा फार पडला. —म. शि. यां. का. पृ. ८४४

जाण्यास दिवसगत न लागावी अरसा न्याहायेत (निहायत) कमी राहिला. —म. शिं. यां. का. पृ. १६७

अरळ तरळ—तात्पुरती, अर्धवट व्यवस्था.

प्रतिवर्षी आल्याप्रमाणें मात्र मनसबा वरचेवर करून परत जावयाचें न

करावें. अरळ तरळ करून रा. पंतप्रधान स्वदेशास गेले म्हणजे मागें आम्हांस कठिण पडतें. --ऐ. ले. सं. १४६८

अरळतरळ होणें—गळती लागणें.

खर्चास न मिळाल्यामुळें फौज अरळ तरळ होऊं लागली. --विचू. व. का. सं. पृ. ६

अरावा— तोफांचा मारा.

इंग्रजाचा अरावा पिऊन फौजा आंत घुसल्या. —राजवाडे १९ पृ. ६३

अरुच—उदासीनता; राग.

राव मजकुराचे ठायीं अरुच फार धरलें आहे. —पे. द. भाग २५ पत्र नं. २०८

अरुता—अपेक्षा, आशा.

या युद्धांत वाचून पुन्हा दक्षणेत जाऊन संसार करावा ही अरुता कोणी ठेवली नाहीं. --पाणि वख. पृ २५

अरुता—मोकळीक.

हल्लीं दारूनें गोळा बंदुकीच्या गोळीप्रमाणें देखील जात नाहीं. तोफेजवळ बाळाराम व राणेखान उभे राहतात, आणि शिस्त लागत नाहीं, तेव्हां आतां गोलंदाजाच्या पारिपत्यास अरुता आहे. --ऐ. ले. सं. ३२०३

अल्अवलाद—मुलाकडून किंवा मुलीकडून झालेली स्त्री किंवा पुरुष संतती (विलसन)

अल् अहयायी वाद अल् मवात—एखाद्याच्या मृत्यूनंतर मागें उरलेले वारस. (विलसन)

अल् एक चित्त--संपूर्ण एकी.

पुढे तुमचे आमचे अल एकचित्त, तफावत न होऊ पावे याचा (असा) कौल करार करा. --हिंगणे द. भाग २ पृ. ३१

अल्काब— लकबचे अनेक वचन. पदव्या.

हलका अलकाब लिहिल्यामुळें विषम मानतात. —दि. म. रा. १७

अल्गर्जी—स्वार्थी.

आता कशाला जाऊन राहिला पोकळ अलगर्जी. --परशराम १७१

अल्ताफ—लुत्फ, कृपा, प्रसाद.

अल्पकरणी--हलक्या कानाचा.

ख़ावंद अल्पकरणी. मुत्सद्दी व सर्व जी जी म्हणतात. --पे. द. भाग २९ पत्र नं. १७५

अल्फ—हजार.

अल्बत्, अल्बता—बेशक; निश्चित; खास.
अल्बता येणें; कांहीं मुलाहिजा न करणें. —राजवाडे १७ पृ. ७

अल्बिदा—ताबूत बुडविल्यानंतर या शब्दाचा उच्चार करितात; त्याचा अर्थ "अखेरचा सलाम" असा होतो.

अल्हक—खरोखरी.

अल्हिबह्—निराळें.

अल् हिशेबी—हिशेबी.
अल् हिशेबी वसूल —रा. खं. २२ पृ. ७३

अलम्—निशाण. मोहरमच्या मिरवणुकींत हसन आणि हुसेन यांच्या नांवानें जो झेंडा मिरविण्यांत येतो तो. (विलसन)

अलम—झेंडा.

अलम—लोक, दुनिया, जग.
तमाम अलमावर रोशन आहे. —पे. द. ३ पृ. ५६

अलमखाना—नगारखाना किंवा वाद्यशाला. —रा. व्य. को.

अलमगिरी—पैशाचा एक प्रकार.
नबाबाचे लस्करांत दररुपयास खुर्दा अलमगिरी तीस पैसे याप्रमाणें आहे. —पे. द. भाग २५ पत्र नं. ७१

अलक्ष—दुर्लक्ष्य; उदासीनता.
तुम्ही मातबर सरदार, दौलतीचे खांब असतां अलक्ष करतां. —ऐ. ले. सं. २६७६

अलं—झेंडा.
भांडीं फिरंगा अलं निशाण —मेस्तक १३९

अलंग—बाजू.
मंगळवारीं लेले यांणीं रामचद्रपंत आप्पास विनंती केली कीं, आम्हांबरोबर पलटण व फौज आहे. कारखानेपैकीं जरबा देवाव्या. एक अलंग सांगावी. तेव्हां आज्ञा झाली कीं, प्रातःकाळीं विचार करून सांगावयास येईल. —ऐ. ले. सं. ६२९२

अलंग—रांग; फरा.
रास्त्यांनीं एक अलंग धरून. —का. प. या. व. पृ. ५४

अलंग—संरक्षक भिंत. बाहेर-कोट.
इकडील अलंग फोडून पलीकडील सफेल फोडून गोळा पार झाला. —हो. कै. २०

अलंग नौबत—पहारा, डंका, निशाण.
ठाणाचे चाकरी अलंग नौबत करून असणें.
अलतगमा—अक्षयी.
मौजे मदनूर इनाम अलतगमा वाफरजंदा बहाल करावा.
—पुणें अख. भाग १ पृ. २५२
अलतमगा—राजाने दिलेली जमीन-वक्षीसाची सनद.
परवाना अलतमगा —का. प. या. व. पृ. २३
अलफ, अल्लफ—हजार.
अलबत किंवा अलबत्ता—बेशक, निश्चित, खास.
अल्वता येणें. कांहीं मुलाहिजा न करणें —रा. खं. १७ पृ. ७
अलल् हिशेबीं—हिशेबी.
अलल् हिशेबी वसूल —राजवाडे २२ पृ. ७३
अला बला; अलाय बलाय—संकट; इडापिडा, दृष्ट काढणे.
मातुश्रीनी अलाय बलाय घेऊन मस्तकी विजयहस्त ठेविला.
—चित्रगुप्त ११
अलैकुम सलाम—'तुम्हांला सुखशांती लाभो;' भेटतांना वंदन करीत म्हणावयाचा मंत्र.
अलाथ—१ वल्हयाचें पातें. लक्षणेनें वल्हीं वगैरे गलबताची लागवड. २ तारवें पाण्यांतून जमिनीवर ओढण्यासाठीं, उपयोगांत आणली जाणारी जोड दोरी.
"गलबताची मरामत करून सा गलबते अलाथ आवदाण अवजारसह वर्तमान तयार केली असत."
--पे. द. ३४ पृ. ७८
पुढें आरमारची अलाथ अवदान काठ्या आदिकरून उतरणीं करीत असो. नंतर गुराबा धड्यावरी घ्यावयाचा विचार करून छावणीचाहि विचार होईल.
—पे. द. ३३ पृ. १०
अलावह—शिवाय.
अलिगोल—विन कवाइती पायदळ. शिपाई. गोलंदाज; तोफची.
पुण्याहून बारूद आली त्याजबरोबर अलीगोल २०० नवें माणूस आलें.
—ऐ. ले. सं. ६३४४
अलिज्याहा कारभार—बडा, श्रीमंती, गैरहिशेबी, आरामशीर.
हे तीन मजली त्यांचे समागमे गेले. सिद्यांच्या घरचा प्रकार व श्रीमंताच्या घरचा येकच धारा. यांचा आलीज्याहा कारभार. तेथे यांची स्थीत व स्वरूप राहणे कलतच आहे.
—हिंगणे द. भाग २१ पृ. ४५
अलिबंद—बंदुकीचा एक भाग.

बंदुखा खाशाच्या, सुमार च्यार. १ प्रत दरोबस्त मुलामा सोनेरी अलीबंदास कड्या दोन रुप्याच्या. —ऐ. सं. सा. खंड ३ पृ. २२०

अलिय्यह—उच्च.

अलिबागी—रुपयाचा एक प्रकार. याचे एके बाजूस फारशी अक्षरें काढलेलीं असत व दुसरे बाजूस ' छत्र-पति ' अशी अक्षरें असत.

—कु अं ड ३४४

अव्लाद—वलद, मुलगे, प्रजा, कुळी.

अव्वल, अवल—प्रथम, प्रथमतः.

अवलीपासून जातीनें मन्सुब्यास धक्का कोठेंही बसला नव्हता.

—हो. कै. ६

अव्लाद अफ्लाद—वंशपरंपरा, पुस्त-दरपुस्त.

लेकराचे लेकरी अव्लाद अफ्लाद तुवा खाणे. —राजवाडे ८ पृ. २६

अवक्रियेस येणें—बेइमान होणें, दगलबाजी करणें.

त्याचे वडील नीमसोड मायणीची देशमुखी खात आले. त्यांचे बंदे दोघेजण करोजी व चापजी, हे दोघे अवक्रियेस येऊन त्यास रात्रीं वडगांवांत जीवें मारिलें. —रा. खं. ३ पृ. ११५

अवकाट—(मो. वा. चूक. अटकाट असें तर मूळ नसेल ?) अटोकाट, सर्व, संपूर्ण.

मागती फिरोन सिद्दीसात हबशी बळावून त्यानें रायगडास वेढा घातला. त्याउपर महाराजांनीं अवकाट फौजास हुकूम केला. मग त्यासहवर्तमान लश्करे उतरोन कोकणप्रातें जाऊन रायगडचा वेढा मारून काढिला.

—रा. १ पृ. १६

अवकात—आब, अब्रू मान्यतेनुरूप योगक्षेम संसार, उदरनिर्वाह.

तुम्ही आम्हास जरुर प्रयोजन म्हणून लिहीले त्यावरून यांस आणवून पाठविले आहे. लोकहि दृष्टीस पडल्यानंतर कळतील. तरी यांचे अगत्य धरून चालविले पाहिजे. गैरवळणी माणूस (सर्व सामान्य नव्हेत) यांचा अवकात चालावा. तुमचेहि थोरपण ऐकोन हे तुम्हाजवळी आले आहेत.

—पे. द. ३३ पृ. ११७

मौजे मुलखेड यांस इनाम दिल्हे होते. तेणेकरून त्यांचा अवकात चालेना म्हणोन दूर केला. (व त्याच्या मोबदला मौजे दारवली हा गांव इनाम दिल्हा.) —शि. च. सा. खं. ५ पृ. १९१

अवकाश—ठिकाण, पत्ता, आधार, सोय.

कांहीं संसारकृत्याचा योग असता तरी त्यामधेच थोडयाबहुताने निर्गम

करितों (केला असता). प्रस्तुत अन्नवस्त्रास अवकाश नाहीं असा प्रसंग आहे. —वै ४ स. १७४५ पृ. १

अवकाश समीप—थोडा अवधी.

पुढें अवकाश लग्नास समीप जाणोन जुन्या कोटांतील श्रीगणपतीस अक्षत जाली —ऐ. ले. सं. ४६३८

अवखाद—खरें अंतःस्वरूप. अवलादच्या उलट ती अवखाद. अवलाद म्हणजे कायदेशीर औरस संतति. त्याउलट अवखाद म्हणजे कडू संतति. भावार्थानें पोटांतील कुकल्पना.

" हरामखोरीचा डाग तुम्हांकडे न लागतां महाराजांकडून तुम्हांस निरोप देववावा अशाकरितां तुम्हांस बोलाविलें तें आमचे आम्हापाशी राहून तुम्ही आपली अवखाद बाहेर काढून हरामखोरीचा मदसद (मुखवटा) परिधान केला ! " —हो. कै. पृ. १५०

अवग्र—समग्र.

यैसा बखेडा जाला याजमुले तहसील अवग्र, याप्रांते लस्कर होते तोवर बंद होती. तफरीक अगोधर केली होती. वसूल करीत आहेत. —चं. चू. द. पृ. १४९

मला घरीहून निघोन अवग्र चार वर्षे जाली. —पे. द. भा. ३८ पत्र १३

अवज—ऐवज, द्रव्य.

अवजार—शीड.

गलवताची मरामत करून सा गलबते अलाथ अवदाण अवजारसह-वर्तमान तयार केली असत. —पे. द. ३४ पृ. ७८

अवतार—' दहा ' आकड्याबद्दल योजण्यात येणारा सांकेतिक शब्द.

अवताराची (दहा लाखांची) बोली होत होती त्यास वर्षे झाले ! —हिंगणे द. भाग २ पृ. ३९

मसलत पडल्यास अवतार (१० लक्ष रुपये) पदरचे खर्च करावे याजप्रमाणें भाव लिहिले —ऐ. ले. सं. ५७०८

अवतार संपूर्ण होणें—मरणें.

राजा शाहूचा अवतार संपूर्ण जाहल्यास कोणी खावंद नाहीं, ऐसे झालें. —रा. ८ पृ. २२२

अवध—अवधी, मुदत, विलंब.

तुमचे विचारें येईल तसे तुम्ही करणें. आमचे विचारें येईल तसें आम्ही करूं. याची अवध दोन महिन्याची बोलण्यांत होती. —म. शि. यां. का. पृ. २१७

भाऊसाहेबांचा मुक्काम कोठे आहे? येणेस अवध कां?

—ऐ. ले. सं. ६०१८

अवर्ण,–आवर्ण—चौकी पहारा, बंदोबस्त.

बादशहा व अबदल अहदखान यांजभोवतें अवर्ण आपले केले आणि बावांस लिहून पाठविलें कीं, आम्हीं बादशहास आगऱ्यास घेऊन येतो.

—म. शि. यां. का. पृ. ४०८

अवर्तणूक—गैरवर्तणूक, दांडगाई.

तरी कर्ज घेऊन न द्यावे ही रीत कोठील? असे अवर्तणुकेनें परिणाम लागेल की काय? हल्ली हे आज्ञापत्र सादर केलें असे तरी येथे येऊन त्यांचा भाग वारून जाणे.

—वै. ४ स. १७४२ पृ. ५

अवरतमाना—स्त्रिया.

जळितात दोघे कुणबी जखमी केले अवरतमाना चार जखमी केली आहेती. त्याही जेर आहेत.

—रा. १ पृ. ३३

अवरंगजेबी—कापडाचा एक प्रकार

मागे तीन औरंगजेब्या लिहिल्या होत्या ते आम्हीं राजाचे भेटीस येऊं तेव्हां देऊं.

— ब्र. च. पृ. २९१

अवरा (अवारा)—भलताच, वाटेल तसा.

जासूद असामी चार आहेत त्यास रुपये शापुरी (शहापुरी) देववावे. येथें मलकापुरीस (मलकापूरच्या टांकसाळीच्या रुपयास) रुपयेस अवरा बट्टा पडतो.

—ऐ. ले. सं. ३९७८

अवरोध पडणें—अडथळा होणें, विलंब लागणें.

कासीराव रास्ते यांचा काळ रोज मजकुरी जाला. त्याची स्त्री सती निघाली याजकरितां गंगाधरराव रास्ते यास अवरोध पडला. ती निवृत्ति जाल्यावर टिपूकडील वकिलासी जाबसाल सुरू होईल.

—पुणें अखबार भाग ३ पृ. १२२

अवसंदा किंवा अवखंदा सांपडणें—अचानक अडचणीत किंवा कैचीत सांपडणें.

'दत्ताजी अवसंदा सापडला। घेरा राउताचा पडला। एक म्हणती जित धरा दत्ताजीला'.

—ऐ. पो. के. खं २ पृ. २५

अवंरद—अवरज—धाकटा भाऊ.

परंतु गंगापुत्र व येथील अवंरद याजपासीं आपली स्तुती करीत नाहीं. देशावरून यात्रेकरू येतात यांजवळीं मात्र सांगतो कीं घाट, घरें, धर्म सर्व बाजीरावजीचा आहे.

—पे. द. १८ पृ. २१

अवलात—मुळांतच; अव्वलांत; सुरवातीसच.

नाईकास आपण आतां काढून दिल्हे ! तो ठेवावा हे अवलात चूक.

—पे. द. २० पृ. १६७

अवलाद--अफलाद—वंशपरंपरा, पुस्तदरपुस्त.

लेकराचे लेकरी अवलादअफलाद तुवां खाणें.

—रा. खं. ८ पृ. २६

अवसान देणें—धीर देणें.

आपण मातुःश्री यांस अवसान देऊन यत्न करणें तो करावा.

—ऐ. ले. सं. २७०३

अवसानास खामी होणें—अवसान किंवा अब्रू कमी होणें.

सरदारांनीं उत्तर केलें कीं, आमचे कबिले दक्षिणेस आणि आम्ही नर्मदा उतरोन येत नाहीं, त्यावरून दादासाहेबांच्या अवसानास खामी झाली.

—ऐ. ले. सं. ३५७

अवसाफ—अब्रू किंवा लौकिक.

भाऊंचा सूड घेण्यासाठीं विश्वासराव गाइकवाड सांपडला. त्याची बरदास्त करावी, बहुमान करून छत्रपतीकडे परत पाठवावें, तें न करतां रामचंद्रपंत आप्पांनीं ठार मारिलें, ही अपकीर्तीची गोष्ट जाहली. आमचे घराण्याचे अवसाफास योग्य न जाहलें. —ऐ. ले. सं. ७३७०

अवसाफ—समाप्ती.

स्वार्थमात्र (यत्किंचितहि फायदा) न साधल्यास (भांडण करण्यांत) अर्थ नाहीं व मल्हारजी होळकर यांचा ॠणानुबंधाचा अवसाफ होऊन खुद्दवक्तावर मनांत पाप आणून बदनक्षा केला हीं अक्षरें कपाळीं लागून पतहि राहणार नाहीं.

—हो.कै. पृ. ४६

अवाई उडविणे—बातमी पिकविणें.

श्रीमंत तात्याकडील अवाई येथें कोन्ही उडविली कीं हरीपंतावर हैदरनाइकानीं रात्रीं छापा घातला. —ऐ. ले.पा. म्यु. प्र. पृ. ८

अवाईतवाई—(तबाही–नाश) संकट

अवाईतवाई शिपाई लोकांवरी येऊन पडतच आहे.

—ऐ. ले. सं. पृ. ३२४६

अवांतर—दंगा किंवा स्वारी.

त्या उपरी ताम्राचे (मुसलमानांचे) अवांतराकरितां भोगवटा तुटला आहे. ऐसीयासी श्रीज्ञानेश्वर समाधीचे स्थळीं पूजा पुनस्कार यथासांग चालले पाहिजेत म्हणोन पूजेस मोईन करून दिली असे.

—मा. स. प. मा. पृ. १६८

अवातिफ—(अ) उल्फ, प्रसाद.

अवाप्ति—अनवाप्ति; अवर्षण.
पर्जन्याच्या अवाप्तीनें महालची बाकी राहिली नाहीं.
—ऐ. ले. सं. ४७१८

अविद्या—कपट.
त्यास सांगितलें कीं, पोष्या लेक सूर्याजी दिल्हा तो दरबारिया आहे. उपयोगाचा होईल. त्यावरून वहिरजीनें अविद्या मनांत आणून पोष्या दिलेला लेक आपले घरीं मायणीस नेऊन ठेविला.
—रा. खं. ३ पृ. ११६

अविमुक्त क्षेत्र—काशी क्षेत्र.
येथील कुशल चैत्र व. ३ मुक्काम श्री अविमुक्त क्षेत्र येथें समस्त सुखरूप असो. —ऐ. ले. सं. ३६९९

अविंध मोतीं—वेजें न पाडलेली मोतीं.
सरकारांत अविंध मोत्याचे प्रयोजन आहे तरी मोत्यें चांगली तेजदार अर्ध रुपयास एक मोती पडे ऐशी, एकहजार रुपयांची मोत्यें खरेदी करून पाठविणें. —थो. मा. रो. प्र. पृ. २८४

अश्आर—(अ) शअर, माहिती.

अश्रफ—अभिजात, नामांकित.
सिंहगड किल्ला बहुत अश्रफाचा. —इ. सं. मं. त्रै.

अश्रफ—महत्तर-त्तम.

अविस्राच—अकस्मात; नकळत.
कोणी आगट्या करतील; गवत पडिले आहे ऐसे अगर वारे लागले आहे ऐसे मनास न आणितां (मनास न आणाल) म्हणजे अविस्राच एकादा दगा होईल. एका खणांत आगी लागली म्हणजे सारे खण जळून जातील.
—रा. ८ पृ. २४

अवैर करून—अवैरेंकरून, निर्वैरवृत्तीनें
अवतरणासाठी 'बरकत' शब्द पाहा —चं. चू. द.–पृ. १३९

अश्न— अशनि, वीज.
रायास परलोक प्राप्त झाला या खेदाची परिगणना नाहीं एकदाच अश्न तुटून पडते यैसी गति जाली —नाग २ पृ. ५१

अश्रफी—एक सोन्याचें नाणें. मोहोर.
याची किंमत १६ रुपये सामान्यतः असे. (विलसन)

आंग्र्यांस पत्र जे तुम्हास जहाज हस्तगत जाहले आहे त्यांत स्वामीचा विभाग यावा त्यापैकी कांहीं जिन्नस पुतळ्या वगैरे व रयाल व संतम्या व अश्रफी जिन्नस सोन्याचा रवाना करणें. —पे. द. ३० पृ. ४२

अश्राप—गरीब, सभ्य, सविनय, अभिजात.
(मूळ शब्द शरीफ् याचे अनेकवचन.)

अशर—दहा.

अशरीन—वीस.

अशी—(असूचें अनेकवचन); आसवें.
रडतीयाची अशीं, तुम्ही पुसोन परिणाम त्याचा करावा, तो करावा.
—ब्र. च. पृ. ४१

अशील—अभिजात, खासा; मानकरीण अशी दासी.
असीलास पाठवून घटके घटकेचे वर्तमान आणविनात
—राजवाडे ७ पृ. ११२

नवाबानी चंपा असील नेहमी मियापाशी जवळ बैसवून हकीमाकडून दवा देववितात
—राजवाडे ७ पृ. १९१

अशेला—१लोभी २ खासा ३ मानकरी.
" रात्रीस शें पन्नास घोड्यांवर जीन नेहमीं असावें. रात्रंदिवस दुसरा ध्यास नाहीं. फौज थोडीफार असती म्हणजे चिंता नव्हती. रागें मात्र कारभारी भरोन दगा मात्र दिसतो ! परंतु कर्नाटक २० लक्षांचा मुलूख सुटला, मागाहून फौजेची पुष्टी होऊन सरदारांस उमेद द्यावी हें लक्ष नाहीं! अशेले गाफील! फार लिहिलें म्हणोन वडिलीं रागास न यावें. कळलें पाहिजे.
—ऐ. ले. सं. २७६२

अशोकाष्टमी—चैत्र शु॥ ८ या दिवशीं अशोकाच्या कळ्या पाण्यांत टाकून तें पाणी पिण्याचा विधी करावयाचा असतो. ही तिथी विष्णुदेवतेप्रीत्यर्थ आहे.
(विल्सन)

अष्टगोली—काठांपदरावर वेलबुट्टी काढलेला शेला.
महाराजानी कृपाळू होऊन वस्त्रें दोन, शिरपाव एक, चांदणी चिरा व अष्टगोली एक पाठविला.
—पे. द. ३३ पृ. २४९

अष्टमांगल्य—त्रैवर्णिकांचा एक संस्कार. गर्भाधान संस्कार योग्य काळी व्हावयाचा राहिल्यास गर्भाच्या आठव्या महिन्यांत पुंसवन व सीमन्तोन्नयन या दोन संस्कारांसह पुन्हा गर्भाधान संस्कार करतात तो विधि.
चि. सौ. उमाबाईस अष्टमांगल्याकरितां घेऊन येणें.
—पे. द. १८ पृ. ३३

अस्करा—आसकरा, ख्याती, गाजावाजा.
कानडे तो येकंदर कामाकाजास उपयोगी नाहीं. तसेंच आरब. आसकरा मात्र आहे ! —पे. द. १६ पृ.८३
सकळ सुरुप मंडळींत माझ्या स्वरुपाचा अस्करा
—प्रभाकर लावण्या १६१

अस्तन--अस्थान—घर, रहिवासाची जागा. मुलाखत घेण्याची राजकचेरी. मुसलमान फकीक राहतात ते स्थळ. एखाद्या मुसलमान संताचा दर्गा. (विलसन)

अस्तरगिरी—चुन्याचा गिलावा.
शिखरास अस्तरगिरी होत आहे —रा. खं. १० पृ. ५

अस्तनें—कबरीवर घालावयाचें वस्त्र किंवा गलेफ.
कुडचीच्या पीरास अस्तने पेठमालीचे करवून वैशाख वद्य १३ मुहूर्त करून जाणार —इच. सं. इ. पृ. ३०

अस्तबाल—तबेला; पागा.
पीलखाना व अस्तबालास व उंटास दाणा नाही
—राजवाडे १ पृ. ५४

अस्तमित—अस्तमान, सायंकाळ.
अस्तमितपर्यंत त्रिवर्गाचे खिलवत (खलबत) जाले.
—पुणें अखबार, भाग १पृ. ८७

अस्तमिति—अस्तमानीं.
त्याचे काल प्रातःकालचे पत्र लिहिले ते अस्तमिति पावले.
पे. द. भाग २९ पत्र नं. १६६

अस्त्री—पत्नी, स्त्री.
सुभानजी राऊ सिलींबकर हे किल्ले पुरंधरीचे धारेस भांडणी पडले, त्याचे अस्त्री व मुले लहाण आहेत. त्यांचे चालविले पाहिजे.
—रा. १७ पृ. ३९

अस्त—आहे.

अस्तावा—मोठ्या झारीसारखे किंवा चहादाणीसारखे भांडे
सरकारचे दागिने आहेत त्यांत पांढरे (?) तांब्याचा आस्तावा आहे. त्याप्रमाणें रुप्याचा नवा तयार करून, ब्राह्मणाचे पाय धुतात, त्यास पाणी घालावयासी पाहिजे. त्यास त्याचे तोटीतून साफ पाणी पडते त्या प्रमाणे.
—पे. द.

अस्ताव्यस्त होणें—नाश होणें, मृत्यु होणें.
टिपूचे अस्ताव्यस्त जाहलेवर धोंडजी वाघ तेथोन पळोन आला.
—ऐ. ले. सं. ६०७३
अस्तावेस्त—विपरीत; वाईट.
यानंतर राजेश्री पांडुरंगराव तात्या यांचे फौजेचें वर्तमान अस्तावेस्त ऐकिलें. त्यावरून अहोरात्र तिकडीलच फिकीर लागली असे.
—ऐ. ले. सं. २८४८
अस्पस्वार—घोडे स्वार (अस्प–घोडा). —रा. खं. २० पृ. १६२
अस्पहानी—स्पॅनिअर्डस्, स्पेनदेशीय.
ऐसीयास फरासीस व इंग्रज व वलंदेज अस्पहानी या चौघा टोपीकरांचा परस्परें सलूख झाल्याचें पत्र इष्टिनांकडे आलें.
—मं. शि. यां. का. पृ. ३१९
अस्पी—नगाऱ्याचा एक प्रकार.
स्वामीनीं अस्पी नगाऱ्याविसी आज्ञा केली होती त्यावरून नगारे नवे सजवून जोडी येक पाठविली आहे. —पे. द. ९ पृ. ३८
अस्पी नगारा—घोड्यावरील नगारा.
अस्पी नगारा एक रवाना करून देणें
—पे. द.
अस्बाब—सामुग्री; सामान.
जो आम्हापाशी अस्बाब आहे तो हज्रतचे कृपेचा आहे, हा घेऊन फौजेचे खर्चांत आणावा. —दिमरा १ पृ. २१२
वायकापोरे आणि अस्बाब कोठें ठेवावा ?
—राजवाडे ७ पृ. १५३
अस्मत पन्हा—शूद्ध किंवा पवित्र.
अस्मान—आकाश
नजर अस्मानास गेली (महत्त्वाकांक्षा आकाशास भिडली)
—खरे ६ पृ. २७६४
अस्मानी फत्तेची ध्वजा लागली.
—चित्रगुप्त ३३
अस्मानगिरी—मांडव, छप्पर
अस्मान जमीनीची तफावत—जमीन अस्मानाचें अंतर. (व्युत्क्रमाचें उदाहरण)
खंडणीबाबत श्रीमंत व हैदर यांच्या आंकड्यास अस्मान जमीनीची तफावत.
—ऐ. ले. सं. १२१५
अस्मानास थिगळ (ठिगळ) देणें—वाटेल तेवढें मोठें संकटहि थोपवून धरणें, निवारण करणें.

येक आरोग्यता अन्यावास असलियां असमानास थिगळ देईन.
—चं. चू. द. पृ. ८०

अस्मानास लागणें—चढून जाणें; गर्विष्ठ होणें.
त्याचा प्रकार बुनियाद कशी आहे तें कळतच आहे. आणि त्याजशीं हलके बोलल्यास ते अस्मानास लागणार.
—ऐ. ले. सं. १०७४

अस्मानी फत्ते—दिग्विजय. मोठा विजय.
हैदर खानाकडील सामान वरचेवर येत आहे टिपूहि येणार म्हणून लिहीलें त्यास अस्मानी फत्ते त्याची जाहली. (परंतु) एक वेळ भलती-सलती गफलत होत असते, वारंवार होत नाहीं.
—ऐ. ले. सं. २८०८

शत्रूस अस्मानी फत्ते ईश्वरें दिली आता तो गोकाक मनोळी हीं दोन ठाणीं घ्यांवीं म्हणतो. नजर अस्मानात गेली !
—ऐ. ले. सं. पृ. २७६४

श्रीमंतांच्या पुण्योदयेकरून मोठे यश आले अस्मानी फत्ते जाहली, असे आहे. —ऐ. ले. सं. पृ. ५६९३

अस्मानी यश—आशा नसतांना केवळ ईश्वरी कृपेनें मिळालेलें यश.
सखारामबापू राक्षसभुवनच्या युद्धाचा पराक्रम फारसा स्तुतींत आणीत नाहीं. अस्मानी यश आलें. शत्रूनें बेतरतुदीनें लढाई केली म्हणून यास यश प्राप्त जाहलें, अशा भावें बोलले. —ऐ. ले. सं. ५८५

अस्मानी सुल्तानी—दैवी आणि राजकीय आपत्ति. क्रांति.

अस्लूब—व्यवस्था; पद्धत; तऱ्हा.
तेव्हां करारी कोणे प्रकारच्या व कशा याचा अस्लूब काय तऱ्हेचा ?
—राजवाडे ७ पृ. ८२

अस्वद—प्रसाद (?) अशुद्ध म्हणजे रक्त— बळी दिलेल्या पशूचे रक्त.
तेथुनु वाजांतरीयास निरोप देऊनु आपलाल्या घरास जावे, मग गुरवें आपलाल्या घरास येऊनु अस्वद घेणें.
—म. द. रु. ३ पृ. ३७

असक—अशक्य.
यानीं उत्तर पाठविलें कीं ' मूल खरें परंतु धन्याचे. यद्यपि अमार्गही असल्यास त्याची अमर्यादा करणें आपल्यास असकच. '
—हो. कै. पृ. १०१

असकत—अशक्य.
अवतरणासाठी ' सुरतसांभाळया पासून ' शब्द पहा. —हो. कै. पृ. ४०

असतां—त्या अर्थी.

ज्यापक्षीं नानांनीं लोभ धरिला, असतां (त्या अर्थी) संकट पडणार नाहीं.
—ऐ. ले. सं. ५१९६

असत्या पदार्थांत—उपलब्ध सामुग्रींत; आहे त्यांत.

मुलूक जो सुटला आहे तो कोणताहि नाकारा नाहीं. असत्या पदार्थांत उत्तम आहे.
पे. द. २८ पृ. १६०

असर्फी--अश्रफी; मोहर, अशराफिन या पोर्तुगीज शब्दाचा अपभ्रंश.

बाळकृष्ण भुतपेटीचा लेक यानें पांचसहाशें असर्फी (अश्रफया) आमचे बुडविले, त्याचें आम्ही काय केलें ?
—ब्र. च. पृ. ३३६

असर—परिणाम.

असरफी--मोहरा.

बादशहास व मलकाजमानीस बहुत मार दिला. तेव्हां त्यांनीं बहुतां दिवसांचा खजिना होता, तो दाखविला. त्यांत कांहीं असरफी व नगदी सांपडली.
—ए. ले. सं. ४२२४

अस्वलीगड—उर्फ परळी उर्फ सज्जनगड.

अस्वाब—सबाब, मार्ग.

असली—खरा, सच्चा, अस्सल.

आपणांस बंगालियास माल खरीदी करावयाबद्दल रवाना केलें. यैवजहि थोडाबहुत समागमें आणिला होता. त्यास येथें यांची खर्चाची वोढ देखून असलीस साहित्य न करावें तें अयुक्त जाणून जें साहित्य होऊन आलें तें केलें.
—पे. द. ४० पृ. ५१

असवाऱ्या—स्वाऱ्या.

आमचे लोक आहेत ते आम्ही न्यावयास हुजूर अर्जदास्त करतों असें सांगितल्यावरून राहविले. असवाऱ्या सरकारच्या गेल्या नसतील.
—ऐ. सं. सा. पृ. २४ लेखांक १४

असह्य—वैर; वैषम्य.

सर्वांस तुमचें असह्य. धणीयाची व कार्यभागी यांची ममता तुमचे ठायीं, हें सर्वांस असह्य.
—ऐ. ले. सं. ९००

असाकिर—सैन्य.

असामदार—वेतन घेणारा.

असामदाराचे घोडें परिच्छिन्न लहान जमेस धरूं नये.
—खरे ११ पृ. ५७०७

असामधणी—मूळ अरबी शब्द इस्म त्याचा अर्थ नांव किंवा प्रतिष्ठा—त्यावरून थोर, मातबर.

यंदा छावणी झाली तर फौजे । बखेडा होईल. लोक कोणी राहत नाहीं. निदान ७००--८०० स्वार असामधणी राहिले तर फार थोडके राहून (आमचें) स्वरूप राहत नाहीं. —ऐ. ले. सं. १८०१

निम्मेच्या अजमासास राहतां राहतां लोक कमी राहिले. परंतु असामधणी फार करून राहिले आहेत. —ऐ. ले. सं. १८६८

असामी—नांव; व्यक्ति; नेमणूक; वार्षिक वेतन.

वितप्शील असामी नांवनिशीवार. (पा. ब. ३)

कृष्णाजीपंत त्रिवर्ग बंधूस विश्वासराव म्हणवून नांव किताब दिला; मातबर लोकांत असामी घातली (सभासद)

तुकोजी शिंदे याणी मौजे मुलखेड येथें बटकी देखील पोरे असामी तीन येकूण रुपये दीडशांस विकत घेतली —वाडबाबा २ पृ. १९१

असामीवार—नेमणूकप्रमाणें; हुद्याप्रमाणें.

वरकड पांच इसम यास असामीवार शिर्पेच पान्दान देऊन वाटेस लाविले —राजवाडें ५ पृ. १४१

असावयाचें स्थळ—वास्तव्याचें ठिकाण.

मी बदामी येंथील बनशंकरी आहे. मी असावयाचें स्थळ बदामीचे पलीकडे एक कोसावर. चोळच गोडचे रानांत सरोवराचे पूर्व भागास माझ्या पादुका आहेत म्हणोन. या प्रकारें सांगोन अदरुष जाली

—द. स. कै. या. पृ. २५५

असासह—(स्त्री) असास. पाया.

असाह्य—असह्य.

ते प्रांतीचा मनसबा स्वामीचे पदरी पडला हें गोष्टीचे त्यांस तो असाह्य आहे. परंतु फत्तेसिंग बावास मात्र समाधान आहे.

—पे. द. १० पृ. १२१

असीर, अशीर—बंदीवान.

इंग्रजाकडील हमिष्टवान असीर जाहले आहेत त्यास सोडून द्यावे

—रा. खं. १० पृ. १८२

असील—दासींतील मानकरीण.

आठ पंध्रा दिवस जाले बेगमेचे कुणबिणीची जमादारीण कुणबिणीत असील होती तिची भेट घेतली तिला १०० रुपये नजर केली आणि तिचे घरीं जाण्याचा पाट (परिपाठ) घातला.

—सनपुरी बखर पृ. १०

असील—दासी. मात्र ही गुलाम नसते यामुळें लवंडी वर्गांतील दासीपेक्षां किंवा गुलाम म्हणून विकत घेतलेल्या पोरीपेक्षां हिचा दर्जा वरिष्ठ असतो.

तथापि, कित्येक वेळां हा शब्द सर्वसामान्यतः स्त्री दासी अशा अर्थीहि वापरतात. (विलसन)

असीवसीचा—अंशाचा, वंशाचा. वंशज. वारस.

यासी आपण नौदिगर होऊ अगर आपले असीवसीचा भाऊबंद नवदिगर करील तरी आपनास कुलस्वामीची व पूर्वजाची अनेगा (मनाई, शपथ) असे —शि. च. सा . २ पृ. २६०

असुदगी—शांतता; भरभराट.

तिन्ही सरकाराची नजर रयतीचे व मुल्काचे व शहरचे असुदगीवर सादर आहे —पे. अ. ६२

असुदगी—विश्रांति; सवड.

आमची चाकरी करावयाची उमेद किती राहिली आहे ती तुम्हांस ठाऊकच आहे. ज्यांणीं मेहनत करून आम्हांस असुदगी करावी ते घरींच राहूं लागले! आमच्या वस्तु सरदारी होत नाहीं.

—ऐ. ले. सं. १५९३

असुदा, असुधा—विश्रांति मिळाल्यामुळें ताजेतवाने हुशार; पुष्ट.

लष्कर श्रमी यामुळें मुक्काम केले, ही उत्तम गोष्ट केली. आतां लोकही असुधे झाले. —ऐ. ले. सं. ३८३

मग कोण्हीकडे पोट भरावयास असुधा मुलकात जाऊन फौजेची उस्तवारी करणें. —पे. द. १३ पृ. १६

यांची फौजही थोडी आहे. तुमचें उत्तर येईजे तों येथेंच राहून चार दिवस असुदे होतील. —ऐ. ले. सं. १४८०

सध्या आमची घोडी तरंगली आहेत. घोडी असुदी जाहली म्हणजे आठा चहुदिसी स्वामीचे भेटीस येऊ. —पे. द. ३० पृ. १६३

असुरा—मोहरमचे दहा दिवस,

अमित्राची फौज कित्तुरावरीच आहे, असुरा जाहलेखेरीज कूच होऊन कोणीकडे जात नाहींत. —ऐ. ले. सं. ३९६४

असूदी—पारिपत्य, तजवीज.

स्वामीचे संग्रहीं तुम्हांसारखे शूर आहेत, कार्यप्रसंगीं स्वामीकडील त्याणी (नवाबानी) अडविल्यास नवाबाची असूदी केली जाईल ते मतलब यांतून आल्यास तुम्हांकडून त्याचे मनसब तसद्दूक आहे हे स्वामी जानतच आहेत.

—म. कु, ई. भा. पृ. ८२

अह्काम—हुकूम; सत्ता; हुवमत.

याप्रमाणें मुख्तारीचे अह्काम आणून दिले. (चि. रा. २४)

एक महिन्याचा येथून अह्काम पाठवितों. —राजवाडे २२ पृ. ४७

दोन अह्‌काम कामाचे नाहींत. —चि. रा. ४२

अह्‌फाद—प्रजा.

अह्‌वाल—वृत्त.

अह्‌जार—(अ) हजर, उपस्थित लोक.

अहद—करार.

कृष्णराव बल्लाळ याणी पुण्यांत जो अहद व वचन प्रमाण करून तुलसी व बलभंडार दिला त्याची फरामोसी रावजीस झाली.

—पुणें अखबार भाग १ पृ. १०८

अहदनामा व बेलभंडार पाठविला तेव्हां अंदेशांत पडले.

—हिंगणे दप्तर खंड २ पृष्ठ १४

अहद—स्थान, ठाणे.

अहद—एक.

अहददार—वसुलावर शें: कांहीं टक्के देण्याचें कबूल करून जिल्ह्यांतील वसूल जमा करण्याच्या कामावर जो कामगार किंवा अधिकारी मोगली सरकारांतून नेमण्यांत येत असे तो. (विलसन)

अहदपैमान—दारमदार किंवा करार.

अहदपैमान व्हावे ते सर्व स्वामीपाशी आल्यावर अर्ज करितो

—राजवाडे १ पृ. १५९

त्यानंतर सखारामपंत व हरिपंत व बालाजी जनार्दनाची परस्परें अहदपैमान होऊन इतिफांक जाहाला. —पुणें अखबार भाग १ पृ. १०६

अहदशर्त—तह; करार; कायममिजाजी.

यास अहदशर्तीचे कागदपत्र देऊन रवाना केले.

—राजवाडे १९ पृ. ४७

दौलतींत अहदशर्त आणि वचन हा खजाना.

—राजवाडे १९ पृ. ४७

सबवजहेने (सबवजेनें--सर्व तऱ्हानीं) पेशवे यानी सावनूरकर नवाबासी दोस्ती ठेऊन मसलतच्या वक्ती मददगारी करीत असावे या बमोजीब **अहद-शरत** होऊन तहनामा ठरोन तालुकेची वाटणी झाली.

—द. स. कै. या. पृ. २३६

अहदसिकनी—करारभंग, वचनभंग.

करनल अपटेनचे विद्यमाने करार जाहला त्याची अहदसिकनी व श्रेहात अंतर तुम्हाकडून जाहले. —पुणे अख. भाग २ पृ. १९१

अहफाद (अफ्लद पाहा)
बादऊ अवलाद व अहफाद त्यास रवा (चालू) करणें
—राजवाडे १५ पृ. ३६४

अहफाद, अफ्वाद, अफ्लाद,—मुलीची संतती.
व अवलाद व अहफाद चालविजे. —रा. खं २० पृ. १४१

अहमदी—टिपू सुलतानानें चालू केलेलें एक सोन्याचें नाणें. त्याची किंमत पॅगोडाइतकी म्हणजे होनाइतकी असे. (विलसन)

अहल्‌कलम—मुलकी अधिकारी. (विलसन)

अहल्‌कार—कारकून दरबारातील कर्ते लोक किंवा अधिकारी.
साहेबाने फौज बक्षी करून लवकर जाब पाठवावयाविशी अहल्कारास आज्ञा सादर झाली पाहिजे.
—पृ. ११२
मराठ्यांचे परराष्ट्रांचे दरबारांतील वकील.

अहल—लोक.
— प .अ. ५९

अहल—कुटुंब.

अहलतमगा—राजानें दिलेली जमीनबक्षिसाची सनद.
वरसना येथील सनदा अहलतमगा करून द्याव्या.
—म. शि. यां. का. पृ. ८२७

अहलनसार—त्यागी लोक. लक्षणेने धन्याकरतां जीव देणारे बॉडीगार्डसारखे लोक.

वकीलास कंठी, पोषाक, शिरपेच व हमराही (बरोबर आलेले) अहलनसार तीन आसामीस वस्त्रे देऊन रुखसत केले.
—पुणें अखबार भाग ३ पृ. १८७

अहसन्—उत्कृष्ट.

अहादी—शिपायापेक्षा वरच्या दर्जाचा लढाऊ स्वतंत्र स्वार.
अहादीवर अहादी रवाना केले.
—म. रा. चि. थो. शा. ६४
तेथून सुलतानजीराव निंबाळकरास सांडण्या व अहादी बोलाऊं पाठविले होते.
—पे. द. १५ पृ. ८१

अहाली मवाली—हाली मवाली. उच्चनीच, सर्व दर्जाचे लोक.

अहीनी—लोखंड.
अहीनी दगडी जिन्नस दारूचे अंतरीं ठेवावे. —म. रा. आ. पृ. ३५

अहूदह—हुद्दा, अधिकार.

अहोनिरंतर--अहोरात्र.

१ अहोनिरंतर आशिर्वादाचा वर्षाव करून चिरंजीव यशस्वी होऊन येत तें करणार स्वामी समर्थ आहेत. —ब्र. च. पृ. १८

२ तुम्ही पत्र न पाठविलें: आम्हांस अहोनिरंतर काळजी तुम्हांकडील. —ऐ. ले. सं. १२७

अक्षतमरिष्ट--कांहीं इजा न होता.

श्रीच्छेनें एवढें फौजेच्या परिघांतून अक्षतमरिष्ट बाहेर काढिलें. —ऐ. ले. सं. ४१३

जेणेकडून केला तह अक्षतमरिष्ट चाले ऐसा विचार असेल त्यासच मध्यस्त देऊन तह करूं. —पे. द. भा. ३ पृ. ८१

अक्षीतमरीठ--अक्षतमरिष्ट. संपूर्ण, कमीअधिक न होता.

पातशहाचा प्रकार म्हणावा तरी, येक लाख तीस हजार रुपये दरमहाचा चाकर आहे तितका पैसा अक्षीतमरीठ मिळाला म्हणजे त्यास एका गावासी व बिघाभर जमिनीसी गरज नाही. —राजवाडे खंड १२ पृ. ३०

अक्षा—भीति, संशय.

भोसले यासी कर्ज मागीत होते ते हुजरे जाऊन बसले! त्या आक्षेनें जाणोजी भोसले यासी सनद दिल्ही कीं आपण नवाबासी पयेगाम बांधून की ते आपण येक होऊन पेशव्यासी लढाई घेऊन पुणे लुटू. ते जो पैका मागतात हा (तो) शिबंदीवर खर्च करूं. —स. ब. पृ. २९

अक्षोभ—अथांग, अपरंपार, खोल.

पायाब होऊन (उतार होऊन) सुभेदारास यमुनेने मार्ग दिला ! तों मागाहून फिरंगी आला. त्याणेहि गंगेत (नदी यमुनेत) प्रवेश केला तों पाणी अक्षोभ. लाचार होऊन माघारा गेला. —हो. कै. पृ. ३७

अंकरीब—जवळ; लौकरच.

खर्चाचा मजकूर तर खर्चासही येथून अंकरीब पाठवीत असो सा. सं. इ. जु. ले ७५

अंगठाण--आवाका, शक्ति.

आपले जातीचें अंगठाण पाहतां, जमेतीचा अजमास पाहतां एकोण, पन्नास हजारांची जड. —इ. सं. होळकर कैफियत पृ. २

अंगडी--तंगडी व कमर यांमधील शरीराचा भाग.

माझ्या ज्वराचा मजकूर सखारामपंतीं सांगितला असावा; परंतु तो लटका. यांत संदेह अंगडींतला आहे. अजून किंचित् अंगडींतील दुःख जाणवतें. कांही ताज़ेहि होत आहे. दुवख्त दंड काढतो दो रोजाआड

घोडी फेरावयास जातो. खातो ते जिरते.

—पुरंदरे द. भाग ३ पृ. १७१

अंगभूतिक—संबंधी, नातलग, आप्तविषयी.

अण्णा देशमुख वाकडे यांचे घरीं चौकी बसोन त्यांचे विपत्य बहुत करतात. आणखीहि किरकोळ मोठयांचें अंगभूतिक होते, त्यांच्याहि घरीं प्रतिबंध जाले. —ऐ. ले. सं. ७५८६

अंगलग—लगत्याचे; निकटचे; विश्वासू; नात्यांतले.

मग राजानें सासष्ट सरदार व अंगलग व प्रधान, पुरोहित, गुरु, उपाध्ये समस्तांशी बोलाविले. —बिंब ३

अंगारक—आंगरे (आंग्रे आडनांव; आंग्र्यांचें सांकेतिक नांव)

अंगारकानें सल्ल्याविषयीं लिहीले आहे. सल्ला करून घेतला जाईल.

—पे. द. ३ पृ. १७३

रहिमतुल्ला बेग सावकार अवरंगबादकर याचे जहाज अंगारकानें लुटले सबब खर्चास रुपये. —पे. द.

अंगप्रस्थान—प्रवासास निघण्याचें ठरल्यानंतर मुहूर्तानें बाहेर पडावयाचें व घराशेजारीं दुसऱ्या कोणाचे ठिकाणांत तो दिवस मुक्काम करावयाचा, या विधीस अंगप्रस्थान म्हणतात.

परंतु एकाहि सरदाराची फौज बाहेर न पडे तेव्हां खासा पाटील-बावानीच डेरे तोफखान्याचें सराईजवळ देऊन अंगप्रस्थानेंकरून कूच केलें. —म. शि. यां. का पृ. ८३५

माघ सुद ५ सोमवारी प्राथकालींच खासगत अंगप्रस्थानेंकरून बाहेर निघावें दुसरा विचार नाहीं. —पे. द. भाग २८ पृ. १५५

कृष्णराव बल्लाळ छ मजकुरी श्रीमंतांचा निरोप घेऊन अंगप्रस्थान करणार छ ३ तारखेस बारामतीस जाणार.

—पुणें अख. भाग १ पृ. २५१

अंगवण, आंगवण— पराक्रम, ईर्षा, जोरा.

शेवटीं पाटीलबावाही दिक होऊन बोलले कीं, "बाईसाहेब! आपण इतकी आंगवणाचीं बोलणीं बोलतां परंतु आम्ही पुरुष आहोंत. आपले ढंगावर आलो असतां (आपणांप्रमाणेंच हट्टास पेटलो असतां) आपण काय कराल? —हो. कै. पृ. ७५

अंगहीन करणें—डोळे काढणें.

गुलाम कादर दिल्लीत येऊन पातशहास अंगहीन करून अमर्यादा केल्या त्याचें पारपत्य केले असतां चांगलें, असें जाणून फौज रवाना केली.

—म. द. रु. ३ पृ. ६०

अंगारकवार—मंगळवार. —पे. द.

अंगी डसवून बोलणें—मुद्दा अंगी लाऊन निरुत्तर करणें.

मी मुलाजा धरीत नाहीं. यथार्थ व अंगीं डसवून बोलतो म्हणून विषम मानितात. —म. शि. यां. का. पृ. ५६५

अंगीं भूत वाढणें—अंगांत येणें.

तेथें कोणाच्या अंगीं भुतें, ग्रह वाढत असतात. त्यांनीं कांहीं बाधा आहे म्हणून सांगितलें. त्यावरून धाकटे श्रीमंत धोमास गेले. तेथें भुतें वाढतात त्यांस पुसावें म्हणून गेले आहेत. —ऐ. ले. सं. १९०४

अंगूर—द्राक्ष.

अंगेज—१ अंगेजी; अंगेजणी; पराक्रम. २ अंगीकार.

त्या प्रसंगीं राजश्री त्रिवर्गांनीं जातीनिशीं व फौजेनिशीं अंगेज फार सरस केली.

—ऐ. ले. सं १७९७

तुमचे वरचेवरी जसे साहित्य करणें तसे करून, केल्या अंगेजाचे सार्थक होय ऐसी गोस्ट केली जाईल.

—इ. सं प्रा. म. सर. पृ १७

अंगेजणी—पराक्रम.

झूज जाहलें ते समईं अंगेजणी झाली नाहीं म्हणून नाना प्रकारें व्यंगोक्तीच्या गोष्टी लोक बोलतात.

—ऐ. ले. सं २३४०

अंगेजी—जातीनिशीं पराक्रम किंवा मेहनत.

मसलतीस अंगेजी नशिबाची केली नाहीं, यामुळें शत्रूच्या हातास कांहीं न लागतां आम्ही निघालों. —ऐ. ले. सं पृ. १५२५

अंची—१ म्हैसूरच्या राज्यांतील डांकेस ‘ अंची ’ म्हणत.

२ टपालखात्यावरचा दरोगा.

बनुरास हें पत्र पावतेक्षणीं अर्जी अंचीवर रवाना करणें.

—ऐ. ले. सं. पृ. २०४८

तेथें गेलेवर अंची शामय्या याजपाशी आम्ही फार बोलिलो.

—ऐ. ले. सं. पृ. ३६४०

अंजाम—परिणाम किंवा शेवट.

मर्जी हजरतीची खूष राहिली म्हणजे कृतकृत्य. अंजाम कसा आहे इकडे कोणी पहात नाहीं —रा. खं. ५ पृ. १०४

अँजुमन—सभा.

अंत्राफ—जवळचे, नातलग.

वरकडही अंत्राफ शिलेदार वगैरे लोकांस याचप्रमाणें ताकीद आहे.

—राजवाडे ७ पृ. ५४

अंतरसूत—फेर, फरक, विसंगति.

पेंडसे यानी लिहून दिले आहे कीं मुरडीचे आगराची मामूरी करावयाची सनद नेली ते विसोहरी महाजन याणी घेऊन आगर नारायण जोसी यासी दिला. त्यास मनास आणिता गांव वसाहत जाला यास ५० । ५५ वर्षे जाली अणि मुरडीचे आगरास नारायण जोसी यासी दिल्हैयास वर्षे ३८ जाहली तेव्हा अंतरसूत. तेव्हा ते साक्ष प्रमाण दिसोन येत नाही

—पेंडसे कु. वृ. पृ. ३५

अंदाज—टाकणारा.

उदाहरणार्थः तिरंदाज, गोलंदाज.

अंदाजपट्टी; अंदाजपट्टा—पीक उभें असतांच किती वसूल होईल याचें केलेलें अंदाजपत्रक.

(विल्सन)

अंदाजा—हेतु.

तरी पेशजी साहेबी तह करून दिल्हा होता आणि तेणेंप्रमाणें नावतीवयास त्याची काय अंदाजा आहे?

—पे. द. ३१ पृ. १९

अंदु—लढाईचे वेळीं हत्ती जाग्यावरून पळूं नये म्हणून त्याच्या पायांत जो साखळंदड घालतात तो.

इंदुरीहुन तुमचे कूच होईल त्याच दिवशीं हत्तीचे पायांत अंदु घालून तुमची खात्री करीन, तरीच मल्हारजी होळकराची सून.

—हो. कै. पृ. ७५

अंदेशा—विचार, संशय.

आपल्या कार्यास दिनावधि लागल्यास त्या देशांत वस्ती राहणार नाही. आपल्या संग्रही पैसा नाहीं जमयत होणार नाही याची अंदेशा कशी ते पाहावी.

—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. ५९

ऐशास आपण लिहीले अंदेशे येथे उभयतांनीं घेतले, तेव्हां त्यांची खातरजमा केली.

—ऐ. ले. सं. ४०४८

अंधारी—अंधार कोठडी.

ज्या गाड्यानें श्रीमंतांवर हात टाकिला त्यास मोरोबा दादांनीं तेथेंच मारूं न देतां कैद करून आणून अंधारींत घातला आहे.

—ऐ. ले. सं. १४२०

अंधेरी—अंधेरनगरींतल्या सारखा; बेबंद.

येथील कारभार मोठा अंधेरी. कोणास कोणी पुसत नाहीं. शिलेदारी

चोहोकडें आणि हुजरे कारभारी पुण्यांत ! कोणापाशीं फिर्याद सांगावी ?
—ऐ. ले. सं. ५२४४

अंधेरी—किलाव्यास बांधलेली असते जरूर लागेल तेव्हां हत्तीच्या डोळ्यावर टाकतात.

अंबर—देवमाशाचे सुगंधी रेत किंवा विष्ठा कापडी झापड. —राव्यको

अंबाटक्का किंवा अंबीटक्का—आंबराया बावत घ्यावयाचा कर. (विलसन)

अंबारसरी—गांवांतील ब्राम्हण गांवकामगारांना वगळून, इतरांपासून जी घर-पट्टी वसूल करतात ती. (विलसन)

अंबारीसकट हत्ती गिळणें—सर्वांच स्वाहा करणें.

येथील मंडळी अंबारीसकट हत्ती गिळणार हें स्पष्ट आपणास ·विदित आहे. —पुणें अखबार भाग १ पृ. ७७

अंबीर—थोर सरदार.

अंबुवाची—आषाढ वद्य पक्षांतील दशमीपासून त्रयोदशी अखेरचे चार दिवस. या काळांत भमि अशुध्द होते अशी समजूत असून या अवधीत कोठलेहि शेतकाम न करण्याची प्रथा आहे. (अंबुवाची हा अमावास्येचा अपभ्रंश असावा.) (विलसन)

अल्काब—मायना. पदव्यांची मालिका.

महादजी शिंदे देशी येण्यास कारण वजीरातीचा अल्काब बमय (सह) मरातब (सन्मानचिन्हें, अब्दागीर वगैरें सारखी) श्रीमंतांस नजर करावा. —हो. कै. पृ. ११०

हलका अल्काब लिहिलियामुळें विषम मानतात.
—दि. म. रा. १ पृ. ७

अंवारे—अंतरें, अंतरानें, फासल्यानें.

येजमान पुढें चौदा कोसाच्या अंवारे आहेत.
—हो. इ. सा. प. खं. १२ पृ. १३३

आ

आइबदार—अयबदार—व्यंग असलेले.

हत्ती हत्तीणीमध्ये निरसवस्त आइबदार माहागही असेल ते मोरारजी गाईकवाड यास देणें. —पे. द. १७ पृ. १२२

आइंदे—येणारा; पुढें; पुढील साली.

यंदा हाली व आइंदे. —का. प. या. व. ४९३

सरकारचे वचनाची कायमी कशी ते आइंदे जहुरात येईल.
—राजवाडे १० पृ. १६६

आईन—मूळचा, अस्सल.

(अवतरणासाठी ' चपर ' शब्द पहा) —हिंगणे द. भाग २ पृ. ८१

आई माई जेरू बेटी करणें—आई-माईवरून शिव्या देणें.

वरातदार पाहून नाइकास राग आला त्यांनीं वरातदारास आई माई जेरू वेटी करून वरात माघारी टाकली (अमान्य केली). —रा. १ पृ. ४

आईमा—एक हक्क, कर.

मौजे सिदपे यावर आईमा आहे. त्यास गुदस्तां हाच फकीर गावास आला होता तेव्हा आइमेदाराचा सरीक दोन हिस्से याचा आहे त्यास पैका दिल्हा त्याप्रमाणें यासहि देत होते; तें न मानून, तेथून निघून आला तो आज मसाला घेऊन आला. —हो. इ. सा. खं १२ पृ. १९

आऊताची पास—नांगराचा फाळ.

शेतें कापून चारावी, आऊताच्या (कुणबीयाचे नांगराच्या) पासा वगैरे न्यावे, याप्रमाणें करितात. —पे. द. भाग २० पत्र नं. २०३

आउर्दन—आणणें.

आउर्दह्—आणून.

आकरीत—खोटें, उलटेपालटे; लबाडी.

त्यावरी निलोपंती विश्वनाथ भटावरावर सांगोन पाठविले कीं, तुम्ही आकरीत करीता आणि पाठ राखिता आणि सखोबावरी आकरीत होईल तेव्हा कैसी पाठी राखोना. —पुरं. द. भा. ३ पृ. १४०

आकलवंदी—हुशारी, शहाणपण, मुत्सद्देगिरी.

मशारनिलेचे आकलवंदीनें आमचे सरकारचा फायदा कमपेश चाळीस लक्षाचा येकसाला जाला (सबब त्यास) इनाम गाव सहा हजारांचा प्रांत सुरत अठाविसी, येथें द्यावयाचा मानस. —शा. द. वें. पृ ६

आकसकोशी—द्वेष; आकस. उट्टें काढणें. वैर, वैमनस्य.

रामचंद्रपंतआप्पांचा कारभार आकसकोशीचा. करितां प्रसंगीं मला रक्षावें. —ऐ. ले. सं. ६४०३

पटवर्धन व घोरपडे याची फार दोस्ती. भाऊंचे व हरिपंत फडक्यांचें वैमनस्य. घोरपडे आपले मर्जीनें वागत नाहींत या आकसकोशीनें तहाचे वेळी हरीपंतांनीं घोरपड्यांचा पावणेतीन लक्षांचा तालुका मोगलाईकडे तहाचे संधीत दिला. —द. स. कै. या. पृ. ५१

आकारण—आमंत्रण; बोलावणें.

मुंबईकर जनरालाजवळचे मुनशी रा. रावसाहेब यांणीं आकारण करून आणविले आहेत. —ऐ. ले. सं. ६२१२

इत्यर्थं ठरला की त्याजला हुजूर बोलावून त्याचे विद्यमाने कितीक कामे-

काजे घ्यावी म्हणजे बहुत द्रव्य मिळेल. त्याजवरून श्रीमंतांची आकारण पत्रें गेलीं आहेत —हिं. द. खं. २ पृ. ५७

चतुर्थीचे दिवशीं श्रीमंताणी रात्री भोजनास आकारण केले होते. भोजन झाल्याउपर आदर्श मंदिरात (आरसे महालांत) श्रीमंत गेले. तांबूल दिले. आज्ञा घेऊन सिबिरास आलो. —ऐं. ले. सं. पृ. ७०५३

श्रीमंताची आकारणपत्रे राजाजीस गेली आहेत राजाजी मार्फत तहाचे बोलणे लावणार. —हिंगणें द. भाग २ पृ. ५७

आकाशपाण्याचें दुर्निमित्य—दारू प्यायल्याचा आरोप (दुर्निमित्य–आरोप) विसाजी आप्पाजी आठवले यांचे पुत्र मोरोपंत आठवले यांजवर आकाशपाण्याचें दुर्निमित्य कोतवालानें आणोन घरीं चौकी बसविली आहे.

—ऐ. ले. सं. ७०६०

आकास—आकस, तेढ.

त्यावरून याचा व त्याचा आकास वाढला.

—पे. द. २० पृ. १३५

आकिफान—दक्ष, उत्साही, सज्जन.

आकिबत—अंदीश, अन्तर्द्रष्टा, शेवटवर विचार करणारा.

आंकी—तें की. —इ. मं. ६५

आंख—कापड किंवा कापडाचे तागे-मूळ किमतीपेक्षा कापडावर आपणांस हवा तो किमतीचा आकडा घालतात अशा कापडालाही आंख म्हणतात.

कापड तेथें कांहीं आंख नाहींत. खासगत सनगे आहेत तीं जागा जागा त्याणी पळविलीं आहेत. तुम्ही कार्याकारण, आंखाच्या सुमारें कापड विकत घेऊन, तीन रुपयांचे मुद्दल सनंग त्याजवरी १५ चा आंख घालून, जे घेतील त्यास देणें, न घेतल्यास न देणें. —ऐ. ले. सं. पृ. ५३७

आखर—समाप्त.

स्वामींनीं सरदारास उत्तर लिहिले तों दिवस आखर जाला.

—पे. द. ९ पृ. ९

आखर चौघडा—तळ सोडावा अशी सूचना देणारा अखेरचा चौघडा.

आमचे मरणाचे सोबती व्हावयाचे असल्यास चौघडा आखर झाल्यावर अमूक जागा घोडे न घेतां पादचारी, ढालतलवारीनिशी त्या ठिकाणीं हजर व्हावे. —इ. सं. हो. कै. पृ. १२

आखत्यार मुखतार—कार्यकर्ते–अधिकारी–मुखत्यार.

माधव सिंगाचा पुत्र स्थानापन्न आहे. त्याचें वय १८-२० वर्षांचें. स्वता ज्ञान नाहीं. बरें, कार्यकर्ते अखत्यार मुखतार तें आपसात परस्परें विरोध राखितात. —म. शि. यां. का. पृ. ६५२

आखर होणें—मरणें.

दिल्लीहून असफजहावर सुभा फत्तेखा आला. असफजहा याणी बाजीराव यास बोलावून, याणी त्याणी मिळोन, पांडूरपरभणीचे सुमारे बुडविला. फत्तेखा आखर जाले.

—म. व. पृ. १९

सखारामपंत बापू व चितोपंत ज्या किल्यांत ठेविले होते तेथें ते आखर जाले.

—पुणें अख. भाग २ पृ. ११

आखरलवाजमा—उत्तरकार्य.

हरिपंत फडक्याचा अंतकाल (मृत्यू) जाला. मशारनिल्हे पुत्रानी हरिपंत मुतवफाचा आखरलवाजमा सिधटेकी केला.

—पुणें अखबार भाग ३ पृ. १९१

आखश—आकस, वैर, द्वैतभाव.

अथवा आत्ताहि विगाडास (विगाडास म्ह. विघाडास) जातो तर तुम्हास साफ सांगतो. भय काय आहे? आखश गोस्ट झाकत नाहीं. परंतु माझे चित्तांत हें गोस्टच नाहीं. मग चिंता काय?

—पे. द. १० पृ. २९

आखाडी—अनवाप्ति. अभाव. आषाढाच्या पावसाच्या अभावी पडलेला दुष्काळ.

प्रज्यन्याची दोनतीन महिने आखाडी पडली होती. प्रस्तुत तीनचार रोज प्रजन्याचा वर्षाव चांगला जाला.

—पुणें अख. भाग २ पृ. ३१

आखीरश—त्याच्या अंतीं; अखेर.

त्यावर दुसरे दिवशी आखीरश इंग्रज बेहिम्मत जाला

—कापयाव ४८०

आखें—बैलाच्या किंवा तट्टाच्या पाठीवर डाव्या व उजव्या अंगास धान्याच्या समान वजनाच्या गोण्या लादलेल्या असतात; अशा गोण्यांच्या दुडीपैकीं किंवा जोडी पैकीं एक गोणी.

—(विलसन)

आग—रक्षा, अस्थी.

नारोपंताचा मुडदा घेऊन आळंदीस येऊन, आपण दहन केले. दुसरे दिवसी वडकीहून जाऊन आग गोला करून लोहोगडास आलो. तेथून राजगडा-जवळ हस्तीस मंत्रआग्न दिल्हा.

—पुरं. द. भा. ३ पृ. १३९

आगम बांधणें (विचाराचा)—मनांत विचार पक्का योजणें.

अवतरणासाठीं हवक पहा.

—हो. कै. पृ. ३

आग रिघणें—सती जाणें.

कानोजी नाईकासारखा भाऊ जिवानसी गेला. बाइको त्याची आग रिघत होती. तीस रिघो देत नाहीं; यैसा अनर्थ घडला आहे.

—पे. द. ३३ पृ. १२८

आगरुखाचे होडके—झाडाचा बुंधा पोखरून सबंध बुंध्याचे होडकें तयार करतात ते.

मग जे पोहोणारे होते त्यास बकसीस देऊ केले आणि खाडीत उड्या घालविल्या. कितेकाच्या तरवारा बुडाल्या, पांघरुणें गेली. श्रमें करून अडीचसें माणूस पलीकडे गेले. तो एक आगरुखाचें होडकें सांपडले. मग त्या होडकेयासी दहा माणसें लावून दुसरें दीडसे माणूस पलीकडे घातले व गाताड्या लाकडे राजावलीचें गांवांतून आणून, ताफा बांधला.

—पे. द. १६ पृ. ३३

आगा—अजमास; अंदाज.

दोघे चुलतेपुतणे पडले. जातीचे खंबीर. परंतु समयास फौज जवळ नव्हती. व वाघ पाठीवर येईल ही आगा नव्हती. —ऐ. ले. सं. ६६३५

आगाजा—हूल; आवई.

या वाटेनें जाण्याचा उगीच आगाजा घालून, हैदर झाडींतून आम्हांवर दर्यानें येणार म्हणून बोलणारे बोलतात, यांत पहावें !

—ऐ. ले. सं. ८९४

आगाध—अवघड.

हा मनसबा आपणच कबूल करावा ! सिरोपस्थाई आपणच व्हावे. आपले पदरी आम्हासारखें असतां आगाध काय आहे ?

—पे. द. ३ पृ ३९

आगाह—माहित.

आगाही—(स्त्रीलिंगी) ज्ञान किंवा माहीती.

आगाहु—माहिती, पुढचा अंदाज.

मनसबीयाचा आगाहु आमचे नजरे येणें तो येऊन गेला

पे. द. ३ पृ. ८२

आंच—दहशत; भीति; धास्ती.

शत्रु कांहींसा शेर जाहला आहे. विना त्यास एकदां जरब चांगली बसल्या-शिवाय आंच धरीत नाहीं. —ऐ. ले. सं. ४१४३

आंच निघणें—दम निघणें.

त्यांचा मार तोफा व बंदुकींचा अतिशय. लोकास आंच न निघे.

—पे. द. भा. २५ प. नं. १६७

आंची—डाक, टपाल.

नवाब बहादूर यासी अर्जी आनंदराव यांची, आंचीवरून रवाना केली ती पाऊन समाचार कळेल. —राज. १९ पृ. ८२

आचीर्य—आश्चर्य.

आठ सवालापासून आपलें पत्रच आलें नाहीं. श्री. नानाही आचीर्य करीत आहेत. —ऐ. ले. सं. पृ. ५९२५

आजपडे—आज पावेतो.

अप्पा ! आतां तर मी बेहिम्मत जालो. फार सीमा झाली. आजपडे सात वर्षे झाली, कर्ज किती खावें ? पुढे परिणाम काय ? —नाग २ पृ. ५०

आजम—उजम. गर्व. अभिमान.

त्रिवर्ग एकांती बसून पवार यांची दिलजमाई बहुता प्रकारें केली. परंतु पवार मार्गावर न येत. त्यास तरवारीचा व जमयतीचा आजम ! आम्हावाचून ब्राह्मणाच्यानें काय करावयाचे आहे ? हा फंद ! शेंवटीं बाजीराव याणी पागोटें काढून उदाजी पवार यांचे पुढे ठेविले. तथापि त्यांचें बोलणें तेंच. तेव्हा मल्हारजी होळकर याजला त्वेष येऊन बाजीरावाचा हात धरून बोढले ' इतके मनावीत असता ध्यानास नये ! एक कुळंबट न आले तर काय चिंता आहे ? ' —हो. कै. पृ. ७

आजमाईश—परीक्षा. प्रत्यय.

एक वेळ आम्ही स्नेह म्हटला तेथे चाल कशी पडती याचा आजमाईश नवाबसाहेब यास अद्याप नाही. —रा. खं. १९ पृ. १०१

आजमोमाचे—मेणासारखे मऊ (?)

राज्य मुधोजी भोसले याचे कबज्यांत गेल्यामुळें मुलुख गारद झाला. पुन्हा पूर्ववत प्रमाणें कबजात येणें व अंमलदारी कायम होणें याला दहा वर्षे पाहिजेत. तेव्हां शम्सुद्दौला व घासीमिया या उभयतांनीं अर्ज केला जे, दहा वर्षे कशास पाहिजेत ? दहा महिन्यांचें काम आहे. तेव्हां दौला मजकुरासी मध्यस्तांनीं उत्तर केले की तेही आजमोमाचे आहेत यैसे नाहीं. याचे पोटी खिसारा वा चेंद दस्चेंद मुश्कील आहे. हे उभयतांचें भाषण एकोन मुख्यानी हास्यवदन करून फर्माविले की वर्षाच्या गोष्टी महिन्यावर आल्या. हेहि गनीमत मोजावे. —नाग २ पृ. १५८

आजराहकावीस—कपटानें. कपटपूर्वक.

निळो वामन एक सक्स त्यापाशी होता त्याच्या सांगितल्यावरून आजराहकावीस आपणांस पुरसीस करूं लागले. —म. द. रु. ३. पृ. २९

आजलग—आजपर्यंत. आजतागायत.

जनराल इबर करंवी कोन्नूरच्या मुलकांत निघून गेला. आजलग मुक्कामास पोंचला असेल. —ऐ. ले. सं. ४४१०

राजे यांनीं रावसाहेबास आजलग खोटी करून ठेविले ते येखादी खजमत (कामगिरी) सांगावी म्हणोनच ठेविले आहे.

—पे. द. २५ पृ. ३१

आजात, आजाद—स्वतंत्र, मुक्त.

यांच्या मुलांमाणसांचें चालवून त्यास आजात करावें.

—ऐ. टि. भा. १ पृ. २२

आजिबाद—१ यापुढें, यानंतर, २ अगदीं, बिलकूल.

इनाम सेत दिल्हे ते कोयाजीचें नावें आजीबाद रुकमालियास खर्ची पडून भोगवटा चालत आहे. —शि. च. सा. खं. ५ पृ. १९

आजिलग—अजिबात.

हल्लीं आम्हीं हरजी मजकूर याचे घरीचीं भुतें वोवाळून नेतों. आजिलग भुतें येऊं देणार नाहीं. आलीं तर दर असामीस गुन्हेगारी रुपये येकशें येकशें देऊं. येणें प्रमाणें दसकत दोस्तीचा कबूल--कतवा नरसमाळी सोनजी तांबेंडकर व रामजी होला यांणीं लिहून दिल्हा

—रा. खं. ३ पृ. ४४

अजिहोतधर्माची वाट करणें—शरण आलेल्यास अभय देऊन सोडून देणें.

रायबागणीस कोंडलियावर तिणें दातीं तृण धरून राजियासी बोलिली की तुमची धर्मकन्या म्हणविते. मग राजियानी तीस कौल देऊन आजिहोत धर्माची वाट करून सोडून दिली.

—म. द. रु. १ पृ. ६४

आजीकारणें—आजपर्यंत, आत्तापर्यंत, हा वेळपर्यंत.

अन्यथा आजीकारणें अंजनवेलीचा मनसबा विलेस लावून जंजिरेयाचा पक्ष तोडिला जाता. —पे. द. ३ पृ. ५९

आजीज—दीन.

मारता मारता मरावे परंतु केवळ आजीज होऊं नये.

—भा. व. पृ. ७

आजुमुदाकार—अजमोदाकार. अनुभवी. प्रौढ विचाराचा.

गोविंदराव भगवंत ना-आजुमुदाकार व वचनाचे इमानाचे शाबूत नाहीत. आपली बुजरगी व फरवर व नफा व्हावा हेच उमेद व बाजीगर व फंदफरेब व दानाईचा गरुर फार आहे. बलके गोविंदराव याचे बोलण्यांत कृष्णराव मौनी देत आहे. —पुणें अखबार भाग १ पृ. ११०

आजुरदगी—अजुर्दगी. असंतुष्टता. नाखुषी.

हे तुकोजी होळकरास कबूल न जाहल्यास महादजी सिंद्याची आजुरदगी.

—पुणें अख. भाग २ पृ. ११२

आट—हट्ट.

रावसाहेब याणी नारायेणरावसाहेब यांस सांगितले कीं दादासाहेब यांचा आट तुमच्यांनीं निघणार नाहीं. माझा कांहीं भरोसा नाही. त्यास (दादासाहेबास) तुम्ही बरोबर फौज देऊन हिंदुस्तानास पाठविलें म्हणजे तुम्ही राज्य स्वस्थ कराल. नाहींतर चैन पडूं देणार नाहींत.

—स. ब. पृ. ३६

आट—प्रयत्न, साहास.

जामदारखाना राजश्रीचा उत्तमप्रकारें पुणियांत ठेवलाच पाहिजे. सावधतेनें जितका रुपया, मोहर, सोने, रुप्याची भांडी मात्र आपले स्वाधीन, त्याचे जामदार लिहिणार ठेऊन ठेवावें. वरकड उचलावयास आट कशाला करावा?

—पुरं. द. भाग १ पृ. २४४

आट—अढी; कुर्रा.

दुसरी गोष्ट धन्याशीं आट धरून वर्तत आलों. आज चाकरीचा दिवस. आम्ही अनमान करून फौज न ठेविली तर पुढें लौकिक बरा दिसत नाहीं.

—ऐ. ले. सं. पृ. ५९

आट—फितुरी, कट. किंवा बंड.

त्यास इतकें मागितले की गंगाबाई व त्रिंबकराव याणी आट केला आहे त्यास तुम्ही सामील न व्हावें.

—स. ब. पृ. ३९

आटफले—अटपळ. पासोडीच्या दोन तुकड्यापैकी प्रत्येकास 'अटफळ' म्हणतात. संस्कृत अर्धपट शब्दाचा अपभ्रंश.

या खेरीज हक्क उत्पन्न चौघानी आपापले विभागाप्रमाणे घ्यावे.

१ सेव माल्याची

१ कोष्टयाचे मागास आटफले येक

१ वराडाची खौबऱ्याची वाटी

१ वाण्याचा वाटेल

—चं. चू. द. पृ. २४

आटाळा—लटांबर. सामानसुमान. खटलें. बाडबिशाद, अवजड सामान.

हत्ती, घोडीं, माणसें आदिकरून सारा आटाळा विटया पावेतों सुखरूप गेला

—ऐ. ले. सं. ८३६.

त्याजबराबरील जडजूड आटाळा आहे तो तेथें ठेवावा व कार्याकारण घेऊन तेथें यावे.

—ऐ. ले. सं. पृ. ३२९

आपाजीराम दाभोळकर पुणियाहून लष्करात येत आहेत. समागमें घोडी व उंट व पालखी वगैरे आटाला आहे त्यास मुजाहीम न होता आपलाली हद्द पार करून देणें. —मं. त्रै. वर्ष ९ अं. २

शिंदे डेरेदाखल झाले त्यांचा आटाला उज्जनीस रवाना त्याणी केला. —ऐ. ले. सं. पृ. ४७२१

आटून असणें—सिद्ध किंवा तयार असणें; सज्ज असणें.

त्यानंतर दुसरे दिवशींहि शिद्यांनीं शिकारीची ताकीद आपले गोटांत केली व ४ घटका रात्रीस शिकारीस निघावें हा बेत जाहला! तो संदेह पडोन कारभारी (नाना फडणवीस) आटून होते. —ऐ. ले. सं. ५२७१

आटोकाट कुमैत—कुमाईत घोडी. अनावर अशी कुमाईत घोडी. जहांबाज हट्टी स्त्रीला दिलेलें विशेषण.

करवीरची कृत्या (जिजाबाई) भूधरगडासारखा किल्ला देती तर कार्याचा होता परंतु ती अटोकाट कुमैत! तिजला कोणाचा विश्वास नाही! —ऐ. ले. सं. पृ. ३१२

आटोपून येणे—जलदी करून गाठणें.

सुभेदारासमागमे त्रिंबकपंतदादा तेथपर्यंत जातील त्याजबरोबर तुम्हीही जावे. इतकियात तुम्ही जेथे असाल तेथें तुम्हाजवळ आटोपून येतो. —चं. चू. द. पृ. १३४

आठ—जुलूम, छळ.

कदाचित् श्वेतकृष्ण (काळेंवेंरा) विचार चित्तांत आणून या तर्फेचें मुलुखांत वरातदार पाठवून रयतेचा आठ करूं लागले तरी वरातदार हातीं धरून बाहेर घालणें. —पे. द. ३ पृ. ४९

आठई—अधिकारी. आरूढ.

नानाचा काळ जाहला. ती. राव, प्रधानपदास आठई झाले. —हिं. द. खंड. १ पृ. १४

आठकी सोलंकी—आठ आठ किंवा सोळा सोळा मजुरांनी ओझीं वाहतात तीं.

कुरणांत दोनशें पसतीस कामाठे पाठविले आहेत. त्यामुळें आठक्या सोलंक्या चालत होत्या त्या राहिल्या. —पे. द. १८ पृ. १०१

आड—(पु) अडथळा. अट. हट्ट.

येसाजी शिंदे यांचे तहाची बोली लागली आहे. त्यास येसाजी शिंदे यांनीं सदरहू गांवचा आड घातला आहे. याजकरितां येविशीं आज्ञा केली पाहिजे. —ऐ. ले. सं. ३२४५

आडकणीदार—पातळाचा एक प्रकार.

पातळें सेलारी. १ पंचरंगी आडकणीदार १ बादली आडकणीदार, एकूण २. —पे. द. २६ पृ. १५४

आड घालणें—आडकाठी घालणें; अट घालणें.

किल्ला हवाला करणें तरी राहेन म्हणून गणेश संभाजीनें आड घातला. याकरितां झाशी किल्ला हवाला केला.

—पे. द. भाग २९ पत्र नं. २२

आडजात—१ कनिष्ठ जातींत मोडणारें लोक. २ संकरप्रजा.

(विल्सन)

आडताला—आडथला.

रघोजी भोसले मंगरुळ प्रांतीच फिरत आहेत. त्याचे मोकासे कमाविस चालत आहे. आडताला नाहीं.

—पे. द. ३० पृ. ९६

आडताळणें—अडथळा घालणें.

भगवंत गोपाळानी कसबें मजकुराचे सिवारास उपद्रव करुन वहीत सेते पाडून कुरणें करितात. कसब्याची जमीन आडताळून पाडिली आहे.

—पे. द. २० पृ. १३५

आडधाये—अडचण; अट.

कापड पुढें पाठविले तरी कार्यास येईल. वरकढ लोकानीं हरयेक गोष्टीची आडधाये नसे. माणूस इजाफेस दिवट्या व पोरगे व अपतागिरें द्यावयाची ते देऊन दिलासा केलाच आहे. —पे. द. १६ पृ. ३६

आडभीड—अनमान.

पाटीलबावानीं भाषण केलें कीं आम्ही आडभीड करावी तर पातशा वगैरे येथें आहे काय ? आम्ही पातशाह नवें करणार. वरकढ हिशोब काय ?

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ७

आडभीड—भीड; हट्ट.

सर्वही आडभीड त्यांची आम्ही चालवीत असतां ते पुन फितव्यांत होतेच.

—ऐ. ले. सं. ३४४

आडमान—ताबेगहाण, तारण.

त्यास आतांही मुखालीफाचे तंबीस जो ऐवज लागेल त्याचे तमसुक (पावती किंवा परवाना) लिहून देतो. त्यास पाहिजे तरी आडमान, पैका फिटजे पावेतो (फिटेपावेतों) मुलुख, जो पाहिजें तो कुंपनीत ठेवून घ्यावा.

—इ. सं. चिना.

आडमुद्दा—कराराबाहेरचा मुद्दा. अडवणूक करणारा. आवांतर मुद्दा.
रोजमुरा तिसरा द्यावा, नालबंदीपैकीं कांहीं द्यावे, तरी पलीकडे उतरों, असें शिलेदारांनीं आडमुद्दे घातले. —ऐ. ले. सं. २३८०
किल्ल्यापैकीं, पुरंदर, नगर व साष्टी हे तीन किल्ले व ५ लाख रुपये रोख द्यावे, येणेंप्रमाणें करार असतां, आडमुद्दे राज्याचे वगैरे गाड्यांनीं मनस्वी घातले. —ऐ. ले. सं. १९८९
एक दोन आडमुद्दे संकराजीचे होते, तेही यांनीं कबूल केले. —ऐं, ले. सं. २८५५

आडवट—१ बिनताशीव अनघड तुळई २ आडवी तुळई.
किरकोळी खांब मोहटी, आडवट, कामेरे जाया जाले असतील तीं नीट करून द्यावे लागतील. —पे. द. १७ पृ. ६३

आडवा लगाम—१ लगामाचा एक प्रकार २ लगाम ओढण्याचा एक विशिष्ट प्रकार.
रिकीबदारानें राजेश्रीस सांगितलें कीं दूरच्या टप्प्यास बहुतसा दाटला तरी थोडासा वोढितो. त्याहीमध्यें त्यास खपाटचा लगाम म्हणून थोडा वोढितो. आडवा लगाम दिल्यानें सज येईल असें सांगितले. त्यावरी राजेश्री बोलिले कीं पुढीले चौकास जसा आहे तसा मागले चौकास नाहीं. —पे. द. ८ पृ. १५.

आडवे—टेकडीच्या शिखरापासून पायथ्यापर्यंतचा उतार असलेला प्रदेश. माची. उपत्यका. (विल्सन)

आडवे पाणी—तलावादिकापासून शेतीबागायतीकरितां घेतलेलें पाटाचें पाणी (विल्सन)

आडसवा करणें—(?)
नाईकवडी घेरा किल्ले मजकूर (यांस) जमाव घेऊन राजपुरीच्या मुक्कामींचे खंडांचे कुलारग मनास आणून, आडसवा करून देशमुखाच्या व उदम्याच्या राजीपणें खंड नांवनिशीवार करार केला असे. —रा. १ पृ. ५१

आडा—१ धान्य. २ फायदा. ३ साठा. (विल्सन)

आडाव—आडहत्यारी. शस्त्रधारी शिपाई.
मग देशदेसाई सोळाशे आडावाहीं आड घातले मग हादरुत माचळीवर बैसला —पा. क्ष. ज्ञा. इ. खं. १ पृ. १८

आडासन (न)—कंबर.
उभयता बंधूंनी पातशाहाचे फौजेत प्रवेश केला आणि अंतःकरणीं मनांत आणिले कीं आमची आजपर्यंत शंभर वर्षे संपूर्ण जाली आता आम्ही

माघारे काय फिरावे ? म्हणोन हातीं भाले घेऊन व फिरंगा आडासनी घेऊन, हत्तीसन्मुख येऊन, भाले निशाणाचे हत्तीस लाविले.

—म. द. रु. १ पृ. ४

आडीचा मार्ग—अडचणीचा मार्ग.

पुढें यावे तरी लस्कर लांबले. मार्गहि आडीचा. याकरिता जासूद पत्रें देऊन रवाना केला. तो मार्ग चालतो हेहि कळलिया भारी मजला करून काल सन्निध २ कोशावर येऊन मुकाम केला. —पे. दप्तर भाग २ पृ. ५

आडे—माप. वजन. ताजव्याची दांडी.

आडेपाडे—प्रत्येक खळ्यावरून गांवच्या पाटलाला जो धान्याचा हिस्सा मिळे तो पाटलाचा हक्क —(विल्सन)

आडेपारडे—मोकदमीचा एक हक्क.

मोकदमीचा हक्क लाजीमा इनामती पासोडी व आडे पारडें व सेलावाटी तेलधार सेवसबजी निमेनिम घेत जाणें.

—ऐ. सं. सा. खंड ६ पृ. ३२

आडोर—स्वस्थ, निभ्रांत.

तुम्हासी कौलू मरहामत करून पाठविले होते. त्यावरी तुम्ही उमाजी-पंतासांघाते सांगून पाठविले कीं फरजंदानीमधें (पुत्रांमध्यें) जमा करुनू (गणून) सांभाळणें व आपण आडोर राहणें.

—शि. च. सा. खं. ४ पृ. ७६

आढा—माप. बाजारचीं मापें तपासण्याचा अधिकार आवटयाचा असे.

ऐसे ठराऊन तुम्हास आवटीपणा आढासुद्धा भुसार देखील किराणा, असे वतन द्यावयाचें करार करून. —ऐ. सं. सा. खंड ५ पृ. १४

आणप्रमाण—शपथप्रमाण, वचन.

फिरंगी यासी खानासी आणप्रमाण जाली.

—पे. द. भा. २५ पत्र नं. १९२

महम्मद—अल्लीखानानी आपला भाऊ अब्दुलवहब-खानास आण प्रमाण करून बोलावून आणलें. E M. P पृ. ११२

आणा—आहणा; आहाणा; लोकोक्ती; सुभाषित; म्हण.

राजेश्रीनीं लिहिल्या गोष्टी खऱ्या आहेत. कोकणचा आणा जाला (कोकणातल्या म्हणीप्रमाणें अवस्था झाली) केलें तूज भावलें मज असें जालें.

—ऐ. ले. सं. ६६५३

आणी—१ कलम २ रुपयांत मिळावयाची आणेवारी.

मग सुभेदारानी इंग्रजांशी बोलणें करून दादासाहेब व सहा आणींचा लेख हवाली करावे म्हणून म्हटले. त्यावर इंग्रजांनी उत्तर केलें कीं दादासाहेबांचे

जवाहीर व सहा आणींचा लेख हे कलकत्यास आहे. कोणास पाठवावे. घेऊन येईल.

—इ. सं. हो. कै. पृ. १३

आणीख—आणखी, निराळा, वेगळा, विचित्र.

जें ईश्वरास करणें ते होईल. तुम्ही निश्चित घरीं राहाणें. गतवर्षींचा विचार आणीखच होता. यंदाचा आणीखच आहे.

—हिंगणें दप्तर खंड २ पृ. ७

आत्मिक—विश्वासाचे; विश्वासूक; अंतरंगांतले.

नानाचे आत्मिक कोणी श्रीमंतांनीं स्वतः जवळ ठेवूं नयेत.

—ऐ. ले. सं. ४९४१

आत्र—आंत्र, अगत्य, जिव्हाळा.

याचे गांव सुदामतप्रमाणं चालवणं नाहीतर तहाप्रमाणं यास पैका पावणं. याच आंत्र (अगत्य) आम्हास व वाडियांत आहे व तुम्हासहि आहे हे जानतच आहां. तर तहास अंत्राय न करणं

—ऐ. सं. सा. खं. ११ पृ. २५

आतनात—विपत्ति, अडचण, लाचारी.

पेचाखाली आलो. मनुष्येपणाचा विचार किमपी राहिला नाहीं. आमचा आतनात पाहून आपण जी आज्ञा करणें ती करावी. आमची आतनात पाहून आमच्या हातून निभावे असा विचार करून बालाजी रामचंद्र याची रवानगी करावी.

—ऐ. ले. पा. म्यु प्र. पृ. ८१

आतशखाना—तोफखाना.

किल्ल्यात अब्दुल अहदखानाचे आतशखान्यांत राहावे.

—दि. म. रा. भा. १ पृ.८६

आतशबाजी—दारूकाम.

रात्रीं नाच रोशनी आतशबाजी जाली. —रा. खं. ७ पृ १४५

आतार—सुगंधी. अत्तरें, तेलें तयार करणारा व विकणारा.

आतित्याई—आतताई, अतिरेकी.

गोविंदपंत आतित्याई फार आहे. पांघुरणे जाळून पुणियासी येऊन आमची नालीश करून (चहाडचा करून) आम्हास तेथे (पुणें दरबारांत) नेणार यैसे आहे.

—चं. चू. द. पृ.१५८

आम्ही सांगू तेच मान्य पडेलसें दिसत नाहीं. कारण आपला मतलब न जाहल्यास आतित्याई करतील.

—रा. खं. ११ पृ ५

आतिफत—कृपा, प्रसाद.

आतिय्यात—(अ) अतिय्यह. बक्षिसें.

आतिशयेसी—अतिशय. अतिशयेंकरून.

भेट जाली तों परजन्य आतिशयेसी बोळला. करितां काही येक बैठक होऊन बोलणें विशेष जाले नाही.

—पुणें अखबार भाग ३ पृ. ९९.

आद्यकरून—आदिकरून.

स्वामीच्या मूर्ती, देव, लिंग आद्य करून पेंढाऱ्यांनीं लुटलें.

—ऐ. ले. सं. ४५०६

आद-अवसान—आदिअंत. पुरावा. आधार.

पातशहाचे परवाने व कै. थोरले महाराज यांची पत्रें घेतली होती वतनासंबंधी. तीहि आपले बाप सखोपंत यांचे वेळेस राज्यक्रांतीमध्यें घरवाडा दग्ध जाला तेथे दग्ध जाली. आपल्यास आद-अवसान कोठे काही लागेना. —मा. स. प. मा. पृ. ७०

आदद—आदाद म्ह. संख्या

(अवतरणासाठी --पुणें अख. भाग २ पृ. ११६ ' कारचोबी ' शब्द पहा)

आदर्श मंदिर—आरसे महाल.

चतुर्थीचे दिवशीं श्रीमंतांनी रात्रौ भोजनास आकारण केलें होतें. भोजन झाल्याउपर आदर्श--मंदिरांत श्रीमंत गेले. तांबूल दिले. आज्ञा घेऊन सिबिरास आलों. —ऐ. ले. सं. ७०५३

आदर—इच्छा; खुमखुमी.

रा. येमाजीपंत व अंताजी शिवदेव सातारा आले. खालीं धामधूम करावयाचा आदर आहे म्हणून लिहिलें, तरी धामधूम करणें हीं कार्ये भले मर्दांची आहेत ! ज्या ज्यांचें मनोदयें असतील त्यांनीं आपला निशा करून घ्यावा. येविशी आम्ही कोणास गणनेतही आणीत नाहीं.

—वै. ४ स. १७४३ पृ. २६

आदर—आवकाश; आदर होणें म्ह. संधी सापडणें.

ऐशास मानाजी आंग्रे यांचेहि पत्र आम्हास आले यावरून इलाज करायास आदर जाहाला.

—पे. द. ३३ पृ. २८४

आदरउपचार—आदरसत्कार.

हैदरअल्लीनें लक्ष्मणपंताची भेटी घेतली. मशारनिल्हेचा आदरउपचार फार कांहीं केला. —ऐ. ले. सं. १४४३

आदरमुदारत—आदरसत्कार.

त्यांची भेट जालीयावर वहुत आदरमुदारत करून त्यास मेळवून घ्यावें.
—म. शि. यां. का. पृ ३१४

आदा, मसाला, रोजखुराक, बटा—परगण्याची खंडणी वसूल करण्यासाठी आलेल्यास गांवकऱ्यांकडून मिळावयाचे हक्क वा पट्ट्या.

पहिले तहाप्रमाणें चालणें. दुसरे परगणियांसी खंडणी करणें ते गावगना जीवन पाहून, परगणियाची पाहाणी करून जमाबंदी करणे. आदा मसाला रोज खुराक व बटा मनमाने तैसा घेतात तसा न घेणे. पहिले पासून ढमढेरे व सितोले घेत असतील त्याप्रमाणें घेणे.
—चं. चूं. द. पृ. २९

आदाब—१ वंदन, नजर. २ भेटीचा दागिना किंवा नजरनजराणा

१ सर्वांनीं आदाब बजाविली. ऐ. टि. भा. १ पृ. १२

२ नबाबानी मोत्याच्या कंठ्या ३ व जिगा कलगी वगैरे ११ आदाब इनायत केले.
—रा. खं. ५ पृ. १९१

आदाब अर्ज—भेटीच्या वेळीं सलाम करावयाच्या वेळीं म्हणावयाचे शब्द.

आदाब बंदगी—वंदनपूर्वक विज्ञप्ति, विनंती.

आदाब बंदगी ऐसी जे. —ऐ. ले. सं. ५९१८

आदावल—गुन्हा, आरोप, जबाबदारी.

या विचारांत आपणांस न घ्यावे तरी आपण म्हणतील कीं सटाबटा करून आपला उलगडा करून आदावल आम्हावरी घालून गेले.
—पे. द. ३ पृ. ८२

आदावल घालणें—आरोप घालणें, तुफान घेणें.

दरबारी अवांतर गृहस्थ मंडळी पुण्य खर्च करून आदावली घालीत आहेत. म्हणावयासी अथवा माया येक आमची तुम्हासच आहे.
—वै. ४ स. १७४५. पृ. ४

आदिअवसान—आद्यंत, आरंभापासून अखेरपर्यंत.

तिमाजी व्यंकटाद्रि यानें शपथपूर्वक मंडळांत उभें राहून आदिअवसान करीना (हकीकत) सांगितला. —ऐ. ले. सं. ८३९०

आदिल—न्यायाधीश (रा. व्य. को.)

आदेसूद— हस्तगत, जमा.

त्याणी जगंनाथ चिमणाजीस आज्ञा केली कीं लाख रुपयांस तुम्हांस आदेसूद जाहलें असेल तें वजा करून बाकी ऐवज घेणें.
—रा. खं. ३ पृ. ३२

आध्यान करणें—आधीन करणें, स्वाधीन करणें.
मग जानोजी बोलिला कीं माझी तिसरी तक्षिम माझा भाऊ लाखोजी आहे, त्याचें आध्यान केलें. —शि. च. सा. खं. ५ पृ. २३६

आधण—आधान. आधार. विसंबणूक. भरवसा.
विठ्ठलराव कोरेगावकर आले असतां करार करून गेले आहेत त्यावरी याणीं आधण ठेविलें आहे. पे. द. ८ पृ. ४५.

आधारी— खिडकीच्या आधारासाठीं उपयोगांत आणलेलें लाकूड.
सहा भंडाऱ्या (कपाटें किंवा फडताळें) विटालीसुद्धा अकरा तुलईची तोंडे व सात खिडक्यावरील आधाऱ्या.
—पु. न. सं वृ. खं. २ पृ. १५८

आधिनी—अजीजी, आर्जव, विनवणी.
जयपूरचे कारभारी याजवर जरब पडली. त्याणी बहुत आधिनी करून गुन्हेगारीबाबत २५ लाख रुपये याची निशा देऊन तेथून कूच करविले.
—हो. कै. पृ. १६

आन्चह—जें कांहीं.

आन—अन्य, अन्यथा.
इन्साफ वाजवी केला तर स्वामीवर शब्द येऊ देणार नाही. आन करीत तर येत्न काये ? येथे कोन्हासी बोलावे हे जागा दिसत नाही.
—पुरं. द. भाग ३ पृ. १३

आन—वक्त. संकटप्रसंग. आनबान—आणिबाणीची वेळ.
श्रीमंतांनी आमची आन राखून घ्यावे. आम्ही लेकरें आहोंत.
—पे. द. भाग २५ पत्र नं. २५५

आन—तों.

आनबान—प्रतिष्ठेबाबत तेढ किंवा चुरस.
दरबारांत व तमाम गांवांत अफवा कीं, सासुसुनेसीं आनबान कीं, मातुश्रीचे चित्तामध्यें अंबिकाबाईनें निरांळा पराक्रम न करावा.
—पे. द. ४० पृ. ५९

आनभाष—आणभाष, आणशपथ.
त्याची व मोगलाची आनभाष झाली की साल दरसाल घासदाणा जे घेता ते घ्यावे इजाफा कोठें न घ्यावयाची. —पे. द. २० पृ. ४४

आनसारिखें—अन्यथा, खोटें, अन्यसारिखें, विरुद्ध.
उपाध्येपण आपण खात आलो आहे. यासी आनसारिखें होये तरी आपण गोताचा अन्यायी.
—ऐ. सं. सा. खं. १ पृ. १३५

आपणापासून यास आनसारिखे न करून (करूं.)

—पे. द. भा. ३१ पृ. १४०

आम्हांस कुलकरणासी समंधू नाही यासी आनसारखें करू तरी आम्हास पूर्वजाची आण आहे. —पु. द. भा. ३ पृ. १५१

आनाड—अज्ञान, अडाणी.

(अवतरणासाठी ' लापणिका ' शब्द पहा)

—चं. चू. द. पृ. १३२

आनीक—आणिक, किंवा निराळा. विचित्र.

जे समयास धोंडाजीस मुख्यानें स्वामीकडे पाठविलें तो समये आनीक होता. हल्ली यांची नवली (चर्या) बदलली.

—पे. द. १० पृ. ६०

आप्तकी—आप्तपणा.

श्रीमंत नानासाहेबाच्या स्नेहाच्या गोष्टी बहुत सांगितल्या बहुतच आप्तकी व घरोबा सांगितला.

—पे. द. भाग २९ पत्र नं. २०३

या अर्थें स्नेह आप्तकी कळवावी हा चित्तातील भाव.

—म. शि. यां. का. पृ. ३७३

आपकरा, आप्कारा, आप्करा—प्याला, पेला.

आपकार—आजार, विकार.

छ २८ रमजानी सेनाधुरंधर यास पित्ताचा आपकार जाला.

—नाग २ पृ. १५२

आपकारणें—१ स्वाभाविकपणें. अपघात किंवा काही विषप्रयोग असला विपरीत प्रकार न घडतां, २ आकस्मिकपणें.

रा० आनंदराऊ पवार यांसी आपकारणें दैवाज्ञा जाहाली म्हणून वर्तमान आहे.

—राजवाडे खंड ११ पृ. ३०

आपखुदी—स्वसामर्थ्य.

तो खावंद त्या पाणियातील आपखुदीनें जाला.

—चित्रगुप्त बखर पृ. ८३

आपमरण—अपमरण; अपघाताचें किंवा वाईट रीतीचें मरण. (?)

अलचपूरचा सुभा आपमरणें करून मरतांच जानोजी भोसल्याचे बायकोनें तें शहरहि घेतलें. ऐ. ले. सं. १८७३

आपल्या गावाखाली असणे—स्वतःच्या गांवांत असणें.

वासुदेव मुतालिक ज्वराच्या बाधेमुळे आपले गांवाखाले होते. त्यांचा

काळ झाला म्हणून वर्तमान आले.

—पुणें अख. भाग १ पृ. २५१

आपलदारी—१ मालक, स्वामी, मुख्य. २ स्वार्थी.

या देशाचीं स्थीत विलक्षण. ज्यन फार करून अनाचारी. आपलदारी अनाधिकारी असोन कर्माचारी संकरकारी. धर्मस्थापक स्वामीनी सर्वहि केल्यानें होईल.

—पे. द. ३४ पृ. ७६

आपला पराया—आपलापरका, आपला पारखा.

आपला देश नाही. पराये देशांत येऊन पडले.

—पे. द. भाग ३८ पत्र नं. ३

आपलें केले पावणें—स्वकर्मानुरूप फळ मिळणें.

न देत तर आपलें केले पावतील

—हिं. द. खंड १ पृ. ६५

आपले परावें—आपले व परक्याचे.

लाख दोन लाख रुपये आपले परावे काढून सरकारांत दिल्हे

—हिं. द. खंड २ पृष्ठ ३२

आपले पारखे—आपले परके.

इतकीयांत च्यार सा घड्या रात्र जाली. आपले पारखे कलेना. अंधारोंन चहूंकडें पलू लागलें.

—पे. द. २८ पृ. १३४

आपसे—परस्पर,२ आपोआप, अनायासें.

(१) पुढें शिवाजी महाराज छत्रपती जाहले. महाराजांनी तानाजी सिंदे राव मोकासी यांसी धरून नेले. पारिपत्य करून ठार मारावे असे ठरले ते समयीं मुत्सद्दी मोठमोठे होते. त्याही अर्ज केला कीं, असा मोहरा मातबर सरदार यासी धरून पारिपत्य करावे हे योग्य नव्हे. तर यांसी हरएक गनीमावर घालून जुंजात पारिपत्य आपसे होईल.

—द. शि. मो. यांचा इतिहास. पृष्ठ १७

आपेट घोडा—घोडी न दाखविलेला घोडा.

उबार दाण्यासाठि हुजुरच्या कुमेद नर माद्या हिंसती ।
दूधखिरी शिंगरें पिती सुरु अपेट जे जे वळु असती ।
चारजामे जिन ठेउन अंधारी देऊन गडी बळकट कसती ।

—प्रभाकर शाहीर

आपोड असणें—१ एकाद्यावर अवलंबून राहणें (?) २ गुंता.

लोकांस दोनदोन पत्रे पाठविली कीं, त्वरेनें जाणें. परंतु माणूस एकाचा आपोड दुसरीयाचा आपोड. तिसरा त्याची वाट पाहूं लागला. चवथ्यास आणखीच गुंता पडला. पांचव्यास फलाणें निमित्त. असें भिन्नप्रकारें निमित्यें करून राहिले.

—ऐ. ले. सं. १२०

आफ्ततर—आफ्तर—बेवारसी, निकृष्ठ स्थितीचा.
केशव पंताचा मामला आफ्ततर पडला —पे. द. पृ. ५.
आफ्रीतहशीन—स्तुती, अभिनदंन.
निजामन्मुलुख याणी स्वहस्ते आफ्रीतहशीनचा शुका तुम्हास पाठविला —रा. खं. ६ पृ. ६२७
आफत—संकट. दुष्काळ, दुर्दशा, आपत्ती.
दरबारच्या बोलण्यांत सालमजकूरची आफत पावसाची आहे ती परिछिन्न मजुरा न द्यावी. कमाल सालची बेरीज घ्यावी. आम्हांकडील बोलण्याचा प्रकार तरी आफत मजुरा द्यावी. ते मागतात त्याप्रमाणें पैका द्यावा तरी ४--५ लक्ष रुपये आफती आहे. —ऐ. ले. सं. १९८२–८३
ये प्रांती आवंदा आफत बहुत आहे. याजमुले वसूल युक्तिनें घेतला पाहिजे. —पे. द. १५ पृ. ६४
आफत अस्मानी—१ दैवी आपत्ति २ दुष्काळ.
मुलुख ज्यागिरी आहेत त्यात आफत अस्मानी जाली. —दि. म. रा. भा. १ पृ. १०५
आफताबा—पाणी ठेवण्याची प्रवासी झारी.
आफरीतहसीचा शुका—स्तुतीचें, अभिनंदनाचें पत्र.
रा. सवाई माधवसिंग यांसी आफरीतहसीचा शुका लिहीला असे. —हिं. द. खंड १ पृ. ५९
आफलाक—कितीही, केवढाही, निःशेष.
वैद्य तो प्रतिज्ञा करितो आफलाक पुरुष धातुहीन असला तरी तो बरा होईल. —पे. द. ३० पृ. ३८७
आफीयत—खुशाली.
आफ्रीन—उत्पन्न करणारा.
आबताब—अब्रू, जोरा, दरारा, वजन.
त्याचा आवताब राखणार त्याचे धनी समर्थ आहेत. —पे. द. भाग २७ पत्र नं. ११२
रा. बाबा फडके वडिलापाशी आबताबाने असावे ऐशी खटपट बहुत करीत आहे. —ऐ. ले. सं. पृ. ७९६६
म्हणूनच सर्वांचा आबताब राहून, इंग्रज जरबेस येऊन मनसब्याचे जातीनें माळव्यात यावयाची सल्ला ठरली. —म. शि. यां का. पृ. ११९
आबवाब—अजमास, सुमार.
तेव्हां बोलिलो कीं फौजेचा आबवाब किती लिहावा ? तेव्हां बोलिले की

प्रस्तुत जे तुमचे नजरेस फौज आली असेल तितकी लिहिणे.

—पे. द. २८ पृ. ४४

आबष्मानी —कागदाचा प्रकार. आकाशी रंगाचा. आबष्मानी हा 'हवसाणी' शब्दाचा अपभ्रंश तर नव्हे ?

ताजा कलम. आबष्मानी कागदावर लिहिलें नाहीं. कबूल करावें, (मान्य करावे. मानून घ्यावे,) हे कितावत. —ऐ. ले. सं. ७८५०

आब्दारखाना—पिण्याचें पाणी सांठविण्याचें टाकें किंवा हौद वगैरे.

आबखुरा, आबखोरा—पेला, प्याला.

आबखोरा—पाण्याची झारी.

आबखोरा व प्याला सोनेरी रंग, हारयेक धातूचे जहराची बाधा न होय याकरितां भोजनास व पाणी पिन्यास

—पुणें अखबार भाग १ पृ. ९८

आबस—व्यर्थ; निष्फळ.

असें जरी लिहितो तरी येथून पत्रें जाऊन पोहोचवायास येक मास पाहिजे तो पावेतो फौज माघारे फिरोन अर्ध्या मार्गात येईल तेव्हां लिहिणें आबस आहे. आतां जे जाहले ते समर्थ.

नाग. १ पृ. २३८

आबहवा—हवापाणी.

हे मुलखाची आबहवा आम्हांस रास्त नाही. हुकूम होईल तर विलायतेस जाऊ. पर. द. म. व. पृ. १०९

आबा—(अ) अबू, बाप.

आबाद—संपन्न, तृप्त.

स्वारी माघारी फिरली. लोक आबाद जाहले. मल्हारजी होळकर याणी पंचवीस घोडयांची सवाशे घोडी केली. हो. कं. पृ. ४

आबाद—लष्करी परिभाषेंत या शब्दाचा अर्थ ज्या ठिकाणीं रसद-साहित्य इत्यादिकांचा पुरवठा होऊं शकेल असें स्थळ किंवा ठाणें. (विलसन)

आबादान—सुरक्षित.

वरकडही जिन्नस सरदी न लागे असे आबादान ठेवावे.

—मराठ्यांचीं राजनीति, आज्ञापत्र पृ. ३५

आबादी—वस्ती. दाट वस्ती.

पुणें शहरांत आबादीत जागा जागा नाके आहेत तेथे हजार पाचशे स्वार तयार होऊन उभे राहात आहेत. व गस्त रात्री दोन तीनशे स्वाराची कुल (सर्व) आबादीत फिरत आहे याची खुलस (खुलासा) कळत नाही.

—पुणें अखबार भाग ३ पृ. १०९

आवें जावें बोलणें--अवे जावे, अरे तुरे करून, उद्धटपणें बोलणें.

तुमचे वाड्यांत राहावयास आलों. त्यास एसाजी सोनवणी वाडियांत होता म्हणून तुमचे शिपाई आम्हांस वाडियांत न घेतां आवें जावें बोलिले. तेव्हां आम्हींहि त्यास चार शिव्या देऊन रानांत जाऊन राहिलों.
--रा. खं. ३ पृ. २५

आभ्र--कारस्थान. देखावा, आभाळ.

देशीं नानाप्रकारें राजकारणाची अभ्रें फिरतात.
—पुरं. द. भाग १ पृ. २०८

आभारण--राजाच्या परिवारांतले महत्त्वाचे लोक.

मग राजा शंकरदेव राणा महाराज (•महाराजांनीं) आपले पुरोहित प्रधान पंडित समस्त आभारणा पाचारिले व मुहुर्त पाहून महीपाळ देव-राणा राजीं बसविला.
--बिंब २

आम्हायेऊग--आम्हा योग्य.

आम्हांयेऊग कामकाज असल ते ऊहीत जाणे.
—पे. द. १४ पृ. २

आमखास--१ सर्रास २ दरबार.

१ सदरहूप्रमाणें धारण छ. २५ रज्जबी आमखास बाजारात जाली.
--रा. खं. ७ पृ. १४७

२ पादशहा आमखास तीन दिवस आले नाहींत. —स. ब. पृ. ५९

३ तैसेच आमखास मध्यें कुल वजीर मुस्तेद करून उभे केले.
—स. ब. पृ. ३८

आमचे हकामध्यें—आमचेसाठीं.

राव ब्राम्हण आहेत त्याणी आमचे हकामध्यें श्री सेवेस दुवा केलीयानें त्याची दुवा कबूल होऊन आम्हास सद्य आरोग्य होईल. याप्रमाणें तुम्ही रावजीस लिहून पाठविणें. --पे. द. २५ पृ. ४६

आमद--वार्ता, आवाई.

कृष्णेस पाणी यावयाची आमद जाणून भाऊस लिहोन माघारे बोलाविलें.
--म. शिं. यां. का. पृ. ६२३

जोंवर हिंदुस्थानांतून आपण येत तोंवर घरमुलूक साहुकार सर्व लुटून आपली येण्याची आमद ऐकता निघोन जावे असा त्यांचा बेत.
—पे. द. २० पृ. १६६

आमद--विपुलता, उत्पन्न. आवक.

दौलत कायम आहे तेथे आमदही आहे व खिसाराही आहे.
—म. शिं. यां. का. पृ. १६६

आमदन--येणें.

आमदनी--१ येणें २ वसूल, उत्पत्ति, समृद्धि.

१ चहूकडील गल्ला येथे येण्याची आमदनी बंद जाली.

--रा. खं. ५ पृ. ४४

२ तालुक्याची आमदनी हंगाम्यामुळें येत नाही.

--रा. खं. ५ पृ. १०३

पंतप्रधानाचे सरकारात रुपयाची आमदनी थोडकी. हैदरखानाकडून २५ लाख रुपयेपर्यंत मदद जाहालिया फौज रवाना होईल.

--पुणें अख. भाग २ पृ. ६३

आमदरत्फ—दळणवळण, येजा.

गाडेर मजकूर कल्याणीहून पुन्हा मुंबईस गेला व वसई व पनवेलीस आमदरत्फ करीत आहे म्हणोन यैकिले.

पुणें अख. भाग २ पृ. १२७

आमदरप्ती--दळणवळण, वहिवाट.

तिकडे येक मोर्चा काईम जाहलीयानें कुली आमदरप्ती बंद होईल.

--पे. द. १६ पृ. १०५

आमदरफ्ती--१ रहदारीचा परवाना. २ वहातुकीवरील जकात. ३ मोकळीक.

१ सुखरूप आमदरप्त होऊ देत नाहींत. --रा. खं. ३ पृ. ८८

२ मार्गी येतां आमदरफ्तीचा उपसर्ग न लावणे.

—रा. खं. १५ पृ. २०३

३ तो किल्ला घेतला म्हणजे दर्यांतून जहाजें येण्यास आमदरफ्ती जाली.

--ऐ. ले. सं. ४३५४

आमदह--येऊन (आमदन-येणे)

आमदार--भले लोक.

हें वर्तमान गोवलकोटास कललियावरी सिदी याकुद गोवलकोटी होता, तो दाहा लोकानिसी पलोन गेला. मागे कोटांतील लोक होते त्याणी चिपळूणकर गडीमध्ये होते त्यासी मायावी विचार सांगोन त्यांचे निशाण व लोक व बंदरे कांही घेतले होते आमचे आमदार लोक गोवलकोटास रवाना केले त्याही एक भला माणूस पाठविला की तुम्हा (नि)शाण चढविले बरें उत्तम केले.

—वै. ४ स. १७५४ पृ. ५

[आम]लाफैला—सरकारी नोकर चाकर, लहानमोठे अधिकारी.

वराडचा आमलाफैला समागमे आहे. त्याची रवानगी आजच करून उदईक तिकडे रवाना करून देतील आणि आपण स्वामीकडे दरकूच येऊन [पो]हचतात.

—पे. द. २० पृ. ११४

आमलेफाले—अमलाफैला. कारकून. अधिकारी.

तीस लक्ष रुपये सालखर्चास महाराजे बहादुरानी करार करून दिल्हे आहे. माहबमाह पहोचतात आणि आमलेफाले हजूरचे मुखत्यार आहे.

—हिं. द. खंड २ पृ. ८१

आमा—पौर्णिमा किंवा अमावास्या.

आमचें येणें लवकर होत नाही. आमा जाहलियावरी अग्नीहि (अग्नि-होत्राचा) येथेंच आणणार. —पेठे द. भाग १ पृ. २८

आमाल—(अ) अम्मल. कामें.

आमासे—अमळसे.

आमासे सावकारी चलण धरा कीं, आणीख दाहा परगण्याचे इजाऱ्याचा विश्वास पडे. —हिंगणे दप्तर खंड २ पृ. १५

आयनी गोळे—ऐनी गोळे, लोखंडाचे गोळे.

किल्ल्यांत चांगल्या तोफा सांपडल्या. आयनी गोळे सांपडले. दारूहि बरीच होती. —ऐ. ले. सं. १५८४

आयब—बट्टा, कलंक, व्यंग, दोष.

(अवतरणासाठीं ' बदनग ' शब्द पहा.)

—चं. चू. द. पृ. १२९

आयां असणें—दीन असणें, होणें. आयास येणें.

तोफांची मारगिरी. गांवांत दाणाचारा, दारूगोळा नाहीं, यामुळें शत्रू आयां आहे. —ऐ. ले. सं. ३५१७

आयाज—बट्टा.

अलीकडे तिस्सापासून रुपया पडला. याचा आयाज ज्याजती आहे. जुना रुपया फार करून मोडून नवाच पडला. जुना घेऊन नकली दिले, असें जाहल्यास जुन्याचा भाव पडेल तो पडो. रहिमतपुरी रुपया चालतो, तोच रुपया गांवच्या वसुलाच्या पोत्यास घेतो. त्या रुपयास मिरजेंत नकली रहिमतपुरी म्हणतात. —ऐ. ले. सं. ७४९५

आयाद करणें—आणविणें, आयात करणें.

फौजा जाऊन परगणे उदवस्त जाले. आता कौल देऊन आयाद करावे.

—पे. द. ३० पृ. ९६

आयाल—बेशिस्त, गैरव्यवस्थित. गोंधळ.

सारा ब्रम्हगोळ तोफखान्याचा. मनस्वी खर्च. त्यातील चौकसी पाहतां अयाळ. तसेंच इतर कारखाने. —म. शि. यां. का. पृ. ८८९.

आयास येणें--हारीस येणें, नरम येणें.

तारापुरास शह बसला नसतां अशिरकर येकायेकीं आयास येतो यैसे नाहीं. --पे. द. १६ पृ. ८९

आयीन—नियम, पद्धत.

आयुर्भाव--अविर्भाव, जोष, ऐट.

नासरजंग याचा आयुर्भावाचा विध्वंस जाहला.

--हिं. द. खंड १ पृ. २२

यशवंतराव रामकृष्ण आले. तिकोट्यावर जाऊन गांव मारून खंडणी घेऊन पलीकडे दोन कोसांवर राहिले. आयुर्भाव मात्र मोठा. प्रजाभोग बलवत्तर.

--ऐ. ले. सं. ७०३९

आर्जकु--थाट, शृंगार, आरास.

दुसरे सराच्याचा व डेऱ्याचा आर्जकु पाहून थोडेसे दुःखहि जाले. येका दोघा जवल बोलूहि लागले की जानोजीनें आज आम्हास मोठासा थाट करून दाखविला की आम्ही ऐसे मातबर म्हणोन आम्हास दाखविले.

—पे. द. २० पृ. ८०

नवाब घरास येतात म्हणून सरांच्या उभे करून सेनासाहेब सुभानी तीन चार मसनती तयार केल्या होत्या त्यासी नवाबास भये प्राप्त झाले की हे आर्जकु केला आहे तेव्हां कांहीं येथें दगा आहे.

--पे. द. भा. २० पृ. ८०

आर्जव्य लावणें—वशिला भीड लावणें.

अलीकडे संकर सेणवी याणें आर्जव्य लाऊन येथील सर्व कारभार आपखुद करू लागला (आपण स्वतः करू लागला.)

--शांतादुर्गा सं. इ. परिशिष्ट पृ. ११

आर्जवी असणें--लखलाभ होणें.

तुम्हांस मागितलें होतें तेवढेंहि तुमचेवस्तु देवविलें नाहीं. बरें. तुमचें तुम्हांस आर्जवी असो. --ब्र. च. पृ. २९५

आर्जुंदा--अजुर्दा, असंतुष्ट, नाखूष.

ममई वगैरे येथील साहुकार वगैरे यांचा माल बंद पडला. खरीदी फरोख्ती न चाले या अर्थी साहुकार आर्जुंदा.

—पुणें अखबार भाग ३ पृ. ३८

आर्त---उत्कट इच्छा.

विश्वेश्वराची स्थापना करावी हें आर्त होतीच.

--हिं. द. खंड १ पृ. १४

आर्दुसी—अदूरदर्शीपणाची.
तेथून पत्रे समागमीयासी आली. आणि या गृहस्तास मात्र न आले हे गोस्टी आर्दुसी दिसोन आली. —पे. द. १४ पृ. २२

आरजु—इच्छा, महत्त्वाकांक्षा, वांछा.
दिल्लीत काबीजात जाल्यास वजारतची आरजु सुजाअतदौलास आहे व पातशहास तक्तावर बसावे हे जरुर. तेव्हां ते तुमचे मुद्दे मान्य करतील.
—ऐ. सं. सा. खंड ७ पृ. ४४

आरद—आणावें (आउर्दन)

आरदास—अर्जदास्त.
थिटे परगणें मजकुरचे देशपांडे कदीम आहे, म्हणऊन आम्हास आरदास पाठविली आहे. —शि. च. सा. खं. ५ पृ. २५

आरपार—या बाजूस व त्या बाजूस. या थडीस व पैलथडीस. लक्षणेने झाडून सगळी.
तुम्ही खामखा बजीदच आहा तर कायमखानास आरपार जितकी जागीर होती तितकी याना द्या. —हिंगणे द. भाग २ पृ. १४

आरवाली—अरवली त्रास, खोडया, उपद्रव.
राजे वेडे खरेच परंतु त्यासहि विचारे करून सांगणे ते सांगावे. बंदीखाना दाखल न करावे. आईसाहेबांनी आरवली सोसावी.
—पुरं.द. भाग. १ पृ. २२०

रा. आबा जाईनात म्हणून श्रीमंतांची मर्जी क्रूर आहे त्यासी आबाचे लेकुरपण अथवा आरवाली सोसणे श्रीमंतांवांचून कोण आहे?
—पेठे दप्तर. भाग १ पृ. ३०

आरसा—वेध, वेढा, शह.
पुण्यांत नकाशा करून पाठविला त्याप्रमाणें आमची फौजा सिकाकोलाकडे जावी त्यास हैंदराचा आरसा अदवानीस होता याजमुळे दिवस लागले. आरसा निघून गेला. फौज सिकाकोलाकडे पाठवावयाची योजना करीत होतो तो बातमी आली की फिरोन हैदराची फौज आमच्या तालुक्यात येत आहे.
—नाग १ पृ. १२४

आराबा—१ तोफखान्याची आग, २ मार.
त्याजमध्यें आपलीं तीन पथकें आघाडीस निशाणाजवळ उठलीं. तोफखान्याचा आराबा खाऊन आंत गेले व गाड्यांच्या बुरुजांशीं हत्यार लागलें.
—ऐ. ले. सं. १७७७

आरामगाह—आरामगृह.

आरीफ--जाणता, सूज्ञ.

विशेष लेहावे तरी महाराज साहेब आरीफ असेती.

—रा. खं. ८ पृ. ७

आरीयत—शरम, लाज.

गुदस्ता दादासो। पुण्याजवळून आले परंतु पुणें पाहिलें नाहीं हे आरीयत मातुःश्रीस फार आहे. —महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें, भाग १ पृ. ६२

आलंग—रांग. लष्करी शिपायांच्या झोपडीची रांग.

हल्ली गोवळकोटानजीक भांडीयाच्या माराखाले जाऊन आलंगा घालून बैसले आहेत. —पे. द. ३३ पृ. ४७

आलम्गीर--जगज्जेता.

आलम--प्रजा, जग.

हेतू हा कीं आलमाचे बरे व्हावे ते गोष्टीनें उभयेपक्षी फायदा व कीर्ति हे तुम्ही जाणता. —ऐ. द. ३३ पृ. १९२

आलमपन्हा--जगाचा संरक्षक. जगदाश्रय.

आला—अल्ला, अत्युच्च, सर्वश्रेष्ठ.

प्रस्तुतचा रंग तर असा दिसतो जे, आला व आद्ना खाविंदापाशी बराबर.

—रा. खं. ५ पृ. ९

आलाथ—वल्हयाच्या काठीला लावण्यांत येणारा रुंद पंखा.

पुढें आरमाराची आलाथ अवदा(न) काठ्या आदिकरून उतरणी करीत असो. —पे. द.

आलाबला—संकट, गंडांतर.

हिरोजी फर्जंद याने शिवाजी राजे यांचे पायावर सीर ठेऊन हात जोडून अर्ज केला की मी एकटा मेलो तरी सिवाजी राजे याची आलाबला गेली. लाख मरावे परंतु लाखाचा पालनवाला कायम राहावा.

--म. द. रु. १ पृ. ५४

आलावा—मोहरमात डोल्यांच्या पुढें जी खांच खणतात ती. या खाचींत आग पेटवून मुसलमान लोक तिच्या भोवती नाचतात.

मोहरम महिना. आलावे उठल्याशिवाय जाबितजंग याचें कूच होईना.

--ऐ. ले. सं. ३१३०

आलाव्याचे दिवस, फौज कांहीं मागाहून चालती होईल.

--ऐ. ले. सं. पृ. ५४६७

आला हजरत—सर्वश्रेष्ठ स्वामी.

आलाहिदा—अलग.

नवाबानीं बहीर बुणगे कुली आलाहिदे करून राये सोनगड सातक्रोस

आहे तेथें पाठविले. आपण जरारे होऊन राहिले आहे.
—पे. द. ३० पृ. १५८

आलिकाव—अलकाब. पदव्या, दर्जा.
यावरून हुजरून अमानत फर्माविले तरी आपण साहेबाचे दौलतरखाह आहो आपले अलिकाव चालिले पाहिजे. —पे. द. ३१ पृ. २६

आलीगोल—तोफेचा गोलंदाज.
मराठ्यांच्या लष्करांतील बिनकवायती पायदळ शिपायांचा जमाव. हे अलिगोल शिपाई बव्हंशी सर्व मुसलमान धर्माचे असत. लढायांत ते गोल करून म्हणजे जमावानें हल्ल वढवीत व तो चढवितांना तोंडानें 'या अलि' अशी रणगर्जना करीत. (विलसन)
त्या बराबर सरंजाम साठ हजार पठाण व चाळीस हजार आलीगोल व तीनशे तोफा चालू या प्रमाणे आहे. —हो. कै. पृ. ८

आलीजा—उच्च पदवीचा.
आलीजा बहाद्दर शिंदे.

आलीजाह कारभार—बेशिस्त, दिरंगाईचा कारभार.
शिंद्याचा घरचा प्रकार व श्रीमंतांच्या घरचा एकच धारा यांचा आलीजाह कारभार तेथें यांची स्थित व स्वरूप राहणें कठतच आहे.
—हिं. द. खंड २ पृ. ४५

आलीमिक्दार—उच्च-मोठ्या शक्तीचा.

आलीयह—उच्च.

आलीशान—उच्च मानाचा.

आलेस येणें—समजुतीस येणें.
कृष्णाजी नाईक यास भाक देऊन धरून सिंहगडास नेले. तेथें कृष्णाजी नाईक आलेस येई न. मग गोणींत घातलें. नाना प्रकारचे हाल केले व मग चौरंग केले (हातपाय तोडले)
—ऐ. सं. सा. खं. ४ पृ. ६७

आवखादा—अवघड, अडचणीचा.
शत्रू रात्रीचा दगा करणार. गवत रानामध्यें बहूत. जागा आवखादा. राउताचा इलाज नाहीं. —पे. द. ३३ पृ. २९०

आवग्र—अवग्र, सर्व, एकूणएक.
रमण्यांत जाऊन स्वार व गाडदी हरणांचे आसपास उभे करून हरणे धरावी, इतकियात हरणे आवग्र पळून गेली.
—पुणें अखबार भाग ३ पृ. १०५

आव घालणे—उत्साह, महत्त्वाकांक्षा, उभारी धरणें.

आता शोक करावयाचा प्रकार नाहीं. सरदारीचा विचार दौलत चालली पाहिजे. यास्तव विवेक करून कामकाजात चित्त घालून आव घालावा. तीर्थ. कैलासवासी प्रमाणें (मल्हारराव होळकर) लौकिक होय तेच कराल (तर) यांतच तुमचा लौकिक आहे.

—चं. चू. द. पृ. १०१

आव घालणें—आळाबांधा करणें, व्यवस्था लावणें.

चहूकडे माणसें बटकी चाकर विखरली होती ती जानरायानीं जमा करून आव घातला. —ऐ. सं. सा. खं. ४ पृ. १३४

आंवंढेकरी, वोवंडकरी—गावंढेकऱ्याच्या उलट.राहणें एका गांवांत, परंतु शेत करतो दुसऱ्या गांवांत, असा इसम.

आवंध—आवधी, मुदत, अपेक्षा.

एक मुद्दा मात्र यानी घातला आहे कीं आपले चिरंजीवास सेनासाहेब–सुभा दिल्हा आहे तो कायम असावा. यानीही मान्य केले आहे. याची आवंध त्याजपासोन अंतर पडावयाची मार्गप्रतीक्षा करितात.

—पेठे दप्तर भाग २ पृ. १३

आता कांहीं बहुतसी आवध राहिली नाहीं. जे होणे ते आठा दिवसांत होईल. —पे. द. २ पृ. ७९८

आवना—आफवा.

तुळाजी आंग्रे बाणकोट वसवणार म्हणोन बाजार आवना खबर होती; याचें तथ्य वर्तमान कलत नाही.

—वै. ४ स. १७४३ पृ. ११

आवर्जा—हिशेबाची वही.

लोक उणें (कमी) बाळगितो, अशा आरोपावरून चोरून गणती घेतात त्यास लोक किती ठेवितो हा भ्रम असल्यास कीर्दी, नांवनिशीवार पत्रकें, आवर्जे पहावें, त्यास रुजु घालावें, येथपावेतों आम्ही राजी असतां जे ते गोष्टींचा संदेह ! —ऐ. ले. सं. १४३३

आवर्त—वेढा.

सभोवता सैन्याचा आवर्त पडून मध्यें कोंडला असतां, त्यास सोडून निघाले ! —ऐ. ले. सं. ८४३

आवर्त—अनर्थ.

आंग्र्यानें ऐसा आवर्त मांडिला आहे.

—पे. द. ३० पृ. १४७

आवलीस होणें—प्रारंभ होणें.

येकसारकर कडू यास पालवग न चालवे म्हणून नातवास दिधले तैंपासून वृत्त (वृत्ति) आवलीस जाली. —पा क्ष ज्ञा इ खं. १ पृ. १९

आवाई खाणें—भीति खाणें; जरब खाणें.

लष्करानें फारच आवाई खाल्ली आहे, याजकरितां रामचंद्र गणेश व बाजीपंत अण्णा असे करवीरच्या शहावर राहिले आहेत.

—ऐ. ले. सं. २७७९

आवाई तवाई—संकट.

राजे, आई, वर असून गडास मोर्चेत आवाई तवाई. हजार दोन हजार फौज गमाजीनें जयली. —पुरं. द. भाग १ पृ. २३७

आवाई तवाई सोसून राहिला हे श्रीमंतांच्या व कार्यभागी याच्या ध्यानात आले तेव्हा सहजेच संतोषी जाहले. —ऐ. ले. सं. ८४७

शिलेदारांच्या पहिल्या आवायातवाया सोसिल्या असता (म्हणजे पूर्वी काय वाटेल ते करून अवघड प्रसंगीही शिलेदारास पैका दिला असता) आतांच निकडीस यावयास कारण काय?

—ऐ. ले. सं. पृ. २९६२

आवाका—सवड, फुरसत, धैर्य, सामर्थ्य, शक्ति.

आमच्या तोफा जवळ लागू जाहल्या होत्या. त्याजवर शत्रू उलटेल म्हणून साऱ्या फौजा जपून होत्या. परंतु काल कांहीं त्यास आवाका जाहला नाहीं. —ऐ. ले. सं. पृ. ६९

स्वारी समागमें येतील त्यांस वस्त्रें द्यावी, त्याप्रमाणें करावें तर इतकी आवाका तूर्तचें काली नाही. —ऐ. सं. सा. खं. ५ पृ. ५६

प्रकृत बरी आहे. आवांका नाहीं. ईश्वरकृपेनें येईल.

—ऐ. ले. सं. ५४६२

आवाचा माणूस—इभ्रतीचा, वजनदार, जबरदस्त.

गाइकवाड गंगा उतरून गेला मागे बापू वगैरे फौज आहे. येकूण पुर्ता आवाचा माणूस कोणी नाही. —पुरं. द. भाग १ पृ. २४७

आवाज—संख्या. तोफांच्या मोजदादीत येणारा जुना संख्यादर्शक शब्द, जसे तोफा आवाज २५ म्ह. तोफा संख्या २५.

जेजाला सुतरनाले व थोरली भांडी येकूण आवाज दीड हजार, याप्रमाणें आराबा पसरून उभे राहिले. —पाणि. बख. पृ. २४

आवान--वेळ.

आवारा--नासाडी.

त्याचे सेताचा आपण आवारा केला. —रा. खं. १५ पृ. ३४

आवारा करणे--उधळणे, खर्च करणें, गमावणें.

तीनचार करोड रुपयाची जिंदगी व मुलुख व दौलतेसहित पेशवे यांचे दोस्तीत (दोस्तीसाठीं) आवारा करून नवाबसाहेब पुणेस गेले.

--द. स. कै. या. पृ. २३७

आवारा होणे--भकणें, उनाडासारखें फुटून पळून जाणे, भडकणें.

यलगंदलचे सफरेंत रघुनाथराव दादा त्या जिल्यांत आवारा जाहले. ते समई सखारामपंतांनी रघुनाथराव यांचे तर्फेनें कृष्णराव बल्लाळ यास हुजूर (पेशव्याकडे) ज्यावसालाकरितां पाठविले होते.

—पुणें अखबार भाग १ पृ. १०४

आवेशी--१ आवेशयुक्त. २ तीव्र इच्छुक.

दसऱ्याच्या सणांत सोने वांटण्याविषयीं मी फार आवेशी होतो.

--अरुणोदय पृ. ८०

मंडळीची वृद्धी करण्याचे कामीं कित्येक गृहस्थ फार आवेशी असत.

—अरुणोदय पृ. १७८

आशोरा—आशूरा. मोहरमचा नववा अगर दहावा दिवस.

मोहरम महिना आहे. आशोरा सरल्यावरी हल्ला करावी, याप्रमाणें करार केला आहे. --ऐ. ले. सं. ३४२४

आषा—आस्था.

त्यानें हिम्मत धरून किल्ल्यावर मात्र आहे. मुलकाची आषा मोडली.

—पे. द. भा. २७ प. नं. ११८

आस्वली—पागोटें किंवा लुगड्याच्या किंवा पातळाच्या पदराचा प्रकार.

पातळ महतावी, किनारा आस्वली, किंमत ७००

--पे. द. २६ पृ. १५४

आसक्तता--शक्ति किंवा सामर्थ्य.

स्वामींनी बहुतां दिवशी आशीर्वादपत्र पाठविलें तें पावोन आनंद जाहला तो लिहून कळविण्यास आसक्तता नाहीं कारण की धेनूचा जो वत्स त्याचे मातादर्शन व दुग्धपान होऊन तृप्त होतो त्याचे जसें कोणी प्राणिमात्र वर्णन करूं शकत नाही तदनुसार मजला आल्हाद झाला तो मी लिहून कळविण्यास योग्य (**समर्थ**) नाही. --पे. सा. पृ. २८०

आसडपासड—झांबडाझांबड, लुटालूट.

बाहेर जे लोक सापडले त्याची आसडपासड केलीं. —पे. द.

आसताई—आस्था, ममता.

त्यांचा मामला विपरीत जालियावरी कांहीं दिवस आपले घरी होते. आमचे आसताई पहिलेपासून होती. याजकरिता आम्हापासी आले.
—पे. द. १७ पृ. १२३

आसन्नकाळ--मृत्युसमय.

आसन्नकाळी सुभेदारांनी मालरावबाबांचे हात दादासाहेब व महादजी शिंदे यांचे हातात देऊन शेवटी तुकोजी होळकर यांचेहि हातात मालराव बावा यांचे हात दिले.
- -हो. कै, पृ. ४१

आसनाई, आस्नाई--स्नेह, सख्य.

रावपंतप्रधान याजकडील सरदाराशीही रफ्त आसनाईचा आहे.
—रा. खं. ५ पृ. १०१

आसबाब--सामानसुमान, लवाजमा.

यशवंतरावानें खुशालगडासही घेरा घातला तेव्हां फिरंग्यांनी ओझेंपाझें आसबाब होता तो तेथील तेथें टाकून सडे होऊन रात्रीस निघाले (पळून चालले)
--हो. कै. पृ. १६२

आसरफची जागा--अत्यंत अभिजात, महत्त्वाची जागा.

वरघाटे सिंहगड, पुरंदर, लोहगड, हे किल्ले मोठ्या आसरफची. ते गलिमाकडें आहेत. त्यामुळें रायगडास महाडाहोन मदती होत्ये. सिंहीगड म्हणजे मोठे आश्रफाचा आहे. गनीम बहुत जोरावर हमेशा खबरदार आहे.
--शि. च. सा. खं. ५ पृ. १८८; १८९

आसल--तटाची भिंत, तट.

गढीची आसल उंच जाणोन सिड्याही तयार करविल्या. येणें प्रमाणे हल्ल्याचीं तर्तूद करविली.
—पे. द.

आसल--हासल, प्राप्त.

याउपरी पुढें या प्रांती नवऴ अपूर्व वर्तमान आसल होईल ते लिहोन पाठवीन.
--पे. द. १० पृ. ३६

आसवद--सणादिकाचे दिवशीं बलुत्यास द्यावयाचा ठराविक हक्क किंवा देकार.

वैशाखमासी कुंभारानें मृत्तिकेचे कलश घरोघर द्यावे त्यास आसवद द्यावे दाणे.
—ऐ. सं. सा. खं ३ पृ. १२८

आसान---सरळ, सोपें.

जनरल मशारनिले यांचे खातरेत कीं पैकीयावर मदत जाली तरी याकूतखानासारिखा गनीम तेथें येऊन जीवपेणें **आसान** नव्हे.
—पे. द. ३ पृ. ५६

आसान—येहसान, कृपा, उपकार.
या भावीं दोष त्याचे पदरीं घालून त्यास रामपुऱ्यास रवाना करून, त्याचे माथां आसान केलें. —हो. कै. पृ. १५०

आसानमंद—येहसानमंद, कृतज्ञ.
सलाबतजंगास आसानमंद करून आम्ही आपलें कार्य करून घेऊ.
—हिंगणे दप्तर खंड २ पृ. १७

आसार—खूण, निशाण.

आसिफ—सॉलोमनचा प्रधान.

आसिफजाह--उच्च मानाचा.

आसीलमासील--दासीवर्गातील मानकरीण.
बातमीचे वर्तमान येथें उमद्याकडून कांहीं कलत नाही. म्हणुन एकदोघे अंतरंगचे आहेत, त्यासी सख्ये केले आहे. एक जासुदांचा नाईक. एक चोपदाराचा मिर्धा व एक आसीलमासलातली आहे. स्वामी पैका पुरवतील तर अंतरंगचे वर्तमान सविस्तर कोणासहि न कळीते लिहून पाठवू यैसी सेवक उमेद राखतो. --पे. द. १० पृ. ९७

आहकाम--हुकूम.
यथील गौरनराचे नामें जनरलीचा हुद्दा व कुमसलवाल्यास(कौन्सिल वाल्यास.) हे मुख्तार यांनीं जें केलें त्यावरी समग्रांनीं सही करावे या प्रमाणे मुख्तारीचे (मुखत्यारीचे) आहकाम आणून दिल्हे.
--इ. सं. चिना.

आहद—करारमदार, दारमदार.
खरें अंतः करणांतून आहद व पैमान आनाची व कुरान मजीदची मजबुती इमानधर्माची करून करार केले जाते कीं.
--हिं. द. खंड १ पृ. ६१

आहंग--हेतू.

आहमिकिक--अहकामिक (मूळ शब्द अहकाम-हुकमत, सत्ता) हुकुमानुसार.
तोहमास कुलीखान इकडे यावयाच्या विचारांत आहेत. याचा मुलूक दबावित येतो. सरंजाम सामान फार. पातशहाची जाली उभी राहते तैसा आहमिकिक उभा राहतो. पासस्ट हजार खाचरांवर चालतो.
--ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १९६

आहाणा—म्हण किंवा संकेत.
सशाचे पारधीस वाघाचे पारधीचे साहित्य असावे यैसा आहाणा आहे.
--पे. द. ३ पृ. २३

घागरीवर शेला १. —थो. मा. रो. २ पृ. ३९०

आहेवदोरा—१ मंगळसूत्र, गळसरी. २ लक्षणेनें मालमत्ता किंवा तहाचें सूत्र.
फौज तोफ रवाना करून मुलूख पालथा घालावयाचा परंतु आहेवदोरा हातास येऊ लागला तर टाकावा यैसे नाही. —पे. द. १२ पृ. २७

आळ—हट्ट, इच्छा.
मी जे आळ घ्यावी ते मी सिद्धीस पाववावी तरीच आमचा पांचवा आश्रम. ––ब्र. च. पृ. २८९

आळ घेणें—हट्ट घेणें.
दौलत संबंधीं हरएक गोष्ट परिछिन्न न करावी आणि ते समयीं बहाद्दरांनीं कराच म्हणून आळ घेतल्यास कैसे होईल?
––नाग २ पृ. १०१

आंकणभर––खणभर.
आमच्या दोन्ही गांवांची अवस्था तर जाळून लुटून बेचिराख होऊन गेली. घरीं कवठ्यास जाऊन राहूं म्हटलें तर येक आंकणभर देखील राहिलें नाहीं. कडबा, दाणादुणादेखील झाडून गेला.
––ऐ. ले. सं. ६४३१

आंख—अंक.
ते दिवशीं इंग्रजानें बहूत तारफेनें लडाई केली. दहा आंखास एक बार याप्रमाणें त्याच्या तोफांचे बार होत होते. —ऐ. ले. सं. ४३८४
तीनशें तोफांचा व बेवीस हजार कंपू नळीचा; पांच आंख मोजीत तो एकदाच आवाज होई. याप्रमाणें चार घटिका कंपूची कवाईत दाखविली.
—खडर्याच्या स्वा. ब. पृ. ८

आंख––खंडणीचा आंकडा.
साहेबी कृपाकरून संस्थान त्रिचनापल्ली पूर्ववतप्रमाणें आपली आपल्यास दिल्ही. ऐसियास कर्नाटकचा आंख संस्थानावरी सरकारचा मक्ता बसला आहे, त्याची वाटणी जे त्रिवनापल्लीवर बसेल ते आपण सरकारांत देऊं.
––इ. सं. ऐ. स्थले. पृ. १०

आंखाचे घोडे उंट किंवा बैल—आंख म्हणजे आंकडा किंवा कांहीं खूण. पागेंतील जनावरांची चूकभूल होऊं नये म्हणून त्यांच्या टिरीवर आंकडा डागीत असत.

सरकारचीं उंटें चुकोन तुमचे तालुक्यांत गेली आहेत त्याची चौकशी करून दाहाचे आंखाची असतील ते पाठ।न देणें. —पे. द.

आंगजोऱ्यानें वर्तणे—बळ-प्रदर्शन करणें, मूठ-मर्दाई करणें.

सरकारच्या मामल्यात लटकीच फिशाद तुम्ही मांडली आहे. आंगजोरियानेच वर्तता तरी परिणाम उत्तम पाहोन वर्तत जाणे.

—शि. शा. इ. सा. भा. १ पृ १४६

आंगवटा, आंगबाटा—पीक आल्यानंतर जमिनीचा मालक आणि प्रत्यक्ष शेत कसणारा यांच्यांत पिकाची वांटणी होतांना शेत कसणाऱ्या कुणब्यास जो विभाग मिळावयाचा तो. (विलसन)

आंगसूत्र—फितूर, कारस्थान.

दोन महिनें इंग्रज गायकवाडाजवळ. दो कोसावर आमचा मुक्काम. सोबती अस्तनीत (अस्तनील निखाऱ्यासाखा) आंगसूत्रे अनुसंधानें सोबत्यानीं खेळविली. --म. शि. यां. का. पृ. ९२

आंगेज--स्वीकार.

प्रतिनिधी याणी या मनसबीयाचा अंगेज केला आहे त्यास इरे प्राप्त जाहाली असतां आपण मान्य करावें तरी उचित दिसत नाहीं

--पे. द. ३ पृ. ५९

आंगेजणी--अंगीकार.

अवतरणासाठी हाटी शब्द पहा. --हो. कै. पृ. १३३

आंतरबाद—अंतरबाह्य. आंत एक व बाहेर एक, असें.

पाटणकराचा मजकूर आंतरबाह्य दोन आहेत, असें आहे. त्यास नरहर विठ्ठल याजकडे लिहून बारकाईनें शोध घेवावा. आंतरयाम त्याचें खोटें आहे. केवळ (मुळीच) चुकणार नाहींत.

--ऐ. ले. सं. ७२५४

आंतरा—निराळा, वेगळा; वाकडा.

आपण तेथें होतों तोपर्यंत तुमच्या आमच्या मायेंत अंतर पडलें नाहीं सांप्रत चिरंजीवही भेटोन गेले तेव्हांही त्यानी कांही तुमचा आंतरा मजकूर सांगितला नाहीं. —वै. ४ सन १७४६ पृ. १३

आंतेरा—अंतस्थें. गुप्तसंकेताप्रमाणें.

पुण्याच्या कागदावरून छत्रसिंगराजे याणीं आम्हांस बोलावूं पाठविलें. त्यांनीं आमचा सन्मान करून आपले फौजेपैकीं २००० स्वार अजबाबसुद्धां

देऊन पाठविला. तरी लोकांस कळावेंकरितां त्याचें आमचें बिघाड जाहलें सारखे करून आम्ही कूच करून एक मजल आले नंतर बरतरफी केलें-सारिखे करून, आंतरा आम्हांकडे दोनी हजार स्वारांस, उतरले मोकामास पाठवून दिला.

—ऐ. ले. सं. ७४९१

आंधी—उत्तरहिंदुस्थानांत वावटळ सुटून दिवसा अंधार होतो तो.

प्रस्तुत आंधी व आभाळ व कांहीं पर्जन्य येखाद दिवस पडतो.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १२४

आंब्याचा चीक—औषधासाठीं लागणारा आंब्याचा चीक.

कपूंकडील लोकांनीं आंबराई झोडपून आंबे नेले. आंब्याचा चीक पाठवून देणेविशीं आपलें आज्ञापत्र आलें आहे, त्याप्रमाणें पाठवून देतों.

—ऐ. ले. सं. ६४२४

आंबवणी—आंब्याच्या रोपाची लागवड.

नागोजी नाईक व येसवंतराव मुलकांत अंबराईच्या आंबवणीस चालिले.

—पुरं. द. भा. ३ पृ. १३४

कारकून मुलकात आंबराईच्या आंबवणीस चालले त्याबरोबर मौजे उंबरे येथें गेलों.

—पुरं. द. भा. ३ पृ. १३४

इ

इक्ताअ—बक्षीस देणें.
इक्तिरान—जवळ, युक्त असणें.
इक्बाल—दैव, अभ्युदय.
इक्राम—मेहरबानी करणें, मान देणें.
इक्रार—कबुली किंवा संमति.
इकामत—राहणें, थांबणें.
इख्तियार—स्वीकार.
इख्तियारनामा—वकीलपत्र.
इख्तिसास—वैशिष्टय.
इखलास—विश्वास.
इखलास, इख्लास—अंत:शुद्धता, स्नेह किंवा एखलाशी.
इग्वा—फूस.
इज्आन—पालन (आज्ञा)
इज्जत आसार—सुप्रतिष्ठित.

इज्जती आसार.

—रा. खं. ८ पृ. ५०

इज्जत खोंवणें—अब्रू, प्रतिष्ठा किंवा थोरवी संभाळण्याची इर्षा धरणें.
पांचा लाखा रुपयांवर नजर देऊन सरकारचें केल्याचें व वकालतीचे व सरदाराचे केल्याची इजत खोऊन हे सरदार जाले. व आपल्याहातें सरदारीची इजत खोविली. त्या दिवसापासून आजपरियेंत जे काम केलें तें मुजऱ्याचेच (मान्य होण्यासारखें) केलें.

—पे. द. २७ पत्र नं. १२६

इज्जतपन्हा—सुप्रतिष्ठित (एक पदवी)

इज्जतमहा—सुप्रतिष्ठित.

—रा. खं. ३ पृ. ४३

इज्जती दस्तगाह—प्रतिष्ठानिधि. (एक तऱ्हेचा मायना)

—रा. खं. १८ पृ. ५०

इज्तराब—अस्वस्थता.

इज्ना—ताबा. इजन्यात–ताब्यांत लगामीं, आधीन.
जो कोणी सवाई सिंगाचे इज्न्यात येईल त्यास राज्य द्यावें.

—जोधपूरची रा. (इ. सं.) पृ. १०७

इजतआसार—सुप्रतिष्ठित. एक मायना आहे.
इजतआसार त्रिंबकपंत बआकियेत बाशद दरीविला (या वेळीं) आखबार शदाजाबादेहून आली जे.

—पे. द. ३० पृ. १७०

इजन—सैनिक (इजनाद हें अनेकवचन)
अवतरणासाठी 'फहमायश' शब्द पहा.

—पुणे अख. भाग १ पृ. २६८

इजमाइली—तकलुपी, बळकट नसलेला.
बाणकोटाजवळ बकाजी महाडिक याणें मागे मेढा घातला होता तो इजमाइलीच होता.

—पे. द. ३३ पृ. १६७

इजमायली—१ सारांश २ किरकोळ ३ ताबडतोब मागणी आल्यामुळें ठोकळपणें तयार करून दिलेला हिशेबाचा खर्डा.

इजहार—जाहीर. प्रसिद्धी करणें. मथितार्थ, मतलब.
आज्ञापत्राप्रमाणें किल्लेयाचा मजकूर सविस्तर खलबतामध्यें नबाबाचे खजमतेस इजहार केला.

—पे. द. २८ पृ. २८

कृष्णरावजींनीं बालाजीपंताचे जुबानीचा इजहार मजलाही या प्रमाणें सांगितला.

—पुणे अखबार भा. १ पृ. १६१

इजाफह—जास्त (देणगी).

इजाफा—जाफा, आधिक्य, वाढ.
त्याजला आज्ञा केली जे जाजती फौज ठेवणें. त्यास त्याची समजूत करोन

इजाफा ठेविणे; यैसा करार करोन निरोप घेऊन उभयतां गेले.
—पे. द. भा. ३८ पत्र नं. २०

(अधिक अवतरणासाठीं 'कैद' शब्द पहा.)
—चं. च. द. पृ. ११३

इजाफा—नेमणूक, तनखा.
इजाफा पंच हजारीचा देणार. —रा. खं. १ पृ. १७९

इजारत—जबाबदारी.
मनसब्याची सर्व इजारत तुझ्यावर आहे. —चित्रगुप्त पृ. ९२

इजारदार—मक्तेदार.

इजारदारी—मक्तेदारी.

इजारपट्टा—दरसाल वर्षअखेर वार्षिक वसुलाचे वेळीं सरकारतर्फे पाटलांना जो हिशेबी कागद देण्यांत येत असे तो. त्या कागदांत गांवावर बसविलेला वसूल व तो वसूल गांवानें किती हप्त्यांत भरावयाचा, याचा निर्देश केलेला असे.

इजारा—मक्ता.

इजालतन्—घाईचा.

इज्झ—अब्रू असणें.

इज्झत—अब्रू, मान.

इज्न—परवानगी किंवा परवाना.

इज्ननामा—मृत्युपत्र.

इटा—पायदळ शिपायाने वापरावयाचें, भाल्याच्या जातीचें एक हत्यार. याचा मारा बारा हातापर्यंत चालतो. 'एक इटेकरी व दहा पट्टेकरी बरोबर' अशी म्हण आहे.
बंदुकी इटेकरी पटेकरी ऐसा सर्व समुदाय सज्ज राखिला आहे.
—पे. द.

इटावप्रत—रुपयाचा एक प्रकार.
बाजारात कुणबी, वाणी, उदमी येतील जिन्नस विकतील त्याचा रुपया घेणे देणे तो इटावप्रत दौलताबादप्रत घ्यावा द्यावा. सदरहू प्रतीहून निरस रुपया असल्यास चौकशीने वाजवी बट्टा पडेल तो द्यावा.
—पुरं. द. भाग ३ पृ. १०३

इटेकरी—भाल्यासारखे एक विशिष्ट हत्यार बाळगणारा लढाऊ शिपाई.
इटेकरी स्वारीबरोबरचा होता. त्याचा हात जमादार याचे वारानें उडाला.
—ऐ. ले. सं. ५६६८

इत्तदाय—आरंभ.

ज्येष्ठमास इतदायपासून तागायतचा पौषपर्यंत मजकूर.

इत्तिफाक—सहज प्रसंग.

—जोधपूर रा. (इ. सं.) पृ. ५८

इत्तिहाद, इत्तेहाद—ऐक्य, मैत्री. यगानगत.

आमची दोस्ती आणि इत्तेहाद पूर्वीपासून जी आहे त्यात खलश न व्हावा.

—रा. खं. ५ पृ. ३०

असे श्रीमंतांच्या मनांत येणें हे इत्तिहादास चांगले नाही.

—रा. खं. ५ पृ. १३७

इत्मिनान—भरंवसा.

इत्य—इत्यर्थ, निश्चय, निर्णय.

करनाटकचे स्वारीस आपा बलवंत याजलाहि पाठविनार म्हणोन वर्तमान आहे. येविसीचा इत्य ठैरल्यावर सेवेसी लेखण केले जाईल.

—पुणें आखबार भाग ३ पृ. १०२

इतके—पर्यंत, सुमारास.

पुढें देवगड प्रांते पुस वद्य आमावास्ये इतके जाऊं.

—पे. द. १३ पृ. २७

आम्ही त्रयोदशी इतके निघोन येतो.

—म. शि. यां. का. पृ. ४०

इतकेस्तव—इतक्याकरितां; या करितां.

बातमी येत नाहीं. इतकेस्तव रा. नाना व बापू या दोघांस फार वाईट वाटतें. यास्तव वडिलीं तीर्थरूपांस लिहून इकडे दररोजींना एक पत्र यावें, या विषयीं आपण लिहावें.

--ऐ. ले. सं. २११७

इतबार—विश्वास.

दगा करून फिरंगी यानी इमान पुर्ते बुडविले इतबार गेला.

—पुरं. द. भा. ३ पृ. १७५

येखादेयाजवळ बोलीचाली केली तरी परिणामी सेवट लागल की न लगे यास्तव लोक आपले व परकी, इतबार धरीत नाहींत.

पे. द. भा. ३ पृ. ५

इतमाम--लवाजमा, बडेजाव, सन्मान.

इतमाम—घोड्याचें अंग मळणें किंवा त्याची मालिस्ती.

—रा. व्य. को.

इतमाम्या--व्यवस्थापक, रखवालदार,
वाणकरी व इतमामे पुण्यास रखवालीस पाठविले.
—खरे ऐ. ले. सं. पृ. ४३३

इतरता--दुजाभाव किंवा अंतर.
उभयेपक्षी इतरता नाहीं. --पे. द. १७ पृ. ४९

इतराज—नाराज, असंतुष्ट.
गणेश माली, राजे यानें दोन लाख रुपये देऊन पाठविले. त्याची भेट जाली सुभेदार इतराज जाहले. कांहीं केल्या न धैकत. मजल दर मजल त्याजवर चालिले. —हो. कै. पृ. १९६

इतल्ला—अनुमति, आदेश. सल्ला. इतल्ला करणे—दखल, माहिती, खबर, वार्ता विचारणें, पुसणें.
तुम्ही बोलिलात ते ठीकच आहे त्याचा इतल्ला पाटील बावास केलाच असेल. नसल्यास करावा. —म. द. रु. ३ पृ. ६५
ते मागाहून येऊन जवळ पावतील; त्यास तर इतल्ला देणें. नाही, यास्तव गांठ तोडावी, या अर्थी हे आवशाकडे जाणार.
—ऐ. ले. सं. २११४
कांहीं आपली खासगत कामें जाहल्यानंतर मग आसामी करून देणें तरी द्यावी आणि ये विसईचा इतल्ला मजला थोडासा असावा.
—म. शि. यां. का. पृ. २४१
त्या दारमदारीत आमचे तीर्थरूप जे दिवशी फत्ते सरकार पेशवाईची, ते वेळेस नवाब निजाम-अलिखान बहादुर याचे खवाशीत बसून, नवाब याची खुषीबमोजिब, मदारूल-महामास (नानाफडणिसास) इतल्ला मनाशिब वक्त करून मुकाबिला तोफाचा सुरू होता. याजवर जिऊबादादा सरगरम होते त्यास सरकार पेशवाईतून इतल्ला करून रफेशर केला व तस्फियाचा नकाशा ठरविला, हें सर्व खुर्दबुजरूख यांस माहीत आहे.
—द. स. कै. या. पृ. १००
मोरोबा व नारो गणेश उभयतांची मसलत होऊन बापूस इतल्ला केली पण बापूनी या मनसब्यास दूषणे लाविली.
—हो.कै. पृ. ६९

इतलाखी--नक्त पगार देऊन ठेवलेला सैनिक किंवा शिलेदार तो इतलाखी. अशा पगारी शिपायांची फौज ती इतलाखी फौज.
अवतरणासाठी ‘ सरंजामी ’ पाहा. —हो. कै. पृ. ४२

इताअत—बक्षीस.

इताअत गुजारी—बक्षिसी देणें.

इतिकर्तव्यता—काम, मसलत.

तात्पर्य नासो कीं सुधरो, वडिलांचे हातचीं माणसें होतीं त्या कोणाचेही माथां, भार न करिता, सांगितलें काम ज्याचे त्याचे हातें घेऊन, इतिकर्तव्यता आपली आपण करावी, भरंवसा व विश्वास आपला आपल्यास, अशा धोरणावर (यशवंतराव होळकराची प्रवृत्ति होती.)

—हो. कै. पृ. १६१

इतलाख—रोख.

श्रीमंतांनीं गंगातीरास राहून इतलाख खर्चास घ्यावें येणें प्रमाणें ठराव झाला तरी उत्तम.

—ऐ. ले. सं. २६५८

इति—१ अनावृष्टि, २ अतिवृष्टि, ३ टोळधाड ४ घुशींचा उपद्रव. ५ पोपटांचा—पांखरांचा उपद्रव, ६ सरकारी जुलूम आणि ७ परचक्र. या सात राष्ट्रीय आपत्तींचा उल्लेख 'इति' या शब्दानें करीत. हा शब्द महाराष्ट्र, बंगाल व मलबार या तीन्ही प्रान्तांत एकसारखाच रूढ आहे, असें "विलसन" म्हणतो.

इतिफाक—मैत्री, एकोपा.

बाबुराव फडणीस व त्रिंबकराव मामा यांचा इतिफाक व सखाराम-पंतासी व उभयता मशारनुलेसी निफाक.

—पुणें अखबार भाग १ पृ. १०३

इदगा—ईदचे समारंभ करण्याची जागा.

इदबारात—(स्त्री) मानपान.

तेव्हा आम्हास सरकारातून दरमहा तीन हजार रुपये पोतापैकी पावत होते. शिवाय स्वारीखर्च व इदबारात पावत होती. पुढें पानपत जाल्यावर आमचे वडलास श्री कै. नानासाहेब यांही शहाकडे (अब्दालीकडे) श्री. कै. भाऊसाहेब यांचे शोधास इतमाम देऊन पाठविलें. तों शहा अटक उतरून पार गेला. मग आम्ही येथे परत आलो.

—इ. सं. पे. द. स. प. मा. पृ. ११०

इदमथ—इदमित्थं या संस्कृत शब्दांचा अपभ्रंश इदं १ हें; इत्थं १ या रीतीनें. असें गणनीय माणसें जमा करून विचार केला. कोणी बोलला, असामी त्यांचे स्वाधीन करावी, कोणी कांहीं, (असें) इदमथ जाहलें.

—हो. कै. पृ. १००

इदीम—प्रतिष्ठा.

पुदचेरीचे ब्राह्मण जेऊन जातील याजमधें लवकीक व इदीम त्याची मरजी (मर्जीतळे) त्याचे म्हणविता तरी तेथोळ कपितानाचे नांवी पत्र लिहून देणें.

—ऐ. सं. सा. खंड ६ पृ. २३

इदंन्याये—याप्रमाणें.

आम्हाकडील जाबसाल इदंन्याये जाला. जाधव आहेत. ते आपला कंठ-कर्तव्य ते करितात. परंतु परिणाम इदंन्याये आहे.

——पे. द. ३ पृ. १०

इदबारी—विश्वासू.

पंतप्रधानास भोसल्यानी (म्ह॰ भोसले) शरीक (स्नेही) जाले नंतर जानोजी भोसल्याचे जाणे पुण्यास जाले. राज्यास संभाजी भोसल्याचे बंदोबस्त ठेवण्यास कोणीही मनुष्य इदबरीज (इदबारी) न पाहिला.

—इ. स. कै. या. पृ. ११३

इदंमित्थ्य—वाटाघाट, बोलणें, असें असें, पक्के.

दिल्लीचे राजकारणाची चालनां चालतच होती. इंग्रजांचें इदंमित्थ्य झाल्या नंतर दुसरें राजकारणांस झोंबावे असें होते. तों इंग्रजानीं बुद्धी व इमान बदलून कंपू न पाठविलें. —म. शि. यां. का. पृ. ४५४

ते आलेनंतर स्वामीचे आज्ञेप्रमाणे जो विचार करावयाचा तो केला जाईल. इदंमिथं यैसा अर्थ जाहालियावरी तुम्हास विशदे लिहून पाठवू.

--पे. द. भा. ३ पृ. ८४

इदलीस-हाझा--शीड हाकारण्याची दोरी. --कु आं ढ ३९४

इदी—सणावारी दिलेली भेट.

इदीम--लौकिक किंवा वजनदारी, अब्रू.

महाराजाचा बोलबाला जाला म्हणून हजार ब्राह्मणभोजन देवणापटणी करवितो. मजला निरोप देणे. देवणापटणास जाऊन केलियाने पुदचेरीच ब्राह्मण जेऊन जातील. याजमध्यें लौकिक व इदीम त्याची मरजी त्याचे म्हणविता तरी कपितानाचे नावीं पत्र लिहून देणे.

--E. M. P. पृ. १४९

इन्आम--इनाम, बक्षीस.

इन्तिकाल—मरण, मृत्यु.

इनशाल्लाताला—'इन् शा अल्लाहु त आला' याचा अपभ्रंश. 'सर्वश्रेष्ठ प्रभु इच्छील तर.'

पृथ्वीपद इनशा अल्लाहुत आला याणी अकबरा-सहित अवरंगजेबास करार करून बक्षिसी केली आहे. —चित्रगुप्त पृ. ४१

इनसान—न्यायाची, सरळ, योग्य.

हल्ली मिरा बुबु बेगम यांचे अनुमतें येऊन व्यर्थ दंगा आरंभिला ही गोष्ट इनसान नव्हे. —पाणि. बख. पृ. २१

इनसाफ—न्याय.

नेहमी गड किल्ले आपले पाठीमागे लागले आहेत. आणि पवारासहि सरंजाम द्यावा हा कोठील इनसाफ आहे?

—पे. द. ३३ पृ. १९०

इनसाफाचे सबब—इनसाफाच्या रीतीनें, न्यायाच्या रीतीनें.

रंगोबाची स्थापना पूर्ववत्प्रमाणें करणें म्हणून आज्ञा. ऐशियास इनसाफाचे सबब, जे वाजवी होईल ते रुक्ष प्रकारें करूं.

—ब्र. च. पृ. १०३

इनाम इक्राम—भेट, देणगी.

—पेशवा रोजनिशी स. माधवराव भाग २ पृ. १९६

इनायत—कृपा, बक्षीस. इनायत नामा-कृपापत्र, शिफारस पत्र, आज्ञापत्र.

यास अर्ज करिता इनायत-नामा द्यावयासी विलंब करणार नाहींत.

—रा. खं. ८ पृ. २०२

इनायतनामह—कृपापत्र.

इफ्तदाय—इब्तदाई. प्रारंभिक. प्रारंभ.

त्यावरून **इफ्तदाये** नामाजी लांडा गुमास्ता हकीकत **बंदगीस** जाहीर केली. त्यावरून सनद दिधली तेथें **मजमून** (मजकूर सारांश, तपशील) कीं.

—पे. द. ३१पृ. १७२

इफ्तदायपासून फिदवीस काबूची लोकांची बेइमानी ठाऊक आहे.

—पु. अ. भा. १ पृ. १११

इफ्तिखार—मान.

इफ्लस—दिवाळें काढलेला.

इन्बिसात—आनंद.

इन्साफगुजी—न्यायाग्रही, न्यायी. —खरे ३५७५

इफाजत—(हिफाजतचा अपभ्रंश) संरक्षण, आश्रय.

रघुनाथराऊ पेशवे ईजानबाचे इफाजतेत आहेत.

—रा. खं. १० पृ. १०८

इन्हिराफ—विरुद्ध.

इनफिसाल—निकाल, फैसल्ला.

त्याचा हिसाबाचे रुईने इनफिसाल करावा.

—रा.खं. ७ पृ. ६८

दिगर गांवसुद्धा बाकी साल मजकूरचा इनफिसाल करून द्यावा.

—रा. खं. २२ पृ. ६६

इब्न—इबिन पुत्र. अमक्याचा मुलगा.

वेदमूर्ती रामभट व कृष्णंभट बिन कोंडभट व गंगाधरभट व सदाशिव भट बिन नागेश भट इब्न यादव भट बिन अनंत भट उपनांव घोडे यांस दिल्हे इनामपत्र ऐसेजे —पु. न. सं. वृ. खं. २ पृ. १३२

इब्लिस—सैतान, दुष्ट, खोडसाळ.

इबरत खाणें—दहशत खाणें; कचदील होणें.

हल्लीं वर्तमान तर भुजंगराऊ घोरपडे लढाईंत वारलियावर लष्करानें इबरत खादली त्याजवरून बुलगे तमाम किल्ले वरघावर येथें आले.

—पे. द. भाग २८ पत्र नं. १००

इब-लाग, इब्लाग—पाठवणूक.

हमेशा मोहबतनामा इब्लाग करोन मस्रूर (आनंदित) करीत जाणे.

—रा. खं. १० पृ. १६४

इबादत-व-इज्लाल—दस्तगाह—

भक्ति व श्रेष्ठत्व यांचा निधि (हा एक अल्काब किंवा मायना आहे.)

इबादती—धार्मिक.

हे बातेचा तरस मोहिबासारखे इबादती लोकांस कांहींच न ये हें अज्जाइब आहे. —रा. खं. ३ पृ. ९०

इबारत—१ भाषा किंवा शब्दप्रयोग २ लिपि.

या ग्रंथाच्या बैता तीस हजार आहेत. तो पारसी भाषेचे इबारतीत आहे.

—इ. सं. ऐ. स्फु. ले. पृ. ४५

इबीन—पुत्र, बिन्.

येलोजी बिन मावजी इबीन चांदजी. —पे. द. स. मा. पृ. १११

इभ्रत—दबाव, दहशत. धास्त, दरारा.

दुसरे दिवशीं मिश्री-कोटेचें ठाणें म्हणजे निम्मे धारवाड, खंदकांत पाणी पुरुषप्रमाण, तें ठाणें इभ्रतीनें घेतलें. —ऐ. ले. सं. २७२५

किल्लेदाराने करारप्रमाणें न वागतां दोन दिवस घालमेलीवर घालविले तेव्हां आम्ही कोन्हेरराव यास पाठवून दिले. तेणेकरून त्यासी इभ्रत पडली व त्याणी किल्ला स्वाधीन केला. —ऐ. ले. सं. पृ. ६२४

इभ्रत पडणें—दरारा किंवा वचक बसणें.

त्याची फौज आणवावी म्हणजे सहजच इकडे आपली इभ्रत पडेल.

—हो. कै. पृ. ८४

इभ्रामी—रुपयाचा एक प्रकार.

मोहरा व पुतळ्या व इभ्रामी रुपये, व सलाम्याचे व होन व वरया व

फलम व वरकड नाना जातीचे नाणे इतक्या जिनसा ज्याच्या होत्या त्याच्या धोकटचा भरल्या व कापड थोडे थोडे घेतले.

—म. द. रु. १ पृ. ६४

इम्तियाझ—फरक.

इम्तिहान—परीक्षा.

इमदाद—साहाय्य, मदत.

येकीन आहे जे हरयेकबावे आमची मदती व इमदाद करतील.

—शि. च. सा. खं. ५ पृ. २५

हुजूरचे फौजेचे इमदादीनें माधवराव यांची शिकस्त होऊन दस्तगीर (हस्तगत) जाहले. —पुणें अखबार भा. १ पृ. १०४

इमान घेणें—अभिवचन घेणे (सुरक्षित निघून जाण्याबद्दल)

सुरुंग लावून अर्धा बुरुज पाडला मग ठाणेदार व लोक घाबरले इमान घेऊन बाहेर निघाले. —नाग २ पृ. २०६

इमाम—धर्माध्यक्ष.

इमायत, इमाईत—संरक्षण, आश्रय, वशिला, वग.

इमायतीच्या बळें गरिब गुरिबाला तूं गुरकाउं नको

—अनंतफंदी

इमारत—भरवंसा, मदार, विश्वास.

वरकड येक राऊत जाऊं दिला नाहीं. ज्या लोकावर इमारत ते येक आसामी जाऊं दिल्ही नाहीं. —पे. द. भाग २७ पत्र नं. ४५

आमची इमारत सर्व तुम्हावरच आहे. येविसी आपलें समाधान असो देणें.

—धा. प. इ. सा. ३ पृ. ४

इमारत असणें (एखाद्यावर)—एखाद्याच्या साहाय्यावर मदार असणें. किंवा अवलंबून असणें; उभारणी असणें.

हुजरुन आम्हांकडे निम्में मोकासा आहे. त्यापैकी निम्मे तुम्हास मोकासा सरंजामी करून दिल्हा आहे. आमची इमारत सर्व तुम्हांवरच आहे.

—भा. इ. सं. त्रै. वर्ष ८ अंक १, २, पृ. ३८

इरतिबात—स्नेह.

पंतसाहेबासी व आम्हांसी दोस्ती व इरतिबात कदीम आहे.

—दि. म. रा. भा. १ पृ. ४५

इरबात—इर्तिबात, स्नेह.

श्रीमंत पंतप्रधान साहेबासी व आम्हासी दोस्ती व इरबात कदीम आहे. त्यांत किमपी अंतर नाही. म्हणोन दुहराऊन कौल करार दिन इमानची

शपथपूर्वक लिहितो की, तुमचा मित्र तो आमचा मित्र तुमचा शत्रू तो आमचा शत्रू.
—राजवाडे खंड १२ पृ. २५

इरशाद—आज्ञा, आदेश, उपदेश, इच्छा.

हुजुरीहून जो इरशाद होईल त्याप्रमाण आम्हास मान्य आहे.
—पुणें अखबार भाग १ पृ. ९४

इरषाद—आज्ञा, इच्छा.

(अवतरणासाठीं 'हरफ' शब्द पाहा.)
—पुणें अखबार भाग १ पृ. १०८

इरसाल—१ देणगी, भेट, नजर. २ गांवाकडून किंवा जमीनदाराकडून किंवा तालुक्याकडून सरकारांत जावयाचा वसूल.

स्वामीचे सेवेसी इरसाल बीतपसील मोहरा हजार हत्ती १ घोडे ५ आरसा जडित समेत जवाहिर मोत्ये रास ? —पे. द. २० पृ. २

इरसाल—वेचक, निवडक, उत्तम. उंची जिन्नस.

एकंदर भिल्लांचा जमाव अरब, सिद्दी वगैरे इरसाल मिळोन ५००० जमाव आहे.
—ऐ. ले. सं. ८२३३

फरासीसांचे चाळीस मनवर (लढाऊ जहाजें) मोरस (मॉरिशस) म्हणून बंदर आहे त्यास येऊन लागले १२००० गोरा शिवाय इरसाल माणूस, या प्रमाणे आले म्हणोन बातमीचें पत्र आले.
—ऐ. ले. सं. पृ. ७९६७

तह ठरल्यावर आम्ही मग नबाबाची कोंडी मोकळी करून आमच्या तमाम लष्करास व वाणियास ताकीद करून नबाबाकडे इरसाल पोहचवून दिला.
—ब्र. च. पृ. ५२

इरसाल—निवडक लोक.

कित्येक लोक जखमी झाले. ३०० कोळी जीवें मारिले. गांवचे इरसाल मिळाले होते. रयतसुद्धां ते सारे फुटोन गेले. जिकडील तिकडे तारांगण झालें.
—ऐ. ले. सं. २५५८

इरसाल—पाठविलेलें.
—रा. व्य. को.

इरसाल करणें—पाठविणें, सादर करणें, रवाना करणें, दाखल करणे.

अर्जदास्त इरसाल केली आहे. —शि. च. सा. खं. ५ पृ. २१

इरादत—इच्छा असण्याचा भाव.

इरादह—इरादा.

इरादा—वजन, प्रतिष्ठा, दबदबा, बाणा, शील.

गुत्ती संस्थानावर शिदोजी हिंदुराव दुसरे घराणेचे पुरुष निपणजे, यानी

स्थापना करून आले होते ते त्यानी तिकडील किल्ले वगैरे दुरुस्त करून होते. आबादी केली व इरादाहि मोठा ठेवला.

—द. स. कै या. पृ. ४३

वास्तविक तुम्हास असेच महाराजापाशी नेऊन पावते करावे परंतु आम्ही रजपूत. असें करण्यानें आमच्या इराद्यास खामी (बट्टा, कमीपणा) येती. बाकी तुम्ही हरामखोरी करण्यात आपल्या कडून कसर केली नाही.

—हो. कै. पृ. १५०

इरादा—शत्रुत्व, वैर, स्वारी करण्याची इच्छा.

फारस्तराचे म्हणणें कीं फत्तेअलीखान बहादर यासी आमचा इरादा आहे या मसलतीस नबाव व श्रीमंत रा० पंतप्रधान अनकूल आहेत.

—नाग. २ पृ. ८१

इरी—ईर्षा, खिजवणूक.

आमची विक्री कारभाऱ्यास आली म्हणोन जांव-गांवींचि आमचे पारिपत्य करीत होते. तो डाव चुकला. परंतु डंश चित्तांतील कसा जातो? याकरिता आम्हास इऱ्या देऊन लिहितात. —लेख पृ. ९९

इरीति—हे रीत, ही पद्धत.

मौजे नाडोली गांव अग्रहार पहिलेपासून चालत आला आहे. ऐसीयासी राजश्री कै. स्वामीनी काही दिवस अमान्य केले होते की इरीती आपले राज्यांत चालली नाही. यावरी स्वामी गोसावियांचे भेटीस कोरटीस आले तेथे भेटी जाहली. भेटीनंतर कित्येक संभाषण-प्रसंग जाला तेव्हा त्यानी तो गाव गोसावियासी पहिले प्रमाणे दिल्हा असे.

—मा. स. प. मा. पृ. १३५

इरेस टेकणें—ईर्षेस पेटणें किंवा पडणें.

छावणी समीप; यामुळें तुमच्या लष्करांतील लोक बेलाशक निघोन येतील ! गुंता नाहीं. इरेस टेकोन तुम्हांपाशीं जे राहतील त्यांची याद आकारून पाठविणें.

—ऐ. ले. सं. ८४५

इल्तबा—थांबून धरणें, बाजूस घेणें.

इल्तिझाम—उपचार.

इल्तिमश—प्रार्थना, अर्ज.

इल्तिमास—विनंती, अर्ज.

ये बाबे इल्तिमाश लिहिली. —इ. मं. पृ. ७५

इल्हाक—१ जोडणी २ सही.

अजमखान यांचा इल्हाक व सर-बुलंदजंग यांचे दस्कत

—रा. खं. ७ पृ. ४५

इल्हाम—अंत: स्फुरण.

इलजाम, इलाजाम—आरोप, दोष, ठपका. जोखीम जवाबदारी.

चाकरच आहो. तेव्हा चाकरीच्या कंब्रेसीचे इलाजमास चिंता नाहौ. धनी आहा. बरदास्त कराल. परंतु हरामखोरीचे इलाजमानें आमचे शीळास बट्टा आहे. —हो. कै. पृ. ४०

नवल विशेष असल्यास श्रीमंत नाना व तात्या यांसी अगोदर इतला देण्यात येईल. न दिल्यास आम्हावर इलजाम आहे. तुम्हावर नाहीं. कारण तुम्ही खलबतात नसता. —नाग. २ पृ. ९१

इलतमास—विनंती.

त्यावरून पादशहास न्याहारखानाच्या वकीलांनी इलतमास गुदरानिली हजरतीचा संवाद इलतमासीवर जाला की बेवारीस वतन असले तर तहकीक करून देणे. —मा. स. प. भा. पृ. १९६

इलतिजा—विनंति.

सखारामपंतानी हुजुरात इलतिजा करून कुमकेस सरदार व फौजफेरोजी नेली. —पुणें अखबार भाग १ पृ. १०३

बालाजीपंत पुन्हा बोलिले की सांप्रत इंगरेजावर हैदरअलीखान गालिब जाहला आहे याजकरितां हुजूर इलतिजा करून नम्रतेची गोष्ट सांगत आहेत व ताबेदारी व फिदवीयत यख्तियार करतात. हैदराचा व इंगरेजाचा दारमदार कदाचित झाला तर कदाचित् कांहीं दिवस स्वस्थ राहून उपरांतिक हुजूरचे जवाब मुकसदेत बाद-अहदीची गोष्ट सांगतील येसे आम्हास वाटते. —पुणें अख. भाग २ पृ. १७२

इलमला—हल्ला, हमला.

तेथून बारवाई डोंगरावर इलमला करून तीन लढाया मोठ्याच जहाल्या. —द. शि. मो. यांचा इतिहास पृ. १३

इलं—इल्लम, शास्त्र, विद्या, कला.

इला—(?)

त्यावरून साखराई मरळ याची तकसीम व इला गांवगन्ना इनामतीपैकी असेल ते याचे स्वाधीन करावयाची आज्ञा केली असे. —रा. १ पृ. ५९

इलाका—इलाखा, संबंध.

विठ्ठलरामजी याही त्यास कांहींही इलाका नसता मौजे पिंपरीपासून तीनसे रुपये घेतले. —पुणें अख. भाग १ पृ. ७५

इलाखा—इलाचा-कापडाचा एक प्रकार (?)

पुण्याहून सामान पालख्यांचे, दोरण्या, मुलामे कोर, दाल, पिंजरीचे गोप व राजगोंडे इलाखे व सांगचें सामान पाठविलें आहे. —ऐ. ले. सं. ९३५

इलाखा—संबंध किंवा हक्क.

इलासवजा जोड—घोड्याच्या सामानापैकीं एक जिन्नस.

समस्त घोड्याचें समान दसऱ्यास आणिले होते तें तुम्ही कारखानियास जाऊन अंताजी खंडेरावाबरोबर पाठविले वितपसील. सोनियाचें सामान २ जीन २ कंडे २ पट्टे १ चोइत्या जोडा एकूण ७, रुप्याचें ४ कंडे ४ पट्टे २ दुमच्या १ इलासवजा जोड, चरका जोड एकूण ११

—शाहू रोजनिशी पृ. ३९

इलाही—परमेश्वरी (इलाह्—ईश्वर)

इलाही गज—अकबरानें सुरू केलेली जमीन मोजणीकाठी. हा गज ४१ अंगुळांचा असे. इंग्रजी अमलांत इलाही गजाची लांबी ३३ इंच ठरविण्यांत आली.

इश्तिहार—जाहिरात.

इश्रीन—वीस.

इशमें—इसम शब्दाचें अनेकवचन.

समागमे भोजनास इशमें लक्ष्मणराव पाटणकर मानसिंग मोहिते वगैरे १०।१५ असाम्यासहित आले.

नाग २ पृ. १४७

इशाद—विषाद

मग तो इशाद मनांत येऊन हावाजीस ठार मारला आणि आपले बायकोसहि ठार मारली.

—म. द. रु. ३ पृ. २७

इशादायपासून—प्रारंभापासून, इफ्तदायपासून.

सूर्याजीनें इशादायापासून जें कागद घेतले असतील ते कुल रद्द असे. तुमचे वतन तुमचे दुमाले (स्वाधीन) केले असे.

—ऐ. सं. सा. खंड ५ पृ. ३२

इषकील—हरकत किंवा तंटा.

गणेशपंत कुंटे याचा भोग अजूनपर्यंत सरत नाहीं. सजावल (सरकारचा ताकीद करणारा खास शिपाई) पाठवावयाची तजवीज झाली आहे. तथापि कित्येक लोकानी भरी-उभरी घालून सजावळ निघू देत नाहींत. दरम्यानच इष्किली काढितात.

—पे. द. ३० पृ. १४८

इष्ट—हितचिंतक.

फौज रवाना करावी ऐसा इत्यर्थ जाहला. तो कोणी इष्टानें हे बातमी लिहिली कीं फौजा पाठवून तुमची अब्रू घेणार तेव्हां जरूर जाणोन किल्ले मजकुरास आलों.

—ऐ. ले. सं. १२६९

इषक—इष्क; षोक.

बाजीराव साहेब व चिमाजी आप्पा यांसी घोड्यावर बसावयाचा इषक बहुत आहे. —ऐ. ले. सं. ४८३३

इस्कील—हरकत, विरोध, अनमान.

येणेंप्रमाणें निमे मिरासी दिल्ही असे. यास आम्ही अगर आम्हावादज जो होईल तो इस्कील करील त्यासी कासीस गोहत्या केलिया समान.
—शि. व. सा. खंड ५ पृ. १७०

मग साहेब ढेकोरीचे मसलतीस गेले होते तेथे आपण साहेबापाशी येऊन अर्ज केला मग साहेब मेहेरबान होऊन सदरहू रोजमुरीयाची इस्किल दूर करून सालाबादप्रमाणे पुरा रोजमुरा देविल.
—पे. द. भा. ३१ पृ. १५

इस्टत्व—स्नेह, सलोखा.

चित्तातून मुख्य गोष्ट की जर स्वामीसी इस्टत्व होऊन आले तर करावे.
--पे. द. २० पृ. ३१

इस्टव्रत—इष्टैक्य, घरोबा, मैत्री.

आपलें वर्तमान तर वाफगांवचे खंडाचे काही आजपावेतो आपणांकडे मागितले नाही. आपल्यापासून कांही घेत नाहीत. आम्ही सरकारचे लोकांचे आजपावेतों इस्टव्रत राखिले आहे.
—चं. चू. द. पृ. १३१

इस्तकबल—सामोरें.

संध्याकाळीं तुबाजीपंत, केशोराव व विठ्ठलपंत आले. राजश्री भुजंगराव पूढें इस्तकबल पाठवून डेरियांत दाखल केले. मग प्रहरा रात्रीं मुरार-रायाची भेट जाली. —पे. द. ४० पृ. ६२

इस्तकबाल--सामोरे,

चौकोसावरी पुन्हा तैसीच पत्रें आली. लिहीले कीं इस्तकबाल कोणास पाठवावें. —हिं. द. खंड १ पृ. ३७

इस्तकबाल करणे—सामोरे जाणें, सन्मान-आगत-स्वागत करणें.

विठ्ठल सुंदर निजामन अलीखानापासोन निरोप घेऊन लस्करबाहेर निघाले. स्वामीकडे येतात. यास इस्तकबाल करावयासी स्वामी समर्थ आहेत. --E. M. P. पृ. ९४

इस्तक बिल--सामोरें.

इंग्रजांकडील मातबर मनुष्य सरकारांत बोलावयाला आला असतां त्यास मदारुल महाम (नाना फडणवीस) अगर मातबरांतील इस्तकबिल येत

गेले. हल्लीं तो आम्हीं पातशाही पत्रें घेऊन आलों आहों, त्यापेक्षां या चारी रकमा घडाव्या. —ऐ. ले. सं. ६२०८

इस्तकलाल—जोर.

आपण मोठा इस्तकलाल केला. मोठी गोष्ट गेली. आतां तर फलादेश आहे. —पे. द. भाग. २९ पत्र नं. ८

इस्तकलाली--जोर, सामर्थ्य.

दर्गाहिकुलीखान कांहीं एक दिवस शजदर होते. आता इस्तकलालीनें आहेत. —ऐ. सं. सा. खंड ६ पृ. ४८

इस्तकामत—(?)

दौलतख्वाही व नेक खिदमती करून दाखवणें व बादज दौलतख्वाही पुरापुर हालबटा इस्तकामत मरहंमत करून सर्फराज फर्माविले जाईल. —रा. १७ पृ. १७

इस्तमालत, इस्तमाली—१ लावणी, संचणी; २ कीर्दमामुरी, ३ दिलदिलासा.

आबादीस व इस्तमालतीस कोसीस करावी. --रा. खं. पृ. ११३

माझ्या नांवें सनद करून पाठविलीयाने हारसेन सेत इस्तमालेत होईल. —वै. ४ स. १७४५ पृ. १०

इस्तसवाब—सल्ला, पसंती. बइस्तसवाब—(सल्ल्याप्रमाणें).

बइस्तसवाब बालाजीपंत सिंद्याचे व हरीपंत होळकराचे ज्वाबसालाचे बानीकार जाहले आहेत. —पुणे अखबार भाग १ पृ. २६३

इंग्रजासी स्नेह हैदरनायकाचे इस्तसवाबेवितरिक्त सर्वथैव होणार नाही हा येथील कारभाऱ्यांचा सिधांत आहे. —पुणें अखबार भाग १ पृ. २१०

त्यांचे इस्तसवाबानें काम करावे. —रा. खं. ७ पृ. ५८

उभयतानी उत्तर केले कीं इंगरेजासी दारमदार केल्यापक्षीं (केला तर) हैदर अलीखानाचे इस्तसवाबेने होईल. —पुणें अखबार भाग २ पृ. ६२

इस्तहार—प्रसिद्ध, जाहीर.

इंगरेजानी महादजी सिंद्यावर शबखून घातला हे खबर वाफगावीहून ईस्तहार जाहाली होती, ते गलत आहे. —पुणें अख. भाग २ पृ. ६

इस्ताद--चुन्याचें पक्कें काम.

इस्तादीची घरें. —आज्ञापत्र

इस्ताद—जंगम मालमत्ता.

इस्ताद—तयारीसाठीं पैसा; साहित्य; सिद्धता.

आंग्याचे अडीचशें माणूस त्यानीं सांगितले त्यासहि इस्ताद मिळत नाहीं.
—पे. द. १६ पृ. १०९

उत्तूर, देवर्डे व कोळिंद्रें तिन्ही गांवांत इस्ताद व दास्तान असेल ते माघारे द्यावे.
—इचलकरंजी संस्थानचा इतिहास पृ. १६१

इस्तिकाल—करार किंवा सौदा मोडणें.

इस्ताफ—शरणचिठ्ठी, राजीनामा.

पातशहानीं माळवा व गुजरातचा सुभा आपनास दिल्हा आहे कीं तुम्ही मुलकाचा बंदोबस्त करणें. इस्ताफ दिल्हा कीं आपल्याच्यानें होत नाहीं. हजरत कोन्हाचें सांभाली लाऊत.
—पे. द. १० पृ. २९

इस्ताफा—राजीनामा (इस्तिफा)

कदाचित् अर्ज मंजूर नच होय त्यापक्षीं इस्ताफा लिहुन देणे प्राप्त होईल.
—पुणें अख. भाग १ पृ. २५२

इस्तावा—नवीन जमीन लागवडीस देतेवेळी कांहीं वर्षेपर्यंत भर साऱ्यापेक्षां कमी, परंतु दरसाल वाढत्या साऱ्यानें जमीन देणें.

इस्तिअजाल—घाई करणें.

इस्तिकामत—कायमपणा.

इस्तिगासह्—तक्रार.

इस्तिज्हार—जाहीर.

इस्तिफा—त्यागपत्र, राजीनामा.

ते बोलिले कीं, सदरहू जागीर तगीर जालियावर आम्हीं नौकरीचा इस्तिफा देऊं. आम्हास गनिमाईकडे जाणें नाहीं.
—पे. द. ४० पृ. ३९

इस्तियाक-मुस्ताकी—प्रेमलोभ.

ज्या ज्या प्रसंगोचित इस्तियाकमुस्ताकीच्या गोष्टी बोलावयाच्या त्या नबाव निजामुद्दौला बहादुर याणी बयाण केल्या.
—रा. खं. १ पृ. १८७

इस्तिला—(१) जय (२) अधिकार (३) जिंकून कबजांत घेणें व अशा रीतीनें जिंकलेल्या लोकांना गुलाम करण्याचा हक्क संपादन करणें.

इस्ना—दोन.

इस्पडताल—इस्पितळ, हॉसपिटल.

इस्पडतालच्या डाक्तरास हुकूम केला कीं, यादीप्रमाणें जी औषधें मोदी मागेल ती देणें.
—पे. द. ३३ पृ. १०७

इस्म—नाव.

इस्लामगड—रायरी, रायगड (रायगडचें जुनें नांव).

इ कौलनामा अज सुभा मामलें दाभोळ व सुभा प्रांत राजापूर व मामले इसलामगढ–उर्फ राइरी.

—दस. शि. मो. इ. पृ. ३४

इस्लामाबाद—चाकणाचें जुनें नांव.

चाकण उर्फ इस्लामाबाद. —पे. द. ४५ पृ. २

इसकील—इस्काल, इस्कील, इस्कीलकी, हरकत, तंटा.

ये बावे इस्कील न करणे दोनी चावर इनाम पिढी दरपिढी चालविणे.

—मा. स. प. मा. पृ १२१

इसदार, इस्दार—बाहेर काढणें. प्रसिद्धीकरण, बाहेर निघणें (हुकूम)

दस्तक इस्दार करून पाठविलें आहे. —रा. खं. ३. पृ. ९१

इसन्ने—दोन

इसन्नेअशर—बारा.

इसापती—इजाफती. इनामाखेरीज मिळकतीच्या जादा इतर बाबी.

सदरहु इसापती व हक्क लाजीमा खाऊनु लाठी बल (?) देऊनु तपा तमाम, मामूर करणें. —रा. १ पृ. २८

इहतिराम—मान देणें.

इहसान—प्रसाद.

इंग्रज—पोलाद.

।· इंगरज कुऱ्हाडीस ८८।।· दर ८=; सुंव्यास पाणी पाजले व इंगरज भरले.

—पे. मा. पृ. २३७

इंग्रजी लोखंड—पोलाद.

राजापुरीं, सरकारानें मुंबईस माल सावकार नेतील यास्तव कैद केली आहे. यामुळें बंदरीं सावकारी चालत नाहीं. इंग्रजी लोखंडहि सध्या नाहीं. इंग्रजी शिसें दर मणीं रुपये १२ प्रमाणें दर आहे.

—ऐ. ले. सं ३६४७

इंगिताग्र—इंगित जाणणारा.

पंतप्रधान यांणीं पत्र लिहिलें त्यांतील भावही उत्तम आहे. सारांश, पंतप्रधान इंगिताग्र आहेत. प्रसंगानुरूप विचार सर्वही त्यांच्या ध्यानांत आहेत.

—ऐ. ले. सं. ११८३

इंगळास वळंबे लागणे—एकादशीचे घरीं शिवरात्र, असलेल्या संकटांत अधिक संकटाची भर पडणें, गंडस्योपरिपीटिका.

—पे. द. भाग २५ पत्र नं. १६२

इंतहा—इतिहा; नि:सीम; कमाल; शेवट.
येक मुचलका देणे, आण बिदा होणे. यास नऊदिगर जालो तरी गर्दन मारिले जाल. यावर आपण आगरामधे ठाणे मातबर बैसवूं येणे प्रमाणे रदबदल इंतहाप्रो जाली.

इंतजाम—व्यवस्था, निकाल.
सरकारचे कामाचा पक्का इंतजाम (करावा).
—जो. रा. पृ १२९

इंतिजार, इंतजारी—१ मार्गप्रतीक्षा करणारे, २ प्रतीक्षा
(१) हजूरच्या सालजाबाकरितां इंतिजार होते, त्यास सालजाब आला अत:पर सनदापत्रें करून देतील. —हिं. द. खंड १ पृ. ४७
फर्मानाचे नकलेकरितां जानोजीराव निंबाळकर याचे वगैरे वकील इंतिजार आंहेत परंतु अद्याप नकल कोण्हास प्राप्त जाहाली नाही.
—पे. द. २५ पृ. ९७
(२) थेट कासीचें पत्र येऊन वर्तमान कळावयाची इंतजारी आहे याप्रमाणें बालाजीपंत जुबानी बोलले. —पुणें अख. भाग २ पृ. ८२
(३) अद्यापि उत्तर आले नाही. मीं त्यांचे जाबाचा इंतजार आहें.
—हिं. द खं. १ पृ. ७६

ई

ई—हा, ही, हे.

ईजहार करणें—निवेदन करणें. सादर करणें.
किलेयाचा मजकूर सविस्तर आज्ञापत्राप्रमाणें खलबतामध्यें नबाबाचे खजमतेस इजहार केला. —पे. द. भाग २८ पत्र नं. २२

ईजाफत—जास्त किंवा अधिक.
जानोजी निंबालकर यांनीं हजार स्वार ईजाफ(त) व दोन हजार प्यादे ठेवावे हा उद्योग केला आहे. —पे. द. भाग ३८ पत्र नं. १४

ईटा—भाल्यासारखें एक हत्यार.
त्याणी हातघाई करून मेढयाची दोनचार लांकडे मोडिली त्याजवरी ईटे जंगी भांडीयाचा मार जाला. —पे. द. ३३ पृ. ४५

ईतालकी बातईताल—आजची बात म्हणजे अवस्था किंवा बोलणें उद्याला टिकत नाहीं (?)
खंडोजी माणकराची ईतालकीबातईताल नाहीं.
—पे. द. १६ पृ. १०९

ईतीयात—इत्तेहात, स्नेह, मैत्री.

स्वामीचाच आसरा मूर्तजाखा धरितात सादुल्लाखान याचा नातू आहे. नवा ईतीयात आता मातबर तोच आहे.

—पे. द. २८ पृ. १२३

ईरशात किंवा ईरशाद—उपदेश किंवा आज्ञा.

सारांश पातशाहाचे ईरशाताहून अधिक आम्हांस नाहीं. जे आज्ञा करतील त्याप्रमाणें सेवा करून दाखवूं. —हिं. द. खंड १ पृ. ३९

ईल काढून घेणे—वेळ मारून नेणें, दिरंगाईवर टाकणें.

तूर्त तो ईल काढून घ्यावा व पुढें मुंबईकराचा येक हात करून फिरोन गोष्ट सांगावी यैसा विचार करील. —पे. द. ३ पृ. २४

ईलम—मात्रा किंवा युक्ती.

नानानें सांगितलें कीं स्वारी होऊन आल्यावर बंदोबस्त करावयास येईल. तावत्काल तुमचा ईलम चालल्यास करावा.

—इ. सं. आं. यांची हकीगत पृ. २५

ईश्वरगती—दैवगती.

कोषीस वहुतच केली परंतु घडोन न आले. ईश्वरगतीस येत्न नाहीं.

—पे. द. १३ पृ. ७

ईश्वराचे घरची वस्तु—अमोल, अपूर्व.

लाल मोहनराव मुनसी केवल ईश्वराचे घरची वस्तु आहे. —पे. द.

ईशान—हे, ह्या, हीं.

ईसकपेच—१ शक्तीवरची एक वनस्पती; १ एक जातीचें फूल.

पांढरे ईसक-पेचाचें (इष्क-पेचाचें) बीज पेशजी फकीरानें दिलें तें ठेविलें होतें. या तऱ्हेचें बी पेशजी गेलें आहे. तें व हें पांढरे ईसक-पेचाचें आहे. रूबरू (समक्ष) फुलें आणून पाहिलीं. संशय नाहीं.

—ऐ. ले. सं. ६९८३

ईस्कपेच गुलछबू सदोदित भरशेवति साबरी.

—प्रभाकर १५४

उ

उकाल—१ अवचित, अनपेक्षित २ निशाणावर न बसता पलीकडे गेलेला तोफेचा गोळा. कोरडचा ओकारीसारखा. (असे गोळे पुन्हा उपयोगास आणता येत असत) ३ ओकारी, उबळ, पोटांतील दुर्वासना मळमळ.

खंडोबा निंबालकर यास, दूर उभे होतो तेथें उकाल गोली येऊन गुडघ्यावर लागली.

—पे. द. २८ पृ. १९८

किल्ल्यांतील गोळा गोटात पडतो असें समजून दहावीस बार उगीच उकाल सुटले. ते गोटांत व पुढें पडले. परंतु कोणी जायां जखमी जालें नाहीं. —ऐ. ले. सं. ४३९०

तुम्हास जातेसमयीं सांगितलें होतें जे लष्करचे सोद्यांस कांहीं देऊं करून उकाल गोळे गेलेले, आणवावे. त्याप्रमाणे गोळे तुम्ही आणविले की नाही? —ऐ. ले. सं. पृ. ३४८४

किल्ल्यावरील पाचसात गोळे उकाळ येऊन फौजेंत पडले. दोनतीन घोडीं ठार जालीं. इंग्रजांच्या लेणीमध्यें एकदोन गोळे बसले. त्यांचेहि चारपाच आसामी ठार जाले. —ऐ. ले. सं. ४३६४

इकडे विठ्ठ महादेव याणीं कारभार करावा असें खचित ठरून आळेकर याजपासून पैका घ्यावा, असे उकाल निघूं लागले. —हो. कै. पृ. १८५

उकाल गोळा—डोक्यावरून जाणारा गोळा.

साही तोफा मिळून ३२ बार केले. वरून उकाल व दोही बाजूने चारपाच हाताचे अंतरानें गोळे जात; परंतु एकही गोळा चादरेस लागू दिला (जाला) नाही. —नाग २ पृ. १७२

उक्ती पाक्ती—सबंध खेड्यावर ठरविलेली एकूण वसूलाची रक्कम. हा वसूल शेतकऱ्यांकडून मान्य करून घेऊन त्यांना कांहीं वर्षांच्या मुदती पुरती जमीन लागवडीस देण्यांत येते. या सर्व प्रकारास उक्तीपाक्ती म्हणतात.

यावरी गांवास पैका बहुत पडो लागला. गांवी मिरासीदार प्रज नाहीं. उक्ती पाक्ती लावून, उगवणीकरितां गांवाची तुटी येऊं लागली. ते द्यावयासी काटकरास मवसर नाहीं. —म. द. रु. ३ पृ. ३४

उक्त—भाईपण.

उखळधुणी—उखळबेऱ्या करणें किंवा शिव्यागाळी करणें. —पे. द.

अवतरणासाठी दाद्या शब्द पाहा.

उगलेच—उगेच.

माहीमचा मोर्चा उठलीयावर तुम्ही सिरगांवास राहोन उगलेच बसावे यैसे आमच्यामतें नाहीं. —पे. द. ३४ पृ. १११

उगव—उगावा, फडशा, निकाल.

दरम्यान येथें शामजंगाचा जाबसाल आहे मामलेतसंबंधी उगव होणें आहे. —नाग २ पृ. १२९

उगवणीचा व लावगणीचा हंगाम—पिकाचा व पेरणीचा हंगाम.

तेव्हां महाली उगवणीचा व लावगणीचा हंगाम हे दोन्ही कामें जाली पाहिजेत याबद्दल शेरीकरास महाली राहविले. —पे. द. ३१ पृ. ५

उगवणे—करून घेणें, मिळविणें.

राजेश्री पंत मशारनिलेकडे पाठवितील तेणेप्रमाणें सनदपत्र उगवणे ते राजश्री शंकराजीपंत उगऊन देतील.

—शि. च. सा. खं. ५ पृ. १०१

उगा—समजूत, समाधान.

तिसा लाखांचे माल जयेद आहेत ते आम्हास सनद करून द्या. येथे तनखादारांचा उगा करून. —हिं. द. खंड १ पृ. ७२

उगालदान-बार्दार—पिकदाणी धरणारा नोकर.

—रा. व्य. को.

उगावगा—उगवणी, वसूल.

तरी गोपाळ संभाजी यासी तुम्ही लेहून तेथील उगावगा जेथवर होईल तेथवर करून घेणें म्हणोन स्वामीची आज्ञा जाली.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १६६

उगावगा करणें--गयावया करणें.

रयत उगावगा करून पळावयास सिद्ध राहिली. —पे. द.

उघड—फूट, बेबनाव.

आजपावेतों तीर्थस्वरूप कैलासवासी सर्वांनीं संगोपन करून आबच रक्षीत आले, म्हणूनच मंडळींत निभावले ! कसेंही जाहलें तरी उघड पडली नाहीं. अलीकडे बहुतच विरुद्धास कारणें जाहलीं. परंतु तुम्हांकडे थोरपण आणि आडनाव, पटवर्धन मंडळींत दुसरा विचार नव्हता.

—ऐ. ले. सं. ३००८

उचका, उचक्या—उचल्या, भामट्या, खिसेकापू. —(विलसन)

उचगा--गटंगळी.

नवाब मशारनुलेची अवस्ता पाहता नदीमधे उचगे खात माणूस कैसे श्रम पावते तेणेपरी विचार. —E. M. P.पृ. १६४

उचल्या—उचलेगिरी करणारी चोरांची एक जात. सध्याच्या गुन्हेगार जातीच्या नोंदीप्रमाणें ऐ. काळींही अशा लोकांची नोंद असे व ते कोण्या गांवास गेले तर तेथें त्याजकडून करासारखी कांहीं किरकोळ रक्कम वसूल केली जाई.

२ रु. उचल्या गांवास आला होता त्याजपासून घेतले.

—पे. सा. पृ. १०६

उचल्या हातें—वाटेल तसा उचलून.

मौजे मजकुरचा मोकासा मंत्री याजकडे पूर्वीपासून चालत असतां अलीकडे पाच साले तुम्ही आकार बमोजीब वसूल देत नाही. दिक्कत करून-

प्रतिनिधी-पंताकडील कमाविसदाराकडे ऐवज देतां. ते उचल्या हातें याज कडे पैका देतात म्हणुन विदित झाले.

—ऐ. सं. सा. खं. ४. पृ.१००

उचलून गोष्ट सांगणें—विरोध दर्शविणें, उर्मटपणा करणे.

रायदुर्ग. चित्रदुर्ग वगैरे लहानमोठी संस्थानें आपोआप येऊन भेटोन खंडण्या दिल्या. कोणी उचलून गोष्ट सांगितली नाहीं.

—पे. द. २८ पृ. १७६

उचले—उचलल्यासारखे, साहित्याशिवाय, सडे.

येथून समुदायसहवर्तमान स्वार होऊन येथून उचले तेथे येऊं. त्यासी ते स्थळीं साहित्य व राहावयासी जागा, याची अगोधरीच योजण्क पाहिजे.

—पे. द. ३४ पृ. ११३

उचापत—(१) उसनी रकम, कर्ज (२) एकाद्या कामासाठी लागणाऱ्या वेळोवेळ करावयाच्या खर्चाची जबाबदारी.

नाशकांत श्रीसुंदरनारायणाच्या देवालयास काम लाविले आहे त्यास श्रीमंतास विनंति करून कारखान्याचे उचापत आपल्याकडे लाविली आहे. सात हजारासिवाय आनीख कारखानियांस यैवज लागेल तो देत जाणे. हिसेब ठीक ठेवणें. श्रीमंत ज्यास यैवज देवितील त्याचे विद्यमाने उचापत नित्यानी देत जावी. अनमान न करावा. —चं. चू. द. पृ. ४२

बालसेट वीरकर भाऊसाहेबाबरोबर हिंदुस्थानांत स्वारीस जाऊन लोकांचें कर्ज घेऊन सरकारांत उचापत दिली तो ऐवज वीरकरांस परत पावला नाही याजमुले हे कर्जदार जाले. —पुरं. द. भाग ३ पृ. ४५

संताजी घोरपडे याचे रवानगीस कर्ज दिल्हे व किरकोली जिन्नस दिल्हा व राजश्री त्रिंबक सिवदेव मुतालिक— सुरनिसी यांकडेही उचापत दिल्ही तो अवघा हिसेब दप्तरी आहे. —ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ट ३६

पुढें यावे तो खर्च सरला. याजकरिता ठाण्याची उचापत खातो.

—E. M. P. पृ. २३७

उचित—देणगी, बक्षीस.

विजया दशमीस पंतप्रधान यांणीं पदरचे मंडळीस उचित द्यावयाचा करार करून वस्त्रें दिलीं. कोणास पालख्या, कोणास वस्त्रें, कोणास बागबंगले वगैरे.

—ऐ. ले. सं. ६७९३

उचित्त—बक्षीस, सन्मान.

मग राजा याणी (राजानें) आपले हातीं सर्वांस भूषणें वस्त्रें वाहिलीं (दिलीं, अर्पण केलीं) मग भोजनें झालीं मग उचित्तें व वृत्ति दिधली ऐसी वाणीं दिधली.

—बिंब ३

उचितास येणें—मानवणें, आवडणें, पसंत पडणें, योग्य वाटणें.

आपले चित्तास येईल ते अतःपर करावे. आम्हा लेहून उतराई व्हावें हेंच आम्हांस उचित. आपले उचितास येईल तें करावें.

—पे. द. ३३ पृ. १८

त्यांचे उचितास येऊन राहिल्यास उत्तम. परंतु न राहिले म्हणून उपद्रव न करावा.

—इ. सं. तं. रा. घ. इ. पृ. ४०

आम्ही एकच उत्तर दिल्हे की वडील तुम्ही आहात. उचितास येईल ते करावे.

—पे. द. भाग १ पृ. ३५

उचितास येईल तैसे त्याणी सुखरूप करावे.

—नाग १ पृ. २५९

उज्म—मोठेपणा, प्रतिष्ठा.

इंद्रसेनानें सरकारांत येऊन श्रीमंताशी भेटून जाण्यांत उज्म राहतो.

—म. शि. यां. का. पृ. ५३४

उज्मा—भव्य-

उज्लत—घाई.

उजगऱ्यास येणें—१ प्रसिद्ध होणें, २ शुद्धीवर येणें.

आपला पैका आहे. विनाकारणिक भक्षिला असतां त्यास जिरणार नाहीं. जरूर अडकवावा. गुप्तरूपे उमज सांपडूं न देतां अडकवून ठेवावें. मग आपणच उजगऱ्यास येईल.

—ऐ. ले. सं. ६६२०

उजगारा—उचका, जागरण.

खिडींत घोडीं इंग्रजांवर लोकांनीं घातलीं. इतकियांत दोन घटका दिवस आला. शत्रु बारवईच्या तळ्याची पाळ धरून जमून उभा राहून तोफा मारूं लागला. परंतु आपल्या फौजेस आसरा होता, यामुळें कोणी जायां झाले नाहीं. शत्रूस चार प्रहर रात्र उजगारा पडून खराबी जाली.

—ऐ. ले. सं. ३६०६

रात्रीं छबिने पाठविले, लोकास उजगारा पडला. वुणगे प्रातःकाळी आले.

—पे. द. भा. १ पत्र नं. ६८

उजगारा—१ प्रतिष्ठा, २ विश्वास, ३ उघड, प्रकट.

नानाचे चौकींतून श्रीमंतांनीं मला जबरदस्तीनें सोडविलें आहे. याजमुळें माझें बोलणें कोठेंच उजगाऱ्याचें नव्हे. (माझ्या बोलण्याला कोणीच किंमत किंवा प्रतिष्ठा देणार नाहीं) यास्तव वडिलीं एखादा मातबर, शहाणा पाठवावा, म्हणजे तो प्रसिद्ध बोलला असतां दिक्कत नाहीं.

—ऐ. ले. सं. ५२७०

उजम—गर्व, अभिमान, श्रेष्ठता, थोरवी.

नासरजंगाचा पातशाही उजम आहे व प्रकृतहि जलद, यास्तव विषम मानितात.

—पे. द. २८ पृ. ४४

उजरख्वाही—विरोध करण्याची इच्छा करणारा.

श्रीकृपेने दसऱ्यानंतर ताजे दमाचे फौजेनसी पुन्हां इंग्रजाचे तंबीस भोसले बंगालचे रुखे रवाना होतील, याप्रमाणें उजरख्वाही करून दिवाकरपंतांनीं पेशव्यास पत्र पाठविले आहे, म्हणोन यैकिले

—पुणें अखबार भाग १ पृ. १६५

उजरिसी—व्यवस्था, बंदोबस्त, लौकिक.

सिवरामपंताची स्त्री सौभाग्यवती दुर्गाबाई यांणीं रामराजे यास फारफार जपून सौरक्षण केलें म्हणोन कललें. त्यास दुर्गाबाईस साडीचोलीबदल देशमुखीचें वतन स्वामीचें आहे तें तिजला इनाम करून देऊन चालविलें जाईल. माहादजी गदाधर याणीं दरखाची उजरिसी राखिली नाहीं, याज मुळें पायमली आहे, तसें पुढें होणार नाहीं. स्वामीनीं शफतपूर्वक मशार-निलेजवल वचन दिल्हे आहे. तुम्ही कोण्हेविसीं संशय न धरणें.

—पे. द. ४० पृ. २५

उजरून लिहिणें—उघडून उलगडून लिहिणें.

हिशोब देऊन पाठविणें म्हणोन लिहिलें, त्यास कोणकोणतें हिशोब देऊन पाठवावे ऐसें उजरून लिहिलें नाहीं. —ऐ. ले. सं. ८४८

उजरें (राहणें किंवा होणें)—उजळमाथ्यानें, उघडपणें.

भेंड्यानें वही केली वाऱ्यानें उडोन गेली तदन्याये मिर्ध्यांनें तकलुपी कोट सिद्ध केला आहे. आणि आम्ही तेथें जाऊन उजरें रहावे, बरे वाईट म्हणावे, ते सारे जन आम्हास हासेल, याजकरितां ते कार्य आमचे नव्हे. आम्ही अद्यापीवरी नजरेनें कोट नवा होत आहे तो पाहिला नाहीं.

—पे. द. ३३ पृ. १५६

उजाड—वाईट, विपरीत किंवा उनाड, अविश्वसनीय, उझड, नादान, विशेष अर्थ नसलेली.

त्यास सप्तरुसीची राजकारणें येथे उजाड येतात. —पे. द.

उजागरा—जाग्रण.

श्रीमंताचे दर्शन जाले. रात्रौ गोकुलअष्टमी जन्मकालसमई कीर्तनास स्वारी गेल्याचे उजागऱ्यामुळे स्नान जाले नव्हते.

—शा. द. वे. पृ. ८५

उजागरी, उजागिरी—मोकळीक, उजळमाथ्यानें कांहीं गोष्ट करण्याची पात्रता किंवा स्वतंत्रता.

बोलल्याप्रमाणेंच बेत घडावा. मध्यस्तास पुढें बोलावयास उजागिरी असावी हे उत्तम.

—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. ७२

साहेबाची आज्ञापत्रें असल्यानंतर त्यासी बोलावयास आम्हास उजागरी होईल.

—E. M. P. पृ. १०९

ईश्वर विघाड करून आमची उजागरी करील तर उत्तम आहे, म्हणोन हे इच्छा करितात.

—पे. द. भा. १ पत्र नं. ८१

वसई कल्याण वगैरे जागा साष्टीसुद्धां सोडून द्याव्या म्हणजे मग तुम्हाकडील सलुखाचे बोलणें आम्हीं सरकारांत बोलूं. तोपर्यंत आम्हास तुम्हाकडील गोष्ट सरकारांत बोलण्याची उजागरी नाही.

—म. शि. यां. का. पृ. १९५

उजू—हातपाय धुणें.

उजू तवाजू—नमाज, प्रार्थना.

—भा. व.

उजूतवाजू करणें किंवा ठेवणें—१ प्रार्थना, २ समाचार, मानमर्यादा, बडदास्त ठेवणें.

मालोजी घोरपडे पाडाव करून आणिले. फत्तेसिगानें घोरपड्यांची उजू तवाजू उत्तम प्रकारची ठेवून जखमांचा जाबता (निगा) करून वस्त्रें देऊन रवाना केलें.

—हो. कै. पृ. १५८

उजूनमाज—प्रार्थना.

यांजबद्दल पाच वख्त उजूनमाज करून इलाही नजीक रावसाहेबांचे हक्कांमध्ये (संबंधी, बाबतींत) दुवा याद करीत आहो.

—रा. खं. १ पृ. १३

उजूम—प्रतिष्ठा, थोरवी, अब्रू.

आपल्या मवकलाचा उजूम ठेविला पाहिजें. यास्तव माहाराव पुरुषोत्तमपंताची मोहर हाजर आहे.

—हिं. द. खंड २ पृ. २४

उजूर—उपसर्ग.

तरी आज्ञेप्रमाणें आपला कौल पाठविला आहे. आमचे तर्फेनें स्वामीच्या गांवास कांहीं उजूर लागणार नाहीं.

—रा. खं. ३ पृ. ७६

उजूर—अपेक्षा.

गुरुनाथपंत वगैरे सर्वांस पाहरेंत ठेविले आहेत. दुर्गास पाठवणार होते. परंतु पट्टणाहून दुसरे परवाना यावयाचे उजूर करून ठेविलें आहे.

—ऐ. ले. सं. ३९८१

चिकोडी जाती यांत संदेह नाहीं. वडीली सरकार-सनदेचा मात्र उजूर करावा.

—ऐ. ले. सं. ६६५०

उजूर ठेवणें—निमित्ताची सोय करून ठेवणें.

तूर्त इलाज नाहीं असें पाहून निकाल काढला आहे. पुढां आणखी पुरंदरास उजूर ठेविला आहे. —ऐ. ले. सं. २३६०

उजूहात—वजा करावयास योग्य अशा गोष्टी.

उझ्म—इरादा, हेतू.

उझड—वेडगळ, अक्षरशत्रू, विदूषक.

हा पोर (सुजाउद्दौवला) वदमस्त गुमराई ! व दौलत व फौज, थोर थोर मनसुवा राखायाची माणसे आनीक (निराळीच) असताती ! जो अर्थ स्वामीच्या चित्तांत आहे त्यालायक हा नाही, व इस्माइलखान अक्षरशत्रू व उझड यैसा प्रकार झाला आहे. —हिं. दे. भा. २ पृ. ९६

उठवण—तोटा, आपत्ति, चणचण.

कुंजपुरा लुटून दरोबस्त फस्त केला. द्रव्याची लष्करांत महामुरी (समृद्धि) जाहाली. तेव्हा तीन शेर धान्य मिळो लागले. खाण्यापिण्याची वगैरे सरंजामाची उठवण मोडली. —पाणि. बख. पृ. १५

उठाण—वळवळ, दंगा.

स्वामी रायगडी असतां ताम्रांनीं संकट केले म्हणून स्वार होऊन पन्हाळीयास आले ते प्रसंगी ताम्राचे उठाण विशेष देखोन तुम्हास या प्रांतीच्या राज्यरक्षणास ठेवून आपण स्वार होऊन कर्नाटक प्रांतीं गेले.

—मा. स. प. मा. पृ. १८८

उठाव—हकालपट्टी.

कुमकेचा विचार घडल्यास रास्ते यांचा उठाव करितील.

—ऐ. ले. सं. ६०२४

उडकी—पाट (विधवा-पुनर्विवाह).

लग्न व पाटदाम रयतांचे घरीं जाहल्यास दर लग्नास व पाटास.

लग्नास	उडकीस
३ उत्तम असामीस	१
२ माफक (मध्यम असामीस)	।।।
१ कनिष्ठ असामीस	।।
—	—
६	२।

येणे प्रो। घेतलें जाईल. —पे. सा. पृ. २७२

उडणें, उढणें—अंगावर धाऊन जाणें.

साऊ पाटील मोकदम त्याचा फर्जंद धाराजी, तों‌हरजी सितोले मुतालिक

देसमुख त्यापासून द्वाही देत असतां उढोन जिवे मारला.
—शि. च. सा. खं. २ पृ. ११६

उडतें वेतन—चवरी किंवा रुमाल उडवून घेण्याच्या मानाबद्दल सरकारांतून मिळणारें वेतन.

३०० रुपये गोविंद बाबूराव, भिकाजी केशव यांचे नातू. त्यास भिकाजी केशव यास उडतें वेतन पावावयाची नेमणक आहे; त्यास मशारनिले मृत्य पावले. सबब याचें नांवे आसामी छ १ जिल्हेज सन सबा समानिनापासून.
--पे. द. भाग ४५ पत्र नं. ६५

उडदा बेगम—लढाऊ स्त्रीशिपाई.

वरकड बायका दबावल्या. त्यामध्यें उडदाबेगमी वीस पंचवीस याणी गुरगुज घेऊन या लोकांवर चालून येऊन मारीत चालल्या. तेव्हा राजे याच्या (शिवाजी) लोकांनी उडदा बेगमा पांचसात मारिल्या व त्याही दबावून राखिल्या.
--म. द. रु. १ पृ. ४३

उडदी--वर्दी किंवा ताकीद.

तों यांनीं महालांत गावगन्ना द्वाही घराघरात उड्या फिरविल्या होत्या की जो गुलाम कादर दाखवून देईल त्याजला पांच हजाराची जागीर देऊन वादीष केली जाईल.
--हो. कै. पृ. ९९

उडाफी—उर्मट.

उत्तर आलें जे, फौजेस खर्चास नाहीं. स्वार कांहीं आमचें ऐकत नाहींत. असें उडाफी जावसाल लिहिले आहे.
--ऐ. ले. सं. ५९८९

उडुकदुडूक—उडत उडत, अव्यवस्थित.

आणखी कोणापाशी गावांत वंशावली असतील त्याचा शोध करून वंशावल लेहून घेणे. तजविजेने लेहून घेणे. आम्ही उडुकदुडूक लेहून दिल्हे आहे ते कोणास न दाखविणें.
—पुरं. द. भा. ३ पृ. १७८

उणाखट—हलका (भारी नव्हे असा) हलक्या किमतीचा.

त्यास बंगाल्यापैकी रेशमी जिन्नस उणाखट, तापते, मुगटे, गुदर कच्चे रेशीम बहुत करून येत असते. सफेद कापडाचा जिन्नस थोडा थोडा येतो
—नाग १ पृ. २०५

उत्क्रांत धेनु—मृत्युकाळीं करावयाचें एक दान.

अवतरणासाठी मोक्षधेनु पाहा.
—हो. कै. पृ. ११९

उत्तरे निरोत्तरे—उत्तरप्रत्युत्तर.

तसें तात्यास माहित करून त्याजकडूनच उत्तरें निरोत्तरे करवीत जाणें.
—ऐ. सं. सा. खं. ३ पृ. ८

उत्पन्नता—उत्पत्ति; उपटणें.

व्यथेची वेळा उत्पन्न होण्याची, निरास होण्याची नियमित नाहीं. कोणत्या वेळेस उत्पन्नता होईल व कोण कालपर्यंत श्रम देईल कसे, याचाही अनुमान होत नाही. —नाग २ पृ. १०

उत्तम गत करणें—सद्गति पावण्यासाठीं विधिपूर्वक दहनादि उत्तरकार्य करणें.

माझा काळ समीप आला तरी तुम्ही माझी उत्तम गत करणें आणि माझें वतन मौजे मुर्डी येथे महाजनकीचे आहे त्याचा उपभोग तुम्ही करणें. —पेंडसे कु. वृ. पृ. ३१

उत्तरवादी—प्रतिवादी.

उत्बह—उंबरठा.

उत्सव—उत्साह, आनंद.

कां कीं, सर्वप्रकारें आपणांस भाऊंच्या कल्याणाचा उत्सव. —ऐ. ले. सं. ५६२५

उतफती—उत्पाती, दगेखोर, पेंढारा.

श्रीमंत लांब आहेत. यास्तव पटवर्धनास धुडावून द्यावें या मतलबें हैदरखान लांब आला तों रावसाहेबांकडील लोकांनीं उतफती कांटेगारीस उठले. राउता राऊतांची मिठी जाहली. तिकडील एक घोडी पाडाव करून आणली. —ऐ. ले. सं. ८०५

उतरवा—उत्तरवा, उत्तरेचा वारा.

आरमार गुराबा रत्नागिरीस आले आहेत. उत्तरवा वारा फार, याकरितां वरत्या येत नाहीं. दो चौरोजी दक्षणवा सुटला म्हणजे गुराबा जयगडास आणून, जलमार्गें अंजनवेलीच्या नस्तावर येऊन, भांडियाची सारगिरी करितील. —पे. द. ३३ पृ. १५३

उतराई होणें—मोकळें होणें किंवा जबाबदारींतून मुक्त होणें. उत्तीर्ण होणें.

आपले चित्तास येईल तें अतःपर करावें आम्हा लेहून उतराई व्हावे हेंच आम्हास उचित. आपले उचितास येईल ते करावें. —पे. द. ३३ पृ. १८

उतराण वारा—उत्तर दिशेकडून वाहणारा वारा.

इंग्रजांचे चार पाल विजयदुर्गाचे नस्तावरी दोन कोसांचे तफावतीनें आठ दिवस होते. वारासुद्धां न लागे. उतराण वारा. मुंबईकडे जाणें न होय. यास्तव दुर्गानजिक आठ दिवस होते. त्यामुळे सर्व कोकणपट्टी गडबडली. दाणादुणा मातीआड केला. —ऐ. ले सं. २६६७

सातवें दिवशी वादल उतराण बहुत यास्तव आगवताच्या नस्तावर आहे. —पे. द. भा. १६ पृ, ११८

उताऱ्या—तरीवाला. खाड्या किंवा नद्यांवर तरींतून उतारूंचीं होडींतून ने-आण करणारा.

उतार (राहणें), उतार (मोडणें)—राबता बंद असणें; जाऊन भेटण्याची सुगमता नसणें.

माने याची शरीरप्रकृती अद्याप ठीक नाही भ्रमिस्त कारभार जाला. आता बोलावे येक, घटिकाभरा बोलावे येक, स्मरणांत गोष्ट राहात नाही अशाश्वती आणि उतार राहिला नाहीं अशी गोष्ट आहे.

अलीकडील मुख्याचा उतार मोडला परंतु नेहमी सूचनस असता आपले-विशी अंतःकरणापासून आहेत.

—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. ६२

उताराखालीं पडणें—कमी होऊं लागणें; हटणें.

श्रीकृपेनें व्यथा उताराखालीं पडली. चार दिवस अलीकडे पलीकडे बरी होईल,

—ऐ. ले. सं. ८३७

उतारी—उतारू; प्रवासी. विशेषतः गलबतांतून प्रवास करणाऱ्यांना हा शब्द लावतात.

उतावली—(क्रि. वि.) उतावळी करून.

शुक्रवारी नबाबाचें कूच जाले उतावली नदीवर गेले. मजल दरमजल हस्तनापुरास जातात.

—पे. द. १५ पृ. २२

उथळपाथळ—थोडाथोडा; विरळ विरळ.

अजमपूर तरीकिऱ्याचें गांव मारून आणीत आहों. दाणा उथळपाथळ मिळतो.

—ऐ. ले. सं. १५१९

उद्येस—उद्देश, उद्योग, इच्छा.

यानी आम्हासी भेटीचा उद्येस करीत होते व चिरंजीव अप्पास डेरियास बोलावूं पाठविले होतें.

—पे. द. १५ पृ, ४९

उद्वर्तन—सुटका, ताटातूट, फाटाफूट.

राजश्रीचे आईसाहेबापासून उद्वर्तन जाले. यास मूळ पुराणिक भिवजी की आणखी कोणाचे कसे होते हे सविस्तर लेहून पाठविणें.

—पुरं. द. भाग १ पृ. २०२

उद्वोग—उद्योग, स्वारी, आवाडाव.

ममईस व कल्याणास इंग्रजाचा जंगी सरंजाम मातबर तयार होतो. भाद्रपद मासीच ते इकडे उद्वोग करणार यैसे वर्तमान आहे.

—पुणें अखबार भाग १ पृ. १७९

उदईक—उदक घालून दिलेलें दान.

अकलेकर २५, परंचेकर २५, व दुसरे १० येणेंप्रमाणें ६० रुपये उदईक

घातले, ते तुम्ही वसूल घेऊन पोतापैकीं ६० रुपये आम्हांस पावणें म्हणून स्वामींची आज्ञा त्याप्रमाणें पाठविले असत.

—ब्र. च. पृ. ३५

उदक—उदकदत्त जमीन.

या दिवसांत कितेक इनाम व उदक माधोसिंगजीही दिधले होते ते सर्व दिवाणजीनी खालसा केला. —हिंगणें द. भाग २ पृ. ३०

उदकदत्त—विधिपूर्वक पाणी सोडून केलेलें दान.

नानाबाबत उदकदत्त ३॥ हजार रुपये येणें आहेत. त्यास बहुत दिवस जाहले तर द्यावे. —पे. द. १८ पृ. १३

उदघाट—उपक्रम; सुरवात.

यंदा सारेच गोष्टीचा उदघाट चिरंजीव बाजीराऊ उत्तरप्रांती गेले असता करावयाचा नव्हता. परंतु घडोन आलिया गोष्टीस, हल्ली होये नव्हे म्हणावे, यैसे काय आहे ? —पे. द. ३३ पृ. ३२७

उदंड—फार, पुष्कळ.

हल्ली फौजेचें प्रयोजन आहेसे नाहीं. चाळीस-पन्नास राऊत असल्यास उदंड आहेत. —पे. द. १७ पृ. ६१

उदास करणें—उदासीनता स्वीकारणें; अंगाबाहेर टाकणें.

हरकसें पांच हजार होन कर्ज देवावें. आजीचे प्रसंगीं संकट समजोन लिहिलें आहे. उदास न करितां सदरहू ऐवजाचो तरतूद करून द्यावी.

—ऐ. ले. सं. ४१८७

उदास जाबसाल करणें किंवा **जाबसाल उदास करणें**—शुष्क उत्तर देणें.

केवळ जवलील मात्र संभाळून करावे आपले तर्फेनें उदास जाबसाल करावा, पैका येकंदर देऊं नये.

—ऐ. सं. सा. खंड ७ पृ. १९

उदासता करणें—उदासीनता करणें.

अंगाबाहेर टाकणें.

त्यास आपल्यास सांगणार आमचे अमित्र सातारा बहुत आहेत. त्याजमुले आपण उदासता केली आहे. —पे. द. ११ पृ. ४६

उदासमातगा—बेदरकार, उद्धट, उदासीन, अनास्थेखोर.

विचारे करून पाहता येथील कारभार उदासमातगा आहे. मर्जीस येईल तर राजे विठ्ठलदास यास ममतापुरस्सर येक आज्ञापत्र समाधानाचे सादर करणार स्वामी समर्थ आहेत. —पे. द. २० पृ. १३२

उदासी—उदासीनता.

मग दादासाहेब कुंभेरीच्या जाटाचा मेळ करावा (समेट, तह) अशा

भावे सुभेदाराशी बोलूं लागले तेव्हा याणी उदासीच्या भावे उत्तर केले, 'आपण धनी व शिंदे मुकत्यार सरदार, चांगले तेंच कराल! आम्ही शिलेदार. सांगाल ती चाकरी करूं' —हो. कै. पृ. १९

उदी—:पिराजवळ ऊद जाळून त्याचा अंगारा प्रसादार्थ घेतात तो. (बेल भंडार, गंगाजळ, देवावरील तुळशी फुलें व गीता हीं हिंदूलोक व उदी किंवा कुराण हीं मुसलमान लोक, आणप्रमाण करतांना परस्परास देत असत.)

बापू होळकर व जिवबादादा यांच्या भेटी होऊन यादीबुदी ठरून याचा बेलभंडार त्यांची (शिंद्याची) उदी (कारण महादजीचा गुरु मुसलमान होता) अशी परस्परें सलामाई जाली. —हो. कै. पृ. ११५

येणें प्रमाणें चालवूं. अंतर करणार नाहीं. येविशीं साहेबांची उदी व बेल भंडार व पाटीलबावांची पायांची शपथ असे.

—ऐ. ले. सं. ५०१४

येविसीं शफतपूर्वक खातर-जमेचे पत्र व पत्रांत कुलदेवतेची शफत लेहून पाठवावी व उदी पाठवावी. आम्हींही पाहिजे तैसी खातरजमा करूं

—पे. द. भा. ३१ पृ. १३५

उदीवर हात ठेवणें—उदीची शपथ घेणें; उदीला स्पर्श करून शपथ घेणें. पिराजवळ ऊद जाळून त्याचा आंगारा प्रसादरूपें घेतात ती उदी होय. कोणी लीहिणारानीं लिहीले तरी हे तुफान आहे. तुमचा विश्वास साहेबाचे ठायी आहे. त्याची उदीवर हात आम्ही ठेवितो. मग तरी तुमची खातरजमा होती की नाहीं?

—ऐ. ले. पा. म्यु प्र. पृ. ७३

उदुलहुकुम—आज्ञाभंग, हुकमाची अवज्ञा.

निर्मलकरास ताकीद जाहालिया (तो) उदुलहुकुम करणार नाही.

—पुणें अखबार भाग १ पृ. ११२

उदेग—उद्योग, खटपट.

पुढेहि दिनप्रतीनें राजश्री प्रतिनिधी ये गोस्टीचा उदेग करितात.

—पे. द. १० पृ. ८३

येथेच यावयाचा निश्चय जाला तरी उत्तर पाठवावे. यावयाचा उदेग करावा. साहित्य येथानशक्त्या होणें ते होईल.

—वै. ४ स. १७४२ पृ. ४

उदेला—उद्याला, उदईक, उद्यां.

महाराज बोरीचे झाडाखाली होते. मर्जी प्रसन्न होती. गोष्टी चालल्या

उदेला रंगाचा समारंभ करण्याचा. तेव्हा म्हणू लागले ठीक आहे. बेत राखावा, नवे हवेलीत करावे. —शा. द. वे. पृ. २५

उधार-उद्धार—Reference, अवतरण, उल्लेख.

सदा असता धर्मगददास व करीमबेग याची पत्रें करून घेतली आहेत. त्यास हाजी शफीरखान याचे सनदेचा उधार आहे. वरकडांचे पत्राचा उल्लेख कां नाहीं म्हणतात. —पे. द. ३१ पृ. १२७

उन्चह— जे कांहीं.

उन्नत—उद्धत, मगरुर.

तमाम अमीर राजे रजवाडे जाट यांनी मुलूख आटोपून अति उन्नत जाले. त्यास शिक्षा करून पैका मातबर घ्यावा.

—ऐ. सं. सा. खंड ७ पृ. ४३

उप्रांत—उपरांत, त्यानंतर.

बारदीखान यासी युद्ध-प्रसंग करून उप्रांत छावणी करून राहिले होते.

—वै. ४ स. १७४३ पृ. १८

उपईंद्र—उपेंद्र, उत्पन्न, प्राप्ति.

घरठाण व इनामजमिनीची याद तपशीलवार दिली असे. सदरहू प्रमाणे मान पान व हक्कलवाजीमे व इनाम व घरठाणे व मिराशीचे मळे वगैरे उपईंद्र काळी व पांढरीचे आपापल्या तक्षिमे प्रमाणें खाणें.

—धा. प. इ. सा. ३ पृ. ५०

उपजीविका—प्राप्ति, लाभ.

आजीपर्यंत श्रमसाहास केले; त्याचे कलशारोपण हेंच कीं समूळ शामल उपडून टाकावा. हें गोष्ट नव्हे तेव्हां अवघेच व्यर्थ. व आमच्या मनसबीयाची उपजीविकाहि हेच ! —पे. द. ३ पृ. ५५

उपतिष्ठणें—फळास येणें, मान्य होणें, रुचणें.

दौलतींतील माणूस, गणनीय, मरातब्यास आले, ते नादान (क्षुल्लक) गोष्टीवर माणसाचा आब घ्यावा ही गोष्ट कोठील ? माणूस करण्यास लाखो रुपये त्याचे हातून बिघडवावे लागतात तेव्हा माणुसकी येती. या भावी बहुत परिश्रम केला, परंतु उपतिष्ठला नाहीं.

—हो. कै. पृ. ३९

त्याच्या साहयतेस त्यांच्या बुद्धि, युक्ति, सर्वहि तुम्हास उपतिष्ठोन त्यापासोन शहाणे जाले आहां. —इ. सं. तं. रा. घ. पृ. ४३

उपनांव—अधिकार, पदवी, दरक.

माहाराजानीं कृपालु होऊन सेवकास सेनापती हें पद येथास्थित देऊन गौरविलें. त्याप्राा स्वामीचे प्रतापे सेवाहि यथाशक्ति करून दाखविली. जैसे

तैसे सा महिन होत पुढें राजश्री फत्तेसिंग भोसले याजवर कृपाळु होऊन सरंजाम त्यास, उपनांव सेनापती सेवकास दिल्ही. त्या उपनांवाचें आश्रयावर माहाराजाचे पुण्यें जे आले तें केलें. त्याजउपर सेनापतीस सरंजाम कांहीं तरी असावा यैसे माहाराजाचेच चित्तांत आले, ते समई थोडासा दिल्हा तो मारनिलेकडील अमलांत दिल्हा. —पे. द. १२ पृ. ४.

उपप्लव—संकट, अरिष्ट.

दादासाहेबांस विचार पडला कीं दुसऱ्याचे घर घेऊ जाता (होळकराचे) तो प्राण जाय तोपर्यंत कस्त चुकणार नाहीं. यांचे घरावर (आम्ही) उपप्लव (करणार) तेव्हा यानी (परस्पर) पुण्यास लिहून उत्तरे आणलीच असतील. आशादुराशा धरून आगळिक केल्यास, साधल्यास (साधलें तरी) लौकिक नाही. —हो. कै. पृ. ४६

उपबल—पाठबळ.

उपबल त्यास हिंमतबहाद्दर अनुपगीर गोसावी याचें आहे. —म. शि. यां. का. पृ. ४२८

उपमा देऊन लिहिणें (एखाद्यावर)—नांवें ठेऊन लिहिणें

एक पत्राचें उत्तर गेलें नाहीं तों आम्हांवर कित्येक उपमा देऊन लिहिलें आम्ही सेवक लोक चुकलों तर आपण धणी. क्षमा करीत असावें. —ऐ. ले. सं. १५७०

उपर—आक्षेप.

चाकरी केली असतां सरकारचें एक पत्रहि न आलें, तीहि गोष्ट एकीकडे राहून हाच उपर लिहिला ते पक्षीं दैवाची गोष्ट ! —ऐ. ले. सं. ४६६५

उपर—बोलबाला, कीर्ति, जोरा, वरचष्मा, शह, दबाव, सरशी, जय.

१ त्यांच्या चित्तांत संशय नाहीं. निखालस आहेत. पत्र जातांच आले, असा आपलाच उपर होईल, करितां ताबडतोब यावें. —ऐ. ले. सं. १९९४

२ राजश्री पंतप्रधान याचा उपर दाखऊन माणसें घेऊन जावी हे गोष्ट काये आहे ? —पे. द. २३ पृ. ३०६

३ स्वामींच्या फौजेचा उपर आहे. पण त्यांस सामान आहे ते सर्व जाया जाले आहे. दुसरे सामान पाठविलीयानें सेवकापासून सेवा होऊन येईल. —पे. द. ३३ पृ. १४६.

४ जे गोष्टीनी सर्वांवर आपला उपर आहे तेच गोष्ट आम्ही करूं. —पे. द. ३३ पृ. ३६

५ आपले वचनाची प्रामाणिकता ठेवून जागीर दिल्यास उपर त्याजवर राहील. —म. शि. यां. का. पृ. ४०७

६ जन्मात रा. अंबाजीपंततात्याचा कारभार दरबारी नव्हता तो त्याचाच उत्कर्ष जाला! ईश्वरे कृपेंकरून तुम्ही सावुत असल्यास आपला उपर राखाल. —चं चू द. पृ. १३८

७ तेथील मारवाड्यांचें मोर्चे कापून काहाडलें असतां मारवाड्यावर सहजात जरब बसोन कृष्णगडवाले याचा वेध तुटेल. त्याचा उपरा जाल्यास ते बहुत उपयोगी पडतील. —म. द. रु. ३ पृ. ५८

हल्ली बारा वर्षे धामधुमीकरिता गांव टाकून उपर चाकरी करीत असो व जीनचे लस्कर उतरले तेव्हांही डेऱ्यामध्ये चाकरीस होतो. —दस. शि. मो. इ. पृ. ३६

उपर करणें—उपराळा; मदत करणें.

याजकरितां नजीबखान यांनीं जाटाकडील मनसुबा सोडून सिखाकडे जाऊन पैगाम लाऊन अकरा लक्ष रूपये मामलीतीचे ठरावून सला-मामला करून उपद्रव मिटविला. सीख माघारे गेले. जाटाचा उपर सिखानी बहुत केला मुलुक वाचविला. —पे. द. भाग २९ पत्र नं. ५५,

उपर करून दाखविणें—श्रेष्ठता स्थापून दाखविणें.

नासरजंग याचा पुत्र शहरी आहे. त्याचा उपर करून दाखवावा दुसरीयांसी दाखलगिरी या प्रांती न होय ते करावे यैसा मनोदय आहे. —पे. द. २० पृ. ६१.

उपर चढणें (एखाद्याचा)—एखाद्यास बोलावयास जागा किंवा निमित्त होणें.

आपण आहेत तेथेंच असावें. येणेंकरून टिपूस बोलावयास जागा आहे. त्याचा उपर चढावयाचा नाहीं. याचकरितां त्याचे प्रांतास वगैरे कोणेविशीं आपले कडील फोजेचा उपद्रव न लागेल असें करावें. —ऐ. ले. सं. ३९२३

उपर ठेवणें--उबर ठेवणें—१ वरचष्मा राखणें; २ आस्था, अगत्य राखणें.

गपचुपाची घोडी पुरंदरे यानी जबरदस्तीने नेली आहे. देत नाहीत यास्तव कर्णोल कलूस याजला मजकूर माहीत करून. त्याजकडील नेटाने घोडी सुटे ते करून गपचूप याजकडील हरयेक कामाविसी उपर ठेवीत जाणे. —हो. इ. सा. प. खं. १ पृ, १४७

उपर येणें—१ किनाऱ्याकडे, २ उत्तरदिशेकडे.

सुवर्ण दुर्गानजीक फिरंगींयाची १७ गलबते पाणी भरावयास लागली होती, पाणी भरून उपर आली. —पे. द. १६ पृ. १३

उपराळा—खोटा आरोप, निंदा नालस्ती. (विल्सन)

उपराळें करणें--धाड आणणें, घालणें.

निंबाळकरास आमचे वडील अनुकूल न झालेबद्दल निंबालकरानीं आकस धरिला. वतनी सुभे अम्मल व पालखीचा गांव वगैरे पांच पुस्त चालत असता त्यांस व्यत्यय आणोन वहिवाटूं लागले आणि घर वगैरे जिदंगीवर उपराले केले.

--पे. द. ४४ पृ. १४

उपरोध—कपट, कृत्रिम.

वरकडापेक्षां आपणांस तर अधिक मेहनत केली पाहिजे. कारण कीं, वरकडाप्रमाणें आपण नाहीं. वरकडांचे जागा आम्ही उपरोध करतों. तेही उपरोध करून करितात. त्याप्रमाणें आपले जागा प्रकार, आम्हीं उपरोधच करीत नसतां, कालचें आपलें उत्तर ठीक न झालें!

--ऐ. ले. सं. १७६४

उपरोधिक--उपरी अधिक-यापेक्षां अधिक.

पुढेंहि सर्वप्रकारे आश्रा आपलाच आहे. उपरोधिक ल्याहावेसें नाही.

—पे. द. भाग २९ पत्र नं. २३७

उल्हाणा देणें (एखाद्यावर)—टोमणा देणें; दोष देणें.

आणि सेवकावरीहि पाटीलबावा उल्हाणा वारंवार देतात की तुम्ही मध्यस्ती करून दोन लक्ष रुपये देविलेत आणि फौज तर अद्याप चाकरीस गेली नाहीं.

—म. शि. यां. का. पृ. ८३१

उपल—झरा, झिरपा, उमाळा.

उपश्रुत—वर्तमान, बातमी, बोलवा.

सरकारआज्ञेप्रमाणें इंग्रजांबरोबर न गेले त्यांचो पूर्णाहुती अर्थानिशीं प्राणानिशी होणार याप्रमाणें उपश्रुत निघाली, तीं लिहीली आहे. उपश्रुत पक्की आहे बाजारी नव्हे.

—ऐ. ले. सं. ७९३०

उपस्वर्ग—उपसर्ग.

गोत्रपुरुष यांसी कजिया करतील अगर उपस्वर्ग लावतील तरी यासी उपस्वर्ग करावयासी गरज नाहीं.

—पे. द. ३१ पृ. ३६

उपसंहार—पारिपत्य, नाश.

तालुक्यांत राऊत जाऊन उपद्रव केले. त्यांचा उपसंहार करोन मग कूच करणार.

—ऐ. ले. सं. ६४२९

उपसारा—सामानसुमान, अडगळ वगैरे.

गंगेच्या काठीं येकादी खाली जमीन दिधल्या बाग व गवत लाकूडफाटे यास उपसाऱ्यास जागा करू.

—पेठे दप्तर भाग १ पृ. ८

उपसाहित्य—लागलागवड, अवांतर किरकोळ लागणारें सामान.

पिलाजी जाधव यास पाबळामध्यें कैद करून ठेवले होते. तेथें दररोज

येक बकरें यास देविले होते. त्याप्रमाणें येथेंहि पाहिजे. याकरितां आणविली आहेत. त्याचे उपसाहित्ये देखील द्यावे लागते.

—पे. द. १७. पृ. ४

शिवराम पंडित अमात्याचे स्त्रीस धोमास श्रीच्या सेवेकरिता रवाना केलीं आहेत तरी त्यांचे सर्व प्रकारें साहित्य शाकभाजी गवतफाटें, उपसाहित्य लागेल तें देणें. —शाहू. रोज. पृ. २२८

उपांगललिता—ललितापंचमी. अश्विन शु॥ ५स पूजन करावयाची एक देवता.

बाळंभट तिमाजीपंत याचे घरास आले तो त्याचे घरी उपांग-ललीता होती. —ऐ. सं. सा. खं. ४ पृ. ६८

उपाधी—निकाल किंवा पारिपत्य.

कमरधीखान व कित्येक मोंगल याचे आप्त दिल्लीकडून बोलाऊन येकदा उपाधी बरे प्रकारे करावी या विचारात आहेत. —पे. द. १० पृ. २३

उपाधिक—उपाध्यक, उपाध्येपणाची वृत्ति किंवा वतन.

त्यावरून कलहवृद्धि होऊन उपाधिक तुम्ही अमानत ठेवले ते येक वर्ष अमानतच राहिले. —पेठे दप्तर भाग २ पृ. ३

उपार्जना करणें—द्रव्य खंडणी किंवा खर्चास देणें.

येणें करून सुज्जाअतदौला व पातशहा व रोहिले तुमची उपार्जना करीतील. कराराप्रमाणें जाट पैका देईल. —ऐ. सं. सा. खंड. ७ पृष्ठ ४५

उपाव जाणें—उधळून जाणें, उपाई जाणें.

बोडके याचे लढाईंत घोडीं ठार पडलीं व भले लोक जखमी झाले त्यांचीं घोडीं गेलीं. नाथाजी लोणार यासी जखमा लागून घोडी बोर उपाव गेली. —ऐ. ले. सं. ८१९०

उपासपारणी—धरणी-पारणी.

ते आपण मिळोन अवघे अजीवर गुदराण उपासपारणी करून (उपाशीपोटी) आपला मार्ग लक्षीत आहोत. —पे. द. १३ पृ. १२

उपेद्र—उत्पन्न.

त्यास त्याचे वडिली कांहीं दिवस वृत्ति अनभवली आहे त्यामुळे वृत्तीचे उपेद्र त्यास पावले आहे, तें सदरहू पैवयामध्यें मजुरा देणें.

—इ. सं. जु. ऐ. गो. पृ. १५

दरोबस्त मुलकाची वांटणी करून आमचे हिश्शाचा मुलुख आमचेकडे द्यावा. सरकारांतून ठरावांत येईल तेथपावेतो आमचे हिश्शाचे मुलकाचे उपेद्र येईल ते सिंदे याजकडे सरकारआज्ञेने देऊ. परंतु मुलकांत अंमल आमचा असावा.

—हिं. द. खंड २ पृष्ठ ८३

उफ्ताद—पडला (उफ्तादन).

उफ्तादह्—पडून.

उफजणें—उतणें.

सिरेवर बिबवा घातला. गुण तरी आला नाहीं. परंतु उफजून दुःख अधिक जाले. —नाग. १ पृ. २६७

उफाडाचे बल—जोराचें, आवेगाचें, शक्तीचें बल.

खान जानवाचे व खासियाचे उफाडाचें बल कललेच आहे !

—पुरं. द. भाग १ पृ. २१०

उबर—अब्रू, प्रतिष्ठा, वजन, उबार.

जे माणूस परनिष्ठ बोलणार त्यास दापादापी करीत आपणासारखी गोही देणे म्हणोन. गोही द्याना म्हणजे राजश्री साहेब व सरकारकून तुमचा उबर राखणार नाहींत, म्हणोन दबावीत.

—पुरं. द. भाग ३ पृ. १३७

गई कराल तरी उत्तम नाहीं तुमची उबर राहणार नाहीं, हें जाणून वर्तणूक करणें. —पे. द. भा. ३३ पृ. २१३

उबहतमंझीलत—वैभवसंपन्न. —रा. खं. ७ पृ. १७२

उबार—विश्वास.

स्वामीनीं आज्ञापत्रीं लेखन केलें होते कीं, याजपासीं बोलावयास कोन्हाचा उबार न धरणें. तरी आज्ञेप्रमाणें वर्तणूक जाहली.

—पे. द. २६ पृ. २०६

उबार—अब्रू, प्रतिष्ठा.

नवाब आपणास छावणी करूं देत नाहीं तेव्हां सर्व प्रकारें आपला वकर गेला ! आतां येकच गोष्ट आहे कीं नवाबास भेटोन माघारे जावे. याजमध्यें कितेका गोष्टीनें आपला उबार राहेल.

—पे. द. २५ पृ. ६९

खासगीच्या महालात उपद्रव दिला म्हणजे तुमचा उबार राहणार नाहीं.

—पे. द. २० पृ. १०

उबूर—तरून जाणें.

उभीउभी—उभ्याउभ्या; सहज, तेथल्या तेथें, सक्तीनें, निकडीनें.

जिल्हेदारांनीं तेलाचे खरेदीबद्दल पलसीकरावर रु. २५ मसाला करून चिमणगावच्या ठाण्यांत नेऊन उभीउभी सेंभर रुपये घेतले.

—पे. द. २० पृ. ७७

उभी पट्टी—नेहमीच्या ठराविक वसुलाखेरीज अधिक वसूल करण्याकरितां बसविलेली पट्टी किंवा कर. (विलसन)

उभे धावेनें—दौडतां दौडतां, विसावा न घेतां.

केवळ उभे धावेने चार महाल आलियानें शत्रुचें पारपत्य जाहलें ऐसें नाहीं. दोन महिनेपर्यंत मुलखात राहून बंदर किनारादेखील मुलुख मारून, दोनचार जागें हातास येत, ऐसा विचार करणें.

—रा. ८ पृ. १७९

आम्ही कन्नडेतून टाकळीतून अंतूर फुलवणी सुतोडा उभे धावेनें फेरा करून जाळून नागापूर मारिले. याकरितां बाहेर तो त्याचा अंमल बंद जाला. आम्ही अद्यापी चार पाहर कोठे राहिलो नाहीं. उभे धावेनें फेरा केला.

—पे. द. १७ पृ. ५२

उम्दह—आधार

उम्मीदवार—आशाधारी.

उम्रा—(अ) अमीर.

उमग पडणें—निकाल होणें, सवड होणें.

तेव्हां नागमंगली राहून कर्जवाम पट्टणांतून अतिसंकटे काढून आणून, चार दिवस त्यास खर्चाचा उमग पडे यैसे करूं.

— पे. द, २८ पृ. २५५

उमज—उमट, प्रकट, प्रसिद्धी.

त्यास आम्ही मराठे. उमज गुप्त काये जाणो? याजकरिता उघड ल्याहावे.

—पेठे दप्तर भाग २ पृ. २५

त्यांचें येणें घडलें पाहिजे आणि उमज तर न पडला पाहिजे. त्यास उभयतांनीं फार चांगली केली. समयास येऊन पोहचले.

—नाग १ पृ. ७६

उमजून सांगणे—नीट खोलून, खुलासेवार सांगणें.

यैसे त्यांस उमजून सांगितले तेव्हा मग पावणसें रु. मात्र प्राप्त जाले.

—चं. चू. द. पृ. १३७

उमट—प्रसिद्धि: परिस्फुटता.

परवांचे दिवशीं बातमी आली कीं हैदर स्वारीस निघणार. त्यास कालीं आजी कांहीं उमट तो पडला नाहीं. तथापि आम्ही सावधपणें आहों.

—ऐ. ले. सं. ८९३

पट्टणास जावयाची आवाई घालून हैदर सडा होऊन कोणीकडे गेला ही बातमी लागली नाहीं. उमट कोठें पडला नाहीं. माणसें बातमीस पाठवावीं तीं जिवानिशींच जातात.

—ऐ. ले. सं. १७२५

उमट खाणें—प्रगटणें.

कलघटगीकडे किंवा मिश्रीकोटाकडे येण्याच्या शत्रूच्या आवाया आहेत त्यांत जिकडे उमट खातील तिकडे आम्हीहि जाऊं.

—ऐ. ले. सं. १६७२

उमट पडणें—उमटून दिसणें, परिस्फुट होणें, प्रसिद्धि करणें, वाच्यता करणे.

हा मजकूर बाहेर फोडूं नये. वाचून पाहून बंदोबस्त राखणें तो राखावा. बातमी फुटली असतां, जो बातम्या सांगतो त्याचा उमट तेव्हांच उमटणार.

—पे. द. भाग ४१ पत्र नं १५९

तांब्राची ठाणी राजापूर प्रांते बैसिली असतां कोठे उमट पडो न देता युक्तीनें आपले जहाज व लोक समुद्रांतून येकेरीच्या राज्यांतून होनावरास पाठविलेत.

—पे. द. ३१ पृ. ५५

उमतवार—उमेदवार, जवान.

धणि महाराजाची होती गुजरीवर नजर । काय घोडा देखणा सवार उम्मतवार । हा कोठुन आला स्वार आणा हिथवर ।

—ऐ. पो. के. खं. २ पृ. १७७

उमदगी—थोरवी; मातबरी.

मगर (परंतु) तीन चार हजार लष्कराचा सरदार वजमीयत (जमावा-सह) व साहेब-हिमायत (मोठ्या वशिल्याचा) हें तर गोष्ट दिसून आली. कवडीचा मजकूर. उमदगी तर कळून चुकली. प्रतापावर दृष्ट नाहीं द्रव्यावर आसे.

—हिं. द. खंड २ पृष्ठ ३६

उमदा—राजकारणी पुरुष, सरदार.

हिंदोस्तानच्या उमद्याचें व अवदालीचें पातशाह व फिरंगी याजकडील वर्तमान लिहीले ते कळले.

—हिं. द. खंड २ पृष्ठ ५७

उमरजी—मर्जी.

त्यासी आम्ही कूच दरकूच १० कोसावर येतो. वडिलाच्या उमरजीस येईल ते करावे. परंतु आम्हास हातंचे दौडू नये.

—पे. द. २० पृ. १५९

उमली लागणे—वाजवीपेक्षां अधिक भिजून कुजावयास लागणें. लाहयावगैरे करण्याकरतां भात जोंधळे आधण घालून भिजत ठेवतात, त्याला उमलें म्हणतात. तसेच सपीट, रवा वगैरे काढण्याकरता गहू भिजत ठेवतात, त्यालाहि उमले म्हणतात.

पर्जन्यानें कांहीं बाकी ठेविली नाहीं. पिकास उमली लागोन पिकें बुडालीं.

—ऐ. ले. सं. ८३४२

उमष—उमस, विसावा, सवड. दम.

अशी दररोज लढाई चार महिनें सतत झाली ८० हजार फौजेचा मेळ असतां उमष (इंग्रजानें) खाऊ दिला नाहीं. यामुळें नानाहि फार दिक् जाले. —इ. स. हो. कै. पृ. ११

उमाट—उमाठा, टेकडी, टेकाड.

आमचे उजव्या बाजूस उमाट मोडक्या गांवाजवळ होतें तेथें शत्रूचें गोळे येतात. म्हणून सरोन पूर्वेकडे राहिले आहेत. —ऐ. ले. सं. १७८७

उमाटा, उमाठा—उंच जागा किंवा टेकाड.

त्याची चाळीस तोफ उमाट्यावर आणि हे तर बदखलीत; यामुळें फौज फार मारली गेली. —हो. कै. पृ. १५२

उमूर—खातें.

उर्जित करणें—सन्मान करणें, सत्कार, उन्नति.

तुम्ही फौज धरून कार्यभाग केलिया आम्ही तुमचे उर्जित करावयास अंतर करणार नाही. तोलदार फौज धरून अमित्र दंतभग्न करून संतोषाचे वर्तमान वरच्यावरी लिहिणें. —पे. द. ३० पृ. २२२-२३

उर्तता—उर्ता, अपेक्षा, जरुरी.

(अवतरणासाठी ' ताजा ' शब्द पहा)

—शेंदुर्णी सं. म. कागदपत्र भाग १ पृ. ६१

उर्मी—गुर्मी, गर्व.

उर्मी चित्तांत न धरणें. बहुत सावध राहत जाणें.

—पे. द. १३ पृ ३१

उर्मीकडून—उर्मीकरून-गर्व किंवा जोरेकरून.

स्वामीची फौज या प्रांतास न यावी म्हणोन बहुत उर्मीकडून उभयेता येणार आहेत. —पे. द. २८ पृ. ४९

उऱ्या करणें—वल्गना करणें, उडया मारणें, भलत्याच मागण्या करणें.

तुम्ही, आईसाहेब फारच उऱ्या करतात त्यास केला कारभार मोडून त्याचे मर्जीनें राहावे असे विचार लिहिता.

—पुरं. द. भा. १ पृ. २२२

उरकडणें—उरकणें किंवा उलगडणें.

याप्रमाणें या प्रांतीचा कार्यभाग उरकडिला. —पे. द. १५ पृ. ४

उरता—उर्ता, अपेक्षा, वांछा, इच्छा.

नाखुदा मयत जाला त्याची बायको आहे. त्यास आपले अभयेपत्राकरितां उरता धरली आहे. तरी त्यास अभयपत्र देणार स्वामी समर्थ आहेत.

—पे. द.

उरफी—जाणलेली, ज्ञात.

उरवेषी— (?)

तैनात दरमाहे होन प्रो. ३ रास केले असेत. इ॥ प्रो. वजावाटा उरवेषी प्रमाणें वजा करून बाकी बेरीज माहे दर माहे आदा करीत जाणें.

—रा. ८ पृ. २९

उरूज—महत्त्व, उत्कर्ष, वजन.

यजमानासमीप यांजपेक्षा दुसऱ्यांचा उरूज नसावा व यजमान साहेबांसमीप पोख्त सलाहकार व हिमतीचा व हौसलेदार कोण्हीच नाही. हा निश्चय त्रिवर्गाचा आहे. —पुणें अख. भाग २ पृ. १२५

उरुपुरु—रूबरू, समक्ष.

त्याचे उरुपुरु राजे निजधामास जात्येसमयी दिवाण पहाडसिंग यास बोलावून दरोबस्त राज्याचा येकत्यार दिला.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. २१४

उरूबरा—उरुबरु, सन्मुख.

रा. पाटीलबाबा यांचे पाठीवर पातशाहानी बहुत ममता-पुरस्कर हात ठेऊन आज्ञा केली की तुम्ही उरुबरा बसा. त्याजवर रा. पाटीलबावा बसले. --राजवाडे खंड १२ पृ, ३४

उरुबरु—रुबरु, समक्ष.

येथील बंदोबस्त करून उरुबरु येऊन स्वामीस विनंती करीन.

—रा. खं. ३ पृ. १२३

त्यासी त्याजकडील आपले नजरे उरुबरु चौ'रेजण ठार जाले.

—पे. द. भा. ३३ पृ. २४४

सरदार फत्तेसिंग यास जिवे मारिले आण डोचके खिजमतगारापासून उरुबरु कापविले. —पे. द. भा. २९ पत्र नं. ६०

उरुस—उत्सव.

येथेच उरुस करून आज्ञा घेऊन जातो. गुरुदर्शनास बिडास जाणें ये समयीं युक्त नाहीं. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ७६

किल्ले लोहगड येथे पीर शेख उंवरसा याजकडे तर्फ नाणे मावळ येथील या वतनी उरुसाबद्दल व चिराखीबद्दल खैरात खर्च मोठे गांवास १ रुपया व लहान गांवास ॥ रुपया व शेवसब्जी व वेहरचे जत्रेत कानूकैद याप्रमाणें मोगलाई अमलापासून वहिवाट करीत आहों. —पेशवे दफ्तर

उल्फा--शिधा (कोरडा) ; रोजचा सिधा.

मौजे सिंगणापूर का मलेवाडी पैकी पांचां अतीताचा (अतिथींचा) उल्फा वजन टक्के बंदी (तपशील) —पे. द.

उलबण—उपशम.

आपण शत्रूच्या तोंडावर सबंध आहां, म्हणून हें वेढयाचें काम नीटपणें चालतें व गडबडीचेंहि उलबण होत जातें. हिंमत धरून दांतकरकिटीनें नेट धरून आहेत. —ऐ. ले. सं. १७००

उल्हाण—भरती, पूर, कल्लोळ, उठाव, दंगा, बंड, संकट.

त्यांचे रागाचे उल्हाण कांहीं शांत होईल. तदुतर गोविंदराव याणी राजश्री स्वामीपासी येकांती विनंती करावी.

—पुरं. द. भाग १ पृ. १४०

दारुगोळी खरेदी करून ठेविली आहे उल्हाण एक गेले तर एक उभें राहते यामुळें शिबंदी वगैरे खर्च ज्याजती करणे प्राप्त आहे.

—पे. द. भा, ४१ पत्र नं. ३१

गोखलेकडील कारकून वगैरे जमाव राजमंडळकरांचे उल्हाण पाहोन जागे सोडून निघून गेले. —ऐ. ले. सं. पृ. ५७१८

यापूर्वीही कित्येक उल्हाणे जाहाली ती पुण्य-प्रतापे करून लयास गेलीं.

—पे. द. भा. २० पृ. ७४

उल्हाण पुल्हाण—उणेंदुणें (काढणें)

ये रीतीनें बहुत काही परस्परे जाबसाल उल्हाणी पुल्हाणी जाली.

—हिंगणे द. भाग २ पृ. २९

उल—ओल किंवा वोळ. जामीन म्हणून ठेवून घेतलेला मनुष्य. ओलीस ठेवून घेतलेला.

रयेतास बोलाऊन म्हणतो जे गांवास येक माणूस कुदचेरीमध्यें उल ठेवणे. (म्हणजे) ज्याचो गुरं त्यास देवितो. यैस बळकवि करितो.

—ऐ. सं. सा. खंड ६ पृ. २५

उलगाड--उजाड; पीक उपटल्यामुळें उजाड.

अगदी उसाची थळे उलगाड जाली. दोन फड सरकारचें होते. त्याजमध्यें हत्ती उभे करून कही केली. —पे. द. ९. पृ. २९

उलगिडा—गावचे नोकर. --(विलसन)

उलगी—चाकर; मूळ कानडी शब्द उलीग. उलीग म्ह. चाकरी, नोकरी, काम.

दुर्गस्थाचा उलगी येक आम्हाकडे आला होता. त्याजबरोबर कितीक वर्तमान सांगून पाठविलें आहे. कारण पत्र (पत्रीं) लिहिता नये.

--पे. द. भा. ४० पृ. ११०

उलझा--अपरोक्ष; पाठीमागें.

आपलेकडील अमीलास ताकीद केली. कांहीं मामलेतसंबंधी बोलणें

उऴझा कबूल न करावे याविशी सलाबतखान यास महिपतराव या समागमे देऊन नागपुरास पाठविले आहेत.

——नाग. २ पृ. १२९

उलटणी—शत्रू पाठलागावर येत असतां एकदम तोंड फिरवून त्यावर हल्ला करणें.

तेव्हां लोकांच्यानें दम न निघे म्हणून निघालो. ते स्वार व लैना व तोफा मागें लागले. दोन कोसपर्यंत लढाई होत आली. पांच-सात उलटण्या जाल्या तेव्हा ते (शत्रू) उभे राहिले.

--ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १७८

हरी गोपाळ यांचेहि तोंड एका उलटणीस लागलें होतें. दहा-वीस तिकडील जायाजखमी जाहले. —ऐ. ले. सं. पृ. ६७

उलटबाजी—उट्टें काढणें, बदला घेणें.

या समयीं तिकडून कांहीं उलटबाजीचा विचार घडला असतां, इकडून उपद्रवास कमतर होणार नाहीं. --ऐ. ले. सं ६१७०

उलटा—उलटणी; एकदम पाठ फिरवून केलेला हल्ला.

नंदीगडचा गुंता उरकला म्हणजे आम्ही रिकामेच आहों. कांहीं एक उलटा करणार आहों. —ऐ. ले. सं. १५४१

उलटा होणें—परतफेड, उलट अहेर.

सबब त्याची साक्ष, त्याचा गरूर देतो. ख्याल न करावा तो करूं लागला- याचा उलटा होत आहे. हाच ईश्वराचे घरीं कनवा.

--ऐ. ले. सं. ४३५६

उलटी देणें—१ टांग मारणें. २ उलटी करणें.

१ याजकरितां राजकारणें करून दादासाहेबांस उलटी द्यावी, आणि खूळ माजवावें, अशा विचारांत लहानमोठे सरदार आहेत.

—ऐ. ले. सं. २०६७

२ करारात दोघांच्या झाली कांहीं किंचित गफलत ।
म्हणुनि फिरुन नानांनीं उलटी मारूनि केलि गल्लत ।

--प्रभाकर शाहीर

उलसन करणें—खुलासेवार लिहिणें. उलसन—खुलासा, उलगडा, उकल.

पुढें मातबर काम होणेचे आहे या करितां अवध्याच गोष्टीचे उलसन करून लिहिले आहे. —पे. द. भा. १६ पृ. ६८

उलिग--काम; अनिच्छेनें किंवा सक्तीनें लादलेलें काम. वेठ. हा मूळ कर्नाटकी शब्द आहे. त्या भाषेंत त्याचा अर्थ नोकर, प्यून, शिपाई, असा आहे. उलिग वारणें असा वाक्प्रचार मराठींत आहे. त्याचा अर्थ अंगावर आलेलें काम

एकदाचे पुरें करणें, वेठ पोचविणें, असा होतो. एखादें काम उलगडणें या वाक्प्रचाराचा अर्थहि काम तडीस पोचविणें, असा होतो. उलगडणें शब्द मूळ उलिग वरूनच आला असावा.

उली येणे—उतूं येणे, उलून येणें.

धरणीकंपामुळे शहाजहापूर आरवे गारद जालें. कितेक आड पाणी उली आलें. वर येऊन पूर गेले. उपरांतिक कोरडे पडले. आडात येक थेंब पाणी न राहिले. —E. M. P. पृ. १९१

उलुव्ब—हिम्मत—मोठ्या हिमतीचा.

उलुव्व—उच्च, मोठी.

उश्रमा करणें—तोंडावर फेकणें; उणें काढणें; तकार काढणें; टोमणा देणें; निरुत्तर करण्यासाठी एखादी वेधक गोष्ट पुढें आणणे.

उश्रमा केला कीं नानासाहेब असतां हे सतंतर का करितात? त्याचा पर्या (पर्याय) (मी) सांगणे तो सांगितला.

—पे. द. भाग २९ पत्र नं. १३०

बावांनीं उश्रमा केला की नवी कलमे याणें लिहिली! सरकारांतून कोठें लिहिलीं आहेत? —म. शि. यां का. पृ. ५०४

उष्ण—ऊन; उन्हाळा.

यंदाचा उष्णकाळ अतिशय! कागदीं लिहितां पुरवत नाहीं. आम्हांस फारच श्रम होतात. प्रहर दिवस प्रातःकाळचा आला म्हणजे दोन प्रहर रात्र पावेतों मोठी धगी शरीराची होते. यामागें असें उष्ण पाहिलें नव्हतें. —ऐ. ले. सं १६१५

नालबंदीसाठी नीळकंठराव थोराताच्या शिलेदारानी त्यास उष्णांत उभे केले होते! लोकांचाही अन्याय नाही. —ऐ. ले. से. २८७७

उस्तवार—व्यवस्थित.

खानाची व चिरंजीवाची भेटी होऊन उस्तवार स्नेह व करारमदार व्हावा. E.M. P. पृ. १७२

उस्तवारी—साहित्य; मदत. पुनर्वसाहत किंवा स्थापना, दुरुस्ती.

आम्ही शिबंदीचे पायीं पंनास हजारापावेतों खालीं आलों. त्यास उस्तवारी करणार साहेब धणी आहेत. —पे. द. २६ पृ. १६४

संस्थान त्रिचनापल्ली तुम्ही पराक्रमे करून साध्य केली यास्तव तुम्हास सरंजामात उस्तवारीबद्दल पूर्वीच दिली आहे त्याच प्रमाणें करार केली आहे. —इ. सं. ऐ. स्थ. पृ. ११

फौजेस भक्षावयास नाहीं. सावकार नाहीं, तेव्हां या फौजेची उस्तवारी स्वामीखेरीज या प्रांतीं कोण करणार आहे? —ऐ. ले. सं. २९११

याचे पदरी चार माणसें कुटुंबी आहेत. तरी याची उस्तवारी करणार साहेब धनी समर्थ आहेत.

—पे. द. ३४ पृ. १६६

हा प्रसंग आमच्या सेवेचा आहे येसमई आम्हास आज्ञा करून आमचे हातानें कष्टमेहनत घेऊन उस्तवारी करावी हें उचित आहे.

—पे. द.

उसणा—उलटा, उद्धट.

मोरोपंत रोजकीर्द घालीत नाहीत. त्यास ते चित्तावरच घेत नाहींत. सारा जाबसाल उसणा करितात. चित्तापासून सरकारकाम करावें हें मानस नाहीं.

—ऐ. ले. सं. ३५५१

उसणें पारणे फेडणें—उट्टें काढणें; सूड उगविणें.

केल्या गोष्टीचा शेवट उसने पारणें फेडलें तरच आम्ही समदु:खी तितक्यांचे समाधान होईल.

—ऐ. ले. सं. ३६२

उसाचे थळ—उसाचें शेत किंवा मळा.

—पे. द. भाग २० पत्र नं. २०३

उसाली—उसळी, उशी, झेप.

मुजफरखान हरकोठें उसाली खाऊन जातील तर जाऊ न द्यावें म्हणोन आज्ञा.

—पे. द. १८ पृ. १९१

उहू—प्रस्ताव, प्रस्तावना किंवा उपक्रम, बोलणें, विचार.

मध्यें असा उहु राजेश्री माधवराव गंगाधर याजवळ बावानीं केला की वर्षप्रतिपदेस खीलताची रवानगी सदाशिव दिनकराबरोबर करावी लागते; तयारी करणें.

—म. शि. यां. का. पृ. ५२८

त्यांच्या म्हणण्यांत आपलीं मुलें माणसें सर्व मिरजेस पाठवावीं, असा उहू मजपाशीं गणोबा तात्या आहेत, त्याणीं गोष्टी काढिल्या कीं, बक्षींचीं सारीं माणसें मिरजेस पाठविती.

—ऐ. ले. सं. ५४३६

उंच दार—मुख्य थोरला दरवाजा.

नानाच्या वाड्यांतून माणसांनीं बली बाहेर टाकावयास उंच दारांनीं आणून सरकार वाड्याकडच्या बाजूस टाकला, तेव्हां शिंद्याकडील लोक कांहीं कोडे केलें म्हणून आळ घेऊन कटकटीस आले.

—ऐ. ले. सं. ५११८

उंट कलावर बसणें—उंट केव्हां पुढचे पाय आधी दुमडून खालीं बसतो किंवा केव्हां मागचे पाय दुमडून बसतो ही अनिश्चितता असल्यामुळें वर बसणारास अनपेक्षितपणें धक्के खावे लागतात. त्यावरून अदमास न लागणें, अशा अर्थीं हा वाक्प्रचार रूढ झाला.

अवतरणासाठीं ‘ साहेबसुभा ’ शब्द पाहा.

—हो. कै. पृ. १०३

उठंत्री, उंठत्री ?

भीमसिंगाकडे कारकून गेला तो आला म्हणजे उंठत्री पाठऊन देऊं. महाराजाचे मर्जीस येऊन उठंत्री आल्यास उत्तम. उठंत्री आली म्हणजे २५ हजाराचे लिहिले करून घेऊन गांव सोडून देऊं.

—हो. इ. सा. प. खं. १२ पृ. १४१

उंदीर तोडी करणें—उंदराप्रमाणें ठिकठिकाणी कुरतडून भोसकें पाडून टाकणें.

तेच तुमच्या चित्तांत बिंबून गेले आहे. परंतु गतवरुषी जैसी उंदीरतोडी करून, हत्तीनें, उंटानें, बैलानें, घोडेतटटूनें लस्कर लुटविला, माहागाईमुळें लस्कर सडविले, आरधे लस्कर बेमार जाहले पाव हिस्सा लोक न मारिता मरून गेले. बावीससें घोडी च्यार हत्ती पाडाव करून आणले रुस्तुमराव पांढरेचा लेक पाडाऊ आला त्यास मुलुकमबाह करून वस्त्रें देऊ सरदारास सोडून दिल्हे. —E. M. P. पृ. १३४

ऊ

ऊ--तो

ऊर्जा--पूजा, व्यवस्था.

हे गोष्टीनें देवास ऊर्जा सांगसंपादन नाहीं यास्तव मोईन वाढवून दिल्ही असे. --पे. द. ३१ पृ. ६५

ऊर्मी--गुर्मी.

तदनंतर चंद्रपूर प्रांतास फौजेसह आले. संस्थानिकानें ऊर्मी धरून भेटीस न आला तेव्हां पारपत्य करावेसे जाले. --पे. द. २० पृ. ७०

ऊला—पहिली.

ऊशान—ते, त्या, तीं.

ऊष्ण--ऊन.

चैत्राचा महिना ऊष्ण अति तीव्र आणि ती यावनी सलतान! जागा जागा तहखाने सामसूम होते. —हो. कै. पृ. १०

ऊह—उपक्रम; उहापोह; सूतोवाच.

ऐसीयास कलकत्त्यास मदतीविशीं येथून टिपूचे मसलतीचा ऊह निघतांच लिहिण्यांत आलें, त्यावरून त्याणीं मालीट याची रवानगी आपणाकडे केली. —ऐ. ले. सं. ४११६

ऊहू—वाटाघाटी, ऊहापोह.

राजेश्री त्रिंबकराव नारायण यांस समागमे न्यावे असा ऊहू जाला आहे. उदयीक निश्चय होईल तो कळेल. —ऐ. ले. पा. म्यु. प्र, पृ. ८०

ऊहू करणे—उपक्रम, सुरुवात करणें.

हे गोस्टीचे समक्षतेस्तव अस्तमानी आम्हीहि गेलो होतो त्यास संधेचे समई सविस्तर जाल्या जाबसालाचे ऊहू करूं.

—पुरं. द. भाग ३ पृ. ४९

ए

एक्का करून बसणें—एकत्र जमून बसणें.

अलिजाबहाद्दर यांणीं बक्षी वगैरे मंडळी कैद केली, असें समजून झाडून फौजेनें एक्का करून बसल्यावर मागती बक्षी वगैरे आणिले. (म्हणजे कैदेत नेले होते ते सोडलें.)

--ऐ. ले. सं. ५३५५

एख्बार—अखबार, वातमीपत्र.

—दि. म. रा, भा. १ पृ. १६४

एक्रार—इकार, कबुली.

ऐसे पष्टवादे पुसतां मुल्जीम होऊन एक्रार केला.

—रा. खं. २० पृ, ६५

एकगाहा--एकजूट; एकत्र.

जाट व ही फौज एकगाहा करून मातबर झुंज शत्रूशीं करून नामोहरम करावा असें आहे.

—ऐ. ले. सं. पृ. ३४

एकजखी—एकाच शाखेचे वंशज. दादोबा व आपण एकजखी भाऊ, दोघांचे आजे सखे एकोदर बंधू आहेत.

--शा. रोज. पृ. १७५

एकजरा--यत्किंचित, बिलकुल, एकंदर.

श्री गोसावी यांचा पोव्हा मोंगलाईतून रामाजी गोसावी सावळे वर्षास घेऊन येत असताती. तरी श्रीचे यात्रेचा पोव्हा येतो त्यास मार्गी कोण्ही आजार एक-जरा न लावणें.

—ऐ. सं. सा. खं. ४ पृ. ८९

एकत्यारी—अखत्यारी, मुक्त्यारी.

सर्वत्र एकसारखा दंगा. कोणाएकाची प्राबल्यता होऊन एकत्यारी झाल्याविना स्थिरता होता दिसत नाहीं.

—ऐ. ले. सं. ८१३२

एकतत्वी होणें—एकाचाच किंवा एक पक्षाचाच कारभार चालणें.

दुही तुटली. ते गेले तर चिंता काय ? एकतत्वी जाले (झाले) हें बरें. ते दगा देणारे होते. अनायसे अरिष्ट चुकलें.

—ऐ. ले. सं. पृ. ९७

एक तऱ्हा—विचित्र; चमत्कारिक.

पहिले मिरजेचे मुक्कामीं श्रीमंती कृपा करून पुरुषोत्तमराव यासी करार-मदार करून यादी पाठविल्या. परंतु दिवस एकतऱ्हेचे होते. याजमुळें गोष्टी घडून न आली.

—ऐ. ले. सं. ५२४

एकतारी—एकनिष्ठा.

आपणही जैसी कांहीं आपलें वडिली साहेबाची चाकरी केली आहे तेण्हेच प्रमाणा पुढेंही एकतारीनें चाकरी करूं. —रा. १ पृ. ४५

एकंदर—बिलकूल, अगदीं.

महादाजीपंत पुरंधरे याही श्रीमंत महाराज यास विनंति केली कीं भाऊसाहेबांस एकंदर हिंदुस्थानचे मोहिमेस पाठवूं नये. भाऊसाहेबांचे कारभाराचा हावभाव दुसरे कोणास येणार नाहीं. सर्व राज्याचा भार त्यावर आहे ! —पाणि. बख. पृ, ८

एक प्रकार—विचित्र, निराळे, विपम.

संभाजी आंग्रे सरखेल याजकडील मोर्चे उठोन गेले त्यावरुन राजश्री स्वामीच्या चित्तांत बहुत एकप्रकारें भासले. खासा स्वार होऊन जावे परंतु वाडियांत दोन दिवस बरे वाटत नाहीं या करिता आठ दिवस स्वारी तकूब जाली. —पे. द. ३. पृ. १३६

कांहीं तुमची नुकसान नसतां दिकतीखालीं घालून टाळिले; यामुळें सर्वांस एक प्रकार वाटते. —ऐ. ले. सं. २४७६

एक पेटचा— एक पेटा—एकी, एकात्मता, सख्य.

सिंदे व नाना फडणिसांचा पेटचा एक. यांनीं मसलत करुन बापू व मोरोबा व होळकराचे कारभारी तिघांस जरब (बसे) असा व्यूह सिध्द केला. —इ. सं. हो. कै. पृ. ६

एक व एक—एकाएकी.

१ एक व एक हुजूर मालूम जाहली. —रा. खं. १५ पृ. ३१

२ त्यांनीं मीर इमाम यास जठचरक येथें एक व एक येऊन गांठले. —रा. खं. ५ पृ. ११४

३ इंग्रजांस लढाई देऊन खिपत द्यावी, इतका टिपू मजबूत आहे. परंतु कांहीं कावादावा, शत्रू (इंग्रज) सेर होऊं द्यावा, काळीज दाखवून पट्टणापावेतों पोटांत घ्यावा, मग एक व एक अशी कस्त करावी कीं, इंग्रजास फुरसत घेऊं न द्यावी, हाहि टिपूचा मनसबा संभवतो. —ऐ. ले. सं. ४३५६

एकबार—अखबार, बातमीपत्र.

त्यांची पत्रें येतात ती एकबाराची येतात त्यांत मजकूर येतो तो एकवेळ खरा होतो एकवेळ बातलहि पडतो. —म. शि. यां. का. पृ. ६७४

एकमुखी रुद्राक्ष होणें—एकटयाच्या हातीं सर्व सत्ता केंद्रित होणें. ज्यास एकच मुख म्हणजे एकच कच असतो अशा रुद्राक्षाला एकमुखी रुद्राक्ष असें म्हणतात.

असें म्हणतात कीं अशा रुद्राक्षावर तांदुळाची रास केली तरी त्या राशीवर खालचा रुद्राक्ष येऊन बसतो. यावरून कोण्या एखाद्यानें सर्वांना दाबून वरचढ होणें अशा अर्थी एकमुखी रुद्राक्ष शब्द वापरतात.
शिलेदार, पागा, मुत्सद्दी कोणीही असो तफावत पडल्यास पारपत्याशिवाय दुसरी गोष्ट नाहीं असा धर्मकुवराचा एकमुखी रुद्राक्ष जाला.

—हो. कै. पृ. १७७

एकमुठीनें असणें—एकत्र किंवा एकजुटीनें असणें.
कोणास जाऊं देऊं नये. एकमुठीनें सारें असावें. —ऐ. ले. सं. ५५२

एकरूप—यत्किंचितहि, बिलकुल, एकंदर.
अवतरणासाठीं गुमराई शब्द पाहा. —हो. कै. पृ. १६१

एकसमयाविच्छिन्न—एकसमयावच्छेदे करून.
रोहिले मजकूर यांणीं यंत्रधारी म्हणजे शिंदे यासी सलुकाचें बोलणें करून खंडणी ठरविली व गजपा कुवर यांणीं याच अन्वये बोलणें करून दीड लक्ष रुपये ठरावून नंतर ऐवज हस्तगत करून एकसमयाविच्छिन्न हल्ला करून मोठी लढाई होऊन पराजयातें पावविलें.

—ऐ. ले. सं. ७१३७

एकसरणे—एक होणें, एका बाजूस होणें, फितुर होणें.
ते समयीं आरब त्यास जाऊन सामील जाहाले. त्याचा यांचा सलामा-सलाम होऊन येकसरोन आमच्याच लोकावरी फिरले. यास्तव इतका नाश जाहला. —पे. द. ३४ पृ. ६७

प्रस्तुत काले सारें राज्य एकसरलें आहे. एक कर्तुत्व व फौजेविषयीं भरं-वसा तुमचाच धणीयांस. —ऐ. ले. सं. १०३

एकसहा—एकसारखा, उसंत न पडतां.
आज १५ दिवस पर्जन्य एकसहा पडत आहे. —ऐ. ले. सं. ३०४०

एकसान, एक्सा—एकनिष्ठ,
१ धन्याची एक्सान चाकरी केली सुकृत पदरीं आहे.

—ऐ. ले. सं. ४०९

२ आपण तों साहेबाचे खिजमतीस एक्सान असो.

—इ. मं. ७५

३ जमान एकसा नाहीं. —रा. खं. ५ पृ. ८५

४ बेशक एकसानीनें कामांत शरीक झालेत म्हणजे हूरपूरहूर लेखोन सनदहि आणावयासी जागा होईल.

—द. शि. मो. यांचा इतिहास—पृष्ठ ३४

एक सोईचा—एकनिष्ठ. एक्सू–एकनिष्ठ. सू–बाजू.
येथूनहि तुम्ही जावयाचें कारण हेंच कीं, तुमचा कारभार एकसोईचा जिकडे असावें तिकडेच असावें, यास्तव तुमचें तिकडे जाणें जालें.
—ऐ. ले. सं. ५२४

एकाकेच—एक रकमेनें.
हल्ली वाणीही आटा देत नाहीं ऐसें कारागिरांनीं वर्तमान सांगितलें त्यावरोन त्यांची खातरजमा केली कीं रुपये तुमचे येतील एकाकेच सरकारातून् अवघी बाकी देतील. ऐसे बहुता प्रकारे सांगोन त्यांस काल कामावरी छत्रीच्या लाविले —हो. इ. सा. ख. १२ पृ. १७५

एकाँग बाजी--पट्टयाच्या कसरतीपैकी एक प्रकार. या प्रकारात फक्त एकाच हातांत पट्टा किंवा तरवार घेऊन हात करावयाचे असतात. उलटपक्षी दोआंग बाजींत दोन्ही हातांत तरवारी घेऊन हात करावयाचे असतात.

एकांगवीर होणें --एकटयानें धाडसानें पराक्रम करणें.
जो पावेतो आपलें हातून इंग्रेजाचें पारपत्य जाले नाहीं तो पावेतो हैंदर नायकासारखी स्वतंतर मसलत डोईवर घेऊन येकआंगी वीर होऊन इंग्रेजाचे पारपत्य यांजकडून घडणें दिसत नाही.
—हिं. द. खंड २ पृष्ठ ७८

एकांगी--१ तरवारीच्या खेळांतील एका हाताचें नांव. २ धाडस.
अफजलखानास नानाप्रकारे बोध करोन येथें मी जावलीस आणतो मग तुम्ही भेटीस येऊन हिंमत धरून एकांती एकांगी करून कार्य संपादणें.
--म. द. रु. १ पृ. २७

एकांडा—एकटा स्वार. हे निघडया छातीचे मर्द शिलेदार ब्राम्हण, मराठे, रजपूत, मुसलमान वगेरे सर्व जातीचे असत. प्रत्येक पथकांत व पागेंत दहा, वीस, शंभर असे एकंदर स्वारांच्या संख्येचें मान पाहून हे एकांडे बाळगलेले असत. आणीबाणीच्या वेळीं नेहमीं हे एकांडे मोहरे आघाडीस असावयाचे. हेच एकांडे पुढे बढती मिळून पागेंत पथके होत असत.
नित्य नवे गणतीस लागती एकांडे देशावरले.
—प्रभाकर खडर्याचा पोवाडा

एकाद्यावर बिराड करणें--एखाद्याच्या बोकांडी बसणे, एखाद्याच्या पाठीमागें तगादा, त्वष्ट लावणें.
मुलूक खराब जाला पैका नाही तेव्हां दिवाणजी, सरदारापासून (शिंदे-होळकरांकडून) मामला चुकऊन आल्यानंतर (खंडणीची रवकम भरून

आल्यानंतर) शहरांत लहान थोरावर बिराड करतील ! विना बिराड यांस गत नाही, यैसे दिसो येते. —हिंगणे द. भाग २ पृ. ३३

(एकाद्याच्या) अन्नाचे वाढविलेले—उपकृत.

हे उभयेता ब्राम्हण आमचे पदरीं आहेत. आपले आन्नाचे वाढविले आहेत. —पुरं. द. भाग १ पृ. ११४

एकीन, यकीन—दृढ मत, खात्री. नक्की.

बवाजीबी ताकीद होईल हे एकीन समजोन. —रा. खं. १५, पृ. १५२

एकूणीस—एकंदरींत.

एकूणीस हरएक प्रकारे दौलतेस अपाय. एक दोन कुफार तोडले म्हणजे सर्वांवरी दवा बसेल. —ऐ. ले. सं. पृ. ९९

एकेरी—होनाचा एक प्रकार.

अंताजीपंत मामास एकेरी होन देणें म्हणोन लिहिलें होतें. त्यास तूर्त मिळत नाहींत. —ऐ. ले. सं. २१८०

एकेरी कारकून—क्षुद्र दर्जाचा कारकून. —(विल्सन)

एकोणीस विश्वे—एकशें एक हिश्यांनीं. अठरा विश्वें ही कमाल मर्यादा उ. अठरा विश्वें दारिद्रच. त्याहीपेक्षां एक विश्व्यानें अधिक.

नानांचे दूर-आंदेशीत इतका तर्क न यावासा नाही. आणि ऐकण्यात तर गोष्ट आली. याचरून एकोणीस विश्वें तर नानांस विदित नसतां दरम्यानच आमचें स्नेही असतील त्यांनीं केली असेल म्हणून तुम्हांस कळवितो. —म. शि. यां. का. पृ. २८६

एखत्यारी—विश्वासू.

आपले जीवाची आशा चाकरीत धरली नाही. एखत्यारीचे जाणून शिंदे-राव मोकाशी यानें (कदमरावास) वतनपत्रें करून देवविली. —द. शि. मो. यांचा इतिहास पृ. १४

एखाद्याकडून एखादा प्रसंग जाणें—एखाद्याकडून एखादे वेळीं चूक होणें.

एखादा प्रसंग आम्हापासून गेला तरी वडीलपणें सांभाळून बुद्धीमंदे (अक्कलमंद; शहाणा) आज्ञा केली पाहिजे, —पे. द. ३३ पृ, ९३

एगानगत, यगानगत—ऐक्य, स्नेह.

दुनियाईत दोही दौलतीची एगानगत महशूर. —रा. खं. ५ पृ. ३१

एडी—घोड्याची दुडकी चाल. —रा. व्य. को.

एरिद—यारीद, सहाय्यक, दुय्यम अधिकारी, कारकून.
बाजीच्या एरीदियास हुजूर तूर्त पाठविजे. नाहींतरी तुज ताकीद होईल.
—रा. १७ पृ. ९.

एलानदाज—जासूद, पत्र किंवा हुकूम नेणारा.
पैकीयासी दिसगत जाली. मग मुजरद एलांदाज व महार देऊन रुपये १५०० सेवेसीं पाठविले, ते घेऊन जाब पाठविला आहे.
—ब्र. च. पृ. २०१

ऐ

ऐजन—सदर.

ऐते वेळेस गांड वाकडी करणें—ऐनवेळी अांग काढून घेऊन दगा देणें.
तुम्हास पुणें संभाळावे लागेल. राजमंडलच सर्व फिरले असले, गमाजीपंत दोन अडीच हजार जमा होऊन आले, तदम आहे ते (आयत्या) वेलेस गांड वाकडी करावी अथवा फारासी थोडयानी झुंजावे, हे मसलत उचीत नाही.
—पुरं. द. भाग १ पृ. २२४

ऐन—सर्वोत्तम; सर्वांत महत्त्वाची.
बातमी चहूंकडील राखोन हुशार राहून टिपूचे मुलखांत हंगाम सुरू करावा ही ऐन मसलत आहे.
—ऐ. ले. सं. ४३५०

ऐन—भर, तारुण्य.

ऐनबाबती—मराठयांनीं वसूल केलेल्या खंडणीपैकीं चौथाई भाग राजासाठीं राखलेला असे तो.
—(विलसन)

ऐनात—बक्षीस.
सवलतजंगानी घोडा नवाबास नजर करावयाविसी तयार केला त्यास घोडा त्यांचा त्यास ऐनात करून दिल्हा आणि २००० रुपये खर्चास दिल्हे.
—नाग २ पृ. ११२

ऐनी गोळे—लोखंडी घडीव गोळे.
बल्लारीवर हैदरखानानें मोर्चा दिला तेव्हां बल्लारकरानें फार कस्त केली. बहुत लोकांस जाया केलें. जखमपट्टीस ३०,००० रु. हैदरास लागले. तोफांचे ऐनी गोळे ६०,००० खर्च झाले.
—ऐ. ले. सं. ११९४

त्याच फर्म्यानें भाडयाचे बैलांवरून गोळे ऐनी व शिशाच्या गोळ्या बैल सर२२ येकूण.
—खरे ३५२३

ऐरण देणें—एखाद्यास ‘ऐरणी दिव्य’ करावयास लावणें. तापून लाल झालेली ऐरण मोकळ्या हातांनीं उचलून कांहीं पावलें चालून दाखविणें असा

एक दिव्याचा प्रकार असे. आपण गुन्हेगार नाहीं असें सिद्ध करण्यासाठीं किंवा आपल्या एखाद्या हक्काच्या शाबितीसाठी वरील प्रकारचें दिव्य करून दाखविण्याची जुन्या काळीं वहिवाट होती.

हरदो गांवांसी सिवेचा कर्कशा बहुत दिवस चालला होता. पेशजी आपणात आपण झगडोन खून खराबिया केलियावरी हरदो नफरीं नेम केला जे, सिवेस यैरण द्यावी. जो खरा होईल तेणें खावी.

--शि. च. सा. खं. २ पृ. ११४

ऐलीकडे—अलीकडे.

राजेश्री पंतप्रधान कोकणांत गेलीयावर ऐलीकडे कांहीं वर्तमान कळलें नाहीं. उडाऊ खबर ऐकिली कीं इध्ये (युद्ध) जाहले म्हणून. यास्तव चिंता लागली आहे. —पे. द. ३३ पृ. ११८

एश—चैन.

ऐश—आरा—चैनीची सजावट करणारा.

ऐषमहाल—राजे लोकांच्या किंवा श्रीमंत लोकांच्या स्त्रियांचें अंतःपुर.

(विलसन)

ओ

ओघ--पूर्वापार क्रम, व्यवस्था, वहिवाट.

सुभेदार यानी पैसा उत्पन्न करून मागे टाकावा त्याची व्यवस्था व चार माणसांचें संरक्षण बाईनें (अहल्याबाईनें) करावे असा ओघ चालत आला.

—हो. कै. पृ. ४७

ओडगाडू—ओढगांडू; नादान कर्तृत्वशून्य.

ओडगाडूमध्ये डोई खुबसून राहीले आहेत. या सर्वांचा उच्छेद करून यथापूर्वक आपलाच जिमा जालीया उत्तम आहे.

—हिंगणे द. भाग २ पृ. २९

ओढ्या—ओरिसा प्रान्त. तेथील भाषा किंवा लोक.

ओढणबाकी—वसुली जमाखर्चांत दरसाल मागील वर्षाचा हिशेब पुरा करून जी बाकी पुढील सालच्या जमाखर्चाकरितां पुढें ओढतात ती.

ओढणें--लांबणीवर पडणें.

इकडे पर्जन्य ओढला आहे, याउपरी पुनर्वसूचा लागेल तरी राहिले पेरे पेरतील.

--ऐ. ले. सं. ४१०९

ओढा ओढणे लागणें—ओढ निवारण करावी लागणे किंवा मसलत संभाळण्याची जबाबदारी पत्करावी. लागणें.

मोठा वोढा श्रीरंगपट्टणकराकडील ठाण्याचा वोढा वोढणे लागला.
—पे. द. २८ पृ. १४५

ओढीचा, वोढीचा—आस्था किंवा लागतें असलेला.
काळोपंत दफतरदार अपाले वोढीचा. म्हणोन वतनाची देखरेख त्यास सांगितली आणि निळोपंत हुजूर गेले. —रा. ८ पृ. ३३

ओढेखोडे—अडचणी.
आपण राहिले आहेत तेथून मोगलाचें लस्कर तीन साडेतीन कोस लांब आहे त्मयांध्यें ओढेखोडे फारच आहेत. —पे. द. भाग १ पत्र नं ७४

ओढे जिले—किंवा **ओढे जिले ओढे**—नाले (जिल–झिल. झिल म्हणजे पाणथळ).
जिले वोढे वाहो लागले. पूर्वेकडील दोन्ही खेडयांतील वोढे व दक्षिणेकडील तळयांचे पाळी-बाहेरील वोढे जिले वाहो लागले. ते खणोन बांधोन आणून तळयांत आणले आहेत.
—पे. द. ९ पृ. २५

ओरवा—वरवा, मुक्काम. (नाविक शब्द).
ह्या खेपेस आमची सफर वेंगुर्ल्यावरून समुद्राच्या वाटेनें होती. आमच्या फत्तेमारीस वारा उलटा असल्यामुळें मुंबईस पोचण्यास १४ दिवस लागले. मार्गात दोन तीन ठिकाणीं ओरवा करावा लागला.
—अरुणोदय पृ. ९१

ओली आग—पुरामुळें किंवा अतिवृष्टीमुळें निर्माण झालेली परिस्थिति.
ओलीं द्राक्षें—ताजी द्राक्षे. (वाळलेल्या द्राक्षांस मनुका म्हणतात).
बाईस ओलीं द्राक्षें पाहिजेत. १० शेर मिळालीयासी पाठवावी.
—ऐ. ले. सं. ५९१८

ओलें कातडें डोईवर ठेवणें—दिव्याचे वेळीं 'खरें सांग' असें वाद्याप्रतिवाद्यास बजावतांना करावयाचा एक विधी.
पाटीलबावा रागानें मजला म्हणूं लागले जे, जमा दाखवितील ती पाहणें. कांहीं तजावत तफावत मनांत येईल तर ओली कातडी या ब्राह्मणाचें डोईवर ठेवावी. म्हणजे असेल ते सांगुन देतील. मी उत्तर केलें कीं ओले कातड्यापावेतो नौबद आल्यास ठेवावी. आणि ठेवली तर आपले ब्राह्मणाचे डोईवर किंवा बादशाही मंडळांतील ब्राह्मणाचे डेईवर ठेवावीं.
—म. शि. यां. का. पृ. ५१९

ओवंडकरी—गांवांत शेती करतो परंतु त्या गांवांत ज्याचें घर नाहीं किंवा शेत नाहीं असा उपरी माणूस.

ओसर—अवसर.
शामाजीपंतास पत्र लिहिले कीं तारापूरपावेतो जाऊन येकदोन दिवस ओसरानें राहून पारपत्य होय ते करणें.
—पे. द. ३४ पृ. १६३

ओसीक—ओसा, ओसाड, पडीक.
सलास सवैनचे पाहणीस ओसीक जमीन आहे ती मोजणीत आली नाही.
—पेंडसे कु. पृ. ४६

ओहट दळणें—ओहटीस सुरुवात होणें.
तो इतक्यांत ओहट वळला त्यास आज्ञेप्रमाणें शंभर माणूस दरवाजाच्या वाटेनें कोटांत पाठविलें.
—पे. द. ५४ पृ. १४१

ओहदा, वोहदा वोहोदा—कर्तव्य, ठराव, हक्क.
पातशहाकडून वस्त्रें घेऊन जावीं हा ओहोदा आमचा आहे.
—दि. म. रा. भा. १ पृ. १३१

ओहर—(न) लग्न लागल्यानंतर वधूवरांनीं उभयतां जोड्यानें परतणें किंवा जोड्यानें कुलदेवतेस दर्शनास जाणें याला ओहर म्हणतात.
नंतर महादाजी नाईक यांचे लग्न शिवाजीराजे भोसले यांचे कन्येबरोबर पुण्यांत जाले. यावर फलटणास येऊन पुढें थोडक्याच मुदतीत महादाजी नाईक यांचें ओहर कुलस्वामी श्रीखंडेराव जेजुरीचें देवास नेले.
—इ. सं. प्रा. म. स. पृ. ३०

ओळख्या—ओळखीचा, ओळखणारा.
ज्यानें पत्र दाखविलें तो गृहस्थ ओळख्या नव्हता.
—ऐ. ले. सं. ३४२३

ओळंबा येणें—शब्द लागणें, टपका लागणें, ठपका लागणें.
नंतर तुकोजीराव होळकरांनी चौघाहि पुत्रांस बोलावून कांहीं एक विचार दुर्भाषणें बोलून म्हटलें, श्रीमंतांचा मजला ओळंबा आला ते पक्षीं मला उदईक लढाईत मरावयाचें.
—इ. सं. हो. कै. पृ. ११

ओंड जमीन—सखल, पाणी सांठवून धरील अशी भातखाचराला उपयोगी पडणारी जमीन.

औ

औट—तोरा; गुर्मी.
वरकडाशीं जसें औट धरून करितात, तसें तुम्हाशीं करितात. परंतु तुम्ही आप्तकोटींत सर्वस्वें तुम्हांवरी कृपाच करावी.
—ऐ. ले. सं. १०२

औटी; आवटी—१ सोनाराचा शिक्का २ एक ग्रामाधिकारी. त्याचेकडे गांवांत विक्रीसाठीं येणारें धान्य मोजून घेण्याचा व त्याचप्रमाणें अधिकृत सरकारी नियमाप्रमाणें बाजारचीं मापें तपासण्याचा अधिकार असतो.
(विलसन)

औतकी; औटकी—सुगीच्या वेळीं दर औतागणिक पाटलाला हक्क म्हणून धान्याचा जो हिस्सा मिळतो तो. —(विसलन)

औरंग—व्यापारी मालाची निपज, त्याचा साठा व जेथून त्याची बाहेर निर्गत होते असें शहर. —(विसलन)

औलियाई—उच्च.

औसाफ, अवसाफ—लौकिक, अस्करा, कीर्ति.
मोहिबाचा औसाफ होऊन येईल. —रा. खं. ३ पृ. ९१

क

कई—कही. सैन्यासाठीं लागणाऱ्या धान्य वैरणीची व लाकडांची आसपासच्या खेड्यांतून लूट करून आणणारी टोळी.
पेंढारी व लुटारू कईनें स्वारांचें न ऐकतां गांव अगदीं लुटलें.
—ऐ. ले. सं. ४०८१

कंगणी—तोफेच्या विशिष्ट भागाचें नांव.
अवतरणासाठी ' मोहरी ' पाहा. —पे. द.

कंगणी—१ पागोट्याचा एक प्रकार. २ एक स्त्रियांचा दागिना.
जडावाच्या कंगण्या जोड १ व छंदजोड १ येणेंप्रमाणें श्रीमंत बाईसाहेबांस शिंद्यांनीं दिली. —ऐ. ले. सं. ४६४२
' कंगणिदार भरजरी पिळाची पगडी शिरावर. '

कंगर किंवा कंगीरा—किल्ल्याच्या तटावर लष्करी संरक्षणाच्या दृष्टीनें केलेली तटबंदी किंवा बांधकाम.

कच्चें—तपशिलवार; बारीकसारीक.
आवाया ऐकल्या, त्यांतून खरें किती खोटें किती असेल कळत नाहीं. स्वामींचीं पत्रें येऊं लागलीं कीं, जनवार्ता अनेक आहेत, ऐकवत नाहीं, काय तें कच्चें लिहिणें. यास्तव ऐकिलें तें लिहिलें आहे. मात्र ही वातमी खरी या (वा) खोटी, मी येथून लिहिली अशी चर्चा तेथें निघों नये.
—ऐ. ले. सं. ४७९५

कच्चें पक्कें होणें—डावाडोल होणें; घाबरें होणें.
गांवांतील लोक फटकडीनें व तोफानें फार मेले. गांवांत पाणी नाहीं,

कच्चेपक्कयाचा सुमार दिसतो. परंतु प्रत्ययास येईल तेव्हां सत्य, असें आहे. —ऐ. ले. सं. १७०५

कच्च्या धाग्याचें बांधिले—पक्के दोऱ्यानें जखडलेले. लक्षणेनें एकजीव एकनिष्ठ.

आम्ही आपले कच्चे धागेचें बांधिले आहों. —इ. सं. चिना.

कच—कचाट, ओझें, जबाबदारी.

राऊतास १५ रु. दरमहा द्यावयाचा करार, त्यांत रुपया दोन रुपये उणे दिले तरी कबूल करून जमाव पाडवावा. सारी कच आपल्या अंगावर येऊन पडल्यानंतर मग आटपावयाचें कठीण पडेल. एक कागल गेलें, याजमुळें किती उणें पडलें ! —ऐ. ले. सं. ३४१२

कच खादणें—कच खाणें; वेहिंमत होणें; मोड होणें.

हैदराकडील फौजेंत व सरकारचे फौजेंत लढाई होऊन सरकारचे फौजेनें कच खादला म्हणून वर्तमान ऐकून आज चार दिवस जाले.

—ऐ. ले. सं. २७७४

कचरा—जुन्याकाळीं मुंबई बाजारांत पाऊसकाळांत तांदुळाचा पुरवठा करण्यासाठीं नेमण्यात येणारा ठेकेदार. —(विलसन)

कचाट—कारस्थान, कवटाळ, भांडण; तंटा.

ऐशास ज्या गृहस्थांनीं इतका खेळ मरीचिग्रामीं (मिरजेस) केला तो कृतघ्न समागमें आहेच. तो सर्वांचा बुद्धिभ्रंश करून कचाट करावया अंतर करणार नाहीं. —ऐ. ले. सं. ३९१

आमचे बापभाऊ तकसीमदार अम्हासी कचाट करून तुम्हासी अपले तकसीम देवयासी येतील तरी तुम्ही त्यासी आसरा नेदावा.

—शि. च. सा. खंड ५ पृ. १६९

कचार जमीन—नदीकडेची खोलगट जमीन. ही अर्थातच उत्तम प्रकारें गाळानें खतावलेली असते.

कचावणें—कच खाणें, घाबरणें.

किल्ल्यांतील मनुष्यमात्र (झाडून सारे माणूस) कचावलें आहे.

—ऐ. ले. सं. ४४३७

कची—कच्छी. जहाजाचा प्रकार.

छ मजकुरी गलबतें दोन पाडाव केलीं. त्यांस येक कची त्याजवर खारीक व खजूर व पापडखार व तूप थोडेसें आहे. —पे. द. ३४ पृ. ४८

कची ढेली—तडे गेलेला, तुटका, पुसट रुपया.

रुपये चांगले पारखून पाठविले आहेत. पोतदार उगेच कचीढेली काढील तर सरसुमारामध्यें घ्यावी. —पे. द.

कचेपके होणें—कच्चें पक्कें होणें, डावडोल होणें, कच खाणें.
भुजंगराऊ घोरपडे मुरारराऊ यांचे बंधु १७-१८ वर्षांची उमर होती. फार दाटी जाली तेव्हां लोक कचेपके होऊं लागले तेव्हां बेजरब घोडा चालविला. लोकांस सिव्यागाली करून जुंज सांवरिलें. इतकियांत आकस्मात गोला येऊन खोपडीच उडून गेली. भुजंगराऊ मृत्ये पावले.
—पे. द. २८ पृ. १३२

कछवा—रजपुतांतील एक जात. ही रामाचा पुत्र कुश यापासून उत्पन्न झाली असें समजतात. जयपूरचे प्रसिद्ध राजघराणें याच जातीचें आहे.

कजा—हुकूम.

कंजार, कजारी—एक जात. हे लोक वाकाचे दोर व चटया करून विकतात.

कजाखी, कजागी—१ गनिमी काव्याची लढाई. २ लूटफाट. ३ युक्ति, हुन्नर.
१ ते फौज कजाखीस (गनिमी काव्यासाठीं) व आमची फौज सन्मुख झुंजास कामास येईल. —दि. म. रा. भा. १ पृ. २२
२ इस्मायल बेग कोठील कोण, ऐसे असता पांच हजार फौज बाळगून कजागी (लूटफाट) करतो. —रा. खं. १० पृ. २०१
३ चौकशी पडली असतां कजाखी करून (युक्ति हुन्नर) नांवें न सांगतां सुटून येऊं. —चिटणीस राजारामचरित्र पृ. १९

कजावत, कफावत—कज्जा, भांडण.
त्याची व आमची कजावत जहाली. यावरी आंग्रचाकडे २००० माणूस किल्ल्यानजिक येऊन राहिले आहे. —पे. द. ३३ पृ. ३६७

कजियाकडा—भांडण, द्वैत.
(अवतरणासाठीं 'चेरमनुकाई' शब्द पाहा)
—E. M. P. पृ. १५३

कजियाखोकला—भांडणतंटा.
मौजे मजकूरची खंड गुन्हेगारी, खटनट कजीया खोकला याची कमावीसबाब होईल ती रुपये आचार्य बाबांनी घ्यावे.
—ऐ. सं. सा. खंड ५ पृ. ६९

कजिये रजिये—भांडणतंटे.
धरणीपारणी कजियेरजिये जितके करावयाचे तितके सोलाही संस्कार जाले. कांहीं बाकी राहिले नाहीं. आतां तर मागतीन (मागत्यान) निकड करितो त्याचे कांहीं भय काय आहे ?
—पे. द. २० पृ. १२१

कजियाराडा—दंगा, मारामारी, कलह.
पुदचेरीवरी यानी बंदुक धरूं नये. त्यांनी याजवरी बंदुख धरू नये.

बाहेर कुमकेमुळं कजियाराडा होईल तर हो.

—E. M. P. पृ. १००

कजीया खटखट—भांडण, अडथळा, तक्रार.

कजीया खटखट कराल तर आम्ही पेशवे यांचे शरीक (स्नेही) असो. तुम्ही नसती तक्रार घातल्यांत फायदा नाहीं.

—ऐ. ले. सं. १२३७

कंझया—लांझ्या, कटकट, वाद.

ऐसीयास वाणी व सराफ वगैरे उदमी यांकडे तिकडील कंझया कांही नसल्यास त्यांनीं सुखरूप इकडे येऊन रहावें.

—ऐ. ले. सं. ५०९०

रखवालीस रामोशी होता, त्याजकडे कंझ्या आहे, म्हणोन धरून घेऊन गेले.

—ऐ. ले. सं. ५६८८

कट्टा करणें—कत्तल करणें, नाश करणें.

त्या गढीवाल्यानी गोळी वाजविली याअर्थी कूच जालें. त्या गढीचा कट्टा करावा. तेथील कट्टा करून कोल्हापूर किंवा निरोळाकडे जावे यैसे म्हणतात.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. २९

श्रीमंताची फौज बढवणीस येऊन लागली होती, त्यापूर्वी मल्हारजी होळकर आपल्या घोडयानिशी बढवणीस चाकरीस राहिले होते. बाहेरील फौजेची मोर्चेबंदी झाल्यावर मल्हारजी होळकर याणी चौदाशे माणसानी बाहेर निधून मोर्च्यांचा कट्टा करून वारापाणी करावे ! अशी तीन महिने लढाई घेतली.

—हो. कै. पृ. ५

खेचवाड्यांत ज्या गढीवाल्यानें गोळी वाजविली त्या गढीचा कट्टा करून तीनशें तीनशें पांचपांचशे माणूस सेकसूखालीं मारले ! नारळ फोडीत गेले. असा निग्रह रवाव पडण्याप्रीत्यर्थ केला.

—हो. कै. पृ. १०

कट्टा होणें—नाश पावणें. कत्तल होणें.

तेथें गोरखियाणी लढाई घेतली. तीन कोस माघारी तलावापरियेंत मारीत आणिले. माणूस वहुत कट्टा जाहले.

—पे. द. भाग ४१ पत्र नं. ३०६

कट—कडबा मोजण्याची विशिष्ट लांबीची दोरी.

फाल्गुनमासपासोन साडेचारशे पावणे पांचशे कट कडबा लागणार.

—पे. द.

कट—आड; अडथळा; हट्ट.

नाईकास इकडे घेऊन यावयाच्या मनसब्यांत होते. परंतु इंदापुरासाठी कट पडला. ऐ. ले. सं. ११६८

कट—बंदुकीची नळी व तिचा बुंधा सांधलेला असतो त्यावर बसविलेले धातूचे वलय किंवा पट्टी.

बरें म्यान, रुप्याचे कट बंदुकीला सार।
बंदुकिचे भरले बार झाले तय्यार।

—ऐ. पो. के. खं २ पृ. १९२

कटक—सैन्य, सैन्याचा तळ.

खानमहमद याचे कोठे ठिकाण आमचे लष्करांत लागत नाही. जरी ठिकाण लागता तरी अलबता सोडून देताविला असता. आमच्या कटकांत बंद धरावयाचो (शत्रूचे लोक कैद करून आणण्याची) पद्धतच नसे हे तुम्हासहि ठावके आहे. तिकडेच त्याचा तलाष करून पाहाणें.

—हिंगणे द. भाग २ पृ. ३१

आपल्या कटकातील बातमीस जोडे (जासूद जोडे) गेले होते तेही आले त्याणी हेच वर्तमान सांगितले. —पे. द. ३० पृ. ३६

सैद हसनखानाचा मेहुणा घसिटखाननामें कटकांत आहे. तो भेटीस आला होता. धोंडोजी कमतर तऱ्हीहि हजार स्वारानसी उठोन स्वामीकडे आला म्हणजे याचेहि कटकांत भरड पडेल.

—पे. द. १० पृ. ६२

कटक तमाम त्याचे मारून लुटून पस्त केले.

—पे. द. भाग २७ पत्र नं. १०७

दीपसिंग वगैरे वकील शहरीं आले. ते थोरले नबाबाचे कटकांत येऊन काल मुलाजमती केली. —पे. द. १० पृ. ७०

मोगल तीन कोसांवर आला आहे. पुढेंहि येत आहे. तरी कटकांत ताकीद करून राऊत पाठविले पाहिजेत.

—पे. द. १० पृ. ४०

विठठ्ल कार्येदेऊ कटकास गेलेपरी मागे ते सेत हाऊजी आरडा प्रज कसबे मजकुर दिवाणीच्या महासुलाबद्दल कीर्दी करून उगवणी करीत होते. —शि. च. सा. खं. २ पृ. १९९

कटकणा—डाव, कपट, अंतस्थ हेतु.

या प्रकारची मसलतहि जनरलास कळवावी. हे अपटणास समजों न द्यावी आणि मसलत मारावी. हाहि कटकणा आहे. तूर्त अपटणानी लिहिले हे तरी प्रत्यक्ष डौल आम्हास कैद्र करावयाचा आहे तेव्हा इंग्रजाचे घरीं

आम्ही आलों असता त्याचे (बारभाईच्या) स्वाधीन आम्हास करुन कैद करवितात हे गोष्ट इंग्रजाचे अभिमानास उचित काय ?

—राजवाडे खंड १२ पृ. ८६

कटकणी—कपट, लुच्चेगिरी.

त्यानीं उत्तर केले कीं आम्हासी जो नीट चालतो त्यासी जिवानसी हाजर आहो. आणि आम्हासी कटकण्या करतील तर आम्ही पातशाहा नवे उभे करणार. जे च्याहू ते करूं. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. २१

कटक ज्योतिषपणाची वृत्ति—सैन्याबरोबर राहून मुहूर्तादि सांगण्याचें काम.

शाहूराजे दिल्लीहून देशी आले त्याजबरावर मुदगलबोवा राजउपाध्ये आले. मुदगलबोवा यांचे श्रमसायास वहुत जाणून कृपाळू होऊन पंडितराई अधिकार व कटक ज्योतिपणाची वृत्तीही दिली.

—द. स. कै. या. पृ. १४५

कटकाई करणें—कटक म्हणजे सैन्य जमविणें.

देवगिरीचे जसगदेवरायाने भोजराये केशवदेवास आंबे धाडिले ते बळेच घेतले. तो वृत्तांत परिसोन केशवदेव याणें आपला भाट धाडिला. मग जसगदेवराव बोलिला जर (की) कोपला केशवदेवराया होईल तर आम्हांस वेसण फोडील,. तेव्हां केशवदेवाने कटकाई केली व म्हशियागड वेढला.

—बिंब ९

कटाव, कटाउ—कत्तल.

राजधरकर दोनचारशे लोकानिसी सामोरे जाला. खुद्द जातीने १०—२० माणसे मारून आपणही मारला गेला. तमाम कटाउ जाला.

—नाग २ पृ. १२७

कटाव—बनाव, कारस्थान.

जरी श्रीमंत जफ्ती मोकूप करून पहिले कराराप्रमाणें वर्तले तरी उत्तम. नाहींतर याप्रमाणें कटाव आरंभिला आहे.

—पे द. १५ पृ. ७५

कंटाळा घेणें—दहशत खाणें; भीति खाणें.

मग तुरकाण झालें. क्षत्री राजे यांहीं कंटाळा घेतला जर (की) याचे हातें (दिल्लीच्या बादशहाच्या हाते) मृत्यु होई तो अधःपातास जाईल, त्यास गति नाही, म्हणोन त्याजसमोर झुंजावयास उभे न राहत !

—बिंब १५

कंटाळेखोर—चेंगट, सुस्त.

आमचे तीर्थरूप यांचा कारभार कंटाळेखोर होता त्यांणीं कांहीं एक

समजोन घेओन करणें कोणतेही केलें नाहीं.
—ऐ. जु. ले. चि. घ. सं. भा. पृ. ४

कटाक्ष—ताकद, जोर, सामर्थ्य.
देशी येऊन फिरुन महायात्रा होण्यास शरीरकटाक्ष व द्रव्य दोन्ही मजपासी नाहींत तेव्हां असाध्यच. कटाक्ष अथवा धन एक तरी अनुकूल असल्यास घडण्याची संभूत. —म. शि. या. का. पृ. ६३१

कटाक्ष—वैर, कलह. कटाक्ष वाढणें--वैर निर्माण होणें.
राजेश्री मुराररराव याचे व मुसाफरखानाचे कटाक्ष वाढले.
—पे. द. २८ पृ. १७९
आवजी कवडे वराड प्रांती आलियावर त्याचे व आमचे कटाक्ष जालियावर मग आवकृपा जाली. —पे. द. २० पृ. ३०
श्रीमंत रा. दादा व श्रीमंत रा. राव या उभयतांच्या चित्तांत विकल्प परस्परें येत चालला. पुढें कलहाचा प्रसंग सत्वरच दिसतो. लोकांचा भोग उभा राहिला असला तर आषाढातच बहुधा उभयतांचा कटाक्ष होईल. नाही तरी पुढे दसरा दिवाळीच्या सुमारें होईल. —इच.सं इ. पृ. १०५

कटाक्ष मिटणें—भांडण संपणें.
लक्ष्मीबाई शिंदे यांचें व अलिजाबहादर यांचें कटाक्ष मिटत नाहीं.
—ऐ. ले. सं. ५७५६

कटाक्ष लागणें—भांडण लागणें.
जाबतेखान शुक्रतालास आहेत. कलूमलून गंगापार आहेत. त्याचा कटाक्ष लागला आहे. —पे. द. भाग २९ पत्र नं. ८९

कटी—कट्टी, कजाखी.
व्यंकटराव यांस आपण फौजसह स्वारीस रवाना केले होते. तिकडे उत्तरेची कटी फौज चालून आली होती. ते नामोहरम (पराभूत) होऊन स्वस्थलास गेली हे महद्कृत्य आपले प्रतापे जाहले.
—पे. द. २८ पृ. ५

कटुबाण—एखादी ओसाड अगर नापिक जमीन वंशपरंपरा एखाद्यास दिलेली असते तिला 'कटुबाण' म्हणतात. या जमिनीवर जो सारा सुरवातीस बसवून दिलेला असतो, त्यांत पुढें केव्हांहि बदल होत नाहीं.

कटून मरणें—लढून मरणें, लढता लढता मरणें.
राजधर कारभारी किल्ल्यावर होता व आणखी दोनचार मातबर माणसें होती. ती कटून मेली. राण्याची धाकटी स्त्री किल्ल्यावर धनी, ती दारू पसरून उडून गेली. वरकढ लोकांनी कौल घेतला.
—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १६९

कटेचुर—(?)
अवतरणा करिता 'तोटा' शब्द पाहा.
—नाग १ पृ. १८४

कंठणें—क्षीण होणें, जीव कंठापर्यंत येणें.
श्रीमंत मातोश्री पार्वतीबाई फारच कंठली आहेत. हत्ती वगैरे दानें झालीं. ईश्वरकृपा करील तरच भरंवसा. —ऐ. ले. सं. २३५७

कंठाळ—१कंठाळी. जनावराच्या पाठीवर दोहो अंगास सारखी बसेल अशी पडशी गोणी किंवा बारदान. २ ओझें, बोजा.
हें बोलिलें कीं आम्हीं लुटलें गेलों. घोडे कंठाळ अगदीं गेले.
—हो. कै. पृ. १३३
वेढा उठोन गेला दोन चार दिवस जाल्या–उपर खत मोरो नारायण याजपासून जबरदस्तीने घेतले आणि कंठाला किलियात ठेविल्या आहेत.
—चं. चू. दं. पृ. १६६

कठीणगड—उर्फ तुंग.

कड्या विकड्या—कडोविकडीच्या, वेड्यावाकड्या, अनर्गळ.
त्याणीं काशीराव होळकर यांच्या कड्याविकड्या आचारविचाराच्या गोष्टी सांगितल्या. तोंपावेतो काशीरायाविशी महाराजांच्या मनांत विकल्प नव्हता. —हो. कै. पृ. १५३

कडकणें—कणकेची पोळी.
घटलक्ष्मी मोकदमाचा, त्याचे कायदे, घटावरील कडकणें, अमुक अमुकानी घ्यावें. —ऐ, सं. सा. खं. ३ पृ. १३०

कडनिकड—हल्ला; निकराचा हल्ला; कस्त.
तात्यासाहेब माघारीं फिरण्याची योजना करतात तों लोकांनीं धर टाकिला! फौजेच्या चलका सुटल्या, तेव्हां सरदारांनीं काय करावें! कोणास कोणी पुसेनासें झालें. लोक भणाण होऊन जिकडे तिकडे पळाले, तशांतहि शिवराव घोरपडे यांणीं तोंड लावून कडनिकडी बऱ्या केल्या, परंतु उपराळा त्यांस कोणाचाच झाला नाहीं.
—ऐ. ले. सं. २७८८
खासा स्वारी गेल्यानंतर कडनिकड करून गोकाकचें ठाणें घ्यावयाचा बेत आहे. —ऐ. ले. सं. ५६१९

कडलगपण होणें—दरवाजावर असणाऱ्या कड्यालग्यावर चढून जाणें.
दरवाजा बळाचेच (जबरदस्तीने) हातीं घेतला. बाकी दहा पांच माणूस दरवाजियास जाऊन कडलगपण होऊन आंत उड्या टाकाव्या तों आंतून मारा जाला.
—पे. द.

कडवई—एक वनस्पति.
कडवईचीं पानें म्हणजे गुरूं अगर कोणी खातें तर तत्काल मृत्यु प्राप्त होतो. तीं पानें मी श्रीसन्निध सेविलीं. —ब्र. च. पृ. २५९

कडसणी—पेच, पेचपांच, कवाईत.
उभयेता सरदाराच्या कामाकाजाच्या व बोलण्याचालन्याच्या कडसण्या सर्व श्रीमंतांच्या ध्यानांत आहेत.
—पे. द. भाग २९ पत्र नं. १८६

कंडा—घोडयाचें कंठभूपण.
—रा. व्य. को.

कडा उडणें—कडयावरून उडी मारणें किंवा कडा उतरून जाणें.
किले गडगडा अमवाशेस आदितवारी फते केला. मोगलाकडील बाराजण ठार जाहले. कांहीं कडा उडाले त्याचा शोध केला नाहीं. सोध करून लेहून पाठवितों. —पे. द. भाग १७ पृ. ९५

कडाकोट—कडेकोट.
तो कडाकोट जमून गोलच्या गोल उभा राहिला. तेथें हिरीरी करून साध्य नाहीं ! न उठला (हल्ल्यास उठला नाहीत) ही फार सरस गोष्ट झाली. —ऐ. ले. सं. १५५८

कडागी—कणकण, कसर, बारीक ताप.
मुनसीजीस बोलिले जे माझ्या अंगांत कडागी आली. मुनसी गेल्यावर धुरंधर लहू–संक्यास करावयास गेले, लहू–संक्या होऊन पाण्याचा गुळणा केला तो अकस्मात हींव वेत-हाच आलें. येणेप्रमाणे वाखा जाला आहे.
—नाग २ पृ. १४८

कडाचूर—आपल्याच नादांत गर्क.
त्या छायेंत बाजीराव जातीनें स्नान करून भोजन करीत होते. दहावीसच स्वार बरोबर. तितक्यांत मल्हारजी होळकर लबार भरून पाचशे स्वार कडाचूर आडरानाने आले. बाजीरावास पाहून गराडा घातला. रायाचे छातीस भाला आणून भाषण केलें कीं ते दिवशी तुला ढेंकूळ मारले आता भाला पार करतो ! तुझा वाली कोण ? —हो. कै. पृ. ४

कडाड—दुष्काळ; महागाई.
तांदूळ अधोलीप्रमाणें, परंतु तेहि मिळत नाहींत. मोठा कडाड आहे.
—ऐ. ले. सं. ११७४

कंडापट्टा—कंडा आणि पट्टा मिळून घोडयाच्या मानेवर व डोक्यावर घालावयाची कांहीं भूषणें.

कंडा—घोडयाच्या गळयांत बांधावयासाठी पोटी तंतू आणि त्यास बाहेरून सखलाद इ. वस्त्राचा तुकडा लावून करितात जे भूषण तो कंडा (शास्त्रीकोश)

१ घोडा तुर्की; सामान चांगलें; कंडापट्टा सांखळी सोन्याची; येणेंप्रमाणें नजर श्रीमंतांस मुधोजी भोसले यांनीं केली.

—ऐ. ले. सं. २६२५

२ खंडेराव यादव जखमा लागोन मृत्य पावले. त्यांचा घोडा, देखील कंडापट्टा घेऊन गेले.

—E. M. P. पृ. २८

३ घोडयावर सामान कंडापटा व साखळी वगैरा बरेच होते.

—पे. द. २५ पृ. ७३

कडी बसणें—जम बसणें, काम होणें,

यास खर्चाचे आनकूल आसल्यावर कडी बसेल कारण येथें द्रव्याचा कारभार आहे.

—पे. द. ३३ पृ. २८४

कडुसर—कडोसरी; कमरेचा भाग.

तिसरी भालेची जखम कडुसरावर लागली. एक जखम कुशीस भालेची भारी आहे.

—ऐ. ले. सं. ६६३५

कढ सोसणें—गैरसोय किंवा त्रास सोसणें.

तूर्त मनोळी शिंदे यांचे हवालीं करा. पुढें शिंदे देशांतून गेल्यानंतर करवीरचें पारिपत्य करावयाचें, यांत दिक्कत नाहीं. चार महिने माझेसाठीं तुम्ही कढ सोसा. हरकसेंहि करून शिंदे यास देशांतून लावून देतों, असें श्रीमंत बोलिले.

—ऐ. ले. सं. ६९५५

कण्याचें रोप—१ कणा म्ह. एक झाड. २ पिंपळी नांवाची वनस्पति. ३ कणाक-कळक बांबू.

स्वामींनी आननासे व कण्याचें रोप पाठविलें तें पावलें.

—पे. द. १८ पृ. १३

कण—धान्य किंवा अन्न.

आणखी तुमचें मीं फारसें मागत नाहीं; परंतु मीठ तरी पोटभर वीस खंडी खाऊं द्या. कण खाल्ल्यास त्याचें उतराई होत नाहीं. याचकरितां मीठ मागितलें असे.

—ब्र, च. पृ. २५१

कणसाळे—मळणीच्या आधी धान्याची कणसें व्यवस्थित उडव्यासांरखी रचून ठेवितात, त्यास कणसाळ म्हणतात.

गांवच्या रानांतील खळीं कणसाळे कडबे लुटून नेले. अनिवार लष्करचे कहींचे लोक.

—ऐ. ले. सं. ३८४८

कत्ल—कत्तल.

कतरवाकई—खातरखाई- समाधानकारक, यथास्थित.
लेहून दिघले त्यावरुन त्यानी वाका दाखल केले आमा हकीकती सदरहू-प्रमाणें कतरवाकई आहे दुबारापैकी रयेतीस पडिला नाहीं.
—शि, च. सा. खं. २ पृ. १२९

कतलाम—(कतल ई आम) सर्रास कत्तल, विजन.
गोळी न वाजवितां शहर दिले यास्तव कतलाम केलें नाही.
—खरे पृ. ३२

कतवार—कातवार लमाणासारखी लष्करास धान्य पुरवणारी, बैलांचे तांडे पाळणारी एक जात. लक्षणेनें कतवार म्ह. बिनलढाऊ लोक; कचरा.
सरदार सर्व बोलाऊन खातरजमा करून घ्यावी. किल्ल्यांत ठेवणे त्यांची नेमणूक याद करून ठीक ठेवावी. किल्ल्यांत कतवार असेल ते दूर करावे.
—पे. द. भाग २९ पत्र नं. १५१

खासा मोगल साठसत्तर हजार फौज व कतवार येक लाख आहे.
—E. M. P पृ. ६७

कथला—भांडण.
तुवा पुरंधऱ्यासी उगाच कथला करून उपद्रव देतोस तरी त्यास उपद्रव द्यावयास गरज काय ?
—पुरंदरे दप्तर भाग १ पृ. ५

कथलाकुसूर—हिल्ला हरकत, भांडणतंटा.
जो कोणी कथलाकुसूर करील त्यास गोहत्येचे दोष असत.
—पुरं. द. भाग १ पृ. ६२

कद—लायकी.
याद्या पाहून श्रीमंतांनी उत्तर केले रावजी महादेव पारनेरकर याची दौलत कोणास डोळे असल्यास त्रिंबकेश्वरी जाऊन पहावी ! कारकुनाचा कद किती ! असें बोलून यादी आपले हाते फाडून टाकल्या.
—हो. कै. पृ. ५४

कद—१ कापडाचा एक प्रकार २ वस्त्र संख्या.
लांडगे यांचे निशानबद्दल ताफता येक कद, निम्मे लाल व निम्मे हिरवा पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे.
—पे. द. ३४ पृ. १२

कदम—पाय.
त्याप्रमाणें इंग्रजांचा कदम दौलतींत पोंचला असतां कोणाचेंच महात्म्य राहत नाहीं. इंग्रजांचा कदम दौलतींत शिरू न पावे, असें व्हावें.
—ऐ. ले. सं. ७७५५

कदंबोस—पायाचे चुंबन घेणारा, भावार्थ पायां पडणारा.
प्रथम दर्शनी मोगलअल्ली नबाबापाशी येताच कदंबोस झाले.
—रा. खं. ५ पृ. १९१

कदमदराजी—पाऊल उचलणे, चाल करणें, पाय शिरकवणे.
आताही (अजूनहि) कांही गेले नाही लवकर शामील फौज होत व हुजूरची मजब्बुती सर्वप्रकारें रक्षिल्या काय ताव (हिंमत) असे कीं कोणी कदमदराजी करील ?
—हिंगणे द. भाग २ पृ. ३७

कदर—मर्जी.
आदरें करुन विनविता कदर का कठीण करिता तुम्ही ।
—प्रभाकर पृ. १२१

कदर—सामर्थ्य.

कदर करून देणें—करार करून देणें.
आपणांकडे फौजेचे वेगमीस सरंजाम कदर करून दिला.
—पे. रो. स. मा. भाग १ पृ. १५५

कदरदान—गुणग्राहक, पारख करणारा, जरबवान.
कदरदान वसली साहेब.
—खरे

कदरदानी—सामर्थ्य असणें, प्रतिष्ठा, वोज, चीज.
तेव्हां जे त्याचे खावंदगिरीस व कदरदानीस उचित तेंच करितील.
—रा. खं. ३ पृ. १२०
आम्ही फौजेच्या वळानें दम धरून आहों. पुढें हरिसत्ता प्रमाण ! सेवेची कदरदानी करणार धणी समर्थ आहेत.
--ऐ. ले. सं. १३४२

कदरबंदी—निष्ठा, शिस्त.
सर्वप्रकारें नफा किफायत सरकारची व्हावी अशी ज्याची कदरबंदी त्याचें करणें त्याच धोरणावर अनुक्रमें चालत असतें.
—म. शि. यां. का. पृ. ४८९

कदलबाश—कझलबाश. एक प्रकारची लालटोपी घालणारे इराणी सैन्यांतील कडवे शिपाई.
पूल तयार जालियानंतर पाच सात हजार कदलबाश वगैरे खंडेरायाबराबर देऊन पार (पलीकडे) पाठऊन रसद बंद करावी.
—हिंगणे द. भाग २ पृ. ९

कदाक—कदाचित्.
बाबास आराम फार नाहीं. पुढे जाणेची जलदी फार आहे. कदाक भेटीची अपेक्षा असली तरी धर्मपुरीस घडेल.
धा. प. इ. सा. ३ पृ. २५३

कदाच—कदांच, कदांचित्.
दुसरें याची स्वारी पनाळा गडावर सडी जाणार यैसे म्हनतात. धमकावनी देतात, कदाच गेले तर स्वारीत घोडी वसावयायोगें नाहीं.
—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १०

कदिमल अयाम—पुरातन कालापासून.
कदिमल अयाम शेणवी मजकूर याचे पिढी दर पिढी भोगवटा चालिला आहे. ---गोमांतकाच्या इतिहासाचीं साधनें. पृष्ठ १२

कंदिल---खुर्चीसारखें आसन, कोच.
कंदिलें आणिलें आहेत. त्यावर इंग्रज वकील बसत असतात. व उभयतां कारभारीहि (नाना व बापू) बसत असतात. फार भागले म्हणजे भुईवरहि बसत असतात ! —ऐ. ले. सं. २४८३

कदीम—कदम, पाय. कदीम घालणें--प्रवेश करणें.
जावजी दाभाडे याही त्या प्रांतात कदीम घातला.
—E. M. P. पृ. ३५

कदीम—जुना, जुनी, जुनें.

कदीमलयाम—पुरातन काळापासून.
देशपांडे यांनी सिवाजीराजे साहेबास अर्ज केला कीं, तर्फ कर्याती मावल देसपांडेगिरी अहदमुदती कदीमलयाम आपलिया वडील वडिलांची आहे.
—पे. द. ३१ पृ. १७१

कदीमह—जुनी.

कदीमी, कदिमाई---१ जुना लौकिक, २ जुना स्नेह, ३ जुनेपणा.
आपल्या कदिमाईस बोल न लागे तो विचार करणें.
—रा. खं. ८ पृ. ११९

सरकारचें काम होऊन येईल परंतु तुमचे कदीमीस व निष्ठेस एक प्रकारे दिसेल. —रा. खं. १ पृ. ३३५

कदीमुल अकाम---मूळ शब्द ' कदिमल अय्याम ' असा आहे. त्याचा अर्थ पुरातन कालापासून.
अवतरणासाठीं ' लघमुरा होणें ' शब्द पाहा.
—दस. शि. मो. इ. पृ. ३४

कंदी —उदी किंवा पिंगट रंगाचे.
श्रीमंतांनीं वस्त्रें कंदी तिवट व दुपेटा कंदी रंगाचा दिल्हा.
—ऐ. ले. सं. ७५०९

कंदी रुपाया—रुपयाचा एक प्रकार.
श्रीचे ऐवज कंदी रुपये, मोहरा, पुतळ्या जें असेल तें रवाना करणें म्हणोन आज्ञा.
—रा. खं. ३ पृ. ३८

कंदुरी—मांस, सागुती.
त्या कंदुरीची पुण्यें जाली ते करामत देखोन
—महिकावती बखर

कंदुरी करणें—जत्रेस बकरें वगैरे बळी देणें.

कंगुरह—कंगोरा.

कनार—अणकुचीदार लोखंडी त्रिशूळ, हत्तीच्या कानांमागें टोंचण्यासाठीं.

कनोडा—दाब, दमदाटी, दहशत, आक्षेप.
आपले प्रतापेकडून माजीवर (माझ्यावर) कोणाचा कनोडा नाहीं. हिसेब मनास आणिता सर्व निदर्शनास येईल.
—हिंगणे द. भाग २ पृ. २९

कपकलस—टोंपण व कळस.
आत्फागिरीची दांडी व वसनातील कपकलस व चिपली ऐसे कोणी येईल त्याब ।। पाठविणें.
—पुरं. द. भाग १ पृ. ७७

कपडे—पोषाख, वस्त्रें, लुगडीं.
सर्व मिळोन प्रतापपुरी दिवाणास भेटले मग दिवाणानें देसायास कपडे दिधले, समस्तास पानें दिधलीं, मग आपापल्या स्थळास गेले.
—पा. क्ष. ज्ञा. इ. पृ. १९

कंपश—कमीअधिक, सुमारें, अदमासें.
मिस्तर फारस्तर येऊन दाखल जाले. सेनासाहेबांनी शहरचे पूर्वेस नानसेट कलाल याचे बागांत जागा तूर्त राहावयास दिल्ही. कंपश कोसभर आहे.
—नाग. २ पृ ७५

कपाल निवडणें—दैवांत असेल तें उभें रहाणें.
आला तर जाऊन. विचारे करून आपणांस अर्थ साध्य होयेसे करून. परंतु त्याचे कपाल काय निवडेल ते न कले.
—पे. द. ३४ पृ. ४

कपाळास कांठीं घेणें—वैतागणें.
आमचे हातचा हत्ती घेऊन गेला म्हणून आम्ही कपाळास काठी घेऊन वरघाटें आलों.
—ब्र. च. पृ. २६४

कपाळास काठी टेकणें—कपाळास काठी घेणें; वैतागणें.
मी तुमच्या राज्यांतून जात होतों. कपाळास काठी टेकून वैतागोन जात होतों. परंतु राजापुढें विलाज नाहीं.
—ब्र. च. पृ. ३३५

कपाळीं भद्दा असणें--(मूळ वाक्प्रचार कपाळीं भद्रा असणें. अगदीं मूळ अर्थ शुभ लक्षणाची, किंवा चांगल्या नशीबाची असा. परंतु पुढें त्यास अगदीं उलट अर्थ आला. कपाळीं भद्दा असणें म्हणजे वैधव्ययोग असणें, कपाळकरंटी.)
लग्न होणार होतें परंतु सांगणारांनीं महाराजांजवळ जाऊन सांगितलें की महाराज मुलगी चांगली आहे परंतु कपाळी भद्दा आहे, त्याजवरून सोयरगत करावयाची राहिली, पुढें शिंदेराव यांचे मुलीनें नवरा केला नाहीं. ---दस. शि. मो. इ. पृ. ५

कपि—पुस्ती किंवा जोड (फुटलेल्या लाकडास देतात तो).
दोनतीन गलबतें कपीस आलीं होतीं, त्यास सुतार देऊन कपीया पुरवून करून दिल्या. --पे. द. ३४ पृ. ९४

कपित्थफळ—कवठ.
—पे. द.

कपूरीमेणबत्ती—a candle of the best or whitest wax.
अत्यंत शुभ्र अशा मेणाची बनविलेली उंची मेणबत्ती.
४२०।। यैन खरीदी मोमबत्त्या कपूरी, पेट्या सुमारी ६
--पे. द.

कंपू—युरोपियन सरदारांच्या हाताखालीं कवाईत शिकवून तयार केलेले पायदळ पलटण.
हें वर्तमान पाटीलबावास समजताच लखबा शेणवी याजबरोबर कंपू व फौज देऊन गुलाम कादराचे पारपत्यास रवाना केले. —हो. कै. पृ. ९८

कंपेश—बरहुकूम
सल्ला झाल्याप्रमाणें वर्तणूक कंपेश न केल्यास पारिपत्य होईल.
—ऐ. ले. सं. २६०७

कंपेश—सहज, विनायास
श्रीमंताचे राज्यांत अपस्वार्थाकरितां बखेडा करावा ही नेक सल्ला नाहीं. असेंच करणें असतें कर कंपेश वरखाचा आरसा होता.
—इ. सं. हो. कै. पृ ६

कँपेश—कमी अधिक.
पेशजीच्या तहनाम्यांत कलमें कंपेश आहेत ती नीट करण्याविसी व आणखी कलमें नऊ स्वामीकडून लिहीली आली. —म. शि. यां. का. पृ. २६४
नबाबाजवळ कमपेश २०,००० फौज आहे. —ऐ. ले. सं. ४७५८

कपोई—घोड्याची मल्लमार्जनी.
घोड्याची मालिसी किंवा अंग रगडण्याचें एक साधन. रा. व्य. को

कफ्षदोज—'पादरक्षाकारक,' चांभार. —रा. व्य. को.

कफन—मृतावर घालण्याचें वस्त्र.

दर्याप्पा ठार झाला. त्यास कफनास ५ रुपये देणें. —ऐ. ले. सं. ३५१२

राजश्री रायासी (थो. बाजीराव) देवआज्ञा जाली त्यास कफनास सेला साधा बालापुरी १ येकूण रुपये १५. खोड चंदनाचे ता। महादाजी नारायण कुंटे राजश्री रायास दहनास खोड भार सुमारे १ (२८-४-१७४०) —पे. द.

कफा--अफूच्या बोंडाच्या रसांत भिजविलेलें फडकें. असे कापडाचे तुकडे इतर कापडगठ्ठ्यांत घालून चोरटा अफूचा व्यापार होई.

कफारत—विरुद्ध, तंटा, संशय.

आमचा वसवसा (संशय) काडीमात्र न धरता एकदिल होणे. इराणीचा हिशेब कोण धरतो ? आमचे खातरेत नाहीं. तुम्हाजवळ आम्हा विषयीं हरएक बाबेविशी कफारत पडते. त्या गोष्टीवर न जावे. तुम्ही मुरबी सर्व जाणत असतां अगदी छान (छाननी) न केला. नजरेनें पाहून मग आम्हास दोष ठेवावा. —पाणि. बख. पृ. १४

कफालत--हमी किंवा जामिनकी, तारण.

हे दफा कफालतीचे अहदनाम्यांतील नाहीं. —रा. खं. ७ पृ. ९४

कफावत--कज्या, तंटा, भांडण.

१ त्याचा हेत जे नागपुरीच कफावत करावी. यामुळे जें होणें ते हो. —पे. द. २० पृ. ९५

मेस्तर बैट याची व नानाकडील शिलेदार यांची कलागत जाली. शिलेरादानें हत्यार धरले. बैट याणें गोळी घालून २ घोडीं ठार केलीं. कफावत अजून वारली नाहीं. —ऐ. ले. सं. ५१०२

कफेदस्त--वाळवंटीचें सपाट मैदान.

प्रहर दिवसास मस्त हाथी मौजे भांबरडे पुण्यानजीक तेथील कफेदस्त मैदानांत, हाथीचे गंडस्थळीं चिरकुठाचा पुतळा बसऊन सोडला होतां त्याची सयेर (मौज) सातमजली बंगल्यावरून दुर्बीनींतून तिसरे प्रहर पर्यंत श्रीमंत (स. माधवराव) पाहात बसले. --पुणें अखबार भाग ३ पृ. १४४

कब्ज—कब्जा, हस्तगत होणें, पावती.

कब--कव.

श्रीमंताचें पुण्यप्रतापें बादशहा कवेत आला. तेव्हां पदे साधावयास लागलो. --म. शि. यां. का. पृ, ५६६

कंबक्ती—दुर्दैव, नष्टचर्य.

ठाईठाई त्यांस ताण बसवावे ऐसें ठरविलें, त्यांतच त्यांची (इंग्रजांची) कंबवती आली हें समजावे. —इ. सं. ऐ. टि.

कबज—पावती.

राघो महादेव कारकून ह्याचें पदरीं ५ हजार रुपये घालून कबज घेऊन दप्तरी ठेविले. —पे. द. ८ पृ. ११

ठाणीं कमावीसदाराचे स्वाधीन करून त्याचीं कबजे हुजूर आणून आम्हांकडे पाठवावीं. —ऐ. ले. सं. २३७४

कबजगिरी—ताबा, अम्मल.

अलीकडे या राज्यात कबजगिरी आधी जाली ते गांवीं ठाणें बैसवून तरफा (तर्फा) केलिया आहेत.

—रा. खं. १५ पृ. ७८

कबजा—तरवारीची मूठ.

कबजी—ताब्यांतील, अमलांतील.

लष्कर पावसाळे दिवसांत छावणीस आपले कबजी देशांत यावें.

—चित्रगुप्त पृ. ३६

कंबरबंदी करणें—बद्धपरिकर होणें, चढाई करून जाणें.

बिकानेरकरावर कंबरबंदी करून गेले. शहर लुटले, किल्ल्यास महासरा केला आहे. —हिं. द. खंड १ पृ. १८

कंबर बांधणें—(एकाद्यावर) एकाद्यावर चढाई करणें.

सेनासाहेबाचे बोली आहे कीं श्रीमंतांनीं लेकरावर कंबर बांधली आहे.

—पे. द. २० पृ. १५८

कबहात—कबाहत-दोष, गुन्हा, कुभांड, तंटा.

शपथ न दिली तर कबहाती फार आहेत तेव्हां करणें प्राप्त. त्यापक्षी शपथ दिल्यास चिंता नाहीं. —म. शि. यां का. पृ. ६१

कबाड—कहीकबाड, वैरण व लांकूडफांटा.

या स्थलास आल्यापासून सुखी नाहींत. कबाड तीन गांवां गेलें ! (बारा कोसांवरून लांकूडफांटा आणावा लागतो.)

—ऐ. ले. सं. १७०६

कबाडाचें तटू येक व पडीथळाचे तटू येक.

—चं. चू. द. पृ. १३७

कबाड, काबाड—बैलावर मावेल येवढें गवताचें किंवा लाकडाचें ओझें.

कबाडखोत—सर्पण पुरविण्याचा मक्ता घेतलेला इसम.

कबाड बांधणें—लांकूडकांटा गोळा करणें.

शत्रू नवलगुंदकराच्या गांवावरी कहीस येऊन गांवांत शिरून कबाड बांधीत असतां, गांवातील लोकांनीं गोळ्या मारून पिटून बाहेर काढिलें.

—ऐ. ले. सं. २८६२

कबायिल (अ)—काबिल, योग्य.

कबालत, कबाला—सनदशीर रीतीने केलेली विक्री.

देशमुखी आपली आपण खुपरजाबंदीनें, कबालतीनें फरोवत करून दिल्ही.

—रा. खं. १७ पृ. १

कबाहती—दोष, व्यंग, गुन्हा, कुभांड, तंटा, अडचण.

हें त्यास समजतांच किती दाव कमी पडेल! दुष्मानास राजकारणास जागा होतो. (होते.) ऐशा कबाहती.

इ. सं. है. टि. द. पे. व. कृ. ना. जो. यां. प.

कबिले माही—महिन्यापूर्वी. —रा. खं. १० पृ. १६४

(पटवर्धनकोश)

कंबेशी--कपेशी, कमी करणें, कुचराई.

अवतरणासाठी 'इलजाम' पाहा. —हो. कै. पृ. ४०

कंबेशी—कलह, चुरस.

तेव्हां सुभेदाराने विचार केला येथें राहून आपसात कंबेषी उत्पन्न होईल म्हणोन चार दिवस जयपूरचें राज्यांत काढावे खंडणीही घ्यावयाची आहे, अशी सबब सांगून कूच करून जयपूर प्रांतीं आले.

—हो. कै. पृ. १११

कमअकली—बेअकलीपणा, मूर्खपणा.

ते वक्ती त्या पोरानें कमअकली करून मशारनिलेवर चालून येऊन बेअदबी केली. —ऐ. सं. सा. खं. १ पृ. ११९

कमइज्जत—अप्रतिष्ठा.

असा गैरहिसाबी जाजती सोसून, कमइज्जतीनें व गैरमेहेरबानी पेशजीही खिदमत केली नाहीं व पुढेंही न करूं. —इति. मं. पृ. ६७

कमकदमी—पिछेहाट, पराभव.

सिंद्याकडील प्रकार दिवसेंदिवस कमकदमीचे वर्तमान येतात याचा विचार राजश्री नाना व राजश्री तात्या यांस सक्त पडला आहे.

—नाग २ पृ. ९५

कमकसर—कमजास्त. कमी नाहीं तरी; किमान.

नबाबाबरोबर फौज व पायदळ वगैरेसुद्धा एकंदर जमीयत कमकसर लाख सवा लाखाचा अदमास. --ऐ. ले. सं. ७३५५

कमची—छडी, जिनें फटके मारतात ती.

चिमणाजी खंडेराव यास कमच्या २५ मारल्या.

—ऐ. ले. सं. ६५२४

कमजवाद—कमजास्त, कमीअधिक. फेरफार.

अशीं पत्रें येतात, त्यापक्षीं २ दिवस कमजवाद, परंतु मसलत होते.

—ऐ. ले. सं. ६६४४

खानानें जहागीर व स्थळें कबूल केली आहेत. ती येथिल्या दस्तावैजा-प्रमाणेच केली आहेत. त्यांत कमजवाद करूं सकत नाहीं.

—पे. द. २० पृ. ११३२

तैनात पाहून मागूस होतें व शेराहि तसाच बनतो. शिरस्त्यास कमजवाद नाहीं. —ऐ. ले. सं ४४०३

दादासाहेब पुण्यास आल्यावर मुलकाची वाटणी कमजवाद जाहली, असे बोलोन गायकवाडांची वाटणी तेलाडी व अमरोळी वगैरे महाल दोन लक्ष चौपन्न हजाराचे होते ते घेतले. —गा. ह. का. सं. पृ. ४६

हें इतके मीं लिहिल्याचें स्मरण आहे. कमजवाद चार अक्षरें जीं असतील तीं. परंतु मजकूर हाच. —ऐ. ले. सं. ४६१६

कमत—१ घरच्या बैलांनीं परंतु मशागतीस दुसऱ्या लोकांची मदत घेऊन केलेली शेती. २ प्रत्यक्ष इनामी नसली तरी जवळ जवळ त्या सारखीच असलेली जमीन. हीं कमतें सरदार किंवा इनामदार लोक मजूर लाऊन किंवा लोक वेठीस धरून कसून घेत. ३ घराऊ शेती; कुळंबावा.

—महाराष्ट्र शब्दकोश.

१ घोरपडे यांचें घर सावशींत आहे तेथें कमतें व शेते फार केलीं आहेत

—ऐ. ले. सं. २७६८

२ लाट व रांगोळी दोन गाव इनाम व देशमुखी व सरदेशमुखी व कमते आहेत त्यास तुम्ही एकंदर उपद्रव न देणें.

—इ. सं. इ. पृ. १५०

कमतरीन—कमीत कमी, किमान.

या खेरीज सिबंदीचे कमतरीन पन्नास लक्ष देणें आहे त्याची वाट जाहली पाहिजे. —राजवाडे खंड १२ पृ. ८७

कमती बढती—कमीपणा व सरशी; सरशी निरशी.

बाजारी अफवा (कीं) बाळोबा तात्यांच्या कारभाराची कमती, घाडगे यांची बढती आहे. —ऐ. ले. सं. ६३६४

कमतें कमतनु—जहागीरदार, इनामदार जें शेत खंडानें करावयास न देतां स्वत:कडे ठेवून स्वत:च्या देखरेखीखालीं कसून घेतो तें.

कमन्द—जाळें.

कमन्दअन्दाझ—जाळें टाकणारा, शिकारी.

कमपेश—किमान , कमीत कमी.

हरवा अण्णा घरास येऊन कमपेश आठ महिने जाहले, त्यास प्रायश्चित्त दिल्याचा लौकिक तरी करावा. --ऐ. ले. सं. ३००८

कमबाजी पडणें--कमी होणें, उणा पक्ष होणें.

सारे रांगडे गैरसमय पाहून व कमबाजी पडली (असे) देखोन आपले जागा गर्वारूढ जाले आहेत. --हि. द. गंठ १ पृ. ११९

कमबेस—कमवेश, कंपेश, कमीअधिक, सुमारें.

आम्हापासीं फौजपागासुद्धां अडीच तीन कमबेस. आपला गारंजास थोडा. ---ऐ. ले. पा. स्मृ प्र. पृ. ७

श्रीमंतांचे दर्शन होऊन कमवेश वीस रोज क्रमले.

—प. शि यां. का. पृ. ६

श्रीमंतास ब्रह्मानपूरचे रंगाचा पोपाक व बाळाजीपंत व इतर दहा आसामीस हरयेकास पैठणीसेला व मुंडासें मरातिबाप्रमाणें कमवेश किमतीची दिली. —पुणें अख. भाग २ पृ. ४९

कमर्गा, कंबर्गा—सैन्याचा मध्य विभाग, कटिभाग किंवा मध्य.

भेटी घेऊन श्रीमंतांस खालीं किल्ल्याच्या कमरग्यांत चौक्या आहेत, तेथें घेऊन आले. —खरे पृ. ३१९३

कमर—कंबर.

नित्य मार द्यावा, एके जिन्यांत सर्वत्रांस रात्री कोंडावें व प्रात:काळी मार द्यावा. यामुळें एका दोघांची कमरेंही जाया जालीं. याची छान (चौकशी) प्रवरासंगमचे मुक्कामी होऊन रुजूवात घेतली.

—इ. सं. पे. द. स. प. मा. पृ. ३०८

कमरखंजर—तरवार अडकवण्याचा पट्टा.

कमरखुलाई—एखाद्यास सक्तीने पुढें घालून आणण्याकरितां जो सरकारी शिपाई बेलिफासारखा पाठविला जातो, त्यानें थोडी गय करावी, कंबर सोडून जरा अवधि द्यावा, यासाठीं त्याला दिलेली लांच.

मसाल्याचे राऊत ५ असामी यांनीं कमरखुलाई म्हणून घेतले-१२ रु. पैकीं, १० रु. कमरखुलाई व २ रु. खोजगिरी.

—ऐ. ले. सं. २८६८

कमरछोडी—कमरखुलाई.

आज कंपूचे लष्करांतून स्वार ' ।सदाप्याचें बोलणें आहे तर पाटील

कुलकर्णी हुजूर येणें, आणि मसाला १०० रु. देणें ' म्हणोन रोखे घेऊन स्वार येऊन तूर्त मसाला व कमरछोडी द्यावयास पाहिजे. या विषयीं खर्च तो मनस्वी. त्यास कांहीं मोताद नाहीं.

—ऐ. ले. सं. ६६५२

कमरबंदी—जोर, अवसान.

जावसाल करावयाजोगें उत्तरें चांगली असतां तिकडे पाटीलबावाशीं तुम्ही करीत नाहींत, आणि मोठी कमरबंदी इकडेच ल्याहावयाची चालते. मोठें अपूर्व आहे. —म. शि. यां. का. पृ. ५०१

कमरसाल—तलवार लटकवितात तो कमरपट्टा.

कमसखुनी—मितभाषी.

हे बरे मर्द आणि कमसखुनी भले माणूस नेकजाद. दाऊदखानाचा वाका जालियावरी तवाईखाली आले. —पे. द. १७ पृ. १२३

कमाऊ—विकत घेतलेले (भावार्थानें) सर्वस्व वाहिलेलें, एकनिष्ठ; धन्याचा फायदा करून देणारे.

आम्ही चाकर स्वामीचे कमाऊ आहोंत. स्वामीचे चार पैसे खराब करावयाचे नाहींत. —रा. खं. ३ पृ. १२३

कमाणमारी—धनुष्य चालविणारा तिरंदाज.

—चित्रगुप्त पृ. ३०

कमानदार—जखमा शिवणारा, शल्यतंत्री.

नंतर दाजी गोटास आले तेव्हां सरकारचे कमानदार वगैरे जखमा शिवणारे श्रीमंतांनीं पाठवून दिले. —हरि वं. ब. पृ. १०

कमाल—पलटण.

३०–३५ हजार स्वार जमा करून करोड रुपये खर्च खाऊन, गाडदी व फिरंगीचे कमाल घेऊन आले. बकसी तीन हजार स्वारांचा बुडविला.

—E. M. P. पृ. ९९

कमाल—पूर्ण. जसे, कमाल आकार म्हणजे पूर्ण आकार, जास्तींत जास्त आकार.

कमी करणें—अंगचुकारपणा करणें.

झूज जाहलें ते समयीं अंगेजणी झाली नाही, म्हणून नाना प्रकारें व्यंगोक्तीच्या गोष्टी बोलतात ! कोन्हेररायांनीं ते समयीं कमी केली असें लहानथोर म्हणतात. —ऐ. ले. सं. २३४०

ऐशास पन्नाससाठ हबशास पाठ देऊन कमी केली आणि आपण क्षमा करितात. हेंहि अपूर्व आहे. —पे. द. ३३ पृ. १६

कमीन—१ अगदी हलक्या दर्जाची २ स्वतः ३ बंदा.

कमीनाचे बाईल व मुल बनाम कमली व राम ऐसे दस्तगीर होऊन

—मंडळ द्वि. सं. वृत्त पृ. ५०

ऐसे असुनू लाईनी फिर्यादी करिताती. कमीन विलायतीस (मुलूख जमीन) गस्ती करा, कौल द्या, लावणी करा म्हणताती.

—म. द. रु. ३ पृ. ४४

दिवाण काम चालवीत नाहीं तरी कमीन रात्रंदिवस ठाणीयांत देसकुळकर्णी बहजहती ठेविला आहे व कमीनाचा गांव दीड कोस आहे तेथुनु एका दो रोज येतो.

—म. द. रु. ३ पृ. ४६

कमील—कमीन, क्षुद्र नौकर.

हें संस्थान पूर्वीपासोन श्रीमंत स्वामीचे पदरचें असून आज्ञानुसार वर्तत येतो. स्वमीनी पूर्ण ममता ठेऊन कृतोपकार वडऊन कीर्ति घेणेस, सकल भार कमीलचे असता (या कमीलचा सकल भार आपणावरच असतां) पत्रीं विशेष उपचार लिहिणे काय असे ?

—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. २३

कयाज—(कयास), विचार, सल्ला.

खैरमियानें आम्हांस सांगून पाठविले की, तुम्हांस नबाबगिरी श्रीमंत भाऊसाहेब याणीं दिली होती. आतां आम्हांस नबाबगिरी सरकारांतून श्रीमंतांनी दिली आहे तुम्ही आमचे मुजरेस येणें. त्याजवरून सांगून पाठविलें की, तुमचे कयाज आम्ही मुजरेस येत नाहीं. पुणेंहून सरकारचा हुकूम येईल तेव्हां येऊं.

—ऐ. ले. सं. ५२०५

कयारी—वाफा, तक्ता.

तिसरे प्रहरी तुळसीबागास जाऊन बाग पाहिला. वेदाणी हाराळी लावावयास सांगितले; हाराळी लावून तुळसीच्या कयाऱ्या करणार.

—नाग १ . ३७५

कयास—निश्चय, सिद्धान्त.

श्रीमंत कै. गोविदपंत नानांनीं गंगाधर अय्या काळा जंगम यास पटीं बैसविले, त्यांनीं पट व मठाधिकार अनुभवावा ऐसा कयास करून देशमुख व देशपांडे व समस्त पंचाईत यांनीं सविस्तर मजकूर निवेदन केला.

—ऐ. ले. सं. ३४९१

कयाळनिशी—मापाऱ्याची कारकुनी.

वेदरी पातशाहा होते तेथें निळोपंत कयाळनिशी करीत होते. त्यास पातशहानी तपे मजकूरची ठाणेदारी व मजमू दिल्ही.

—रा. ८ पृ. ३२

कर्कशा—भांडण.

मोकदमी मिरासी आपली कटकियाआधी आपले वडिलीं केली आहे यावर कारकीर्द कारखान हयवतखान आपण उभे राहून कर्कशा करू लागलो. —शि. च. सा. खं. ५ पृ. १२३

कर्जदायी, कर्जदाई—ऋणकरीपण, कर्जबाजारीपण.

भटमजकूर फकर गदाई फार. करजदाई करून पोट भरिताती तरी गोपाल जोसी मजकुराचीं वज तेयाचे दिमती करणें. —शि. च. सा. खं. ४ पृ. ५

कर्ज फारीक करणें—कर्ज फेडणें.

दोन चार जागा मातबर पैका घ्यावयाच्या आहेत. तेथून घेऊन तुमचे कर्ज फारीक करीन. —हिं. द. खंड १ पृष्ठ २०

कर्ज फेरणें—कर्ज फेडणें.

माणसिंग याचें कर्ज जोतीबाबाबत होतें. तें आम्हीं फेरलें. तुम्हांस कळावे म्हणून लिहिलें असे. —पे. द. १० पृ. १४

कर्जबार—कर्जभार.

गणेश हरी बोललें कीं, जुन कर्जबार जाला आहे. त्याचा फडशा जाहल्यावाचून आपण यादी देत नाहीं. —ड्यू. ३३६

कर्जभरी होणें—कर्जाखालीं येणें.

खर्च किती पडेल व कर्जभरी होणे लागेल याचा अंदेशा न करता उद्योग केला होता. —पुणें अख. भाग २ पृ. १९८

कर्ज सेकणें—कर्ज करणें किंवा वाढणें.

कुली पाऊस पडिला नाहीं व लष्कर धामधूम जाहली. तेणेकरितां हैराण-गती जाहाली. कर्ज सेकलें. कर्जदार न सोडीत. —ऐ. सं. सा. खं. १ पृ. १०७

कर्जहसना—कर्जाऊ, कर्जादाखल.

या समई मदद केल्यास फार उपयोगी पडेल तरी २५ लाख रुपये बतरीक दस्तगर्दा किंवा कर्जहसना देणे म्हणोन पैगाम केला. —पुणें अख. भाग २ पृ. १११

कराराप्रमाणें पेशकसी बाा रुपये बारा लाख व कर्जहसना आठ लाख येकोन वीस लाख रुपये (ठरले). —पुणें अखबार भाग ३ पृ. ५०

कर्णफुलें—कानांस चाप. (वेड्यांना कडीतोडे म्हणतात त्याप्रमाणें अलंकारिक.)

जिवाजीपंत नेन्यास ऐवजाची निकड होळकर करतात. कर्णफुलेंहि लागतात ! घनगड किल्ला खालीं करून मागतात. —ऐ. ले. सं. ७५७६

कर्णभूषणें—कानास लावलेले चाप. (अलंकारिक).
त्या कारभारांत प्रमुख बाजीराव मोरेश्वर म्हणून आहेत. त्यांस कर्णभूषणें जालीं, ताडणहि जालें. —ऐ. ले. सं. ४७५९

कर्द—केलें (कर्दन) —रा. व्य. को.

कर्दगर—शस्त्रें बनविणारा.

कर्दनवस्तन—हिशेब.
कर्दनवस्तन गुणाकार भागाकार करावयाचा सराव बहुत असावा.
—काव्येतिहास संग्रह पत्रे यादी वगैरे पृष्ठ ४५९

कर्दह—करून.

कर्दहअन्द—केलेले आहेत.

कर्मण्य—करणी, चेटूक, अभिचार.
हलीं कोणी येकाची गांठ त्याचे घरचे माणसांखेरीज पडत नाहीं. वडोद्याचे लोकांनीं धाकजीस कर्मण्य केलें ऐसा भासहि त्याजला व साहेबांस कोणी घातला असेल. त्यावरोन मनाई साहेबांनीं केली आहे.
—शा. द. वे. पृ. १८६

कर्मणा—कालक्रमणा.
श्रीमंत कोपळप्रांतींच मास पक्ष कर्मणा करितील असें दिसतें.
—ऐ. ले. सं. ८५७

कर्मेवर्मे—लागभाग किंवा माऱ्याच्या जागा.
मोर्चेबंदी करणें तेव्हां गोंवलकोटची कर्मेवर्मे मनास आणून मोर्चे घालावे लागतात. —पे. द. ३ पृ. ९७.

करएक—करियत्, कर्तबगार, उमेदवार.
आमचे वडील शिवराम गणेश व जिवाजी गणेश हे इचलकरंजीकर घोरपडे यांजवळ होते. ते बहुत शहाणे, मोठे कामाचे करएक जाणोन पेशव्यानी स्वतः कडे मागोन घेऊन, त्याजकडे सरकारांतून प्रथम मामलती सांगोन, नंतर पुण्यांतील शनवारचे थोरले वाड्याचे काम सांगोन, दरोबस्त दौलतीची खासगी सांगितली.
—द. स. कै. या. पृ. १०३

करकर—तंटा, भांडण.
पाटीलकीच्या करकरियाकरितां गाऊ खराब. प्रजा नाहीत.
—म. द. रु. ३ पृ. ३६

करकर करणें—तंटा करणें. कटकट करणें.
दरम्यान कुंभारकर हरकत करून आपला आजा कमळपाटील यासी मोकदमीचा करकर करू लागला. —शि. च. सा. खं. ५ पृ. १२३

करणालची—कर्णा वाजविणारा.
महबुदल्लाखान रोहिले यांचे करणालचीस गोळी लागली.
—ऐ. ले. सं. ३५०९

करणी खुसपट–अडचण, अडथळा, कारस्थान.
करण्या खुसपटे चित्तास येईल ती करून त्याचे केले धुलीस मेलवणें.
--पु. द. भाग १ पृ. २४६

करदा, कर्दा--(पु.) शेतकरी,जमीन कसणारा, स्वत: शेतीचा धंदा करणारा (मालक किंवा कूळ). हा शब्द अनेकवचनीहि उपयोगांत आणतात. जसे 'करदे पाटील.'
जाहीरनामा लागला कीं, इनामदार मोकाशी कर्दे माणूस आहेत, त्याणीं सिपाई देऊन रामोशी यांची बातमी रोजचे रोज साहेब लोकास समजावीत जावी. न कळविल्यास तुमचा वसूल बंद होईल.
--पे. सा. पृ. २६२

कर न करी--करणेकरी; कशानेंहि समाधान न होणारा.
श्रीमंतांचें ध्यान काय आहे. कर न करी विचार!
—ऐ. ले. सं. १९९३

करमड—(?)
इंग्रजाकडील करमडची भाजी आली.
--नाग १ पृ. ३२१

करमफर्माय मुखलिसान—'स्नेहयावर कृपा करणारा'. एक मायना
—रा. खं. ३ पृ. ४५१

करमबक्षी—कृपा.
कागदपत्र अफरातफर जाले, कुंपणी सरकारचा अमल जाला तेव्हां निजाम सरकारचें पत्र आमचे आजाचें नावें आलें होतें तेंच बाबजी मल्हार वकीलीचें काम करीत होते, त्याजबरावर कुंपणीकडे पाठविले, तेव्हा गौरनरसाहेब बहादुर यांणीं आम्हावर करमबक्षी करून नवाब व बहादुरीचा मरातब दिल्हा.
—द. स. कै. या. पृ. २३३

करवडी—एक जकातअधिकारी.
हुकूमतपुन्हा हाद्दूखान नायब सेख अहमद करवडी व तहवल बालाजी बाजी परगणे मजकूर या हुजूर मातकाली (?) दरवडा येऊन फिरयादी केली.
—पु. न. सं. वृ. खं. २ पृ. ११९

करवणें—करवीं, मार्फत.
त्यासही चार गोष्टी वकीलाकरवणें सांगितल्या आहेत.
—ऐ. ले. सं. ३७८८

करवल—मोगल बादशहांच्या सैन्यांतील एका विशिष्ट पथकाचें नांव. या पथकांतील शिपाई शांततेच्या काळीं बादशहाच्या शिकारीचे वेळीं रान वेढण्यास व उठवण्यास उपयोगी पडत. या पथकाच्या किंवा शिकाऱ्यांच्या नायकास करवलबेगी अशी संज्ञा असे.

करवलबेगी—करवल शिपाई पथकाचा नाईक.

करवली—१ चकमक २ आघाडीच्या टोळचांच्या चकमकी.

नजीबखानाचा मनोदय कीं, बलोच्यास त्याचे स्थळीं पूर्ववतप्रमाणें कायम राखावें. हा अभिमान धरून त्याचे लोक जमा करून लढाई होणार. सांप्रत्य करवली होत असती. —हिं. द. खंड २ पृष्ठ ५०

कराचली—तरवार-

चि. भाऊकडील एक घोडा ठार पडला. दहापाच माणसांनीं कराचलीनीं हटले. त्या उप्पर शत्रूचा दम निघाला. —ऐ. ले. सं. ८६०

कराचली—तरवार (लक्षणेनें सैन्य)

चेऊल प्रांतांत पूर्वी देशाईपण व कुलकर्ण दोन्ही वतनें आपलीं होतीं. त्यास पातेणपरभु यासी गुमस्तगिरी सांगितली. ते जबरदस्त, सातसे कराचली होती. पेण पणवेली कल्याणप्रांते दरवडे घेत.

—पे. द. ३१ पृ. १४०

करांचली मारणें किंवा करणें—तरवार मारणें, पराक्रम करणें.

हरबा अण्णानें चांगली करांचली मारली. फौजेंतील मराठी माणूस होतें त्यांतून कोणी करांचली करणेंविषीं चुकला नाहीं. —ऐ. ले. सं. १७७७

करामत—वैशिष्टच; विशेष गुण, खुबी, चमत्कार.

मुंबईहून घडयाळें आलीं असल्यास, किंमतीचा अजमास भारी लिहिण्यांत आला. त्यास त्याची तऱ्हा कोणती व मोठेपणास केवढी, करामत काय, तें लिहावें. —ऐ. ले. सं. ४६५४

करामात—महत्कृपा.

जे येसमयी आपले येणें गोया (म्हणजे) करामात जाली.

—रा. खं. १ पृ. १८८

करार—निश्चय.

करारजाब—निश्चयात्मक उत्तर.

आपणांकडून करारजाब आला, दोघांस पाठविण्याची आज्ञा जाली तर पाठवूं. —पे. द. २६ पृ. १६८

करारदाद—ठराव, करारनामा.

करारदाद तहनामा करावा म्हणोन इंग्रजाचे विचारें दरम्यान बोलीस कपितान होता.

—पे. द. ३ पृ. ३७

फौजा न आल्या तरी दोघांनीं बाणकोट राखावा ऐसा शामल व संभाजी आंग्रे यांचा कररदाद जाहला म्हणून लिहिलें आहे.

—पे. द. ३ पृ. १३९

करारवाके—पक्के, पक्का.

यैसी बोली आम्हासी करारवाके करून सिरपाव देऊन आज्ञा दिली.

—पे. द. १० पृ. ३२

करारौ—खात्री, अनुभव, प्रत्यय.

सर्वतोमुखी यैकत होतो हें सत्य इतुके आमुचें करारीस आले.

—पे. द. ३३ पृ. ७३

करारी—निश्चय. कररमदार.

जशी निकड येईल तसी सोसून जाहला करार शेवटास न्यावा याप्रमाणें करारी करून तेथून मजल दरमजल मुक्काम मजकुरपर्यंत आले.

—पे. द. २० पृ. १२८

सांप्रत बोली असे कीं आरमारसहवर्तमान कर्णाळियासी जाऊन दाणा गल्ला भरून किलेयाची मजबुदी करून निघोन राजपुरीस यावे यैसी करारी जाली असे. —पे. द. ३३ पृ. ३०७

गोविंद नारायण तुम्हासी करारी करतील त्याप्रमाणें बंदोबस्त केला जाईल. —पराग वर्ष १ अंक ११ पृ. २७

करारीची बातमी—पक्कें-विश्वसनीय वृत्त.

परंतु यास विश्वास पुरेना. तेव्हां दसमहाला व गोडवला याजबरावर हटकरी दिल्हा की, करारीची बातमी घेऊन या. तेव्हां त्रिवर्गांनीं जाऊन पक्की बातमी घेऊन आले. —राजवाडे खं. १ पृ. २

करीन—युक्त; जवळ.

करीन सलाहा—वाजवी, न्यायाचें, योग्य तेंच.

त्याजवरोन हजरतीनेंही पत्रांतील अन्वय श्रवण करून फर्माविलें की, इकडोनही पूर्वील सिलसिल्यावर व नक्षावर व तिकडील लिहिल्यावर लक्ष देऊन करीनसलाहा तेच अमलांत येईल.

—नाग २ पृ. १५८

करीबी—सामीप्य, जवळीक.

गोविंदराव फार तरार (लुच्या) आहे आपण हजरतकरीबी करून बोलेल. अर्ज करील की, हैबतराव यासी वचनप्रमाण केल परंतु मशारनुले व रघोत्तमराव यांजकडून राजदारी होणार नाहीं.

—पुणें अखबार भाग १ पृ. ११०

करुणा—शोक किंवा आक्रोश, अजीजी.

तमाम रयत तजावजा जाहली आहे. येथें येऊन करुणा करिते ते ऐकवत नाहीं. —पे. द. ३ पृ. ३५

करोल—बंदुक घेऊन लढणारा स्वार.

रास्ते यांजकडील समजावीस लोकांचो घरीं होत असते. सहजांत त्यांनी करोलास दारू दिली. त्याजवरून सुमेरसिंग याणीं दादासाहेबांस समजाविलें की, रास्त्यांनीं दारू वांटली. दंगा करणार. अगोदरच आज्ञा झाली तरी हल्ला करून त्यास लुटितों. —ऐ. ले. सं. २०३८

श्रीमंतांनी करोलही कांहीं चाकरीस ठेविले म्हणून बोली आहे. —ऐ. ले. सं. ९३३

करंबकशी—कृपा.

यावर सेवकास स्वामीचे नांव घेऊन कुशल आहेत कीं म्हणोन पुसिलें सेवकानें जाब दिला कीं हजरतीचे करंबकशीकरून खुशहाल आहेत. —पे. द. २५ पृ. १०

करवली—गोळागोळी. बंदुकस्वारांची गोळागोळी. आघाडीच्या टोळयांच्या चकमकी.

नजीबखानाचा मनोदय कीं बलोचास त्याचे स्थळी पूर्ववतप्रमाणे कायेम राखावे हा अभिमान धरून त्याचें लोक जमा करून लढाई होणार. सांप्रत्य करवली होत असती. —हिंगणे द. भाग २ पृ. ५०

करोल बरकंदाज—बंदुकीनें लढणारे.

आज्ञा कीं हजार बाराशे लोक पायेउतारा करून व करोल बरकंदाज यैसे राजपुरीस रवाना करून तुम्ही उभयेता हुजूर येणें. —पे. द. ३ पृ. ५

कल्प—संशय, आरोप, अंदेशा, वहीम.

आवघियाचा कल्प येक तुम्हावरी आहे. वरें श्री समर्थ. राजश्री स्वामीचे पुण्यप्रभावें करणाराची कालीं तोंडें होतील. —पे. द. ३० पृ. ५३

कल्पना—संशय, वसवसा, भीति, वहमा.

हैदरजंग कारभारी त्याचे मनांत तुम्हांविषयीं कल्पना भारी आहे. —स. ब. पृ. २६

कल्पना घेणें—संशय घेणें; तर्क करणें.

तुळाजी जासुदास कुरुंदवाडास न पाठवितों, परंतु स्वामी तेथें असतील, म्हणोन कल्पना घेऊन, पाठविला. —ऐ. ले. सं. २७९१

कल्बी---मधली डोलकाठी.

—पे. रो. माधवराव भाग १ पृ. २३६

कल्याणी—पंचांगांतील एका अशुभ योगाचें नांव.

मिरजेची सनद देविली; परंतु काल कल्याणी संध्याकाळी होत्या, त्याजमुळें न घेतली. आज १५ घटिकांत सनद घेणार.

—ऐ. ले. सं. ५९०

कल्हई—आरसा बनविण्यासाठीं काचेच्या एका बाजूनें जो लेप किंवा मिश्रण लावावयाचें तें.

आरसे आहेत, (त्यांपैकीं) ज्यांची कल्हई उडाली असेल व जे पालखीस बसे असे असतील ते हुजूर पाठविणें. —रा. खं. १२ पृ. १४२

कल्हावती—कटकट; भांडण, कलह.

सबनीस सुभेमजकूर यावरी बापुजी नलवडा याणें कल्हावती करून तरवारेचा हात टाकिला. —रा. ८ पृ. २०

कल—कळ, तंटा, कलह.

वरातदार गलमुगीर (?) जाले तर बेमुलाहिजा बाहेर घालणें यामुळ कल वाढली तर कबूल करणें. —पे. द. ३ पृ. ४९

कलकल करणें—कळवळा करणें.

आम्ही दोस्तीचे वाटेनें कलकल करून लिहितों.

—नाग १ पृ. २२५

कलकेरी—रुपयाचा प्रकार.

वराता आपणांकडून ५ लक्षांच्या आल्या, त्यांत हरीभक्तीकडील २ लाख रुपये जलद (?) याच्या. त्यांपैकीं लाख रुपये गाइकवाडाकडे लाऊन दिल्हे. लाख राहिले, त्यांची सोय करितों म्हणतात. कलकेरी व दादाकडील मिळोन तीन लाख. त्यांपैकीं लाख रुपये गाइकवाडाकडे लावून दिल्हे. महिन्याची मुदत आहे. —ऐ. ले. सं. ३१४०

कल खादणें—मनांत चंचलता किंवा भीति उत्पन्न होणें. ऱ्हास किंवा उतारास सुरवात होणें.

प्रतिनिधीच्या लष्करानें कल खादला आहे. शत्रूनें छपा मुख्य (प्रतिनिधी) राहतात तेथें घातला तर तग निघतां मुस्कील असे. येसे जाहलें आहे.

—पे. द. ३ पृ. ४८

कलगी—पागोटचावर बांधावयाचा एक अलंकार.

संभाजीराजास मंगलवारीच कलगी जडिताची दिल्ही.

--पे. द. ११ पृ. २६.

कलतरे किंवा कालतरे—१ कर्ज. २ व्याज.
महजर करून घेतले, होन दोनशे पडिले ते तेव वळी कर्जवाम करून व्याजकलातरे चक्रवाढ व्याजाने घेतलेले कर्ज काढून पैके दिल्हे.........
होन सहाशे पडले तेहि मधवा नाईकपासी चोरांतरा-दरमहा दरशेकडा ४ प्रमाणें कालतरे काढून पैके दिल्हे.
—शि. च. सा. खं. ८ पृ. ७५

कलथनी—उलटणी; अकस्मात् उलटून चढविलेला हल्ला.
ईश्वरकृपेनें आपण आज सर्व मंडळासह लष्करांत दाखल झालों. सूर्योदय झाला. यशअपेश ईश्वराधीन. दौलत आणखी मिळेल; या समयीं आपले प्राण वांचले, हा मोठा लाभ आहे. जनोबा सुभेदार त्यांनींहि यत्न केले. दोनदोनदा कलथन्या केल्या असें सांगतात.
—ऐ. ले. सं २७६५

तिकडील फौजेचे मराठे सामान चांगलें. लोक चांगले जुजले. दोनदोन चारचार कलथन्या केल्या. परंतु इकडील फौजा भारी व ताकवान्यांचा व वारांचा मारहि भारी जाहला. —ऐ. ले. सं. २८३१

कलद्री—(कलंदरीचा अपभ्रंश) हा एक डेऱ्याचा प्रकार आहे.
भोजन होऊन विडे कलद्रीचे डेऱ्यात घ्यावया बसले,
—ऐ. ले. सं. ४८३९

कलंदर—दरवेशांचा एक पंथ. बंधनातीत साधु. लोकातून उठलेला. बेपर्वा मनुष्य. भटक्या, दारुड्या, व्यसनी.

कलफती—आरमारावरील प्रत्येक गलबतावर हशमा खेरीज जे लोहार, सुतारासारखे लोक लागत, त्या पैकी एक कारागीरवर्ग.
दरेक जहाजावर बाजे हशम म्हणजे लोहार, अरकशी, सुतार, निजारी व कलफती असे लोक असत. —म- आ. पा. पृ. ५१

कलब—काळीज.
पट्टण टिपूची राहावयाची जागा कलब. तेथवर फौजा जाऊन लढाई केली.
—म. शि. या. का. पृ. ८८०

कलबी गादी—मारके शीड. —कु. आं. द. ३९४

कलबूत—साचा; सांगाडा. उदा. तोफ ओतण्याचें कलबूत, पगडबंदाचे कलबूत.
कृष्णातीरच्या वोवऱ्या दक्षिणेच्या बुरुजासुद्धां दरवाजेच्या वोवरीयावेतों प्राकार तयार जाले. कलबूत घालून लादनी लवकरच करवितों.
—ऐ. ले. सं. ४१७४

कलवूत—दांडगा राकट मनुष्य.

१ अहा रे बडोदे शहर। कोट चौफेर। काम मजबुत।। चार दरवाजे चार दिशांना वर शिपाइ कलवूत।। —ऐ. पो. के. खं. २ पृ. २५१

कलभूत—साचा.

तोफ ओतावयासी अवघा रस येकदाच करावा लागतो, येथें राजेश्री स्वामीनीं मुसा तयार केल्या आहेत. आणि कलभूत मेणावल्या आहेत. याउपरी कलभूतावर मातीचें कलभूत दिल्हे म्हणजें मोड येऊन रस तयार जाहला पाहिजे. —पे. द. १७ पृ. २७

कलभूत—लठठ् व बुटका माणूस किंवा तसा घोडा.

कलम—खण.

येकूण लांबी सवाचौतीस तीन तसू, रुंदी पावणे सोळा गज च्यार तसूं व कलमें नऊ येणें प्रमाणें जागा तुम्हाकडे करार करून दिल्ही. —पु. न. सं. वृ. खं. २ पृ. १०२

कलम करणें—कापणें; छाटणें.

कित्येक धरून आणून, कित्येकांचे हातपाय कलम केले. —ऐ. ले. सं. ३०२२

कलमकुचराई करणें—सबंध मजकूर जशाच्या तसा उतरून न देतां कांहीं मजकूर मुद्दाम गाळणें.

मला जी संध्या लिहून दिली होती तिची पोथी वरील कागदपत्रांत सांपडली. अब्राह्मण जातीशी ब्राह्मण लोक धर्माच्या वाबतींत कशी कलम-कुचराई करतात याचा ती उत्तम मासला आहे. —अरुणोदय पृ. ६१

कलम चालणें—फौजबंदीसाठीं पत्रें जाणें. भावार्थ, फौजबंदी सुरू होणें.

नवाब निजाम उन्मुलूख फौजेची जमाबंदी करीत आहेत. कलम चाललें आहे. —ऐ. ले. सं. ५२२७

कलमजारी—सैन्य जमविण्यासाठीं पत्रें लिहितात तीं; सैन्याची जमवाजमव.

नवाब फौज व पायदळ ठेवण्याची कलमजारी करीत आहेत, म्हणोन वरचेवर बातम्या येतात. —ऐ. ले. सं. ४६५२

कलमजारी करितां २,००० पर्यंत प्यादा रामचंद्र अप्पाबरोबर आहे. मागाहुन आणखी येतच आहेत. —ऐ. ले. सं. २३९०

कलम तराश—हुषार चलाख कारकून. मूळ पर्शियन शब्द तराश याचा अर्थ चाकू असा आहे.

आपण वारंवार कलमतराशी करावयासी पाठविता. —पे. द.

कलमदान--दौत व लेखण्या ठेवण्याचें लांकडी पात्र. स्वारींत हें कलमदान अंगावरील कमरपट्टयांत बांधीत असत. खंडोबल्लाळानें स्वारींत धावत असतां संभाजी राजानें सांगितलेलीं पत्रें लगेच लिहून दिलीं, ती हकिगत संभाजीच्या बखरींत पाहा.

कलम धरणें—सैन्यभरती सुरू करणें.

जंगली शहाजाद्याचा हेत बोलीचालीत बहुत देखिला कीं भाद्रपदमासीं कलम धरावे २० हजार मौगल चाकर ठेवावे.

—पे. द. १० पृ. ३१

कलमी—लेखी.

येणेंप्रमाणें आवई बोलतात. पण हें वर्तमान कलमी नव्हे.

—ऐ. ले. सं. ६१७५

कलमी करणें–पत्र लिहुन कळविणें.

सिद्दीसाद यांस मोहीवी कलमी करावे.

--पे. द. ३ पृ. ३

कलमी फौज—नक्त पगार देऊन ठेवलेलें घोडेस्वारांचें सैन्य.

त्या स्वारीस कलमी फौज ठेवावी असा बाजीरावसाहेबांचा इरादा. म्हणून त्यांनीं उदाजी पवारास विचारलें, पण ते चाकरी कबूल करीनात. तुम्ही आम्ही एका धन्याचे चाकर. तुम्हास हजेरी देऊन रोजमुरा आम्ही कां घेऊं असें म्हणूं लागले.

—हो. कै. पृ. ६

कलर—कलरू; मद्रास कर्नाटकाकडील एका मुसलमान जातीचें नांव.

फितुरांमुळें टिपू बुडाला. तेव्हां आम्हीं इंग्रजांचे हातीं सांपडलों. आम्हांस नगरचे किल्ल्यावर ठेविलें. तेथें आमचे मुलखांतील कलर पाच चार असामी येऊन चाकरीस राहिले. त्यांणींच आम्हांस काढून तीन मजला आणून सोडून दिल्हें.

—ऐ. ले. सं. ७४८७

कल राखणें—संधान किंवा तोल संभाळणे.

ऐसे प्रसंग येऊन पडले आहेत, त्यांत चहूंकडील कल राखणें आणि दिवस घेणें हें स्वामीस प्राप्त जाहले आहे.

—नाग १ पृ. ७१

कलवर—दारू गाळणारा.

कलवल—प्रसंग, संकट, जरुरी, झगडा, भांडण.

इस्माइलखान तिकडेच सामील आहे तोही यास सामील होईल तेव्हां मातबर खूल तिकडे जाले. पुढें थोरले यजमानास कलवल पडे ते समई मुधोजी व ते तिकडे गेल्यास आश्रय मातबर त्यास जाहला !

—पेठे दप्तर भाग २ पृ. १४

कलवल, कळवळ—चाकरी, कामगिरी, मोहीम.

राज्याची कलवल प्रतिवर्षी हिंदुस्थान कर्नाटकाची जे येईल ते श्रीमंतांनीं सोशीत जावे ! राज्याचे सरंजामी आम्ही; राज्याचे कळवळीस आपलें सरंजामानिशीं सामील असावें.

—पे. द. भाग २० पत्र नं. १९८

कलशारोपण—सर्वोच्च ध्येय, ईप्सित, फळ.

आजीपर्यंत श्रमसाहास केले. त्याचे कलशारोपण हेंच कीं समूळ शामल उपडून टाकावा. हें गोष्ट नव्हे तेव्हां अवघेच व्यर्थ व आमच्या मनसबीयाची उपजीविकाही हेंच ! —पे. द. ३ पृ. ५५

कलहरु—कर्नाटक मद्रासकडील बेरड रामोशासारखी एक चोरटी जात.

वेंकटपेठ येथून पत्र लिहून तयार केलें. परंतु मार्ग न चाले. झाडी मोठी. पालेगर त्याच्या मुलकात कलहरु म्हणून चोर आहेत. मार्ग चालू देत ना. याजकरितां पत्र तसेंच राहिलें. —पे. द. २८ पृ. ७७

कला—चमत्कार, विचित्र प्रकार.

सेवट हे गोष्ट बहुधा ईश्वरास न मानली त्यानें यैसी कला केली कीं बाळांतीणच गेली. —हिंगणें द. भाग २ पृ. ३९

कला—आशा.

पंचाईत करणार यास काय मिळत होते म्हणौन ? त्यास पंचाइतीस चांगले संपन्न लोकच बहुधा. ते पंचाईतानीं मिळकतीचे कलेनेंच पंचाईतीत बसावे, असा शिरस्ता नाहीं. —पे. द. ४५ पृ. १३८

कलाक वाजणें—तासाचे घड्याळाचे ठोके वाजणें.

कपडबंदास स्वारी मंदवारीं (शनिवारीं) नऊ कलाक वाजतां आली.

—शा. द. वे. पृ. ७१

कलांतर—कर्ज किंवा उसनवारी, व्याज.

पाच होन पडिले आहेत ते आपण कलांतरें करून दिले आहेत. त्याचे कलांतर देखील आपणांस देणें होन दाहा जाले आहे. ते द्यावया ऐवज नाहीं. —म. द. रु. ३ पृ. ४२

त्यास पहिले बलात्कारें कुलकर्ण घेतली त्या समयीं महजर करून घेतला होता. त्यावरी निशाण करून देणें म्हणून आग्रह करितो. अगर आपले-पैकीं कलांतरासहित देणें, या प्रकारें कथला आरंभिला आहे.

—शि. च. सा. खं. ५ पृ. २०८

कलाद्रि—डेऱ्याचा किंवा तंबूचा एक प्रकार.

सरंजाम तरी डेरे राहुटी बिचवा कलाद्रि तयार करावी.

—खड‍र्याच्या स्वा. ब. पृ. १८

कलान—मोठा, मोठी, मोठें.

कलाफती—कफलती, भांडखोर. कज्जेखोर.

अंताजी घाटगे यांचें आचरण तुम्हांस कळलेंच आहे व दरबारी प्रसिद्ध आहे ते कलाफती लोक ! —वै. ४ स. १७४३ पृ. २९

कलाम—(अ) कलिमह; व्याख्यान.

कलाल, कलाली, कलारी—१ गुत्तेवाला. दारू विकणारा, २ त्यांपासून घेतला जाणारा कर.

कलीच—काळीज.

आता आपला नक्ष राखणें तर महादजी शिंदे यास शामील होणें. नाही-तर आतां कलीच दाखवून इंग्रज पुढें ग्रास करतील तेव्हां पस्तावा कराल व आमचें बोलणें स्मराल. —राजवाडे खंड १२ पृ. २७

कलीच दाखविणें—१ काळीज दाखवणें, २ अंतःकरणापासून मैत्री दाखवणें. (अवतरणासाठीं ' टोपी बसणें ' शब्द पाहा.)

—राजवाडे खंड १२ पृ. २७

कलिशता—खलश, किल्मिष.

माझे मनांत आतां कलिशता नाहीं. —रा. खं. ५ पृ. ८४

कलूष—दुःख, चेष्टित, ढोंग किंवा ढंग.

आतां हे कलुष सर्व पोटाचे (पोटासाठीं) आहे. याचा मार्ग निघाल्याचे पोटीं सर्व तुझे चरणीं प्राण समर्पून आहे, तेथें संशयाचें कारण मनांत आणूं नये. —हो. कै. पृ. १७२

कलेतर—कलांतर. व्याज.

स्वामींचें कर्ज कलेतर सहित वाढवून देऊं.

—वै. ४ स. १७४६ पृ. ७

कलेबाजी—खोडया, दंगा, दांडगाई.

मतवाली (घोडीचें नांव) लाहान व येकादवेल कलेबाजी करते. मथुरा तो सर्वा गोष्टीनें चांगलीच आहे. —पुरं. द. भा. १ पृ. ८९

कलेस—कलसी किंवा कलासी, कर्नाटकांतील धान्य मोजण्याचें एक परिमाण.

नंदराजाचें ठाणें तरी तुम्ही खलेल घालाल तर आम्ही तुमचे मुलकांत धामधूम करूं म्हणून उत्तर आल्यावर फौज पाठविणें मानसिक करून त्रिचनापलीचे किल्लेस जकिरा ४० हजार कलेस, ५ हजार गोण्या साली, नगद पंधरा हजार रुपये पाठवितो म्हणून करार केला आहे.

—E. M. P. पृ. १२४

कलो—कलहो, कलह, भांडण.

याच्या चहू सण्यापैकी चार पैसे व आपले तक्षिमेपकी ससगणी येकूण तीन सण्या दत्तोपंतास दिल्या. तेव्हां बापूभट यांनीं कलो आरंभिला.

—ऐ. सं. सा. खं. ४ पृ. ६७

कलोली—कलुली. घोडी पाहून अस्थिर होऊन घोडा खोडया करतो त्या.

राजेश्री नानास घोडा पाठविला होता, तो कलोली करितो याकरितां पसंत जाला नाहीं. —म. द. रु. ३ पृ. १५५

कलंद्री—डेऱ्याचा एक प्रकार. —रा. व्य. को.

कव्हेदाणी—कव्हा = अर्क. ज्यांतून अर्क किंवा चहा ओतावयाचा तें पात्र.

आपखुरे (पेले) २ कव्हेदाणी १. —पे. सा. पृ. २०८

कवयेद—कवाईत, शिस्त.

पुदचेरीच वर्तमान (कीं) येक जहाज आलें त्याजमध्यें ५०० फिरंगी उतरल ... लोकांस कवयेद सिकवताती.

—E. M. P. पृ. १५१

कवाईत—युक्ति, डाव, कपट, कौशल्य, पद्धति.

१ रांगडे यानी शेवडे दतिया वगैरे येथील जमियत झांशींत भरून दिली. कारण सुभेदार झाशीस मोर्चे लावतील. हें पाहून सुभेदारांनींही कवाईत केली. झांशी सोडून शेवढयाकडेच चाल केली.

—हो. कै. पृ. ३८

२ इचलकरंजीस शह दिला हें ठीक न केलें. आतां शह दिलेवर उठोन कसें जावे ? तेव्हां कवाइतीनें जावें ! —ऐ. ले. सं. ६१३९

३ इंग्रजांची धमक बरीच होती. परंतु त्यांस आमच्या मराठी फौजेची कवाईत आतां समजली ! —ऐ. ले. सं. २३२१

कवाडें अडकावून बसणें—दारकोंड करून बसणें.

जितकी सेवा केली तितकी निर्फळ झाली. आतां देशत्यागास जावें किंवा घरीं कवाडें अडकावून बसावें, किंवा ईश्वरचरण जवळ करावे, ऐसे अर्थ दिसतात. —ब्र. च. पृ. १३५

कवाल—गवई, कलावंत.

रात्रौ संध्या व उपहार करून कवालाचे गायेन यैकून आराम करायास महालांत गेले. —पुणें अखबार भाग ३ पृ. १०४

कवाल—कौल दिलेला मुलूख, अभय दिलेला मुलूख.

सांप्रत त्याणी ४ हजार फौज जमा करून आम्हाकडील मुलुख कवाल वगैरे तिकडे जाऊन मुलकाची खराबी केली आहे.

—पे. द. २० पृ. ७३

कवाला—कबालापत्र, सौदापत्र.

कविजा—M. a sort of flat headed ladle.

३ डेरे, ३५ कनाता, ९ गडदे पमेदार, ७ राहुट्या, २ पडदे सायेवानी, १ बिचोबा पेमेदार, ३ सायवाने, ४ जाजमे पमेदार, १८ मलिते, २५ गदारे (गरादे), १० बदरसे, २ कविजे ३७९ तनावा.

फरासखान्याचें सामान. —पे. द.

कविहाल—बेशक, नि:संशय.

तुम्ही कविहाल होऊन आपले वतनावरी येणे.

—रा. खं. १७ पृ. ३४

कश्चित—कोण्या, कोण्याएका, लाण्या.

सांप्रत सेवकाने कश्चित् स्नेहिताचे मुखें यैकिलें कीं मुंबईकर वकिलास पुण्यास यावयाकरितां मोहरी दस्तक कारपरदाजांनीं मुंबईस पाठविलें आहे. —पुणें अखबार भाग ३ पृ. ११

कश्यप धरणें (एखाद्याचा) (कच्छपी लागणें). —एखाद्याचा कासोटा पकडणें म्हणजे त्याच्या आसऱ्यानें किंवा तंत्रानें चालणें.

भाऊंचें म्हणणें तसें पडलें त्या अर्थी त्यांचाच कश्यप धरून वागणें प्राप्त झालें. —ऐ. जु. ले. चि. घ. सं. मा. पृ. १४

कशांग—सुंदर.

कशिश, कोशिश—चौकशी, शोध, धडपड. जिद्द, प्रयत्न.

कशिश कोशिश व कारभारी यास निकडी बऱ्याच होतात.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ९७

कशीद—ओढले. (कशीदन).

कशीह—गुप्त शत्रु.

कष्टकाम—मेहनत-मशागत.

१ त्यांणीं कौल पाठऊन रयेत गांवांत आणून कष्टकामास लाविले.

—पे. द. ३३ पृ. ६४

२ वरकड चाकरमाने व रयेत आले त्याणीं माड घेऊन कष्टकामास लागले. —पे. द. ३३ पृ. ३९

३ यंदा इमारत कसची होते ? पर्जन्यकाळ समीप आला. कष्टकामाचे दिवस, याकरिता (इमारतीचे) अनुकूल पडोन येत नाहीं.

—इच. सं. इ. पृ. ११

कषमक—कज्जा, भांडण.

पूर्वीपासून ते आपणासी कजीया कषमकी करितात त्यांस आजवर आम्हीं ठासून ठेविले. —पे. द. १५ पृ. ७७

कस्त—मेहनत, पराक्रम, मर्दुमी, हल्ला, चढाई, महत्त्वाकांक्षा, निश्चय, ईर्षा, कटाक्ष.

१ ऐसीयासी कृष्णे परभ याणे परळीच्या वेढयांत कस्त करून इनामतीचे सनद तूं वडील भाऊ म्हणून सनद तुझ्या नांवें करून घेतली असता, यासी कांहीं लागो देत नाहीं, सारी इनामतीचा ऐवज तूच खाऊन थोतांडी करतोस, यावरोन तुज काय म्हणावें ?

—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. २

२ शत्रू समीप असतां असें स्थळ इंग्रजांनीं साध्य केलें ! यांच्या कस्तीस उपमा नाहीं. —ऐ. ले. सं. ४४६२

३ बल्लारीवर हैदरखानानें मोर्चा दिला तेव्हां बल्लारकरानें फार कस्त केली. बहुत लोकांस जाया केलें. जखमपट्टीस ३०,००० रु. हैदरास लागले. तोफांचे ऐनी गोळे १०,००० खर्च झाले. —ऐ. ले. सं. १४१९

४ माडीच्या दरवाज्यापावेतों लोक मारीत गेले. लोकांही कस्त बरीच केली. —पे. द. १६ पृ. ६०

५ इंग्रजांस लढाई देऊन खिपत द्यावी, इतका टिपू मजबूद आहे. परंतु कांही कावादावा. शत्रू (इंग्रज) शेर होऊं द्यावा, काळीज दाखवून पट्टणापावेतों पोटांत घ्यावा, मग एकबएक अशी कस्त करावी कीं, इंग्रजांस फुरसत घेऊं न द्यावी, हाहि टिपूचा मनसवा संभवतो.

—ऐ. ले. सं. ४३५६

६ गोटास जावयाचें कठीण पडेलसें पाहून तेथेंच गाडून उभा राहिला. पुढें जाण्याची कस्त होईना. —ऐ. ले. सं. ८०५

७ श्रीमंतांच्या ठाण्यास उपद्रव करावा, ठाणीं उठवून, नर्मदेपावेतों यावें, अशी जाटाची कस्त होती. —ऐ. ले. सं. १३०१

८ तुम्ही कोठें आहां ? तफावत किती आहे ? फौज शत्रूजवळ किती आहे ? तुमची कस्त कोणे रीतीची आहे, तें विस्तारें लिहिणें.

—ऐ. ले. सं. ३३४

९ चित्रदुर्गकराशीं हैदरखान तह करीत नाहीं. स्थळच घ्यावें ही त्याची कस्त आहे. —ऐ. ले. सं. २९९१

कस्तगिरी—मेहनत, पराक्रम.

छावणी मुख्यासहवर्तमान बंदोबस्तें करून कस्तगिरी केली तरी फिरंगाण फत्ते होईल. —पे. द. ३४ पृ. ९८

कस्तर—कास्यकार, कासार.

कुंभकोणी तांब्या कस्तरापाशी करावयासी दिल्हा असे. सिद्ध झाल्यावर पाठवितों. —कुआं. ढ. ४३२

कस्त होणें—खस्त होणें, ठार होणें.
गणोजी जाधव स्वामीकार्यावरी कस्त जाहले याकरितां याच्या पुत्राचें चालविणें स्वामीस आवश्यक.
—ऐ. सं. सा. खंड ६ पृष्ठ ४०

कस्बह—कस्बा.

कस्त्रत—फाजीलपणा.
तुझी कसरत मी जाणतो. —पे. द.

कस—कुणबिणींची मोजदाद करतांना योजण्यांत येणारा संख्यावाचक शब्द
कुणबिणी कस १. —पे. द.

कंस—त्रिंबकराव पेठ्याचें सांकेतिक नांव. तो भाऊसाहेब पेशव्यांचा मामा म्हणून सर्वत्र ‘मामा’ या नांवानेंच ओळखला जाई.
स्वदस्तुरचीं पत्रें आलीं त्यापासून येथें थोडीशी स्वस्ता (स्वस्थता) जाहाली. तथापि कंसांनीं पत्र लिहिलें आहे की, आम्हीं कोलियास कौल दिल्हा त्याप्रमाणें तुम्ही देणें. —पेठे दप्तर भाग १ पृ. ३१

कसबती—कसबाती, गांवकसब्यातील लोक किंवा अधिकारी.
१ रमजानी कसबियासी आलों. गावकसबती भेटला. लवकर न येत (बोलणें करण्यासाठीं). —पे. द. १४ पृ. ५

कसबती, कसबाती.—कारागीर, कसबाती लोक.
—वाड स. प. मा. भा. २ पृ. ७

कसबी लोक— वेश्या, कळवांतिणी.
(अवतरणासाठीं ‘शोदा’ शब्द पाहा)
—पुणें अखबार भाग ३ पृ. ११८

कसमअकसाम—शपथप्रमाण.
(अवतरणासाठी ‘तसफिया’ शब्द पहा)
—पुणें अखबार भाग ३ पृ. १८६

कसरकम—कमीअधिक.
हरिपंताजवळ फौज दोन तीन हजार कसरकम आहे.
—पुणें अखबार भाग ३ पृ. २३

कसरेकम—कमकसर, कमींत कमी, सुमारें.
१ कसरेकम हजार फिरंगी उतरले आहेत.
—चिनापट्टण राजकारणे पृ. १
२ येथें आज फौज नवाबाकडील ४५,००० व भोसले कसरेकम ३०,००० आहे. —पे. द. २० पृ. १३०

कसलमंद—आजारी, बीमार, अस्वस्थ.

मीर अलम याची तबियत कसलमंद; येण्याची ताकद नाहीं.

—रा. खं. ५ पृ. १४४

कसलिक—कसणूक, मशागत.

सेतान्चें कसलीकेस दिगरमहालचीं कुलें आणाल ती कुले गांवचे सिवारांत राहतील. —ऐ. सं. सा. खंड ५ पृष्ठ ३६

कसारा—तोफेचा एक प्रकार.

कसाला—तंगी, तंबी, जखडबंदी, परिश्रम; जिवापाड मेहनत किंवा कष्ट, श्रम, विपत्ति, त्रास, प्रराक्रम.

१ आम्ही घोडीयावरी जीन कमरा बांधून कसाला मातबर केला. ते समयी कारभारी येऊन भेटले. —पे. द. १४ पृ. ६

२ आठ महिने बाजीराव साहेबांच्या स्वारीबरोबर कसाला भोगला.

—पे. द. ४४ पृ. ६१

३ रा. गोविंदपंत मामा वृद्ध. त्यांनीं कसाला किती करावा.

—खरे ४६८४

४ त्याजला लिहिण्याचा कसाला होईना. रा. खं. ६ पृ. २५१

५ त्यांचें शरीर आधीं क्षीण; त्यांमध्यें मिरजेचा कसाला भारी पडला, त्यामुळें भागवटा आला. —ऐ. ले. सं. ३४२

कसाला-असाला—कष्ट, तसदी.

विठाजीनें वाद सांगितला वतनाचें संरक्षण केलें. पांढरीचे कसालेअसाले सोसून पांढरीमुळें नागवणा पडल्या त्याहि दिल्या.

—ऐ. सं. सा. खं. ४ पृ. ७९

कसाला पडणें—जाच, छळ, छडाछड होणें.

यैशास आपलीयास (आपणास) दिवाणचे वगैरे कसाले बहुत पडले याजमुळें कर्जवाम बहुत जाले. —चं. चू. द. पृ. १८

कसिस—घासाघीस, कोशिस; ओढून धरणें.

१ सारांश नकशाप्रमाणें इंग्रेजाची तंबी हुजूर मंजूर होत नाहीं (निजामाकडून) व चौथाईचे तहाकरिता कसिस बहुत होत आहे यास्तव-(पुणेंकर) कारपरदाजांनीं इंग्रज वकिलास बोलाविलें आहे व दारमदार विषई परस्परें बोलणार.

—पुणें अखबार भाग ३ पृ. १८

२ दहापांच दिवस ज्वाबसालांत कसीस व वोढ धरावी.

—पुणें अखबार भाग १ पृ. २६४

कसीद करणें---काढून घेणें.

कसीदगी—कमी करणें.

जरूर एक वक्त पादशाही कामाबद्दल कांहीं कसीदगी केले तरी अवल-सवाईनें मुवादला देऊन बाजद कसीद करावे.

—इ. मं. पृ. ६७

कसीदह—प्रकरण, काव्य.

कसूर—आकस, दंश, कुसुर.

राजे रामचंद्रराव जाधवराव विठ्ठसुंदर याचे सल्हेंत हैदरजंगाचे वेळेस नव्होते, तो कसूर धरून जाणोजी निंबाळकर याची आगाडीची कटक होती, ते नमूद करून त्याची याची लढाई लाविली.

—स. ब. पृ. २८

कसूर कोताई—चूक, न्यून, अंगचुकारपणा.

स्वामीसेवेचे ठायीं आम्हांपासून कसूर-कोताई हा कालपर्यंत जाली नाहीं व पुढेंही होणार नाहीं. —का. प. व. पृ. २८

कसोकसी, कसोकशी—कसोशी, कसून चौकशी.

मशारनिलेनी कसोकसी करून मख्ता साधून काम उरकलें.

—पे. द.

कसोशींत आणणें---जरवेंत, दावांत आणणें.

रजपूत रांगडे व अवंतर थोर थोर संस्थानकरिते (संस्थानिक) जबरदस्त आहेत ते तुम्ही कसोशींत आणून दिल्लीपर्यंत बादशाहीचा व सुरळीत-पणाचा जवा बसवून देऊं. —पाणि. बख. पृ. १९

कह्या—१ (कह्या करणें = आज्ञा करणें किंवा हुकूम मान्य करणें) २ दाब, हुकमत.

राजपुरीस सल्ला करावा म्हणून कोण कोण उपाय योजिले ते एकीकडे राहिले तेव्हां जर कह्या करितेस तर ये दशेस का पावतेस ? अद्याप इंगरेजास हयात मागा कीं पुढें तरी बरें होईल. याची कह्या न करा तेव्हां कोठेंहि तुम्हांस थारा नाहींसा करून घ्याल.

—पे. द. ३३ पृ. १९५

२ दाजीबा आमच्या कह्यात वागत नाहींत त्यास जरब देईसा येथें कोण्ही आहे नाहीं तें स्वामीस विदितच असे. —पे. द.

३ कंपू सरदारसमेत महादजी शिंदे यांच्या बायकांच्या कहेंत, त्याजपक्षीं अलिजाबहाद्दर यांची कमती पडते. —ऐं. ले. सं ५१४७

कह—कीं.

कहत कदीम--कहतकद्म; पूर्वीपासून.

जो कांहीं सालाबाद कहतकदीम पिढी दर पिढी देवकप्रतिष्ठा तागाईत सोलीपावेतो चालिली असेल तेणेप्रमाण याचे दुमाला असे.

--शि. च. सा. खं. २ पृ. २९८

कहत, काहत—दुष्काळ.

येथील विचार पाहतां च्यार सालापासोन कहत पडला. खसूस या सालीं पावसाची कमी व मुलूकात काहताकरिता रयेत व ढोर मरून गेली.

—पे. द. १७ पृ. ६०

कहरी—जबरदस्त; उग्र, भारी.

१ शत्रूचें नित्य माणूस जिन्नस घेऊन जात असतां सांपडतें. वावगा दिवस जात नाहीं. पारिपत्यहि कहरी होत असतें.

--ऐ. ले. सं. ४३९४

२ येसाजीपंत मंगळवेढेकर जखम मानेवर तरवारीची कहरी आहे. कानोपंताची मात्र हलकी आहे. --ऐ. ले. सं. २८३३

३ श्रीपतराव यांस जखमा दोन, एक कहरी व एक हलकी आहे.

--ऐ. ले. सं. २७६४

कहातसाल—कहत–दुष्काळ; दुष्काळाचें वर्ष.

भट मजकुराची मिरासी पिढानपिढी चालत आली आहे यैसीयास कहात सालामधें परागंदा होऊन गेला त्याची आई व बाईल दोघी बायका उरल्या. —शि. च. सा. खं. २ पृ. १४५

कहाली--बिघडलेली, अत्यवस्थ.

नवाब नजीबदवले यांची तबियेत कहाली आहे. जुलाब घेतला आहे.

--हिंगणे दप्तर खंड २ पृष्ठ १०४

कही—सैन्याच्या तळावरील लोक दररोज लाकूडफाटा, दाणा-वैरण शत्रूच्या मुलखांतून आणावयास जातात त्या लोकांची टोळी.

१ श्रीमंत विश्वासरायाची लढाई जाली ते समयीं कहीचीं घोडीं वळून ताकीददारांनीं नेलीं. --पे. द. २६ पृ. १९५

२ वैरणी तरी श्यामलानी दग्ध केल्या उरल्या होत्या त्या आमच्या सैन्यानीं जाळिल्या कहीस जावे तरी फार लांब जावे लागते आणि पाणीहि मिलत नाहीं. --पे. द. ३ पृ. ३९

कहीकबाड—कबाड म्हणजे लाकूडफाटा, सरपण. सैनिकांना लागणारे जळण. लाकूडफाटा वगैरे गोळा करण्यासाठीं सैन्याबरोबर एक टोळी असे, ती रोज आसपासच्या प्रदेशांतील धान्य लुटून व घरें मोडून लाकूडफाटा आणी. तिला कही भरणें अशी संज्ञा होती.

१ चांदवडा अलीकडे धोंडोपंत गोडबोले श्रीमंतांकडून होते त्याशीं याशीं कहीकवाडावरुन कटकट झाली. ते चढून आले यांनीं मुकाबला केला.
—हो. कै. पृ. १३८

२ लष्कराचा मुक्काम येथें पाऊण महिना आहे. परगण्यांत एक कसब्या-विरहित खेडें निखालस राहिलें नाहीं. लष्कर अनिवार. रोज कहीकवाडा-खालीं बाकी राहिली नाहीं.
—ऐ. ले. सं. ३००६

३ मुलकांत रसद व कहीकवाडें मना करीत मुराररराव घोरपडे व गोरंदारे याचे फिरंगी फिरतात.
—पे. द. २८ पृ. १२४

कहेंत—कह्यांत; ताब्यांत.

दादासाहेब यांनीं नारायणरायास पोटाशीं घेतलें. परंतु गाडदी कहेंत न राहतां, पाय धरुन ओढून कचाकच वार केले.
—ऐ. ले. सं. २०४४

कळकट—कुळकट; वंशावळ; वंशवृक्ष.

या हरदूजणांची कळकट पाहिली हर नाईक देश (देसाई) साळुंख्या रायापैकी व गोपाळ नाईक हे माहीमकर म्हात्र्यापैकी. त्यास व यास कांहीं संबंध नाहीं.
—पा. क्ष. ज्ञा. इ. खं. १ पृ. २६

कळवा (स्त्रीलिंगी. अनेकवचन कळावा)—घोडे चरावयास सोडले असतां त्याच्या दोन पायांस दोरी बांधतात ती.

आबाप्पा धनगर अलकूडकर याणें घोड्याच्या कळावा नेत होता, सबब बेडी घातली.
—ऐ. ले. सं. ३७३९

कळवंडी पडणें—कलह लागणें.

श्रीमंतांस पैक्याची निकड शिंदे यांस द्यावयाची आहे. पण लोकांचीं घरें बुडवून शिंद्यांची भर करावी तरी असा गृहस्थहि कोणी शिल्लक राहिला नाहीं. शिंद्यांचा नेट फार आहे. सारांश, पुढें (श्रीमंत-शिंद्यांत) कळवंडी पडाव्या ऐसा रंग दिसतो.
—ऐ. ले. सं. ६७१८

कळवांतिणीचं दुःख—गर्मी, वेश्यासंगामुळें जडलेला रोग.

रेणूरावसाहेब याहांची (यांची) सवारी मलकार्जुनाकडे गेली. तमाम खंडन्या घेतल्या. तेथें तिकडील कळवांतिणीचं दुःख भरलं. नंतर देशी आले.
—स. व. पृ. ३५

कळसपाकी—कापडाचा एक प्रकार. कळसपाक या गांवीं तयार होणारें कापड.

मानाजीं आंग्रे यास वस्त्रें, मंदील, दुपट्टा झगा तिवट कलसपाकी, बांधावयाचें पदक, तरवार कटार, येणे प्रमाणें पाठविली आहे.
—पे. द. ३३ पृ. ३४०

कळावती—कलागत, भांडण.
रायाजी देशमुख बाजाराचे रोजीं तेथें गेला होता त्यामध्यें व पंडित मशारइलेमध्यें कळावती जाली. —ऐ. सं. सा. खं. १ पृ. ११९

कळीचा अर्जून—कलियुगांतला अर्जुन.
भरतपुरावर माणसेंही मोठींमोठीं कामास आलीं. सोमाजी लांभाते, केवळ कळीचा अर्जुन, तेथेंच खपले. आणखीही दहा-पांच माणसें गणनीय कामास आलीं. —हो. कै. पृ. १६७

ा—खुसपट, संशय.
नसती कक्षा काढून परस्पर सौख्य चालत आहे त्याजमध्यें कलुपता वाढवावी यैसे त्यास विहित नाहीं. —पे. द. ३ पृ. ४९

कृत्रिम धावती—कपटकारस्थानाचा उद्योग.
हे अनेक प्रकारच्या कृत्रिम धावतीतहि आहेत असें वृत्त अढळलें. तें सेवेसी लिहिलें आहे. —पे. द. २५ पृ. ८६

कृत्रिमीसार—कपटाचे, कपटी.
सारें कृत्रिमीसार. लिहितां विस्तार होतो. —पे. द.

कृत—वर्तन; प्रकार; हकीगत.
पलटणवाले यांचा फितुराचा कागद सांपडला असल्यास मग बोलण्यास अवघड नाहीं. त्यास ही कृत कशी जाहली हें कळवावें. —ऐ. ले. सं. ६४१३

कृतकर्मा—अनुभविक; पूर्वी मोठमोठीं कामें केलेला.
आपणांसारखे कृतकर्मे त्या फौजेंत असते तर असें न होतें! बरें, असो. श्रीमंतांच्या दैवेंकरून सर्वहि गोष्टी उत्तमच होतील. —ऐ. ले. सं. २७९९

कृताकृत—नांवाला, जुजबी, फुटकळ, जेमतेम.
चमेलपार तीन वर्षांचे आवर्षणामुळें मुलुख वैराण जाला मातबर मातबर शहरें पण कृताकृत वसल्या आहेत. दाणा चारा पाणी कसें मिळेल? —म. शि. यां. का. पृ. ४२७

कृताकृत—करणे न करणें, कर्तुंअकर्तुं, कर्तव्य-अकर्तव्य.
माधवरावसाहेब जातीनें कारभार करूं लागले. कृताकृत दादासाहेबाचे स्वाधीन कांहीं नाहीं. कार्याकारण बंदोबस्त करीत चालले. —स. ब. पृ. ३२

कृताकृत—कसे तरी.
ऐवज रोख मिळत नाहीं. २५–५० हजार पावेतों कृताकृत रोख मिळतील. परंतु खातरजमा वाटत नाहीं. —ऐ. ले. सं. ४६७७

कृपा—दया.

स्वामीस कृपा येईल तरी आम्ही कर्जापासून मुक्त होऊं.

—रा. खं. ३ पृ. २१

कृपासंपाद्य—कृपासंपादन.

आम्हास स्वामीच्या कृपासंपाद्याहून अन्य अधिकोत्तर नाहीं.

—पे. द. २५ पृ. ८६

कृष्णमुखी—काळतोंडा, शिद्दी. शिद्द्यासाठीं वापरण्यांत येणारें तिरस्कारयुक्त विशेषण किंवा संबोधन.

आपण ते ठिकाणीं येऊन कृष्णमुखास नतीजा दिल्हा नसतां तरी काय होतें ?

—पे. द. ३३ पृ. २८

क्लप्त—माहीत.

येथील वर्तमान तों आपणास क्लप्तच आहे.

—इ. सं. जु. ऐ. गो. पृ. ३

क्रमणें—मरणें.

पाटीलकी मातुश्री सखुबाईस दिल्ही होती. आलीकडे सकूबाई क्रमलियावर स्वामींनी बाईस अजरामर हक्क करून दिल्हा असे.

—पे. द. ३१ पृ. ६०

क्रिया उजवणें—शपथेंतून किंवा दिलेल्या शब्दांतून उत्तीर्णता होणें, शपथ पार पडणें.

बरें असो. रिणानबंद प्रमाण. दादाची आनाची क्रिया उजवली ! **भास** (भाक, भाष, शपथप्रमाण, वचन) घेतली तिचें सार्थक केलें !

—पुरं. द. भाग ३ पृ. २७

क्रियानष्टपण—हरामखोरी.

मध्यस्थानीही निंघते समयीं साफ त्यास विचारलें कीं गोवलीपासून सर्व कारभार आम्ही माहीत आहो आणि पुरते क्रियानष्टपण आमचे वाटयास असेच त्यासी समजले आहे.

—पे. द. २० पृ. ८७

क्रियापाल करणें—शुद्ध करून हिंदु धर्माचे आचार पाळण्यास मोकळीक करून देणें.

पेशजी शिदे भंडारी व साष्टी प्रांतांतील खार पाटील यासी हिंदुधर्म लावून दिल्हा त्याप्रमाणें तुम्हास क्रियापाल करून हिंदुधर्मास मोकळीक केली.

—इ. सं. पे. द. स. प. मा. पृष्ठ २६३

क्रियाबाल—अज्ञान, वयांत न आलेला.

हरी सोनार पोतदारीचें कामकाज करूं लागले तेव्हां आम्ही क्रियाबाल होतों आमचे कोणी करावयास नव्हतें. —पे. द.

क्रियावंतपण—वचनाचा सच्चेपणा.
मुलाचा आकीकार (अंगीकार) करावा. आपले पदरीं भलेपण क्रियावंत-पण घेऊन निभाहून घ्यावे. —चं. चू. द. पृ. १६८

क्रिया सुटणें—क्रियेंतून किंवा शपथेंतून उत्तीर्ण होणें.
या उपरि आम्हीं केल्या शपथाप्रमाणें उतराई जालों, उपरि आमची क्रिया सुटली. आम्हास मोकळीक करून उत्तर पाठविलें पाहिजे.
—ब्र. च. पृ. १०

काइरे मुबारक—दीनाला रक्षण द्यावें अशा हेतूनें.
तो सुभे मिर्जा राजा पाईन किल्ले पुरंदर बमय लस्कर घेरा घालून सिकंदा केला ते वख्तीं सिवाजीराजे मुलाजमतीस येऊनु किल्ले व मुलुख दौलत काइरे मुबारक दाखल जाला. —पे. द. ३१ पृ. ४३

काइली होणें—काहिली होणें, आजारी, अत्यवस्थ होणें.
अलंपूर मुकामीं आल्यावर श्रीमंत सुभेदार बहुतच काइली जाले. सेवटीं शु॥ ११ स देवाज्ञा जाली. —चं. चू. द. पृ. ९८

काईल—कायल; हैराण. निरुत्तर.
वकील बोलिले कीं, पत्र कोठें आहे तें काढावें, म्हणजे त्यास काईल करूं.
—ऐ. ले. सं. २४७३

काकून—किल्ला, गढी.

काकड—सरहद्द.
आमचे काकडावर फौज आलियावर जैसें आपण सटवासमागमें मुखजबानी सांगोन पाठविलें तैसे न झाल्यास, या पत्राप्रमाणें व्हावें.
—धा. प. इ. सा ३ पृ. २३२

काकर—ओरखडा.
दादासाहेब पेशव्यावर औरंगाबादचे मुक्कामीं जाधवानें मारेकरी घातला. (बहिर) दिशेकडे जातां मारेकऱ्यानें शेतखान्याजवळ गांठिलें. तरवारीची हूल चालविली. थोडासा दंडावर काकर निघाला. खैर झाली. मारेकरी गाडदी मुसलमान होता. —ऐ. ले. सं. ३४५

काकरती—निसटती.
पागेचे लिंगोजी जाधव यांस गोळी काकरती दंडावर लागली.
—ऐ. ले. सं. ८९३

काकळूत—करुणा, दया.
तोतयाचे लोक सांपडतील त्यांचें पारिपत्य बेमुलाहिजा करणें. मारून टाकणें. काकळूत सर्वथा न करणें. —ऐ. ले. सं. २६८०

कागज--कागद.

(अवतरणासाठी 'वेदार' शब्द पाहा.)

--पुणें अखबार भाग ३ पृ. १०३

कागदगडी—पत्र नेणारा गडी.

मोंगल या प्रांतीं येतो तंवर घाट चढल्यावर आणखी कागदगडी पाठवितो. परंतु बहुत सावध रहावें आम्हाकडे येण्याचें कराल तर एकंदर येऊं नका.

—पे. द. १० पृ. १४

कागदी—१ पत्रें घेऊन जाणारा जासूद किंवा कासिद. २ कागद तयार करणारा.

१ कागदी जाऊन जावसाल यावयास दिवसगत लागेल याजकरितां आजच सेवेसी विनंती लिहिली आहे. —पे. द. २५ पृ ५३

२ किल्लेमजकूरचें वर्तमान कागदी पेसजी कागद घेऊन सेवेसी आले त्यावरून विदित होईल. —पे. द. ३३ पृ. २७९

३ कागदीपुरा औरंगाबाद.

कागदी जोडी--पत्र नेणारी जासूदजोडी.

स्वामींकडे ३-४ जोड्या कागदी गल्या. परंतु एकही अद्यापि आली नाहीं.

—ऐ. ले. सं. १७४६

काचकसूर—काटकसर, खाराखोशी.

२७ प्रगण्याच्या फडणिशा व वऱ्हाडची फडणिसी मात्र राहिली आहे यांत मोठी काचकसूर केली तर पाच सहा शे रुपये मिळतील.

—नाग २ पृ. ४९

च खुलणें किंवा खुंटणें—उणापक्ष होणें, बे-अब्रु होणें, तडा पडणें.

पातशाहातची छडी आपल्या हातीं राहिल्यास विलायतवाले यांची कांच खुलून जाते. —हिं. द. खंड १ पृष्ठ ४५

कांचारी, कांचकार—कांचकाम करणारा किंवा बांगड्या वगेरे बनविणारा कासार.

काजकामें—कामकाजें (व्युत्कमाचें उदाहरण)

त्यावरी दिपाइ आऊ यानी दत्तोपंत हेजीब ठेविले. त्यानी हेजिबीची चाकरी करून काजकामें केलीं, ते समयी बांदलाची सक्तगिरी फार होती.

—ऐ. सं. सा. खं. ४ पृ. ६७

काजी कोतवाली करणें—अधिकाराचा दबाव दाखविणें.

त्यास माझ्या पायांत सामर्थ्य नाहीं ऐसें नाहीं. परंतु तसें हिंडल्यानें महत्त्व उणें पडून हलकेपणा येतो. याजमुळें काजी कोतवाली करून कार्य संपादिलें पाहिजे.

—ऐ. ले. सं. ६४०९

काटयादाटयानें जेर करणें—युक्तिप्रयुक्तीनें किंवा दपटशानें जेर करणें.
—पे. द.

काट--यत्न, कर्तृत्व.

शत्रूच्या मारापुढें काट पुरेनासें पाहून आमच्या फौजा तमाम माघाऱ्या निघाल्या. —ऐ. ले. सं. ८०६

काटक—बंडखोर, दंगेखोर.

१ कर्नाटकांतील लष्करांत भरती होणारी एक लुटारू जात. २ कर्नाटकी शिपाई.

येथील काटकांवर भरंवसा नाहीं. समयीं अवसान सोडणार. यास्तव हुजरून लोक आले म्हणजे अवसान बसेल.
—ऐ. ले. सं. ३२९१

ऐसे सांगून भगवंतरायाकडील फौज आम्हाकड पाठविली. आम्हास सर्व राज्याचा लोभ दाखविला. काटकाचा विश्वास नाहीं.
—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ८१

गोकाककर देसायाचे ४०० काटक येऊन त्यांनीं परवां छापा घालून मोर्चे उधळले. —ऐ. ले. सं. ५३२९

काटक संधी पाहून आपल्या काबूस चुकणार नाहीं.
—पे. द. २६ पृ. १७४

हा कर्नाटक देश काटकी मुलुख येकास पदरी घेऊनु येकावर प्रयोग करावा तेव्हां चार टक्के साधतात. —पे. द. २८ पृ. ८५

काटकाई—लुटारू लोकांचा दंगा, बंड, भालेराई.

वाटेस काटकाई फार, एकटया दुकटयास वाट चालत नाहीं,
—ऐ. ले. सं. ४११०

पुढें परगणे मजकुरी काटकाई होऊन सरकारअमल चालेना म्हणोन तुम्ही परस्थळीं जाऊन राहिला.
--इ. सं. पे. द. स. प. मा. पृ. ८५

गदगकर देसायाच्या मुंडरगीच्या स्वारांनीं प्रांतांत काटकाईस ारंभ केला आहे. —ऐ. ले. सं. ६९७८

काटगिरी चालणें--हात चालणें, कार्य करून दाखविणें.

शत्रुभोंवता यांचे फौजेचा तलावा फिरल्यास मग त्यास जड पडेल. तें कांहीं नाहीं. आणखी महिनाभर तेथेंच राहिल्यास आपली खराबी मात्र होईल. परंतु कांहीं काटगिरी चालावयाची नाहीं निध राहिल्यास शत्रु रोज छापा घालील आणि खराबी करील.
—ऐ. ले. सं. ४१४३

काटफेरा—काटमारा ? गलबताचा एक प्रकार.
खारेपाटणचे जहाजाविसी आंग्र्याचे कारकून रदबदली करितात त्यास त्याचे कारकुनाजवळीं तुम्हास पत्र लेहून कीं काटफेरा मात्र देणें.
—पे. द. ३४ पृ. ९३

काटा—काठा.
किनाऱ्याकडील कांठचा प्रदेश.
Coast border adjoining shore or country.
चेऊल प्रांतचा तमाम काटा राखावयास जमाव जागजागा आम्ही ठेविलेच आहे. —पे. द. ३३ पृ. ५८

काटादाटा--कावादावा.
हैदरअल्ली यास श्रीमंतांनीं छावणी केली यामुळें मसलत भारी पडली, परंतु तूर्त तो काटचादाटचानें धोवभाव दाखवून त्यास (आपण) भारी ऐसा विचार त्याणे दाखविला आहे. —ऐ. ले. सं. ८४०

काटी किंवा काठी आड करणें--दरवाजे देणें, लावणें, पराङ्मुख होणें.
आबरू तो जाऊन चुकली परंतु प्राणासी गांठ आली तेव्हां गांव सोडून दिल्हा. काठी आड केली. —पे. द.

काटे—कांठेवाडांतील लोक. भिल्लकोळचासारखी काठेवाडांतील एक लुटारू जात.
काटे मात्र दररोज १०–२० घोडीं नेतात, चोरांचा व काटचांचा उपद्रव लष्करांत फार. —ऐ. ले. सं. २३०५

कांटेगारी—कापाकापी; हातघाई.
श्रीमंत लांब आहेत. पटवर्धनास धुडावून द्यावें या मतलबें हैदरखान लांब आला, तों रावसाहेबांकडील लोकांनीं उतफती कांटेगारीस उठले. राउताराउतांची मिठी जाहली. तिकडील एक घोडी पाडाव करून आणली.
—ऐ. ले. सं. ८०५

काठदरी—कडेची डोंगरकठडी.
खाडीच्या पलीकडील काठदरींत बरकंदाज लोक मारीत आले.
पे. द. ३ पृ. ३४

कांठमारा—एक तऱ्हेचें गलबत.
जर मानाजी आंग्र्यानें कांठमारा नायासाचा सोडिला तर आम्ही तसाच त्याचा सोडून देऊं. --पे. द. ३४ पृ. ८८

काठी--जमीन मोजणीचें एक जुनें माप.

काठीनें पाणी शिवणें—अंगमोड न करितां दुरून किंवा परस्पर काम उरकण्याचा प्रयत्न.
जातीनिशीं जुमामर्दी करून दौलत राखोन आपलाले लौकिक राखावे हें चित्तांत आणीत नाहीं. तेव्हां परिणाम कसा लागेल ? काठीनें पाणी शिवल्यास कै. वडिलांचे पाठीमागें लौकिक होत नाहीं.
—ऐ. ले. सं. ७९०८

काठी भवंडणें—झेंडा फिरवणें (?)
सुलतान अल्लाउद्दिन पादशहा राज्यीं बैसला, मग काठी भवंडिली. क्षत्री राजे आपले राज्ये सोडून पळाले. —बिंब १५

काठे—काठेवाडांतील लोक.
यामुळें काठेवाडचे जमीदार यास जी सुकडी मिलत होती व काठे लोकापासून किती येक गांव खरेदी केले ते करणेल वाकरसाहेब याचे बंदोबस्तांत गायकवाड सरकारात दाखल केले आहेत.
—पे. द. ३१ पृ. १६६.

काठेवाडी सुतळी—सुतळीचा एक प्रकार.
तुम्ही काठेवाडी सुतळीचा संग्रह केला आहे, तर आम्हांकरितां एक सुतळी लवकर पाठवावी. --ऐ. ले. सं. ५००३

कांडादळा—दळणकांडण (व्युत्क्रमाचें उदाहरण)
पुढें आई व आम्ही तिघे मुले लहान. यांचे कांडादळा करून पोट आई भरीत होती. —ऐ. सं. सा. खंड ३ पृष्ठ २११

कांडी—हत्तीच्या पायास होणारा एक आजार. —पे. द.

काढा--कर्जाऊ दिलेल्या रकमेचें व्याज धान्याच्या रूपानें घेतात, त्याला काढा म्हणतात.

काढा काढणें--झाडून शोध काढणें.
मौजे आधारणें या गावीं वाघाचा उपद्रव झाला तेव्हा मौजे मजकुराच्या ठाकुरांनीं हिंमत धरून पेणचे मुकामी मोठा पटाईत वाघ मारून आणून दाखविला, आणि अर्ज केला कीं साहेबी आम्हांस घरपट्टी माफ करावी. म्हणजे पुढेही रानाचा काढा काढून गावास उपद्रव होऊं देणार नाहीं त्यावरून ठाकूर असामी १० दाहा यास घरपट्टी माफ केली असे.
--थो. मा. रो. पृ. २६१

काढा काढवणें—निकाल करणें, मारून टाकणें.
स्वारीपैकी २५ माणूस चोरबातमीनें पाठवून आडीचे रानांत शामलाकडील १२ असाम्या आल्या आहेत, त्यांचा काढा काढवणें.
—ऐ. सं. सा. पृ. २३ लेखांक १२

काढा किंवा काडा काढणें—निपटून काढणें; नीर काढणें; संपूर्ण छडा लावणें.

त्याचे लोक असतील त्यांचा काडा काढून बेमुर्वत पारिपत्य करणें. तिळा-इतकी क्षमा न करावी. —ऐ. ले. सं. २६७९

काढाव काढणें—माघार घेणें.

सीख पाठमोरे होऊन काढाव काढोन जोहरमल जाटाचे नजिक निघोन आले. --पे. द. भाग २९ पत्र नं. १२६

काढावा—कर्ज किंवा उसनें घेणें.

काढावा काढणें--अंग काढून घेणें. पाय मागें घेणें; पळ काढणें.

गोळा गोळी होऊन त्यांनीं चालवून घेतलें, तेव्हां पानशांचे फौजेंने काढावा काढून बाजूस जाले. --ऐ. ले. सं. ६९६४

ये वेळीं काढिता काढावा
नामवस जाईल तुझा.

--ऐ. पो. के खंड २
(दत्ताजी जाधव पोवाडा)

केळ्यास झुंज जालें माणसें बहुत मेलीं. पोमदे नायकानें धनुष्याची आढी काढून राया भोजाची दांडी छत्राची वेधली दुसऱ्या तीरें शीरचा मुकुट वेधिला. मग भोजराज्याच्या सैन्यानें काढावा काढला.

—बिब. ८

काणवण—अनमान किंवा टाळाटाळी, काचकूच.

कर्नाटकांत फौज रवाना करावी परंतु लोक जावया काणवण करितात यास्तव खासा रायास पाठवावें. —ऐ. ले. सं. पृ. २७५

काणवरा—सरमिसळ, पंचभेळ खुर्दा.

येके भांडेरीस रसद पाऊणलक्ष यंदा शिद्यास दिल्ही. सरकारांत द्यावयास मात्र (त्यास) काणवरा टका मिलत नव्हता.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १४९

काणस किंवा काणुस—रोड.

चहुं दिवसांचे मुहूर्तानें आले त्यास सवा महिना झाला. माणसांचीं काणसें झालीं आहेत ! —ऐ. ले. सं. १५६३

कातरतें घेणें—अंग काढून घेणें.

इकडून तोफांचे गोळे त्याजवर लागू जाहल्यावर कातरतें घेऊन तोफांचे गोळे टाळून आपली फौज पोटासी घ्यावी असा मनसबा त्याचा होता.

—ऐ. ले. सं. २३९३

कातवार, कतवार—व्यापारी; उदमी. (लक्षणेनें लष्कराबरोबरचा बाजार)
१. चार-पांच हजार लष्कर होतें. याखेरीज कातवार, तोफांचे बैल. खाणार फार ! भरीला शिवार लुटिला. —ऐ. ले. सं. ९६६
२ दुसरे जामदारखाना व कातवार बराबर आहे. हे पल्ला पाऊन मगच कुंदगोळच्या गळा पडता येईल. —पे. द. २८ पृ. १४८
३ शिंदे आपलें कुटुंब ब्ऱ्हाणपुरास लावून देऊन कातवार पिच्छाडीस ठेवून या रोखें यावें हा बेत होता. —ऐ. ले. सं. ४८२२
४ "स्वार कातवार"—लष्कर व बाजार.
—पे. द. भाग ४१ पत्र नं १५६

कातवार-लमाण—वाणीउदमी, व्यापारी वगैरे लष्कराबरोबरचे बाजार-बुणगे.
वाट अडचणीची. झाडी, डोंगर. समागमें कातवार-लमाण वगैरे भारी. शत्रू मागें येत आहे, यामुळें हंबीचा रोख धरिला.
—ऐ. ले. सं. ३०८६

कातिल—कत्तल करणारा.

कादंबरी करणें—खरा भासण्यासारखा मनाच्या कल्पनेनें प्रसंग किंवा हकीगत सजविणें.
करारनाम्याचें पत्रच हल्लीं नवें कल्पित कादंबरी करून शाहु महाराजांचा काळ जाहल्यापूर्वी २ वर्षांचा कागद केला. कागदास धूर देऊन कागद जुना केला ! —ऐ. ले. सं. ५५५०

कांदा (चवरीचा)—दांड्यावर बसवावयाचा चवरीचा गुच्छ.
चवरीचे कांदे घेतों. —ऐ. ले. सं. १०९१

कान—खाण.

कानगी—नैवेद्य. (व्यंकोबाचा). व्यंकोबा देवाला जी वार्षिक देणगी देण्यांत येते ती.
१ तिरपती पाहाडावर श्री व्यंकटेशजीचे यात्रेस लोक येतात. त्या लोकांनी कानगी व पूजा वगैरे दक्षणा देण्याचें व त्या लोकांस बहुमान मर्यादा पोहोचण्याचे असे दोन्ही कायेद्याचे हिशोब दोन, नंबर पहिला व नंबर दुसरा याप्रमाणें तयार होऊन आले ते तमाम लोकास जाहीर करणें.
—पे. द. ३१ पृ. १५५

२ श्री व्यंकटेश देव स्वामीचे शेवेसी विनंति शेवक चिंतो वामन देशमुख स्वामीस सालमजकुरी येकसाला कानगी रुपये पांच पाठविली आहे शके १७३७ —पे. द.

कानगोई, कानूगोई—कानूगोचें काम अगर वतन.
सर्कार मजकुर येथील कानगोईचे वतन —रा. १२. १७४

कान पाडणें—दुर्लक्ष करणें; उधळून लावणें.
अव्दाली तहाचे बोलत होता. तें रोहिल्यास कळल्यातर त्यांपाशीं (अव्दालीपाशीं) जाऊन म्हणो लागला कीं, "तुमचे सोबतीनें आमचा खराबा बहुत जाला. एक वेळ मी जाऊन मराठ्यांशीं लढाई करीन. मग तुम्हीं सख्यत्व करावें. तूर्त आपण (मीं) या मनसब्यास रजावन्द नही." त्यावरून अव्दालीनेंही कान पाडिले पुन्हां पूर्ववतप्रमाणें झुंज होऊं लागलें.
—भा. कै. पृ. ९७

कान पाडणें—१ आपलें अंग नाहीं असें दाखविणें, २ हल्ला किंवा कुरापतीसाठीं तयार होणे.
आमचेजवळ राहिलीयाने ठीक राखलियास मातबरी. यासाठीही आमलसे मनापासूनहि बरे आहेत. परंतु दुसरा प्रसंग पडिलियास कान पाडावयास चुकणार नाहीं असेंहि आहे. —पुरं. द. भाग १ पृष्ठ १३९

कानागाडा—काणाडोळा, दुर्लक्ष.
राजमलानें सुभेदार याजेला प्रांत धुडाड येथपावेतो आणून ईश्वरसिंगराजास कळविलें की, मल्हारजी होळकर आला! तेव्हां राजानें आज्ञा केली कीं आपली फौज जमा करा. ऐकून कानागाडा केला. हा फितूर राजास समजतांच राजानें विषप्रळय केला. —हो. कै. पृ. १५

काना वेगळें टाकणें—कानाआड करणें, कानाडोळा करणें, दुर्लक्ष करणें.
भलताच उपद्रव करून तो पैका नेतो. पण येथे सांगावें तर कारभारी कानावेगळे टाकतात. —पुणें अख. भाग २ पृ. १६२

कानिर्डेपण—हट्ट, विक्षिप्तपणा, हेका, चिडखोरपणा.
"क्षीणतेचेयोगेंकडून कानिर्डेपण फार आहे. उपाय नाहीं.
—ऐ. सं. सा. खं. ३ पृ. २३२

कानीझ—मोलकरीण, दासी.

कानू—फायदा.
यैसे कित्येक मुसाहेब (मित्र) तजवीज (सल्ला) देताती (परंतु) महमद अलीखान चित्तात कानू पाहून काम करणार.
—E. M. P. पृ. १११

कानू—पट्टी, कर, पट्टी घेण्याचा हक्क, कायदा, पद्धत.
१ सरखेलीच्या भयास्तव खाडींत गलबतें जावयास भितात व कौल घ्यावा तर येथें प्रतिबंधक. याकरितां येका गलबतास स्वामीचें दस्तक असिलें म्हणजे ते खाडीत येऊ जाऊ लागेल. म्हणजे सहजच दुसरे येतील. म्हणजे

थोडीबहूत कानू बसवावी याकरिता येकदोन कौल व दस्तक डौल येतील तर हा चौका बसवून पाहो. —पे. द. ३० पृ. ३८८

२ मौजे मजकुरी सेल बैल म्हणून कानू होती तेही ब्राम्हणास कृष्णार्पण देऊन पत्र करून दिल्हे. —शि. च. सा. खं. २ पृ. ३९९

३ नवी कानू होते हे चालणार नाहीं. सुदामत इस्तकबील पासोन चालत आहे त्याप्रमाणें चालवू, जास्ती कटकट करतील ते चालणार नाहीं. —पे. द. ३० पृ. २०२

४ हल्लीं सालोसाल नजरेची कानू गांवगन्नास बसविली ते दूर करावी. —इ. सं. ऐ. टि. भाग २ पृष्ठ ४१

कानूकवाइत—कानूकैद.

जलतरू पाषाण निधिनिक्षेप कानूकवाईत देखील हक्कदार खोती पुत्रपौत्री वंशपरंपरेनें अक्षय देणें दिले. —दस. शि. मो. इ. पृ. १३

कानूगो, कानगो—जमिनीच्या वहिवाटीची व वसुलाची नोंद ठेवून माहिती पुरविणारा व केव्हां केव्हां मोजणी करण्यांत व धारा ठरविण्यांत मदत करणारा वतनदार मुल्की अधिकारी.

कानूनात—(अ) कानून, कायदे.

काप—कांप, कँप, छावणी.

अजम हनराबल इलफिशटन साहेब धोडनदीचे कापांत गेले होते, तेथून रोजमा आले सबब आम्ही भेटीस मागील सहा घटका दिवसास गेलों होतों. —शा. द. वे. पृ. ८२

कापडी—एक यात्रेकरूची जात. तो तांबडी पताका बाळगतो व तुळशीच्या माळा, गंगेच्या कुप्या इत्यादि विकतो.

कापाल—नरोटी; नरोटीप्रमाणें शुष्क.

मामलीयाचा तो कापाल केलेले! याउप्पर स्वामीनी यासी परिछिन्न सांगोन आमची शेतें मळें देवितात तर बरें. —पे. द. ३४ पृ. १६०

काफरी—शिद्दी. एक आरमारी दर्यावर्दी मुसलमान जात.

फिरंगाणातून काफरी पलोन आले. आसामी तीन. हे काम करावयास धक आहेत. तरी यास वाडीयाचे कामावरी ठेवून घ्यावें. —पे. द. ९ पृ. ३

काफिलासालार—कारवानांचा नायक.

काफी—लायख.

काब—कावू, संधी.

टिपूशी सलूख करितील अथवा जरवेत आणितील जशी काव पाहतील तसें करितील.

—म. शि. यां. का. पृ. ३४४

काबजात—ताव्यांत, स्वाधीन, कावीज असल्यासारखें.

यैशास स्वामीच्या पुण्यें व तपोवलें करून भागीरथी जावे तव स्वामीची कावजात आहे. परंतु कोंकण स्वामीचे वतनादखल आहे. कोकणांत स्तल असावें यैसें कोणी स्वामीस सूचना करीत नाहीं !

—पे. द. ३३ पृ. ११९

कावा—महाराष्टाच्या समुद्राच्या उत्तरसीमेपलीकडील चाचेगिरी करणाऱ्या लोकांना या संज्ञेनें संबोधीत असत. हे चाचे कच्छच्या आखातांत मुख्यतः वस्तीस असत.

काबा—लांव पायघोळ अंगरखा.

काबिज—कव्जा असलेला.

काबिज-उज-जूद—उदार.

काबिजमूतसरफ—कवजा, वहिवाट उपभोगणारा.

त्र्यंबक हरी काविज मुतसरफ असतां महाराज सिवाजीराजे यांनी निराजी राहुजी सरकारकून यासी हेजीवीच्या कामावद्दल अवरंगावादेस पाठविले होते.

—म. द. रु. ३ पृ. २९

काबिल—जामीन.

काबिला—सुईण. (विल्सन)

काबु—(१) संधी, कपट, कावा, मुत्सद्देगिरी; कोशल्य, मसलत, कारस्थान, दगा. (२) अभेद्य (अवघड)

१ वावानी उत्तर केले कीं आम्हास वादशाहीचा अगर कारभाराचा लोभ असतां तर मागें किती वेळ काबू आमचे लागले. वादशहातच घेतों अगर कारभारांत कवजा करतो. उरफाटें आम्ही वादशहाच्याच स्थापना व मदती करीत गेलो.

—म. शि. यां. का. पृ. ८८५

२ अहमदखानाकडून आणविले आहेत ते रुपये पाठविले तरी त्याचे बोलणें-प्रमाण, स्नेह खरा ऐसे वाटेंल, काबूचा प्रकार दिसणार नाही.

—हिं. द. खंड २ पृष्ठ ५५

३ पहावें काये करितात व आता कसा कायें कोणाचा काबु पडतो.

—हिं. द. खंड १ पृष्ठ ७१

४ हरयेक गोष्ट काबुनें करावी.

—पे. द. भा. ३८ पत्र नं. ३

५ तेथें कलताच पारपत्य गोंदबाचे करावें असें चित्तांत होते. काबू बनला

नाहीं. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ९८
६ तैसच्च जाहालियाने चक्रवर्तीच होता (व्हाल) यैसी काबू ईश्वरें अनायासे दिल्हा आहे. --E. M. P. पृ. १२१
७ त्या संधींत हैदरअल्ली काबू करून आला त्यास नतीजा दिला.
—ऐ. ले. सं. ८४७
८ यवनाची काबू आपण साधून द्यावी व आंपलें काम करून घ्यावें, हा प्रकार त्यांनीं केला. —ऐ. ले. सं. ५५३
९ मदगिरी इतका काबू किल्ला असून एकाएकीं फत्ते झाला, तेव्हां श्रीमंतांचे प्रारब्ध विचित्र ! तदनुसार घडोन आलें.
--ऐ. ले. सं. १२२४

काबू करणें—संधि साधणें आपला हेतू उगऊन घेणें.
सैद लस्करखान आपली मध्यस्ती असतां फिरंगीने मधेस्ती करून आपली काबू केली. त्याचे चित्तातहि गुबार फार आहे.
—E. M. P. पृ. १४४

काबूचीपणा—हरामखोरी.
मुराररराव याचे कुचोद्यांत आहेत हेही काबूचीपणास चुकत नाहींत.
—पे. द. २८ पृ. ८७

काबूचे यार—संधिसाधू.
(अवतरणासाठी ' दुनयवी ' शब्द पाहा)
—पुणें अखबार भाग १ पृ. २०१

काबूतलब—संधीसाधू.
इंग्रज बइमान काबूतलब. —काव्ये. प. या. व. ४६४

काबूदाबू—काव दाव—पाचपेच.
स्वामींचे पत्र बाबास होते. त्यात मजकूर हिताहित आंदेशे काबूदाबू निभावणी करून पाठवावे असें होतें. —म. शि यां. का. पृ ७०

काबूबाज—कपटी.
इंग्रज काबूबाज. आमावास्येच्या दिवशीं रात्रौ, प्रहर रात्र होतांच आम्ही होतो त्या तोंडावरी छाप्यास आले.
—म. शि. यां का. पृ. १९३

काबूवख्त—संधि.
हाच कबूवख्त मुखालिफाचे पायमल्लीचा आहे.
—रा. १० पृ. १९१
खाली मैदान देखून व काबूवख्त पाहून आला.
—खरे ३५६७

काबू साधणें—संधि साधणें.
तुम्ही तो तेथील प्रकार पाहून काबू साधाल हे खातरजमाच आहे.
—हिं. द. खंड २ पृ. ९०

कामचंग—कामात तरबेज; कर्तबगार.
आपाजी मनुष्य कामचंग मोगलाईत वाकीफ आहे, याचा दरमहा मोकरा गौर करार कीजे. —रा. ८ पृ.२१४

काम नाजुक लागणें—काम जोरात सुरू असणें.
हुजूर राजश्री स्वामीच्या मुदबखाकडे बकरी खरेदी गुजारत सेटी खाटीक मि ॥ देणें पैकी तुम्हाकडे पेशजी रुपये १५० सादर आहे. त्यापैकीं तुम्ही ७५ रुपयेची वरात तोडिली आहे, म्हणोन खाटीक मजकूर यांणीं विदित केले. यैसीयासी मुदबखचें काम रोजबरोज नाजूक लागलें आहे. पैका न पावता काम बंद होऊन हुजूर बोभाटा आला आहे. तरी सेटी खाटीकाचें पदरी ७५ रुपये आत्ताच घालणें. —पे. द. ७ पृ. ५

काम-बक्षी—वासना प्राप्त होणें.

काम-रानी—कार्यसफलता.

काम हातापायावर घालणें—कामास दिरंगाई करणें, काम चुकविणें, इ.
त्यास गावकरी यास ताकीद करून पाठवून द्यावे. गावकरी कर्म हातापायावर घालावयाचे करितात व त्याची बदलामी दुसऱ्यावर आणतात.
—पुरंदरे दप्तर भाग २ पृ. १०

कामाकार्याचा—कामकाजाचा, उपक्रमाचा, उद्योगाचा.
नानांनीं कैलासवास केला, तेव्हांपासून कोणें कामाकार्याचा उद्योग जाहला असतां (अडथळाच यावा), अशी वेळ प्राप्त जाली.
—ऐ. ले. सं. ६४१०

कामाचा अजोरा पडणें—थोडयाशा चुकीमुळें पुन्हा जास्त काम करण्याचा प्रसंग येणें (मिरज प्रांतीं असा वाक्सांप्रदाय आहे)
गवंडी म्हणाला या तुमच्या करण्यामुळें विनाकरण कामाचा अजोरा मात्र पडला. —पे. द

कामाचा यार—संधिसाधू, स्वार्थसाधू.
आपल्या मुद्याच्या गोष्टीकडे पाहणारा.
" पाटीलबावा बट्टेबाज खिलाडी कोन्हाचाहि नाहीं. कामाचा यार आहे.
—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ८.

कामाठी—मजूर
गाडदी किती आहेत ? कामाठी, दर्यावर्दी व खलाशी व सुतार लोहार व

तबलदार व बेलदार हें सामान काय आहे हे लिहून पाठविणें.
—ऐ. ले. सं १४७६.

कामाठी—एक शूद्र जातीचा नोकर. महाराष्ट्रांत हें कामाठी लोक धान्य दळण्याचा, राहुटचा ठोकण्याचा, किंवा तोफखान्याकडील मजुरीचा उद्योग करीत. हे कामाठी तेलंगणांतील असत. (विल्सन.)

कामांतून गेले यैसे करणें—निकामी करणें.
त्याणी आतून सुरुंगास टाळें पाडून सुरुंग उडवावयाचे कामांतून गेले, यैसें केलें. —E. M P. पृ. ३६.

कामिल—काबील, चतुर.
मुत्सदी तर कामिल न अढलला. हिंगणें द. भाग २. पृ. ३६.

कामील—होनाची एक जात.

कामील—कट्टी, घनघोर.
पेशव्यांनीं सावनुरावर स्वारी करून मुजफरजंगास मागितलें. पण पाठीसी पडला आहे. त्यास दिल्हा असता नामोसी (नांवलौकिक, प्रतिष्ठा) जाती यावास्ते (याकरता) लढाई अखत्यार (मुक्रर) केले. सहा महिने कामील लढांई होऊन शेवटीं तह ठरला. —द. स. कै. या. पृ. २३६.

कामील—कमाल (कमाल आकार)
मौजे कायगांव ज्याची कामील जमा चार हजार पांचशे एकसष्ट हा गांव नारायण भट यास इनाम बक्षीस दिले. ना. दी. पा. पृ. ६७

कामेरे—खामेरा किंवा खांबेरा किंवा खांबेळा. भिंत बांधीत असतां विशिष्ट जागीं खांब घालावयाकरिता जी मोकळी जागा ठेवलेली असते ती.
किरकोळी खांब मोहटी आडवट कामेरे जाया जाले असतील तीं नीट करून द्यावे लागतील. —पे. द. १७ पृ. ६३.

काय—किती.
गल्ल्याचे खरेदीस ऐवज देविला होता त्यापैकीं ऐवज आला काय, गल्ला खरेदी केला काय, सिंहीगडी दास्तन जाले आहे काय, तो हिशेब तपशीलवार लेहोन पाठविणें. —पे. द. ७ पृ. २८.

कायत—कायस्थ.
सल्ल्याचा प्रकार तरी अद्यापि इकडे बोलणें चालणें नाहीं. कायताचें विद्यमानचेंच राजकारण आहे. —ऐ.ले. सं. १७९०

कायथ—कायस्थ.
पांच हजाराच्या जागिरीचें आमिष. आशादुराशा, त्यांत कायथाची जात. पटवारी कायथ होता. त्यानें गुलामकादरास हस्तगत करून पाटीलबुवापाशीं पोचवून दिल्हा. —हो. कै. पृ. ९९.

कायद्यानें कुरनिषात करणें—हात वस्त्रानें बांधून मग कुरनिसा किंवा वंदन करण्याची दरबारी रीत

निर्मलवाल्यानें हात बांधून, नबाबाजवळ कायद्यानें कुरनिशात करून उभा राहिला. नवाबांनीं हात सोडून पोटासी धरिला. —नाग २ पृ. १३

कायममकाम—एक अधिकारी जाऊन त्याच्या जागीं नेमण्यांत आलेला.

येक अधिकारी तगीर होऊन त्याचे कामावर दुसरा होणे त्यास कायमकाम असें म्हणावें. —रा. ७ पृ. ९५

कायम मुकामी—कायम असणें.

कार्यवादू—कार्यसाधू, कपटी, आपमतलबी.

प्राप्त प्रसंगाप्रमाणें परिहार करावा ल्याहावा तरीं आपलें तों चित्तास विपर्यास येणार नाहीं, परंतु लोकोत्तरांत कीं कार्यवादू आहेत ! बोलोन निष्ठा दाखवितात. —पे. द. भा. २४ पृ. ५६

कायल—निरुत्तर, दीन.

नाना बापूस म्हणाले की आतां दंग कां होता? ऐसें बोलतां बोलतां पागेपासी नाना बोलले की 'आपणच करविलें आतां श्रमी (कष्टी) न व्हावें क्रम चालों द्यावा.' बापू म्हणाले. की तें कांहीं मजला माहित नाहीं तेव्हां नानांनीं त्याच्या कानासी सांगितले कीं, 'तुम्हीच करविलें तुमचा रुकार सिकापत्रावर पहावें' तें पाहून बापू कायल जाले.

—स. ब. पृ. ३८

काये—कांहीं.

मग त्याच्या खर्चाची बेगमी होऊन काये फौज जमून गोविंदराव गायकवाडाची रवाणगी जाल्यास लेखण केलें जाईल.

—पुणें अख. भाग २ पृ. १३९

कायेबदल—काय म्हणून ? कशासाठीं?

१ चापाजी बोलिला जे महाराजानी या उपरी निरोप दिल्हा पाहिजे आम्ही कांहीं गावामध्ये राहात नाहीं त्यास देसपांडिये बोलिले जे कायेबदल राहात नाहींत. ? —शि. च. सा खं. २ पृ. १३८

२ हवालदार बोलिले कीं यास काये बदल आणिले. ?

—शि च. सा. खंड ५ पृष्ठ १६४

कायेसींत आणणें, कावेसीत आणणें—पेचांत आणणें.

माधवरामास कायेसीत आणून पैका मागतात म्हणोन लिहिले तर तेथें तुसचा यत्न काय ? याविसी त्यास लिहावे तर तो अधिकोत्तर द्वेष करणार.

—शिं. इ. सा. भाग १ पृ. ३१

कार—करार, ठराव.

१ जर त्यानीं पैका न दिल्हा तर त्याचा मुलुख जप्त करून आपली ठाणी वसवून पैका वसूल करावा याप्रमाणें कार ठरला आहे.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १७६

२ मागाहून शिंदे आले. यांणीं ठरलेला (होळकरांनीं ठरविलेला) कार मोडावा, दुसरा राजा बसवावा, असें मनांत आणून महिनाभर घोळ पाडला.

—हो. कै.पृ. १५

कार—मर्म, दंश, मुद्दा.

आज पावेतो, गर्भवासी श्रीमंतापासून सेवासेवन केलें (चाकरी केली) तें गांवखुद (निष्फल किंवा नष्ट) होऊन यशाधिकारी आणखीच (दुसराच कोणी तरी) होईल यांतील कार उगवून लिहिण्यांत गेले.

—हो. कै. पृ. १०९

कार—काम.

कार-आगाह—कामाची माहिती असलेला, अनुभवी.

कार-आझ्मा—काम अजमावणारा, काम करणारा.

कारकर्द-कारकरदा-अनभवी, कार्य केलेला.

आपाजी बाळाजी हे आपले आप्त आणि सेवकहि पुरातन तीर्थरूप वडीलाचे स्थापित कारकर्द श्रीमंतांचे मनोगतांकित जाणून विनंतीपत्र देऊन पाठविले आहे.

पे. द. २८ पृ. १९७

कारकीर्द फिरणें—एक राजवट जाऊन दुसरी येणें, राज्यक्रांती होणें.

आमच्या घराण्यांत दिवाणगिरीची सनद शके १७२१ पर्यंत चालली. पुढें यजमानाचे आप्पाचे वाकडे आले. हुजुरांतून बंदोबस्त व्हावा तो न होई. कारण पुण्यांतहि कारकीर्दी फिरल्या. हा समय पाहून यजमानानी तंटेबाजी करून आपास कामाहून काढिलें.

—पे. द. ४४ पृ. ९

कारखैर—शुभ कार्य.

कौलनामा यैसे जे तुम्ही आपुला भाउबाचा लेक बेटा करून पाहिला त्याचें कारखैर केले. तरी बरवे केले. मागापुढें तुमचे जिवाजितरबाचे घणीं तो (गोपाल जोइसी) असे.

—शि. च. सा. खं ४ पृ. ४

कारगार—कारेगार, कारेगर, परिणामकारक.

अंजनवेलीस मोर्चेबंदीचें साहित्य पाठवितों म्हणोन आपण लिहिलें तरी सत्वर रवाना करावे म्हणज मोर्चे कारगार करून कार्य सिद्धीते पाववितो.

—वै. स. १७४२ पृ. ३०

कारचोबी—जरीचे, वेलबुट्टीदार.

१ बादली व कारचोबी वगैरे वस्त्रें येजमान साहेबास द्यावयास येथून रवाना केली. —पुणें अख. भाग २ पृ. ३८

२ ४ कारचोबी पारचे, ६ बाळाजीपंताचे तेरफेने पारचे, आदद (संख्या) —पुणें अख. भाग २ पृ. ११६

कारंदाजी—कारस्थानी, शहाणपणा.

आम्ही कारंदाजीची मसलत सांगितली, ते त्यांणीं (अलिबहादरानें) न ऐकिली. जैपुरांत दीड हजार ब्राम्हण प्रयोगास बसविले. आमचे फौजेचे लोक मेले ! —इ. सं. पु. ६ अं. १ ते ३ पृ. ३६ जोध. राज.

कारपदाझी—कामात गढणें.

कारपरदाज—कार्यकर्ता किंवा मुत्सद्दी. कारभारी.

नवाबाकडून पत्रें यांस आली जे, कारपरदाज यांनीं शिंदे यांच्या हातून इंग्रजांचा सलूख केला. त्यांत तुम्ही व आम्ही नाहीं. —म. शि. यां. का. पृ. २२१

कार–फर्मा—काम फर्माविणारा.

कारली राजावर्त—वांगड्यांचा एक प्रकार

अवतरणासाठीं 'गुलालधारी' पाहा. —पे. द.

कारवान—(१) फिरस्त्या व्यापाऱ्यांचा तांडा किंवा जमाव. (२) व्यापारी.

१ याप्रमाणें सांगोन त्यानें आम्हांस निरोप दिला. तेथून कारवानांत आलों. सर्व साहित्य करून सावनुरास आलों. —ऐ. ले. सं. ३६४२

२ येथील कारवान व सौदागर हैदराच्या लष्करांत आहेत. त्यांजकडील माणसें आलीं. त्यांणीं जबानी सांगितलें जें उभयपक्षीं लढाई बहुधा लागली आहे. —ऐ. ले. सं. ३४२४

कारस्थानी—जोर; भर; मुख्य लक्ष.

श्रीमंत राव यांनी हल्लीं कारस्थानी हिशेबावर धरिली आहे. हल्लीं हिशेबास कोकणपट्टीचे प्रारंभ जाहला आहे. —ऐ. ले. सं. १०३९

कारसाज—कारसाई an impost in kind as corn, straw etc. for a village dependent on a fort, for the use of the latter. किल्ल्यासाठीं धान्य व गवत भोंवतालच्या गावांनी पुरवावें लागतें तें.

धारावीचे कोटांत तोफा गरनाळा गोळे, व दारू वगैरे (व इतर) कारसाज मोजदाद केली. त्याची याद सेवेसी पाठविली असे. —पे. द. १६ पृ. ११०

कारसाजी—भागिदारी. —पे. द.

कारागार—लागू; सफळ.

१ तोफांनीं कोटांत मार धरला तो आंत चहुंकडे कारागार होऊन बहुत गर्दी उडाली. --ऐ. ले. सं. पृ. १७००

२ मोर्चे चालत नाहींत, हे दुरोन गोळे मारितात ते कारागार होत नाहींत. —ऐ. ले. सं पृ. १८०४

कारागिरी होणें—कारागर होणें. साध्य होणें.

खंडोजी मानकर वेसावेयावरी थडकले, परत काम कारागिरी नव्हे. तोफेविना प्रयास लागेंल याज निमित्य करून तोफा नेणें लागल्या. —पे. द. १६ पृ. २३

कारिस्थानी—कारस्थानीपणा, कर्तबगारी.

मी फार पाहिले (पण) या उभयेताप्रमाणें कारिस्थानी कोठें पाहण्यांत न आली. ---पे. द. २० पृ. १०५

कारू—बारा बलुत्यांपैकीं एक गांवकामगार. (कर्नाटकांत लोहाराला कारू म्हणतात).

कारेगर—कारेगार, प्रभावी, परिणामकारक.

शत्रूनें चरावर सूल रोविलें होतें. ते गडदात (अंधारांत किंवा चिखलांत) आम्हाकडील लोकांस रुतले. ते शस्त्राच्या जखमेपेक्षां कारेगार आहेत. —पे. द. ३३ पृ. १०१

कारेगारी—यत्न, काट; कारागिरी.

शत्रूनें कुसेगलावर येऊन तोफा लाविल्या, परंतु कारेगारी चालली नाहीं. जुज होऊन त्याचे १०-२० ठार होऊन माघारे गेले. —ऐ. ले. सं. २८६२

कारेगिरी—कारागिरी; परिणामकारक कामगिरी; प्रयत्न; शर्थ.

चेनरायदुर्गास श्रीमंतांनीं तीन दिवस तोफा लाविल्या आहेत. मोर्चे पुढें चालतात. कारेगिरी होत आहे. परंतु किल्ल्याचें फारसें भिताड पडत नाहीं! --ऐ. ले. सं १२११

काल्हदली—कालवडी; कालवड.

पवार यानें काल्हवली महिनें तीनची गाईखालील, पाणी प्यावयासी नेत होता. —ऐ. सं. सा. खं. १ पृ. १७८.

काल—वाईट दिवस.

वृद्धापकाळी आम्हांस काल आला, त्यापेक्षां मरण उत्तम होते; परंतु मी दैवहीन. --ऐ. ले. सं. २३०९.

कालकला—भविष्यकाळीं, पुढें, कालांतरानें.

१ ज्या रीतीनें रुपया निवेल त्या रीतीनें घेतच आहे. रुपयाची निशा यैसी घेत नाहीं. कालकला जोखम होईल. —पे. द. १४ पृ. ४९

२ त्याजवर कालकला सरकारातून वगैरे कर्जपटी आदिकरून लहानमोठी हरयेक तोहमत आली तर याचे निवारणाविषई प्रयत्न करावा. न होये त्या पक्षी जे पडेल ते यथाविभागें त्रिवर्गांनीं द्यावें.

—चं. चू. द. पृ. ८

कालकाला—कालांतरानें, भविष्यकाळीं.

पुढें कालकाला कानभराचे वंशज तुम्हासी आगर तुमच्या वंशजासी वृत्तीमुळें कजीया करतील त्यासी कजिया करावयासी गरज नाहीं.

—पे. द. ३१ पृ. ३४

कालगती विजातीय होणें—काळ फिरणें; काळ विचित्र होणें.

परम सावध असावें. आपल्या खबरदारीस उपमा नाहीं. परंतु कालगती विजातीय जाहली आहे. परम सावधपणें असावें.

—ऐ. ले. सं. ५२६४

कालपर्याय—कालविपर्यय; विपरीत काल.

कालपर्यायेंकडून अशी बुद्धी त्यास निर्माण झाली !

—ऐ. ले. सं. ६६४३

कालवंचना करणें—कालहरण करणें, वेळ काढणें.

जर हे सरदारीचा सांभाळ न केला, विचार न सांगितला, तर पुढें काय होईल हें ध्यानात असेल. निजाम अल्लीस ६ महिने इकडे अटकाविले, लोकाची घोडी तलब खरी झाली. येंदा समजावीस काये निकडेने जिवाभ्यश्रम करून केली. पुढें समजावीस करावी तरी यैसा विचार राहिला नाहीं. कालवंचना करावी, गंगथ ेिस असावे, तरी सरदारी या रीतीने परिच्छिन्न राहतां दिसत नाहीं. —पे. द. २० पृ. ८२

काल समाप्त होणें—मृत्यु येणें.

तुरुकताजखान त्यास अत्यावस्त अवस्था होऊन छ ५ रमजानी प्रहर दिवसा काल समाप्त त्याचा जाहला. —E. M. P. पृ. १७

कालक्षेपाचे दिवस—सुखानें कालक्रमणा करण्यासारखी परिस्थिति.

हे दिवस कालक्षेपाचे आहेत यैसे नाहीत. काल घोर आला यास्तव गुदराण मात्र करावी यैसे असे.

—चं. चू. द. पृ. ७६

कालीतनेडे—(?) कासावीस? कांवरेबावरे?

येथें कारभाराची सीमा जाहली! ताल राहिला नाहीं या करितां आपण

त्वरा करून लौकर यावे. आपलें आगमन होतें हें दुप्ट ऐकोन कालीतनेडे जाहालीं आहेत. केळकरसंग्रह कुबल दप्तरी

कालीधारी—बांगड्यांचा एक प्रकार.
अवतरणासाठीं गुलालधारी पाहा. —पे. द.

कालू—वालू एक वाद्यविशेष.
नगारे, कर्णे, वाजंत्रें, कालू, नौबती वाजूं लागल्या. —चित्र १३

कावल—an old and much worn metal vessal.
जुनें, वापरून जीर्ण झालेलें धातूचे भांडें म्हणजे कावल. —पे. द.

कावळे सोडणें—भय दाखविणें.
ये समयीं गांगरल्यानें कांहीं होणें नाहीं. त्यांणीं कावळे सोडून लिहीलें आहे. —ऐ. ले. सं. १६७

कावा—घोड्याची एक चाल, वाटोळें फिरणें. —रा. व्य. को.

कावाडावा—कावादावा
हैदर सडा होऊन सिंगटाळूरावर आहे. काव्याडावांत आहे. —ऐ. ले. सं. ३१४५

कावादावा—गनिमी कावा.
यास्तव तुम्ही गनिमी कावा करून असावें. उतावळी करून गांठ घालूं नये. येथून हरीपंताची रवानगी जाहली आहे. लवकरच येऊन पोहोंचतील. हैदरास काव्यादाव्यानें तंबी पोंचवावी. उतावळी करूं नये. गनिमीनें असावें. मातबर फौजेखेरीज ठीक जाणें नाहीं. —ऐ. ले. सं. २७९९

कावादावा—तावडी, हकटक, गव.
काव्यादाव्यांत गनीम सापडला आणि ते वेळीं अनी चोरिली म्हणजे जिवाजाग्यानसी जाल यैसी ताकीद समजोन वर्तणूक करणें म्हणून लोकांस ताकीद केली आहे. —पे. द. ३३ पृ. २४

कावित्र—कपट, कसब, कवटाळ, कारस्थान.
रामजी पाटलानें काय कावित्र केले असेल तें ते जाणत. आम्हास किमपी ठाऊक नाहीं. —म. शि. यां. का. पृ. ६४३

कावेरीपाक—होनाचा एक प्रकार.
एकूण वराह कावेरीपाकी २५ रास व फुलम् २० रास पावले असे. —रा. ८ पृ. २९

कावेशीत आणणें—गोत्यांत आणणें, अडचणींत आणणें, खोटेपणांत आणणें, कायल करणें.

१ राजेश्रीचा खोटेपणाचा मजकूर लिहिला तर पहिले राज्यलोभें आई (ताराबाई) जेवली (म्ह. तो खरा राजबीजाचा असें दाखविण्याकरितां त्याला ताटांत घेऊन जेवली). आता कावेशीत आणायास्तव (असें) बोलतात ! —पुरं. द. भा. ३ पृ. १७३

२ साल मजकुरीं ज्याजती फौज पायदळ ठेऊन शत्रू कावेसींत आणून विपुल द्रव्य साधावें. —ऐ. ले. सं. १७५२

काशीकापडी—काशीफळाचें म्ह. भोपळ्याचें भिक्षापात्र घेऊन फिरणारा एक भिकारी. हे सतत तीर्थोतीर्थी यात्रा करीत, भीक मागत फिरतात.

दादो जोगदेवाचे वडील स्त्रीस बहुत दिवस संतान नव्हतें तिनें मल्हारी या नांवाचे काशीकापड्याची सेवा त्याचे आजारीपणांत केली. पुढें बाईस पुत्र जाला. —केळकर संग्रह चास. जो. दप्तर

काशी कुवाशी—किल्ल्याभोंवतीं चौफेर खुली जागा टाकून पलीकडे पुन्हा चौफेर मैल अर्धा मैल निवडुंग, चिलारी किंवा वांबू (वेळू) यांचें जंगल शत्रूला अडथळा करण्यासाठीं कायमचे राखिलेलें असतें तें.

काशीफळ—भोपळ्याच्या जातीचें एक फळ.

काशीफळें आम्हांकारणें ४ पाठविलीं तीं पावलीं.

—ब्र. च. पृ. १३०

कास्तकार—शेतकरी, जमीन कसणारा.

कासद—काशीद, पत्र नेणारा जासूद.

कासद वगैरेच्या जुबानी तेथें इंग्रजांची दहा पलटणे आहेत.

—पुणें अखबार भाग १ पृ. २५०

कासबंदी—जमिनीच्या मगदुराप्रमाणें विल्हेवार केलेला वसूल.

कासा—भोजनपात्र; ताट; लक्षणेनें 'कासा देणे' याचा अर्थ उदरनिर्वाहासाठीं देणें. पोटगीसाठीं देणें.

मौजे खांबवदा हा गांव सदाशिव बल्लाळ यासी कासा महाराव हाडे याणी दिल्हा असे. —शि. शा. इ. सा. भा. १ पृ. १४३

कासाजी—खंडणी (?)

बंकापूर व रटेहळी हे दोन्ही आमचे हातास येत तें करा, म्हणजे तुम्हांस मातबर कासाजी देतों व एक गांव दरोबस्त देतों. याप्रमाणें रदबदल करितात. —पे. द. ४० पृ. ९९

कासारभंगार—तांबें-पितळ्याची भांडीं घडणारा.

कासीपतो—समर्थ; जबरदस्त.

आपल्या वतनास व आपल्या जीवास कोणी तरी धणी कासीपतो जाहलियावेगळे जीव वाचत नाहीं, वडिलांचे वतन सुटत नाहीं.

—रा. ८ पृ. ४३

काहली—बिघडलेली.

हरिपंत दरबारास येत नाहीत. कारण च्यार दिवस स्वस्थता व च्यार दिवस काहली प्रकृती असती. —पुणें अख० भाग २ पृ. १५

काहवा—कव्हा (विश्राम कषाय) शीण घालविणारा अर्क किंवा पेय.

—रा. व्य. को.

काहाळ, काहाल—नगारा.

पोइसरकरास दोन काहाला व दोन सुरती दिधल्या. साहारकरांस जुनरीच्या झुंजास मोहरी शिग व उत्तनकरास विराणे दिधले व गोराईकरास वीरगांठि व येकसरकरास मोहरी सिंग ऐसीं उचितें दिधलीं.

—बिंब पान १०

काहिरह—सामर्थ्यवान्.

काहिली—आळस, दिरंगाई.

सुस्ती या काहिली इ. अन्याय.

—राजनीति आज्ञापत्र पृष्ठ १३८

काहिली—आजारी, अत्यवस्थ.

बाळाजी नाईक थत्ते पंतप्रधानाचे मेव्हणे याची स्त्री काहिली होती तीस छ मजकुरी देवाज्ञा जाली. —पुणें अखबार भाग ३ पृ. ११०

काहिले होणें—घाबरें होणें.

कर्ज न मिळे, यामुळें काहिले न होणें. —ऐ. ले. सं. ४६३

कांही येका कामनें—कांही हेतुमुळे, काही इच्छेसाठीं.

गंगाधर तात्या यास श्री. कै. माधवराव बलाल पंतप्रधान यानी कारभाराचे पेचामुळें सर्वस्वे अपहरण करून अटकेंत ठेऊन पुढे काही येका कामनें, साहा लक्ष खंड बांधून मुक्तता केली.

—चंद्रचूड दप्तर पृ. ४

काळच्या रानीं होणें—असहाय होणें, संकटांत पडणें.

फौज येऊन पारपत्य झालें तरी बरें. नाहीं तरी मोगल एकीकडे जाहलीयावर हे काळच्या रानांत होतील. —ऐ. ले. सं. पृ. ३३८

काळकूट—द्वेष.

त्या काळीं इस्मायल बेग यांनीं बहुत रदबदली केली की तुमचे मनांत बहुत काळकूट असल्यास त्याचे (त्या बादशहाचे) उत्थापन करून

आणखी कोणी वसवावयाचे असल्यास वसवा. परंतु हीनांग न करणें.
—हो. कै. पृ. ९७

काळजाचें काळीज—अत्यंत प्रिय; जिव्हाळ्याचें.
बाई, तुम्ही माझें काळजाचें काळीज! म्हणून तुम्हांस पोर (कुणबीण) पाठविली आहे. लहानाची थोर करून सेवा घ्यावी. वरकड आहे तें मजमागें तुमचेंच आहे. —रा. खं. ३ पृ. १०६

काळंबी—कोळंगी, कोणगी, मधाचे मोहोळ किंवा पोवळें.
आपल्या घराजवळ एक झाड आहे; त्याजवर काळंबी बसोन मध होतो त्यापैकी निमे सरकारांत घ्यावा व निमे आम्हास द्यावा.
-नाना. रोज १ पृ. २५२

काळ होणें—मृत्यु पावणें.
अवतरणासाठी ' किलीचेहात ' पाहा.

काळा मोरा—गोरामोरा किंवा काळजीनें काळवंडलेला.
ह्या अप्पाला नाहीं कुठें कुठें रोजगार ।
झाला काळा मोरा उलटला माघार ।
काय तोंड दावित जाऊ वडिला म्होर ।
-ऐ. पो. के. खं. २ पृ. १७६

काळीज दाखवून पोटांत घेणें—शत्रूस खोटी दिखाई दाखवून आपल्या माऱ्यांत जवळ आणणें.
इंग्रजांस लढाई देऊन खिपत द्यावी, इतका टिपू मजबूद आहे. परंतु कांहीं कावादावा. शत्रू (इंग्रज) शेर होऊं द्यावा, काळीज दाखवून पट्टणापावेतों पोटांत घ्यावा, मग एक ब एक अकसमात अशी कस्त करावी कीं, इंग्रजांस फुरसत घेऊं न द्यावी,हाहि टिपूचा मनसबा संभवतो.
—ऐ. ले. सं. ४३५६

काळी मृत्तिका—कृष्ण मृत्तिका; बंदुकातोफांची दारू.
काळ्या मृत्तिकेचा तोटा आम्हांजवळी झाला. तोफाहि थोडक्या. याजकरितां किल्ल्याचें भिताड पाडण्यास दिवसगत लागली.
—ऐ. ले. सं. १६९८

काळे गडी—कर्नाटकी पायदळ शिपायी.
मुलबागलचा किल्ला हल्ला करून घेतला, तों रात्र पडली. किल्ल्यांतच सातशें लोक होते ते काळे गडी प्यादे होते. पश्चिमेकडून, खेड्यांनीं होऊन (शिड्या नेऊन?) पळून गेले. —ऐ. ले. सं. १५८४

कांक्षा--संशय, हरकत, कल्पना, आक्षेप.
नंतर मजकडे बापशा येऊन कांक्षा घेतली कीं पेटचा आजच न्यावयाचें प्रयोजन काय ? चि. रावसाहेब आल्यावर न्याव्या.
—शा. द. वे. पृ. १७४

किकनेल--एक औषधी तेल.
नारायण तेल चांगलें कोठें मिळत नाहीं. किकनेल तेल म्हणून आमचे संग्रहीं आहे, तें वातास लावल्यास गुण येतो. --ब्र. च. २५६

किगायसी-- कुचराई; कंजूषपणा.
गाडद दहापधा हजार बडतर्फ केली गारद्याचे तलबेचे देणेही निघाले त्याची तोडमोड देणियाविसी किंगायसीनें होऊ लागली तेव्हां बडतर्फी लोक याणी येका करून कोणतेंही प्रकारे तलब घ्यावी हा मनसबा करून मैनुद्दौलाच्या हवेलीवर धरणीयास चालून गेले.
-- नागर पृ. १२७

किचाट—संकट, कारस्थान, तुफान.
मार्गी त्यास जीवे मारिलें. कागदपत्र व उभयेतांचें येजितखत वाताहात जाहले. जानोबानें व जाऊबानें हे किचाट केले म्हणवून त्यास तोंड दाखवितां नयें ऐसे होऊन देशांतरें गेले.
--शि. च. सा. खं. ५ पृ. २२५

किचाट, कीचाट—खटला.
ठाणदार ...अफजलनगरास माइणीचे जत्रेस कीचाटाबद्दल आला होता.
—शिं. च. सा. खंड ५ पृष्ठ १६६

कित्ता—मळा.
१ उसाचे कित्त्यास गुळाची भेली १ व सेवसबजी वगैरे मोकदमीसंबंधीचे हक्क सुदामत आहेत ते तुम्ही आधी घेणे मागाहून अर्जोजी घेतील.
--पेठे दप्तर भाग १ पृ. १९
२ केळीचे कित्यास झाडे दोन (इनामदाराचा हक्क) मकईचे टिक्क्यास तास १
—शेंदुर्णी सं. म. कागदपत्र भाग १ पृ. १२८

कित्ता--(१) हिशेबी जसाखर्चांत येणारा शब्द.
(२) हिशेबांतील जी बाब स्वतंत्रपणें एखाद्या खात्यांत लिहिण्यासारखी असते ती.
(३) हिशेबांतील अशी एकादी बाब की जी जमाखर्चात उल्लेखिलेली असते पण जिचा तपशील अन्यत्र दिलेला असतो.
(४) किरकोळ, फुटकळ, अवांतर.

कित्ता—खेरीज, या शिवाय, इतर.

१ येथें शिलेदार राजेवाडीचे पन्नास भवानजीराव चाळीसपन्नास नागोजी नाईक खास बारदार, कित्ता, हुजुरातचे मुसलमान भालकीकर, याप्रमाणें लोक येथें आहेत. —ऐ. ले. सं. १४६९

२ तुम्हीं आदिअंत वर्तमान वंद सात व कित्तावंद चार एकूण अकरा वंद विस्तारें वर्तमान लिहिलें तें अक्षरशः वाचून विश्रांति वाटली. —ऐ. ले. सं. ११७

१०५००० चत्रसिंगराजे यास खुद्द जातीस
३५७०० मानकरी खासे आसामी २०
१०५००० कित्ता खासे आसामी १५० यांस

—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. ५४

४ सर्व वर्तमान दुसरे पत्रीं लिहिलें आहे त्याजवरून कळेल. कित्ता वर्तमान तपशील-- —ऐ. ले. सं. ४५१४

कित्त्याचें पत्र—एखाद्या मुद्द्याच्या खुलाशासाठीं स्वतंत्रपणें लिहिलेलें पत्र.

आपण चार कित्त्यांचीं पत्रें जोडीसमागमें पाठविलीं तीं प्रविष्ट झालीं. —ऐ. ले. सं. ११८३

किंत—किंतु, संशय.

१ पुढें सर्व प्रकारें आमचे मामलीयांतील किंत तोडून देऊन निखालसपणें सर्व प्रकारें चालवून सेवा घ्यावी. —पे. द. ४० पृ. ५१

२ चित्तात उभयपक्षी किन्त होता तो काढिला. —पे. द. १३ पृ. ११

३ आम्हांवर आदर बहुमान करावा पूर्वील किंत मनांत खावंदानें व आम्ही न आणावा शपथपूर्वक चालावें ऐसें जालिया आपण तुम्हाजवळ येतों. —वैं. ४ स १७४७ पृ. १

किताब—उंटाच्या सरंजामापैकी एक वस्तु-किताबजोड.

सालगुदस्त किले जिवधन फते केली तेव्हा वरत्या किताव सापडल्या. त्यापैकी काही फरोख्त केल्या काहीं किल्ले मजकुरी राहिल्या आहेत त्या झाडून हुजूर पाठऊन देणें म्हणोन आज्ञा केली. —E. M. P. पृ. ८१

किताब—सन्मानदर्शक मायना.

श्रीमंतांनी स्वारीतून " राजश्रिया विराजित " लिहावयाचा किताब दिल्हा त्याप्रमाणें पत्रें आलीं, ही नवी रकम (बहुमूल्य गोष्टींची जवाहीर वगैरे सारख्यांची संख्या दर्शवितांना संख्यावाचक शब्द म्हणून रकम शब्द लिहितात) दिल्ही आपणांस कळावें. —बा. गो. प. ले. १३

किताबजोड—उंटाच्या सरंजामापैकीं एक जिन्नस.
उंटास नवे किताबजोड करावयासी परवानगी पाहिजे.
—पे, द.

किताबत—पत्र, लेख.
ऐसेच हरवक्ती किताबत पाठऊन दिल् आराम होये तें केले पाहिजे.
—पे. द.

कितेब—लेख, किताबत.
हिशेब कितेब —रा. १५ पृ. २५४

किन्ही—खुणा, चिन्हें.
त्याचे हाताची खलिती काढून निंब लावून हात धुवून पाख केला हातची किन्ही लिहिली. दिव्य मांडिलें. —ज्यू. २६८

किनार खेंचणें—अंग ओढून घेणें किंवा अंग काढून घेणें.
अदवानीवर मारावें किंवा मरावें, या इराद्यानें गेले. हें समजतांच हात उचलन किनार खेंचून टिपू राहिला.
—ऐ. ले. सं. ४३५६

किनारा खेचणें—मागें घेणें, अंग काढून घेणें, पदर मागें ओढणें.
त्याची फौज निखालसपणें माघारें गेली तर उत्तमच जालें. ते गोष्ट न करतां शह त्याणीं दिला आहे, तो या फौजेचे आवाईनें सोडून किनारा खेंचला तर तूर्त शह तुटला हें काम जालें. त्याच प्रांतीं राहिले तर आपले फौजेचें कसें करावें त्याचा विचार करितां येईल.
—ऐ. ले. सं. ३९०९

किनारा घेऊन असणें—दूर कडेला असणें, एखाद्या गोष्टींत प्रत्यक्ष भाग न घेणें.
लढाई जाली, मामाची नवी फौज होती तिनें कच खाल्ली मामा धरले गेले. कांहीं निकटीचे (निकटचीं) माणसे व हरीपंत फडके किनारा घेऊन होते (म्हणून वाचले). —स. ब. पृ. ४०

किनारा पिच्छाडीचा करणें—माघार घेणें; पराङ्मुख होणें.
मेस्तर वैट याचें म्हणणें, श्रीमंतांकडून राजश्री आबा काळे आले आणि त्यांणीं दुवाई सरकारची घातली, म्हणोन आम्ही किनारा पिच्छाडीचा केला. सबब, आरबांनीं आगळीक करून आमचें माणूस मारलें. त्याजपक्षीं आम्ही आरबांचें पारिपत्य करणार. —ऐ. ले. सं. ५१३३

किनास—अनर्थ, कहर.
दोन्ही गाऊ जाळून सत्यानाश केला. बाइकांचा बंद धरला, बदअमल गरतीशी केले, येसे किनास केला. —ऐ. सं. सा. खंड ३ पृष्ठ २०७

किफायतसर्फा—फायदा.

किफायत सर्फेवार—फायदेशीर.

(सर्फेवार शब्द पाहा)

—पे. रो. मा. खं. १ पृ. ४९

किब्लह—पवित्र, मोठा.

किब्लेगाह—वंदनीय (मूळ शब्द किब्लागाह. याचा अर्थ प्रार्थना करितांना ज्या दिशेकडे तोंड करावयाचे ती दिशा)

किब्लेगाह नारायणरावसाहेब —ऐ. ले. सं. ३५६५

किब्लेनुमा—दिशायंत्र.

होकायंत्र (?) —रा. व्य. को.

किबलगा—मू. श. किब्लागाह-त्याचा अर्थ प्रार्थना करतांना ज्या दिशेकडे तोंड करावयाचें ती दिशा. त्यावरून लक्षणेनें अर्थ वंदनीय.

त्यानंतर आमचे किबलगा नवाब अबदुल हकीमखां यांचे कारकीर्दींत श्री. कै. नानासाहेब यांची स्वारी कर्नाटकप्रांते गेली.

—इ. सं. पे. द. स. प. मा. पृ. २३४

किबला, कबिला—कुटुंब, परिवार.

भावसिंगराऊ याचा किबला कन्हेयास होता तेथून वारसे प्रांतें गेला आहे.

—पे. द. १० पृ. ३६

किबले काबे—वडील, पूज्य, किंवा बाप.

हजरत जिलसुभानी छायाखाले येऊन सर्व लहानथोर यांसदेखतां (यांजदेखतां) बोलिलें कीं मी आपल्यास रामचंद्रपंतास सोपिले आहे. बरे करोत अथवा वाईट करोत. त्यावरोन निजामन-मुलूक बोलिले जे हजरतजी, आपल्यास ज्याचे हवाली केलें, इतका तफजूल त्याचे हकांत हजरतचा त्यास पाहिजे जे आम्ही अरकानाहीं. त्यासी किबलेकाबे जाणावे. मग वजीर मुमालीक व अमीरूउमराव याणीहि बहुतसी तारीफ केली. त्यास निजामन मुलुकाची सरदारी आहे ते वडिलांची आहे. पातशहापासी सुरुखुरु करणार वडील समर्थ आहेत. —पे. द. १५ पृ. ८०

किमात्र—क्षुल्लक, कःपदार्थ

दिवाणजीस वरकडांचेही स्वरूप कळून चुकले आहे. कोठे डोले चोरील ? वरकड किमात्रें आहेत काय ? —हिंगणे. द. भाग २ पृ. २९

कियाफा—साम्य, रीत.

(अवतरणासाठी बफजलइलाही शब्द पाहा).

—पुणें अखबार भाग १ पृ. ११०

कियाम—शाश्वत.

कियामत--शाश्वतता.

कियास—कयास; तर्क.

टिपूनें कोइमतुरास आग देऊन निघोन गेला, याचे कियास दोन.
—ऐ. ले. सं. ४३५५

किर्दार--काम.

किर्यास—वाडा.

किरकोळ शिरकोळ—किरकोळ विरकोळ.

केळूर वगैरेच्या खंडण्या घेतल्या, तें कळलें. पुढेंहि किरकोळ शिरकोळ साधेल तें उरकावें. —ऐ. ले. सं. ११७३

किरचंड—प्रचंड; फार किचकट.

दोन चार रोज अधीक लागले यास्तव धणी रागास येतील त्यासी काम किरचंड बहुत. परंतु स्वामीआज्ञेवरून रात्रीचा दिवस करून आटोपिले.
—पे. द. भाग २५ पत्र नं.२१७

किराणा—उंची जिन्नस, किंमतवान जिन्नस.

राणांत चंदन फार आहे. नबाबाचे लस्करात दोनी लक्ष रुपयाचा चंदन आला असेल. लहान कोणी चंदन आणीत नाहीं यैसे नाहीं. मिरे, वाळा, चंदन, नारेल बहुत लुटी जाली आहे. राणांत झाडी किराणाच आवघा आहे. —पे. द. ३० पृ. ९०

किराया—भाडें.

दोन नावा तीनशें रुपयांची किराया करून, पटण्यास आलों.
—प. द. म. व. पृ. ७३

किल्ला—गिल्ला, तक्रार.

अल्लीबहाद्दराकडील एकबार (अखबार) नित्य येत आहे त्यास बहुतकरून खर्चाचीच ओढ. तोच किल्ला लिहिल्यांत येत असतो.
—म. शि. यां. का. पृ. ८५०

किल्ल्याची हेजिबी करणें—बोलणें लाऊन किल्ले घेणें.

स्वामीच्या किल्याचा कितेक हेजिबी करून दिल्ही व जमाव सातपाचसें स्वार केले, यैसी सेवा वळखोन रा. रामचंद्रपंत आमात्य याणी पागेची पंचशहश्री आपणास सांगितली.
—भा. इ. सं. मं. अहवाल पृ. ९३

किल्ल्यांत पाठविणें—कैद करणें (पूर्वी गुन्हेगारांना डोंगरी किल्ल्यावर नेऊन कैद करून ठेवीत असत.)

मग ते रुपये पदमसीकडून हमी जाल्यावर कुटुंब व तिचा पितापुत्र धाकटे रामपुऱ्याचे किल्ल्यांत पाठविले. —हो. कै. पृ. ९६

किल्ला बांधणें—जमावाची पद्धतशीर वळकट आवळून रचना करणें.

१ इतक्यांत यशवंतराव होळकर चडा घोडा राऊत २ हजार येऊन गोंचलें जानसाहेब पलटणचा किल्ला बांधून होते त्यावर घोडे घालून जानसाहेबास दस्त केलें.
—हो. कै. पृ. १३९

२ चार पलटणें समरूची. ते लढाईचें अवलपासून तुटून किल्ला बांधून होती. त्यावर कोणी जाटाचा माणूस गेलाही नाहीं. पेंढारी यांचे स्वार गेले आले. त्याजवर गोळा टाकून जवळ फरकूं न दिल्हे, किल्ला बांधून शाबुदीनें आपले ठिकाणास गेले.
—हो. कै. पृ. ६६

किल्ली—हिकमत, युक्ति.

विषयविडा देऊन भुलवितिल लढवुन हरकिल्ली!

—परशराम शाहीर पृ. १४२

किलअह—किल्ला.

किलअह-कुशा—किल्ला उघडणारा.

किलत—अडचण, कष्ट, श्रम, उणीव, दुर्भिक्ष.

१ पावसाकरता (मुळे) चिखल जाहला व घोड्यांस धावणीस फार किलत जाली.
—पुणें अखबार भाग १ पृ. २०३

२ खालापुरानजीक पाण्याची किलत फार म्हणून कल्याणचे रुखे मौजे दहीगांवावर पंत मशारनुले येका दो दिवसां जाणार.

—पुणें अखबार भाग १ पृ. १३४

किलाअ—(अ) किलअह, किल्ले.

किलाफ—संशय, किंतु, धास्ती.

श्रीमंतांच्या मनांत यामुळें किलाफ आले असतील ते कागदपत्रीं दूर करावे.
—ऐ. ले. सं. १३०४

२ किलाफ तुटून सरळ प्रकार चालत होता त्यांत हा प्रकार झाला. ईश्वरी इच्छेस उपाय नाही.

—ऐ. ले. सं. ८१८

किलावा—१ अनेक दोरांचें गांठलेले कडें, हत्तीच्या गळ्यांत घालतात तें त्याचा माहूत रिकिबीसारखा पाय ठेवण्यास उपयोग करितो. किलावा सुती किंवा रेशमी अथवा कातडीही असतो क्वचित त्याला लोखंडी खिळेही जडविलेले असतात. एखाद वेळ हत्ती मस्त होऊन आपल्या माहुतास सोंडेनें उचलूं पाहातो त्या वेळीं हे किलाव्याचे खिळे त्याच्या मानेस बोचवून त्यास मान हलवूं देत नाहींत. (२) वाटोळी लोखंडी कडी.

१ हत्तीच्या पायावरती चढोन किलाव्यात बसले.

—इ. सं. आंग्रे याची हकीकत.

२ स्वारी बराबर दरबारचा डेरा नवा तयार बहुत थोरला करविला आहे त्याच्या खांबास लोखंडाचे किलावे तोफखान्यात करविले होते ते सिद्ध जाले म्हणोन रा. सखारामपंत पानसे येऊन चान्ही किलावे रा. नानास व फडके यास दाखविल्यावर फरासखान्यांत ठेवावे म्हणोन सांगितले.

—पुणें अखबार. भाग पृ. १०१

किली घेणें—धडका, टकरा घेणें.

कोलीयानी लबाडी करून किल्ले वाघेरा यासी वेढा घातला. सुभेदार वाघेऱ्यावर आहे. तीन चार हजार कोली आहे; त्यानीं वाटा धरल्या. किल्ल्यांत दोन अडीचशे माणूस आहे. रात्रंदिवस तटासी किली घेतात. अठरा रोज सुभेदारांनी कंबर सोडली नाहीं. कुमक येऊन पोचत नाही.

— E. M. P. पृ. १८०

किलीचेहात—कलीचा किंवा किलीचा म्हणजे लहानशी गढी. किलीचे जात, किल्लेजात, ठिकठिकाणचे म्ह. किल्ले वगैरे ठाणीं.

आमचे वडील सुबराव शिंदे यास बोलाऊ पाठविला पण ते समई वडीलाच्या शरीरांत स्वस्त नव्हता तेव्हा आमचे घराणपैकी भाऊबंद संभाजीराव शिंदे खासकील यांचे वडील होते त्यांचे स्वाधीन किलीचेहात करून तो किल्लेदार काळ जाला (मेला). —द. स. कै. या. पृ. ८६

किलीद फत्त—विजयाची किल्ली. हें वसंतगडाचे औरंगजेबानें केलेलें नवें नामकरण स. १६९९. —म. रि. ४ पृ. ११३

किल्लेबंद होणें—किल्ल्यांत अडकून कोंडी होऊन पडणें.

बाहेरील रस्त (रसद) वगैरे बंदी जाली. निर्मलवाला किलेबंद जाहला. याप्रमाण बातनीचें वर्तमान येथें आलें आहे. —नाग २ पृ. ६

किश्वर-कुशाई—देश उघडणें.

किस्ता—भांडण, तक्रार, मुद्दा (मूळ शब्द किस्त)

असले किरकोळ किस्त्यांचा बयाण फार होतो श्रवण करणार चित्त पुरवून पुसल्यास सांगावयास येतील. —हो. कै. पृ. ६४

किस्ती—होडी, नाव, टोकरा.

१ येथून एक किस्ती भाड्यानें साठ रुपये करार करून निघालों.

—इ. सं. प. द. म. व. पृ. ८०

२ टोकें कायगांवजवळ इंग्रज गंगापार होणार. तेथें किस्ती जमा करविल्या आहेत. —ऐ. ले. सं. ७७९८

किसास—सूड घेणें.

किहान—जग.

गठ्ठे आहे. पटचा पाठविल्या आहेत. तेथें शिल्लक कापड असेल तें मोजदाद करावी.
—ऐ. ले. सं. १४२९

खाजगिरी—१ खाजगी रीतीनें, अंतस्थें, २ लांच.
तेव्हां राघोपंतास खाजगिरी रुपये तीनेंशाचें जातीखत देऊन आपल्या विचारांत घेतला.
—ऐ. सं. सा. खं ४ पृ. १३४

खा(ख्वा)जह—थोर, पवित्र मनुष्य.

खाटखट—कटकट.
येथें शिपाई रोज खाटखट, दंगा करीत आहेत.
--पे. द. २८ पृ. १०२

खाटमार—उभ्या खाटेशी हातपाय बांधून कोरडयानें सडकणें याला खाटमार म्हणतात दुसऱ्या बाजीरावीत यशवंतराव होळकराच्या लोकांनीं याच छळाच्या प्रकाराचा विशेष अवलंब केला होता.
शहर पुण्याची नाकेबंदी वागु देइना पसारा ।
खाटमार मोठा कठिण, नाहीं कुठे ऐकिली तऱ्हा ।
मार देउनी खंडण्या घेतो चौ मुलकीं दरारा ।
--ऐ. पो. के. पृ. ३६०

" खद देशमुख व देशपांडिये व मोकदम व सेटेमहाजनानी वगैरे अदर-कोटात आणून खाटावरी बांधोन मार मारून खावारे करून दोनी रोजामधे मवलग रुपये ३०२० घेतले (शके १६९३)"
—शि. च. सा. ख २ पृ. १३१

खाटेवर घालणें—धिंड काढणें. (उंटावर खाट टाकून त्यावर गुन्हेगारास बांधीत.)
तोतयास रविवारीं पुण्यांत खाटेवर घालून मग पारिपत्य करणार. दौलत-गिरीस तोफेच्या तोंडीं देणार.
—ऐ ले. सं. २७२०

खांड—मेंढरांचा कळप.
खाजगत मेंढरांचे खांड चव्हाण याचे निसवतीस चारणीस होते. पठाणांनीं मेंढरांची वळणी करोन वेळोंकीचीं खांडें व आमचीहि खांडें घेऊन लष्करांत आले.
—ऐ. ले. सं. ६०६१

खांडा—तरवारीचा एक प्रकार. हिला 'धोप' असेंहि म्हणत.

खांडबच्ची, खांडबाकी—१ मेंढरांच्या चारणीबद्दलचा कर किंवा पट्टी. २ मेंढरांच्या चारणीबद्दल त्या धनगराला जमीनमालकास एक मेंढरू देणगीकर म्हणून द्यावें लागे त्यालाहि खांडबच्ची म्हणतात.

खाडें—खड्ग; तरवार.
मग सिमळ म्हात्रा याणें वाडे कर घातली तंव सिमळम्हात्रा याणें उडाण

केलें. खाडे भुइस लागले. खाडे मोडून गेले. मग निहातेरी जाले. मग सिमळम्हात्रा याणे मात्र एक घाय केला खांदियावर.

—पा. क्ष. ज्ञा. इ. खं. १ पृ. १८

खाणगत—खाणींपासून घ्यावयाचा कर.

खाणपोस किंवा खाणपोस—तबकावर किंवा ताटावर घालावयाचें आच्छादनाचें वस्त्र.

भोयाची पांघुरणें चिव्या आपले अंगीं घातल्या. आपल्या जागियावर एक चाकर निजविला व खाणेपोश डोईवर घेऊन तटावाहेर पडला.

—पे. द. २८ पृ. १३९

खात्रा—खात्री.

त्यासी तुमची सचोटी तेथें राहे, यैसेच घडल. हा खातरा चित्ताचें ठायीं आणून स्वामीशेवा करून दाखविणें.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ६९

खातर—१ मन, विचार, आस्था, २ साठीं.

स्वामीची खातर जरूर जाणून. —राजवाडे १ पृ. १३२

खातर्खूं—समाधानी, संतुष्ट.

येसाजीपंताचीं मुलें माणसें आमचे हवाली करावी. येमाजीपंतास खातरखूं करून चाकर करून ठेवावा. उत्तम प्रकारें चालला तर उत्तम. न चाले तर मग अवकाशानुरूप पारपत्य करावें.

—ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ ११

खातर्दास्त—खातरजमा, समाधान, खात्री, इच्छा.

कितेक आपले खातरदास्ती व सरकारचे उपयोगास्तव रवाना केले असेती.

—राजवाडे १ पृ. ३१०

खातर्नशीन—श्रुत. —खरे ७ पृ. ३५६६

खातरखा—यथास्थित. यशस्वी; समाधानकारक, इच्छेप्रमाणें.

आमची पेशकशी बहुता दिवसांची हैदरखानाकडे राहिली ते त्यानी देऊन खातरका सलुख आम्हाशी करावी.

—म. शि. यां. का. पृ. २१५

(२) इंग्रेज पलटणे पुण्यासमीप आली त्यांचें पारिपत्य. खातरका न जालें

—दि. म. रा. १ पृ. ४०

(३) बंदोबस्तही खातरका आमचे स्वामी करतील.

—राजवाडे १ पृ. १३२

(४) कित्येक उम्दे उम्दे मन्सुबे खातरख्वाह होतील.

—राजावाडे १ पृ. ५३

(५) मशारनिल्हेचे हातची सुरी घेतली व बहुत खातरका (समाधान) केली.
—राजवाडे १० पृ. २६५

खतरखाह—इच्छेप्रमाणें, यथास्थित.
मगर दंडद्रोह तर खातरखाह जेव्हां म्हटले तेव्हां कसें हस्तगत होते.
—हिं. द. खंड १ पृ. ५०

खातरखुद—जातीने दाखविलेली आस्था.
सवाईराम नामे फकीर हिंदू आहे. तो धोंडाजीपंतास भेटला. महाराजाचें कामकाजाबाबत बहुत खातरखुद करितो.
—पे. द. १५ पृ. ३२

खातरतसली—समजूत, समाधान.
शीख वगैरें सर्वांची खातरतसली होऊन जमाव जालाच असेल.
—दि. म. रा. भा. १ पृ. ३१

खातरतसली—खातरनिशा, खातरी.
राजकारणप्रसंगीं हा दम देऊन जमीदार यांची खातरतसलीम करून, पगडी-बदल भाईचारा करून त्यास आज्ञा केली कीं, तुम्ही आम्हास घाटावाट निटोप्याची दाखवून दोन प्रहराचे संधीस त्यांजवर आम्हास नेऊन सोडावे.
—हो. कै. पृ. ९

खातरदारी—खातर्दारी–खात्री, समाधान.

खातरदास्त—खात्री, निशा, विश्वास.
याजकरितां आम्ही कबूल नव्हतों. हल्लीं सर्व गोष्टी तुमच्या प्रत्ययास येऊन चुकल्या; एवढ्यानें तुमची खातरदास्त झाली.
—ऐ. ले. सं. ३४१७
तुमचे हातून काम निभावून घेऊन तुमची सचोटी राखू ही खातरदास्त असो देणें.
—ऐ. ले. पा. म्यु प्र. पृ. ६९

खातरपाष–सबब—खात्री करण्यासाठी, विश्वास उत्पन्न करण्यासाठी.
टिपूची सिकस्त जाली तें वर्तमान इंग्रज वकिलाने श्रीमंतास निवेदन केले त्याजवरून इंग्रजाचे वकिलाची खातरपाशसबब, पन्नास तोफा खुसीच्या सोडावयाची परवानगी जाली
—पुणें अखबार भाग ३ पृ. १७८

खातरा—खात्री.
त्यांत स्वारीसमागमे कार्यभागी यांचा खातरा श्रीमंतांनीं पुरविला, त्यामुळें ते प्रस्तुत स्वस्थचित्तें आहेत.
—ऐ. ले. सं. ८१५

खातसाल—दुष्काळ.

खाता—स्थळें, ठाणीं.

आम्हीं कवताल घेऊन पामन केळूरचें ठाणें घेऊन कारडीकल, लिंगसुगुर रा. हरीराम याचे सरंजामांत या दोन खाता आहेत, त्यांत ठाणीं बसवावीं म्हणून श्रीमंतांची आज्ञा. ऐ. ले. सं ११६९

खातिम—आंगठी.

खातिरखोहा--मवाफीक—स्नेहाखातर (खातरख्वाही मवाफिक)

इकडील बंदबस्त महाराजाचे खातिरखोहा--मवाफीक करून इंग्रजास घेऊन हजूर येऊन पावावे. —E. M. P. पृ. १४९

खातिर--जम्ई—मनस्तोष.

खाती—लोहार. —रा. व्य. को.

खातीर—दिलासा, खातर्जमा, समजूत.

मिर्जाची बहुत खातीर केली. —दि. म. रा. २ पृ. ४०

जालिमसिंग बेदिल. जाणार आहे पाटीलबावांनी खातीर करून साम्प्रत ठेवून घेतलें आहे. —दि. म. रा. २ पृ. ३७

खातीरख्वा—इच्छेप्रमाणें, यथास्थित.

यादीप्रमाणें खातीरख्वा कबुतरें खरेदी करून रवानगी केली जाईल. —पे. द. २५ पृ. २७

खातीरनिशा—खात्री.

स्वामीविषयी आता त्यांच्या चित्ताची खातीरनिशा जाहाली की हाकनाक पेशजी कोकणच्या मनसबीयास खट्टे केले, आता मागती त्यास काय म्हणून म्हणावे ? परंतु त्याची वासना आहे कीं मागती स्वामीचेच स्वाधीन करावे. —पे. द. ३३ पृ. १७५

खांद्यावर धोतर घालून राहणें—खांद्यावरून धोतर पांघरणारा--तो गरीब भिक्षुक ब्राह्मण. भिक्षुकासारखें, दळिद्रयासारखें राहणे.

आम्ही येथें परदरबारीं पूर्वीपासून, सरकारचा नावलौकिक नक्ष त्याप्रमाणें राहिलें पाहिजे. खांद्यावर धोत्र घालून राहिल्यास रूप नाही. वावगा खर्चही नाही. परंतु बाह्य मात्र नीट राखणें पात्र. —राजवाडे खंड १२ पृ. १७

खांद्यावर खुंटचा बसविणें—जुन्या काळचा टॉर्चरचा (म्ह. छळाचा) एक प्रकार. येशु ख्रिस्ताप्रमाणें खांद्याला खिळे ठोकणें.

तेव्हां सदाशिवपंत बोलले कीं धोंडोपंत तुमचे राहणें येथे कठीण. खांद्यावर खुंटचा बसतील. उत्तर केले कीं माझी क्रिया शुद्ध आहे तर चिंता नाहीं. —ऐ. ले. सं पा. म्यु. प्र. पृ. ६८

खाददळवी—खाण्याच्या कामांतले पुढारी; भोजनभाऊ.
तोतया धरला याजमुळें कोंकणांतील खाददळवी वाचले.
—ऐ. ले. सं. २७११

खांद बांधणें—चुरस करणें, कुस्तीची पैज मारणें. स्वामीनीं ज्या बराबरी खांद बांधावयाची नव्हे त्याजवर भुज वडविली (हें बरें केलें नाहीं).
—ऐ. ले. सं. ७२५३

खादम—सेवक.
आपल्याकडील जासूद अथवा खादमाबरोबर अर्जीचा लिफाफा पाठवावा.
—पुणें अखबार भाग १ पृ. ११९

खांदाडकरी—खांद्यावरून माल वाहून नेणारे.
मौजे नसरापूर येथील पेठेचे आठवडेकरी दुकानदार कापडकरी व पसारेकरी व पत्र केणी व खांदाडकरी बाजारास जातील त्यास हासील जकातीचा न घेणें
—पुरं. द. भा. ३ पृ.१००

खांदाडी, खादाडी—खांद्यावरून ओझें वाहणारे किंवा खांद्यावरून वाहिलेलें ओझें.
घोडियास निमे, गाढवास तिजाई, खांदाडी मोडलेकरी चौथाई कि॥ जिनस.
—शि. च. सा. खंड ५ पृ. १५९

खान्दान खानदान—१ घराणें, थोर घराणें २ कुलीनता, कुलवंतपणा.
शाबास तुमचे खानदानाची असे. —राजवाडे १२ पृ. १२३

खान्दान—कुल.

खान्दानी, खानदानी—अभिजात घराणें, उच्च, कुलीन.
पुरातन खानदानींतील मनुष्याचे बहुत प्रीतीनें पालन करीत जावे.
—ऐ. स्फु. ले. ५४

खान, खाना—ताट थाळा.
मेजवानी मिठाईचे खाने.
—राजवाडे ७ पृ. २११

खानका—मुसलमान साधूसाठी राहण्याची जागा किंवा मठ.
सुमारी नऊ औत जमीन विकत मिळावी म्हणजे तेथें मुकरबा व मशीद व खानका व बाग बांधू.
—मा. स. प. मा. पृ. ९

खानखा—खामखा, निश्चयेकरून.
त्याचा सिद्धांतविचार हा आहे कीं खानखा आम्हासीं गांठी घालावी.
—पे. द. १२ पृ. २५

खानखानान—१ खानांचा खान. २ एक पदवी.

खानगी—१ दासी २ नायकीण, ३ गृहसंबंधीं.

नबाब सलाबतजंग हाजी महंमदअलीखानाच्या बागांत सहल करावयास दोन जनाने, हत्ती व कांहीं खानग्या घेऊन गेले होते.

—राजवाडे १ पृ. १९७

खानम—१ खानाची बायको २ उच्चपदस्थ स्त्रियांची सन्मानदर्शक पदवी.

खाननिसीन—-निवृत्त, अधिकारभ्रष्ट.

विसाजीकृष्ण बिनीवाले सरदार कदीम पण मोरो बाबूराव यांचा शरीक जाहला होता सबब नागवण घेऊन जागीर जप्त केली व खाननिसीन केला होता पण सांप्रत त्याच्यावर कारपरदाजांची कृपा आहे जागीर बहाल करून पुन्हा सरदारी सांगणार.

—पुणें अख. भाग २ पृ. ११५

खानसुमारी—-खानेसुमारी, मोजदाद. खाना म्ह. घर.

पुण्यांत पंतप्रधानांचे कारभारी हरयेक पुरा व पेठेंत खानसुमारी करीत आहेत याचें प्रयोजन मातबर सराफ व व्यवसायी लोकापासी कांही रुपये पटी करून घ्यावे. —पुणें अख. भाग २ पृ. १५

खाना—-घर, घराणें, विभाग, खण.

बददुवा दिल्ही की या दोघांचा खाना खराब.

—म. द. रु. १ पृ. ११८

खानाजङ्गीं, खानेजङ्गी—-गृहकलह, यादवी.

हे सर्व आपलची खानाजङ्गी करून --दि. म. रा १ पृ. ८८

खानाजाद—-१ दासीपुत्र, लेकवळा. २ आश्रित, गुलाम.

फुलाजीचा खानाजाद तुळाजी --राजवाडे १७ पृ. ४

तुमचे आजे मीरखान याचे खानाजाद दलेलखान व हकीमखान आहेत व लेकवळे असतील त्यानीं सरकारांत गैरवाका समजाविल्यास ऐकणार नाहीं. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १४

बकाजी फर्जंदामागे मौजे खांबगांवची मोकदमी तीन पिढ्या चालली पुढे खंडोजीचे नकल झाले तेव्हा त्याची आई गोधावा याही शाहू छत्रपतीकडे जाऊन अर्ज केला कीं पोटी पुत्र होता त्याचे नकल झाले मोकदमीस अधिकारी कोणी नाहीं. आंम्ही सरकारचे खानाजाद याजकरितां सरकारचे फर्जंदपैकी येक मुलगा मजला देऊन माझे चालवावे.

--शि. च. सा. खं. २ पृ. २८४

खानाजाद होणें--बाटणें.

रंगोजी भोंडव्याची व खानाची चुरस लागली सबब भोंडव्यानें खानास मारिलें. म्हणौन मोकदमी सरकारांत गेली, ते वेलेस अडंबोजी पाटील

याणे जातीस बटा लाऊन खानाज़ाद होऊन मोकदमीचा महजर करून घेतला. --पे. द. ३१ पृ. २

खाना बसुल--(?) घरपट्टीपासून होणारें उत्पन्न (?)
हरयेक माहालांत खानावसुलाची रुजवात हजरत मगफरतमाब यांचे समईची पाहून, त्या उपरी तह करार करावा हे यांचे मानस.
--पुणें अखबार भाग १ पृ. २३५

खानेतलाशी—झडती.

खानेनिसीन—घरीं बसणें, निवृत्त होणें.
हैदरअलीखानाबाबत रुपये वीस हजार रावजीस आले ते सरकारांत देणें म्हणोन बाळाजीपंतांनीं पैगाम केला. याकरितां रावजी नाखूप होऊन पुण्यांत खानेनिसीन जाहले. शेवटीं ते रुपये कृष्णरावजींनी दिल्हे.
—पुणें अखबार भाग १ पृ. १०२

खापरसुत—जस्त. एक प्रकारची धातू.
कथील व खापरसुत या पाठविण्याविषयीं निकडीनें आज्ञा केली आहे.
—पे. द. १७ पृ. २७.

खापर होऊन रहाणें—१ प्रतिष्ठाशून्य होणें. २ निष्कांचन होणें.
मुराररराव सेंडूरास गेलियावर बहुतेक दंगा, थोडी समजावीस करावी यैसे वर्तमान आहे. मुजफरखान यांणीं फकीरी घेतली आहे. खापर होऊन राहिलें आहे. पदरीं पैसा नाहीं. सरकारचा यैवजाचा गुंता होता. तो मुरारराव याणींच वारिला. —पे. द. २८ पृ. १६२

खापरें—श्राद्धाचे वेळीं मडक्यांत शिजवलेलें अन्न.
साफी चिठ्ठ्या आल्यानंतर नित्य ३—४ शें चिठ्ठ्या दररोज गयावर्जनाच्या इंग्रजांकडील घेऊन येत होतो. खापरें ३००० व पंचगया व एकोद्दिष्ट मिळोन २००० येणें प्रमाणें जाहले. —ऐ. ले. सं. ३८०१

खाब्गा—शय्यागृह, शय्यास्थान.
खाब्गामध्यें नबाब बरामद जाले. —राजवाडे ७ पृ. ८३

खा(ख्वा)ब—झोंप.

खाबगा—वस्त्रगृह. —रा. व्य. को.

खाबगाह—निजण्याची राहुटी, शय्यागृह.
येक दिवाणखानेयाचा डेरा व येक खलबतखाना, ख्वाबगाह मिलोन डेरा, यैसे दोन डेरे वेगले उभें केले. " —पे. द. २५ पृ. ६१

ख्वामखा—निश्चित.
राजेश्री राऊ आलीयावर मुलुकगिरीस खामखा जातील तेव्हां तुम्हास फ़ौजेनिसी समागमे नेतील.
—पे. द. ३ पृ. ८५

खाम खाणें—रुष्ट असणें, नाराज असणें.

राजे भोसले यांस देशमुखी तनखेबदल दिली त्यावरून तरी खाम खात होते. —शि. च. सा. खं. ५ पृ. २४

खामतम—ईर्षा, गुर्मी, गर्व, तम.

कोणीही शिवाजीशी सामना घेईना, तें पाहून खामतमानें अफ्झुलखान वजीर तेच क्षणी उठोन कुर्निशा करून अर्ज केला जे:—मजला हुकूम व्हावा. " मेरे डरसे शिवा बिल्ली होता है. " —चित्र. ८

खमतमा—अपक्क आकांक्षा, फाजील हाव. —चित्रगुप्त ८.

खामनखाम—खायेनखाय, निश्चितपणें.

आम्ही विडा घेऊन आलों आता सारे माघारे राहिले तरी खामनखाम ठिकाणास जातो —पे. द. ३३ पृ. १०८

खामी—नुकसानी, तोटा, हिसका धोका, धक्का.

अमृतरावसाहेब यांचा विचार लोभी. १०० रु. दिले असतां (मग) सरकारदौलतीमध्यें लाख रुपयांची खामी जाली असतां चिंता नाहीं ! हे समज तेथें आहेत. —ऐ. ले. सं. ५६०६

सावाजीचें असें झाले. (मृत्यु पावला). येणें करून आपली खामी झाली. —ऐ. ले. सं. २२९०

या वेळेस हरीपंत तात्या येथें न राहिलें तरी साऱ्याच मनसब्यास खामी बसते. —ऐ. ले. सं. २९६६

यवनाचा स्वामीचा बिघाड जाला तर जानोजीबाबा निखालस यवनाशीं झुंजतात . आपली खामी कबूल करितात. दुसरा अर्थ नाहीं. —पे. द. २० पृ. ११२

खामोश करणें—गम खाणें.

अवतरणासाठीं ' शिपाई भाषण ' पाहा. —हो. कै. पृ. ३

खायेमखाये—खामखा, निश्चित, अवश्यमेव खामाखाय.

आपणास तो खायेमखाये जावे लागते. —पे. द. १० पृ. ३९.

अब्दुलखानानीं आपले पुत्राची शपथ केली कीं खायनखाये रजबदल करितो आणि निरोपाचा प्रसंग करितो. —पे. द. ३३ पृ. ७२

खायेष—इच्छा.

बाजीरावसाहेब याणीं कंपणीसरकारासी बिघाड केला. याकरितां त्यांच्या सरदारांचें नुकसान व्हावें असी कंपणी सरकारची खायेष नाहीं. —पे. द. ४४ पृ. ५६

खार—राग, संताप, एकाद्यावर खार खाणें म्ह. एकाद्यावर संतापणें, रागावणें.

खारखापडा—खाऱ्या जमिनींची मशागत करण्याचा धंदा करणारी एक जात.

खारजवारी—खारीजवारी. खारीज म्हणजे नष्ट, उध्वस्त. पळवून लावलेले. त्यावरून खारजवारी म्हणजे दुर्दशा नष्टप्राय स्थिति.

उत्तर प्रांते दौलत लयास जावयास कारण तोच. गुदस्तां यवन येऊन प्रांताची खराबी झाली. सर्व प्रकारीं दौलत खारजवारीस यावयास तोच (कारण). —ऐ. ले. सं. पृ. १०२

खारवा, खार्वा—नावाडी, एक आरमारी जात.

खारवा खारबी—तोफखान्याकडील एक कामगार किंवा कारागीर.

अवतरणासाठीं बंधानी शब्द पाहा.

—नाना. पेश. रोज. १ पृ.१७९

खारवा—कॅन्व्हस कापडासारखें घट्ट पक्क्या विणीचें व लाल रंगाचें कापड.

खारिज—शिवाय.

खारी (?)

वाडीमजकुरी सरकारची पागा नवी बांधली आहे तिजला खारी पाहिजे. परजीन काल समीप आला आहे. याजकरितां खारीची बंदोबस्त कमाविसदाराकडून करून देवावी. —हो. इ. सा. प. खंड १२ पृ. ३

खारीज करणें—हद्दपार करणें, पिटाळून लावणें, बाहेर काढणें.

चेतसिगनें दहा हजारपर्यंत प्यादे जमा करून इंगरेजास खारीज केले.

—पुणें अख० भाग २ पृ. १०४

रोहिल्यास मारले त्याजलाही खारीज करून निम्मे प्रांत घेणें.

—हिं. द. खंड २ पृ. ६९

खालसा—जहागीर अगर इनाम नाहीं अशी जमीन. सर्कारजप्त.

नैबानें कुल विसादी लुटून खालसा केली. —रा. १५

खालिसह—शुद्ध, विश्वासू

खाली—१ पर्यंत. २ अदमासें.

कुमकेचे आरमार लहानमोठें दाहाबारा आहेत. त्याजवरील लोक तेरासे चौदासे लोकाखाली आहेत. —पे. द. ३४ पृ. ९८

खालीं—रिकामें.

तेथील काम हाताखालीं घेतल्यास सर्व घडून येईल. खालीं घरीं बसून बंदोबस्त होणें ती गोष्ट निराळीच आहे. —ऐ. ले. सं. २०४६

खाली गोळी—Blank cartrige. आंत शिशाची गोळी नसलेलें काडतुस. अशा काडतुसानें नुसता बार होतो. आंत शिशाची गोळी नसल्यामुळे कोणी जखमी होत नाहीं.

खाली—मोकळा, मसाला न भरलेला.

सत्तर बाण सुमार. त्यापैकीं ६८ भरलें दारू १, २ खाली. दारू नाहीं.

—पे. द. २० पृ. ७

इंग्रेजाची खाली जहाजें समुद्रांत आहेत तेच फरासीसाची म्हणोन लोकांनी वादवाही शोहरत घातली.

सोनगडचे रुखावर इंग्रेजाकडील जमीयत नाही खाली मैदान पाहून गेले.

—पुणें अख. भाग २ पृ. ११९–१२०

खालीं पडणें (रान)—सुनकें किंवा रिकामें होणें.

खासा स्वारीचा रोख बिदनुराकडे झाला म्हणजे हैदरही सारे लोक बिदनुरास घेऊन जाईल, तेव्हां शिकारपूर, उडगणी, अनवटी हें रान खालीं पडतें, तिकडे आम्ही गडबड करून पाहतों. —ऐ. ले. सं. १५२७

खालीबार—वायबार.

खावन्दगिरी—स्वामित्व, साहेबी, धनीपणा.

१ श्रीमंताचें दौलत यांची (अहल्याबाईची) दौलत; ते आठवण न धरिता आपणच खावंदगिरी महालाविषयी करून आहेत.

—म. द. बा. २ पृ. ३३

२ इकडे सरंजामी यांस खावंदगिरी कशी असते व सेवा कशी हे पुतें ठाऊक नाही.

—राजवाडे १४ पृ. ४३

३ लौकिकांत तर त्यांचें खावंदगिरीचें स्वरूप वाढवून.

—खरे १ पृ. ८८

खावंदी, खाविंदी—साहेबी, खावन्दगिरी, प्रभुत्व.

तर बंगाला आदिकरून इंग्रजांचे दोलतीवर देखील मालकीयत व खाविंदी राहील.

—दि. म. रा. १ पृ. २०७

खास्त—खांच.

या मोर्च्यापासोन माडी व कोट, तीराचे वस्तीवर सन्निध आहे. (तीर जाऊन पडेल इतक्या अंतरावर) —पे. द. ३४ पृ. ३१

खा (ख्वा) स्त—(ख्वास्तन), इच्छिणें.

खास्ती—धोकेबाज, फितुरी.

त्यास अरबाचा व महंमदखानाचा सेरा बिनसिरस्ता रुबाब आहे. त्यास या दो पथकांस दक्षिणेच्या सरदेंत राहीतों तेथें ठेवावेसे नाहीं. खास्ती आहेत. रोज उठोन अस्तनींत आग बाळगावीसी नाहीं.

—पे. द. ३४ पृ. ४५

खास्बंदी—एखाद्या गांवच्या जमिनी एखाद्या घराण्यांत वाटून देणें आणि सारा उवता ठरविणें.

ऐ. श. १८

खास्बार्गीर—हुजूरचा घोडेस्वार.
खास्बाल--वाळूमिश्रित जमीन, जींत खत घातलें तरच बरें पीक येतें अशी.
खास—विशिष्ट,
खास करणें-- रोख करणें, उद्योग करणें.

तूर्त याची फौज शिखाकडेही अटकली आहे. याजकरितां दुसरेकडे खास करूं सकत नाहींत. --राजवाडे खंड १३ पृ. २४

खास खबर—खात्रीलायक बातमी.
खासगत—स्वत:साठीं.

आम्हास खासगत येक पागोटें विकत घेऊन पाठविलें पाहिजे.
---वै. ४ स. १७४६ पृष्ठ ३

खासगत—स्वत:चे.

नाना देवदर्शण करून परस्परें मेणोलीस कृष्णातीरास जाणार तेथें आपले खासगत लग्न करून दाहा बारा दिवसांनी पुण्यास येणार.
---पूणें अखबार भाग ३ पृ. ७६

खासगीचा उतार पोषाख देणें—स्वत:च्या अंगावरील पोषाख उतरून तो देणें. (हा मोठ्यांतला मोठा बहुमान होय.)

तुम्हीं चाकरी चांगली केलीत. सबब तुम्हांस बहुमान खासगीचा उतार पोषाख व अंगठी पाठविली आहे. —ऐ. ले. सं. ४२००

खासदार--नोकर, मोतद्दार, अश्वधर, घोडा धरून उभा राहणारा.
—रा. व्य. को.

खासदार--पादरक्षाधर (जोडा संभाळणारा नोकर). - रा. व्य, को.
खास निशाण—खाशानें स्वहस्तें लिहिलेलीं अक्षरें

मातुश्रीबाईस विनंती केली, त्याजवरून त्यांनीं बोली सोडून देणें असें आपले खास निशाणाच्या चिठ्ठ्या तिघां पठाणांस दिल्या.
—ऐ. ले. सं. ५९०२

खासबारदार--खाशाची बन्दूक धरून बरोबर चालणारा नौकर.
खासर—गाडा.

आगीनें सरकारचे अठरा लाख कडबा व तीन लाख गवत व सेंभर खासरे व लकडगंज यैसे जळून खाक जाले. --नाग. २ पृ. १३७

खासह-खल—१ खाशाचा घोडा. २ एक किताब.
खासेसार--?

ऐशीयास हे सहा सरदार हे सरकारचे आहेत यांचा खासे खासेसार दरोबस्त वसूल घ्यावे ऐसे नाही यासी बाबती माफी केल्या असत,
--दस. शि. मो. इ. पृ. २६

खा (ख्वा) हृदयाप्त--मिळवील.
खा (ख्वा) हान--इच्छिणारे.
खाहेश--मागणी, अधिकाराच्या नात्यानें केलेली मागणी.
खिजणें—रुष्ट होणें.
(अवतरणासाठी गलहलफ शब्द पाहा)
--मा. स. प. मा. पृ. १३३
खिताब--किताब, पदवी.
खिताबराय--किताब, किताबराई.
यजमानसाहेबानी कृपावंत होऊन चिरंजीवास खिताबराय व पांचसदी (पाचशे) मनसब इनायत केली. —पुणें अख. भाग २ पृ. ८०
खिद्मत---चाकरी-
खिद्मत--गुजार—चाकरी बजावणारा.
खिद्मत--गुजारी—चाकरी बजाविणें.
खिद्मात—(अ) खिद्मत.
खिदडून काढणें—खरडून काढणें. मारून पिटून काढणें; लुढावणें.
वरकड माणसें वीस पर्यंत ठार जालीं. गांवाजवळून खिदडून पठाणांस काढिलें. —ऐ. ले. सं. ५८७८
चंदावरची फौज आलियाने जमाव घेऊन त्यांस खिदाडून काढावें.
—ऐ. सं. सा. खंड ६ पृ. २५
जसें बनेल तसें त्याजला तेथूनही खिदडून देऊं.
—हिं. द. खंड १ पृ. ५५
खिपत—फजिती, अप्रतिष्ठा.
१ बाहृयात्कारे तमाम लोक म्हणतात कीं, बिगाड करील तर खिपत खातील. मुखश्री (तोंड, हिम्मत) दिसत नाहीं.
—पे. द. १० पृ. ७०
२ नवाबास खर्चावर खिपत बसली. —राजवाडे ५ पृ. १८
३ इंग्रजास लढाई देऊन खिपत द्यावी इतका मजबूत आहे.
—खरे ८ पृ. ४३५६
खिपत देणें—पराभव करणें, फजित करणें.
इंग्रजास लढाई देऊन खिपत द्यावी, इतका टिपू मजबूत आहे. परंतु कांहीं कावादावा, शत्रू (इंग्रज) शेर होऊं द्यावा. काळीज दाखवून पट्टाणापावेतो पोटांत घ्यावा, मग एक व एक अशी कस्त करावी कीं, इंग्रजांस फुरसत घेऊं न द्यावी, हाहि टिपूचा मनसबा संभवतो.
—ऐ. ले. सं. ४३५६

खिरादमंद—शहाणा, हुशार.
खिल्वंत सराए—खलवतखाना.
खिलत, खिलात—सन्मानाचा पोषाख.
बक्षीगिरीचा खिलत. —दि. म. रा. १ पृ. ८६
खिलतखाना—सरकारी वस्त्रागार.
खिलत फाखरा—बहुमानाचा उंची पोषाख.
खलाअतफाखरे मुम्ताज होऊन. —वाड सनदा. १४०
खिलवत—(१) खलवत करण्याची खाजगी जागा. एकीकडची निवांत जागा (२) खलबत
आज बाबूराय वकील चंद्रसेनाचा गयासखानानी बोलाविला आणि खिलवतात नेऊन हमवार करावयाचा मजकूर केला. समजावीस होईलसी दिसत्ये. —पे. द. १० पृ. ७०
खिलाडी—खेळचा, कारस्थानी.
पाटीलबावा दट्टेबाज, खिलाडी कोन्हाचाहि नाहीं. कामाचा यार आहे.
—ऐ.ले. पा. म्यु. पृ. ८
खिलाडीदार—खेळचा, कारस्थानी.
सिंदे होळकर या प्रांती असतां यैस होईल मग तोंड काय दाखवितील ? (तथापि) इतकीयावर आहेत खिलाडीदार. कसं कसं असल ते सर्व समजेल. ऐ. ले. पा. म्यु. प्र. २१
खिलापट्टी—तोफासाठीं लागणारी लागलागवड, आवश्यक सामान.
तोफा तूर्त देत नाहीं. खिलापट्टी तयार होऊन गोकाकपर्यंत जाव्या. पुढील सुमार पाहून मग पुढें जातील. —ऐ. ले. सं ७१८९
खिलाबती—वाटाघाटी; खलबतें
सैद लष्करखां व अन्वरखां सामोरे जाऊन पिलाजी जाधवराव यांस घेऊन आले. खिलाबती जालीयावर माघारें लष्करांत गेले.
—पे. द. १५ पृ. ६६
खिलार—कळप, खांड (मेंढराच्या कळपालाहि खिलार म्हणतात)
यशवंतराव शिवाजी यांनीं म्हैसाळास येऊन उतरले. ते दिवशीं सरकारचे मेंढरांचें खिलार बोलवाडास होतें, तेथून घेऊन गेले.
—ऐ. ले सं. ५९७६
खिलारी—एक फिरस्ती धनगरांची जात.
खिस्त—किस्त, पाळी, खेप, हप्ता.
लोक छ ८ रमजानी माहीमास गेले व कांहीं छ ९ रमजानी गेले. यैसे दो खिस्तीनें जाहाजे भरून गेली. —पे. द. १६ पृ. ८६

खिस्ती—किस्ती, हप्ते.

तीन हजार होनाच्या वसूलाच्या खिस्ती बांधून देऊन त्याप्रमाणें वसूल करून देणें. —ऐ. सं. सा. खंड ५ पृ. २६

बाकी खंडणीपैकीं ३२ लक्ष रुपये राहिले. ते सावकारी खिस्ती करून द्यावी याप्रमाणें करार झाला. —ऐ. ले. सं. १८६५

खिसा—आवाई, दंगा.

मंगलवारी सदरहू गावगना मोकदम व मोख्तसर यैसे पांचसहा येकजण सांगाते घेतले वरकड लोक मुस्तेद होऊन येत होते त्यास द्वाही देऊन गावांतच राहाविले. लोक असलिया खिसा होईल म्हणून गावांतच राहवून दिवाण, लोक व गोत यैसे तिसाचाळिसाक जणानसी वेस (वेशीस) जाऊन बसले. —शि. च. सा. खं. २ पृ. ११६

खिसा—वांधा; आडमुद्दा.

(१) अमुक केलें तर प्रतिनिधीवरील चौकी उठेल असें बोलणें पडलें आहे. आणखी दुसरा एक खिसा आहे, तो प्रतिनिधीनें एक तेलीण ठेविली आहे, त्या बाबत. --ऐ. ले. सं. ६६१२

(२) पत्रे दप्तरी बार होत असेत. देण्याघेण्याचे खिसे. —पे. द. ४५ पृ. १४०

खिसाने—पश्चात्ताप, फसवणूक झालेले, फजीत.

झांसीचे किल्ल्याशीं युद्ध होत आहे. फौज दहापंधरा हजार आहे श्रीमंताच्या मुलकासी खलस अगोदर केला आतां खिसाने जाले आहे. —हिं. द. खंड २ पृ. ४२

खिसारा—नुकसान, तोटा.

दौलत कायम आहे तेथे आमदही आहे व खिसाराही आहे. —म. शि. यां का. पृ १६६

इंगरेजाचे तंबीस बंदगानअलीनी अज्म (निश्चय) करावा हें बोलणे यांचे मुख्य आहे. याचा तोड हुजूरीहून होण्याचा प्रकार खिसारा कबूल करावा. —पुणें अख० भाग २ पृ. ४१

खिसारा खैचणें--हानि, नुकसान सोसणें (?)

ममईवाल्याचें म्हणणें कीं, कलकत्तेकर साहेबांनीं खिसारा (?) खैचून मि. मेडोस यास कशासाठीं रवाना केलें ? —ऐ. ले. सं. ४३५४

खिसा होणें—नाश, नुकसानी होणें.

तुझे बाबे तुगी गवडा हुजूर येऊन मालूम केलें जें हरताजी देशमुखांचें खिसा जाहालियावरी फरजंद मजकूर शकजादा होऊन परागंदा जाहला आहे. --शि. च. सा. खं. ५ पृ. ९५

खीचल—हस्तक्षेप, ढवळाढवळ.

माहारावजी कोटेकर यासी तुम्ही माकुल करून सांगोन परगणे मजकुरची कमाविस राघो शंकर यासी असे त्यांचा अमल सुरलीत चाले, नालस त्यांची न ये, यैसे सांगोन गावमजकुरी खीचल न करीत ते गोष्ट करणें

—शि. शा. इ. सा. भा. १ पृ. १२२

खुजस्ते—शुभ.

खुजस्ते अख्तर—शुभग्रहाचा, सुदैवी. —राजवाडे ८ पृ. ७७

खुजस्ते फर्जाम—सद्गतीस पोंचलेला.

—राजवाडे १५ पृ. २५३

खुजस्ते बुनियाद—शुभ पायाचा.

(औरंगाबाद शहराची पदवी)

खुंटवा, खुटवा—गलबतें विशिष्ट टापूंत येऊन नांगरण्याबद्दल किंवा त्या विभागांतून होणाऱ्या वाहतुकीबद्दल घेण्यात येणारा एक कर.

खुंटी मुरगाळणें—खुंटी पिळणें; अलंकारिक रीत्या, आंतून कांहीं कळ फिरविणें.

मीं आजच दौलतराव शिंद्याचा हुजऱ्या व कारभारी बाणाजी शेटचाकडे जाऊन खुंटी मुरगाळून ठेवितों. —ऐ. ले. सं. ५२७३

खुटेकर—धनगरांतील एक पोटजात.

धनगरांत खुटेकर, हटकर, सेगर व सणगर असे चार पोटभेद आहेत. अवतरणासाठीं 'चौगुला' पाहा. —हो. कै. पृ. १

खुडा—खड्डा; फांस (?)

दोन तीन वाघ खुडयांत, म्हणून पूर्वींच बातमी आली होती.

—नाग १ पृ. २९८

खुडुस—शल्य.

श्रीमंत दादासाहेब अकस्मात इंदुरास आले त्यास जाऊं द्यावे तरी राज्यांत खुडुस रहाते. —म. शि. यां. का. पृ. ५

खुतु—शिरस्त्राण. **जिरे**–लोखंडी कड्याचे चिलखत.

शिवाजी भेटीस येणार म्हणून बादशहा सदर कचेरी करून पांच हत्यारे आपणाजवळ ठेऊन कमरबंदी करोन अंगांत जिरेखतु घालून तख्ती बैसले.

—म. द. रु. १ पृ. ५२

खुतूत—स्वतांचा, आत्मीय. खास.

आपण खुतूत गैरमाकूल सहसा वर्तणार नाहीं.

—राजवाडे ८ पृ. १०

आपण कारभार करणें तो ऐसा करू की जैसा अपले घरींचा खुतूत कार्भार

—राजवाडे ८ पृ. १०

खुद्दपसन्ती, खुद्द-पसंदी—१ अहंमन्यता २ अहंमन्य, मनस्वी.

१ बाईचा प्रकार खुद्द पसंतीचा आहे. हिताहिताचा विचार तोडमोड करून समजावी असा मनुष्यही कोणी नाहीं. —म. द. बा. १ पृ. १८८

२ पाटीलबावाची मर्जी खुद्दपसन्दी व खुशामततलबी बहुत.

—दि. म. रा. १ पृ. २५९

खुद्दाम (अ)—खादिम, चाकर.

खुद अखत्यार, खुद यख्तियार—स्वेच्छा.

हें सल्लाहानें झाले किंवा खुद्द यख्तियाराने ?

—राजवाडे ५ पृ. ५१

खुदगर्जी—स्वार्थ.

इन्साफाची रवेश दर्किनारा (बाजस) ठेवून खुदगर्जीवर नजर देवून.

—खरे ७ पृ. ३५७०

खुदपसंद—अहंमन्य, मनस्वी, स्वच्छंदी, स्वयंमन्य.

त्यानी उत्तर दिले जे, नंदराज खुदपसंद. कोणाची गोस्टी यैकत नाही.

—E. M. P. पृ. १०९

खुदरत—प्राज्ञा.

त्यांची खुदरत नाही जे पहाडीखाले उतरोन चांदनी व कनात घेऊन जातील. —E. M. P. पृ. ९९

खुदाई—चौकशी, शोध, खणणें, खोज.

त्यांच्या विषयींच्या दंतकथा खुदाई केल्यानंतर अगदी खऱ्या ठरल्या.

—पु. न. सं. वृ. खं. २ पृ. १३३

खुदाईखोर—दैववान, सुदैवी.

लोकांची गाळण बहुत झाली आहे. महागाई बहुत. मजली भारी. यामुळें माणूसमात्र रणकुंडीस (रडकुंडीस) आले. तो प्रकार लिहितां पुरवत नाही. बुनगे खुदाईखोर. मनस्वी फिरते. स्वमुलखांत येऊन पडिले. नाहीं-तरी बाकी नव्हते. —पे. द. भाग २० पत्र नं. २४४

खुदातर्सी—ईश्वरभीरुता.

खुदातर्सी फकिरी तौरानें राहतात. —राजवाडे १ पृ. ६३

खुदानखास्त—‘ ईश्वर न घडवो ’

तेव्हां नवाबांनीं बहुत समाधान केलें कीं खुदानखास्त बाशद आपनास राजेश्री पंतप्रधानासी बिगाड सहसा करणें नाहीं.

—पे. द. १० पृ. २९

खुदायगान—ईश्वरी.

खुदावन्तन्यामत—श्रीमन्त.

—राजवाडे १० पृ. १६५

खुदावन्द—मालक.

खुदीनें—स्वत:च.

प्रस्तुत ते खुदीनेंच देवगड फते करून आले. त्याची मर्जी गरम आहे. तुम्ही त्याकडे देवगडचे कामास न गेलेत हे त्यानी श्रम मानिले आहेत.

—पे. द. १० पृ. १७

खुनकाट—युद्धांत मेलेल्या शिपायांच्या कुटुंबास भरपाई दाखल दिलेली देणगी. जे लोक युद्धांत जखमी झाले व मेले त्यांच्या बायका-मुलांस, कोणास रांडरोटी कोणास खुनकाट कोणास इनाम व बक्षिसें अशीं इनामें जमिनी वगैरे देऊन सर्वांचें समाधान केलें. —को. प्रा. ११८

खुनसवाल—डूग किंवा खुनस धरणारा.

—पे. द.

खुनी, खुन्या—वध करणारा, मारेकरी.

हिचा खून हडपसरचे रानांत करून खुन्ये पळून गेले.

—वाड स. मा ३ पृ. ८८

खुफिया—कुपिया, गुप्त.

हें वर्तमान खुफिया परंतु बालाजी जनार्दन व हरिपंतास कळले.

पुणें अखबार भाग १ पृ. १०१

कारभाऱ्याचे तर्फेने कोण्ही हरकारे खुफिया मुंबईस गेले होते ते परतोन आले त्यांचे जुबानी गाडर गोसेनिसीन होऊन बसला आहे बाहेर निघत नाहीं. —पुणें अखबार भाग १ पृ.१३९

खुबा—मुठीनें पकड घेण्यासाठी कडें.

बुदली ढाल, मुलामा रुपेरी, खुबे ४ —ऐ. ले. सं. ४१६१

खुबाळ—अडचणीचा, अवघड. खुब्बल, कुब्बल.

महंमद इसफ गाडदी चिखली म्हणून गांव आहे, तेथें दडला आहे. झाडीचें रान, जागा खुबाळ पाहून राहिला आहे.

—ऐ. ले. सं. २३७६

खुम्ब, खुम—लोक, जात.

कानू कायदे अठराखुम्ब जागे जागे चौथरे नेमून दिले.

—म. द. रु. १ पृ. १५

पाटेल सर्व खुमाचा —म. ब. ५१

खुमास—खुमारी.

खुर्दबुजरूख—लहानथोर.
अवतरणासाठीं ' इतल्ला मनाशिब-वक्त ' पाहा

खुर्दबुदरुख करणें—ढवळाढवळ, हस्तक्षेप. घालमेल.
परगणेयांत सख्ती करून वसूल घेतला. खरावी केली. नासिक परगणेयाचें जमीदार हातीं धरून जमावंदीमध्यें कितेक खुर्दबुदरुख केले.
—पे. द. १० पृ. २८

खुर्दसाल—लहान, अल्पवयी, अननुभवी.
तुम्ही म्हणाल कीं कमरदीखानाची विजारत (इजारत, इजारा) व जागीरा त्याचे पुत्रास कां न दिधल्या ? यैसे म्हणाल तर विजारतेचें नांव मोठें. ते खुर्दसाल. या कामा योग्य नाहींत. —पे. द. २५ पृ. ८९
माधवराव खुर्दसाल होते याकरितां रघुनाथराव व सखारामपंत यांजवर कारभार सोपविला. —पुणें अखबार, भाग १ पृ. १०३

खुर्दा—मोड; फोडून तुकडे करून पुन्हा आटवण्यास योग्य; भंगार.
तोफखान्यापैकीं लहानथोर ५-७ तोफा फुटल्या. खुर्द्याच्या उपयोगी. सबब धारवाडांत ठेविल्या. —ऐ. ले. सं. ४४७३

खुर्बाण—एक लढाऊ हत्यार. —पे. द.

खुर्मा—खारीक खजूर. —भा. इ. स. मं. द्वि. सं. वृ. १७२

खुर्सन्दगी—आनंद.
मजकूर दर्याफ्त जाला व खातरेस बिस्यार (फार) खुर्संदगी जाली.
—भा. ऐ. प. या. व. पृ. ४६

खुरशी—खुर्ची.
काशींत फिरंग्यापाशीं एक शहाजादा होता त्यास शिंद्यांनीं आणून फिरंगी व आपण मिळून दिल्लीअलीकडे सहा कोसांवर खुरशीवर शहाजादेस बसवून तमाम सरदारांनीं नजरन्याज केलें. —ऐ. ले. सं ४२२५

खुरसीनामा--वंशावळ, वंशवृक्ष, पिढ्या दाखविणारा नकाशा. मूळ शब्द कुरसी-वंश. त्यावरून लक्षणेनें पिढी असाहि अर्थ होतो. जसे 'कुरसी दर कुरसी हें वतन अनभवणें'.
खाली लिहिलेल्या सनदापत्राच्या नकला व खुरशीनामा मुतालेत आणून सुदामतपासून चालत आलेले मर्यादेप्रमाणें किताब अलकाब चालवणें.
—द. स. कै. या. पृ २३९

खुल्द—शाश्वत. स्वर्गोद्यान.

खुल्द मकान—स्वर्गस्थ, स्वर्गास जाण्यास योग्य.

खुलगा—रेडा.

१ खुलग्याची लढाई झाली. तमाशा पाहावयास नवाब बहादूर याणी बोलाविले. —राज १९ पृ. ७९

२ आणखी अवतरणासाठी ' बिर्दी ' शब्द पाहा

—मा. म. प. मा. पृ. ७

खुलस—खुलासा, निर्णय, तात्पर्य, कारण, हेतु.

१ वरकड तीन मुद्दे सामान्यच. खुलस दोन किल्ले व पांच लाख रुपयाचा मुलुख याजवर आला. —म. शि. यां. का. पृ. २८७

२ त्यास बोलावून तेहि येकांत बैसले. तेच समयीं दोनशे राऊत देऊन हरी बावाजी व बाळारायाकडील कारकून विदा केले. खुलस कळला नाहीं. तेव्हां कोणास विचारले तेव्हां कळले. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ३९

खुलास—मोकळीक, सार.

खुलासह—सार.

खुलासा—मनांतील भाव किंवा खरा हेतु.

वसई वगैरे तुमची तुम्हास परत देऊ यैसे इंग्रज वकील म्हणाला तेव्हा कारभाऱ्यांनी वकिलाचा खुलासा पाहण्यासाठी उत्तर केले जे.

—पुणें अखबार भाग ३ पृ. ५८

खुलिद अयाम दौलतहू—त्याच्या दौलतीचें आयुष्य चिरायु असो.

—राजवाडे १५ पृ. १३२

खुली दुष्मनी—उघड वैर.

हे, जों पावेतो इंग्रजाचे पारपत्य होत नाही तों पावेतो इंग्रेजासी खुली दुष्मनी करावयास भितात. —राजवाडे खंड१२ पृ. २३

खुलून खेळणें—मोकळ्या मनानें, बेशक (शक = भीति) लढणें.

परंतु हे इंग्रेजास फार भितात खुलून खेळत नाहींत.

—इ. सं. दि. म. रा.

खुश्क—सुका.

तर मेव्याचे व खुश्क मेव्याचे खोन. —राजवाडे १० पृ. २९६

खुश्कसाली—अवर्षण, दुष्काळ.

साल मजकुरी खुश्कसाली आहे. —राजवाडे २२ पृ. ५२

खुश्की—१ जमीन, २ अवर्षण, दुष्काळ.

खुश्कीचे.तमाम सरदारानी इंग्रेजास तंबी करून खुष्कीतून त्याजला खेरीज करावे. —राजवाडे १० पृ. १८१

कर्पादिक खुश्कीमुळे जागिरीपैकी हातीं लागत नाहीं.

—दि. म. रा. १ पृ. ८३

खुश्नमत—आनन्ददायक.
खत खुश्नमत. —साने प. या. व ३८४

खुश्नुदी—आनंद, सौख्य.
मुफाविजा (कृपापत्र) मर्कूम (कलमी) केला तो पोहोचून खुश्नुदी हासल जाली. —राजवाडे १० पृ. १२९
आणि दर्कार नसेल तर खुस्नुदीनं रजा दिधली पाहिजे.
—इ. मं. ६७

खुश्नुमा—दिसण्यांत चांगलें, उचित.
अखबरनवीस तेथें जाणें जाहिराण्यात खुश्नुमा दिसत नाहीं.
राजवाडे ५ पृ. १०४

खुश्बईदार—सुगंधी.
—मेस्तक पुस्तक जमे लेखन ३१९

खुश्वक्त— सन्तुष्ट, खुष.
नबाब बहुत खुशवक्त होऊन यांचा आदर बहुमान केला.
—राजवाडे ११ पृ. ५९
स्वामींच्या नांवावर कुल अम्मलदार व मुत्सद्दी बहुत खुश्वक्त आहेत.
—राजवाडे ८ पृ. २१४

खुशखुर्मी—आनन्द, समाधान.
तें पोहोचून खुशखुर्मी हासल जाहली.
—राजवाडे १० पृ. ११८

खुशतबाई—प्रकृतीच्या मर्जीप्रमाणें.
निव्वळ गांठ पडल्यास कांहीं खुशतबाई जाब आज उद्यां असेच होत असतें.
—म. शि. यां. का. पृ. ३७५

खुशम—खुशाल. मूळ शब्द खुश्नमत-आनंददायक.
महाडकर जुंझले येकायेकीच बाणकोट गेला म्हणून राजेश्री फार खुशम जाहाले आहेत. —पे. द. ३ पृ. १२९

खुशवक्त—१ चांगली वेळ. २ ज्याचा चांगला काल आहे असा.

खुश हालीनें—खुशालीनें.
आपलें इनाम व हक खाऊन खुशहालीनें रहाणें.
—शि. च. सा. खं. ५ पृ. ५

खुशा—मौज, चैन, थट्टामस्करी.
तुम्ही उगेच खाऊन जेवून खुशा मनमानेशा करून असावें.
—नाग २ पृ. १०९

खुशाद—मोकळा.
स्वरूपासारखे फार लोक जवळ नाहींत म्हणून चिंता करून होणें काय ? गुदरान करावी. हात खुशाद होईल ते समई मागती लोक ठेवावयास उशीर काय ?
—ऐ. ले. सं. पृ. ४६३

खुशामतगो—खुशामत करणारा.
नवावाजवळ जितके आहेत तितके खुशामतगो आहेत. कोण्ही परिछिन्ह मनसुवा सांगेल ऐसा नाहीं.
—पे. द. २५ पृ. ९६

खुशामततलबी—स्तुतिप्रिय.
पाटीलबावांचो मर्जी खुद्दपसन्दी व खुशामततलवी बहुत.
—दि. म. रा. १ पृ. २५९

खुशाल—सुस्थितीत. सुखी, आनन्दित.
हया फौजा गेल्या म्हणोन इंग्रज व मोंगल फार खुशाल जाहले.
—खरे ९ पृ. ४५२६

खुशालपट्टी—पाटलाला किंवा कोण्या अधिकाऱ्याला किंवा राजाला पुत्रप्राप्ती झाली किंवा असा कांहीं आनंदोत्सव झाला तर गांवावर बसविण्यांत येणारी पट्टी.

खुशाली-ब-खुशाली—विशेष आनंद. खुशालीच खुशाली.
खुशाली-ब-खुशाली रूयदाद (प्रविष्ट) जाहली.
—साने प. या. व. ३८६

खुष्क—सुका, कोरडा, वाळवलेला.
कारपरदाजानी इंग्रज वकिलासाठी खुष्क व तर मेवेजात व मिठाई पाठवून दिली.
—पुणें अखबार भाग ३ पृ. ३२

खुषनुमा—सुंदर, उचित, योग्य. गोड.
आमचे गेल्याचे पेशज चौथाईचे अमलाची मोकळीक जाहलिया येथील कारपरदाजास खुषनुमा दिसले.
—पुणें अखबार पृ. २२६

खुषरंग—मनाला संतोष होईल असा रंग.
शालजोडीविषयी लिहिले, त्यास शालजोडी उत्तम खुषरंग पाहोन मागाहून माणसें रवाना होतील त्यांजबरोबर पाठवू.
—वै. ४ स. १७४२ पृ. ६

खुषरजा—स्वसंतोषें.
खंड आपले शिरी ठेवला होता तो आपण खुषरजा कबूल केला.
—पे. द. भा. ७ पृ. ९

खुषवक्ती--आनंद, उत्सव.

वेंकटराऊ घोरपडे यांनीं गोंवें फत्ते केलें. खुषवक्तीचें वर्तमान सेवेसी कलावें म्हणोन लिहिलें असे. --पे. द. १६ पृ. १२१

खुस्त्रवानह--राजकीय.

खुस्त्रवी--राजकीय.

खूसूस--विशेषतः

रावजीनें येक करावे कीं आम्हास कोठें मा[illegible]वर काम पडिले, फौज घेऊन जावे लागले, खुसूस गुजराथसारिखे जिलेयांत, तर पन्नास हजार स्वारानसी पोहचून काम सरबरा करावें. --पे. द. २५ पृ. ७१

खुसूस आयेत—खासगत निशाणी.

खुसूस आयेत दस्तगा आपाजीराम बाषद दरीविला आजि जिवाजीराम यांनीं अर्जी पाठविली. ते पोहोचून मफसल हकीक जाहीर जाहली. —ऐ. ले. सं. १२३५

खुळात शिरणे—बंड करणें; बंडांत सामील होणें.

आनंदराव होळकर यानी खुळांत शिरोन सरकारी महालास उपद्रव दिला. —हो. इ. सा. पत्र. खं. १ पृ. १३४

खुळापैसा—पूर्वी दक्षिणेंत प्रचलित असलेलें एक तांब्याचें क्षुद्र नाणें. असल्या ७०० खुळ्या पैशांचा एक रुपया होई.

खूण पुरणे—खुण पटणें.

निशा खात्री झाली. हल्ली तिकडून सूत्र लागले. खूण पुरली. म्हणून येथूनहि सत्वर भेटी व्हाव्या येविसी लिहिले आहे. —पेठेदप्तर भाग २ पृ. १६

खूद—स्वतः

खूनखराबा—खून वगैरे नुकसानी.

जागा हस्तगत करणें जरूर जाली म्हणोन तुम्हीं केली त्यामुलें खून खराब्या जाल्या व बगरहुकूम कितेक वर्तणुका घडल्या. —पुरं. द. भाग ३ पृष्ठ ३१

खूब—छान, उत्तम.

तुमचें खताचा तर्जुमा रुजू केला. नबाबानीं आपले हातें तपसीलवार वाचून पाहिला. खूब आहे म्हणोन बोलिले. —पे. द. ४०. पृ. ४४

खूब वजा—उत्तम रीतीनें.

मुसा बुसी यास खूबवजा ताकीद करून रवाना करावे. राजवाडे पृ. ५१

खुशाद—मोकळा.
स्वरूपासारखे फार लोक जवळ नाहींत म्हणून चिंता करून होणें काय ? गुदरान करावी. हात खुशाद होईल ते समई मागती लोक ठेवावयास उशीर काय ?
—ऐ. ले. सं. पृ. ४६३

खुशामतगो—खुशामत करणारा.
नवाबाजवळ जितके आहेत तितके खुशामतगो आहेत. कोण्ही परिछिन्ह मनसुवा सांगेल ऐसा नाहीं.
—पे. द. २५ पृ. ९६

खुशामततलबी—स्तुतिप्रिय.
पाटीलबावांची मर्जी खुद्दपसन्दी व खुशामततलबी बहुत.
—दि. म. रा. १ पृ. २५९

खुशाल—सुस्थितीत. सुखी, आनन्दित.
ह्या फौजा गेल्या म्हणोन इंग्रज व मोंगल फार खुशाल जाहले.
—खरे ९ पृ. ४५२६

खुशालपट्टी—पाटलाला किंवा कोण्या अधिकाऱ्याला किंवा राजाला पुत्रप्राप्ती झाली किंवा असा कांहीं आनंदोत्सव झाला तर गांवावर बसविण्यांत येणारी पट्टी.

खुशाली-ब-खुशाली—विशेष आनंद. खुशालीच खुशाली.
खुशाली-ब-खुशाली रूयदाद (प्रविष्ट) जाहली.
—साने प. या. व. ३८६

खुष्क—सुका, कोरडा, वाळवलेला.
कारपरदाजानी इंग्रज वकिलासाठी खुष्क व तर मेवेजात व मिठाई पाठवून दिली.
—पुणें अखबार भाग ३ पृ. ३२

खुषनुमा—सुंदर, उचित, योग्य. गोड.
आमचे गेल्याचे पेशज चौथाईचे अमलाची मोकळीक जाहलिया येथील कारपरदाजास खुषनुमा दिसले.
—पुणें अखबार पृ. २२६

खुषरंग—मनाला संतोष होईल असा रंग.
शालजोडीविषयी लिहिले, त्यास शालजोडी उत्तम खुषरंग पाहोन मागाहून माणसें रवाना होतील त्यांजबरोबर पाठवू.
—वैं. ४ स. १७४२ पृ. ६

खुषरजा—स्वसंतोषें.
खंड आपले शिरी ठेवला होता तो आपण खुषरजा कबूल केला.
—पे. द. भा. ७ पृ. ९

खुषवक्ती--आनंद, उत्सव.

वेंकटराऊ घोरपडे यांनीं गोंवें फत्ते केलें. खुषवक्तीचें वर्तमान सेवेसी कलावें म्हणोन लिहिलें असे. --पे. द. १६ पृ. १२१

खुस्त्रवानह--राजकीय.

खुस्त्रवी--राजकीय.

खूसूस--विशेषत:

रावजीनें येक करावे कीं आम्हास कोठें मातबर काम पडिले, फौज घेऊन जावे लागले, खुसूस गुजराथसारिखे जिलेयांत, तर पन्नास हजार स्वारानसी पोहचून काम सरबरा करावें. --पे. द. २५ पृ. ७१

खुसूस आयेत—खासगत निशाणी.

खुसूस आयेत दस्तगा आपाजीराम बाषद दरीविला आजि जिवाजीराम यांनीं अर्जी पाठविली. ते पोहोचून मफसल हकीक जाहीर जाहली. —ऐ. ले. सं. १२३५

खुळात शिरणें—बंड करणें; बंडांत सामील होणें.

आनंदराव होळकर यानी खुळांत शिरोन सरकारी महालास उपद्रव दिला. —हो. इ. सा. पत्र. खं. १ पृ. १३४

खुळापैसा—पूर्वीं दक्षिणेंत प्रचलित असलेलें एक तांब्याचें क्षुद्र नाणें. असल्या ७०० खुळचा पैशांचा एक रुपया होई.

खूण पुरणें—खुण पटणें.

निशा खात्री झाली. हल्ली तिकडून सूत्र लागले. खूण पुरली. म्हणून येथूनहि सत्वर भेटी व्हाव्या येविसी लिहिले आहे. —पेठेदप्तर भाग २ पृ. १६

खूद—स्वत:

खूनखराबा—खून वगैरे नुकसानी.

जागा हस्तगत करणें जरूर जाली म्हणोन तुम्हीं केली त्यामुळें खून खराब्या जाल्या व बगरहुकूम कितेक वर्तणुका घडल्या. —पुरं. द. भाग ३ पृष्ठ ३१

खूब—छान, उत्तम.

तुमचे खताचा तर्जुमा रुजू केला. नबाबानीं आपले हातें तपसीलवार वाचून पाहिला. खूब आहे म्हणोन बोलिले. —पे. द. ४०. पृ. ४४

खूब वजा—उत्तम रीतीनें.

मुसा बुसी यास खूबवजा ताकीद करून रवाना करावे. राजवाडे पृ. ५१

खूम—लोक.

तरी कसवे मजकुरी कुल खूम असतील त्यांजवर पट्टी करून रुपये देवविणें
—वाड बा. बा. २ पृ. २१

उदमी खुमाविना बाजाराची अमदानी होत नाहीं.
—वाड. स. मा. २ पृ. १४४

खूर्द सालह—म्हातारा.

खूर्शीद—सूर्य.

खूल—खूळ, बंडवाले, दंगेखोर.

गतवर्षी भालगावच्या पाटलाणें नरसिंगराव आणून खूळ केले म्हणोन येथून श्रीमंतांच्या फौजा गेल्या त्याजवरून खूल व गांवांतील पाटील पळून गेले.
—पुणे अख. भाग २ पृ. १६

खूश—सुखी.

खूश-बूदी—सुखी असणें

खूशी—सौख्य.

खूष (नाम)—समाधान.

हिंदुस्थानांत पेशवे सरकारचा बहुत नक्षा जाहला. (येणेंकरून) इंग्रज सरकारांतहि खूष जाहलें.
—ऐ. ले. सं. ४३४५

खूळ करणें—बंड करणें.

फाकडे मजकुराने भिल मेलऊन वोशागडावर खूळ केले आहे त्याचे पारिपत्यास येथून पागा पाठविण्याचा निश्चय जाला.
—पुणें अखबार भाग ३ पृ. ६८

खेटा—धक्काबुक्की, मारामारी.

आमच्या तोफा लागू व्हावयाच्या सुमारें त्याणींहि किल्ल्यावरून व पेठेजवळून शें-पनास गोळे मारावे, याप्रमाणें खेटे जाले.
—ऐ. ले. सं. ४३८०

खेटा करणें—कटकट करणें, उपसर्ग देणें.

चंद्रावताचा पुतण्या चिमणाजी सेदोनसे स्वार व पायदल ऐसी घेऊन गड प्रगणियांत आला आहे. गरोठ चंदवासा तप्यांत गावांसी खेटा करील असें दिसतें.
—हो. इ. सा. प. खं. १२ पृ. १३८

खेड किंवा खेडाब—भूत किंवा समंध, पिशाच्च.

नवी सिंगरें पांच मेली त्यांच्या माना उफराटया होऊन मेली. खेडाब झाडाच्या अंगीं येऊन सांगतो की तुम्ही येथें राहिल्यानें पागेची घोडी मारीन.
—पे. द.

खेडली जमीन—लागवडीस आणलेली, ज्यांतून पीकदाव निघते अशी.
मग हरनाईक बोलले आगामुऱ्हासाहेब! तुम्ही पादशाही वजीर. दाणे लोक-आणि आम्ही जमीतदार शेरीकर, तुम्ही इन्साफ खरा करा. जमीन खेडलीचा महसूल घ्याल की उजाडीचा घ्याल? तेव्हां मुऱ्हा बोलले आम्ही खेडली जमीनीचाच वसूल घेऊ. —पा. क्ष. ज्ञा. इ. खं. १ पृ. २४

खेंडी—हलक्या तऱ्हेचीं वस्त्रें.
५ रु. करोलीस लुगडें १; दहा रु. वरास वस्त्रें २; आठ रुपये खेंडी सुमार ८. —ऐ. ले. सं २७६३

खेडी झोंपडी—वाड्यामजरे.
वरकड खेडीझोंपडी रखवालीस कोन्ही कोन्ही येऊन रुजू होते. तेथील जीवनप्रमाणें शेंदोनशें चुकतात. बोरी मात्र कागदी होते ऐसे आहे. —पे. द. भाग २७ पत्र नं. २

खेडू-खेडूत,—कुणबी, शेत कसणारा.
पांच-पंचवीस बिध्यांचा खेडू त्याजवर जोरजूलूम जाहला असता बेरोम (बेहरम म्ह० रुष्ट, संतप्त किंवा निष्ठूर) होऊन गांव जाळीत असतो पण त्याचेंही समाधान करून जाल्या गोष्टीचा बंदोबस्त होऊन जमिनीवर कायम करावा लागतो. —हो. कै. पृ. १५७

खेंदडा—नाठाळ, खटचाळ, खाष्ट, खेद उत्पन्न करणारा, दुष्ट, नष्ट.
अर्वाच्य खेंदडा बहुत बापट बच्या। त्याच्या वर्तणुकेच्या रीती श्रवण करी कच्या॥ —भा. इ. सं. मं. त्रै. वर्ष २० अंक १ पृष्ठ २७

खेदाडणें—खिदडणें, मारून खरडून पिटून लावणें.
नासरजंग मारले गेलेवरी पन्नास स्वारवाले हजारा स्वारास मारून खेदाडताती. E. M. P. पृ. ९९

खेप—जुन्या काळीं लमाणांचे किंवा वंजाऱ्यांचे बैलांचे तांडे धान्य भरून आणीत, त्याला 'खेप' असें म्हणत.
वैरणीचा तोटा आहे. धारण, खेप आली चोहोंकडून तर ३ पायलींची होते. एक दोन दिवस खेप न आली तर २॥ – २। पायली होते. —ऐ. ले. सं. १७०२

खेपाट घेणें—खणपटीस बसणें, पिच्छा पुरविणें.
जैस माळवेचे हिंदुस्थानचे बंदबस्तीस लागोपाठ दहा-पांच वरुष खेपाट घेतला तैसच दखणचे बंदोबस्तेस दोनी वरुष कसाला केलियानें साहा सुबे दक्षण कारारवाकै अमल होत आहे. E. M. P. पृ. १२३

खेमा—डेरा, तंबू.
येक खेमा व डेरे पातशाही न सोडिले. —पुरं. द. भा. ३ पृ. १६७

खेमेदाखल—डेरेदाखल.

तूं बाहेर खेमेदाखल होऊन फौजेची गिर्दावरी करावी.

—राजवाडे ५ पृ. ७८

खेमेदोज—राहुट्यादिक शिवणारा, दुरुस्त करणारा शिंपी.

यंदा श्रावणमासी फुलाजी खेमेदोज यास दिले येक हजार.

--वै. ३ पृ. ४८

खेरीज मुशाहिरा—भत्ता.

खेलखाना—१ खान्दान, २ क्रीडासोबती, ३ क्रीडांगण.

खेलनवाला—खेळगडी, सोबती, मित्र.

अडंवोजी पाटील भोंडवे मौजे रावेत सरकार जुन्नर नवाब अलीखान सुभेदार याजपासी अर्ज केला कीं मौजे मजकुरीची पाटीलकी साहेबाची होती ती साहेवाचा खेलनवाला गज्यालीखान याजला दिली.

—पे. द. ३१ पृ. २

खेश—सोयरे (फा. खेश्—नातलग) नातलग.

खेश—सोइरे.

—राजवाडे १८ पृ. ८७

खेळ खिसारा—कपट; लपंडाव; अडवणूक.

असे प्रकार किती लिहावे ? उठोन एकादीकडे जाईन म्हटल्यास जातां न ये. असे नाना प्रकारचे खेळखिसारे आहेत. सोसवेल तोंवर सोशीतच आहों.

—ऐ. ले. सं. ३२५८

खैर—कृपा, आबाद, खुशाल.

खैर आफियत—क्षेम कुशल, खुशाली.

—राजवाडे १० पृ. ११८

खैरख्वा—हितेच्छु.

सालगुदस्ता नवाबानीं सारेच येकीकडें ठेऊन नायकांची दस्तगिरी केली. नाईकाची बुनियाद काय याचा विचार नबाबानें चित्तांत आणिला नाहीं. आम्ही नवाबाचे खैरख्वा आहोत म्हणोन नवाबाचे किफायतीचा मजकूर सांगावा लागतो.

—पे. द. २५ पृ. ३०

खैंच करणें— ओढून धरणें.

महाली शाळूची कमाई उत्तम प्रकारची होऊन ज्वाऱ्या चांगल्या आल्या. एक्या पर्जन्यानें खैच केली आहे. अलीकडे पर्जन्य नेहमीं नाहीं.

—हो. इ. सा. प. खंड १२ पृ. १३८

खैरखाही—हितचिन्तक, हितचिंतन, सदिच्छा.

—राजवाडे ८ पृ. ६

खैर खुशी—क्षेम कुशल.

खैरखैरात—दानधर्म.
खैर खैरात केली.
--म. द. बा. १ पृ. २०१
खैरत—चांगली गोष्ट, भलाई.
एक जरा तस्वीस दिलिया खैरत नाहीं
—राजवाडे १५ पृ. १३७
जे गोष्ट करावी ते पातशहाचे दौलतखाहीसाठीं करावी त्यांतच तुमची आमची सर्वांची खैरत असे.
--राजवाडे ६ पृ. ६१८
खैरशादमानी—खुशाली.
येथील खैरआफीयत जाणून आपली खैरशादमानी हमेशा कलमी करावी.
—राजवाडे २२ पृ. ८६
खैरसला—खुशाली.
येथील खैरसला जाणोन तुम्ही आपली खैरसला हरवक्त लिहीत जाणें.
—राजवाडे खंड १५ पृ. २५०
खैराती—निकृष्ट; केवळ शोभेचे.
तोफांचें सामान चांगलें असावें. खैराती सामान मात्र नसावें.
—ऐ. ले. सं. १६०९
खैरीयत—खुशाली. हित.
त्याचे लेकीचे खैरीयतीचें वर्तमान पुशिलें आहे.
--राजवाडे १ पृ. १८१
इंग्रेजांचा कदम पातशाही मुलखांत बहुत नादुरुस्त व त्यांची तम्बी होऊन खारीज करावे यांतच खैरीयत.
--राजवाडे १२ पृ. २२
खोक--हुंडीचे पैसे दिले व ती रद्द झाली म्हणजे तिला खोक म्हणतात.
—सु. का. ८९
खोकला—भांडण.
लग्नामध्यें कांहीं खटखट खोकला जाला नाहीं. बहुत समाधाने करून उभय पक्षी समारंभानें लग्नकार्य सिद्धीस गेलें.
—नाग. २ पृ. १३८
खोका—एखादी हुंडी पटविल्यानंतर ती पटविल्याविषयीं व्हाउचरदाखल ती पटविणाऱ्याजवळ राहावयाची असते ती हुंडीबरोबर असणारी चिट्टी.
हुंडी करून सत्वर पाठविणें तुम्ही तेथील सावकारास खोक्याविषयीं ताकीद करीत नाहींत.
—पे. द. भाग २१ पत्र नं. १७३
खोचणें—मनास लागणें, वाईट वाटणें.
रावसाहेब (नारायणराव) तर पारच जाले (मेले) असी बातमी
ऐ. श. १९

आली तेव्हां सखाराम बापू आपले चित्तांत खोचले की धरण्याचा मनसुबा होता, आणि लागलेच मारले, हें कांहीं चांगलें नाहीं.

—स. ब. पृ. ३७

खोची—फांसूं. आखातवजा समुद्राचा जमिनींत घुसलेला छोटा फाटा.

लहान होडकी सातआठ होतीं ते खोचीतच पश्चिमेच्या आहेत.

—पे. द. १६ पृ. ५०

खोज—शोध.

घाटमाथा, बैल कंठाळ व राहुटीसुद्धां (चोरीला) गेला. येत्न फार केला, परंतु कोठें खोज न लागला. —पे. दे. ४० पृ. ५४

खोजगिरी—शोध.

मसाल्याचे राऊत ५ असामी यांनीं कमरखुलाई म्हणून घेतले–१२ रु. पैकीं १० रु. कमरखुलाई व २ रु. खोजगिरी.

—ऐ. ले. सं २८६८

खोजगिरी—क्षुद्र भाषा, दुरुत्तर, दूषण. —रा व्य. कौ.

खोटे वयांत येणें—साध्य होणें, सफल होणें. (?)

परशराम रामचंद्र याच्या महालास उपद्रव व्हावा असें बोलण्यांत आहे परंतु परशराम रामचंद्र हस्तगत जाहले. मसलत खोटे वयांत आली. याजकरितां आतां त्याच्या महालास कोणीविषयीं उपद्रव होऊं नये.

—को. प्रां. इ. १९९

खोड—बंड, दंगा.

दुर्जनसिंग, जवारकर रामनगरकर यासी मिळोन, उत्तेजन देऊन कोलीयाचें खोड केलें, असें सर्व प्रकारें आहे, म्हणून ऐकतों.

—पे. द. ४० पृ. १४६

खोंडा—(१) दोन डोंगरांमधील संधीप्रदेश. याला कोपरा असतो.

(२) घळ, दरी, आडवळणाची जागा.

नवाब कूच करून निघाले ते मडकशिऱ्याचे पश्चिमेस किलेयाजवळोन कोशाचे दुफासलेयावर आले. तेथें पहाडांचा खोंडा आहे. तेथें फौज उभी केली.

—पे. द. २५ पृ. ७४

खोन—नजराण्याची वस्तु ज्या सुपलींत किंवा टोपलीत ठेवावयाची तिला खोन म्हणत.

(१) दिवाणजीकडून खोन व सरपोश आणऊन वस्त्रें त्यामध्यें ठेऊन बाजेवाले त्यामधी ताफे नाच करवीत, वस्त्रें कपितानाकडे घेऊन गेलो.

—E. M. P. पृ. ९७

(२) नंतर तात्यांनी त्याजला पांच खोन वस्त्रें व कंठी एक, सीरपेंच एक व जीगा दिल्हा. —ऐ. सं. सा. खं. ३ पृ. १४

(३) सुभेदारासहि तीन खोन मिठाई पाठविली.

—पे. द. २८ पृ. ६१

(४) इंग्रजांस उद्यां मेजवानी होणार. त्यास वस्त्रें ठेवावयास खोनें पाहिजेत. याजकरितां ५–४ असतील तीं पाठवून द्यावीं.

—ऐ. ले. सं. ४३४३

खोपडी—डोक्याची कवटी.

भुजंगराऊ घोरपडे मुराररराऊ यांचे बंधु १७–१८ वर्षाची उमर होती. फार दाटी जाली तेव्हां लोक कचेपके होऊ लागले. तेव्हां बेजरब घोडा चालविला. लोकांस सिव्यागाली करून जुंज सांवरिले. इतकियांत आकस्मात् गोला येऊन खोपडीच उडून गेली. भुजंगराऊ मृत्ये पावले.

पे. द. २८ पृ. १३२

खोबळा—मूठ अडकविण्याचा पट्ट्याचा भाग.

अगोदर दोन वार पट्ट्यावरी तटले. खोबळा पट्ट्याचा तुटला आहे.

—ऐ. ले. सं. ४७३१

खोय्—घाम. —रा. व्य. को.

खोरणें—तुंबणें, थकणें.

अंमळनेरचा पैसा जाधव देत नाहींत. भावसिंग टोके याजकडील दोन हजार रुपये तो ते देतच नाहींत. यैसा यैवज चोहीकडील खोरला आहे.

—पे. द. १७ पृ. २२

खोरनिशा—पक्की हमी.

जे करारमदार ठरला आहे तेणेंप्रमाणें खोरनिशा करून देणें; नाहक बखेडा न करणें. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १५७

खोरी—कष्टी, नुकसानी पावलेले.

आजी आपण मुलुख लुटिला तरी उद्यां आपणच खोरी व्हावे! उलट त्या मुलुखांत पिकाचे पूर्वी जाऊन बसलो तरी दाणागला खंडणी घ्यावयासी कार्यास येईल. —पे. द. ३४ पृ. १५७

खोल—खड्डा; विहीर.

कमरभर खडक फोडुन गंगातीर्थांत खोल करावी.

—पे. द. ४० पृ. १२९

खौप—भीति, संशय.

येक खौप मात्र वाटतो की याचे नाखुषीत गिरफ्तार बाला न व्हावें.

—पुणें अखबार भाग १ पृ. १०९

ख्यांती—त्रागा; ग्लानी.

सेनाधुरंधरांनीं व्यथेमुळे जिवास बहुत ख्यांती केली.

—नाग. २ पृ, ११२

ख्यानत—ख्यालत, खियालत, ख्याल, फंद. फितुरी.

यैसी ख्यानत नारो तुकयानें केली हे तमाम आलम जाणते. तुमचे कोनी त्याजबरोबरी नवूते. तुम्हापासून कांहीं पातशाही कामांत हरकती व ख्यानत जाली नाहीं.

—पे. द. ३१ पृ. २७

ख्याल; खियाल—विचार.

तार्‍हाल (तारांवळ?) हा ख्याल दिलात न आणिला.

—खरे ७ पृ. ३५७५.

दर्बारिचे जाबसाल तटून राहतात आणि त्यांचे तगादेहीं लागत असतांना जाब मिळत नाहीं; याचा खियाल इतर दौलतदार काय करितील तो करोत.

—राजवाडे ७ खलप २ पृ. ७१.

ख्याल—खोडी.

सबब त्याची साक्ष, त्याचा गरूर देतो. ख्याल न करावा तो करूं लागला याचा उलटा होत आहे. हाच ईश्वराचे घरीं कनवा.

—ऐ. ले. सं. ४३५६

ख्याल करणें—खोडी काढणें, हल्ला करणें.

घांटाखालीं मकान एक पलकाचेरी राहिली. ती जागा कुबल उमदी आहे. तेथील इरादा बादपट्टण (पट्टण घेतल्यावर) करूं. आतांच वर्तमान आलें कीं, पट्टणांत कांहीं फितूर होऊन गलबल पडली, हे बातमी खरी आहे. तरी लागलेंच पट्टणावरी ख्याल करितों, येणेंप्रमाणें मेडोसचें पत्र आलें.

—ऐ. ले. सं. ४३५३

ख्वार—१ खराब, हलाख. २ नुकसानी.

भोरपकर सरसगडामुलें ख्वार जाहलो म्हणतात, हेंच अपूर्व.

—पे. द. ३३ पृ. ३८४

लोक यांचा फार ख्वार जाहला.

—इ. सं. जोधपूर रा. पृ. ४५

ख्वाहीश, ख्वाहिषी—इच्छा, मागणें.

ख्वाहिशी दरखास्तीप्रमाणें.

—रा. खं. १० पृ. २५६

ग

गई--गई गुदर, दिरंगाई; अनास्था, गय.
राजश्री कोन्हेरपंत मजमदार यासी सांगोन शिवाजी शिंदे व साहेबखान-सातारा आहेत, त्यांसी जोर पोहोचाऊन पैका त्याजकडून घेतला पाहिजे ये विषयी गई न करणें. —वै. ४ स. १७४२ पृ. १८

गई-गुदर—वेळ मारून नेणें, अळंटळं, दिरंगाई.
वजीर पैका द्यावयाची गई-गुदर करतात.
—राजवाडे ६ पृ. ६३२

गईब, गयब, गैब--अदृश्य, मृत.
राजा गईब झाला असें जाऊन सांगतांच —सभासद ४२

गईबत--(१) ईर्षा (२) पराक्रम
गनीम हांवभर आहे. तो बेधडक येखादे जागा तोंड टाकील तेथें मारून खर्च व्हावें गईबत करून खरडून काढावें तेव्हांच हालखुद राहील.
—पे. द. १६. पृ. ५६

गगनगड--उर्फ बावडा.

गंगाजळी--शपथक्रिया. हातावर गंगोदक घेऊन शपथ घेणें.
बाजीराव साहेबांची आणि राजश्री नानांची गंगाजळी फाल्गुन शु. २ स जाहली. —ऐ. ले. सं. ४८७५

गच्च--चुना, चुनेगच्ची. ठासून भरलेला; रिकामी जागा न राहील असा भरलेला.
स्वल्पमात्र दरज असेल तरी गच्च लावून पाझर न फुटे असें करावें. तळघरांत गच्च करावा. —म. रा. आ. ३४

गच्च किंवा गच्ची—आवळून एकत्र उभा असलेला जमाव.
मार्गशीर्ष शु।। १ स आम्ही जागा पाहून तोफा सुरूं मोंगलाच्या गच्चीवर फौजेच्या केल्या. —पे. द. भाग १ पत्र नं. १

गच्ची—गच्च; एकत्र आंवळून उभा केलेला शिपायांचा जमाव.
आमच्या तोफा लागू होतांच गच्चीमध्यें गोळे पडूं लागतां शत्रू घाबरा झाला. —ऐ. ले. सं. १७७६

गच्ची—चुन्याची जमीन, चुनेगच्ची धाबें; आगाशी.

गच्छ करून जाणें—गच्छ संपादणें, पळून जाणें.
(१) शिंदे यांनी इंग्रजांची फौज मारून ताराज केली हजार बाराशें

मानूस राहिले; ते दोन ठिकाणीं कोंडिले आहे. वरकड गोहदकर व भदावरकर वगैरे व त्यांचे लोक गच्छ करून गेले.

—राजवाडे खंड १२ पृ. १९

ठेविला बंदोबस्तीमें नेउन साष्टिस ।
एक वर्ष लोटल्यानंतर या गोष्टिस ।
केले गच्छ भाद्रपद वद्यांतिल पष्ठिस ।

—प्रभाकर शाहीर दु. बाजीचा पोवाडा

(२) परजन्याचे दिवस म्हणोन गच्छ संपादिल्याचा भावार्थ लिहिला तो कळला. —पे. द. ३३ पृ. ३८२

गच्छ करणें—पलायन करणें.

(१) बाबूराव त्रिमल श्रीमंतगडचें ठाणें सोडून पळाला, तसेंच वाले हसूरकरहि पळाले. येळवंतीचे लोक पहिलेच गच्छ केलें होतें.

—ऐ. ले. सं. ३१४२

(२) येक तर नुसता ब्राम्हण आहे व दुसरा कांही काल (काळ-यमधर्म) नाहीं ! तुम्ही किमपी यांसी न दबावे व सलुखाचें भाषण न करावें. तुम्ही पै दर पै आले पाहिजे. तुमच्या आवाईनेच हे गच्छच करतात. —हिंगणें द. भाग २ पृ. १०१

(३) दहा–वीस हजार फौज आली, अशी आवई गेली म्हणजे गच्छ करतील! —ऐ. ले. सं. ४१४

गज—१ चोवीस तसू लांबीचें एक परिमाण २ बंदुकींत दारू ठासण्याची कांब ३ कांब ४ प्रमाण ५ सामर्थ्य.

त्यास तट गजाप्रमाणें नेमून द्यावें. —चित्रगुप्त ३५

गज—(?)

श्रीमंतांचा गजाचा बाजार थोडासा लुटला. सारें लष्कर लुटलें जावें, परंतु दिवस होता, म्हणून राहिलें. —ऐ. ले. सं. १२०५

गंज—एकत्र आणलेला जमाव.

सरकारच्या तोफा येऊन पोंचल्या. शत्रूचा गंज होता तेथें लागू झाल्या.

—ऐ. ले. सं. १७८१

गजढाल—गजढाळ, जहांबाज, कारस्थानी.

त्यावरून ताराऊ आईसाहेब बोलली कीं मी बायको गजढाल असे लोक म्हणतात. त्यास मूल वारल्याचा बहाणा करण्यास पारसनीस, वाकनीस, व काकासाहेब भोसले जितीकर व भवानीबाई यांच्या विचारे करावे असें ठरलें. —भा. व. अमा. बाव. यां. कै. पृ. १८

गजतजरीज– गजाच्या मापानें.
जमिनीची गजतजरीज लांबी पूर्वीपश्चिम गज इमारतीसिवाय पाये दिवाल गज ४२ —पेठे दप्तर भाग २ पृ. १

गजब—गहजब, अत्याचार, जुलूम.
यानंतर आपणास श्रीमंत रघोजीबावा याहीं आपणावर गजब करून घरांतून चीजवस्त तटु सारे व चि. हैबतरावजी नेऊन अलजपूर येथें पठाण यांचे बंदीं घातले. —पे. द.

गजब, गहजब—कहर, अनर्थ, जुलूम, हद्द, कमाल.
पर्वदिगार, मोठा गजब जहाला. —चित्रगुप्त ४५

गजबजणें—घाबरणें, डावाडोल होणें.
तोफा आलियावर हेहि मोर्चे पुढें चालतील. किल्लाही गजबजिला आहे. —पे. द. ३३ पृ. ३२९

गजबाक—अंकुश.

गजर—गहजब, जुलमाचा कहर.
तिघासही वाड्यांतून काढून मार्गावरील वाघवळावीर आहे तेथें आणून तुलबाजी, राऊ याहून लहान होता तो व पुतळाई आवा, ऐसी दोघे मारली. त्या दोघावरी गजर जाली तेव्हां बाब्रजीराऊ पळाले ते रान उढियाचें होते व गाठीयाचे गवत दाट होतें. त्यामध्यें जाऊन दडाले. —राज १ पृ. ९

गंजपयाचा आराबा—तोफखाना.
रजपुतांपुढें गंजपयाच्या आराबा व नाला नसता, तरी त्यास मारून गर्दीस मेळविलें असतें. —ब्र. च. पृ. ४४

गंजिफा—पत्यासारखा एक जुना बैठा खेळ.
९६ पत्ते किंवा गंजिफा आठ भिडूंत वांटून हा खेळ खेळला जातो.
उपरांतिक गंजिफा तीनचार घटका खेळून आराम केला. —पुणें अखबार भाग ३ पृ. १०६

गंजीकोट—रुपयाचा एक प्रकार.
रुपये मातुश्रीबाईच्या स्वाधीन केले त्यांत चांदवडशिका (रुपयांचा एक प्रकार) वगैरे सेपन्नास रुपये निघाले ते नित्यखर्चाचे यैवजीं घालून दुसरे रुपये त्यांत घालून यैवज ठेविला. आपल्या रुपयायैवजीं गंजीकोट वगैरे पांच चार रु।। जे निघतील ते लग्नाचे गडबडींत मोबदला करून चांगला यैवज करून ठेवावा ! —चं. चू. द. पृ. १३८

गंजीफाच्या गाड्या—दारूचे गोळे भरलेला खटारा जो तोफेबरोबर असतो तो.
१ सतरा तोफा व जिलिबी व गंजीफाच्या गाड्या पांच, शिवाय जंबूर व

बाण लोकाकडे फार आली. —ऐ. सं. सा. खं. ३ पृ २१८

२ दोन तोफा व गंजीफाच्या गाड्या तीन व रहकले गाड्या चार, येणें-प्रमाणें घेऊन त्यास मोडोन माघारी घातले.

—पे. द. भाग २७ पत्र नं. ११७

३ लढाईत तोफा पंचवीस सत्तावीस व गंजीफांच्या गाड्या पांच सात पाडाव आल्या. —ग. शि. यां. का. पृ. ८३०

गंजीफा नळ्या—तोफांच्या नळ्या. म्ह. तोफाच.

अवतरणासाठीं होका शब्द पहा. —पे. द.

गंजूर—खजिन्यानें युक्त अशी जागा, वखार

गट्टण—गट्टी; गांठ.

आपले व आमचे स्नेहाची प्रेममयतेची गट्टण आहे ही सर्वांस वाईट आहे!

—नाग १ पृ. ३२

गटीची चिट्टी—(?)

आम्ही चिठी लिहून पाठविली जे आम्हांस देवदर्शनास जायाची तरी परवानगी देवावी, आनि आम्ही येथे येऊन पोहोंचलों ते वर्तमान श्रीमंतांस पाठवावें. येक जोडीची गटीची चिठी देवावी, परंतु कांहीं जावसाल करीनात. —पे. द. ४० पृ. १०७

गट्ठा—शिरओझे (?)

अवतरणासाठीं वतदारी शब्द पाहा. —को. प्रा. पृ. ५५

गठडी—गुंज, जमाव.

पठाण हा मार्ग पाहतात जे (कीं) यांची गठडी जे आहे हे फुटली म्हणजे नीट वजीर अजमास पाहावे! हिंगणें द. भाग २ पृ. ९

गठून येणें—जुळून येणें; एकत्र होऊन येणें.

येसाजी शिंदे यांनीं ४००० फौज व २ हत्ती ऐसें गठूनच आले. व पंताचे फौजेवर येऊन टकरलें. —ऐ. ले. सं. २५७५

गड्डा—उंच कोरडी खडकाळ जागा.

वेदगंगा दुधगंगा या दोन्ही नद्यांचे मध्यें गड्डा आहे तेथें उतरावयाची आज्ञा जाली. —ऐ. ले. सं. ६०३२

गड्यानें गडी साधणें—आधी एक, नंतर त्याच्या साहाय्यानें दुसरा, अशी साखळी बांधणें. सुताला सूत जोडणें.

परंतु त्याचे विचार वेगळे आहेत. ते कांहीं कागदीपत्रीं लिहितां येत नाहींत. गड्यानें गडी साधून कर्नाटक आपलें करावें. समय हाच आहे.

—पे. द. भाग २८ पत्र नं. ८४

गड—लोखंडी त्रिशूळ. हत्तीकडील 'भोई' नामक कामगार वापरतो तो. (गडेकरी हा शब्द यावरूनच आलेला आहे कीं काय न कळे)

गडकी—गडकरी, गडावरील लोक.
गडकी गलादाणा गडावर नेतात. आमच्या व राजश्री गोविंदराव याच्या घरावर दगडी लवंडितात. (परंतु) आम्ही कजियाची गोष्टी करीत नाहीं. --ऐ. सं. सा. खंड ७ पृ. १८

गडखोला—घोड्याच्या गळ्यातील दोरीचे वळे.
—रा. व्य. को.

गडजाती--किल्लेकोट; गडजात; किल्लेजात. विविध किल्ले.
सेनाधुरंधर प्रांतांतील गडजाती पाहून हुताशनी करावयासी नागपुरास येतील. —नाग १ पृ. २०८

गडद--काळोख किंवा अंधार.
शत्रूनें चरावर सूल रोविले होते. ते गडदांत आम्हाकडील लोकास रुतले, ते शस्त्राच्या जखमेपेक्षां कारेगार आहेत.
--पे. द. ३३ पृ. १०१

गडद—अंबार, पेव किंवा साठ्याचे ठिकाण.
कडबा गवत नेऊन शिवनेरीच्या गडदांत सांठवितो.
--पे. द. १० पृ. ३५

गडदु—न सहन होण्याजोगें ओझें.
साल मजकुरीं नवीन सरंजाम सरकारांतून घेतला. त्याजप्रमाणें चौथाई सरंजाम सरकारांत परत द्यावा या प्रमाणें दारमदार झाला. असा तूर्त वरकड सरदारांवर गडदु चढविला. —ऐ. ले. सं. ६१९

गडनीस---किल्ल्यावरील जमाखर्ची हिशेब ठेवणारा कारकून.
--(विलसन)

गडबेडी--अंदू प्रमाणेंच एक प्रकारची बेडी.

गडवीपण—गडकरीपणाचा कारभार. —पे. द.

गडवीपणा--गडावरील कामकारभाराचे ज्ञान असणें.
यास्तव तुकोजी साळोंकी यासी आपणाकडे पाठविले आहेत. गडवीपणाच्या कारभारास योग्य आहेत. आमचेहि आप्तविषयीं आहेत आणि गडवाई केले मनुष्य आहे. तरी यासी किल्ले वज्रगडावरी चढावयाची आज्ञा जावी. —पे. द. १७ पृ. १२१

गडीवान--गढेवान; हत्तीची चाकरी करणारा नोकर.
धुरंधरांनीं निद्रा केली तों हातीकडून गढीवान धावत आला. त्याणें

सांगितलें जें पांचसात हत्ती सुरापुरवाल्यानें वळून नेले.

—नाग २ पृ. १४९

गडेकरी—हत्तीची चाकरी करणारा गडी.

सावंता नीळकंठ याजकडील गडेकरी महार सुरापूरवाल्याकडील हत्तीवर आहे, त्यास शिवाशिव जाली, म्हणोन चौकीवर बसविला आहे. बांधोन ठेविला आहे. कानडा गैरमाहित. क्षमा करावी.

—ऐ. ले. सं. ३७५४

गडे मह बान—(?)

भूस दर गोणीस रुके

८३ जकाती

८३ गडे महाबान

८६

—शि. च. सा. खंड ५ पृ. १५९.

गणक—ज्योतिषी.

फडके यांचे निघण्याच्या मुहूर्ताचा निश्चय कारभारी यांचे वाड्यांत गणकास बोलावून आणून होत आहे. —ऐ. ले. सं. ४७१६

गणत—गणित; गणती; मोजदाद.

रास्ते, घायगुडे, इचलकरंजीकर येणेंप्रमाणें गणताची सोळा हजार पुढें फौज आली आहे. —ऐ. ले. सं २१५७

गणती—मोजणी, गणना.

पागेपथकदारांनीं कराराप्रमाणें घोडीं माणसें हजर केलीं आहेत कीं नाहीं याची सरकारतर्फें माणसें पाठवून समक्ष शहानिशा करीत त्याला गणती म्हणत. या गणतीचे गोटगणती व खडेगणती असे दोन प्रकार असत.

सध्या गणत्या घ्यावयाची फार चौकशी झाली ती पत्रीं कोठवर लिहावी? परवां तमाम गोटगणत्या घेतल्या

—ऐ. ले. सं. ११६०

गणनीय—नामांकित मानकरी किंवा इरेचे एकांडे.

तेव्हा राठोडाचे फौजेंत गणनीय माणसें होतीं, त्यांस वीरश्री पडून आठशें आसामी रजपूत, याणीं केशऱ्या करून मरणोन्मुख जाहले.

—हो. कै. पृ. १०५

गणवी—(?)

गणवीच्या कदीम वाड्या चालत असतील त्या प्रमाणे चालवांव्या

—पे. द.

गणी--१ वाटणी २ गणति.

उरला ऐवज दामाशाही गणीप्रमाणें घ्यावा. मोकासी कोणी न म्हणावा. सारे जमेचा तह येणे प्रमाणें करावा.

—धा. प. इ. सा. ३ पृ. १२

गत्य—गत, अवस्था.

त्यास वारंवार पत्र दस्तऐवजीं लिहिणेंही ठीक नाही. गोमाजीपंताची गत्य व्हावयाची. —ऐ. सं. सा. खंड ११ पृ. १३

गतका--सोटा. उदाहरणार्थ फरीगतगा.

फरी--ढाल, फळी; गदगा किंवा गतका म्हणजे काठी.

गदर—बंड, दंगा, हल्ला, तुफान, विश्वासघात, वैर.

१ मुकासियाने वांदजीस दस्त केला कीं, आमचे हक्कामधे पैके सिस्त करून घेवया काये निसबत म्हणौउनु वादजीवरी गदर करून गर्दन मारीत होते. —शि. च. सा. खंड ५ पृष्ठ १६४

२ महादजी पाटिलावरी आपण चालोन गदर केली.

—राजवाडे १५ पृ. ३३

गदरी—दंगा, तुफान, खोटा आरोप.

येके दिवशीं बुधबळ खेळत असता वाडीयांत रायेराऊ याचा माहालदार येऊन हातीं धरीला. त्यावरी गदरी करून बापुजीपंत भट म्हणून हातीचा घेऊन चाकराचें रूप त्यास देऊन व त्याचे बाईलेस बटकीचें रूप देऊन रातोरात रोहीडीयास पाठविले. —पुरं. द. भा. ३ पृ. १४०

गदल—गोंधळ; गर्दी.

अष्टवर्गांच्या गदलांत माझी निभावणी होत नाहीं.

—ऐ. ले. सं. ४६४५

गदा—भिकारी.

गदेला—हत्तीच्या मानेवर घातलेली उशी-बसणारास खालचा दोर रुपं नयें म्हणून.

गन्तव्य--पलायन.

१ स्वामींनी पत्री आज्ञा केली कीं, हावजी सेडगर किल्लेदार करून पाठविले आहेत. यैसीयासी हावजी सेडगराने गन्तव्य केलें.

—पे. द. ३३ पृ. १३६

२ नाईकास तो अवकाश नाहीं. प्रातःकालीं उठोन गंतव्य केलें पाहिजें. विलंब जालीयावर नवाब परामर्षास येतील ही अडचण पडली.

—पे. द. २५ पृ. ७३

गंतुकाम—मृत, मरणोन्मुख.
भाऊसाहेबानी हत्ती बसविला आणि धावत आले (तों) विश्वासराव गोळीचे जखमेनें कार्य होऊन गंतुकाम. --हो. कै. पृ. ३१

गंदकी—घाण.
एकदां मागील गंदकी वारून ट.कून पुढें ठीक करून घेणें आहे.
—राजवाडे ३ पृ. १४१

गंधक उटी--गंधकाचे खडे.
८ गंधक उटीया ८१ दरमणी रुपये. --पे. द. १२ पृ. ८६

गनिमाई—मराठ्यांचा गनिमी कावा.
आतां आम्ही गनिमाई करोन फिरों लागलों. त्यापक्षीं श्रीकृपेनें एकादे दिवशीं शत्रूची गांठ पडेल. —ऐ. ले. सं. २८७६

गनीम—शत्रु.
याउपरी दक्षिणप्रांतेस तोहमास कुलीखान स्वार होणार आहेत. याजउपरी त्यास आणखी कोणी गनीम आहे असें नाहीं. आम्ही त्यास व तो आम्हांस गनीम आहोंत. अशास जों ते तेथून निघाले नाहींत तों तमाम मराठ्या फौजा एक होऊन चमेलीपार व्हावें, त्यास अलीकडे येऊं न द्यावें असा विचार आहे. —ब्र. च. ६७

गनीम—मराठे लोक. मुसलमान लोक मराठ्यांस गनीम म्हणतच; पण मराठेही स्वतःस गनीम म्हणत.
१ रुस्तुमखान सातारेखाली वेढा घालून बैसले होते. त्यावरी गनीम संताजी घोरपडा व धनाजी जाधव यांनी स्वारी करून खान अजमाचे फौज कुल (सर्व) बुडविली त्यावरी गनीम वाईस गेले. वाईचा किल्ला पाडून टाकिले. —भा. इ. सं. त्रै. व. ८ अं. ३ पृ. १५६
२ त्यावर वर्षा दो वर्षा हबशियामध्यें व गनिमामध्यें कलह प्राप्त जाहला तेणेंकरून मुलुख खराबा जाला.
—ऐ. सं. सा. खं. ३ पृ. ११६

गनीमत—लूट.

गनीमाई—(१) मराठी फौजेचा कावा. (२) गनीमी कावा.
शत्रूचें सामान भारी आल्यास बुनगे एकीकडे लावून द्यावें आणि सडी फौज करून आज या ठाण्याजवळ, उद्यां दुसऱ्या ठाण्याजवळ, याप्रमाणें गनीमाई करावी. —ऐ. ले. सं. २७९६

गनूदन—डुलकी घेणें.

गपगिरी--वार्ता, माहिती, कुणफुण, आवाई, सुगावा.
तेव्हा साहेब बोलले, पेशवे सरकार म्हणतील कीं, आम्हीं भाऊस

समाचारास पाठविले होते व शास्त्रीबावाचा (गंगाधरशास्त्र्याच्या खुनाचा) प्रकार जाला याची गपगिरी गायकवाड सरकारास तशी आम्हासहि बहुत." त्यावर आम्ही बोललों, "भाऊ समाचारास आले अशानी समजूत नाहीं. जर पेशवे साहेबास गपगिरी असती तर तो प्रकारच भिन्न असता. या करतां अशा बोलण्यांनीं गायकवाड सरकारची समजूत होत नाहीं."
—शा. द. वे. पृ. १६६

गफलत—चूक.

गंबार—एक सोन्याचें नाणें, गभर.
—चित्र १२१

गबोला—गोंधळ (?)
नाही तर मागलेसारखे मागती डोकें धारेंत खुपसून गबोला मात्र करूं नये.
—धा. प. इ. सा. ३ पृ. २५४

गभर— गॅबरडीनचा अपभ्रंश (?) गॅबरडीन हा एक उंची कापडाचा प्रकार आहे.
कित्ता आंख
११०।≡ किनारी तोळे २३। एकूण.
१७ गोट थाने १७ एकूण.
२७८।≡ गभर गज ४५।।। ४ एकूण.
—इ. सं. पे. द. स. प. मा. पृ. १४३

गभर—एक तोफेचा प्रकार.

गम्गीनी—दुःख, शोक.
हें ऐकून दिलास बहुत गम्गीनी व खफगी जाली.
—का. सं. प. या. पृ. ४६७

गमखोरी, गामखोरी—गुन्हा, गुन्हेगारी.
तथापि इकडून गामखोरी कोणे प्रकारी जाहाली आहे हें तुम्हास ठावकेच आहे.
—पे. द. २५ पृ. ४

गमी—शोक, दुःख, दुखवटा.
गमी करून कोणाशीं न बोलतां दाखल जाले.
—राजवाडे ७ पृ. १४२
शोर साहेबास गमीची खबर आली आहे. —पे. द. म. व. ११५
वस्त्रें गमीचीं. —राजवाडे ७ खलप ११२
पंचमीस दत्तक घेऊन षष्ठीस देहावसान जालेनंतर बडे साहेब समाचारास आले त्यांनींही बहुतच गमी मानिली. —हो. कै. पृ. १९४

गयफ--गैफ, गैब, गुप्त, अदृश्य, नष्ट.
चाकण चौऱ्यांशी परगण्यांत चासकमाण म्हणोन गांव आहे तेथें डोहांत जळक्रीडा करावयास गेले होते; त्या डोहांत गयफ जाहाले.
—म. द. रु. १ पृ. २

गयरत (गैरत)—१ लज्जा किंवा भीड, २ गैरवाका समजाविणें.
शत्रूंनीं श्रीमंत नानासाहेबाजवळ गैरती घातल्या आहेत कीं बापू मवास जाले. दर्शनास येणार नाहींत. त्यावरून श्रीमंत दादासाहेबांस वरचेवर पत्रें येतात कीं बापूस दर्शनास घेऊन येणें.
—हिं. द. खंड १ पृष्ठ ११३

गयाल--नालायक, भिकार.
आम्ही गयाल आसामी निवडून काढिल्या त्याहि करार कराव्या यैसे मनस्वी भाषण करूं लागले. —पे. द. २८ पृ. ३११

गर्क, गरक--निमग्न; मृत.
ज्या ठिकाणीं भाऊसाहेब गेले आणि गर्क जहाले तें ठिकाण आपण दृष्टीनें पाहूं नये. —पा. ब. ४७
राजश्री कोन्हेरराव फौजेंत गरक जाहले.
—खरे ६ पृ. २७९४

गर्गशा—भांडण, वाद, कथला, कर्कशा, तंटा, गोंधळ.
१ पुरंधरे व अत्रे यांस सासवडच्या कुलकर्णाचा गर्गशा लागला आहे.
—पुरंदरे दप्तर भाग १ पृ. ५
२. प्रस्तुत किल्लेदाराचा आपला गर्गशा होऊन स्थलास आपण वेढा घातला आहे. --पे. द. ३० पृ. ३६
३ शिंद्याकडील कारभाऱ्यांचें बोलणें पडतें, 'लेखकांणीं कारभारांत येऊं नये,' असा गर्गशा पडल्यामुळें कूच होत नाहीं.
—ऐ. ले. सं. ४९३०

गर्जी—शौकी.
माझ्या घरच्यांची कठीण मर्जी हो। याला नुमजे हा बायकांचा गर्जी हो ॥
—रामजोशी ४१

गर्द—नाश.
गर्द होणेंत बाकी राहिली नाहीं. ईश्वरें मोठा गहजब केला.
—ऐ. ले. सं. ६०८६

गर्द—१ धूळ, दाट (छाया), २ धूलीभूत, नष्ट.
मनांत उगीच संशयाची गर्द आली असेल ती काढून टाकिली म्हणजे साफ. कांहींच खत्रा रहात नाहीं. ---राजवाडे ५ पृ. १६६

टिपूचें संस्थान गर्द झालें हें सरकारचे दौलतीस चांगलें नाहीं.
—खरे ११ पृ. ६०५६

खासे विश्वासरावसाहेब अगदीच गर्दीत गर्द होऊन गेले.
—पा. ब. ४०

झाडून बुणगेसुद्धा दौलत गर्द झाली. —खरे ११ पृ. ६०८६

रोहिल्यांची फौज मारून गर्द केली. —राजवाडे १४ पृ. ११

गर्दीस मेळविणें—नाश करणें. —सभासद ९

गर्दन—मान.

गर्दन मारणें—ठार करणें.

गर्दनबाजी—तळहातावर शिर घेऊन लढणें.

गर्दपोस—पलंगपोस,

गर्दपोस काढून करूं द्या नीट तकिये पलंगावरले.
—होनाजी बाळ ९५

गर्दनी—हैदराबादच्या नबाबाच्या 'जफर पलटण' नामक स्त्री-सैन्यांतील शिपाई. मूळ 'गार्ड' शब्दाचा अपभ्रंश 'गारदी', आणि त्याचें स्त्रीलिंग 'गर्दनी'.

गर्दीद—१ झालें. २ घडून येणें, फिरणें.

रोशन गर्दीदके—श्रुत झाले कीं. —राजवाडे १५ पृ. ३६४

गर्दिश—राज्यक्रांति.

गर्दीसी—आपत्ति, दंगा, क्रांति.

नवाब बहादुरासी आम्हासी फारसी उमेद असतां त्याहीं जमान्याचे गर्दिसीनें (आपत्कालामुळें) दुसरेकडे चित्तापासून येखलास केला. यास्तव त्यास पत्र पाठविलें आहे. —हिं. द. खंड १ पृष्ठ ५८

गर्दून-असास—आकाशाएवढा वाडा असणारा.

गर्दस मेलविणें—नष्ट करणें.

कित्येक देशियात खंडणिया घेतील आणिखीही जमाव पोख्ता करून गनिमास गर्देस मेलवितील. —शि. च. सा. खं. पृ. १०१

गर्दोगर्दी—चोहींबाजूस, चौगिर्द.

गर्भछाट—तोफेच्या गोळ्याचा एक प्रकार. हा शब्द इंग्रजी 'ग्रेपशॉट' किंवा 'ग्रॅबशॉट' या शब्दाचा अपभ्रंश होऊन मराठींत आला.

१ जोर इंग्रजी थोर अंगावर तुटून हे पडले ।
नांगर सोडुन खासे जुझासाठि आडिस आले ।
भांडि पेटविता सांडि गर्भछाटाचे गोळे ।
—ऐ. पो. के. खं. २ पृ. २३८

२ तोफांची व गरनाळाची व गर्भछाट तोफा गुराबा समागमे होत्या त्याची मार दिल्ही. वीस पंचवीस दिवस किल्ला लढला.

—भा. २ पृ. ७६

गर्मरू—तप्त चेहरा असलेला, गोरामोरा.

गर्मिणा—उकाडा, तल्खी.

१ दोनी मंडप बुलंदीस कमी; याजमुळें गर्मिणा भारी; हजमा (गर्दी) भारी होता.

—खरे १० पृ. ५४४५

गर्मी—१ उष्णता, २ त्राण, ३ गुर्मी, ४ जरब, ५ उपदंश.

इकडील मोंगलाची गर्मी राहिलीच नाहीं.

—राजवाडे १ पृ. २६२

परंतु गाजुदीखानाची येण्याची गर्मी असती तर चित्तानरूप हेंही आम्हासी बोलते.

साने प. या. व. ३२५

गर्मी दाखवून जें मिळेल तें मेळवावें.

—साने प. या. व. ३२७

गर—?

प्रातःकाळी पठाणासी गाठ घालोन तोफा सुरू केल्या त्याजपासीही ३०।३५ तोफा होत्या परंतु गर थोडें याजमुळें इकडील फौजेचा जोरा होऊन पठाणाचा गल्हाटा जाला.

—धा. प. इ. सा. ३ पृ. १९६

गरक—१ गर्क २ नष्ट. ३ नाश ४ प्रलय.

कोन्हेरराव यांचें तों ठिकाण नाहीं. फौजेंत गरक जाहले.

—ऐ. ले. सं. २७९४

मोरोबादादा जवळ राहून मनसवा (कारस्थान नानांस धरावयाचें) करितात. येविशीं मीं नानांसही २–४ वेळ विनंती केली. मोरोबादादा लांब राहिले नाहींत. जवळच मारणार (दगेखोर लोक) आहेत! एकदांच गरक होईल!

—ऐ. ले. सं. २२०२

गरज—१ छाती; २ हिंमत, संधि.

नबाबाची फौज भारी. याखेरीज तोफखाना. तोहि कोणे प्रकारचा हें तुम्हीं जाणतच आहां. सभोंवता आराबा चालून तमाम फौजेनिशीं तोफखान्याचे पाठीं चालावें. (असा त्याचा बंदोबस्त). तर राऊत अगर पायींचें माणूस निघावया गरज नाहीं.

—ब्र. च. पृ. ५२

गरजगो—मतलबी, आपमतलबी, स्वार्थानें प्रेरित होऊन बोलणारा.

महमदअलीखान मोठा गरजगो. बोलतो येक करितो येक लिहितो येक, चित्त ठिकाणीं नाही. चंदीचा किल्ला फौज आलिया देईन म्हणतो.

—E.M.P. पृ. १३७

नबाबानें आम्हांकडे राजेश्री महाराव जानोजी जसवंत निंबालकर पाठविले. जाहीरा येखलासाची बायेस दाखवून कित्येक गरजगो लोकानें सांगितले तेंच चित्तांत आणून फौज व तोफखाना जमा करून राहिले.

—हिं. द. खंड १ पृष्ठ ५८

ऐसें असतां गरजगो लोकांनीं मनास येईल तसे नबाबास समजाविलें.

—राजवाडे ६ पृ. ३५७

गरजमतलबी—स्वार्थसाधू.

श्रीमंताशीं (पेशव्याशी) कागदीपत्री स्नेह राखिला म्हणजे जाले. आम्ही त्यांचे चाकर नाहीं. जे त्यांचे चाकर असतील त्यांनीं त्याचें भय मानावें. आम्हास दौलत शाहु महाराजांनीं दिली ती आम्ही करितों. आम्ही त्यांची मागत नाहीं आपली देत नाहीं. आमची ते मागूं लागतील तर आम्ही उत्तर चांगलें करून दाखवूं, याप्रमाणें वल्गना करितात, गरजमतलबी मोठ आहेत ईश्वरसत्तेकरून याजवर दाब ज्या दिवशीं नानासाहेबासारखा किंवा माधवरावसाहेबासारखा बसेल, त्यावेळेस यांच्या डोल्याचा धूर निघेल.

—नाग १ पृ. २०२

गरजेची—कामचलाऊ; कशीबशी, तकलुपी.

गडाची इमारत गरजेची करूं नये. —मरा. आ. ३२

गरद—धुरोळा.

गरद बहुत उठला. —राजवाडे १ पृ. ५४

गरम बाजारी—व्यापारतेजी, श्रीमंत होण्याची संधि साधणें.

मध्यस्थ लोकांनीं गरमबाजारी करून. —दि.म.रा. २ पृ. २८२

गरमी—ईर्षा; महत्त्वाकांक्षा.

नानास स्वस्थानीं बसवून दिल्लीस आपण कारभार केला तसा येथें श्रीमंतां-पाशीं आपण करावा ही शिंद्याची गरमी आहे.

--ऐ.ले.सं. ४७६०

गरवा किंवा गेरवा—पिकांवर पडणारा एक रोग.

गरागर्षा--गोंधळ, गर्गषा, कटकट.

दाभाडीकडील गरागर्षा पडला आहे. कालीही दोन खून जहाले. रोज उठोन कटकट होती. त्याची स्थित (पत, अब्रू) सातरियांत कांहीं राहीली नाहीं.

—पे. द. ३३ पृ. १७५

गराज, गराद, गरादा—Bar of iron or wood fixed in a grate window, railing or paling.

खिडकीच्या चौकटीस बसविलेली लोखंडी पट्टी किंवा लाकूड.

--पे. द.

गराटा—दरारा, दणका; बाण वेगानें जात असतां होणारा गुरुगुरीसारखा आवाज.

अशी गाफिली पाहून कांहीं बाजारावर व कांहीं खाशा डेऱ्यावर बाण (आगीचे बाण) टाकिले. त्या बाणांच्या गराट्याने 'मल्हार आया' या दहशतीनें पुरुषमात्रानें बायको सोडून दिल्लीचा रस्ता धरला.

—हो. कै. पृ. १९

गरादी:—चुना तयार करण्याची घाणी.

गरिबीहरिफी—नरम गरम वर्तन. अजीजी--कारवा

गरीबगुरबा, गरीबगुरीब—गरीब लोक.

भवानीदास साहुकार, यात्रे उद्देशे जाणार, समागमे गरीब गुरबेही चालतील. —राजवाडे ६ पृ. ५५३

गरीबगुरिबांचीं घरें बहुतेक वाहून गेलीं.

—राजवाडे ७ पृ. ७०

तें गरीबगुरिबाखेरीज वसूल करणें. —वाड बाबा २ पृ. ३१

गरीबगोर—गोरगरीब.

औरंगाबादेसभोवते चोर राऊतांनी उपद्रव फार मांडिला आहे. गरीबगोर मारिले जाते त्याची दादफिर्याद लागत नाहीं.

—पे. द. भाग २५ पत्र नं. १०६

गरीबदारी—गिरीफदारी; चिंता; काळजी, विपन्नावस्था.

सिंदे बहादुर यांस सर्व गोष्टींची तंगचाई होऊन फौज वगैरे लोक बहुत उठोन गेले. सरदारी बहुत गरीबदारींत आहे.

—ऐ. ले. सं. ८११३

होळकर याची जरब बहुत व फौज दोनतीन लाख बरोबर. याजकरितां इंग्रजांस विचार पडून बहुत गरीबदारींत आहेत.

—ऐ. ले. सं. ८११५

गरीबनवाज—दीनांचा कनवाळू व पोशिंदा.

गरीब पर्वर—गरीब नवाज.

गरुर—गर्व.

महादजी सिंद्यानी तोतियाचें पारपत्य केलें, व सखारामपंत व मोरो बाबूराव वगैरेस कैद केले याचा (सिंद्यास) गरुर बहुत जाहला.

—पुणें अखबार भाग ३ पृ. ६०

गल्लातळपट्टी—पट्टीचा एक प्रकार.

गलची—गळा.

अफरासाबखान एकटा डेऱ्यांत पाहून बारगीरानें झटपट करून गलची

धरून कटार स्कंधावर उभा चालवून वरून भार घालून दाबला तो स्तनापावेतों आला. कारगर झाला.

—म. शि. यां. का. पृ. ८८२

गलत—चूक, चुकीचा, खोटा, रद्द.

'चूक गलत' —राजवाडे १५ पृ. २६०

असद अलीखान यांनीं मीर आलम यास धरिलें म्हणून वर्तमान उठलें होतें परंतु तें गलत. —राजवाडे ५ पृ. १८३

पेंढारी यांची आवई उठली होती परंतु तें गलत वर्तमान.

—राजवाडे १० पृ. ३९९

सरदेशमुखीचा परवाना पहिले जाला होता तो गलत करून हल्ली नवा परवाना सिद्ध करविला. —इ. मं. १७४

गलत, गलंत—लेखांतील जो मजकूर रद्द करावयाचा किंवा गाळावयाचा असतो त्या मजकुराच्या सुरुवातीच्या शब्दानंतर किंवा अक्षरानंतर जी विशिष्ट खूण केली जाते, तिला गलंत किंवा गलत म्हणतात.

गलथन, गलतन—संततीशिवाय मरणारा.

—(विलसन)

गलथा—ओझें, सामान ठेवण्याची होल्डऑल सारखी पिशवी.

त्यांच्या कारकुनानीं बालकिसणाचे दोन गलथे घेतले आहेत ते देत नाहींत. —पे. द. ८ पृ. १९

गलद (किंवा) गलब—धामधूम, दंगा.

इंग्रजाचा मतलब जे, पंतप्रधान प्रस्तुत गलबात (गलदात) आहेत. या समई आपले कार्य साधावें. —E. M. P. पृ. २३३

गलप ठोकणें—(गॅलप या इंग्रजी शब्दाचा मराठी अपभ्रंश). १ धाऊन दौडत जाऊन हल्ला करणें. २ घेरून टाकणें.

दर मजल सावनुरास जाऊन फुरद्यावर छपा घालून गलप ठोकला तेव्हां लढाई होऊन फुरद्या शिकस्त जाहला. —म. द. रु. २ पृ. ५

गलफ—म्यान.

गलफ होणें—आवरण बसणें; घशांत जाणें; वर्चस्व होणें.

सारांश, चहूंकडे चहूं राज्यावर इंग्रजांचा गलफ जाला!

—ऐ. ले. सं. ७२९५

गलबत धड्यावर घेणें—पावसाळ्या आधीं गलबतें कांठावर ओढून तेल-पाणी देऊन आच्छादन घालून ठेवीत नारळी पौर्णिमेपर्यंत. त्यास धड्या-वर घेणें म्हणतात.

गुराब गलवतें धड्यावरी घेणें, इत्यादिक कार्यें पर्जन्याआलाकडेस (पर्जन्य पडावयाच्या आंत) समुद्रास तुफान जाहाले नाहीं तों अगोदर करावें.

—पे. द. ३३ पृ. ७

गलबा—स्वारी; गहजब; आक्रमण; संकट; गलबला; गोंधळ.

१ हल्लीं इकडील फौजा आपले जाग्यावर असतां हा गलबा इंग्रजांचा टिपूवर गुजरला, हें मनसब्यास विरुद्ध. तोंडानें बोलत नाहींत, परंतु इंग्रजांचे मगजांतील बोय येती कीं, 'तुम्हीं कुमकेस न आलां तरी काय गेलें? आम्हीं पट्टणसुद्धां घेतों! हें धूज (ईर्षा) आहे.

—ऐ. ले. सं. ४३५२

२ गलबा या रीतीच्या

—पे. द. भाग २९ पत्र नं. २०७

३ या उपर मुहूर्ताची वाट न पाहतां गंगाधरराव यासी डेरेदाखल करावें. तयारीची गलबा दाखविली म्हणजे येणेंकडून श्रीमंत संतोष मानितील.

—ऐ. ले. सं. १०८१

गलमुगीर—उद्धट, बेमुर्वत, आग्रही.

वरातदार गलमुगीर जाले तर बेमुलाहिजा बाहेर घालणें यामुळें कल वाढली तर कबूल करणें.

—पे. द. ३ पृ. ४९

गलसल—निरुपयोगी, नाकाम.

लोकांचा जमाव तेथें पावलियाउपरी तेथें फौज आहे त्यापैकीं गलसल सबर (निबरच्या उलट म्हणजे बळकट नव्हेत असे. निबरसबर असा वाक्प्रचार आहे) जे कोणी येतील त्यास निरोप देऊन खासे दोनसे स्वारानसी राहाणें.

—पे. द. ३३ पृ. १६६

गलहलफ—(?)

श्री चिंचवड यांचे इनाम परगणे सुपे विलायतीस आहे. गलहलफ करींतां जे लागते ते लगत, खडते ते खडत. अैसीयास जकीदी होत त्याचें पैके श्रीस पावावे. ते तुम्ही झाडा करून पाववीत नाही म्हणून कळले तरी साहेब तुम्हावरीं ये गोष्टीकारणें खिजतील.

— मा. स. प. मा. पृ. १३३

गलागोटा—गल्लागोटा; दाणागोटा.

तुम्ही कोणाच्या आधारें न बैसतां, गुरेंढोरें गलागोटा असेल तो घेऊन जाणें.

—पे. द. २६ पृ. १८५.

गला पडणें—गळ्यास मिठी मारून अडविणें.

आम्ही कागद दिल्हा नाहीं म्हणोन तुम्ही आपल्या गला पडोन आपणास पदरीं धरले.

—पे. द. ३१ पृ. १७३

गलीव—गनीम; शत्रु.

तुम्ही आमची जमीन वाहावी मुल्कात गलीव येईल तो आम्ही मारूं तुम्हासी फिकीर नाहीं.

—पा. क्ष. ज्ञा. इ. खं. १ पृ. २८

गलूला—गलोला, तोफेचा गोळा, गलोल.

गलेफ—अभ्रा, आच्छादन, आवरण.

मावळ्या लोकाजवळ तलवारा आहेत. त्याजमुळे मावळे आलेसे शौरत (आवई) हीईल.यास्तव तरवारेस गलेफ करून ज्या रीतीनें बरकंदाज येतात. त्याप्रकारें येत, शौरत येकंदर न होय ते करणें.

—पे. द. ३० पृ. १७२

गलोल—जमाव, भीड, सैन्य, समुदाय.

त्या वेळीं भाऊसाहेबाकडे कोणाच्याने पहावेनासे जाले. हा केवळ कलयुगी कर्ण जन्मला यांत संदेह नाहीं. सभोती फौज पन्नास हजारांचा गलोल घेऊन मध्यभागीं इराणीसमूर परम आवेशें उभे राहिले.

—पाणि. बख. पृ. ३९

गलोला—गोळा

गव्हाई—गव्हाराई (?) दंगा.

त्यावरी विलायती (मुलखांत किंवा प्रांतांत) गव्हाई जाहली त्याबरोबर आपणहि गेलों.

—शि. च. सा. खं. ५. पृ. २४२

गव्हार—दंगेखोर; लुटारू.

झाशीहून कूच करोन पुढें जावें तों बातमी आली कीं, १०–१२ कोसांवर गव्हार २–३ हजार जमा झाले आहेत, तेव्हां इंग्रजांनीं मार्गाचा बंदोबस्त करून दिला.

—ऐ. ले. सं. ३७८७

गव्हार—हरद्र, अंतरीचें गूज, अंतर्गत हेतु.

यानंतर रा. भगवंतराव सोमवंसी यांणी स्वामीचे सेवेसी विनंतिपत्र लिहिलें आहे त्याचे गव्हार स्वामीनी चित्तांत आणून त्याचा अंगिकार करावा निमित्त की पूर्वापार स्वामीचे पदरीचे आहेत आणि कार्याचे मनुष्य आहेत.

—पे. द.

गव—पत, अब्रू.

एक वर्ष उभयतांची तोडमोड, सावकारासी गव व मामलेदारासी प्रामाणिकपणा त्याणी कसें चालविलें हें आपण पाहली आहे.

—पे. द. २० पृ. १००

गवगव—गवगवा.

फौजेचा गवगव भारी. यास्तव ५० हजार रुपये आणवून द्यावे, म्हणजे इकडे आणावयाची तरतूद करूं. —ऐ. ले. सं. ४१०६

गवगवा—दंगा.

पुण्याच्या सावकारापासून ४ लक्ष रुपये कर्ज घेऊन हरिपंताचे फौजेचा गवगवा वारून त्याचे कूच करावे ऐसे नानाचे चित्तांत आहे.

—पुणें अखबार भाग १ पृ. ४६

गंव गांठणे—मृद्यास हात घालणें, मर्म हातीं घेणें.

जरी हे गंव गांठतील तर यांचे ते पातशाह आहेतच.

—हिं. द. खंड १ पृष्ठ ६७

गवठ--गणगोत्र इ.

दोघी नवऱ्यांमधे समस्ताचे मते मिठो घाटगे याची मुली नेमस्त करावी यैसा विचार जाहला. दोहीमध्यें मुलीचा गवठ आणि सगूण हेच यैसा निर्धार जाहलेनंतर ती मूल म्हसवडास आणली.

--पे. द. ३० पृ. १३

गवबी—(?) गवादी ? गवाळी ?

कुलकर्णी याचा रुमाल व गवबी

—ऐ. सं. सा. खं. ३ पृ. १४२

गवसाळा करणें--पकडींत घेणें; छाप पाडणें.

आपलें वतन खरें आहे त्याचें वर्तमान पादशहानजीक गाठोळीच्या बळें व गवसाळा करून साकल्ये जाहीर करावे तरी आपण गैर महसरदार याकरिता गनीमाचे दिवाणात जावेना. —रा. ८ पृ. ४३

गवारनिबार—सैन्याबरोबर बाळगलेले लुटारू पेंढाऱ्यांसारखे लोक. २ कचरा, बाजारबुणगे. ३ असमर्थ, लढाईस निरुपयोगी.

सैन्यांत कोणी कोणी निरोप मागतात. दिलाहि पाहिजे. आणि अखेरीस दिवस आले आहेत. गवारनिबार त्यासहि निरोप दिला पाहिजे. तेव्हां येथें किती राहतील, न कळे. —ऐ. ले. सं. ३२४९

गवेस येणें—तावडींत सांपडणें.

सेवकाचे गवेस आलियावर कार्य करावयासी चुकत नाहीं.

—पे. द. ३३ पृ. ३८१

गश्तन—१ हिंडणें, २ होणें.

गश्तह—होऊन.

गस्त—ग्रस्त, कर्जबाजारी, खालावलेली.

वालाजाह याणीं दोन इंग्रजी पलटणे ठेविले होते त्याची तलब चहढली त्या वेळेस गस्त सरदारी म्हणोन चाळीस पन्नास लाख रुपये कर्ज घेतले.
—स. ब. पृ. ३५

गस्तकरी—गस्त घालणारा.

गस्त देणें—फिरते पहारे ठेविणें.

आज रोहिल्याची फौज हजार स्वार आले आहेत. गस्त देऊन बाजारांत उभे राहिले आहेत, त्यास आम्हासी मोहरा जुडलीयावर ईश्वर साहे होईल चिंता नाही.
—पे. द. २९ पत्र नं ४४

गहजरी—गहजोरी, जबरदस्ती, दंगा.

मध्ये तीन चार गाव टाकून तुमच्या विलातीच्या महारानी येऊन आम्हावर गहजरी करुन आमचे खून केले आहेत.
—शि. च. सा. खं. २ पृ. १३८

गहजोरी—मस्ती, बदमस्ती, जबरदस्ती, मूठमर्दाई, दंगा.

मोकदम जखमी केले व नागविले. दिव्याचे गोताचे तोंडें निवाडा झाला यावरी (झाल्यावर, झाला असूनसुद्धा) पारगाऊकरी यैसी गहजोरी केली.
--शि. च. सा. खंड २ पृ. ११७

गहदम—पूर्वीपासून. सतत, अखंडित.

तैनातबद्दल यारेदीबद्दल मोहतान दरमहा होन पांच गहदम चालताती. मुसमा तख्त जागा महसूला कमावी व इसल व साहने व सारीबीजे माल व रायतेल.
--पे. द. ३१ पृ. ४

मालूम केले जे धर्मातकरण व मुलेपण पूजा, तुलापुरुष, गहदम सालाबाद पिढी दर पिढी चालिले आहे.
--शि. च. सा. खं २ पृ. २९९

गहनगड—उर्फ चंद्रगड.

गहाणलहन—कराराचा एक प्रकार.

गहाण डुलणें—करारप्रमाणें फेड न झाल्यामुळें गहाण ठेविलेली वस्तु सावकाराच्या मालकीची होणें.

जेष्ठअखेर रुपये देऊ यैसा वायेदा करतात, नाहीं तर गहाण डुले, याप्रमाणें करार आहे.
—वै. ३ पृ. ८

गंहिवर करणें—शोक करणें.

त्यास दैवहीन आम्ही दुःख देण्याकरतां जन्मास आलो, असा गंहिवर केला
शि, प्र. ब. पृ. १११

गळ्यांतील कफनी काढणें—मनासारखा निकाल होईपर्यंत त्राग्यानें दीनवेष धारण केलेला असेल (पागोटीं बांधण्याचें सोडून देणें, श्मश्रू न करतां दाढीडोई वाढविणें वगैरे) तो सोडणें.

आम्ही टिपूमियाचे. त्यासाठीं कैद झालों. आतां टिपूचा लेक आपलेजवळ आला. त्यास आपण कृपावंत होऊन कुमक केली. ती सारे मुलखांत जाहीर जाहली. आम्ही टिपूमियाचा व आपला घरोबा समजून आपणांकडे आलों आहों. तुम्हीं (पेशवे) व आम्ही दिल्लीचे शिक्केसनदवाले आहों. आम्हांस दुसऱ्याकडे जावयाचें नाहीं. आपण बादशाहीवर नजर देऊन आमचे गळ्यांतील कफनी काढावी. कफनी काढून हुरमत देऊन रवाना करावें, म्हणजे टिपूचा बदला घेतों.

—ऐ. ले. सं. ७४८८

गळ्यास गोणी येणें—अकस्मात अवघड जबाबदारी अंगावर येऊन पडणें.

१ त्याणीं गर्वारूढ होऊन २५ लाख रुपये खर्च करून बारगीर अथवा सिलेदार, कोणतीही गोष्ट निर्गमात आणली नाही. कारभार परभारा केला तो गल्यास गोणी आली फजिती जाली.

—पेठे दप्तर भाग १ पृ. ५४

२ नाहीं तर आपण तेथें मनसबा करतील आणि येथें माझें गळ्यास गोणी येईल.

—ऐ. ले. सं. ६६५१

गळचडाव करणें—गळीं देणें; फांशी देणें.

टिपूनें आपाजीराम यास गळचडाव केलें म्हणून बाजारी वर्तमान आहे.

—ऐ. ले. सं. ३९६९

गळफटा—गळफास, संकट, अडचण, गळाठा,

बहुत हुशारी (हुशारीनें) राहून खटला संभाळून असावें. गाफलीनें (गाफिलीनें) गळफटयांत आल्यास कामीं पडणार नाहीं.

—हो. कै. पृ. १६४

गळा कफणी घालणें—आपल्यासारखा निकाल लावून घेईपर्यंत वैतागानें फकीरासारखें राहणें.

त्यावरी तुम्हीं वतनाची खबर ऐकोन वतनाकरतां गळां कफणी घालून दरबारास गेलेती.

—रा. खं. ३ पृ. ५५

गळाठा—गोंधळ; नुकसान.

शत्रूनें दगा केला. गळाठा फार केला. परंतु फौजा जमून राहिल्यानंतर शत्रू माघारा गेला.

—ऐ. ले. सं. ४१४१

गळा मढणें—गळयांत बांधणें. एखाद्याकडे लागूं करणें.

त्यांत सध्य देत असेल ते सध्य घ्यावे बाकीचे वायेदे मुदत लेहून घ्यावी, रुपये त्याच्या गळा मढावे, निशा करून घ्यावी. आगे मागे रुपये देईल.

—हिंगणें दप्तर, खंड २, पृष्ठ १३

गळास देणें—गळीं देणें; फांशीं देणें.

कोडयाळचा किल्लेदार महंमदअल्ली कुमदान यास टिपू यांणीं गळास दिलें.

—ऐ. ले. सं. ३७१९

गळसिपी बसणें—गळचेपी होणें.

संकराजीपंताचे मतें डांगण मुलुक (डांगण म्ह.जंगलगर्क) या दिवसांत आपले फौजेस दाणा मिळणार नाही. शत्रूस गळसिपी बसणार नाही. आपल्या मुलकास मात्र उपद्रव लागेल (तूर्त स्वारी नेऊं नये.),

—पुरं. द. भाग ३ पृ. १७६

गळे उगवणें—मोकळे करणें, मुक्त करणें, देणें देऊन बेबाक होणें.

साहुकार व कमाविसदार यांचे गळे उगवावे हेहि संकट आहे.

—पे. द. १५ पृ. ६

गळे कापून नेणें—मुंडकीं कापून नेणें.

चित्रदुर्गकराचा तह १५ लक्ष होनावर जाहला होता, तो बिघडला. चित्र-दुर्गकर मोर्चावर चालोन येऊन २-४ हजार माणूस जायाजखमी केलें. कांहीं गळे कापून नले म्हणोन वर्तमान आहे.

—ऐ. ले. सं. ३०१२

गाऊगंगा घरौट, गावगंगा घरौट— (?)

लाला परमसुष बा सदु दुबे याची पंचाईत गाऊगंगा घरौट करून मग रावजीचे समक्ष जमाबंदी करून तहसील केली.

—हिंगणे द. खंड२ पृ. ३

गाज्या—तरवारीच्या पात्याच्या एका विशिष्ट भागाचें नांव.

फौजेचा गवगवा लोकांचा आहे. याचा बंदोबस्त करणें, असें सांगितलें. त्याजवरून आबा व गोपाळराव व कृष्णराव या त्रिवर्गास लोकांनीं बसविलें. बोलण्यामध्यें कज्या होऊन आबास गाज्याची व पुतळीची अशा दोन जखमा तरवारीच्या लागल्या.

—ऐ. ले. सं. ५८८४

अनंत जिवाजी, पांडुरंग शिवराम यांसी कलह लागला. हिंदुस्थानचे घोडयावरून नारोपंत पोंक्षे याजवर गर्दी केली तेव्हा नीळकंठराव यांस उरांत तरवारीचा गाज्या लागला.

—पोंक्षे कु. वृ. ८३

गाजी—धर्मसंरक्षक योद्धा; जेता; महापराक्रमी.

गाझी—शूर.

गांठ तोडणें—दूर जाणें; अंतर पाडणें.

रास्ते यांजकडील फौजा गोविंदराव बारवकर हुजरात वगैरे पथके कहीस गेलीं होतीं, त्यांची गांठ पडली, तेव्हां सोशीत (शत्रूचा गोळीबार सोशीत) गांठ तोडीत तीन कोस लष्करपावेतों आले.

—ऐ. ले. सं. ३१२०

गांठ पडणें—खरें काय तें पक्कें कळणें.

आतां देतों म्हणालां, आतां नाहीं म्हणतां; तेव्हां आम्हांस गांठ पडत नाहीं.

ऐ. ले. सं. २६८८

गांठागाठ—तडजोड, समजूत.

यावरून फरासीस यांतून फुटून इंग्रजास मिळाले असतील तर थोडके मुद्यावर गांठांगाठ करून घ्यावी असें असेल.

—म. शि. यां. का. पृ.२८७

(एखाद्यास) **गांठून बसणें**—धरून किंवा जडून बसणें.

यास्तव आम्ही गोवलकोटास गांठून बसलों तों सिद्दीसाद पंधरासे लोकानसीं चालोन आला.

–पे. द. ३ पृ. १३

गाडग्यालवंड पाऊस—घरांतील गाडगीं मडकीं वाहून जातील असा मुसळधार पाऊस.

ते दिवशीं पाऊस मनस्वी लागला कोण्हाचें मडकें मडक्यांत राहूं पावलें नाहीं, गाडग्यालवंड पाऊस. —पे. द.

गांडगुडघी मारणें—ढुंगणावर गुडघे मारणें

कोथळा किल्ला फत्ते करून हसमखानास गांडगुडघ्या मारून काढून दिला.

म. सा. छो. ब. पृ. ४१

गांड घोड्याची मेहनत—महार पोरग्याचे व मोत्तद्ाराचें काम. पूर्वी प्रत्येक शिलेदार घोड्याच्या चाकरीसाठी एकेक महार पोरगा बरोबर वागवीत असे. त्याणें घोड्याची चाकरी करावयाची. गांड म्हणजे लीद काढण्याची कामगिरी आणि मेहनत म्हणजे घोड्याचे अंग मळण्याची कामगिरी.

माझे बरोबर सडेस्वारींत येणें असल्यास गांडघोड्याची मेहनत, डोकें हातावर. मिळेल ते दिवशीं खावें, नाही ते दिवशी उपास करावा हे तुमच्यानें होणार नाहीं. —हो. कै. पृ. १५४

गांडगुडघी—गांडगुडदी (?) छळाचा एक प्रकार.
पुढें तपास करून देशपांडियास गांडगुडघ्या देविल्या.
—नाग १ पृ. ३६९

गाडद—कवाइती सैन्य; गाडदी लोक.
सात हजार फौज व गाडद दोन हजार इतलाख ठेवावे. त्याकरितां दरमहा लाख रुपये खर्चास द्यावे. —ऐ. ले. सं. ३८४६

गाडली—लहान गाडा.
गाडे व गाडल्या असतील त्या निमेनिम घेऊं.
—पेठे दप्तर भाग २ पृ. ३९

गाडेबगाड—गळ टोचून घेऊन गाड्यावरील खांबाला लोंबकळत फिरण्याचा, नवस फेडण्याचा एक प्रकार.

गाण, गाणी—(कोकणी शब्द), १ डोंगरातील पाण्याची जागा २ उथळ विहीर ३ डबकें ४ पोखरण.
तेथून नांदवीस जात होता तो मौजे अळसुंदे याचे गाणीवर ५ आसामी सरकारचें भेटले. —ऐ. सं. सा. पृ. २४ लेखांक १४

गाताड्या—लाकडे, फळ्या.
मग जे पोहणारे होते त्यास बकसीस देऊ केले आणि खाडीत उड्या घालविल्या. कितेकाच्या तरवारा बुडाल्या, पांघरुणें गेलीं. श्रमें करून अडीचशें माणूस पलीकडे गेले. तों येक आगरुखाचें होडकें सांपडले. मग त्या होडकेयासी दहा माणसें लावून दुसरें दीडसे माणूस पलीकडे घातले व गाताड्या राजावलीचें गांवांतून आणून ताफा बांधला.
—पे. द. १६ पृ. ३३

गाधाडी—पुण्याजवळील शिक्रापूरचे जुने नांव. मौजे गाधाडी उर्फ सिक्रापूर.
—ऐ. सं. सा. खं. ८ लेखांक ३४ पृ. २७

गाफलाई—गाफिलगिरी.
स्वारी वाड्यांत जाऊन बंदोबस्त करावा, तो प्रकार अंतकालचा समय प्राप्त, याजमुळें न जाहला; गाफलाई जहाली.
—म. द. रु. २ पृ. ९८

गाफिली, गाफिलगिरी—गैरसावधपणा, निष्काळजीपणा.
शिपाई लोकांचे व घोड्यांचे सामान सरंजाम कसे आहेत ते वरचेवर पहात जाऊन दुरुस्त ठेवण्यास कदापी गाफिलगिरी करीत जाऊं नये.
—ऐ. स्फु. ले. ५४

हे गाफिली कारकुनापासून जाहली. —वाड बाबा २ पृ. ८६

गावित, गावती--कोळयांपैकी एक जात.

गावडे—भोंक.

तरांडे दुघौसी पालशेताजवळ खडकात लागोन गावडे पडोन बुडाले.
—पे. द. ४५ पृ. १०६

गावाळ—कचरा; गवाळ; बिनलढाऊ लोक.

चाकरीचुकरी पडेल ती नीट करावी. पेंढार वगैरे गावाळ झाडून देशास लावून द्यावें.
—ऐ. ले. सं. २९९०

गायब—गुप्त किंवा बेपत्ता.

शिमगी पौर्णिमेचे दुसरे दिवशीं चांभारगोंदियाहून मनुष्यें चालली ते लिंपनगाऊ व गारदौंड या दोही गांवामध्यें गायब जाली. तलास केला परंतु कोठे ठिकाणा लागत नाहीं.
—पे. द. १४ पृ. २७

गायबाना—अपरोक्ष, परस्पर.

जर चित्तास येईल तरी ' सिष्टाई स्नेहकरितां गायबाना सवाईरामाचें लिहिल्यावरून कलूं आले ' यैसे चित्तास आलीया लिहीन.
—पे. द. १५ पृ. ३२

गायेदूम पिटणें—गायेधूम पिटणें, गुरासारखे उधळणें किंवा पिटीत नेणें.

महाराजांच्या पुण्यप्रतापे करून शत्रूस गायेदूम पिटीतच नेऊन वेशीत घातले.
—पे. द. ११ पृ. ३३

गार—खड्डा.

वाडीयांतील मागील चौकांत गार घेतली होती, त्यांत दगडाची पुरवणी घालीत आहेत.
—पे. द. ४०, पृ. १४५

गारत, गारती, गारद—नाश, गर्दी, उध्वस्त, फस्त, नष्ट.

सदाशिवराव कार्यकर्ते लेकिन गरूर मोठा या सबबानें गारती जाहली.
—ऐ. टि. ३ पृ. १७

गारद—गारदी. कवाइती फौज.

दहा हजार अरब व गारद असे जमा करून आपण व गायकवाड असे मिळोन श्रीमंतांनीं महीचा घांट धरिला.
—ऐ. ले. सं. २२८३

गारभांडें—गारेचा चाप असलेली बंदूक.

१ मुधोजीनें गोळी गारभांडेची जवळून मारून साबाजी ठार केला.
—ऐ. ले. सं. २२९९

२ दुसरीयाजवळ घोंगडी होती आणि गारभांडी होती. त्याणी सांगितले कीं, आम्ही भिवंडीहून पारधीस आलो आहो.
—पे. द. ३४ पृ. १२९

गारभांडें—गारा किंवा दगड ज्यांतून मारतात अशी छोटी तोफ.
उदाजी पोवार यांनीं स्वामीस बंदूख दिल्ही म्हणोन ऐकिलें, तरी स्वामींनीं ती आम्हांस खेळावयास पाठविली पाहिजे. तसेंच, चि. मानसिंग यास (यासाठीं) गार भांडें कुलाबियांतून आणविलें पाहिजे.
--ब्र. च. पृ. २०९.

गार होणें—पराभूत होणें; खजील होणें.
मोगलास असा मार कधीं जाहला नाहीं. गार जाहला.
—ऐ. ले. सं. पृ. २९.

गालब—वरचढ.
कदाचित् येथील प्रसंग मिटल्यास शिंदे नबाबावर गालब आहेत, हें नबाबास पुरतें समजलें आहे. —ऐ. ले सं. ४९४३.

गालीब—बळकट, समर्थ.
स्वामीचे हस्त गालीब आहेत. कोणाच्यानें काय होणें आहे ?
—पे. द. ३३ पृ. ७८.

गालीब मगलूब—सरशीनिरशी, जयअपजय.
सलाबतजंगाचा व मल्हारजी होळकराचा मुकाबिला होऊन गालिब मगलूब पाहून कितेक सरदार रुजवात द्यावी येणेप्रमाणें मार्ग रक्षित बसले आहेत.
—E. M. P. पृ. १२२

गांव—चार कोंस. जुन्या काळचे अंतर सांगण्याचें एक माप.
१ लोक बोलिले कीं येथून महाड (साताऱ्यापासून) सात गांवें आणि पुण्याहून नवदहा गांवें आहे. —पे. द. ३ पृ. १२७
२ या स्थलास आल्यापासून सुखी नाहींत. कबाड तीन गांवां गेलें. (बारा कोसांवरून लांकूडफांटा आणावा लागतो).
--ऐ. ले. सं. १७०६
३ वद्य पंचमीस सुमुहूर्तें निशाणासहवर्तमान निघावें, असा बेत धरून निकडीनें ६–७ गांवांची मजल करून आलों होतों.
—ऐ. ले. सं. ४३३१.
४ शहाजी राजे यानी निरोपसमई पातशहास अर्ज केला कीं इतक्या उपरांतिक माझा जोहार बारा गांवांवरून (म्हणजे अठ्ठेचाळीस कोसांवरून) पाठवीत जाईन. येवढे देणे पातशहानी मजवर मेहेर करून द्यावे.
—म. द, रु. १ पृ. १७

गांवकीवतन—वतनाचा एक प्रकार. हें वतन वंशपरंपरा चालावयाचें असून तें धारण करणारा जरी गांवावरून फार काळपर्यंत परागंदा झालेला असला तरीहि त्याचा त्या वतनावरील हक्क कधींहि नष्ट होत नाहीं.

गांवकोस—एक जुनें जमीन मोजण्याचें स्थूल परिमाण. गाय हंबरली तर तिचें हंबरणें जेथवर ऐकूं जाईल तितकी जमीन, ती गांवकोस.
— (विल्सन)

गांवखाना—गोखाना–बैल वगैरे भारदारी.
नवाबाचाहि विचार बाहेर निघावयाचा दिसतो गांवखाना व सितखाना वगैरा सरंजाम आणविला आहे. —पे. द. २८ पृ. ३०

गावखुद होणें—नष्ट होणें, निष्प्रभ होणें.
एवढा सुभा बुडवावयास वर्षांची वर्षे लागलीं तो एक छाप्यांत गावखुद जाहला ! हा दक्षण्यांचा होतकाळ, श्रीमंतांचा प्रताप, मल्हारजी होळकर यांचे तलवारीचा जलूस ! —हो. कै. पृ. १०

गांवखुर्द होणें—महत्वशून्य होणें.
बापू होळकर शिलेदारास बोलला 'सुभेदारांचा वृद्धापकाळ. त्यानीं श्रमसाहस या दौलतीत केले. हे सर्व गांवखुर्द होऊन या प्रसंगीं वृद्धापकाळीं त्यास श्रीमंतांचा ओळंबा आला (दूषण, बोल, आरोप) तेव्हां त्यांनी तर मरणाचा संकल्प केला. पण त्यांनीं मरावे व आपण वाचावें या वांचण्यास धिक्कार असो. '' —इ. सं. हो. कै. पृ. १२

गांवगत—गावगन्ना घेतलेला वसूल.
पुणें देशीचा सुभा करू लागले तेव्हां भावास गावगतीच्या हिशेबामुळे नाना प्रकारे मागो लागले. —पुरं. द. भा. ३ पृ. १४९

गावगुंड, गावगुंडा—गावचा माहीतगार माणूस; सडा माणूस. धाडसी माणूस.
दक्षिणेकडे मौजे हरकूल खुर्द व मौजे भिरवडे या दो गावातून पाज आहे ते वाटेने घोडे बैल जात नाही फक्त मनुश गावगुंडे जातात येतात.
—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. १०

गावढेगांव—खेडेगांव.
जातीनें आपल्यास बहिष्कार घातला त्यास आम्ही दोन वर्षे गांवढेगांवीं होतो. —ऐ. सं. सा. खं. १ पृ. १७६

गावणगे—गावचे अधिकारी किंवा सावकार. सधन लोक.
चालू अमलामध्यें प्रजेवर मांडिला कहर। धरून नेले गावणगे खंड केले मक्रर। —भा. इ. स. मं. त्रै. वर्ष २० अंक १ पृष्ठ २६

गांवनिसबत इनाम—ग्रामाधिकाऱ्याला किंवा गांवच्या नोकराला गांवकऱ्यांनीं सारामाफ दिलेली जमीन.

गांवनिसबत मिरास—सबंध गांवाची सामुदायिक मालकी असलेली जमीन.

गांवसई—१ गांवच्या भुताखेतांना दरसाल द्यावयाची ओवाळणी. अर्थात् त्याबद्दल गावकऱ्यांकडून वसूल करावयाची पट्टी २ गाववस्तीची मोजदाद.

गांवसई आजतागाईत करावी, परंतु कुळांच्या मळण्यांच्या गुंता होता व सिवेचा तंटा पडला आहे, तथापि गावसईचे उद्योगांतच आहे.

—पे. सा. पृ. २१०

गाशा—घोड्याच्या खोगिरावर घालावयाचें पातळ गादीसारखें आच्छादन.
चिठी घेऊन सांडणीस्वार, सुभेदार घोड्यावर होते तेथे आला. चार घटिका दिवस होता. गाशा टाकून चिठीचे वृत्त श्रवण करीतात इतक्यांत पांच माणसे एकत्र पाहून तोफेचा गोळा आला !

—हो. कै. पृ. ७७

गासिबानह्—जबरदस्त.

गाह्—गाहा, जमाव.

येजमानाचा गाह् पाच हजार फौजेचा जो आहे तोच आहे.

—पे. द. २० पृ. १०२

गाह् व गाह्—प्रसंगविशेषी.

सांप्रत कृष्णराव यांचे पुत्र गोविंदराव (काळे) शरीकखिलवत (खलबतात सामील) नसतेत (नसतात) गाह् व गाह् बालाजीपंतांनी (नाना फडणिसांनी) बोलाविल्यास जात आहेत.

—पुणें अखबार भाग २ पृ. १२९

गाहा—१जमाव, २ संकट.

दोन लाख फौजेनिशी वजीर बुंदेलखंडच्या रोखे व नजफखान लाख फौजेनिशी मारवाड अजमीर जयपूर आदिकरून मुलखात येणार. दादासाहेबांचें हें खूळ त्यांत जाऊन मिळते तरी भोसले इसमाईलखान व गाइकवाड हें अनुकूलच आहेत तेव्हां मोठा गाहाच होता.

—म. शि. यां. का. पृ. ८

गाहा—जमा, एकीकरण, जथ.

१ तुम्ही आबा बापू मोडले त्याचे आपले लोकाचा **गाहा** करून, सारी येक होऊन भारी होणें. —पुरं. द. भाग १ पृष्ठ २४९

२ यैशास सातआठसें माणसाचा गाहा त्याणीं केला आहे.

—पे. द. ३३ पृ. ३०

३ आणखी नवे लोक बोली करून ठेविले. जमावाचा (सैन्याचा) गाहा जाह्ला. —पे. द. ११ पृ. ३८

गाळणें—अंग काढून घणें.

अवतरणासाठीं ' मसलत उघडी होणें ' पाहा

—हो. कै. प. ६८

गाळणें—वगळणें, टाळणें.

येकादे वेळी खाशाची गाठ, सर्वत्रास गाळून घातली तरी सारे कारखानीस रात्रंदिवस जवळच असतात !

—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. ६२

गाळ बसणें—१ काळीमा लागणें, २ शिव्या खाणें.

तुम्ही जेव्हां आमचे तक्ताशी झड घालूं लागला तेव्हां आमचा इलाज नाही, तक्तास उपद्रव जाहला आणि आम्ही उगेच बसून तमाशा पाहिला तरी आम्हावरी बेइमानी शाबूत होती व गाळ बसती.

—नाग १ पृ. ६९

गाळशिवी—शिविगाळ. व्युत्क्रमाचें उदाहरण.

त्याचे वाणी सोनार कारभारी ।
दरकदाराची खातरी न धरी ।
जमेदार दवडिले दुरी ।
भल्याशीं गाळशिवी करी ।।

—भा. इ. सं. मं. त्रै. वर्ष २० अंक १ पृष्ठ २७

गिजगड—घासाघीस.

हैदराचे वकील आपाजीराम श्रीमंतासी गिजगड करीत होते. शेवटी तहात गोष्ट ठरली श्रीमंतानी तीन किल्ले देऊन २५ लाख रुपये घ्यावे.

—पेठे दप्तर भाग २ पृ. २०

गिर्द—परीघ, घेर, चौकी, भोंवतालचा प्रदेश, भोंवती.

नवशें रुपयांचे जमेचा गांव झांशी गिर्दीत तजवीज करणें.

—ऐ. टि. ३ पृ. ५७

अलिफ्टन साहेब याणी शहराभोवती गिर्द बसवून.

—राजवाडे १४ पृ. ६४

सर्व फौजा दिल्लीचे गिर्द जाऊन रसद बंद करावी.

—दि. म. रा. १ पृ. २६६

चौ गीर्द = चौ बाजूंस.

गिर्दनवाई, गिर्दनवाही, गिर्दनवाह—१ शहरकोट व भोंवतालचा प्रदेश २ त्याचें संरक्षण करण्याचें काम. ३ सभोंवती, आसपास. ४ समोंवतालचे.

१ गिर्दनवाईचें गांव लुटून उध्वस्त केलें.

—राजवाडे १४ पृ. २०

२ धालगांव कर्यातीचीं खेडीं मिरजेच्या गिर्दनवाईस आहेत.

—ऐ. ले. सं. ८३३

३ लष्कर इकडे येईल तेव्हां गिर्दनवाई गांव लुटले जाते करतां राऊत पाठवून रखवाली करविली पाहिजे. —पे. द. १५ पृ. ५२

४ खंदक व वातेऱ्या लष्कराचे गिर्दनवाह वांधल्या म्हणोन खबर आली आहे. —पुणें अखबार भाग १ पृ. ६१

गिर्द ब गिर्द—चोंहीं बाजूंनीं. —राजवाडे १५ पृ. २०

गिर्दाब—भोंवरा.

गिर्दावरी—१ जमवाजमव, बंदोबस्त, २ जकातवसुली; जकात बंदोबस्त. —राजवाडे ८ पृ. २१

तूं बाहेर खेमेदाखल होऊन फौजेची गिर्दावरी करावी. —राजवाडे ५ पृ. ७८

गिर्दी—वर्तुलाकार लहान उशी.

गिर्वा, गिर्व्हा—ढालीचा एक प्रकार.

गिर्वीदगी—निष्ठा, चहा, नवाजीस.

मर्द माणूस लोकास गिर्विदगी करून कित्येकांचे पारिपत्यच केलिया उत्तम आहे. —ऐ. टि. २ पृ. ७१

गिऱ्हे—तेढ, संशय, अरुची.

(अवतरणासाठी ' सिकवा ' शब्द पाहा.) —पुणें अखबार भाग १ पृ. १०५

गिरंदारी—गिराणदारी, वजनदारपणा.

मग नबाब पुसो लागले कीं सातारा महाराजापासीं मातबर मनसुबेबाज, राजा ज्यास मानितो, यैसा तुमचे नजरेस कोण आला ? तेव्हां यानें जाब दिल्हा कीं महाराजा जयसिंगजीनीं मजला याजकामाबद्दल बहुतकरून (मुखत्वेकरून) पाठविले जे बाजीराऊ पंडित प्रधान यांचे नांव मुलकांत मरदुमीचे फार आहे. परंतु गिरंदारी व मुतसदगिरी व मान आदर राज्यांत व बोलोन चालोन पोक्त कारबारी मनास आणून येणें, म्हणोन मजला पाठविले होते. त्यांस सिवाये बाजीराऊजी आणिक कोण्ही सत्यवचनी अगर प्रामाणिक अगर पोख्तकारी अगर चलन साहेबफौज दुसरा दिसत नाहीं. —पे. द. १० पृ. ५७

गिरफ्तन—घेणें.

गिरफदारी—चिंता, काळजी.

१ फत्तेसिंगाकडील आपाजी परभूची त्याची कटकट जाहाली याजमुळें गिरफदारीत आहेत. —पुरं. द. भाग १ पृ. २३३

२ कारभारी आपले गिरफदारींत. प्रांत खराब झाल्याची काळजी कोणी करीत नाहीं. —ऐ. ले. सं. २१९१

४ निकटवर्ती आहेत ते सांभाळून नेतात. आम्हांसारखे आहेत ते त्या गिरफदारींत मग्न असतात. --ऐ. ले. सं. पृ. ३९

गिरव; गिरो—गहाण.

गिरफ्तार—बद्ध, कैद.

(अवतरणासाठीं 'खौप' शब्द पाहा)

—पुणें अखबार भाग १ पृ. १०९

गिरा—लांबी मोजण्याचें एक माप. १॥ तसूचा एक गिरा.

गिराणी—दुःख, खफगी, रुष्टता, जेरी, महागाई, दुष्काळ, अडचण.

१ लोकास खर्चाची गिराणी फार आहे.

—म. द. बा. १ पृ. ७०

२ मर्जीस गिराणी येईल. —राजवाडे १० पृ. २५२

३ किल्लेवालेही गिराणीस आले आहेत.

—म. द. बा. १ पृ. २०७

४ लश्करांत गिराणी फार म्हणून लोक बहुत हैराण परेशान आहेत.

--दि. म. रा. २ पृ. १०

५ रसद लौकर येत नाही या करितां गिरानी फार.

—पुणें अखबार भाग १ पृ. २२२

गिरामी—मोठी, फार.

गिराशी, गिराशा, गिराशिया—गुजराथ-सातपुड्यांतील एक बंडखोर लुटारू दरवडेखोर जमात.

(अवतरणासाठीं बट शब्द पाहा.)

—ऐ. पो. के. खं. २ पृ. २३२

गिराशीचा शिरस्ता—घाटांतील गिराशी (भिल्लासारखी वन्य जमात) संस्थानिकांना निर्धोक वाहतूक होण्यासाठीं जो कर किंवा पट्टी देतात ती. घाटावरून वणजोर व बुडग्यांतून जासूद व काशीद वगैरे माणसें रहदारी कोंडाईबारीनें लस्करांत येतील. त्यास येता जाता घाटापार करून देत जाणे. वणजोर याचे बैलावर गिरासेचा शिरस्ता असेल तो घेत जाणें.

—पे. द. भाग ३८ पत्र नं. २४

गिरास—बंड.

तेव्हां सर्वांनी बादशाहीस धक्का द्यावा हा इरादा करून सवाई जयसिंग यांस पुढें करून दक्षणी घोडीवाले यांस बगलेत घेऊन **गिरास** करावे हा मनसुबा सिद्ध केला. —हो. कै. पृ. ८

गिरासपण—लुटालूट, लक्षणेनें स्वारी-शिकारी. मोहीम.

(अवतरणासाठी 'सोंप' पाहा.) —हो. कै. पृ. २

गिन्हा—गांठ

गिरिस्तन—चिताक्रांत.

श्रीमंत दादासाहेबांची स्वारी या प्रांतीं आली त्यामुळें ते गिरिस्तन.

—ऐ. ले. सं. ९५७

गिरिफ्तन्—मधेंच हिराऊन किंवा पकडून नेलेला.

गिरी—घेरी, मूर्च्छा.

आली पाहतां मज गिरी. —परशराम १४८

गिरीफदार—संचित किंवा गर्क.

येथून फौज कशी पावते? कमावीसदाराचे ताबीनाती फौज. ो जमीदाराचें कजियात गिरीफदार आहे.

—हिं. द. खंड १ पृष्ठ ४३

गिरीबदारी—चिंता, दीनस्थिति.

तथापि त्याजकडे यास पाठवावें तरी हें आपले गिरीबदारीमध्यें फारच आहेत. यास्तव पाठविले नाहींत. —पे. द.

गिरे—तीन अंगुलांची लांबी.

१ तोफ लांबी दहा गज दोन गिरे आली.

—राजवाडे ७ पृ. २२६

२ पदर पावणे दहा गिन्हे तयार करावा यैसी आज्ञा मशारनिल्हेस करावी. पागोटीची रुंदी इतकी येईल म्हणून विनंती लिहिली.

—पे. द.

गिरेबान—गळपट्टी,

गिरो—गिरवी, गहाण.

पुढं खर्चास नाही हैद्राबाद गिरो देतो. —E. M. P. पृ. १४९

गिलकारी—मातकाम किंवा मातीचा गिलावा. मूळ शब्द गिल म्ह. माती

इमारत सदरहू किल्ल्याचे बुरजास चौरस सात हात घेरा चुन्याचे काम चालतें; मधें पुरणीस गिलकारी व धोंडे घालून पुरणी भरितो.

—पे. द. ३४ पृ २०

गिला—तक्रार, चहाडया.

बापू गोखले यांस पत्रें आलीं त्यांत मजकूर आपलेकडील कारकुनाचा गिला बहुत लिहिला होता. —ऐ. सं. सा. खंड ११ पृ. २२

गिलेगुजार—१तक्रारी, २रुष्टता.

हें वृत्त शहाजीस समजल्यावर बहुत गिलेगुजार आहेत.

—दि. म. रा. २ पृ. २३

भवानी कुंवरही दरबारास जाऊन खलबत करितात. म्हणून बहुत गिलेगुजारीनें लिहिलें होतें. —दि. म. रा. २ पृ. २३

गिळगिर—' गिलेगुजार, ' तक्रारी, रुष्ट.
बदनामीचें घर आपल्या माथा घेऊन सिबंदीचे लोक गिळगिर करावें, यास्तव सोडले. —हिं. द. खंड १ पृष्ठ ७३

गीला किंवा गिला—तक्रार, आरोप.
हिंमतबहाद्दराचें मजकुराचें पाटीलबावानीं पत्र पाठविलें त्यांत तुमचा गीला बहुत लिहीला आहे. —म. द. रु. ३ पृ. ९४.

गुंज्यायेसी—समृद्धि किंवा उत्पन्नाची विपुलता.
स्वामींच्या चित्तांत कांहीं तफावत वाटत असेल तर अखेरसाली मनास आणून जेथें गुंज्यायेसी दिसोन येईल तेथे सुखरूप फायदा करून घ्यावा. —E. M. P. पृ. ३२

गुंज्यासी—गुंजासी, मोठा, खूप वस्ती राहील असा.
किल्ला फारच उत्तम गुंज्यासी म्हणून विनंती लिहिली आहे. —पे. द. भाग २५ पत्र नं. २७६

गुजर—निर्वाह
तीनशें रुपये रोजांत गुजर होत नाहीं. —दि. म. रा. १ पृ. ३१३

गुजरणे—वारणें, मरणें.
ऐशीयास साबिक विठुजी नाईक व बयाजीराम हरदो जणामध्ये निफाक होता. ते हरदोजणहि गुजरले—आपली कांहीं तकसीर नाहीं. —मा. स. प. मा पृ. १४०

गुजरयेत—पाठविणें, पोचविणें, गुजारा, निर्वाह.
आम्हांकडून बळेंच लिहून घेतलें हे लिहिले सही (खरें) होणार नाहीं तुम्ही साक्षीस असणें म्हणोन त्याला साक्षीस ठेवणें. गुजरयेतीस पत्रें आमची आहेत ती त्याला देऊन उत्तर पाठविणें. —पुरं. द. भाग ३ पृ. ८

गुजराण, गुदराण, गुदराणी—उपजीविका, निर्वाह, कालक्षेप, पाठवणूक, नजर.
आमचीं गुजराणी चालेल —राजवाडे १३ पृ. ९४
आणखी मासपक्ष गुदराण करावयाचें तेव्हां आतां. कां उतावळी करावी म्हणून कर्जवाम करून गुदराणी करितों. —खरे ७ पृ. ३६१६

गुजराणा—गुजराण.

हगदवाडीचा बंदोबस्त करून मग दाणावैरणीची सोय पाहून चार दिवस गुजराणा करूं. —ऐ. ले. सं. १६२७

गुजरात रीतीनें रडणें—खोटा शोक करणें. गुजराथी बायका छाती पिटून जसा आक्रोश करतात (कोणी मेल्यावर) तसा देखावा करणें.

नाना बापूस म्हणाले रावसाहेब धरल्याची सलाह कोण्हे दिल्ही (तेव्हा बापू) गुजरात रीतीनें रडूं लागले तक्यात नानापासी बापूच्या सिवकापत्राची नक्कलच आली. नानाची हुषारी भारी. बापूस त्यांनीं उत्तर केलें की काय जे जाले असेल ते आपले सल्हेसिवाय होणार नाहीं. —स. ब. पृ. ३७

गुजरी—पायांतील दागीना.

आम्ही सोनाराचे घरीं तुमचे गुजारतीनें दोन शेर, गुजऱ्या करावयासी रूपे दिल्हें होतें तरी त्या पाठवून देणें. —वै. २ पृष्ठ ६२

गुजस्त, गुदस्त—गत, झालेलें.

बरें; जाहली ती गुदस्त, —खरे ७ पृ. ३५२६

दिगरचंद मुदत गुजस्त जाहली. —राजवाडे ३ पृ. ९०

असो जें झालें ते गुजस्त, पुढें काय तजवीज सफाई करावी ? —राजवाडे ५ पृ. १६६

गुजाज्गर, गुदाज्गर—टाकसाळींतील धातू गाळणारा. —भा. इ. सं. स. सं. वृ. ८५

गुजायश—जमाव; जमवाजमव.

स्वारांची गुजायश चहूं महिन्यांत नाहीं, हें जाणून तो दसऱ्यापावेतों दोहोंकडील अमका जमाव दुवाबांत उतरावयाची सबब हीच कीं, पडदा सत्रींनीं खुला केला, या दबदब्यानें मुकालिफाचें हावास निघोन जावें. —ऐ. ले. सं. ४३५४

गुजार—आदा, देणें, सोंपवणूक.

तुम्ही आपले पंचसहस्त्रीचा जो जमाव कराल तो मशारनिलेसी गुजार करीत जाणें. —राजवाडे १५ पृ. ३७५

गुजारणी—गुजराणी; गुजराण.

एक गांव द्यावा. गवत गंजपैकीं कांहीं द्यावें, येणेंप्रमाणें अखेर सालपावेतों काळगुजारणीचा प्रकार जाहला आहे. —ऐ. ले. सं. १३०९

गुजारत—मध्यस्थी, मार्फत.

तेही निळो कृष्ण यांचे गुजारतीनें विदित केले कीं. —इ. मं. १३१

गुजारत—घालविलें.

गुजारन्द (गुजाश्तन)—घालवावें.

गुजास्त—सोपवणूक.

जागीरचे महाल १२ लाखाचे गुजास्त जाहाले; व पूर्वी ५ लाख रुपये नजर केले होते पुन्हा ५ लाख द्यावे म्हणोन करार असता तफावतीची गोष्ट बोलूं लागले. ——पुणें अखबार भाग १ पृ. १०६

गुंजासी—मोठा किंवा पुष्कळ वस्तीचा.

किला फारच गुंजासी आहे. —पे. द

गुंज उखळणें—जमाव उधळणें.

शामलाची गुंज वलाविलीयानें कार्याची नाहीं. कळेल तैसे साहित्य करून तेथून गुंज उखले तो अर्थ केला पाहिजे.

—पे. द. ३ पृ. १४६

गुंज फोडणें—१ संशय निवृत्ति करणें, २ जमाव फोडणें.

आ(धी)चे मुक्कामीं पलीकडे आम्ही सुचविलें होतें कीं आधी फरोकाबादेकडे सेह द्यावा. हे गडवडले होते. भेटून गुंज फोडून मग दिल्लीकडे येतो. —पे. द. भाग २९ पत्र नं. २५१

गुंज बांधणें—जमाव करणें.

हफीज कार्तिकमासी गुंज बांधोन दक्षणियांसी जुजणार.

—हिंगणे द. भाग २ पृ. ५४

गुंजाईश—लबाडी, कूस, ऐपत, नफा, उत्पन्न, उपयोग किंवा खोंच.

१ गुमास्तेयाचें दसकत नसता तुमार कायेबदल विल्हे लाविला यांत गुंजाईश आहे. हे निमित्त ठेवून लिहिलें पाहिजे.

—पे. द. १० पृ. २८

२ दिवाणानें गुंजाईस अधिक सांगितल्यानें भांडावयास उभे राहतात. ——सभासद २५

स्वारांची गुंजायश चहुं महिन्यांत (बर्सातीच्या) नाहीं.

—खरे ८ पृ. ४३५४

३ सांप्रत बोलण्यांत कांहीं गुंजाथीश ठेवीत नाही; व मोहराही क्रूरतेचा नाहीं. ——ऐ. च. ७

गुंजाइसी——नफ्याचा.

त्याजखाले मुलुख घाटाखालीं पांच लक्षा हुनाचा वसुली गुंजाइसी आहे. —पे. द. ४० पृ. ११०

गुंजाणनां—(?)

यैशास सिवाजीपंत याचे भेटीचें प्रयीजन आहे तरी तुम्ही त्यास जो विचार

सांगणें तो सांगोन गुंजाणनां ये जागा दर्शनास अगत्यताच यावे.
—वै. ४ स. १७४५ पृ. ४२

गुंजायेश—अडचण सवड.
आता बहुत लांबवायाची गुंजायेश राहिली नाही.
—हिं. द. खंड २ पृष्ठ ३०

गुंजाविष–गुंजावेष—उत्पन्न, नफा, कूस किंवा ऐपत.
१ महिना पंधरा दिवस मजबूतीनें राहिल्यानें गुंजायेष आहे; परंतु जर बख्तसिंगानें नीट रुख धरीलीया तर भांडणात मारीला पडतो.
—हिं. द. खंड १ पृष्ठ ४२
२ सरकार देणें व गावखर्च वसुलात वजा होऊन बाकी गुंजाविष राहील ते पाटील व कुलकर्णी यानी यथाविभाग वाटून घ्यावी.
--पु. न. सं. वृ. खं. २ पृ. ११८

गुंठा--१२१ स्क्वेअर यार्डांचा १ गुंठा.
गुंड, गुंडा—गावगुंड, अडदांड, पुंड.
जहानाबादेंत गुंडे वगैरे शरीर लोकांचा हंगामा फार जाहला आहे. शंभर पन्नास माणूस मुतफिक होऊन हरकोठे जातात येतात.
—पुणें अखबार भाग १ पृ. २२२

गुंडगल—गुंडगोळ. एक तऱ्हेची तोफ २ तोफाचे गोळे.
सटवाजी भोसला दोन हजार बदकंदाज दोन गुंडगले छकड्यावर घालून कोल्हापुरांतून चालून आला. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ४८
खाशा वाड्यावर लहानसान गुंडगोळे आहेत. तेथेंहि मोगल उपद्रव करणार. ---ऐ. ले. सं. ४४०
कोट रुपये द्यावे म्हणोन चिरंजीव जातीनें उन्हांत उभे केले. मुखें करून अनिर्वाच्य शब्द तसेंच चालले. मग गुंडगलाची माळ घातली. तगाद्याची पराकाष्ठा केली. --हो. कै. पृ. ९६

गुडघा—फूस; फितूर. अंतस्थ अडचण निर्माण करणें.
आजपर्यंत हैदरखान तहाचें बोलत नाहीं. तेव्हां गुडघ्याखेरीज नाहीं असें आमच्या अकलेस येतें. --ऐ. ले. सं. १५७५
गुडघा देणें—आंतून फूस किंवा पुष्टीबळ देणें, फितूर करणें, अडचण उभी करणें, आंतून तिढा पाडणें.
यानींहि बदनजर धरून अष्टभयास गुडघा देऊन बखेडा करितात याप्रकारचें वर्तमान आहे. —पे. द. भाग २९ पत्र नं. १६९
तेव्हां गायकवाड इंग्रजाकडे राजकारण लाविले. गुडघा दिला.
—म. शि. यां. का. पृ. ९६

गुडदा—गुर्दा—गदा.

गुंडाळें—पार्सल.

फळांचें गुंडाळे सिवावयास पाठविलें आहे तें पाठऊन देणें.

—पे. द.

गुंडी—गोंडी, बंड, दंगा, गोंड लोकांचा दंगा किंवा बंड

मोरोपंतानी नंतर एक मुख्य राणी आपल्या मसलतीन सामील होती तिला मारून टाकून गोंडी भेडून (गोंड जमवून) गुंडी मांडिली राजे सुमरेसा यास धरून हाटयाजवळ जटाशंकरचे किल्यांत रणवास सुद्धा कैद करून ठेवले. —मा. व. गो. बुं. कै. पृ. २३

गुढे—आश्रयार्थ एकत्र एखादे ठिकाणीं जमलेला जमाव त्यास गुढे किंवा गुळे म्हणतात.

गुरेढोरे नेली, गुढी लुटली, याप्रमाणें नाश केला.

—पे. द. १३ पृ. ३९

निजाम अल्लीखान यानें पुणें जाळिलें, देव फोडिले. सिंहगडचें गुढें लुटिलें, जामदारखाना शिलेदारखाना वगैरे कारखाने खालीं ठेविले होते ते लुटिले गेले. —ऐ. ले. सं. ५२३

विठ्ठलवाडीपासून तोरण्यापावेतों गुढें दाटले आहे. बोरघांटाकडेहि तसेंच. पाणी केळीवर नारळी चढतात. (केळी–मातीची घागर, नारळी–नारळाची करवंटी. पाण्यासाठी मातीच्या घागरी वापरण्याची पाळी येणें.)

—ऐ. ले. सं. ४२७

कान्हूरगांव दरोबस्त घरसुद्धां खाणोन वस्तानी व गुरेंढोरें सर्व लुटून नेले व गांवचे गुढे डोंगरावर पलोन गेले तेथे स्वार जाऊन वस्त्राहरण करून गरतीबाइका देखील नेल्या. —ऐ. सं. सा. खंड ११ पृ. २८

महूजवळ बन होतें व गढी होती तेथें गुढे जाऊन राहिले होते तेथें स्वारीच पाठविली. —ऐ. सं. सा. खं. ३ पृ. ४

गुढेकरी—पळून जाऊन आश्रयार्थ एके ठिकाणीं जुळलेला जमाव.

तशांतच तोफा लागू केल्या. खंदकावरी गुढेकरी होते त्यानीं वस्तभाव तों गावांत लाऊन दिलीच होती. पण पांच चार हजार गुढें मात्र बाहेर होती ती लस्करानें लुटिली. —पे. द. २८ पृ. २६६

गुण—तोडगा; उपाय.

अल्लीसाहेब याणें ' विशेष नाहीं, रान सटवाईचा फेरा आहे. गुण करून देतों ' म्हणून सांगून गुण करून देऊन गेला होता. त्यास गुण कांहींसा दिसतो.

—ऐ. ले. सं. ४०७३

गुणवंतगड--उर्फ दातेगड.

गुणाची वस्तु—अलंकारिक रीतीनें किंवा उपरोधिक रीतीनें, खेळचा, कारस्थानी, खोडील.

आधी चिंतोपंत गुणाची वस्तु ! यास्तव बावास विनंती केली कीं अजंठयांत आणून यांचे हवाली त्यास करावे. मग तेथून पुण्यास घेऊन जातील. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ८८

गुत्ता--गुंता किंवा अडचण. वादाचा मुद्दा.

नर्मदातीरीं आल्यावरी मंडळयास गुत्ता पडला. उष्ण काळ निघून गेला यास्तव रजवाडियांत आलों. —ब्र. च. ९४

दोन्ही महालातील गुत्ते फार करून दूर केले रोज नवे नवे निघतात त्यांस मात्र आमचा इलाज नाहीं. सांप्रत महालातील गुत्ता नाहीं.
—भा. व. ऐ. प. या. पृ. ६७

गुत्तीस सुमारें—गुत्तीच्या सुमारें.

तेथून पुढें कूच करून गुत्तीस सुमारें समीप गेले, म्हणोन वर्तमान आलें.
—ऐ. ले. सं. २८९७

गुतका—सर्वोपरी स्वामित्व हक्क (Exclusive right).

हा तालुका स्वामींचा. पालेगार याजकडे येक येक पालेगार यांजखाली सरकारचे वसुली गांव दहा पांच गुतकीयानी पेशजीपासून करीत आहेत.
—पे. द. २८ पृ. २८९

गुतका—मक्ता.

२७ हजार रुपये बीड आंबड येथील बाबतीचा गुतका जाला होता त्यापैकीं ५ हजार माफ केले. —पे. द. १० पृ. ४९

गुतग—(१) गुंतागुंत, (२) जोडणी, व्यवस्था.

यानंतरी, मलापाचा व आपला मित्रत्व बहुत. त्याच्या मुला-लेकराचा वारंवार आपण परामृश करीतच असाल. पुढेंहि त्याचा हेत याप्रकारे गुतग करून त्याच्या पुत्राचे चालवणार आपणच आहेत.
—चं. चू. द. पृ. १२९

गुंताराडा—लढे, भानगडी.
—पे. द. भाग १ पत्र नं. ४३

गुंतारुंता—अडचण, भानगड, गुंतागुंत.

मायावादीसी मायावादपण केल्याखेरीज गती नाही; व विना मायावादीपण केल्याखेरीज हिसेबाची साफी होऊन आपला गुंतारुंता निघून येणे दुस्तर असे. —हिं. द. खंड २ पृष्ठ ३०

सौ. बाईसाहेब यांणीं तुमचें स्मरण केलें होतें तरी गुंतागुंता उरकून सत्वर येणें.
—वै. ४ स. १७४६ पृ. ३२

गुंद—स्थान (.जसे अनागुंदी म्ह. हत्तीचें स्थान किंवा हस्तिशाला अना म्ह. हत्ती. दोन्ही कानडी शब्द.)
—चि. शि. च.

गुदराणी—निर्वाह, निभाव.
आजपर्यंत तळ्याच्या पाण्यावर गुदराणी जाली. पण आता तळें आटलें.
—ऐ. ले. सं. पृ. ४३९०

गुदरानी—गुजराण.
इतके फौजेची गुदरानी लुटीवरी कशी झाली?
—ऐ. ले. सं. ३६०

गुन्हे बे गुन्हे—गुन्हा असो नसो, हकनाहक; खात्रीनें.
जर हें काम न करितो तर गुन्हे व गुन्हे हा पारिपत्य करील.
—जो. रा. १०७

गुना—सूरत, शक्कल, भार.
सर्व मसलतीचा गुना तुम्हावर आला आहे.
—राजवाडे १२ पृ. ७९

गुप्तगोइ—अंतस्थ संभाषण, अंतस्थ फितूर.
तहनामा मराठेयात व फिरंगीयात पहिला सलूक चालत होता. त्यास दरम्यानें गुप्तगोई जाली त्याजकरितां सलुकाचा बिघाड होऊन फिरंगी कुलाबियावरी चढोन आले. हें देखोन मराठे यांच्या लष्करच्या फौजा आल्या.
—पे. द. ३० पृ. ४४

गुप्ताऊ—गुप्त. अप्रकटपणें.
अनि गुप्ताऊ माणूस दरम्यान आहेत त्यासी सांगोन वर्तमान आणवितों.
—पे. द. भाग २७ पत्र नं. ८३

गुफ्रान-पनाह—क्षम्यांचा आश्रय.

गुबार—गभर. एक प्रकारची तोफ. A mortar for throwing shells.
तोफांची व गरनाळांची व गर्भछाट तोफा गुबारा समागमे होत्या त्यांची मार दिल्ही.
—म. शि. यां. का. पृ. ४८०

गुबार—संशय, किंतू, कपट.
१ पत्र दाखविलें. त्याणीं वाचून पाहिलें, आणि निखालसतेचीं बोलणीं बोलले. इतक्यानें गुबार निघाला.
—ऐ. ले. सं. ४६६६
२ तुमचे मनांत गुबार होता तो तुम्ही बाहेर काढला. आतां या गोष्टीस चुकाल तर तुम्हास मार्तंडाची शपथ.
—हो. कै. पृ. ७६

३ कुमक आल्यावर कूच करील तेव्हां वचार समजेल गुबार भारी दिसतो. —म. शि. यां. का. पृ. १७४

गुबार—धूळ.

गुम—नष्ट. गहाळ.

१ आपणासी इनाम सालाबाद चालिलें आहे. यावरी आपले भोगवटे गुम जाले. मग मलीक अजम सिदी याकूद ठाणदार माजी यासी मालूम केले. —शि. च. सा. खं. २ पृ. १५१

२ एक सांडणीस्वार राजश्री रावजीच्या सडेस्वारींत पाठविला होता तो गुम जाला. —म. शि. यां. का. पृ. १७०

गुम्‍मज, गुमट—घुमट, मुकबरा, रोजा.

नवाब सवार होऊन अमीनुद्दिन साहेबाचे गुमजाकडे गेले. —रा. ७ पृ. १६९

नंतर सर्वत्रांनीं जाऊन माती दिली आणि गुम्मजही बांधिला. —प. या. वगैरे पृ. ४००

गुम्‍र—किंतु, राग, संशय, ते .

मस्तानी येथून गेली. मोठा संदेह आम्हाविसी होता तो वारला असतांहि गतवर्सीसारखी निखालसता दिसत नाहीं. न कले काये मनांत गुमर आहे ? --पुरं. द. भाग १ पुष्ठ ८९.

गुमराई—गर्व.

१ नासरजंग तारुण्य, फौज, तोफा व रिसाला बहूत यांजमुळें गुमराई वसत होती. —हिं. द. खंड १ पृष्ठ २२

२ तुला वाटतें की दौलत 'मी चालवितों माझ्या भरंवशावर महाराज स्वस्थ आहेत' परंतु हरनाथ एक आणि एकूणपन्नास हरनाथाची करामत मी खेळवून तुझा पल्ला राखतो (पल्ला राखणें म्हणजे पक्के जाणणें, ओळखणें) तुझे भरंवशावर मी आहें ही गुमराई एकरूप मनांत न आणितां सांगितलें तितकें काम करून असावे. —हो. कै. पृ. १६१

गुमशूद—नष्ट, गहाळ.

सनद गुमशूद झाली म्हणौनु इस्कील न करणें. —रा. २० पृ. ३५५

गुम होणें—नष्ट होणें.

१ इनामतीच्या सनदा आलाहिदा आपल्यापाशी होत्या त्या फितरती-करिता (दंग्यामुळें, स्वारीमुळें) गुम जालिया. —मा. स. प. मा. पृ. १४०

२ सनदपत्र बंडामुळें गुम जाल्या —ऐ. सं. सा. खं. १ पृ. १४

गुमान—विचार, मत, संशय, पर्वा, काळजी, ताठा, गर्व.

श्रीमंताकडील सूत्र अलिजाहाकडे असेल ऐसा गुमान (संशय) येथें आहे.
—रा. ५ पृ. ५३

दिलेलखानाचा गुमान (पर्वा) धरितो की काय ?
—सभासद पृ. ३५

बहाद्दूरखान पेंडीचे गुरूं आहे. त्याचा गुमान काय आहे ?
—सभासद ५९

गुमानी—संशय.

तेव्हां त्या सरकारचा आशरा अशी गुमानी येऊन—
—म. द. रु. २ पृ. १३७

गुमाश्तह—गुमास्ता, नोकर.

गुर्गु—गुर्गुंज, गदा.

गुर्ची—एक लढण्याचे हत्यार.

रा. पां. न. पटवर्धन यानी दादासाहेब ओंकारसंग्रहांतील गुर्ची नांवाचें हत्यार दाखविलें.
—मं. षष्ठ सं. वृ. पृ. ५

गुरबत—परदेश

गुर्बत—नम्रता, अजीजी

२ इंग्रेज गुर्बत दाखवून काबु साधण्यास चुकणार नाहीं.
—दि. म. रा. १ पृ. ५४

गुरगुज—गुरग्रुस, रवीसारखें लढाईत वापरण्यांत येणारें एक हत्यार. किंवा गदेसारखे एक हत्यार.

श्रीपतराव भाऊ यांस डोचकींत गुरगुजाचा मार आहे.
—ऐ. ले. सं. १७७०

गुजारत—मार्फत, गुजारतीनें, मार्फतीनें, द्वारा.

भेट व्हावीशी नव्हतें, परंतु विनोबाच्या गुजारतीनें अखेर कार्य साधून घेतलें.
(पे. द.)

गुडाखू—हुक्कयांतून ओढण्यासाठीं तयार केलेली विशिष्ट प्रकारची तंबाखू.

गुढार—गुढें किंवा गुळें (गुळें किंवा गुळेकरी शब्द पाहा)

गुत्का—एखाद्या वस्तूचा व्यापार करण्यासाठीं एखाद्या इसमास दिलेला पूर्णाधिकार किंवा मोनॉपली.

गुसगांव—जें एकेकाळीं अस्तित्वांत होतें, परंतु आता ज्याची कांहीं निशाणी शिल्लक उरलेली नाहीं असें गांव.

गुमान—मत, तर्क, संशय.

गुमास्ता—मालकाबद्दल मालकाच्या गैरहजेरींत नेमलेला त्याचा प्रतिनिधीभूत मनुष्य.

गुर्गुज—रवीसारखें किंवा गदेसारखें एक लढाऊ हत्यार.

गुर्झ—गुरगुझासारखें लढाऊ हत्यार. याचे टोकास रवीसारखे दाते असतात

गुरवपुंज—गुरवाला त्याच्या नोकरीबद्दल द्यावयाचा धान्याचा हिस्सा.

गुरु—फोड, व्रण, करट.

पायास गुरु जाहला म्हणून ऐकिलें. निःशेष आरोग्य जाहलियाचें वृत्त लिहावयास आज्ञा केली पाहिजे. —ऐ. ले. सं. ३८५६

गुरुगोडी—गुडगुडी.

पटनांत दारूखाना छ ९ रोजीं उडाला. गुरुगोडीची आग पडिली. तीसचालीस माणसें उडालीं व पनास माणूस जखमी झालें, याप्रमाणें वर्तमान. —पे. द. ४० पृ. १०९

गुरुचे सीख—शिखांचा उल्लेख जुन्या ऐतिहासिक पत्रांतून कित्येक वेळां 'गूरूचे शिख' असा करतात. गुरु नानकाच्या पंथाचे जे, ते गुरूचे शीख. शीख-शिष्य

१ गुरुचे सीख आपल्या मुलखास गेले.

२ राजे माधोसिंगजी याच्या मुलकांत बहुत बखेडा गुरुच्या सिखांचा पडला होता.

—पे. द. भाग २९ नं. १०५

गुरुजबारदार—गुरुज हें हत्यार बाळगणारा सरकारी ढालाइतासारखा शिपाई.

मातोश्रीबाईस दस्तके त्रिस्थळीं यात्रा करून सुखरूप नर्मदापार करून द्यावें यैसी दिल्ही आहेत व गुरुजबारदार दोघेजण व हजार स्वार दिल्हे आहेत. —दे. द. १४ पृ. ४३

गुरुरी—गरुरी- गर्व.

जुन्नरकर मोगलानेंहि आपले ठायीं गुरुरी आणिली आहे. त्याच्या पारिपत्यास स्वामीनी ये प्रांतीं असिल्याविना त्यास शह पडणार नाहीं. —पे. द. ३ पृ. १२५

गुल्दान—(न.) कात्रीनें काजळी काढून घेण्याचें पात्र.

गुल्दानें रुप्याचीं —का. पत्रें यादी पृ. २८७

गुल्दानांनीं गूल काढावें. —का. पत्रें यादी पृ. २८७

गुलगलबा—गोंधळ, दंगा. आवाई.

स्वारी चालणें ती मिसळी नेमिल्याप्रमाणें आघाडी पिछाडी डावे उजवे

बाजूचे सरदार फौज यांणीं आपलाले मिसळीस चालावे गुलगलबा कांहीं एक होऊं नये --थो. शा. म. च. पृ. ७२

रात्रीस मोर्चावर बाहेरले जाटाचीं माणसें येऊन कांहीं गुलगलबाही केला होता. —म. शि. यां. का. पृ. ३६६.

गुलजार—ताजेतवाने.

अवतरणासाठीं जेरबार करणें हा शब्द पहा. —इ. सं. दि. म. रा.

गुल्बदन—एक प्रकारचें रेशमी कापड.

गुल्बदनें रेशमी. —इ. सं. ऐ. टि. भा. ५ पृ. २३

गुल्बांग—भुमका, आवाई, बोलणें.

बेदरास येण्याचा गुल्बांग दाट होता. —रा. ७ पृ. ११२

दोन दिवस याप्रमाणेंच गुल्बांग होता. --रा.५ पृ. १८४

गुल्शन—बाग.

गुल्हेर—शेंदरी किंवा डाळिंबी रंगाचें.

मजला समागमे आणोन ठाणे मजकूरचे कामांवर ठेविले ते समई तांबडे किनखापी अंगरखा व गुल्हेर झग्याउपरी शालजोडी व पैठणीं पागोटे दिले. --शा. द. वे. पृ. २१

गुल—दंगा, गडबड, अवाई.

ती गुल महाराज होते तेथवर आली. —हो. कै. पृ १६६

गुल—फूल.

गुलअनार—१ डाळिंबाचें फूल; २ डाळिंबाचे फुलाचे रंगासारखा.

श्रीमंत चिमाजीअप्पास गुलअनारी रंगाचा जैनाबादी पोषाख दिला. --ऐ. ले. सं. ४९२५

गुल करणें—दंगा करणें, गलगा करणें. हाक, बोंब करणें.

इतुकियामध्यें गांवलोकी मिलोन गुल केले कीं, पाटिलाचे गला तुम्हावरी मुंड असोन उफराटे त्याचे गर्दन मारितां हे कोण इनसाफ ? —शि. च. सा. खंड ५ पृष्ठ १६४

बाजारचे रोजी रात्रीं येऊन कोटाचे दिंडीचा दारवटा खणोन उघडिला इतकियामध्यें रजपुताची चौकी होती त्यामधे एक रजपूत जागा झाला त्यानें गुल केला. —शि. च. सा. खं. ५ पृ. ९६

गुलगुला—आवाई.

सेनाखासकेल फौजबंदी करून गुजरात प्रांती जाणार यैसा चहूंकडून गुलगुला उठला आहे. —हिं. द. खंड १ पृष्ठ १२९

गुलदान—पुष्पपात्र.
लोटे तांब्याचे व हंडे व गुलदाने व तपेली व झाऱ्या समया व बुधल्या गुलदाने रुप्याची —लेख पृ. १३९

गुलदार—फुलें काढलेला.
नित्य नवा पोषाक रंगी गुलदार
——भा. इ. सं. मं. त्रै. वर्ष २० अंक १ पृष्ठ २६

गुल देणें—मोठ्या खिळ्याचें डोकें तापवून त्यानें दिलेला वाटोळा डाग.
भगवंतराव प्रतिनिधी यांची शरीरभावना पूर्वीपेक्षां अधिकोत्तर. पोटास गुल दिलें होतें त्यांतून पू निघत असतो. आपल्या आपण उठून बसावयाचा प्रकार राहिला. —ऐ. ले. सं. २५५०

गुलमेख—खिळ्याचा एक प्रकार. बारका खिळा ज्याचें माथें फुलविलेलें असतें. —पे. द.

गुलाबकंद—गुलकंद
गुलाबकंदाविशीं लिहिलें, त्यावरून गुलाबकंद वजन पक्कें १ शेर पाठविला आहे. —ब्र. च. पृ. १२९

गुलाबपाश—गुलाबदाणी.
सरकारात येथून तबके व पानदान व गुलाबपाश आले आहेत.
—पे. द. २० पृ. १३९

गुलाबशकरीच्या वड्या—१ रेवड्या २ गुलाब पाक.
आपण पत्र व गुलाबशकरीच्या वड्या सुमार ५० पाठविल्या त्या पावल्या. —ऐ. ले. सं. ६२९७

गुलाब शिसा—गुलाबपाणी भरलेला शिसा.
गुलाब शिसे उत्तमसे तीन-चार पाठविलेत तर बरें होतें. जिवास बरें वाटत नाहीं, यास्तव लिहीलें होतें. —ब्र. च. पृ. २५३

गुलाम—चाकर.

गुलाल—तांदूळ किंवा शिंगाड्याची पूड करून ती कांहीं वनस्पतींच्या रसांत रंगवून लाल करतात, तो पदार्थ. होळीच्या सणांत किंवा इतर देवादिकांच्या उत्सवांत गुलाल उधळण्याची वहिवाट आहे. रांगोळींतहि गुलाल घालतात.

गुलालगोटा—अभ्रकाच्या पातळ पापुद्र्याचा पोकळ गोळा. यांत गुलाल भरून ते होळीच्या सणात एकमेकास मारीत.
१ रंगाची वर्णना किती करावी? हजारो गुलालगोटे उडूं लागले. खंड्याचे खंड्या गुलाल वाड्यांत उडाला.
—पेश. बख. सोहोनी पृ. १५२

२ भोतगाडे रणगाडे गुलाले भरून चालती स्वारीत । गुलालगोटे शिवाय ठेविले निरनिराळे अंबारीत ।

—प्रभाकर ऐ. पो. के. खंड १ पृ. २००

गुलालधारी—बायकांच्या हातांत घालावयाच्या बांगड्यांचा एक प्रकार.

आज्ञेप्रमाणें मुद्दाम कारखाना लाऊन बांगड्या करवून पाठविल्या त्याला लागवड मजुरी मिळून ३७ रुपये खर्च आला.

२००० गुलालधार माळा ४
२००० राजावर्त माळा ४
२००० कालीधारी माळा ८
२००० पाटलीमाला माळा ८
२००० कारली राजावर्त माळा ८ —पे. द.

गुलालबार—एक तऱ्हेचे कनाती पडद्यांसारखें कुंपण किंवा वाड. मुसलमान बादशहाच्या खास डेऱ्यासभोंवार हें कुंपण असे.

गुली—पोवळें.

'गुलीनाम प्रवाल स्याद् बिलोर: स्फटिकोभवेत्'

—रा. व्य. को.

गुलेल—गलोल.

गुस्त— (?)

हल्लीं स्वामीनें तुम्हांकारणे हत्ती १ घोडा १ तुरा जडाव गुस्त १ येणे प्रो पाठविले आहे घेणें. —रा. ८ पृ. ८४

गुसल—अंघोळ.

आराम होऊन गुसल केली. —का. सं. प. या. व ४६७

गुळचांस जाणें—आश्रयार्थ जाणें.

१ शत्रूची फौज आली तेव्हां अनागुंदी प्रांतांत गुळचांस कोपळचे लोक गेले त्यांस नागावा वस्तभावेस वस्तभाव लुट केली आहे.

—ऐ. ले. सं. ७६६

२ रयत गुळेंस जाती. चार ढोरें पोरें आहेत. ते तरी जतन करावें असें सर्वांस लागलें आहे.

—ऐ. ले. सं. २४१४

गुळचास लाऊन देणें—आश्रयार्थ कोठेंतरी पाठविणें.

अनेगुंदी व कनकगिरी संस्थानिक यांनीं मुलेंमाणसें गुळचास लाऊन दिलीं कनकगिरी अगदीं ओस आहे. गजेंद्रगडांतील शत्रूचे कांहीं प्यादे पळाले अशी बातमी आहे. —ऐ. ले. सं. पृ. ४०९६

गुळधावा—गुळासारखी तांबूस छटा.

चौकडा हुरमुजी गुळधावा रंगाचा पाठविणें. —पे. द.

गूढस्थल—कैद; बंदीखाना.

समक्ष बोलणें व्हावें तें झालें म्हणजे दादासाहेब गूढस्थलीहून निघणार. त्यास सात लक्षांची जहागीर द्यावी ऐसा मनसबा आहे.

--ऐ. ले. सं. १७७१

गूल—दंगा, गडबड.

सदाशिवपंत करमरकर. फडणीस यास ४ मुसलमान शिलेदारांनीं ठार मारिलें. तेथील चौकीदारांनीं त्यांपैकीं दोघां मुसलमानांस ठार मारिले, परंतु दोघे पळाले. गोटांत गूल होऊन जिनबंदीदेखील जाहली होती.

—ऐ. ले. सं. २८७५

गेंदजोड—घोड्याच्या शेपटीवरील एक भूषण, किंवा अलंकार. गेंद म्ह. झुबका, गोंडा.

—पे. सा. पृ. २३८

गेर—स्वारी, दंगा.

११९।। रुपये पुणें खातें त।। कृष्णाजी विश्वनाथ सन समानीनअखेर इंग्रजाची गेर झाली ते समयीं गवतांत ऐवज घालून किल्ले विकटगडास पाठविला तेथून गवत पुणियासी नेलें त्यांतील ऐवज मोजदाद करून ठेविला.

—पे. सा. पृ. १६

गैबत—गैब १ अदृश्य. २ गैरहजर ३ अनुपस्थिति.

त्यांतच गैबत जाले. त्यांचा मुडदा देखील कोणी दृष्टीनें देखिला नाही.

—भा. ब. पृ. ६३

गैबती—गैरहुजूर नोकरी. मालकाच्या सन्निध न झालेली किंवा न होणारी नोकरी.

हुजरात आणि गैबती ।
सेवनमार्ग द्विधा असती ।
दोहीत मुख्य हुजराती ।

—मेस्तक पृ. ३८

गैबी—निनांवीं.

गैबी अर्ज.

गैबी शब्दाची महाध्वनि—आकाशवाणी.

महाराजांचे देहावसान झालें तेव्हा गैबीशब्दांची महाध्वनी जहाली, भूमिकंप होऊन धरा, तळीं तडकली

—चित्र १६७

गैर—स्वारी.

गुदस्त फिरंगाण प्रांते गैर जाली ते समई आपणास गावसमवेत रा० ऐ. श. २२

पिलाजी जाधवराव याणी धरून नेऊन बहुत इतराजी केली ते समई तुम्ही सेरीकराचा अभिमान धरून आम्हास सोडऊन आमचे बहुता रीतीनें चालविले. —राज. खंड ११ पृ. २८

गैरअदा—रद्द. न पटलेलें.
शिंदेकडील वरात जाली तर मग गैरअदाही व्हावयाची नाही.
—ऐ. ले. सं. ५२७१

ताकद राहिली नाही. हे समयी नानानी वरात गैरअदा केल्यासच परिणाम लागेल. —ऐ. ले. सं. ५६२१

गैर अमली—परस्वाधीन.
चार लक्षांचे भरतीस वेरीज अमली महालांतील कमी आल्यास गैर-अमली महाल आहेत त्यापैकी भरतीस कमाल आकाराचे वेरजेचा महाल लावून देणें. —रा. १० पृ. ३२१

गैरआरामी—अस्वस्थता.
हजरतांचे शरीरास दोन दिवस गैरआरामी आहे.
—दि. म. रा. २ पृ. ३२

गैरइतबार—गैरविश्वास.

गैर इमानी—बेइमानी.
गैरइमानी, नाही तुम्हा तिळभर माया. —होनाजी १२८

गैरकबजी—परस्वाधीन.
सरंजाम गैरकबजी कांहीं सुटला त्यांत वस्ती नाहीं.
—ऐ. ले. सं. ९४२

गैरकबजी—ताब्यांत न आलेला.
गैरकबजी मुलुक आहे. तो दबामुळें हारी यावा. त्यास प्रस्तुत फौज थोडकी. येवढे फौजेनें मातबर कामें कशी होतील ?
—पे. द. २८ पृ. १४१

गैर किफायत—तोटा, नुकसान.
किफायत, गैर किफायत, समयासमयास चित्तांत आणून किफायतीचीं कामें करीत आला, पुढें त्याचप्रमाणें करावीं.
—रा. १ पृ. ३४६

गैर कौली—परवानगी अगर अभयवचन दिलें गेलें नाहीं असा.

गैरचाकर—बडतर्फ, माजूल.
जखमी जहाले त्यास गैरचाकर करून जागिरा तगीर करविल्या.
—जो. रा. ७५

गैरजप्त—परस्वाधीन.

गैरजप्त देश साधावे. —चि. ११०

गैरत—पराक्रम, शज्जत.

गैरत—चहाडीचुगली, तक्रार.

१ मुकासी तों आमच्या वरियावर आहेत. परंतु घोरपडियाकडे कमावीस जाहल्यातागायेत हरयेक वाब गैरती येकोन साहेबाजवळ विक्षेप पडावयाचें वर्तमान विदित करतात. यांत आपण धणी आसा.

—पे. द. २६ पृ. १८६

२ मोजणी कसोटीनेंच करून सदरहूप्रमाणें दर लाऊन दिला आहे. माझी गैरत स्वामीजवळ करितील, याजकरितां विनंती लिहीली आहे.

—ऐ. ले. सं. ६९८६

गैरत—लज्जा, भीड.

हल्लींचे शिकस्तेची गैरत आणि शरमंदगी नवाबास फार जाली आहे.

—रा. ५ पृ. १९

गैरत, घैरत—आवेश, उत्कट उत्साह, पराक्रम, शौर्य.

गैरदस्ती—सरकारी करमाफ जमीन किंवा कांहीं जिन्नस.

गैरबर्दार—फळहीन.

पोफळीं गैरबर्दार शेंडे वाळलेल्या आहेत. —रां. ११ पृ. ७९

गैरबरायें गोष्टी—गैरकायदा गोष्टी.

तर मधीलमध्यें तुम्हास वतन विकत द्यावें या गैरबरायें गोष्टीचें वर्तमान मनास आणण्याकरितां तुम्हास यावयाकरितां आज्ञा केली.

--ऐ. सं. सा. खं. १ पृ. ११३

गैरमजा होणें--मजा नष्ट होणें; सौरस्य नष्ट होणें.

(गडकरी) विचारास न येत तर आम्हांस तो खावंद अडकून पडला—त्यासाठीं जोर करणें प्राप्तच आहे. परंतु मग गैरमजा होऊन नरम होतील. त्यापेक्षां आता दूरंदेशी गडकरी करून, वर्तणूक करीत ऐसे करणें.

—पुरं. द. भा. १ पृष्ठ १९५

गैर महसर्दार—अप्रतिष्ठित. --रा. खं. ८ पृ. ४३

गैर महसूल--सरकारधाऱ्याविरहित केलेला वसूल.

विजापुराहून एक हवालदार गैरमहसूल पैदागिरी कबूल करून आला.

--इ. ऐ. अं. ५ पृ. १००

गैर माकुल--मूर्ख, अजाण, गैर, मुर्खपणानें. गैरकायदा, बेहिशेबी, अयोग्य.

नवें कचाट करून कारबारास खलेल करणें हें गैरमाकूल गोष्टी आहेत.

--रा. १८ पृ. ३३

परंतु लोक गैर माकूल आम्हांस नकळत वर्तले तरी त्याची बदलामी आपणावरी न ठेवावी. --रा. ८ पृ. १०

गैरमाकुल कथला करील त्यास ताकीद करणें ज्याजती नौजिकीर होऊं न देणें. —ऐ. सं. सा. खंड ११ पृ. २

गैर मिराशी—वंशपरंपरा ज्याची मालकी नाहीं असा.

निवाडा केला जे रामरामे महाजन मिरासदार, मातकदीम मिराशी खरी जाह्ली, काण्णव मजकूर गैर मिरासी, मुतालीक ऐसे जाले. --इ. ऐ. ५ पृ. १०२

गैर मुजरा, गैर मजुरा—गैर चाल. ---राजवाडे ८ पृ. २६

गैर मेहनत--निरुद्योग.

परंतु मेहनत गैर मेहनत सर्व एक ईश्वरी क्षोभानें वाया गेल्या. —इ. सं. ऐ. च. पृ. ५

गैर रजावंद—नाराज, नाकबूल.

तो क्रियेस गैररजावंद जाहला. --शा. रो. पृ. १३२

गैर रह्या--रस्ता सोडून बेकायदा.

भुजंगराव यांची वर्तणूक गैररह्या दिसते. --ऐ. ले. सं. ५७७५

गैरराबता—माणसें भेटीस येण्यास प्रतिबंध.

नानांजवळ तूर्त गैरराबता बहुत जाला आहे. —ऐ. ले. सं. ४१५४

गैरराह—अन्यायाचा, गैरशिस्त.

पक्षपातानें येखादा इनसाफ गैरराह जाला असें चौकशीनें ठरलें असतां दुसरेयाणे इनसाफ वाजवी करवून विल्हे लावित असत. —पे. द. ४५ पृ. १४०

गैरवाका—१ न घडलेली, खोटी बनावट गोष्ट २ लबाडीनें.

ऐसा गैरवाका सांगितला. —रा. ८ पृ. ५२

वाका अगर गैरवाका समजाविल्यास ऐकावयाचा नाहीं. समजूनच करणें तें केलें जाईल. —ऐ. ले. सं. ३५५०

गैर विल्हेस पडणें—गळबटणें.

पत्र काढावें म्हणतात, त्यास याचें पत्र गैरविल्हेस पडलें, सांपडत नाहीं. —ऐ. ले. सं. २४७४

गैरसाल---अनिश्चित काळाचा.

गुणनवरे यांनीं कागद एक काढिला तो बहुतां दिवसांचा गैरसाल. --रा. ६ पृ. ८९

गैरह--इतर, शिवाय.
गैरहुरमत–अप्रतिष्ठा, बेअब्रू.
गैरहुशार—असावध, गाफील.
गैराद—वरकड, इतर लोक.

—सभासद पृ. १४

गैराद—हंगामी, नवे आलेलें कायम नेमणुकीचें नाहीं असें.
ही फौज बरकराराची तावीनात. याखेरीज गैराद हशम व मवास यांची फौज ४०००, याप्रमाणें फौजेचा कट्टा —चित्र १४

गैरी—अन्याय.
ज्याकडेस गैरी लागेल त्यापैकी मसाला होनु एक देणें.
—सा. सं. इ. जु. ले. पृ. ८८

गोकाख—गोखाना (?) थट्टी.
सायंकाळीं नजर बागांत बसून गोकाखेच्या गायी तेथें आणवून पाहिल्या.
—नाग १ पृ. २९२

गोखरू—सराटा; ढाखिणी गोखरूची जी जात आहे तिचे सराटे तिकोनी असतात व त्यांच्या तिन्ही टोकांस काटे असतात. त्याच धर्तीवर जुन्या काळी पोलादी सराटे करून, ते पसरून देऊन शत्रूच्या घोडदळाला अडविण्याचा प्रयत्न केला जाई.

गोचर्म—जमीन मोजण्याचें एक जुनें माप. गाईचें कातडें पसरलें असतां तें व्यापील तेवढी जमीन.

गोखा—(गवाक्षाचा अपभ्रंश)–झरोका, खिडकी.
अलीकडे श्रीमंतांची प्रकृत हुषार आहे. छ १ रोजीं चाफेखणावर दिवाणखान्यांत गोखेंत येऊन बसले होते. —ऐ. ले. सं. ७८८१

गोगा—गोंधळ.
त्यासी तेथील प्रकार पाहिला तर सारा गोगा होता म्हणून तेथून उठोन आलों. —पे. द. भाग २९ पत्र नं. ४७

गोचर करणें—दृष्टीगोचर करणें, नजरगुजार करणें.
सर्वांचे मुजरे घेऊन सेनासमवेत उभे राहिले. भाऊसाहेबांनीं सारी सेना गोचर केली.
—पाणि बख. पृ. ३८

गोटागुंता—(गोटा म्ह. धान्याचा गोटा) भावार्थ सुतळीचा तोडासुद्धां.
सलुखाचा प्रकार बनत नाहीं. याउपरी स्थलांतर करणें. ढील न करणें. गोटागुंताहि घरा नसो देणें. संकटें मोठी आहेत. मुलें माणसें अन्यत्र स्थलीं जलदीनें नेणें.
—चं. चू. द. पृ. १२९

गोडवे गाणें—मूळ अर्थ स्तुतिस्तव करणें. पण कित्येक वेळा निंदा करणें या अर्थीही वापरला जातो.

या प्रमाणें आम्हासी कृत्रिम करून शेवटीं मरून गेले. असें असून उफराटें तुम्ही आम्हावर गोडवे गातां याजवर आपल्यास काय म्हणावे ?

—भा. व. टि या. कै. पृ. ४

गोडवे सामान—गोडे सामान म्ह. दारू बंदुका तोफादिकानी न लढणारी तर तरवार भाला इ. साधनांनी लढणारी पायदळाची किंवा शिलेदारांची फौज.

रांगड्यांनीं तीन टोळ्या करून पलटण तोफखान्याचे तोंडावर न येतां बाजूनें गोडवे सामान पाहून डावे बाजूस आंबोजी इंगळे मुकाबल्यावर उठावणी केली. —भाग २ पा. ५४

गोंडी करणें—दुंडी; दंगा.

इतकियांत गौरझांबरे येथे दुर्गसिंगाचा भाऊ भारतशाहा होता. त्यानें गोंडी करून गांव लुटून गांवास आगी देत होता.

—पे. द. भाग २० पत्र नं. ३

गोडी दारू—शोभेची दारू.

दारूची पाटी रस्त्यांतून फिरवूं नये व मिरवणुकींत गोडी दारू लावीत जावी. तारा फटाका वगैरे मिरवणुकेंत दारू नसावी.

—लेख पृ. १३५

गोडी फौज—भाला, तलवारीनें युद्ध करणारी शिलेदारांची घोडदळाची फौज.

शत्रूच्या तोफेपुढें आमची गोडी फौज झटल्यानें फौजेचाच नाश होतो.

—ऐ. ले. सं. ३६००

गोडे हतेर--गोडे हत्यार, भाला, तरवार, सांग, सोटा इ. हत्यारें हीं गोडी हत्यारें. या उलट बंदूक, तोफ इ. हीं उडती हत्यारें.

परंतु तीन तीन बाराची दारूगोळी दिली ती सरली. आणखी दारू गोळी मागावयास लागले तों साहित्य नाहीं याकरितां गोड्या हत्येरानें लोकांचा टिकाव कैसा होईल. दारूगोळीखेरीज उपाय नाहीं.

--पे. द. १६ पृ. ६०

गोणगोठ—गोणी; गांठोडें; ओझें.

यामधे आपणावरील x x बाद कमी येईल म्हणोनु येथे बरो देता नय. गुंज्यास नाहीं. कोठून गोणगोठ येते त्याचा हासील मात्र.

—पे. द. ३१ पृ. ९७

गोतकाशी—काशीगोत-गोतगंगा. गोतांतील पंचमंडळी N. The caste collectivley as assembled in investigation or adjudication.

तुम्ही धाकटे येसे असता सावाजी सेटीया वडील याचा खून कायेबदल केला? त्यास बहिरोजीने जाब दिल्हा जे आपला चुलता हरजी नाकाबिल होता. त्यानें गोत्रहत्या करू नये ते केली, त्यापासून अंतर पडिलें. आम्ही गोतकाशी आहो. रास्ती करणे.

—ऐ. सं. सा. खं. ४ पृ. ६४

गोतपात किंवा **गोतबात**—जातींत घेण्यासाठीं, एका पंक्तीस जेवावयास बसण्याचा समारंभ.

फाल्गुन मासीं इंदुरास मुक्काम आला तेथें तुळसाबाई (ही यशवंतरावाची रक्षा महानुभाव पंथाची होती) व मल्हारराव महाराज वर्तमान (सध्यां विद्यमान असलेले) यांचीं गोतबात झाली. दिवसोंदिवस अधर्माचे आक्रमण विशेष पडत चालले. —हो. कै. पृ. १७६

गोताई, गोतपत—जातिभ्रष्ट झालेल्याला पुन्हा जातींत घेण्याचा विधी.

गोतिया—गोतावळा, गोत्रज.

आपले कोणी भाऊबंद दाईज गोतिया उभा राहिलियाने त्यास आपण समजाउनू. —शि. च. सा. खंड ५ पृष्ठ १७१

गोद—खोल.

गोदरी—समाज, समुदाय. —रा. व्य. को.

गोदिव्य, गौदिव्य—गाईची शेपूट हातांत धरून साक्ष देण्याचा एक जुना दिव्याचा प्रकार.

गोदंती हरताळ—(नपु.) एक पिवळें विषारी द्रव्य. त्याचें भस्महि करितात. वैद्यकांत उपयुक्त.

गोदंती हरताळाविशीं एक दोन रोज शोध केला. परंतु मिळालें नाहीं.

—ऐ. ले. सं. ५१५४

गोध, गोधू—धनुर्धाऱ्यानें दोरीने हात सोलटूं नये म्हणून घालावयाचा हातमोजा.

गोधूळ लग्न—गोरज मुहूर्तावरचें लग्न. गाई रानांतून सायंकाळीं परत येत असतां त्यांच्या खुरांनीं धूळ उडते असा काळ म्हणजे सायंकाळ.

श्रीमंत हरीहरराव यांचें लग्न भृगुवारीं अष्टमीस गोधूळ लग्न झालें.

—ऐ. ले. सं. २४४२

गोपचार—गाईंच्या चरणाकरितां राखून ठेविलेलीं गांवकुरणें.

प्रांतांत गोपचार व रानें वगैरे ठिकाणीं ओसाडी जमिनी आहेत त्यांचे लिलांव ज्यास पाहिजे त्यांनीं घ्यावे.

—पराग वर्ष १ अंक ५ पृ. १६

गोफ्तगो, गुफ्तगो—संभाषण, बोलाचाली.

त्या उपर बहुत गुफ्तगो जाली.. —रा. २० पृ. ३८

गोमटे करणें—गौरव करणें; परामर्ष घेणें, लाड पुरविणें.

तुम्ही संताजी घोरपडे कैलासवासी याजपासी पूर्वी येकनिष्ठपणें सेवा केली त्याणी लेकपणे तुमचे सर्वस्वें गोमटे करून चालविले.

—पे. द. ३१ पृ. ८५

तुम्ही आमच्या राज्यामध्यें आलीयानंतर तुम्हास हफ्तहजारी दौलत द्यावयाचा निर्वाह केला आहे. तुमचें गोमटें करून चालवायाचेंविसी सहसा अंतराये होणार नाहीं. —शि. च. सा. खं. ४. पृ. ७९

गोयन्द (गुफ्तन)—बोलतात.

गोया—जणुं, म्हणजे.

जे येसमयीं आपलें येणें गोया करामात (महत्कृपा) जाली.

—रा. १ पृ. १८८

गोरकफन, गोरखपण—शवावरण; उत्तरकिया.

गोरखी— मंडप, मांडव

हजरतीनी किल्लाचे दरवाजियानजिक मोठी गोरखी दहा हजार खासा बसावयाची उभी केली. —शि. प्र. ब. पृ. ५०

गोरबंद—घोड्याच्या तोंडास शोभेकरितां घालण्यांत येणारा पट्टा.

गोरबंद व सरोसर पाठविणेस आज्ञा व्हावी.

—ऐ. ले. सं. ६३२३

गोरी—प्रेत, चिता.

तुम्ही साहेबकामावर खर्च जाला तर देशमुखीचा सिका तुमचे गोरीवर ठेवू हा निशा समजोन तुम्ही खुशाल जाणें यैसे महाराजानी बाजी यशवंतरायास अभये देऊन बेलसरचें स्वारीस पाठविले.

——शि. च. सा. खं. ५ पृ. १७

गोरी (?)

शिरपेंच व जेगा व विलायती गोरी व खंजीर व पेटी लोखंडी दस्तान्या २ व बोकमार १ आम्हांस इंग्रजांच्या वकीलाच्या घरीं मिळाल्या. आज ते आमच्या डेऱ्यास येणार, तेव्हां इकडूनहि सदरहुअन्वयें बहुमान केला पाहिजे. —ऐ. ले. सं. ४३३०

गोरु, गोरी—गाय किंवा बैल.

गोल्या—पाठीवर लांकडी उखळ व मुसळ घेऊन घरोघर जाऊन भात सडून देण्याचा धंदा करणारा. तांदूळ सडणारा.

—पे. सा. २३९

गोल—एकत्र आंवळून उभा राहिलेला जमाव.

स्वामी एक गोलानें राहून असल्यास येथेंहि अवघड सर्वांस वाटेल. (एकत्र जमावानें सर्व मजबुतीनें राहिल्यास इकडून 'दगा करा' असें सुचविणारासहि विचार करावा लागेल.)

—ऐ. ले सं. ६३८७

गोलाटपा—नेमणूक; वसूल; जहागीर.

समशेरखान यास पुत्र नाहीं. यास्तव फत्तेखान, यास दत्तपुत्र देऊन गादीचे खावंद फत्तेखान यास करावे. पुढें ईश्वरी इच्छेने समशेरखान यास पुत्र जाल्यास त्यास गादीचा संबंध नाही. त्यास निर्वाहाबद्दल गोलाटपा बेवीस गावचा द्यावा. आणि गादी पुढे फत्तेखान याचेच वंशाकडे चालावी.

—शा. द. वे. पृ. ५६

गोवर्धनदेवी—गोस्तनदेवी.

रयत लोकांच्या वगैरे मुलांस गोवर्धनदेवी काहाढण्याबद्दल अजम सूसराग्रीन साहेब दाक्तर याजकडील कारकून आले आहेत.

--पे. द. ३१ पृ. १५७

गोवरपा— (?)

छत्री हिरवी अतलसी, तीस सोन्याचा कळस व गोवरप्यांचे काम

—मरा. कु. इ. अकंली शितोळे

गोवागुंता—अडचण; गुंता.

पुण्यांतील लोक बहुत सावध जाहले आहेत. मातबरहि हुशारीनेंच आहेत. गोवागुंता ठेविला नाहीं. —ऐ. ले. सं. ४८५९

गोश्‌गुजार—श्रुत.

अज्राहे दोस्ती तुम्हास गोश्‌गुजार करून ठेवितो हें निमित्य उलट येईल.

—रा. ५ पृ. १६४

गोशमाली—कानपिळी, शिक्षा, नतीजा, शासन.

इंग्रेजास गोशमाली करून, सलतनतीच्या कामास रवनक व जेब द्यावी हे दिलापासून मंजूर. —हिं. द. खंड ९ पृष्ठ ७८

गोशा—धनुष्यास दोरी लावतात त्या टोकास गोशा म्हणतात.

टणुकर मोहिते यांणीं महाराजास कमान (धनुष्य) नजर केली होती. ती वाईट, गोषा टाकते (म्हणजे त्याची दोरी टोकापासून निसटते) म्हणोन महाराज याणी परत केली. —पे. द.

गोशेनशीन—गुप्तपणें, कुफिया.

गोवर्धन खीचीनें याजला गोशेनशीन सांगून पाठविलें.

—जो. रा. पृ. ८

गोश्पेच, गोस्पैच—थंडी लागू नये म्हणून कानांवरून बांधलेली टापशी.
गोष्ट—गोष्ठ, गोट, तळ.
याप्रमाणें भाषणें होऊन चेतसिंगानें इंग्रजाचा निरोप घेतला व इंग्रजाचे गोष्टाबाहेर निघाला. —पुणें अख. भाग २ पृ. ३९
गोष्ट उतरणें—गोष्ट घडून येणें.
ताई तेलीणसुद्धां सांपडली. वरकड लश्कर लुटलें गेलें. आता मातोश्री सुद्धां सारें लष्कर कऱ्हाडकडे येणार. गोखले व अप्पासाहेबांकडील फौजांनीं पंतास बोरगांव येथें वेढून हें काम केलें. मी येणार होतों. परंतु गोष्ट उतरली, यास्तव विनंती लिहीत आहे.
—ऐ. ले. सं. ८२१६
गोष्ट जाणें—(एखाद्यापासून एखादी गोष्ट जाणें) एखाद्याकडून चूक होणें, प्रमाद घडणें.
अवतरणासाठीं 'तुटक' शब्द पाहा. —पाणि बख. पृ. ३५
त्याजवर 'आम्हांपासून गोष्ट गेली, क्षमा करावी' अशा अन्वयें त्याणीं विनंती केली. —ऐ. ले. सं. ५४०२
गोष्ट लपणें—गोष्ट लोपणें, एखाद्यास अज्ञात राहाणें.
रुकनुदौलाचे चित्तांत भोसले व मामाची भेट अथवा समीपता होयेतो पावेतो त्यास मनसबा कलो नये हे आहे, परंतु त्याला गोष्ट लपतील यैसे नाही. —पेठे दप्तर भाग २ पृ. १७
गोष्टीगपा—गप्पागोष्टी; वलगना; पोकळ बडबड.
त्यास गोष्टीगपा रामाजीपंताच्या प्रसिद्ध आहेती.
—पे. द. १० पृ. ६९
गोष्टीमात—गोष्टी, बातचीत, हकीकत, बोलणें चालणें.
१ महमदअलीखाने नंदराजाचे घरास जाऊन कित्येक गोस्टीमात शफतपूर्वक करून किल्ल्याचे किल्ल्या त्याचे स्वाधीन केल्या.
—E. M. P. पृ. ११३
२ श्रीकृपेनें सर्व फितूर तुटतील आपली गोष्टीमात पक्की जालिया आम्ही यावें. याप्रमाणें तुम्हांस लिहीत गेलो.
—हिं. द. खंड २ पृष्ठ ४१
३ तेथून कडपेयासी आलों. उभयेता पठाणाची गोष्टीमात अभिप्राव कलला. —पे. द. २८ पृ. १०८
गोषगुजार—श्रुत.
ते मजकूर नवाबसाहेबांचे खजमतेस गोषगुजार जाले पाहिजेत.
—पे. द. २५ पृ. १३

गोषा—(मूळ शब्दार्थ कोंपरा किंवा टोंक) धनुष्याची प्रत्यंचा. जेथें दोरी अडकवितात तें धनुष्याचें टोंक.

उभयता सरदार व राहुरकर यांचा संकेत होता की जाटाचे लढाईचे प्रसंगीं दोन्ही गोषावर उभयतांनी असावे. मध्यवर्ती हुजरात (असावी) हुजरातीचे निशाण उठले म्हणजे यानी बेलाषक उठावें.

—हो. कै. पृ. ६५

गोषानशीन—एकांतवासांत राहाणारा मुसलमान साधू.

गोसमाल—गोषमाल, शिक्षा.

तुम्ही परागंदा होऊन बाहेर गेलेसि तरी याचे सिरी साहेब धिग असतां यैसा हैफ जाहला, आतां त्याची द्वाही घेऊनु फरजंद हाती धरूनु सरफराज केला पाहिजे. व वेरीसदारानी ज्यानी लावून देऊन सीर साहेबी पाठी राखली पाहिजे. —शि. च. सा. खं. ५ पृ. २

गोसावियाचे दुष्मनास आजार—खुद्द स्वामीच्याच शरीरास आजार! ही दरबारी लिहिण्याची पद्धत!

येथें आलीयावर ऐकले कीं गोसावीयाचे दुष्मनास आजार आहे. (म्ह. तुम्हास कांहीं आजार झाला आहे.) येणें करून चित्तास समाधान नाहीं. कृपा करून आपले आरोग्यवर्तमान लिहिणे. तरी समाधान होये.

—पे. द. १० पृ. ९२

गोसेनिसीन—एकांतवासांत असलेला.

(अवतरणासाठीं 'खुफिया' शब्द पहा.)

—पुणें अखबार भाग १ पृ. १३९

गोही—साक्ष.

नंतर वाळव्यांत हुजरे होते, त्यांस आणिलें. त्यांणीं गोही भरली कीं, ठाणें रामचंद्र पर्शराम यांचें आहे. —ऐ. ले. सं. ६५२७

गोहीभास—साक्षीपुरावा.

लग्नसंबंधी पाणिग्रहण आपण त्यांचा उपाध्या म्हणऊन आपण घेऊं. देवप्रभु यासी घेऊ नेदी म्हणऊन बोलिला या उपरी पूर्वपर मनास आणिता गोहीभास होये तोवरी अदबखाना ठेविले.

—शि. च. सा. खं. २ पृ. २९७

गौळक—एक जात. ही जात हीन समजण्यांत येत असे. कुंडगोळक, रंडगोळक वगैरे आणखीहि त्यात पोटभेद असत.

गोळा खालीं जाणें—गोळ्याचा नेम चुकणें, फुकट जाणें.

किल्लेवरी गोलंदाज ऐसे मारितों कीं दहा पांच चांगलें खळणपांघरूण

पाहिलें म्हणजे गोळा मारिलाच ! दोघे चौघे ठार ! एक गोळा खालीं न जाय, असा मारितो ! कोणती म्हणून तारीफ लिहावी !

—ऐ. ले. सं. २५१५

गोळीची मारणी—गोळीचा टप्पा.

नदीचें कांठापासून खंडोबाचे देवळापर्यंत गोळीचें मारणीवरून देवळा-चेंही पुढें दोन गोळ्यांचे मारणीचे टप्प्यापावेतों उतरले आहेत.

—पे. द. भाग ४१ पत्र नं. १५८

गोळी वाजविणें—गोळी मारणें.

ठाण्यांत आरब होते त्यांणीं गोळी वाजविली.

—ऐ. ले. सं. ५६७२

गौगवा—गवगवा.

येथे तर फौजेचे खर्जाचा गौगवा. ऐवज न देतां उगीच बोलणे तूर्त येथे शिलेदारांना गोड लागत नाही.

—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. २१

गौप्यतेंत आणणें—गुप्त ठेवणें.

स्वामींनीं माझी हीं पत्रें पाहून गौप्यतेंत आणावी.

—पे. द. २५ पृ. ८६

गौर करणें—संरक्षण करणें, साहाय्य करणें. गौरव; खोल व पूर्ण विचार. काळजी.

१ आपाजी गणेश सुभेदार प्रांत गुजराथ याजकडे पत्र पाठविले की श्रीमंताचा मुलूख तुम्हास तैनात केला असतां गायेकवाड याची फौज येऊन अदावतीने वैरान करितात त्यास आमची गौर करावी. त्याचे उत्तर आले कीं आमचे चालत नाहीं. तुम्ही श्रीमंत साहेबाकडे अर्ज पाठविणे तेथून गौर होईल. —ऐ. सं. सा. खं. ३ पृ. १०९

२ आम्ही सदैव पदरीचे जाणोन स्वामीनीं गौर करीत गेलें पाहिजे.

—पे. द. ४० पृ. १६

—रा. खं. १० पृ. २५२

१ यांची हरएकविषयी गौर करीत जाणें. —रा. ३ पृ. २०५

२ परंतु रयतेची गौर करून कमावीसदार यांची तहकीकात करीत नाहीं.

—म. द. बा. भा. २ पृ. ५७

गौरपरदास्त—सन्मान.

अवतरणासाठी 'सिलह' 'किंवा खटाई' शब्द पाहा.

—E. M. P. पृ. ९९

गौरबरदास्त—गौरव व सन्मान.
चार महिने निखालस राहिल्यास पाटीलबाबाजवळ रजबदल करून तुजवर गौरबरदास्त करूं. —म. द. रु. ३ पृ. ८२

गौरमुख—इंग्रज.
मुंढरगी महा लबाड आहे. धोंडजी वाघाकडे मिळून होता. त्याजवर कांहीं गौरमुख येणार असें वर्तमान आहे. —ऐ. ले. सं. ७०३४

गौरशी—खोल चौकशी, परीक्षा, गौरव, सरफराजी.
आमची गौरशी करून आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणुकेस हजीर आहों. —इ. सं. ऐ. स्फु. ले. पृ. ५२
आम्ही कामकाज केलें हे धनी दृष्टीनें पाहून गौरशी करील म्हणोन आस्था होती. —का. सं. प. या. पृ. १००

गौरस—गौरव.
अजम जनराल यांणीं बहुत गौरस करून भेटीस नेले आणि आपलें पत्र सादर केलें. —पे. द. ३३ पृ. ७३

गौरसी—गौरव, सन्मान.
मोराजी सिंदे यासी येक दिवस ठेवून गौरसी करावी. दुसरें दिवसीं त्यास आज्ञा दिली पाहिजे हे विज्ञप्ती. —पे. द. ३४ पृ. ८०

गौरा— (?)
" दालदी लोक चाकर यासी तगादा न लावणें बरकढ **गौरा** जिराईती वसूल मना केला नसतां आपणासी मन मानेल तैसे लिहितात. तेच आपणासी खरें वाटतें. — पे. द. ३३ पृ, ८२

गौल्यता—गोडी, गोड भाषण, गौरव.
१ बलवंतराव सदाशिव यास पाटीलबावाकडे पाठविलें. त्यासी कांहीं दिवस विचारच जाला. त्यावर कांहीं गौल्यता दिसते. त्यावर परस्पर संदेश (संदेह). मनांत विश्वास येत नाहीं. —म. द. रु. ३ पृ. १८४
२ पत्रें येतील तीं माना (मायना) नीट लिहून सलाम लिहीत जावा आणि गौल्यता नीट पत्रांत असावी. थैल्या चांगल्या व अपसानी कागद याप्रमाणें पत्रें येत जावीं. —ऐ. ले. सं. ८२२८

गौहर—मोती.

ग्रंथिमोचक—चोर, गांठोड्याची गांठ सोडून माल पसार करणारा.

ग्रहस्तपणें सांगणें—संभावितपणें सांगणें.
उदईक बिरजनाथास उत्तम रीतीनें ग्रहस्तपणें तोंडात साकर घालितो कीं असी कोतेअंदेशी न करी. —पे. द. भाग ३८ पत्र नं. ४

गलांत—रदबदल, शिफारस.

महाराज छत्रपती यांची भेट केली. नंतर याणीं त्यासी आम्हाविसी गलांत बहुतपणें केली आणि हें पद प्राप्त करविलें.

—ऐ. सं. सा. खं. १ पृ. ११७

ग्याली—एक तऱ्हेचें गलबत.

इंग्रजाच्या ग्याल्या आजीच तीन खांदेरीबाहीर आल्या आहेत.

—पे. द. ३ पृ. ६६

ग्लानी—आर्जव, अजीजी.

पवाराचे कारभारी कौठेकर यांनीं उदाजी पवार याशीं बुद्धिवाद देऊन कायल केलें कीं 'तुम्ही फार चुकला. या प्रसंगीं श्रीमंतांनीं बहुत ग्लानी केली. तुम्ही रुकार न दिल्हा यांत आपले पायावर धोंडा पाडून घेतलात.'

—हो. कै. पृ. ७

ग्लानी होणें—नष्टांश होणें, कमी होणें.

महाराज अहल्याबाई पुण्यप्राणी। संपूर्ण स्त्रियांमधि श्रेष्ठ रत्नाची खाणी। दर्शनें मोठ्या दोषांची होइल ग्लानी।

—ऐ. पो. के. खं. २ पृ. २३१

ग्वाही—साक्षीदार.

ठाणीयास कज्या चालविते जाहले मग कुंडपुरोपासून ग्वाही आणविले (कुंडपुरोचे साक्षीदार आणविले. कुंडपुरो हें एका माणसाचें नांव आहे.)

—पा. क्ष. ज्ञा. इ. पृ. २३

ग्वाही—साक्ष.

गुहागरच्या महाजनकीचें वतन हजार रुपयांस विकत घेतलें म्हणून विठ्ठलराव परचुरे यास बोलाऊन सांगितले कीं, या वतनाचे सनदेवर देसमूख व देशपांडे वगैरे वतनदारांची ग्वाही करून घेणें.

—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. ७३

घ

घजन्फर जंग—रणसिंह, एक पदवी. —म. म. ५८

घटका—सध्यांच्या २४ मिनिटांची १ घटका होते.

घटकापात्र—एक धातूची तळास छिद्र पाडलेली वाटी पाण्यांत तरती ठेवतात. ती भरून बुडाली कीं, एक घटका झाली. अशी कालगणना करून तास वाजवीत असत.

घटती—घट, कमती होणें, नुकसान.

अन्वय मात्र घटती आहे. वरकड सर्व अर्थ समजलेच आहे.

—म. शि. यां. का. पृ. ३३१

घंटाघोष—घंटाघोष करणें—१ कंठशोष. २ कानीं-कपाळीं ओरडणें. ३ दबाव बसविणें, कीर्ति पसरविणें.

वजारतमाबास हिसके दिले. ज्या गोष्टींत बाईसाहेबांस त्यांचा तिरस्कार येई तेच गोष्टीचा त्यांजवळून अत्याग्रह करविला या प्रकारींचा घंटाघोष केला. —पे. द. २६ पृ. १४९

तरी तुम्ही या उपरी अंगेज करून, जे सामील करून घ्यावयाचें ते सामील करून घेऊन या प्रांते इकडील सेवकपणाचा भारीपणें घंटाघोष करून संतोषवर्तमान लेहून पाठविणें.

—इ. सं. प्रा. म. सरदार पृ. १७

घटाटोप—any hemispherical covering or canopy, a dome or cupola. पोकळ आवरण, गवसणी, खोळ.

२५ रु. शुक्रवारचे थोरले वाडयांत दोन घडयाळें आहेत त्यास दोन गजनीचे घटाटोप केले. छ २ रबिलाखर. —पे. द.

मिरजेहून घटाटोप पावल्याचें उत्तर आलें कीं नाहीं ?

—ऐ. ले. सं. ५३५६

घटाटोप करणें—जामानिमा करून सज्ज होणें, किंवा चिलखत वगैरे घालून शस्त्रसज्ज करणें.

नंतर वाडयांतील माणसें व सदाशिव खिजमतगार यांजला दरवाजाबाहेर चारजण व कोठीकडील माडीवर एक दोन घटाटोप करून बसविलें. माणसें पाहून मग काळे याजकडील लोक आले नाहींत.

—ऐ. ले. सं. ६१९१

घंटारव—सर्जेराव घाडग्याचें सांकेतिक नांव.

विदुरनिकट संकर्षण यांस प्रतिबंध करावा, अशी बुद्धि घंटारवाची जाहली असें वर्तमान आहे. —ऐ. ले. सं. ६३२०

घडयाळ—ज्यावर ठोके देऊन घटका-प्रहर कळवितात असा काशाचा पत्रा.

घडशी—एक जात. हे लोक वाद्यें वाजविण्याचा व गाणीं लावण्या-पवाडे म्हणण्याचा धंदा करतात.

घडेबाजी—घडयांत दारूचे फटाके वगैरे स्फोटक पदार्थ घालून उडविण्याचा एक प्रकार. Asport with fireworks, the stuffing of a pitcher with squibs, crackers, balls etc. and exploding the whole atonce.

घडेबाजी करून हत्ती वर घातले होते. परंतु हत्ती ठरले नाहींत.

—ऐ. ले. सं. ४६३३

घणसदी—जबरदस्ती, जोरा.

महमदअलीखानास वुडऊन फौजा जमा करून त्याची आमदानी जाहलियाने मुकाबिला करू. घणसदी केले वाचून मूलूक व पैके राहणार नाहीं.

—E. M. P. पृ. १०२

घनीमत—फायदा.

घबाडमाप—नेहमींच्या मापापेक्षां अधिक मापानें दिलेला जिन्नस.

घमगी—विषादयुक्त, दुःखी, कष्टी.

घर करणें—बस्तान बसविणें.

त्याहि हर कैसे नवाबास आर्जव करून आपलें घर करावें म्हणोन श्रीमंत राऊजीकडून मोठे नवाबास १० मोहोरा नजर करविल्या.

—पे. द. १० पृ. ३४

घर खालीं असणें—घरांतील पुरुष मनुष्य मृत्यु पावणें.

कासीबा देशपांडे यांचा घर खालीं होता त्याची बाईको तिसी कासीबा देशपांड्या गेला. सबब दोघास धरून कांगोरी किल्ल्यास अटकेस ठेविलें.

—ऐ. सं. सा. खं. ४ पृ. १०७

घर निघणें (एखाद्याचें)—एखाद्याच्या आश्रयास जाणें.

आमचे तरी होणें काय आहे ? दोन बोटें दाली बांधली आहे. तेव्हां जातीचा झाडा देऊन मरो! किंबहुना हाबसी फिरंगी याचें घर निघोन सारेवाद (बाटून मुसलमान होऊन) होऊनू सूड घेऊनू

—पे. द: ३३ पृ. १२८

घर पाहाणें—घरीं जाणें, घरीं मुलाबाळांत जाणें.

गंगाधरतात्या याणी दादासाहेबांपाशीं आज्ञा मागितली कीं, फौजेस पांच वर्षे जाली. हिशेब करून घर पाहावे हा इरादा.

—हो. कै. पृ. ४२

घरबार—घरचा कारभार किंवा मुखत्यारी.

पृथ्वीपतीची कृपा सहादतअलीवर फार आहे. पहावें काये ठहरते. परंतु पूर्वकर यासीच खूष आहेत. यानी सारे घरबार त्याचेच स्वाधीन केला.

—हिंगणें दप्तर (भाग) दुसरा पृष्ठ १०६

घरबूड—सर्वनाश.

भवितव्यापुढें कोणाचा यत्न नाहीं. आबा गेला! ईश्वरें आमची सर्व प्रकारें घरबूड केली!

—ऐ. ले. सं. ४१८८

घरवाहो—वहिवाट, कारभार.
वेदमूर्ती देवस्वामी चिंचवड याचा इनाम जमिन घरवाहो करितातो त्याची सरदेसमुखी त्याची त्या खालें पडिली आहे.
—शि. च. सा. खं. ५ पृ. १८

घरभाट— घराच्या सभोवती स्वसत्ताक घराखालची जी जागा तें घरभाट (शास्त्री कोश)
उत्तरेस रुद्रसेणवी कुळकर्णी याच्या घरभाटाची मेर (सीमा, हद्द)
— के. सं. भट दप्तर मालवण

घरसमुदाय—घरचाच परिवार.
आमचा घरसमुदायच आठशें होईल.
—म. शि. यां. का. पृ. ५४७

घरसंसारांतून उठणें—सर्वस्व हरण होणें; घरदारहि विकावें लागणें.
कृपा केलिया आबरू राहात आहे, नाहीतर स्वामीचे सेवेशीं अंतरतो. घर संसारांतूनही जातो. — पे. द. भाग २९ पत्र नं. ५२

घराणदाज—घरंदाज.
ते घराणदाज थोर. वास्तव अटकाव केला असल्यास मोकळी होऊन (मोकळीक करून मुक्तता करून) मासुरास पाठवून द्यावे.
—ऐ. ले. सं. ६३४७

घरास येणें—अवस्थेप्रत येणें.
मागती चौघे शहाणे मिळून दुसरी फार कलमांची याद लिहिली याजमुळें या घरास आले ! ऐसें होऊ नये. —ऐ. ले. सं. ६६८२

घरौट— (?).
" याची पचाईत गाऊगंगा घरौट करून मग रावजीचे समक्ष जमावंदी करून तहसील केली. —हिंगणेंदत्पर खंड २ पृष्ट ३

घरौटेचे वंद—(?)
येथील घरौटेचे वंद आहे तुम्ही हवेलीत दोन मानसे ठेऊन लवकर येने.
—हिंगणेंदत्पर खंड २ पृष्ट ३

घसारा—घोळका.
खंडोजी दाभाडे उभयता महाराजास घेऊन, गवतास पोरगे जात होते, त्यांचा वेष देऊन, घसाऱ्याबरोबर वाहिर निघोन गेले.
—दा. से. ब. पृ. २

घसिब, घासिब—बळकावणारा.

घसेटी-घसीट, घसेटा—(स्त्री. न.) खोगिराला तंग घासटूं नये म्हणून ऐ. श. २३

खोगिराच्या प्रत्यक भागाला लावलेलें चामड्याचें अस्तर.
—पे. सा. पृ. २३८

घागशा—घांगशा ; गर्गशा ; गोंधळ ; दंगा.
आम्ही यामागेंच येत होतो परंतु अंग्रेजाचे घागशामुळें गुंता पडला. इकडून अंग्रेजाचे निवणें जाहले म्हणजे मी सेवेसी येतो.
—नाग. १ पृ. ५८

घाट—उतार.
कालतीचा घाट सोडून भदेखच्या घाटास आलों. घाट उत्तम सांपडला. पाईउतारा सर्व यात्रा उतरली. —पे. द. ४० पृ. ३१

घाट—घटना.
महिना दोन महिन्यांत विलक्षण घाट होईल. सविस्तर मागाहून लिहीन.
—ऐ. ले. सं. ५५३१

घांटगस्त—गस्तीचा एक प्रकार. राजगस्त आणि घांटगस्त असे किल्ल्याच्या तटावरून रात्री घस्त घालण्याचे दोन प्रकार होते. पहिल्यांत चुडी पेटवून फेरी होई. दुसरींत घाट वाजवीत घस्तीची फेरी होई.
घाटगस्त पडली, राजगस्तीचीहि चुडी पडली, ऐसा कारभार.
—पे. द.

घाटपेच—डावपेच.
असें घाटपेच परस्परें लागले आहेत.
—म. शि. यां. का. पृ. ४०३

घाटबारी—घाटबंधारी; घाटांतील वाट.
रास्ते वगैरे फौज सडी पुढें गेली ती घांटबारी उतरोन पलीकडे गेली.
—ऐ. ले. सं. २४९६

घाटबंदी—घाटांतून जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाश्याकडून घेतला जाणारा कर. या कराच्या पैशांतून घाटाची मरामत ठेवली जाते.

घाटावाट—घाटातली वाट, शॉर्टकट.
अवतरणासाठी खातरतसलीम पाहा. —हो. कै. पृ. ९

घाटी—निमचाच्या म्ह. तरवारीच्या एका भागाचें नांव.
आमचा निमच्या येथें आहे. त्यास परज पाहिजे तर परजाचें सामान गोसावी करजकर यांस सांगून घाटी वगैरे जे पाहिजे ते आणविले पाहिजे.
—पे. द. १७ पृ. २०

घड्याळीं—(घड्याळ याचें अनेकवचन घड्याळीं)—घड्याळें.
श्रीमंत खालीं किल्ल्यावरून डेऱ्यास आले होते. घड्याळीं वगैरे जिन्नस

उंच पहिल्यापासून पद्धत आहे त्याप्रमाणें इंग्रजांनीं नजर केला.
—ऐ. ले. सं. २५४१

घांगशा—कटकट, वाद, घोळ.
घांगशा घालीत आहोत, निर्गम (निकाल) आज्ञेप्रमाणें होईल.
—पे. द. ३३ पृ. ३१८

घाडी—देवळांत व्यवस्थेसाठीं नेमलेला एक शूद्र जातीचा नोकर. याचें काम जवळ जवळ गुरवासारखेंच असतें.

घाणा होणें—कालवाकालव होणें, गोंधळ.
डावे बाजूस पदमोजी बावानी व आऊजी बावानीही सिकस्त खादली. यामुळें सारे फौजेचा घाणा होऊन येक प्रहर युद्ध जाहले.
—पे. द. १५ पृ. ४३

घामत—होडीच्या किंवा गलबताच्या तळाशीं फटींतून समुद्राचें खारें पाणी झिरपून सांठतें तें.
गलबतास गोळे तीन लागू होऊन फुटले. आंत पाणी भरले. पुढें चालावयाचे राहिले. घामतात लोक बैसले.
—पे. द. ३३ पृ. २३७

तुम तांडेल हम तांडेल तर घमत कोण सांडेल ? —एक म्हण.

घायतल येणें—घेरी येणें.
गाईस आपण धोंडा मारिला. तीस घायतल येऊन दुसरें दिवसीं मेली.
—ऐ. सं. सा. खं. १ पृ. १७५

घालघसर—दिरंगाई, ढिलाई.
लोकांचा याउपरी अन्याय नाहीं तुम्ही विचार न करितां घालघसरीवर घातले तर लोक विचार करितील ! (सोडून जाण्याचा किंवा निघून जाण्याचा.)
—पे. द. ३३ पृ. १६९

घालविणें (एकाद्यावर)—हल्ला करणें.
मोगल कूच करून वालकी रांजणगांवीं भिवरा-मुलानदीचे संगमी कूच मुक्काम केला. मार्गी येताना दुमदारीवर रा. रघुनाथपंतदादा यानी घालविले. मोगलाचा आरबा मार्गाचे अडचणीमुले वाटेने चालिला ते वेळेस घालविले. जूज जाले. दोन तोफा पाडाव जाल्या.
—पुरं. द. भाग १ पृष्ठ २७७

घाव जाऊन बुक्की आठवणें—(?)
त्यास निश्चयेरुप बिघाड करून अटकावितो; तुम्हीही येऊन पावतसे

कार्य होते, तुमचा तो अर्थ कळतच आहे. घाव जाऊन बुक्की आटवेल गढून जातो. मग आटपत नाहीं. —हि. द. खंड १ पृ. ३३

घावडाव—संधी, माना. अनुकूल काल किंवा अवस्था. तालामाला, लाग-ाग, पेंचपांच.

१ आम्हाकडील सरदारांचे विचारे परिच्छिन्न घावडाव पाहून मोगलास बुडवावे ऐसे आहे. —पे. द. २० पृ. ७२

२ हरीपंत तात्यांचे लिहिण्यांत 'पुढें गेलों तत्रापि घावडाव पाहून माघारेंहि येऊं' असें आहे. —ऐ. ले. सं. ३५८०

३ करवीरकरांचें तोतयाकडे सूत आहे. ते पैकेकरी आहेत. पाहिजे तेव्हां फौज ठेऊन आज ३ वर्षे घावडाव साधीतच आहेत. —ऐ. ले. सं. २६४९

४ तुम्ही पलीकडील बातमी रात्रंदिवस राखून घावडाव पाहून, फौज पाठवून जे रोहिल्याकडील लोक येतील त्यांचें पारपत्य करविणें. —हि. द. खंड २ पृष्ठ ५३

घांसणी—घासाघीस; वैर; नुकसानी.

कोणत्याही प्रकारें तुम्हांसी घांसणी करावी हाच सखारामबापूचा मनोदय. कोण्याही प्रकारें दौलत लयास न्यावी हेंच त्याच्या मनांत. —ऐ. ले. सं. ८४४

घासदाणा—सैन्यांतील घोड्याच्या गवतासाठीं व सैनिकांच्या दाण्यासाठीं जो पैका सक्तीनें गांवोगांव स्वारी करणारे वसूल करीत त्याला 'घासदाणा' अशी संज्ञा होती.

दुसरे यांजकडील होळकर वगैरे सरदार याणी घासदाणा म्हणोन मनमाने जो यैवज घेतला तो उपद्रव कोठपर्यंत लिहावा ? —पुणें अखबार भाग ३ पृ. ४९

घासलकडी—१ चारा, धान्य व सर्पण. २ अशी घासलकडी मुलखांतून सक्तीनें गोळा करण्याचा सैन्याचा जुना रिवाज असे.

सेवकानें सांगितलें कीं बहीरवुणगा व लोक येथून विदा करावे कां की हा प्रांत सरकारचा घासलकडीखाले लुटला जाईल. —पे. द. २० पृ. ५४

घिघावणें—दुरवस्थ होणें, दुर्दशा होणें, वैतागणें, विपन्न होणें.

पठाण रोहिल्यांत कांहीं अवस्था राहिली नाही. बहुत घिघावले आहेत व अजीजी करून पायां पडतात. —हि. द. खंड १ पृष्ठ ५५

घुगी, गुगी—शिरस्त्राण, मुखस्त्राण.

(अवतरणासाठीं 'परापर' शब्द पाहा)

—हिंगणें द. भाग २ पृ. ३६

घुटी—मद्य, दारू.

इतके सिद्ध करून डेऱ्यास जाऊन घुटीची प्रार्थना यथास्थित करून (दारू झोकून) स्नान करून देवावर भंडारा टाकून सुभेदाराचें नांव घेऊन कंबर बांधली. ——हो. कै. पृ. ७९

घुणघुण—गुणगुण; बोलवा.

यावरी आम्हांस घुणघुण कळों आली की तीन हजार लारी आंगी होती त्यापैकीं १४०० गोविंद राउताचे महाली दिधली बाकी १६०० लाहारी काय केली ते कळत नाहीं. —राज. ८ पृ. ८

घुणा—अडथळा, खोळंबा, संकट.

येथे थोरसा घुणा पडला होता. परंतु आम्ही येथे येऊन मनसुबा जाला. आणि नबाब तिकडे गेले. —पे. द. १४ पृ. ६४

घुलाविणें—निर्गमांत आणणें, ठरविणें.

बोडसे दतीये दोन्ही संस्थानास सेनेसहवर्तमान येऊन पोचले. त्यांचा मामला गुदस्त सालास अधिकोत्तर वडिलांचें दयेकरून घुलावला

——पे. द. १४ पृ. ५८

घुसलखाना—स्नानगृह, खलबतखाना, एकान्ताची जागा.

घेंगशा—गोंधळ; घासाघीस.

आजपावेतों घेंगशातच काल व्यतीत होतो, काम कांहींच होत नाहीं.

—म. शि. यां. का. पृ. २८८

घेणें—लूट.

जेव्हां स्वारी गेली तेव्हां समस्त बसोन राजाज्ञा व भिवराऊ पवार व शेखजी वगैरे तह केला कीं जे घेणें येईल त्यांत पायीच्यांचा येक विभाग व स्वाराचे दोन विभाग —पे. द. ३३ पृ. १३२

घेरघर करणें—घेराघेर करणें, घेरून टाकणें.

मोंगल चौहूकडून फौजा उतरवून घेरघर केला आहे.

—पे. द. २० पृ. ७२

घेरणी—कबुतराची एक जात. आकाशांत मंडळें करणारी किंवा घेरे घालणारी कबुतराची जात.

१ खानवालाशान सैद लस्करखान याहीं घेरणी कबुतरे जोड दोन येकूण पक्षीं चार, सेवकाचे हवालीं केले. ते रवाना केले आहेत.

——पे. द. २५ पृ. ४३

२ पत्रें सादर जाली त्यांत आज्ञा कीं घेरणी खबुतरे खामखा मेलवून पाठविणें. —पे. द. २८ पृ. २५

घेरा—तीराचा एक प्रकार. या तीराचें फळ रुंद असतें.

घोंगता--घोंगडी रुंदीच्या बाजूनें दुमडून एका बाजूस शिवून केलेली तिची खोळ, २ कुंचीचा एक प्रकार (लहान मुलाच्या).

११। रु. चिरंजीव नानाकडे टोपी अंगरखा व कुंची घोंगता. —पे. सा. पृ. १९८

ोगवरी—घोगारी (घोघा बंदर किनाऱ्याची कोळी-भंडाऱ्यासारखी एक जात.) गनीम फिरंगी किती होते व राहिला जमाव घोगवरी व भंडारी किरिस्तांव होता त्याजकडील किती ठार झाले ? —पे. द. ३४ पृ. ४०

घोगा—ओरड.

'जलद चला' ऐसा घोगा करूं लागले. --म. द. रु. २ पृ. २७

घोगारी—घोघा बंदराकडील एक जात.

गांवांत हत्यारबंद माणूस हजारबाराशें पर्यंत आहे परंतु रेणोल थोडे आहेत. मराठे व घोगारी व थोडेसे आरब सिद्दी ऐसे आहेत. —पे. द. १६ पृ. ७८

घोट सुपारी---झाडावरच्या झाडावर वाळून तयार झालेली सुपारी.

सुपारी वोली (व) १०० घोटे सुमार. —पे. द.

घोड्यावर स्वार—चढेल, मग्रूर.

आम्ही काल स्वारी प्रगण्यात केली. मुलकाची खराबी जाली ते ध्यानास आणितो. गोड बोलून रयतेचा दिलासा करतो. ते उत्तर देतात की, 'येकदा कलेल तैसे बीज भोईत टाकले ते धुळीस मिळाले. आतां बीज कोण देतो ? तुम्ही सरकारातून बीज देवणे (तर) मेहनत करून लावणी केली जाईल. त्यास बीज सरकारांत तो कलतच आहे ! आता जाफरखान आले ते घोड्यावर स्वार ! रुपये मागूं लागले. —हिंगणें द. भाग २ पृ. ३५

घोड्यास हात घालणें—घोडा लगाम खेंचून थांबविणें.

इंग्रज सभोंवतें मिळाले. आतां पळूं नये. व्यर्थ मरूं नये. घोड्यास हात घालावे. सर्वत्र लहानथोर पळाले. आमची घोडी लहान होती ऐसें नाहीं परंतु पूर्वसंकेत समजोन तुम्हांस पाहतांच हात घालून (घोडीस) उभें राहिलों. —पे. द. भाग ४१ पत्र नं. १८९

घोडी टालेस येणें—उलटणें, उफराटी होणें.

घोडीवर बसावयास लागले तों हाताचा झटका आणेनीस (अनीनीस) बसला त्यानें घोडी ठालेस येऊन घोडी अंगावर पडली तिच्या अंगाखाली याची मांडी उजवी सापडून मोडली. सरकारचा तबीब बोलावून नंतर पाय बांधला. —नाग. २ पृ. १७७

(घोडी तलब) खरी होणें—खोरी होणें ? निकृष्ट दशेस येणें ?
जर हे सरदारीचा सांभाळ न केला, विचार न सांगितला, तर पुढें काय होईल हें ध्यानांत असेल. निजामअल्लीस सहा महिने इकडे अटकाविले, लोकांची घोडी तलब खरी जाली. येंदा समजावीस काये निकडेने जिवाभ्य श्रम करून केली ! पुढें समजावीस करावी तरी यैसा विचार राहिला नाहीं. कालवंचना करावो गंगथडीस असावें तरी सरदारी या रीतीनें परिच्छिन्न राहता दिसत नाहीं. —पे. द. २० पृ. ८२

घोडींपडी, घोडीपिढी—घोडी बिडी.
१ साळोंखे कविलेसुद्धां, देखील घोडीपिडी आदिकरून ठाणेंत होते. —पे. द. २६ पृ. १६४

२ परंतु आधी घोडीपिढी लुटून नेल्यामुळें आबरू गेली. —ऐ. ले. पा. म्यु प्र. पृ. ९६

घोडेबाज्या—घोडेबाजी. घडयांत दारूचे फटाके घालून उडविण्याचा एक आतशबाजीचा प्रकार.
आज दिपवाळीचे सायंकाळीं घोडेबाज्या वगैरे ओंत्नसबाजी जाली. --ऐ. ले. सं. ४७१४

घोर—काळजी, प्रतीक्षा.
रा. गिरमाजीपंत यास फुरसत चिठी ४ दिवसांचीच पाठविली ! नित्य घोर करतात. --ऐ. ले. सं. २९१८

घोर करणें—राग मानणें, वैषम्य मानणें, गवगवा करणें.
त्यांच्या पालख्याचा रोजमरा आपण वजा केला त्यामुळें त्यांनीं फारच घोर केला आहे. --पे. द. भाग २० पत्र नं. २२९

घीरदन--जेजालेचा एक प्रकार.

घोस—झुबका, गुच्छ.
इंग्रजास रुकसतीचीं वस्त्रें सहा असामींस जालीं. कंठयांतील घोस दिला, व शिरपेंच पांच असामींस दिले. —ऐ. ले. सं. ८२२३
कृत्तिकेचा काय घोस तुरा नव सरस पदर वर्णिचा —प्रभाकर

घोस—मांस.

अम्बाबाईनें घोस गाईचा पाहिला.

—ऐ. पो. के. खं. १ पृ. ५८

कांहींच योग्यता नाहीं राजेशाला । पंचामृत साहित. नव्हने गोशमसाला (मास मसाला). —ऐ. पो. के. खं. १ पृ. ४०४

घोस—शिडाचे खालचें टोक. कु. आं. द. ३८७

घोघा—दंगा, दंगल.

घिकाणाची—(?)

येणे प्रमाणें हक्क व इनामगांव व घिकाणाची रक्कम व इनाम गांवगन्नां व कानू कानूनाती पुरातन सनद प्रमाणें करार करून दिलीं असे.

—वै. ४ स. १७४६ पृ. १८

च

चकितयाची पादशाही—दिल्लीची मोंगल बादशाही. चकताय् हें एका तुर्की जमातीचे नांव होतें त्या जमातीपैकीं मोंगल बादशहा होते.

चक—१हुकूमनामा २ (काजीनें दिलेला) फत्वा.

चक—हद्द किंवा हद्दींचा नकाशा.

मेढीयातून काम पांच हात उंच आहे त्याचा चकहि काढून पाठविला असे

—पे. द. ३४ पृ. ८२

चाउक—(?)

तरी या वतनाचा हक्क लाजीमा, इनामगांठ, व इनामजमीन व बलुत्याची राहणुक, पटी पासोडी, सनवार, बीजबकरा, खलेती, दिवटी, बाजार, चाउक, ठग, शेलधार, मानपान, तशरीक, सुदामत भोगवटीयाबद्दल चालत आले असेल त्याप्रमाणें अनभवून सुखरुप राहणें.

—रा. खं. ३ पृ. ११९

चकती—हुकमाचा कागद.

जलचरास चकती आली. त्यास जलचराचें लक्ष क्षुद्र (छिद्र) अन्वेषण करावें. (आपणांस दगा करण्याविषयीं इंग्रजांस हुकूम आला आहे, तरी इंग्रजांच्या बारीकसारीक हालचालींवरहि लक्ष ठेवावें.)

—ऐ. ले. सं. ६५९६

चकती—१ परवाना, दस्तक, (२) साहेब लोकांनीं लिहिलेल्या इंग्रजी पत्रांना सर्वसामान्यत: चकती अशी संज्ञा होती. —विल्सन

चकनामा—चतु:सीमा दर्शविणारा कागद किंवा नकाशा.

भिवरशेत जमीन बिघे ३० दिल्ही. याचा चतु:सीमाबरहुकूम चकनामा पूर्वेस भीमा, दक्षिणेस इंद्रायणी, पश्चमेस भवानी फिरंगाई, उत्तरेस वोढा येणे प्रमाणे चतु:सीमापर्यंत ३० बिघे जमीन पाटील मजकुराचे (पिलाजी जाधवाचे) जिमे करणें. --पे. द.

चक पुरविणें—चक म्हणजे चतु:सीमा, अर्थात् चारी बाजूंकडून त्रास होणें.

त्याचा आमचा सीवसेजार. प्रत्येक चक पुरवत होते. त्याचे गांव आमचे किल्ल्या नजदीक. आमचे गांव त्याचे किल्ल्याखालीच. केवल याच करणे कजिया होतो. —E. M. P. पृ. २१०

चक बसणें—खंबीर पायावर उभारणी होणें, मजबुती होणें. पक्की व्यव था अमलांत येणें, दरारा, दहशत बसणें.

१श्रीमंताचे चित्तात कल्पना आली की सिंद्याची सरदारी, मातबर मराठ्या-सिवाय सरदारीचा चक बसणार नाही. म्हणून महादजी सिंद्यास मवकूफ केले. —हिंगणें द. भाग २ पृ. ४५

२ त्या दिवसापासून दारू व मांस शहरांत विकूं नये असा चक बसला. --शि. प्र. ब. ६९

चकभूल—आश्चर्य.

या फौजा तमाम हैदरअल्लीच्या दृष्टीस पडतांच त्याची चकभूल झाली कीं हें काय ? कीं फौजा येऊन पोंहोचल्या !

---ऐ. ले. सं. ८०५

चकमकी--बंदुकीचा एक प्रकार.

चकल्या—(१) पोलीस अधिकारी (२) मॅजिस्ट्रेट.

(विल्सन)

चकला—जिल्हा, प्रांत, विभाग.

चखोट—निवडक, उत्तम.

येथें नवे लोक सेदोनसे माणूस चखोट ठेऊन पाठऊन देतो.

—पे. द. ३४ पृ. ५

चंग—एक वाद्य.

हातांत घेऊन चंग रंग जमवीला. —हो. पो. १५

चगढपण—चाहाटळपणा, आगाऊपणा.

ष्याद्याविसी दोन तीन वेळां लिहिलें हे चगढपण दिसते परंतु ऐतेवेलेस माणूस मिळणार नाही समय कोणे वेळेस कसा येईल हे नकले; याज-करिता लिहितों. —पेठे दप्तर भाग २ पृ. १९

चंगाल---१पंजा, २पक्ष्याच्या पायाच्या नख्या.

चंगेरी—तबकडी; तिपाई

१ इंग्रजी चंगेरी बैठकसुद्धा पानदान देवाचें. --पे. सा. पृ. २०९

चंगोली--भाड्यानें किंवा रोजानें केलेलें काम. --विल्सन

चट्टेकरी—सैन्याबरोबरचे हरकामी शिपाई.

तेव्हां हैदर, फौज गाडदी, प्यादे, चट्टेकरी व तोफा घेऊन झाडीच्या आश्रयानें गाड्यांचे बुरुज बांधून उभा राहिला.

—ऐ. ले. सं. १२३

चटपट—चुटपुट, हळहळ.

गोसावी आशीरवाद देऊन दिसेनासा जाला. मालोजी राजे यास चटपट लागली. निद्रा लागेनासी जाली. --म. द. रु. १ पृ. ३

चटेकरी—पट्टेवाला; चपराशी. a belted messenger, a peon, cheprasie.

इंग्रजाकडील चटेकरी क व जासूद एक, गांवगन्ना चिठ्या घेऊन हिंडतात व गावांत घरें किती, माणसे किती, गुरें ढोरें किती हें ल्येहोन देणें म्हणोन उपद्रव आहे.

--पे. द. भाग ४१ पत्र नं. १६०

चटेगार--१ वाटे, हाफकास्ट; २ त्या जातीच्या शिपायांची पलटण.

वसली समागमें १३ पलटणें. हिंदुस्तानी चटेगार १३,०००, गोरे ४,०००, स्वार ४,०००, एकूण २१,००० आहेत.

—ऐ. ले. सं. ३६३२

चंडोल, चंडावल—चंडोल, सैन्याची पिछाडी. पिछाडीची रक्षक फौज.

ते दिवसी नवाबानें लोकांस दारुगोली वाटून हारावल, चंडावल, दस्तराख, (दस्तरास्त, दस्तराज—Right-wing of the centre). दस्तचप, (दस्तचप--Left-wing of the centre) फौजेबंदीची नेमणूक केली. —पे. द. २५ पृ. ६१

सरदारांस बाजू वांटून, त्याप्रमाणें दस्तराज हरचेहप रोज चंडौल चालवितात. सामान बांधून सुंडे हौदियांत बसतात.

—ऐ. ले. सं. ९७१

पठाण चंडोलीस राहिले होते तेथें फिरंगी यानीं रथ चालविला तो एका पठाणाच्या राहुटीवरून गेला. —पे. द. २८ पृ. ९५

चढ्या घोड्यानसी--घोड्यावर बसल्या बसल्या, न उतरावें लागतां, म्हणजेच विनायास किंवा सहजात.

त्रिवर्गांनीं मसलत करून वजिरास दाहा कोस मागें ठेविलें. जाट समागमें घेऊन आंतरवेदींत प्रवेश केला. जातांच पठाणाचीं स्थलें दोन तीन होतीं

ते चढ्या घोड्यानसी घेऊन, तेथील पठाण बहुत मारले.

—पे. द. २६ पृ. १३८

२ हैदरनाईक तोफखान्यासह सारी फौज घेऊन बाहेर निघाला, त्याचे मनांत होसकोटे चढे घोड्यानिशीं घ्यावे.

—ऐ. ले. सं. १७३१

चढ—जोरा; वजन. गर्व, मग्रुरी, वरचढपणा, लौकिक

परवां मीं सदाशिव मल्हार यांजकडे गेलों होतों. त्यांचा चढ पाहतां आम्हीं सांगूं तसेंच राजमंडळकर आयकितील या प्रमाणें बोलिले.

—ऐ. ले. सं. ५३८८

तेव्हा तो यवन चढावर. त्याचे खातरेत ही फौज नाहीं. पन्नास हजार फौजेनिशी बक्षी पाठवितो. तसेंच काम पडल्यास बक्षी त्यासी पुरा पाडील, असा स्तोम बाळगून वकील बक्षीचा पाठविला.

—हो. कै. पृ. ६०

इंग्रजांनीं हल्ला करून बेंगरूळ तेच दिवशीं घेतलें. १२,००० माणूस टिपूकडील ठार जाले. याप्रमाणें बातमी लिहिली आहे. मोठा चढ इंग्रजांचा जाहला.

—ऐ. ले. सं. ४४६२

चढणें—हल्ला करून जाणें.

सेवटीं बहादूराकडील हल्ला अगोदर चढला. सवेच मुसे लनियेन व वीरसाहेब हे दोघेही चढले.

—इ. सं. चिनापट्टणाकडील राजकारणे, जनार्दन शिवराम याचीं पत्रें.

चढ करणे—वरचढ करणें. मक्त्याचे किंवा लिलावाचे वेळीं चढता सवाल करणें.

यंदा सोळा सहस्त्र चढ करून (१६,००० रुपये अधिक रसद देण्याचे कबूल करून) त्याणे मामला केला.

—शेंदुर्णी सं. म. कागदपत्र भाग १ पृ. ५

चढाव—पूर.

श्रीकृष्णेस पाण्याचा चढाव आहे म्हणोन लिहिलें तें कळलें.

—ऐ. ले. सं. ४७६६

चढी देणें—भर देणें.

वेदमूर्ती माधवभट हे महाराजांस चढी देऊन झुंजावें म्हणतात.

—ऐ. ले. सं. २३४६

चढीं लागणें—गर्विष्ठ होणें.

ते दिवशीं चि. रा. दादाकडील व आम्हांकडील मिळोन ४०–५० माणूस जायांजखमी जाहलें, याजमुळें गांवकर फारच चढीं लागले. याजमुळें

दुसरे दिवशीं अमावास्या इंदुवारीं मोठ्या प्रात:काळीं वानेऱ्यांवर हल्ला केली.
—ऐ. ले. सं. ३०१९

चढी लावणें—भर देणें.
पातशाहास चढी लावून नवाबानें कुल येखतियार आपणाकडे करून घेतला.
—पे. द. १५ पृ. ५३

चढून येणें—हल्ला करून येणें.
अवतरणासाठीं कहीकवाड शब्द पाहा. —हो. कै. पृ. १३८

चतरसिंगी रुपया—रुपयाची एक जात. चांदवड कोरे, रहिमतपुरी, चिंचवडछापी, मलकापुरी, कलदार, कासी सिक्का, तुऱ्याचे, सरकार पोते, चलनी सुरती, इंग्रजी सुरती, अर्काटी, अटीचे, मिटे, त्रिशूळी, वावडी, भातवडी, भुंडे, सिप्रीसिक्का, जरिपटका, अंकुशी, एक बुंदकी, वगैरे रुपयाचे शेकडो प्रकार जुन्या काळीं होते.
१॥। चतरसिंगी रुपये २ वजा वट्टा देणे सराफ दर ८= प्रमाणे ।· बाकी.
—पे. सा. पृ. १४२

चतुष्टाई—चार लोकांनीं मिळून केलेली चौकशी. (combined investigation or inquiry.)
पत्रें सांपडलीं तीं करवीरकर यांणीं शिंदे यांच्या घरीं पाठविलीं. त्यांनीं सरकारच्या मुत्सद्यांस दाखविलीं. मलाहि पुसलें. परंतु चतुष्टाई अद्यापि जाहली नाहीं. चतुष्टाई जाहल्यास अस्सल पाहून मग नक्कल करून सेवेशीं पाठवितों.
—ऐ. ले. सं. ६६७६

चंद्रबळ देणें—गचांडी देणें. अर्धचंद्र देणें.
हा अविंध विजापुरांत आला त्याशी पोळ, गणोजी वाघमारे व मोरो बापूजी वगैरे चार घटका मिलोन तुरकास चंद्रबल देऊन शहरांतून बाहेर काढला.
—पे. द.

चंद्रुस—लाख.
—पे. द.

चंद—कांहीं.
हें बंद करण्यास चंद मुश्कील नाहीं.
—खरे ७ पृ. ३५७५

चंद दरचंद—अधिकाधिक.
या मस्लहतीची पैरवीस डील (ढील) टाकिली होती परंतु सबब चंद दरचंद मुस्किलीचें झाले आहे.
—राजवाडे १० पृ. २५२

चंदेरी—चैद्य देश. म्हणजेच चेदि देश. हा सध्याच्या वऱ्हाडच्या ईशान्येस बुंदेलखंड म्हणून ज्ञात आहे.
—पे. द. १४ पृ. ९

चनीकली—चौकशी ? विचारणा ?

यांणीं उत्तर केले कीं तात्या नाना आज्ञा करतील याप्रमाणें करूं. यावरून उभयतांकडे चनीकली केली. नानांनीं हरीपंतावर टाकिलें तात्यांनीं निविष्ट सांगितलें की शास्त्रीबाबा करीत होतें तें श्रीमंतांसही मान्य होतें यास्तव या खटपटीत तुम्हीं पडूं नये. —ज्यू. ३४०

चाकलश, चकलश—हातघाई, हातपराजी. हातास हात, तलवारीस तलवार भिडून होणारी लढाई किंवा झोटधरणी.

चंपत होणें—अकस्मात गुप्त होणें; दडी मारणें.

चक्रदेव वगैरे यांचे हाताखालीं कामकाजास होते, ते आज ८ दिवस चंपत जाले. कोठें आहेत न कळे. शिंदे याजकडील आजपावेतों तरी उपद्रव शहरांत कोणास लागला नाहीं. —ऐ. ले. सं. ६४७९

चपर—सजावल, तगादा करणारा ढालाईत शिपाई, खास हुजऱ्या.

येकवेल बंदोबस्त हिंदुस्थानचे आगत्य करणे आहे कीं हिंदुस्थानात आईन मुसलमानी राहिले नाही याजवरून तैमूरशहा पातशहा यानी पाचसे स्वार चपर, फौज जमा करावयास तैनात केले.

—हिंगणें द. भाग २ पृ. ८१

चपरास—बिल्ला किंवा अधिकारदर्शक पत्र्याची पट्टी. त्यावरूनच चपरासी हा शब्द आला. —विल्सन

चपेट—धक्का, संकट प्रसंग.

राज्य आपले नवें, त्यांत दोन तीन चपेट होऊन बहुत हलाक जाहलों आहों. —चित्र ७९

चपेटा—धक्का, आफत, नुकसानी.

राजे याणी मनांत विचार केला कीं आपणास एक विजापूरचा दावा व दुसरा निजामशाहीचा दावा व तिसरा दिल्लीवाले मोगल याचा. हे तीन दावे कार्याचे नवेत. त्यामध्ये दोनतीन चपेटे होऊन आम्ही बहुत हालाक जाहलो आहे. त्यास एक शत्रू तरी मित्र करावा.

—म. द. रु. १ पृ. ६१

चपेटा—घाव, मार.

लढाईची हातघाई जाली. भाला व बिचवे व गुरगुजे व जमदाडा व वाघनखे यांचे चपेटे फार जाले.

—पाणि. बख. पृ. २५

चपेटा—मारा, अघाडी, तोंड.

गर्तेत गडबड ऐकतांच बाहेर धाऊन आले. चपेटीस पंताजी गोपीनाथ

सांपडले, त्यासही च्यार वार झाले, वळकले नाहीं म्हणून.

—म. सा. छो. व. पृ, २४

चबदार—चोबदार (मूळ शब्द चब्–काठी, सोटा.)

चबर चबर,—अबरचबर—अस्खलित (भाषण). अस्खलित, अद्वातद्वा चर्ब = स्निग्ध.

चबिना—धान्य, हरभरे वगैरे.

शिंदे यांची फौज व पलटणें आहेत, त्यांस मसाला (दारूगोळी) व चबिना वगैरे सरंजाम दिला. —ऐ. ले. सं. ६३६४

चबुतरा—(१) कोतवाल कचेरी (२) चव्हाटा (३) बाजारचौक (४) कोतवाल चौकी (५) चौत्रा. —विलसन

चमक—भीति; संशय.

मीं त्यांची खातरजमा वहुत करितों. तथापि मनांतील चमक जाईना.

—ऐ. ले. सं. ६८०८

चमकाचमकी—चममक.

२–२॥ घटका चमकाचमकी बरीच जाली. ४०–५० जखमी व ठार.

—ऐ. ले. सं. ४६७६

चमखा—मोठा लांब सुरा किंवा चाकू.

चमचक—दिल्लीकर बादशहांच्या पुढे त्यांचे यस्वाल शिपाई ज्या रुपेरी फरशा (परशू) घेऊन चालत त्याना चमचक किंवा चमघ म्हणत.

चमडावती—चर्मणवती नदी.

तेव्हां सुने रान पाहून चमडावती उतरून आग्र्याचा किल्ला घेतला.

—इ. सं. हो. क. पृ. १७

चमत्कार—प्रत्यय, साक्ष, समक्षा.

शंभर मनुष्यात दाहा पाच मनुष्यास त्या सिद्ध पुरुषाचा चमत्कार येत आहे, म्हणोन लोक बोलतात.

—पुणें अखबार भाग ३ पृ. ७५

चमन—बाग.

चमिंदार—ओस; गवत वाढलेलें मैदान. (मूळ फारशी शब्द चमन असा आहे. त्याचा अर्थ " तृणांगण " होतो.)

ते समयीं तांबरा पडोन गहुं अगदी गेले त्यामुळें गांवातील कूळडाळ परागंदा जाले. गांव चमिंदार जाहला.

—ऐ. सं. सा. खंड ५ पृष्ठ ६७

चर्क, चर्ख चर्खी—एक यांत्रिक धनुष्य. क्रॉसबौ, Cross bow—Bow fixe upon wooden stock with groove

for the missile (stone, arrow etc.) and mechanism for holding and releasing string

चर्खी—धार लावण्याचें चाक.

चर्ब--वरचढ, गालीव.

आपण साऱ्यांवर चर्ब असावे. —राजवाडे ५ पृ. २४

मस्लहतीचे मार्ग आलीजाह चर्ब पडतील असें दिसत नाहीं.

चर्बी—मेद, उन्माद, मस्ती, माज.

चर्मीना—१ कातड्याचे, २ कातड्यापासून बनविलेले.

चर्या—चालचर्या, चलण, वर्तणूक, चालचलणूक.

आम्ही लिहीले हे प्रमाण (खरे) कीं कसे हे पहावयास येक कारकून देवरीस पाहावयासी पाठवावा म्हणजे येथील चर्यास (चर्येस-चालचलणुकीस) पाहोन जाईल. —चं. चू. द. पृ. १२५

चर्या विचारणें—तानमान पाहणे, अदमास घेणे.

मी सुजाउदौवल्यापासी गलो होतो. तेथे कांहीं दिवस राहून सर्वच चर्या विचारिली व सविस्तर वर्तमान लिहून कासीद वारंवार सेवेसी पाठविले होते. —हिंगणें द. भाग २ पृ. ९६

चरका—घोड्याच्या सामानापैकीं एक जिन्नस.

अवतरणासाठीं 'इलासवजा जोड' हा शब्द पाहा.

चरकी—तोफेचा एक प्रकार.

लक्कडकोटांतून व सुभेकोटावरून भांडी व गुंडगल व चरकी व जेजाला याचा मार बेसुमार जाला. —पे. द. ३३ पृ. १००

चरकी येणें (घोडा) —चक्कर येऊन स्वत:भोवतीं गरगर फिरून पडणें.

रा. चिंतामणराव आप्पाचा पाय, घोडा चरकी येऊन खालीं पडोन सांपडला. खैर मोठी जहाली. —ऐ. ले. सं. ५४७२

चरघण—गुरासाठीं चराऊ रान, गुरचरण. —विलसन

चरण—खडावा, पैजारा.

प्रधानपंत दरबारास आले तेव्हा महाराज चरण घालून तख्तावरून उठोन वाड्यात चालले. मध्यघरचे दरवाजांत चरण टाकले. खिजमतगार दूर होते. महाराज पुढे गेले तों चरण बाळाजीपंत यांणी घेऊन मागील दिवाणखान्यांत गेले आंणि महाराजापुढे ठेवले याजवरून बहुत संतोषी जाल.

--थो. शा. म. च. पृ. ९०

चरण घेणें—चौथाई वसूल करणें.

पूर्वीं रामदासपंतानें चरण बहुत घेतला होता व पीक अपरमित ते वेळेस

होतें. —पे. द. भाग २५ पत्र नं. २००

चरवार—सोमवार. —पे. द.

चरबख—उद्दाम.

इंग्रजाविसी नवाबास लिहून पाठविले होते जे मायावी सात्रागमनी चरबख इंग्रज आहे. यासी बहुत सावधपणें बोलून लौकर निरोप द्या. —नाग १ पृ. २०४

चरस, चरसा—१ कातड्याची पिशवी किंवा खलेती. २ मोठी बादलीवजा चामड्याची पिशवी. —विल्सन

चरसे २ दर ४ प्रमाणें. —ऐ. ले. सं. २८६८

सरस फर्मासी हलक्या बंदुखा व जेजाल्या व सांबरी चरसे पाठवून देणें. —पे. द. ४५ पृ. ९९

चरित्र दाखविणें—चुणूक दाखविणें, इंगा दाखविणें.

अशा स्थितींत बाळाराम शेट याजला कांही चरित्र दाखवावें यास्तव मीरखान याने फैल घातला की (बोलणें लावलें कीं) आम्हांस दोन कोट रुपये लोकांचे देणें झालें याचा मार्ग काय काढतां तो बोला ! —हो. कै. पृ. १७९

चरिंदा—चाऱ्याचा खर्च.

वैरण दाण्याची महर्गता, यामुळें घोडीं खराब जाहलीं. पुढें ठेविल्यानें चरिंदा उगवणें कठीण. यास्तव चरिंदा ३०० रुपये घेऊन घोडीं सोडून दिलीं. —ऐ. ले. सं. ६०७३

माळी बोलले कीं आम्हास रोजमुरा व बैलांस चरिंदा तुम्ही द्यावा म्हणजे माल नेऊं. —पोंक्षे कु. वृ. पृ. ७७

चरिंदे—चारा, गवत.

आम्ही यास टाकून पुढेंच येतो (तर) निभाव नव्हे यास्तव यास टाकून येता नये. चरिंदे जाहले आहे. —पे. द. १५ पृ. ३५

चरिया—चर्या, फांजी, तटावरची सफेली.

फिरंगी यानीं तोफा व धरनाला मारू लागले किलियाचा चरिया तोफा-खाले पाडूं लागले. —पे. द. २८ पृ. ७४

चलका—घोडदळाची धावाधाव किंवा दाणादाण.

तात्यासाहेब माघारीं फिरण्याची योजना करतात तों लोकांनीं धर टाकिला ! फौजेच्या चलका सुटल्या, तेव्हां सरदारांनीं काय करावें ! कोणास कोणीं पुसेनासें झालें. लोक भणाण होऊन जिकडे तिकडे पळाले. तशांतहि शिवराव घोरपडे यांणी तोंड लावून कडनिकडी बऱ्या केल्या, परंतु उपराळा त्यांस कोणाचाच झाला नाहीं.

चलचलाव—दळणवळण; रावता. चळवळ, हालचाल.

शिंदे याजकडे कुंजर यांचा चलचलाव फार आहे.

—ऐ. ले. सं. ६६१३

निजामनमुलुक रेवातीरी सेनासहवर्तमान स्थिरतेनेच आहेत. बहुतसा चलचलाव नजरेस येत नाहीं. —पे. द. १५ पृ. २१

चलण—चालचर्या, वर्तणूक.

–मल्हारपंत आमची नालस (चहाड्या) नानाप्रकारे लिहितील त्यास (म्हणून) आपला येक कारकून येथे पाठवावा तो सर्व चलण पाहोन जाईल. —चं. चू. द. पृ. १२५

चलती हुंडी व ठिकाणबंद हुंडी—(हुंडीचे प्रकार)

ग्वाल्हेरीची हुंडी चलती होत होती, त्यास त्याणें चलती हुंडी नको म्हणाला. ठिकाणबंद झांशीची हुंडी देववावी म्हणोन बोलिला, त्याजवरून झांशीचीच करून देविली. —ऐ. ले. सं. ३९५०

चल देणें, चळ देणें—हल्ला करणें, हालचाल करणें.

बहिरजी पांढरे यानी गावाबाहेर येऊन गोसावी याचे मठ होते त्यांत प्यादे घालून चोकीबंदी केली; त्याजवर फौजानीं चल दिल्हा तेथें आग बरीसी झडली. त्यामुळें साऱ्या पथकांतली दहा बारा घोडी ठार जाहाली. —पुरं. द. भाग १ पृष्ठ १०३

चलन—वर्तणूक.

जसे आपा तसे आम्ही. हा अर्थ चित्तात आणून आम्हास आपण विचार आचार सांगणें तो सांगावा. त्याप्रमाणें चलनास अंतर सर्वथा होणार नाहीं हा भरवसा असो द्यावा. —पे. द. ३३ पृ. ५०

चलनी—छोटी हलकी तोफ.

--(रा. व्य. को.)

चलाव—कूच.

दुसरे दिवशी मनसुबी करून आपला व सूर्याजीचा कथला तोडावा तो लष्कराचा चलाव जाला. स्वामीनी आपणांस आज्ञा केली कीं, तुम्ही समागमें येणे. जेथे मुक्काम होईल तेथें बरहक्क निवाडा करूं.

—ऐ. सं. सा. खंड ५ पृष्ठ ३१

चवकडा—जासूद जोडया. एकाच वेळीं पाठवावयाच्या दोन जासूद जोडया एकूण इसम चार.

महाराजानीं कृपा करून जासूद पांच जोडिया दिल्हया परंतु वाटा चालत नाहीं. चवकडयावाचून वाट फुटे ना आणि बातमी तर वरचेवर पाठविली

पाहिजे तर आणिक पाच जोडी जासूद पाठवून देणें म्हणजे वरचेवर बातमी सेवेत येत जाईल. —पे. द. २० पृ. २६

चवकणें—बदलणें, फितूर होणें, चमकणें.
बाबाच्या वर्तमानावरून गडकरांनीं चवकावे असे नाही. गडकरी पदरचे पहिल्यापासून आमच्या विचारांत आहेत. त्याचप्रमाणें त्याणी आमच्या विचारें वर्तावे यांत त्यांचे कल्याण असे.
—ऐ. सं. सा. खंड ७ पृ. १६

चवकार—अब्रू, प्रतिष्ठा, वजन.
कोणी हिंदुस्थानी हरामनिमक च्यार कागद लिहून मोहर करून घेत असेल. त्यास काय विववीत असतील न कले ? यैस्या गोस्टीनें याचा चवकार जातो. —हिंगणें दप्तर खंड २ पृष्ठ १०

चवटे—(?) झांप (?)
१ आरमारच्या प्रयोजनास चवटेयांचे प्रयोजन आहे. येशास ते जागा चवटे दास्तान (कोठार) आहे त्याजपैकीं, प्रस्तुत चवटे पांचसे देविले पाहिजेत. हली गुराबांची अवजारें धड करावी लागतात
—पे. द. ३ पृ. ७२

२ चवटयाविषीं मानाजी आंग्रे यास लिहिले आहे म्हणून लिहिले त्यास चवटे आणून पाठवावें. —पे. द. १६ पृ. ३६
—पे. द.

चवड—घोडयाची विशिष्ट चाल.

चवढाळ—आवाडाव. कारस्थान. खटपट.
कोणेहिप्रकारें चवढाळ करून पैसा मिळेल तो हाताखालीं ध्यावा.
—पे. द. २८ पृ. २९०

चवना—चवणा, चटक, संवय, हांव.
त्यांस मुलकाचे जप्तीचा चवणा लागला आहे. गड किलीयाचाहि लागला. भलत्या गांवास रोखा पाठवितात कीं सेंभर रुपये देणें.
—पे. द. १२ पृ. ८९

चवरडोल—अंबारी किंवा अंबारीसारखें कांहीं वाहन.
—रा. व्यं. को.

खासा दलीलखान
चवरडोलांत बैसला ।
दिवटीच्या हिल्लाले
रणामध्यें आला ।
जाधवराई मुरदा
उचलून पालखीत घातला । —ऐ. पो. के. खं. २ पृ. २७

चवल—वराही होनाच्या $\frac{1}{8}$ किमतीचें नाणें.

चवला खाणें—लांच खाणे; बदलणें.

सातारकर गडकरांनीं राजश्री बाबाच्या वर्तमानावरून चवला खादला. आम्हासी बोलत होते ते कांहीं बोलेनासे जाले आहेत. आमचे मध्यस्त गडावर दोघे जात येत होते त्यांतील येकास मात्र गडावर घेतले, येकास घेतले नाहीं.
—ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ १५

चवसर—चौपटाचा खेळ.

(अवतरणासाठीं 'नजरंदाजी' शब्द पाहा)
—पुणें अखबार भाग ३ पृ. १०५

चवाळें—१ दोन पट्ट्यांची जाडीभरडी घोंगडी. चौरस असून लहान असते. हाच कांबळ्यांत व ह्यांत फरक २ बैलाच्या किंवा घोड्याच्या पाठीवर घालण्याची कांबळ्याची झूल.

पाथरी व गंगथडीहून चवाळीं पागेकडे सुमार ३०० आणविलीं आहेत. त्याचें सरकारचें दस्तक घेऊन पाठविणें म्हणोन आज्ञा.
—ऐ. ले. सं. ४५३६

चश्म—डोळा.

चश्म-झख्म—दुर्दैव, नजर, दृष्ट.

चश्मपोशी—डोळेझाक, दुर्लक्ष.

जरी तुम्ही हे गोष्टी चश्मपोशी करून दर्गुजर कराल तरी जिकडे वाजवी तिकडे परमेश्वर आहे.
—ऐ. टि. १ पृ. ६०

चह—काय, कोणतें.

चहल—चाळीस.

चहार—चार.

चळचळाट—प्रसर; हालचाल; फैलाव; जोरा.

यंदा तोतयाचा चळचळाट भारी झाला. हरबा अण्णासुद्धां तोतयाकडे निघून गेले.
—ऐ ले. सं. २५४३

चळ देणें—हल्ला करणें; चाल करणें, आक्रम करणें.

१ खामखा फौजा जमा करून चळ द्यावा म्हणजे आपणच वारापाणी होतात.
—ऐ. ले. सं. १०३

२ हैदरखानानें पुढें चल दिल्हा.
—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ४८

३ कदाचित् नबाबांनीं चळ दिल्हा आणि आपले लोक कचकरले तर पुनः सावर बसावयाचें कठीण.
—ऐ. ले. स.५१३

चाऊस—जमादार, पोलीस अधिकारी.
चाक करणें किंवा च्याख करणें—फाडणें, कापणें.
पत्र वाचून च्याख करावा.
—तट्टू दप्तर पत्र नं. ९ अप्रसिद्ध.

उभयतांचे पोट चाक करावें म्हणोन आज्ञा केली आहे.
—दि. म. रा. २ पृ. ८९.

चाकरमाना—चाकरमाणूस. ज्याला तीच एक चाकरी किंवा नोकरी वंशपरंपरा करण्यासाठी शेत वगैरे इनाम करून दिलेलें असतें असा चाकर.
१ आपले आजे रुस्तमखान यास किल्ले व्याघ्रगड येथील सरनाइकी होती कै. शाहूमहाराज देशास आले आणि सातारियास मोर्चे लावले ते वेळस त्यांस ५०० लोकांचे जमावानिसी सातारियास पाठविलें. जमाव भारी जाला यामुळें शाहू महाराजास किल्ला येईना तेव्हा चाकरमान्यांचीं कुटुंबें कैद करू लागले. ते समई आमचे घरास चौकी पाठविली. त्या दहशतीमुळे आमचे वडील परागंदा जाले.
—इ. सं. पे. द. स. प. मा. पृ. ८०

२ स्वामीचे जिल्हेतील चाकरमानें पाटील यांस पूर्वी निरोप दिल्हा त्यावरून ते घरास अगदीं झाडून गेले आहेत.
—पे. द. ३० पृ. २१३

चाकरीचुकरी—सेवा चाकरी. मेहनत.
बाबा नानाजवळ नगरामध्ये होते. त्यावर पाणिपतची स्वारी जाहाली. चाकरीचुकरी होणार ती जाहली. परंतु ईश्वरी सत्तेने विश्वासरायाचा प्रकार तसा जाहला. फौज मोडली. गारत जाहली. चौघे चौकडे गेले.
—पुरं० द. भाग ३ पृ. १८६

वामनराव सर्वांशीं गोपाळरायाप्रमाणेंच संभाळून नेतात. मेहनत भारी. चाकरीचुकरीविषीं अंगेज करितात. —ऐ. ले. सं. १७७०

चाकोर बसविणें—जमीनदोस्त करणें.
दीड हजार माणसातून दोनसे माणोस पलोन गेले. वरकड अवघे मारून चाकोर बसविले. शामलाकडील आवघी मंडली खपविली.
—पे. द. ३ पृ. १६३

चाख—नष्ट करणे किंवा फाडणें.
पत्र वाचून चाख करावे. —पुरं. द. भाग १ पृष्ठ १११
चाचणी—उंटासाठी खुराक. हरभऱ्याची भिजलेली डाळ वाटन लाल परतून त्यावर दूध शिंपून ढवळतात व नंतर त्यात वेलदोडे वगैरे मसाला टाकून त्याचे लाडू बनवितात.

यादी उंट रवानगी चारणी मौजे वऱ्हाणपूर नगद
२ चाचणी
१ कांदे
२ सारवान दरमहा इ ॥ ता ॥ दरमहा उंटास दाला करून देवणें.
—व. ४ स १७४२ पृ. १४ व १५

चांचणूक—चुणूक, हिसका.
अवतरणासाठी ' पांच विश्वें ' पाहा. —हो. कै. पृ. ५८

चांदणी—तंबूराहुटीचा एक प्रकार.
१ काल सौम्यवारीं बदरीजमालखान बोलण्यासाठीं चांदणी मोर्चाजवळ दिली आहे, तेथें आले होते. —ऐ. ले. सं. ४४६०
२ पांच राहुटया दोन बिचोबे दोन चांदण्या कुलारसाहून छकडयावर लादून नेत होते ते पाडाव करून आणले.
—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १२१

चादर—शरण आल्याबद्दल फिरवावयाचा पांढरा बावटा किंवा कापड.
त्यापेक्षा चादर फिरवून किल्ला स्वाधीन करूं
—गो. खं. चि. शा. ब. ६५

चादर लावणे—लक्ष्याचे निशाण रोवणें, (निशाणबाजीसाठीं)
सकरदऱ्याच्या कारखान्यांतून ४तोफा नेऊन दक्षणच्या अंगें चादर लाविली. चौहूत (चारी) तोफांचे, कोणाचे ४ कोणाचे ३ ऐसे चौदा बार केले पण एकही गोळा चादरेस लागला नाहीं. —नाग ∽ पृ. १७२

चांदरात करणें—उत्सव करणें; चैन करणें.
ईश्वरें आम्हांस ढासणें चांगलीं दिलीं त्याणें खैर जाहली. गाडद्यांनीं दोहीकडील फारच चांदरात केली. हुजरातेची व चोहीकडील फौजेची खैर जाहली. —ऐ. ले. सं. ६९

चांदला—कापडाचा एक प्रकार

सनगे	
पासोडया पैठणी	सनगे ४४
दुपेटे	,, १३०
चांदला जरी	,, ४
वोढण्या	,, ६

—इ. सं. पे. द. स. प. मा. पृ. १४१

चांदवडी—होनाचा एक प्रकार. —ऐ. ले. सं. ५६२७

चापकशी, चप्‌कशी—तलावा - (सैन्याच्या पुढें किंवा तळाच्या पुढें १०–१२ मैल, शत्रूची टेहळणी करीत फिरणारी घोडेस्वाराची तुकडी.)

चापलोसी—अजीजी करणें, मनधरणी करणें. (चापलोसी = चापलुसी)
त्यानें यासीं चापलोसीच्या गोष्टी सांगून नादी लाऊन पलटणे सामील करून पातशहास भक्षावयास देऊन पातशहाची स्वारी बाहेर काढावी या विचारावर आला होता. —इ. सं. दि. म. रा.

चापां—चाप लावणें—चिमटा लावणे, छळ करणें.
रुपये वेजरव चापां लावून घ्यावे. मजुरी घ्यावी.
—ऐ. ले. सं. ३७५५

चापाची फतरी—१ चापाची बंदूक २ बंदुकीच्या चकमकीसाठीं उपयोगी पडणारी गारगोटी.
चापाच्या फतऱ्या पुण्याहून आल्या. मागाहून रवाना करतों.
—ऐ. ले. सं. ५७६७

चांपेल—चाफ्याचें तेल. —रा. व्य. को.

चांफेखण—१ घराचा सर्वांत मोठा खण २ चौकाच्या कोपऱ्यावर दोन बाजू मिळतात त्या ठिकाणी होणारा मोठा खण.
थोरल्या चौकांत उजवेकडील चांफेखणांत बैठक होऊन नजर नजराणा जाला. —ऐ. ले. सं. ४७४६

चाबुक—हुशार, चपल, चलाख.

चाबुकस्वार—घोडे शिकविणारा.

चाबुकसिवणी—चाबूक मारला असतां त्याची दोरी स्पर्श करील इतकें थोडें अंतर.
भिवरीपुढें तो हुजुरचें स्वार आम्हांपुढें सासवडाचें सुमारें आले होते त्यासी पाटीलबावाचें लोकानीं गांठून धरूं लागले ते पलत हे मागें यैसे चाबुकशिवणीनें आपले लोक आले तेच आम्हास भेटले. तेव्हांच ते बोलले कीं तुम्हांस धरतील तेव्हां तुम्ही न जाणें.
—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. २

चामचक—लढाईंत वापरावयाचा एक परशु.

चामोटें थिटणें—पळून जातां येऊं नये म्हणून पायाला बोंचतील असे लोखंडी कांटे किंवा चिमटे पायांस बसविणें.
बावीस असामी शामलाकडील स्वारींतील धरून चामोटे थिटून रायगडास नेली. —ऐ. सं. सा. पृ. १६ नोंद ६

चारकुबा—एक प्रकारचा आंगरखा. यास बाह्या नसतात. आगापिच्छा मात्र असतो व आघाडीस व बाहूवर मोत्यांची झालर असते.
वस्त्रे खिलत सात पारचे व चारकुबा व दस्तार व सरबस्ता मरावरीद

व समशेर व सिपार या प्रमाणें इनायत हुजूर होऊन जाहले ते सेवेशी रवाना केले आहेत. —म. शि. यां. का. पृ. ४५९

चारकुवा—१ मुसलमानी तऱ्हेचा उंची पोशाख २ चौकटीदार कापड.
वकील मुतलख व अमीर उल् उमरावची खिलत चारकुवा व जीगा व शिरपेंच व परिंदा कलगीमय लटक व माला मकरवारी व कलमदान ढाल तलवार मोर्चेल नालकी पालखी शिक्के कटचार माही मरातब, तमन तोग हत्ती घोडासुद्धां बहुत आदरें करून श्रीमंतांनीं घेतलीं.

—ऐ. ले. सं. ४६२३

चार चातुर्मास्ये—चार पावसाळे.
चार चातुर्मास्ये तुम्हांस अधिक आहेत—चार पावसाळे जास्त पाहिले आहेत. —बा. गो. प. ले. १६

चारण—सैन्याला धान्य रसद पुरविणारी, बैलांचे तांडे पाळणारी एक फिरस्ती जात (जमात).
नवाब खासे मात्र खडर्याच्या गढीत शिरले होते फौज दरोबस्त बाहेर होती नवाब यांचे बरोबर चारण यांचे बैल चाळीस हजार दाण्यांनीं भरलेले होते, ते पेंढाऱ्यांनीं लुटून पेशव्यांच्या लष्करांत आणिले.

—खडर्याच्या स्वा. ब. पृ. १५

इंग्रज १२,००० व तोफा २५ व लमाण चारण २०,००० पावेतों आहे.

—ऐ. ले. सं. ३५८४

चारणकस पथकें—पेंढारी पथकें
सांप्रत होळकर शिंदे यांजकडील चारणकस पथकें तमाम इकडे आलीं त्यांनीं लुटून पस्त केलें.

—पे. द. भाग २९ पत्र नं २७१

चार दिवाळी—ज्याला चोहोंकडूत भिंती आहेत असें आवार.
टेंबलाईजवळ उत्तर दिशेस एक टेकडी आहे. त्याजवर चार दिवाळी पाऊणशें हात हमचौरस होती. —ऐ. ले. सं. ४६७२

चारवा—चर्या. 'चर्या प्राकार फालिका' रा. व्य. को. त्यावरून तटाच्या भिंतीवरच्या माथ्यास कातरलेल्या करंजीप्रमाणें किंवा कमळाच्या पाकळ्यांप्रमाणें बांधकाम केलेलें असतें तें.
त्यानी शहरचे दरवाजे लाऊन कत्तल केली. तेव्हां दोन स्वार, कोट शहराचा आतून वीस हात उंच उडून आले त्यात एक तर कोटाचे चारव्यास अडकून बरोबर जाहला (ठार जाहला) एक शाबुतीने लस्करांत आला. —हो. कै. पृ. १६

चालक—चाळक, खेळचा, कारस्थानें करणारा.

परंतु हे गृहस्थ परम चालक आहेत. यास निर्बंध ठेवलीयानें पुण्यामध्यें सुद्धा राहणार नाहीं. येखादे स्थली (कैदेत) ठेवावा नाहीतर कार्याचा नाश करील. —पे. द. १२ पृ. ७०

चालक—चलाख; चांगली मजल मारणारा.

मकसुदाबादी टाकण (घोड्याची एक जात) चालक पाठविणें.

—रा. खं. ३ पृ. ११

तीर्थरूप रा. आपास सातारां पत्रें लिहिलीं आहेत. आपण पोचताच दीन माणसें चालक बरीं पाहून, कागद आधी तीर्थरूपाकडे पोहचत तें करावे

—इच. सं. इ. पु. ५२

चाल घालीत चालणें—दडपून वहिवाट पाडणें.

१ साडेतीन वाटण्या केल्या त्यात कलम लिहिले आहे जे, इनामवतनें जीं असतील तीं चौघा भावांनीं सारखी घ्यावीं. त्यांत चिटणविसीचा वाटा नाहीं असे असोन अलीकडे मल्हारीराव यांनीं चाल घालीत चालले आहेत. वतनामध्ये वडील वाटा म्हणून प्रांत चेऊल येथील गांव आपणाकडे वडील वाट्यास म्हणतात !

—चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती व यादी सनदापत्रें.

—ऐतिहासिक जुने लेख पु. २ पृष्ठ २

चालचर्चा—हालहवाल.

तुम्ही गेल्या तागायत पुण्याकडील चालचर्चा कशी आहे हें कांहींव लिहिलें नाहीं. —ऐ. ले. सं. १४२८

चालचलाव—जा ये, वहिवाट; वर्दळ.

त्यांचा वाडा आमच्या वाड्या शेजारीं. मध्यें भिंत मात्र. त्यांचा चाऊ-चलाव जाला आहे. उपद्रव करितात.

—ऐ. ले. सं. ६४९५

चालढाल—चालढकल.

त्याणी चालढाल करून त्याजकडून कौलकरार लिहून आणावा म्हणून मसोदा करून आम्हांपासी दिधला. —इ. सं. दि. म. रा.

चालणी—काथ्याचा दोर. —कु. आं. ढ. ३९४

चालत (स्त्री.)—धोरण; चालचलणूक.

नवाबाकडील मजकूर लिहीला आहे, त्यास त्याची चालत कारभारी यास मठीं ठेवावयाची आहे. (कैदेंत ठेवावयाची आहे.)

—ऐ. ले. सं. ७०१६

चालचरित्र—वर्तणूक.

मसलतीविषयीं नेट आहे कीं उपेक्षा आहे हे चालचरित्र शोधून बातमी लिहीत जावी. --ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १३८

चालचालण—ठरावाविरुद्ध वर्तन; गैरवर्तन.

पेणकर ब्राह्मण व परभूंचा कजिया मागेंपासून आहे. ऐया शास्त्री (न्यायाधीश) असतां अमुक तऱ्हेनें त्यांणीं वर्तावें असें ठरावांत आलें होतें. कांहीं चालचालण पडलें होतें. अलीकडे दंग्यामुळेंहि तसाच प्रकार होता. यंदा मात्र पेणकर परभूंचा बंदोबस्त पक्का करावा या बेतांत आहेत. —ऐ. ले. सं. ५२१६

चालचूक—चळचूक, गोंधळ, नजरचूक.

काही फौज तिकड चेमलकड चालचूक होऊन निघाली त्याचा थोडा-बहुत गलाठा झाला. --पे. द. भाग २९ पत्र नं. १२७

चालते थबल्याचीं पत्रें--चालते थैल्यांचीं पत्रें. चालू टपालांचीं पत्रे.

जनरेल या मार्गें पुण्यास जाण्यास आल्यास तुम्ही बरोबर येतच आहांत. योग बनल्यास समक्ष भेटूं. अथवा सरदेस आल्यास चालते थबल्याचीं पत्रें तुमचीं येतील तेव्हां विस्तारयुक्त बोलण्याविशीं लिहून पाठवूं. —ऐ. ले. सं. ८२२७

चालतें दप्तर—मराठी अमलांत या शब्दाचा अर्थ चालूं दैनंदिन कारभारा-साठीं लागणारें दप्तर. हें दप्तर फडणिसाच्या ताब्यांत असावयाचें. —विलसन

चालवा--चाल, चालचलणूक, रोख.

शत्रूचा मुक्काम कोपळापलीकडे तुंगभद्रातीरीं आहे. त्याची चालवा पाहून कनकगिरीच्या सुमारें जावें, असें आम्हीं योजिलें आहे. —ऐ. ले. सं. ४१६५

चालाकुचाला—चाळाकुचाळा, आवाडाव, चालमेल, चाळादुचाळा.

चालेकुचाले करून कार्यनाश करू म्हणतील तरी बऱ्या विचाराच्या गोष्टी चार सांगोन थंड करावे. —पे. द. ३३ पृ. ४०

चाली घेणें—कूच करणें.

आता विजयादशमीही समीप येऊन पावली. विजयादशमीचे मुहूर्ते चाली घेतील. —हिं. द. खंड १ पृष्ठ ६७

चाले चाले--हळूहळू; कूच मुक्काम करीत.

इंग्रजास आश्चीर्य जाले कीं मल्हारजी होळकर मनुष्य नव्हे ईश्वरी अंश खरा! असे मानून टोपी काढून सलाम करून माघारा गेला. चाले चाले झाशीस आले. --हो. कै. पृ. ३७

चास्नीगर—नाणें पाडण्याच्या मिश्र चांदीची परीक्षा करणारा.
—भा. इ. सं. मं. स. स. वृ. ८५

चासणीकार—राजे लोकांचा स्वयंपाक आधी चाचणी करण्याकरिता खाऊन पहाणारा अधिकारी; चोख्या.
—रा. व्य. को.

चासणी—उसाचा रस कढविण्याची काहील.
—विलसन

चासनी—चव.

चाहता—आवडता; मर्जीतला.
कित्तूरकर देसाई विद्यमानकाळीं महाराजांजवळ चाहते झाले आहेत. बागेवाडी वगैरे तालुक्यांतील इनाम गांव वतनवाव आपले स्वाधीन करून घेणार.
—ऐ. ले. सं. ५३५०

चाहरम—चवथाई.
सुजायतखान अलजपूरचा सुभा यानें ३ वर्षे आमचा चाहरम दिल्हा नाहीं. म्हणोन त्याचा परामृष करणें जरूर जाहले.
—पे. द. १५ पृ. ७९

चाहारुम—चौथाई, खंडणी.
मौजे मदनूर ही जागा जागीर सेवकाची आहे. येथील चाहारुम विषयी तकयुद फार आहे.
—पुणें अखबार भाग १ पृ. ६९

चाहूर—जमिनीचें एक माप. कांहीं ठिकाणीं १२० चौ. बिघ्यांचा चाहूर धरतात तर कांहीं ठिकाणीं तो १५० बिघ्यांचा धरतात.
—विलसन

चिक, चीक—बांबूच्या चोयटयांचा पडदा.

चिकंदाज—वेलबुट्टी काढणारा; मुतर्रिज.
(ऐतिहासिक कागदपत्रांतून चिकंदोजी असा कापडाचा एक प्रकार नेहमीं येतो त्याचा अर्थ नक्षी किंवा वेलबुट्टी काढलेलें कापड.)

चिकंदोजी—कापडाचा एक प्रकार. फुलें किंवा वेलबुट्टी काढलेली शाल.
त्या समागमे आम्हास बुटेदार चिकंदोजी थान पाठविले आहे.
—पे. द. १७ पृ. ८८

चिकाटी—मिठी; पाठलाग, पिच्छा.
मैदानांत इंग्रजांची गांठ पडती तर त्यांचा फडशाच होता ! याउप्पर गांठ पडलियावरि चिकाटी सुटणार नाहीं, असें समजून इंग्रजांनीं मही उतरून दोन मजली जलद अलीकडे आले.
—ऐ. ले. सं. २३२०

चिकार—बिनलढाऊ; कचरा.
किल्ल्यांतून चिकार माणूस नित्य थोडें बहुत पळोन जात आहे. पळोन

येतात त्यांच्या सांगण्यांत किल्ल्यांत गडबड आहे (म्हणजे किल्लेकरी घाबरले आहेत). —ऐ. ले. सं. ४३७९.

चिकित्सक—बाबा वैद्याचें सांकेतिक नांव.
खंडोपतं पानसी कोणें समयी व्यामोह करतील न कळे चिकित्सकही त्याच पक्षीं ! —ए. ले. सं. पृ. १०४

चिकीर्षित—महत्त्वाकांक्षा; हेतु; उद्देश.
कवाइती लोक ३०० आले आहेत. त्यास कीठून आले, जाणें कोठवर, चिकीर्षित काय, याचा विस्तार लिहिण्याची आज्ञा झाली पाहिजे.
—ऐ. ले. सं. ५१३९.

चिचेरा—चुलत.
भानू मजकूर बाळाजीपंताचे चिचेरे बंधु ते मृत पावले.
—पुणें अखबार भाग ३ पृ. ११५

चिटणीस; चिटनवीस—पत्रव्यवहार करणारा.
चिटणीस याणीं सर्व राज्यांतील राजपत्रें ल्याहावी. राजकारण पत्रें उत्तरें ल्याहावीं. —वाड सनदा १२४

चिठ्ठीचा चाकर—चिठ्ठी येताच येऊन हजर होणारा आज्ञाधारक, विश्वासू चाकर, हुकमी हलाल चाकर.
हुजूर येण्याची आज्ञा त्यास मी चिठीचा चाकर मजला उजूर नाही परंतु शरीरसामर्थ्य नाही याजमुळे निरुपाय आहे.
—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. २८

चित्तांत कुऱ्हा जाणें—चित्तांत कुऱ्हा येणें. दंश, राग. विकल्प येणें.
—पे. द. भाग २० पत्र नं. २८७

चित्तास विस्कळीत वाटणें—विचित्र भासणें.
चित्तास विश्कलीत वाटेल यास्तव जितके त्यांचे तिकडे संतोषे होईल ते करून कागदपत्रें रोख होईल तें पदरीं पाडून घ्यावें वोढूं नये.
—हिं. द. खंड २ पृष्ठ ७४

चितेवान—शिकारखान्यांतील शिकारी चित्यांचें काम पाहणारा किंव. निगा राखणारा अधिकारी. —पे. दा

चिंधीचोळा करणें—नाश करणें.
तें समयी किल्ल्यावरील लूट गुरेढोरें व चिंधीचोळा करून खाले उतरोन गेले. —पे. द. १२ पृ. १००

चिनी—चिनी साखर (साखरेचा एक प्रकार)
रु. १३ साकर चिनी
वजन ८३! दर मण रु.

४८ योा दर ४
२ साकर नावद
वजनी ८।"

—केळकर संग्रह कुंबल दप्तर

चिपड होणें—किंचित दिसूं लागणें. सकाळच्या वेळीं झुंजूमंजू होणें.
काली समस्तानीं बसून विचार केला कीं दोप्रहरा रात्रीं खाडी उतरावी व चिपड होता हल्ला करावी. —पे. द. ३३ पृ. १४१

चिपली—पिचकारी.
सेनाधुरंधरास मूत्रकृच्छ्रामुळें प्राणांतिक श्रम जाले सेवट बाह्योपचार इंद्रियद्वारा कषायाची चिपली (काढ्याची पिचकारी) मोठ्या प्रयासें करून केली तेव्हां होत होत (हळू हळू) मूत्र मोकळे जाले.
—नाग २ पृ. १०

चिपळुणे—कोकणस्थ
त्यांत आम्ही चिपळुणे: तुझे वाढविले. तुला लाज असावी.
—ब्र. च. पृ. ४२

चिपोली—पिचकारी.
वैद्य उपाये करीतच होते ते समयीं बकऱ्याचे अडाचे काताड्याची चिपोली करून आंत काढापाणी घालोन इंद्रियात पिचकारी चालवून दिल्ही तेव्हा मूत्र थोडा थोडा होत होत जाला. —नाग २ पृ. १११

चिरंजीव—नाना फडणविसाबद्दल एक योजिलेलें सांकेतिक नांव. (बाळाजी जनार्दन यातील बाळ म्हणजे लहान त्याचा मायना चिरंजीव)
तूर्त शिंदे यांचें आणि चिरंजिवांचें यथास्थित (सख्य) झालें आहे.
—ऐ. ले. सं. ५१७०

चिराख; चिराग—दिवा, बत्ती.
तों शहरांत सर्कारचे वाड्यापासून भवानी पेठेपर्यंत दो बाजूनें चिराखा तयार केल्या. —खरे ९ पृ. ४७४५
सगळया शहरांत चिरागा लावून हवया नळे चंद्रज्योती लाऊन स्वारी रस्त्यानें मिरवत चालली होती.
—ख. स्वा. ब. पृ. २१

चिराख बत्ती—दिवाबत्ती.
दर्गाहाचे चिराखबत्तीस व ऊद फुलाबद्दल.
—पे. द. स. मा. २४२

चिराग्दान—रोषणाईचे वेळीं रस्त्यानें दिवे लावण्यासाठीं उभी केलेली बांबूची जाळी.

चिरागान—चिराकदान; (चिराक म्ह. दिवा; दान म्हणजे (दिवा) ठेवण्याचें पात्र. कामटयांच्या ताटया करून त्यावर पणत्या वगैरे लावून दीपोत्सव करतात त्यास चिरागान (चिराकदान) म्हणत.

लग्नसमारंभासाठीं ९ खणांचे चौकांत महतापी केली होती. चौकाचे दरवाजापासोन दिल्ली दरवाजापावेतों जागा खुली होती, त्याचाहि महतापी मंडप मढविला होता. वाडया भोंवती चिरागान बुधवार कापड औळी झाडून फडक्याचे वाडयापावेतों चिरागानाचीं लांकडें उभीं केलीं होतीं. —ऐ. ले. सं. ५४४४

चिरादस्ती—कौशल्य.

चिल्ला—चाळीस दिवसांचें उपोषण व ध्यानमग्नता.

तुम्ही (ब्रह्मेंद्रस्वामी) चिल्ल्यांतून उठले याची खबर लिहिली मालूम जाली. —पारसनीस ब्र. च. २३९

चिल्ला—धनुष्याची प्रत्यंचा किंवा दोरी. —रा. व्य. को.

चिलखत—लढाईचे वेळीं अंगांत घालतात तें; बख्तर.

त्याचे घोडे घेतले चिलखत घेतले. दाटी फार जाहाली म्हणूनच तो राहिला. नाहीं तरी शिद्यास आणिले असते. त्यास पांच सहा जखमा लागल्या होत्या. —पे. द. ११ पृ. ३४

चिलमी वर्तमान—पुण्यांतील भांग्या मारुतीच्या अड्डयावरील लोकवार्ता. (दरबारी, बाजारी, सावकारी, भटी, चिलमी असे वार्तांचे किंवा बातम्यांचे प्रकार त्या काळीं प्रसिद्ध होते).

चिलमी वर्तमान मिरजेच्या सनदा श्रीमंतांनीं श्री. चिमाजी अप्पास करून दिल्या असें बोलतात. —ऐ. ले. सं. ६५९६

चिवट—कच्च्या सुताचा पेळू. हें सूत, १० ते १२ क्युबिट लांबीचें असून त्याचे तानवटावर म्हणजे २ खांबांवर १०० ते २०० वेढे होतात.

सुताचे चिवट येक देऊन पाठविले आहे. —पे. द. ८ पृ. २०

चिवडा होणें—गोंधळ, घालमेल.

सिंदे याची सरदारीत चिवडा दिसते.

—पे. द. भाग २९ पत्र नं. ३६

मुख्य मातबर नरवर. तेथील चिवडा जाला.

—पे. द. भाग २७ पत्र नं. ४५ व ५१

चीक—डिंक.

छत्रपतीकडील हुजरे पुणें, जुन्नर प्रांते चीक काढावयास आले आहेत तर जिकडे चीक असेल तिकडे दहा पांच गांवी पाठवून दहापाच घागरी

त्यानी चीक न्यावा. थोर गांवास पावला व लहान गांवास चवलप्रमाणें तह आहे त्याप्रमाणें घ्यावा. —पे. द. ३० पृ. २१५

चीज होणें—मरणें, ठार होणें.

द्वारकोजीरावानी उडी टाकून सुभानरायाचा मुडदा काढून आणला आपणहि जातीनिसी तरवार केली ऐसीयास सुभानराव स्वामीकार्यावर चीज झाले. त्यांचे पुत्र तुम्ही जोत्याजीराव तुमचे चालविणें आवश्यक करिता तुम्हास सवाई सुभानराव नांव ठेऊन मौजे इंदोली हा गांव इनाम दिला असे. —इ. सं. पे. द. स. प. मा. पृ. १७

चुकणें—(एखाद्यास चुकणें) — एखाद्याकडे दुर्लक्ष करणें किंवा एखाद्यास विसंबणें किंवा एकाद्याबद्दल उदासीन राहणें.

तेव्हां हे दोघे नांदीवशास गेले आणि आईच्या चरणावर मस्तक ठेवून समजाविते झाले की आम्ही सोमाजीरावास चुकणार नाहीं. —दस० शि. मो. इ. पृ. ४

चुकराई--दीनपणा, उदासपणा.

तुमचे पत्र बहूत चुकराईचें आले ते ऐकोन चित्तास बहूत श्रम जाहलें. द्रव्य मिळाले नाही म्हणोन लिहिले तर एक जय झाला त्यापेक्षां धन अधिक नाहीं. —ऐ. सं. सा. खंड ६ पृष्ठ २८

चुकांडी—झुकांडी.

ते दौड देऊन गांठ घालीत नाहींत. हर तऱ्हेनें चुकांड्या देत फिरावें आणि वैशाखमास घालवावा ऐशी त्यांची मसलत आहे. —ऐ. ले. सं. ३६४

चुकारा—खंडणीची चुकती किंवा चुकोती.

भदावरचाहि चुकारा (खंडणीची चुकती) जाला. —पे. द. १४ पृ. ५६

चुकूर काळ—भयंकर, मोठा दुष्काळ.

सन ११९४ आपला लेक व भाऊ पोटाविण मेले. चुकुर काल पडिला. माणसें सुजलीं. —शि. च. सा. खं. ५ पृ. २३७

चुकुर होणें—दीन होणें.

आपण अन्नाविण चुकुर जाहलो व मेलो तरी आपणांस वतन काय होये? —ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ ६२

चुंगल—मूठभर. मूठ. —विलसन

चुंगाल—पंजा, पकड.

बहुत खुश्वक्त जाले की जबर्दस्ताच्या चुंगालापासून गरिबाचें वतन खुलास जाले. —राजवाडे २० पृ. ४९

चुगी—मूळ हिंदी शब्द चुंगी—मूठभर धान्य. २ गवताची किंवा कडब्याची पेंडी; ३ शहरांत विकल्या जाणाऱ्या वस्तूवर बसविलेला कर.
यासी कानू दर गोणीस रुपया ।' परदेसी येईल त्यास चुगी सदरहू खेरीज दर बैलास अदपाव ८८८९ प्रमाणें.
—शि. च. सा. खंड ५ पृष्ठ १५८

चुंगी—टोळी.
अशा फौजेच्या चुंगी पांचशें, हजार, पंधराशे, दोन हजार जशी हजेरी होत गेली तशी (तशा) पाठवीत गेले. —हो. कै. पृ. ११४

चुंगी—बाजारांत काटयावर वजनें करतांना त्या मालापैकीं मूठ मूठ धान्य कर म्हणून घेतात त्याला चुंगीं म्हणतात. —विलसन

चुटका—लहान तुकडा.
आपणांकडील बारीक मोठे वर्तमानाचे चुटके लिहून पाठवावे.
--ऐ. ले. सं. ३२७
—विलसन

चुटकी--चुंगी शब्द पाहा.

चुवक—ताशा किंवा नगारा बडवण्याची काठी.

चूड--दर गडावर चुडीसाठीं गवताचा सांठा करून ठेवीत तो.
हंगामशीर चूड शाकार गला पावता करून किल्ल्याची बेगमी करवणे म्हणून आज्ञा. —E. M. P. पृ. ११२

चुणेदार आरसा--चुन्नी म्ह माणकाचा छोटा लाल खडा. यावरून फ्रेम किंवा चौकटीवर माणकांचे खडे बसविलेला आरसा. --पे. द.

चुथाचूथ—ज्यांत अनेक दुरूस्त्या, शोध, खोडाखोड इत्यादि आहेत असें चिताड लिखाण. —विलसन

चुनाँचे—ज्याअर्थी.
चुनाँचे आँ मेहेर्बाहीं इंग्रजांचीं मकाणें घेतली व तमाम तालुक्यांत दौड ताख्त व ताराज करण्यास गेली आहे व कुमकेचे जमियतेस घेराघेरी करविली गेली आहे हें ऐकून न्यहायत खुशी जाली.
—साने प. या. व. ४६४

चुनीदा—निवडक.
त्याचे उपराळयास जनरल मंडोर याणे आपले हमराहीपैकी बेश चुनीदी जमियेत पाठविली. —साने प. या. व ४८१

चुनंदी—निवडक.
दहापाच हजार चांगली चुनंदी फौज नवनिगाहदास्त करावी.
—पुणें अख. भाग १ पृ. २६५

चुनां—इतकें.

चुनां-कह—इतकें कीं;

चुनां-चह—ज्या प्रमाणें.

चुनीं—असें, इतकें.

चुरसाचुरसी— स्पर्धा.

सखारामपंत व बालाजीपंत कांहीं दिवस बइतिफाक होते; परंतु कामकाजाकरितां परस्परें चुरसाचुरसी होऊं लागली.

—पुणें अखबार भाग १ पृ. १०६

—म. आ. पा. पृ. ५७

चुवक—गलवत प्रकार.

चुस्टाई—चौकशी, पारिपत्य.

हैबती रामोसी आपल्यापासी नांदगिरीहून दोन तीन रोज जाले आला आहे. सांप्रत्य सासवडलाच आहे. त्यास याची चुस्टाई बहुत होईलसे वाटते. त्यात आपणास शत्रु फार जाणोन त्याचा बंदोबस्त राखून येथें पाठवून द्यावा.

—पु. द. भाग २ पृष्ठ १८६

चुस्त—चपखल, तंग.

जरी मुण्डासे पायजमे चुस्त पायाला जी

--होनाजी ८

चुहाड; चुव्हाड—ओरीसा प्रांतांतील भिल्ल कोळी रामोशासारखी चोरटी लुटारू जात.

नबाबांनीं खाजदखान अल्लीस हत्तीच्या खरेदीसाठीं कलकत्त्यास रवाना केला होता. ३ वर्षे तिकडे राहून ३०।४० हत्ती खरेदी करून शिकाकोल राजवद्रचे मार्गाने हैदराबादेस रवाना केले आणि हा कटकचे मार्गे ब्राह्मणपुरास घरास जात असता सोनपूरचे व संबळपूरचे रानांत आला तो तेथे चुव्हाडांनीं लुटून घेतला.

—नाग पृ. १६८

चुहाड—मध्यप्रांतओरिसाकडील केवझड संस्थानांतील बेरड रामोशासारखी एक लुटारी जात (चुहाड, चुवाड, चहाड किंवा चोहाड हे सर्व शब्द एकच. मराठींतील चोरी चहाडी किंवा चोर चहाड हे शब्द याच चहाड जातीवरून रूढ झाले आहेत.)

केवझडवाल्यांनीं श्रीमंत चिमणाबापुसाहेबाकडे राजकारण लाविले की वीस हजार चुहाड व पंचवीस तोफ मी तुमचा सामील होतो आणि आपले झाडींतून बंगाल्यांत जितकी तुमची तितकी अंग्रजाची पलटणे चुकवुन चौक्या चुकवून बंगाल्यांत फौज नेतो परंतु मजला सरकारचा फर्जंद म्हणावे.

—नाग १ पृ. ७४

चूं—जेव्हां, ज्या अर्थी.

चोबी—लाकडी.
नवाबाचे खेमे व चोबी बंगला जाऊन उभा राहिला.
—राजवाडे ७ पृ. ९८

चोबीना—लाकडे. लाकुड काम. राजवाडे ७ ख. ल. प. २ पृ. ७६

चोर असणें—चोराप्रमाणें किंवा अपराध्याप्रमाणें भयभीत असणें.
मन्या हलालखोर गांवांत यावयास चोर, म्हणून कऱ्हाडास पुनाजी नाइकापाशीं चाकरीस जाऊन राहिला.
—ऐ. ले. सं. ६३६०

चोर आंख—व्यापारी लोक कापडावर किंमतीचा जो खुणेसाठीं अगदी बारीक आकडा घालतात तो. तो आंकडा फक्त त्यांच्या माहितीसाठीं असतो. —विलसन

चोरचरीट—चोरचिरीट.
श्रीमंत आपास कैलासवास झाला. यामुले कितेक चोरचरिट आवाडाव करितील यास्तव सावध राहाणे.
—पुरं. द. भाग १ पृष्ठ १००

चोरछपी—चोरीनें छपीनें येणारे. हेर.
पलीकडील आंगचीही बातमी राखणें. चोरछपी जे आणखी कोणी खाली त्याचे येतील ते मारावे.
—पुरं. द. भाग १ पृष्ठ २३८

चोरवाडी—चोरटे लोक जेथें एकत्र जमतात असें ठिकाण.
—विलसन

चोवा किंवा चुवा—चंदनविशेष, चुवा चंदन. —रा. व्य. को.

चोरस्नान--आजारानंतर निंबाचीं पानें उकळून त्या पाण्यानें स्नान करितात त्यास चोरस्नान म्हणतात.
सांप्रत कांहींसा आराम आहे छ ३ रजबी बुधवारीं चोरस्नानही केले.
--नाग १ पृ. २६७

चोराचे चोटानें विंचू मारणे--स्वतः शाबूत राहून दुसऱ्यास खर्ची घालून आपलें काम साधणें.
येमाजीपंतावर नेहमी मसलत कराजी तर पांच हजार सात हजार फौज घेऊन येक खासा हंगामशीर मेहनत करील तेव्हां मंगलवेढें सांगोले अथनी ही ठाणीं सुटतील. यास खर्च दाहा लाख बसेल. दरबारचे मुदसदी चोराचे चोटानें विंचू मारणार ! खर्चाखालीं मात्र आम्हीं यावें.
--ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ १३

चोरावा—चोर चोरटा; चोरी.

१ तीन महिने मोर्चे लागले आहेत. दीड दोन हजार माणसें बाहेरील मेलीं. चोरावे सुटले आहेत. आपले जोडीचा निभाव होईना, म्हणून हर तजविजीनीं सिन्यास पत्रें पाठविलीं. —पे. द. ४० पृ. १०९

२ प्रांतांत दंगा आहे. रामोशी चहूंकडून उठले आहेत. चोरावे भारी जाहले आहेत. —ऐ. ले. सं. ७९६७

चोरीचपाटी—चोरीमारी.

ऐशियास गावात चोऱ्याचपाट्या होतात हे गोष्ट कार्याची नाही. रखवालीस बेरड ठेवावे. --पुरं० द. भाग ३ पृ. ९०

चोरे पाणी घेणें—आजारानंतर बरेच दिवसांनीं प्रथम स्नान करितांना कडू निंबाचीं पानें पाण्यांत घालून त्या पाण्यानें स्नान करण्याची पद्धत आहे त्यास चोरे पाणी घेणें असें म्हणतात.

ज्वर येऊं लागला. १५-२० दिवस अगदीं स्नान राहिलें होतें. चोरे पाणी घेतलें. --ऐ. ले सं १८५६

चोली कुचाली--फितुरी.

इकडे मुरारराव वगैरे चोलीकुचाली फार आहेत, स्नेहानें सर्व आपले करुन, आपलें कार्य होईल. —पुरं. द. भाग १ पृष्ठ २४९

चोली दामन (मैत्री किंवा तह)—पक्का, घनिष्ठ, दृढ. चोळी-चोळी-दामन -पदर. चोळीवर जसा पदर हटकून असावयाचाच, बिलकूल ढळावयाचा नाहीं त्याप्रमाणें एकमेकांस न सोडणारी मैत्री. हा हिंदी भाषेंतील वाक्प्रचार आहे. उ. चोलीदामनका साथ.

दादासाहेब बोलले कीं या वेळीं निजामाची लढाई कडवी घ्यावी. बोलणी होत होती तेव्हा सुभेदार (मल्हारराव) बोलले कीं 'कडवी लढाई जाली तर नाश दोघांचा होईल. त्यांत तुमचा व त्याचा (निजामाचा) चोळीदामनचा लेखा, लिहिले पुसले आहेत ! हा (लढण्याचा) जिकर भारी असला तर आपले व नबाबाचे दोन्ही दौलतीस आपाये करील'

--स. ब. पृ. ३०

चौहाड—मध्यप्रांत ओरिसाकडील एक चोरटी जात.

त्यास वाटेनें येता समलपूरचे मैदानांत चोहाडांनीं जासूद लुटले तेव्हा ते कागदही गेले. —नाग १ पृ. १०९

चोळण—चिंधीचोळा. नाश.

कुलाबा संस्थान आपलेच आहे. स्वार व गाडदी जावयाचा इतका अट्टाहास कशास पाहिजे ? रयतेची चोळण होईल.

—इ. सं. आं. यांची हकीगत पृ. १७

चूच--(?)

१। रुपया वरास (नवऱ्या मुलास) चूच केली तेव्हां न्हावी यास शेला १
--थो. मा. रो. २ पृ ३५०

चेडूली---चंडोल. सैन्याची पिछाडी किंवा रियर गार्ड.

ग्रहणाचे दिवशी मुजफरजंगानें छापा घातला फिरून श्रीमंताणी सांभाळोन फौजेची जमीयेत मीडली लढत लढत कोरगांवास आले तेथे लढाई होऊन चेडूली वुडविला.
--स. ब. पृ. २२

चेढुल—चेदुल, चंडोल.

यशवंतराव पवांर याणी सदरीं लिहिल्याप्रमाणे मोगलाकडील चेढुल लढाई करून वुडविला नंतर यशवंतराव पवार पानिपतचे लढाईत फौजे सुद्धा गर्द होऊन गेले.
—द. स. कै. या. पृ. ७५

चेंद—चेंदाचेंद; गर्दी; गोंधळ.

फटकडीच्या मारानें कोटांत मोठी चेंद होऊन गजबज झाली आहे.
—ऐ. ले. सं. १७१४

चेरमनुकाई—चर्मनुमाई (?) मऊ कातडी, मायाळूपण (?)

बंगालेचा मुलूक रघोजीबावांनीं सोडवीत गेले तेणेपरी पट्टणचाहि मुलुख सुटत जाईल. त्याचा गर्वभंग करावा. त्याचे वकील तो तेथे रुजू जाहले असतील त्यास चेरमनुकाई दाखऊन लस्करात राहून दबावेस जाहालिया पुढें भये उत्पात होईल. पैकेवालेसहि कजियाकडा पडो त्याजकडून काही तकसीर घडो यैसे ईश्वरापासी मागावे.
E. M. P. पृ. १५३

चेला—घरच्या मुलासारखा पाळलेला माणूस, पालकपुत्र, शिष्या, चेले बारगीर.

पुढें इस्मायल बेग तीस हजार स्वार लाख पायदळ पांचशें तोफेनें नवाब कूलीखा व अफरास खां इत्यादि नजीबखानाचे चेले, फौजबंद तितके सामदामदंडभेदेकरून पिशवींत घातले व जयपूरचे राजास उपद्रव आरंभिला.
—हो. कै. पृ. १०३

चेष्टित—हालहवाल, हकीकत.

तीर्थरूपास तेथील चेष्टित सविस्तर लिहीत जावे.
—चं. चू. द. पृ. १३५

चेहलदा—वंजारी लोकांकडून वसूल करावयाचा कर.
—विलसन

चेहलदु—(?)

हे रयत कैदेतून सुटल्यास कसब्याची आमदानी चालोन चेहलदु व जकात सर

कारची उत्पन्न होईल रयतेचा जीव घेतल्यानें इतका पैका त्यास मिळावयाचा नाहीं. सेनासाहेब जालनापूर येथील रयत दलाल कैदेत घालून रोज तीन मार देतात यामुळें कांही मेलेही. —नाग २ पृ. २२५

चोकस—चोख, पारखून घेतलेली.
माघारे देशास येतेसमयीं बातमी बरी चोकस राखोन बहुत खबऱ्यानें सावधपणें यावयाचा विचार केला पाहिजे.
—पे. द. १२ पृ. ५३

चोखट—चखोट, उत्तम, निकराची, निवडक.
१ लढाई चोखट जाहली लोक बहुत हरदोतर्फेचें जाया जाहले.
—इ. सं. तं. रा. घ. पृ. ८०

२ फिरंगी वगैरे सामान चोखट आहे.
—पे. द. २८ पृ. १२८

चोटया—घोडयाच्या आयाळीच्या घातलेल्या वेण्या.
—रा. व्य. को.

चोट चालविणें—हल्ला करणें, घाव घालणें, जखम करणें.
पर्वतीस पंतप्रधानानी वाघावर हत्ती घालून सेर केले. येके हातीने वाघावर चोट चालऊन जाया केले.
—पुणें अखबार भाग १ पृ. २०४

चोपड—घोडयाच्या अंगास लावावयाचा औषधी लेप.
येणेंप्रमाणें कुटून वस्त्रगाळ करून धयांत कालवून चोपड घोडयाच्या अंगास लावावें. --ऐ. ले. सं. ८४१४

चोपड—१ चौपट, २ सोंगटया.
चोपड व बुदबले खंबाईताहून आपण आणविली होती ती आली आहेत. त्यास चोपडास पट पाहिजे तरी नारंजी सकलादीचा पट करून आणविला पाहिजे. —पे. द. १७ पृ. २०

चोपाचोप—मारामारी.
त्यानी कोल्हापूरच्या पेठेपर्यंत जाऊन दाहापांच घरें नागविलीं आणि चोपाचोप करीत दरवाजेपर्यंत भिडले. पूर्वी बुमका (?) होता त्यामधें जाऊन भिडले आंत शिरावे इतक्यांत चौकीचे लोक याणी दरवाजे महामूर (बंद) केले. —पे. द.

चोपाळा—विश्रांतीची व पाणपोईची जागा.
मौजे मजकुरी आमचे वडिलांची थडी (समाध्या किंवा वृंदावनें) व चोपाळे आहेत.
—मरा. कु. इ. ढवळ पवार पृष्ठ ३५

चौघाचार—समाईक मालकी. —विल्सन

चौचाकी—चारचाकी गाडा
जेजुरकर सुतार चौचाकी नीट करावयासी आले त्यास तिवट १ रु. १३३ बाभळा खरेदी केल्या चौचाकीस व तर्फास खाणीवर ४२
—पे. द. ३१ पृ. ११८

चौत्रा—चबुत्रा, उंचवटा.
गोटात लाख रुपयांचा चौत्रा बैठकीस करून पांच लाख रुपये फकीरीबद्दल (फकिरी दिल्याबद्दल) यशवंतरावास पावती दिली.
—हो. कै. पृ. १७२

चौत्रा—चव्हाटा, २ कोतवालाची कचेरी
मंदोसरात वस्ती मेवात्यांची. मेवात्याशी व कोतवालाशी कलह होऊन मेवातीयानी लढाई करून कोतवाल याचे डोके गादीवर कापले तेव्हा सुभेदारानी धाऊन येऊन शहरात शिरून मेवात्यांचा कट्टा केला. चौत्र्यावर ज्या मेवात्याने कोतवालाचे डोके कापले होते त्याचे डोके चौत्र्यावरच कापिले —हो. कै. पृ. ३५
जागा स्वसंतोषे देऊन खरेदीपत्र करून दिल्हे ते तुम्ही चौतरा आणून दाखविले. त्याजवरून चौतराहून कारकून व गवंड्या पाठवून जाग्याची मोजणी करून कलमें करार करून दिल्ही.
—पु. न. सं. वृ. खं. २ पृ. १०१

चौधरी—तोफखान्याकडील बैलांचा अधिकारी.
यांजकडील माणसांनीं व तोफखान्याचे बैलांचे चौधरी यांजकडील माणसांनीं जिन्नस आणिला आहे, त्यास जकातीचा तगादा न लागे तें केलें पाहिजे. —ऐ. ले. सं. ४४९

चौरसी—घंटा घुंगुर लावलेली झूल.

चौंभास—हुशार, हरहुन्नरी. मूळ अर्थ चौभाष (चार भाषा) जाणणारा किंवा बोलणारा.
बापू विठ्ठल परभू होळकराचे दौलतीत शिलेदारीनें होते. चौभाष माणूस. लिहिणार बोलणार. शिपाई इराद्याचा माणूस.
—हो. कै. पृ. १३१

चौमेखी करणें—दोन हात व दोन पाय, चारी चार बाजूस मेखा ठोकून त्यांस दोरीने बांधून ठेवणे
उभयता मारेकरी यांच्या पायांत बेड्या घालून चौमेखी करून पाहऱ्यात ठेवले. —नाग २ पृ. ७७

चौशाला—शेल्यासारखें एक वस्त्र.
अंगावरील चौशाला दोन जोडिया होत्या त्या कृपा करून अंगावरी टाकिल्या. —पे. द. १८ पृ. ५०

च्यकनामा—चतुःसीमा सांगणारा कागद
१ च्यकनामा प्रो. थल इनाम रा. विसाजी कृष्ण यास दिले त्याचा.
—पेठे दप्तर भाग १ पृ. १
२ उत्तरेस पेडोला सेत घोटीटिके दक्षणेस पेडोला सेत गायमुख पूर्वेस वोढा वोहोळाचा पेडोळा पश्चिमेस सेत गायमुखाचा पेडोला येकूण जमीन कास रुके ॥ चोवीसपैकी चावर १ रास च्यकनामा करून दिधला असे. —पेठे दफतर भाग १

च्याहारुम—चवथाई, चहारुम.
कृपाळू होऊन नूतन इनाम पडजमीन अवल—च्याहारुम चौप्रतीची खेरीज हकदार.... एक चावर दिली. —ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ ३६

छ

छकडा—दारूगोळा वाहण्याचा छकडा. (तोफांबरोबरील).
बातमी लागतांच फौजा धांवून गेल्या, तेव्हां छकडे वगैरे कांहीं सांपडले.
—ऐ. ले. स. ३३९०

छटा—छट्टा; अंतर.
श्रीमंतांची खासा स्वारी फौजेसुद्धां नबाबाचे रोखें गेली. फौजेस छटा थोडा राहिला. —ऐ. ले. सं. ७३५६

छटी—छट्टा, अंतर, फासला.
त्या संधीस देशी निजामअल्ली याचा दिवाण रामदासपंत यानी नानासाहेब भाऊ साहेब यांजवर चाल केली. पारनेरानजिक लोणी कोल्हयाची तेथे मुक्काम आला. श्रीमंतांचा मुक्काम तीन कोसांच्या छटीनें सुप्यावर होता. —हो. कै. पृ. १८

छडा—तोफा (मूळ शब्द छडी, जसें, लंबछडी तोफ)
मौजे बसोडा प्रो॥ जलालाबाद हा गांव बादशहाचे बायकोस जागीर जाली. छडा व पनासेक प्यादे येऊन बलेतगावी शाहदरिया जवळ आहे.
—हिंगणें द. भाग २ पृ. ३५

छडीकाव—शिडकाव.
जुने हशे लालहिरवें सोनेरी छडीकाव असें तसबिरांचें एकवीस फरदच राहिलें. —म. द. रु. ती. पृ. १७७

चौक—१ चारी पाय उचलून भरधाव डौलदार पळण्याची घोड्याची एक चाल उदा० 'जरा घोड्यावाणी चौक टाक'
रिकीबदारानें राजेश्रीस सांगितले कीं घोडा दूरच्या टप्यास बहुतसा दाटला तरी थोडासा वोढितो. त्याहीमध्यें त्यास खपाटचा लगाम म्हणून थोडा वोढितो. आडवा लगाम दिल्यानें सज येईल असें सांगितले. त्यावरी राजेश्री बोलीले कीं पुढीले चौकास जसा जाहे तसा मागले चौकास नाहीं.
—पे. द. ८ पृ. १५

चौकचारी—चौघाचारी, समाईक हक्क.
त्यांतील वहिवाट गुरवाहाती करून उत्पन्न होईल ते चौकचारी वडलाचे वडीली मुलगांवकरांचे विद्यमानें श्री कडे खर्चवेंच करून उस्तवारी करीत असावे. —द. शि. मो. यांचा इतिहास पृष्ठ १४

चौकडा—दोन जासूद जोडे एकदम पाठविले म्हणजे त्याला चौकडा म्हणत.
१ जासूद चौकडा आला त्याचे जबानी आबाजी महादेवच येणे (येणार)
—पेठे दप्तर भाग २ पृ. १८

२ सतरा सफरची आज्ञापत्रें पाटिलबावांचे चौकड्याबरोबर डिगेच्या मुक्कामी पावली. —म. शि. यां का. पृ. ४६९

३ दिवाकर पुरुषोत्तम (चोरघडे) व बाबूराव विश्वनाथ यांचें पत्र त्यांत आपलें पत्र ऐसी आली त्यांचेच चौकडीयाबरोबर. ते सविस्तर वाचून पाहिली. —नाग २ पृ. २०८

चौकशीस बट्टा काढणें—टांकसाळीत खरीं खोटीं नाणीं तपासून घेणारा अधिकारी तो 'चवकशी'. अशा अधिकाऱ्यानेंच आपलें काम करतांना पुन्हा त्यांत आपला बट्टा म्हणून कांहीं निराळा लाच घेणें.
ऐसें बोलून शिरेदरबार (भर दरबारातून) उठवून दिले. करावयास गेले साधकपणा त्यास (पण) श्रीमंतांचे समजण्यात आलें कीं लबाडी करून बट्टा काढला. —हो. कै. पृ. ९२

चौकस—चौकशीनें, काळजीपूर्वक. जबाबदारीने, बारीक चौकशी करून आणलेली.
१ गनीमानी खबरदारी करून पाहारे चौकस बसवून गस्तीवरी गस्ती चालताती. —शि. च. सा. खं. ५ पृ. १८९
२ सयाजी कनोजे कर्ता आहे, त्यास उत्तम एका किल्ल्याचा हवाला सांगावा. तेथें चौकस धंदा करील. —ब्र. च. पृ. २७०
३ पत्र लिहिले कीं बालाघाटावरून कान्होजी भोसले माहुरपटीस येईल तरी बातमी चौकस राखून तंबी पोहोचविणें.
—पे. द. २० पृ. ३

चौका—ठाणें, किंवा बस्तान, अंमल.

परराज्य साधे साहेबांचा चौका बसे, जागे साध्य होत, यैसा यत्न उपाय करणें. —पे. द. १७ पृ. ११

चौका बसविणें—बस्तान बसविणें.

सरझेलीच्या भयास्तव खाडींत गलबते जावयास भितात व कौल घ्यावा तर येथें प्रतिबंधक. याकरिता येका गलबतास स्वामींचे दस्तक असिले म्हणजे ते खाडींत येऊ जाऊ लागेल. म्हणजे सहजच दुसरे येतील. म्हणजे थोडीबहूत कानू बसवावी. याकरितां येकदोन कौल व दस्तक डौल येतील तर हा चौका बसवून पाहो. —पे. द. ३० पृ. ३८८

चौकी—खुर्ची किंवा चारपाई. खुर्चीमारखें कांहीं उंच आसन.

१ अनवरखानामध्यें कांहीं सामर्थ्य राहिलें नाहीं. पालखीत बैसोन देवडी-वर येतात. तेथें चौकीवर बैसवून खिजमतगार चौकी उचलून दिवाण-खानेयात आणितात याप्रमाणें त्यांची अवस्था आहे.

—पे. द. २५ पृ. ९७

२ येक चोकीवरी कपितान आपण बसला येक चौकी आम्हास दिल्ही. दुभासी उभा राहिला. —E. M. P. पृ. ९८

(एखाद्यास) चौकी देणें—एखाद्यास पहाऱ्यांत बसविणें.

जनराल मशारनिलेनें सिद्दीमसूदास चौकी देऊन लोकसहवर्तमान कैदेस ठेविला. —पे. द. ३३ पृ. १९३

चौगिर्द करणें—चारी बाजूंनीं वेढणें.

सर्व सरदार येऊन हैदरास घेरून चौगिर्द केलें.

—ऐ. ले. सं. १७९७

चौगुला—पाटलाच्या हाताखालील एक ग्रामाधिकारी. पाटलाचे हाताखालीं चौगुला, हवालदार, रामोशी वगैरे नोकर असतात. त्यातला चौगुला मुख्य होय.

मौजे होळ मुरुम नीरेचे कांठी जेजुरीजवळ आहे तेथें खंडूजी वीरकर खुटेकर धनगर चौगुले राहात होते. —हो. कै. पृ. १

चौघडा आखर होणें—अखेरचा चौघडा वाजणे. तळावरून कूच व्हावयाच्या दिवशी अंतराअंतराने ३ चौघडे वाजत. शेवटचा चौघडा वाजल्यानंतर तळावर कोणीही असता कामा नये असा रिवाज असे.

आमचे मरणाचे सोबती व्हावयाचे असल्यास चौघडा आखर झाल्यावर अमुक जागा, घोडे न घेता पादचारी ढाल तरवारेनिशी हजर व्हावें.

—हो. कै. पृ. ७८

छाया—आश्रय; कृपा; धनी.

१ आम्हा अगदीच नसावें असें मानस असल्यास उत्तम. आणके छायेस जाऊन पोट भरूं. —म. शि. यां. का. पृ. ९५

२ आपले छायेकडून जमावसुद्धां वर्तमान यथास्थित आहे. —ऐ. ले. सं. ३२४२

छावणीपाणी—छावणी, छावणीचा मुक्काम.

फौज आहे ते राहू द्यावी छावणीपाणी त्याच प्रांती होईल. तर सावध असावें. —पेठे दप्तर भाग १ पृ. ३६

छीट—चीट; (इं. sheet या शब्दाचा अपभ्रंश). स्त्रियांचें एक वस्त्र.

हिला नेसावयास अगदीं नाहीं. एक छीट अगर दुसरें कांहींतरीं दिलें पाहिजे. —ऐ. ले. सं. ३७५६

छीवणें, छिटणें, शिटणें—संग करणें.

सेना धुरंधरांनीं वृत्तीस क्षोभ होऊन दिवाकरपंतास (दिवाकरपंत चोरघडे यांस) सल्ला विचारला त्याणी उत्तर केले कीं आधी वर्तमान गलत आहे, कदाचित खरे जाहल्यास जर माझे यैकशील तर तमाशा करून दाखवीन. जर माझे ऐकणार नाही, तर या उपर रोजगाराची उमेद नाही. काशीस जाईन. ६० वर्षं वयास झाली आतां काय करणें आहे ? आणि ऐकल्यावर या गोष्टीचा जो सूड न घेईल, त्याची आई छीवली. तो धेडाचे वीर्याचा. —नाग २ पृष्ठ २०८

छुटी जोडी—डाकेच्या जासुदाखेरीज दुसरे जासूद वेळ प्रसंगीं उपयोगांत आणीत अशी जासूदजोडी

पूर्वी डांक उज्जनी पावेतो होती उज्जनीहून इकडे छुटी जोडी येई. तत्रापि उज्जनीपावेतो डांक होती यामुळें कागद लवकर येत होते, आतां डांक उठली छुटचा जोडचा रवाना होतात. —म. शि. यां. का. पृ. ६६१

छुटेकासीद—डाकेंत नसलेले असे स्वतंत्रपणें पाठविण्यांत येणारे ' कासीद ' म्हणजे पत्रें पोचविणारे लोक.

लष्करांत दोनचार जोडचा कासद नवे चाकर ठेवून येकदोन जोडी आपणाजवळ व येकदोन जोडी नारो हरीजवळ ठेवितो. तेथून छुटे कासदा-बरोबर लष्करांतून पत्रें पाठवीत जाऊ. स्वामीचीं पत्रें डाकेंत नारो-पंताजवळ येतील. तेथूत छुटे जासुदाबरोबर आम्हाकडें येतील. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १११

छेकणें—छेडणें; छडाछड करणें.

हल्लीं छपारामध्यें राहून धुम्याचे गांव ५।७ मारिलें व जमीदार धरून

नेऊन दांड केला व बेपारी यास लखनादोन (गांवाचें नांव) येथें छेकून चार पाचशे रुपये घेतले.

—नाग २ पृ. २०१

छेकत—(शकट, शकटभेद) मंत्र, गुप्त खलबत, मसलत.

इंद्रसेन इंग्रजांचे खलबत तीन चार रोज होत आहे. यादीयुदी होतात. छेकतात काय मजकूर असेल तो कळल्यावर विनंती करीन.

—म. शि. यां. का. पृ. ५४५

छेका—त्वष्ट, टुमणें, छडाछड.

यादवराव भास्करानें गायकवाड याची दिवाणगिरी करून ३ वर्षांत सरदारी बुडवून फत्तेसिंगास दगा करून जीवें मारिलें. मुरारी जामदार-कडून पैका खाऊन देशीं छेका लविला. आपण कैदेंत पडला. परंतु पैका दिल्हा नाहीं. येथील ही दशा करून आतां सावध हरीफ उरावर होतात.

—ऐ. ले. सं, ७१२५

छेजा—सज्जा, गच्ची.

कवालाचे गायन यैकिल्यावरी बंगल्यावरील छेज्यावर जाऊन पुण्याचे आबादी वगैरेची सयर केली.

—पुणें अखबार भाग ३ पृ. १०६

छेडी फौज—सडी फौज म्हणजे तोफा, डेरे दांडे किंवा बाजार वगैरे बरोबर नसलेली फौज.

स्वामींनीं या कार्यांत मन घालून तूर्त पांच हजार छेडी फौज जलद रवाना करावी. —पे. द. ४० पृ. ९३

छेपा—छापा.

ग्रहणाचे दिवसी नदीवर स्नानास गेले असता छेपा पडला सात हजार ब्राह्मण मारले गेले मोबलग खजाना व घोडी जीन खोगीरसगेत हातास लागले येणेप्रमाणे मुलकांत खबर फैलावली.

—E. M. P. पृ. ९९

छेमीना—शामीयाना.

तैसेच बाडांत गेले, जाऊन मागती माघारे छेमीन्याखाले येऊन बसले,

—नाग २ पृ. १४४

छोटेखानी—सामान्य; क्षुल्लक, हलकट, मातबर नव्हे असा.

१ माणूस छोटेखानीं. समज थोडका. याकरितां कांहीं अर्थद्वारें त्यास वदवून घ्यावे. —ऐ. ले. पा. स्मृ. प्र. पृ. १३८

२ दादासाहेबांच्या जवळ गणांचा कारभार (शागीर्दांचा). छोटेखानी. त्यांचा विश्वास धरूं नये. —ऐ. ले. सं. १२७८

छडीदार—छडीसारखें उभे पट्टे असलेले कापड.
मंदील हिरवा छडीदार, किंमत रुपये १०७
—पे. द. २६, पृ. १५४

छत्रभूत होणें—सर्वांवरील अधिकारी होणें.
आपले आगमन किले बंकापुरास जाहले हे सुवार्ता ऐकून परम संतोष पावलो आपण छत्रभूत होऊन आले उपरांतिक सर्वत्रास धीर भरवसा आला आहे. —ऐ. सं. सा. खंड ११ पृ. २२

छंद—एक स्त्रियांचा दागिना.
नागबंद छंद पाठीवर । सूर्याची शोभती कोर चंद्रकोर. ।
—ऐ. पो. के. खं. २ पृ. १९७

छनापन लागणें—झटापट, चढाओढ लागणें.
भेट झाली पाहिली हानीपानं, । दोघांची लागली छनापन । जैतून वाटं मारिला जपून। —ऐ, सं. वा. सा. खं. १ पृ. १४.

छबिना छेबिना—लष्कराच्या गोटाभोंवतीं रात्रीं पहाऱ्यासाठीं ठेवलेल्या फिरत्या स्वारांच्या टोळ्या.
१ आजीपावेतों चांदणें होतें. आतां काळोखी रात्र आली आहे. ४–५ छबिने असतात. डेऱ्याजवळ चौकीचे राऊत असतात.
—ऐ. ले. सं. १४७५

२ बातमी समजल्यावर उज्जनीजवळ आले क्षिप्रेनजीक मुक्काम करून पुढें छबिन्यात कुशाबा बक्षी पाठविले.
—हो. कै. पृ. १४५

३ ते दिवसी दिवसाचा छबिना जिवाजी ढमढेरे यांचा होता. त्यानी गनिमावर घोडे घातले. —पे. द. १६ पृ. ८०
४ फौज तयार करून छेबिनीयास बडवाणी भोंवते पाठवितो.
—पे. द. पृ. २

५ रात्रींची दगाबाजी करील यास्तव छबिन्याची बन्दोबस्ती चांगली असावी. —खरे ४ पृ. १५१०

छल—कपट.
गणेश संभाजीकडे झाशी होती परंतु बाबुराव कोन्हेर यांनीं छल करून हस्तगत केली. —पे. द. भाग २९ पत्र नं. ३७

छलक—कपटी.
राजे गुमानसिंग बहुत कुत्रिम, बहुत छलक; सरकारांत लक्ष थोडे.
—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १५३

छलछिद्र करणें—कपट करणें, छापा घालणें.
पूर्वी हायदर नाईकहि छलछिद्रें अशी बहुत करीत होता परंतु श्रीमंतांचे प्रतापे फौजा टिपूचें पारपत्यच करीत गेल्या आहेत.
—म. शि. यां का. पृ. ६३५

छागल—कातड्याची पाण्याची पिशवी जीस तोटी असते.
—रा. व्य. को.

छाटणें—निवडणें, निराळें करणें.
तेच दिवशी होळकराकडील पेंढाऱ्यांनीं शिंद्याकडील फौजेचा तीनशे उंट कांहीं घोडे बैल व बंदीशाळा ही लुटून आणिली. ही अनाहूत फिसाद होऊन त्यांनीं चालून घेतले तेव्हां याणीही बुणगे छाटून पुढें रवाना केले.
—हो. कै. पृ. ११३

छाती—हिंमत, धैर्य, आश्रय.
येथील कसाले तापत्रय लिहिल्यास आपणांस कंटाळा येतो. आम्ही दुसरे कोणास लिहावें ? आम्हांस श्रीशिवाय आपणाशिवाय तिसरा आश्रय आहे कीं नाहीं, चित्तास आणावें.
—ऐ. ले. सं. २९१९

छाती वाढविणें—हिम्मत धरणें, श्रेष्ठ धारिष्ट दाखविणें.
अवतरणासाठीं हुसेनी शब्द पाहा.
—हो. कै. पृ. १६८

छांदस—छंदिष्ट; तऱ्हेवाईक.
उमापती दिक्षित यांच्या व्याजाचा मजकूर लिहिला तो कळला. छांदस आहेत ! बोलून पाहतों. —ऐ. ले. सं. १०८३

छान—निवड, शोध, छाननी.
१ अवतरणासाठीं ' कफारत ' पाहा. —पाणि बख. पृ. १४
२ छान करून २०० माणूस ठेवून घेऊन वरकड लावून देणार.
—ऐ. ले. सं. २६१६

छान—विवेचकपणा, शोधवुद्धि.
असें असतां हल्ली तुकोजीबावांचें म्हटल्याप्रमाणें बाईनीं तुकडा खाऊन पडले असावे असें भाव स्पष्ट आपले लिहिण्यात येतात; त्यास जिकडे धनीपणा आहे तेथें छान असावे. एक पक्षी कल देऊ नये.
—म. शि. यां. का. पृ. ३००

छानपिछान—निवडानिवड.
तुरुंगांत बंदीवान बहुत जाले आहेत. एक वेळ छानपिछान जाल्यास कांहीं कमी होतील. —ऐ. ले. सं. ३७४६

जखमीना—मू. श. जखमाना. जखमी झालेल्या शिपायांना औषधोपचारा-
साठीं म्हणून जी रक्कम दिली जाते ती.
माणूस जखमी आतोनात जाले, ऐसी हजार रुपये जखमीना लागला.
—हो. कै. पृ. ९४

जखमानेही दिले.
—राजवाडे ४ पृ. १०७

जखली—आक्षेप; ओढ;
मुलकाची गोष्ट श्रीमंतांनीं आज्ञापिली ते समयीं आम्हीहि जखली घेतली होती. तोच भावार्थ यांचा दिसतो. पैक्यावर कबूल करून येश घ्यावें, मग याचें घर वांचविल्यास झक मारून हेहि कांहीं ऐकतील.
—पे. द. ४०, पृ. ४९

जखीरा—धान्याचें कोठार.
महेश्वरीं आल्यावर जखीऱ्याची व जामदारखान्याची वगैरे मोजदाद करून यादी सुभेदाराकडे रवाना केल्या. —हो. कै. पृ. १२१

जगडंबर--अवडंबर; खोटी भीति.
पुण्याकडील फौज २ महिने येत नाहीं. शिवाजीपंत उगेंच जगडंबर लिहितात ! —ऐ. ले. सं. २७६२

जंग—लांछन, दोष.
सटवाजी जाधव यांनीं भापकरास बहुत शरमिंदे केले कीं, तुम्ही व आम्ही येकजात व शरीरसंबंधी व सिपाहगिरीचा बाना बाळगतो आम्हापुढें तुम्ही पळता हा जंग तुम्हावर आहे याप्रमाणें बहुत लाजविलें.
—पुणें अखबार, भाग १ पृ. २०३

जङ्ग—लढाई.

जंगजू—भांडखोर, कलागतीखोर.

जंग जोड—युद्धाची व्यवस्था
जंगजोड बसेल. —खरे १० पृ. ५३४५

जंगजोड—१ मसलतीची सफलता; (लक्षणेनें) २ ऐक्य. ३ व्यवस्था.
यांनीं आपली फौज बळवंतरावाबरोबर पाठवून मिरजेंत स्वस्थ असावें. श्रीमंतांपाशीं बळवंतराव १५–२० हजारांनिशीं येऊन पोंचले म्हणजे मांडवगणाहून भाऊंस आणूं, म्हणजे जंगजोड बसेल.
—ऐ. ले. सं. ५३४५

जंगजोड—स्नेह, एक हात; मिलाफ.
बाबूजी नाईक यांचीं पत्रें आलीं होतीं कीं, तुमची व आमची जंगजोड व्हावी. —पे. द. २० पृ. २२

जंग झगडणें—लढाई होणें.

४–६ घटकापर्यंत उभयपक्षीं जंग झगडतें.

—ऐ. ले. सं. ४६८१

जगदीशपूर—नाशिक जवळील जलालपूरचें दुसरें नांव.

'मौजे जगदीशपूर उर्फ जलालपूर प्रा नाशिक मामले गुलशनाबाद.

—पेठे. द. भा. १ लेखांक १६

जगनाल—परशूचा एक प्रकार.

जंगली—बंडखोर, रुसून गेलेला, हद्दपार केलेला.

आपण शहरास आलों त्यास जंगली शाजादा याचे भेटीस गेलों. तो भाद्रपद मासीं कलम धरणार. —पे. द. १० पृ. ३१

जंगी—किल्ल्याच्या तटावर ठेवलेल्या तोफांच्या तोंडाकरितां ज्या फटी किंवा भोसके ठेवलेले असतात त्यास जंगी म्हणतात.

बरखंदाजीनें मारामार करून भांडीयाच्या जंग्या मना केल्या.

—पे. द. ३३ पृ. ५६

जंगी—लढाऊ.

(अवतरणासाठीं 'सारक्त' शब्द पाहा)

—पुणें अख. भाग २ पृ. ९५

जघन्य—सर्वप्रसिद्ध, जगजाहीर.

अवतरणासाठीं 'बैतलमाल' पाहा. —हो. कै. पृ. ४२

जघन्य—दुष्कीर्ति, दुर्लौकिक.

१ जे गोष्टीनें पत राहे आणि जघन्य न होयें तें करदवें.

—हिं. . खंड २ पृष्ठ ३८

२ आपण गेलां येणें करून उत्तम गोष्ट झाली. न जातां तरी गोपाळराव कांहीं लष्कर टाकून येत नव्हते. आणि तेथें मृत्यु पावते! लोकांत जघन्य होतें कीं, त्यांचे इतके (आप्त) असोन कोणी आले नाहींत असें होतें! —ऐ. ले. सं. १७६२

जंजाळ—जेजाला (तोफेचा एक प्रकार).

नाळे मागें नाळ। शतें सोडीत जंजाळ। जणो आगिया वेताळ। ऐसा बेटा भांडला। —ऐ. पो. के. खं. २ पृ. ४५

जजिया—मुसलमानेतरांवरील डोईपट्टी.

न्यायाचे मार्गानें पहातां जजिया पट्टीचा कायदा केवळ गैर. याजवर हिंदु लोकांस पीडा करण्यांतच धर्म आहे, असें मनामध्यें आलें असल्यास आधी राजा राजसिंग याजपासून जजिया घ्यावा म्हणजे इकडून कठीण नाहीं.

—वाड सनदा १५०

३ मंदवारी प्रातःकाली जिऊबा गोविंदराव भास्करवैद व आणिकहि दहापांचजण छोटेखानी दरबारी होते. प्रतिनिधी व मंत्री हे नव्हते.
—पे. द. ३ पृ. १४२

छोलदार—सोलदाद; सोल्जरचा अपभ्रंश.
इंग्रजांच्या फलटणापैकीं दस्तारबंद व छोलदार व तुरूपस्वार वगैरे यांच्या तपशिलाची याद पाठविली आहे.
—ऐ. ले. सं. ४४०८

छयावणी—छावणी. पावसाळ्यांत गलवतें घडयावर ओढून त्यावर छपरें झापांची घालून झाकून ठेवतात त्यास छावणी घालणें म्हणतात.
गुराबा पाच छयावणीकरितां कुलाबा पाठविल्या म्हणोन म्हणत असतील, तर गुराबाची तामरात व छयावणी जाली पाहिजे. सबब गुराबा पाठविल्या आहेत.
—पे. द. ३ पृ. ५७

ज

जईफ, जयफ, जैफ—वार्धक्यानें क्षीण, अशक्त.
आम्ही जईफ जालों आहों, बहुत दिवस वाचत नाहीं
—राजवाडे १ पृ. २८

तुकोजी होळकर बहुत जैफ जाले; शरिरांत ताकद नाहीं.
—खरे ९ पृ. ४९२५

पातशाहीची दौलेत जेफ म्हातारी जाली आहे.
—दि. म. रा. १ पृ. २१३

जईभ, जैभ—चिलखताचा एक प्रकार.

जक्कड—जखडबंदी; पेंच.
खेडयांनीं चिठ्ठया दिल्या आहेत. परंतु खेडीं ओस आहेत, तेव्हां ते येथेंच येऊन जक्कड बसविणार. फौजेच्या बळावर ते कोणास खातरेस आणीत नाहींत.
—ऐ. ले. सं. ५९७१

जक देणें—गोता देणें, जरब देणें, आपटी देणें, हिसका बसणें.
१ हैदरखान व सरकारमिळून आपल्यास जक देतील, याकरितां आपले विद्यमानें इंग्रजासी सलूक करून हैदरखानासी व सरकारसी विरुद्ध पाडले, हे त्यांचे चित्तांतील अर्थ आहेत.
—म. शि. यां. का. पृ. २१६

२ तेव्हां पुढील मोठया मनसब्यास जक बसल यैसें दिसतें.
—पे. द. भाग २९ पत्र नं. २५५

३ हत्यार वालिलें, इंग्रजी लोक बहुतेक कापून काहडले, त्यास बरीच जक दिल्ही. —इं. सं. है. टि.

जकारनामा—जानोजी भोसल्याचें सांकेतिक नांव (याप्रमाणें नांवाच्या अद्याक्षरावरून पुष्कळशीं सांकेतिक नांवें तयार करीत. जसे सकारनामक सखारामबापू दकार नामक म्ह. दिवाकरपंत चोरघोडे. पिकारनामक म्हणजे पिराजी नाईक निंबाळकर रकारनामक म्हणजे रघूजी भोसले. येथील वर्तमान जकारनामकाच्या पुरोहितानें प्रथम हा प्रकार करावा, म्हणोन रकारनामकास रवाना केलें.

—ऐ. ले. सं. पृ. ५४९

जकीरा---सामानसुमान; धान्य, दारूगोळा, कोठार, सांठा, संचय, सामुग्री, साठवणूक.

१ तर्फ मजकूरचे जमीदारास ताकीद करून यांचा जकीरा नेला असेल तो यांचा यास माघारा देणें.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १८४

२ महादजी बल्लाळ यांचे गुजारतीनें जकिरा मोजदाद करून ठाणें स्वाधीन करून पावतीचें कबज घेणें. —ऐ. ले. सं. ६२१

३ ठाण्यांत दारू व तोफेचे गोळे, बाण वगैरे जकिरा पोक्ता आहे.

—खरे ९ पृ. ४५२५

४ सर्व नेऊन पट्टणांत जकिरा केला. —खरे ९ पृ. ४५२५

जकिरी—जकिऱ्याचे, (विशेषत: दारू गोळचाचे) साठवणुकीचे.

त्याजवर सामान जकिरी पूर्वीलप्रो॥ राखावें.

—म. रा. चि. थो. शा ३२

जख—नुकसान.

खावंदाचे दौलतीस जख किती बसली हे खावंदाचे ध्यानांत आहेच !

—पुरं. द. भाग ३ पृष्ठ १५

जख खाणें—गोता खाणें, नुकसानी होणें, नाश होणें.

कमजोर झाल्यावर कोणास तरी आपले करून ठवावें. यांत माणूस जख खात नाहीं, असे सिद्धांत आहेत. —हो. कै. पृ. ७

जखम शेजेस येणें—जखम बरी होऊं लागणें.

दोन दिवशीं जखम शेजेस येतांच कोन्हेरराव कूच करून करवीराकडे जाणार आहेत. —ऐ. ले. सं. २३०८

जखमाना आणि मयताना—जखमी लौकांना औषधोपचारार्थ देण्यांत येणारीं मदत व मेलेल्यांना त्यांच्या उत्तरकार्यार्थ देण्यांत यावयाची मदत.

—पे. द. भाग ४१ पत्र नं. ८६

जंजिरा, जंजिरा—दर्याकिल्ला, जलदुर्ग.
सरकारचा जजिरा सर्कारांत तावीन होऊन.
—राजवाडे १० पृ. २८०

जंजिरा—तुरा.
जंजीर—हत्तींची गणना करतांना वापरावयाचा संख्यावाचक शब्द. जसे 'हत्ती जंजीर' ४. जंजीर म्हणजे सांखळदंड. सांखळदंडानें हत्ती बांधीत असत त्यावरून लक्षणेनें जंजीर म्हणजें हत्ती. आपल्याकडे गवळी 'माझ्या गोठ्यांत शंभर शेपटी आहे' असें म्हणतात; तेथें शेंपटी हा शब्द गाई म्हशींच्यासाठीं योजलेला असतो.
२ बाळाजी विठ्ठल व राघो विठ्ठल या हमराह (याबरोबर) खत खुषनमत (आनंददायक) बमय एक जंजीर फिल (हत्ती) व जवाहीर व खिलअत पारचे इरसाल केले, ते पोंचले.
—को. प्रां. १९४
३ एक जंजीर फील. (हत्ती) —साने प. या. व. ३८४
जंजीर—लोखंडी साखळदंड.
स्वामीसन्निध कित्येक विनंती करितात की पस्तीस वाव लोखंडी साखली असलिया खाडी बंद होईल. यैशास जंजिरेचे प्रयोजन आहे यैसे नाहीं. दोन्ही मोर्चे काइम असलिया सहजच खाडी बंद होते.
—पे. द. ३३ पृ. ३३१

जंजीरजामिनी—जमानसांखळी—दिलेल्या कर्जाऊ रकमेसाठीं ऋणकोकडून सावकार ज्या अनेकलोकांना जामिनादाखल गुंतवून घेतो, त्याला जमान-सांखळी म्हणतात.
जड—जमाव, जथ, समुदाय, संख्या.
१ पांच हजार सरंजामी, पाच हजार पागा, पंचवीस हजार पेंढारी, एकोण-पन्नास हजारांची जड. ईश्वर मार्तंड प्रांत (शेवट) कसा लावील असी मनांत व्यावृत्ति.
—हो. कै पृ. ६३
२ दोन तीन हजार फौज घांटाखालीं दिंडगलास पाठवावी, आणि दोन हजार फौज इकडे आली तर फार आहे. अविंधाची जड पडेल.
—पे. द. ४०, पृ. १०७

३ आपले जातीचें अंगठाण पाहतां जमेतीचा अजमास पाहतां एकोण पन्नास हजारांची जड.
—इ. सं. होळकर कैफियत पृ. २

जड—साहाय, मदत, मदतगार.
फौज दूर करावयासी लिहिले असतां ते त्यांणीं न केले आणि जैत्याचे

गढीस लागले. इतका तर (तरी) विचार करावयाचा होता जे (कीं) नजीबखान त्याची जड. त्याचा कावू (कारस्थान, कपट) या प्रकारचा.
—हिंगणें द. भाग २ पृ. ९०

जडगिरी—कागदाचा एक प्रकार. --पे. द.

जडगीर—अवजड सामानसुमान.
येथें भारी तोफा वगैरे सरंजाम भारी जडगीर असेल ते ठेवून आम्ही मोगलांचे शहावरी जात असों. --ऐ. ले. सं. २७२

जडगीर—भारावलेले, लादलेलें.
तेथोन कूच करून निघोन जावें, तर लश्कर जडगीर जाहले होते, मार्गानें कैसें जावें ते समयीं बहिर्जी नायकानें मोगलाची गांठ न पडतां लश्कर ठिकाणास नेऊन पाठविण्याची हमी घेतली. —चित्र ११९

जडगीर होणें—सामानसुमान लादून घेणें. लुटीनें संपन्न होणें.
तिकडून हांवभरी होऊन गनीम जडगीर होईल आणि 'यावयास लागेल तेव्हां बरा मानात येईल. एकसमयावच्छेदें यालगार करून गनीम नाहींसाच करावा. --पे. द. ३३ पृ. २४

जड जखमी—भारी जखमी.
रामाप्पा घोरपडा आमचा जडजखमी आहे. रामजीपंत भाचा वाचतां दिसत नाहीं. —पे. द. भाग १ पत्र नं. २५

जड बळावणें—बळ वाढणें, साथीदार वाढणें.
आईसाहेबाची जड बळावत चालली. . . . तरी तुम्ही आपले जागा खबरदार राहून राजश्री अंतस्थ आहेत तसे तुम्हाकडे ठीक असत असे करणें.
—पुरं द. भाग १ पृष्ठ १९०

जडभारी—१ संकट, २ जोखीम.
१ तुम्हाबरोबर तोलदार वजीर देतों. व तुमची भेट भरोन (करोन) आणवितों फिकर न करावा. तुमचे जडभारी तें आम्हास आहे. पन्नास साठ रजपूत आपणाबरोबर देतो ऐसे जयसिंग बोलला.
—म. द. रु. १ पृ ४८

२ जडभारी पडलेस बोलवाल त्यावेळीं येऊं.
--ऐ. ले. सं. ५९०

जडभारी—अवजड सामान.
हत्ती व कारखाना व जडभारी यादवाडास ठेविलें आहे.
—ऐ. ले. सं. २७९९

जडमोल—होनाचा प्रकार
—चित्र १२१

जडाव—जमाव.

यासमयीं अवघे लोकांचा जडाव येके जागा करावा, याच विचारें लोक आणविले होते. --पे. द. ३३ पृ. ३७

जडाव—साहित्य.

त्याप्रमाणें मोर्चेबंदीचा जमावाचा जडाव नाला तोफा देखील देऊन सरखेलांनीं सेवकास आज्ञा करून पाठविलें.

—पे. द. ३ पृ. ९६

जडावणें—वाढणें; बिघडणें.

बापाजीस ७ रोज किंचित् ज्वर येत होता, एकाएकीं जडावून शुद्ध १२ स काळ जाहला. —ऐ. ले. सं. १००५

जडी--चिकाटी, जमाव.

तिसरें, तुम्ही तेथून निघालां तरी सावनूर राहत नाहीं. हैदराच्या हातास गेल्यावरी त्याची जडी भारी. सावनूर, बंकापूर दोन्ही स्थळें त्याच्या हातीं लागलींशीं होतात. —ऐ. ले. सं. ८७९

जडीप--जडप; जास्त मोलाचें, अर्थात निवडक नामांकित.

जासूदास व पागेचे जडीप आढळाचे बारगीर, त्यास महीने बांधून दिल्हे ते दरमहा दिल्हेच पाहिजेत. —पे. द. १५ पृ. ४२

जंत्र—यंत्र.

जत्रा फुटणें--फौजेची पांगापांग होणें.

येथील जत्रा फुटून गोपाळकाला होत आहे.

--ऐ. ले. सं. २५५३

जतन--निगेनें; काळजीपूर्वक.

सरकारची सनद हरीहरराव यांचे नांवानें मुहूर्तानें घेतली. ती तुम्हांस पहावयास पाठविली आहे. ही जतन खासगीचे रुमालांत ठेवावी.

—ऐ. ले. सं. ३२९५

जतन राखणें—जतन करणें, काळजीपूर्वक संरक्षिणें.

धैर्य धरावे, खंत करू नये, मातुश्री बाईसाहेबांकडील लग (सूत्र, शिलशिला, घरोबा) जतन राखावा. —चं. चू. द. पृ. १३५

जता-जथा--समुदाय.

याउपरी बाळोजी वायसा जोा (जथे) संभाजी काळे (संभाजी काळच्याच्या जमावापैकी) यांस रुपये ६० देविले ते त्यास प्रविष्ठ केले.

—पे. द. १२ पृ. ३

जथ—जमाव.

सखाराम केशव तुळजापुराकडे फौज ठेवीत होता, त्यावर सटवोजो गावडे

रवाना झाले होते. ते गेल्यावर सखाराम केशव याचा जथ विस्कळित झाला म्हणून पत्रें आलीं. —ऐ. ले. सं. २५१७

जथनामा—वंशवृक्ष, वंशवेल, कुळकट, जयदनामा.

गांवचा पोंक्षे कुलाचा जथनामा आमचेपाशी असलेला पाठविला आहे हा गांव पोंक्षे कधीं धारण करीत आले त्याची माहिती यांत नाहीं. पूर्वींचा जथनामा आमचे एकंदरीत होता त्याजवर माहिती कदाचित् सांपडली असती पण ती घोण्यानें खाल्ली. (वाळवीचा किडा)

--पोंक्षे कु. वृ. पृ. ४३

जद्द—-आजा.

जदी—बकरा.

जदीद—नवीन.

जदीद करार झाला त्याची ही अहवाल तेव्हां रास्तरवी कायमी कोठें राहिली ?

—खरे ७ पृ, ३५७०

नवे नूतन नव्हति शाहीर जदिद वर्दिचे. —प्रभाकर

जदीद—बाटलेला, धर्मांतर केलेला.

जधूनु—(जबूनु जबून. मोडीवाचनाची चूक) जबून (बळकट नव्हे असा) आपला आजा बाजी हैबतराव, यासी बोलला कीं, पातशाही किल्ला आहे, तुम्ही पातशाही दिवाण नफर आहां, किला जधूनु आहे तर तुम्ही मिरासी नफर आहा. किला राखणें. —रा. १७ पृ. ७

जन्नत-आरामगाह—स्वर्गवासी.

जन्नतनशीन—स्वर्गवासी.

जन्मात—? जानमत ? हमी ? जमानत ?

पालखीचे सरंजामाची वरात परगणे शेलाणीचे कमाविसदारावर तीनशे रुपयांची जेष्ठमासचे वायद्याची जन्मात दिली.

—म. शि. यां. का. पृ. ५७१

जन (न.)—जनविश्व; लोक.

सर्व जन म्हणतें कीं, लढाई होईल किंवा काय होईल हें समजत नाहीं ! ऐसें संकट म्हणतात. —ऐ. ले. सं. ५०८३

जनांत गोत--पिढ्या तुटलेले पण एका कुळांतले.

बावाजी मुकदमाचें हातपाय तोडून दूर केला ते वक्ती सोनजी बिन बनाजी गुजर किल्ले पुरंदर ह **जनात गोत** म्हणून येऊन अर्ज केला जे आपले हातीं देणें. बराय अर्ज खातरेस आणून बावाजी मजकूर याचें

माथा गुन्हेगारी होन पातशाही तिनशे करार केले ते सोनजी मजकूर यानें देऊन बावाजीस हातीं घेतलें.
—म. द. रु. ३ पृ. ३२

जनाब--१ प्रासादांगण, २ उम्बरा.
स्वारी या शब्दाप्रमाणें याचा बहुमानदर्शक संबोधन म्हणून उपयोग होतो.
(१) खावंदाचे जनाबांत सेवक लोकांनीं हजर असावें हें तो लाजीम आहे.
—राजवाडे ३ पृ. ७३
(२) जें मनांत होतें तें जनाब इलाहींत (-ईश्वरास) कबूल होऊन हे दिवस दृष्टीस पडले.
—राजवाडे ५ पृ. ८६
(३) प्रस्तुत हजरत बंदगानअलीचे जनाबेत तुम्हाकडील वकील जाऊन विनंति करील.
—पुणें अखबार, भाग १ पृ. ९४

जनाबे आली—उंच उंबरा; बहुमानदर्शक संबोधन.

जनाह--पंख, हात.

जनिकर्षक--जुना कृषक. जुना स्थायिक शेतकरी.
—विल्सन

जनीबयसार--सैन्याची डावी बगल.

जनुबा—दक्षिण दिशा.

जनेश्वर--पृथ्वीपति.
धन्य तुमचे पराक्रमाची ! संपूर्ण धरा जिंकून जनेश्वर तुम्हीच प्रमाण, यांत संशय नाहीं.
—चित्र ९७

जप्त--हरण, नियंत्रण, दबाव, सर्कारजमा, जप्त (इ. मं. २१२),
खुसूस तुमचे तालुक्यांतील लोक बेरोजगार बहुत त्याजकडे गेले याजवरून कियास करावा की असें लोकांवर जप्त कसा राहील ?
—राजवाडे ५ पृ. ५२

रामाजीपंत यांचा जप्त टोपीकरांवर बरा आहे.
—राजवाडे ६ पृ. ४०२

जप्तन्मुलूक—जेता, संताजी घोरपडे यांचा किताब.
—राजवाडे ८ पृ. ४९

जप्त बसविणें—अंमल बसविणें
(अवतरणासाठी ' घुमधाम ' शब्द पाहा)
--E. M. P. पृ. १७

जपणी घालणें--टपून बसणें.
दोघे लिंगाइताचे चांगले बाइका धरिले. वरकडांसहि धरावयाकरितां जपणी घातले आहेत. तमाम सुंदर बाइका बारा वाटा पळून गेले !

बाइका धरावयास कारण टिपूचे पालक लेक आहेत, त्यांस स्त्रिया करून देणेस नेतात. —ऐ. ले. सं. ३९७७

जपणीस लागणें—घात करण्यासाठीं संधी शोधीत बसणें.
कान्होजी नायकाच्या पुत्रांनीं जपणीस लागोन वरसा सा महिन्यांनीं आनसावा, तिची कुणबीण व कुणबिणीचे पोर ऐसी तिघेजण मारलीं. —राज. १ पृ. ५

(एखाद्यास) जपणें—एखाद्यावर पाळत ठेवणें, टपणें. (मारणेकरितां किंवा इजा करण्याकरिता)
रायाजीराव लहानमूल होता. त्यास कुडीजेकरांनीं मारेकरी घातले आणि त्या मुलांस जपूं लागले तेव्हां तिणें तें मूल घेऊन सुपें येथें आपल्या माहेरास गेली. —ऐ. सं. सा. खं. १ पृ. १६

जप्तरफ्त—दबाव, दहशत, व्यवस्था, बंदोबस्त.
१ अवघ्याच गोष्टी दस्तांत आल्या; जप्तरफ्त आहे तेथे इकडील बंदोबस्ताचे संकट नाहीं. —हिं. द. खंड १ पृष्ठ १९
२ करारवाके जप्तरफ्त करू —राजवाडे ६ पृ. ६१२
वतन्दारांचीं वतने वतन्दाराच्या दुमाला केल्याविरहित पोटतिडिक लागोन मुलूक मामूर होत नाहीं व मुलुकाचा जप्तरफ्त होत नाहीं असें कळों आले. —राजवाडे १६ पृ. ४४

जफर—विजय.

जफर असर—विजयश्री ज्याच्या पाठोपाठ जाते असा.
मुक्काम लष्कर जफरअसर मौजे तुलापूर. —पे. द. ३१ पृ. १७०

जफर-करान्—विजययुक्त.

जफर-पैरा—विजयानें शोभणारा.

जब्ती—जप्ती.

जब्ब—घोरपड.

जबजब—यवयव, तिळतिळ, कणकण, थोडे थोडे.
जबजब नूतन संपादावें व बळकट व्हावें. —म. रा. आ. २३

जबडू (?)—शस्त्र विशेष ?
हत्यारे, फिरंगा, गुर्दे, तोमर, इसपा (सैफा), कत्या (तरवारींचा प्रकार) कटार, भाला, बिचवे, जबडू, इटे, पटे, बाणे, बरच्या, यकल्या (?) दुमदुमे (?) निमचे, कमाना, कांबिटे (कमठे ?) व ठाणपे (?) (टोणपे), भिंडीमाळा (?) —चित्र. ५९

--रा. व्य. को.

जबरजंग—छोटी तोफ.

जबा—चिलखताचा एक प्रकार.

जबा--जबान, वचन, शपथप्रमाण.

सारांश गोष्ट आम्ही सर्वांस जबा देऊन आपले दयेवर इतरांस भरोसा देऊन हें पत्र लिहीलें आहे. —पे. द. १६ पृ. १४

जबा (**अरबी शब्द.**)—बाणांचा भाता.

जबाबी—१ उत्तरविषयक, २ तासांची घंटा वाजविणारे घड्याळ.

एक घड्याळ जबाबी चांगलें, जबाबी म्हणजे तास वाजतात तें.
—राजवाडे १२ पृ. ६८

जबाबी हुंडी--एखाद्या सावकाराच्या पेढीवर डिपॉझिट म्हणून हुंडीच्या रकमेइतकी भरण्यांत आलेली रक्कम. मालकाकडून अनुज्ञा आल्यावर सावकारानें ती रक्कम ज्याच्या नांवें हुंडी दिलेली असते त्यास द्यावयाची. अवतरणासाठीं भलावण हुंडी पाहा.
--पे. सा. पृ. १३८

जंबीशी तोफखाना—हलका, नेहमीच्या स्वारींत बाळगतां येण्यासारखा तोफखाना.

जंबुर्का—जंबुरा. तोफेचा एक प्रकार. मूळ शब्द जंबूर म्हणजे भुंगा किंवा मधमाशी. त्यांच्या गुंजारवाप्रमाणें ज्या तोफेच्या गोळ्याचा सुटतांना "गुं गुं" असा आवाज होतो अशी तोफ ती जंबुर्का तोफ.

जाटाजवळ जंगी सामान भारी. तोफाची बंबुर्क्याची मार फार यामुलें तोंड कोणाचे न लागे —ऐ. सं. सा. खं. ३ पृ. २१६

जंबुरा—लहान तोफ.

त्यांच्या तोफा, यांचे **जंबुरे** (असा) परस्परें मार चालला.
--हो. कै. पृ. ६१

जंबुऱ्याचे भारकस—दोर. जंबूरा जातीच्या तोफेचा दोर.

सरसुभानचें मोरच्यांत जंबुरा होता. तो घेऊन ते निघाले. ते वेशीमध्यें जंबुराचे भारकस तुटून तेथेंच राहीला.
—पे. द. भाग ४१ पत्र नं. ८७

जबून--भिकार, दरिद्री, खत्रूड, अशक्त.

१ आजी चार कुदळी व चार कुऱ्हाडी जबून दिल्हया. त्यास दांडा नाहीं. मोडकी हतेरें दिलीं ! --पे. द. १६ पृ. १०३

२ कोकणचें घोडें फारच जबून जाहलें आहे. उंटहि चालो सकत नाहींसे जाहाले आहेत. तैसेच ढकलीत आणितों.
—पे. द. ३४ पृ. १५१

३ दिवस बहूत जबून आहेत. युक्तीनें वसूल घेतला पाहिजे.
—पे. द. १५ पृ. ६३

४ वऱ्हाडचे महाल जबून म्हणतात त्याच महालावर लक्ष्मणराव खंडागळे आडचा ती हजारा फौजेनसी चाकरी करीत होते.
—राजवाडे १ पृ. ११७

५ हाल जबून होता. —भा. इ. स. म. १८३४ पावृ. १४१

जबे करणें—जेब करणें, ठार मारणें.

१ पठाणानें आपली दाद लागत नाहीं म्हणून रागानें आपला घोडा चारशें रु. चा होता त्याचे पाय मागील तोडले, घोडा पडला. एक दिवस होता. हाल होऊं लागले म्हणून सरकारांतून आज्ञा होऊन जबे करविली. पठाण चौकींत आहे.
—ऐ. ले. सं. ५७७१

२. शामसुंदर घोड्याच्या पायास गोळा लागला. तीन पायांवर घोडा उभा राहिला. चोकशी होती. सबब नानाकडील कारकून व भालदार जाऊन घोडा पाहून आले. नंतर जबे करणेंची आज्ञा जाली. त्याप्रमाणें जबे जाली.
—ऐ. ले. सं. ५१२७

जम्इयत—जमीयत, टोळी.

जम–इक्तिदार—जमचें (जम नामक प्रसिद्ध राजाचे) सामर्थ्य असलेला.

जमखाक—कटयारीचा एक प्रकार.

जमखाना—मोठी सतरंजी.

जमखाने २ जोडी व गालीचे करावे. —ऐ. ले. सं. ४२२१

जमदाड—रुंद पात्याची सरळ तरवार.

जम–निशान—जमचीं (जम राजाचीं) लक्षणें किंवा चिन्हें असलेला.

जमनीस—जमेनीस, एक वसूली अधिकारी.

हिशेब तपासनीस.

जमरूद—पाच

जमरूद पाचेचा जोड एक. —राजवाडे ७ खल ५१ पृ. २१

जमरूदी—पाच (रत्नविशेष).

पंतप्रधानांनी पैठणी दोन वस्त्रें सेला व पागोटे व मोत्याची कंठी बमय पदक जमरूदी, भवानी सिवरामास देऊन रुखसत केले.
—पुणें अखबार, भाग ३ पृ. ४४
—ऐ. ले. सं. ५६२७

जर्मासिरी—होनाचा एक प्रकार.

जमा—जमान, जामीन.

नरसो गणेश प्रभू यासी जमा गोपालशेट सभासद किल्ले सातारा.
—पे. द. १७ पृ. ६

—चित्र १२६

जमाई तारूं—तारवाचा एक प्रकार.

जमातखाना—जमायत खाना. मशीदीचे तिन्ही बाजूस जमातीस बसण्यासाठीं बांधलेला दुमजली अगर एक मजली सोपा.

—ऐ. स्फु. ले. २ पृ. ३४

जमादिलाखर—अरबी वर्षाचा सहावा महिना.

जमादिलावल—अरबी वर्षाचा पांचवा महिना.

(चि. रा. ११)

जमादिसानी—जमादिलाखर

जमाधारे—(?)

जेरव्यास खरे असेल तरी खाते होतील. आणि आपली मिराशी पटेलगी खातील. मिराशी न होतील तर खोटे होतीलच, म्हणोन जमाधारे आपले जाग्यास जातील. म्हणोन नियम केला.

—मरा. कु. इ. ढवळपवार पृ. २४

जमानकतबा—एखाद्यास आपण जामीन आहों असें लिहून दिलेलें पत्र.

श्री छत्रपती स्वामीचे सेवेसी लेहून दिल्हा जमानकतबा ऐसाजे.

—पे. द. ३० पृ. २

जमानगत—जामिनकी, जामीनगत, हमी.

सखो महादेवाबद्दल जमानगतीचें सरकार बिज्यागड येथील जमानगतीचें रुपये आपानीं पुण्यांत घेतले.

—पे. द. १० पृ. ३८

जमानसाज—काळाप्रमाणें वर्तणूक करणारे, संधीसाधू

अवतरणासाठीं ' बहरहाल ' शब्द पहा.

—पुणें अखबार, भाग १ पृ. १०९

जमानसाजी—प्रसंग साजरा करणें, कालानुरूप वर्तणूक करणें.

आचरण तर या लोकांचे कळून चुकले. परंतु जमानसाजी केलीच पाहिजे. आजी किती वर्षे लोटली कीं या दरबारची साधना नाना रीतीनें जीवे अर्थे करायासी स्वामी न चुकले.

—हिं. द. खंड २ पृ. २९

२ मुकदमा फारीख केला असता तरी उत्तम गोष्टी होतील. फौजेची तिकडे स्वारी होईल तेच समयी द्यावे यैसे असेल तरी फौजेमुले मुलखाची खराबी होईल, त्यानीं जमानसाजी वरी दृष्टी दिल्ही आहे.

—पे. द. २८ पृ. ९४

जमावणें—एकत्र जमाव करून राहणें.

म्हणू न आपण सारी फौजसुद्धां जमावून राहणें. म्हटले वेळेस कूच करावयास विलंब पडणार नाहीं. बिघाड करावा असा मानस आहे

—ऐ. ले. सं. २०७०

जमा--वर्कुं (?)
राजेश्री सेखोजी आंग्रे सरखेल पैकीं जमा कोठीं मुक्काम पुणें ।। **जमा वर्कू** म ।। र तांदूळ मोठे असडी. —पे. द. ३ पृ. १

जमसेरी--होनाचा प्रकार.
हरीहराकडे कांबळी जुळीची व सूत आलें. त्याजबरोबर शंभर कांबळी जुळीचीं पाठविलीं तीं आम्ही ठेवून घेतलीं. एकंदर किंमत २७ होन जमसेरीं लिहिले आहेत. —ऐ. ले. सं. १७०१

जमासुदगी—(?)
तुम्हास वेतन सालीना देखील पालखीभोई व चाकर दे।। सालीना होनू पातशाही ३००० पडले असेत. चाकर मोईनप्रमाणें ठेऊन जमासुदगी लिहवाल त्या दिवसापासून चाकराचा हक घेत जाणें. घोडे बारगीर ख।। करून वागवीत जाणे. —पे. द. २० पृ. १

जमिया—जंबिया.
शिद्दीफरंज यानें आपला जमिया एकदम म्यानांतून काढून शिद्दी समूलखानाच्या मस्तकांत मारला. —जं इ. पृ. ८८

जमी—भुईकोट किल्ला.
आरकाटचे तालुक्यांपैकीं त्यागगड व रावतनळूर दोन्ही किल्ले. एक पहाडी व एक जमी. —म. शि. यां का. पृ. ३४१

जमीदारी—भुईवरचे, भुइकोट.
गुंडी वंडे, हंप समुद्र वगैरे किल्ले पहाडी व जमीदारी कुल वापूजी गुंडो याच्या हवालीं करून कबज घेतले. —ऐ. ले. सं. १२३९

जमीदोजी—भुईकोट.
जमीदोज किल्ले इंग्रजाचे लढाईंत परिच्छिन्न रहावयाचे नाहींत.
—राजवाडे ७ पृ ६१

जमीदोज—जमीनदोस्त.
साष्टीचा किला इंग्रजानीं जमीदोज करून हल्ला केली.
—ऐ. ले. पा. म्यु प्र. पृ. १०९

जमीदोज—भुईकोट.
मागडीखालील जमीदोजी किल्ला घेऊन पहाडी किल्ला करेसेवती म्हणोन आहे त्याजी माची घेतली. —ऐ. ले. सं. १५१२

जमीन अत्राब (आत्राब)—पांढरी—पांढरीतील ? पांढरीनजीकची (?)
गावामध्यें तुम्हास राहावयास वाडा जमीन आत्राब पांढरी.
पांढरी गज इमारती काळी जमीन खारीज जमा गजरेशमी.

अर्ज गज	तूळ गज	अर्ज जरीब	तूळ
१६	२५	१० बिघे	१२ बिघे

—ना. दी. पा. पृ. ६४

जमीनदोस्त—चीत, पायमाल, गर्दीस मिळविलेला, जमीनीबरोबर.

जमीर—सदसद्विवेकबुद्धि, मन. —पुणें अखबार भाग १ पृ. १११

जमीर मुबारक--शुद्ध विवेकबुद्धि.
याकरितां हुजूरचे इरशादेचा व जमीर-मुबारकेचा खुलासा काय हें वर्तमान कागदीपत्रीं कळत नाहीं.
—पुणें अखबार भाग १ पृ. १५९

२—हरीपंतास मध्यस्तानी हुजूरचे जमीरमुबारकेचा खुलासा लिहिला आहे त्यावरून येथील कारपरदाज बहुत फिकरवंद (चिंताग्रस्त).
--पुणें अख. भाग २ पृ. १३७

जमी सामान—जंगी सामान. युद्धोपयोगी साहित्य.
किल्ल्यावरील लोक उतरून किला याचे हवाली करणें किल्ल्यावरील दारूगोळा जमीसामान असेल ते असो देणें वरकड दाणा असेल तो उतरणें.
—पेठेदप्तर भाग २ पृ. ४८

जमे, जमीये--सर्व, कूल.
—राजवाडे १५ पृ. १७१

खुदायेताला हे फत्ते आँ मेहेरबाँस व जमीये दोस्तास मुबारक लाये.
—साने प. त्रा. व. ४८२

जमेत—जमाव; जमात.
१५-१८ हजार तिकडे जमेत दिसत आहे. —ऐ. ले. सं. ५६५६

जयद—अनुभविक, कसोटीस उतरलेली, कजाखी (मूळ शब्द जहद असा आहे.)
दुदरनेकाचें (ड्रुजीयन साहेबाचे) हातचा कंपू. त्यांतील पलटण जयद बरबाद जाली तींही माणसें पुन्हा मिळालीं नाहींत व पलटणेंही भरलीं गेलीं नाहींत.
—हो. कै. पृ. ८१

जयदनामा—वंशवृक्ष.
पेडांबेकरामध्यें कागदाची वाटाघाट चालूं होतीच. सहा फूट लांब व तीन फूट रुंदीचा एक मोठा जयदनामा मला दाखविण्यांत आला.
—दस. शि. मो. इ. पृ. ५

जयास जाणें—सफळ होणें.
महाराजांचे आगमन आयेकून या प्रांतीं परम आनंद झाला तो लिहितां

पुरवत नाहीं. चार पांच वरसांपासून अनेक प्रकारें ईश्वरप्रार्थना जयास गेली कीं महाराजांचे आगमन जालें. —चं. चू. द. पृ. ७९

जयेद—जायजाद, सैन्याच्या खर्चास लावून दिलेले महाल.

सिकाकोल वगैरे महाल तिसा लाखांचे जयेद आहेत. ते आम्हांस सनद करून द्या. —हि. द. खंड १ पृष्ठ ७२

जर्‌कमर—कमरेतील सोन्याचा करगोटा.

कटिसूत्रं जर्कमरो —रा. व्य. को.

जर्गा—मंडळ, वेढा.

यांतही सर्वांनीं जर्गा एकच केल्यास काम तमाम होऊन नफे फार होतील. —राजवाडे १९ पृ. ३७

जर्गार—जर्गर, सोनार. (जर म्ह. सोने)

जर्जरा, जरजरा—अणू अणू.

हर्कारे यांनीं जर्‌जरा तिलतिल खबर घेउनु आपुले पादशाहासी सांगितलें. —इ. मं ९

जर्तारी—कलाबतूचें.

जर्द—सोनेरी. पिवळे जर्द पिवळे धमक, अतिशय पिवळें.

स्वारी तयार करून नवाब जर्दा अंबारींत

(—साने प. या. व ५४)

जर्दकाम—पिवळट रंगाचा.

जर्दोजी, जरदोजी—जर्तारी.

खानपोश जर्दोजी जवाहरजडित मोत्याची झालरचे आणून ठेविले. —पे. द. म. व. ९४

जर्ब, जरब—१ प्रहार, तडाका. २ नाणें पाडणें, छाप. ३ जोर. ४ शिक्षा, मार धाक, दरारा. ५ ठार. ६ नग. ७ तोफ. ८ तोफांची मोजदाद करतांना वापरावयाचा जुना संख्यादर्शक विशिष्ट शब्द.

१ वीज शिरली. ब्राह्मणास पुरती जरब बसली. —राजवाडे ६ पृ. १२५

२ सर्कारातून दिवाळतोड जरबा रवाना व्हावयाचा बेत ठरत होता. —खरे पृ. ४५७१

३ अशा सतरा जर्बा बिडी राजश्री तात्यांनीं घेतल्या. —खरे पृ. ४५७१

४ पंचवीस जर्ब तोफा. —राजवाडे १ पृ. १६१

जर्बजान—तोफेचा एक प्रकार.

(शब्दशः अर्थ 'तडाका हाणणारी')

जर्बाब—जर्तारी विणेचे, भर्जरी वस्त्र.
—म. रा. आ. २२

जर्बाबी—भर्जरी.
खुर्शा मखमल जर्बाबी मढोन मांडिल्या होत्या.
—राजवाडे १ पृ. ४२

जर्रार—शूर.

जर—कीं.
भास्कररावांही आपल्या सर्व क्षेत्रीयासी खबर जाणविली जर (की) आपला महाराज परदेशास जातो. त्यास सामर्थ्य होईल त्याणें सर्वें चलावें.
—बिंब २

जर—पट्टी (?)
जें काये घेतलें आसेल ते परतून देऊन तेचे कबज लिहवून पाठविणें. यासी मातल (बातल ?) जाहलेया सुभेसी जाहरा होईल. सजा आहड-तील. हें येकीन समजून सिताब जर परतून दीजे.
—शि. च. सा. खं. ५ पृ. ६

जर—तर.
मल्हारजी होळकर वगैरे फौज कुली कोणकोणे ठायीं आहेत त्यांचा वर्तमान लिहिणें जर महाराज सलामत. गंगास्वरूप उमाई दाभाडे गायेकवाड व बांडे यांची फौज महीपार उतरून अमदाबादेवर असे.
—पे. द. १४ पृ. १

आपण स्वत: पांच मास सेवा केली. रोजमुरा व सिबंदी कांहीं येक घेतले नाहीं, कां जर पुढें महत्‌उर्जिताचे भुकेले म्हणून अपेक्षा करीत राहिले आणि जे श्रम करावे ते केले.
—पे. द. १६ पृ. ३

जर—जखम.

जर करिता—जर, कारण.
मुजफरखानानें म्हटलें, 'हट्टानें मजवर तुफान घेतलें आहे;' तेव्हां त्याचें समाधान करून लाऊन दिल्हा. जर करितां तेव्हांच मारावा, तरी पुरती चौकशी न करितां उगाच मारिला, असा लौकिक जनांत होईल.
—भाऊ साहेबांची कैफियत पृ. ३

जरंघर—सैन्याच्या हरोळीच्या म्हणजे अघाडीच्या सैन्यविभागाची डावी बगल. (लेफ्ट विंग)

जरजस्ती—जर जास्ती, उपद्रव.
देवाकडे गांव नेहमी आहे याजकरितां तेथें तगारा (तगादा) कोणेविसी जरजफ्ती (जर जस्ती) न करणें किरकोळ उपसर्ग न देणे जाणिजे.

—शांतादुर्गा संस्थानचा संक्षिप्त इतिहास शेळडेकर संपादित
पृ. ९ (परिशिट)

जरतुर—जर्जर. मरणोन्मुख.
१ राजश्री फोंडियास गेले ते वक्ती खाडीवरी गनिमासी गाठी घालून जुंझ वहुतच केले. तें वख्ती जखमा लागोन (कृष्णाजी कंक) जरतूर जाला म्हणोन घरास जावया आज्ञा दिली. घरास आलियावरी जखमा फुटोन मयत जाला. —शि. च. सा. खं. २ पृ. ४००

जरदार—धनाढ्य, श्रीमंत (जर–सोनें)
हैदरअलीखान जरदार खजानेपूर स्वारांस नालवंदी पेशगी तलब देईल.
—पुणें अखबार, भाग १ पृ. २१४

जरदुझी, जरंदोजी—जरंदोज (ज्यावर जरीचें नक्षीकाम केलेलें असें कापड किंवा वस्तु)
२ नक्षी किंवा वेलवुट्टी.
३ सोनेरी जरानें विणलेलें जरीकाठी.

जरब—तोफ.
१ हें वर्तमान गुलाम कादरास समजल्यावर जरबेपुढें पाऊल न टिकतां वाहेर पडला. —हो. कै. पृ. ९८
२ खडर्याजवळ नवाव वंदेगान अल्लीची फौज, पायदळ, जरबा होत्या, त्यांजपैकीं कांहीं सरंजाम येऊन मशीर यास मिळाला.
—ऐ. ले. सं. ५१३५

जरब (जर्ब)—तोफांची मोजदाद करताना वापरावयाचा संख्यावाचक शब्द.
उ. तोफा जरबा पांच म्ह. तोफा संख्या पांच.
१ बाणाच्या कैच्या २५ व तोफा जरब १५ या वितिरिक्त जंगी सरंजामसुद्धा जलुसी लष्कर उतरविले आहे. डेरे दांडे दुचंद सरंजाम उभा केला आहे. —पुणें अखबार, भाग ३ पृ. २५
२ समागमे दोनसे स्वार व पांच जरब तोफा (तोफा संख्या ५) व दोनसे गाडदी प्रस्तुत आहेत. —पुणें अख. भाग २ पृ. ११९

जरबवान—दराऱ्याचा, कर्तृत्ववान.
जरबवान पुरुष आहे त्याचे तोंडांत दौलत आहे.
—हो. कै. १०९

जरर—जखम, लक्षणेनें वैर.
बाळाजी पंतांनीं तुळशी शाळिग्रामाच्या सिंद्यास दिल्या व सिंद्यांनीं आपल्या गुरूची उदी अंगारा बाळाजीपंतास दिला परस्परें जररावर

नसावे (एकमेकास इजा करण्याच्या बुद्धीवर नसावे) अब्रू हुरमत उभय-तांची येक याप्रमाणें ठरले.

--पुणें अखबार भाग ३ पृ. १८६

जरलगी—जरीलगी; जरीचें निशाण; जरीपटका.

बाबा फडके मुहूर्तेकरून निघाले. जरलगी व अंबारी व ३००० फौज बरोबर आहे. --ऐ. ले. सं. ७६९०

जरा जवादा—(?)

हशम घेऊन गडास येऊन वेढा घालून खालील जरा जवादा न जाता गड सितावीनें कैद होऊन कामावरी ये गड हजरतींचे तरफेस होये ते करणें.

—शि. च. सा. खं. २ पृ. २१४

जराबजरा—कणन् कण.

इनामाचे जराबजरा पावते कीजे.

—राजवाडे १५ पृ. १६४

जराबाजरा--सामानसुमान; बारीक सारीक चीजवस्त, झाडून सर्व.

१ निंबाळकर याची सुटका होऊन सुतळीचा तोडा जराबाजरा सुटोन ये, तो अर्थ केला पाहिजे. —पे. द. २८ पृ. २४७

२ मौजे मजकूरचीं गुरें वगेरे चीजवस्त नेली असेल ती जराबाजरा देवावी. —ऐ. ले. सं. २६५३

३ आंबेगांव येथील वाडा शिंदे याजकडील लोकांनीं चीजवस्त जरा बाजरासुद्धा लुटून नेले. याजमुळें खराबी बहुत जाहली.

—पे. द. ४४ पृ. ११

जरारा—ओसाड; चीजवस्त हलवलेला.

१ शत्रू हावभरी जाहला. याजकरितां गांव जरारा करावा म्हणून लिहिलें आहे. —ऐ. ले. सं. ३२९७

२ तेथून कूच केलें तें हनगलीस गेलों. तों ठाणें जरारें होतें.

—ऐ. ले. सं. १२९५

जरारा—सडा; अवजडसामानाविरहित.

१ सिद्दीसाद बाणकोटास आहे. बाणकोटांतील कुलीसामान दाणागला देखील तोफा सारे आरमारावरी चढविले आहे. जरारा राहिला आहे.

—पे. द. ३ पृ. १३७

२ या प्रमाणें शत्रूची फौज मैदानांत कधींहि येणार नाहीं (अशी आली आहे), तुम्हांकडील बातमी तर जरारे येऊन गांठ घालावयाचे विचारांत असाल. —ऐ. ले. सं. १७०७

जरी अह—योग, कारण, रूप, साधन.

जरीद—भाला.

जरीदा—जरिदा, सडा, सडाजरारा.

१ लढाई बिघडली मानाजी फांकडे जरीदा फरारी होऊन गेला.
—पुणें अख. भाग १ पृ. २५७

२ मुराररात्र जरिदा कुदचेरी समीप वहीरवुणगं चंदीवर ठेऊन गेला.
—ऐ. सं. सा. खंड ६ पृष्ठ २५

३ आजंठेवरी हे जरिदे आले आहेत.
--पे. द. ३० पृ. ५३

जरीदी--सडी.

आन आपन जरीदी फौजेसी मजल दरमजल पावागडास जाऊन चापानेर सर केले. —पे. द. १४ पृ. १

जरीब—मोजणी. १ जवळ जवळ एक जमिनीचा बिघा. २ जमीन मोजण्याचें एक माप. ३ जमीन मोजण्याची एक सांखळी किंवा दोरी.

बेतालीस गांवांत तेरा गांव वाचले आहेत. त्यांत पांच गांवचे जरीब केले होते. केवळच घाकटी परवानगी वस्तीस राहून सेते करितात.
—पे. द. भाग २९ पत्र नं. ९५

जरीबकरणी—पिकाऊ जमिनींची मोजदाद करून तयार केलेलें सरकारी पत्रक.

जरीब कोस, जरीबी कोस--विशिष्ट परिमाणाचा कोस.

(खुलाशासाठीं ' पैमापी तणाव ' पाहा.)

जरीबदार—जमिनीचें मापन करणारा.

जरूर—अशक्य.

एकाएकीं मीर फैजुला पट्टणाहून बारा गांवें येईल आणि गडबड या लष्करावर करील हे गोष्ट घडणें जरूर, तुम्ही आपले जागां स्वस्थ असावें. --ऐ. ले. सं. १२०२

जरूर--फारतर; जास्तींत जास्त; कमाल.

या खेपेस रस्तेचा बैल भारी नव्हता. हजार दीड हजार जरूर होईल.
—ऐ. ले. सं. ३६१४

जरूर—दुर्घट.

तिकडे पायचें माणूस ५–७ शें व ५० स्वार गेले आहेत. ठाणीं बसतील. परंतु टिकणें तूर्त जरूर दिसतें. —ऐ. ले. सं. ४३७३

जरूर—किमान.

येथून धारवाड १।।–२ कोस जरूर. —ऐ. ले. सं. ४३७५

जरूर—जरुरीपुरतें. कार्याकारण, थोडके.

खावंदांची आज्ञा मान्य करावी लागेल म्हणतात. परंतु लोक जरूर राहातील. सरलस्कराकडील सरंजामी पथकें मात्र से दोनसे राहतील.

--पे. द. ११ पृ. ३१

जरूर ठरणें—मुळींच न ठरणें.

त्याजवरून ५-७ रोज सरकारांत विचार पडला आहे. खासा स्वारी निघावी असा बेत आहे. परंतु हा मनसबा जरूर ठरेल व हरीपंत तात्यांचीच रवानगी करितील. —ऐ. ले. सं४४०१

जरूर ठरून राहणें—दहशत खाऊन जाणें.

आपला मुक्काम मनोळीवर जाहल्यामुळें अमित्रास दहशत पडली. आपली सडी फौज पुढें गेल्यास धारवाडास जरूर ठरून राहतील. आंपला लौकिक आणिकांस न ये. —ऐ. ले. सं. २८२७

जरूरत--जरूरी.

जरूराती—कामचलाऊ, हंगामी.

कांहीं लोक लागल्यास जरुराती ठेवणे व दंगा वारलीयावर दूर करणें.

--वाड स. मा. १ पृ. २०

जरूरे--जरारे, सडे.

मुत्सदी शहरास रवाना करून आपण जरूरे होऊन नर्मदा तीरास गेले.

—पे. द. १५ पृ. २५

जल्हू— वक्षीस.

जल—वैभव, झकाकी. —राजवाडे ५ पृ. ७६

(जलील शब्द पाहा)

जलंद मर्जी—त्रस्त, व्यग्र.

दुसरे नवाब मेलियाचे खबरीमुले नासरजंगाची मर्जी जलद यामुलें सातारियासारखे तेथें आवाई आहे असे पत्रांत भाव आहें.

—पुरं. द. भाग १ पृष्ठ १२७.

जलदरव—जलदीनें चालणारी डाक.

बदामीपासून हैदराने आपले लष्करापर्यंत डाक बसविली आहे त्या डाकेवर पत्रें अजीर्प्यंत बदामीस येतात व तेथोन पुण्यास जलदरव हरकारे पत्रें घेऊन येत आहेत.

--पुणें अख. भाग २ पृ. १३१

जलदाई—चपलता, घाई.

विठोबा भला मारिला टोला ,कंबर मोडली । रखुमाई भली केली जलदाई। कंबर शेकली । —मराठी भजन

जलमार्ग--जलमार्गानें होणाऱ्या वाहतुकीवरील जकात.

जला—दगा, धोका, नाश.

ते आपले भुजबळ आणि कीर्तीचे रक्षक आहेत. ते संतोषित राहिले म्हणजे दौलतीस जला बसणार नाहीं.

—इ. सं. पे. द. स. प. मा. ५. ३१८

जलाजल--घोड्याच्या वक्षःस्थळावर जो घुंगुराचा गुच्छ किंवा माळ बांधतात ती. —रा. व्य. को.

जलाद—१ फांशी देणारा, शिरदछेद करणारा मांग, २ निर्घृण.

अम्मलदार हमदानी जलाद. —ऐ. टि. ५ पृ. १०

जलादत—मोठेपणा.

जलाल—उग्रता, शक्ति, जुलूम, जोरावारी, कडक, उग्र, जुलूम.

जर रयतेवर हक्क करून दिधला तरी नूतन कानूमुळें रयतेवर जलाल होऊन रयत पीडा पावते, श्रमी होते.

—म. रा. आ. २५

२ जेथें लष्करचा मुक्काम होतो, त्या गांवाचा शिवार व घरें राहों देत नाहींत. जलाल फार आहे.

—ऐ. ले. सं. ६१६५

३ तुम्ही इकडेहि (कर किंवा पट्टी) घेऊं लागलेस म्हणजे रयतेस जलाल जालें. तुम्ही तिकडे बसविलें तें तें अंगारक घेईल. हिकडे मागती तुम्ही घ्याल, यैसें दुवारा होतें.

—पे. द. ४०, पृ. ७९

४ बाजारास उदमी व्यापारी येतील त्यास कोणेविसी जलाल होऊ न देणें.

—पुरं. द. भा. ३ पृ. १०३

जलाली—जहाली, तामसी स्वभाव.

रखमाबाई होळकर सुभेदारांची स्त्री तिची जलाली फार मीठी सबब सुभेदारांनीं आपल्या त्रिवर्ग पुत्रांची सोय (सोपवणूक) पांडुरंग शंकर यांस करून दिली.

—हो. कै. पृ. १५१

जलावतन—हद्दपार, निर्वासित.

जानराव वकील पटणाकडे पाठविला जे, नासरजंग मारिले, करितां तुम्हास बिलकूल जलावतन करावे म्हणून गाजुदीखानाचे चित्तांत आहे.

—E. M. P. पृ. १०२

२ हांडे याचें पारिपत्य जलावतन करणें.

—स. न. दा. ७०

जलील—प्रकाशमान्, वैभवसंपन्न.
नबाबाची दौलत बहुत जलील झाली यास आणखी जल देणें अथवा रोनक आणणे हा यख्तियार तुम्हांकडे आहे.
—राजवाडे ५ पृ. ७६

जलुशी—राज्यारोहणापासून मोजण्यांत आलेलें (वर्ष).

जलूश—कीर्ति, अस्करा. दरारा, पराक्रम. माहात्म्य, प्रभाव.
माधवरावसाहेब यांचे जरबेचा जलूश मोठा. —हो. कै. ४२
अवतरणासाठी 'गांवखुद' पहा. —हो. कै. पृ. १०
अवतरणासाठी 'गांवखूद' पाहा —हो. कै. पृ. १०
जरबेचा जलूष पाहून, घरोब्याची वृद्धि असावी यास्तव टिका वस्त्रें जोधपूर, जयपूर, उदेपूर, बुंदी आदिकरून संस्थानिकांनीं सर्वांनीं पाठविलीं.
—हो. कै. पृ. ४८

जलूस—आरोहण, समारंभ.
मोठा जलूस जाहला. —ऐ. टि. पृ, ६५

जलुसी—शोभेकरितां, देखाव्याकरतां.
(अवतरणासाठीं ' जरब ' शब्द पाहा)
--पुणें अखबार भाग ३ पृ, २५

जलूसवाला--श्रेष्ठांचें आरोहण. —राजवाडे १८ पृ. ५६

जलेदी रेहकला—भराभर गोळा ज्यांतून सोडतां येतो अशी एक तोफ.
बुरजावर मोठें भांडें (तोफ) येक व दोन लहान असी तीन तीन भांडीं भारी चांगलीं दर बुरुजास असेत. मध्यें सफीलीवर (तटाच्या भिंतींवर) लहान भांडीं वगैरे जलेदी रेहकले (जलदीनें उडणारे) भारी असेत.
—हो. कै. पृ. २२६

जलेली—जुलूम.
माणिकगड किल्ला व त्याखालीं मुलूख तो रास्ते यांचे वडील पुत्र गोपाळराव रास्ते याजकडे. त्याची रयतेस जलेली व संस्थानासी (कुलाबा संस्थानाशी) बिघडून चालले. —द. स. के. या. पृ. १९

जलोत्सर्ग—नव्या खणलेल्या विहिरीचें लग्न लावण्याचा विधि. विहीर ही नवरी व जलोत्सर्ग करणारा मनुष्य हातांत शाळीग्राम घेऊन उभा राहतो तो नवरा.

जलोहखाना--जिलौखाना, समारंभाचें स्थान, दरबार, दालन.
नबाबांनीं हवेलीचे जलोहखान्यापुढें एक तोफ ठेविली.
—राजवाडे ५ पृ. २०

जव तव—जसा तसा, कसा तरी, कसाबसा.
वासीम परगणियास गुदस्तास चौथाई सोड देऊन जवतव तहरह करून भांडेगांव येथें मुकामास गेलों. —पे. द. १७ पृ. ८६

जवळ—पेरणीसाठीं जमीन नांगरावयाच्या आधीं ती भाजण्याकरितां शेतकरी एकत्र जमतात त्याला ' जवळ ' म्हणतात.

जवानमर्द—तरुण मनुष्य.

जवार—शेजार, समीपता, शेजारचा प्रदेश, गांवाशेजारचीं खेडीं.
The villagers in the vicinily of a town
हवकजवार ? (wilson)

जस्ती—जस्ती दागिने, जस्ती नग. जस्त ही कथील व शिसें यांची एक मिश्र धातु आहे.
गोदडबावानें आपले पालेपताका, नगारा, वीणा, देवाच्या मूर्ति आदि वालवंटीवर जमा करून त्यावर तूपतेल व कांहीं जस्ती होते तें घालून अग्न लाविली. सर्वस्व जाळून फडशा केला.
--ऐ. ले. सं. ७१३५

जसन—समारंभ.
प्रथम येक पुत्र नवाबास आहे. त्याच क्षेत्रीं (त्याच राणीस) प्रस्तुत पुत्र जाला. याजकरितां तीन दिवस जसन केलें. —पे. द. २५ पृ. ९२

जसातसा--असातसा, सामान्य.
स्वामीचा व राजेश्री सरखेल साहेबाचा ऋणानुबंद जसा तसा नाहीं.
—पे. द. ३ पृ. ६८

जसारत—सुगमता.

जसे तसे—कसें तरी, मोठ्या कष्टानें.
याप्रमाणें फार फार उपद्रव पाहून जशी तशी (कशी तरी) नर्मदा उतरली, नंतर बडोद्यास जाईतोंपर्यंत प्राण वाचतील कीं नाहीं अशी दहशत पडन, खंबायत डावी व पेटलाद उजवी टाकून, डाकूरचे मार्गं जसे तसे पायगडास दाखल झाले.
—काय. प्रभु. इ. सा. पु, १ अंक ६ पृ. ६
आम्ही पंचवीस हजार रु. कर्ज मेळऊन हा कालवरी जसे तसे चालविले.
—पुरं. द. भाग १ पृ. २३२

जहत—कारण.

जहन्नम—नरक.

जहती—कारणें.

तेणेंप्रमाणें आपले जहती येक मोख्तसर माणूस सिवेनें चालविणें. तेणें प्रमाणें सिवेस गडधो घालणें म्हणोउन रजा फर्माविली.

—शि. च. सा. खं. ५ पृ. २०३

जहन् नशीन-जहन्नसीन, जहाननसी—श्रुत माहित.

१ कुल् कैफियत आं मेहेर्बानास जहन्‌नशीन व्हावी म्हणोन तपशिलें कलमी केले असे. —खरे ७ पृ. ३५७४

२ तुम्ही सरकारकाम मातबर केले हें जहनसीन आहे प्रस्तुत तुम्ही फौज ठेऊन पंचमहाल प्रांतास जावे.

—पुणें अखबार भाग १ पृ. २४२

३ येजमानसाहेबास ज्यहाननसी केल्यावाचून इनायतनामे कैसे सादर होतील ? ज्यहाननसी करून इनायतनामेविषी उत्तर लिहून पाठऊ म्हणोन आज्ञापिले. —पुणें अख. भाग २ पृ ५४

जहमत—श्रम, श्रमी, आजारी.

राजा जहमत जहाला आहे. —सभासद ४२

जहमति—व्यथा. —रा. व्य. को.

जहरबाज, जहरबाद—हत्तीस होणारा एक आजार, हत्तीचा मद.

जहरबाज हत्तीस उतरला आहे आजारी आहे सबब धुवावयास.

—पे. द.

२ बांका हत्तीस जहरबाद जाला आहे. —पे. द.

जहाज फरमास—दर्यात बेकौली जहाजें अडवून सरकारांत जमा केलेली मालाची लूट.

मशारनिल्हेचा मामला स्वामीनीं न काढावा; दुसरा मामलेदार येईल त्यास मशारनिल्हेप्रमाणें पोटाग लागोन जहाजफरमास व स्वामीकार्याची तिडीक लागणार नाहीं. —पे. द. ४०, पृ. १४

जहाती—निमित्तें, कारणें.

जहाती भंडारा. —राजवाडे १५ पृ. १५३

जहान् दीद—जग पाहिलेला, अनुभविक.

थोर उम्दा सरदार व जहांदीद होते.

—राजवाडे २२ पृ. २५

जहान्दनाह—जगाचा रक्षणकर्ता. राजाचें एक संबोधन.

जहान—सैन्य; प्रचंड समुदाय.

एवढें जहान; छावणीस खातील काय हे काळजी.

—ऐ. ले. सं. ४६१

मोगलानें जहान उठविलें. —खडर्याच्या लढाईचा पोवाडा.

जहांबाजी—जिवावर उदार होऊन केलेला पराक्रम; शौर्य.

राघोपंत सुभेदारास धरावें, इतक्यांत त्याणें जहांबाजी करून किल्ल्यांत पळून गेले. --खरे १ पृ. ५२

जहांमर्दी—साहस, पराक्रम, छाती.

दमाजी थोरातानें बाळाजी विश्वनाथ पेशवे व अंबाजीपंत पुरंदरे यांस कैद केलें. त्यास कारस्थानानें व जहांमर्दीनें काढून साताऱ्यास नेले व पुढे दमाजीसहि धरून कैद करून साताऱ्यास नेलें.

—द. स. कै. या. पृ. ५५

जहाला—जहाल, तापट, जुलमी.

बाईसाहेब (अहल्याबाई) होळकरांचे घरांत आल्यापासून समजू लागल्यावर खंडेराव होळकर याचे जहाला सरदारी चलन, त्यात घुटी (दारू) प्राधान्य, यामुळें वृत्तीस उदास राहिल्या. —हो. कै. पृ. १२०

जहालीम--जालीम, निकराचा.

याची त्याची सळमिसळ होऊन जहालीम तरवार चालिल्या. सुल्तानाकडील मातबर दहावीस जाया जखमी होऊन फौजेचें तोंड करवटलें.

—म. द. रु. २ पृ. ३

जव्हर—विशेष गुण.

यावरी मनुष्याचे जव्हर जाणणार असें शकस होणें दुर्लभ.

—ऐ टि. ३१७

जवादी—एका विशिष्ट मार्जारापासून मिळणारा सुगंधी पदार्थ.

जवाद्या मांजराचा आण्ड. मिळाला तर आम्हास पाठवून देणें.

--राजवाडे १७ पृ. ५२

जवादी प्रसवती विडाळी मुक्तेश्वर आदिपर्व ४९।८८

जवादी बिडालाचें वृषण । कर्णी खोविती रसिकजन ।

परी लंबकर्णाचे कर्ण । सेविती न. —मुक्तेश्वर

जवार--सामंत, नवाई. आजूबाजूचा प्रदेश.

जशन—समारंभ, उत्सव.

पातशहांनीं छ ११ माहे मजकुरी जशन केला.

—दि. म. रा. २६०

जसाला--भालदारासारखा शिपाई.

नवाबाचे देवडीवर से-दोनसे चोपदार व जसाले वगैरे इतमाम असतो; तो त्याणी उठऊन देवडी पंडित मशारनिल्हे व रंभाजी निंबाळकर यांचे हवाली केली. —ऐ. सं. सा. खंड ६ पृ. १२

जहान—जग.

जहानकुश—तोफेचें एक नांव. जहान म्ह. जग. कुश म्ह. जिंकणारी. अर्थ जगज्जेती तोफ.

जहान-मताअ—जगत्प्रभु.

जहानियान—जगांतील लोक.

जहालत—पशुत्व, रानटीपणा, अज्ञान.

जहुरात आणणें—जाहिरातींत आणणें; जाहीर करणें.

ते आणखी जहुरात आणतील लेकिन अगर ते तमाम सरदार लोका वगैरें तेथून रवाना झाले असतील तर इंजानेबास ह्या महांगेरीबराबर ईरकाम करून पाठवावेसा नियत. —केळकर संग्रह कुबल दप्तर

जहूर—जाहिरी.

सरकारचे वचनाची कायमी कशी हे आइंदे जहुरात येईल.

—राजवाडे १० पृ. १६६

जहूर—समुद्राचें खारें पाणी, भरतीचें पाणी.

कोठें जागा कोरडी तोफा ठेवावयापुरती नाहीं चिखोल बहुत जहूराचें पाणी बहुत येतें. —पे. द. १६ पृ. ११३

जळ—इंग्रज. (जळचर-इंग्रज)

होळकरानें जळाचा समग्र फडचा केला.

—पे. द. भाग ४१ पत्र नं. ३८

जळतोंडा—काळे तोंड झालेला, दुलौकिक झालेला.

साहेबाच्या वचनावरी जाईन परंतु तेथें गेलियाउपरी मला जळतोंडा म्हणतील, नीट बोलणार नाहींत, राग करतील, मग माझी गत काय ?

—ऐ. ले. सं. पृ. ३३६

जळीती—आग लावणारा, जळित करणारा.

एखादा जाबसाल बोलण्याचा पडला तर जळीती आपण नसावें. आग पडली ती विझविणें होणें कठीण. असें बहुत प्रकारें बोलून गृहस्थांनीं आग घालूं नये याजप्रमाणें करार करून घेतला.

—ऐ. ले. सं. ५१२३

जा—जागा.

—मुधोळकर घोरपडे फर्मान

जाईदाद—जहागीर,

आम्हांस जमेतिसुद्धा सोडावे आणि जाईदाद पहिल्यापासून आम्हाकडे आहे ती मात्र द्यावी असें जाबसाल.

—म. शि. यां. का. पृ. ७७८

जाखा—?

भिकाजी रेणुसा याणें फास लावून जीव दिल्हा मग सेरकर सेरी मोजावयासी निघाले होते ती राहिली त्या उपरी माल जो जो फस्त केला होता त्याचे रुपये जाखा करून वारिले, सेरीच्या माथा ५० रुपये दखर्यास ऊस लावून द्यावें ऐसा तह केला. --रा. १ पृ. २४

जांगजोडी—जंगजोड, संगनमत.

साहेबाचे तर्फेने कयीती मावलास हवालदार व कारकून आलाहिदे गेले त्यासी जांगजोडी करून नामाजीने आपणासी बेइमान होऊन नजर बदलली. —पे. द. ३१ पृ. १७३

जागतौदासरी—कर्नाटकाकडील भिक्षेकऱ्यांची एक जात.

जागर बगर—(?)

त्यांचे वचनावरून मामलीयत केली आहे. चिंता न करणे. येका महिन्यानें फौज नांदेड सरकारचे महाल उगऊन घेतो. गंगा उतार जालीयानें उगवून घेतो. महालास कमाविसदार पाठविले आहेत. मुदल यैवज जागरबगर फौज जाणार आहे. फौजेनें यैवज होईल कांहीं फिकीर न करणें. --वै ४ स. १७४२ पृ. २२

जागली—(नाम) रखवालदार, रक्षणकर्ता.

आम्ही तुमचे जागली, तुम्ही आमचे शब्द मानिता म्हणून तुम्हास लिहिले तरी आमचे वचन मान्य करून थोरात याचें चालविले पाहिजे. —पे. द. ३३ पृ. १३७

जागले—(क्रियापद) जाग्रत झाले, बेदार झाले.

छ २५ माहे शाबान रोज सोमवारी नवाब साहा घटकास जागले. मग मसरनमुलुक जागले व मग मसरनमुलूक येक प्रहरास बंगलेमधे बरामद जांहले (हजर जाले.) —राजवाडे खंड १२ पृ. १९०

(एखादे) जागा घालणें—एखाद्या जागेवर हल्ला करणें.

नबाबाचें वर्तमान ऐकतो कीं अवरंगाबादची अगर बऱ्हाणपूरची आवाई घालून इकडील येखादे जागा घालावें. —पे. द. १० पृ. ३०

जागाजुगा—ठाणें; किल्ला; जागा; जागाविगा.

१ आम्ही हैदरखानास भेटलों, याचें कारण आमचे जागेजुगे चांगले नाहींत म्हणून नाइलाज जाणोन हैदराची भेटी घेणें प्राप्त जाहलें. —ऐ. ले. सं. १४३५

२ श्रीमंत सहा कोशीं आल्यावर तुम्हीं यावें लागेल. वरकड आंतील जागागा अडचण असेल ते नीट होईल. —ऐ. ले. सं. १७४५

३ यांचे खर्चाचें बेगमीविसी जागाजुगा लावून द्यावयाविसी सरकारांत ल्याहावें तर तोहि प्रकार समजलाच आहे.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १६७

जागाबजागा—जागाजागा, ठिकठिकाणीं.

१ तीन्ही सरदारांचे कमावीसदार जागाबजागा बसले.

—हिं. द. खंड २ पृष्ठ ६७

२ लष्कर कोठे आहे? महीपलीकडील ठाणीठुणी जागाबजाग आहेत त्यांचे वर्तमान सविस्तर लिहीणें.

—पे. द. १२ पृ. ३०

जागीर—जहागीर.

जागीरात (अ)—जागीर, जहागीर.

जागे मकानें—किल्लेकुशाद, ठाणींठुणीं.

मल्लखान लालखान व सुलतानखान वगैरे येक होऊन जागे मकानें फौज-खजीना आटोपून बळाऊन राहिले आहेत.

—ऐ. सं. सा. खंड ७ पृ. ४४

जाजती, ज्यादतीं—आधिक्य, बढती, जुलूम, जोरा.

कामाचा माणूस पाहून तैनात जाजतीने हशमास करणे ती सरकार कुनांनीं करावी (सभासद ६०)

ठाणीं इकडील असता ज्यादती करून टिपूने घेतली.

—राजवाडे ७ पृ. २१

जाजती—सर्शी, जय.

खंडोजी माणकर यांचे व हबसियाचे युद्ध जालें यांची जाजती जाली. रामाजीराव रेडीकर त्यांचे, पाडाव जाले.

—पे. द. ३३ पृ. ३१४

जाजती—उपद्रव; अनर्थ; छळ, धीटपणा, बेमुर्वतपणा.

१ आमच्या फौजा चौगीर्द बैसल्या आहेत. रात्रींचे बाण-बंदुका त्याच्या चौक्यावर चालवितों, यामुळें सारी रात्र दंगे गोटांत होऊन फौजा ताटकळोन उभ्या राहतात. त्यांच्या घोड्यास चारा नाही, दुसरें, सारा-वेळ तयारी. ऐसी जाजती मांडली आहे. —ब्र. च. पृ. ४५

२ बेदड्यांनीं चालत्या स्वारींतूनहि कोतवाल घोडीं निशाणापुढील गोळ्याचे अंतरावरील नेलीं ! याप्रमाणें जाजती बेदड्यांची कधीं झाली नव्हती ! —ऐ. ले. सं. ४५७५

जाजती आजार—जुलम, पीडा.

जाजती जलल, जाजती जलाल—जुलूम; अत्याचार.

१ शामल वाटवील किंवा देवळें मोडील व जाजती जलल करील तर आम्ही जामीन राहतो. —पे. द. ३ पृ. १७२

२ यात्रेकरू आले आहेत यांस कोणी कज्जाभांडण व जाजती जलाल करूं नये. —खरे ७ पृ. ३७८६

जाजमे हंतरणें—धरल्या जागेवरून किंवा बैठकीवरून बिलकूल न हलण्याचा निश्चय करणें. असाच शब्दप्रयोग हरिवंश बखरींत व पानपतच्या पोवाड्यांत आला आहे. फक्त तेथे जाजमाऐवजीं सतरंजी शब्द घातला आहे इतकेच. उ. "सावनूरकर नवाब याजवडील पठाण किल्ल्याचे रेवणीवर सतरंज्या हंतरून वर बसून तिरंदाजी करीत. येथेंच मरूं पण जागा सोडणार नाहीं असा आपला निश्चय शत्रूस कळावा म्हणून —ह. वं. ब. पृ. ९

त्यापक्षीं सोक्षमोक्ष आजच व्हावा असा निश्चय करून जाजमे हंतरून जयपूरवाल्याशी लढाई घेतली. —हो. कै. पृ ३४

जाडोल—अवजड; मोठ्या (?)

शत्रूचा मोड जाहला. त्याची फौज डोंगरांतून निघोन जाडोल तोफा टाकून शें-दोनशें फौजानिशीं गेली. —ऐ. ले. सं. ४५६४

जाण करणें—जाहीर करणें.

सर जॉन ग्रँट आपल्या जडजपणाचा अधिकार स्वता सोडतात सबब त्याचा सन्मान करण्याकरता लोक एकत्र जमावे असा अकबरीत खबर प्रकट जाली म्हणोन मुद्दाम गवरनर साहेब वाजीप (वाजीब, योग्य किंवा जरूर) जाणोन लोकांस कळावया करितां जाण करतात जे (कीं) जड्जसाहेबास त्याजवर फिर्यादी जाल्यामुळें पादशाही दरबारांतून (ब्रि. सरकारनें इंग्लंडांतील) परत बोलाविलें आहे. —पे. सा. पृ. २६६

जाणे—सती जाणें.

परसोजी महाडिक मेले. बायको जात होती त्यास वराणजी मोहिते याही जाऊं दिल्ही नाहीं. —पे. द. २० पृ. ३५

जाणो जन्माचा—जन्मोजन्माचा !

दाभाडे पहिल्यापासून राज्याचे पायासी शत्रुत्व चालवितातीं, येकनिष्ठ नाहींत. सुलतानजी निंबालकर येकनिष्ट होते. त्याचा इमान कळला तसा दाभाडीयाचाहि वळखावा. ऐसा जाणो जनमाचा राज्याचा जाणता यैसी तजवीज हिकारपूरकानें सांगितली. —पे. द. १० पृ. ६८

जाणोपरी—कळों लागल्यापासून, आठवत असल्यापासून, आपल्या

माहितीप्रमाणें.

कार्तिकी पौर्णिमेचा त्रिपुर आपले जाणोपरी डिंगणकर पाजळतात यैसें एकाचें बोलणें (उलट) वेलंबकर शेतें करून डिंगणकरास सल आलीकडे आपले जाणोपरी देतात यैसे पांच जणाचे बोलीत.

—ज्यू. ३२७

जात—स्वतः, मालक,

भावाभावांत कटकट लावून दिली आपण तमासबिनी करितात, असे जातीकडे येते. ——राजवाडे ५ पृ. १५९

आतां मदार नाना यांचे जातीवर आहे. —ऐ. टि. १ पृ. २५

जात इनाम—वंशपरंपरा नव्हे असे तर स्वतःच्या हयातीपुरते सरंजामी नव्हे असें इनाम.

जातऊजहम—स्वभावतः थोर, श्रेष्ठ, कुलीन.

नवलपूर्व काय लिहावे ? मूल नवाब व गयासखान जातऊजहम आहेती. बेइमानी लोक ! यास वचन प्रमाणाची सयें असत नाहीं.

—पे. द. १० पृ. ५२

जातखत—हमीपत्र, जामीनपत्र.

ऐसियास पाटीलकी तुमची आणि आपले जातखत गुंतले यास्तव ३५००शें रु. चे गांवकरी याचे खत घेतले.

—पु. न. सं. वृ. खं. २ पृ. ९८

जातपत—गोतपत शब्द पाहा.

जातमुचल्का—स्वतःच्या सुटकेसाठीं न्यायाधीशापुढें लिहून दिलेला करारनामा.

जातमुबारक—खुद्द श्रीमंत.

सर्कारचे व जातमुबारकेचे लक्ष सोडून जे असतील त्यांचा बंदोबस्त मनोदयानुरूप केला जाईल. —राजवाडे ७ पृ. २९

जाता व जावयेता—जातांना व परत येतांना.

वेणीराम वकील व रमाकांत यासी जातां दीढ महिना लागेल आणि जावयेता १॥ मास येकूण ३ महिने लागतील.

—नाग १ पृ. ५४

जातीचे आंगवण—स्वांगेकरून पराक्रम.

इकडे हिंदुस्थानांत महादजी शिंदे उज्जनीस होते. गोहदकर जाट यांचा इरादा ग्वालेर घ्यावी हे. परंतु जातीचे आंगवण थोडे तथापि उद्योग करीतच होता. तो ग्वालेर श्रीमंतांनीं शिंद्यास दिली.

—इ. सं. हो. कै. पृ. १५

जातीनें हाणणे किंवा हांटणें—जातीनें पराक्रम करणें.
ते दिवशी बाजीपंतानें जातीनें हांटिले त्याचा स्तव किती करावा.
—पे. द.

जातीवर मोबदले करणें—स्वतःच्या नांवें कर्ज काढणें.
त्याप्रसंगी ऐवजाबद्दल वगैरे सरकारांतून मदत न जाली याबद्दल जातीवर मोबदले जालेबद्दल आमचा ऐवज सरकारांत बहुत्र घेणें झाले. पैकीं सरकारांतून ऐवज आदा होऊन आमचे फाजील सरकारांतून येणें रुपये दाहा आकरा लक्ष राहिले. —पे. द. ४४ पृ. १३.

जातीस--स्वतःस.
हणमंतराव ढमढेरे पाईनें लंगडे परंतु यांणीं केसो कृष्णाचे लढाईत घोड्यावर बसून कामकाज फारच चांगलें केलें. जातीस जखम लागली व बसावयाच्या घोड्यास जखमा लागल्या, मोठी शर्त केली.
—पे. द.

जा तुर जुमानें—(?)
खोजाचे सरायेंसमीप पांच सात दिवस जाले मुकामात करुन राहीले आहेत. ज्या तुर जुमानें स्वकार्यें साधावी हें मानस इच्छून आले.
—हिं. द. खंड १ पृष्ठ ६२

जाद्दह—मार्ग.

जादा--उत्पन्न झालेला; मूल किंवा मूलगा.
साहेबजादा—धन्याचा पुत्र.
शहाजादा—राजपुत्र.
हरामजादा—व्यभिचारोत्पन्न.

जादा तलबी—हांव, फाजील तगादा.
स्वराज्याचा अंमल बाजवी मामूलप्रमाणें देत जावा ज्यादातलबी न करावी. --राजवाडे ७ खलप २ पृ. ११३

जान्फिशानी—निदानींची मर्दुमकी, जहांबाजी, जिवावर उदार होऊन सेवा.
मुरारराव घोरपडे यांहीं....बहुत जहांफिशांनी केली.
--राजवाडे १ पृ. ४५

हे कदर आपण मनांत धरावी कीं सर्कारचाकरीवर जान्फिशानी करितात किंवा त्याचें पोट भरत नाहीं म्हणून मेहनत करीत फिरतात ?
—दि. म. रा. १ पृ. ६२

जान--जीव, प्राण,
वजीरखानासी बाण लागतां हौद्यात जान सोडिली.
—साने प. या. व. ५५

स्वामी सेवेवर जीवजानाविषयीं हजर आहे.

--ऐ. टि. ७३

जानगिरी—प्राणहरण.

ब्राम्हणघरचा हक्क द्यावा तें नाइकलें म्हणोन खंडोमल्हार खासनीस यास अभिमान येऊन पडला की आमची गोष्ट अमान्य करतात. म्हणोन त्यांनीं यास दूरदराज लावून (कोठेतरी दूर पाठवून) जानगिरी केली.

—रा. १ पृ. १८

जान-गुदाझ—प्राणाला वितळविणारा, प्राणघातक.

जान-निसारी--प्राणाचें ओवाळणें.

जान-फिशानी—प्राणार्पण.

जानतलग—आजीव, हयातीपर्यंत, तहाहयात.

कंपनी सरकारकडून पेन्शन उभयता बायांस जानतलग दोन हजार चालवीत आहेत. —भा. व. अमा. बाव. यां. कै. पृ. १६

जान-बाझ—प्राणाशीं खेळणारा.

जानमातीस लागणें—एखाद्याच्या दिमतीस लागणें.

कारकून, जो ज्याचे जानमातीस लागेल त्याचे आज्ञेत राहून त्याने सेवा करावी. —चं. चू. द. पृ. ११३

जानवान—जाणते, सुज्ञ, शहाणे.

यासी अंतर परस्परें न करावे. आपण सर्व प्रकारे जानवान आहा. कितीयेक कजिये गावासंमधे आहेत, ते साहेबी नीट करावे.

—धा. प. इ. सा. ३ पृ. ९०

जान सिपार—प्राणार्पण करणारा.

जान-सिपारी—प्राणार्पण.

जानिबदार—प्रतिवादी.

जानी—जिवलग (दोस्त).

जानीब—जाणिजे (?)

येणेंप्रमाणें चालविले जाईल जानीब ताा २६ माहे जून सन १२२९ फसली.

सही (इंग्रजी)
कलेकटर

—पे. सा. पृ. २७२

जानीबैन, जानबैन—तर्फैन; दुतर्फा. उभयपक्षी.

जानी बैन जुदागी नाहीं.

—साने प. या. व. ४८४

जानीवास—जानवसा; जानोसा.

लग्नाचा समारंभ मोठा मांडला आहे. वै. शु. ५ स वराचे सीमंतपूजन करून जानीवास घरीं आणून राहाविले आहेत.

—नाग २ पृ. २९

जानू फाइदा—नफा तोटा.

हे तिन्ही विचार चित्तांत आणून मनसुबीयाचा जानू फाइदा कैसा आहे तो पहावा. —पे. द.

जानूफैल—नफातोटा; विस्तार.

मनसुबीयाची जानूफैल चित्तांत आणून करणें तें करावें.

—पे. द.

जाफी—ताटयांचे किंवा चिकाचे पडदे तयार करणारा.

जाफत; ज्याफत—आतिथ्य; मेजवानी.

पांचशें रुपये नवाबानें जियाफत—मेजवानी पाठविली ते सेवकास दिधली.

—राजवाडे १ पृ. ४३

सदाशिव रड्डी यांनीं साहेबज्यादे यांस ज्याफत व नजर केली.

—राजवाडे ५ पृ. ४२

जाफरा—केशर.

—ऐ. सं. सा. खं.६ पृ. ३१

जाफराबाद—ऊर्फ चांदवड.

जाफा—नवीन, जादा.

तुम्ही फौज जाफा ठेऊन चाकरीस यावें असा करारमदार जाला असतां अद्याप न आला. —पे. द. भाग ३८ पत्र नं. १८

जाबकरी—जासूद, निरोप्या.

त्यांचेकडून उत्तर आल्यावरी जाबकरी रवाना करू म्हणोन लेहून पाठविले. —पे. द. ३ पृ. ७८

जाबछडा—एखाद्या गोष्टीची चौकशी करण्यासाठी किंवा छडा लावण्यासाठीं पाठविलेलें प्रश्नपत्रक.

या जाबछडाची पुरसीस करून सेरभर पीठ देखील घेतले असेल त्या सुद्धा चौकशी करून लेहून पाठवणें. —पेठे दप्तर भाग १ पृ. ३७

जाबजा—स्थळोस्थळीं, ठिकठिकाणीं.

१ पुदचेरीवाल्याकडे जाऊन त्याचे फिरंगी घेऊन, महमदअलीखानास उठऊन जाबजा त्याची ठाणीं कायम करितो.

—E. M. P. पृ. १३७

२ दिवस चांगला निश्चय करून धोईहि (द्वाहीहि) फिरवितों. साखरहि

वाटवितों जावजा किल्लेस पत्र लिहून तोफाहि सोडवितों म्हणून निश्चय करून वरास आलों. —E. M. P. पृ. ११६
३ ऐशा ताकिदा जावजा पाठवांव्या. —खरे ७ पृ. ३५७५
४ नाकेबंदी ज्यावज्या केली. —राजवाडे ५ पृ. ३६

जावत, जाबीत, जाबती—अधिकारी, मुखत्यार.
जोगेंद्रगीर मानभाऊ जावती कमलनैन सेकीन सम्मत निम्ब.
—राजवाडे १५ पृ. १७३

जाबतफरमास—जावत-आज्ञा, फरमास-मागणी. सांगू ती आज्ञा पाळली जाणें आणि मागू ती मागणी पुरी केली जाणें असा अधिकार किंवा अमल.
किल्ले माहुलीची जाबत फरमास चालावयास किलीयाचे पायनाम येक महाल. तेथें दुतर्फा सत्ता असलियास विचार कळतच आहे.
—पे. द. १७ पृ. १२९

जाबता— नियम, बंधन, यादी, कायदा, ठराव.
जाते समयी कुल लश्करचे लहान थोर लोकांचे बिशादीचे जाबते करावे.
—सभासद २२

जाब हासील—बोलणें, वाटाघाट.
प्रतिनिधीकडील वासदेवपंत भाऊ पंढरपुरास आले. त्याचा व याचा जावहाषील लागला.
—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. २३

जाबाचा साल होणें—प्रश्नाचें उत्तर होणें.
येथून आम्ही पत्र पाठवितो त्याचें उत्तर स्वामीचें येतें. जाबाचा साल होतो. आणि त्याचे फिरोन काय ल्याहावें म्हणून लिहीत नाहीं.
—पे. द. १६ पृ. १५

जाबितह—जाब्ता.

जाबिता—अधिकार, अंमल.
सुरत प्रांत याचा बाबती व सरदेशमुखीचा अमल यैसा मामला तुमच्या स्वाधीन केला असे. तुम्ही इमानें इतबारें वर्तोन जबरदस्तीनें जाबिताबसवून अमल बैसविणें. कुलबाब जमा आकार करणें त्यापैकीं जमेती व ठाणीं व महाल मजकूर देखील खर्चाचा तह ऐसा.
—पे. द. ४० पृ. १

जाबीं हुंडी—?
सांप्रत साडेतेवीस हजार रुपयांची हुंडी तुम्हावर जाबी केली आहे येथे

जानीवास—जानवसा; जानोसा.
लग्नाचा समारंभ मोठा मांडला आहे. वै. शु. ५ स वराचे सीमंतपूजन करून जानीवास घरीं आणून राहाविले आहेत.
—नाग २ पृ. २९

जानू फाइदा—नफा तोटा.
हे तिन्ही विचार चित्तांत आणून मनसुबीयाचा जानू फाइदा कैसा आहे तो पहावा.
—पे. द.

जानूफैल—नफातोटा; विस्तार.
मनसुबीयाची जानूफैल चित्तांत आणून करणें तें करावें.
—पे. द.

जाफ्री—ताटयांचे किंवा चिकाचे पडदे तयार करणारा.

जाफत; ज्याफत—आतिथ्य; मेजवानी.
पांचशें रुपये नवाबानें जियाफत—मेजवानी पाठविली ते सेवकास दिधली.
—राजवाडे १ पृ. ४३

सदाशिव रड्डी यांनीं साहेबज्यादे यांस ज्याफत व नजर केली.
—राजवाडे ५ पृ. ४२

जाफरा—केशर.
—ऐ. सं. सा. खं.६ पृ. ३१

जाफराबाद—ऊर्फ चांदवड.

जाफा—नवीन, जादा.
तुम्ही फौज जाफा ठेऊन चाकरीस यावें असा करारमदार जाला असतां अद्याप न आला:
—पे. द. भाग ३८ पत्र नं. १८

जावकरी—जासूद, निरोप्या.
त्यांचेकडून उत्तर आल्यावरी जावकरी रवाना करू म्हणोन लेहून पाठविले.
—पे. द. ३ पृ. ७८

जाबछडा—एखाद्या गोष्टीची चौकशी करण्यासाठी किंवा छडा लावण्यासाठीं पाठविलेलें प्रश्नपत्रक.
या जाबछडाची पुरसीस करून सेरभर पीठ देखील घेतले असेल त्या सुद्धा चौकशी करून लेहून पाठवणें.
—पेठे दप्तर भाग १ पृ. ३७

जाबजा—स्थळोस्थळीं, ठिकठिकाणीं.
१ पुदचेरीवाल्याकडे जाऊन त्याचे फिरंगी घेऊन, महमदअलीखानास उठऊन जाबजा त्याची ठाणीं कायम करितो.
—E. M. P. पृ. १३७

२ दिवस चांगला निश्चय करून धोईहि (द्वाहीहि) फिरवितों. साखरहि

वाटवितों जावजा किल्लेस पत्र लिहून तोफाहि सोडवितों म्हणून निश्चय करून घरास आलों. —E. M. P. पृ. ११६

३ ऐशा ताकिदा जावजा पाठवांव्या. —खरे ७ पृ. ३५७५

४ नाकेबंदी ज्यावज्या केली. —राजवाडे ५ पृ. ३६

जावत, जाबीत, जाबती—अधिकारी, मुखत्यार.

जोगेंद्रगीर मानभाऊ जावती कमलनैन सेकीन सम्मत निम्ब.

—राजवाडे १५ पृ. १७३

जाबतफरमास—जावत-आज्ञा, फरमास—मागणी. सांगू ती आज्ञा पाळली जाणें आणि मागू ती मागणी पुरी केली जाणें असा अधिकार किंवा अमल.

किल्ले माहुलीची जावत फरमास चालावयास किलीयाचे पायनाम येक महाल. तेथें दुतर्फा सत्ता असलियास विचार कळतच आहे.

—पे. द. १७ पृ. १२९

जाबता— नियम, बंधन, यादी, कायदा, ठराव.

जाते समयी कुल लश्करचे लहान थोर लोकांचे बिशादीचे जाबते करावे.

—सभासद २२

जाब हासील—बोलणें, वाटाघाट.

प्रतिनिधीकडील वासदेवपंत भाऊ पंढरपुरास आले. त्याचा व याचा जाबहापील लागला.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. २३

जाबाचा साल होणें—प्रश्नाचें उत्तर होणें.

येथून आम्ही पत्र पाठवितो त्याचें उत्तर स्वामीचें येतें. जाबाचा साल होतो. आणि त्याचे फिरोन काय ल्याहावें म्हणून लिहीत नाहीं.

—पे. द. १६ पृ. १५

जाबितह—जाब्ता.

जाबिता—अधिकार, अंमल.

सुरत प्रांत याचा बाबती व सरदेशमुखीचा अमल यैसा मामला तुमच्या स्वाधीन केला असे. तुम्ही इमानें इतबारें वर्तोन जबरदस्तीनें जाबिताबसवून अमल बैसविणें. कुलबाव जमा आकार करणें त्यापैकीं जमेती व ठाणीं व महाल मजकूर देखील खर्चाचा तह ऐसा.

—पे. द. ४० पृ. १

जाबीं हुंडी—?

सांप्रत साडेतेवीस हजार रुपयांची हुंडी तुम्हावर जावी केली आहे येथे

राखले कृष्णभट पाटणकर जोग धनी रुपये शहाजानी पंचमेळ कृष्णंभटाचे जप्त करून ठेवणें, आमचे नांवें लिहिणें.

—ना. दी. पा. पृ. ७१

जावीद—अधिकारी, मुखत्यार.

पुढें औरंगाबाद प्रांतीं पिलाजी जाधवरावास कन्नड फुलंबरी वगैरे महालचे मोकासे श्रीमंतानी दिले. त्यायोगेकरून पागापथक जावीद राहून, सरकारनी कामगिरी फर्माविली, तें काम महाराजांचे प्रतापेंकरून बजावीत होते. —द. स. कै. या. पृ. ५५

जाभ—बाणांचा भाता.

जाम, जांब—पेला.

फक्त एक रुप्याचा जांव पदराशी बांधून घेतला.

—मा. प्र. ११६

जामगी—बंदूकेच्या दारूस रंजक देण्यासाठी जी वळलेली दोरी पेटवून शिपाई जवळ बाळगी ती. ही दोरी उदवत्तीसारखी ठिणगी न पडता संथ जळत जाई. जसा ‘तोडा’ तशीच ही ‘जामगी’.

सुभेदारांनीं नारो गणेश यांची अप्रतिष्ठा फार केली. तवे तापवून पुढे टाकले. व गळचांत साखळदंड हत्तीचा घातला. आंगास जमग्या लाविल्या, मिरच्याची धुरी दिली.

—इ. सं. द. बा. प. पृ. १७६

२ बंदुकीत भरले बार झाले तैयार । जोड जामग्या जळती निघाले लष्कर ।

—ऐ. पो. के. खं. २ पृ. १९२

जामदानी—कापडाचा एक प्रकार.

१ रा. मन्याबापू यांचे लग्नाचे अहेराचीं वस्त्रें व कांहीं धोत्रजोडे व आगावानी (आगाबानी) व जामदान्या सरकारास व आपणास यैसे मजबरावर पाठविणार. —नाग २ पृ. ६५

२ उंचीं मलमले चांगली व बुट्टेदार जामदान्या आहे आज्ञा जाहल्यास हजार दोन हजाराची मिळतील. —नाग २ पृ. २२२

जामदारखाना—वस्त्रागार व रत्नागार, भांडार.

रजईचा मजकूर लिहिला तर प्रस्तुत जामदारखान्यांत शाल नाहीं.

—पारसनीस ब्र. च. ८

जामनी—(जामीनचे अनेकवचन).

अद्याप त्यावर पाहरा आहे. जामनी वगैरेचा फडशा जाल्यावर चौकी उठवावी असा निश्चय.

पुणें अखबार भाग ३ पृ. ६९

जामा—अंगरखा.

जामानिमा—सारा पोषाख.

जमीन तलब—जामिनाची मागणी.

या निमित्तें साहेबाच्या स्वारांनीं जामीनतलब केली त्यावरून मशार-निल्हेस आपण हजीरजामन असू.

—राजवाडे १२ पृ. १६७

जामीनसाखळीं—(१) एखाद्या विषयीं जामीन होत असल्याबद्दलचें पत्र. (२) एकाद्या गोष्टीबद्दल जामीन घेतला तर त्या जामीनाबद्दल दुसरा जामीन या प्रमाणें अनेक जामीन लावून घेणें.

लक्ष्मेश्वरच्या प्याद्याचीं घरें लक्ष्मेश्वर परगण्यांतून आहेत हा पुरता निश्चय. व लिंगोजी जाधव यास पुरती माहीतगारी व कांहीं जामीनसाखळी जाहली आणि तुमच्या विचारें ठेवावेसें झाल्यास प्यादें नोकरीस ठेवावे. म्हणून श्रीमंतांची आज्ञा.

—ऐ ले. सं. १२१७

जायजाद—१ जहागीर २ सैन्याच्या खर्चासाठीं लावून दिलेली जहागीर

१ सरकारी मुलुख आम्हांकडे चाळीसलक्षाचा बादशहाकडें चाळीस लक्षाचा व पातशाही सरदार याजकडें जायजाद साशष्ट लक्षांचा आहे.

—म. द. रु. ३ पृ. ६३.

२ नबाव नजवखान यांनी मिर्जा सफीखान यास मेरट वगैरे अकरा महाल जायजाद दिली होती.

—दि. म. रा. १ पृ, १०१

३ बारा पर्गंणे तुम्हांस जायदादी सरंजामात दिले आहेत.

—दि. म. रा. १ पृ. २१२

जायनाल-तरवारीच्या म्यानावर बसविलेली धातूची टोपणें इ. कारागिरी काम.

जारत, ज्यारत—पवित्रस्थानास भेट.

१ दर्गाहास जारत करून.

—दि. म. रा. १ पृ. ११८

२ पिराची ज्यारत करून.

—दि. म. रा. १ पृ. २४७

जारिस्त—चालू आहे.

जारी—१ चालू, २ सुरू, कसोशी, ३ जमा.

१ हमेशा खतकिताबतीचा सिद्ध सिल्सिला जारी असावा.

—खरे ७ ३५ पृ. ६४

२ निगादास्त जारी केली आहे.

३ त्याजकडे बोलणे चालणेही जारी आहे.

—राजवाडे ५ पृ. १८९

४ मुख्य फौज नित्य जारी किती होती तें लिहावें.

—ऐ. ले. सं. ५३८१

जारी भरणे—ज्वरीं भरणें, गर्वानें ताठणें.
जाठाची मामलेत होऊन स्नेह होवे यैसे जाठाचे मानस आहे. परंतु हे जारी भारले आहेत मामलेत करीत नाहीत.
—पे. द. भाग २९ पत्र नं. २५५

जाल—सामान.
ते मोर्चे सोडून गेले तेव्हां आपण एकटे राहिल्यावर दिवस उगवतां फिरंग्यास समजल्यावर आपणास वाचूं कशास देतील ? यास्तव मोर्चाचे जाल तेथील तेथें ठेवून तंबूर वगैरे कांहीं एक न वाजवितां, तोफा काहाडून तुम्हीं कुच करून जावें आम्ही कंपेश पांच हजार स्वार आहों. दिवस उगवल्यावर या शहरचीं माणसें बाहेर निग्रतील यांची तांव्यातांबोटी करून तुमचे मागोमाग येऊं. —हो. कै. पृ. १६४

जाल—आरोप, आळ.
चिरंजीवास तुम्ही वाकवच आहां. किती चाकरी करून जाल करितील ! तसेंच, तुमचे चिरंजीव तो सदचिलीच आहेत. मन मानेल तशी वर्तणूक करितात. —ऐ. ले. सं. १८५४

जालपाल—जाळपाळ, जाळ्या किंवा जाळ्यांचें पडदे.
पातशहाच्या स्त्रिया झरोकियांतून जाळपाळांतून राजा (शिवाजी) पाहतां बहुत थक्क जाहल्या. —सभासद पृ. ७२

जालंदाज—पाश टाकण्यांत कुशल; कपटी.

जालमी—जुलूम.
याप्रमाणें जालमी व जलालीची चाल अलफखानाची.
—राजवाडे ७ पृ. १५०

जालाशोर—जालसाज, विश्वासघातकी. जालशोर हें 'जालसाज' चें अपभ्रष्टरूप असावे.
आम्ही वजिरास पुसले कीं नासरजंग फर्मानाप्रमाणें अमलांत आणून फिरला तर उत्तमच आहे. कदाचित जालाशोर आहे मनांत स्फुंदत आला कीं चार मजल आणखीहो दबाऊन जावे. जावेच जावे, यैसे स्वमनी विचारून पुढे चालला, तर काये विचार ?
—पे. द. २५ पृ. ८९

जाली—A team or string of beasts to any drag.
१ सामान वाहणाऱ्या पशूंची माळ. २ बादशाही डेरे असतात तो लष्करी छावणीचा विभाग.
तोहमास कुलीखान इकडे यावयाच्या विचारांत आहेत. याचा मुलूक

दबावित येतो. सरंजाम सामान फार. पातशहाची जाली उभी राहते तैसा आहमिकिक उभा राहतो. पासस्ट हजार खाचरावर चालतो.
—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १९६

जालेजात—वंशज, वारस, संतति.
येणेप्रमाणें माड व जमीन तुम्हासी वृत्त करून जन्मंत भासे दिली असे. तुम्ही व तुमचे जातेन भोगवटा करणें आम्ही व आमचे जातेन पाळून देणे भास म्ह. वचन.
—के. सं· भट्ट दप्तर मालवण

जावर्दा आवर्दा—निर्यात आयातीचा माल.

जावली—जावळी, जुळी.
चि. सौ. रमाबाई प्रसूत व॥ ३ शुक्रवारी दीड प्रहर दिवसा जाली. जावली कन्या दोन जाली. —हो. इ. सा. खंड १२ पृ, ६५

जास्ती—शिक्षा.
ज्याचा गुन्हा होईल त्यास मराठीयाची तो इज्जत वाचणार नाहीं, मग रोजगार कैसा ? खलक समजों जास्ती (शिक्षा) केल्यावेगळं सोडणार नाहींत. —रा. खं. ८ पृ. २५

जासुदीजहाज—निघालकतीचें जहाज. निरोप किंवा पत्रें नेणारें आणणारें जहाज.
गोवीयासी जासुदीजहाज फिरंगी यांनीं व इंग्रेजानीं पाठविलें होतें तें आलें. —पे. द. ३४ पृ. १३८

जासुदपट्टी—सरकारी जासूदकामासाठीं होणाऱ्या खर्चाबद्दल गांवावर घालण्यांत येणारी पट्टी.

जासुसी—टेहळणी; बातमी काढणें.

जाह—मान.

जाहली—क्रोध; राग.
जाधव ते दिवशीं कूच करीनासा जाहला. म्हणन त्यास कूच करा म्हणोन जाहली करून त्याचें कूच करविलें. —ऐ. ले. सं. ३७२

जाहली किंवा जाहाली—मूर्खपणा.
१ खंडागले वगैरे फौजा पुढे रवाना केल्या आहेत. याचा त्याचा मुकाबला पांचा साता रोजा होणार. मोगलानी खासा नबाबानी फार जाहाली केली. —ऐ. सं. सा. खंड ६ पृष्ठ ४
२ इतक्यानें दाब सलाबत मोठी होती ते मल्हारराव यांचे ज्याहेलीमुळें हे खराबी. —राजवाडे ७ खलफ २७

जाहिरी--प्रसिद्धी, जहूर. प्रकटपणा.

१ एक-सखुनीपणाची नेकी व खुबी सर्व टोपीकरांत जाहिरीस येईल ते करणे वाजीव व लाजीम आहे. —राजवाडे १० पृ. २८०

२ पत्रें येतात; मग जाहिरीचें किंवा, खरें काय असेल ते असो —राजवाडे ५ पृ. १३३

३ जाहिरींत बहुत स्नेह दाखवून. —दि. म. रा. २ पृ. ९४

जाहीर व बाहिर—व्यक्त.

जाहीरणें—उघड होणें.

अथर्वण खोटा जाहीरला. —राजवाडे ८ पृ. ४३

जाहींरदारीं—बाह्य देखावा, बाह्य सलोखा, जाहिरी.

जाहीरदारीनें सफाई ठीक नाहीं, दिला पासून साफ व्हावें. —राजवाडे ५ पृ. १६७

सर्दाराशी आपसांत चित्तशुद्धता नाहीं जाहिर्दारी मात्र परस्परें आहे. —दि. म. रा. १ पृ. ३३८

जाळ—ताप; ज्वर.

ठकु आक्कास जाळ थोडथोडा येत आहे म्हणून डोली केली आहे. —ऐ. ले. सं. ३७७३

जाळी—खाशा मोगल बादशहाच्या तंबू राहुटयादिकांच्या सभोंवार, मैदान राखून, सभोवार कापडी त्या कुंपण घातलेलें असतें त्या सर्व खाशा तळाला जाळी म्हणतात;

जाळी—दिल्लीच्या बादशहांच्या तक्तापुढें जो सभोंवार कठडा उभारलेला असे त्यालाही जाळी म्हणत.

जिक, जिक्क—त्रस्त, हैराण.

आमचेंही माणूस जिक जिक जाहलें. —राजवाडे ६ पृ. ४९७

जिक्रीहुंडी--हुंडी स्वीकारली न गेल्यास धारकाला मिळालेलें एक प्रकारचें तारणच ही हुंडी होय. हुंडीचे पैसे ज्या ठिकाणीं मिळावयाचे असतात त्या ठिकाणीं राहणाऱ्या माणसाला ही चिठ्ठी लिहिलेली असते व हुंडी जर नाकारली तर ती हुंडी स्वतः स्वीकारण्यास त्या माणसास लिहिलेलें असतें. —सु. का. ८९

जिकर—जिकीर, प्रश्न, गोष्ट, वाद, कटकट, घासाघीस, हर्कत, तक्रार, आक्षेप, अडचण, वांधा, अडथळा.

१ विठ्ठल सुंदर हैदरजंग व निजाम अल्ली बोलत बसले. बोलतां बोलतां

हिशोब कितोबाचा (हिशेब कितेबाचा) जिकर निघाला बोलता बोलतां (जिकर) वाढली, —स. ब. पृ. २७

२ सालाबाद भोगवटा चालत आला असेल तेणेप्रमाणे चालविणे नवा जिकीर करूं न देणें. —ऐ. सं. सा. खंड ११ पृ. १

३ आम्ही सरकारआज्ञेप्रमाणें मसलत कबूल केली आहे. परंतु जिकिरी आहेत, त्या समक्ष सांगेन. —ऐ. ले. सं. ४३२७

४ सनद तीर्थरूपाचे नांवे होती व गांव तीर्थरुपाकडेसच सरकारांतून चालविला असें असता हल्ली आमचे बंधूचे चिरंजीव जिकर करतात. —ऐ. सं. सा. खंड ११ पृ. १८

५ लढाईचो गोष्ट लढाईंत राहिली त्याचा जिकीर आतां कशास पाहिजे. —राजवाडे ५ पृ. १२

६ हल्लीच्या समयी इंग्रजाचा जिकीर निघतो. —दि. म. रा. १ पृ. ९३

७ जिकीरीचीं उत्तरें (पा. ब. ३२) नैराश्याचीं भाषणें.

जिकीरखाना—अडगळ ठेवण्याची जागा (साने) —पेश. वख. सोहोनी पृ. ८५

जिग जिग—कटकट, किटकीट, त्रास.

जिगर—यकृत, हृदय.
तुम्हा बराबर आम्हीं आपला जिगरच दिला आहे. —राजवाडे ६ पृ. ३८२

जिगर जाटले—(?)
ते समई जितके चाकरीचे मार्ग आहेत तितके त्यापासून लिहून घेऊन पातशाहाजवळ सिफारस केली. पातशहा व नवाब कुतसिया याणी आज्ञा केली जे तुमच्या मवकलास सर्वश्वें पातशाहाजाद्यानी स्थलें देऊन आपण जिगरजाटले याचे कारण जे. —हिंगणें द. भाग २ पृ. २४

जित्रब, जितरब—घोडीं वगैरे जनावरें.
१ भानूंच्या घरांत सर्व जित्रब होतें, तें घाटगे यांणीं आणिलें. आंबेगांवासहि जप्ती गेली. —ऐ. ले. सं. ५३८५

२ संताजी जाधवाकडील पागेचीं घोडीं आजपर्यंत चाळीस मेली या दोही दिवसांत आम्हा हुजूर तीन घोडे थोर मेले. जित्रब बुडाले आता आपणच राहून काये करावे यैसे ते म्हणतात. —पे. द. ३३ पृ. २८३

३ माल मुबलक सांपडला. सिवाये मवेसी तीन लाख रुपयाची जितरब हातास लागला. —E. M. P. पृ. १०८

जिता रोटी मेलिया सद्गति—जिवंत असेपर्यंत पोटास देणें व मेल्यानंतर उत्तरकार्य संपादणें.

मग विनायकभटीं आपल्या गोत्रजाच्या बाईका म्हणऊन त्याचे समाधान करून, तुम्हास जिता रोटी मेलिया तुमची सत्‌गती करून यैसे बोलोन त्यास अन्नवस्त्र देऊन त्यास पोसिले.

—शि. च. सा. खं. २ पृ. १४५

जित रोटी मेलीया माती—जिवंतपणीं अन्न न मेल्यावर मूठमाती.

राघोजी पाटील याचा प्रतिपाळ केला जीता रोटी मेलीया माती दिली म्हणून गोतनाईकी रतनोजी याचे वंशपरंपरेस तक्षिम दिल्ही.

—शि. च. सा. खं. ५ पृ. २३५

जितून उभे राहणें—जिद्द खाऊन, पाय रोऊन, इर्षेने उभे राहणें.

अजि तीनी वरुषे चंदाचे फंदामध्यें (चंदासाहेबाचे) जितून उभा राहिला.

—ऐ. सं. सा. खंड ६ पृष्ठ २४

जिद—जिद्द, वैर, राग, खटखट.

१ आम्हांसी जिद करावयास त्यास कारण काय ? ऐसें आपण म्हणतील

—पे. द. २८ पृ. २९४

२ बदरी जमालखान आम्ही बरोबर पागे देऊन आणविले. ते गोटानजीक आले असतां, पुढें एक कोसावर रहावयास जाऊं म्हणोन आग्रह करूं लागले. चिरंजिवांनीं जाऊं दिले नाहींत सबब जिदीस येऊन बसले.

—ऐं. ले. सं. ४४६६

जिदन्यायें—ज्या रीतीनें.

वाणकोटी भांडी आहेत त्यांपैकीं ५–७ भांडीं गोवलकोटास घेऊन जाणें. ईदन्याये वरचेवर पत्र येतात. जिदन्यायें पत्रें राजश्री स्वामीची येतात तदन्यायेच तात्याचींहि पत्रें येतात.

—पे. द. ३६ पृ. १५१

जिदर—तट, तटबंदी.

जिदाल—लढाई.

जिदीस गोष्ट पडणें—हट्टास पेटणें.

दुर्गकर अद्यापि शर्तीनें लढत आहेत. आजपर्यंत बाहेरील माणूस पांचसात हजार जायां जखमी जालें. जिदीस गोष्ट पडली आहे. कोण थरास जाते पहावें !

—ऐ. ले. सं. ३०१७

जिन्द—१ जिद्द २ मुसलमानाचे भूत.

(१) जिन्द वाढविल्यास कामास येणार नाहीं.

—पा. ब. १८

(२) खजिन्याचे विहीरीत जिंद होता म्हणून मुसरीन मुलक यास इजा व्हावी याजकरितां फडणीस याणी त्यास त्वा विहीरीत (म्ह. खजिन्याच्या बागेत) नजरबंद ठेवला. —म. द. रु, १ पृ. १४१

जिंदगानी—साहित्याची तरतूद, जमवाजमव; निर्वाह.
आम्ही वैरणकडबा विकत घेतों. डोंगरचें गवतहि आणवितों. बहुत तजविजेनें जिंदगानी करीत आहोंत. —ऐ. ले. सं. ३५७९.

जिन्दगी—सामर्थ्य.

जिंदान—तुरुंग.

जिंदानबान—तुरुंगाचा दरोगा. जेलर.

जिन्नतमकान—स्वर्गवासी; पैगंबरवासी.
जिन्नतमकान निजाम अल्लीखान हे लढाईचे इराद्यानें फौजसुद्धां चालून आले होते. —ऐ. ले. सं. ७३४२

जिन्नस—जात, प्रकार, वस्तू, चीज.
(एक जिन्सी—एकाच जातीची)
(हरजिनसी—विविध जातीची)

जिन्नस अज्नास—माल, अस्बाब.
सर्व जिन्नस अज्नास जरजवाहेर ब्रिजलाल नागपुरास घेऊन जाऊन —राजवाडे ७ खलप १।३

मशारनिल्हे या जिन्नस अज्नाशीच्या तलाशांत आहे. —ऐ. टि. ३ पृ. ६५

जिन्नसवार—विविध प्रकारची.
१ पिलाजी जाधव याणी पुण्याचे मुक्कामी येऊन विनंति केली की भीमातीरी बागबागाईत करावे आंबे वगैरे जिन्नसवार झाडझाडोरा लाऊन रम्य स्थान करावे महानदी आहे तडीताबडी (तडीतापडी) व मार्गस्थ यास छाया उपयोगास येईल याजकरितां मौजे मरकल येथे ३० बिघे जमीन देवावी. —पे. द.
२ श्रीमंतांस तशींच जिन्ननवार फुलें, केवड्याचीं कणसें वगैरे भाजीबरोबर डांकचौक्या ठेऊन ताजा जिन्नस येऊन पावे, याप्रमाणें तरतूज करून पाठविणें. —ऐ. ले. सं. १७४४
३ नारो शंकराच्या नजरेच्या ऐवजांत पक्कें १॥। मण सोनें आलें. त्यापैकीं चौरंग १ कमल १ संपुष्ट १ येणेंप्रमाणें ४०० तोळे वजन आहे पुतळीचें सोनें. घडाई नाहीं ! समया, तवकें, ताम्हनें, कोणी कोणी घेतलीं पैका असल्यास जिन्नसवार दागिना घ्यावयास येतो. —ऐ. ले. सं. २४४

जिन्पोष—गाशा, जिनावरघालावयाचें वस्त्र.

जिनसाज--जिनगर, खोगिरें शिवणारा.

जिनहार—विल्कूल, हर्गिज.

करारास जिनहार कसूर येणार नाहीं.

—साने प. या. पृ. ४८४

जिनगर—(१) चित्रें बाहुल्या इत्यादि तयार करणारी जात (२) खोगीर लगाम इ. कातडी सामान तयार करणारी जात.

चार आणे गणपती, सरकारचे वाड्यांतील आणिला त्याची सोंड जाया जाली सबब दुसरा आणला त्याजबद्दल देणें जिनगर.

--पे. सा. पृ. ७

जिनगानी—सांठा.

येथें कोणाचा ऐवज आहे तो मोबदला करितां नये. ठेवीदाखल आहे. पुढें आम्हांस जिनगानी केली पाहिजे. ऐवज न आला तरी मग निभाव बोलल्याप्रमाणें होणार नाहीं. हुंडी फिरवितां नये. यास्तव सेवेशीं सूचना लिहिली आहे. —ऐ. ले. सं. १३७०

जिनगी, जिन्दगी, जिनगानी, जिन्दगानी—जीवित, जन्म, आयुष्य, संसार निर्वाह, मिळकत,इस्टेट.

पादशाहाची घर जिनगानी (खासगी मत्ता) समग्र लुटून

—खरे ८ पृ. ४२२४

उपरी कोणत्या सुखे जिन्दगानी करावी.

--खरे १ पृ. १७८

बहुत तज्विजीनें जिन्दगानी करीत आहो.

—खरे ७ पृ. ३५७९

जिन जित्रब—जिन म्ह. घोड्यांचें जिन खोगीर व जित्रब म्ह. घोडे किंवा जनावर.

जर करितां करवीरकरांकडे गेले असा पत्ता लागला, तरी राजश्री बाबाजीपंत दिम्मत पागा यांनीं ज्यांची ज्यांची जिनजित्रबाचीं यादी लिहून घेऊन गेले आहेत त्या यादीप्रमाणें जिनजित्रब व मुलें माणसें देखील आणून सरकारांत हजर करून देऊं.

—ऐ. ले. सं. ३११२

जिनस--प्रकार.

हरीपंत तात्यांस शिद्यांनीं दोनचार जिनसांचें पोषाख दिले.

--ऐ. ले. सं. ४७६३

जिनसाना—तोफा.

वार्ता आहे की नबावाकडील तोफा चार मात्र देणें आहेत. व हैदराबादेस आपणाकडील जिनसाना आहे. तो घ्यावयाकरितां ईदग्यासमीप जाऊन रहावें. —पे. द. २८ पृ. १७२

जिनसाना—विविध जिन्नस, जिनसांचे प्रकार, तऱ्हेतऱ्हेचे, अस्बाब, जकिरामाल.

प्रस्तुत वाडीकर सावंतानी जिनसाना सकलाद मखमल वगैरे हुजूर सेवीसी रवाना केले आहे. —पे. द. ३४ पृ. ७२

२ संध्याकाळीं शुक्रवार तळ्यांत अतशबाजी चांदणी वंगला व राक्षस व फिरंगी व घोडी व सांडणी वगैरे जिनजिन्नसचे सोडून मग प्रहर रात्रीं हवेलीस आले. --नाग, पृ. १३८

३ खंडोजी कदम व हुजरे यांबरोबर फुलझाडे जिनसान पाठविला आहे महाराजास रुजूं करावा. —वै. ४ स. १७४६ पृ. ४

४ तेथें सर्कारचा जिन्साना आहे त्याची मोजदाद त्यास देऊन पावती घेणें —राजवाडे १२ पृ. १३९

जवाहीर सिरोपाव वगैरे जिनसाना पाठविला.

—जो. रा. ८

जिनसी तोफखाना—हलका तोफखाना.

जिनसी पुलानी--तोफखाना.

हैदरअलीची जिनसीपुलानी कूचाकरिता मागे राहिली होती यामुळें हैदराचे लोक फार जाया झाले. —पुणें अख. भाग १ पृ. २५०

जिनसी सामान—तोफखान्याकडचें सामान.

नबाबाकडील कांहीं जिनसीसामान व तोफा व गाडद येथून आठ कोसांवर आले, म्हणून वर्तमान आहे. --ऐ. ले. सं. ४१२७

जिनसी—हलका तोफखाना.

नवाब त्या लढाईस श्रीमंत सामील होतात कीं हे गेल्यापूर्वीच जूज उरकते हे कसे होते हे पहातात. आणि नवी जिनसी तयार करवितात.

—पे. द. २५ पृ. ८५

जिभी—१ किल्ल्याच्या मुख्य दरवाजावरची भिंत. (हा अर्थ कै. खरेशास्त्री यांनीं दिला आहे तो चूक वाटतो) २ किल्ल्याच्या मुख्य दरवाजापुढें बांधलेला बुरूज किंवा चौबुरजी. या ठिकाणीं चौकीदाखल सैन्य असे. ‘जीभिर्हस्तिनखाख्या’--रा. व्य. को.

किल्ल्यांतील लोकांनीं सांगून पाठविलें जे तुमचे किल्ल्यानजीक येण्याचें कारण नाहीं, तेव्हां जबरदस्तीनें किल्ल्यांत जावे म्हणोन इंग्रज

किल्ल्याचे जिभीजवळ गेले तेव्हां किल्ल्यातील अरबांनीं गोळ्या घालून आठदहा असामी ठार केले, त्यावरून बसलीसाहेब यांचा राग नगरच्या किल्ल्यावर बहुत आहे.

—ऐ. ले. सं. पृ. ७७८३

२ बंकापुरास तोफा ५ सजावून बाहेर जिभीजवळ ठेविले आहेत.

—ऐ.ले. सं.२७५१

३ शिराळच्याच्या ठाण्यावर हल्ला करून लोक जिभीपावेतों गेले, तेव्हां ठाण्यांतील लोकांनीं बाहेर येऊन पिटून माघारें घालविलें.

—ऐ. ले. सं. ५७९८

४ बेंगरूळ घेणें तर तोफा पूर्वेचे दरवाजेस पेठेंत नेऊन जिभीवर मार करावा दक्षिणेकडे पाणदरवाजा आहे तेथेहि पांच तोफा लावाव्यात. दोन्ही जिभ्यांवर मार केल्यानें कोणी माणूस जिभींत ठरणार नाहीं.

—पे. द. २८ पृ. २८५

५ किल्ले यास दोन द्वारें असेत. येक दक्षण अलंगेचें. त्यापुढें जिभी चौबुरजी मातबर असे.

—हो. कै. पृ. २२६

६ रघोजी भोसल्याचा मोर्चा चौखडी लागला व देवराव याचा जिभीस लागला.

—पे. द. ११ पृ. ४१

जिम्मेदार—जबाबदार.

जिम्मेदारी—हमी, जबाबदारी.

जिमती—हमीदार.

माझे नांवें पत्र जिमती खातर्जमेचें पाठवावे की माळव्यांतील महालास पुढें उपद्रव लागणार नाहीं.

—म. द. बा. २ पृ. ३३

जिमे—हवाला, ताबीन.

ऐसियासी आपण तुम्हास ग्रामदान वाडगीपाडा जले परगणे पेठ तो गाव दरोबस्त मोकासा कुलबाब कुलकानूजमे वगरे वेठ बिगारसुद्धा तुमचे जिमे केला असे.

—पे. द. ३१ पृ. १४०

जिमेनीस; जम्नीस—आवक होणाऱ्या वस्तूंवर व उत्पन्नावर देखरेख ठेवणारा अधिकारी.

जिमेनीस यांणीं पोते, जामदारखाना कोठी बाजार वगैरे पैदास्ती कमावीस जमा याजवर दखलगिरी करावी.

—वाड सनदा १२६

जियारत (जारत पाहा)—प्रार्थना.

निजामुद्दौला शाह मुसाफर याचे दर्गात जाऊन जियारत (प्रार्थना) केली.

—राजवाडे १ पृ. १८३

जिराईत. जिरायत; जिरात--
लागवड (धान्याची पावसाच्या पाण्यावर होणारी).
जिरातखाना—शस्त्रागार.
(पाहा वाडबावा २ पृ. ४२)
जिरातखान्याच्या सदरांत शस्त्रांची नामावळी आहे.
—रा. व्य. को.
जिराह—कवच, चिलखत.
जिरीम--हलका, हलक्या किंमतीचा.
आंगठी थोरली तावदानी तिचे आंगीं दोष जिरीम व रंग किंमत रुपये चार हजार पसंत पडल्यास रुपये साडेचारहजार द्यावे रति अजमासे दहा चारहजार आंगठी बिलपाणी निर्मळ किंमत रुपये.
—पे. सा. पृ. १५७

जिरे (न) जिरी (स्त्री)--सांखळीचें चिलखत.
जरीचे झगियाचे अंतर्भागी नर्वरी बारीक कडियाची लोखंडी जिरे.
--चित्रगुप्त ११२

जिरेगार, जिरेड्गार--चिल्खत तयार करणारा.
जिरेटोप—शिरस्त्राण.
जिल्काद—अरबी वर्षाचा अकरावा महिना.
जिल्ल—छाया.
जिल्हे—उजळा, उज्ज्वलता.
नवाब बहाद्र देवब्राह्मणांची मर्यादा फार करितात म्हणूनच दिवसे दिवस दौलतीस जिल्हे व रवनक (भपका, शोभा) आहे,
—इ. सं. ऐ. टि.

जिल्हेज—अरबी वर्षाचा बारावा महिना.
जिलअह—जिल्हा.
जिलब—मूळ अर्थ परिवार; परंतु लक्षणेनें बंदीखाना; कैद.
मल्हारराव सुमंत म्हणून कोणी आहे त्याजवर ममताहि होती. परंतु त्याचे कागदपत्र फितुराचे सांपडले, सबब, आतां पायउतारा महंमद इसफ याचे जिलबींत आहे.
—ऐ. ले- सं. २१३२
जिलब-जिलीब—परिवार, स्वारी.
हे लोक अलंग नौबत चाकरीचे बिलकुल उपयोगी नाहींत गडी हुडियावर ठेवावे अगर जिलबेत बाळगावे तरी यास हुजूर नेऊन मुबदला लोक पाठवावेत.
—पे. द. ३३ पृ. २३९
जिलबीचे माणूस—परिवारांतील माणूस.
अलिजाबहाद्दर यांचे जिलबीचे माणसावर ब्राह्मण मारला हा आरोप

आला, त्याजमुळें सात असामींचा शिरच्छेद जाहला.

—ऐ. ले. सं. ५३५१

जिलदी, जिलबी तोफखाना—नेहमीच्या स्वारीच्या परिवारांत बाळगिता येण्यासारख्या तोफा.

जिलागर—पॉलीश करणारा.

जिलीब—शृंगारून शोभेसाठीं मिरवणुकींत चालविलेला घोडा. स्वारी मिरवणूक, लवाजमा.

जिलिबी—हलका तोफखाना किंवा हलक्या तोफा.

सतरा तोफा व जिलिबी व गंजीफाच्या गाड्या पांच शिवाय जंबूर व बाण लोकाकडे फार आली. —ऐ. सं. सा. खं. ३ पृ. २१८

जिलेबींच्या तोफा—परिवारांत बरोबर सहज वागवितां येतील अशा हलक्या तोफा.

राजश्री हरीपंत तात्याहीं खोपोलीहून इंग्रज निघतांच खालीं सडे फौजेनिशीं जिलेबीच्या तोफा घेऊन उतरून खालापूरचे मुक्कामींच तोफा इंग्रजांच्या पिछाडीस लाविल्या. इंग्रज काईल जाला.

—ऐ. ले. सं. ३६१८

जिलेवन्त—शोभीवंत.

तक्तराव जिलेवंत नाचती सभांगना आनंदांत.

—प्रभाकर ४१

जिलौखाना—समारंभाचें स्थान.

दर्बारदालन (राजवाडे ५ पृ. ३६)

नबावानी हवेलीचे जलौखान्यापुढें एक तोफ ठेविली.

—राजवाडे ५ पृ. १२०

जिलोह—लवाजमा, थाट, समारंभ.

त्यास छत्राची व जिलोहाची तयारी जलदीनें करून पाठवावी.

—दि. म. रा. २ पृ. १५०

(बहुत) जिलोहानें—मोठ्या इतमामानें. —दि. म. रा.

जिव्हाळ्याचें राजकारण—नाजूक, अति महत्वाचें राजकारण.

ऐवजखानाकडूनहि राजकारण बहुत जिव्हाळियाचे आले आहे ते कागदीं लिहिता येत नाहीं. —मरा. कु. इ. भा. १ पृ. ८२

जिव्हाळा—झरा, विपुलता.

वाणगंगेस डोहो दोन्ही आहेती जाणोरीच्या बांधा यास पान्याचा जिव्हाला दिसतो. यैसेयास जानोरकराची हरकती नाहक दिसते.

—ऐ. सं. सा. खं १ पृ. ११३

जिवट—वळकट.

विसालाखाचा मुलुख त्याचा खाली होणे मातब्बर किले ठाणीं जिवट जागे त्याजकडेच आहे. ते हातीं लागल्याखेरीज हे जाहले तर आपले उपयोगी किती ? —पे. द. २८ पृ. २३५

जिवाचा निधडा करणें—जिवाचा धडा करणें, जिवावर उदार होणें.

इब्राहिमखान गारदी याजवर लूट (?) पडली तेव्हां त्याणें जिवाचा निधडा करून शिपाइगिरी म्हणावी तैशी केली, ज्याचें नांव शिपाइगिरी! —भा. कै. पृ. २४

जिवाचे उदार—मरण्यास तयार.

रंग पाहतां समागमें तीन हजार फौज दोन हजार गाडदी एकूण सारे एकदिल मरणोन्मुख, जिवाचे उदार, असे आहेत.

—ऐ. ले. सं. २१६०

जिवावर आंगेजणी करणें—जिवावर उदार होऊन कार्यभाग अंगीकारणें.

लढाई होईलसी दिसती ते बहूत हे थोडे परंतु हे जिवावर अंगेजणी करितील श्री यश कोन्हास देईल पहावे. —पे. द. ३० पृ. २०६

जिवास पाणी घालणें—जिवावर उदार होणें.

अवघे लोक पळाले, ऐसा प्रसंग लोकांचा या भरोसियावर रहावे तरी आपल्या जीवास पाणी घालोन रहावें लागते.

—पे. द. ३० पृ. ७०

जिहलम्, झिलम्—चिलखताचा एक प्रकार.

जीगा—(m) An ornament for the head (of males)

पुरुषांनीं पागोटयांत घालावयाचा अलंकार,

वकील मुतलख व अमीरउल् उमरावची खिलत चारकुवा व जीगा व शिरपेंच व परिंदा कलगीमय लटक व माला मकरवारी व कलमदान ढाल तलवार मोर्चेल नालकी पालखी शिवकेकटचार माही मरातब तमनतोग हत्ती घोडासुद्धां बहुत आदरें श्रीमंतांनीं घेतलीं.

—ऐ. ले. सं. ४६२३

जीत—जय.

अवसानसिंगाचा मोड जाहला. चेतसिंगाची जीत जहाली.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १३९

जीत होणें—बोलाचाली, जिद्द.

एके दिवशीं भवानी काळो व चिमणा बापूशी काही एक बोलता जीत झाली. तेव्हा पंत मजकुरानी चातुर्यगोष्टीकडोन उभयतांचे मनोधर्म रक्षून खुष केले. —द. स. कै. या. पृ. ११४

जीद, जिद्द—हट्ट, निकड.
आम्हा उभयतास गडावर घालावे तेव्हां आप्पास तेजी येईल या आक्षेपावर राजे व व्यंकटराव मिळून करंडे याजकरवी जीद धरविली.
—पे. द. २० पृ. १०१

जीन—लक्षणेनें घोडा किंवा घोडेस्वार.
गांवकरी यांनीं गोळ्या चालविल्या. दहा पांच माणूस जखमी झालें. दहावीस जीन राहिले ते उठोन दोन कोसांवरी राहिले.
—ऐ. ले. सं. ५२२

जीनबदस्तूर— (?)
जीनबदस्तूर हल्लीं इंग्रजांचो आग व मार साहवेना. शेवटीं निघोन गेला. खुलास जातीची मजबुती नाहीं. खालें मैदान पाहून शेर. वक्तावर बिली.
—ऐ. ले. सं. ४३५६

जीनबन्द—खोगीर वगैरे कसून तयार.
जीनबन्दी—खोगिरे चढवून तयारी, मुस्तेदी,
शिंद्याच्या लष्करांत आवई पडली, त्याजवरून तेथें दोन प्रहरचि जिनबंदी जाहली.
—खरे ७ पृ. ३४९८
स्वारी पंचगंगेच्या पाण्यावर जीनबंदीनिशी राहिली.
—खरे ९ पृ. ४६७०

जीमन—अर्जदाराचें मागणें वगैरे जो तपशील सनदेच्या मागे लिहिलेला असतो तो.
हा गांव नारायणभट जुनारदार यांस जीमनमध्यें लिहिल्याप्रमाणें इनाम मुकार जाला आहे.
—ना. दी. पा. पृ. ७६

जील—खालील.
जील सुभानी—पादशहाची पदवी.
हज्रत जीलसुभानी याणी आज्ञा केली जे.
—राजवाडे ६ पृ. ६२७

जीव गेला, धाशत वारली—मेले कोंबडें सुरीला भीत नाहीं या अर्थी जुनी म्हण. जिवासाठीं धास्ती बाळगावयाची पण जीवच गेल्यावर धास्ती कशाची ?
जीव गेला, धाशत वारली, यांहीं आतां आमचें काय करावें ?
—रा. खं. ३ पृ. ९१

जीवजीनजितरुब—सर्वस्व.
खान दिदीलखान याचें ताहवेलीकरतां जीवजीनजितरुब तमाम टाकून येकयेक चीता देणें जन पागडी सभेंत जीव घेऊन बाहेर पडलो. जिन-

जितरुब तमाम भत्ता लुटून फना होऊन गेलें.
—शि. च. सा. खं. २ पृ. ३६५

जीव नाकास येणें—नकीं नव येणें, नाकीं नळ येणें, दमछाक होणें, होष उडून जाणें.
—हो. कै. पृ. १६७

अवतरणासाठीं संधान शब्द पाहा.

जीवमर्दी—जवामर्दी.

पानशानें मोठी नादानी केली. तोफा सोडून पळाले. सरकारच्या २ तोफां-पैकीं १ जीवमर्दीकरून काढिली. दुसरीचें तक्त मोडलें म्हणोन गेली.
—ऐ. ले. सं. ६९६७

जीवरखी—गाभारा, गर्भागार, गाभाऱ्यांतील देवाचा देव्हारा.

कसबे तळे येथें हरिहरेश्वराचें देवालय आहे. त्याचें जोतें व जीवरखी प्राचीन, याचें काम कसबे मजकूरच्या ब्राह्मण कुलकर्ण्यानें केलें.
—ऐ. सं. सा. खंड १० पृ. १

जींववा हात—जेवणाचा हात (उजवा)

भवानी काळो महंमदखान तरीन मृत्यु पावला त्याचे घरासं समाधानास गेले होते ते परतोन येते समयी घोडीहून पडले त्याचा जीववा हात दुखून जरबेत आला आहे.
—नाग २ पृ. २०३

जीवाभ्य—१ जिवापासून २ जीव आहे तोंपर्यंत.

आम्ही पुरातन सेवक एकनिष्ठतेने सेवा करीत आहों. पुढेही जीवाभ्य सेवा करावयास अंतर करणार नाही.
—इ. सं. पे. द. स. प. मा. पृ. १८

जीवे प्राणें उभे राहणें—जीवावर उदार होणें.

जाधव, करोलीकर, व नवलराम बीजेपूर याणीं बहुतप्रकारें खासा अंगे बरखंदाज घेऊन येऊन त्याचा रेच मोडला. हें जीवेंप्राणें उभे राहिलें तेव्हां त्याणीं अमल दिल्हा व तह केला.
—पे. द. १५ पृ. ६२

जुग किंवा जुंग (जंक)—गलबताचा एक प्रकार.

१ चित्रगुप्त बखर २ म. आ. पा. पृ. २१

जुजका—जुजबी, किरकोळ, क्षुल्लक.

दोस्तीचा लौकिक अटक रामेश्वरा पावेतों जाला त्यांत जुजका कामावर नजर ठेवणें हें खानदानांस व उमेदपणांस लाजम नाहीं.
—म. शि. यां. का पृ. १६६

जुजगल—जुजबी.

हशमलोक निवडून संपूर्ण इकडून नेले. जुजगल कोन्ही राहिले.
—पे. द. १६ पृ. २८

जुजदान--कागदपत्रें ठेवण्याची पिशवी किंवा बटवा.
१ स्वामींनीं वडिलांस पत्रें पाठविलीं तीं जुजदानांत होतीं. तें जुजदानच सांपडलें आहे. —ऐ. ले. सं ५०६८
२ आरमारावर पन्नास हजार रुपये तजकरा शाबूत जाहला. लक्ष्मण कोन्हेर याचें सामान जप्त करून आणिलें. जुजदान देखील आणिलें, त्यांत दरबारखर्चाची यादी निघाली. —ऐ. ले. सं. १०७१

जुज्रसी, जुजरसी—बारीक चौकशी.
१ शहराचे दरवाजे तीनचार खुले तेथें गाडदी ठेवून येणाजाणाऱ्याची जुज्रसी बहुत आहे. —राजवाडे ५ पृ. ९९
२ परंतु जजरसी करणें तरी विना दुसऱ्या अमलदाराखेरीज होणार नाहीं. --पे. द.

३ जुजरसी करून खेडियांसीं मजरा द्यावी लागल.
--पे. द. भाग २० पत्र नं. २२४

जुज्वियात—किरकोळ गोष्टी, तप्शील.
आम्हाकडील जुज्वियातचे फडचे करून द्यावें.
--राजवाडे ५ पृ. ११

जुजबी, जुज्बी—साधारण, किरकोळ, क्षुद्र.
यासि जुज्वि पीक आलें. —राजवाडे १८ पृ. ३१

जुटेदार—एकावर एक कौलें रचतात त्याप्रमाणें कापड चुणून शिलाई केलेली.
आमचे भावजाई आहे. त्यास आम्ही येथून पातल व चोली सोनेरी जुटेदार पाठविली आहे. --म. द. रु. ३ पृ. ५७

जुती—जुडगा.
हत्तीवर जोडल्या हातनाळा ।
उंटावर जोडिले जंबूर ।
बाणाच्या सवे जुत्या ।
राजा मिर्झा मोहोरं झाला । —ऐ. पो. के. खं. २ पृ. २९

जूतें--पायतण, जोडा.
गावगन्ना चांभाराकडींल जूतें दरसाल एक येणेप्रमाणे हक्क करून दिल्हा असे. —वै. ४ स. १७४२ पृ. १

जुदतर—द्रुततर, चपल. --रा. व्य को.

जुदाई, जुदागी--वेगळीक, निराळेपणा, अंतर.
पण्डित प्रधान व नबाब निजाम यांचा तरीका (सलूक, वर्तनक्रम)

एक्लासीचा कदीमापासोन चालत आला हर्बावे त्यासी जुदागी नाहीं.
—राजवाडे १० पृ. १६५

जुनथर--एक जुनें चलन, चलनी नाणें. (?)
जालनापूरचीं ओझीं ३ पावलीं म्हणून लिहिलें तें कळलें. पेचाचीं ओझीं रवाना झालीं आहेत. येऊन पावतील. रुपया परत फार होईल. पुण्यांतील पारख कठीण. मिरजेची पारख चांगली नाहीं. जुनथर अर्धवट पाहिलें म्हणजे नाईकांनीं घ्यावें.
—ऐ. ले. सं. १९१२

जुनारदार--ब्राह्मण.
शाहूराजे यांचे वकील आनंदराव यांचे अर्जावरून नारायण भट जुनारदार यास जमिनात लिहिल्याप्रमाणें इनाम मुकर केले आहे.
—ना. दी. पा. पृ. ६५

जुने हुकेरी—होनाचा एक प्रकार.
—ऐ. ले. सं. ५६२७

जुप्त जुत्पत्ती—रणशूर योद्धा शूर वीर 'तो अंगद दक्षणेप्रती । सवें देवोनी जुत्पत्ती । रामे धाडिलें सीता शुध्यर्थी' त्यावरून जुप्त म्ह. शौर्य, ईर, इर्षा.
येथें सरलष्कर आहेत ते वहमा बाळगतात. तें इरे आम्हास आहे. तरी सर्व लोकास सांगणें कीं निंबाळकराची इरे व जुप्त मोगलाचें शरम तुम्हा लोकावरी आहे. समये राखोन राहाणें.
--पे. द. १० पृ. ४४

जुब्दतुल एक्रान—समवयस्कांत स्नेह्यांत श्रेष्ठ.
—राजवाडे १५ पृ. ११२
,, ,, पृ. २१७

जुबा—सर्वांत वर घालण्याचा पायघोळ झगा.
जुबा मोठ्या पट्टीचे मश्रूचा.
—ऐ. टि. ३ पृ. ५०

जुंबीश—जुमस, माघार, पराभव, धक्का.
तेव्हां टिपूनें चेनापट्टणाचें तोंडावर फौज ठेवून जुंबीश न खाय असा बंदोबस्त करून जबरदस्तीनें किल्ला घेतला.
—म. शि. यां. का. पृ. २८७

जुम्मह—शुक्रवार.

जुम्लह—संघ.

जुम्ला—(१) सवाशें बार्गीर अथवा शंभर दौडशे पायचे लोक यांची तुकडी;
(२) समाइकी एकंदर जमीन.
—राजवाडे १० पृ. २५०
रुइखेड तो जुम्ल्यांत.
नाकिर्दी असेल जुम्ल्यापैकी । ते कीर्दी करावी निकी
इस्तावेनि चढेल कौतुकी । जमा धरणें.
—मेस्तक-पुस्तक लेखकाधिकार ११५

जुम्लेदार—जुम्ल्यावरील अधिकारी.

जुपरात—गुरुवार.

जूंमस—भीति, जरब.

१ ये तोफेने आमुची गलबते जुमस खात नाहींत.
—पे. द. १६ पृ. १०५

२ एकूण त्याणें आपला बंदोबस्त चांगला केला आहे. कोठें जुमस खावयाचें नाहीं.
—ऐ. ले. सं. ८४०

जुमस खाणें—भीति खाणें; कच खाणें; दहशत घेणें.

एकदोन वेळां यांणीं उपराळयानें जाऊन गोळी वाजविली, परंतु ते जुमस खात नाहींत.
—ऐ. ले. सं. ३३८६

जुमाधर—लूट.

घाटाखालीं फौजा उतरल्या. येणें करून कोकणपट्टीची जुमाधर लुटारी यांनीं केली. कांहीं बाकी राहात नाहींत.
—ऐ. ले. सं. २६९५

जुमामर्दी—जवामर्दी.

कोणाचा भरंवसा धरूं नये. याउपरी जितकी जुमामर्दी होऊन बळ धरून दाब बसेल तितकें उभयतांस सुटकेचें घडेल.
—ऐ. ले. सं. ६३८८

जुमा मर्दुमी—पराक्रम; मर्दुमकी.

गोखले यांजकडील पांच असामी ठार व वीसपंचवीस जखमी जाले. जुमामर्दुमी चांगली आहे.
—ऐ. ले. सं. ६३५२

जुर्माना—धनदंड, दंड.

जुरत, जुरात—प्राज्ञा; हिय्या, जोर, हिंमत, धैर्य, बिशाद, शौर्य.

१ त्याणी गोपालरायाच्या अमलास नवदिगर करावे असी यांची जुरात काये ?
—पुरं. द. भाग १ पृष्ठ २२४

२ खान मजकुराचे लोक तलाव्यास जात आहेत परंतु जुरअत करून इंग्रेजाचे चौकीवर जात नाहींत.
—पुणें अख. भाग २ पृ. १४

३ जाऊं नका असें म्हणण्याची जुरत कोणाची नाहीं.
—ऐ. ले. सं. १९४१

४ पंतांचें बोलणें आपली फौज व ही फौज एक जागां आहों, तेपक्षीं गोखले यांणीं येण्याची जुरत काय आहे ?
—ऐ. ले. सं. ८२२०

५ हैदरअली करनल कूटाचे मुकाबिल आहे पण इंग्रेजाची जुरत लढाईची होत नाहीं.
—पुणें अख. भाग २ पृ. १०१

६ मुंबईवाले याची काय जुरत की कलकत्तेकर ठरावतील त्यास तफावत करतील. —खरे ७ पृ. ३५७९

७ बिदनूर जुरतीनें घेऊन इंग्रज हत्यारें ठेवून कौल घेऊन बाहेर निघाले ते कैद केले. —साने प. या. व २२४

८ काय जुरत यमाच्या बाला । पुढं शिरल ?

—राम जोशी १०५

जुरत मेहनत—धैर्याची कोशीस.

पूर्वीपासोन जो कोणी जुरत मेहनत करीत आला आहे त्यास मुलखास व खजान्यास व फौजेस कमी नाहीं. —दि. म. रा. भाग १ पृ. ३४

जुरती जुरतवार—धैर्यवान, शूर.

जुरा—ससाणा, बहिरी ससाणा.

१ अमरसिंग बुंधेले याणी बाज व जुरे व कुतरीयाची जोडी राजेश्री स्वामीकडे रवाना केली होती. —पे. द. ८ पृ. १९

३ बाज व जुरे. —पे. रो. स. मा. भाग १ पृ. ११८

जरूर—आवश्यक.

जुरुरत—आवश्यकता.

जुल्फकारी, झुल्फकारी—हैद्राबादेस चालणारे रुप्याचें नाणें. त्यावर महंमदाच्या किंवा झु-अल्-फकर अलीच्या तरवारीचे चिन्ह काढलेले असे.

जुल्कद्र—प्रतिष्ठावंत.

जुल्कद्र कृष्णराव नारायण. —राजवाडे खं. १९ पृ. १०५

जुलाई, जुल्हाई—कोष्टी, विणकर.

पेठ वसावणेस जुलाई वर्तक कोमठी बनिया चिल्लर खुषबाष लोक वगैरे कोणी येऊन घर बांधून बेपार केलिया साले हालपासून नऊ साल पावेतो त्या लोकाकडून सारा घेणार नाहीं दहा सालीनंतर बिराड आवार पेठ मवाफक तीर्व वसूल करविला जाईल. —पे. सा. पृ. २७१

जुलूस—राज्यारोहण, समारंभ, थाट, वैभव.

तिकडून दीड प्रहर रात्रीस मोठे जुलुसानें फिरंगीयासहवर्तमान शहरांत आले. —राजवाडे १ पृ. २७

जुबे—बेट.

गलबते तमाम सरोन जुबेनजिक गेली आहेत.

—पे. द. १६ पृ. ११५

जुहुर—व्यक्त होणें.

जुळीची कांबळी—दुहेरी कांबळी.

हरीहराकडे कांबळीं जुळीचीं व सूत आलें त्याजबरोबर शंभर कांबळीं

जुळीचीं पाठविलीं तीं आम्हीं ठेवून घेतलीं. एकंदर किमत सत्तावीस होन जमसेरीं लिहीलें आहेत. —ऐ. ले. सं. १७०१

जु-अल-इक्तिदार—सामर्थ्यवान.

जुग—जुंग, तारवाचा एक प्रकार (इंग्रजी जंक की काय ?)
तीस गुराब थोर, साठ तारवें, पंध्रा जूग, पंचवीस पाल.
—चित्र १२५

जूज—जुजवी, किरकोळ.
आबाजी नाईक जूज फौजेनसी निरानरसिंगपुरास आले म्हणोन मशार-निलेचे वकील बालमुकुंद यांनीं नवाबाचा अर्ज केला.
—पे. द. २५ पृ. ४९

जुजकाम—किरकोळ, जुजवी काम.
मसलत इंग्रजाची मोठी आणि मोठेच नफे. ऐसे असता जूज कामाकरिता आपआपल्यात नाखुषी राहणें ठीक नाहीं. —इ. सं. ऐ. टि.

जुत—लावणी, मशागत. नांगरणी.
सालेहाली माळवाप्रांतीं फौजेसहित छावणी जाहली आहे या गोष्टीची दहशत खाऊन मुलखाची जूत होत नाहीं करितां कौल सादर केला असे कोणे बावे आजार लागणार नाहीं खातरजमा राखोन मुलखाची लावणी करणे. —नाना. पेश. रो. १ पृ. ७

जुद—लौकर, त्वरेनें, जलद.
जूद चेनापट्टण तालुक्यांत जाणें होय तें करावें
—राजवाडे १९ पृ. ७३

जुदतर—विशेष लौकर.
जूदतर खर्चाची मदत-इम्दाद पोक्ता ऐवज देऊन रवाना करून पाठवावे.
—का. प. या. पृ. ३८७

जेकमीचे—बेगमीचे (?) जखम्यांचे (?) जेखमींचे (?)
शत्रू हरकोठें येथें अगर जंजिरे अरनालीयास येईलच. आलीयावरी ठेचगा देतच आहो. बरवाजी पाटील साहित्य करीतात व बाळाजीपंत फडणीस जेकमीचे (?) साहित्य करीतात.
—पे. द. १६ पृ. ८६

जे कुत पटा—(;) स्वामित्वाची सनद ?
त्यावरी काही कथला नसता त्रिंबक नारायण व बलवंतराऊ हे दोघे भाऊ भांडो लागले जेकुतपटा मागो लागले आपल्या बापाने म्हटले जे गाव तुम्ही खाता ते आमच्या हवाला करणें तुम्ही हे गाव दोन्ही खाणे मग पुढे वाटालाखा होईल. —शि. च. सा. खं. २ पृ. १४३

जेगा—पागोटयावर बांधण्याचा एक रत्नालंकार.
मोत्यांची कंठी, तुरा ,जेगा, शिरपेच याखेरीज पांच पोषाख उंच दिले.
—ऐ. ले· सं. १९७४

अवतरणासाठीं, "तुंबा" शब्द पाहा.
—पेठे दप्तर भाग २ पृ. १५

जेजया, जिजिया—मुसलमानेतर लोकानीं द्यावयाची डौईपट्टी.
अलमगिराचे कारकीर्दीत यज्ञोपवीतास साडेतीन रुपये जेजया बसून, ओलें अन्न विकावें, सर्वांनीं घ्यावें हें नौबद गुजरली.
—इ. सं. ऐ. टि. भा. १ पृ. १८

जेजाल अंदाज—जेजालंदाज. जेजाला मारणारा.
याशिवाय गाडदी व जेजाल अंदाज वगैरे पायेदळ आहे तेहि येतीलच.
—पे. द. २० पृ. १४१

जेठवड—ज्येष्टाचे किंवा अगोटीचे दिवस.
—पे. द.

जेठी—कर्नाटकी मल्ल. सर्वसाधारणपणें मल्ल कुठलाही.
१ श्रीमंतांच्या वाडयांत पंचमीस जेठी यांच्या लढाया झाल्या.
—ऐ. ले. सं. ४१५९

२ महाराजास बहुतच क्रोध आला आणि समक्ष प्रतिनिधीस आणले आणि डोळे काढावे ऐसा मनांत आवेश येऊन जेठी पैलवान बोलाऊन आज्ञा केली जे " तक्ता उरावर ठेऊन डोळे काढावे "
—थो. शा. स. च. पृ. २५

जेथलग—(?) पर्यंत, पावेतो.
हे जरूर दोस्तीवर नजर देऊन गल्ला **जेथलग** दोन हजार खंडीपर्यंत येतर्फे पोहोचलेयास गल्ल्याचा ऐवज नक्षा ते तर्फेस पोहचता होयेईल. ये गोष्टीचे जरूर धरून ये **हातेची कैरोज** दुतर्फा यादगिरी राहील.
—पे. द. ३४ पृ. ७५

जेनबी—जिनोवा (इटलींतील) येथें तयार झालेली—झालेल्या.
जेनबी फिरंगा (तरवारा)
—चित्रगुप्त १११

जे न होय तें थोडें—जें जें होईल तें तें थोडेंच.
काळजी तरी कोठपर्यंत करावी ! जें न होय तें थोडें !.
—ऐ. ले. सं. २९९९

जेब—लक्षणेनें स्वरूप.
(अवतरणासाठीं 'येकसुई' शब्द पाहा.)
—हिंगणें द. भाग २ पृ. ७८

जेब—खिसा.
लखोटा फोडून पाहिला आणि आपले जेबांत ठेविला.
—राजवाडे १० पृ. २६५.

जेब—व—जिनत—शोभा.
यांचे येण्यांत रौनक अधिक होईल; जेबवजिनत येईल.
—राजवाडे ७ पृ. १९४

जेबिन—नांवचे ? जवळील ?
सेवकाचे जेबिन आज्ञापत्रे व खान आजमाचा लखोटा होता तो काढून आज्ञापत्र वाचून दाखविले. —पे. द. २८ पृ. २८

जेर जखमी—जखमी; इजा झालेला.
याजउपर, जेरजखमी आहेत त्यांस एकादें जागां ठेवून मिरजेचे सुमारें येतों. —ऐ. ले. सं. १७२२

जेरजप्त जेरदस्त—स्वाधीन, हस्तगत.
पाण्यांत गड वसविले म्हणजे दर्या जेरजप्त आहे. —जित्रगुप्त ८७

जेरब—जरब; तोफ.
गुरमकोंड्याचा प्रसंग आजपर्यंत उरकला असता, परंतु संग्रहीं भारी दिक्काळतोड जेरब नाहींत. —ऐ. ले. सं. १७१३

जेरबंद—जीन आवळून धरणारा घोड्याच्या पोटाखालून जाणारा पट्टा.
इकडे गर्दी जाली तेव्हां जो हुषार सवार (त्यानें) जेरबंद कापून गंगेवर घोडे घातले. जो गाफील तो (त्यास) जेरबंद कापावयास अवसर नाहीं तो तसाच गंगेत शिरला असे दहावीस हजार सवार गंगेंत बुडाले नवाबाचे फौजेचा असबाब खाशासुद्धा गनीमवाल्यानीं लुटला.
—स. ब. पृ ३२

जेरबार—त्रस्त, हैराण, खर्चाखाली आलेला.
१ तेथें जाऊन व्यर्थ जेरबार व्हावें; बरकड अर्थ नाहीं.
—दि. म. रा. भाग १ पृ. ४२

२ इंग्रेज श्रीमंतास जेरबार करितात व जंगलांत गुलजार करून स्वस्थ आहेत असें किती डंश आहेत. —इ. सं. दि. म. रा.

जेरी—दुर्बलता, पडती, हैराणी.
सारांश फिरंगी याची जेरी आणि श्रीमंतांची जबरी असे सोमवारचें वर्तमान आहे. —राजवाडे ४ पृ. ९८

जेल, जैल—खाली दिल्याप्रमाणें तपशील.
त्यावरून मौजे मजकुरास जाऊन थले नेमून दिधली तपशील जेल.
—पेठे दप्तर भाग १ पृ. १

रयतेकडील राजीनाम्याचे हातचा त्याचे हातची जेलाची वाटणी असावी ते नाहीं म्हणतात. याचे उत्तर जैल म्हणजे तपसील. ज्याणे राजीनामा लिहिला त्याचे हातचा माहालवार नाहीं हा दोष म्हणतात.
—पे. द. ३१ पृ. १२३

जेवा—जेवण. सरकारी वसूल करण्यास गेलेल्या कामगारास किंवा सरकारी पत्र घेऊन गेलेल्या इसमास गांवकऱ्यानीं जेवण देण्याची सक्ति असे त्याला जेवा म्हणत.
१ तपेमजकुरी वेठविरळा व जेवा यैसा बहुत आले गेले उपसर्ग बहुत होतो. त्यास तपा मार्गावरील आहे. जितका येतो तितका वेठविरळा व जेवा मागतात.
--पे. द. ३४ पृ. २४
२ पत्र गांवास पाठविलें. माणसानें जेवा देखील घेतला नाहीं.
—ऐ. ले. सं. ९७४

जेष्ठा वाटा—मोठा वाटा.
मग जेष्ठावाटा येशवंत घोडी व देव्हारा आपल्यास दिल्हा. कारण पर्वतरायानें मी तुमचा भाऊ अशी कुळकर्णी याच्या पायाची क्रिया केली.
--ऐ. सं. सा. खं. ४ पृ. १३४

जैहतफुर्मास—?
वेठ बिगार जेहत फर्मास व खरेदी फुर्मास माफ केली असे.
—दस. शि. मो. इ. पृ. ३६

जैहननशीन—श्रुत, मालूम.
अक्षरशः मजकूर नवाब सम्सामुद्दौला बहादूर यासी पत्रें वाचून दाखवून जेहननसीन केला.
—राजवाडे खं. १ पृ. ११४

जैहपट्टी—कॉलर. गळपट्टी.

जैहल—राग; रोष.
श्रीमंतानी गोखले यावर जेहल केली जे आपण लढाईचे कामात महाशूर आणि सावध असता जेव्हां पहावें तेव्हां अशी गडबड सांगण्यांत येते !
—म. द. रु. २ पृ. २०

जैफ, जैफी, जईफ, जयफ—वार्धक्य.
आमचा दीनबदीन जैफीचा दिवस.
—पे. द. ४४ पृ. ६२
तुकोजी होळकर बहुत जैफ जाले. शरीरांत ताकद नाहीं. तुकोजी होळकर यांणीं आपले डेरे पुढें महतापीचा मंडप उभा केला होता त्यांतच बैठक जाहली.
—ऐ. ले. सं. ४९२५
३ --जयफी नबाबाची
--राजवाडे ५ पृ. ८२

जैफ—पुसट, गुळगुळीत झालेली किंवा कातरलेली नाणीं जी पोत्यास किंवा किंवा सरकारी ट्रेझरीत स्वीकारण्यांत येत नाहींत अशी.

जैफी--सबूरी (जैफ-अशक्त वार्धक्यानें क्षीण; २ जैफी-वार्धक्य.)
लोकांनीं मजला बदनाम न करावे जे असफजाहा कमरदीखां मेल्यावर यांनीं त्याच्या औलादीस पिसूनच टाकलें, यैसे न म्हणावें. माझ्या थोरपणास शब्द न लागावा म्हणून आपल्याकडून जैफी केली.
--पे. द. २५ पृ. ८९

जैश--सैन्य १ फौज.

जैसा तैसा—असा तसा, क्षुल्लक, किरकोळ, मामुली.
ते जमावहि जैसा तैसा धरीत नाहीं. पोख्तच धरितात येवढ्या जमावास तऱ्हा द्यावी हे कोण गोष्ट ?
—शि. च. सा. खं. ५ पृ. १०५

तुका म्हणे जैसा तैसा तुझा दास । न धरी उदास मायबापा ॥
—तुकाराम.

जैसे तैसे करून--कसें तरी करून
आपला हाल व गावचा हाल कांहीं राहिला नाहीं जैसे तैसें करून आपण आजीतागाईत वतण राखिले. --शि. च. सा. २ पृ. २६०

जो—कीं.
याचा अर्थ जो, मी लहान मज सांघाते बोलावयास कामास नये.
—पे. द. ३ पृ. १२१

जोखमार, जोकमार—१ मदनाचें प्रतीक असलेला कर्नाटकांतील एक भिक्षेकरी. हा मदनाप्रमाणें बेमुर्वत असा समजला जातो.
२ गांवभर थाटमाट करून शिश्नपरायण होऊन फिरणें. कर्नाटकांत भाद्रपद शु. ८ पासून पौर्णिमेपर्यंत मोठें शिश्न असलेले जोकमार नावाचे एक मातीचें चित्र करून गांवांतून फिरवितात. याचा जन्म तराळाचे घरीं होऊन, मृत्यु परटाच्या धुण्याच्या दगडावर होतो. परीट याचे सुतक धरितो. —महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश.

या दुनियामधि हिंडलों जसा जोखमार ।
कुणी गांडू भडवा आला नाहीं माझ्यावर ॥
—ऐ. पो. के खं. २ पृ. २००

जोखमी हुंडी—ही हुंडी नेहमी त्या हुंडींत लिहिलेल्या व जहाजावर चढविलेल्या मालावर काढलेली असते व ती एक प्रकारची विम्याची पॉलिसीच असते. जहाजावरील माल जर सुरक्षितपणें पोंचला तर त्या हुंडीचे पैसे

धारकाला माल घेंणाऱ्या माणसाकडून मिळावयाचे असतात.

—स. का. ८९

जोखीब किंवा जोखींव—जोखीम, जबाबदारी.

जोखीब नाहीं तर पैवयाचे जोखीवाचे कारभार परभाराच त्या अर्थी बिन चोखीबानें होईल तें करावयास काये चिंता आहे. ?

—बा. गो. प. ले. १०

चिरंजीव दादा लाखेरीचे दऱ्यापावेतो आले ग्वालेरीचे कार्य करून मग येणार. जयापाकडे गेले नाहीं. जयापा सर्व प्रकारे जोखीव अंगिकारून आहेत.

—पुरं द. भा. ३ पृ. १८५

जोखोहीं—(?) दोष किवा जोखीम ?

तेथील कामही हाताखाली घालावें आणि जोखोही न यावी आणि हुजूरांत महाराजे यांचा आणायाचा विचार करायाचा तो करावा लागतो.

—हिं. द. खंड १ पृष्ठ ५९

जोगींदोश—(?)

मेवा, व तांदुळ व जोगीदोश पाठविले आहे सेवेसी पावतील.

—हिंगणे द. भाग २ पृ. ९

जोट—शेला सुती; पासोडी; जाडेभरडें सुती कापड.

१ येक हजार तिवट व जोट पांचसे सत्वर आणवावें.

—पे. द. ३४ पृ. ११७

२ नारोपंतास सांगून जोट येक ती चौ चार रुपयाच्या किंमतीचा जामदार खान्यात असला तर देवणें.

—पे. द. १३ पृ. ४६

मातबर लोकांचीं ओझीं चालतात मोटांत ।
गरिब करी गुजराण प्रसंगीं ऐक्या जोटांत ॥

—ऐ. पो. के. प्रभाकर शाहीर दु. बा. पेशवे.

जोडका—कुटुंबांतील मिळविता पुरुष.

जोडकापूत—(?) सरकारनें नेमलेला गुप्तहेर. याचें काम लोकांच्या मालमत्तेची बित्तंबातमी काढून सरकारांत पुरविण्याचें असें. त्या आधारावर कांहीं ना कांहीं सबब काढून निर्दिष्ट इसमावर दंड बसविण्यांत येत.

—विल्सन

जोडजोड—जंगजोड, एकी, एकात्मता.

लाला नरसिंगदासजीचा व यांचा जोडजोड आहेच.

—हिंगणे द. भाग २ पृ. ३०

जोडा धरणें—धन्याचा जोडा संभाळण्याचें काम करणें, म्हणजे अगदीं हलकें सलकें काम करणें.

विशेष सेवा व्हावयाची नाहीं. जोडा बहुत जोडा धरावयाचें करूं. मागें वडिलांचीही सेवा थोडाबहुत जोडा धरावयाची केली असेल. आपली घडावी अशी इच्छा आहे. —ऐ. ले. सं. २२९८

जोडेकरी—जासूद.

तुम्ही पत्रें देऊन जोडेकरी रवाना केले होते. त्याचा जाब काय त्यानीं पाठविला त्याचें वृत्त लिहिले पाहिजे. —पे. द. ३ पृ. ४८

जोत्या—जोत किंवा नांगर धरणारा.

जोत करणें—जोतपात करणें, जमीन लावणीस आणणें.

याहून जाजती रयत आणून जोत करवावी तेव्हा आबादानी होईल. —चं. चू. द. पृ. १२५

जोबाळूत ठेवणें—संभाळून निभाऊन राखणें.

पर्जन्यकाल जसातसा जोबाळून ठेवावा. नौका मार्ग चालता जाहल्यावरी जलमार्गं आरमार व खुशकीनें आपणाकडील लस्कर नेऊन मोर्चेबंदी करून किलेमजकूर (अंजनवेल) हस्तगत करावा हा विचार उत्तम आहे. —पे. द. ३३ पृ. ३१

जोरगत—जोर, जोराचा.

आमावास्येचे जोरगतीचा निखर आहे. खाडीस पाणी थोडे रहाते पहाटेची वख्ती सुकती आहे. व धुकट दोन तीन दिवस येत आहे ऐशा समयास कार्य साधेल. —पे. द. ३३ पृ. २४५

जोरबजोर—नटानें, जबरदस्तीनें.

त्यास सारे अरब येकत्र होऊन जोरबजोर मोर्चावर चालोन घेओन मानाजी आंग्रे यास मोर्चातून धुडावून लावून येक कोसपर्यंत पिटोन काढिले. तेथें मानाजी आंग्रे याची व यारखानाची येकांगी जाली. —पे. द. ३३ पृ. १०९

जोरबेजोर—बळानें; नेटानें; जोर करून. धिटाईनें; बेगुमानपणे.

१ दुर्गकरानें परिघ (वेढा) बसला होता तो उठवून जोरबेजोर लावून दिला, म्हणोन खबर आहे. —ऐ. ले. सं. ३४२५

२ हैदरखान जोरबेजोर येऊन ठाण्यास उपद्रव करितो. —ऐ. ले. सं. १८३९

जोरभारी--जोरावर, बलिष्ठ, वरिष्ठ.

या प्रांतीं हे जोरभारी झाले. —ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ २३

जोरात, ज्योरात—(?)

मेहरबान पार साहेब याची ज्योरात आहे. संगमनेराहून नवा ताफा आला

त्याचा गाजा (गजर, वादन) आहे तरी मेहरबानगी करून यावें.
—पे. सा. पृ. २३९

जोरू—बायको.
चौघासहि बोलाऊन आई माई जोरू बेटी कांहीं एक विचार दुर्भाषणे बोलून (आईमाईवरून शिव्या दिल्या) म्हणाले श्रीमंतांचा मजला ओळंबा आला ते पक्षी उदईक मजला मरावयाचे. कोणेही गोष्टीची बाकी ठेवली नाहीं.
—हो. कै. पृ, ७८

जोशन्—चिलखताचा एक प्रकार.

जोहर—जवाहीर.
रुकसतीच्या वेलेस होळकरानी श्रीमंतास हाती घोडा व जोहर दिल्हे.
—पुणें अखबार भाग ३ पृ. ६५

जोहर—शोभा, डौल.
रुस्तमगजाचे मस्तीचा जोहर फारच चांगला दिसतो. हल्ली व्यंकटपतीस पेडोल लावावयासी मौजे हडपसर येथे घेतला आहे.
—पे. द. १८ पृ. ३८

जोहर—रत्न.

जोहर—तलवारीच्या पात्याचें पाणी, तेज.

ज्यातप्राय—झाल्यासारखा.
बंगल्याचें पूर्वेकडील उजव्या हातचें हौदाचें काम चालीस लाविले होते. तो हौद ज्यातप्राय आहे.
—पे. द. १८ पृ. १०२

ज्यानफाइदा—तोटा नफा.

ज्यानब—उपचार, आदर.
सखारामपंत कृष्णराव बल्लाळ यांची ज्यानब व रावमजकूर सखारामपंताची ज्यानब परस्परें राखीत होते.
—पुणें अखबार भाग १ पृ. १०५

ज्यानमान—जीवमान, प्राण.
ऐसियास स्वामी आम्हास आपल्या-सामील करून घेऊन आंगिकार कीजे. आम्ही ज्यानमानासी (जीवजानानसी.) हाजीर आहोत.
—पे. द. भाग २५ पत्र नं. १०५

ज्यान व नुकसान—नफा व तोटा.
पांचजण जमीदारी तजवीज केली जे कांहीं जाणोरकराचें ज्यान व णुकसान होत नाहीं व त्याच्या पाटाचें कमी होत नाहीं.
—ऐ. सं. सा. खं. १ पृ. ११२

ज्यांवज्यां—ठिकठिकाणीं ?

किल्ल्यांतून निघतेसमयीं त्यांणीं बरोबर माणूस आणिलें होतें तेंहि या गडबडींत त्यांजवळून पळालें. अखेरीस ज्यांवज्यां राहिले. लुटले गेले. वाईट गोष्ट जाली. —ऐ. ले. सं. ४४६६

ज्यानी दुष्मनी—जिवापासून वैर, हाडवैर.

त्या दिवसापासून फडणीस व त्रिंबकराव यांचा इतिफाक (सख्य) व सखारामपंतासी ज्यानी दुषमनी.

—पुणें अखबार भाग १ पृ. १०४

ज्यापक्षीं–ज्याअर्थीं—जर-तर.

ज्यापक्षीं शिंदे होळकर श्रीमंत दादा साहेबांचे शरीक होऊन आम्हांसी बदलून गोष्ट सांगतील तेव्हां छावणी पडली तरी करून फडशा करणें प्राप्तच आहे. —ऐ. ले. सं. २१८५

ज्याफत—मेजवानी.

फौज व रसद लुटून गोविंदपंताचे डोकें कापून नेले व उंच उंच फडक्यांची वेष्टनें गुंडाळून एक्या ककीराबरोबर ज्याफत म्हणोन श्रीमंताकडे पाठविले!

—हो. कै. पृ. २८

ज्याफिशानी, जाफिशानी—निदानीची मर्दुमकी, जिवावर उदार होऊन सेवा.

नमकहरामी करूं तरी स्वामीच्या पायाची शपथ असे. या फिदवीपासून सिवायेंज्याफिशानी अनखी काही होणार नाहीं. —पे. द.

रघुनाथरावदादा फौजेची निगाहदास्त (जमवाजमव) करीत आहेत व कौल ज्यावज्या आले या करिता मराठे लोक बहुतकरून सुरतप्रांतीं जातात. —पुणें अख. भाग २ पृ. ६

ज्यायत—रयायत, तोडमोड, तडजोड.

तिसामधे फौजेचे सरंजामाची कर्जपेटी सर्वांवर बसली त्या सालचा आकार बापूकडील सरंजामाचा घरून फडशा करीत असले तर करावा. ही गोष्ट ज्यायतीनें लिहिली आहे. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १०७

ज्याहत—खडाजंगीची, कट्टी, निहायत.

खाशी फौजसुद्धा आम्ही चालोन गेलों लढाई ज्याहत जाहली कर्नल बेली याचे फौजेस कतलाम (कत्तल) केलें.

—लेख पृ. ९५

ज्याहलीयत—मूर्खपणा.

सदासर्वदा अयशामध्यें शर्राब (?) (सर्शार-तर्र) असोन दर्बार न करिता जाहलीयत करावी हे वर्तणूक राजास युक्त नाहीं.

—जो. रा. १०६

ज्याहाजाती पैदास्त—समुद्रावर जहाजें लुटण्यामुळें मिळणारें उत्पन्न.
ज्याहाजाती पैदास न होये तेव्हां मनसबा कैसा कैसा चालूं पाहातो ?
—पे. द. ३ पृ. ५५

ज्याहादार—१ शूर, जिवावर उदार, धाडशी २ जहानदार म्ह. सैन्य सरंजाम चांगला असलेला.
विठ्ठलसुंदर याचे चित्तांत लढाई घेण्याची गोष्ट होती ते ज्याहादार तशात हेही (भोसले नागपूरकर) सामील जाले.
—स. ब. पृ. २९

ज्याहांबाज—धाडस. शौर्य. जिवावर उदार होऊन केलेला पराक्रम.
मुख्य गोष्टी मशारनिलेनी ज्याहांबाजी सिनेदराजी बरीशी केली. हुन्नरवंदीनें किल्ला फत्ते केला.
—पे. द. १० पृ. ४६

ज्याहिल—अज्ञानी, अविचारी.
इंगरेजाकडील सिलसिला बंदगानअलीकडे व हैदरखानाकडेहि आहे. पंतप्रधानाकडे काहीच सिलसिला नाहीं त्याअर्थी येथील कारपरदाज (कारभारी) मनसुबेबाज व तरतुदी नाहीत केवळ ज्याहील आहेत हा दोष लागतो.
—पुणें अखबार भाग ३ पृ. ४१

झ

झक मारणें—नाइलाज होणें.
कारभारी ओढेवेढे घेतात. परंतु झक मारून सेवटीं यादी ठीक करून देतील.
—पे. द. २८ पृ. १३२

झक मारीत पडणें—निरुपयोगी, निष्फळ होऊन जाणें.
सरकारांत रुपये दृष्टीस न पडे. पन्नास लक्षांची मामलत केल्याचा लौकिक ! (पण) सरकारचे संस्थानी रुपयांनाही पांच लक्षांचा हवाला. त्यांत दीडलक्षाचे जवाहीर पाठविले, तें झक मारीत पडले ! एवंच रुपयास जागा नाहीं.
—ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ ४३

झकली—झवकली, स्वच्छंदी वृत्ति.
सुभेदारांची सर्वोपरी (सर्व प्रकारांनीं) झकली. त्यांत दबाऊन आदिपश्चात् विचाराच्या गोष्टी बोलणें, असें पुण्य (लायकी किंवा हिम्मत) व भीड (वशीला किंवा वजन) अहिल्याखेरीज दुसरे कोणाची नव्हती.
—हो. कै. पृ. १२१

झकात—कर.
झख्म—जखम.

झगटणें—भिडणें, झुंजणें.

इभ्रामखान रातोरात कुच करून प्रात:कालींच दाखल जाला आणि परभारें कुंजपुऱ्यास झगटला. श्रीमंतांनीं सांगून पाठविलें कीं मुहूर्तास ३ घटका अवकाश आहे, तों त्यानें परत सांगोन पाठविलें कीं, मुहुर्त कशास पाहिजे ? आम्ही किल्ला फत्ते करितों आणि हुजूर येतों.

—भा. कै. पृ. ११

झगडा—लढाई.

चंजी घेतली व सदरखानास झगडयांत मोडून गर्दीस मेळविलें.

—इ. सं. तं. रा. घ. पृ. ३६

झगडारगडा—भांडण व नाश. (झगडा–भांडण; रगडा–नाश) हाणाहाणी व नुकसानी.

त्यास झगडारगडा आहे. लढाई बिघडली म्हणून क्लेश किमपि न मानावा. पुन्हा उमेद धरून तरतूद करावी. —ऐ. ले. सं. २५०३

झट—उपद्रव.

खंडणीचा जाबसाल आपण उगविला असतां शिंद्याकडील ऐवजाचें झट काय येईल याचा अंत लागत नाहीं. त्याच्या बोल्या भारी. त्यापक्षीं परिणाम कैसा लागेल ? —ऐ. ले. सं. ६३५४

झट लागणें—झळ पोचणें; शब्द लागणें.

जनार्दन गोसावी याचे इनामास तुम्ही सारियाचें तस्ट करितां म्हणून जाहीर झालें. तरी यैसें न करणें. नवदिगर केलीत ये गोस्टीचें झट तुम्हास लागेल. —पुरं. द. भाग १ पृष्ठ २२

झट लावणें—तगादा करणें.

आठ रोजांमध्यें सरकारचीं घोडीं पांच बलवंतसिगानें चोरांकडून नेवविलीं. सबब त्यास येविसीं झट लाविले जे 'घोडीं तलास करून सत्वर पाठवून देणें.' —पे. द. ४० पृ. ३५

झटे खाणें—झोंबणें, झटणें, झगडणें.

त्यांच्या तोंडावर गणेशपंत व भापकर सात आठ हजार फौजेनसी राहून झटे खात आहेत. —म. शि. यां. का. पृ. १८५

झड, झट—लिगाड, उपद्रव, कटकट.

हे पर्याये राजश्री स्वामी जवळ बोलून आपणाकडील झड उडवावे. न ऐकतच, तेव्हां बोलावें कीं, 'हे सरंजामाचे झड लावतां, तरी गड किल्ले आमचेकडे आहेत ते हवाली करून घ्या.' असें बोलून सरंजामाचे झड न लागे तें करावें. —पे. द. ३३ पृ. १९१

झडका--झटका, घाव.

रोहितकर पाटलास प्याद्यानें निरापराधें तरवारीचे झडके मारिले, याज-मुळें कलागत पडली. —पे. द. ४५ पृ. १४८

झड जाणें (एखाद्यावर झड जाणें)--रागें भरणें.

तुम्हीं स्वदस्तुरें पत्र लिहिलें, त्यांत लोक न आले यामुळें फारच शरमी (श्रमी) व आम्हांवरहि झड गेला. ऐशास आमचा उपाय काय?
--ऐ. ले. सं ११६

झडपड—पडझड, (व्युत्क्रमाचें उदाहरण).

आपले छवीनें ४।५ हजारांच्या टोळचा पुढें जात होत्या, त्याजकडीलही फौजेच्या टोळचा पुढें येतात. त्यांचा यांचा मुकाबला होत होता. कांहीं झडपड होऊन हे इकडे येतात व ते तिकडे जातात.
--भा. कै. पृ. १४

झडफडोन उठणें—खडबडून किंवा दचकल्यासारखें उठणें.

उभय तां श्रीमंतांनीं बिबाजी नाईक हुजऱ्यास प्रश्न केला कीं 'सुभेदार जागे आहेत किंवा झोपेंत आहेत?' त्याणें उत्तर केले 'डोळा लागला आहे आज्ञा जाहल्यास जागे करतो.' हीं भाषणें परस्परेंची ऐकून जागे होताच झडपडोन उठोन एकीकडे उभे राहून श्रीमंतास रामराम केला..
—हो. कै. पृ. २२.

झडीबदली; झडीं बादली—पावसाची संतत धार; पावसाची झड.

कटक जवळ करावे. नाहींतर झडीबदली लागल्यास उठणेंच कठीण होईल.
—नाग १ पृ. ११०

झनक—हनु, हनवटी.

झपाटा देणें—मार देणें, शिक्षा करणें, हल्ला करणें.

महाराजांनीं आज त्यास येक वेळ झपाटा द्यावी. त्याणी येंदा फारच गर्व धरला आहे. —पेठे दप्तर भा. १ पृ. ४२

झमझमा—तोफेचें एक नांव. झमझमा म्ह. गडगडाट. त्यावरून मेघमंडळा-सारखी गडगडाट करणारी तोफ.

झमान—काल.

झमीन—जमीन.

झमीन-बोसी--जमिनीस टेकणें. लवून प्रणिपात.

झर्किस्त—सोन्याची चीप किंवा तुकडा.

झल्लरी--झांज.

समस्त सेनासमुदायासहित महाभेरी, नगारे, तुरतुरे, कर्णे, काळू, शिंगें.

पणवा, नफेरिया, झल्लरी, वाजंत्रें, मृदंग, शंख, पावे, मोहरी या महा-
वाद्यगजरें गागाभट्टजीस सामोरा जाऊन आणलें.

—चित्र ९६

झांजर—दिसूं लागतें न लागतें अशी पहाटेची वेळ.

बुनगे संभाळून झांजर झांजर आहे तों वारणा उतरोन आलों.

--ऐ. ले. सं. ६०८७

झाडगळ —झाडी किंवा झाडोरा माजलेला मुलूख.

झाडपछाड—झाडंपट्टी, बोलाचाली, उत्तरें प्रत्युत्तरें.

१ त्यानीं त्रिंबकरायास बोलावून आणून झाडपछाड केली.

—म. शि. यां. का. पृ. ४५१

२ आम्ही गेलों. झाडपछाड बहुतच जाली. आम्ही त्यास जाऊं न देऊं
यैसे देखोन बाबाजी म्हस्के याणी निकाल काढिला की तुम्ही निग्रह
करिता तर बरें, चार दिवस तुमच्या बोले राहतो.

—पे. द. ३३ पृ. २८२

झाडपिछाडी करणें—संपूर्ण झाडा करणें, संपूर्ण फडशा.

हल्ली यादी पाठविली आहे त्यात एक कलम न राहता झाडपिछाडी
करून देणें.

--को. प्रा.१७८

झाडाझटका--शौचमुखमार्जनादि विधि.

चिठ्ठी वाचून अंतःकरणास विश्रांति पडून जिजिसाहेबास सांगून पाठ-
विलें की सैंपाक करावा. लोकांसही सांगितलें कीं कंबरा सोडून झाडा-
झटका करावा आणि फिरून यावें.

--हो. कै. पृ. १२६

झाडा होणें—खलास होणें किंवा संपणें.

आतां बातनीहरकारे झाडा जाले. लवकरी आणीक पाठविणें.

—पे. द. १० पृ. ८४

झाडियानसीं—झाडून सारे.

पाटणकर यांचे लोक पोटास मुतलख नाहीं यामुळें तेहि झाडियानसी गेले.

—पे. द. ३ पृ. १४

झाडी लागणें—जंगल वाढणें, मशागतीवांचून राहणें.

परगणा मातबर. बहुत दिवस झाडी लागून पडला. कुळभरणा अगदीं
नाहीं. लावणी करणें जरूर जाणोन चौकडे कुळांचा तलास करावयास
लाविलें.

—राजवाडे खंड ११ पृ. ४५

झापा--छापा.

लक्ष्मण खंडागळे व आनीक डोंगरे मिळोन झापा घातला. नारो अप्पा मोडला, फौज लुटली.

—पे. द. १४ पृ. ४८

झांबडणें-- उपद्रव देणें; लुटण.

श्रीमंतांनीं औरंगाबादचे दोन पुरे झांबडले व तेथून अडीच लक्ष रुपये घेतले. —ऐ. ले. सं. ३७१

झांबडाझांबड--उपद्रव; लुटालूट.

लष्करचे लोकांनीं शहरचे लोक भवानीचे यात्रेस बाहिर आले होते, त्यांस झांबडाझांबड केलें. ब्र. च. पृ. २६

झामडणें—झांबडणें, झडप घालून लुटणें.

पुढें आघाडीस आंबोजी इंगळे यांनीहि एक पलटण झामडले. नक्ष जमला असता महादजी शिंदे यांनी हैवत खाल्ली.

—हो. कै. पृ. ८४

झारेकरी—सोनारादिकांकडून त्यांचा केर व राख गोळा करून त्यांतून सोन्या-रूप्यांचे कण शोधण्याचा धंदा करणारे लोक.

झालरदार—झालर असलेला. --ऐ. गो. लो. पृ. ७

झासा--अर्थासाठीं त्रागा शब्द पाहा.

झिगर, झिगर--१ जेथें अंगठचात धरून धनुष्याची दोरी ओढतात ती जागा. २ धनुष्याच्या दोरीनें अंगठा व तर्जनी यांचे मांस सोलले जाऊ नये म्हणून बोटांस बसवावयाचे टोंपण किंवा अंगुस्तन.

झिटपीट- हातघाई, हाणाहाणी.

थोडासा गनीम एकदोन वेल गेला त्याची यांची झिटपिट होऊन गनीम माघारा फिराऊन लाविला.

—पे. द. १६ पृ. ९०

झिडबीड--झीटपीट; झटापट.

फौजेनिशी बाहेर दोन कोसांवर येऊन राहिली. त्यास आठपंधरा दिवसा त्यांची याची झिडबीड होतच होती.

---वै. ४ स. १७४७ पृ. २९

झिडाडणें---झिडकारणें. जोरानें दूर सारणें.

ते आपणासी झोंबो लागले. काये मुदा होता नकले. आपण त्यासी झिडाडून चालिलो. ---पुरं. द. भाग ३ पृ.१३७

झिना----व्यभिचार.

झियादह----जास्त.

ऐ. श. ३०

झिरंगी,जिरंगी----कौशल्य, पाटव. झिरंग—कुशल.
झिरीन---जिरीम, कमीप्रतीचा, व्यंग असलेला.
झिल्या—?

सेनासाहेबसुभे याणी तोटे दहा हजार व दीड हजार वांसीचे नळे व झिल्या व लोहचूर पक्के चौदा शेर, यैसा सरंजाम सांडणीवर भरून पुण्यास श्रीमंतांच्या लग्नातील आतशबाजीसाठीं रवाना केला.

---नाग २ पृ. १०९

झिल—= ?

अवतरणासाठीं "तोटा" शब्द पाहा.

---नाग १ पृ. १८४

झो----धनुष्याची प्रत्यंचा किंवा दोरी.
झील—पाणथळ जागा; झरा; सरोवर.

१ सालमजकूरचे अवर्पणामुळें पाणी तळयांत नाहीं म्हणून सांगतात. पश्चिमेकडील अंगे झील १॥ कोसाचे तफावतीनें आहे, तेंच तेवढें पाणी.

—ऐ. ले. सं. १६०८

२ पट्टणचे पूर्वेस पाण्याचा झील आहे, तेथें आज राहिलों आहों.

—ऐ. ले. सं. १७८६

झुकावा करणें—छापा घालणें.

दारूगोळा आल्याचे वातमीवरूनच गडकरी यांणीं झुकावा केला असें वर्तमान. --ऐ. ले. सं. ६३३९

झुटा दोरा ठेवणें—उगाच नादास लावून ठेवणें.

उगाच झुटा दोरा ठेवून आम्हास श्रमी करितां! सर्वप्रकारें आमचा नाश होतो. —पे. द. १६ पृ. २०

झुटी लढाई—खोटी लढाई; लढाईचा देखावा.

झुटी लढाई करून एकीकडे हल्ला करावी, या मनसबेंत रामचंद्रपंत आप्पा आहेत. —ऐ. ले. सं. ६३३६

झुटी सानक—चाकरीची माफी करून जी जमीन एकाद्यास देणगी बहाल दिलेली असते ती.

शहाजीराजास चंदी चंदावर परगणा दिल्हा होता तो बाद घालून नवीन नूतन अठरा लक्ष होनाची झुटी सानक शहाजीराजे महाराजवजीर याचे साबे इनाम वौंशपरंपरेने दिल्ही. —म. द. रु. १ पृ. १७

झुत्री—कोरडा पडलेला ओहोळ, ओढा किंवा झरा.
झुब्दत—सत्व.
झुम्रह—जमाव.

झुमर—झुंबड; मारामारी; हातघाई. चकमक.

खालीं आंतील माणूस, वर इकडील लोक, दोनचार रोज मोठी झुमर झाली. —ऐ. ले. सं. १७०४

झुरमट—झटापट, झोंबी.

त्यांची यांची एक दोन वेळा झुरमट होऊन, येथें आपले पाय टिकत नाहींत असें समजून यशवंतराव होळकर (हा) जुंझार नाइकास न समजतां, रातवा घेऊन शेपन्नास माणसानिशी बडवाणीकडे निघोन गेला. —हो. कै. पृ. १३४

झेपावेसें असणें—ओझें सहन होण्याइतकें असणें, आपल्या आवाक्यांत असणें.

जर तुम्हांस (किल्ला) झेपावेसा असिला तर तुम्ही व भगवंतराव यैसे मिलोन मारून ठाणें घेणे. तुमचे जरदस्तीत असलिया मारून घेणे सलाह आहे. —हिंगणे द. भाग २ पृ. ९७

झेहल—जलाली, जहालपण.

आम्ही टाळाटाळ करून प्रयुक्तीनें उत्तरेहि वरचेवर लिहीणें ती लिहीतच आहो. परंतु खावंदानीं बहुतसी झेहल घातलिया कार्याची नाहीं. —पे. द. ३३ पृ. १५१

झोकचिठी—(१) A fraudulent note of hand or bill, one not intended to be honoured, (विल्सन) २ एकाद्यानें एकाद्यास एकाद्यावर काम न होण्याजोगी दिलेली चिठी, रोखा, हुंडी, खोटा चेक किंवा करार पत्र (कीं ज्यामुळें ती घेणाराची निराशा होईल) ३ लक्षणेनें व्यर्थ हेलपटा, खोटें वचन, खोटी आशा.

सात महिने आजपावेतो जाहले. खर्चा पैका पावत नाहीं. झोक चिठ्या उगाच मनस्वी करून द्याव्या. तेथें कारकून पाठवावा तर चाळीसपन्नास रुपये उलटा खर्च देणे येऊन चिठ्या पटों नयेत; वायदे मुदती करून कालहरण यैसे होतें ! —नाग. २ पृ. ५२

झोडीधाडी—पुंडावा.

धारापत पुंडावे झोडीधाडी करीत असत. —इ. सं. प्रा. मं. स. पृ. २४.

झोंबडें—झोंबट; श्वानमैथुनासारखें गोवागुंता होऊन निकालात न निघणारें प्रकरण किंवा लढाई, युद्ध.

हिंदुस्थान इंग्रजानी बळावले. येक सरदार खासा हिंदुस्थानांत जाईल. रात्रंदिवस परम साहास होतील, तरीच काये होणे ते होईल. चौघरचें चार गेल्यानें व्यर्थ आहे. टकरुन पाठीमागे झोंबडें घेऊन देशास येतील. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ८७

झोंबणें—तंटा करणें, वाद सांगणें.
(अवतरणासाठीं दुकोळ पाहा.)

झोंबीलोंबी—झोंबाझोंबी.
पाणिग्रहण सोनप्रभूनें घेतलें त्यास आपण झोंबीलोंबी देऊ घेऊ नका. (असे म्हटले.) यावरी झोंबालोंबी जाली. मारामारी जाली. मग आपणास चाऊडीस प्यादीं नेले. मग सोनप्रभु दमगिरी जाला.
—शि. च. सा. खं. २ पृ. २९५

झोरा—झोऱ्या, एक तऱ्हेचे जाजम किंवा सत्रंजी.
अंताजी नाईक भिडे याजकडून भीमाशंकराचे इमारतीचे कामावर सामान बट व लोखंड, घोंगडी ४ झोरा १ छिटे २ येणे प्रमाणें भरून बैल २ आळंदीहून जात आहेत त्यास जकात माफीचें दस्तक.
—पे. द.

झोलमठ—? झोलमाठ ? मोठा मातीचा माठ ?
गडावर इस्तादेचे घरांत तुपास टाकी करावी किंवा थोर थोर काचेचे मर्तबान, झोलमठ, मडकीं आणून त्यास मजबूत बसका करून त्यांत तेल तूप साठवावे.
—आज्ञापत्र धुळे आवृत्ति पृ. ३९

झोळणा—चार कोपरे एकत्र केलेलें वस्त्र (आजाऱ्यास नेण्याकरता).अर्थात अशा झोळण्याने आजाऱ्यास वाहून नेण्याचें काम करणारा तो झोळणेकरी.
झोलणेकरी व तट्टे व पालखी व दुममनुष्य, चालणार नव्हे ऐसे लोक, शेंदीडशें हें आम्हाकडे पाठविले.
--पे. द. ३ पृ. ९०

झोळी--१ जखमी माणूस २ लढाईत जखमी झालेल्या माणसास दोन भाल्यांवर पासोडी गुंडाळून त्याची स्ट्रेचर बनवून त्यास काढून आणीत त्याला झोळी म्हणत.
१ आमचे लोक बाहेर निघोन झुंज झाले त्याचा करणेकरी पाडिला आणिकही पांच माणूस पडले म्हणून सांगतात. परंतु चार झोळचा त्यांनीं उचलून नेल्या त्या आम्ही इकडून अवधियांनीं पाहिल्या.
—पे. द.

२ त्यांजकंडील मातबरास गोळी लागली. खालीं आल्यावर उडचा टाकून कस्त करून झोळी करून काढिला. वरकडास काढावयास फुरसत सांपडली नाहीं.
—ऐ. ले. सं. २३९४

ट

टक्का—चाण आणे. —खरे पृ. ३४८९

टक्का—जमीन मोजणीचें एक परिमाण.

टक्काबंदी—जमीन मोजणीनंतर दर टक्क्यास अमुक रुपये प्रमाणें ठरविलेला जमीन महसुलाचा दर. —विल्सन

टक—पिंड
टका कावळा शिवला नाहीं. तेव्हां श्रीमंत नारायणरावसाहेबांस पुत्र झाला तर माधवराव म्हणून नांव ठेवावें म्हणून उदक सोडिलें, तेव्हां काकस्पर्श झाला. —ऐ. ले. सं. १९६७

टकरणें—टक्कर घेणें; हल्ला करणें.
१ येसाजी शिंदे यांनीं ४,००० फौज व दोन हत्ती ऐसे गठूनच आले व पंताचे फौजेवर येऊन टकरले.
२ करवीकरांनीं चालून येऊन चांगली शिपाईगिरीची शर्त केली. इराणी अथवा गिलचे याप्रमाणें टकरणार नाहींत, अशी शिपाईगिरी केली. —ऐ. ले. सं. २५७६

टकापैका—पैकाटक्का—(व्युत्क्रमाचें उदाहरण)
१ आजीपर्यंत टकापैका खर्च जाहाला तो फुकटच जाहला ! —पे. द. ३३ पृ. १८
२ मुतालीक बदमामली करू लागले. ज्याचे वतन त्यास टकापैका देईनात. —ऐ. सं. सा. खं. ४ पृ. ६६

टकोचा—हत्तीच्या डोक्यावर घालावयाची टोपीसारखी शिरी.
हत्ती, त्यास पाखरा, घंटा सांखळी व जडावाचे टकोचे, भारी सुवर्णाचीं पिंपळपानें. —चित्र १११

टप्पा टपा—नेम; गोळीचा धक्का. पल्ला.
१ त्यास मोडून नामोहरम करून पाठीस लागले. गोळीचा टप्पा पाठीस लागले. —ऐ. ले. सं. २३९३
२ सुटती तोफा धुंद दणादण । गुंगत गोळे येति छणाछण । सों सों करिती बाण सणासण । खालेल घोडे उडति टणाटण । टप्पा हाणिति दुरुनि ठणाठण । —के. ऐ. पो. प्रभाकर ख. ल. पो.
३ दोन तोफा कोसावर टपा खात यैशा रवाना फिरंगियानें केल्या आहेत. —पे. द. २८ पृ. ७८

टप्पा—पत्रें आणविण्यासाठीं टप्प्याटप्प्यावर लोक ठेवून वसविलेली डाक.
पुण्याकडील टप्पा आला आहे; टप्याचीं पत्रें वाचून दाखविली.
—नाग २ पृ. १५८

टप्पागुजरा—धमधमा (मूळ फारशी शब्द तप्पा म्ह. उंचवटा)
—म. रा. आ. पृ. ३६

टपका—संतत मार.
आम्हांकडील मोर्च्यांतील टपका गोळीचा, सावधगिरीकरिता (दारू पुरेशी नाहीं म्हणून) थोडा थोडा चालविला आहे. —नाग २ पृ. २२३

टपका—विसावा; उसंत.
मैराळ टेकडीवरील चिरेबंदीवरून मारगिरी तोफांची होत असते. प्रथम इकडील तोफा जाग्यावर जाऊन बैल सुटत तंवपर्यंत व अस्तमानीं माघारे येतेवेळीं मारगिरी करितात. दरम्यान टपका असतो.
—ऐ. ले. सं. ४३८९

टपली—साल किंवा अंगाची कातडी.
(अवतरणासाठीं संधान शब्द पाहा.) —हो. कै. पृ. १६७

टबका—टमका; मार. अविरत मार.
आंत रेकला लिंबाएवढ्या गोळ्याचा आहे. ते दोन्ही रात्रंदिवस टबका लाविला आहे. मारणार चांगला आहे. —ऐ. ले. सं. ५०३७

टाकण—घोड्याची एक जात. डोंगराळ मुलुखांतल्या घोड्याला टाकण म्हणतात, हा उंचीला खुजा असतो. 'मद्रजस्तु भवेत् ताजी पर्वतीयस्तु टाकण :' —रा. व्य. को.

१ मकसुदाबादी टाकण चालक (चलाख) पाठविणें.
—रा. खं. ३ पृ. ११

२ मकसुदाबादी टाकण चलाख पाठविणें. माली घोडी पहिली तुम्हास दिली तिचा मुबदला पाठविणें म्हणोन आज्ञा
—ब्र. च. पृ. १००

३ पंत मशारनुलेस वस्त्रें व खर्चास व येक टाकन बसावयास दिल्हा.
—पे. द. ४० पृ. ८४.

४ टाकण शिंगरू शेळचा येथून पाठविलेल्या येऊन पावल्या असतील.
—ऐ. ले. सं. १४८४

५ एके दिवशीं मागील दोन घटका रात्र राहता आपण व मालरावबाबा व महादजी शिंदे त्रिवर्ग टाकण घोड्यावर बसून एक एक माणूस असे श्रीमंत दादासाहेब यांचे डेऱ्यास आले. —हो. कै. पृ. ४०

टाकणी— ? फेकून मारावयाचे सैंतीसारखे हत्यार असावे (?)
बंदुक बाळगणारासह गडावरील हशमानी तरवार टाकणी हेहि हत्यारें बाळगीत जावी. —आज्ञापत्र धुळे आवृत्ति पृ. ३९

टांकी लागणें—काम सफल होणें; कामास सुरुवात होणें; टिक्की लागणें.
आज श्रीमंतांचे राज्यांत दैवानें कुंजरास हातीं धरिलें आहे! आजपर्यंत त्याची उपासना मी केली नव्हती. परंतु याजउपरी त्याजकडे जावेसें केलें आहे. परंतु आम्ही रिक्तहस्ती, तेव्हां टांकी लागणें ईश्वराचे हातीं आहे! या राज्यांत याजउपरी रिक्तहस्तें कांहीं व्हावयाचें नाहीं!
—ऐ. ले. सं. ६६११

टाके ढिले होणें—भेदरणें, घाबरणें, दम खलास होणें.
तोफेचा गोळा इकडील अलंग फोडून, भवानसिंग निजला होता, त्याचे खपरेल उडून, पलीकडील सफेल फोडून पार झाला; त्यांतच त्याचे टाके ढिले झाले. हो. कै. पृ. ९०

टाला देणें—(१) हवाला देणें, (२) थाप देणें.
राजश्रीकडील चांगले माणोस आपले कार्याचे असेल व लगामी लागल्यास उपयोग, त्यास राजश्रीच्या पोत्यातील रुपये काढून देणें. गैरसाल, कवडीचे कामाचे माणोस, त्यास कांहीं न देणें. 'राजश्री आईसाहेब गडावरती. खाली आलियावर देतील,' ऐसे म्हणोन टाला देत जाणे.
—पुरं. द. भाग १ पृष्ठ २३२

टालेटोले—दंगेखोर, पुंड.
रामजी बंडगर याने माणकोजी बंडगर याची फौज आणिकहि टालेटोले जमा करून बाळेघाटीं चिरंजीव महादाजीबाबाकडील ठाणे आहे, त्यासी वेढा घातला होता. —पे. द. ११ पृ. ९

टाळा देणें—आंग काढणें, विन्मुख होणें, दूर सरुन जाणें, पळून जाणें.
या समई व्यर्थ मार खाऊन घोडे माणूस जाया करावे हें ठीक नाही. या वेळेस टाळा द्यावा. —हो. कै. पृ. ६५

टाळें—भोंक.
गुरमकोंड्याचे मोर्चाचें वर्तमान तर रेवणीस टाळीं पाडून खंदकांत उतरोन सुरुंग तयार झाला तो उडविला. बुरुज पडला; परंतु आंतल्यांनीं दम धरून तेथून मार करूं लागले, एक तोंडी म्हणून हवा न झाली.
—ऐ. ले. सं. १७०८

टाळेटोळे—पुंड, जमातदार, दंगेखोर,
विराप्पा वगैरे टाळेटोळे जमा होऊन मुलखांत धूम मांडली आहे
—मरा. कु. इ. भा. १

टाळें पाडणें—१ ज्या बाजूस सुरुंग खोदीत असतील त्याच सुमारे दुसऱ्या बाजूकडून सुरुंग खोदीत जाऊन त्यास भिडवणें. असे झाल्यामुळें आरपार हवा खेळून सुरुंग निकामी होतो यास टाळे पाडणें म्हणतात. २ भोक पाडणें. भगदाड पाडणें.

१ रात्रौ पडक्या बुरुजास बाहेरून त्यांनीं सुरुंग लागू केला. अगोदर दोन दिवस आम्हास कळताच आम्ही बुरुजात टाळे पाडिलें होते.

—ऐ. ले. सं. पृ. २३५

२ एक सुरुंग किल्ल्याचें भिंताड टाकून आंत गेला आहे, त्या सुरुंगानें रात्रौ टाळें पाडून फौजेची फौज आंत जावी असें केलें आहे.

—ऐ. ले. सं. १६९७

टिकलीदार कागद—कागदाचा एक प्रकार.

—पे. द.

टिका, टिक्का—राज्याभिषेक विधि, गादीनशीन होण्याचा समारंभ.

टिक्याचा हत्ती चांगला व घोडे उत्तम वगैरे सामान समागमे घेऊन येणें.

शि. शा. इ. सा भा १ पृ. १३३

टिका—मान, जबाबदारी.

कैलासवासीं तुम्हास वडील होते. हरयेक लेकूरपण तुमचें चालवित होते. तो वडिलपणाचा टिका आतां तुम्हास आहे. भलतसें लळे चिरंजिवाचें पाळावे हे उचित आहे.

—पे. द. ३ पृ. ७४

टिकोर पडणें—कटकट, त्रास, गोंधळ होणें.

पागेच्या घोडीचा पायें नळींत जाऊन, टिकोर पडले, घोडी मेली.

—पे. द. ९ पृ. ४१

टिपणीस—टीप म्हणजे मोजणी करणारा एक अधिकारी. गांवांतील घरादिकांची टीप करून त्यावर पट्टी ठरविण्याचे याचे काम असें.

टिपऱ्या घालणें—हा एक जुन्या काळचा छळाचा प्रकार; हातांपायांस किंवा स्तनांस दोरीचा पीळ भरून तो पीळ एका लांकडी दांडीस गोऊन ती दांडी फिरवून पीळ अधिकाधिक दृढ करणें.

१ दादासाहेबांनी गांवगन्ना खंडण्या मनास येतील तशा घेतल्या, टिपऱ्या घातल्या. एकदोन खूनही केले.

—ऐ. ले. सं. ३४४

२ आजपर्यंत बहुत दंगे जाले. परंतु असें अरिष्ट झाले नाहीं. कोणतेहि विशीं अब्रु राहिली नाहीं. बायका धरून टिपऱ्या घातल्या, असा अग्नीचा पाऊस पडला आहे !

—ऐ. ले. सं. ७०२५

नाईक मजकुरांनीं घरी टिपऱ्या माणसास घालून घोडी पिढी व माणसे यांचा अनर्थ मांडिला आहे.

—पे. द. ३० पृ. १३४

टिपावण—ठरलेलें किंवा ठरविलेलें.
इतरासी हाली व पहीले जे कांहीं टीपावाण व्याज दिधले आहे त्याप्रमाणें कलमी गोष्ट धरलीया मुबलग वाजवी होतात.
—हिं. द. खंड २ पृ. २९

टिपून—नेमकें; निश्चयात्मक.
आधीं त्यांच्या फौजेचा मुकाबिला घेऊन फौजेचा विसकट पाडावा. फौजेचा आब गेला म्हणजे त्यांचीं ठाणीं ठुणीं घ्यावयास संकंट नाहीं. विना त्यांचा जथ विस्कलित झाल्याखेरीज टिपून लिहितां येत नाहीं.
—ऐ. ले. सं. २५६३

टिबा—याद्या, टिपा.
हुंडी वाटे लावावी म्हणून सावकारास बोलाविले जे पंचविसा हजाराच्या टिबा दिधल्या त्याची हुंडी करून देणें.
—पे. द. १५ पृ. १८

टिळा—टिळा वठविण्यासाठीं केलेला नाम.
गंध राहील ते जपोन दुसरे दिवसास राखीत जावें. ताम्हाने वाटचा व साकळचा टिळे सोन्याचे व रुप्याचे.
—लेख पृ. १२४

टुक—इच्छा; अपेक्षा; सांगी; प्रतिष्ठा.
आमची दौलत खाली आणि मसलत तो स्वामीचे टुकेप्रमाणें करून दाखविली पाहिजे तेव्हां किती जड जात असेल ध्यानास येईल.
—नाग १ पृ. ७०

टुमणी—गांवच्या महाराला देणगीदाखल दिलेला जमिनीचा लहानसा तुकडा.
—विलसन

टुमणी—चाबूक किंवा पराणी.
—रा. व्य. को.

टेक—बाणा.
परशुरामभाऊंनीं आजपर्यंत शिपाईगिरीची टेक राखिली, तैसीच शेवटास नेऊन दाखविली, ही तारीफ पत्रीं कोठवर लिहावी ?
—ऐ. ले. सं. ६१०७

टेक राखणें—बाजू सांभाळणें, बाणी राखणें.
यंदाची टेक याणी राखली. आपल्यास महत यश प्राप्त जाहले.
—हिं. द. खंड १ पृष्ठ ३७

टेंभी—टेंभ, टेकाड, टोंग, उंचवटा.
गोंवळकोटास तोफा पाठविल्या त्याणीं काळुसतीयाच्या टेंभीवर मुर्चेबंदी करून मार करीतात.
—पे. द. ३ पृ. ९७

टोकरा—नांव.

नदीयास टोकरे नाहींत. —पे. द. ३ पृ. १५

टोंकली—टोळी, जमाव. जथ.

महादजी नाईक व वणगोजी नाईक माने पाटणकर यांनीं टोकली करून एकेजागा उभें राहावे. —पे. द. भाग २५ पत्र नं. २६३

टोंगाईच्या गोष्टी—टौरीपणाचें वर्तन, उद्दाम वर्तन.

दरम्यान मुलकास नाना प्रकारच्या टोंगाईच्या गोष्टीं कोणी केल्यास हुजुरून परिपत्य करावें. —म. कु. इ. साळुंके ७७

टोंगी—टोंग, उंचवटा.

आमचाहि मोर्चा धामणीचे टोंगीवरी जागा बांका आहे तेथें कायम होईल. —पे. द. ३ पृ. १५४

टोणपा—दंडा.

पिलाजी हुजरातीस चाकर होता. त्यांनीं टोणपीयाचा वार केला. तें समयीं तुम्हीं त्याचें रक्षण केलें. सबब मौजे ओझरडें येथील सरकारचे शेरीची जमीन निम्मे चावर इनाम दिली असे.

—रा खं. ३ पृ. ५३

टोणपेबाजी करणें—सोटे लगाविणें; काठ्या मारणें.

होनाजी बलकवडे याणी सिपायावरी टोणपेबाजी करावयास लोक पाठविले. (हल्ल्यांतून पळून माधारें येतील त्यांस काठ्या हाणून परत हल्ल्यांत पाठविण्यासाठीं) —पे. द. ३३ पृ. ३८५

टोप—चौकी.

शहापुर किल्ल्याच्या दरवाजांत दांडगाई होतांच दरवाजकरांनीं दरवाजा लोटला व टोपांनीं वगैरे लोक होते त्यांची लढाई होऊन २–४ असामी ठार जाले. इकडे नारोपंत दुर्गाडीच्या दरवाजांत शिरोन मारीत वाड्याकडे चालले. त्यांचें पिच्छावर जिभींतील रायचंदाकडील लोकांनीं चाल केली. दरवाजास अग्न दिली होती, परंतु जिभींतील लोकांनीं विझविली. —ऐ. ले. सं. ६८२५

टोपीकर—सर्वसामान्यत: युरोपियन असा अर्थ. परंतु सोयीप्रमाणें पोर्तुगीज, इंग्रज, फ्रेंच यांचाहि विशेष निर्देश करितांना तो वापरीत.

टोपीकराचा उपमर्द करावयास पूर्वी राजश्री व्येंकटरायास रवाना केले होते (येथें टोपीकर म्हणजे पोर्तुगीज) —पे. द. २८ पृ. ७

टोपी घालणें—नुकसान करणें.

रावतांची समजावीष पूर्वींच केली म्हणून लिहिलें. वरसापेक्षां ती चौहाजारास टोपी घातली.

—पे. द. १८ पृ. ५३

टोपी वसणें—नुकसान होणें. नाश होणें.
वारंवार यांसी अर्ज करितो कीं पागोटीयाची आबरु सोडून टोपी घालाल तर पुरती टोपी बसेल. —राजवाडे खंड. १२ पृ. २७

टोळखाद—टोळधाडीमुळें झालेलें नुकसान.
१ तालुका खरावी. नापीक. टोळखाद. याची विनंती सरकारांत व्हावी. —ऐ. ले. सं. ६१२५
२ सातआठ वर्षें टोळखाद व वळसरा होऊन कर्जाचे पेंचांत बहुत आलों. —ऐ. ले. सं ४२६०

टंकार, टंकारा—नौबतीचा एक प्रकार.
नौबती टंकारे ऐकून अगदी तोफांचा मार (शत्रूनें) आम्हांवर धरला. —ऐ. ले. सं. पृ. १५२३

टंगचाई—तंगचाई; टंचाई.
आम्ही कर्जदार; नित्यखर्चाची टंगचाई. रुपये कोठून देणार ? —ऐ. ले. सं. ४२४

टेंबा, टेंभा उभा राहणें—जोरा सुरू होणें, नारा नाचू लागणें.
श्रीमंत दादासाहेबांचा टेंबा उभा राहिला ! आतां श्रीमंतांची व नानांची अवस्था काय होते, देव जाणें ! —ऐ. ले. सं. ३१६७

टोंगपण—धटाई; जबरदस्ती.
असें झाल्यास सारीं खुळें मोडतील. नाहींतरीं जो बळी मारून खाईल तो खाईल. टोंगपण करील तो करील, असा प्रसंग होईल. —ऐ. ले. सं. २४८९

टोंगाई—धटाई, मूठमर्दाई, अडदांडपणा.
संभापूर येथील पेठेंत बाजारास कसबे पाटण येथील लोक जात होते. त्यास तुम्ही धरून नेऊन अटकाव करून मारामार केली म्हणून विदित जाले. दरम्यान मुलकांत नाना प्रकारच्या टोंगाईच्या गोष्टी कोणी केल्या. असलें बर्तमान (प्रकार) तुम्हांकडून न व्हावे देखतपत्र कुळे सोडून देणे. — मरा. कु. इ. साळुंके पाटणकर

ठ

ठकणें— (verb. To kill outright as a serpent by a bite, thieves in an attank. There is an implication of suddenness and unpreparedness.) ठार होणें, नष्ट होणें, मरणें.

१ कदाचित् पलटणें मनोळीवर आलीया त्याजवर तोंड टाकूं ऐसेंहि आपले मनांत आलें. तथापि मनसवा चांगला नाहीं. ४ माणूस जाया झालें, पुरवलें पण १० घोडीं ठकलीं म्हणजे प्राणासी गांठ आहे !

—ऐ. ले. सं. ६८१२

२ आप्पासाहेबांस नाकावर जखम आहे. बापू गोखल्यास डोळ्यापाशीं व मनगटावर. गोखले चुलतेपुतणे उभयतां ठकले.

—ऐ. ले. सं. ६६४६

ठकवणें—फसवून आंत पाडणें.

(अवतरणासाठी 'डाहारा' शब्द पाहा)

—पुणें अखबार भाग ३ पृ. १५०

ठक—(?)

तरी या वतनाचा हक्क लाजीमा, इनाम गांठ, व इनाम जमीन व बलुत्याची राहणुक पटीपासोडी, सनवार, बीजवकरा, खलेती, दिवटी, बाजार, चांउक, ठग, शेलधार, मानपान, तशरीक, सुदामत भोगवटीयाबद्दल चालत आलें असेल त्याप्रमाणें अनभवून सुखरूप राहणें.

—रा. खं. ३ पृ. ११९

ठपका—क्रम; लागण; रांक.

स्वार झालों त्या दिवसापासून दर कुचात घोडी मरावयाचा ठपका लागला तो आजपर्यंत तैसाच चालला आहे.

—नाग १ पृ. २३३

ठर—ठराव; निश्चय; सिद्धान्त.

१ कोणते मार्गें जावयाचा ठर होतो, हें पहावें.

—ऐ. ले. सं. ४०७५

२ आजीच्यास (आजमितीस) ठर जाहला आहे, कीं, यंदा धारवाडावर छावणी करावी. कृष्णेपावेतों मुलुख सर करावा, ही मसलत.

—ऐ. ले. सं. ३२५९

ठराव—राहणें; मुक्काम करणें. थोपणें, थबकणें.

माघारें कूच करून जाण्याच्या मतलबें इंग्रजांनीं मोती तलावाचे सुमारें मुक्काम केला. इतक्यांत श्रीमंतांच्या प्रतापें लिहिल्याप्रमाणें आमच्या व त्यांच्या गांठी पडतांच त्यांचा ठराव जाहला.

—ऐ. ले. सं. ४५११

ठसा—अब्रू; दबाव (कीर्ति)

नासरजंग बापाच्या हाताखाले तरबीयेत जाला आहे. बाप असताहि कांहीं दिवस दक्षिणेंत ठशानें राहिला.

—पे. द. २५ पृ. ८९

ठाकूरकी—अब्रू, आब.
तरी ज्या तऱ्हेनें कळेल तैसाच विचार करून ठाकुरकी राखोन चमेल उतरोन अलीकडे येतो.
—म. शि. यां. का. पृ. ७१२

ठांचून राखणें—ठेचून राखणें; ठासून राखणें, जागचेजागी चेंचून थोपविणें.
हुपरीचे ठाणेयावर युद्ध जाहाले. परंतु हस्तगत जाहले नाहीं. ठाण्यातील लोकांनीं चव्हाणास बाहेरच ठांचून राखिला.
—पे. द. ११ पृ. ३३

ठाण्यापरत—ठाण्यापुरते.
तेथे ठाण्यापरत २।४ शें माणुस राहून बाकी पलटणे ममई व वसईकडे गेली यैसी वदंता आहे. —पुणें अख. भाग २ पृ. ५९

ठाणगुलाम—घरगुलाम.
दसपटीचें सतरा गांवी पाटीलकी हक्क हक्कदारी व ठाणगुलाम असतील त्यासुद्धां वंशपरंपरेने चालविणे.
—द. शि. मो. इतिहास पृष्ठ ४६

ठाणपती—ठाणेदारीचा अधिकार किंवा दरक.
हैबतराव यास सा आढाण्याची ठाणे बंदराची ठाणपती सांगितली.
—बिंब ५

ठाणा—(पुल्लिंगी) ठाणें.
पुढें कांहीं प्यादे पाठवून परगणे शहापूर येथील खेडयांस ठाणा घातला.
—ऐ. ले. सं. ३९६८

ठाणीजात—सर्व ठाणीं. ठिकठिकाणचीं ठाणीं
हे हस्तगत होतांच गजेंद्रगडचें उरकून धारवाडास येणार. मध्यें असलीं ठाणींजात, सर करीत जाणें हेंहि आहे.
—ऐ. ले. सं. ३२५९

ठाणीं ठुणीं—ठाणीं बिणीं; लहान मोठीं ठाणीं.
हैदरखानाकडील फौज अत:पर ठाणींठुणींयांचे गळीं पडत नाहीं.
—ऐ. ले. सं. १६८३

ठाणें जमविणें—ठाणें बसविणें.
पिराजी गायकवाडांनीं नवापुरापुढें अरण्यांत जागा कायम करून छावणी केली. ठाणें जमवावें या मनसब्यानें डोंगरी पाहून किल्ला बांधून सोनगड नांव ठेविलें.
—गायकवाड यांची हकीकत काव्येतिहास—
—संग्रह पृ. ३८

ठाणेदार--ठाण्याचा अधिकारी. याचा दर्जा फौजदाराच्या खाली असे. या ठाणेदाराच्या हाताखाली थोडीशी शिबंदी असे.

ठाणें बोलूं लागणें—शरण येऊन अभय मागूं लागणें.

जुनी हुबळी बोलूं लागली. परंतु ठाणें बसेनासें जालें. विना तोफांशिवाय ठाणें कसें येतें हें समजल्यानंतर खासा स्वारी तोफखान्यासुद्धां हुबळीवर मुक्कामास गेलों. —ऐ. ले. सं. ४३६९

ठानहदार—ठाणेदार.

ठाव—ठिकाण.

वऱ्हाडात पैका मिळावयाचा ठाव दिसत नाहीं.

—पे. द. १३ पृ. २२

ठावणें—ठेवणें.

फौज ३,००० आहे. पायदळ २,००० पर्यंत आहे. नवे लौक आल्यास ठावतात. परंतु राऊत कोणी आतां येत नाहींत. पायींचें माणूस थोडें बहुत येतें. —ऐ. ले. सं. ५४८०

ठास—समजूत.

दाभाडियाकडील लोकाची ठास कांहीं थोडी बहुत आठाचौरोजांनी होणार आहे. —E. M. P. पृ. १८

ठास—खडतर; कठीण.

तिकडे ठास लागलें म्हणोन हैदर इकडे चांचपावयास आला आहे.

—ऐ. ले. सं. ११८०

ठास देणें--टक्कर देणें.

सारांश मातबर फितूर गाईकवाडाचा आहे. त्याचे निराकरण जाले पाहिज. घाटामाजी सारे जमा होऊन बरे वजेने ठास देणें.

—पुरं. द. भाग १ पृष्ठ २४७

ठिकरें—खापर.

म्हातारपणीं अपेशाचें ठिकरें घेतलें. —हो. कै. पृ. ११७

ठिकाण—विश्वसनीय; पक्के.

ऐकले तें तर ठिकाणवाध (खोटे) लटके व्हावेसे नाहीं इतक्यांवर न कळें.

—म. शि. यां. का. पृ. ५००

ठिकाणसूध—माहितीचा, माहितींतला, ज्याचें राहण्याचें ठिकाण माहित आहे असा.

वेढा आहे तो उधळावा ऐशी बोली बाणकोटची आहे. ब्राह्मण ठिकाणसूध राजपुरीहून बाणकोटास आला. त्याणें सांगितले त्यावरून लिहिले असें.

—पे. द. ३ पृ. १३७

ठिकाणी लागणें—मरणें.
अवतरणासाठीं 'पाणी लागणें' शब्द पाहा. —इ. सं. चिना.

ठिकाणीं लावणें—ठार मारणें.
विरम्माजीनें बसवलिंगाप्पास दूर केले शिवलिंगाप्पास सर्वाधिकार दिल्हे राजेहि ठिकाणी लागले. वंकापूरच्या सेटयाचें मूल आणून राजी बसविलें आहे. —पे. द. २८ पृ. २२७

ठिकाणीं लावणें—पत्ता पाडणें.
त्याच्या लष्करांतून थेट बातमी येथें कळतच नाहीं. तशाहीमध्यें युक्तीनें ठिकाणीं लागेल ती बातमी लिहितों.
—ऐ. ले. सं. १५१७

ठिकें—जमिनीच्या अनेक तुकडयांचा गट किंवा पुंज.

ठिचरें—उसण.
चि. रा. संभाजी जाधव यासी नारू जाहला होता त्याणे मासभर श्रमी केले व आपणासहि नारूंनीं कष्टी केलें आहे आणि ठिचरें माजामध्यें (कंबरेमध्यें) भरलें आहे त्याणे उभे राहू देत नाही.
—पे. द.

ठुया रावा—राघूची एक जात.
ठुया राव्याविषयीं पेशजी पत्रें लिहिलें आहे. त्यास फकीर बोलला कीं मजपाशीं आणखी फकीर बसावयास येत असतात, त्यांजपाशीं आहेत. अथवा आणखी महिन्याभरानें घाटावरील मुऱ्यातील विकावयास येतील.
—ऐ. ले. सं. ७९३१

ठेंचगा देणें—आपटी देणें, शासन करणें.
फिरंगीयानीं लबाडी केली. पत्र पाठविले त्याचें उत्तर मगरुरपणें लिहीलें. याकरितां त्याला ठेचगा द्या म्हणून लिहीले. यैसीयास २–२॥ हजार माणूस सिद्ध करावें म्हणजे स्वामीचे प्रतापे कार्य सिद्धीस जाते.
—पे. द. १६ पृ. १२

ठेचून वाटे लावणें—पिटून पराभूत करून पळून लावणें.
थोरात व धिराजी वगैरे येऊन मुलकांत धुंदी केली. लोहगडचें पेठे-पर्यंत गेले तेथें लोहगडकरी यांनीं ठेचून वाटें लाविलें.
—पे. द. १० पृ. ४२

ठेप ठरणें—(एकाद्या गोष्टीवर) निर्णय अबलंबून ठेवणें. ठेप—निर्णय.
सोयराजी नाईक याणी मुधोजी नाईक यास दत्त (दत्तक) घेतला आहे. याची चौकशी सरकारातून बहुत जाली. नंतर क्रियेवर ठेप ठरली. दत्तक

जाला असी जेजुरीचे कासवावर क्रिया करावी (असें ठरलें).

—द. स. कै. या. पृ. ६७

ठॅप देणें—शह देणें, जवळ येऊन भिडणें. मुक्काम करणें.

भेलसे घेऊन अगदी मालवा हाताखाली घालून बऱ्हाणपुरास ठेप देतील यास्तव आम्हासच इंग्रजांचे पारपत्यास गेले पाहिजे.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ११३

ठेपेस लागणे—निकाल होणें, शेवट होणें, निर्णय लागणें.

सन १२१० फसली पेशवाईत पुणे मुकामी धांदल पडलें (दंगा बेकैदी बंड झाले) समई वेंकपय्या देसाई यानी संस्थानचे जावसाल ठेपेस न लागे सबब त्रास होऊन कुरुंदवाडास गेले व तेथून धोंडजी वाघास सामील होऊन त्यानी आपले डंबलचे ठाणे आपण गाठून घेतले (जिंकले, दाबले, मिळविले).

—द. स. कै. या. पृ. २५९

ठेवणाईत—राखीव.

आपला वतनाचा कजिया पूर्वांपार स्वामीस ठाऊका आहे. त्याची वाट केली पाहिजे. जणेंकरून पदरी यश पडे. तरी आपण पदरीचे ठेंवणाईत पूर्वीपासून आहे.

—पे. द. १७ पृ. ८७

ठेवणाईत—गुमास्ता.

अलीकडे राणुजी नाईक देशमुख याचे लग्न दुसरें साताऱ्याहून देशमुखीचा वेव्हार निवडून आलेसमयीं महुडीयांत जाले. हळदी लागल्या. गणेश पुजा अगोदर आम्ही व मोरभट यांनी केली ते समयीं बालंभट हल्ली येसभट याचा बाप मोरभाचे पदरचे तांदूळ व खोबरेची वाटी सोडून घेतली. त्यावरी बोलला कीं तुम्ही आमचें ठेवणाईत यैसे बोलला. यामुळें त्याचा आपला कजीआ वाढत चालला.

—ऐ. सं. सा. खं. ४ पृ. ७०

ठेवणें—लपवून किंवा पुरून ठेवलेला धनाचा साठा.

ठोकरा—टोकरा; नाव.

कृष्णा उतरण्यासाठीं नावा, ठोकरे जमा करविले आहेत.

—ऐ. ले. सं. ४३४७

ठोका—पिकांतील काही हिस्सा घेण्याच्या अटीवर जमीन दुसऱ्यास कसावयास देतात त्याला ठोका म्हणतात.

ठोठार—एका धडाक्यांत ठार.

दारूखान्यास अग्न लागली दारूखाना वुर्जात होता तो वरूजच घेऊन उठला त्याणे मोठा प्रळय जाला त्याने ११०० मनुष ठोठार जाहले व चार पाचशे जखमी जाले. —नाग. २ पृ. १३९

ठोसरा—आरोप, दूषण, आक्षेप.

जन्मभर ठोसरा तुम्हांवर राहील कीं आमचे सोयरे धायरे आप्त यांनीं पैशावर नजर ठेवून मुलाच्या लग्नांत वेध पाडला. --हो. कै. पृ. १८४

ड

डक—हजिरीपट.

स्वार जमातदारानीं लिहवावे, आणि पुढे दाखलादुखला कांहीं नाहीं. त्याजप्रमाणें डक भरून द्यावा. जातीचा कारभार. कोण्ही कोणास मानीत नाहींत. याजमुळें त्याची फौज कितीक उठून कडपीयासी गेली. —पे. द. २८ पृ. १०९

डकार—ढेकर.

प्रात:कालीं पूजनोत्तर अथवा जेव्हां सरबत घेणें मर्जीस येईल ते समयीं एक तोळाभर हें पाण्यांत घालून घेतल्यास डकार सुगंध (सुगंधी) येईल. —इ. सं. दि. म. रा.

डंग—A pounding apparatus. कुटण्याचे किंवा कांडण्याचें उखळ मुसळ.

दारूचे तीन डंग लाविले आहेत. दररोज ३५ शेर नवी होती. काम तडका चालतें. —ऐ. ले. सं. ६१८६

डंग—किर्र झाडी, विशेषेंकरून सह्याद्रीचे माथ्यावरील किर्र झाडीस डंग म्हणतात. (डांग म्हणजे जंगल.)

वसईपासून बादलापारडीपर्यंत कोळ्यांहीं मोठा अनर्थ आरंभिला होता. त्यास हुजूरून फौजा आल्या. जव्हार देखील घेऊन तमाम कोळी डंगांत पिटून लाविले. —ऐ. ले. सं. पृ. ४

डफगन्यांत येणें—डबगण्यांत येणें, डबघाईस येणें.

कर्जाचा भरणा करून रोकड रुपयाचा मुलुख रतकर्ज (रदकर्ज म्हणजे कर्जाच्या फेडीसाठीं) लावून घेतला. तीन लाख रुपये दरमहा उचक-खर्चास महंमदअलीखानास देतात कांहीं एक दिवशीं तोही मिळणार नाहीं. सवस्थान डफगन्यांत आलें. —स. ब. पृ. ३५

डफगर—नौबती नगारे इत्यादिकांवर कातडी चढविणारा कारागीर.
नौबत तडकली. मढवावयाची आहे. त्यास डफगरास कातडी देऊन पाठवावयाची आज्ञा जाली पाहिजे. —ऐ. ले. सं. ७३३०

डबी—देवापुढील पेटींत यात्रेकरू किंवा दर्शनेच्छू जें द्रव्य टाकतात ते. देवालयाची कोठी.
१ श्रीदेवीचे यात्रेस डबीविषई वगैरे कोणे विषयीं तुम्ही मुजाहीम न होणें (अडथळा न करणें.) —विल्सन
२ शिवनेरी किल्ल्यावरती पहिले डोंगरास भुयार होतें. त्यांत देवी होती. त्यास तेथें देवीचे नवसाबद्दल व यात्रेबद्दल डबीचा ऐवज जमला होता. —ऐ. ले. सं. ८१३४

डबीर—१ अष्टप्रधानापैकी एक. २ लेखक, कारकून, चिटणीस.

डरडाफर—दमदाटी. दहशत घालणें, दबाव करणें.
१ माणकोपंत रुसोन कण्हेर न्हावी पावेतो आले आणि डरडाफर केली जे वालंभटा ! तीन सण्या मल्हारभटाच्या खातोस तुजला कैशा जिरतील ? —ऐ. सं. सा. खं. ४ पृ. ६९
२ राजेश्री राघुजीबाजी देशमुख कर्याती मलेवाडी तेथें गेले. तेथून डरडाफर करूं लागले. —शि. च. सा. खं. ५ पृ. २३५

डवणा—डोहाणा, दंगा.
खानदेशप्रांते राऊत रवाना केले आहेत. जागा जागा डवणा करितात. —पे. द. १२ पृ. ७१

डवला—डवळा, ढवळाढवळ, डहुळा, दंगा.
१ तमाम मुलकानें हवसा खादला आहे. या प्रांते महिना दोन महिने राहावे तेव्हां बाकीचा निर्गम होईल. तों त्यास तांब्राच्या डवल्याकरितां राहता येत नाहीं. —पे. द. १७ पृ. ८६
२ कारभार मालीमामल्यांचा वगैरे शहानवाजखानाने करावा, हैदरजंगाने कारभारांत डवला न करावा, याप्रकारें जाले आहे. —E. M. P. पृ. १८९

डंशिक—दंशिक; दावेदार.
आपण छावणीस राहिलां. खर्चावेंचाची ओढ, कारभारी डंशिक, महागाई फार, यास्तव अहोरात्र वडील चिंता करितात. —ऐ. ले. सं. ८५३

डहुणा—डोहणा, डोहाणा; दंगा.
बाजारी अफवा हुताशनीचे आंतबाहेरी मोठाच डहुणा होणार म्हणोन बोलतात. —ऐ. ले. सं. ५३४६

डहोला—तंटा, दंगा.

जर श्रीमंत येजमान आयेकत नाहींत तर मागती डहोला कजिया पाडावा असे हे साफ नागवे होऊन बोलतात. —पे. द. २० पृ. १०१

डळमळ—डळमळित; घाबरेपणा.

बंकापूर घेतल्यामुळें तमाम मुलूख भयाण झाला. येथेंहि डळमळ झालें आहे. —ऐ. ले. सं. ५८२

डाकचौकी—गावोगावाहून पत्रांची ने-आण करण्याकरिता ठिकठिकाणीं अंतराअंतरावर माणसें ठेऊन पत्रें जलदीनें नेण्या आणण्याची केलेली व्यवस्था.

राजश्री सुमंताकडील वर्तमान स्वामीयासी येका दिढा दिवसांत डाकचौकीनें येत असेल तें आम्हास लिहून पाठविलें पाहिजे. —पे. द. ३० पृ. २१८

डांक बसविणें—जलदीनें पत्रें पोचण्याची कांहीं योजना. पूर्वी हल्लीसारखी टपाल व्यवस्था नव्हती. पेशवे सरकार, सरदारलोक किंवा सावकारलोक आपापले जासूदजथे ठेऊन पत्रें नेण्याआणण्याची स्वतःपुरती व्यवस्था करून घेत. मधल्या निरनिराळ्या टप्प्यावर सांडणी घोडीं किंवा जासूद ठेऊन पत्रें जलदीनें नियोजित स्थळीं पोंचण्यासारखीं जी रिलेसारखी व्यवस्था तिला डांक बसविणें म्हणत.

सांडणीची डांक बसवून तुकोजी होळकर यांस सहावे दिवशी मजपाशी आणावे. —हो. कै. पृ. ४४

२ लष्करात दोनचार जोडया कासद नवे चाकर ठेऊन येकदोन जोडी आपणाजवळ व येकदोन जोडी नारो हरीजवळ ठेवितो तेथून छुटे कासदाबरोबर लष्करांतून पत्रें पाठवीत जाऊ. स्वामीची पत्रें डाकेंत नारोपंताजवळ येतील. तेथून छुटे जासुदाबरोबर आम्हाकडे येतील. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १११

डांग—जंगलमय प्रदेश, अरण्य.

खीचीच्या मुलखात हवा उतम नाही पाऊस फार डांग मोठी प्रक्रुतीस मानवणार नाही यास्तव चार दिवस सिरोंजेस राहून औषधउपाय करावा. —हिंगणें द. भाग २ पृ. ६४

डांगी किंवा डांगीयपणाची वृत्ति—घांटांतील जकातदाराचें काम.

तुम्हीं येऊन जाहीर केलें कीं, आपली वृत्ती डांगीयपणाची कसबा वांई येथील हवेली संमत व घांट व खांबटकी येथील मिराशी सालाबाद पिढी दर पिढी वडील चालवीत आले. —रा. खं. ३ पृ. ७

—पे. द.

डाभा—खिळ्याचा एक प्रकार.

डांभिक—लौकिक, दर्जाप्रमाणें करावयाचा मानसन्मान.

डांभिक पूर्ववत् चालणें तो पुढें श्नेहेस्नेह (स्नेहें स्नेह वाढल्यावर किंवा 'शनैः शनैः' असेहि असेल) वाढलीयाउपर चालेल.

—पे. द. ३३ पृ. ७८

डामाडोल, डामाडूल—डावाडोल; डळमळीत; अस्ताव्यस्त. घाबरे, त्रस्त.

१ प्रस्तुतकालीं गुजराथेचा मामला डामाडोल जाला आहे. याजकरितां पेशवे आपली दस्तगिरी करितील. —पे. द. ४०, पृ. ४७

२ सांप्रत तों डामाडूल जाहले आहेत जप्तीखाली येऊन कोण अमील होऊन येईल तो पहावा. —E. M. P. पृ. १७

३ आमचे लोक आत्ताच डामाडूल जाले आहेत.

—पे. द. ३० पृ. १६७

डाली—करंडी, टोपली.

हजरत शाहासाहेब औरंगाबादकर याजकडील अंगुराच्या डाल्या श्रीमंत व नाना यांस आल्या. —पुणें अखबार, भाग ३ पृ. ९४

डाव—मासे पकडण्यासाठीं कृत्रिम तऱ्हेनें डोह करतात तो.

आतांपासून दसरा दिपवालीपर्यंत माशाचें शिकारीचा हंगाम आहे. यास्तव माशाचें डाव जागजागा राजश्री स्वामीनीं घातलें आहेत. नित्य जाऊन गल टाकून बसावें. —पे. द. ८ पृ. १९

डाव—भाजल्याचा डाग.

श्रीमंती कोण्ही येक मूल राज्याचें वंशीचे जाणून ठिवलें होते ते ताराबाई-पासी वलखायास पाठविले; तिणें येक डाव कपाळावर व दोन दोन्ही जांघावर देवून काढून दिधलें. —हिं. द. खंड १ पृष्ठ ५२

डाव उचलणें—महत्त्वाकांक्षा धरणें; एकादें मोठें काम अंगावर घेणें.

आम्हीच अवसान टाकल्यास पांडुरंगरावांची सुटका कशी होईल? प्राण वेचीन परंतु चिरंजीवास दृष्टीनें पाहीन. मोठे डाव उचलोन घेऊन त्यांच्या सुटकेचा विचार होय तोच अर्थ होईल!

—ऐ. ले. सं. २७८१

डावाडाव—आवाडाव, उपव्द्याप.

योजिलें कार्य शकटभेदेंकरून साध्य झालें तर वरेंच जालें नाहींतर मोर्चे-बंदी करून बसावेच लागेल. श्यामल डावाडाव करू लागेल तर त्याचा वंदोबस्त उभयेपक्षीकडून जाला पाहिजे.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. २११

डावाडोल—विस्कळित, उत्साहरहित, निर्बळ.
आंग्र्याकडील लोक उठोन गेले यामुळें मोर्चाचें काम डावाडोल जालें आहे. —पे. द. ३३ पृ. २८१

डावी उजवी करणें—डावा हात व उजवा पाय किंवा उजवा हात व डावा पाय कापणें.
१ मानाजी आंग्र्यानें गोविंदपंत व राघोपंत यास धरून नेऊन सदरेस अगदी भेदाचे वर्तमान सरखेलीचा कागद मनास आणून त्या दोघाजणाची डावी उजवी केली. त्यात गोविंदपंत तेव्हांच निवर्तला राघोपंत वाचेल की मरेल हे न कळे पंधरा परवारीही मारले.
--पे. द. ३३ पृ. २८०
२ या शिक्षेबद्दल खोपड्यांच्या घराण्यांत अजुन खंडोजीचें डावें उजवे झाले होतें अशी स्मृती आहे.
—भा. इ. सं. त्रै. व ८ अं. १२ पृ. ९६

डाहारा--खाडा, खड्डा, गार.
सिमग्याचे सणांत छ १६ रोजी श्रीमंत प्राथ:काली वाड्याबाहेर येऊन दरोबस्त मंडळीस बोलाविले रा. दाजीबा फडके याचे शरीर बहुत अशक्त यास्तव त्याचे यावयाचा आनमान. तेव्हां श्रीमंतानी दप्तरचे कारकून याजला फडके मजकुराकडे पाठऊन त्याजला आणविले आणि विनोदार्थ शोभा फारच करविली. चिखलमाती डाहारियांत घालोन मंडळीस त्यांत परस्परे लोटविले ! नारो नीलकंठ मुजुमदार याजलाही डाहारियांत ठकविले होते. --पूणें अखबार, भाग ३ पृ. १५०

डाळ गळणें--डाळ शिजणें.
एक नानांची श्रीमंतांपाशीं मात्र डाळ गळत नाहीं. त्यासाठीं नानांनीं रास्ते यास सांगितलें कीं, परशुरामभाऊंच्या सुटकेविषयीं तुम्हीं विदुरद्वारें बोलणें. आम्ही कार्य होण्याविषयीं सिद्ध आहोंत.
--ऐ. ले. सं. ५१९६

डिंगमार—डेन्मार्क.
चौऱ्यांशी बंदरें घेतलीं. हब्शी, डिंगमार व लंदेज, नायर, शिद्दी, अरब, इंग्रज, वांचा, फराशी यांस शिक्षास्पद केलें. --चित्र ८४

डिगलें--डगलें (जाड कापडाचा अंगरखा).
तांदूळ बारीक ०८२ डाळ उत्तम ०८२ दोन पाइली हळदी बारीक १ येकशेर व डिगले व रजई यैसी पाठवून देणें.
—वै ४ स १७४४ पृ. २८

डिंगी:--एक गलबताचा प्रकार. —विल्सन

डुलणें—हातचें जाणें, गमावणें, नष्ट होणें, विसकटणें, कोसळणें, डळमळित होणें
१ सारांश, हिंदुस्तान तिकडे शिंदेवाया गेल्यामुळें डुलेसें जालें आहे. ही भ्रांत लोकांस वाटती. याजमुळें दौलतराव तिकडे जातीलसा भास होतो.
—ऐ. ले. सं. ६८०४

२ सर्व राज्यच डुलावयाचा सुमार आहे. मग दैव कळेना !
—ऐ. ले. सं. ५३४५

डेऱ्याचे दाँडे होणें—डेऱ्याचे कापड झडून जाऊन फक्त दांडे शिल्लक उरणें. भावार्थ-गळाठा किंवा दुर्दशा होणें.
तुम्ही जाऊन तुमची भेट होयास वर्ष सहामहिने पाहिजेत. इतक्यांत तुम्ही खर्चाचें कोचवणीत येऊन डेऱ्याचे दांडे होतील ना !
—हो. कै. पृ. ८५

डेरे दांडे—तंबू, राहुटचा इत्यादिक सामान. त्यांस लागणारी लागलागवड.
श्रीमंतांस डेरेदांडे येथून रवाना जाहले होते. परंतु त्यांनीं घेतले नाहींत. बाहेर उघडे बसले आहेत.
—ऐ. ले. सं. ५६६०

डोई—पिढी.
१ रत्नोजीपासून महिमाजी पावेतो चार डोया मोकदमी गव्हाणे याणी चालविली.
—ज्यु ३३०
आपण मेहरबान होऊन मला सात डोया राज्य दिलेत पण हें माझे स्वांगानीं वभव येऊन मिळणार किंवा स्वप्नांत भोगणार, तें सांगावे.
—शि. प्र. व. पृ. ४

डोई उचलणें—पुंडावा सुरू करणें.
कोणी दाबता पुसता नाहीं. पेशवाई बुडाली असेंच काटक लोक मानतात, त्यामुळें भलताच डोई उचलतो.
—ऐ. ले. सं. २४४९

डोईउचला—डोई उचलणारा, बंडखोर, उपद्व्यापी.
वरुषानुवरीस त्याची क्षीणगतीच आहे. परंतु पुढे डोईउचल्यास ठाव नसावा (म्हणून) फिरंगी बिलकूल काढावे. कारण ते पैके देऊन पुढें नाही ते फिसावे करवितील.
—E. M. P. पृ. १४०

डोई देणें—कार्यभाग उचलणें.
स्वारीचें ओझें तुमचे डोकीवर आहे. यामध्यें पोक्त मोठे तुम्हीच आहा. तुम्ही डोई दिल्याशिवाय पल्ला येणार नाहीं.
—खडर्याची स्वा. ब. पृ. १०

डोईवरील पदर काढणें—उघडपणें खरें स्वरूप प्रकट करणें.
सरदाराकडील विशेष उत्पात डोईवरील पदर काढून करणार किंवा निष्ठा उत्तम आहे? दंडकास काय करितील? इतकाच प्रकार आहे.
—पुरं. द. भाग. १ पृष्ठ २११

डोकें उचलणें—वंड करून उठणें किंवा आव्हान देणें.
मारवाडवाल्यानें डोकें उचललें आहे अजमेर घ्यावी हा त्याचा इरादा आहे त्याचे मुकाबल्यास फौजेची योजना जाहली आहे.
—हो. कै. पृ. १०४

डोके-देणें—जिजिया कर. हा हिंदूंवर औरंगजेबानें लादलेला कर. हा कर **दरडोई द्यावा लागत असे.**
तों इकडे जयपूरवाले, जोतपूरवाले वगैरे रजवाडे यांजवर पातशाही कर तिसरें वर्षांत डोके देणे लागत होता. या त्रासाने आपले जागा दिक्क. मनांतील धर्म कीं, कसेही करून बादशाहीस धक्का द्यावा.
—हो. कै. प्र. ८

डोखला—टांकें (पाण्याचें), विहीर, डबकें.
तळयांतील पाणी कालपासून जेज्यालानीं पाणी बंद केलें आहे. डोखल्यातील मात्र पाणी शत्रूस. आम्ही रात्रीस त्यांत सेर घालितो परंतु सकाळीं काहाडन सायंकाळचे दहावीस घागरी पाणी शत्रु नेतो.
—पे. द. १६ पृ ४१

डोंग किंवा डोंगा—लाकडी सोट किंवा तक्ते घालून बांधलेला तराफा.
नदींत येऊन तेथून दीडकोस पाण्याचा डोहो मातबर होता तेथें डोंग्यांत बसून जाऊन भोयाकडून मासे धरविले.
—नाग १ पृ. ३२६

डोंगरकडासी—डोंगर कठडी वा डोंगराची बाजू.
जिरात पायेमाल होऊ लागली म्हणून डोंगरकडासीनें सिवगांव परगण्यांत आलों.
—पे. द. २५ पृ. ३

डोंगर किनारा—डोंगरकिनारी; डोंगरकठडा.
आम्ही लांब लांब मजला करून जाटाचे मुलखांतून नेवातीयाचे सरदे (सरहदें) डोंगरकिनाऱ्यानें चाललो.
—ब्र. च. पृ. २५

डोंगर माजून राहणे—डोंगर बळकाऊन राहणे.
भिलांचें पारिपत्य चांगले जाले नाही. प्रस्तुत आणखी जमाव करीतच आहेत. डोंगर माजून राहिला आहे.
—चं. चू. द. पृ. १५५

डोंगरी मोर नाचविणें—वढाया मारणें, थापा मारणें, चाळवण्या दाखविणें. आढ्यतेखोरपणानें वागणें.

तेथोन सुभेदारानी कुच करून महादजी शिंदे यांच्या भेटीचा इरादा धरला. आजपावेंतो डोंगरी मोर नाचविले आतां अवघड पडले असें जाणून पाटीलबावानी आवा चिटणीसास सामोरें पाठविलें.

—इ. सं. हो. कै. पृ. २३

डोंगा-डोंगी, डोंग्या.—१ एक तऱ्हेचा मोठा २ तराफा, होडीचा प्रकार.

१मग आपण व उभयता कारभारी यैसे नदीत जाऊन डोंग्यावर बसून प्रहर दिवसापासून दोन घटका रात्रपर्यंत खेलत होते. मग श्वारी गोटास आली.

—राजवाडे खंड १२ पृ. १९७

२ दुसरे दिवशी प्रातःकाळीच उठोन डोंग्यांत बसोन पलीकडे जाऊन बावास (तुकोजी होळकरास) वर्तमान सांगितलें. बहुत आनंदयुक्त जाहले.

--हो. इ. सा. प. खंड १ पृ. १९५

३ तिसरे प्रहरीं डोंग्यात बसून नदीत खेळले. कलवांतीनही डोंग्यावर बसविल्या होत्या. उपरांत पोहले. कलवांतीनहि वुडविल्या भिजविल्या.

—नाग २ पृ. ७०

डोण किंवा डोणी—एकच शीड असणारें गलवत किंवा मचवा.

--विलसन

डोंब—धूर.

अग्न लाविली तर वोला ताडांचा मेढा जलणार नाहीं—डोंब होऊन टाकणारास पळता मुस्किल होईल.

—पे. द. १६ पृ. ४७

डोल—पाणी वहाण्याची पखाल्याजवळची कातडी बालडी.

—रा. व्य. को.

डोल्या—लहान कातडी बादली.

—विलसन

डोलची—पाणी उपसावयाची कातड्याची पिशवी.

—पे. द.

डोलजावसा—पुढचें शीड.

—कु आं. ढ. ३९४

डोली—मासे पकडण्याचें जाळें.

त्याचा शिरस्ता कारकीर्द श्यामल चौतीस दालधापैकीं निम्में सतरा वेठे

द्यावे. त्याचे पोटास सेर व धडवती द्यावी आणि वेठीची चाकरी द्यावी. घरी सतरा असामी राहतील त्याणीं डोली लावून उदीम करावा.

—पे. द. ३४ पृ. ७८

डोहलोट—पूर (?) महाराष्ट्र शब्दकोशांत 'डोहलोटी' म्ह० ज्येष्ठ शु ॥ १५ असा अर्थ दिला आहे.

कृष्णेस डोहलोट जाला. मुख्याची आज्ञा कीं, मऱ्हाटे उमराव याची फौज पलाडल्याचे तीरास बसालतजंगाचे मुलखांत पाठवावी.

—पे. द. भाग ३८ पत्र नं. १२८

डोहवण--बखेडा.

प्रस्तुत निमित्यास त्यास करून हे डोहवण करितात; परंतु परिणाम शुद्ध नाहीं.

—ऐ. ले. सं. १०२

डोहवण—डोहणा. डोहाणा. दंगा, फंद-फितूर.

श्रीमंत दादासाहेबांची अंगेजणी कर्तृत्व साहसकर्म, करतील न करतील, हे सर्व कळोनच गेले आहे! परंतु प्रस्तुत निमित्तास त्यास करून, हे डोहवण करितात.

—ऐ. ले. सं. पृ. १०२

डोहाणा—दंगा, बंड.

खुशाल शहर राखून गावांत राहावे. जागजागा सनदापत्रा आईसाहेबाच्या घेऊन डोहाणा मांडिला त्यास कापून टाकणें.

—पुरं. द. भाग १ पृष्ठ १९४

सारांश गोस्ट हेच, झाशीवाले डोहाणा करितात.

—पे. द. भाग २९ पत्र नं. १३४

डोहीं पडणें—संकटांत पडणें.

तेथील ताकीद आल्याव्रेरीज कोणी बोलणार नाहीं. परंतु ढल्याचे डोहीं पडलों आह्मीं.

—पे. द. भाग २९ पत्र नं. २७०

डोळयाचे दिवे करणें—सतत नजर ठेवून अत्यंत काळजीनें जपणें.

१ माउलीचे कष्ट कुठेरे फेडू देवा ।
तळहाताचा पाळणा नेत्राचा केला दिवा !
२ म्यां केला रजाचा गज लहानाचा थोर।
म्यां डोळयाचे दिवे केले आजवर।
म्यां केलें हताचें पाळणे तळ हातावर ।

—ऐ. पो. के. खं. २ पृ. १९०

डोळ्यांत सळई फिरविणें—डोळे काढविणें.

गुलाम कादरानें दिल्ली हस्तगत करून बादशहाचे डोळ्यांत सळ्या फिरविल्या.

—हो. कै. पृ. ९७

डोळे चोरणें—फसविणें; डोळ्यांत धूळ टाकणें.

मीं न बोलता याणी मला म्हटले की कारभार तुम्ही करावा त्याप्रमाणें करीत असता मला डोळे चोरावयाचें कारण काय ?

—नाग २ पृ. १०१

डौल—साताराच्या छत्रपतींच्या खासगीकडे नेमून दिलेली नेमणूक किंवा तिचे बजेट.

मौजे येरोळे हा गांव सातान्याचे डौलाकडे आहे. तेथें काहीं गेली होती. गांवच्या लोकांनीं घुडाविलेवरून कोल्हापूरच्या लष्करानें स्वारी करून गांव लुटला. —ऐ. ले. सं. ५५०४

डौलाचे खर्चास पांच लक्षपर्यंत सरंजाम माहाल नेहमी लावून द्यावे.

—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. ५०

डौल—मजकूर लिहून ज्याच्या नांवानें तें पत्र किंवा तो हुकूम किंवा करारनामा रवाना करावयाचा, त्याचे नांवाची जागा नांव लिहिण्याकरितां मोकळी ठेवलेली असते, असा जो कागद त्याला डौल म्हणतात. (डौल हा न. लिंगी शब्द आहे. अनेक वचन डौलें.)

१ लग्न चिठ्ठ्या पाठवावयाच्या, त्यांत १८ नांवें ठाऊक नाहींत. सबब डौलें विसाजीपंताकडे पाठविली. त्यांणीं नांवें भरून डौलें द्यावीं, आणि नांवनिशीची यादी मिरजेस पाठवावी. —ऐ. ले. सं. ४२३६

२ सर्वा सरदारास पत्रें नामनिसीवार पाठविलीं आहेत. व डौलेहि दहा पाठविली आहेत. ज्यास देणें असतील त्यांचीं नांवे भरून त्यास देणें.

—पे. द. २८ पृ. २३२

३ मोघम नावास जागा टाकून डौलें पाठविली लष्करांत नांवें भरून देतील. पत्रें सुमार २५. —मरा. कु. इ. भा. १

डौल—छत्रपतींच्या नांवचा अधिकृत कोरा कागद तो ज्याला दिलेला असेल त्याणे त्यांत तहाची कलमे किंवा इतर कामाची कलमे वाटेल तशी लिहावयाची. तो डौल अधिकृत असल्यामुळें त्या कागदाची जबाबदारी छत्रपतीवर राही.

डौल बांधणें—कारस्थान शिजविणें.

अंतस्ते त्यानी नानाप्रकारे डौल बांधले; जाहिरात मात्र आम्हाकडे.

—E. M. P. पृ. ९६

डौलाचा कारभार—सातारकर छत्रपतींच्या खाजगीकडे तोडून दिलेल्या मुलखाचा किंवा जहागीरीचा कारभार.

ढ

ढलायेत--ढालाईत--सरकारच्या हुकुमाची अंमलबजावणी सक्तीनें करण्यासाठीं पाठविण्यांत आलेला खास तगादेदार शिपाई.

हुजूर विदीत झाले त्यावरून हे पत्र सादर केले असे तरी कोलीयास ताकीद करून सरकारचे खासबारदार व ढलायेत पाठविले आहेत चोरलेले बैल त्यांचे स्वाधीन करा. —चं. चू. द. पृ. ७३

ढवणा—डोहणा; दंगा.

तेव्हां आज्ञा झाली कीं, राज्याचा ढवणा वारला म्हणजे त्यांची सुटका होईल. —ऐ. ले. सं. ५२५०

ढवळा—डोहळा, गोंधळ; दंगा, ढवळाढवळ.

अवतरणासाठीं नविस्तरवाद शब्दाचे अवतरण पाहा.

—हिंगणें दप्तर खंड २ पृ. २१

ढाणकास देणें—मांगास गुलाम म्हणून देऊन टाकणें.

दिल्लीपतीसारखा शिरावरी असता तुम्ही एकटे गोसावियाकरितां (रामदासांच्या दर्शनाकरितां) रानोरान फिरतां. कोण्हीहि धरून नेले म्हणजे आमची रांडापोरे सव्याच ढाणकास देतील आमचा जीव घेतील.

—शि. प्र. ब. पृ. १०३

ढाणकास वाटणे—१ शिरच्छेद करण्याकरितां मांगाचे हवालीं करणे २ किंवा शिरच्छेद केल्यानंतर गुन्हेगाराचीं मुलें मांगास गुलाम म्हणून देऊन टाकणें.

ढाणक—मांग

तू धनगराचे बीज मल्हारराव होळकराचा वंशज आहेस. पोटास भाकर, अंगास वस्त्र, बसावयास घोडें मिळेलच. परंतु आम्हासारख्याचे मस्तकी मेखसूची योजना होऊन रांडा पोरे ढाणकास वाटतील.

—हो. कै. पृ. १३९

ढाबळा—जमाव, थवा.

अवतरणासाठीं 'शोहरत' पाहा. —हो. कै. पृ. १५

ढाल—निशाण, झेंडा.

१ अकरा शाबानी मुजफरखान याच्या ढाला पूर्वेच्या रोखें गोटाबाहेर बाणाच्या टप्प्यांवर जाहाल्या. —पे. द. २८ पृ. १६७

१ आम्ही कूच करून गोरखोजी पाटीळ याचे ढालेपुढे जाऊन राहू.

—पे. द. १३ पृ. १

१ आंगरे यांचे निशाणावर शंखाचे चिन्ह १ झेंडा भगवे कापडाचा व ढाल भगवीच. —द. स. कै. या. पृ. २४

ढाल—उलाढाल, पराक्रम, कर्तबगारी.

ज्या सरंजामावरील येवढे ढाल केले त्याचा परिणाम कोणीकडे जाला बरे ? —पे. द. १५ पृ. ४७

ढाल—छाती.

दिलेलखान याणे शिरची पगडी उतरोन ठेवली आणि बोलला जे गड घेईन तेव्हा पगडी बांधीन असा नेम करून चालून घेतले. दरवाजाखाली जाऊन ढालेचा कोट करोन बसला.

—म. द. रु. १ पृ. ४७

ढालढकल—चाल ढकल, अळंटळं, दिरंगाई, घालघसर, उपेक्षा.

१ काही रुसवाहि राहून, देण्याघेण्यास ढालढकल चाले, ऐसे या कालांत केले पाहिजे. —ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ ११

२ रजवाडेकर ढालढकलेची गोष्ट सांगतात.

—पे. द. भाग २७ पत्र नं. ५

३ आम्ही येथील वर्तमान वरचेवर लिहीतच गेलो आणि स्वामी त्याची ढालढकलच करीत गेले. —पे. द. ३३ पृ. १७२

ढालणी घेणे—तोंड फिरवणें.

वसईकडून गलबते ४४ आली.माहिमाकडे जात होती. अकस्मात ढालणी घेऊन फिरोन जिजिरे मजकूरचे बारीयावर होरीबोरी घेत राहिलीं.

—पे. द. ३४ पृ. ६६

ढाल वाजणें—कीर्ति होणें.

अवधानी बावा बोलले कीं, लढाईचा प्रथम दिवस आहे. आणखी लढाया होतील. परंतु येश आप्पासाहेबांस येईल. फत्ते होईल. सवाई ढाल वाजेल.

—ऐ. ले. सं. ७३२१

ढालाइत—पायदळ शिपाई. —आर्यविन

ढालाइती प्रकार किंवा तऱ्हा—हुकमाबरहुकूम, दुसरा कांहीं विचार न करतां अंमल करण्याची सडेसोट ढालाइताची रीत. पूर्वी ढालाईत पाठविला म्ह. तें अखेरचें समन्स समजलें जाई. ढालाइताजवळ रदबदली चालत नसे. मालकानें सांगितलेला हुकूम ढालाईत शब्दशः बजावीत असे, व मला मालकानें असें असें करावयास सांगितलें आहे, तितकेंच मीं तसेंच करणार असें तो म्हणे.

खर्चाचा व करवीरप्रकरणीं मसलतीचा प्रकार इस्तरजीसाहेबापाशीं बोलून काय फळ ? तो 'मीं कलुषास (Col. close) लिहितों' म्हणणार

इतकाच अर्थ आहे. ढालाइती तऱ्हा आहे.

—ऐ. ले. सं. ८१४३

ढांसण—आडोशाची, जेथून आसरा घेऊन मारा करितां येईल अशी जागा. दब्याची जागा.

१ आम्ही कणगले नजीक वोढयाची ढांसण धरून उभें राहतांच शत्रूचे लोक निघोन माघारे गडाकडे गेले.

—ऐ. ले. सं. २५०१

२ त्या प्रांतीं तीन हजार माणूस पाठवून ढांसण करावे हा विचार पर्जन्य काळींच लिहीला होता. —पे. द. ३४ पृ. ३३

ढीग—सैन्याचा जमाव.

चिरंजीव रा। आपाजवळ होती ते फौज चालून जाऊन मोगलाचे ढिगास थडकली... फिरंगोजीस मोडून ढिगांत घातला.... पांच सात घोडी पाडाव करून मोगलाच्या ढिगांतून आणली.

—ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ ७

ढीग—फार, पुष्कळ.

—मोगलाचा गुंता उरकून सरकारच्या कामास लागावे. दिल्लीकडील वगैरे मनसुबे ढीग आहेत यास्तव लौकर फौज जमा करावी.

—चं. चू. द. पृ. २९

ढीलढाल, ढीलढालाल—(मो. वा. चूक. मुळांत 'ढील ढाकल' असेल.) ढालढकल, चा लढकल, सुस्ती, ढिलाई, दिरंगाई.

१ येविषयीं ढीलढाल व ढालढकल आठ चार दिवस करीन म्हटल्यास पाहचा ? हंगाम आजच. —हिं. द. खंड १ पृष्ठ ७०

२ ढील सहसा न करणें. यैवज व फौज घेऊन सत्वर येणे. ढीलढालाल सर्वथा न करणें आमची खर्चाची वोढी असे.

—शि. शा. इ. सा. भा. १ पृ. १०४

ढेण—(कोंकणी शब्द) सूण किंवा त्यासारखा कांहीं वन्य लाकडाच्या किंवा गवताच्या दिवटीचा प्रकार. त्यावरूनच मराठींत 'ढणढण दिवा जळणें' हा वाक्प्रचार

मजला व गुरवास फिरविले हत्यारें भवती लावली मानेवर तरवारा दोन ठेविल्या हातीं ढेण पेटविली होती. —ऐ. सं. सा. पृ. २५ लेखांक १५

ढेलज—कमानी दर्वाजा; उंबरा; देवडी.

वाघनख ठेव घरणीला।

हत्यारे लाव जा आपुल्या ढेलजाला ।

—के. ऐ. पो.
नारायणराव वध पोवाडा पृ. १६४

घोड्याचा रंग पाहून जिन फांजिली ।
मुबलक पैसा खर्चीला उंच अन्नूला किनखापाची खरेदी केली ।
ढेलजेंत बसले शिंपी म्होरकी शिवली.

—के. ऐ. पो. शिंद्याचा पोवाडा पृ. ४३०

ढेली––ज्याच्यावरील अक्षरें किंवा मुखवटा पुसला आहे असा रुपया, नाणें. त्यावरूनच ‘ कची ढेली ’ म्हणजे गुळगुळीत, बाजारांत न चालणारीं नाणीं
—विल्सन

ढेहा—डोई. ढेह लावणें–मुंडी देणें, प्राणपणानें एखादी गोष्ट अंगीकारणें.
सारांश राजश्रींच्या चित्तांत आले आहे कीं स्वामीच्या (बाजीरावाच्या) चित्तांत उत्तरेकडील भर भरला आहे. तो मनसबा तुम्ही करालच. व फौजा जातात. याणी मोगलाची व मुलकाची हुद घेतलीयामुळे हावभरी होतील. आणि केवल दिलीसी ढेहा लाविली म्हणजे कोणे वेलेस नाहीं, कोणे वेलेस तऱ्ही, अरीस्ट येईल.

—पे. द. १७ पृ. ३८

ढोकणें—तहकूब होणें; शिथिल होणें.
एक चैत्रमास मुलुखगिरीस उरला. स्वारी येण्याची ढोकलीशी दिसते. अद्यापि शत्रूस रसायनच लागलें नाहीं. मग त्यानें तह कां करावा ?
—ऐ. ले. सं. १५५९

ढोंग—प्रस्थ.
सुभानराव कदम तूर्तकाळीं येथें मोठें ढोंग आहेत. त्यांणीं निम्मे गांव इनाम मला करून द्यावा म्हणोन आड घातला.

—ऐ. ले. सं. ६०४१

ढोढो—निष्कर्ष; निर्णय; बोलणें.
शेवटी गोहदचा काये ढोढो पडतो जे ठरेल ते मागाहून विनंती लिहीली जाईल.
—हिं. द. खंड २ पृष्ठ ५९

ढोणा—डोहणा; दंगा; फितुरी; बंडावा.
मागती ढोणा करावा हाच त्यांचा मनसबा.

—ऐ. ले. सं. ८१५

ढोणे—पोर्तुगीज डॉम किंवा डॉन शब्दाचा अपभ्रंश. डॉम म्हणजे मातबर, उंचीं रक्ताचा.

दहा हजार प्यादे व दोन हजार फिरंगी ढोणे लढवाई घेऊन त्यानें चाल केली. —पे. द.

ढोम---अडथळा, वांधा.

शेवटीं हिंदु हिंदु एकत्र होऊन मिळाले, पादशाही कार्यास ढोम पाडिला ऐसे म्हणोन दलेलखान दुसरे दिवशी जयसिंगाचे भेटीस आला.

—चित्र ५५

ढोल टाकणें—इरादा दाखविणें.

त्याच्या मुबादला सेलाणी प्रगणाचा गांवपालडीचे बंधवे धरून आणले (कैदी) तेव्हां ते जेर होऊन सलूकाचा ढोल टाकला.

—हो. इ. सा. प. खं. १२ पृ. १७९

त

तअय्युनात--तैनात.

तअल्लुकह—संबंध. तालुका.

तई—ठरविणें, सिद्ध करणे, योजणें, नियुक्त, नमूद, रवाना.

१ सिंदे मजकुरानी पुन्हा पाच सात हजार फौज इंग्रेजाची कही व रसद बंद करावयाकरिता गिर्दनवाह तई केली.

—पुणें अख. भाग २ पृ. ४९

२ किंबहुना कारपरदाजाकडून हजार पांचशे फौज त्याजवर तई होईल परंतु अंतरंगी यांचेच. —पुणें अखबार भाग ३ पृ, ८७

३ नासरजंगासहि रघोजी भोसलीयावरी पांच हजारा फौजेनसी तई केले.

—पे. द. १५ पृ. ८२

४ वजीर अजम व खानदौरा व बंगस वगैरे अमीर तई केले आहेत. ते येऊन पोहचतील. मग लढाई करून पराभव पावऊन ताकूब (पाठलाग) करून तंबी करणें. --पे. द. १५ पृ. १३

तख्त-ई-रवण—मोंगल बादशहा ज्यांतून कधीं कधीं स्वारी करीत, असे माणसांनीं वाहण्याचें पालखीसारखें एक वाहन. दोन सरळ बांबूंच्यावर एक फार मोठी, प्रशस्त खुर्ची बसविलेली असे. तींत दोन अगर तीन माणसेंही बसत. वर छत्र असून शिवाय ऊन टाळण्यासाठीं उतरती झडपही असे आठ भोई हें वाहन वाहून नेत.

तक्दीम--प्रगति.

तक्क्या; तक्या; तकिया--विश्रांतिस्थान.

(म. रा. चि. थो. शा. ८२)

१ तक्यात बसणारे फकीरासही रोजमरे द्यावें.

--ऐ. स्फु. ले. २३१.

२ अलीकडे धामधुमीचे सबबेनें मोहींवीं आपला कदीम तकिया सोडून उपर घाटावर जाऊन नवाच तकिया बनाविला आहे.

—पारसनीस ब्र. पृ. ३३७

तक्लीफ—त्रास.

तक्सीर—गुन्हा.

--विलसन.

तकदम, तकादम—प्राचीन, पूर्वीचा.

तख्त—गादी, सिंहासन.

तख्त-नशीनी—गादीवर बसणें.

तख्त या ताबूत—तक्त नाहींतर तिरडी. तक्तावर तरी बसूं नाहींतर प्राण समर्पण करून तिरडीवर प्रेत होऊन तरी बसूं असा प्राणपण.

तख्त या ताबूत असा नेम करून कत्तल करीत चालले.

--शि. प्र. ब. पृ. १०

तखल्लुफ—विरोध.

तंग—जेरबंद, घट्ट; आवळ.

तंगचाई—टंचाई; दुर्मिळता; अडचण; तंगी.

१ परंतु खर्चाची बहुत तंगचाई झाली. --इ. म. १३४

२ आपले अशा तंगचाईत बहुत उपयोगी पडले. --खरे ११ पृ. ६०००

३ त्या मार्गे कही येते त्याचा बंदोबस्त करावा. कदाचित् आंत गवताची तंगचाई याजकरितां शत्रू आंतील फौजेस निरोपही देईल, तरी तो मार्ग रोखून राहावें. —ऐ. ले. सं. १८००

तंगतुरासी—तंगीतुरसी, अडचण.

आपला अवकात चालत नाहीं बहुत जबुन वक्त तंगतुरासी जाहली आहे.

—शि. च. सा. २ पृ. २१९

तंगनवार—घोडेस्वाराला लागणाऱ्या दोन आवश्यक वस्तु, तंगतोबरा त्याप्रमाणें तंगनवार.

तंग म्ह. घोड्याचे खोगीर आवळण्याचा चामड्याचा पट्टा. नवार म्ह. तीन चार बोटें रुंदीची सुती जाड पट्टी किंवा नाडा.

राजश्री आप्पानीं नर्मदेच्या तळावरून आज्ञा केली कीं कुलजिन्नस दाणा, तूप, तेल, कडबा, गवत, नालमेख, तंगनवार, सूत अंबाडी देखील वर्षाची बेगमी जमा करून ठेवणें. —पे. द. ३० पृ. २११

तंग पुस्तंग—घोड्याच्या पोटाखालून जाणारा जिनाचा पट्टा; तंग.

तट्टू जरदा किं. २०

सामान तट्टाचे

१ खोगीर

१ तंगपुस्तंग

१ लगामजीन —रा. खं. ६ पृ. ११६

तंगबस्त, तंगदास्त राखणें—योग्य तजवीज, तयारी ठेवणें.

तुम्ही आपले जागा घोडेपिढे चाकरमाणूस यांचा तंगबस्त राखून परम सावध होऊन जाणें.

—पे. द. भाग ३८ पत्र नं. ३७

तंगतोब्रा—घोड्याला लागणाऱ्या आवश्यक जिनसा.

तंगबार करणें—जीनबंदी करणें.

तगीर—बाजूस करणें.

तंगी–तुरसी—अडचण, ओढाताण.

मनसब जागीर घेऊन तीन वर्सें गुजरान थोडीबहुत तंगी तुरसीनें करीत होते. —पे. द. १० पृ. ७

तघ्रीब—हद्दपारी.

तजकरनोस—१ ऑडिटर २ मराठी अमलांत या तजकरनोसाचें काम हिशेब तपासून अफरातफर कोठें झाली असल्यास ती निदर्शनास आणण्याचें असें.

तजव ज—विवंचना, विचार, विषाद.

खान असें बोलतांच पंताजीपंत बोलिला जे पादशाही माल पादशहाचें घरी जाईल. त्याची इतकी तजवीज काय ? ––सभासद पृ. १७

तज्वीज—तजवीज, उपाय.

तणणें—? (दोरीनें मोजणें ?)

सदरहू जमीन दस्तीबाद तणून हदमहदूद घालून देणें हरसाला ताजा खुर्दखताचा उजूर न करणें. —शि. च. सा. खं. २ पृ. २६४

तत्रौववेताला—(तत्रैववेताळः)—वेताळ पूर्वस्थळीं येणें.

या भयेकरून कारस्थानें करून चार महिने काढावे पुन्हा तत्रौववेताला पुन्हा अक्षय व्हावे. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १६३

तक्त (तोफेचें)—ज्यावर तोफ बसविलेली असते तें तुळवट.

पानशानें मोठी नादानी केली. तोफा सोडून पळाले. सरकारच्या २ तोफांपैकीं १ जीवमर्दी करून काढिली. दुसरीचें तक्त मोडलें म्हणोन गेली.

—ऐ. ले. सं. ६९६७

तक्ती—लहानसा तक्ता; चकती.
तक्दम—मागील; भूत; झालेलें.
तक्दमा—आगाऊ; आगाऊ पैका; अग्राधिकार.
तक्दमा वसूल घेतला. —खरे ८५१
तक्रीब—संबंध; वहाणा; सबब.
त्यास मझेल्याची तक्रीब लावणें निस्वत नाहीं.
—राजवाडे ५ पृ. १५७

तक्रीर—हकीगत; कैफियत, करिणा.
फितूर केला होता त्याच्या तक्रीरा
—वाड. स. मा. ३ पृ. ७१
तक्रीर कर्दे--निवेदित. ---वाड. शा. छ. १७४
तक्वा दिल्दारी—समाधान, उत्तेजन.
संचणीचा वख्त आहे तक्वादिल्दारी पाठविणें.
—राजवाडे १६ पृ. ३३

तक्वा, तकवा—उत्तेजन; हुशारी, उत्साह, त्राण, शक्ति कोशीस.
१ इतका तकवा त्यांस कां दिल्हा येवढयावरच ते चढून जातील.
—राजवाडे ५ पृ. १७७
२ दोन्हीकडील खंडणीमुळें संस्थान नातवानीस पडले.... हैदरअल्लीखान याच्या उपद्रवामुळें कांहीं तकवा राहिला नाहीं —खरे ११३५
३ मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा
ये विषयी न करिता तकवा । पूर्वज हासती —रामदास
४ तुमचे लिहिल्याचे तक्व्यावरी पंधरा दिवस लोकास उमेद होती.
—राजवाडे १२ पृ. ८३

तक्वियत-कौल, तक्वेत--कौल समाधानीचा कागद. मदत पत्र.
मदतपत्र. —वाड. स. मा. २ पृ. २४४
तक्वेत—समाधानी, खातर्जमा.
साहेबी तक्वेतीचे खुर्दखत सादर केले.
—राजवाडे १६ पृ. ३२

तक्शकमान—छोटें धनुष्य.
तक्शी; तक्सीम—वाटणी, हिस्सा, भाग, सीमा.
तक्शीमदार; तक्सिमदार--वाटेकरी, हिस्सेदार.
तक्शीर, तक्सीर—कमीपणा; न्यून; दोष; चुकी.
तहमूल (सहन) करावयास तक्सीर केली नाहीं. —इ. म. ६७

तक्सीराती—चुका.

ऐशा तक्सीराती तुझे निस्बत कितेक जालिया.

--इ. ऐ. ५ पृ. ४१

तक्सुबी—लबाडी.

राण्डेनं तकसुबी करून आली आहे.

—भा. इ. सं. मं. १८३४ पा. वृ. २११

तकटी--जरीची.

आपले आरमार दर्यात फिरत आहे. टोपीकरांच्या आरमारावरी तकटीं निशाणें त्यांच्या तऱ्हेची असतात. त्यास, सरकारच्या आरमारास तकटीं निशाणें असल्यास सलाबत भारी दिसोन येत आहे. तरी निशाण द्याव-याची आज्ञा व्हावी. —इ. सं. पे. द. स. प. मा. पृ. ४९

तकटी—जरीनिशाण, जरीपटका.

तकटी खासा निशाण पाडाव, तसेंच नगारा पाडाव जाहाला.

--पे. द. १६ पृ. ७५

तकडबंद करणें—जखडबंद करणें.

शहराची अगदी बंदी नाके गल्या व शहरचे आसपासची चौक्या ठेऊन तकडबंद करून झाडे घेत चालले.

--ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ९०

तकडबंदी—जखडबंदी.

अवतरणासाठीं बंडाल शब्द पहा. —स. ब. पृ. ३६

तकदमा--आगाऊ वसूल; आगाऊ दिलेला ऐवज (पैका)

१ श्रावणमासीं गुदस्तांची मखलाशी जाहली तरी होईल. परंतु मखलाशी-मुळें कांहीं यावयाचें नाहीं. तकदमा वसूल घेतला. आबादानी जाहलीया-नंतर साल मजकूरचें कांहीं चालूं लागेल.

---ऐ. ले. सं. ८५१

२ प्रस्तुत सिरगांवचे लोक याणीं बहूत गवगवा केला. तकदमा ऐवज आपण पाठविला होता तो दिल्हा. व प्रस्तुत निम्में रोजमरा देतो परंतु घेत नाहींत. --पे. द. १६ पृ. ९१

तकयुद—दक्षता, लक्ष.

गाडराकडील २०० माणूस पुण्यासमीप येऊन उतरले आहे व नौकर राहावयाचे उमेदवार. येथील कारपरदाजांनी त्या लोकावर तकयुद चौकीची केली आहे. --पुणें अखबार भाग ३ पृ. ५१

आणखी अवतरणासाठी 'चाहारूम' शब्द पाहा.

तकरीब--बहाणा.

रावजी येके तकरिबीने हुजूर अर्ज करतील किंवा केला असेल.

—पुणें अख. भाग २ पृ. १९२

तकरीब—अजमासें, सुमारें, संबंधीं, कमींत कमी.

नादरशहाचे लोक तमाम लस्करचे लोकानीच मारले तकरीब दहाहजार मनुष्य त्याचे मारले गेले. —पे. द. ३० पृ. १७१

तकलीफ—दिरंगाई, कोताई, गैरआस्था.

रोहिल्याचे पारपत्य परस्परेच होत असे. स्वामीचे शेवेसी तकलीफ होणारच नाहीं. —पे द. भाग २९ पत्र नं. १४३

तकवाजाहां--तगडे जवान ?

कलकत्त्याहून जमाव ७–८ पलटणें व गोरे तकवा जाहां पेठेवर इंग्रज जमा करितात. --ऐ. ले. सं. ४३३९

तकवेतूट—अस्ताव्यस्त, भयभीत, घाबरी.

गनीमाची दाटीची खबर ऐकोन रयत तकवेतूट होऊन परागंदा जावयास लागली. —पे. द. ३ पृ. ५४

तकसीम--मर्यादा, हद्द.

(अवतरणासाठी 'नवीसिंदा' शब्द पाहा)

—पुणें अख. भाग २ पृ. १८०

तकाजा--तगादा.

लूट सापडली त्यापैकी निमा हिसा पंतप्रधानास द्यावा म्हणोन कारपरदाजांनी वासुदेवबाबास तकाजा लाविला आहे.

--पुणें अखबार भाग १ पृ. १७७

चाहारूमचा तकाजा आहे तो माफ करून घेणे.

--पुणें अखबार भाग १ पृ. ६९

तकियेत--ताकीद.

तुमचे हरकारे पुदचेरीची बातमी कैसी आणितात तकियेत पाहिजे की आधी तेथली खबर तहकीक देत. —E. M. P. पृ. १२९

तकूब—तहकूब, वारगीर किंवा शिलेदार यांच्या वार्षिक वेतनाचा तिसरा किंवा दुसरा हिस्सा रक्कम त्यास आगाऊ नालबंदी म्हणून देण्यांत येई. बाकीची रक्कम पावसाळा सुरु होण्याच्या सुमारास लष्करें आपल्या मुलखांत परत आली म्हणजे मिळे तिलाच तकूब किंवा तकूबाचा ऐवज म्हणत.

येथील खर्चाची ओढी लिहावी तर तुमची ऐकोनच श्रम ! ' बारगिरांनीं

तकूबासाठीं अडविले ' म्हणोन तुम्हीं लिहिले तरी त्याणीच या वेळीं कां चुकावे !

—ऐ. ले. सं. पृ. ५१०

तकोन बसणें—टपून बसणें.

आम्हीं जो मारील त्यास रुपये पांच इनाम द्यावेस करार केला. आजि दोन दिवस झाले, त्यामुळें कांहीं ताकीद करावी लागत नाहीं. प्यादे तकोन बसतात व प्रत्यहीं १५,२०,१० (शत्रूचे शिपायांस ठार करितात.)

—ऐ. ले. सं. २२६

तख्त पादाबुद—(?)

याउपर स्वामीचे पायाजवळ यावे तख्त पादाबुद म्हणावे. धनी चित्ता-प्रमाणें उर्जीत करतीलच. हे नव्हे तर मक्केस रवाना करून द्यावें.

—पे. द. २८ पृ. २२२

तख्तिरावन्—१उंटावर बसावयासाठीं केलेली काही अंबारीसारखी सोय. २ माणसानी आहून नेण्याच्या वाहनालाहि ही संज्ञा असे. मात्र हें वाहन दिल्लीकर बादशहाच वापरीत.

तख्तरावा—तक्तरावा. बैलांच्या गाड्यावर भलें मोठें रुंद फळीचें चाक बसवितात तें फिरत असतें, त्यावर कलावंतीणी नाच करतात. असे तख्तरावे मिरवणुकांत पुढें चालविण्याची पद्धत असे.

स्वारीपुढें आतषबाजी, घोड्याचा, हत्तीचा रथ, जरीपटका व दोन तख्तरावे होते.

—ऐ. ले. सं. ५४४

तख्तराव जिलपेच नाचती——
सगुण नार आनंदांत।

रंगाचा पोवाडा—प्रभाकर शाहीर

तखफीक—सूट, कमी करणें.

कर्जाचे पेचांत आलो या करितां इजाऱ्यांत काही तखफीक करावी म्हणजे तुम्हासी बोलावयाचा निश्चय केला आहे.

—पुणें अख. भाग २ पृ. ३३

तखाल—(?)

वेरड जथें बालमरी येक हो तेथें दुर्ग बांधोन पुंडावा करून आसती. ते परगदा (परागंदा) करून वेरड विद्यनगरासी जाऊन राजासी भेटले. तेथें तखाल जाहाले. सकल नाक कैंकाडे परगदा जाहाले.

—पे. द. ४५ पृ. १२

तग्दीर—ईश्वरेच्छा, दैव, नशीव.

तग्मा—नक्ष, अस्करा लौकिक.

आम्ही आजपावेतो मुसलमानीचा तग्मा जतन करून आहोंत.
—दि. म. रा. १ पृ. १५९.

तग—दम.

याउपरी लष्कराचा तग कैसा निघतो आणि फौजेचा आब कोणे गोष्टीनें रहातो ? पे. द. ३३ पृ. १५८

याही अर्थे प्रतिनिधीचा तग तेथें निघतां दिसत नाहीं.
—पे. द. ३ पृ. १९.

तगट—पत्रा.

स्लेटीच्या ऐवजी बहुतेक मुलें टिनाचें तगट वापरीत. त्यावर शाईनें हिशेब मांडीत व तो ओल्या फडक्याच्या बोळ्यानें पुसून टाकीत.
—अरुणोदय पृष्ठ १६.

तगटी निशाणें—जरी पटके, जरीची निशाणें.

श्रीमंतांचे पुण्यप्रबळ। सोडी तकटी निशाण.
—ऐ. पो. केळकर पृ. ७३

म्होरप्याला लाविले हत्ती तकट निशाण.
महाराज निघाले इतकें सैन्य घेऊन. —ऐ. पो. के ४४५

तगदमा, तकदूम—'तगमा' असा तर मूळ शब्द नसेल ? तगमाचा पुढें दिलेला कोशांतील इंग्रजी अर्थ. अवतरणांतील मतलबाशी जुळत नाहीं. Being ancient or prior. In law such an interval between the commission of a crime and the giving of evidence respecting it, as operates in bar of punishment.

गांवगन्ना धर्मादायाची मोईन तगदमा करून देऊन वंशपरंपरेनें चालविलें पाहिजे. —म. द. रु. ३ पृ. २२५

तंगदस्ती—ओढाताण.

तगबिना—तजवीज.

परगणेमध्यें पहिली गार (गारा पडल्या) पडली मागून गेरवा (गव्हा-वरचा एक रोग) थोडानाबहुत झाडोन परगण्यात पडला म्हणोन तगबिना करून रयतीची समाधानी करतां कृष्णाजीपंत भाऊस रवाना केले. —हो. इ. सा. प. खं. १२ पृ. १७३

तगमा--राजाज्ञा, मुद्रिका, बादशाही किंवा शाही सनद किंवा हुकूम, रॉयल एडिक्ट.

जहांगीरखान सरदाराने लखनौस वजीराकडे व इंग्रेजाकडे निरोप पाठविला की श्रीगंगेआलीकडे हिंदूंचें राज्य झाले! मुसलमानी बुडाली. आम्ही आजपावेतो मुसलमानीचा तगमा जतन करून आहोत.

—भा. इ. सं. मं. अह पृ. १४
अहवाल शके. १८४०

तगलफ; तगलीफ—तकलीफ; त्रास; उपद्रव.

इंग्रज दर मजल मुंबईस जाणार तरी रसद व गल्ला व बाजार व हरजिनस याची तगलीफ आमचे फोजेचे न होये आणि ते सुखरूप जात हें दोस्तदारीचें वाटे. —नाग १ पृ. ५५

तगहर—तगहेर, तगैर, पदभ्रष्ट, कमी केलेला, झालेला.

महादजी बाबावरील वरात येका लाखाची होती त्याजपैकीं येक रुपया देत नाहीत. "आम्ही तगहर! आम्हाजवल काय म्हणतात? श्रीगोंदियांत काय जे दिल्हे तेवढेच मात्र!" ऐसा प्रकार आहे.

—पुरं. द. भाग ३ पृ. ६

तगाद्याची आयुधें—छळ किंवा टॉर्चर करण्याचीं साधनें किंवा हत्यारें.

त्यास दहा पांच गालिप्रदानें शेलकी समर्पक करून तेल, तोबरा, खाट, जेरबंद आणून टाकले आणि कोळसे शिलगावले.

—हो. कै पृ. १६९

तगादे हुजरे--तगादा करण्याकरितां पाठविलेलें हुजरे.

असें बोलल्यावरून आज्ञापत्र द्यावें तेथें विनंती करूं असें उत्तर केलें आणि तगादे हुजरे यांची खुशामत करून सातान्यांत वकील निसबत दाभाडे आदिकरून भेटी घेतल्या आणि झालेला मजकूर सरकारात समजाविला.

--काय. प्रभु. इ. सा पु. १ अंक ९ पृ. १

तगाफली—गाफिली.

१ श्रीमन्तास मोहीम दर्पेश; इतके तगाफलीचें कारण काय?

--दि. म. रा. २ पृ. १०८

२ तगाफली केलिया आपलें केलें पावाल.

---राजवाडे १८ पृ. ५०

३ (अधिक अवतरणासाठीं 'ताहाल' शब्द पाहा)

—मा. स. प. मा. पृ. १४०

तगार करणें—? पराभूत करणें ? (तगीर करणें म्ह. बदलणें असा अर्थ पटवर्धन कोशांत आहे. पण तगार शब्दच नाहीं. तगार शब्दाचा एक अर्थ चुन्याची भट्टी असा आहे. (उर्दू कोश,) पण येथे तो लागू नाहीं.)
या नंतर जगजीवन पवार व राजाराम बाबूराव याची फौज आपल्याकडील फौजांनी तगार केली. यास्तव यवन जुन्नर प्रांताहून नासिक चांदवडाकडे येणार. यास्तव सावध राहून निरोपद्रव असिले पाहिजे.
—चं. चू. द. पृ. ६७

तगारी—१ताट. २ पीठ भिजवून तें मळण्याची परात.
तेव्हां बादशहास मोठा घुसा येऊन संभाजीमहाराजियास विचारले कीं आमचे तगारीत जेवावे ! (लक्षणेनें बाटावे).
—म. द. रु. १ पृ. १०८
मिय्या आणि बिबी । तगारी भिंतीला उभी । —लौकिक म्हण

तगारें—लोखंडी टोपलें.

तगी लावणें—पिटून लावणें.
आमचे विल्हेस अल्लीखान व गावडे वगैरे फौज होती. ती मोडून तीन कोसपर्यंत तगी लाविले. डावे बाजूस कृष्णाजी आटोले होते. त्याणी पदमोजी जाचक यासी मोडिले दो बाणांची खाचपर्यंत पदमोजी बावास तगी लाविले याजमुले भास्कर हरी याचे बुलगे वाचले. नाहींतरी मोडून लुटून भयाभंगास नेले असते. —पे. द. १५ पृ. ४२

तगीर—रद्द, बडतर्फ.
शुक्रवारी विलायती पत्रें, 'हार्न जनराल बहाल, रॉबर्ट कोविन तगीर' यैसी आली. —पे. द. ३३ पृ. १

तगेरी—तगीरी; बडतर्फी.
खंडेराव यांची तगेरी करून श्रीनिवासराव यास नबाबांनीं दिवाणगिरी दिली. —ऐ. ले. सं. ३०३९

तचकरा, तजकरा—पैशाच्या अफरातफरीमुळें निघालेलें येणें; चोरी; दंड.
१ जानराव धुलप यास जातीस सालीना मोईन ८००० त्यापैकीं आरमाराचा तचकरा जाहला. ते समई सदरहू तैनातीपैकीं सरकारांत ५००० घेऊन बाकी ३००० रु घेऊन जावे येणे प्रमाणें त्याशी करार आहे.
—पेठे दप्तर भाग २ पृ. ६५
२ मालीमुलकी कामकाज जाल्यावर सातखणीवर जाऊन परगणे नासिक वगैरे माहालचे तचकरियाची चौकसी जाली.
—पुणें अखबार भाग ३ पृ. ९५

३ खंडेराव हरीच्या मामलतीवर तचकरा लाला नौबतरायानें बावांस समजाविला आहे. --म. शि. यां. का. पृ. ६०९

४ लक्ष्मण कोन्हेरे याजवर तजकरा निघाला, रुमाल धरून जप्त करून सरकारांत आणिलें. पांचा लक्षांचा तजकरा आहे.

—ऐ. ले. सं. १०६९

५ चिमणाजीवरी तजकरा आणाजीपंती केला होता, त्याची निकड लाविली होती. —पुरं. द. भा. ३ पृ. १४३

तज्करनीस—सनदा वगैरे लिहिणारा.

तज्करा; तज्किरा—सनद; दण्ड; पैशाच्या अफरातफरीमुळें निघालेलें येणें; चोरी.

दुमालां कीजे, तज्करा उजूर न कीजे.

--राजवाडे १५ पृ. ४७२

तज्करे घ्यावें घरें बुडवावी नागवावे. —म. रा. चि. सं. १९

भानूस पंधरा लक्ष तज्करा व आठ लक्ष खंड मागत होते.

—खरे १० पृ. ५३८५

तज्वीज—व्यवस्था, तर्तूद, उपाय, सल्ला विचार, काळजी.

राजा गईब जहाला ऐसें जाऊन सांगतांच पादशहास आश्चर्य वाटून बहुत तज्विजीत पडला. —सभासद ४२

येही तज्वीज विचारली की —इ. ऐ. ५ पृ. ५७

तजवीज—सल्ला.

तजविजा देतात — सल्ला देतात

१ पुंदेचरीवालेस खाणून काढिलियानें पुढें आपला पयीस इतका (पैशाइतका सुद्धा थोडा) वकार (दबाव) राहणार नाहीं यैसे कित्येक लोक त्याचे आप्त तजविजा देताती. —पे. द. २८ पृ. १०४

२ **तजवीज**—सल्ला, निर्णय.

(अवतरणासाठी ‘ भोईचे खडे खाणे ’ शब्द पाहा)

—E. M. P. पृ. १११

तजवीज करणें—-मुक्रर करणें; योजून ठेवणें.

राजेसाहेब यांचे उतरण्याचा जागा व येण्याचा मार्ग तजवीज केला आहे. याचा इतल्ला आम्हांस ठेवणें हें जरूर.

—ऐ. ले. सं. ४४५८

तजावज—उल्लंघन; अतिक्रम; अन्तर; फासला.

महकूम अक्दसासी तफावत व तजावज न करूं.

—राजवाडे १ पृ. २

सात कोशीचे तजावजीनें पानगळ नजीक मुक्काम केला,

—राजवाडे ३ पृ. ३५१

हरएक वावे चालवावे म्हणून कलमी केलें तर दोस्तीचे जागा तजावज आहेसे नसे. —पारसनीस ब्र. प. २३६

तजावजा—गडबडलेले, परागन्दा, अफरातफर.

मिरजेंतील थोर थोर मंडळी कांहीं तजावजा झाली अशा प्रकारच्या अवया ऐकतों. —खरे १० पृ. ५३३७

पुण्यात लोक बहुत तजावजा जाहले आहेत.

—खरे १० पृ. ५३४१

दागिने यांची तजावजा होईल, त्याची खबर्दारी वरचेवर करीत जाणें.

—वाड मा. १ पृ. ११५

तजावततफावत—अंतर, तफावततजावत. कमीअधिक (पारसनीस ब्रम्हेंद्र चरित्र पृ. २४० वर " तफावत तजावत करणार नाहीं. " व्युत्क्रमाचें उदाहरण.)

पाटीलबावा रागानें मजला म्हणू लागले जे जमा दाखवितील ती पाहणें. कांहीं तजावततफावत मनांत येईल तर ओली कातडी या ब्राह्मणाचें डोईवर ठेवावी. म्हणजे असेल ते सांगून देतील. मी उत्तर केलें कीं ओले कातड्यापावेतों नौबद आल्यास ठेवावी. आणि ठेवली तर आपले ब्राह्मणाचे डोईवर किंवा बादशाही मंडळातील ब्राह्मणाचे डोईवर ठेवावी.

—म. शि. यां. का. पृ. ५१९

तझकरा—वाका, हकीकत, स्मरणाने लिहून काढलेल्या आठवणी.

तट घालणें--आडकाठीं घालणें; अडथळा करणें; धरणें देणें; अत्याग्रहास प्रवृत्त होणें. हट्ट करून अडवणूक करून बसणें.

१ राणोजी नाईक यांनीं भगवंतरावास 'आम्हांसी निरोप देणें' म्हणून आज चार दिवस तट घातला आहे. —ऐ. ले. सं. २५५१

२ तेव्हां बोलिले कीं, आधीं महाल हवालीं करणें. तटच घालून बसलां तर एक पैसा देखील तुम्हांस द्यावयाचा नाहीं.

—ऐ. ले. सं. ७१८५

तट पाडणें—अडवून धरणें.

तेव्हां येमाजी सिवदेव यास बोलावून आणून तुम्ही पुढें जाऊन प्रातःकालपर्यंत तट पाडा आपण येतो म्हणून राजश्री स्वामींनी सांगितलें परंतु जावयाचे कबुल न केले. —पे. द. २० पृ. ३

तट होणें--स्थगित होणें. बांधा येणें.
कुलाबा येताच पर्जन्यानें वृष्टी केली. तन्मुले कितेक कार्याचा तट जाहाला.
—पे. द. ३ पृ. १८

तटाई—१ तंटाई, भांडण २ तटलेली, तुंबलेली बाकी (शिपायांच्या पगाराची बाकी.)
लस्करात रुपयाची अडचण ते कोठवर लेहावी ? आज दोन सालें तटाई. दरसाल युद्ध प्राप्त. परंतु सरकारकाम जाणोन, निकट (निकड) करोन समयास आले असेत.
—पे. द. २० पृ. ११५

तटाचे जुंज--निकराची लढाई. एकमेकासमोर उभे राहून गाडून झालेली लढाई.
ते एकीकडे उभे राहून विठल सुंदर याच्या अंबाऱ्या उभ्या राहिल्या त्याजवर आपल्या लोकास पाठऊन तटाचे जुंज (जाले)
—पुरं. द. भा. ३ पृ. ११९.

तटी लावणें—१ इरेस घालणें २ अडून वसणें.
१ यैशास थोडचा मजकुरासाठी कोणी सांगोन तटी लावावे हें उत्तम नाहीं.
—पुरं. द. भाग १ पृष्ठ २७०
२ कांहीतरी अधिकोत्तर कार्य करून घ्यावे. केवळ तटी लावीन म्हणतां कार्यास न ये.
—पे. द. १५ पृ. ३

तट्, तट्टू पाठीस लागणें—तट्टाच्या पाठीस कांही दुखणें होणें.
धाकटा मनोऱ्या तट्टू येथें आणून ठेवला त्यास तट्टू पाठीस लागला होता तो महिनाभर बांधून ठेवला पाठ थोडीसी बरी व्हावयाची राहिली आहे. याजमुले तुमचेकडे पाठविला नाहीं.
—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. २९

तंटेबाजी—भांडण, खोडी, खुस्पट, बखेडा.
१ आमच्या घराण्यांत दिवाणगिरीची सनद शके १७२१ पर्यंत चालली. पुढें यजमानाचे अप्पाचे वाकडे आले. हुजुरांतून बंदोबस्त व्हावा तो न होई कारण पुण्यातहि कारकीर्दी फिरल्या. हा समय पाहून यजमानानी तंटेबाजी करून आपास कामाहून काढिले.
—पे. द. ४४ पृ. ९
२ त्या गृहस्थानें चिठ्ठी केली आहे ती मी तूर्त माघारी टाकली आहे. परंतु तंटेबाजीनें परिणाम कसा लागेल ?
—ऐ. ले. सं. ६३८५

तड, तडी—किनारा.

खांदेरीस गलबत पाठवून तेथून भांडीयाचा मार व तडचा मार उंदेरीवर करावयाची योजना केली आहे. —पे. द. ३३ पृ. ४९

तड खाणें—तट खाणें, हट्ट धरणें, आग्रह धरणें, इसीम येणें.

आपलें न ऐकतां बादशहाचे डोळे काढिले तेव्हां इस्माइल बेग तड खाऊन तीस हजार फौजेनिशी उठोन गेला. —हो. कैं. पृ. ९८

तड पाडणें—निभाव लावणें; अब्रू राखणें.

हैदराचा मोकाबला कोणी घेणारा नाहीं. मराठा सरदार त्या रानांत होता, म्हणून आजपर्यंत तड पाडिला आहे. नाहींतरी मोकळें रान होतें. —ऐ. ले. सं. २५११

तडस—तरस.

शिकारीस गेले. च्यार हरणे व दोन तडस आणिले. —नाग १ पृ. ३४४

तडाका—तडका; जलदीनें.

लष्कर तडाका देशाकडे चाललें, हें वर्तमान तहकीक आहे. —ऐ. ले. सं. २११८

तडाका—दुष्काळ.

कटकास पंधरावे रोजीं दाखल झालों तो अन्नाचा तडाका झाला की तीन रोज खाशास देखील अन्न नाहीं. नाग १ पृ. ११०

तडाका—विपुलता, गर्दी.

अन्नशांतिचा चालु तडाका. —श्रावणमास दक्षिणामहोत्सवाचा पवाडा, मोरेश्वरकृत.

तडामोडा—तोडमोड; तडजोड.

सवाईखान याणे घरचे जवाहीर वगैरे तडामोडा करून २५००० रु. दिल्हे. —नाग २ पृ. १५७

तडी—किनारा, थडी.

जमावाच्या बळें तडीस उतरोन युद्धप्रसंग करावा यैसा विचार केला आहे. —पे. द. ३ पृ. २१

तडीक—तडक.

तेव्हां विसाजीपंत होळकर निघोन तडीक माघारे आले. —म. शि. यां. का. पृ. ३१५

तणाणा—सूत्र किंवा नाद; तणावा.

अंग्रेज छापा घालते, दगा करते हे जाणोन त्याचे पत्राचा तणाणा लावून ठेविला. —नाग १ पृ. ७०

तणाव—तम्बूची ताणून मेखांस बांधावयाची दोरी.
कार्भारी यांचे पेचामुळें आमचे दौलतेच्या तणावा तुटत चालल्या.
—खरे १ पृ. १४६

तत्त्व--लक्षणेनें पैका.
वरचेवर तरतूद पाहिजे तैसी करावयाची होती, परंतु एक तत्त्वाचे पेचांत आलों. कर्ज मिळत नाहीं, याजमुळें नाइलाज जाहला आहे.
—ऐ. ले. सं. २६६४

तद्दत्त--१ तीच २ त्यानंतर.
हैदरखान मार्गशीर्ष शु. ७ स देवाज्ञा पावला. पेशजी व्रणाची व्यथा जाली होती. तद्दत्त व्यथा प्रबळ होऊन निधन पावला.
—ऐ. ले. सं. ३६९१

ततबीर, तदबीर–तर्तूद, व्यवस्था, उपाययोजना, साहित्य, तयारी, जमावाजमाव.
सरकारच्या पैक्याचीहि विल्हेवाट करावी ती सत्वरीच करणार म्हणून बोलतात त्याच ततबिरेमधे असेत यैसे तपशिले लिहिले तरी उत्तम असे. —शिं. शा. इ. सा. भा. १ पृ. १११
पैकी होन राहिले त्यास ततबीर नाहीं. आपण बाहीर ततबिरीस फिरत होतो त्यास अंज्यजाही हिंडता पुढें ततबीर कोठे नव्हे. मग आपण तुम्हापाशी नगरास आलो येऊन होन घेऊन सदरपैकी आपण तुम्हास मोकदमी निमे तवदत (तवरख) बंध दिधली आहे.
—शि. च. सा. खं. ५ पृ. १३
पटेलगीची तशरीफ देऊनू सेरणी होन १०० बांघले ते कबूल करून मौजे काजकुरास येऊन् पटेलगीस बांदजीस देऊनू आपण पैकीयाचे ततबिरेस जाऊन् होन साठी उसूल केला.
—शि. च. सा. खंड ५ पृष्ठ १६४

ताथबा—आवरासावर, तूर्तातूर्त बंदोबस्त.
आमचे मनोदयानुरूपच श्रीमंतांचा इरादा आहे परंतु तूर्त तताथबा करून इंगरेज सुरतेस गेले व सरदार उज्जेनीस इंदुरास गेले.
—इ. सं. दि. म. रा.

ततोप्यधिक—त्याहिपेक्षां अधिक.
आपण संपादिली कीर्ति ततोप्यधिक कीर्तीचा विस्तार व्हावा हेंच मनोभिष्ट इच्छित असो. —पे. द. ३ पृ. २३

तथ्य—पक्कें, सत्य. विश्वसनीय.
शादतखान यासीं तथ्य वर्तमान आले आहे. —पे. द. ३ पृ. १२५

पांडुरंगराव तात्याची लढाई विघडली हें तथ्य वर्तमान आहे की नाहीं म्हणून लिहिलें तें कळले. —ऐ. ले. सं. २७७८

तथ्य मिथ्य—खरें खोटें.

गुरमकोंडचें राजकारण आलें आहे. तथ्यमिथ्य पाहून त्यासारखे कूच करूं. —ऐ. ले. सं. १६८३

तथा—वानवा.वाकी, शिल्लक.

वापू गोखले यास ज्वरांश जाहला आहे. त्यास स्वारीबरोबर जावयाची तथा आहे. —ऐ. ले. सं. ८३००

विस्तारे काय लिहूं ? वनेल तसी खातरजमा करून देऊन निघण्याचें करावे. तथा ठेऊ नये. —ऐ. सं. सा. खंड ११ पृ. १४

तद्बीर; तत्वीर—योजना, विचार, युक्ति, व्यवस्था, उपाय.

तदनंतर जे तद्बीर होईल ते विनं-ी केली जाईल —राजवाडे १ पृ. १४७

मशारनिले येथें आलियावर तर्तूद व तत्वीर पाहून बहुत संतोष जहाला. —साने प. या. व. ५७

टोपीकरांची जात मकरी व दगावाज; शायद् भुलावा देऊन कांहीं एक शक्कल नमूद करावी या तत्विरेंत असतील. —साने. प. या. व. ४६३

वसल्याठायीं कायेक तदवीर करून मजबुतीन धरील. —हिं. द. खंड १ पृष्ठ ४८

ते सर्व निवेदन करतील तदनुरूप जे तदब्रीर ते करतील. —हिं. द. खं. २ पृष्ठ २८

तदारुक—इलाज, उपाय, शिक्षा, तयारी, परिचय.

तुम्ही व रावपंतप्रधान यांनीं खातर्जमेनें दिल्हा तदारूक अमलांत आणावा. —दि. म. रा. १ पृ. ७

इंग्रजाकडून जितकी जितकी बेअदबी झाली तितका तदरूक सर्कारांतून अमलांत येत गेला. —खरे ७ पृ. ३५७५

श्रीमंतांसी इंगरेजानी बदमामली केली त्याचा तदारूक होईल. —पुणें अखबार भा. १ पृ. ९५

तन्ख्वाह—तनखा, पगार.

तन्त—तंतोतंत, तसाच.

स्वामीनी पूर्वी एक दोनदां ऐसा मजकूर लिहिला होता. त्याजरून आता

काबू पाहून (संधि पाहून) तंत (तंतोतंत तसाच) केला असे. जसें उत्तर येईल तसी बुनीयाद (पाया आरंभ) बांधू.

—दे. द. २५ पृ. ९०

तंदूर कारखाना, तंदूरखाना—तन्दुरुस्तीचा कारखाना; वर्क शॉप.

उदईक सक्करदऱ्याचा बाग तोफाचे कारखान्याचे तंदूर वगैरे यांसी दाखवावें यैसे सांगितले सक्करदऱ्यास तंदूरचे कारखान्यांत गेले तोफ चरकी धरली होती तिचे तुरपण होऊन तीस पहावयास गेले पाहून म्हणूं लागले की कारागर चांगला आहे यैसे म्हणून कडे सोन्याचें दिले कारागिराचे नांव धरमुल्ला जातीचा तांबट करफीचा सीस (शिष्य?) आहे.

--नाग २ पृ. १६४ व १७७

तन्हा, तनहा—एकटा.

मुजाका नाहीं तन्हा यावयाचें करावे. —राजवाडे ५ पृ. २५

तन्हाई; तन्हाई--एकलेपण, एकान्त.

तन्हाईंत बोलावयाचें किंवा कसें ? —राजवाडे ५ पृ. २८

तन्हे—बरोबर, संगतींत.

चिंतोपंत रायरीकर दादासाहेबाचे अंतरंग कारभारी होते त्याचे तन्हे असलें म्हणजे खडन्त न होते. (म्हणजे अडत नव्हतें.)

—स. ब. पृ. ३९

तनखा—किल्ल्याच्या सभोंवारच्या ज्या गांवाचा वसूल त्या किल्ल्याकड लाऊन दिलेला असतो. तो त्या किल्ल्याचा तनखा.

तनखा जंजिरें विजयदुर्ग समान अशर मयातेन. तनखा मजकूर ठाणीं विजयदुर्गसुद्धां जिम्मा करून घेण्याबद्दल सरकार कंपनीची फौज रवाना झाली आहे. —केळकर संग्रह लेले दप्तर.

तनखा—वरात. रक्कम देण्याचा हुकूम.

उगेच तनखा मजवरी करिता, धोंकलची पांचा रुपयाची केली व प्रभाकरास चाळीस देणें येशां तनखा करिता. तरी मी कोठून देऊ?

—हिंगणें द. भाग २ पृ. १००

तनखासी माहाल-वसुलाचे महाल.

तरी सरसगडचा तनखासी महाल परंतु धन्यांचे आज्ञेप्रमाणें ते समयीं बावीस गांवचाच अंमल एकतर्फा करून कटकट न वाढविली.

—पे. द. ३ पृ. ४६

तनचाई.—टंचाई; तंगचाई; चणचण; अडचण.

सोमवारीं अलीजाबहाद्दर यांजकडील गणपतराव खर्चीची तनचाई सांगाव-

यास रामचंद्रपंत आप्पाकडे आले होते. —ऐ. ले. सं. ६२९९

तन देणें—हिय्या करणें; छाती करणें.

१ इंग्रजापाशी गोफांचा मार फार तेव्हां लोकांनीं तन न दिले. निघाले. —खरे १०२४

२ फौज कमी; तेही खर्चाचे अडचणीमुळें तन देईना. —हो. कै. १६

३ त्यास विचार पहाता कोण्ही तन न देत. —पे. द. १३ पृ. ६

कां की फौज तन लढाईस देत नाहीं. —पुरं. भा. १ पृ. २५३

४ नजीबखानाशीं साडेतीन महिने लढाई जाली जाटाची फौज फितुरी. तन देईना तेव्हा जाट कमजोर पडला तेव्हा सुभेदारानी जाटाचा व नजीबखानाचा तह ठराऊन दिला. हो. कै. पृ. ३६

५ पातशहाचे पैगाम सर्वासी आहेत परंतु कोन्ही मनसुब्यांत तन देत नाहीत. —पे. द. भाग २९ पत्र नं. १२८

तन देणें—अंग देणें. फितूर होणें.

भोरपेंखाली शिरक्याकडील दोन हजार माणूस बसले राहे. किल्ल्यावरील संदर्भ व हवालदार व कांहीं लोकाचा होता. त्यास सरनाईक व सरनोबत मोहतादी लोक एकत्र मत्त होऊन सिर्क्याकडे तन देत होते त्यास दस्त करून बेडचा घालून किल्ल्यावरी ठेवले असेत. —पे. द. ३३ पृ. १०६

तनसीत आणणें—संकटांत आणणें.

जंगाकडील बल भारी झालें तेव्हा हे शहरांत येऊन शहरास तनसीत आणले जंगाने शहरचा तसनस फारच केला. --नाग २ पृ. १२४

तनाखोरी—नावड, वीट.

तो यांस तनाखोरीस येऊन —जो. रा. ५४

तनूमंद—लठ्ठ, जाडजूड, भरलेला.

तनु राखणें—जीवधारणापुरतें थोडकें देणें.

लोकास पैका फारसा न देणें तनु पोटाची मात्र राखणें. —पे. द. १३ पृ. २०

तपसामग्री वेंचणें—पुण्याई खर्च करणें. सर्वस्व पणास लावणें. पुण्य पणास लावणें.

याकरितां येक वेल सिन्याचा कोट करणें तो सर्वांनीं मिळून ठाण्यासच मारावे मरावे आपली तपसामग्री वेचावे. —पे. द. १६ पृ. ५६

तफ्सील्यानें----?

इतकीयांत तपसिल्यानें यशवंतराव याचें खूळ उभे राहिले त्या कामीं यास वसवास पडला होता. --भाग २ पृ. ३

तपासी—तपासणी.

माहाली रायाजी खंडेरावु ठाणदार यानें तपासी घेतली जे, गनीमानी वसूल कायें घेतला? —शि. च. सा. खं. ५ पृ. २३३

तपीळ--तापट, तल्लख.

पाराशर दादाजी जुवामर्द सर्वां गोष्टीस बहाद्दर परंतु स्वभाव तपीळ सुभेदाराचा हात धरून वोढून बोलला, कसचे कपाळाचे बोलणें बोलता? हरीप उरावर आला. —हो. कै. पृ. ११३

तफ्रका--दाणादाण; परागन्दा; हैराण.

रोहिल्याचे अम्मलापासून वस्तीचे लोक तफ्रका जाले.

—दि. म. रा. १ पृ. १६

गोरगरीब आलम तफ्रका व परेशान आहे.

—राजवाडे ३ पृ. ९०

पत्री आज्ञा केली कीं तो महार व मुद्दई कोण आहेत ते सारे हुजुर घेऊन यैणें. अेक माणूस त्यातील तफरका जाहले म्हणजे कार्यास येणार नाहीं. —पे. द. ३३ पृ. ११७

तफ्वीज—देणें.

तफ्सील--विवरण, खुलासा, तपसील.

तफजूल—कृपा, उपकार.

आश्रफूलउजरा याणी तफजूल करून हजूरामध्येंच ठेविले.

--हिं. द. खंड २ पृष्ठ ४२

मगर वजीरावर तफजूल होतो तो श्रीमंताचेच खातर्दास्त होतो.

—राजवाडे ६ पृ. ६२०

२ हजरत जिलसुभानी छायाखाले येऊन सर्व लहानथोर यांस देखतां (यांज देखतां) बोलीलें कीं मी आपल्यास रामचंद्रपंतास सौपीले आहे. बरे करोत अथवा वाईट करोत. त्याबरोन निजामन मुलूक बोलीले ज हजरतजी आपल्यास ज्याचे हवाली केलें इतका तफजूल त्याचे हकांत हजरतचा त्यास पाहिजे. जे आम्ही अरकानाहीं त्यासी किबलेकाबे जाणावे. मग वजीर मुमालीक व अमीरुलउमराव याणीहि बहुतसी तारीफ केली. त्यास निजामत मुलुकाची सरदारी आहे ते वडिलांची आहे. पातशहापासी सुरुखुरू करणार वडील समर्थ आहेत.

—पे. द. १५ पृ. ८०

तफरी—गुन्हा, अफरातफर; लबाडी.

१ तुम्हापासून कांहीं तफरी जाली नाहीं आपली खातीरजमा राखोन येऊन आपले जागा आबाद होणें. —पे. द. ३१ पृ. २७

२ बहादरांनीं तफरी करून तीन हजार माणूस जमा केले आहे. —पे. द.

तफरीक, तफ्रीक—वाटणी, वर्गवारी.

१ या यैवजास अमृतरावजी असतां दोन राजपाळेची तफरीक पंधरा हजार रुपये देविले होते. —पे. द. २८ पृ. ११९

२ तरी कौलाप्रमाणें रयतीपासून तफ्रीक बर्हुकूम गुदस्ताप्रमाणें वसूल घ्यावा. —राजवाडे ३ पृ. ४९१

३ चाळीस लाखांची तफ्रीक इसमनवेसीवार करून होन देविले. —राजवाडे ५ पृ. १४८

४ गांवगन्ना पाटील कुलकर्णी जमा करून जमाबंदीची तफरीक केली वसूल चालो लागला. —चं. चू. द. पृ. १४९

५ वराड प्रांत आमचे वतनी आहे यैसे म्हणतात. मक्था सालाबाद आहे. त्याप्रमाणें तफरीक करून देऊ. आम्ही म्हणतो की श्रीमंताची आज्ञा आहे. जे कच्चा अम्मल घ्यावा. हे गोष्ट हे मानीत नाहीं. —पे. द. २० पृ. ११३

तफवास—तफहूस, तपास.

म्हणउन् तकरीर केली त्यावरी साहेबानी मखलासी करुनू तफवास केलें. —शि. च. सा. खं. ५ पृ. ८८

तफवासी—चौकशी.

सदरहू माळूमाती खातिरेसी आणौनु ये बावेची तफवासी होतां यांचे मिरासी पटेलगी होये यैसे तहकीक जाहाले. —शि. च. सा. खं. ४ पृ. ७४

तफहूस, तफहुज—तपास, चौकशी.

आंगऱ्याच्या मार्फतीनें तफहूस करिता मोहव्वांचीं गुरें यांमध्यें नसेत म्हणून आंग्न्यानें मांलूम केले. —पारसनीस ब्र. प. २३६

तफावत-तजावज—अंतर.

केव्हांही हर्दहाल मोहिव्बाचे कामामध्यें तफावत-तजावज करणार नाहीं. —पारसनीस ब्र. प. २४०

तफावत—सवड.

बरसातीचे दिवसांत तफावत असती म्हणजे बसूनच करवीर जिंकण्याचें काम होतें. —ऐ. ले. सं. ६३५६

तफावत करणें—मर्यादा राखणें.

हलालखोर मोठा माजोरी आहे. गांवांत तफावतीनें वर्तणुक करीत नाहीं. पेठेंतून चालला असतां ब्राम्हणांस अथवा बायकांस वसार देत नाहीं. अंगास अंग लावून चालावें असा मस्तखोर आहे.

—ऐ. ले. सं. ६३६१

तब्लख—कागदांचें पुडकें. कागदपत्राचा गठ्ठा किंवा रुमाल.

तफुल्लियत—बाळपण, बाल्यदशा. अज्ञानपण, नेणतें वय.

तब्दील—बदली; तगिरी; तगीर.

तब्दील होणें, करणें—बदलणें.

तबक—१ खडक किंवा टेकडी. २ खंदक, चर. ३ रान, घेर. ४ वर्तुलाकार जमिनीचा पट्टा, ५ स्तबक.

(या शब्दाचा निश्चत अर्थ कळत नाहीं. तो निरनिराळया संदर्भांत निरनिराळा आहे)

१ पाणबुरजाचे व मेढेयांचे मध्ये दोनदोन तबक आहेत ती काईम करावी तेव्हां पाणबुरुजावर कणंग मांडून तो जागाकाईम होईल.

—पे. द. ३३ पृ. २२३

२ तोफापुढें तबक येक नेले आहे. —पे. द. १६ पृ. १०४

३ सिवभटबाबा याणी श्रीसुनुख (सन्मुख) इमारतीची तबकें उत्तर दक्षिण दोन बांधली आहेत. त्यापैकीं दक्षिणचें तबकांत तुम्ही श्रीच्या पुजेस वगैरे झाडें लावून बाग करावा. —ऐ. सं. सा. खं. ४ पृ. १४४

४ बहाद्दरपूरचे मोर्चाचे पूर्वेकडे पश्चिमेकडे दोन तबकें खणोन सिद्ध केली. —पे. द. ३४ पृ. १२६

५ गर्दनगडास छ २४ रोजीं मामांचेही मोर्चे आले. ते दिवशीं हल्ला झाली तेव्हां एक तबक घेऊन, दुसरे तबकास लोक लागले.

—ऐ. ले. सं. १८२७

तबक—डेक, मजला.

गलबत येकामागे येक तीन चालून येत होती. तोफा वरच्या तबकात होती ती गलबतावरी लागू केल्या. —पे. द. ३३ पृ. २३७

तबक,—पान, कागद, ताट.

तबक—प्रत, वर्ग, दर्जा.

तबक—कुळी, वंशावळ.

तबकदार—तुबकदार म्ह. बंदुकवाले. तुबक म्ह. बंदूक.

परवां हुजऱ्यांनीं बरोबर कारखान्यांतील तबकदार वगैरे १०-२० माणसें आणून कोळश्यांकरतां लांकडें पाहिजेत म्हणून मनस्वी दंगा करून गांवां-

तील आवतें नेऊं लागले, असा मेस्टर टोण याचा उपद्रव.
—ऐ. ले. सं. ५८०६

तबकीर—तपकीर. (नपु. लिं.)
तुम्ही पत्रें व तबकीर पाठविलें तें पावलें. याच अन्वयें घराऊ चांगलें तबकीर करवून पाठवीत जाणें.
—ऐ. ले. सं. २७११

तबखिल (नपुं.)—तपकीर.
श्रीमंत नानांस तबखिलेकरितां तंबाखू १०–१५ शेर चांगली आणविली.
—ऐ. ले. सं. ५९२६

तबंचा, तमंचा, तमांचा—१ थप्पड; २ पिस्तूल, ३ लाकूड.

तबदील—बदली, बदल, बद्दल.
उखाईस दूर करुन ठाकुराचे तरफ निमे आपले दुमाले केले व नागोजीचे तरफ निमे याचे तबदीलबाकी नागोजी जिवंत आहे तोवरी नागोजीने खावे.
—शि. च. सा. खंड ५ पृष्ठ १६५

तबरजगनाल—परशूचा एक प्रकार.

तबरूक—१ प्रसाद, पिरापुढील प्रसाद. २ आदेश, सल्ला.
१ त्यास पातशहानीं तबरूक देवायाची आज्ञा केली.
—दि. म. रा. १ पृ. १५२

२ महाराजांनीं यथाविधि मुसलमानांचे पीर, मशीद यांची दिवाबत्ती तबरूक चालविला.
—चित्र ४०

३ शाहामुहमदजीचे व त्याचें भाषण काय जाले आणि तबरुक काय दिधला याचा शोध पुरता सवसगियापासून घेऊन सेवेसी लिहितो.
—राजवाडे १ पृ. १८०

तबल—नगारा, ड्रम.

तबलदार—लष्करातील लाकूडतोडचा (फारशी शब्द तबर-कुऱ्हाड, परशु.)
१ कामाठी, बेलदार, तबलदार यांचा प्रकार तर स्वामीस ठाऊकच आहे. तेव्हां अशा किल्ल्यास मोर्चे लावणें परम कठीण आहे.
—ऐ. ले. सं. ४३६५

२ गाडदी किती आहेत ? कामाठी, दर्यावर्दी, व खलाशी व सुतार लोहार व तबलदार व बेलदार हें सामान काय आहे हें लिहून पाठविणें.
—ऐ. ले. सं. १४७६

तबा—बाकी, अन्न.
नबाब मुजफर्जंग याचेथें आठ दिवस शिबंदीनें दंगा करून धरणी पारणी फार जाली. कांहीं तबा राहिला नवता.
—पे. द. २८ पृ. ७५

तवाख—शिजलेलें अन्न विकणारा.
तबियती—लहरी.
तबीब—वैद्य, शस्त्रवैद्य.

१घायाळ जखमी होते त्यास औषध पाणी तबीबापासून करवावे या उस्त वारीस भाऊसाहेब एक महिना लागले.

—पाणि. बख. पृ. ३१

२ तबीब लावून जखमा बांधविल्या. —खरे ६ पृ. २८३२

३ आपला पाय जाया झाला बढवाईस वेढा घातला तेथें, म्हणोन तबीबाचे हातें उपाय करोन घरास जावे यासाठी मजला खरगोणास पाठविले.

—पे. द. भा. १५ पृ, १

४ तबीबानि वैद्यानि रसायन स्वतांच तें कुठले.

—सवाई मा. मृ. पो. प्रभाकर

५ शिवराव यांच्या तोंडावर जखम भारी आहे. तबीब लावून जखमा बांधविल्या. जखमांची दास्त लष्करांत न होय म्हणून वंकापुरीं पाठविले आहेत.

—ऐ. ले. सं. २८३२

तंबीह—तंबी, शिक्षा, पारिपत्य.

उभयेताहि फौजबंदी करून बसले आहेत, यास्तव त्याचे तंबीहेस (पारिपत्यास) प्रवर्तणार. —हिंगणें दप्तर, खंड २ पृष्ठ ६

तंबू—डेरा. खेमा.
तबेलदार—मू. श. तबर्दार म्ह. कुऱ्हाडवाला. हा तोफखान्याकडील एक कामगार असे.

तोफखानापैकी गोलंदाज वगैरे

सुतार ४	दर १०॥
लोहार ८	११
बेलदार १०	८
तबेलदार ५	९

—पे. डा. V. बाजी. II पृ. १८४

तमणें—ईर्षा धरणें; महत्वाकांक्षेनें फुरफुरणें.

येथें उमाबाईचे कारभार पांच. त्यांत एकमत नाहीं. सेनापती अंबिकाबाई देवजी ताकपीर ते मंडळी येकविचार. याखेरीज गायीकवाड तिकडे वेगले तमत आहेतच. —पुरं. द. भाग १ पृष्ठ १७४

तमनतोग—याकजातीच्या बैलाचे गोंडेदार पुच्छ. दिल्लीकर बादशहांचीं जीं नऊ राजचिन्हें होतीं त्यांपैकीं एक. (अर्यविन)

वकील मुतलख अमीरउल् उमरावची खिलत चारकुवा व जीगा व

शिरपेंच व परिंदा कलगीमय लटक व माला मकरवारी व कलमदान ढाल तलवार मोर्चेल नालकी पालखी शिक्केकटचार माहीमरातव, तमनतोग हत्तीघोडासुद्धां बहुत आदरें करून श्रीमंतांनीं घेतली.

—ऐ. ले. सं. ४६२३

तमसूक—पावती, करार, वचनपत्र, करारपत्र, लेखी करार.

—हिंगणे दप्तर, खंड २ पृष्ठ १३

१ तमसुक गुंतली आहेत. आणि वायद्यासही पैका पावत नाहीं तेव्हां लटिकवाद आपणांकडे येतो. —पे. द. २५ पृ. ९४

२ शिंद्याकडील तमसुकाप्रमाणें ऐवज येणें. —राजवाडे ५ पृ. ११

३ शिंदे यास नबाबांनी पैका दिला त्याचे तमसूक आहेत.

—राजवाडे ५ पृ. ७०

४ या करता त्याजपासून पस्तीस हजार दोशांचे तमसूक लेहून घ्यावे त्यात सध्य (सध्या) देत असेल ते घ्यावे बाकीचे वायदेमुदत लेहून घ्यावी (अशारीतीने) रुपये त्याच्या गळा मढावे.

—हिंगणे द. भाग २ पृ. १३

तमातवका—आशावाद.

तमा-तवके दाखऊन शोहरा करतील.

—साने प. या. व. ४६६

तमाकारी—लोभ, अधाशीपणा.

तमाखूं—१ रहिवासाचें ठिकाण. २ रहिवास, बादबाप.

तमाचा—तमाँचा, थप्पड, थोबाडींत प्रहार.

तेव्हां उठोन जावोन दोनचार तमाचे व लहानसें लाकूड सांपडलें ते येक दोन मारिलें. —म. द. रु. ३ पृ. १८८

तमानियत—समाधान, संशयनिवारण, खातरजमा.

१ फतेसिंग गायकवाडाचे तमानियतेकरता गाडर बडोद्यास गेला आहे.

—पुणे अख० भाग २ पृ. २७

२ तेव्हां नबाब मौसूफ यांची मस्लतीविसी तमानीयत कसी होईल ?

—राजवाडे १९ पृ. १६

तमाम—समाप्त.

जुट जाली त्यांत कमी पडते हें ठीक नाहीं. केली मसलत तमाम जाली पाहिजे. —इ. सं. ऐ. टि.

तमाम—सर्व.

तमामी—१ पूर्णता किंवा समाप्ती २ जरतारी कापड.

१ तमामशुद-समाप्त असे.

२ त्यांनीं कुल पालख्या तमामी केल्या पुन्हा। त्यांनीं पूल बांधिले नावा केल्या मना। —ऐ. पो. के.

तमावर चढणें—ईर्षेस पेटणें.

अवतरणासाठीं 'बढती दौलत' शब्द पाहा.

—हो. कै. पृ. १००

तमाशबिनी—मौज पाहण्याची तटस्थवृत्ति.

या दिवसांत तमाशबिनी स्वामीकडून झालियास दौलतीस नवाबाचे धक्का बसेल. —राजवाडे पृ. ५३

तमाशबिनी करणें—तमाशा पाहणें.

१ राजेरजवाडे कित्येक सामील होतील व कित्येक तमाशबिनी करतील. —म. शि. यां. का. पृ. १८७

२ सबब रावमजकूर आपले स्थलीं सखारामपंत व बाळाजीपंत तिघावरहि अजुर्दा व तमासबिनी करूं लागले.

—पुणें अखबार, भाग १ पृ. १०७

तमाशा—मौज, खेळ.

मस्त हाथीचा तमाशा पाहून हाथी माणसं मारील म्हणून राव मवसफानो हाथीचे आसपास ४–५ शें स्वार पाठविले होते.

—पुणें अखबार, भाग ३ पृ. १४५

तमाशा—पराक्रम.

मोठ्या तमाशानें चालून आले. म्ह. मोठी जवामर्दी करुन चालून आले. —पे. द. भाग १ पत्र नं. १

दुसरे काल्ही एक युद्ध नवाबाचे व आपले लोकाचे जाहले बरासा तमाशा नबाबांनीं पाहिला. —ब्र. च. पृ. ५४

तमाशाचा—चमत्कारिक, विचित्र.

येंदा फौजेमध्यें घोड्यास रोग तमाशाचा जाला आहे. येक दोन दिवस घोडे आडते आणि मरते. येणेकडून लोकांची घरें बुडालीं. हाल फौजेंत नाहीं. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. २१६

तमाशा-सैर—देश निरीक्षण व पर्यटन.

इग्रजांचा पाय या प्रांतीं फार शिरला आहे. तमाशा–सैर करण्याचे बहाण्यानें येऊन येथील नक्षे लिहून घेतले.

—दि. म. रा. १ पृ. ३०२

तमासगीर—तमाशा करणारा अगर दुरून मौज पाहणारा.

तमासबीन—प्रेक्षक; बघे लोक.

१ किल्ल्यांतून बदरी जमालखान बाहेर निघोन आपल्या गोटास उतरावयास

जात असतां, मार्गीं आपले लष्कराच्या तमाशबिनांनीं चैत्रमासच्या गुदस्त महिन्याचें वाद्य करून पालखींत धूळ टाकून त्याची फारच शोभा केली.
—ऐ. ले. सं. ४४६३

२ गांवातील तमासबीन भोवतें बहुत मिलाले होते.
—पे. द. १४ पृ. ६

तमासा—तमाशा, पराक्रम किंवा कर्तृत्व.

वैराग्य उत्तरवयीं कराल ते थोडे. आज उद्योग करुन आम्हासहि तमासे दाखविणें.
—इ. सं. तं. रा. घ. पृ. ४३

तयूल—राजकुटुंबांतील इसमाला दिलेली जहागीर किंवा जमीन.

तर्कष—बाणांचा भाता.

तर्कस; तर्कश—बाणांचा भाता, तिर्कश. —चित्रगुप्त १३८

तर्कीब—रचना, योजना, गोष्ट.

तुम्हांशीं बोलण्यांत येईल त्या तार्किबीनें लिहावे.
—राजवाडे ५ पृ. १५७

कोणहि रोजी मैदानांत येऊन मोकाबिला केला आणि कायम राहिले हे तर्कीब नजरेस आली नाहीं. —साने प. या. व. ४८२

तर्कीम—लेखन. —राजवाडे ३ पृ. ७३

तर्जुमा—१ लेख २ अर्थ ३ भाषांतर ४ एकंदर राज्याचा हिशेब पेशवे करीत होते तो. —ऐ. स्फु. ले. २ पृ. ७३

तर्तीब—व्यवस्था, तज्वीज, शिक्षण, तरबियेत.

तर्तीबस—उपचार. (रोग्याचे) —रा. व्य. को.

तर्तूद-कार—व्यवस्थापक.

मिस्तर पार्कल लढाई तर्दूद-कार होता तो गोळीची जखम लागून जाया झाला. —दि. म. रा. १ पृ. ३८

तर्फ, तरफ—दिशा बाजू, पक्ष, तालुका, पेटा.

तर्फसानी—शत्रु, प्रतिपक्षी.

१ कार्नवालीसचीं पत्रें आलीं. त्यांतील भाव ' बाळापुरास यावयाचें कारण अर्काटचीं पलटणें, बंगाली व मोठमोठ्या तोफा व रसद अंबूरच्या घाटाखालीं आहेत ती मिळवून घ्यावी, व गंजीकोटयाकडून नबाबाची फौज येणार त्यांची गांठ—तर्फसानीचा उपद्रव भारी होतो—पडावी हें होतांच पट्टणास निकडीनें जाण्याचा इरादा. —ऐ. ले. सं. ४४७४

२ याच्या लिहिण्यांत खुबी वरून पाहतां तर्फसानी फार थंडा पडला असें वाटतें, परंतु तो कोणे ठिकाणीं आहे हें त्याच्या लिहिण्यांत नाहीं.
—ऐ. ले. सं. ४४७५

तर्फैन—उभयपक्ष, उभयपक्षी.

प्रसंगास जिकडील उणीव तिकडील पुरवणी करावी हा तर्फैनचा शिल्शिला चालत आला. —राजेवाडे ५ पृ. २०२

पेशजीचे करारावमोजीब तर्फैन चालून (चालू)

—खरे ७ पृ. ३५६४

सर्कारचा व इंग्रजांचा तर्फैन करारनामा ठरविला.

—खरे ७ पृ. ३५६९

तर्बियत—१ शिक्षण, २ पोषण, ३ सुशिक्षित.

१ पाटील बावांनीं येथें असावें आणि आम्ही मुले याकरितां तर्बियेत राखावी —ऐ. कि. प्र. २६

२ चिरंजिवास घरीं बसऊन ठेविल्यानें तर्बियत होणार नाहीं. तरी त्यास श्रवण करवीत असावे. —राजेवाडे २२ पृ. ४४

तर्बेज—सुशिक्षित, पारंगत.

तर्र, तर—ओलें; ताजें; रसपूर्ण,

तर मेव्याचे व खुश्क मेव्याचे खोन —राजवाडे १० पृ. २९६

तऱ्हा—रीत, प्रकार.

१ आपण पल्ल्याची तऱ्हे आपण कहाडतील ती कांहीं दिसोन आली नाहीं. —राजेवाडे १२ पृ. ११५

२ लढाई खूप तऱ्हेनें जाली. —राजेवाडे १० पृ. १९२

तऱ्हा—किल्ले जिकतांना तटास लावावयाचे शिडयादि सामान.

तऱ्हा— लाकडी किंवा लोखंडी खांब, साखळयांनीं किंवा हुकांनीं जोडून त्यांच्या जाळीवजा किंवा तटवजा आडोसा सैनिकांसाठीं संरक्षणार्थ केलेला असतो तो. या तऱ्हा शब्दावरूनच मराठी लष्करी परिभाषेंतील तऱ्हांगण किंवा तारांगण हा शब्द निर्माण झाला.

—आर्यविन पृ. १४५

तऱ्हातऱ्ही—निरनिराळ्या तऱ्हेचा.

वीस पंचवीस तोफा नीं तऱ्हातऱ्ही येणें प्रमाणें नबाबाबांनीं पाठवावें.

—खरे ८७५

तऱ्हा देणें—१ बदल करणें २ फरक करणें ३ रद्द करणें.

१ जुन्या अमलास तऱ्हा द्यावी तरी म्या स्वतसिद्ध खावंद नाहीं.

—पे. द. ३३ पृ. ३८७

२ ते जमावहि जैसा तैसा धरीत नाही, पोख्तच धरितात; येवढ्या जमावास तऱ्हा द्यावी हे कोण गोष्ट ? —शि. च. सा. खं. ५ पृ. १०५

तऱ्हा देणें—सर्वस्वावर उदक सोडणें.

आपले वतन आपले सांभाली व्हावें म्हणोन सर्वश्वास तऱ्हा दिल्ही आणि इकडे आल्यानंतर लेहून पाठविले.

—शि. च. सा. खं. ४ पृ. ८०

तऱ्हेदार—फॅशनेबल.

१ माझा छिटाचा अंगरखा फाटला आहे, तर तुसरें एक छिट चांगलें तऱ्हेदार, वडिलांच्या मर्जीस येईल तसें पाठवून द्यावें.

—ऐ. ले. सं. ५२४६

२ पान्दान चांगलें तऱ्हेदार आहे. —राजेवाडे ३ पृ. ४८७

तऱ्हेबाज—लहरी; छंदी.

तऱ्हेबाज ती अधिक खिलाडू नवऱ्याच्या गोष्टी ऐकून। मिष दुखण्याचें करून निजली पडदे लाविले मग चौकुन —परशराम १०७

तऱ्हेवार, तऱ्हेवाईक—चमत्कारिक.

तर—ओला, ताजा.

(अवतरणासाठी 'खुष्क' शब्द पाहा) —पुणें अखबार भाग ३ पृ. ३२

तर—तर्रर, ओलाचिंब.

रंगाची मोठीच धूम जाली. रंगेकरून सर्वत्र तर करून दिले.

—पुणें अखबार भाग ३ पृ. १५३

तरकश—भाता.

चंद्रग्रहणसंधीत स्नान करून श्रीमंतानी पागेतील निळा घोडा मये सरंजाम व ब्राह्मणास पोषाक तयारी व ढालतरवार व तरकश व दक्षणा नख्त रुपये ५०० येणेप्रमाणें दिली.

—पुणें अखबार भाग ३ पृ. १०७

तरकष कमान, तरकस कमान—बाणांचा भाता व धनुष्य.

नाना स्वामींनीं आपली तुला सुवर्णाची केली ७००० मोहरा भरल्या चिखलत ढाल तरवार तरकसकमान घेऊन बसले होते. येणेप्रमाणे तुला जाली.

—पुरंदरे द. भाग ३ पृ. १७०

२ स्वामीनी येक बंदुख व येक तरकस कमान त्यास पाठविले.

—पे. द. ३ पृ. १०४

तरकी, तरक्की—वृद्धी. उन्नति, प्रगति, सुधारणा, उत्कर्ष.

१ उभयपक्षीं एखलाशीची तरकी होईल जाणीजे.

—ऐ. ले. सं. १२३७

२ रावसाहेबांचे दौलतीची रोज ब रोज तरकी होते हे गोष्ट त्यांस खूश लागत नाहीं.

—राजवाडे १ पृ. ५२

३ मसलत केलीया तमाम मुफसदावर दाव बसवून दौलतीस रवनक (शोभा) तरकी होते. —हिं. द. खंड २ पृष्ठ ७९

तरकीब—उपाययोजना, युक्ति.

मग तात्या व बाळाराम शेट लष्करांत येऊन सरकार फौज राहिली (तिच्या देण्याच्या) व्यवस्थेची तरकीब काढिली.

—हो. कै पृ. १८०

तरंगाल—परशूचा एक प्रकार.

तरजुत—तरतूज किंवा तरतूद.

आमचे वर्तमान फौजेस कळे त्याचे वर्तमान आम्हास कळेलसें पत्रदर्शनी तरजुत केली पाहिजे. —पे. द. १४ पृ. २८

तरट--घोड्याचा मोठा चाबूक. —रा. व्य. को.

तरतुद्या--तरतुद करील असा.

मातबर माणुस तरतुद्या कोण पाठवावा यैसे राजेश्री बोलिले.

—पे.द. ३ पृ. १०३

तरतें बुडतें पाहणें—दु-दील राहणें, तरेल त्याचा पक्ष घेण्याची मनाची प्रवृत्ति ठेवणें.

१ याप्रकारचा भरवंसा मानून पत्रें यावयासी पाठविली परंतु कोणीच नाही आले. तरतें बुडतें पाहिले.

—हिं. द. खंड १ पृष्ठ १९

२ इंदुरापासून कुल महालात जमीदार वसूल देत नाहींत तरतें बुडतें पाहतात. —पे. द. १५ पृ. २३

३ अवतरणासाठीं—— 'लपेटवार रुकार' पाहा

—हौ. कै. पृ. ८७

तरदरड—कशीतरी सवड; कोशीस.

प्रसंगानसार गाडराचें जाणें सुरतेस जाहाले त्यांतही तरदरड करून राजश्री दिवाकरपंत याची रवानगी पुण्यास केली.

—नाग १ पृ. २२४

तरदास—एकतऱ्हेच्या कापडाचा प्रकार.

स्नेहवृद्धी व्हावी म्हणून हत्ती घोडा सिरपेच किनखाप साहा व शाल-जोड्या ६ व तरदास बंगाली थान ६ व फुलचरी बदामी थान ६ व ३ हजार रुपये नक्त दिले. —राजवाडे खंड १२ पृ. ३२

तरफदार—१ कैवारी, पक्षपाती, २ एक मुलकी अम्मलदार,

तरफ्दारी—कैवार, पक्षपात, वकिली.

तरफ-बन्दी—सीमाबंधन.

तरफ-सानी—प्रतिपक्ष.

बद-अहदीची दर्याफ्त दोघां शरीकांनीं करून तरफ-सानीकडे नसीयत-पूर्वक सांगून पाठवावें. —राजवाडे ७ पृ. ३

तरफैन—उभयपक्षी, दुतर्फा.

हैंदरअलीशी व इंग्रजासी लढाई मातबर जाली व तरफैन लोक जाया जाले. —पुणें अखबार भाग १ पृ. २२८

तरबितर—तारबितार, दाणादाण; उध्वस्त, विकीर्ण.

१ बाकी सरंजाम तरबितर करून सूर्योदयी मुक्कामास आले. —इ. सं. हो. कै. पृ. ३.

२ फौज आपली तरबितर होऊन सुभेदार कुटुंबासुद्धा काल्पीनजीक यमुनेचे घाटावर आले. तेथे पाणी अथाक (अथांग). —हो. कै. पृ. ३७

तरभारी— ? अवशिष्ट ? अधिक ?

ती ठायीं वाटून तिघीजणीं घेणें. तरभारी होईल तें चाउडीस करावे त्यास त्याग आधी आपण घालुन आपणाउपरी तुम्ही घालणें. —म. द. रु.३ पृ. ३८

तरवणी—आजाऱ्यास द्यावयाची पातळ पेज किंवा कांजी.

शिपीनें तोंडांत तरवणी करून रात्रौ घातलें. चलन राहिलें होतें. —ऐ. ले. सं. १९३७

तरवारी तरवार होणें—खणाखणी होणें.

तेथेंच लढाई मातबर सुरु जाहाली. तरवारी तरवार जाली. —पे. द. भाग. २९ पत्र नं. ५०

तरस—भय.

हे बातेचा तरस मोहिबासारखे इबादती लोकांस (— भक्तास) न ये हें अज्याईब आहे. —राजवाडे ३ पृ. ९०

तराझिंदह—आरास करणारा.

तरांडें—लढाऊ गलबताचा एक प्रकार.

१तरांडीं फिरंग्यांची आलीं आहेत. याजकरितां धुळप यांसही निरोप झाला म्हणून लिहीलें ते कळलें. --ऐ. ले. सं. १९७६

२ फिरंगीयाचे आरमार ३५ तरांडी येत आहे. —पे. द. १६ पृ. २२

—पे. द. भाग २९ पत्र नं. २१५

तराणोपाय—तरणोपाय.

तराना—सुस्वर. लहन.

तरार—ढोंगी, खिसेकापू, लुच्च्या, फसव्या, तोतया.
(अवतरणासाठी ' हरसूरत ' शब्द पाहा)

पुणें अखबार भाग १ पृ. ११०

तराह खाणें—तऱ्हा खाणें, बिथरणें.

स्वारीचे कर्ज व फौजेचे समजाविशीबाबत ऐवज मागावयाचा तगादा दादासाहेबानी लावला. माधवराव याणी उत्तर केले कीं मागे आपण स्वारी करून घरी कर्ज आणित होता तेव्हा कै. नाना भाऊ आपणास वडील होते ते संभाळीत होते. आता आम्हास दौलतीत आपण वडील. सावकाराचे देणे व लोकांचे देणे यांचा धरबंध आपल्यास कर्तव्य तसा करावा! शिल्लकसांखळी असल्यास आमचे स्वाधीन केली तरी संभाळून ठेऊ. या बोलण्यावर तराह खाऊन दादासाहेब गंगापुरास जाऊन फौजबंदी आरंभिली.

—हो. कै. पृ. ४९

तरीक किंवा तरीका—व्यवहार, पद्धति, उपाय.

येकायेकीच त्यास उत्तर केलें की चौथाईची तरीक्याची सदन करून देविली त्यापेक्षी तुम्ही अमल कशाचा मागतां ? एक सरदेशमुखी आहे ते सोईनें देईन. हें उत्तर होताच, बाजीराव जवानच होते, ते याचे जबाब दरजबाब निकुराचे (निस्पृहतेचे, निकराचे) देऊन आपले मकानास आले· दुसरे दिवशी खजिना असफजहाचा लुटला. एक लढाईची पुरावत जाली.

—स. ब. पृ. १६

तरीक—मार्ग; प्रकारें; तुल्य; वजा.

१ इकडील येकसू व एक–दिलीचा तरीक साबीक होता.

—साने प. या. व. ४६८

२ पातशहास सर्कारची गरज न दाखवितां सलाह तरीक (– युक्तिवाद म्हणून) समर्पक विनंती केली. —दि. म. रा. १ पृ. ७

३ आणखीही तोफातरीक (–नजराण्यास योग्य) जिनसांचा शोध करीत आहो . —ऐ. कि. प्र. २ पृ. ६१

४ पांच लक्ष रुपये जास्ती नजराणातरीखा ठराऊन त्याचें काम त्याजवरीच बहाल ठेविलें आहे. —ऐ. टि. २ पृ. ७१

तरीक—तुल्य किंवा वजा.

सेवकानीं सरकारची मोहर केली नाहीं व सरकारचे तरीके याचे (सरकारतर्फेचे) दस्तकहि लिहिले आहे असें नाहीं. दस्तक सरकार अजस्वारी राजेश्री रघुनाथ गणेश वकील दिम्मतपंतप्रधान म्हणोन स्वतःचे नावाचें लिहिलें.

—पे. द. २५ पृ. ३९

तरीकह—मार्ग, प्रकार.

तरिका—चाल; सलूक.
पंडित प्रधान व नबाब निजाम यांचा तरिका एक्लासीचा कदिमीपासोन चालत आला त्यासी हर्बावे जुदागी नाहीं.
—राजवाडे १० पृ. १६५

तरीपार—हद्दपार; तडीपार.
ममईच्या टापूवरील गरीब व कंगाल खलककुल तरीपार करून किल्ल्याच्या वगैरे सरंजामाची तयारी जलदीची जारी आहे.
—ऐ. ले. सं. ७९४८

तरुण उपाय—तरणोपाय.
या परदेशात धन्यावाचून सेवकास कोण आहे? साहेबी खबर घेतल्याखेरीज तरुण उपाये होत नाही.
—E. M. P. पृ. २३४

तलकमा—ताज्या दमाच्या तुकड्यांनीं एका पाठोपाठ शत्रूंवर हल्ला करून त्यास नामोहरम करण्याचा एक युद्धप्रकार,

तलखी—आग; तापटपणा; काहिली, चलाखी.
तलखी सोडून शांतता धरून वर्तावे. —खरे २ पृ. ४७९

तल्फीन—धार्मिक दीक्षा.

तल्बाना—रोजी पगार.
सोळा रोज प्रत्यह तल्बाना गाडदी यास द्यावा लागतो.
—खरे १ पृ. ४५४

तल्सीम—मुका घेणें.

तलख—शपथ.
१ (पुरंदर गडकऱ्यांचा) चांवळीस रोखा आला की कामथा मारिला याचा दावा तुम्ही सांगता तरी तुम्हास तलख आहे. जुजास येणे, नाही तरी स्वारी पाठऊन गाव मारला जाईल. बेड्या घालों, डोचके मारू. ऐसा दबादण रोखा आला आहे. —पुरं. द. भाग ३ पृ. २८
२ त्यास जो कोणी लिहिल्याप्रमाणें न ऐके त्याजला शपथ असे, त्याचे आईवर तलाख असे. —पारसनीस ब्र. च. १२४

तलग—पर्यंत.
लेकिन विसालत पन्हाचा जवाब मोहिबास येईतलग त्यास खोटी करावें.
—पे. द. ३ पृ. ५

तलडूं—अंकूर, मुळी, मूळ, पाळ, भावार्थानें सूत्र, वजन, थोडासुद्धां संबंध. (मूळ शब्द तलगें किंवा तलग. त्याचा अर्थ पिलूं किंवा बालक. त्या शब्दावरून तलगू व त्याचा अपभ्रंश तलडू झाला असावा. संस्कृत शब्द

तल्ल असा आहे. त्याचा अर्थ झाडाचा खड्डा किंवा आळें. त्यावरून आळयांत मुळाशीं फुटलेले अंकूर किंवा मुळया किंवा रोपे.)

अबदालीजवळून वजिरी घ्यावी अली गोहर याची स्थापना करवावी, रोहिले यांचे तलड् राखावे, हे कांही सुजाअतदौलास उचित नाहीं.
—राजवाडे १ पृ. २९९

तलफ; तल्लफ—इच्छा; हुक्की; तीव्र इच्छा.

तलफ—नाश; विध्वंस; उध्वस्त, नष्ट.

तलफ करणें—उध्वस्त करणें.

१ मुऱ्हारी जगदेवराव सुभा येऊन पुणें जाळून लुटून तलफ केले.
—इ. म. ५६

२ मुलुख मारून तलफ केला. —सभासद ५३

३ तर्फ मजकुरास काबीजाती येतां आधीं घाली घालून तपे मज्कूर लुटून नागऊन तलफ केले. —पे. द. स. मा. २१६

४ घाला घालून तर्फ मजकूर लुटून नागवून तलफ केले.
—पे. द. ३१ पृ. ५

५ गतबर्षी सुलतान तारा मोंगल लष्कर समवेत येऊन कसबेमजकुरी मुक्काम करून घरे वाडे व पेठ मोडून जाळून तलफ केली.
—मा. स. प. मा पृ. १६३

६ याशिवाय त्यानें लहानसहान ७–८ खेडीं मारून तलफ करून खंडणी केली. —ऐ. ले. सं. १६२१

७ तीनशें राउतासहित गेल्यासारखें त्यांनीं काम असत्यांत (असत्या साहित्यांत) करून माघारें नागसंगळास येऊन गांव मारून तलफ करून मनस्वी लुटिलें. —ऐ. ले. सं. १७७३

तलब—हुकूम, अधिकार.

जिवाजीपंत अण्णा यास नानांनीं सिंहगडास कैदेंत घातलें होते, त्यास ४०,००० रु. चा हवाला घोरपडे यांणीं आपले तलबेंत लिहून घेतला आणि त्यास सोडविलें. —ऐ. ले. सं. ५२१९

तलब—सक्तीचे कायदेशीर बोलावणें. समन्स. मागणी.

१ त्याचे लेक नागोजी निमे पटेलगी करीत होता त्यास ठाणियामधे तलब करून आणून सदरहू अमलाची वाजी पुसी करिता
—शि. च. सा. खंड ५ पृष्ठ १६५

२ हें जाणून त्यास तलब करून हुजूर आणिला.
—चित्रगुप्त ७८

तलबतनख्वा—पगाराची बाकी, पगार, वगैरे.

१ नवाब असफजाह येही नासरजंगास आठ लक्ष रुपये लस्करचे तलबतनखेकरितां दिलें. --पे. द. २५ पृ. ५८

२ पाचशे गोऱ्याची तलबतनखा वरचेवर तुम्ही पाठवीत जावी. --दि. म. रा. २ पृ १४६

तलबा—तलबाना, पगार, पगाराची बाकी.

पहिली जमीयत आहे त्या लोकांस तलबा द्यावयास जागा नाहीं ऐसे असता नवी ठेवितो यास पैका कोठून देणार आहे? ---नाग २ पृ. २२

तलबाना---तलब म्हणजे बोलावणें पाठविणें किंवा समन्स करणें. त्यासाठीं पाठविण्यांत आलेल्या शिपायास जो पोटखर्च किंवा खानावळखर्च समन्स बजावलेल्या माणसाकडून देण्यांत येतो तो.

सोळा रोज प्रत्यह तलबाना गाडदी यास द्यावा लागतो. --ऐ. ले. सं. पृ. ४५४

तलवन—अस्थिर, चंचल, अशाश्वत.

तलवार (हिंदी शब्द)—तरवार, समशेर.

तलवून मिजाजी, तलवन मिजाज--अनिश्चितपणा, लहरीपणा. हर्दमख्याली; गैरकायममिजाजी.

१ रियासतींत मोठी गोष्ट की वचनाची कायमी त्यांत तलवून-मिजाजी झाल्यास व इत्लाखी बातल होऊं लागल्यास लाचार! —खरे ७ पृ. ३५७४

२ रघुनाथराव तलवन मिजाज, रियासतीस उपयोगी नाहीत. याकरितां माधवराव यांस पेशवाईवर पुन्हा कायम केले. —पुणें अखबार भाग १ पृ. १०४

तलहेटी—जवळचा प्रदेश. (?)

शिखानीं दिल्लीचे तळहेटीत अंतरवेदीत महालोमहाली रखी घेत असतात. —म. शि. यां का. पृ. ४९४

तलाख—शपथ.

तेव्हां सुभेदार बोलिले कीं तुझे आईवर तलाख आहे, खरेच सांग दौलतीस देणें किती? —हो. कै. पृ. २४

तलावा देणें—भोंवताली घिरटचा घालणें.

पहाटचा वेळ. आपले जागा ऐषआरामांत! होळकरानी जाताच फौजेभोवताला तलावा दिला. —हो. कै. पृ. १९

तलावा—टेहेळणी.

१ शत्रू येकदुसरें गलबत पुढे तलाव्यास पाठवितो.

—पे. द. ३३ पृ. १०३

२ तुम्ही तलावेयास फिरत असावे. जिकडे नेऊन (न्यून) पडेल तिकडे सांभाळावे. —पे. द. २८ पृ. २९२

३ बारी पलीकडे तलाव्यास फौज रवाना केली.

—खरे ८ पृ. ३९१९

४ अलाहिदा लस्कर घेउनु तलावा फिरो लागले.

—इ. म. ९

तलावा मारणें—तलावा करणें; टेहळणीकरतां फेरी मारणें.

रट्टेगेरी पलीकडेही २-३ कोस जाऊन तलावा मारून तृतीय प्रहरीं आजच माघारीं आलों. —ऐ. ले. सं. २७३७

तव—तर, तों; तरी.

१ येथील चर खाणावयासी सिपाई लोक तव दमले. वेठचास काम होत नाही. यैसेयासी कामाठी दाहाजण पाठविणें.

—पे. द. १६ पृ. ७१

२ ज्ञातीचा तंव कट. सर्व संमताविना मोडत नाहीं, म्हणोन बहुताप्रकारें यजमानास विनंती केली. —ऐ. ले. सं. ६२२३

तवई—दुर्दशा. नाश, संकट, तवाई.

१ चाकर बारगीर उठोन जातात. तवईच आहे.

—पे. द. भाग २० पत्र नं. २७१

२ सदाशिवपन्तावर मोठा तवईचा वख्त गुजरला.

—पा. ब. १४

३ स्वामीवर तवाई मोठी गुदरली आहे

—खरे ११ पृ. ५९१०

४ आम्ही किती दिवस तवाई सोसावी ? याउपर बाहेर पडोन मोर्चे उधळितो, नाहींतर त्यास पालवून शहरात घेतो.

—खरे १२ पृ. ६२७७

तवक्कू—आशा, भरंवसा.

तवक्कू—मुक्काम.

तवक—ईर्षा, त्वेष.

दिल्लीहून शास्ताखान परम तवके पैजेचे विडे घेऊन दक्षिणेस आला.

—चित्र ४१

तवकल तवकूल:—भरवसा.

१ मोठे मनसव्यास ईश्वरावर तवकल करून चाललो.

—ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ २२

२ तवकलीचा विचार केलीया सार्थकताहि नाहीं. वेर्थच आपले हाते लोकांची घरें बुडवावी. यास्तव आजीपर्यंत अनमान केला.

—पे. द. ३३ पृ. ३८

३ आमची तवकल श्रीहरी ! कोणेही गोष्टीची फिकीर नाहीं.

—खरे १ पृ. २४२

४ खुदावर तवकूल ठेवून रघुनाथराव यांचे तम्बीचा इरादा केला.

—राजवाडे ५ पृ. ८६

तवकल करणें—ईश्वरावर भरंवसा ठेवणें.

कदाचित् तवकल करून दुसरी फौज नवाबास सामील व्हावयास येईल, तिला तिकडील तिकडेच शह तुमचा बसोन ती आटकलो म्हणजे इकडील हे फौज बुडत आहे.

—ब्र. च. पृ. ४६

तवका (पु.)—आशा, भरंवसा, आधार.

१ खुलास दुनियाईचे आलमांत जितक्या तवक्याच्या शकला आहेत, त्यातर्फेन दाखवून हर तद्बिरीनें निफाक (वैर) पाडावयासी कसूर करणार नाहींत.

—साने प. या. व. ४६६

२ तमा तवके दाखऊन शोहरा करितील.

—साने प. या. व. ४६६

३ इसामुदीखानासही पत्र लेहून पाठवावे जे आजीचे उत्तरच न ये तर आम्हास तुम्हापासून आणखी तवके काय? पातशाहा आम्हावर रागे आहेत तर आम्हास तेथे येऊन सार्थक काय?

—हिंगणें द. भाग २ पृ. ९९

४ आमचे कारकुनाशी जाबसाल केले जे, ते या समयांत या देशांत येऊन पोहोंचले (म्हणून) आम्हास बहुत तवका जाला.

—पे. द. भाग २७ पत्र. नं. १६९

तवकूफ (पु.)—खोळंबा; आवकाश.

बिल्फैल आं मेहेरबानांकडून ताण बसावा इतकाच तवकूफ.

—राजवाडे १९ पृ. ७३

तवकें—आशा किंवा अपेक्षा.

आर्जीचे उत्तरचे नये; तर आम्हांस तुम्हापासून तवकें काय ये ?

—हिं. द. खंड २ पृष्ठ ९९

तवज्जेह—लक्ष, कृपा.

तर तवजे करून या सोवत स्वारांचा दर्या (?) ठिकाणलग देऊन तिकडून आरामसीर हत्ती घेऊन येत ते बात केली पाहिजे.

—पारसनीस ब्र. च. २४

तवजा—तवाजा, बक्षीस.

इकडेहि न येणे. तिकडेही न जाणे. (असे तटस्थ राहिलात तर) नजराणा घासदाणा म्हणून तवजा करूं.

—E. M. P. पृ. १३२

तवजामुदारत—आदरसत्कार.

समारंभे भेटीचा प्रसंग होऊन तवजामुदारत जाली.

—नाग २ पृ. १२५

तवजी—वांटणी.

हिसेव तवजी कसबे भुगांव खमस अर्बैन रु. १४७५

हिस्सा सेनासाहेब सुभा	हिस्सा स्वस्थानिक भाईबारा
८४३॥। रुपये	८४३॥। रुपये

(वगैरे) —वै. ४ स. १७४४ पृ. २

तवताक—सत्य; निश्चित; विश्वसनीय, तपशील.

१ स्वामींनीं राजपुरीस तेथील अनुसंधानी माणूस मातबर आहे, त्यासी कांहीं दिल्हे म्हणून नवाजी (जबानी ? मोडी वा. चूक) तवताक कांहीं नाहीं.

—रा. खं. ३ पृ. ३

२ त्यांची खुशाली आज आली. मागाहून तवताक आज उद्यां येणार आहे.

—ब्र. च. पृ. ३३०

तवतुक—सिद्ध, रुजू. **तवतूक होणें**—लक्षणेनें अर्थ, कामी येणे, मरणें.

जनकोजी पानपतचे गर्दीत गारद जाले दत्ताजी नजीबखानाचे गर्दीत कामास आले जयाप्पा मारवाडांत राहिले. राणोजी शिंदे याचे तिघे खासे पुत्र श्रीमंतांचे नोकरीत तवतुक जाहले. तेव्हा महादजी सिंदे विदूर दौलत आटोपून सरकार चाकरी करावयाजोगा पाहून श्रीमंतांनी त्यास सरदारी दिली.

—हो. कै. पृ. ३९

तवयेस—(?)

गुराब इंग्रजाचे बारखी सालगुदस्ता तवयेस गोव्यास होती ती सालमजकुरी माल भरून उदमास जात होती त्यास सरकारच्या आरमाराची गांठ पडली तेव्हा गोवेकराचा माल तीवर होता तो खालीसा (जप्त) केला.

—केळकर संग्रह कुबल दप्तर

तवर—आवेश. वीरश्री, अंगेजी.

१ उमतीचा तवर केली झड घालुन तल्वार.

—परशराम १०९

२ शहर पुण्याच्या भर रस्त्यामधि भर नवतीचा तवर नवा.

—परशराम १७४

तवरख बंद—(?)

पैकी दोन राहिले त्यास ततबीर (उपाय, युक्ति व्यवस्था) नाहीं, आपण बाहीर ततबीरीस फिरत होतो त्यास अंज्यजादी हिंडता पुढें ततवीर कोठे नव्हे. मग आपण तुम्हापासी नगरास आलो येऊन होन घेऊन सदरपैकी आपण तुम्हास मोकदमी निमे तवरत (तवरख) बंध दिधली आहे.

—शि. च. सा. खं. ५ पृ. १३

तवलूद (पु,)—तवल्लुद, पिढी, जन्म.

१ आमची नियत ईश्वरास मान्य होऊन माधवराव पन्तप्रधान यांचा तवलूद झाला. —राजवाडे ५ पृ. ८६

२ त्यानंतर माधवराव पंतप्रधानाचा तवलूद जाहला.

—पुणें अखबार भाग १ पृ. १०६

तवा—पत्रा.

तांब्याचा तवा हौदास पाठवून देणेंविशीं आज्ञा. त्याजवरून आज्ञेप्रमाणें तांब्याचा तवा १ वजन कच्चें ४८ मण पाठविला आहे.

—ऐ. ले. सं. ४२४९

तवाई—तंगी, त्रास, दुर्दशा, ओढ, विपत्ति.

वैरण नाहीं लस्करांत तवाई आली यैसे जाणून प्रातःकाली कूच करून तोफा तळावर सोडून तैसेच निघाले.

—पे. द. ११ पृ. २९

२ माळवे प्रांते कोठें रुपया मिळाला नाही अगर पलीकडेही मिळाला नाहीं यैसी तवाई जाली.

—पे. द. १३ पृ. ९

३ पैसा प्राप्त नाहीं. तरी तुम्ही फारच केली. तवाई सोसून राहिला. आजन्मांत लोकांचे दंगे तुम्हांस ठाव्रूक नाहींत. ते पुरते अनुभवास आले !

—ऐ. ले. सं. ५०९

तवाका—तोक, गळेबंद.

पायांत बेडी व गळचात तवाका घालून कैदेंत ठेविले.

—म. म. ब. ११

तवाजा, तवाजू, तवीजे, तवाजे—बक्षीस, सन्मान सत्कार.

१ राणांनी हत्ती घोडा तवाजा केला.

—दि. म. रा. २ पृ. १९८

२ त्यांनीं दहा लक्षाची जहागीर तवाजा करून समजावीश केली.

--राजवाडे ५ पृ. २९

३ मौजे तुळजापूर महम्मद दौलतखान बहादूर याणीं आम्हांस तवाजा केला आहे.

--राजवाडे २२ पृ. १०४

४ आम्ही वस्त्रें, पान, खुशबो, तवाजे केली.

--हिं. द. खंड १ पृष्ठ ३७

५ अट कीं टक्का मिळेल तो फौजेमाफिक तविजे द्यावा.

--पे. द. १० पृ. ३२

६ कपितानाने आपले दिवानास (आमचे) घरास पाठविला असता तवाजा करावे म्हणून तीस रुपयाचा सिरोपाव त्यास दिल्हा.

—E. M. P. पृ. ९७

७ तिकडे हैदर इंग्रजावर गालीब आहे तेव्हा निजामाने आपणास मिळावे म्हणून खिसाऱ्याची बाबत किंवा आणखी काहीं तवाजा कबूल करावयाचे मानस पुणे दरबारचे नाही.

--पुणें अख. भाग २ पृ. ४१

तवातोबरा--शिलेदारांचा व त्यांच्या घोड्यांचा निर्वाह किंवा उपजीविका. (तवा व तोबरा हीं प्रत्येक शिलेदाराच्या घोड्यावर असावयाचींच. तवा शिलेदाराला भाकरी पिठल्यासाठीं, व तोबरा घोड्याच्या दाण्यासाठीं. यावरून लक्षणेनें, शिलेदारास व घोड्यास लागणारी उपजीविका).

१ त्यास चार दिवस येथेंच ठासून राहणें प्राप्त, परंतु फौजेचा तवातोबरा चालला पाहिजे, याजकरितां मिरजप्रांतीं रोखे केले.

—ऐ. ले. सं. २९१३

२ इकडे कांहीं (पैका) उत्पन्न जाहल्यास तवातोबरा (चालेल) न जाहल्यास फाका.

—हो. कै. पृ. १६९

३ तवातोब्रा चालल्यावर दुसरे सुचेल.

—हो. कै. २५

तवानगिरी--श्रीमंती, संपत्ति.

तवानणें—हुशार होणें; तवाना होणें.

तवाना—सशक्त, हुशार, ताजा.

१ वाघानें चार रुपये संपादून तवाना जाहला आहे.

—खरे १२ पृ. ६३९९

२ फौज तवानी राखून बुनगेचा बचाव होय तोच अर्थ करावा.

--खरे ५ पृ. २५०४

तवाफ—प्रदक्षिणा.
दर्ग्यांत जाऊन तवाफ करून.
—राजवाडे ५ पृ. ६५

तवाफा—-ताफा कलवंतिणीचा.
बागातच भोजन करून प्रहररात्रपर्यंत तवाफाचा नाच पाहून हवेलीस गेले.
—पुणें अखबार भाग ३ पृ. १०५

तवाबअ--(अ) ताबअ, तावा.
तवारीख—इतिहास.
तवारिख-नामा--इतिहासग्रंथ.
अगर मुसलमान कोणी असे तरी मोठे मोठे तवारिखनामे जाले असते.
—ऐ. टि. १ पृ. १८

तवालीयत—जिम्मेदारी, कारभारीपणा.
दर्गा मजकूरची तवालीयत. --वाड सनदा ७७
तवीक—पायदळ शिपाई, बारगीर.
इकडील राजकी अभिप्राय (वर्तमान) महंमद अल्ली कुमदान व गाजीखान व ममदूखां वगैरे २ हजार तवीक व १ हजार शिलेदार मिळोन ३ हजार व बार ४ हजार व तोफखाना सुमार (संख्या) ६ येणेंप्रमाणें काल अळुरास मुक्काम होता.
—ऐ. ले. सं. २७५९

तवीयत--हेतु, धोरण.
तवेल्दार—कुऱ्हाडवाला.
—पारसनीस ब्र. च. ५५
तश्रीफ, तश्रीप, तसलीब, तस्लीब—-पोषाक किंवा देणगी देऊन आदरसत्कार सन्मान करणें.
‘तस्लिबा दिल्या बामणाला’ —अफझलखानवध पोवाडा.
किल्लेदार याणी बहुत संतोष होऊन तिमरसैयाची भेट घेऊन मानसन्मान करून तश्रीप काही उचितार्थ (संभावना द्रव्य) देऊन आपण आमचे संग्रही असावे असे सांगितले. —द. स. कै. या. पृ. २५६
तश्रीफ—मोठें होणें.
तश्वीस, तश्वीश; —पीडा. तोशीस
१ त्यास एकजरेचे तश्वीस व आजार लागूं न देणें.
—राजवाडे १५ पृ. १५६
२ रयतीस लायनी सिवीगाली न करणें व तश्वीस न देणें.
—राजवाडे १६ पृ. २९

तशखीस—चिकित्सा; चौकशी, किंवा ती करण्याचा अधिकार. निदान, परिणामाच्या कारणाची निश्चिती.

अमिलाची तगीरीबहाली व जमाबंदीची तशखीस याचा यख्तियार अहिल्याबाईचा नसावा. —पुणें अख. भाग २ पृ. १३७

तशफ्फी—दिलासा; समाधान.

तुम्ही आमचे तर्फेनें यांची तशफ्फी व दिल्जोई करावी.

—राजवाडे २२ पृ. २५

तशिया—नोंदबुक, रजिस्टर; मोगलाईत या शब्दाला सरकारी घोडयांचे नोंदपत्रक असा विशिष्ट अर्थ असे. हें पत्रक घोड्याना डाग देऊन झाला आहे कीं नाहीं कळण्यासाठी आवश्यक असे. —विल्सन

तष्कीस—वैद्यानें केलेली रोगाची चिकित्सा. —रा. व्य. को.

तषक्, तुषक—दुलई.

तष्ट—त्वष्ट, तगादा.

यानीं त्यास खर्च पडला त्याचे तष्ट विसा लक्षाचें लाविले. पण तो दोन लाख देईन म्हणतो. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ३२

तस्करा (पु.)—आवण; फिर्याद; तक्रार.

त्याजवर हुजूर कोणी तस्करा केला कीं

—खरे ७ पृ. ३६९०

तस्खर— विटंबना, टिंगल, हेळणा.

तस्त—चूळ भरून टाकण्याचें भांडें. तस्त —(रा. व्य. को.)

हात तोंड धुतांना पाणी सांडण्याचें रुंद तोंडाचें भांडें, पिकदाणी.

तस्दीक—दान.

तमाम लोकांनीं सतके नगदी रुपये व खुर्दा व उडीद तेल तीळ वगैरे जिन्नस तस्दीक केले. —राजवाडे ७ पृ. १२०

तस्फिया—स्नेह, तह.

रफेशर केला व तस्फियाचा नक्षा ठराविला.

—बाड कैकियती १००

तस्फीयाचा नकाशा (**तस्फीया** म्ह. स्नेह व **नकाशा** म्ह. योजना, तह, ठराव) स्नेहाचा तह.

अवतरणासाठीं 'इतल्ला मनाशिब वक्त' पाहा.

तसखीर—काबीज.

फत्तेसिंग गायकवाडानें फौज ठेऊन महादजी सिंद्याचे मुकाबिल्यास जावे किंवा खानदेश तसखीर करावा या दोन्ही पैकी एक मोहीम कबूल करावी. —पुणें अख. भाग २ पृ. ४९

तसडर—(?)

येकीन तसडर (तसउर ?) करितो कीं आमोहिबास हुकूम जाहला असे कीं इंजानेबाकडील तमाम तरांडी व इंग्रेज सरदार लोकांस सोडून द्यावे त्यावरून आमोहिब्री तमाम सोडिलेच असेल त्या वास्ता काही चीजवस्त असावी ते महागिरीवर रवाना फर्माविली जात आहे.

--केळकर संग्रह कुबल दप्तर

तसदूक—दान, ओवाळून टाकिलेले.

१ नजरा व लोकांचे तसदूक सत्के जाले. --राजवाडे ७ पृ. १२३

२ त्यावरुन वजिरानीं उत्तर दिधलें जें माझे घर श्रीमंत राजेश्री नाना-साहेबांचे तसदूक आहे परंतु हे महाल सरदार खास पातशहाचे.

—पे. द. भाग २७ पत्र नं. १३०

३ सेवकास स्वामीच्या पायावरून तसदूक करून पुरजे पुरजे (तुकडे तुकडे) करून कापल्यास कुतऱ्यास घारीस चारिले तरी उजूर नाहीं.

—पे. द.

४ दाराशुको आणि औरंगजेब हे उभयता अजमेरीजवळी जुंजले तेव्हा जोतिषाने सांगितले जे मेघडंबरीत पातशाहा स्वार होईल तर मारला जाईल. ते समई सेखमीर याणी विडा उचलून मेघडंबरीत तोच स्वार जाहला आणि तसदूक जाहला. त्याचें पुत्रास बक्षगिरी फर्माऊन कचेरी लाल फर्माविली. —हिंगणें. द. भाग २ पृ. १९

तसनस (पु.)—खराबी, नुकसानी.

१ज्यामार्गे लष्कर गेलें त्याची रखवालीहि गांवाकडून घेतली असतां तसनस व्हावयाचा तो जाहला. गांवांतील घरेंदेखील मोडून नेलीं आणि रखवाली पडावयाची ती पडली! —ऐ. ले. सं. ५१५६

२ रेणदाळचा तसनस केला आहे तो भरून द्यावा.

—ऐ. ले. सं. २३३३

तसफिया—निर्णय, निकाल, तह.

छ २४ रोजी बालाजीपंत, महादजीसिंद्याचे खेम्यास जाऊन तसफियाचा मजकूर बोलोन आले म्हणून पेशजी लिहिलेच आहे त्यास छ २४ मज-कुरीच बालाजीपंत व सिंदेबहादुर याची कसमअकसाम जाली.

—पुणें अखबार भाग ३ पृ. १८६

तसबिऱ्याचा मुलाहिजा करणे—चित्रे, तसबिरा पाहणे.

दोन तीन घटका तसबीऱ्यांचा मुलाहिजा करून रात्रौ संध्येसमई कवा-लाचे गायन यैकून भोजन करून आराम केला.

—पुणें अखबार भाग ३ पृ. १९५

तसबी—मण्याची माळ, स्मरणी, माळ.

रघुनाथ हरी यांजबरावर मोत्ये **तसब्या** ३ येकूण मोत्ये दाणे सुमार २०० पाठविले आहेत.
—पे. द.

तस्त्रीफ; तश्रीफ—आगमन.

जूद आंयक्बाल–पन्हांनीं या जिल्हयास तस्त्रीफ फर्मावावी.
—साने प. या. व. ३८७

तस्लीम—'अस्सलाम् अलैकुम' (तुम्हांला शांति असो) असें म्हणणें; वन्दन

तस्लीमात—वन्दन; देणगी; मोघम खर्ची; स्वाधीन.

१ समस्त लहान थोरी तस्लीमात बज्या आणिली.
—ऐ. टि. १६५

२ ती (जागा) तानाजी येवला याचे तस्लमातीस दिली आहे.
—राजवाडे १२ पृ. १८३

३ तस्लीबा (तस्लिमा) दिल्या बामणाला
—अफजल्खान पोवाडा

४ ज्याचे तस्लमातीस ज हत्यार असेल त्याची चौकशी. . . .राखीत जावी.
—भों. कु. ४०

५ हैदर्यारखान यास पंचहजारीची तस्लीमात जाली.
—राजवाडे १ पृ. १७९

६ बाळंतविडा पाठविला तस्लमात (समागमे) श्रीनिवास त्रिंबक.
—वाड स. मा. १४०

तस्लीमात—(अ) तस्लीम, रक्षित असणें.

तसलिमात—वंदन, **तसलिमातनजर**—वंदन करतांना द्यावयाची देणगी.

पवारांनीं इंद्रप्रस्थीं अथवा राजसंस्थानी (साताऱ्यास) फौजसुद्धा आलियास नौबत नगारे जरीपटकासहित चालते स्वारीने जावे. शस्त्रसहवर्तमान तसलिमात नजर न करिता सलाम करून तक्ताशेजारी उजवे बाजूस बैठक तेथे बसावे वस्त्रे सर्वधी (सर्वाआधीं) मानपानदान भेटी सन्माने करून व्हावी ऐसा संप्रदाय प्राचीन आहे.
—द. स. कै. या. पृ. ७०

तसराव—(?)

गलबत मजकूर सरकारच्या बंदरास बाणकोट सुवर्णदुर्गच्या बारेयावर हस्तगत जाहाली ते समई रा० भगवंतराव धुळप सुभेदार याणी सामान. उतरोन घेतले येणेप्रमाणें.

१ तसरावांचा गठा तसरवे येक गठ्ठा

१९।२० तिवटें धुवट येकुणीस.
—केळकर संग्रह कुबलदप्तर

तसरीफ—मानधन.

जंजिरे सिंधुदुर्ग किल्ल्याच्या निसबतीचा सावकारोचा धंदा कौलावण व दस्तकें यांची मांडावळ एकंदर तुम्हास सांगितली असे तरी वहिवाट करीत जाणें. सदरहू मांडावळ कौलाची जमा होईल त्यापैकी दलाली व तसरीफ तुम्हास मजरा देऊं.

—के. सं. कुसे दफतर मालवण.

तसरूफ (पु.)—अम्मल, तावा, स्वाधीन.

१ मकर फरेब करून आपला तसरूफ केला.

—दि. म. रा. १ पृ. ५४

२ मुलूखही तशरूफात आणिला. —खरे ७ पृ. ३५६९

३ त्यांच्या भरंवशावर येथील रयतेस उजाड करून लाखो रुपये तसरूफ केले. —दि. म. रा. २ पृ. १८५

तसरुफ टाकणें—-नावे खर्ची टाकणें, देऊन टाकणें.

जे वक्ती मिर्जाराजे जयसिंग येही शिवाजी भोसले यासी सलाह करून तर्फ कर्याती मावळ देह छत्तीस त्यांचे तसरुफ टाकीले ते वक्ती शिरस्तीया मध्यें देह छत्तीस दरोबस्त शिवाजी बरहूम यांच्या नावे लिहिले

--मा. स. प. मा पृ. १४०

तसरूफाती—अधिकार, तावा, भोगवटा.

१ भोगवटे तसरूफाती चालत आले आहेत. —इ. म. ४४

२ फर्मान व भोगवटे याचे कागद होते ते जलाले; व आपण दुकालाकरिता कासीस गेलों होतों त्याकरिता तसरुफाती अजी तागाईत नाहीं.

—राजेवाडे २० पृ. ३१८

तसल्लीं—समाधान, खातर्जमा.

परंतु दुसरा सरदार आल्याखेरीज पादशहाची तसल्ली होत नाहीं.

—दि. म. रा. १ पृ. २५९.

तसली—खातरजमा, खातरतसली.

सलाबतजंगानें घरोघर जाऊन अवघे सरदाराची तसली करून परांड्याकडे कूच केले. —E. M. P. पृ. १६०

तसली दिलबरी—तसली म्ह. खात्री, **दिलबरी**—विश्वास समाधान.

सैद हसनखान म्हणजे साहेबुमन सरदार घरवतनदार हमसरचा. जितके हमसरीये तितके याचे चाकरसारिखे आहेती. याची तसली दिलबरी शिपाईयास ठाऊकी आहे जे (कीं हा) प्रामाणिक आहे एकवचनी आहे.

—पे. द. १० पृ. ६२

तुम्ही आलेत आतां तुम्हास खिलवतात बोलावून जाबसाल सविस्तर परस्परें पुसोन लिहून देतील यैसीं तसले केली.

--पे. द. १० पृ. ५५

तसलिमातीची फौज—खास राखीव अशी मानकऱ्यांची फौज तसलीम म्ह. अभिवादन. भावार्थ ज्याना छत्रपति उत्थापन देतात अशा मातबर मान-कऱ्यांची विश्वासू फौज.

धनाजी जाधवरावानी हुकूम अमान्य करताच शाहूमहाराजांस रोष येऊन तसलीमातीची फौज बोलावून आणून बाळाजी विश्वनाथ यास सेनाकर्ते पद देऊन सेनापति लुटून टाकावे म्हणोन हुकूम जाहला.

—भा. व. अमा. बाव. यां. कै. पृ. १५

तसलीम—वंदन, दर्शन.

हजरत पन्हा बंद्याला हुकूम करतील तर कोळी नाबूद (नष्ट) करून मुलुख सर करून साहेबाचे तसलिमीस येईन.

—दस शि. मो. इ. पृ. ९२

तसवीस—त्रास.

मातोश्री फुईजी आवास ठाणेंचें तसवीस होत असे म्हणौउन खबर आइकतो. —शि. च. सा. खं. ४ पृ. ७८

तसियानसि--त्यांतच, तशातच.

प्रस्तुत उभयेता सरदार फौजेनसी मुलुक सोडून गेले नाहींत. अद्यापीवरी राज्यांत धामधूम करिताहेत. तसियानसी उभयेता श्रीमंतास कैलासवास जाहला. —पे. द. २८ पृ. १४

तसू—दोन बोटांची लांबी.

तह—ठिगळ.

चिलखत करविलें म्हणोन आज्ञा. त्यास पंधरा तह म्हणजे थोडे. आणखी ५–६ तह असावे. पोकळ असावे. पाठीवर व पुठचावर अधिक असले म्हणजे ठीक. —ऐ. ले. सं. ७००४

तह—करार, ठराव.

त्यावरून मशारनिल्हेची वाजपूस केली कीं तूं देशकुलकर्णी म्हणवितोस आणि वसूल लिहीत नाहीं. फुकट हक खातोस. त्यावरून गुन्हेगारी लाऊन खंड घेतला. हाली आपले राज्यांत वसूल कुळकर्णी याचे दप्तरी रुजू मोझ्याबगर चालत नाहीं. म्हणोन मामले मजकुरी कुळकर्णी नाहींत म्हणोन तह केला. —पुरं. द. भा. ३ पृ. १४४

तहकात—तहकिकात, चौकशी, शहानिशा.

पठाण याजपाशी सरंजाम चारपाच हजार फौज व तोफखाना आहे.

तेथून कोणीकडे जातील हे तहकात करून लेहून पाठवितो.

—पे. द. २८ पृ. १९०

तहकाकत—पक्के, खात्रीशीर, विश्वसनीय.

सतेमिथ्या नकले परंतु वर्तमान तहकाकत आहे.

—पे. द. ३ पृ. ४३

तहकीक—सत्य, निश्चिति, निर्णय, निश्चित, खरे.

कांहीं कदीम सनद असेल ते हुजूर आणून दाखवावी त्यावरून तहकीक होईल. —राजवाडे १५ पृ. ४

तहकीकात—खऱ्याखोटयाची चौकशी.

१ तोतयाचो धाकटे नाना व गोविंद शिवराम तहकीकात करितां, तो 'थोरात रघुजी' असा ठराव जाहला.

—ऐ. ले. सं. ६३१

तहकीक—निश्चित वर्तमान.

गनीम खामखां येंके मोर्चावरी या चोरोजांत घालितात हे तहकीक आंगरीयाचे मोर्चीयामधें आली. —पे. द. ३ पृ. १५

२ सदर्हू गोष्टीची तहकीकात लाविली.

—राजवाडे १८ पृ. ६०

३ शहरास कमवीसदार पाठवून तहकीकात करावी.

—साने प. या. व. ११९

तहकीद—तहकीक; पक्कें; निश्चित.

मीर फैजुल्ला यास धारवाडाकडे रवाना करून हैदर आपण खासा वंकापुराहून माघारा एक मजल गेला म्हणून वर्तमान तहकीद आहे.

—ऐ. ले. सं. ७६१

तहकूब, तकूब—थांबवणूक, आडवणूक, थांबलेले, ढकलणीवर टाकलेलें, तात्पुरते बन्द; रहित; रद्द.

१ ऐवजाची निकड लाविली आहे जर करिता रदबदलीमुळें चार दिवस तकूब जाले तर उत्तम जाले. —राजवाडे ३ पृ. १६९

२ हल्ला तकूब झाली —म. रा. चि. थो. शा, १६

३ लढाई तहकूब करितों —म. रा. चि. थो. शा. ५०

तहखर्च—अफाट, बेफाट खर्च, फुकट खर्च.

१ तुम्हामुळे आमचे स्वारीचा उद्योग राहिला यामुलें आम्ही तहखर्चांत आलों. —पुणें अखबार, भाग ३ पृ. ४६

२ आम्हावर इंगरेजाची मसलत यामुळे आम्ही तहखर्चात आलो.

—पुणें अख० भाग २ पृ. १५९

तहखाना—जमिनीत खोदलेलें तळघर.

१ अवतरणासाठीं ऊष्ण पाहा. —हो. कै. पृ. १०

२ कांहीं गोविंदरायाच्या तहखान्यात लपाले.

—राजवाडे ६ पृ. ६२९.

तहगीर करणें, होणें—बदलणें.

न्याहार खानाचें वाईचें ठाणें तहगीर जह्यालें.

—इ. म. ३६

तहगिरी—तगीरी, बडतर्फी.

१ गाजुद्दिखा याजला दक्षणचा सुभा पातशहापासून सांगून निजाम-अल्लीची तहगिरी केली. —हो. कै. पृ. १८

२ बाबूराव कोन्हेर याची सरकारातून तहगिरी होऊन आठ नव महिने जाहाले. —पे. द. भाग. २९ पत्र नं. २२

तहत, तहद—सीमान्त, पर्यंत.

पुढेंही श्री अहद रामेश्वर तहद दिल्ली यश देईल.

—पारसनीस ब्र. प. २५३

तहदम—बेजार.

खामगावकरास सा जण काठयाखाले मारावयासी लावले. दोघे पाटील मारून तहदम केले. —पे. द. १८ पृ ५०

तहदिगर—करारमदार.

वऱ्हाडप्रांतीं साठचाळिसाचा तहदिगर जहागिरीचा होता तो निम्मेनिम जाहला त्यासही ठिकाण नाहीं. —नाग १ पृ. ८१

तह देणें—तह ठरविणें, बोलणें करणें, निर्णय देणें, निश्चय ठरणें, ठराव करणें, तहकुबी.

१ ऐसा सिद्धांत करून बजाजी नाइक निंबाळकर व त्याची मातोश्री शिवाई आऊ यांस वर्तमान सांगितले की ही गोष्टी तुमचे विचारे उत्तम आहे कीं काय ? तेव्हा त्रिवर्गाचा विचार एक होऊन तह दिला की हे गोष्टी केल्यानें उत्तम आहे.

—इ. सं. पे. द. स. प. मा. पृ. २१

२ देशक जमा झाले ते समयी वादास उभे राहिलो तो देशकानें तह दिल्हा कीं, किल्ले सिंहीगडी मोकदम व गोत खंडणीस जमा होईल तेव्हा तुमचा कजीया विल्हे लावूं.

—ऐ. सं. सा. खंड ५ पृष्ठ ७५

३ त्याणी सरळ याचा प्रसंग केला तरी कैसा तह द्यावा ये गोष्टीचा विचार लेहून पाठवून देणें. —पे. द. १२ पृ. ४४

तहनाल, तहनाळ—तरवारीच्या म्यानावर केलेलें धातूचें कारागिरी काम किंवा टोंकास बसविलेलें धातूचें टोपण इ०
तरवारीचें अग्र झाकणारा म्यानाचा भाग
—रा. व्य. को.

तहपट—तहाचा मसुदा.
तहपट करार करून पाठविला, त्याप्रमाणें कोन्हेरराव त्रिंबक यांचें विद्यमानें तह जाहला आहे. —ऐ. ले. सं. ३२४५

तहबंद—पक्का करार; पक्का; निश्चित.
१ हैदरखान यानें आमची गोष्ट ऐकावी. तहबंद झालिया मग आम्हांकडून सालास नवीन प्रकार होणार नाहीं.
—ऐ. ले. सं. १२२१
२ सरंजामाचो यादी व बहुमानाची व भेटीचा सिद्धांत व हल्ली नालबंदी व पुणाचें कर्ज वारावे, यांचा करारनामा तहबंद शिकियानसी पाठविणें ते आलियावरी आपण भेटीस येतो.
—वै ४ स १७४७ पृ. ४

तहबंदी—खंडणीचा ठराव.
श्रीमंत तात्यासाहेब यांनीं मिश्रीकोट व जुनी हुबळी वगैरे महाल तहबंदी करूद कुंदगोळ मुक्कामीं येऊन उतरले.
—ऐ. ले. सं. २७६७

तहबार--मूळ शब्द तहव्बुरी, तहव्वुरी असा आहे. त्याचा अर्थ शौर्य. त्यावरून लक्षणेनें जोरा, दहशत, जुलूम, दंगा.
तेथें अंमल सुरू जालीयावर दंगा जाला. त्यामुलें सिबंदीच्या तहबाराखाली आलो. त्यामुळें ओढ जाली आहे.
--हिं. द. खंड १ पृष्ठ १२२

तहमूल (पु.) तह्मुली (स्त्री)--१ सहन, सहिष्णुता २ पुष्टीबल, साहाय्य ३ ढिलाई.
१ तुमचा वास्ता दरम्यान आहे याजकरिता तामूल जाला नाहीं तरी याचा तदारुक करणे लाजम आहे.
—राजवाडे २२ पृ. ६१
२ आपण सबूरी करून तहमूल करावयास तक्सीर केली नाहीं.
—इ. म. ६७
३ इतका प्रकार झाला तो पाटिलबावाचे तहमुली धीमेपणा करता जाला आहे. —दि. म. रा. १ पृ. १४५

तहरह—तह; करार.

मोंगलांस पत्रें कीं, साबाजीस आसरा न देणें. त्याणीं आसरा न दिला तर तहरह होईलसा दिसतो. —ऐ. ले. सं. २०७८

तहवूर व जलादत—दस्तगाह—धैर्यशौर्यनिधि.

—राजवाडे १२ पृ. १८८

तहवर दस्तगाह. —राजवाडे १८ पृ. ५६

तहरीर—फडणीस व मुझुमदार यांना राज्यांतील वसुलावर मिळावयाचा हक्क.

फडणिसानी समग्र कदीम मामलतदार यास बोलाऊन हरयेकाचे जातीस महालात आमिलाना व तहरीर काय मिळतो याचा शोध मामलतदारांचे जुबानी करून हरयेकाचे मकदुराप्रमाणे नजर रुपये घेत आहेत.

—पुणें अख० भाग २ पृ. १२०

तहरीर—(?)

तहरीर सोनेरी करविली त्यास सवा तोळे सोनें दिले कीं पन्नास रुपये पावेतो पालखी तयार होती. (पण) कारीगर लबाड. काम चांगले न केले सबब तबकडी माघारी दिल्ही.

—केळकर संग्रह स. रा. जोशी दप्तर

तहरीर—१ लेखी पत्रक. २ गांवच्या वसुलांतून देशपांड्याच्या कचेरी खर्चाकरितां खर्ची पडणारी रक्कम. याच नांवानें अशी रक्कम फडणीस किंवा मुजूमदारांनाहि दिली जाई.

तहरीर—लेखन.

तहव्वूर—शौर्य, तंवर.

तहव्वुरी—शौर्य.

तहवरी—तहगेरी, तगैरी ?

हिसेब मनास आणिता सर्व निदर्शणासी येईल. चिंता काये ? दोनी दिवस तहवरी व सुलूकी जो जे करील ते भोगणे पडली. स्वामीचे प्रतापेकडून तेहि निवारण होऊन जाईल. —हिंगणे द. भाग २ पृ. २९

तहवेल—अठरा कारखान्यांचा हिशेबी कागद. —पे. द.

तहशील—वसुली; मामलत; तालुका.

तहशील तलब—जरुरीप्रमाणें पडेल तें (काम).

—म. रा. आ. ३६

तहशीलदार—मामलेदार, एक मुल्की अधिकारी.

तहसीन—स्तुति.

तह्सील—वसूल.
ऐशियास कांहीं लोक मुलकात तहसिलेस गेले आहेत.
—पे. द. १७ पृ. ६९

तहसिलीस प्यादे सर्कारचे देविले जातील.
—सा. स इ. जुलै ९१

तह्सील लावणें—तसदी करणें; हाल करणें (?)
स्वामीच्या आज्ञा कीं अंबाडचा देशमुखाकडे पैका पाठविणें. त्यावरून आधी येताच अंबाडास येऊनु त्यास दोन दिवस बैसविले आण तह्सील लाविले.
—पे. द. १७ पृ. ३२

तहहयात—आयुष्य असेपर्यंत; आजीव.

तहात—समक्ष. नजरेखाली, देखत.
आमचे वसते घोडीस तीराची जखम. ते फार आम्ही थोडे परंतु थोर येश आले. त्याचा खातरजमा चांगला जाहला. लढाई मोठे अंगेजीची जाहाली. यैसे काम धण्याचे तहात जाले असते तर फारसे उर्जित होते ! बरे, लाभकालास काय करावें ?
—पे. द. पृ. २९७

तहिय्यह—तयारी, व्यवस्था.

तळ्याची पाळ—तळ्याचा कांठ. कांठावर घातलेला मातीचा उंच भराव त्याला पाळ म्हणतात.
हैदर झाडीच्या आश्रयानें तळ्याची पाळ धरून बिकट जाग्यास राहिला होता.
--ऐ. ले. सं. १७३०

तळई—अर्थासाठीं त्रागा शब्द पहा.
—ऐ. गो. लो. ७

तळणें—भाजून जखम Disinfect (निर्जंतुक) करणें.
महिमाजी मुसे याचे पायास गोळा लागला. गुडघ्यापावेतों पाय कापून तळ्ला. हुशार आहे.
—ऐ. ले. सं. ३११०

तळ ढाळणें—तळ हालवून दुसरीकडे नेणें.
१ आम्हीं प्रातःकाळच्या ७ घटका दिवसास मुहूर्तकरून पहिला तळ ढाळून आद कोसाच्या फासल्यानें मुक्काम केला आहे.
—ऐ. ले. सं. ४४६२

२ श्रीमंत कोन्हेरराव तळ ढाळून घोडगिरीजवळ गेले म्हणून लिहिलें तें कळलें.
—ऐ. ले. स. २५४५

३ आजच पत्र पावतांच प्रस्थान करून तळ ढाळावा आणि उदईक कूच करून कागवाडास यावें.
—ऐ. ले. सं. ३४९४

तळहातास केस असणें—नादान कर्तृत्वशून्य किंवा निर्बल असणें.
आप्पा बोलले की मी भाऊस शल्य करून ठेविले. तूं भाऊबरोबर भांडून

वाटणी घेशील. तेव्हां दाजी यांनीं उत्तर केले की माझे तळहातास कांहीं केस आले नाहींत. वाटणी मागणे हें काम निर्बलाचे.

—हरि वं. ब. पृ. ५

तळानें तळ येणें—पावलावर पाऊल टाकून पाठलाग करीत येणें.

सवाईजी भितात कीं शत्रु राजश्रीच्या तळानें तळ येतील.

--पे. द. १५ पृ. १९

तळावर तळ करणें—शत्रूचा पाठलाग करून तो ज्या मुक्कामावर उतरला असेल तेथें उतरून पुन: त्याच्या पाठीवर कूच करणें.

गोखले फौजेसह हरीपंताच्या पाठीवर तळावर तळ करीत येत आहेत. गोखले यांणीं पाठलाग करावयास कारण काय हें समजत नाहीं.

—ऐ. ले. सं. ७१९०

तळी--बंडावा; पुंडाई.

ठाणें त्याजकडे जाहल्यापासून इकडील जितके लुच्चे तितके त्यास मिळाले. तमाम तळीस प्रारंभ केला. —ऐ. ले. सं. २४०६

तळी करणें—दंगा करणें; बंड उभारणें.

परवां सडेकर देसाई याणीं तळी करून चौघांचें डोचकें कापून घेऊन दहा पाच आसामींस खपवून गेले. --ऐ. ले. सं. ३९७९

तळीखोर—दंगेखोर; बंडखोर.

१ टिपूकडील फौजेनें तळीखोरांकरितां कांहीं गडबड केली होती ते माघारी गेली. तत्रापि त्या तोंडावर आपली फौज असावी, म्हणून लवकर यावें.

—ऐ. ले. सं. ४३१५

२ शहापूर तालुक्यांतील खेडेकरी यांणीं तळीखोर ठेवोन घेऊन दट्टी-कर्यातींत तळी करवों लागले. —ऐ. ले. सं. ५६१०

ताइफा—(पु.) जमाव; जात.

ताइफेवार—जातवार, विल्हेवार; बाबवार.

मोहतर्फा बाब दुसरी ।
जाणूंनि लिहिजे चतुरी ।
ताइफेवार । --मेस्तक पुस्तक जमे लेखन ६८

ताईत—मंतरलेला कागद आंत असलेली, गळ्यांत बांधण्याची सोन्याची डबी, छोटी पेटी.

ताईद--अनुमोदन

ताई भरणें—रागास येणें; ताठा येणें; कोपायमान होणें; गर्व होणें.

फडणीस हे प्रतिनिधीपंताकडे जाऊन कचेरीस बसले होते. पंत बोलतां-बोलतां ताई भरोन फडणीस याजवर कमरेचे पेशकबज उपसोन मारतों

ऐ. श. ३५

म्हणून उठले, तेव्हां भवानजी घाटगे यांनें पंताचें मणगट धरून मागें काढलें. —ऐ. ले. सं. ८२५९
राजश्री बहुतसे ताई भरून मोठ्या कुरुयानें (कुर्यानें) बोलले. —पे. द. ४० पृ. ५७

ताकताराज—तक्तताराज; बेचिराख.
वंगाला ताकताराज करण्याविशी बहुताप्रकारे बोध केला. लिहित गेलों जे, हंगामा जाळपोळ करण्याविशी आळस नच करावा. —नाग १ पृ. २४०

ताकपिट्या—ओंगळ, गलिच्छ, हलक्या दर्जाचा.
ह्या ताकपिट्या कवीची प्रभाकरकर्त्यांनी चांगली खबर घेतली. —अरुणोदय पृष्ठ १८१

ताका—तागा, कपडाचा तागा.
दोन ताके उंच आणिले आहेत. —पे. द. ३३ पृ. १९८

ताकीददार—रखवाली करणारा, संरक्षक.
संगमनेरी व कान्हेरी रखवालीस कोणी बाणदार व ताकीददार पाठविले असले तर दोन्ही स्थलें मात्र जगतील. —खरे १ पृ. ३८८

ताकीद—कडक हुकूम, बंदोबस्त, मजबुती, शिक्षा
एकजरेचे आजार तुमचे तर्फेनें जाहले, ऐसे खबर मालूम जाहालिया बवाजिबी ताकीद होईल. —राजवाडे १५ पृ. १५६

ताकूब—पाठलाग.
१ वजीर अजम, व खानदौरा, व बंगस वगैरे अमीर तईकले आहेत. ते येऊन पोहोचतील. मग लढाई करून पराभव पावऊन ताकूब करून तंबी करणें. —पे. द. १५ पृ. १३
२ आलीजाह बेदराहून निघोन गेले तेच समयीं इकडील सरदारांनीं ताकूब करावयाचा तें न केलें. —राजवाडे ५ पृ. १८१
३ त्याचे ताकूबावर हरिपंत फौजेसुद्धा घाटाखाले गेले. —दि. म. रा. १ पृ. ३८

ताख्त (स्त्री.)—मारलूट; उध्वस्त.
फौजेनें एक दोन महाल ताख्त केले. —दि. म. रा. २ पृ. ८

ताखताराजी ताख्तताराज, ताख्त ताराजी—उध्वस्त; फस्त. मारलूट, नागावा, विध्वंस
१ गणेशपंत बेहरे——सुरतेकडे ताख्तताराजी करण्यास रवाना झाले. — साने प. या. व. ४७८

२ बंगाल्याची ताख्तताराजी होणार नाहीं.

—दि. म. रा. १ पृ. ५२

३ या उपर बंगाला ताख्तताराज करण्यांत येईल.

—दि. म. रा. १ पृ. ५०

४कारभाऱ्यानी तजवीज केली आहे की बंगाल्यांत गनीमीफौज (मराठ्यांची फौज) पाठऊन तो मुलूख ताख्तताराज करावा.

—पुणें. अख. भाग २ पृ. २८

५लगारे व पेंढारी पाठवून तमाम जाटाचें मुलकाची ताखताराजी करविली.

—म. शि. यां. का. पृ. २३६

तरवीर—उशीर.

तांगव—तांडव, त्रागा, तणतणाट.

सकारपूर्वक तर मजवर श्रमी जाला. तांगव त्याने किती केले त्याचा विस्तार कोठवर लिहूं ?

—हो. इ. सा. प. खंड. १ पृ. १९५

तांडव कृष्ण— लंगडा बाळकृष्ण. (महादजी शिंद्याचें एक सांकेतिक नांव)

तांडव कृष्णाकडे ही चिठ्ठी पहातांच पत्रें पाठवावीं कीं, तुम्ही कोणत्या सुमारें आलेत ? आम्हीं तुम्हीं एक कोणत्या स्थळीं व्हावें ?

—ऐ. ले. सं. ३२६४

तांडी—ताडी म्ह. दारू ?

त्यानीच सांगितले कीं हें घरे मोडू नेत जाणे. त्याजवरून कोणे कोणे तीन कोसावरून लाकडे आणिली. तेहि येकच दिवस. त्याजउपर येक लाकूड अगर सालवण अगर तांडी अथवा रयेतीस उपद्रव हें सहसा महाराजाचे दहशतीमुळे कोणी देऊ शकतो यैसे नाहीं.

—पे. द. ३० पृ. १९८

ताज्यूब—अपूर्व, चमत्कारिक.

आम्हां सावकार लोकांस मात्र बुडवावे या हेतूनें हे संस्थानिक आपल्या खराबीचा मजकूर सरकारांत कलमी करितात (लिहून देतात) ही गोष्ट ताज्यूब वाटते.

—पे. सा. पृ. १२५

ताज—शिरताज, रुमाल, पटका, मंदील.

महाराज स्वारीचे लोक माघे टाकून आपण येकटेच पुढे गेले. ते समई डोचकीस ताज व अंगांत बारीक अंगरखा व पांडरी सुरवार. डोकीच्या बावऱ्या (केसांच्या झिपऱ्या किंवा झुलपें) वाऱ्यानें उडत होत्या असें ध्यान होतें.

—म. द. रु. १ पृ. १३०

ताजकी--भलेपणा, मोठेपणा, बरें, सुख.

दिल्लीपद बादशाहींत बाकी राहिली नाहीं व तुम्ही व मनसुरअल्ली मिळोन इराणीस घेऊन येतां ही गोष्ट अनुचित यांत कांहीं ताजकी होता दिसत नाहीं. —पाणि. बख. पृ. ११

ताजगी—ताजेपणा, टवटवी, दम, छाप, उमेद, उत्साह, वरचढपणा.

दिवसें दिवस येथील मनुष्य ताजगी अधिक धरीत चालले.

—खरे १ पृ. २३९.

२ सिवाजीराजे यांची ताजगी आतां कानानें ऐकवत नाहीं.

—म. द रु. १ पृ. ७७

३ असो. किल्ल्यांतील स्वामी, लोकांस धीर देतात, यामुळें कांहीं फिकीर नाहीं. दिवसेंदिवस येथील मनुष्य ताजगी अधिक धरीत चालिले.

—ऐ. ले. सं. २३९.

४ परकीयावर ताजगी करावी. वरकड गोष्टी तूर्त येकीकडे ठेवाव्यात.

—पे. द. १२ पृ. ७

ताजदी—जुलूम. तसदी.

त्यानें जें जें गांव आबाद होतें ते ताजदीने वैरान केले.

—राजवाडे २० पृ. ३८

ताजमहाल—मुकुटमंदिर.

आग्रा येथें शहाजहान बादशहानें बांधलेली मुमताज महाल बेगमेची समाधी.

ताजा—नवा, न कोमेजलेला, हुशार.

ताजा—लढाईचें वेळीं घोड्याच्या मुखावर घालावयाचें कवच.

—रा. व्य. को.

ताजाकलम—पत्र संपल्यानंतर खालीं जोडिलेली पुरती.

ताजिया—१ हसन हुसेन विषयी शोकगीत, मर्शा, २ ताबूत, डोला.

ताजी—अरबी घोडा.

ताजीम—बहुमान, अभ्युत्थान, उत्थापन.

ताजीम तकरीम—(ताजीम– बहुमान आदरसत्कार) (तकरीम–लेखन) सन्मानार्थ दिलेला पोषाख किंवा खिलत.

आम्हास बहुत दिवस न ठेवावे ताजीम तकरीमेत गौरव करावें आम्ही तुमची रिफा करून काजकाम सांगाल ते करूं. तुम्हीहि आमची मदद इमदाद करावी. आमचे जिलेयात कितेक पालेगर नरगुंदवाला वगैरा शरारत करितात त्यास खुद्द मुतवजे होऊन तंबी करावी.

—पे. द. २५ पृ. ७९

ताजीमतवाज—आगतस्वागत; आदरसन्मान.
चिटणवीस हवेलींत येऊन धुरंधराची भेट घेतली धुरंधरांनीं ताजीमतवाज आदर उपचार केला. —नाग २ पृ. १३९

ताजीमतवाजू (स्त्री.)—बहुमान व आदरसत्कार व वस्त्रें वगैरे अर्पण करणें.
त्यांस उभयतां रावसाहेबांनीं ताजीमतवाजू देऊन मानपान केलें होतें. —राजवाडे १० पृ. २१३

ताजीलमाल— ?
आतां मलसेटी सेटिया मजकूर सीह हिसेचे गुन्हचा बद्दल ताजील माल होऊनु सेटियेपण वीटसेटी मजकुरासी दिले. —शि. च. सा. खं. ५ पृ. ८८

ताजूब—अजब, आश्चर्य.
१ आम्हीं फौजेसुद्धां मुकाबल्यास आलों. लेकिन् तुम्हांकडून एकहि काम जालें नाहीं. तुम्हीतरी निघून आलां नाहीं, यावरून ताजूब दिसों आला. —ऐ. ले. सं. ३१११
२ यावरून ताजूब होतो की (राजवाडे ७ खलप २८)
हुजूर वकील रवाना केला असतां सर्कार चाकरमाने याचे कबीले धरून नेऊन खलकास तस्दी देणें व भातें भरून नेणें हें ताजूब आहे. राजवाडे १० पृ. १२८
४ आणखी अवतरणासाठीं लत खाणें शब्द पाहा. —इ. सं. चिना.

ताझीखाना—कुत्तेखाना.

ताट—(नपुं) गोणपाट तरट, कॅन्व्हास कापड, सॅकक्लाथ.
बैलदेखील ताट मूठ सव्वीस पाठवावे. —पे. द. ३० पृ. ५

ताटक—गोणपाट.
२०० बैल पाहिजेत. तितक्यास ताटकाचे गोणते (गोण्या) पाहिजेत. —ऐ. ले. सं. ९११

त डतोडीचा झगा— उभ्या सोनेरी काडचा असलेला (?)
दसऱ्याच्या दिवशीं ताडतोडीचा झगा भाऊस श्रीमंतांनीं दिला. —ऐ. ले. सं. ५०११

ताडा—शेतांतला गोठा ?
गाय खायावांचून आवाळली होती तो पावसाची झड अकरा दिवस होती. ती सोडावयास गेलो कीं ताड्यात भिजत होती. —ऐ. सं. सा. ख. १ पृ. १७७

ताडामोडा—तांतड, घाई, धावाधाव.

ताडामोडा करून नानांचे भेटीसाठीं आलों ते आम्ही अभाग्य ! भेटी न झाली. त्यांचे चरण दृष्टीस पडते मग जें होणार ते होते. परंतु डोळ्याचें पारणें न जालें !
—ना. दी. पा. पृ. ८२

ताडीचें कलमदान—(?)

बाळाजी रघुनाथ सबनीस यास वस्त्रें, ढालतरवार, कमलदान ताडीचे, ऐसे दिल्हे.
—चि. शि. च. पृ. ३३५

ताण; ताणा—दोरी (सुताची).

हत्तीचा गाशा तयार करून देणे व रशाबद्दल (रशी–दोरी) ताणे सुमारें ४० देणें.
—वै. ४ स. १७४८ पृ. ३१

तात्पर्य—निष्ठा, अगत्य, तत्परता.

हवालदार किले भीमगड याही विनंतीपत्रें लिहिलीं जे देसाई मशारनिले स्वामीसेवाठायीं बहुत तात्पर्य धरितात. सांप्रत किलेमजकूरचा तनखेच्या खेडियासी तांब्राकडील स्वारी येऊन धोसो लागले ते समई देसाई यांणीं जमाव मिलऊन घेऊन मर्दानिगी करून गनीमास नतीजा पाविला.
—शि. च. सा. खं. २ पृ. ३९२

ताता—तट, भिंत, सांखळी, जाळें.

पर्वतीचे डोंगरावर जाऊन बसून पलटणाचा परीघ पहाडाभोंवतीं केला स्वारसरंजाम यांचा ताता बांधून कुंभारवेशीचे नदीपर्यंत स्वारांचा थट उभा केला.
—हो. कै. पृ. १२६

तात्रा—त्रागा, राग, संताप.

बालाजीपंत वहूत नाखूष होऊन दिवाकरपंतास तात्र्याचे पत्र लिहून पाठविले होते त्याचें उत्तर आलें कीं श्रीमंताचे सेवेंत आपल्यास दुसरा भाव सर्वथैव नाहीं.
—पुणें अखबार भाग १ पृ. १६५

तांता—तांत, (आंतडे) तंतू; सूत्र; वजन; ऋणानुबंध.

जें शिंदे व सर्जाराव करील तें होतें ! आमचा तांता श्रीमंतांकडे अगदीं नाहींसा जाला.
—ऐ. ले. सं. ६५२६

ताथवडा—उर्फ संतोषगड.

—पे. द. ३१ पृ. १४७

तादृश—तशी मोठीशी किंवा तितकी मोठीशी.

विठोजी होळकर याजकडून स्वामीची अवज्ञा अथवा अरावळी (खोडी) तादृश केली नव्हती तथापि वाळकाचे चोरीस बुक्क्यांचा मार ! त्याचा प्राण घेतला.
—हो. कै. पृ. १५६

तादा—तडजोड करून ठरविलेली रक्कम.

हिशेब द्यावे घ्यावे ते शाश्वत पडेनासें जालें. असे तंटे होऊ लागले. नंतर बाळशास्त्री याणी तादा ठराऊन ऐवज देण्यास सिद्ध जाले. ते आम्ही मान्य केलें नाही तर सातारे मुकामी गंगाधर मराठे, आणा मराठे यांनीं अठरा हजार रुपये जमाखर्च समजाऊन द्यावे असें ठराऊन उभैताची मान्यता करून घेतली. आम्हास पुसण्याची उर्तता (उरता-अपेक्षा) होती. नंतर रामचंद्र दीक्षित मृत्यु पावले. यादी द्वामोश आहे म्हणोन समजल्यावर तेहि आम्ही मान्य केले नाहींत.

—शेंदुर्णी संबंधीमहत्वाचे कागदपत्र भाग १ पृ. ६१

तादाद—संख्या, गणती, मोजदाद.

माघाहून जहाजावरील मालाची तादाद लिहून पाठविणार आहेत.

—पुणें अखबार भाग १ पृ. २२१

तादानन्द—(तादानिस्तन) जाणावें.

तान—झोक, तानमान.

ते समई या तानें बोलणें जाहलेवरी मग प्रकट करणें तें करावें.

—को. प्रा. पृ. १७८

तानकळी—घोड्याच्या सरंजामापैकी एक जिन्नस. (?)

पागेचे सरंजाम जिन्नस खोगरे, जीन, गंडेपट्टे व खुमे व तानकळीया. बख्तरे, चिलखते अशा संपत्तीस पारावार नाहीं.

—म. सा. छो. ब. पृ. ५९

ताप्ता—एक प्रकारचें चमकणारें रेशमी वस्त्र.

टफटा या इंग्रजी शब्दाचा अपभ्रंश.

ताप—दरारा.

मुलकांत स्वारी सिकारी करून चार रुपये पैदाहि करील. मुलकांत तापहि राहील.

—पे. द. भाग २९ पत्र नं. १७५

तापाचा ताप बसविणें—जेथल्यातेथें वस्तु बसविणें.

श्रीमंत नाना यास जाऊन ५-७ दिवस झाले त्यांस आपले घरचा कांहीं बंदोबस्त करावा की (आणि) तापाचा ताप बसवावा असे छ ४ सावानी बोलले.

—नाग २ पृ. १४५

ताफा—मंडळी, टोळी.

रात्रीं कंचन्यांचे ताफे बोलावून, नाच, रागरंग, आतशबाजी, रोशनाई जाली.

—राजवाडे ७ पृ. २२५

ताफा बसणें—नावची नाव बुडणें; सर्व नाश होणें.
जिवास झुरणी लागली आहे. सर्व ताफा बसला ! काय करावें ?
—ऐ. ले. सं. २८४८

तांब्या तांबोटी करणें—लुटून घेणें, तोडातोड करणें.
अवतरणासाठीं जाल शब्द पाहा. —हो. कै. पृ. १६४

तांब्र—मुसलमान किंवा मोगल.
त्रिगलवाडी गडाची बेहवुदी करून तांब्र स्वार होऊन काल नाशिकास आले. किल्ला फिरोन घेतला म्हणून बहुत श्लाघ्यता मानली आहे.
—पे. द. १२ पृ. ५०

ताब—प्राज्ञा, बळ, शौर्य, अवसान, दम, ईर्षा, हिंमत.
१ टिपू कोईमतुरास आहे. तेथील इरादा केला, व ममईवालाहि येऊन मिळाला. तीन कोसांवर जाऊन मुक्काम केला, तों टिपूस ताब सोसेंना म्हणून कोईमतुरास आग देऊन बहिरसमेंत निघून गेला, असे मिस्तर मेडोस याचें पत्र क्निवीस आलें. --ऐ ले. सं. ४३५२
२ हुजूरची मजबूती सर्व प्रकारें रक्षिल्या काय ताब असे कीं कोणी कदम दराजी करील. --हिं. द. खं. २ पृष्ठ ३७
३ खानांनीं ताब लढाईची न आणिता (हतवीर्य होऊन) माघारे हटून गढीचा आश्रा धरून आहे. —दि. म. रा. १ पृ. २८८
४ ताब हिंदूनी रे ताब हिंदूनी घेतला हरून । तलवार पुण्यावर धरून आला मोगल चढाई करून । --इ. पु. स्त्रि. पो १९१
५ते समई मुकाबिल लढाईचा ताब न राहिला तेव्हां हैदरखान पसपा होउन माघारा निघाला. —पुणें अख. भाग २ पृ. १३०

तांबली—खुर्दांतील नाण्याचा एक क्षुद्र प्रकार.
—पे. द.

ताबी—ताबा.
आपले तावीमध्ये ठेविला. —म. ब. ४०

ताबीन, ताबैन—ताब्यांत, आज्ञेंत, स्वाधीन, अंकित.
('अवतरणासाठी' 'बरकत' शब्द पाहा) —चं. चू. द. पृ. १३९
२ वगैरे मशार निलेचे ताबिनांतील पथके आहेत.
—साने प. या. व ८३
३ तरी तुम्हीं त्याचे ताबैन असोन मस्लतीस मदती असणें.
—राजवाडे १५ पृ. ३६३
४ तुम्हांस त्याचे तावीन करून पाठविले आहे की ते ज्याप्रमाणें सांगतील त्याप्रमाणें करणें.
—राजवाडे ६ पृ. ६०३

ताबीनात--हुकमी; खडी.

ही नेहमी फौज बर्कराराची ताबीनात. —चित्रगुप्त १४

ताबीस—उष्णता, उन्हाळा.

खंडोजी भोसले यांनीं छावणीची ताबीसेची बरदास्त न करितां (केली नाही म्हणून) घोडी बेशुमार मेली म्हणोन घाबरे होऊन माघारा फिरावयाचा निश्चय केला. —पुणें अखबार भाग १ पृ. १६५

ताबूत—तिरडी, शव ठेवण्याची पेटी. मोहरमांत मिरवावयाची इमाम हुसेनच्या थडग्याची प्रतिमा, डोला

१ आफराशाबखान मृत्यु पावला त्याचा तावुत शिकरी फत्तेपुरास न्यावयाचा तो मोंगले व फलटणवाले साऱ्यानींच बंद केला. आमच्या तलबेची निशा होईल तेव्हां नेऊ, देऊ म्हणाले.

—म. शि. यां. कां. पृ. ८८२

शहाजाद्याचा ताबूत व त्याची मुलें माणसे येथें पाठवून देणें.

—दि. म. रा. १ पृ. २५१

ताबे—आधीन.

याजवर जशी मर्जी. ताबे मर्जीच्या. विशेष काय लिहावें ?

—राजवाडे ५ पृ. ९१

पादशाही बंदोबस्त ज्याचे अखत्यार त्याचे ताबे दक्षिण तालुका.

—भा. ऐ. प. या. व १८

तामकदूर—मकदूर आहे तोंपर्यंत; यावत्शक्य. शक्यतोंवर, शक्त्यनुसार.

परिणामी कोणीही प्रकार अंमलांत येणें न येणें हें ईश्वराचें स्वाधीन. परंतु तामकदूर धांवत (प्रयत्न, कोशीस) करावयासी अंतर करीत नाहींत. —पे. द. भाग ३८ पत्र नं. १३५

आम्हीही सेवाचाकरी तामग्दूर करण्यास हाजर.

—राजवाडे ७ पृ. ३७

तामरात—तामीरात–डागडुजी, सज्जता. तांब, गंज वगैरे काढून टाकून केलेली सज्जता.

आरमारची तयारीची तरतूद होतच आहे. गलवताची तामीरात करून तेल देऊन सिद्धता केली आहे. —पे. द. ३ पृ. ४१

तामील, तामिली—अम्मलबजावणी.

१ तुझ्या हुकमाची तामील करण्यांत माझ्याकडून समजून कसूर करणार नाहीं —गडकरी राजसंन्यास पृ. ४५

३ गडकरी नेमतात ते हुकमाची तामिली करण्यासाठी दयाधर्माचें सोंगढोंग करण्यासाठीं नाहीं. —तोतयाचें बंड

तामूल—विचार, दिरंग.
तात्पर्य की शरीकांनीं फौज शामील करण्याविषयीं तामूल करू नये.
—राजवाडे ७ पृ. ९

तायीद—मदत.

तार—रागरंग, चर्या, मनोभाव. मजकूर, मुद्दा.
मग पाटीलबावांनीं हसल्यावर गोष्ट नेऊन मातुश्रीचे (अहल्याबाईचे) शांतवन केलें. तार ध्यानास आणिला. यश यावें यैसे पाऊल दिसण्यांत येईना. सबब आज्ञा घेऊन इंदुरास आले. —हो. कै. पृ. ७६
तुम्ही अरीज (अर्ज) पाठविला पाहून तार (मजकूर) खातीरेस आला.
—म. द. रु. ३ पृ. ३३

तारखे पारखे—(१) कावरेबावरे (२) बेहोष, बेताल (३) धूर्त, चाणाक्ष, सावध.
येथें श्रीमंतांची गाड्यांवर भवत फार आहे. तेही तारखे पारखेच आहेत.
—ऐ. ले. सं. २०६२

तारंगण-तारांगण—अस्ताव्यस्त. विकीर्ण.
काली आंग्र्याचे लोकी कूच केले त्यास गनिमाच्या गलबतांनीं मिरजोलीवरोन मारगिरी केली तेव्हां रवेचें तारंगण जाहालें.
—पे. द. ३३ पृ. २४२

तारंगण-तारांगण—मेढ्यावर किंवा तटावर टेहळणीसाठीं बांधिलेली खोली. ही जागा तटाच्या किंवा मेढ्याच्या पुढें आलेली असते.
महाडचा मजकूर तरी तेथें सिद्दीसाद ४००० माणसांनसी आहे. गांवाभोवता, तळेपोटी घेऊन लकड कोट करून तारंगणें बांधून मजबुदीनें आहे. —पे. द. ३३ पृ. १२९

तारगोवारगी—स्वस्थ, तटस्थ ?
अमदानीस हत्तीवर गोळी लागून कामास आला. त्याची फौज बेबंद होऊन गेली. जयपूरवाले लबाड तेहि तारगोवारगी राहिले. राठोडांनीं निस्सीम चालून घेतले व पाटिलबावास जिवंत धरण्याचा हिय्या केला.
—इ. सं. हो. कै. पृ. १८

तारजखाना तारतखाना—शौचकूप.
वाड्यांतील काम तारजखाना साकारला (शाकारला)
—पे. द. ३३ पृ. १८२
त्यास रात्रीं अंधार पडलीयावरी तारतखानाचें दिंडीनें बाहीर काढून बनाचें वेसीनें बाहीर घातलें. —शि. च. सा. खं. ५ पृ. ९९

तारंतार:—तंतोतत, पैन पै. भारंभार.
यैसे असता तो मुलुख पाठीशी घेऊन मोहीम करा म्हणल्यास कैसे घडेल? याजकरिता हिंदुस्थानची वाटणी पातशाही खालशासुद्धा दरोबस्त मुलकाची तारंतार द्यावी. पातशाहीकडील खर्च लागतो तो निम्मे वांटणीप्रमाणें आम्हांकडून देवावा. —हिं. दं. खंड २ पृष्ठ ८३

तारपत्यार, तारबतार—तारपतार; दाणादाण. विस्कळित, विकीर्ण, उध्वस्त
१ सारांश, शत्रू श्रीरंगपट्टणाहून शर्त बांधून आला आहे, त्यास एकदां मातबर लढाई देऊन तारपत्यार करून मग सेवेशीं अर्जी लिहितों, म्हणून बोलून आला आहे. —ऐ. ले. सं. २७५९
२ शीखहि जमा होऊन अंबूजी इंगळ्यावर आले. शीख फार आहेत. परंतु एक सरदार नाहीं. आपसांत फूट असे तारपत्तार आहेत.
—म. शि. यां. का. पृ. ५१४
३ फौजेवर हंगामा करून फौज तारबतार करावी.
—राजवाडे ७ पृ. २१४

तार बांधणें—अखंड पुरवठा होण्यासारखी रीलेची म्ह. टप्याची व्यवस्था करणें.
पेंढारी व आबाजी रडसोड व शरीफभाई रवाना झाले. शिलेदारांची तार बांधवून दिली. —हो. कै. पृष्ठ ८८
सुभेदारानी जाटास कागद लिहिला कीं तुम्ही फौजसुद्धा भेटीस यावयाचें करून रसदमाफक फौजेनिशी तार बांधोन लष्करात जिन्नस मणदीडमणाची धारण राहे तें करावें. —हो. कै. पृ. ३०

तारवावळ—आरमार (तारवांचा समुदाय.)
सत्राव्या शेकड्यांत शिवाजीने तारवावळ घडली तीं आंग्र्याच्या जिवावर.
—कु. आ. ढ. पृ. ४४६

तारांगण—लाकडे व लोखंडी पट्टे यांचे, हुकांनीं जोडून केलेलें जाळ्यासारखें संरक्षक साधन, सैनिकांच्या संरक्षणासाठीं.
मिरजोलीस आलिया उपरी आज्ञेप्रमाणें मेढा कायम करू सामायेन व दरवाजे तारांगणांचें सामायेन ते करून ठेविले आहे.
—पे. द. ३३ पृ. २४७

तारांगण करणें—उध्वस्त करणें, दशदिशा पळविणें.
सरदार दि॥ फत्तेसिंग भोसले याणी विराप्पा नि॥ चंद्रसेन यासी युद्ध प्रसंग करून विराप्पा धरिला फौज मोडून तारांगण केलें म्हणून विदित जाले, त्यावरून स्वामी बहुत संतोषी होऊन खुशाल जाले.
—म. रा. कु. इ. भा. १

ताराज, ताराजी—मारलूट, उध्वस्त.

१ पुढें मुलुख राहिला तोही ताराज करून मोगल अन्नास महाग होत ऐसेच केले जाईल. —इ म. २००

२ मुलुख कुल मारून ताराज करितो. —इ. म. २०१

३ त्या संस्थानची ताराजी केली. —चित्रगुप्त ८

४ रुद्रवरम् येथें जमीयत पोचून ताराजी मांडिली. —राजवाडे ५ पृ. १२२

५ खानानें तुळजापूर संस्थानची ताराजी केली. —चित्र ८

तारंबळा, तारांबळा—तारांबळ. गर्दी, ओढाताण.

१ पर्जन्यानें लष्कराची फार तारंबळा जाहाली. पागेंतील घोडीयांची तमाम सामानें भिजलीं. —ऐ. ले. सं. ४०८७

२ आमचे येथें खर्चाची तारांबळा आहे. येकादसीसी गांठ आहे. उपाय नाहीं. —ऐ. सं. सा. खंड ११ पृ. ५९

तारसखाना, तारतखाना—पायखाना, संडास, शौचकूप.

तारामचवा—उताराचा मचवा. छोट्या अरुंद खाडींतून वाहतुक करणारा मचवा.

महाराजांनीं संभू गुराब व तरांडीं व तारामचवे व महांगिऱ्या ऐशी नाना जातीचीं जहाजें करून आरमार केलें. —चित्र. ८६

तारीख, तेरीख—मिति.

तारीफ—वर्णन. बयान, प्रशंसा, परिचय करून देणें.

१ लढाई बहुत तारफेची झाली. —म. रा. चि. थो. शा. २२

२ अंग्रेज मैत्रकीस बहुतच उत्तम. याची तारीफ काय लिहावी. —राजवाडे १२ पृ. १३७

तारीफदार—प्रशंसनीय, तारीफ करण्यासारखें.

तंबुरे....बहुत चांगले तारीफदार पाठवावे. —ऐ. कि. प्र. २ पृ. ६२

तारीफ लायक—प्रशंसनीय, तारीफ करण्यासारखे

परंतु तारीफ लायक चित्रें मेळवून पाठवावीं, म्हणून पत्रीं आज्ञा. —ऐ. टि. १ पृ. १३

तारे तारे—तारोतार, तारंतार, तंतोतंत.

बगा पान तश्रीफ घ्यावे. इनाम उभा मार्ग विस्वा जो असेल तो तारे तारे दोनी ठायीं आम्ही उभयतांनीं घ्यावें, ऐसे करार करून यास वतनपत्र करून महजर दिला आहे. —ऐ. ले. सं. ८३७३

तारोतार--तारंतार; तंतोतंत.

१ त्याजवरी तेच प्रसंगीं निम्मे देशमुखीचें वतन निम्मेचें पत्र सूर्यरावयांशीं करून दिलें. वांईदेशांतील गांव निम्मे निम्मे तारोतार व इसाफती व इनाम तारोतार निम्मे वांटून दिले असे.

—रा. खं ३ पृ. ६५

२ यांत तारोतार वाटणीचा अर्थ आहे नाहीं हें धणी असेल त्याणीं ध्यानांत आणावें. —ऐ. जु. ले. चि. घ. सं. मा. पृ. २०

तारोळा--तोटा, गिराणी, हाकाहाक; तारांबळ, विघ्न, अडचण

१ श्रीमंतांचे फौजेने पाणी पाठीमागे घातले यामुळे मोगलाचें लष्कराचे लोकास पाण्याचा मोठा तारोळा झाला.

—पेश. बख. सोहोनी पृ. १७२

२ जखमी व घोड्यास चंदी मुदबख कांहीं एक नाहीं, तारोळा एक सारखा. --हो. कै पृ. १९१

ताल्यावर बसविणें—ठिकाणीं आणणें, ताळ्यावर आणणें, व्यवस्था लावणें.

जर श्रीनें कृपा केली, बाहेरील आब राहिला तर मग दोन महिनियानें घरांतील हरयेक ताल्यावर बसवूं.

—पुरं द. भाग १ पृष्ठ २२४

तालका—तालीक शब्दाचें अनेकवचन. तालीक म्हणजे नवकल किंवा प्रत.

१ गोविंदराम याणें पत्रें आम्हांस पाठविलीं, त्याच्या बजिनस तालका पाठविल्या आहेत, त्यावरून कळून येईल.

--पे. द २८ पृ. १६४

२ तेथें येऊन करार जाहाला त्या यादीच्या तालका घेऊन रायेचुरास आलों. --पे. द. २८ पृ. ८९

ताल बसणें—मेळ बसणें, समजूत पडणें.

तेथें बावूजीनाईक त्याचे समजाविसीबद्दल आले होते परंतु ताल न बसला माघारे गेले. —पुरं द. भा. ३ पृष्ठ ४

ताल मनसबा--(?)

ताल मनसबा लिहिला म्हणून क्रोध न करावा.

—पे. द. भाग २९ पत्र नं. १५२

तालामाला—मोठेपण, प्रतिष्ठा, दर्जा.

मलकाजमानी पातशहाची बेगम. (१ण) पेंढारी याशी गांठ. तेव्हां इचे तालेमाले कांहीं एक न राहतां, विवस्त्र करून तिचा झाडा घेतला.

—हो. कै. पृ. १९

तालामाला पाहणें—सुमार पाहणें; अंदाज पाहणें.

इकडले संस्थानिक, मराठे येथून जातात किंवा राहतात हाच तालामाला पाहत होते. —ए. ले. सं. ८३९

तालीक—१ नक्कल २ संबंध.

१ तुम्ही तालीक लेहून घेऊन अस्सली खुदखत मशारनिल्हेपासी फिरावून देणें.

—राजवाडे ८ पृ. १६

२ महादजीस देशमुखीस मसुरीचे तालीक (तालुक) नाहीं.

—राजवाडे १५ पृ. १००

३ त्याची उत्तरेंही आलीं त्यांच्या तालका करून वडिलांकडे पाठविल्या आहेत. —खरे ११ पृष्ठ ६०४५

४ नरगुंदाहून आतांच बातमीचें पत्र रा. काळोपंतांचें आलें, त्याची तालीख सेवेशीं पाठविली आहे. —ऐ. ले. सं. २६४५

५ त्यावरोबर पत्र लिहिले त्याची तालीक ठेवून घेऊन अस्सल पत्र पाठविलें आहे. —पे. द. ३ पृ. ९०

तालीकचा—आज्ञापत्र.

लठ्ठीस अव्दाल्याचा तालीकचा आला. —राजवाडे ६ पृष्ठ ४४५

तालीम—अध्यापन, शिकवणूक; व्यायाम शिक्षण; व्यायाम, व्यायामशाला.

तालुक—संबंध, हक्क.

१ तो वसूल आम्ही घेऊं मौजे मजकुरी तुम्हास तालुक नाहीं.

—E. M. P. पृ. १४

२ या अहदनाम्यासी या शव्दाचा तालूक काय आहे?

—राजवाडे ७ पृ. ९२

तालुकदार—तालुक्याचा अधिकारी. जमीनदार.

तालूक—हक्क, अंमल.

हाली सांप्रत पाटियामधे हडकी दबोन गेली आहेत. गणेश पाटिया पाडेवारी आपली वाडवडिलाची तालूक चालत आली आहे.

—पे. द. ३१ पृ. ५९

तालुका—संबंध, हक्क, जिल्ह्याचा एक भाग.

१ तुम्हांस घर दिले. आतां बाळाजीपंत यासी कांहीं तालुका नाही.

—पेठे दप्तर भाग २ पृ. २

२ मुतालिकीचे वंशाच्या वतनास तालोखा (तालुका) नाहीं.

—राजवाडे ३ पृ. ११७

तालुकात—संबंध.

दर्म्यान त्याचे तालुकातीचे कलम तहनाम्यांत ल्याहावयाचें कारण काय ?
—राजवाडे १९ पृ. ३०

ताले—दैव. ग्रह.

१ रावसाहेबाचे ताळे बुलन्द (उच्च) म्हणोनच ते बाजी सर केली.
—राजवाडे १ पृ. ५२

२ त्यांचें थोरपण व दूरन्देशी बहुत व तालेही मोठे.
—ऐ. टि. ३ पृ. १५

३ दौलतराव बाबा यांचे ताले विचित्र आहेत.
—खरे १२ पृ. ६८१७

तालेवार—दैववान, भाग्यशाली.

सुगर दिसे त्यामधें थेट जणु रंभावंशाची । तालिवार कुबेर पैशाची ।
—प्रभाकर २२१

तालेदारी—सुदैव, उत्कर्ष, चढती कमान.

ताले शिकंदरी—शिकंदरी ताल्याचे, यशस्वी, चढत्या भाग्याचे.

तथापि हे ईश्वरस्वरूप, आणि दैववान ताले शिकंदरी. जे च्याहातील ते सिद्धीस नेतील.
--चं. चू द. पृ. ९७

ताव--दुःख, राग, पीळ. ईर्पा.

१ दौलत खराबीस आली म्हणून तावाच्या गोष्टी बोलतो.
--खरे ७ पृ. ४७१

(मिशांवर) ताव देणें--मिशांना पीळ देणें; मर्दुमकीची प्रौढी मिरविणें.

तुही ताव भरून लिहित होता त्याप्रमाणें फौज पाठऊन तुम्हास लिहिलें. या उपरी भलतेच विचारे खाली न आली तरी तुमचे स्वरूप नाहीं !
--पुरं. द. भा. ३ पृ. १७४

तावडा—गलबताचा एक प्रकार.

बाणकोटचा तावडा सोडविला हें उचितच केलें.
—पे. द. ३३ पृ. २९८

तावडे खटारे आंग्रे यांचे हवालीं करून ठेवावे.
—पे. द. ३४ पृ. १३४

तावण—दंड, जुर्माना, भूदंड, नुकसानभरपाई.

तावणें—तापविणें, रागावणे.

तावदान--खिडकीच्या दाराची काच, काचफळी.

तावदानें चांगली साफ, ज्यात मन्द दिसत असेल ती न घेणें; साफ असतील तीं घेणें.
—राजवाडे १२ पृ. १३२

ताव देणें--ताप देणें; तंगी लावणें.

ताव दिल्यावांचून त्यांस तरी काय गरज आहे कीं, लवकर उलगडा करावा! याजकरितां निकड चांगली असावी. त्यांची कोणाशीं गांठ पडों नये, व निरोप जाऊं येऊं न द्यावे. —ऐ. ले. सं. ५७२८

तावातावानें—रागाच्या भरांत.

तावीज—दृष्टमणी. कुराणांतील मंत्र लिहिलेला पत्र्याचा तुकडा ताइतांत किंवा पेटींत घालून ती गळ्यांत घालतात तिला तावीज म्हणतात.

आज्ञेप्रमाणें सिदी जोहारची गर्दन मारली. सीर सेवेसी पाठवावे परंतु आज्ञा नव्हती म्हणून येथेंच ठेविले असे व हातची मणगटी व पागोटयांतील तावीज परवारी यासी द्यावयाची आज्ञा नाहीं म्हणून ठेविली असे. —पे. द. १७ पृ. ९४

ताशाचा पोशाख—भरजरी पोशाख.

निजामुद्दौला ताशाचा पोशाख करून मुबारकवादीस आले. —राजवाडे १ पृ. १७५

ताशेरा—बंदुकीच्या गोळ्यांची फैर.

शिंदे चालून त्या बेटातील रोहिल्यावर गेले तेथें रोहिल्यांनीं ताशेरा दिल्हा त्यांत गोळी जनकोजी बावाचे डावे हातास लागली. —हो, कै. पृ. २७

हजार बाराशे बंदुकींचा एकदांच ताशेरा दिला. —इ. सं. हो. कै. पृ. १२

तास—वाजविण्याच्या धातूची कांब अगर काशाचा वाटोळा पत्रा.

तास—अडीच घटकांचा काळ.

तीर्थरूप रा. भाऊसाहेब (परशराम भाऊ) यांचा मोड जाहल्याचें वर्तमान आतांच चवथे तासी आले. ईश्वरी इच्छा. (रवाना) सातवा तास छ १० रविलाखर. —इच सं. इ. पृ. २९७

पैवस्ती छ. ३ साबान सन इहिदे तिसैन ७ वा तास रात्र. —ऐ. ले. सं. ४४६४

तासाचा दुपट्टा – विणींत उभ्या काड्या असलेला दुपट्टा. वस्त्राच्या विणींत उभ्या काड्या काढलेल्या असतात त्यास तास म्हणतात.

नाचरंग होऊन गुजाबास वस्त्रें पागोटें पैठणी कोरदार व दुपट्टा तासाचा व जामाही तासाचा छडीदार किमखाप कासींचा व सिरपेच दिल्हा. —नाग २ पृ. ९४

तासची—तास वाजविणारा. —वाड स. मा. २।३

तासी चिरा—उभे तास किंवा काड्या असलेला पटका किंवा मंदील.
मुधोजी बावा यास स्नान घालून (मेल्यावर) सोहळे नेसविले, शालजोडी व तासी चिरा शिरपेच चौकडा येणे प्रमाणें पोपाखसुद्धां पालखींत घालून स्वारी काढिली. चंदन बेलादि काष्टे चिता सिद्ध करून कृष्णाजीन अंथरून अग्न दिल्ही.
—नाग २ पृ. १००

ताहनुज—अ‍द्यापपावेतों.

ताहाड—आजपर्यंत.
अवतरणासाठीं लत खाणें शब्द पाहा.
—इ. सं. चिना०

ताहाल--आजपर्यंत, अद्यापि.
१ दाखला करावा तरी देशमुख व मोरो विठ्ठल वगैरे देशपांडचे गनीमाचे कैदेस ताहाल पावेतो होते. याकरिता आपणापासून तगाफिली जाली.
—म. स. प. मा. पृ. १४०
२ लेकीन अहद पैमानावर नजर देऊन ताहाल हा ख्याल दिलांत न आणिला.
—खरे ७ पृ. ३५७५
३ नवाब निजाम अल्लीखा व भोसले ताहाल खामोश याचा सबब काय न कळे.
—राजवाडे १० पृ. १८२

ताहूद—ठराव, खंड, मक्ता. अभिवचन, करार.
१ कादरखान याजकडे तालुका काडोपली दहा लक्ष रुपये ताहूद ठरून सांगितला.
राजवाडे ७ पृ. ४०
२ तेथील ताहुदापैकी सर्व हप्तेबंदी आपण लिहून पाठविली.
—राजवाडे १ पृ. २६
३ तालुक्यावर ताहूद केले तें मोडावे आणि अमानी करावी.
—राजवाडे ५ पृ. २३
४ आपाजीपंत आले आहेत व बालापूर आकोले येथील ताहूद मनास आणून चुकवती करितात.
—पे. द. २० पृ. ५१
५ खालशातून आभील येईल त्यास दाखल द्या, नाहीतर तुम्हीच ताहूद लेहून देऊन रुपये देत जा.
—हिंगणे दप्तर खंड२ पृ. १५

ताहूददार—कांहीं करारानें किंवा मक्त्यानें जमीन धारण करणारा.

तिकाऱ्याचे गोखरू—गाईच्या खुरासारख्या दुबेळक्या पत्र्यावर पोलादी खिळे उभे ठोकतात. असे खिळे आपल्या गोटापुढें पसरून देण्याची एक पद्धत असे. तिचा हेतु हा की हल्ला करण्यासाठीं पायदळ किंवा घोडेस्वार आले तर त्यांची गति कुंठीत व्हावी.
पलटणापुढें रणगाड्यांचा जंजिरा, त्यापुढें तिकाऱ्याचे गोखरू असा जाबता करुन उभे राहिले.
—हो. कै. पृ. १०५

तिजारत—व्यापार.

तीन जहाज आपले विलायतेंहून बरायतिजारत गेले होते.

--प. द. म. व. ११३

तिडण, तिडणी-- तेढा, अडचण, गुंतागुंत.

दर्याबाईचें आगमन येथें जाहालें त्याची तिडण पडली. मुद्दे तिनें म्हटले ते मामांनीं मान्य केलें.

—पेठे दप्तर भाग २ पृ. ५

घाटाखालीं येईपर्यंत लोकांची येकमास तिडणच वसली. याजमुलें सरकारचे महालांत चार रुपये घेऊन वोढ वारणें पडली.

—पे. द. २० पृ. १३४

कितेक विचार मसलतीचे तिडणीचें लिहिलें ते कळों आलें.

—पे. द. ३ पृ. ५

तितकें मात्र—झाडून सर्व.

गोखले यांजवळ हत्तीवगैरे तितकें मात्र गेले.

—ऐ. ले. सं. ६६३७

तिफासी--तीन फाशांनीं खेळावयाचा एक जुन्या काळचा बैठा खेळ.

राजश्री परसराम भाऊ(पटवर्धन) प्रात:कालपासून सायंकाल पावेतो नित्यपाठ येणेंप्रमाणें करितात. प्रात:काळीं स्नान जाहाल्यावरी बारा घटका दिवस भोजनाखाली जातो नंतर निद्रा चार सहा घटिका पावेतों होते नंतर सोंगटी तिफासी व गंजिफा सायंकाळच्या दोन घटका दिवस पावेतो. उपर मागती स्नान करून देवतार्चन करून भोज्यन करतात.

—पे. द.

तिर इ किष्ती—जहाजाची डोलकाठी.

(या 'तिर इ कष्ती' शब्दाचाच 'तिर्कती' हा मराठी अपभ्रंश असावा.)

तिरगूळ—१ एक शूद्र जातिनाम. या जातीचे लोक पूर्वी बाण तयार करीत असत. २ ब्राम्हणातील एका पोट जातीचें नांव. —विल्लसन

तिरंदाजची घाट—तीर हा एक तोफेचा प्रकार आहे. तोफ डागणाऱ्याचे चित्र ज्यावर कोरलेलें आहे अशी पोर्तुगीज तोफ ?

खंडोजी मानकरानीं दोघा चौ घाटा दिल्या आम्हासहि एक घाट तिरंदाजची देविली. त्याचा कागद आहे.

—पे. द. १६ पृ. ५४

तिरस्कारी—तुसडे.

करवीरकर जोशी वैद्य येथें आले होते. वैद्य चांगले आहेत. परंतु तिरस्कारी. १५ वें आहे ! यांस १५ दिवस ठेऊन घेतलें आहे.

—ऐ. ले. सं. ८२३

तिरुका—पाव आणा, एक पैसा; लक्षणेनें तनसडीहि.

बाबूजी नाईक आम्हाकडे बाकी आहे म्हणतो परंतु त्याचा आम्ही तिरुका लागत नाहीं.

—पे. द. २५ पृ. ८०

तिलधेनू—संक्रातीचे वेळीं द्यावयाचें एक दान.

आपण तिलधेनू दिल्हेयाचे लिहिल्यावरोन परम समाधान झालें. याप्रमाणेच हमेशा धर्मकृत्यें करोन आमच्या कर्णाची तृप्ति करावी.

—शा. द. वें. पृ. ७४

तिलस्म—दृष्टमणि.

तिळातील तेल तिळांत—आपसांतच कशीबशी सोय करून घेणें.

आनंदवल्लीच्या मुक्कामीं श्रीमंतांची भेट घेतली होती ते समयीं आज्ञा जाली की समागमें चला. धंदावंदा सतत वाटें तो सरकारांत जागाजुगा तूर्त नाहीं. तिळातील तेल तिळांत तुमची सोय केली जाईल.

—ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ ४१

तिलाया—सैन्याच्या तळाभोंवती पहारा करणारी तुकडी; तलावा.

तिवट—पागोटें.

१ येक हज्जार तिवट व जोट पांचसे सत्वर आणवावे.

—पे. द. ३४ पृ. ११७

२ स्वामीनी निरोपाची वस्त्रे दिली. आसामीस येक येक तिवट, सेला दिल्हा.

—पे. द. ३३ पृ. २८१

३ जासूद जलदीने पावतीलच. त्या दोघास दोन तिवटें द्यावी.

—ऐ. ले. सं. २६८

तिवधा—तिवंधा–तीन गावांच्या हद्दी एकत्र मिळतात अशी नाक्याची जागा तिठ्ठा.

वैरण कापून आणूं म्हटल्यास एक काडी नाहीं. तालूके हरपनहल्ली व चित्रदुर्ग व हरिहर तिवधा आहे. वैरणीखेरीज परिणाम नाहीं. याजकरितां जेथून मिळेल तेथून आणवावी लागेल. वरकड कशास उपद्रव तिलमात्र लागणार नाहीं.

—ऐ. ले. सं. १५००

तिवारा—तिसऱ्यांदा.

ठाणीयास तिवारा हंशील पडों लागला, त्यामुळें बेपारी कष्टी.

—पे. द. ४० पृ. ८०

तिवासी—चित्रासन, रंगीबेरंगी बैठक, गादी वगैरे.

—रा. व्य. को.

तिस्सा—नऊ.

तिस्सैन—नव्वद.

तीर्थराज— श्रीप्रयागक्षेत्र.

आज्ञाधारक नरसिंगराव कृतानेक आसीर्वाद येथील क्षेम मुक्काम श्रीप्रयाग तीर्थराज जाणून निजानंदवैभवलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष आता भरोसा तीर्थराजात तुमचाच आहे.

—चं. चू. द. पृ. ७९

तीर्व—सारा, पट्टी.

अवतरणासाठीं जुलाई शब्द पाहा. —पे. सा. पृ. २७१

तिस्अ—नऊ. तिस्सा.

तिस्ईन—नव्वद. तिस्सैन.

तिहाई—(?)

यावर इकडे दस्तुर आहे कीं श्रावनमासीं तिहाईचा वसूल घ्यावा लागतो.

—पे. द. १४ पृ. १५

तीग—तरवार.

तीग—झनान. (अ) तीगझन, तलवार मारणारा.

तीझ—तीक्ष्ण.

तीझ–चंगाल—तीक्ष्ण नखीचा.

तीप—ढेप.

तीर—१ तोफेंचें वजन किंवा आकार. २ तोफेचा गोळा.

तीरदान—भाता, तरकश, जबा, मिक्वस.

तीरबंद—गोळा भरलेली तोफ.

तीरबारदार—अंगांत घुसलेलीं तीराचीं शल्यें उपटून काढण्याचा चिमटा.

तीराचा तोटा—(?)

वाडीस वेढा दिला, आणि वाडी भरली होती तेथें तीराचे तोटे दारूचे करून मार दिला. तेंव्हां कोळेवाडीस आग लागून फार माणूस बायका-पुरुष जळून मेले. —ऐ. लें. सं. १०३१

तिळीं येणें—सौरस्य किंवा स्नेह असणें.

बरावाईट जे कोणी माझे तिळीं आले नाहींत तेही थैल्याच्या थैल्या पाठवितात. येरवीं तीन हजार रुपये महिना खर्च कोठून पुरता ?

—महेश्वर दफतर बातमीपत्र

तीस–पंचवीस—पंचवीस तीस. व्युत्क्रमाचें उदाहरण.

१ बाईचे लष्करांत गांवास आग लावणार माणसें तीस–पंचवीस करवीर-करांकडील आहेत, म्हणोन सांगतात. —ऐ. ले. सं. ५९१३

२ त्यांस तीस पंचवीस कोसांचा अंतरा आहे.

—ऐ. ले. सं. ४७२३

तीन परवानग्या—एखाद्यास ठार मारण्याचा हुकूम दिल्यावर त्याचा तीनदा उच्चार केल्यावरच शिक्षेचा अंमल करावयाची प्रथा असे.

उभयतांस धरून लष्करास नेऊन पाहऱ्यात घालोन लागलेंच वाघाने आम्हां उभयतांस शिरच्छेदन करावें यास तीन परवानग्या जाहल्या. बाकी कांहीं राहिली नव्हती. इतक्यांत स्वामींचा पुण्यप्रताप उभा राहून जोतीबा घोरपड्याच्या अर्जानुळें अखेर आमचा जीव वांचला.

—ऐ. ले. सं. ६७११

तुईदार—कलावतू लाविलेले. तुई म्हणजे तोय, कलावतू.

बादली अस्मानगिऱ्या पडदे ठाईंठाईं तुईदार विराजली.

—चित्र १६

तुक्का—तोंडाशीं पात्याऐवजी गोळा असलेला बोथट बाण.

तुक्मा—१ बिरडें, गुंडी, बटन.

२ ज्याच्या टोकाला टोकदार फळाऐवजी सुपारीसारखी गांठ केलेली असते असा बाण.

तुका:—(१) बोथट बाण, (२) टोमणा. (लक्षणेनें)

१ त्यासी पहिले वजीराचा पठाणाचा सलूख सुभेदारांही केला हा तुका मारून निजामुनमुल्कास पेश्वा यावें. सुभेदाराही मुक्काम तुम्हांकरितां इतकें केले. ——हिं. द. खंड १ पृष्ठ ५९

२ मर्जी बहुतच खट्टी आहे आणि आम्हावरी नित्य उठोन तुके शब्दाचें चालवीत असतात. ——म. शि. यां. का. पृ. ८५४

३ आम्हींहि दाराजाहा बहादुरांस लिहिलें. यांत अंतर कितीसा पडला हें पहावें. लटकें तुके कां टाकिता ? —ऐ. ले. सं. ४३५५

तुका मारणें—नेम मारणें. लक्षणेनें महत्कृत्य करणें.

यंदा दोन कामें दक्षण हिंदुस्थानची ते तुमच्या हातून जाहली म्हणजे आपल्यासारखा तुका मारला असा होतो.

—हिं. द. खंड १ पृष्ठ ५९

तुख़्मा—अपचन.

तुख्म—बीज; वीर्य.

तुंग—a metal vessal of a particular description. एक विशिष्ट आकाराचें पात्र किंवा भांडें.

—पे. द.

तुंग—जमाव.

त्याणेंहि फौज चांगली सजोन तीन टोळ्या सासाऱ्या राउताच्या केल्या. पुढे पाईची माणसे व जजाला करून शेखपुराच्या अलीकडे कोस सवा

कोसावर येऊन जागजागा थटकोन तुंग फौजेचे उभे राहिले होते.
—हिंगणें द. भाग २ पृ. ८९.

तुंगचे तुंग—जमावचे जमाव.
कोणी खोगीर उतरले कोणी उतरतो तों नदीचें पार फौजेचा धुराळा उठून राहिला. पेंढारी दोन कोसावर तुंगचे तुंग उभे राहिले.
—इ. सं. हो. कै. पृ. १९.

तुज्जार—(अ) ताजिर, व्यापारी.

तुजुकमिजाज—गर्विष्ट; हावभरी.
आमची फौज बंगाल्यांत गेली म्हणोन शिपाइगिरी अंगीं आणून तुजुकमिजाज होऊन मागील विचार व स्मरण सोडून दुसरेच लिहितात.
—नाग १ पृ. २२६

तुटक—विषम, विपरीत, अनिष्ट.
मग भाऊसाहेबांनी ममतेचे मंडळ एकांतीं घेऊन त्यांस विचारले कीं समय तर तुटक व दुर्घट प्राप्त झाला. विश्वासरावांस मरणाचे घरीं आणले ही गोष्ट सर्वोपरी आमचे पासून गेली.
—पाणि. बख. पृ. ३५

तुटक होणें—गरीब होणें. नुकसानींत येणे, अन्नान्न होणें.
तिघेहि बहुत तुटक जाले आहेत याबद्दल तिही (तिघांनी) आत्मसंतोसे मौजे मजकूरचें ज्योतीसपण तुम्हास विकत देणें आहे.
—म. द. रु. ३ पृ. ४२

तुटे फाटे—किरकोळ, क्षुल्लक, सामान्य.
ऐसे लष्कर अडीच लाख सवार पयेदळ गारद जाले. कांहीं कार्यकारण (कार्या कारण) राहिलें पळोन बाहेर निघाल्या होळकर (गव्हार पेंढार लुटारू गावचे दांडगे) यांनी लुटले ऐसी अवस्ता जाली विश्वासराव तरी तेथेच आखर जाले भाऊ साहेब व शिंदे होळकर व आणखी दहापाच मानकरी गर्दीत जाले (नष्ट किंवा बेटिकाणा जाले) टिकाण लागले नाहीं तुटे फाटे कोण्ही वाचले ते नाना पुरंदरे व नाना फडणीस व पार्वतीबाई समागमे घेऊन देसी आले.
—स. व. पृ. २४

तुडुम—नौबत.
१ रा. बाबूराव छत्रे निशाणें व तुडुम इकडे आले, त्यावरून लढाईचें वर्तमान कळलें.
—ऐ. ले. सं. २१४१

२ तुडुम् नौबती, तंबुर बिनिवर। मेघापरि गाजति (गर्जती) सजेले रथ भवते साजती.
—प्रभाकर शाहीर

तुतरी—(?) बाजा, (?) बँड, (?) तुतारी (?)
फिरंग्यानें तह करतेवेळी महाराजास पुतळी सोनेची वीस हजार व तुतरी व तवकीर पूर्तकाली व शिसे व प्याले व बंदरी रावे व नुरया व गोमांतकी आंबे व नाना जिन्नस फळफळावळ पाठविलीं.

—चित्र १२५

तुतिया—सोंग, ढोंग, कपट.
कोठवर दिवाणजी तुतिया करून पेश नेतील?

—हिं. द. खंड २ पृष्ठ २९

तुती—होनाचा एक प्रकार.

—चित्र १२१

तुती, तूत—एक प्रकारचें झाड.
तुदा—तोदा, ढीग.
तुन्द—अभिमानी, ऐटदार.
गोरी तुन्द मान हिल्लाल गुलाबी गाल. —प्रभाकर ११७
तुफकदार—तुफंगदार. तुबकदार, बंदूकवाले प्यादे.
दाहा हजार फौज पंचवीस हजार तुफकदार जमा होऊन दंगा मांडला.

—पे. द. भाग २९ पत्र नं. २६३

तुफंग—एक जातीची तोफ.
खान अलीशान गोरीखान फौजदार ठाणे मजकुरास येऊन पोहचले पाहाड मजकुरे दरवाजे बंद करुन सिदतीजंग केली. किल्यावरून पथरबाजी केली. खानाचे लोक अमसर जखमी जाले. जरुर जाणोन खानाचे लोकांनीं तीर तुफंगाची मार केली.

—शि. च. सा. खं. २ पृ. १३२

तुफंग—गोळा.
तुफंग—बंदूक.
तुफानखोर—कुभांड रचणारा.
तुफानखोर मनुष्याचे संगतीस लागूं नये.

—ऐ. स्फु. ले. २ पृ. ५३

तुफान तुतिया करणें—बालंट, खोटा आळ घेणें.
आम्हावर तुफानतुतिया करुन वडिलासी पत्र लिहितो.

—पे. द. भाग २९ पत्र नं. १८५

तुफानी—कुभांडखोर, क्षुब्ध, दंगेखोर.
भिल्ल कोळी रामोशी वगैरे तुफानी जातींतले लोक.

—गांवगाडा ५६१

तुफैल—मुळें.

तुबक (पुल्लिंगी किंवा स्त्रीलिंगी वापरतात) एक प्रकारची बंदूक.

—पे. द.

तुबक—लहान तोफेचा एक प्रकार.

वसईच्या गरनाला लाहान २०० व तुबके ५००, थोर गरनालेचे गोले २० यैसे आले तेही उदईक रवानगी होईल.

—पे. द. २६, पृ. १४०

तुबकदार—बंदुकवाला शिपाई.

तीनसे स्वार दोनतीनसें पाईची माणसें तुबकदार इतका जमाव लालाजी-जवळ ठेवून गेले आहेत. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ १२३

तुंबा—चोळणा, विजार, सैल पायजमा.

१ येणेप्रमाणे तुंबा येक, जिगे दोन, सेला येक, पागोटे येक येणेप्रमाणें पाठऊन द्यावी. —पेठे दप्तर भाग २ पृ. १५

२ किनखावी तुंबे.

३ तुंबा किमखापि. —पे. द. १२ पृ. ९६

तुमचे वारचे—तुमचे वटचे, तुमच्या वाटचे.

दुसरी गोष्ट आपण लिहिली कीं राजेश्री स्वामी यासी तुमचे–वारचे आम्ही चार गोष्टी विचाराच्या सांगोन राहावयाचे आज्ञापत्र वार्तिका-समागमे मागून येईल म्हणोन लिहिलें. —पे. द. १२ पृ. १९

तुमदार—संग्राहक.

खोजा इलमास पैकेकरी व फौजेचा तुमदार आहे.

—म. शि. यां का. पृ. ४०९

तुमान—शिपायांचें किंवा स्वारांचें पथक किंवा त्यांची जमात.

तुमनदार—शिपायांच्या पथकाचा पथक्या किंवा जमातदार.

तुमार—१. हिशेबी कागदाचा एक प्रकार २ कागदाचें भेंडोळें.

आमच्या गुमास्तीयास जमाबंदीमध्यें दाखला देत नाहींत. अखेरसाली तुमार जाला. त्यावरी आमचे दसकत नाहीं. —पे. द. १० पृ. २८

तुमार—लढाईची तपशीलवार हकीकत देणारा रिपोर्ट. —अर्यविन.

तुर्कमाना—घोड्याच्या लगामाची दोरी. —रा. व्य. को.

तुर्काबाद—खराडी गांवाचे उर्फ नांव.

तुरुक ताजखानानें या गावची पाटिलकी मिळवली तेव्हापासून त्याचें तुर्काबाद असें नामकरण करण्यांत आलें.

—पेश. बख. सोहोनी पृ. १५

तुर्फह—उघडझांप.

तुर्बत, तर्बती, तुर्पती—थडगें, समाधी.

आणि त्यावरी तुर्पती बांधली. —राजवाडे १५ पृ. ७

तुरकस्वार—ट्रूप या इंग्रजी शब्दाचा मराठी अपभ्रंश तुरक. इंग्रजांच्या कवायती घोडदळाला तुरुपस्वार अशी मराठी संज्ञा होती.

(अवतरणासाठी 'बारचा जवान' शब्द पाहा)

—पुणें अखबार भाग ३ पृ. २५

तुरकी—घोडयाची एक जात.

मादवाना चार, तीन घोडया कुमईत व एक घोडी करडी तुरकी. एकूण चार. —पे. द. ४५ पृ. १४४

तुरंत तुरुंत—तूर्त.

१ अगोदर वकीलास पाठवून तुरंत परिहार करून टाकावे अशी तजवीज सावनुरकर नबाबानीं केली होती. परंतु गोपाळरावजीनीं लिहिलें कीं, तुम्ही हैदराकडे वकील न पांठविणें. आम्ही जलद तुमच्या साहाय्यास आलों. —ऐ. ले. सं. १४४०

२ त्यास तुरुंत सर्व येखतीयार त्रिंबकराव मामाचा आहे.

—हिं. द. खंड २ पृष्ठ ४६

तुरा—एक अलंकार.

(अरबी तुर्रा शब्दाचा अर्थ झिळमिळणारे पुढचे केस)

तुरा—लेस, फीत.

तुराटयाचा जीन—गोंडे किंवा फिती लावलेलें जीन ?

तळेगांव खंडेराव दाभाडे सरसेनापति याचा खासा (हंसा ?) घोडा बसायाचा. **तुराटयाचा** (?) **जीन** मोत्याचा जडाव याचा **मुसनफ** मोत्याच्या काडयात गुंफले असेत मात्र **दुमचीला** शुभ्र **चीक आडा** राव (?) जडले आहेत. रिकीब्या रुप्याच्या आहेत. जिनाला जडाव सोनेरी. **हन्याला** हिरे जडले आहेत. लगामाला **जमरळचा** सोन्याच्या जडल्या आहेत. साहा **साकळा** दुतर्फा सोन्याच्या **कडपठ** (कडापट्टा) रुप्याचा आहे, याचा पालापडि (?) माडला (मोडली.) आहे. सोनेरा **सरोसर** तीन तीन पदर मोत्याचे जडले आहेत. वरते कलगी आहे. करडे निमोनेस आळा आहे, सुभानरायाचे घरीं आला आहे. तो संदुकात ठिवला आहे. माजघरांत जीन ज्यान कोतवले मुसलमान याचा मुशाराया (?) करिता वलास आले आहेत. ते देत नाहीत म्हणऊन साहेब श्रीमंत आहेत याजकरि(ता) फिरयाद आला आहेत. गरीब उदतीकर (?) आहेत.

—पे. द.

तुरू—नाण्याचा एक प्रकार.

माजी अंमलात सदरहु नेमणुकीचा ऐवज तुरु व पटका या नाण्यांचा मिळत होता, व हाल अंमलातही कंपनी सिक्का चालूं होईपर्यंत त्याच-प्रमाणें मिळत येऊन पुढें कंपणी रुपये मिळूं लागले. तुऱ्याची व पटक्याची चलण बराबर होती. कंपणी रुपये मिळो लागले ते चार रुपये शेकडा बटा वजा होऊन मिळूं लागले.

—ऐ. सं. सा. खंड ५ पृष्ठ ५१

तुरुपस्वार—घोडेस्वार;

टिपूबरोबर ५०० तुरुपस्वार व बार ५००० व तोफा १० येणें प्रमाणें सामान आहे

—ऐ. ले. सं. ३९१२

तुरंज—नारिंग.

तुरूक—तुर्क, मुसलमान.

ऐसे असता यांस तुरुक होडीस (तुरुकबंदीस?) द्यावें यैसें काय आहे.

—पे. द.

तुलोअर्ज—लांबीरुंदी.

तूट विचार—बेहिम्मत. बेहिमतीचा किंवा घाबरेपणाचा विचार.

असा शिवानें दगा दिला. आमच्या लस्कराचा इतबार येत नाहीं. कूच करून माघारा दिल्लीस जावे या लोकाबराबरी आपणास राहावत नाहीं. असा तूट विचार करून शास्ताखान माघारा चालिला.

तुष्दान—तोस्तान, काडतुसें ठेवण्याची पेटी किंवा पट्टा.

तुस्त—(?)

श्रीमंत राजश्री स्वामीचे सेवेशी लग्नासमारंभानिमित्त तुस्त (?) व सामान देऊन रा० विसाजीपंत पाठविले आहेत.

—वै. ४ सन १७४६ पृ. ४

तुसारपट्टी—शेतावरील एक कर. हा कर कणसाचा दाणा धरू लागल्या बरोबर शेतकऱ्याकडून वसूल करण्यांत येत असे.

५००० पेस्तरसालची तुसारपट्टी गांव पैकीं.

--पे. द. ४५ पृ. ४७

तुळशीची मुद्रा—तुळशीची माळ.

स्वामीचे सेवेसीं, तुलसीच्या मुद्रा ४ पाठविल्या आहेत.

—रा. खं. ३ पृ. ३७

तूट पडणें—भांडण होणें, विक्षेप येणें.

सेवट तुकोजी बावाची बाईची तूट पडून तुकोजी बावा सेंधव्याची बारी उतरून गेले.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ९९

तूट सोसणें—घस, उपसर्ग, तोटा, तसदी सोसणें.

परंतु आपण सर्वज्ञ जे करणें ते विचारें करतील. त्यांचा आव राहोन सर्वा गोष्टींची तूट सोसून त्यांचे बरे होईल, तें स्वामी करतील.

—इ. सं. ऐ. चर्चा पृ. १२

तूत—तुतीच्या झाडाचें फळ.

तूप—स्नेह.

तेही कार्यकर्ते ममतायुक्त बोलत असतां आपण नाहीं म्हणून त्याची तूप कार्यें निमित्ये मोडावी ?

—हिं. द. खंड १ पृष्ठ २०

तूपशिस्त—सरकारी अधिकाऱ्यासाठीं गांवकऱ्यांना जें तूप किंवा तुपाची किंमत सक्तीनें द्यावी लागे ती.

तूर्त—त्वरित, अत्ताच.

राजानी मिरजाराजियाजवळ सांगून पाठविले कीं आपण तूर्तच भेटीस येतो. दिलेलखानानें गड घेतला आणि मग भेट जाहल्यानें हलवारी (?) आहे.

—सभासद पृ. ३६

तूल—(१) लांबणूक (२) लांबलेली.

१ इंग्रजांचे मोहिमेत हैदरखानास सफर (प्रवास, धावाधाव) व लढाई तूल पडली परंतु त्याची साहेबहिम्मत प्रसिद्ध जाहली.

—पुणें अख. भाग २ पृ. ९४

२ थोडकियांत बंदोबस्त असतां तूल करून खिसारा वाढवावा हें सलाह नाहीं

—राजवाडे ५ पृ. १९८

तेग—(अरबी शब्द) तरवार.

तेगा—तेघा, तरवार. रुंद पातीची तरवार.

कृष्णाप्पा नाईक याची ढाल व तेगा राजश्री मामांनीं पाठविला तो नाइकास दिला.

—ऐ. ले. सं. १७९३

तेज—तीक्ष्ण, तिखट, चलाख.

तेजगी—टंचाई, महागाई.

प्रस्तुत तुपाची मात्र तेजगी आहे. तूप महाग जाहाले आहे. तर एक बुधला तुपाचा पाठवणें.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. २२१

तेज चढणें (एखाद्याचें दुसऱ्यावर)—इभ्रत किंवा दरारा बसणें; वरचढपणा होणें.

उत्तरेचे फौजेवर या राज्याचें एक वेळ तेज चढोन मागतीं पारिपत्य व्हावें हें पूर्वापार चालत आलें आहे. भगवत्सत्तेनें त्याच अन्वयें घडेल उद्योग करावा.

—ऐ. ले. सं. २५२७.

तेज होणें—तयार, सिद्ध, सज्ज होणें.

हबसीयाकडे आमचे गड किल्ले आहेत ते कुल आमचे आम्हांस द्यावे. जरी तो न देई तर पातशाही फौजा तेज होऊन तंबी पोहचाऊन गड आमचे द्यावे. —पे. द. १० पृ. ३

तेजाब—एक दाहक आम्ल.

तेथून—तितका. असेल नसेल तितकें सर्व, कुल. सर्व.

हिंदू माणस तेथून बाटविणार म्हणून लौकिक आहे. याकरिता त्या प्रांती थोर आकांत जाहला आहे. —पे. द. १६ पृ. १०

तेलंगा—सोल्जर. शिपाई. कंपनी सरकारनें आपल्या कवायती कंपूत प्रथम तेलंगी लोक घेऊन त्यांना युरोपियन पद्धतीनें एक फर्म्याचे पोषाख देऊन लष्करी कवाइत शिकविली. तेव्हांपासून तेलंगा या शब्दाला सोल्जर शिपाई असा अर्थ रूढ झाला.

तुंबळ होणें—भरून जाणें, डळमळणें, हालणें, कांपणें.

नगारा नौबती करून (आदिकरून) एकदाच गर्जना केली तेव्हां भूमंडळ नादेंकरून तुंबळ झाले. —पाणि. बख. पृ. ३६

तैंन—नियुक्त, नामजाद, मूळ शब्द तई. अनुस्वाराबद्दल कित्येक वेळा न अक्षर लिहित म्हणून तैंन.

वरघाट व पायाघाट कबज करायाबदल पादशाही फौजा तैंन जाहल्या. —वाड सनदा ३१

तैंनात—नेमणूक; सेवा; नोकरी; पगार, स्वाधीन.

चार पागा, त्या बाईच्या तैंनात केल्या आहेत. —म. द. बा. १७७

तैंनात होणें—नोकरींत रहाणें.

प्रस्तुत काले दिलावरखान श्रीरंगपटणवाले यांचे तैंनात जाला आहे. —पे. द. २५ पृ. ५८

तैंनाती जासूद—नोकरासारखे दरमहा ठरवून ठेवलेले जासूद. या खेरीज असत ते त्या त्या वेळी त्या त्या कामापुरता अजुरा ठरवून ठेवलेले असत ते साधे जासूद.

सेवकाचे तैंनाती जासूदासमागमें छ. १२ रमजानचे कृपापत्र पाठविलें तें पावलें. —पुणें अख. भाग २ पृ. २४

तैंनाळ—तहनाळ—म्यान.

तैंवज—पाहूणचार, पाहुणचारखर्च, सत्कार, आदरातिथ्यासाठी होणारा खर्च पानसुपारी वगैरे.

घोडे बारगीर खरेदी करून सागवीत जाणे तैवज पानसुपारी प्रयोजनमाफीक खर्च करीत जाणें. —पे. द. २० पृ. १

चार आणे तैवज खर्च श्रीमंताचे मेजवानीबद्दल सुपारी चिकणी वजन.
८८।·

—पे. सा. पृ. ४

तैश—संसर्ग.

राजश्री पाटिलबावांचा आम्हासी सर्वाविसी भरवसा. त्यांसी दुसरा अर्थ, विलक्षण कल्पना उत्पन्न व्हाव्या असें जाणत नाहीं. त्यास ईश्वर किंवा परस्परें चित्त साक्ष आहे.- सामान्याच्या मिथ्या क्षुद्र गोष्टीचें संघष्ट--पणाचें तैशानें मात्र पाटिलबोवाचें बोलण्यांत या अर्थ भाव येत गेले.

---म. शि. यां. का. पृ. ११९

तैश—त्वेष; विशाद.

सेनाधुरंधरांनीं यैसे अनादरेकरून उत्तर केले तेव्हा छतनसिंग मजकूर यास तैश येऊन ते समयी सरकारचे वाड्यातच विषप्राशन केलें.

—नाग २ पृ. ११९

तैसिसा—त्यासारखें, तसेंच.

तुमच्या बापानीं व बंधूनीं स्वामीकार्ये केलीं त्यावरून तुम्हीहि तैसीसा पूर्ण असतां येकायेकीं श्यामलाची अवाई खाऊन जमावसुद्धां उठून गेला हे गोस्टी मर्दुमीस अगर एकनिस्टतेस योग्य नाहीं.

--पे. द. ३ पृ. १०३

तोक—गळयांत घातलेली बेडी.

—रा. व्य. को.

तोकजंजीर--शृंखला बंधन.

धरून नेऊन तोकजंजीर करून कैद केले.

—राजवाडे ५ पृ. १२६

तोग—साखळदंड (तोफेचा)

त्याचा वयेदां तुम्ही वारिला नाहीं म्हणिजे साहेब तमाम राजपुतांचें पायीं बेडिया घालुनु गळा तोग घालुनु किल्ले राजगडावरी ठेवुनु धोंडे वाहवितील.

—ऐ. सं. सा. खं. १ पृ. ११९

तोच जावता उतरणें--त्याचीच नक्कल करणें.

शत्रूचीं बातमीचीं माणसें सांपडतात. त्यांचीं तमाम नाकें कापावयाची परवानगी जाली आहे. कारण तरी इकडील बाजारचा तांबीळी हुबळीस जात असतां कुसेगलकरांनीं धरून त्याचे नाक कापून त्यास लष्करास पाठविलें. त्याचवरून तोच जावता उतरावयास प्रारंभ जाला आहे.

ऐ. ले. सं. ४३७५

तोट--त्वष्ट किंवा तगादा.

त्याजवरी बाकी आहे त्याचे वसुलाचे तोट आम्हीं लाविलें आहे.

—पे. द. ४० पृ. ३

तोटा—(m. A cartridge, a role of paper with powder) काडतुस

इस्मितानें एक कुंपीण घेऊन आपण गेलों होतों असें लिहिलें, त्यास ही गोष्ट लटकी. रावजीपाशीं ५–७ शें माणूस तोटे भरून आला. काळ परम दुस्तर.

—ऐ. ले. सं ६६२०

तोटा—फार मोठा फटाका.

साहा घटका दिवस राहाता कारभारी बोलाऊन आपण व कारभारी वगैरे माणकरी यैसे नदीत डोंग्यावर बसून दारूचे तोटे खेळत होते मग दो घटका रात्रीस बाहेर येऊन नदींत बसले. नंतर परसोजी भोसले वगैरे माणकरी दाहावीस येकीकडे व लिज्यावा गुजर व कृष्णाजी मोहिता वगैरे लोक येकीकडे होऊन, दारूचे तोटे वाटून घेऊन, साहाघटका खेळत होते.

—राजवाडे खंड १२ पृ. १९७

२ इंग्रज मोठ्या हलाखीनें पनवेलीस गेले. चौकाचे तळ्यावर दारू व तोटे व ४०–५० बंदूख पुरलेली होती, ती लष्करचे लोकांस सांपडली.

—ऐ. ले. सं. ३६१९

तोटा—मोठा फटाका किंवा तो तयार करावयास लागणारा कागद.

आतसबाजीया तयार करावयाचा सरंजाम येथें तलाश केला व सरकारांतही विनंती केली याजकरिता तोटे व कटेचुर व हासन्या व झिल्या जरूर जलद पाठवून देवावे त्यावरून काल पत्र पावले त्याच क्षणी त्यांच्या लिहिण्याप्रमाणें सरंजाम येथें तयार होता तोच सांडणीवरून पाठविला आहे.

—नाग १ पृ. १८४

तोटानफा—नफातोटा, शब्दांचा व्युत्क्रम.

चारी अर्थ मनांत मनन करून तोटानफा समजून पायासुध केले पाहिजे.

—पुरं. द. भाग १ पृष्ठ १७०

तोटारोटा—तोटाबिटा. वसुलांत आलेली घट.

गांवचा तोटारोटा हिशेबामुळें देणे पडला तो आपण पुण्याहून वारिला.

—पेंडसे कु. वृ. पृ. ४०

तोडा—तुलना, बरोबरीचा.

भाऊसारखा शिपाई ऐसा नाहीं. आणि सरदार लोकांची वर्दळ सोसावयाजोगा तोडा भाऊस नाहीं.

—ऐ. ले. सं. ५६६३

तोडा—हजार रुपये.

वरकड दिकती होत्या त्या दूर जाल्या. टिपूच्या वकीलांपैकीं एक जण ऐवज आणावयास गेला होता. काल त्याचेकडून सायंकाळीं मुहूर्तानें एक तोडा जामदारखान्यात आला.

—ऐ. ले. सं. ४१७८

तोडा—तुरा.

राजियानी जरीची कुडती घातली. डोईस मंदिल बांधिला त्यांत तोडा बांधिला. —सभासद पृ. १६

तोडा करणें—सील करणें.

(अवतरणासाठी 'शंकळा' शब्द पाहा)

--पुणें अखबार भाग ३ पृ. १६७

तोंडावर पैजार पडणें—खेटरें खाल्ल्यासारखें तोंड होणें.

परंतु श्रीमंत तात्याची पाटीलबावास स्वदस्तुरचीं पत्रें आलीं तेव्हां खातरजमा सर्वांची जाली. आतां तोंडावर सर्वांच्या पैजार पडली.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ८

तोंडावरी देणें (एखाद्याच्या)--थोबाडीत मारणें.

ज्याची खेडीं घेतली असतील तें तोंडावरी देऊन घेतील.

—पे. द. १८ पृ. ५१

तोंडास येणें—रंगास येणें, भरास येणें.

मनसबा तोंडास आला असतां, तुम्ही जुमस खाल्ला तरी मग आमचा इलाज नाहीं. —ऐ. ले. सं. २४७५

तोंडी लावणें—बोलणे करणें, वाटाघाट करणें.

मीर खलील याचे विद्यमानें बोलणें आहे; परंतु हे गोष्ट करणें आम्हांस ठीक नाहीं; याजकरितां त्याजकडील वकील आला होता त्यास तोंडी न लावतां बिदा करून दिल्हा. —हिं. द. खंड २ पृष्ठ ७७

तोंडीलावून लिहिणें—तोंडदेखले लिहिणें, थापा मारणें; केवळ नादी लावण्याकरिता लिहीणें.

ओढीचा विचार परंतु त्यांची खातरजमा होणारच नाहीं तोंडी लावून लिहितात हा अर्थ मनांत येईलच येईल. —नाग २ पृ. ६५

तोडेदार—बंदुकीचा एक प्रकार. तोडयानें पेटवावयाची बंदूक.

तोदा—तडजोड, तडजोड करून ठरविलेली रक्कम. पैशाची गठडी. खंडणीचा (दंडाचा) ढीग.

पैक्यासाठीं इतक्या आसामीस यातना फार जाल्या, खंडो महादेव व आबाजी पळशीकर यांनीं मात्र आज्ञेप्रमाणे उजूर न करितां, चिठ्या लिहून दिल्या. पांचपन्नास लाखांचा तोदा करून यशवंतराव होळकर जातीनें इंदूर मुक्कामीं फौजेंत आले. —हो. कै. पृ. १५३

तोदा—लक्ष्य, संधानबिंदु; निशाण.

तोद्याजवळ घोडयांची पडवी होती ती मोडकळीस आली होती. सबब सरकारांतून परवानगी घेऊन बांधली. —म. द. रु. ३. पृ. १५६

तोफ कलन---मोठी, भारी तोफ.

तोफखाना—१ तोफांचा समुदाय, २ तोफा ठेवण्याची जागा.

तोफखुर्द--हलकी लहान तोफ.

तोफगाडी--तोफ ज्यावर चढविलेली असते ती गाडी.

गाईकवाडासमागमे तोफगाडी पांचसा आहेत व दारू गाडीया १५-२० पावेतो आहेत. —पे. द. १२ पृ. ९१

तोफजी—गोलंदाजी.

बर्कंदाजी व तोफजी फिरंगी याची निस्सीम म्हणावी.

--पारसनीस ब्र. प. ७७

तोफा—उत्कृष्ट, फर्मास, नजर. (नजराणा)

१ त्या प्रांतीं चन्दन बहुत तोफा व चांगले उंच मिळतात.

--राजवाडे १९ पृ. ९३

२ कस्तुरीचे नाफे व विलंगीचे तोफे पाठविले.

—प. द. म. व. ९७

३ फिरंग्यांनीं महाराजास कळविलें अनंत शेणव्याच्या गोष्टीवरून भ्रष्ट झालों (हातून तुमची खोडीं काढण्याचा अविचार घडला). राग आला असेऊ तो क्षमा करावा. जो तोफा द्यावयाचा नेम केला आहे, त्याप्रमाणें प्रतिवर्षी देईन. —चित्र १२५

तोफा उजळणें—तोफास बत्ती देणें.

कुलाब्याच्या तोफा भरल्या होत्या त्या एकदांच उजळल्या. त्याणें पन्नास पाऊणशें माणूस ठार झालें.

—इ. सं. आं. यांची हकीगत. पृ. २७

तोफातायफ—नजरनजराणा.

१ इंग्रज शिवाय तोफातायफ सव्वीस लक्ष रुपये दर्साल देत होते.

—दि. म. रा. १ पृ. १०४

२ तोफातायेफ —दि. म. रा. १ पृ. २४६

तोफीर—वाढावा

तोफेजात—नजराणा.

याचप्रमाणें तोफेजात वराय नजर नबाब वजीरखान मौसूफचे स्वाधीन केले.

—प. द. म. व. ११८

तोबा—संकट; हांकाहांक.

त्याचे लष्करांत वैरणीचा व पाण्याचा तोबा बहुत. दाणा ३ शेरांची धारण. याप्रमाणें बहुत हलाखी आहे.

—ऐ. ले. सं. ४७४१

तोर, तोरा--१तोडा. हजार किंवा त्याहून अधिक रुपये घातलेली पिशवी किंवा थैली. २ नजर.

१ गाजुद्दीखानानी अकरा तोरे व पांच घोडे व हाथी नजर केला.

—हिं. द. खंड १ पृष्ठ ६७

२ नजीबखानासी भेटी जाली. प्रहर पावेतों येकांत केला. तदनंतर तोरे २ व रक्कम जवाहिर १ दौलतसिंगासी दिली व समागमचे लोकांसी तोरे दिले. --पे. द. भाग २९ पत्र नं. १९

तोर—मर्जी, मर्जीची तऱ्हा, ऐट.

तुम्हास पहिले शाहूमहाराजानी दिल्हे ते खाऊन चाकरी करून असणें-आमचे चाकर अहा या प्र॥ साफ बोलतात ! तूर्त आईसाहेबाची तोर असी आहे. —पुरं. द. भाग १ पृ. १८९

तोरणें बांधणें—(१) उघडपणें आव्हान देणे. (२) रणखांब पुरल्याप्रमाणें आव्हानपूर्वक जोरा सुरू करणें. (३) छावणी व झेंडा उभा करणें.

राजश्री मुधोजी नाईक निंबाळकर यांणीं जबरदस्तीनें जमाव करून तोरणें बांधून धामधूम मांडली त्यामुळें गांव खराब होऊ लागले.

—मराठे कुळांचा इतिहास जाधव पृ. ५७

तोरा—१ राजघराण्यांतील पुरुष; २ राज्यपदावर वारसाई सांगू शकणाऱ्या घराण्यातील पुरुष ३ खासा.

१ तुम्हांस आम्ही कांहीं मागत नाही; तोरा मात्र सांगाते द्या. कर्नाटकास जाऊं. —हिं. द. खंड १ पृष्ठ ७२

२ राजेरजवाडे कोणी आपणास मानीत नाहीत याजकरिता तोरा समागमे असलिया सर्व आदब करून ताबेदारी करतील हे जाणोन पातशहाजाद्यास समागमे घऊन गेले आहेत. --राजवाडे खंड १२ पृ. २८

३ इंग्रजांनी अंतरवेद रोहिलखंड हाताखाली घातलेच. द्रव्यलोभ दाखवून, पातशाह मेळऊन तोरा हाताघाली घालावा, मग नजफखान सामील जाले तरी उत्तम, न जाल्यास तोरा आपणाजवळ असता करतात काय, मारून घेऊं, अशी हिंमत धरून साधन करीत होते.

--म. शि. यां. का. पृ. ११२

४ याजकरिता एक तोरा यावा म्हणजे त्याचे हुकमात क्रम चालेल.

—राजवाडे ५ पृ. १०२

तोरा--अनुभव, प्रत्यय.

त्या पत्रांत कांहीं आमचे अगोदर गोखले गेले ऐसें लिहिलें नव्हतें. परंतु ते नांवचे गोखले ! इमानानें वर्ततील हा भरंवसा दिसतच आहे ! परंतु तो तोरा येण्यास मुदत पाहिजे. —ऐ. ले. सं. ६६७१

तोरा— (१) ज्यातून अन्न वाढतात किंवा वाढून नेतात असे ताट किंवा तबक. (२) (नजराण्यादाखल) नजर करावयाच्या वस्तु ज्यांतून देतात असें ताट किंवा तबक.

तोरेनकम, तोरेनेकम—नजराणा.

जाठाकडील करारदार (करार मदार) ठहराऊन राजसिंग वगैरे महाराजाधिराजाची फौज जैपूर प्रांतास आली. जाठाचा भाऊबंदासमागमे नामाविधान (?) घेऊन आले शु.॥ १० श्रीसवाई पृथ्वीसिंग यास पटाभिषक करून राजी वसविले सर्वत्राकडील टिका हत्ती घोडे व तोरेनकम वगैरे पावला. —पुरं. द. भाग ३ पृ. १७

तोरेपण—हुकमत, वरिष्ठपणा, धनीपणा.

तुम्ही व तुमची मातुश्री चुकला. कारभार तुम्ही कराल तेव्हां तोरेपण कैसे राहील ? तुमचे तोरेपण जतन असावे; या जरबेवर आम्ही लोकीं कामे करीत असावे. —नाग २ पृ. १०१

तोल--(?)

" हत्यारें १ जनार्दन रामचंद्र, निमचा तोलसुद्धां. " --ऐ. ले. सं. ६७४७

तोलणें--आटपणें, आंवाक्यांत असणें.

मोगल मारामार करून धारूरास पोहोचतो मग हातास येत नाहीं. अशामध्यें त्याला कुमक पोंचली नाहीं तो हल्ला करून झुंज द्यावे यश अपेश ईश्वरसत्ता. परंतु धारुरांत तो गेल्यावर मग तोलत नाहीं. —भा. कै. पृ. ५

तोलदार—वजनदार, प्रतिष्ठित, बलाढ्य, मजबूत.

तोलदार गड

तोलदार फौज.

तोलबंद, तोलबंदी—दंडांत घालावयाचा एक दागिना. --रा. व्य. को.

तोश—बळ.

शत्रु तोशीनें जोरीनें चालून येत आहे --खरे ७ पृ. ३५८९

तोशक—बस्कर, अंथरूण.

तोशीखाना, तोशेखाना—जवाहीर, सोने रुपे वगैरे दागिने व जरजरतारी कापड वगैरे ठेवण्याचें ठिकाण, २ कोठार. ३ अंबारखाना. ४ जामदारखाना.

आंग्र्यानें चांदीच्या दोन समया आणि एक झुंबर हबशी सरकारास नजराणा दिली त्या समया अद्याप तोशीखान्यांत आहेत. —जंजिरा सं. चा. इ. (भोसले) पृ. १२४

नाईक बोलिले जे, 'आम्हांकडे ऐवज आला' त्यावर 'तोशीखान्यास जमाखर्च करणें' याजप्रमाणें नबाबांनीं उत्तर दिलें.

—ऐ. ले. सं. ३६४१

तोशेखाना पाहिला त्यांत साडे सातशें रुपये नगद आणि कांहीं पोशाख होते.

—राजवाडे ५ पृ. १४०

तोशीनें जोरीनें—दमानें, गर्वानें, अवसानानें, बळानें.

शत्रूचा जोरा भारी. घाट चढोन कुली तळ्यावर आला. शत्रु तोशीनें जोरीनें चालोन येत आहे. आपल्या फौजांचा काट किमपि चालत नाहीं.

—ऐ. ले. सं. ३५८९

तोशीस—अस्वास्थ्य, त्रास, नुकसान. झीज.

तोष्ट—खष्ट. तसदी, त्रास.

आंगरीयाकडील कोणी तोष्ट लावील तरी त्यासहि ताकीद करून तगादा लागो न देणें.

—पे. द. ३ पृ. ८९

तोषखाना—कोठार, जामदारखाना.

हरिपंताचे आखरलवाजम्याकरतां रावपंतप्रधानानी तोषखान्यांतून पन्नास हजार रुपये देविले.

—पुणें अखबार भाग ३ पृ. १९२

तोस्तान—तोशदान, पडशी, दारूगोळी वगैरे सामुग्री ठेवण्याची पिशवी.

रूपराम चौधरी यांजकडील पलटणी लोक वाड्यासभोंवते होते, त्यास झाडून तोस्ताने व बंदुका व लोक जवळ बसले असतां होळकराकडील छकडे येऊन भरून नेले.

—ऐ. ले. सं. ७५८५

तोस करणें—बळ करणें.

यैसे समई (अशा समयांत) २०० स्वार तरी पाठविलिया तोस करून मधुराचे ठाणे घालीन.

—E. M. P. पृ. १२३

तोहफा—भेट, नजराणा. जिन्नस.

बादशहानें श्रीमंतास पत्र व कांहीं तोहफा जिन्नस दिधला आहे. तो श्रीमंतांचें भेटीनंतर देऊं.

—पुणें अखबार भाग १ पृ. ९८

तोहबंद—१ आंतला कपडा २ नेसावयाचें धोतर.

—रा. व्य. को.

तोहमत—संशय, वहीम. आळ, आरोप, बालंट.

तोहमती—संशयी, वहिमी, बालंटखोर.

तोर, तौर—रीत, राहणी, प्रकार,पद्धत.

१ गाडर इंग्रेज याणी हिंदुस्थानांत जागा जागा लढाया केल्या त्याच तौरानें इकडे मर्दुमी दाखवावयास आला.

—साने प. या. व. १०५

२ खुदातर्सी फकिरी तौरानें रहातात. —राजवाडे १ पृ. ६३

त्याग—(?)

ती ठायी वाटून तिघीजणीं घेणें. तरभारी होईल तें चाउडीस करावें त्यास त्याग आधी आपण घालुनु आपणा उपरी तुम्ही घालणें.

—म. द. रु. ३ पृ. ३८

त्यानें—तो. (कर्तरी प्रयोगांत तृतीयांत कर्ता वापरण्याची वहिवाट पूर्वी होती) राजेबहाद्दरचा कारकून रघुपतरावाचीं पत्रें येथें बावांस व मुत्सद्दी मंडळीस घेऊन आला होता त्यानें मुत्सद्दी यांचें घरोघर फिरला.

—म. शि. यां. का. पृ. ४३४

त्यापरस—त्यासाठीं; त्यापेक्षां.

हैदर बहुत दगाबाज; त्यापरस आपण सावधता करावी. दोन जागे बदल करावे. सकाळीं जेऊन एक जागेस जावें. संध्याकाळीं जऊन एक जागेस जावें. १०० घोडयांचे पैके देतां त्यापरस २००० प्यादे महिने महाल २–३ महिने ठेवतां तर बरें होतें. —ऐ. ले. सं. १५५६

त्रयोदश अवतार—अमृतराव पेशव्यांचें सांकेतिक नांव. (कारण अमृत हें १३ वें रत्न)

थोडकेच दिवसांत काम नमुदांत त्रयोदश अवतार व विशीक (विशिख; शिखानष्ट; मुसलमान; येथें मुजफरखान पठाण यशवंतराव होळकराचा) मिळून आणितात यांत गुंता नाहीं. —ऐ ले. सं. ५४७९

त्रागा—भाट लोक जो आततार्इपणा करतात त्यापैकी त्रागा व झासा या नांवाचे दोन प्रकार होते. त्रागा म्हणजे आपले घरचा माणूस मारून त्याचें डोकें कापून सरकारचे कचेरींत किंवा शत्रूचे घरीं टाकणें आणि झासा म्हणजे अमक्याचें घर जाळू अमक्यास मारू असा कागद लिहून तो झाडास वांधून दहशत घालणें कर्नाटकांतील तळई प्रमाणे हा प्रकार होय.

—ऐ. गो. लो. पृ. ७

त्रिकर्णचित्तें—त्रिकरणासुद्धां, कायावाङ्मनसा, सर्वस्वें.

यवनांशीं सल्लाह करणें नाहीं असा त्रिकर्णचित्तें करार.

—चित्र. पृ. १०

त्रिकर्णशुद्धसेवा—काया वाङगमनसा.

स्वामी राज्यासनारूढ जालीयापासून पायासी निष्टा धरून त्रिकर्णसुद्धीनें सेवा केली. पायाविना दुसरे जाणत नाहीं.

—मा. स. प. मा पृ. २०३

त्रिकर्णपुरःसर—बेंबीच्या देठापासून. तीन्ही इंद्रियांकडून (कायावाङ्मनसा) ज्या ज्या गोष्टी रायानी संपादिल्या व संपादावयाच्या चित्तांत आल्या

त्याचा परिणाम लावावा हेंच त्रिकर्ण पुरःसर चित्तांत आहे.
—हिं. द. खंड १ पृष्ठ १५

त्रिधा—त्रेधा.
कांहीं चमत्कार दाखविलीयानें याची त्रिधा होईल यैसे येथील कितेक म्हणतात.
—पे. द. १० पृ. ६३

त्रिशुद्ध—त्रिकर्णशुद्ध, त्रिकरणशुद्ध, कायावाङ्मनसा.
नालीस आमची कोणी लिहूं करूं! आम्ही त्रिशुद्ध एकनिष्ठपणें वर्तणूक केलियास कांहीं फिकीर नाहीं.
—रा. खं. ३ पृ. १२३

त्वरें कडून—त्वरेंकरून; त्वरा करून; त्वरेनें.
लष्कर श्रीमंताकडून रवाना जाहलें आहे. त्वरें कडून येणार म्हणून आवाई फार आहे.
—ऐ. ले. सं. ३९८७

त्वष—त्वष्ट, निकड, तगादा.
चाकरमाने पाटलाचें त्वष राजेश्री स्वामीनीं लाविले आहे. नित्य आम्हास पुसतात पाटील आले कीं नाहीं?
—पे. द. ८ पृ. २२

थ

थकले मांदले—थकलेभागलेले; शिणलेले.
महमदअली याजबराबर मिस्तरानी निरोप सेनासाहेबास पाठविला कीं आम्ही थकलेमांदले आलो. दोन तीन दिवसांनीं भेट होईल.
—नाग. २ पृ. ७५

थकित होणें—स्तंभित होणें, खिन्न होणें, थक्क होणें.
तेथें तानाजीराव फौजेसुद्धां खस्त जहाले. कोणी राहलें नाहीं. हें वर्तमान महाराज यांस कळल्यावर फार थकित जाहले.
—द. शि मो. यांचा इतिहास–पृष्ठ १७

थट्टयांत नेणें—थट्टेवारी नेणें.
त्यांतच कांहीं हटकिले (तर) थट्टयांत न्यावें मग आज उद्यां म्हणावें ही रीत
—म. शि. यां. का. पृ. ३८५

थट्टाबाजी—थट्टामस्करी.
दरबारांत कोणासी हसामस्करी थटाबाजी करूं नये. हलकेपण पदरात येईल.
—पुरं. द. भाग ३ पृ. ५८

ठ्ठी—दुभत्या गाई, म्हशी त्याचप्रमाणें इतर गुरेंढोरें वा त्यांची चारावैरण व त्यासाठीं नेमलेले नोकर इत्यादिकांचें खातें किंवा कारखाना.

थट—जमाव.

अवतरणासाठीं ताता शब्द पाहा. —हो. कै. पृ. १२६

थडगें—समाधी; थडे; वृंदावन.

मौजे इरले परगणे अवसें येथें जानोजी बावांचें थडगें तयार होत आहे तेथें येऊन रघोजी भोसले पुढें तुळजापूरच्या रोखें येणार.

—ऐ. ले. सं. २०७७

थडणें—थवकणें, थांबणें.

तूर्त मोर्चाचें काम होऊं द्यावे. राणांत थडावें ऐसें नाहीं.

—पे. द. भाग २७ पत्र नं. ५५

थडें—वृंदावन किंवा समाधी.

थडे माहुलीस बांधावयास आरंभ करविला (विरुबाईचें)

—पे. द. १८ पृ. ५२

अधिक अवतरणासाठीं —कु. आं. ढ. पृ. १२४ पाहा.

थनसरी—छातीवरील स्तनाजवळची जागा.

नारो बापोजीस तीर थनसरीस लागला. तो घोडा गजरत्न आसनकोहो होता, त्यावरी जीव गेला. —पुरं. द. भा. ३ पृ. १३८

थरावर गोष्ट बसणें—मनसुबा पक्का किंवा शाश्वत होणें; चलविचल नसणें.

पत्रान्वयें थरावर गोष्ट बसली असतां बरें आहे.

—ऐ. ले. सं. ६२३२

थरून रहाणें—टिकाव धरून रहाणें. स्थिर रहाणें. ठरून रहाणें.

फरासीसांची दोनी जहाजें वुडालीं बाकी दहा थरून रहाणेस ताकद न होतां फुलचरीपावेतो राहिली नाहींत. आणखी चार घटका दिवस असतां म्हणजे तमाम जहाजें चेनापट्टणास धरून आणणेचा योग होता.

—पे. द. २८ पृ. ११३

थळ उठणें—१ थळ—पिशाच्यांची रहावयाची जागा. २ थळ उठणें म्हणजे पिशाच्यादिकांचा उपद्रव सुरू होणें. ३ वस्ती हालणें.

कोल्हापुरास थळ उठलें आहे. मरीच्या उपद्रवामुळें नित्य २५–४० माणूस मरतें. —ऐ. ले. सं. २६०१

थळकरी—'उपरी' च्या उलट. ज्याला गांवांत स्वतःच्या मालकीची जमीन वा घर आहे असा.

थळझाडा—गांवाच्या मालकीच्या शेतांचें रजिस्टर.

थळपत्र—गोतांनीं दिलेलें निबाडपत्र.

चांदक प्रांत वाई येथील गोतात तुळाजी पाटील भांडत गेले होते. तेथील गोतानें थळपत्र करून दिलें आहे. —ऐ. सं.सा. खं ४ पृ ७७

थळभरीत—गांवांत तयार होऊन जो माल बाहेर विक्रीसाठीं जातो त्यावर घेण्यांत येणारी जकात. —विससन

थळमोड—बाहेरून गांवांत विक्रीसाठीं येणाऱ्या मालावर घेण्यांत येणारी जकात.

थळवाईक—अनेक वर्षेपर्यन्त एखादी जमीन कसणारा व त्यामुळें तीवर ज्याला वंशपरंपरा मालकी हक्क प्राप्त झाला आहे असा शेतकरी.

थाऊड--पाऊड (?) पाऊड म्हणजे पानसुपारी; गोंधळी वगैरेस द्यावयाचा पैसा.

जेजुरीस सेनासाहेब सुभ्यानीं भंडार उघळला ४०० ब्राह्मण झाले, वाघ्यामुरळी व गुरव वगैरे ५।६ शें ऐसे हजार माणसांचें संतर्पण झालें ब्राह्मणांस भोजनदक्षिणा दोन आणेप्रमाणें दिले. वाघ्यामुरळीस ४ पैसे प्रो थाऊड दिल्हा. —नाग २ पृ. २००

थाक—गणती; सीमा; मर्यादा.

लोकवार्ता आहेत त्यांस तो थाकच नाहीं! —ऐ. ले. सं. ५२७६

थाक दबकावणें—ठासून जरब देणें.

हे सरदार खुद्द काही नाहींत! माहाराव राजश्री दादोपंताचे बहकावल्यांनीं बहकले आहेत. त्याचा गुमास्ता तेथें आहे थाक दबकावणें व उत्तर साफ देवणें. —हिंगणे द. भाग २ पृ. १०१

थाक लावणें—थांग लावणें, शोध लावणें, पत्ता लावणें.

उत्तमप्रकारें या गोष्टीची चौकसी करून थाक लावणें.

—पुरं. द. भाग १ पृष्ठ १६६

थागा—थांगा, आश्रयार्थ जागा; दव्यासाठीं जागा.

गोरखगड येथील अनुसंधान आम्हाकडे आलें आहे. पांच हजार रुपये रोख व सोन्याचीं कडीं दोन दिल्हियास किल्ला हस्तगत सरकारांत होईल आणि त्यास (मोगलास) थागा होणार नाहीं.

—E. M. P. पृ. ५८

थांगा—सुरक्षित स्थान, आश्रयस्थान. निवाऱ्याची जागा, दव्याची जागा, थारा, आसरा, ढासण नाका धरण्याची जागा.

१ नवाबाची गलबल होईल तेव्हां बालेघाटप्रांताचें लोक कबिले थांग्यास लावावयास जातील. —पे. द. १७ पृ. ३७

२ जवाहीर सर्व तुम्ही नेऊन पुण्यास लाऊन देणें त्याचे जामदार असतील ते त्याज बराबरी इतबारी लावणें. आपले लग्याचे ग्रहस्ताची माणसें थाग्याथाग्यानी लाऊन गडकराचे गांव व गीर्दनवाईचें गांव लुटून कहीकबाड करणें. —पुरं. द. भाग १ पृष्ठ २४४

३ इंग्रजांनीं ग्वाल्हेरचा किल्ला घेऊन गोहदकरावर दृष्ट फिरविली किल्ला आपणच आटोपून थांगा केला.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ८७

४ ग्वालेरचा किल्ला इंग्रजांनी दगा करून श्रावण शु. चतुर्थीस घेतला. इंग्रजांस मोठा थांगा जाला. तेथील मजबुदी करुन पुढें यावयाचा विचार त्यांचा आहे. —म. शि. यां. का. पृ. ११५

५ करणारांनीं जिकडील तिकडे आपले थांगे केले. एक यवनांकडे गेला, दुसरा भोसलीयाकडे गेला. —ऐ. ले. सं. ६२७

थाट—वेष, पोपाख.

बिजेसिंगानें मारेकरास दक्षेणी थाट देऊन लष्करात पाठऊन तीर्थरूपास १५ सवाली शुक्रवारे दगा केला. ईश्वरे मोठासा घात केला.

—शिं. शा. इ. सा. भाग १ पृ. १२६

थाट बांधणें—कारस्थान रचीत आणणें.

सर्वहि वर्तमान लिहिलें तें प्रज्ञाचक्षूकडूनच विसाजी तुकदेऊ आलीयावर थाट वरचेवर लिहून पुसोन बांधत गेले. या थरास गोष्ट आणिली.

—पे. द. १० पृ. ५४

थान—मोहरा किंवा पुतळ्यांची मोजदाद करताना वापरावयाचा संख्यावाचक शब्द.

नाणे मोहरा जमा थान सुमारी ५७६६.

नाणे पुतळ्या सुमारी थान ७२५.

—शेंदुर्णी सं. म. कागदपत्र भाग १ पृ. १४ व १६

थान—ठाण, कापडाचें ठाण, मोठा तुकडा.

१ आस्तराकारणें थानें २ घेऊन येणें, व पाले हातिनीकारणें विकत मिळाले तर जरुर घेऊन येणें. —पुरं. द. भाग १ पृष्ठ १३

२ त्या प्रांतीहून उत्तम सकलाद लाखी, रेशमी, व पशमी थानें दोन मेळऊन पाठऊन देणें. —पे. द. ३३ पृ. ३६८

थानह—ठाणें.

थामडें—डोलारा.

दौलतीचें थामडें कायम ठेवून चार जुने माणसे वडिलांचे व आपले हातचीं जनलाज मनलाज धरून काशीराव होळकर वागवील.

—हो. कै. पृ. १२२

थाया—हट्ट.

लुकजी जाधवरावांच्या बायकोनें त्यांचा फार निषेध केला कीं मालोजी आपले पदरचा चाकर त्याचे मुलास मुलगी आपली देणें चांगलें नाहीं,

तेव्हां जाधवरावांनीं मालोजीकडे सांगून पाठविलें कीं लेक लेकींची बोलणीं; हसतात, बोलतात, म्हणोन तोच थाया घेऊन बसणें समजदारांनी बसू नये. —शि. प्र. ब. पृ. १९

थाऱ्यास करणें—आश्रयास नेणें, सुरक्षित स्थळीं ठेवणें.

मोगल काष्ठी तांदलीवरी आला. पुणियास येतो याउपरी तुम्ही आफ्लेठायीं सावधता करणें मुलें माणसें थाऱ्यास करणें अगोदर सूचना लिहिलीं असे. —ऐ. सं. सा. खंड ६ पृष्ठ ४

थारणें—देणें पोचविणें.

निरयत्न म्हणून हे रुपये त्याजकडे थारले. —पे. द. ३३ पृ. ३७३

थारणें—देणें म्हणून शिल्लक उरणें.

कुलापासोन पैका व गल्ला उचलून आपण खादला. यैसी दोनी सालें करमली. कुलाचें पैका व गला खादला तो आपणापासी थारला. —म. द. रु. ३ पृ. ३६

थारा—आश्रयस्थान, सुरक्षित ठिकाण.

मुलूक मारला जाईल तर तुम्ही तमाम रयेतीस ताकीद करुन रयेत थारीयासी येकीकडे न्यावी. —पे. द. २० पृ. ११८

थारेस लागणें—शिस्तीस किंवा शेवटास लागणें.

तुम्ही अपुलासा येत्न बहूत केला थारेस गोष्ट न लागली. —पे. द. भाग २९ पत्र नं. १८५.

थाळा—जेवण, जेवणार्चे ताट.

त्याजवर मल्हारजी होळकर पुण्याचे मुक्कामीं होते. त्यांजला दुवक्ता थाळा राणोजी शिंदा श्रीमंतापाशीं खिजमतगार होता तो घेऊन येत होता. —हो. कै. पृ. ११

थिगणें—थिजणें; डगमगणें.

मार प्रहर सीमेपल्लीकडे जाहला तों लिहावासा नाहीं परंतु कोणी माणूस थिगले नाहीं. —पे. द. ३४ पृ. ४०

थिरमा—पहाडी मेंढ्याच्या लोकरीपासून बनविलेले वस्त्र.

"तिरमा पार्वतीयोर्णा" —रा. व्य. को.

थेट—अस्सल.

ऐसीयास थेट बिदरी पिकदानी चांगली मिलत नाहीं. —पे. द. ९ पृ. १४

थेले—डेरेदांडे.

बुधवारीं तिसरें प्रहरीं कूच होऊन मोंगलाई फौजेचे थेले झालटें एथें गेले. —पे. द. भाग २५ पत्र नं. १७७

थैली—पत्र पाठविण्याची पिशवी.

नवाब बंदगानअली यास थैली व हैदरखान यास थैली एकूण दोन थैल्या व राजश्री मुधोजी भोसले यांचे पत्राचा लाखोटा ऐसें पाठविलें आहे. तिहींच्या नकला पाठविल्या आहेत राजश्री दिवाकरपंत यांसही पत्र तें खुलेंच पाठविलें आहे अवलोकनांत येईल.

--म. शि. या. का. प. क्र. ११० पृ. ११९

थोक—१ उघड किंवा स्पष्ट, २ विशिष्ट.

हरणें, चितले पाठविली तर नवा व जुना ग्रामाधिपती यास पाठवावी अगर थोक कोणाचेहि नामनिर्देष न करितां आम्हास आज्ञा जाहाली म्हणजे प्रसंगोपात्त विचारें दिली जातील. पे. द. ३३ पृ. ८५

थोक—ठोक, मोठे.

वरकड थोकसाहित्य पाहिजे ते करणार स्वामी खावंद आहेत.

—पे. द. ३ पृ. ८६

थोक—एकूण जमाव.

फौज थोक पांच हजार पावेतो. फौज पंधरा दिवस असिलीया सिवार सरावयाचा नाहीं ऐसे पीक जाहाले आहे. या समयांत भारी फौज येऊन पोहोचती तरी उत्तम गोष्ट होती. —पे. द. ११ पृ. ३४

आणखी बोलावण्याखेरीज हजार पाचशें स्वार असेहि एक दोन फौजेचें थोक आले तेहि ठेवून घेतलें. —म. शि. यां. का. ७२४

थोकणें—थवकणें.

शिवछत्रपति तानाशाह पादशाहाचे नगरीं प्रवेशिला. थोकत थोकत मिरवत पादशहाचे दाद महालास पावला. —चित्र ११४

थोक थोक—अगदीं तपशीलवार, बारीक सारीक सुद्धां, कच्चें.

आठा पंधरा दिवसाआड येवतेश्वरास जाऊन दरबारचे थोकथोक वर्तमान सांगत जाणें. ते थोर आहेत त्याची कृपा आहे यासाठीं कुशल व विघ्न त्याचे कानांवर असावें. —पुरं द. भाग १ पृष्ठ १५२

थोक थोक—मोठे मोठे किंवा प्रमुख.

जमीदारासी तूर्त स्नेहच करून थोकथोक हातीं घेतले आहेत.

—पे. द. भाग २९ पत्र नं. ५

थोटई, थोटाई—धटाई, बदमस्ती.

–त्याकडे वाजवी कर्ज असोन थोटईच्या गोष्टी सांगतो !

—चं. च्. द. पृ. ८२

थोताड—थोतांड, कुभांड.

रताजी मान्या हलालखोर असता लायानी थोताड करून किदरखान-

फणीयाचे लोकानीं कसबे भालवणीहून धावणी करून गहजब करून जिवें मारिला. --शि. च. सा. खं. ५ पृ. २

थोतांडी--थोतांड, खोटेपणा.
(अवतरणासाठी 'कस्त' शब्द पाहा.)
—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. २

थोडीबहुदा—थोडी बहुत.
घोड्याबिड्याची तजवीज थोडीबहुदा जाली. आणखी घोडी पाहिजेत त्याजला ऐवज पाहिजे तरी कोणी सावकाराकडून आमचें कार्य करून द्यावें. --हो. इ. सा. खंड १२ पृ. ७३

थोताडे--धुताड शिपाई, सरकारचा बेलिफासारखा हुकमाची अंमलबजावणी करणारा खास दूत.
यावरी नागोजीनें मलिकाचा महालदार थोताडे आणून याचा पदर सोडविला, तेव्हां हा महालासी आला. —रा. १७ पृ. ९

थोप—प्रसंग, बाणी, अब्रू. दबाव.
१ लष्करांत फितूर असें असतां थोप सांभाळून, तह केला आणि यश घेतले. —म. शि. यां. का. पृ. ६७७
२ मुख्य गोष्ट पातशहापासून द्रव्य येणें ते आल्यास कांहीं थोप राहून मोठे उपयोगास येते. —हिं. द. खंड १ पृष्ठ २४

थोप राखणें—हल्ला किंवा बाजू रोखून धरणें.
तीन चार वर्षे इंग्रजाची थोप हैदरखानांनीं राखली होती; दुसऱ्याची ताकद नाहीं. --नाग १ पृ, १८१

थोप संभाळणें—प्रसंग निभावणें (थोप–मारा.)
आपण वडिलांच्या सुटकेची सिद्धता करावी, म्हणजे इकडून दिकत नाहीं. ऐवजाचें काम समयास आपण चार (लाख) पावेतों थोप संभाळावी. बाकीची भरती आम्ही करून देतों.
—ऐ. ले. सं. ५१९६

थोबले राहणे—थबकून राहणें (?) थोबला, थोबलें–(?)
मध्यें शहानवाजखानाचा सलूख जाला ऐसे बसालतजंगानें लिहिलें होतें त्याजवरून थोबले राहिले. --राजवाडे १ पृ. १६३

थोरबारसें—मोठें, अवाढव्य.
चालीच्या गुराबा बहुत थोर ना बहुत लहान, ऐशा मध्यम सजाव्या. तैसीच गलबतें करावीं. थोरबारसें फरगात जे वारियाविण प्रयोजनाचेच नव्हतें. यैसें करावयाचें प्रयोजन नाहीं.
--आज्ञापत्र धुळें आवृत्ति पृ. ४१

थोर भांडें—महत्त्वाचा विषय किंवा मातबर वसूलाचा प्रदेश.
परगण्यांत बखेडा कामाचा नाहीं. थोर भांडें. हंगाम गेला म्हणजे मजकूर ठकावून जाईल. —ऐ. ले. सं. ५२४४

थोरले वीस—वीस लक्ष.
शिद्यास ऐवज थोरले वीस दिले, म्हणूनहि बोलवा आहे.
—ऐ. ले. सं. ५०७६

थोरा करीणियाचे कार्यकर्ते—मातबर कामावर नेमणूक करण्यास लायक असे गृहस्थ. करीणा = कर्तुत्व
यैशास हे थोरा करीणियाचे-कार्यकर्ते यांजला स्वतंत्र कार्यभाग सांगितलियानें बहुत थोर कार्य करून देतील, यैसें जाणोन वराड पावेतों नामजाद सुभा सांगोन पाठविले आहेति. --शि. च. सा. खं. ५ पृ. १००

द

दऊन—दोन
विष्णुपंताचे पुत्रापासून दऊन लक्ष रुपये घेतले. त्यास ब्राम्हणवधाचा दोष आला. —पुणें अखबार भाग १ पृ. २१७

दखल—प्रवेश, ढवळाढवळ, ताबा, उत्पन्न, रुजू, ताब्यांत, समाविष्ट, श्रत माहित.
१ लढाई न होतां किल्ल्यांत दखल झाला.
—राजवाडे ५ पृ. ६२
२ एक दो रोजांत किल्लेदारीची दखल घेऊन
—राजवाडें १० पृ. ३४२
३ कुलराज्य आपले देखील कर्नाटकहि आपणास सारें दखल आहे.
—चित्रगुप्त १२०
४ कोणी चोरून ठेविलिया आणि सर्दारास दखल जाहलिया त्यास शिक्षा करावी. —चित्रगुप्त ३७
५ राजबीज खरें हें राजश्री उपाध्याय व आपा प्रतिनिधि व चिंतो महादेव आदिकरून सर्वास दखल आहे. ---राजवाडे ८ पृ. १९८

दखलगिरी—ढवळाढवळ, हस्तक्षेप, अडथळा, माहिती, उत्पन्न.
तरी सालमजकुरापासून कसबे मजकूर येथील बाबती व मोकासियाचा अमल याजकडे देऊन आकार होईल तो याचें नांवे बद्दलमुशाहिरा खर्च लिहिणे आणि मोकासा व बाबतीचे अमलाची दखलगिरी तुम्ही न करणें.
—पे. द.

२ सरंजामाची वहिवाट आमची आम्ही मुखत्यारीने केली पेशवे सरकारा-तून कधीं दखलगिरी जाहली नाहीं.

—द. स. कै. या. पृ. ७८

३ बापाजी मुसलमान यासी दखलिगरी करावयास गरज नाहीं.

—राजवाडे १५ पृ. २९

४ याप्रमाणें वर्तमान कच्चें स्वामीस दखलिगरी असावी म्हणोन लिहिलें असें. —राजवाडे १ पृ. २९

५ तुम्हास कांहींच पर्गणेयांत दखलिगरी न जाली.

—राजवाडे १ पृ. २३१

दखलबंद—(?)

खंडेराव दाभाडे तळेगांवकर सेनापती थोरले, त्याची वंशावल त्यांजकडोन लिहून येईल सबब दखलबंद आमची वंशावळ पुढीलप्रमाणें.

—पे. द. ४४ पृ. ७

दखलबाज—दाखल केल्यानंतर नमूद; दाखल.

त्यापैकी मुजरा द्यावयाचे करार केले ते दखलबाज बार केले असेत.

—वाड. स. मा. १ पृ. १७५

दखीलरियासत होणें—गादीनशीन, अधिकारापन्न होणें.

परस्परें वचनप्रमाण जाहले कीं, रघुनाथरावदादा पुन्हा दखीलरियासत जाहले तरी कृष्णराव यास कांहीं उपद्रव नसावा.

—पुणें अखबार भाग १ पृ. १०१

दग्दगा दगदगा—भीति, दंगा, आजार, उपद्रव, त्रास.

१ याजमुळें इतर दौलतदार वगैरेपासून स्वस्थता; कोणाचा दग्दगा बाळ-गावयाचें कारण नाहीं. —राजवाडे ५ पृ. १७०

२ मुलाना हुसैन पेटेकर हरएक बाबें गांवांत दग्दगा देतो म्हणून तप्सीलें कलमी केलें तें अयां जाहलें. —पारसनीस ब्र. प. २३८

दंग—विस्मित; चकित; दिङ्मूढ; हतबुद्ध; निमग्न; गर्क.

१ तोंडात हाताची अंगुली घालून दंग जाहला.

—चित्रगुप्त ४५

२ घरच्याच कारभारांत राजश्री स्वामी दंग आहेत त्यांहीं होऊन आम्हांस निरोप द्यावा तर आपले कारभारांत गिरिफ्दार.

—साने प. या. व. ६४

दंग—डंग; चुना किंवा बंदुकीची दारू तयार करण्यासाठीं कुटण्यासाठीं लाव-लेली घाणी किंवा उखळ मुसळ.

जुनी गच्ची काढाल त्याचा मलामा (मलमा) रामचंद्र महादेव (नगर-

कर) याणी आपले जाग्यांत चुन्याचे दंग लाविले आहेत तेथे आणून टाकावा. —ऐ. सं. सा. खंड ११ पृ. १६

दगडधोंडा करणें—दगडाधोंड्याचा मारा करणें.

वंडाचा दंगा येलम गांवावर आले तेथें दगडधोंडा गांवकरी यानी केलां त्याजवर रविवारीं रात्रीं कोरल खिडीजवळ मौजे वारसे येथें वंडाचे लोक आले वारसे डोंगरच्या माथ्यावर आहे त्यानीं दगड लवंडून माघारे फिरविले. —पे. द. ३१ पृ. १४५

दंगल—जमाव; गर्दी; कल्होळ; कुस्त्यांचा फड.

दगलगाजी—दगेखोरी, कपट, कापटच.

दगा—फसवणूक, घात, धोका, अपाय.

तरांडियास व लोकांस सर्वथा दगा होऊं देऊं नये, आपणांस राखून गनीम घ्यावा. —म. रा. आ. ३८

दगाई—दगेखोर, फितुरी.

ती जरब केशवराव महाडिक याचे बरोबरील पलटणावर पडून त्यांत पांचपन्नास दगाई होते ते काहडून दिल्हे.

—हो. कै. पृ. १८१

दगादुगा—दगा.

एकादा दगादुगा जाहला तरी आपलें बळ उणें पडेल.

ऐ. ले. सं. ८४१

दगावणें—धोक्यांत सांपडून मरण पावणें.

दगेखोर—दगेबाज, दगा करणारा.

शिवाजी मोठा दगेखोर आहे. —सभासद २९

दंडक—संवय, रीत.

श्रीमंताचे फौजेस हंमेशा धावणीचा दंडक; नबाबाकडे फौजांस (तो) दंडक नाहीं, यामुळें थकले. —ऐ. ले. सं. ३८६

दंडक लागणें—संवय लागणें.

माणुसास दंडक लागला आहे कीं एक जागा चाकरी करावी आणि दहा जागा शोध करावा ! —पे. द. १७ पृ. ५९

दंडद्रोह—द्वंद्व, वैर, शत्रुत्व.

मगर दंडद्रोह तर खातरखाह जेव्हां म्हटले तेव्हां कसे हस्तगत होते ?

—हिं. द. खंड, १ पृ. ५०

दंडदीप:-दंडद्वीप, (?) दंडदाप(?) दिग्विजय (?)

स्वामी म्हनतील कीं तत्वता काशावरून जानावा ? त्याची वलख कैसी जाणावी ? तर तत्वव्यत्यांची परीक्षा ऐसी आहे कीं ज्या दंडदीपाच्या

आष्ट दिशा आहेत तेथें जे दिशेची मोहीम योजून आलियास तिकडे त्याचे विचारे पाठवून ज्यास सांगितले त्याची उभारनी करून सत्वर रवाना करावे.
—पे. द. भांग २९ पत्र नं. १३

दंडदोर—खंडणीची हप्तेबंदी.
करारामधे वसूल होणें आहे त्याच्याविसी तगादा केला आहे. लोकांस दंड-दोर केला आहे. वसूल जाल्यानंतर देतो म्हणतात.
—शि. शा. इ. सा. भाग १ पृ. १३१

दंडलाई—दांडगाई.
निजाममुल्काचे आगमन होतें त्यांचीच पहिलेपासून अत्यंत दंडलाई. आपले कडील एक विचार करणे तो तुमचे विचारानें करावा या साठी तुम्ही त्वरेनें यावें.
—मरा. कु.. इ. भा. १ पृ. ८१

दंडवतीचे गांव—१ खंडणी घेण्याचे गांव २ इनामी गांव ?
गोविंदपंत बुंदेल्याच्या लस्कराने आपले दंडवतीचे गांव नजीक आहेत तेथील रबी कापून नेली.
—हिंगणे द. भाग २ पृ. ९३

दडा— पेंढाऱ्याच्या पथकाला, टोळीला दडा म्हणतात.
दत्ताजी शिंदे यांस पत्र कीं दोस्तमहंमद पेंढारी याचा दडा हुजूर असतो त्यास दोस्तमहंमद मेला त्याचा भाऊ शहामहमद हुजूर राहील. याजकडे तुमचे ६००० रु. येणे आहे ते तुम्हास हरएक ऐवजीं मजुरा पडतील तुम्ही त्यास तगादा न करणें.
—नाना. पेश. रो. १ पृ. १७८

दंडी—राजेरजवाडे, फौजबंद लोक, दंडधारी.
या प्रांतचे दंडी (तितके) (त्यास) जाऊन भेटले असेत.
—पे. द. भाग २९ पत्र नं. १५२

दणगा—१ तोफांचे गाडे ओढतांना होणारा आवाज किंवा घडघडाट. २ गोंधळ, दंगा, ३ दणका, हल्ला.
१ आंग्र्याच्या लोकांणी मोर्चे काढून तोफा घेऊन चालले तेव्हां दणगे होऊन संताजी जाधव वगैरे सरदार धावोन बावाजी म्हसके याजजवल गेले. आणि त्यासी बोलीले कीं तुमचा सर्वाविसी भरोसा असतां मोर्चास आगी लावून तोफा घेऊन जावे हे तुम्हास उचित नव्हे.
—पे. द. ३ पृ. १०२

२ बाणाचे सुसाटियांनीं घोडी मात्र दोन चारसे उधळून आपल्याच गोटा-कडे आली. दो ती रोजात घोडीहि जमा जाली. येक दुसरे गोटावरी छापा घालावा या उद्देशे गाडदी दो ती हजार व बाण व तोफा तयार

होऊन अलीकडे आले होते. परंतु आम्हाकडील सावधता पाहून दुरूनच बाण तोफा सोडून घोड्याचे दणगे मात्र करविले.

—पे. द २० पृ. ७२

३ त्याचसमयीं मोंगलाकडील दणगे कालोसावरी पडिले परंतु आपले पुण्येकडून मोंगल पैजार खाऊन दंतभग्न जाहाला.

—पे. द. ३३ पृ. ३७

दणाणणें—दाणादाण होणें, ओस होणें.

कालयुक्तनाम संवत्सरी गांव दणाणिला काल पडिला.

—ऐ. सं. सा. खं. १ पृ. १३४

दणाव—दाणादाण.

रात्रीचा दिवस करून लौकर यावे अथवा मुलकांत दणाव जाला आहे.

—पुरं. द. भाग ३ पृष्ठ २७

दत्त्या—दत्तक.

माधवराव रामचंद्र यांणीं दत्त्या घेतला. हे पंधरा दिवस महिन्याचे सोबती आहेत. ('महिना पंधरादिवसांचे ऐवजी १५ दिवस महिन्याचे,' हे, जुन्या-काळीं, सध्यांच्या उलट शब्दप्रयोग कसा करीत त्या व्युत्क्रमाचें उदाहरण होय. आज आपण ' पत्तामुद्दा ' असा शब्द वापरतों. जुन्या काळीं तो बरोबर ' उलटा 'मुद्दापत्ता ' असा वापरीत.)

—ऐ. ले. सं. ६६८३

दधिकंदन—दहीहंडी; दहीपोहे.

(गोकुलाष्टमी किंवा अशाच दुसऱ्या धार्मिक उत्सवाच्या समाप्तीच्या वेळीं दह्यांडी फोडण्याचा किंवा दहीकाला करण्याचा प्रघात असतो)

संध्याकाळीं दधिकंदनास सेनाधुरंधर गेले होते दधिकंदन होऊन प्रसाद खाशास एक तबक भरून बर्फी पेढे व बत्तासे दिल्हे.

—नाग २ पृ. १५५

दनिश, दानिश—विद्वत्ता, शहाणा, हुशार.

दप्तर्दार—कागदपत्रांची काळजी घेणारा अधिकारी.

दफअतन--वारंवार, एकदम.

दफतनी—बंडल किंवा अलबम.

चित्रांची दफतनी तयार झाली आज्ञा होईल तरी दफतनी पाठवून देऊं.

--पे. द. १८ पृ. ३४

दफतरबंद—१ कागदपत्रें जुळवून व्यवस्थेनें ठेवणारा. २ जुळवून व्यवस्थेनें ठेविलेले.

दफतरी—दफतर्दार.

दफन—पुरणी; मूठमाती; पुरलेलें.

दफनणें—पुरणें.

१ दफनावयास (म. रा. चि. थो. शा. ६५)

२ अफझलखानाकडील मुडधे दफणाऊन टाकावे.

—ऐ. स्फु. ले. ७२

दफयुलवक्तो—अशुभस्य कालहरणम्, वेळ काढणें, संकट लांबविण्यासाठीं काळकाढूपणा करणें.

चर्चा ऐकिली की मेवर इंगरेज कांहीं दिवस यमुनातीरी राहून पुन्हा सुरतेस येणार. काबू पाहून चारदिवस दफयुलवक्ती केली आहे.

—पुणें अख. भाग २ पृ. १२७

दफा—१ क़लम. २ परिच्छेद.

इंग्रजांनीं सात दफेची याद–दास्त पाठविली.

—राजवाडे ७ पृ. ३

दफाते—स्मरणवही; घडलेल्या गोष्टींचें टाचण.

—पा. ब. ४९

दफीना—कुणगा, पुरलेलें धन.

दफे—प्रतिकार, हरवणूक.

१ (अवतरणासाठीं ' शकून ' शब्द पाहा)

—मा. स. प. मा. पृ. २८

२ तोही वेढा राणोजी घोरपडयाचा मारून काढून दूर दफे केला.

—राजवाडे १५ पृ. १९

दफेदार—१ रिसाल्यांतला एक हलक्या दर्जाचा अधिकारी; २ सरपट्टेवाला. ३ घोडेस्वाराच्या तुकडीचा नायक.

४ इंग्रजी अमलांत पोलीस शिपायांच्या तुकडीच्या नायकालाही दफेदार म्हणत.

दफेरफे—कर्ज परत करून केलेला निकाल. त्यावरून एखाद्या गोष्टीचा किंवा भानगडीचा निकाल लावणें. पत्रव्यवहारांत पुष्कळ वेळां ' रफे दफे ' असाच व्युत्क्रम केलेला शब्द वापरतात.

—विल्सन.

दफेवार—कलमवार, प्रकरणशः

यैकिले व जाहाले वर्तमान सांप्रदायाप्रमाणें दफेवार लिहिले असे.

—पुणें अखबार भाग १ पृ. १२४

दबदबा—दमदमा; चबुतरा.

तांबडे तळयाकडे दरवाजावर तोफा दोन रोखून दबदब्यावर ठेवून मारतात.

—ऐ. ले. सं. ३९१०

दबरा—दरारा, भीति.
छत्रसालानें ओडछे दतिया चंदेरीवाले यांस मदतीस बोलविले पण ते बादशहाचे दबऱ्यामुले कोणी मदतीस न आले.
—भा. व. गो. बुं. कै. पृ. ३

दबा उठविणें—दब्याच्या जागेवरून अकस्मात् बाहेर पडणें.
आम्ही नित्य वंकापूरचे रानांत उभे राहतों. त्याप्रमाणें ते दिवसाही राउतांचे पाठीस लागून जाऊं. ओढा उतरावयास लागलों म्हणजे दबा उठवून सर्वांस जीवें धरावें अशी मसलत त्याणे केली होती ती साधली नाहीं यामुळें त्याचा आम्हांवर परम राग. —ऐ. ले. सं. ८६१

दबादबे सलाबत—सलाबत कुचेचरासारखा मोर्चा चालवण्याचा एक प्रकार.
धारवाडास मोर्चा काल लाविले. दबादबे सलाबत टेकडीवरी बांधून ५ तोफा ठेविल्या आहेत. आजि तोफांचा मार अतीशय जाहले. मोर्चाचा सामान अतीशय केला आहे; नणगाडी (?) ३०० हे केले आहे. कामाठी दोन्ही तिन्ही हजार आहे. २०० बैलांवरी पखाली पाणी घालतात. पाणी घालून चिखल करून मोर्चा फार त्वरेनें चालवितात.
—ऐ. ले. सं. २८०२

दबावणरोखा—दहशतीचें पत्र. अल्टिमेटम.
स्वारी पाठऊन गांव मारला जाईल. वेडचा घालो, डोचके मारु, ऐसा दबावणरोखा आला आहे. —पुरं. द. भाग ३ पृष्ठ २८

दबीर—राजचिटणीस; डबीर.

दबेथ—(?) मुक्काम. (?)
निजाम अल्लीखान बहादूर असदजंग यांस रघूजी भोसले यांवर पाठवावयाकरितां फौजसुद्धां वेगळे केले. परंतु अद्याप कूच करून गेले नाहीं. आजचा दिवस दबेथाचा आहे. उदैक नवाबांचे व त्यांचे कूच बराबरच होईल यैसे दिसते. —पे. द. २५ पृ. ४६

दंभासी—उंट हाकणारा.
३७ मोतद्दार.
१९ सारवान दभासी सु॥ —शा. द. वे. पृ. ७०

दम्दमा; धम्धमा—१ नौबत; नगारा, २ तोफा ज्या उंचवटचावर चढवितात तो; टप्पा-गुजरा.

दमण—शिडाचें वरचें टोंक. —कु. आं. ढ. ३७९

दमणें—मागस पडणें; तहकूब होणें.
काशीयात्रेचा मजकूर तूर्त सालमजकुरीं दमलासा दिसतो.
—ऐ. ले. सं. ४६३१

दम देणें—धीर देणें.

१ वडिलीं लिहीलें आहे कीं, 'तुम्हीं दम सोडूं नये. बापू गोखले यास चिठ्ठी लिहीली आहे, ती द्यावी, आणि मशारनिल्हेस दम द्यावा.

—ऐ. ले. सं. ६६३४

२ मग मकाजी गिते शिलेदार यांच्या तैनातीस होते. त्यांजला दम देऊन अर्धारात्रीं कूच करून शरीफभाई पेंढारी घेऊन गेले.

—हो. कै. पृ. ८१

३ अवतरणासाठीं खातर तसलीम पाहा.

--हो. कै. पृ. ९

दमन—The hood of a carriage commonly. दमान, छपर २ गाडीवरचें छप्पर.

आरसे महालापुढे सायवान (पडवी) होते तें मोडून नवें दमन जोतें उंच देऊन उंची कामाची व काम आरसेमहालाप्रमाणेंच येक मजला तयार जाले वर गच्ची केली. नवे दमनापुढें कोटाचें बाजूसी दक्षण उत्तर चालीले. तीन खण चांगलेच केले. त्यांत दोन खणाचा हुजरा केला. पुढें दोन खणाची पडवी करून पाण्यांत पवावयाचें पडवीसी मिलविली. फरस संगी चांगला केला. —म. द. रु. ३ पृ. १०४

दम निघणें--दम उखडणें.

चि. भाऊकडील एक घोडा ठार पडला. १०-५ माणसांनीं कराचलीनीं हटले. ह्या उप्पर शत्रूचा दम निघाला. —ऐ. ले. सं. ८६०

दम बांधणें—छाती करणें; विरोधास तोंड देऊन उभें राहणें.

पुढें दम बांधावा, अथवा ते जें काय म्हणत असतील ते गोष्ट कमजास्ती कबूल करावी, या विचाराखेरीज दुसरा अर्थ नाहीं.

--ऐ. ले. सं. ६४९६

दम राखणें—भरवसा मानणें.

तुकोजी बावा हें माझे हातचे कामास लाविलेले आहेत त्यांणीं निमकहरामीचे फंद आम्हांशीं केल्यास पुढें सुखरूप दौलत करूं म्हणतील तर त्या गोष्टी दुरापास्त आहेत. फार खराब होतील. आजकाल पाटिलबावांचा दम तुकोजी बावा फार राखतात तरी उभयतांहीं फौजसुद्धां मजवर चालून यावें ! --हो. कै. पृ. २१३

दमसर्द करणें—दमवणें; धापा टाकावयास लावणें; नाभोहरम करणें. घामाघूम करणें.

अमर्यादकास शासनें करून त्यांचा संहार करून दमसर्द केलें राज्य शर्थीनें राखिले.

—रा. ८ पृ. १२५

दम साठणें—दम छाटणें.

यामध्यें तुम्हास अनुकूल पडेल, दम साठेल, तर साठणें, राहणें; जरी दम न साठे, राहिल्यानी कार्य होत नाहीं, तर येणें, म्हणोन तुम्हास लिहिलेंच आहे. —ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ ५

दमसांड करणें—विसावा खाणें.

शहरांत धूम झाली. जिवानिशी मारामार करीत नारो शंकर वगैरे कुल झाडून निघाले. अगोदर वाळवंटींतील पथकें तीन निघालीं (पळालीं.) ती फराडीयास जाऊन जीन न उतरतां दमसांड केला, तों हीं नारोशंकरादि पथकेंही रातोरात येऊन मिळाली.

—भा. कै. पृ. २७

दम सुलाख होणें—१ दम खलास होणें किंवा दमाची परीक्षा होणें. २ खुलाखणें म्हणजे नाण्यांत सोनें, रुपें व हीण किती असते याची परीक्षा करणें ३ दम पुरा होणें ४ दमाची कसोटी लागणें.

या उपरी मीर अव्वास उपसर्ग करणार नाहीं. त्याचा दम सुलाख होईल तथापि बातमी रक्षावी. —ऐ. ले. सं पृ. ५८३

सारांश, कित्तूरकरांचा दम सुलाख जाहला. आतां दम धरून झुजेल असें दिसत नाहीं. —ऐ. ले सं. २३९१

दमाघा, दमघा—किल्ल्याच्या तटबंदीत राखिलेलीं उतरतीं भोकें. यांतून किल्ल्यांतील लोक, हल्ला करून तटास भिडलेल्या शत्रूवर उकळतें तेल किंवा पाणी सोडीत. (मूळ पर्शियन शब्द दमघा याचा अर्थ नाकपुड्या दम म्ह. श्वास तो ज्यानें घेतात त्या).

दमान—शीड

दमानची—(?)

खासा खान मशारनिलेचे स्वारीचे हौदेयाचा एक, निशाणाचा एक व नगाऱ्याचा एक, यैसे तीन हत्ती आहेत. बाणांचे कैच्याचे उंट सात व रहकले बारा, व दमानची सवाशे आहेत.

—राजवाडे १ पृ. २३

दमानी पडणें—तोंडासमोरून वारें असल्यामुळें गलबत पुढें सरूं न शकणें.

मूळ शब्द दमान त्याचा अर्थ वाऱ्यासमोरची गलबताची बाजू.

गनीमासी गांठ पडल्यास गनीम दमानी घालून झुंजावे. वारियाच्या बळें गनीम दमानी न येतां आपण दमानी पडलों, आपले गलबत वारियावरी न चले यैसे जालें तरी गनिमासी गांठ न घालतां, गांठ तोडीत तोडीत आपले जंजिरियाचे आसरियास यावे.

—आज्ञापत्र धुळे आवृत्ति पृ. ४३

दमामा—लहान नगारा.
लुटीमधें जो जिन्नस येईल त्यापैकीं निम्मे द्रव्य व हत्ती व निशाण व दमामा यैसे तुम्हास माफ असे. —शि. च. सा. खं. ५ पृ. १२

दमास (दमास्कस येथें होणारें कापड की काय ?)—कापडाचा एक प्रकार.
दमास पाठवावयाविशी लिहीलें. त्यास स्वामीस दमास दिल्हे, त्यापेक्षां उंच नाहीं. नवा कोठून आलिया पाठवूं. —ब्र. च. पृ. ३०९

दमास येणें—दमणें.
आम्हीं त्यांस लिहितां दमास आलों. —ऐ. ले. सं. ६६६४

दया करणें—कृपापूर्वक देणें. बहाल करणें.
ते गांव सोडून देणें मणौन ताकीद पत्र दया केले पाहिजे.
—पे. द. १७. पृ. ६३

दर्कार—जरूरी, गरज, प्रयोजन, संबंध.
१ पुस्तकाची जरूर दर्कार आहे. —राजवाडे १ पृ. ६८
२ मखमलीचा दरकार आहे. —राजवाडे ३ पृ. २६९
३ उद्यां येथें रहावयास दर्कार नाही. —पा. ब. १९
४ आम्हांस राजकारणाशी दर्कार नाहीं.
—राजवाडे ५ पृ. १६
५ आम्हांस माणसें ठेवावयाची प्रस्तुत दर्कार नाहीं.
—म. द. बा १ पृ. ४१
६ अब्रूचा प्रामाणिकतेचा दर्कार त्यांनीं (अंताजी माणकेश्वर यानीं) टाकिलासें दिसतें. —साने प. या. व. ३१०

दर्किनार--बाजूस, एकीकडे.
ते सर्व दर्किनार राहून माष्टीन साहेबच बाजीगार होऊन बेअदबी करूं लागले. —खरे ७ पृ. ३५६७

दर्कूच—कूच दर कूच; मजला मारीत मारीत, कुचावर कूच करीत.
त्याजउपरी दर्कूच महादेवपर्यंत जातो. —चंद्रचूड द. १ पृ. १०७

दर्गा—राजसभामंडप, दर्बार, मशीद, साधुसमाधिस्थान.
१ पेश अर्जी दर्गाह (इ. म. ६५) म्ह. या दर्बारापुढें.
२ दर्गाह बंदगीस (इ. म. ६७) म्ह. हुजुरास; स्वामीस.

दर्गाह—१ केव्हांही, हर्गीज २ मठ देऊळ.
१ तुम्ही मौजे मजकूरचे वाटेस दर्गाह न जाणें.
—राजवाडे ११ पृ. ३६
२ त्याणें आमचे (-ब्रह्मेंद्र स्वामीचे) दर्गास—तिनी गांव दरोबस्त देऊन चालवीत होते. —पारसनीस ब्र. प. २९६

दर्ज्या—सवड. फट; संधी.

फिर्यादीचेच ऐकून हुकूमनामा होत नवते. येखादे समयीं हुकूमनामाहि देत होते. मनसुबीतून वादी गैरहजीर जाहल्यास फिर्यादीचे साधनाची पुरवणी पाहून बलवत्तर आहे असे दिसोन आल्यास हुकूमनामा देत होते. त्या हुकुमनाम्यात वादी गैरहजीर जाहला असे लिहीत असत. कारण कीं काले करून प्रतिवादी हजर होऊन पुन्हा इनसाफ न खरा जाहला तर सवड असावी, म्हणौन दर्ज्या ठेवित होते.

—पे. द. ४५ पृ. १३७

दर्ज—संबंध किंवा संगति.

हिंडणार वागणार मनुष्यास यातील दर्ज माहीत असावयाजोगेच आहेत.

—हो. कै. पृ. १२१

दर्जबाब—उत्तर.

१ त्याचा दर्जबाव कलकत्तेकर यांनीं निगारश केला.

—राजवाडे १० पृ. १६४

२ श्रीमन्त यांचे दर्जबाव आले ते गदगकर फडणीस याजकडे हजर आहेत.

—खरे ८ पृ. ४२०३

दर्जह—दर्जा, इयत्ता.

दर्जा—गोष्ट. रीतिव्यवहार.

इंग्रजांची जात मक्री व वचनप्रमाण कौलकरार यांचे प्रमाण नाहीं, एकास भूलथाप देऊन एकाची दौलत घेतात हे सर्व दर्जे त्यांचें आपणांसहि वाकफ आहेत. —म. शि. यां. का. पृ. २२६

दर्जा—पायरी; पदवी; योग्यता; मुद्दा; गोष्ट.

१ येथें सर्व दर्जे बोलण्यांत येतील. —राजवाडे ५ पृ. ७७

२ हे सर्व मरातब व दर्जे नवाबबहाद्दुर यांचे ध्यानांत आहेत.

—राजवाडे १९ पृ. ९१

दर्जात-उल्--जिन्नान—स्वर्गोद्यानाच्या पायऱ्या.

दर्जाब—दर्जबाब; उत्तर.

वकीलानें अर्जीचा दर्जाब व नजरची पावती व मेहेरबानीचा खिलत द्यावा म्हणून सवाल केला आहे. —दि. म. रा. १ पृ. १७३

दर्जाबनामा—उत्तरपत्र.

दर्दजाफर—दुःखिताविषयीं सहानुभूति बाळगणारा.

साहेब गरीबनवाज, दर्दजाफर मालक खावंद आहेत. आमचा बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे. —पे. द. ४४ पृ. ६२

दर्दममता—दुःखाची जाणीव.
रावसाहेब धणी खावंद आहेत. त्यास दुसऱ्याची दर्दममता कलतच आहे!
—पुरं. द. भाग ३ पृष्ठ ४७

दर्दसिकम—पोटदुखी.
हरिपंतास दर्दसिकम आहे. या दिवसांत शूळ क्षणक्षणा विशेष होत असतो.
—पुणें अखबार भाग ३ पृ. ८९

दर्प—प्रतिष्ठा; अब्रू; जोरा.
मी स्वामींचा आज्ञांकित. मीं आपले माणसास कांहींएक गोष्ट सांगितल्यास स्वामीचे दर्पास न्यून होईल हें काय गोष्ट आहे ?
—रा. खं. ३ पृ. ११

दर्बार—राजसभा.

दर्बारी—राजसभासंबंधी; राजसभेचा घटक; वैभवसंपन्न. विशेष शिष्टाचारास अनुसरून असें.

दर्म्यानगिरी—मध्यस्थी.
ते आमचे सेवक...त्यांची दर्म्यानगिरी तुम्हांकडे नाहीं.
—चित्रगुप्त ६९

दर्म्यानदार—मध्यस्थ.
दर्म्यानदाराकडील लबाडी असेल. विचारानें घ्यावें.
—खरे १० पृ. ५६१

दर्मजल—कूच दरकूच; सारख्या मजला मारीत.
श्रीमंत सुरापुराची खंडणी चुकवून दर्मजल कर्नाटकांत जाणार.
—चंद्रचूड दफ्तर १ पृ. १०७

दर्महा—प्रत्येक महिन्यास माहीना पगार.
१ दहा फलटणे इंग्रजी मुंबईहून आणविली आहेत त्यांत निम्मे फल्टणचा दर्महा निजामअल्लीखान यांणीं द्यावा असें करारांत नबाबासी आहे.
—खरे ८ पृ. ४११९

२ कांहीं दिवस दर्महा हलका करून देऊन
—म. रा. चि. थो. शा. ५२

दर्याई—समुद्रावरील.
दर्याई व खुश्की फौजा.

दर्यागर्क—समुद्राच्या पाण्याखालीं गेलेली.
१ दर्यागर्क खाजणी जमिनीस बांधबंदिस्त करून नूतन शेत होय.
—वाड. स. मा. २ पृ. २४३

२ बहुत तरांडी दर्यागर्क झाली म्हणोन बातमी आली आहे.

—खरे १२ पृ. ६८४२

दर्याप्त—चौकशी; शहानिशा.

१ मौजे निंबूर व मौजे कोटलक हे दोन गांव पलंगाची रखवाली केली (सवाई माधवरावाच्या बाळपणी पुरंदरावर) सबब इनाम दिल्याचे चिमणाजी बाबूराव साने म्हणतात. बाजीरावसाहेब (दुसरे) आल्यावर दोन वर्षानंतर जप्त केले, त्याची दर्याप्त करावयाची आहे म्हणोन छोटे-साहेब याचा हुकूम जाहला आहे. —पे. द.

आम्हीं गणपतरावजीपासून जेथें गांठ पडेल तेथें ऐवज घेऊं. आपण धणी आहेत. या गोष्टीची दर्याप्त करावी. —ऐ. ले. सं. ६६३०

दर्याफ्ती—दर्याप्ती, समजणूक, चौकशी, निर्णय.

ते वेळी राजकारणामुळे आमची दाद लागली नाहीं. अलीकडे कुंपणी सरकारचे अमलांत वडेसाहेब याचे कानावर हा मजकूर घातला. दर्याफ्ती व्हावी तो दादाजीचे पुत्र माधवराव मरण पावले.

—चं. चू. द. पृ. ११

दर्यावर्दी—खलाशी, नावाडी, खारवा.

दर्यावर्दी—तोफखान्याकडील एक कामगार.

१ गाडदी किती आहेत? कामाठी, दर्यावर्दी, व खलाशी व सुतार लोहार व तबलदार व बेलदार हें सामान काय आहे हें लिहुन पाठविणें.

—ऐ. ले. सं. १४७६

२ दर तोफेस गोलंदाज असामी ५ शिवाय दर्यावर्दी व खलाशी.

—ऐ. ले. सं.

३ दर्यावर्दीचे खर्चास नाहीं. तूर्त लोकांस व तोफेस निरोप होणें दिसत नाहीं. —ऐ. ले. सं. ३१९८

दर्वाझह—दरवाजा.

दर्वान, दर्वानकरी—द्वारपाल, द्वाररक्षक.

१ शहरचे दर्वानकरी यांनी राजाजीस मनाई केली की नवाबाची पर्वानगी असल्याशिवाय जाऊ नये. —राजवाडे ५ पृ. १४१

२ दर्वाणकर

—(हो. कै. ४२)

दर्ष—आविर्भाव; चाल; रागरंग; हेतु.

हे येथें आले याचा दर्ष पूर्वी लिहिण्यांत आलाच आहे.

—नाग २ पृ. १५३

दर्सदे—शंभरी; दर शेंकडा.

येथें हुंड्यावर दर्सदे रुपये ३॥ प्रो। पुण्याशिक्क्यास भाव आहे.

—म. द. बा. २ पृ. ५३

दर—प्रत्येक.

दर हर साल खुर्दखताचा उजूर न कीजे.

—राजवाडे २० पृ. ९

दर—आंत.

दर—आम्दन— आंत येणें, घडणें, दरामद होणें.

दरक—विचार; वहिवाट; पद्धति.

उगीच नादीं लावून ठेवावें असा इतर सर्दारांचा दरक.

—खरे ११७८

दरकपट्टी—दहकपट्टी, दरकदाराकडून १० वर्षांनीं एक सालाचा वसूल सरकारांत घेतला जातो तो. हे दरकदार म्हणजे देशमुख व देशपांडे.

—विलसन

दरकार—अगत्य; जरूर, प्रयोजन, जरूरी.

१ श्रीमंत कै. नानासाहेब यांचा वंश चालविणें दरकार. त्याचकरितां चिमाजी अप्पा यांस आम्हीं पदीं बसविणार. तुम्हीं जवळ असावें, असें बाजीरावास सांगावें.

—ऐ. ले. सं. ४७९९

२ त्यास येथें छावणी करून रहावयास दरकार नाहीं. व आम्हीहि राहो देणार नाहीं. —पे. द. २५ पृ. ६०

३ वरकड लोकांचा दरकार बहुत आहे यास्तव नवे लोक ठेवीत असो.

—पे. द. ३४ पृ. ११

४ सरकारांत दारु करणार कारीगर यांचा दरकार आहे त्यास तुम्ही जनरल यास हटकून दोन कारीगर त्याजजवळ मागणें.

—राजवाडे खंड १२ पृ. १४३

५ त्याचें उत्तर केले की तुम्हांस हिसेबासी दरकार काय ? तुम्ही चाकरी मात्र करणें. —चं. चू. द. पृ. १४०

दर किनार—बाजूस, कडेला.

दर खजमत—?

दर खजमत अजम भाऊसाहेबास आमचे खान भेटले यांजमुळें नासरजंग यांस वाईट लागलें. —पे. द. २५ पृ. ८०

दरखाष—दरखास्त. बोलणें, संदर्भ, मागणी अर्ज, फिर्याद.

अब्दुल अजीजखान यास एक पत्र बरे बोलून लिहावे व हरयेकविसी अपणासी दरखाष न करीत यैसे लिहावें.

—पे. द. १० पृ. ४७

दरखी—मार्फाती किंवा माहितगार.

आरमारचे दरखी माणूस ये जागा आलीयावरी राजपुरीचा उपराळा करूं.

—पे. द. ३ पृ. २१

दरखोरी—चौकशी, शहानिशा.

प्रांतांत फर्मांन भोगवटीयासी दाखवूं लागले तेव्हां दरखोरी करितां फर्मांनाचा निवाडा येणेंप्रमाणें

—रा. ८ पृ. ६९

दरगाह—दर्गाह, केव्हांही, हर्गीज,

सुदामतप्रमाणें यांजकडे चालत आले आहे त्याप्रमाणें हे मोकासबाब घेतील तुम्ही मौजे मजकूरचे वाटेस दरगाह न जाणें.

—राजवाडे खंड ११ पृ. ३६

दरगुजर—हैगे, चालढकल.

सरकारचा पैका वसुलात लौकर येई ते गोष्ट करणें. दरगुजर सहसा न करणें. —शि. शा. इ. सा. भा. १ पृ. १८९

दरज्यानैक—वजनदारी, वरिष्ठता.

महाराजाचे नांवाचा तगमा (लौकिक) घेऊन बसलों आहें. याचा बंदोबस्त जलद जाहल्यास हरदो ज्याहानामध्यें दरज्यानैक व महाराजांचे नांव आहे. आजपावेतो महाराजांचे नावावर आणि मुलकात व राज्यात यैसे जालें नाहीं. —नाग पृ. २१३

दरज—फट, चूक, आरोप, आक्षेप. उपद्रव, फूट, व्यंग, चीर, शिवण, बांधा.

१ ज्यांत नफा, राज्याचा बंदोबस्त व कोणीं दरज न ठेवी असें करावें.

—म. द. रु. ३ पृ. ७२

२ मीर अल्ली रेजाखान याच्या तालुकेस कडपेकरांनीं दरज लाविला आहे. —ऐ. ले. सं. १२४०

३ बाहेरले शत्रूस दरज दाखविणें युक्त नाहीं.

—म. शि. यां. का. पृ. २८६

४ तुम्हांकडील उणें पडावें असें वहुतांचें मतें आहे. याजकरितां कोणा बोलण्यास दरज न चालेसें करावें असें सांगितले.

—ऐ. ले. सं. २४४७

५ घरांत कोठें उन्दीर विंचू किडा मुंगी राही अशी दरद न ठेवावी

—म. रा. आ. ३४

६ उभयतांही फजित पावून निखालस जाहले, तेव्हां दरज नाहीं असें वाटतें आणि दरजही राहिली नाहीं. —खरे ७ पृ. ३२९७

७ नबाबसाहेब यांनीं स्वामींचे वचनाचे लायकीवर श्रीमंताशी मन:पूर्वक स्नेह केला यांत किमपि दरज नाहीं.

—साने प. या. व. २०२

८ रतीइतकी दरज पडली असता शत्रूस बळ किती येते याचा विचार करितात की नाहीं. --साने प. या. व. २५२

दरजगी—(चुन्यानें)दर्जा भरून काढलेली, चुनेगच्ची.

पेठेस खंदक भालाभर खोल, रेंवणी बांधीव चुन्याची दरजगी, वीस वीस पंचवीस हातपर्यंत, भिताड मजबूत, याजप्रमाणे जागा फार अवघड परंतु श्रीमंताचे प्रतापे साध्य जाली. —ऐ. ले. सं. ४००६

दरज देणें—उपद्रव, उपसर्ग देणे.

आम्हाकडे जुज खेडी सतरा आठरा राहिलीं. तितक्यांचमध्यें बहुत बेहाल करून गुजराणी करीत असता सावनूरकर चार पाच गांव मारून लुटून दरज देऊ लागले. —पे. द. २८ पृ. २४३

दरजवाब—उत्तर

१–हैदरअलीखानास लिहिल होत त्याचा दरजवाब पाठविला आहे की गौरनरास दस्तगीर केल्याचे पुन्हा तहकीक वर्तमान जे आले असेल ते लिहून पाठविणें. —पुणें अख. भाग २ पृ. १२९

२ पत्रें आली आहेत त्याचे दरजवाब लिहून देणें.

—पुणें अखबार भाग १ पृ. २०८

दरजागा—नजिक.

१ तारीख २५ रबिलोवल मु ।। दरजागा बंदर कलस्पाक यथास्थित असें.

—पे. द. २५ पृ. १००

२ मुक्काम लष्कर निजामलमुलुक दरजागा मौजे मेढेगांव.

—पे. द. १० पृ. ६३

३ सेवेसीं गोविंद त्रिमल, मु. लष्कर दरजागा करवीर.

—ऐ. ले. सं. ३१९७

दरडी ढासळणें—मोडून काढणें. लक्षणेनें ठरविलेली योजना किंवा विचार कोसळून टाकणें.

नबाबाचा विचार कळल्यासारीखे जे करणें तें करावे. यैशा गोस्टी सांगोन दरडी ढासळल्या. परंतु सुमंताचा विश्वास नाहीं. कोणी कांहीं आशा दाखविली म्हणजे तिकडेच डौल देतील यैसे आहे.

—पे. द. १७ पृ. ३७

दरदेगय—(?)

आम्ही तो महजूद (मौजूद) आहो याहीवर दरदेगय बात काय आहे न कळे ऐशा गोष्टी मजबुतीच्या बाबासाहेबीं सांगितल्या.

—राजवाडे पृ. १९५

दरपेश--प्राप्त किंवा सन्मुख.

१ रोहिल्याचा कजीया फैसल जाहला म्हणजे हेही येका करोडीची मोहीम दरपेश जाहलीसी आहे. --हिं. द. खंड १ पृष्ठ ५१

२ हल्लीं फत्ते अल्लीखान याची मसलत दरपेश आहे या करितां सरंजाम पुणीयास पोहचवावयाविसई सादर केली आहे.

--म. शि. यां. का. पृ. ६६२

३ कारभाऱ्यांस इंग्रजाची मसलत दरपेश आहे; ये विषयी त्याची नित्य खलबतें होतात. —पुणें अखबार भाग १ पृ. १५८

दरफिरोज--(?)

अवतरणासाठीं दुकोळ पाहा.

दरबस्त—दरोबस्त, निःशेष.

आज्ञा केली कीं एदिलशाचे कारकीर्दीचा वसूल दरबस्त नेहटोण देणें.

—पे. द. ३१ पृ. २१

दरबार आलम्--सर्व जनलोक असलेला जाहीर दरबार.

ऐसें पाचसहा वर्षे गुदरले तों एके दिवशीं दरबार आलम भरला आहे मानसिंग राजे जाधवराव यास बादशहा म्हणाले तुम्ही आपली लेक यास द्यावी.

—स. ब. पृ. १२

दरबारखर्च—एकादे काम करवून घेण्यासाठीं सरकारी अधिकाऱ्यांना दिलेली अंतस्थ लांच (२) तथापि किन्येक वेळा ही लांच उघडपणें सरकारी मान्यतेनेही दिली घेतली जात असे उ० तहादिकात तह घडवून आणणाऱ्या मुत्सद्यांच्या नांवें वैयक्तिकरीत्या देणग्या मिळत त्यांचाही जमाखर्च उघड रीतीनें दरबार खर्च म्हणून होत असे.

१५३ रु ॥ दरबारखर्च निसबत प्रतिनिधि इनाम पत्राबद्दल

—पे. सा. पृ. ८३

२ आरमारावर ५० हजार रुपये तजकरा शाबूत जाहला. लक्ष्मण कोन्हेर याचें सामान जप्त करून आणिलें. जुजदान देखील आणिलें, त्यांत दरबारखर्चाची यादी निघाली ! —ऐ. ले. सं. १०७१

दरबार जाणे—दरबारास जाणें.

वसडे वगैरे सरदारीचे कामकाज होणे यास्तव फिरोन पुण्यास दरबार जाणार आहेत.

--चं. चू. द. पृ. १६३

दरबार बुडणे—दरबार संपणें. वाटाघाटीचीं बोलणीं निष्फळ होणें, तड-जोडीची आशा खुंटणे.
समजाविशीचा विचार परिछिन्न राहिला यैसे उभयपक्षी जाहले. दरबार बुडला. —पे. द. ११ पृ. २५

दरबारिया—दरबारांत जाणारा येणारा; (भावार्थानें) वजनदार; खटपट्या कारस्थानी.
त्यास सांगितलें कीं, पोष्या लेक सूर्याजी दिल्हा, तो दरबारिया आहे. उपयोगाचा होईल. त्यावरून बहिरटजीनें अविद्या मनांत आणून पोष्या दिलेला लेक आपले घरीं मायणीस नेऊन ठेविला.
—रा. खं. ३ पृ. ११६

दरबिदर—? बेमुलाहिजा ? बेशक ?
पाटिलबावा गोविंदराव गायकवाडास घेऊन येतात असें फत्तेसिंग गाय-कवाडास कळताच त्यानें तमाम मेवास, चोरटे, भिल्ल, कोळी, राणे, ठाकुरडे यांस बोलाऊन आणून त्याजला हमवार करून मेजवानी पोसाक देऊन बजावले, ' कळेल त्या रीतीनें गोविंदरावाचा नाश करून बडोद्याचे तोंड नजरेस न पडे असे कराल तर तुमची शहामत ! आजपर्यंत आम्ही सांभाळले त्याचें फळ !! नाहींतर तुम्ही घेतलेला पैसा कळेल तसा मी घेऊन दरबिदर वाटेस लावीन खातर ठेवा !
—काय. प्रभु. इ. सा. पु. १ अं. ६ पृ. ६

दरम्यान—जामीन.
श्रीमंतांकडून यादीवर लिहुन झाल्यावर मग दरम्यान द्यावा, असें शिंदे श्रीमंतास म्हणूं लागले. त्याजवरून आठ रोजांत लिहिल्याप्रमाणें फडशा करून देऊं म्हणोन सरकारांतून आम्हांस दरम्यान दिलें आहे.
—ऐ. ले. सं. ४९४४

दरम्यानगत करणें—जामीनकी पत्करणें, मध्यस्ती करणें.
आम्हाकडील दरम्यानगत साहेबी करून त्यास हाती द्यावे. साहेब दरम्यान जालियावर आम्हांकडून अंतर पडेल कीं काय ?
—पे. द. १२ पृ. १०२

दरम्यानगिरी—जामीनगत, जामीनकी; बाहेदारी.
दरम्यानगिरी नसतां रुसवा करून कूच करून गोविंदराव गायकवाड जेजुरीस गेले. —ऐ. ले. सं. ३०३७

दरयाप्त करणें—समाजावून घेणें, आकलन करणें.
ते पत्र दरयाप्त करून फरालास गेले.
—ऐ. सं. सा. खंड ११ पृ. ३७

दर रिकीबीस—१ वारंवार, दर वेळीं. २ दरस्वारीस.

रखमाजी उरणास काल सडेच आले आहेत त्यानी तुम्हास राम राम सांगितल्यावरून लिहिले आहे. तुमचे स्मरण दर रिकीबीस करितात.

—पे. सा. पृ. २३९

दर रिकिबीस तलवार जरब सर्वावर दाबाची ।
हुकुम मोडिल कोण कठिण मेहनत रावसाहेबांची।। (थोरल्या माधवरावाची)

—ऐ. पो. के. खं. १ पृ. ३१५

दररोजींना—दररोज, प्रति दिवशीं.

बातमी येत नाहीं, इतकेस्तव रा. नाना व बापू या दोघांस फार वाईट वाटतें. यास्तव वडिलीं तीर्थरूपांस लिहून इकडे दररोजींना एक पत्र यावें या विषयीं आपण लिहावें. —ऐ. ले. सं. २११७

दरवडा घेणें—स्वारी करणें. धाड घालणें.

चेऊल प्रांतांत पूर्वी देशाईपण व कुलकर्ण दोन्ही वतने आपली होती. त्यास पातेणपरभु यासी गुमस्तगिरी सांगितली ते जबरदस्त सातशे करा-चली होती. पेण पणवेली कल्याणप्रांते दरवडे घेत.

—पे. द. ३१ पृ. १४०

दरवबस्त—सर्व, दरोबस्त.

दरवाजाची परवानगी—वेशींतून किंवा किल्ल्याच्या दरवाज्यांतून प्रवेश करण्यास परवानगी.

साहेबीं शहा महंमद खां पठाण याजला दरवाजाची परवानगी देऊन याचे समागमें सरकारचे दोन जवान देऊन चारी पेठेंतून फिरवावा, म्हणजे ते चीजवस्त घेऊन पळून गेलेला खिजमतगार हुडकून घेतील.

—ऐ. ले. सं. ५९१८

दरवाजा देणें—दरवाजा बंद करणें.

परस्पर त्यांची यांची कळ वाढत असतां किल्लेदारानें येऊन दरवाजा दिल्हा आणि मारामार केली तेससयीं किल्लेदारास हूल चालविली. थोडीशी जखम जाहली. —पे. द. ३३ पृ. ६०

दरसद्दे—दर शेंकडा,

दरसद्दे तिहोत्र्याप्रमाणें व्याज झाडून घ्यावें. —ऐ. ले. सं. १८२७

दरसवाद—गांवच्या किंवा शेताच्या शिवारांत.

विद्यार्थी केशव चैतन्य महानभाव साकीन ओतूर मालूम केले जे आपणासी इनाम जमीन चावर १ नजीक मठ व झाडे मठाजवळील केशव चैतन्याचे दरसवाद कसबे मजकूर वजीरानी कारकीर्द दर कारकीर्दी चालविले आहे.

—मा. स. प. मा. पृ. ९

दर हर सुरत—कसेंही असलें तरी, कांहींही झालें तरी.

दर हाल दर कूच—(?) (बहर हाल दरकूच) (?)
शेख बहादूर दर हाल दर कूच कुंभार्ली घाटानें उतरून कोळयांस मारीत मारीत कसवे चिपळूण मुक्कामीं आला.
—दस शि. मो. इ. पृ. १२

दरहिकायत—(?) हिकायत म्ह. गोष्ट. हिकायती म्ह. तक्रारखोर.
महाराजांचे पत्र आले तें महिपतराऊजीनें वाचून दाखविले. शामजीपंतानें दरहिकायत हेही बोलिलें कीं निजामुद्दवला जातीनसी साफ आहे.
—राजवाडे १ पृ. १८४

दरा, दडा—पेंढाऱ्यांची टोळी. —विल्सन

दराख—द्राक्ष.
दराखांचा हंगाम तो गेला आहे परंतु कोठे मिळतील ती वरावर (वरचेवर टाकोटाक) रवाना करावयास लिहिले आहे तिकडून येतील ती आपल्याकडे वरावर रवाना करीत जाऊ.
—पे. द. ३० पृ. २१३

दराज—१ वाकडे २ धटाईचे ३ अधिक.
अबदुल गनी रा. सुभेदाराकडेस जाईल. त्यानी आता तरी सौम्यच बोलत जावे इंग्रज येत तो परियंत दराज न बोलावे.
—पे. द.

दराज—दीर्घ; दीर्घायु.
१ पादशाही दराज करावी. —इ. म. ९९
२ दराज काय लिहिणे ? मुस्ताक (प्रेमी) जाणिजे हे किताबती.
—राजवाडे ११ पृ. २९

दराज—मोठे उंच. दराजकद्द म्ह. मोठचा उंच बांध्याचा.
त्यांत औरंगजेब बालत्व असतां परम क्रूर व पराक्रमी, शरीरहि मोठें दराज. —चि. शि. च. पृ. ५९

दराज—ताराज, उध्वस्त.
गलीम तेथून उखळून काढून सर्व मुलूक त्याचा खराव दराज केला.
—चि. शि. च. पृ. ३५२

दराबी—१ तोफेच्याखालीं जो स्टँड किंवा फडयैया असतो तो. दराबीवर धरणें म्ह. नेम धरून मारा चालविणें.
२ तोफ वहाण्याचा खटारा.
अवतरणासाठीं मुस्तकीम पाहा —हो. कै. पृ. ३८

तोफा न काढल्यास होळकर प्राण घेईल सोडणार नाहीं त्याचे हातें मरावें याजपरीस येथें मरावें यांत लौकिक असे समजोन मराठा लोक अवरु तलम त्यांहीं घोडीं सोडून तीस तोफा, दराबीवर धरून तीन कोस आणिल्या तोंपावेतों कारखान्याचे माणूस बैल रसा कांहीं एक नाहीं !

—हो. कै. पृ. १४४

दरामत—मध्यस्ती.

रायगडचे मसलतेमुळें मनसबा करून मावळचाची सरदारी केली. गडास मोर्चे लाविले दरामतीत पडोन खानास गड हस्तगत करून दिला हे गोष्टी-करितां खान मशारनिल्हेची कृपा त्यावरी विशेष जाली.

—ऐ. सं. सा. खंड ५ पृष्ठ २९

दरामतबरामत—व्यवस्था, तजवीज, निकाल.

श्रीरंगपटणाहून हरिपंत तात्या फडके पुण्यास आले. आमचे तीर्थरूप यास नवाब बंदगानअल्ली यांचे स्वारीबरोबर हमराही (परिवारात) रुकसत केले (पाठविले) त्या मुकद्दम्याचे (कामाचे) दरामतबरामतींत नवाब मुस्तताब लाट करूणवालीस (लॉर्ड कॉर्नवॉलीस) याणी दोन जरबा तोफा किल्ले बेंगरूळाहून वडिलास इनायत केल्या (बक्षीस दिल्या).

—द. स. कै. या. पृ. १००

दरामद, बरामद,—आयात निर्यात, आवकजावक.

दरीचकार—कामकाजासाठीं.

सखारामपंतास पायांत बेडी अहोरात्र कोठडीस कुलफ व दरीचकार सेवेत दोघे माणसे, येक शूद्र आंधळा व येक ब्राह्मण मुका.

—पुणे अख. भाग १ पृ. २४७

दरीवख्त—या वेळीं.

येणेप्रमाणें सालाबाद पिडी दर पिडी देशमुखी खात असता दरीवख्त सिवाजीराजे भोसले याने मुलुक कबज केला.

—शि. च. सा. खंड ५ पृष्ठ १६९

दरीविला—या वेळीं.

(अवतरणासाठीं 'येतमाद' शब्द पाहा)

—पुणें अखबार भाग १ पृ. १०८

दरीविला—इकडून.

खुसूस आयेत दस्तगा आपाजीराम बाषद दरीविला आजि जिवाजीराम यांनीं अर्जी पाठविली. ते पोहोचून मफसल हकीक जाहीर जाहली.

—ऐ. ले. सं. १२३५

दरुणी महाल—अंतःपूर, जनाना.
दरुबंकी—अंतर्द्वारपाल, —रा. व्य. को
दरून, दरूण—अंतर्गत. अंतर्विभाग.
दरेकसी—देरकशी (?) दिरंगाई.

हरिपंताजवळ अद्याप नेमिल्याप्रमाणे फौज जमा जाली नाही तमाम लोकास वगैरे पत्रे पाठविली आहेत. लोक येणार पैक्याची वोढ म्हणोन लोक दरेकसी करून जमा होणार.

—पुणें अख. भाग २ पृ. १३३

दरेरा—? साक्ष, सडी, ग्वाही.

खरे आगर लटके आर्वुज जातीस विचार कोठील ? याप्रा जोतीपंती खता केली. आपण आज सा मास हा कजिया सोसितो. तेव्हां जोतीपंतास रघुनाथपंतास लाऊन न दिल्हे. आणि आता लाऊन कैसे देऊन ? हाली आपण लाऊन दिल्हे असतील तर स्वामीचे पायाची शपथ असे. व सर्व आलमास ठावके आहे. तेच आपले हातचा दरेरा देतील.

—पे. द. १५ पृ. ७८

दरोगा; दारोगा—अधिकारी. देखरेख ठेवणारा; पोलीस अधिकारी; मुकादम.

महम्मदपन्हा दारोगा हरकाऱ्याचा यास हुकूम जाला.

—राजवाडे ७ पृ. १००

दरोबस्त—सर्व; तमाम; बिल्कूल.

१ दरोबस्त दक्षण साध्य होऊन फत्ते जाली.

—म. रा. चि. स. २४

२ स्त्रीचे व चिरंजीवाचे दर्शन दरोबस्त नाहीं.

—खरे ६ पृ. २६५४

३ लश्करात व हशमास व गडास एकंदर मोकाशे महालगांव दरोबस्त देणें नाहीं. —सभासद २४

दल—(?)

दल आणि सुपारी येक खंडी उत्तम जंजिरे सुवर्णदुर्गाहून रवानगी करविली आहे वरकड होलपाट व पाट व काटवटी (काथवटी) मुसळाचे सर (मुसळें) व फणसपोळी याप्रमाणे सामान पाठविले असे महाराजास रुजू केले पाहिजे. —वै ४ स १७४३ पृ. २६

दल—तोफेच्या विशिष्ट भागाचें नांव.

अवतरणासाठीं 'मोहरी' पाहा. —पे. द.

दल-बादल—भव्य व शृंगारलेला (डेरा).

दलवट—दळणवळणामुळें झालेला मुलुखाचा नाश.

मोगलाच्या फौजेच्या दळवटामुळें मुलुख खराब जाहला. सांप्रत जो मुलुख आसूदा राहिला तेथेंच लष्कर आलें. —पे. द. १५ पृ. ४५

दलवटणें—रगडून काढणें, चुरडून टाकणें.

पांचशें माणूस तुम्ही घ्यावे. तेवढें सामानानसीं दवणप्रांत दलवटून विल्हेस लागेल. —पे. द. ३४ पृ. ३२

दवडी—दमडी.

ज्या प्रमाणे स्वामी सांगतील त्याप्रमाणें वजीर करतील परंतु या प्रकारास स्वामीच्या प्रतापें त्रिस्थलीस दवडी पडत नसता त्यांचे यात्रेचें श्रेय स्वामीस येत असता यात्रकरास उलटी उपाधी लाविल्या फल काय ? —पे. द. २० पृ. २३

दवादवी—आचाऱ्याच्या हाताखालचा खटपटचा, किंवा दुय्यम आचारी. —रा. व्य. को.

जासूद, हरकारा.

दवाम—अखंडित.

दविदन—दौड, घोडदौड (या दविदन् शब्दावरून दवडणे, दौडणें हे मराठींतील शब्द आले.)

दशदर—घाबरलेलें.

नवाबासहि या गोष्टीचा अर्ज जाला. याजवरून नवाब चित्तांत बहुत दशदर आहेत. —पे. द. २५ पृ. ९९

दशरात्रपंचरात्र—दिव्याचा एक प्रकार. दिव्य घेऊन एकाद्यानें साक्ष दिल्यानंतर जर त्याचीं मुलेंमाणसें किंवा गुरेंढोरें पंधरा दिवसांत दगावलीं तर तो खोटा ठरे. —विल्सन.

दशांग—निरनिराळे दहा सुगंधी पदार्थ मिसळून केलेला एक सुगंधी जिन्नस.

रु. २१६ दशांग
२८८ लवंगा
१४४ वेलदोडे. —पे. द.

दशार्णवदेश—बुंदेलखंड. —पे. द. १४ पृ. ९

दशेंत अंतर्दशा प्राप्त होणें—संकटांत संकटाची भर पडणें.

आजपर्यंत शरीराची काळजी नव्हती. आतां हें मध्येंच दशेंत अंतर्दशा प्राप्त जाहली आहे. —ऐ. ले. सं. ५२९९

दस्कत—स्वहस्ताक्षरी; पत्र; सही; निशाणी.

दस्कला—घोड्याच्या पायांत घालावयाची चामड्याची बेडी.
—रा. व्य. को.

दस्त—अधिकार; अम्मल; सारा; पट्टी; हात; ढाळ जुलाब.
१ आम्ही माघारे सरलो तर गवारापुढे निभाव होणार नाहीं आणि आंतरवेदचा दस्त उठेल. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. २०७
२ डोळेझाक करून कजिया सोडून तसेच देशास यावें तर तमाम दस्त उठेल. —राजवाडे ३ पृ. १४९
३ नाकुवत, त्यांतून पाचसात दिवसापासोन दस्तही दोनतीन होतात.
—राजवाडे ७ पृ. ९९

दस्त करणें—जिवंत धरणें.

दस्त—हक्क, कायदेशीर कर.
आमचा दस्त आहे तो आम्ही घेतो रयतेस जाजती उपद्रव आम्हाकडून नाहीं: —शि. प्रः ब. पृ. १३३

दस्त अंमल—गांवचा वसूल; हिशेब.
१ दोनी चावर इनाम चालत होता की नाहीं हें दस्तामली रुजू पाहणें.
—राजवाडे १५ पृ. २००
ये गोष्टीची बरी चौकशी करून दस्तामली वतन्दाराजवळी दोन्ही चावर चालविणें. —राजवाडे १५ पृ. २०१

दस्तक—पर्वाना; लायसेन्स, परमिट.
ऐशास मार्गानें जकातीविशी वगैरे हरएकविशी उपसर्ग होऊं नये. ये विशी दस्तक द्यावें. —खरे ८ पृ. ४२४९

दस्तक—आपल्या सत्तेखालच्या समुद्रांतून फिरण्यासाठीं गलबताना दिलेला परवाना. —कु. आं. ढ. ४०५

दस्तकिती—दस्तखतें (?)
घराऊ कामकाजाचा मजकूर लिहिला त्यासो तीर्थस्वरूप पंताचे दस्तकिती व यादी मजला ठाऊक नाहीं. व दस्तकीत यादीही नाहीं.
—राजवाडे १ पृ. १२५

दस्तकेबेरे—ढाला (?)
ढाला, दस्तकेबेरे, रुमी जनबी फिरंगी, तोमर सैफ हीं शस्त्रें.
—चित्र. १७

दस्तखत—हस्तलिखित; हस्तलेख.

दस्तगर्दी—हातउसने (?)
अवतरणासाठीं, 'कर्जहसना' शब्द पाहा.
—पुणें अख. भाग २ पृ. १११

दस्तगा—हात ठेवण्याची जागा, विश्वासाचें स्थान.
खुसूस आयेत दस्तगा आपाजीराम बापद दरीविला अर्जि जिवाजीराम यांनीं अर्जी पाठविली. ते पोहचून मफसल हकीक जाहीर जाहली.
—ऐ. ले. सं. १२३५

दस्तगाह—हस्तगत.

दस्तगिरफ्त—१ हात बांधलेले २ बंदिवान ३ आंतून सूत्र मैत्री असलेले.
कृष्णराव बल्लाळ दस्तगिरफ्ते सखारामपंतांचे परंतु त्यांची चाल दुरंगी पाहून येक हुजुरचे ज्वाबसालचा सिलसिला मात्र त्याकडे ठेवला.
—पुणें अखबार भाग १ पृ. १०५

दस्तगिरी—मदत, साहृय, स्नेह, कृपा, बद्धता.
१ श्रीमंत माझी दस्तगिरी करितील तर चित्तानुरूप सलूख करीन.
—राजवाडे १ पृ. १५७

२ भीमसिंगाची दस्तगिरी राणासी करून दिली.
—दि. म. रा. ११८

३ मिर्जा इस्लामबेग दस्तगिरींत आला (बद्ध, हस्तगत झाला).
—दि. म. रा. २ पृ. २६

४ श्रीमंत बापू यानी प्रायेश: अर्ज केला कीं राजा रामसिंगजी बिरसेदार त्याची दस्तगिरी करून सरफराज करणें.
—हिंगणें दप्तर खंड २ पृ. ७

५ सालगुदस्ता नबाबानीं सारेच येकीकडे ठेऊन नायकांची दस्तगिरी केली. नाईकाची बुनियाद काय याचा विचार नबाबानें चित्तांत आणिला नाहीं आम्ही नबाबाचे खैरख्वा आहोत म्हणोन नबाबाचे किफायतीचा मजकूर सांगावा लागतो. —पे. द. २५ पृ. ३०

६ सर्व प्रकारें माझी दस्तगिरी करून मुदइयात स्तापन केली.
—ऐ. सं. सा. खंड ६ पृ. २२

७ रामाजी दगडोनें चंद्रसेनाचा दोरा आणिला आहे जे श्रीमंत राजेश्री बाजीराऊजी दस्तगिरी करून महाराजास भेटऊन सेनापती देवितील तर उठोन येईन. —पे. द. १० पृ. ६९

८ प्रस्तुत कालीं गुजराथेचा मामला डामाडोल जाला आहे, याजकरितां पेशवे आपली दस्तगिरी करितील. —पे. द. ४० पृ. ४७

९ कारभाऱ्यांचे बोलण्यांत बदकौली व बदअहदीचा दोष (वचनभंगाचा, करारभंगाचा) इंगरेजाकडे लाविला त्याचे उत्तर इंग्रज वकीलानें केले

कीं रघुनाथराव आश्रयास आले त्यांची दस्तगिरी करणें सांप्रदाय सरदारीचा आहे म्हणून त्यास आश्रय दिला.

—पुणें अखबार भाग ३ पृ. ४२

दस्तगीर—कैद बद्ध, हस्तगत.

चेतसिंग जमीदार कासीकर यानें गोरनर मेस्तर हिस्तैन यास दस्तगीर केले हे वर्तमान. —पुणें अख भाग २ पृ. १२९

२ तोतया राघोजी आंग्रे याणी दस्तगीर करून आणिला.

—खरे ७ पृ. ३५७१

दस्तचप---Left wing of the centre सैन्याच्या मध्याची डावी बाजू.

ते दिवसी नवाबानें लोकांस दारूगोली वाटून हारावल, दस्तरास्त दस्तचप, फौजबंदीची नेमणूक केली. —पे. द. २५ पृ. ६१

दस्तदराज—आक्रमक.

दस्तदराजी—जुलूम, आवाडाव. आक्रमण.

येहती शामजंग वराडांत आहे मन माने ऐसी दस्तदराजी आहे.

—नाग २ पृ. १२३

बाजे विलायत सिवा मलऊत नामे आपल्या दर्कबजेत आणून दस्तदराजी करितो. —राजवाडे १७ पृ. १६

दस्तदराजी—हातमिळणी, संधान, स्नेहसलोखा.

राजेरजवाडे आपापले जागा संभाळून दोहोकडे राजकारणे राखून डावे उजवे दस्तदराजीहि करितात.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ९९

दस्तदस्ता--झाडून साऱ्या जमावासह (?)

येहती शामजंग मुलाजमतीस आले तेव्हां समागमें दिलावर जंग फिरंगी जखमीस व सेख फौजुल्ला व मिर्जाजान व इनसार अल्लीखान इतके होते दस्तदस्ता हजर जाले नवाबानीही नजर मुबारकीन दस्तदस्ता मुलाजमत घेतली. —नाग २ पृ. ११३

दस्तपंजा---दस्तक; पर्वाना; कौल; अभयपत्र.

दस्तबोसी--१ हातमिळणी, लक्षणेनें झटापट, चकमक हातपराजी.

गोहदेस तोफ-बंदुकेची लढाई अष्टौप्रहर लागली आहे दिवसातून येकादी वेळेस गाऊकरीहि मोरच्याबाहेर निघून दस्तबोसी करून जातात. दहा पांच माणसे इकडील तिकडील नित्यानी हरिस्मरण करित्यात.

—हिंगणे द. भाग २ पृ. ५६

दस्तमल—दस्तअमल ? गांवचा वसूल.

दस्तमल घडणी लाहारी. —पे. द. ३१ पृ. १८

दस्तमालत—दस्तअंमल, गांवचा वसूल.

त्यास ताकीद होये कीं मौजे मजकुरास कोण्हे बाबे आजार न लावीत. पंडित मशारनिले मौजे मजकुरास कौलकरार देऊन दस्तमालत व आबादी करतील. —राजवाडे खंड ११ पृ. ३७

दस्तरप्त—जुप्तरप्त; बंदोबस्त.

दस्तरप्त सर्व आपला आहे तसाच असो द्यावा.

—ऐ. टि. २ पृ. ७२

दस्तरस्त—दस्तरप्त; बंदोबस्त.

दक्षिणी राज्यामध्यें निराजी राहुजी सरकारकून. दस्तरस्त त्यांचा होता. —म. द. रु. ३ पृ. २९

दस्तराख—दस्तरास्त Right wing of the centre सैन्याच्या मध्याची उजवी बाजू.

ते दिवसी नवाबानें लोकांस दारूगोली वाटून हारावल, चंडावल, दस्तराख, दस्तचप, फौजबंदीची नेमणूक केली.

--पे. द. २५ पृ. ६१

दस्तराज पश्चेहद—दस्तरास्त दस्तचप. दस्तरास्त म्ह. सैन्यांतील गोलाची म्ह. मध्याची उजवी बाजू किंवा बगल. दस्तचप म्ह. डावी बाजू किंवा बगल.

सरदारांस बाजू वांटून, त्याप्रमाणें दस्तराज पश्चेहद रोज चंडोल चालवितात सामान बांधून मुंडे हौदियांत बसतात.

—ऐ. ले. सं. ९७१

दस्ता—चोवीस कागदांची गड्डी; वत्ता; मूठ; पकड; बन्दुकीची पकड; भाता.

दस्ता—बंदुकीचा विशिष्ट भाग, बुंधा.

जमा जिराइतखाना—कमवीसनजर हस्ते गोपालसिंग राजे करोलीकर गुजारत खिजमतगार, बंदुका सबलगडी दागिने सुमार २.

१ प्रा दस्ता लाकडी रंगीन काम. पेंधी मोहरीवर मुलामा सोनेरीगलेफ खारव्याचा येकेरी येकूण दागिना १

१ प्रा दस्ता लाकडी रंगीन. पेंदी गंगाजमनी मोहरीवर मुलामा सोनेरी. नलीवर मुलामा रुपेरी. —पे. द

दस्ता—दहा हजार स्वारांचा कंपू.

ज्या समई श्रीमंताचे सरकारात फौजेचे कुमकेचे प्रयोजन पडेंल ते समई आम्हास हुकूम करावा म्हणजे दोन चार दस्ते पाहिजेत तेव्हा पाठऊन देत जाऊं. अथवा आम्हास इकडे मसलतीचें कामकाज पडेल ते समई आपण आमची कुमक करावी. स्वामी म्हणतील कीं दस्ता किती फौजेचा? त्यास दहा हजार स्वारांचा असतो. या प्रमाणे त्याची चाल आहे व बोल. णेंहि खचित आहे. —पे. द. भा. ३ पृ. १३५

दस्ता—विड्याचीं पाने ज्यांत गुंडाळून ठेवतात तें वस्त्र किंवा डबा. —रा. व्य. को.

दस्ता—हातमोजा लोखंडी. अंगावरील चिलखताप्रमाणें हा हातावर चढवीत दोन दस्ता. १ मुलामा रुपेरी उडाला आहे अशी व १ साधी, एकूण २ —ऐ. ले. सं. ४१६३

दस्तान्या—दस्ताना; लोखंडी हातमोजा, हस्तत्राण.

शिरपेंच व जेगा व विलायतीं गोरी व खंजीर व पेटी लोखंडी व दस्तान्या २ व बोकमार १ आम्हांस इंग्रजांच्या वकीलाच्या घरीं मिळाल्या. आज ते आमच्या डेऱ्यास येणार, तेव्हां इकडूनहि सदरहुअन्वयें बहुमान केला पाहिजे. —ऐ. ले. सं. ४३३०

दस्तानसराई—' स्टोरी टेलर ', गोष्टी सांगणारा.

दस्ताना—लोखंडी हातमोजा; हस्तत्राण;

मालट वकिलाने परशरामपंत मिरजकर यांस वस्त्रे जवाहीर व हत्यारे दिली त्याचा तपशील.

५ हत्यारे
- १ पस्तोल
- १ पेशकबज
- १ तलवार
- १ दस्ताना
- १ पेटी लोखंडी

—पुणें अखबार भाग ३ पृ. १११

दस्ताना—तिरंदाजाचा चामड्याचा हातमोजा. —रा. व्य. को.

दस्तार—पागोटें.

वस्त्रे खिलत सात पारचे व चारकुबा व दस्तार व सरबस्ता मरवरीद व समशेर व सिपार याप्रमाणें इनायत हुजूरहोऊन जाहले ते सेवेशी रवाना केले आहेत. —म. शि. यां. का. पृ. ४५९

दस्तारबंद—इंग्रजांच्या फौजेंतील पागोटीवाले शिपाई.

इंग्रजांच्या पलटणापैकीं दस्तारबंद व छोलदार व तुरूपस्वार वगैरे यांच्या तपशिलाची याद पाठविली आहे. —ऐ. ले. सं. ४४०८

दस्तार बदल—परस्पर पगड्या बदलून स्नेह कायम करणें पगडीभाई होणें.

इकडे गुलाम कादर व इस्माईलबेग यांसी परस्परें सख्य होऊन दस्तारबदल जाली. —दि. म. रा. १ पृ. २०४

दस्तावणें—दाबणें, वळकावणें.

इंग्रज अद्यापि ग्वाल्हेर दस्ताऊन बसलेच आहेत. माझे हवाला न केली असा वचक गोहदकर चित्तात ठेवितो.

—ऐ. ले. पा. स्यु. प्र. पृ. ९९

दस्तावेज होणें—मुठींत सांपडणें, पंजांत सांपडणें.

श्रीमंतांचीं पत्रें सुजाउद्दौलास अंतर्वेदी ग्वाल्हेर झांसीस उमेदवार करून कुमकेस यावे. यैशास वजीरानीं नियत बदलून अंमल उठविलाच आहे. मालव्यास सुभेदार करून पाठविला तो ग्वाल्हेर प्रांतापलीकडे आलाच आहे. श्रीमंतांचाहि आश्रय गेल्यानें दस्तावेजच जाहला. यावरून वजीरास उमेद वाटली. —ऐ. ले. पा. स्यु. प्र. पृ. १७३

दस्ता सरहस्त—(?)

पोषाख मोंगलाई तऱ्हेचा १ दस्ता सरहस्त बांधलेलें पागोटें. १ बालाबंदी पागोट्यावरील. —ऐ. ले. सं. ४६२४–२५

दस्ती—हातांत घालण्याचें ? (घड्याळ).

फरासीसी वकिलानें बालाजीपंतास (नानाफडणीसास) विलायतचे सरदारांचे खलिते तीन दिले व घड्याल दस्ती बेश किमती दिले.

—पुणें अख. भाग २ पृ. ११८

दस्ती—ज्यावर कर आहे असा.

बागायती दस्ती झाडें —वाड स. मा. २ पृ. २५९

दस्तीबंद—म्ह. दस्तीबाद Exemption from Taxation करमाफ जकात माफ.

विसो हरी महाजन यांनीं कित्येक हैराणगीचे वर्तमान सांगितलें. त्याजवरून वीस हजार नारल यासी सोडिले आहेती. दस्तीबंद देणें.

—पे. द. ३१ पृ. २९

दस्तीबाद—करमाफ, करमुक्त.

सदरहू ठिकाणें दस्तीबाद देणे म्हणोन पेशजी सनद असता हल्ली तकादा लाविला म्हणोन कळते तरी तकादा न करणें.

—के. सं. भट दप्तर, मालवण

दस्ती--मोहोर—ज्यांत थोडीं अक्षरें आहेत अशी मोहोर (शिक्का).
रा. पाटीलबाबा याचे मोठे मोहरेची अलकाब 'वकील मुतलखुमददूल उमराव व मुतगरुल मुमालिक फरजंद अलीज्याहा महाराजाधिराज माधवराव शिंदे श्रीनाथ बहादुर मनसुर जमा फीदवी शहाअलम पातशहा गाजी '— येणे प्रमाणे माठी मोहोर आहे. दस्तीमोहर लाहान, 'वकील मुतालख आलिज्याहा श्रीनाथमहाराज माधवराव सिंदे बहादुर'— येणेप्रमाणे आहे.

—राजवाडे खंड १२ पृ. ३७

दस्तुर—परवानगी; कबुली, सही नियम; वहिवाट; रिवाज. पार्शी धर्मगुरु; सही दस्तुर खुद्द—सही स्वतःच्या हातची असे.
दस्तुरी—रस्तापट्टी; रस्तापट्टीचें नाकें.
दस्तुरुल् अमल— वागण्याचा नियम. शिरस्ता.

—ऐ. स्फु. ले. ४५

दस्तेदस्त—भारंभार. (त्या उत्पान्नाइतक्या उत्पन्नाचें)
आम्ही तरफदारास लिहिले आहे जे त्यास सेत अंतुर्लीस इनाम किती होते ते मनास आणोन त्या दस्तेदस्त यास मौजे दापोडा एक सेत इनाम देणे. —रा. १ पृ. ३६

दस्तैवज—हक्कपत्र; प्रमाणपत्र.
दस्तैवजी—प्रमाणभूत; विश्वसनीय.
दसखत—स्वाक्षरी.
(अवतरणासाठी 'बेदार' शब्द पाहा)

—पुणें अखबार भाग ३ पृ. १०३

दह—१ दहा २ खेडें.
दहक—दर दहा वर्षांनीं एक सालचें उत्पन्न, या हिशेबानें सर्व वतनदार इनाम दार तैनातदार यांजपासून सरकारात घेण्याची पूर्वी वहिवाट असे. त्याला दहकपट्टी म्हणत.
१ यादी व्यंकटराव नारायण घोरपडे सुरुइहिदे समानीन.
कर्जपट्टी व दहक व रुसुमाचा गावगन्ना मिळोन रुपये ५८०००.

—इच. सं. इ. पृ. ८२२

२ पुढें मोगलाचे पारिपत्य करावें त्यांत चवथाई देऊ व आमचे सरंजामी सरदार हरामखोर आहेत त्यांचे पारिपत्यास तुम्ही अनुकूल असावें तेथें दहक देऊं. —राजवाडे खंड १२ पृ. ८८
३ सरंजामास महाल आहेत. तेथील कमाल आकारास दर सद्दे रुपये १०

प्रमाणें दहक सरकारांत घ्यावयाचा ठराव झाला आहे.

—ऐ. ले. सं. २४४९

४ यशवंतराऊ याणी विनंती केली कीं दहेकेचा यैवज कोणाकडे कैसा आहे व प्रस्तुत प्राप्त तो कैसा होतो ?

—पे. द. ३३ पृ. २३२

५ सेवकाचे गांवखेड्यांपासून खानदेशचे सुभेदारांनी दहक व सुभेपटी म्हणोन यैवज घेतला.

—पुणें अख. भाग २ पृ. १६१

दहन—(मो. वा. चूक. दरज मूळ शब्द असावा ?) दरज— फट, दुजाभाव, वैषम्य, वैर.

तेव्हा तात्या (हरिपंत) व शिंदे या उभयतांनी श्रीमंतांचे पाय स्मरून परस्पर शपथ जाली त्यावेळेस दोघांचे चित्तातील दहन (दरज) गेला.

—पेश. बख. सोहोनी पृ. १४७

दहानीदह आयद—देववून टाकावे.

दहाबाराक—दहा बारा एक. म्ह. सुमारे दहा बारा.

दहाबाराक हजार फौज समागमें नेली.

—पे. द. १४ पृ. ६३

दहीम—देतों.

दळपवित्र—सोन्याच्या मुलाम्याचें तुळशीपत्र (?).

दळ म्हणजे पान तुळशीच्या पानालाच अत्यंत पवित्र समजतात. होनाजी बाळाच्या लावणींतहि एके ठिकाणीं म्हटलें आहे "तुळशीदळ जरि शिळें जाहलें । तरि शास्त्रीं वंदिले" सोन्याचे तुळशीपत्र करून दान देण्याची वहिवाट अद्याप आहे.

१४ ब्राह्मणांस एकेक फर्द शालीचा एकेक धोत्रजोडा एकेक चौकडा व येणेचप्रमाणे दळ पवित्र व चंबू पंचपात्र व एकेक मोहर दक्षणा दिली.

—नाग २ पृ. १९०

दळवट—(१) सैन्याचा जमाव. (२) पळ.

त्यांची आमची चुकामूक, मला जखमा लागल्या तेव्हां झाली. त्यांचा घोडा ते खालीं पडलेवर पुढें दळवटांत आला.

—ऐ. ले. सं. ६६३५

दाइतें, दाईतें—खंडणी, हक्काबद्दल मिळणारी रक्कम.

१ कृष्णाजी नाईक बांदल आम्हासी सिवेनिमित्य व दाइत्यानिमित्य कटकट करोन झुंजो लागले. —राज १ पृ. ५

२ तीन पिढ्या बांदलांनीं पुंडावे केले. बारा मावळचे दाइते घेत होते.

हिरडस मावळचे वृत्तीपैकी दाइते टक्के साठ राईरकराचे घरास पावते करीत होते. —ऐ. सं. सा. खं. ४ पृ. ६५ व ६६

दाइमी; दायमी—कायमची देणगी.

दाइया—इच्छा, आकांक्षा.

१ इंग्रज दक्षणचा दाइया ठेवून न होण्याचे मन्सबे बांधितात व खूब मकर ही (फसवणुकीची विद्या) जाणतात.

--राजवाडे १० पृ. १६७

२ सर्व मुलुक कबजा केला दक्षिणचा दाइया राखतात.

—राजवाडे १९ पृ. ३८

३ इंग्रज खानमजकुराचे मुकाबिल्याचे दाइयाने मुस्तेदजंग आहे.

--पुणें अख. भाग २ पृ. ३२

दाई—दायाद, महत्त्वाकांक्षा धरणारा.

टिपूहि आतां मसनदनशीन जाला. तो गरूरीच्या पहाडावर चढला! सुलतानीचा दाई.

—ऐ. ले. सं. ४३५५

दाई—दावेदार, फिर्याद करणारा, दावा सांगणारा.

—विलसन

दाईज—वारस, नातेवाईक, किंवा वारसाचा हक्क असणारा नातेवाईक.

—विलसन

दाईदार, दाईंदार—देणेकरी. ऋणको.

--विलसन

दाईमुदई, दाईमुदाई--वादी प्रतिवादी.

हर्दो जन दाईमुदई बोलाऊन आणून —राजवाडे २० पृ. ६०

सिवेचा कजिया असल्यास हरदू दाईमुदाई यांची लिहीली आणवीत.

—पे. द. ४५ पृ. १४१०

दाईया—इच्छा, वांछा, दावा.

इंग्रज बदमामली व हिंदुस्थान व दक्षणचे रियासतीचा दाईया आहे.

---पुणें अखबार भाग १ पृ. १७२

दाईस; दायस--कायमचा.

१ तूं दाईस हलालखोर आहेसी. —राजवाडे १५ पृ. ३१

२ व त्याच पत्रांत दाईम सलूख आहे. --ऐ. टि. ४८

दाखल—नजीक, समीप.

छ ११ रोजी लोणंदचा मुक्काम झाला. छ १२ रोजौ सातारा दाखल कोसभर राहिला. --ऐ. ले. सं. १९६९

दाखलगिरी—१ हस्तक्षेप; ढवळाढवळ. २ पाऊल शिरकवणे.
मकसुदाबाद व पटणे लखनऊ या मुलकांत पातशहाची वरात घेऊं नये दाखलगिरी एकंदर करूं नये पटण्यांत तीन लक्षांचा कमपेश नेमून देऊं ते दहा सोळा (?) (दाहासाला) उपरातिक अंमल करावा.
—वै. ४ स. १७४३ पृ. २५

दाखला—मुकाबला, गांठ.
शामलाचा व आमचा दाखला होऊन युद्धप्रसंग बहुत जाला.
—पे. द. ३ पृ. १४५

दाखला—संबंध, हक्क.
किले माहुली यांचे स्वाधीन करावी. कल्याणकरांचा दाखला नाहीं यैसा अर्थ केला पाहिजे.
---पे. द. ३४ पृ. ८०

दाखला दुखला--दाखला विखला, संबंधविबंध.
स्वार जमात दारानीं लिहवावें आणि पुढें दाखलादुखला कांहीं नाहीं. त्याजप्रमाणें डक भरून द्यावा जातीचा कारभार कोण्ही कोणास मानीत नाहींत, याजमुळें त्याची फौज कितीक उठून कडपीयासी गेली.
--पे. द. २८ पृ १०९

दाखला पुरणें—आधार सांपडणें, पुरावा उपलब्ध होणें.
ही सनद आहे ती घ्यावी व यात काय आहे ते तुम्हीं करावे व सातारियांत सरकारी अमात्याचे दफ्तरी दाखलाही पुरेल तो पाहून जो उद्योग करणें तो करावा.
—ऐ. जु. ले. चि. ध. सं. मा. पृ. ७

दाखलेशीर--विश्वसनीय, सप्रमाण.
आमचे दौलतींत हालीमाजी (दंगा, क्रांति) होत गेल्यामुळें कागदपत्र दाखलेशीर राहिला नाहीं.
--राजवाडे १ पृ. ३१२

दाखिल—देखील.

दागचेहरा—शरीराच्या खाणाखुणांचें टांचण.
दाग चेहरे करून रोजमरे कितेकांचे जारी झाले.
---राजवाडे ७ पृ. ५४

दागतसीया—घोड्यांच्या व स्वारांच्या निशाण्यांची नोंद सरकारांत करतात त्याला दागतशीये करणें असें म्हणतात.
दोन हजार स्वार ठेवायाची आज्ञा केली आहे. त्यापैकीं कांहीं स्वार जमा करून सरकारांत दागतसीये जाहाले आहेत. स्वारास शेरा पंधरापासून तीस पर्यंत देतात.
—पे. द. १० पृ. ७३

२ त्यापैकी कांहीं स्वार जमा करून दागतसिये जाहले आहे.
—पे. द.

दागिना—जहाजांची मोजदाद करताना वापरावयाचा संख्यावाचक शब्द.
५ जमादिलावल रोजीं इंग्रेजी लढवाई दुघोसी बोट १ बतेला १ व सिबाडा ३ असे ५ दागिने जंगी सरंजाम भरून मुंबईहून जात होते.
—ऐ. ले. सं. ४१९८

दाजेदाट—? (मो. वा. चूक) दोन पाट ? म्ह. दोन गांव ?
एकजण जोरावर होता. तो दाजेदाट पलोन तीन नद्या पोहोन हत्येरे व पांवरोणे टाकोन जीव वाचवोन आला त्याणें वर्तमान सांगितलें.
—पे. द. ३३ पृ. २६१

दाट—हल्ला, चढाई.
दुसरे रोजीं मोंगलानीं दहीहांडियाहून कूच केल्यावरी आम्हाकडील फौजा उभ्याच होत्या त्याजवरी चंडोलीवरी मोगलाचे दाट केलियावरी जुंज मातबर जाले. आम्हाकडील लोकांची कस्त यापुढेंही दाटच करावयाची आहे. पानावरी पान ठेवावयाचा प्रकार अद्यापवर नाहीं.
—पे. द. २० पृ. ७२

दाट किंवा दाटा—जरब, दबाव.
श्यामलासहि बरे दाटियाचें पत्र पाठवावें की शिद्दी मुबारक याजबरोबर लोक देऊन तुम्ही शत्रुच्या कुमकेकरितां पाठविलें हे गोष्टी पेश जाईल की काय ?
—पे. द. ३४ पृ. १२९

दाटका उतार—जेमतेम उतार. ?
तुंगभद्रा नदीस उतार दाटका जाला म्हणून वर्तमान आहे. (कदाचित् 'बारका' याबद्दल 'दाटका' अशी मोडी वाचनाची चूक असावी).
—ऐ. ले. सं. ४१२८

दाटका करणें—दम देणें; अत्याग्रह धरणें.
रावसाहेबांनीं आज्ञा केली जे, जें केलें तें सरकारांतून समजून केलें. तुम्हीं दाटका करून विचारल्यास काम पुरसीस होईल !
—ऐ. ले. सं. ४६४७

दाटजारी, दाटजोरी—जबरदस्ती, दमबाजी.
१ रायाजीने बल करून दाटजोरी केलियानें तुम्ही मजबुदी करावी त्यासी ठाई ठेवावें.
—शि. च. सा. खंड ५ पृष्ठ १७०
२ दाटजारीचे कागद तुम्हापासून घेतले असत ते अवघे हुजूर आणऊन कुसूर तोडू म्हणून साहेबी जबांमुबरख वचन दिले.
—शि. च. सा. २ पृ. २६८

दाटणें—धमकावणें.

आम्हीं त्यास दाटलें तेव्हां त्याजकडील पंचवीस प्यादे उठून गेले.

—पे. द. ४० पृ. १४१

दाटपटी—दमदाटी

१ दत्ताजी वारिसदार पहिले पासून जे खात आले आहेत ते खाऊन हाल खुद राहेत ते करणें. कुसूर होव नेदणें. यैशा दाटपटीच्या गोष्टी हेजिबा हाती करऊन.

—शि. च. सा. खं. २ पृ. २६६

दाटा--भीति; अडचण.

शत्रूनें आम्हांवर चालून घेतलें, तेव्हां नदीचा दाटा. (मार्ग सरतां येईना) कांहीं केल्याखेरीज गत नाहीं, तेव्हां उठोन आम्हीहि शत्रूवर नीट चालूनच घेतले.

--ऐ. ले. सं. ८९०

दाटी—दंगा, हंगामा.

-श्रीमंतास घेऊन यावे असा विचार केला होता परंतु दाटी जाली यास्तव बनले नाही. तरी सुभेदार काही परके नाहीत वडीलपणे या वेळेस येऊन सरंक्षण करणें हेच त्यास योग्य.

—चं. चू. द. पृ. ५९

दाटी वर्तमान—दाट बातमी.

साहेब दरकूच येत आहेत हे वर्तमान दाटी आहे. इभरत भारी बसली आहे.

—पे. द. भाग २९ पत्र नं. १२८

दांड--खंडणी; दंड.

ठाकरिणीचें वर्तमान तर तीनशे रुपये दांड केला आणि सर्वस्व लुटून आपले घरांत घातले.

—वै. ४ स १७४५ पृ. ९

दांड करणें किंवा घेंणें—दंड किंवा खंडणी वसूल करविणें. बसविणें.

दुरुदुरु गांव मातबर होता तो रघुनाथ बापुजी याणी मारुन लुटून पस्त केला. आसाम्या धरून दांड केला. तालगांव, येथील जमीनदार बगराय धरून चालीसहजार दांड घेतला.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १६४

दांडगावा—दंगामस्ती.

प्रभूंचा निषेध कशावरून व पुढें काय करावे तें कांहीं सिद्ध न होय तेव्हा दांडगावे आरंभून जो संमत (संमतिदर्शक सही)न करील त्याचें घरीं जाऊ नये (धार्मिक कृत्यें करण्यास किंवा भोजनास) हें आरंभिले.

—काय. प्रभु. इ. सा. पु. १ अंक ६ पृ..७

दांडफुरई—दंडफुरोई. खंडणीचा एक प्रकार.

मुलुकातील रुपया यावा तरी प्रस्तुत रयत परागंदा जाली आहे. आता

रुपया होणें तो दाडफुरई करून जमा करुन करितात.
—पे. द. १४ पृ. ४९

दांडामेडा—दांडाभेंडा. शीवशेजार किंवा मैत्री.
तेव्हांच आम्ही सर्वांस सांगितले भोसले यांचा व इंग्रजांचा दांडामेडा आहे यांच्यानें इंग्रजांची मसलत होणार नाहीं.
—म. शि. यां. का. पृ. २०५

दांडी—शेपूट.
१ दादो कोंडदेव याचे घोड्यांच्या दांड्या कृष्णाजी नाईक बांदलानें तोडील्या. —ऐ. सं. सा. खं. पृ. ६७
२ फडतरे शिलेदार यांची घोडी इंग्रजांचे लढाईत उजवे बाजूस दांडी-जवळ गोळी लागली. —ऐ. ले. सं. ३६२५

दांडी—पालखी उचलण्यासाठी तिला लावलेला मेहरपाकार बांबू २ चवरी —३ लक्षणेने घोडा कारण घोड्याच्या शेपटीला दांडी म्हणतात. तारफेची म्ह. तारीफ करण्यासारखी उंची, सुरेख.
नबाबास पालखी चदनाची बहुत उत्तम व दांडीहि तारफेची व दोन हत्ती येणेंप्रमाणें नजर केली.
—पे. द. ४० पृ. २६

दांडी सुखासन—पालखी सारखे वहान.
ब्राह्मण सुखी केले व पाइसकरास सिमळ म्हात्रीयास दांडी सुखासन दिघलें. —पा. क्ष. ज्ञा. इ. खं. १ पृ. १९

(**एकाद्यावर) दाढ करणें**—दंड बसविणें, खंडणी बसविणें.
याजवरी दाड केला. त्याप्रमाणें आम्हावरही दाढ जाला. लोकापासून काय घेतले आणि आम्हावरी दाढाचा दुराग्रह मांडला आहे.
---पे. द. भाग २७ पत्र नं. २३

दाढेचा मणी—(?)
पत्र सिरी वंदून सनाथ जालों. दाढेच्या मण्याविसी आज्ञा. त्यास रा. सेनासाहेबसुभा यांणी सांगितलें त्याजवरून विनंति लिहीली होती.
—नाग २ पृ. ८४

(**एकाद्याच्या) दाढेस देणें**—तावडींत देणें. (मरण्याकरतां)
जिजावानें घोडिया वरून उडी टाकून जीभ वोढूं लागली तेव्हां गलबल जाली ते समयीं हैबतराव याणी जिजावास भाक दिल्ही कीं चांदोबा भोसल्याच्दा दाढेस दिल्हा. तेथून वांचून आला तरी त्यानें निम्मे वतन खावे यैसी बोली करून जिजावास घेऊन मोंगलाईत गेले.
--शि. च. सा. खं. २ पृ २५७

दाणा—दाना, जाणता, शहाणा, ज्ञानी, हुशार, गुणी.

१ मुधोजी भोसले हे पंत मजकुरास दाणा व जवामर्दी (जवामर्द) जाणून त्यावर बहुत कृपा करीत होते. —द. स. कै. या पृ. ११४

२ दुस्मान दाणा गेला. —म. रा. चि. थो. शा ८५

३ आपण दाणा व दुरंदेश आहेत. —राजवाडे १० पृ. २१३

दाणा—मूठ (घोड्याची उंची मुठींनी मोजतात)

घोडा फार चांगला आहे. रंग निळा. पाय काळे व डोळे काळे व आईल दांडी (आयाळ व शेंपूट) काळी व उंची घोडे अदमासें चवदा दाणे. —पे. सा. पृ. २४०

दाणाई—दानाई, शहाणपणा,

मशीरमुलुक यानी पंतमजकुराचे दाणाईची अधिकोत्तरता जाणून, एका शाळेत विद्याभ्यास केला याची पासदारी दाखवून (आस्था, काळजी) माधवराव रामचंद्र याजला मुसारहीमूचे लईनपैकी पांचशे लोक यांची सरदारी दिल्ही. —द. स. कै. या. पृ. ११४

दाणाघांस—(शब्दांचा व्युत्क्रम) घांसदाणा.

आठरोज लष्कराचे चौगीर्दी कहीकाबाड दाणाघास बंद केला. —पे. द. १४ पृ. ३०

दाणादारू—धान्य व दारूगोळा.

तिसरे प्रहरीं निशाण त्यांचें घेतलें वरकड सामान दाणादारू होता परंतु किल्लेकऱ्यांनीं लबाडी केली. —पे. द. १० पृ. ४२

दाणावैरणीस अजीज करणें—दाणावैरण तोडणें किंवा दाणावैरणीवांचून दीन करणें.

सरकारच्या फौजा चौगीर्द लागून राहिल्या आहेत. दाण्यावैरणीस अजीज करून थोडेंच दिवसात (शत्रु) बुडविले जातील. —हिं. द. खंड १ पृष्ठ ५७

दाणीस देणें—दावणीस देणें, दावण देणें. बळी देणें.

राजा तूं अवसान धरून अफझलखानाचा वध करणें म्हैसा दाणीस देऊन मज संतुष्ट करणें ऐसे वदोन तुळजा भवानी अदृश्य जाहली. —चित्र पृ. १८

दांत—आशा; उपाय.

ईश्वरकृपेनें मुसळास अंकूर फुटले कदाचित् तर दांत आहे दुखण्यांतील ! परंतु हेंच कठीण. कसें घडेल ? —ऐ. ले. सं. १९३७

दांत करकिटीनें—निश्चयानें.

आपण शत्रूच्या तोंडावर सबंध आहां, म्हणून हें वेढयाचें काम नीटपणें

चालतें व गडबडीचेंहि उल्बण (उल्हाण) होत जातें. हिंमत धरून दांत करकिटीनें नेट धरून आहेत. --ऐ. ले. सं. १७००

दांत खट्टे करणे—पराभव करणें.

मराठी फौज तमाम बेफाम होती परंतु सरदार सावध होऊन कोणीं जिण ठेविले कोणी ठेवीत होते तो मोंगलासी गांठ पडली. युद्ध उत्तम रीतीनें जाले तांज्ञाचे दांत खटे केले. —पे. द. ३० पृ. १५१

दांत देणें– राग धरणें; वैर धरणें.

१ गरीब संस्थानिकांवर दांत द्यावा हें कारभारी यांचें मानस पुरतें आहे. —ऐ. ले. सं. ११७६

२ एक संस्थान जयपूर याजवर मात्र दांत देऊन २० लक्ष रुपये नजर करार केली. —म. शि. यां. का. पृ. ४८४

दांती देणें—दांताडावर हाणणें किंवा तोंडांत मारणें.

हें पलटण तरी उडवून टाकू यात जय अपजय ईश्वर देईल तसें पाहून घेऊं विना एक वेळ दांती दिल्हयाखेरीज नक्षा जमणार नाहीं —हो. कै. पृ. १३९

दांती बल धरणें---इर्षा धरणें. उमेद धरणें.

प्रतिनिधी आजी प्रस्थानी गेले तें दाती बल धरून जात आहेत. —पे. द. ३ पृ. ११५

दातेगड—ऊर्फ सुंदरगड. --पे. द. ३१ पृ. १४६

दाद्या—दादला.

माझा दाद्या तोही बोलला कीं तुझा दादला माझी उखळधुळी करतो. --पे. द.

दाद—न्याय. दाद घेणें—तक्रार ऐकून न्याय देणें.

हा चालवून तुमची किस्त अदा करावी तर न्यायदाद नाहीं. --राजवाडे ५ पृ. १३७

दादइलाही—ईश्वरी इच्छा, किंवा न्याय, कृपा.

बाळाजी जनार्दन वगैरे तलेगांवास गेले. व दादइलाही करितां फत्ते जाहली व इंगरेज खजील होऊन मुंबईस गेले. —पुणें अखबार भाग १ पृ. १०२

दाद करणें—दाद घेणें.

दोन चार वेळां भेटीस सन्निध गेलों परंतु महाराजांनीं कृपा करून आमची दाद केली नाहीं अथवा अर्ज विनंती चालविली नाहीं. —वै ४ स. १७४७ पृ. १९

दादख्वाह—दावा सांगणारा, फिर्यादी.

—विलसन

दादन—देणें.

दाद मनसुबी—फिर्याद दाखल करून घेऊन योग्य तो न्यायनिवडा करणें.

श्रीयात्रेस जावे हाच मनोदय, राज्यांत परीक्षा नाहीं दादमनसुबी न्याय-नीति बुडाली. कदीमी पाया राज्यांतील मोडला आम्ही लोकी देशांत जावे यैसे जाले (देशांतर करावे, देशोधडी व्हावें असें झाले) आम्हा लोकांचा धावा ईश्वरच करील.

—वै. ४ स १७४५ पृ. ८

महाराज छत्रपती साहेबाचे सेवेशी वारंवार अर्ज केला, विनंती पत्रें पाठविली परंतु दादमनसुभी नाही अवघी निमित्यें (आरोप) आम्हां चाकर-लोकांवर समर्थपणें (केवळ समर्थ वलिष्ठ आहेत म्हणून) धणी ठेवीत आहेत बाजपासूज दरबारीं नाहीं.

--वै ४ स. १७४३ पृ. १०

दादह—देऊन; दिलेले.

दाद होणें--दाद लागणें.

आम्ही तों सर्वप्रकारें अर्थे प्राणें बुडालों येकवेल दरबारास येऊन हाक-मारून दाद जाहली तरी बरेच, नाहींतरी आमचा उपाय आम्हाजवळ आहे. —पे. द. ३३ पृ. १२७

दादी फिर्यादी—न्याययाचक.

या उपरी कोणी दादी फिर्यादी आल्यास हुजूर पाठवावे.

--राजवाडे ७ पृ. २९

दादू पंथी—दादू नांवाचा अहमदाबाद येथें सतराव्या शतकाच्या सुरुवातीस होऊन गेलेला, पिंजारी जातीचा संत. यानें जो एकेश्वरी पंथ स्थापला तो दादूपंथ व त्याचा अनुयायी म्हणजे दादुपंथी.

—विलसन

दादेपडदादे--वाडवडील.

सुलतानखानाचे पत्रक आणून दाखविलें त्यांतील मजकूर पाहून, हे फारा दिवसांनीं (फार वर्षे) वतनाची सोय धरून आहेत. पेशजी यांचे दादे पडदादे यानी कदीम वतनदारी सांगितली त्याचाहि दाखला यानी मफ-लीसवाका लिहून दिल्हा आहे.

—इ. सं. पे. द. स. प. मा. पृ. ८१

दानत; द्यानत; द्यानती—धर्मबुद्धि; प्रामाणिकपणा; नेकी; सचोटी.

दानतदार--प्रामाणिक.

दानतदारी द्यानतदारी—प्रामाणिकपणा.

बळवतसिंगानें शुद्धीवर येऊन केल्याकर्माचें संपादणूक करून चाकरीची दानतदारी दाखवायाबद्दल, लिहून पाठविलें आहे.

—पे. द. ४० पृ. ३५

२ चाकरी स्वच्छतेनें घेतली तर सर्वही द्यानतदारीनें होईल.

—राजवाडे १४ पृ. ५१

३ रुपया द्यानतदारीचे रीतीनें साधून सर्कारच्या कर्जास हात लावावा.

—राजवाडे ३ पृ. १४६

दाना—शहाणा; जाणता; विवेकी, विचारी.

पेस्तरसालचा विचार काय तो मजकूर रावजीनें आम्हास लेहून व दाना आदमीयाबराबर सांगोन पाठवावा कीं तो जबानीनें अर्ज करील.

—पे. द. २५ पृ. ७१

त्यास आपण दाना दुरंदेशी आहेत.

—खरे ९ पृ. ४०३३

दानाई—शहाणपणा.

नबाब श्रीमंताचे ठायीं आजपावेतो दृढतर आहेत. नबाब इतक्या करतांच निघाले नाहींत की लोक म्हणतील श्रीमंत माधवरावांचा तसा प्रकार होताच नबाब बाहेर निघाले ! लोक उगाच राहणार नाहीत, इकडील तिकडे तिकडील इकडे संशय घालितील, लटिके मनसबे उठवितील या करितां नवाबांनी दानाई केली.

—पुरं द. भाग ३ पृ. ८०

ही दानाई ईश्वरानें ज्यास बक्षीस केली त्याचे सखूनाची पास ठेवणें लाजीम.

—राजवाडे ५ पृ. ८६

हे गोष्ट करणें दानाई व दूरंदेशी पासोन दूर आहे.

—राजवाडे २२ पृ. ३१

४ इकडील तिकडे तिकडील इकडे संशय घालितील लटके मनसबे उठवितील याजकरितां रुकनुदौलानी दानाई केली.

—पुरं. द. भाग ३ पृष्ठ ८०

५ (आणखी अवतरणासाठीं 'आजुमुदाकार' पाहा)

—पुणें अखबार भाग १ पृ. १०

दानारयासी— (?) दानारहासी, दानारहासी–सचोटीची वागणूक रहा–मार्ग, वर्तन.

इसानुद्दौला याचे दानारयासीचे अर्थ दिवाकरपंत दादा यांनीं लिहिलें ते कळले.

—नाग १ पृ. २०८

दाब—संधी.

दरम्यान गुजराथ राहिली आहे, हेहि हस्तगत जाली म्हणजे दक्षणेमध्यें

दुसरा कोण आहे ? प्रस्तुत दावही अनुकूल आहे.
—पे. द. ४० पृ. ४७

दावदूब, दाबादुबा— दमदाटी, जबरदस्ती.
१ पत्रें सरकारचीं काय आणलीं असतील तीं आधीं सुभाकडे दाखवावीं आणि सुभाचीं पत्रें घेऊन मग मौजे मजकुरास जावें तें सारें येकीकडे ठेऊन गावास जाऊन मुलास दावादुबाक रावी हें उत्तम नाहीं.
—चं. चू. द. पृ. १३६

२ येशवंतरायानीं ठेवीवद्दल सुभानजी बेडे यासीं दावदूब करून तगादा करीत होते. —ऐ, सं. सा. खं. ४ पृ. १३३

दावाच्या सिकमात, दाबाच्या सिक्क्यात—दावाच्या पोटीं.
ह्यास पेंच मोठा आहे इतकेही असून उणेपण दिसूं न देता दाबाच्या सिक्यांत चालवीत आहेत (सिक्का म्ह. मुद्रा, छाप, ठसा सिकम् म्ह. पोट)
—नाग २ पृ. ९६

दाबावर टाकणें—दाव आणणें, पेंचांत पाडणें.
सांप्रत नवाबांनीं फिरंग्याशी स्नेह करून माघे फिरल्याचें वर्तमान ऐकल्यानंतर श्रीमंतांनीं दावावर काम टाकलें आहे व नवाबास कळविलें कीं मदगिरी वगैरे किल्ले आम्ही सोडीत नाहीं.
—पुणें. अख. भाग २ पृ. १

दाम दवाम. (अ. दाम)—चिरायु असो. दवाम–अखंडित, दायम–शाश्वत.
दाम—सांपळा, जाळें.
दाम—एक तांब्याचें नाणें. अकबराच्या कारकीर्दींत ४० दामांचा रुपया होई तर औरंगजेबाचे कारकीर्दीत ४६$\frac{1}{3}$ दामांचा. मराठी मुलखांत रोख किंवा नगदी पैसा असा अर्थ होई. —विल्सन
दाम इक्बालहु—त्याचें सुदैव दीर्घायू असो.
दवाम यक्बालहु व इज्लालहू. —(इ. म. ६५)
(त्याचें सुदैव व वैभव हीं चिरायु असोत.)
दाम एख्लासहू—त्याचा विश्वासूपणा, स्नेह चिरायु असो.
—राजवाडे १५ पृ. १५२

दाम दबाव—दावदबाव.
किल्ल्याची वगैरे मजबुती असावी. सध्यांचा प्रसंग रक्षण होऊन दामदबाव राही तें जाले पाहिजे. —ऐ. ले. सं. ७०६०
दामदस्त—१ पैकाअडका, सामानसुमान. २ झाडून सर्व.
१ आपले बुणगे दामदस्त राहुटी पालपडदे बेलबाधी या कांहींएक न ठेवतां एक बिचोवा पलंग मात्र ठेविला. —इ. सं. हो. कै. पृ. १४

३ इतक्यांत सुभेदार घोड्यावरून पालखींत येताच फौज दामदस्त पळाली
—हो. कै. पृ. ३४

दामदाम—दामन्‌दाम, पैन् पै, झाडून सर्व.
खिजमतगारानें मसाला वगैरे जो यैवज घेतला असेल तो दामदाम त्याचा त्यास परतोन देवऊं. —पेठेदप्तर भाग २ पृ. ४१

दाम दौलतहू—त्याचे राज्य चिरायु असो.
अजमखान, वालाशान, बुलंदमकान याकूदखानी, दामदौलतहू.
—वै. ४ स. १७८२ पृ. २०

दामनगीर—वस्त्र धरून ठेवणारा, दावेदार.

दाम मुलूक हू—त्याचें राज्य चिरायु असो.

दामाशाई—समसमान विभागणी किंवा एखाद्या रकमेचे समान हिस्से पाडणें.
१ कोणी दामाशा नांवाचा पूर्वी होऊन गेला त्यानें दिवाळें निघाल्यावर आपली सर्व मालमत्ता आपल्या सावकारांत समसमान वाटून दिली. त्यावरून हा वाक्‌प्रयोग आला म्हणतात. —विल्सन.
२ मागील कर्ज पुण्यांत पांचहजार घेतले तें व दामासी मागील कर्च आहे. त्यामध्यें देऊं म्हणून अभय दिल्हे. —पे. द. १३ पृ. २५
३ पांच हजार रुपये रोजमरा पाठविला त्यास पावणा महिना दामाशाई लोकास बसली असा विचार आहे. --पे. द. ३० पृ. २०४

दामोदर मंडळी—पैकेवाले सावकार लौक.
या मंत्रांत दामोदर मंडळीच फार करून आहे. नांवें लिहितां न येत. पुरता पत्ताहि पाहिजे. मागाहून लिहून पाठवूं.
—ऐ. ले. सं. २९५४

दाय—पेशा, धंदा.
त्या दिवसापासून विठ्ठल शिवदेवांनीं महाराजांचे सन्निध स्वारीशिकारींत शिपाईगिरीचेच दायानें कृपा संपादिली.
--विठ्ठल शिवदेव विंचूरकर बखर पृ. १

दायते—देणगी, देकार, बक्षीस, काम करून देण्याबद्दल घेतलेला लाच किंवा दरबारखर्च.
१खर्च कमी होत नाहीं ऐसे बोलणें पडले तेव्हा बाबाजी यास आणोन त्याचे हातून सरकारवाड्यात काम करण्याचा सिलसिला चालू केला. ते काली दायते चालत होते. पुढे हफीस प्रकर्णें त्यास धरले. त्याजवळ सिताराम बावाचीं पत्रें सापडलीं. त्यास हेफस केद केला व दायते बंद केले.
—शा. द. वे. पृ ९१

२ सन सीत अखेर दरोबस्त वर्षासन दायती वगैरे मखलाशासुद्धा करून द्यावे. —शा.द. वे. पृ. १८६

दायम—शाश्वत.

दायमदार—पक्का करार, पक्का दारमदार.

रास्ते याचे मार्फतीने दाईमदार ठरवून परस्परे दोस्तीचा विचार घडविला.
—भा. व. है. टि. यां. कै. पृ. २

दायरा, दायिरा—१ गोल घेरा, चक्कर. वर्तुळ २ मठ, धर्मशाळा ३ समाधि, कबर ४ एक चर्मवाद्य, टिमकी.

दायरा रणदुल्लाखान मु॥ कसबे रहिमतपूर प्रांत वाई येथे आहे ते जागा कंदोरी, दिवाबत्ती, उदफूल चालले पाहिजे.
—मा. स. प. मा. पृ. ८९

नवाबाचा कूच होऊन तुबाडचा अलीकडील पीराचा दायिरा आहे. तेथे मुक्काम होईल. —पे. द. १४ पृ. ६६

दाया—दावा, हक्क, अधिकार, जोरा.

तो आता परराज्यांत गेल्यावरी आपला दाया त्याजवरी कसा चालेल? शहाजीस घालवोन तुम्ही दौलत बुडविली !
—शि. प्र. ब. पृ. ४७

दायेउपाये—युक्तिवाद, रदबदल.

त्यानी यैसे मर्ईदपणाचे भाषण केले आम्ही दायेउपाये उदंड करणे ते केले परंतु त्याचा सेवटवर हेच गोष्ट जाहली.
—पे. द. ३३ पृ. ६४८

दायेमुद्दे—मुद्द्यानिशीं.

जितकी स्वारी येसाजी विठोजी करीत त्यास ते दोघे सामील होत म्हणून दायेमुद्दे खरे जाले. तेहि आपले त्तोंडें कबूल जाले.
—ऐ. ले. पा. स्यु. प्र. पृ. १९०

दार—घर, मकान, खाना.

दार—उज—जफर—विजयगृह.

दार—उल्—मुल्क—राजधानी.

दारकोंड करणे—घरांतील माणसांस तसदी देण्याकरितां दारांत बसून त्यांचें आंतबाहेर जाणें येणें बंद करणें.

जाऊन दारकोंड करून बाहेर काढा; दुराई द्या.
—ऐ. ले. सं. ११६

२ त्याचो दारकोंड करून ठाणी घेतली जातील.
—पे. द. २८ पृ. २३०

दारचिनी—दालचिनी.

दारद—धारण करतो.

दारबान— घरवाला.

दारमदार—करारमदार, आणशपथ.

१ येसाजी सिंद्याचा दार मदार न आला तर आम्ही कैस निघावें. ?

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ८

२ स्वामीसी कोणेही प्रकारें बिघाड न करावा व होऊं न द्यावा. दार मदारानें चालावें. —राजवाडे १ पृ. १९

दारवटा—उंबरा; उंबरठ्याखालची जमीन.

बाजाराचे रोजी रात्री येऊन कोटाचें दिंडीचा दारवटा खणोन उघडिला. इतकियामधे रजपुताची चौकी होती त्यामधे एक रजपूत जागा झाला त्यानें गुल केला. —शि. च. सा. खं. ५ पृ. ९६

दारुलजफर—उर्फ विजापूर.

(१)—शि. च. सा. खं. ५ पृ. ६.

(२)—भा. व. दक्षण देशचा भूगोल पृ. ३,

दारू (?) एकाची पारू दोन (?)—दारू म्ह. लाकड त्यावरून एका लाकडाची दोन लाकडे होतील अशी दुर्दशा असा अर्थ कीं काय ?

दरमियानें बंधूचा पेच व करांडे वगैरे पंध्रा हजार फौज चालून आली घरगत पेच काय लिहावे? आपणांस सर्व ठाऊक आहे. दोन हजार फौजेवर पंध्रा हजार फौजेनें उठावें तेथें पराक्रमाची रीत नाहीं. येकाची दारू दोन. हें यैसें असतां श्रीकृपें जे जालें तें जाले. —नाग १ पृ.२

दारू—औषध (जसे दारू हळद म्ह. औषधी हळद)

—रा. व्य. को.

दारूचे खडे किंवा खंडे—दारू भरलेलें गाडगें; हुक्का.

किल्ल्यावरोन दारूचे खडे करून जयरामपंताचें माडीवर टाकले तेणेकरून घर पेटोन येकच गडबड जाली.

—भा. इ. सं. त्रै. व. ८ अं. ३ पृ. १६१

दारूफुलसरा—शराव; मोहाची दारू.

फिरंगी गोरे व किरस्ताव जदीद . . . यास दारूफुलसरा नेहमी पाहिजे. . . . आपले खपापुरती भट्टी लाऊन दारू करितील त्यास करूं देणें.

—वाड स. मा. २ पृ. ३००

दारूशिसा—दारू आणि शिसे इत्यापि लष्करी मालाचें, दारूगोळ्याचें कोठार.

—विलसन

दारें धरणें—दारें लावणें

त्यावर आम्ही दारें धरून एकांती बैसऊन चार गोष्टी सांगितल्या मग तेही आमचे मायेत आले.

—पुरं. द. भाग. १ पृष्ठ ५०

दारोगगी; दारोगी—दारोग्याचें काम; आधिपत्य.

नजीबखानास तोफखान्याची दारोगी सांगावी.

—राजवाडे ६ पृ. ४८३

दाल—दोन बोटें रुंदीचा सुती अगर रेशमी कांठ. किनार, फीत.

पुण्याहून सामान पालख्यांचें, दोरण्या, मुलामे, कोर, दाल, पिंजरीचे गोप व राजगोंडे, इलाखे व सांगचें सामान पाठविलें आहे.

—ऐ. ले. सं. ९३५

दाल किंवा डाळ गळणें—डाळ शिजणें; मात्रा चालणें.

खुमानसिंग व परणेवाला कलींजरगडासी भांडत होते. तेथें दाल गळली नाहीं. —म. शि. यां. का. पृ. ५७७

दालदी—समुद्र किनाऱ्यावरील कोळीभंडाऱ्यासारखी आरमारी जात.

यैसीयास बंदरमजकुरीं दालदी आसामी सदतीस आहेत.

—पे. द. ३४ पृ. ७८

दालभ्य—' बकदालभ्य '. त्यावरून बगाजीपंतासाठी योजिलेलें सांकेतिक नांव.

दालभ्यास पाठवूं नये विश्वासही धरूं नये.

—ऐ. ले. सं. ११२

दाला—मू. शब्द दाल म्ह. १ परडी, टोपलें. २ रतीब.

यादी उंट रवानगी चारणी मौजे बऱ्हाणपूर नगद.

२ चाचणी.

१ कांदे.

२ सारवान दरमहा इ ॥ त ॥ दरमहा उंटास दाला करून देवणें.

—वै. ४ स. १७४२ पृ. १४ व १५

(एकाद्यास) दाली बांधणें—एखाद्याच्या कमरपट्ट्यास तरवार अडकवणें म्ह. एखाद्यास हातीं धरणें; त्यास उमेदवार करणें; त्यास नोकरींत शिपाई म्हणून घेणे किंवा त्याचा अंगीकार करणें.

१ तेथे आल्यावरी समक्षान्वये, चार गोष्टी मनांत आहेत त्या बोलोन, आपल्या वडिलानी (आम्हास) दाली बांधली, ते तुमची तुम्हाजवळी सोडून ठेवावी आणि आपली आज्ञा घेऊन, जे स्थळीं राहावयास सांगाल ते स्थळी राहूं. —इ. सं. पे. द. स. प. मा. पृ. १८०

२ जे वेळेस हा पिंड पैदा जाहला तत्समई महाराजांनीं आपणांस दाली बांधली.

—पे. द. २६ पृ. १९७

३ मुजफरखान दोन घटका बोलत होता कीं नानासाहेबानीं आपला गौर करून दाली बांधविली तरच करावी. नाहींतर चाकरी करणेच नाहीं.

—पे. द. २८ पृ. १६६

(एखाद्यावर) दाली बांधणें- –एखाद्याशीं शत्रुत्व किंवा वैर पुकारणें.

दाव्याची चिठ्ठी बांधणें—पूर्वी एखाद्याचा वादांत मनासारखा निकाल झाला नाहीं म्हणजे तो दावेकरी बने व वेशीवर किंवा गावच्या देवाच्या गळयांत आपल्या गाऱ्हाण्याची चिठी लिहून बांधी व उघड बंडखोर बनून गावकऱ्याचे मारे करू लागे.

पवाडी दिग्रजकर यानें बाहेर जाऊन दाव्याची चिठ्ठी बांधली. सबब मोकळा. पोटास घरचें.

—ऐ. ले. सं. ३७२४

दाव—संधि; डाव; कारस्थान; फितूर, सवड.

१ या समयांत दाव साधेल, पुढें यैसा समय सापडणार नाहीं.

—पे. द. २५ पृ. २८

२ त्याणीं सुप्रवृत्तीनें सलूख चालविला, तर उत्तम. नाहींतर जसा दाव बनेल तसे करूं.

--पे. द. १४ पृ. ३७

३ सिदोजी थोरातास तुम्हीही अंतस्ते लिहिणें (कीं) तजविजेनेच दाव करून जागा जागा केले न चाले ते करावे.

—ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ १९

दाव,—हक्क, हक्कदाव.

पाटिलकीचें वतन शंकराजी मजकुराचे दुमाले करणें . . . बाजे कायदा जो काये पुरातन चालिला असेल तो दाव याचे वंशपरंपरेनें चालविणें.

—शि. च. सा. खं. २ पृ. २८२

दावगिरीनें—सावधगिरीनें; दूरदृष्टीनें.

गाढे हिंमतीने सर्व येकविचार होऊन गाईकवाडास जरब देणे हे कार्य तुमचे फौजेस अगाध नाही. तथापि (गाइकवाड) अश्रियास राहिला आहे. हरयेक काम दावगिरीनें केलिया उत्तम.

—पुरं. द. भाग १ पृ. २५६

दावघाव—घावदाव, हुलकावण्या. शब्दांच्या व्युत्क्रमाचें उदाहरण. घावदाव उलट दावघाव.

वाफगांत्री मनसबे आमचे बंदोबस्ताचे मनस्वी करून दावघावहि दाखवि-तात.

—म. शि. यां. का. पृ. २१२

दावण—१ वस्त्राचा घोळ; फेर; २ डोंगराची बाजू.
जिना उतरूं लागले. श्रीमंतांच्या झग्याची दावण मागले पायरीवर पडली
—ह. ब. २६.

दावण वाहणे—बळी देणें.
बायकोनें नवस पुत्रासाठी केला होता कीं बकरियाची दावण तुजपुढे वाहीन आणि वाघजाई ! मजला लेक दे, म्हणून नवस बोलोन, घट येक वरीस बैसविला होता. —पे. द.

दावनगीर—दावेदार.
तुमचा दावनगीर होईल. —जो. रा. ८३

दावा—मागणी; फिर्याद; भांडण; वैर; हल्ला.

दावा लावणे—शत्रुत्व पुकारणें. भांडणे, फिर्याद गुदरणें. उभा दावा—खडें वैर. **दुस्मान दावा**—कट्टे वैर.
१ राजे आपलें इमान राखून ऐवज आदा करितील तरी व्याजाचा दावा करणार नाहीं. —साने प. या. व. ४००
२ बळकट झाले म्हणजे . . . दावे दरवडे करावे.
—म. रा. आ. २३

दावा—संधि, स्वार्थाची संधि.
दादाही लबाड आहे. जेंव्हा आपला दावा पाहील तेव्हां चुकणार नाही.
—पुरं. द. भाग ३ पृ. ५९

दावा—(?)
पुढें खासा शाहिस्तेखानाचे डेरियापाशीं पावले त्या डेरेत बायका व खोजे व दावा व उडदा वेगणी ऐसा समुदाय स्त्रियांचा होता.
—चित्र. ४३

दावा घेणें—दावा उगवणें, सूड घेणें, उसने फेडणें.
आम्हास फोडून तुम्हास तोडावे, तुम्हास फोडून आम्हास तोडावे हे मनसुबा आहे. नासरजंगास मारिल्यास हिदायत मोहिदिनखानास मारील अनवरदीखानास मारिल्यास चंदास मारून दावा घेईल.
—E. M. P. पृ. ९५

दावा दरफडा—वाद, दमदाटी, जबरदस्ती.
वरचील वडीलपण कुलबाब तुमचे दुंबाला केले असे लेकराचे लेकरी खाऊन सुखे असणें यासी दावादरफडा वा दिवाणमुल हरयेक अमल जहाली यकास येक मदती होवा हे लिहिले सही.
—शि. च. सा. खंड ५ पृष्ठ १६२

दावाधका—दावा दंड, दाव्याचा धोका.

आम्ही राजी होऊन सदरहू पैका घेतला मातुश्री जिऊबाईसीही कांहीं दावाधका राहिला नाहीं. —पुरं. द. भाग १ पृ. ९७

दावेकरी—जुन्या काळी एखाद्याचें कोणाशीं भांडण झालें म्हणजे त्यानें गांवकऱ्यांकडे दाद मागावयाची. ती त्याच्या मनाप्रमाणें मिळाली नाहीं म्हणजे त्यानें जवळच कोठें परहद्द असेल तेथें जावें व तेथील आश्रयानें आपल्या गांवावर दरवडे घालावे, त्रास द्यावा. वाद लागेपर्यंत किंवा त्याची हौस पुरेपर्यंत त्यानें हा उपद्रव चालू ठेवावा, अशा इसमास दावेकरी म्हणत. दावा उगवणें हा वाक्प्रचार त्याचाच द्योतक होय.

मिरजेच्या गिर्दनवाईची खेडी लुटतात, गुरें वळवून नेतात. दावेकरी तितके मुकुंद श्रीपतीनें ठेविले आहेत. —ऐ. ले. सं. ८३३

दावेकरी, दावेखोर दावेदार—१ मागणी करणारा; २ धनको; ३ शत्रु.

चहूं पातशहाचे आपण दावेदार. —सभासद ४५

दाश्तन—धारण करणें.

दाश्तह बाशद—धारण केलेलें असावें.

दाश्तह शुदह बूद—धारण केलेला होता.

दाश्ना—कटयारीचा एक प्रकार.

दास्त—निगा. तजवीज; उपचार; शुश्रूषा; सांभाळ; निगादास्त.

शिवरामराव यांच्या तोंडावर जखम भारी आहे. तबीब लावून जखमा बांधविल्या. जखमांची दास्त लष्करांत न होय म्हणून वंकापुरीं पाठविले आहेत. —ऐ. ले. सं. २८३२

कबुतरे जासूदजोडीसमागमे सुरक्षित प्रविष्ट होणार नाहीं याजकरितां आमानुल्ला बेगाजवळोन येक मनुष्य जनावराची दास्त करी यैसा नेमून सत्वरच रवाना करितो. —पे. द. २८ पृ. ३५

यानंतर हत्तीचें वर्तमान तरी महाराजांचें कृपेकरून बरा जाला दास्त बहुत केली. आणखी पंधरा दिवसांत चालेसा होईल. —पे. द. १४ पृ. ५०

दास्तन, दास्तान—धान्याचा सांठा किंवा कोठार, सांठवणूक.

१ गल्ल्याचे खरेदीस ऐवज देविला होता. त्यापैकी ऐवज आला काय, गल्लला खरेदी केला काय, सिंहीगडी दास्तन जाले आहे काय तो हिशेब तपशीलवार लेहोन पाठविणें. —पे. द. ७ पृ. २८

२ किल्लें मजकूरचे दास्तानपैकी गल्लला फरोक्त केला. —पे. द. ३० पृ. ८७

३ गल्ला खरीदी करतो आणि किल्ले किल्ला दास्तानू करीतो आणि बाकी राहील तो कल्याणास येतो. —पे. द. ३४ पृ. ६१

४ सरकारचे दास्तानापैकी तूर्त गोळे काय फर्मास येतील हे द्यावयाची आज्ञा झाली पाहिजे. खरे १२ पृ. ६२४४

५ नख्त नाणें व गल्लेचे दास्तान वगैरा जिन्नस.

—चित्रगुप्त ३५

६ जिन्नस फरोक्त करणें; जर किमतीस फारच अज्मासे तोटा येऊ लागल्यास दास्तान करून ठेवणें. —राजवाडे १२ पृ. १३३

दास्तानदार—कोठावळा; कोठारी.

दासनी दाण्णी-दास्वनी—The show flower (जास्वनचा अपभ्रंश)

दाण्णीकाम—फुलांची वेलबुट्टी काढण्याचें किंवा रंगविण्याचें काम.

चितारी व बण्णीकामावरी (दाण्णी पाहिजे मो. वा. चूक) माधवराव कारकून होता त्यानें चोरी केली वर्ख चोरिले म्हणोन त्यास दूर केला. —पे. द.

दासबगल—गुलामासारखें मजुरीकाम.

मराठे लोक कोसावरून मेढा आणणार नाहींत व दासबगल करीत नाहींत याकरितां ५०० माणूस चांगले मारफाती दिले पाहिजे म्हणजे दुसरे रोजी दरवाजा पाणकोट पाडितो.

—पे. द. १६ पृ. १०६

दासरी, दासैया—द. हिंदुस्थानांतील एक वैष्णवपंथी भिकारी.

—विल्सन

दाहिजा—दहावा हिस्सा.

सरकारांतून सरंजामावर दाहिजा एकसाल घेण्याविषीं पत्रें आलीं.

—ऐ. ले. सं २४५४

दाही—द्वाही.

येसी गोष्ट झाली तेच दिवसी जाणोजी वगैरे सरदार मिळोन निजामअल्लीखानास मिरवत नेऊन सेहेरात (औरंगाबाद) त्याचें वाड्यांत नेऊन बसविले दाही नवाब निजामअल्ली खानाची फिरली.

—स. ब. पृ. २७

दिक्; दिक्क—क्षीण; त्रस्त; खप्पा; अगत्य, काळजी; परवा; भीड; गरज अडथळा. संशय, स्थीत, विचार, दरकार.

१ हगवणीनें दिक्क झाले आहेत. —खरे १० पृ. ५२७३

२ खुशीच्या तोफा सोडल्या; परंतु अंतर्यामीं नवाब बहुत दिक्क व विचारांत. —राजवाडे ५ पृ. १६२

४ वयनींची मर्जी खर्चाची वोढ पडल्यामुळें दिक्क आहे.

—खरे ११ पृ. ५३४३

४ येथे दिक्क कोठें आहे ! राज्य बुडतें ही काळजी कोठें आहे !

—खरे १० पृ. ५३४३

५ आज शिंदे बहुत वाढले आहेत कांहीं दिक्क राहिली नाहीं. तर शिंदे यास जबर बसे असा मन्सबा योजिला आहे.

—खरे १० पृ. ५३४४

६ येथें कांहीं दिक्क राहिला नाहीं. जो बळी तो मारतो, ऐसें घडलें आहे.

—ऐ. ले. सं. ६५१५

७ भाऊंस पांच असामीनीं वार टाकिले. तोंडावर तों बाकी तिळमात्र जागा राहिली नव्हती. सर्वांस दिक्क नाहीं.

—ऐ. ले. सं. ६०८८

दिक्कत—सूक्ष्म दोष; शंका; अडचण; तंगी; हर्कत; आक्षेप.

१ इंग्रज दोनी दौलतींत (निजामाच्या व पेशव्याच्या) पाय घालतात. यांत दिक्कत नाहीं.

—खरे १२ पृ. ६८३४

२ नसती दिक्कत घेऊन कथळे करूं लागले.

—राजवाडे ३ पृ. १५५

३ खजाना देतात परंतु थोडकीसी दिक्कत आहे....येथें खजानियांत पैका नाहीं.

—राजवाडे १ पृ. २६

४ पाण्याचे दिकतीनें आणि उष्णकाळ भारी म्हणून आठशें माणसें मृत्यु पावली.

—दि. म. रा. २ पृ. ८७

५ सरंजामाची वहिवाट मशारनिल्हे करीत असतां दरम्यान कृष्णाजी थोरात यांणीं नवीन दिक्कत करून सरंजामाची वहिवाट आपणच करूं लागले.

—ऐ. ले. सं. ५६९७

६ सातारियाचे संभाजीरायास पत्र पाठविले ते दिकतीचे जाणून आमचा विश्वास नाही या भावे लिहिले.

—पुरं. द. भा. ३ पृष्ठ २

दिकभाव—नाखुषी, रुष्टता.

आपण येण्याविषयी वगैरे कामकाजाचीं पत्रें आपण लिहीतात. त्यांत रुक्ष प्रकार कठोर शब्द येतात त्याजवरून दिकभाव येथें फार होतो.

—पुरं. द. भाग ३ पृ. ८८

दिक् हर्कत—अडथळा.

हे करून दिले इनामती कोणी दिकहर्कत करणें निस्बत नाहीं.

—राजवाडे ३ पृ. ५०२

दिखाऊन राहणें--दिक् खाऊन राहणें. दिक्-संशय, तर्क. भीति, शरम.
श्रीमंत नानासाहेब मनांत आणितील कीं आम्ही निरोप सांगोन पाठविला परंतु दत्ताजीनें न बोलतांच दिखाऊन राहिला म्हणून उत्तर आलें नाही, ऐसें होईल.
---नाग २ पृ. ५५

दिखावा—दिखाई; देखावा; फसवणूक.
गोकाकच्या बारीनें कांहीं फौजा मुद्दाम पुढें दिखाव्यास पाठविल्या आहेत.
—ऐ. ले. सं. ५९४८

दिगर-—अन्य, आणखी. भलते, उलटा, विरुद्ध.
१ अजम गंगाधरशास्त्री पटवर्धन हुनराबल कंपनी सरकारचे विश्वासू कामदार यांचे खैरखाईवर नजर देऊन माहाराजाही इनाम गांव व बक्षीस दिगर याविसीचा मजमून लिहिला तो सविस्तर ध्यानास आला.
—शा. द. बे. पृ. ५

२ गोखले कित्तूर ताल्लुक्यांतून परगणें मजकुरीं मारेहाळानजीक बेकरीवर उतरले आहेत. परगणे मजकुरीं दिगरगांवांस परभारें चिठ्ठ्या केल्या आहेत. गुदस्तां भाऊसाहेबांस पैका दिला तितका देणें म्हणतात.
-- ऐ. ले. सं. ६२५०

३ मध्यें कोणी जो दिगर करील त्यास तम्बी करू.
—राजवाडे १ पृ. ४८

४ बाद कर्नेल गाडर यांचें बोलणें व नजर पहिली राहिली नाहीं ! जबाब दिगर, सवाल दिगर (—प्रश्न एक उत्तर भलते) करूं लागले.
—खरे ७ पृ. ३५७४

५ तरी हे भाऊकडील सरंजामी गांवाचा बंदोबस्त करतील; आपणाकडून येविशी दिगर जाबसाल नसावा.
—खरे ११ पृ. ५६५४

६ चौघांत कबूल होऊन जाधवच आतां दिगर बोलतात. आम्हास मूल दिली ती दुसरियास देतो असें बोलतात याचा आम्ही विचार न केला तर नामुरादी (नामर्दी) येती.
—शि. प्र. ब. पृ. २२.

दिगर जान—जिवश्चकंठश्च; जानी.

दिगरबाद—१ अवांतर, २ दिगर बंदे—अवतर सेवक.
—इ. म. १९९

१ झुंज होऊन मोंगल मोडिले. नबाब वीर हसनखान कोका जखमी जाला २ दिगरबादे चौकी पादशहाचे अडीच-तीनशें मेले.
--ब्र. च. पृ. २६

दिडकी—दीडदुगाणीच्या किंमतीचें एक क्षुद्र नाणें.
—विल्सन

दिदवान—पहारेकरी.
दिदबानी हर्कारे—टेहळणी करणारे जासूद.

—इ. म. १०

दिदार--१ मुलाखत, २ चेहरा.
दिन इमान—धर्म.
त्याचे दिन इमान सुटले तेव्हां त्यास कमवकती आली.

--म. शि. यां. का. पृ. १६७

दिनचर्या—ऐकीव; लोकवार्ता, जनचर्चा.
त्यास आतां झाडून मुत्सद्दी सरकारचे किल्ल्यांत असावें यैसे पाटीलबावा बोलतात. समक्ष यैकीले नाहीं. दिनचर्या यैकतो.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ४६

दिनचर्या--कालक्रमणा, मुक्काम, उपजीविका.
वडीलपणें ममतापुरस्कर बंदोबस्त करून देतील या अर्थें घाटमाथा आठ महिनेपर्यंत दिनचर्या करणें प्राप्त जाहाले होते.

—पे. द. २० पृ. ८६

दिनचर्येवर घालणें—दिरंगाईवर टाकणें. दिनावधीवर टाकणें.
चंदावरकरानीं दिनचर्येवर घालून दगा केला.

--पे. द. २८ पृ. ७४

दिनचा पाय—अरबांचा फितूर, (दिन म्ह. लक्षणेनें मुसलमान, अरब.)
आपण त्यास बोलिलो कीं दिनचा पाय येथें आला आहे तुम्ही भेटीस येणें. याप्रमाणें त्या अरबानें सांगितले. त्यावरून त्याची गर्दन मारिली.

—पे. द. ३४ पृ. ४४

दिन दुनिया नजरेंत नसणें--बेगुमांन, बेफिकीर असणें, कशाचीहि पर्वा नसणें,
अथणी त्यांणीं घेतली म्हणून खबर आहे. आजीकालीं त्यांच्या नजरेंत दिन दुनिया नाहीं.

—ऐ. ले. सं. ३४१

दिनप्रतीनें—दिवसेंदिवस.
दुसरे दिवशीं अभय दिले असताहि गांवावरी हल्ला केली. पुन्हा छ १७ साबानीं नांदणी समीप युद्ध जाहाले. दिनप्रतीनें हाच प्रसंग दिसत आहे.

—पे. द. ११ पृ. ३९

दिनमार्ग—'डेनमार्क' चा अपभ्रंश.
राजे याजकडील जहाजे होती ती जागजागा तिकडील शहरे फौरगीत् नेमेतला व विदेज (वलंदेज) व फरासीस (फ्रेंच) दिनमार्ग (डेनमार्क) किलेतान (?) इंग्रज असे २२ पातशाही पाणियात आहेत त्यांची शहरे दरयाकिनारेची मारूं लागले.

—म. द. रु. १ पृ. ७१

दिनमेक दिनमेकता—दिरंग, दिरंगाई, वेळ लावणें.

१ त्वरा करावयाविशी कितीक लिहिले ते तुम्ही दिनमेक होऊं देता ऐसे नाहीं. या उपरी स्वार होऊन दर्शनास येणे.

—मरा. कु. इ. भा. १ पृ. ८२

२ अशा तीन चार प्रसंगांमुळें एकास एक व्यवधान पडून गोष्ट दिनमेकावर आली. नहोन बसल्यास जागा हस्तगत करावी तरीच सर्वांचा कर्तेपणाचा ठसा. —ऐ. ले. सं. १७१३

३ यैवजास दिनमेक न व्हावा. —पे. द. २८ पृ. ३२८

४ त्यास तीन महिन्यांची मुदत होती, परस्पर निरोप पट्टणच्या मार्गाहोन जाल्यानंतर मुदतीस दिनमेकता लागली. —ऐ. ले. सं. ४७६१

दिन मोताद--भविष्यकथन ?

सालगुदस्तां पंढरीचे रखवालीस नबाब निजाम नवाजजंग बहादूर होते. ते समयीं त्यास युद्धविषयीं सरंजाम, महालमुलूख (जहागीर) होण्याचा दिनमोताद व राजकीय विचार वगैरे कलमबंदीवार लिहून दिल्हे होते, त्या दिनमोतादीस सर्व त्यांस परंडा, नळदुर्ग वगैरे ५-६ लक्षांचा सरंजाम जाला. —ऐ. ले. सं. ६४८२

दिनार—१ एक जुनें रुप्याचें नाणें.

२ हें सोन्याचेंहि असें. त्यावेळीं त्याला 'दिनार सुर्ख असें म्हणत.' दिनार-सुर्ख' याचा अर्थ लाल दिनार. —विलसन

दिनेक—दिवसगत.

दिनेक लागून मागती निश्चयहि नाहीं. —पे. द. २८ पृ. २६६

दिपावत—जुलूम (?)

नंदराजानें किलेची रसद बंद करणेस्तव जावजा (ठिकठिकाणी) चौकी ठेवली आहे. पण हेहि किल्लेबाहेर निघोन रातवा करून स्वारांवरीं पडून रस्त किल्लेस घेऊन येताती. तोडमान, करवर जमीदारचे वकील किलेत आहेत. माणसावरी मोठा दिपावत करिताती.

—E. M. P. पृ १६६

दिपावणें--देवाला दिव्यानें ओवाळण्याचा पूजेचा एक प्रकार.

—विल्सन

दिभती बाद—?

किल्ला सरकारचा येका दिवसाची बेगमी नाहीं तेव्हां किल्लेकोटाचे काम यास्तव खर्च करणें मना केले त्याजवरून सेवकाचे निसबतीचे लोकसुद्धा दिभती बाद घालणे म्हणून याद झाली.

--ऐ. सं. सा. पृ. ३० ले. २२

दिम्मत; ; दिमत—जिम्मा; हवाला; तैनात; सेवा; स्वाधीन; निस्बत.
१ जे काय सालाबाद असेल ते निम्बकर गोसावी यास देविले असे. याचे दिमती करणें.
—राजवाडे १५ पृ. १७९
२ रघुनाथ यादव चित्रगुप्त दिमत राजमन्दिर.
—चित्रगुप्त १३०

दिमती; दिम्मतगार--संबंधी; दिमतीचा.
—वाड स. मा. १ पृ. ९८

दिमाख—गर्व; तोरा; डौल.
दियानत्—सच्चेपणा, द्यानत.
दिऱ्हा—इलाही गज. ३३ इंच लांबीचें परिमाण.
दिरंग; दिरंगाई—उशीर; विलंब; रेंगाळणी.
१ उजूर व दिरंग केलिया मुलाहिजा होणार नाहीं.
—राजवाडे १५ पृ. २२२
२ याजउपरी दिरंगाईखालीं घातल्यास संस्थान राहणें कठीण.
—पे द. स. मा. १९५
दिरम्—दोन आणे किमतीचें चांदीचें नाणें. वजन म्हणूनही दिरीम वापरीत (विल्सन)
सर्कारचा दामदिरम तफावत न करणें. —राजवाडे २० पृ. ३०२
दिरिंग—उशीर.
नवाबाच्या येण्यास दिरग लागला. —ऐ. ले. सं. १०३२
दिलआरामी; दिलारामी—खुशाली; आनंद; सन्तर्पण.
तुम्ही आपली खुशखबर लिहून दिलआरामी करीत जाणें.
—राजवाडे २२ पृ. ६५
दिलखा— यथास्थित.
तुम्ही व राव पंतप्रधान खातर्जमेनें दिलखा तदारूक अमलांत आणावा.
--दि. म. रा. १ पृ. ७
दिल्जमीयत—खातर्जमा; समाधान; निःसंशयता.
तर मोहीबी दिल्जमीयतीनें.
दिल्जोई—सान्त्वन.
तुम्ही आमचे तर्फेनें यांचीं तशफ्फी व दिल्जोई करावी.
--राजवाडे २२ पृ. २५
दिल्ताजगी— हृदयानंददान.
१ आपलीं खैरखुशी कलमी करून दिल्ताजगी करीत असले पाहिजे.
—राजवाडे १० पृ. १६५

२ हमेशा किताबत पाठऊन दिलताजगी करणें दोस्तीचे जागा लाजम असे
—सानें प. या. व. ४९१

दिल्दर्या—उदारधी.
दिल्पाक दिल्दर्या इलाही मेहेर्बान खान.
—पारसनीस ब्र. प. ३०७

दिल्दार—सहृदय; उदार.
दिल्दारी—उत्तेजन; खातर्जमा.
संचणीचा वख्त आहे; तव्वा-दिल्दारी पाठवणें.
—राजवाडे १६ पृ. ३३

दिल्दिलासा—दिलासा, आधार, विश्वास, हुरूप.
१ दिलदिलासा देऊन. —चित्रगुप्त १३
२ दिलदिलासा होऊन. —चित्रगुप्त ४६
दिल्देही—उत्कटता.
कित्येक सर्दार कामकाजाविषयी दिल्हेही करीत नाहीं.
—राजवाडे ५ पृ. १५७

दिल्नशीन—पसंत, अवगत.
अज-राह-यगानगत दिल्नशीन जाले तें क़लमी केले असे.
—सानें प. या. व. ४६३

दिल्पाक—शुद्ध अंतःकरणाचा.
दिल्पाकी—दिल्खुलासा; निखालसता
आम्ही दिल्पाखीनें मशागत करून. —इ. म. ११
दिल्बर; दिल्भर—मनोहारक; दयित.
सुंदरा म्हणे दिलभरा, राजअंबिरा हसुनि मसि बोला जी.
—होनाजी बाळ १६९

दिलभरी—समाधान.
तमाम रयतेची दिलभरी करून लावणी होय ते करणें.
—राजवाडे १ पृ. ३४६

दिल—मन.
दिलकश—मनोहर.
दिलगर्मी—प्रेम, धीर.
सरकारांतून अंताजीपंतासमागमें नारो कृष्ण नामें मुजुमदार मोठे कामकर्ते माणूस होते; व आजपर्यंत त्यानी लढाई मारली व कधीही लांचवला (कचावला असा मूळ शब्द असावा मो. वा. चूक दिसतें.) नाहीं व अंताजीपंतास मोर्चात जाणें पडलें नाही. मोठे दिलगर्मीचा माणूस

जाणून जाटाने दहा जिल्हेजी मोर्चात निद्रिस्त असता दंगल करून सुरी पोटात घातली व जीवे मारिले. —हिं. द. खं. १ पृ. ६८

वहुत मेहेर्वानी व दिलगर्मी करून . . . कुशल वर्तमान पुसिले. —प. द. म. व. ७८

दिलतंग—दिलगीर, दुःखी, घमगिन्.

दिलनिसीन—मान्य, पसंत.

हे सलाह सखारामपंताची माधवराव यांस दिलनिसीन जाहली. —पुणें अखबार भाग १ पृ. १०५

दिलबरी—विश्वास, धीर, समाधान.

रयतेची दिलबरी बहुतसी केली. तेणेंकरून रयत स्तातव्य जाली. —पे. द. ३४ पृ. १०९

दिल वा दिल— रूढ अर्थ फार प्रचंड डेरा, त्याचा मराठी अपभ्रंश 'दलबादल' असा झालेला आहे. प्रथम दिलबादिल डेरा शहाजहाननें तयार केला. १७११ मध्ये बहादुरशाहानें लाहोरांत हा डेरा उभा करण्याचा हुकूम केला, तेव्हां एक महिनाभर पांचशें मेखची व सुतार खपत होते. या डेऱ्याला पन्नास हजार रुपये खर्च आला होता.

नाना फौज पाहताना थकले। दलबादल डेरे दिधले । नगारखाने झडू लागले। —ऐ. पो. के. १ पृ. १०८

दिलभरी करणें—विश्वास निर्माण करणें; उमेदवार करणें.

गोविंदराव येऊन कांही ऐवज घेऊन निमम्हा रोजमरा दिल्हा आणि लोकांची दिलभरी फार रीतींनी केली. —पे. द. २८ पृ. १६५

दिलावरी—शौर्य.

दिलासा करणें—दिलदारी करणें. हुरूप आणणें; विश्वास देणें. मन मिळवून घेणें.

आम्हांस कुली लोक सरदार जमा करून दिलासे दिलदारी करून या कार्यावर लोक घालवावे लागले. —पे. द. ३३ पृ. ४५

दिव्य—वाद तोडण्याचा व खऱ्या--खोटयाचा निर्णय करण्याचा एक जुना सर्वमान्य उपाय. दिव्यांचे अनेक प्रकार असत. उदा.

१ तुलादिव्य २ अग्निदिव्य ३ जलदिव्य ४ विषदिव्य ५ कोपदिव्य ६ तंडूलदिव्य ७ तप्तमाश दिव्य ८ फाळा दिव्य ९ धर्माधर्म दिव्य. वगैरे वगैरे. —विलसन

दिवस कडे लावणें—दिवस कंठणें, काळ घालविणे.

आपण समुदा (समदा, सर्व) जेन्म साहेबाच आश्रीयानं येजमानाकडे

सेवा करून दिवस कडे लाविले. सेवटी भगवंते यैसे केले उपाये नाहीं.
—चं चू. द. प. १५४

दिवस घेणें—दिवस कंठणें; कालनिर्वाह करणें.
सवाई माधवरावांच्या मृत्यूपर्यंत आम्ही पटवर्धन मंडळी साव होतों. आतां हें मंडल साव, आम्ही फितुरी ऐसें जाहलें! यांत दिवस घेणें हे चतुराईनें घेतले पाहिजेत.
—ऐ. ले. सं. ६६२५

दिवस थोडे होणें—मृत्यु येणें.
पातशाही बंदोबस्ताची कामें चित्तांत होती तो मजकूर तुम्हाजवळ सांगून रा. बाजीराव यांस लेहविला होता. व पातशाहीचा बंदोबस्त व्हावा हें गोष्ट ते (बाजीराव) चाहात असतां त्याजला दिवस थोडे जाहले.
—हिं. द. खंड १ पृष्ट १९

दिवाकीर्ती—न्हावी. शूद्र जातीचा मनुष्य.
न्हाव्याचें नांव रात्रीं उच्चारणें निषिद्ध समजत.
—विलसन

दिवाण दरबार—कोर्ट-कचेरी.
परंतु दिवाणाच्या बळानें न मानी याजला दिवाण दरबार केलीया वांचून वतन वगैरे साधत नाहीं तरी तुवां दिवाण दरबार करून वृत्ती साधणें-
—शि. च. सा. खं २ पृ. ३०२

दिवाणदस्त—सरकारास म्हणजे दिवाणांत द्यावयाचा कर.
वतनाची कमावीश करून या वतनास हक दिवाणदस्ताचे बेरिजेस दर-सदे १० दाहोतरा प्रमाणें अनुभऊन सुखरूप असणें.
—शि. च. सा. खं.५ पृ. १०३
—विलसन

दिवाण देणें—कोणताहि सरकारी कर किंवा सारा.
—विलसन

दिवाण पट्टी—सरकारनें ठरविलेला सारा.

दिवाण पाहणें—कोर्ट-कचेरी करणें; वाद कोर्टांत नेणे.
बापाचें पत्र साक्षी काढ्न दाखविले त्यांत तुझें नांव देखील नाहीं यामुळें दिवाण पाहणें प्राप्त झालें
—शि. प्र. ब. पृ. ४१

दिवाण राऊळ—कारभारी मंडळ राजमंडळ. दिवाण म्ह. कारभारी मंडळ; राऊळ म्ह. राजकुल; राजा व त्याचें कुटुंब.
वतनाची देखरेखी करून दिवाणराऊळ समजाऊन वतनबाबेचे हवक व इनाम व कानूबात जकाती विश्वा तुम्ही अनभऊन एकनिष्ठेने सेवा करीत जाणें.
—इच. सं. इ. पृ. ४

दिवाणी अदालत—दिवाणी खटल्यांचें कोर्ट.
—विलसन

दिष्टावा—देखावा.

मावळे व हशमी कोकणे लोक हेच युध्यास पुढें होताती. त्यांचें पाठीवर करनाटकी आहेत म्हणून दिष्टावा दाखविताती त्यास युद्धाचें प्रसंगी मागे गच्छन्ती करीताती! हेच मावळे लोक व कोकणें लोक युध्यास निभाव होताती. स्वामीचा नक्ष तों मावळे व कोकणे करिताती.

—पे. द. १६ पृ. ९८

दिस्ट—? (इष्ट ?)

त्यास त्याचे वचन हेंच कीं आधी मोठे नवाबाची नजर व पेशकस व आपले (दीस्ट दी व ई मोडीत सारखी दिसतात मो. वा. चूक ?) यैसी विले लावने. मग तुमचे कार्य करून देऊ.

—पे. द. १० पृ. ७९

दिसतासला—दिसत असला.

हुंड्या यावयाचा प्रकार तुम्हास दिसतासला तरी साफ लिहिणें.

—पे. द. २८ पृ.२६३

दिसाऊ—दिखाऊ; देखणें.

आज ५ दिवस मीं पावतारा (म्हणजें पायउतारा) हिंडत असतों; तर दुसरे घोडे धीट, दिसाऊ, चालणार, एसे आधीं पाठवावे.

—ऐ. ले. सं. ६६४७

दिवट्याचा सलाम—सायंकाळीं दिवेलागणीचे वेळीं नोकरलोकांनीं एकत्र येऊन मालकास द्यावयाची सलामी.

पंचगंगेवर स्वामी गेले. तेथें धनाजी जाधवराव यांणीं स्वामींस अर्ज केला जे वांई देश खराब जाला आहे. अवघे देशक बराबर आहे. यांशीं कौले वस्त्रें देऊन रवाना करणें. त्यांजवरून दिवट्याच्या सलामाच्या समई वस्त्रें सदरेस आणविलीं.

—रा. खं. ३ पृ. ६६

(ही दिवटीच्या सलामाची पद्धत आंग्र्याच्या दरबारांतहि होती. पुढें ती नानासाहेब पेशव्याच्या कारकीर्दीत पेशव्यांनीं आपल्या दरबारांत सुरू केली, असा एक उल्लेख सांपडतो)

दिवाळ—भिंत. **शिकंदराची दिवाळ**—अभेद्य तट.

१ येणेंकरून नवाबाचे वजनाचीही सचोटी वाढेल व स्नेहही कायम होईल. जैसी शिकंदराची दिवाळ

—ऐ. ले. सं.८७७

२ सुरुंगानें बुरूज मोठ्या बळानें उडाला. दोन्हीकडील तटांची दिवाळ भपकाऱ्यासरशी हादरून शिथील झाली.

—ऐ. ले. सं. १७०४

दिवालतोड—भिंती फोडणाऱ्या किंवा तट ढांसळणाऱ्या जबरदस्त तोफा.
देशाहून २ तोफा कोपळास व एक १८ शेर गोळचाची बदामीस आली होती. तिन्ही तोफा दिवालतोडीच्या.
—ऐ. ले. सं. ३१४८

दिढतर—दृढतर, पक्कें.
श्रीमंताचा निश्चय हाच की मोगलासी झुंजावे यश देता ईश्वर आहे ऐसा इत्यर्थ करोन तमाम सरदारांचे मनोधारण करतात ऐसा प्रसंग पडला आहे निदानी शत्रूस पाठ देता येत नाहीं ऐसे दिढतर करून इतकियात त्याजकडून सलामामलत जाली तर उत्तमच आहे.
—चं. चू. द. पृ. ७०

दिनचलती करणें--मुसलमान जमात दीन दीन अशा भयानक तालबद्ध गर्जना करतात त्यास दिनचलती म्हणतात.
तीनशे तोफा एकसमय दीनचलती केली ! (म्ह. दीन गाजविल्याप्रमाणें तोफांचा धडाका सुरु झाला.) --हो. कै. पृ. ६१

दिपोत्सव करणें—दिवाळें काढणें.
सराफ्यांमध्यें तों कोणाएकाचा भरंवसा राहिला नाहीं. मातबर दुकान असतें तें अकस्मात दीपोत्सव करितें, याप्रमाणें जालें आहे.
—ऐ. ले. सं. ४१६०

दीर्घ विचारणें--दूरवर विचार करणें.
खावंद लोकांनीं जे हल्लीं तेथें मंत्र सांगणार असतील त्यांसी दीर्घ विचारून जें करणें तें करावें. —रा. खं. ३ पृ. १२१

दिल करणें—एकविचार करणें.
इकडील कुल जमातदारानीं दिल केला जे आपण चालोन जाऊन शत्रूच्या लोकांवर पडून त्यांची जागा पाहून यावी.
--ऐ. ले. सं. ४४४१

दिलावर—धीर; शूर.
--प. द. म. व. ८५

दिलासा—सान्त्वन; उत्तेजन; आश्वासन; धीर.
१ दिलासा करून बरावर घेऊन जाणें. —सभासद १४
२ लोकांस दिलासा देऊन किल्ला रक्षावा.
—खरे १ पृ. २२७

दिली--मनाचा.
दिलेर—धैर्यवान; शूर.
दिलेरी—धैर्य; शौर्य.

दिलेरी रुस्तुमी--धैर्य; शौर्य.
शाबास तुमच्या हिमतीची व दिलेरी रुस्तुमीची.

—साने प. या. व. १४०

दिव्य उतरणें, दिव्यीं उतरणे--दिव्याच्या परीक्षेंत खरा ठरणें.
(अवतरणासाठीं 'दिव्यीं लागणे' शब्द पाहा)

—मा. स. प. मा. पृ. १३

दिव्य लागणें, दिव्यी लागणें—दिव्यांत नापास ठरणें परीक्षेंत खोटा ठरणें.
गोतास बोलाऊन हरदू महाराच्या पिशव्या काढून हात पाहिले भोसरीचा म्हार कान्हा दिव्य लागला. यादू महार याचे हात चखोट निघाले तो दिव्यी उतरला.

—मा. स. प. मा. पृ. १३

दिवसवड—दिवसवडा (पु.) एक दिवसाची मजुरी.
चौकीदारासी बहुत खाया पियास दिवसवड उदंड देऊन त्यास राजी ठेविले होते.

--पे. द. २८ पृ. १३८

दिवस होणें--बहुत दिवस होणें.
दिवस जाले. तुम्हाकडील वर्तमान कलत नाही तर यैसे न कीजें. हस्ताक्षर पत्र आलिया वार्तिकासमागमें लेहून पाठवावे.

--चं. चू. द. पृ. २००

दिवाण--राजसभा; मुख्य कचेरी, वसूल कचेरी; प्रधान.
१ थोर किमतीची वस्तभाव असल्यास दिवाणांत द्यावी.

—सभासद ४३

२ निपुत्रिकाचें मिरास ते दिवाणांचे.

--राजवाडे ८ पृ. ४९

दिवाणा—भुताटलेला; पिसा; वेडा; मूर्ख.

दिवाल; दिवार—भिंत, टोपीची उंची.
शहर पन्हाचे दिवाळनजीक मुक्काम केला.

—दि. म. रा. २ पृ. ९८

दिवाळ तोडी—भिंती किंवा तट तोडून पाडील अशी (तोफ).

--खरे ९ पृ. ४६८१

दिवाळ शिकंदर—शिकंदरानें बांधली असे समजतात अशी एक मोठी भक्कम भिंत.
व स्नेहही (नबाबाचा) कायम राहील जैशी शिकंदराची दिवाळ.

—खरे ८७७

दिवे लावणीचा कौल—उध्वस्त किंवा उजाड केलेला मुलूख पुन्हा लागवडीस आणि वसाहतीस आणण्यासाठीं तेथील लोकांना दिलेलें अभयपत्र किंवा जाहीरनामा.

नंतर दिवेलावणीचा कौल दिला तेव्हां कांहीं सुदरलें.
—हो. कै. पृ. १६७

दिसते पदार्थी—वस्तुस्थिति पाहता; पाहातार्थी.
याचें कारण काय ते पुर्तेपणी समजत नाहीं परंतु दिसते पदार्थी दिसते की इंग्रेज कांहीं दावावर आले होते तो दाव सावला नाहीं.
—नाग १ पृ. ८६

दिसोनदिवस--दिवसें दिवस, दिसंदिस.
१ त्यांचे जवानी इकडील लक्ष दिसोनदिवस तुमचा उत्कर्षाचा करण्याचा वगैरे सर्व ध्यानांत येईल. —राज० ८ पृ. ४
इथून अता प्रारंभ दिसोदिस अद्‌भुत प्रळयाला. —प्रभाकर

दीगर—दुसरा.

दीन—धर्म, इस्लाम धर्म.
हज्रतांनीं दीनचा पक्ष सोडून मऱ्हाठीयांचा पक्ष धरिला आहे हे गोष्ट मुसलमानीस ठीक नाहीं. --दि. म. रा. १ पृ. २६७

दीबाचह—प्रस्तावना.

दीवानियान--(अ) दीवानी, दिवाण.

दीवी येणें—देवी येणें.
सेनाधुरंधर यांच्या घरीं मुलास देवी आल्या आहेत. धाकटी सून बरी झाली देवी येऊन धाकटी कन्या ४।५ वर्षांची तिजला दीवीं येऊन पांच दिवस जाहाले हलक्याच आहेत. —नाग खं. २ पृ. २

दीन इमान—धर्म.
१ हिंदूंचें राज्य झालें त्या दिवसापासून आमचा दीन इमान सर्व बुडाला.
—दि. म. रा. २ पृ. ७९
२ दुहराऊन कौलकरार दीनइमानची शपतपूर्वक लिहितों की.
--राजवाडे १२ पृ. २५

दीन-दीन—मुसल्मानांची युद्धगर्जना.

दीन-दुनिया—अलम-दुनिया, सारें जग.
आतां हिम्मत धरणें हें अगत्य; तुम्ही शाबूत (सुरक्षित) तर दीनदुनियेचें भय नाहीं. —खरे १ पृ. १७०

दी-पेस्तर—उद्यां पुढें.
हें दीपेस्तर रोशन होईल. —इ. म. ६८

दील—हृदय, हिम्मत.
१ एक वेळ तुमचा दील कच्चा जाहला म्हणोन तुम्ही शिपाई नव्हेत कीं काय? --ह. ब. २५

२ दुसरे नोकराचा दील साहेबचाकरीस कसा वाढेल?

—राजवाडे ७ पृ. १५७

दीलएक—एकदिल (व्युत्क्रमाचें उदाहरण).

तें सर्वांनी मान्य केलें आणि सर्व दीलएक होऊन उठावणी केली.

—शि. प्र. ब. पृ. ३७

दुआब; दुवाब—१ अन्तर्वेदी; २ कोणत्याही दोन नद्यांच्या चिमट्यांतला प्रदेश.

दुकलकाल—कालदुकाल, (दुष्काळ). व्युत्क्रमाचें उदाहरण.

—शि. च. सा. खं. २ पृ. ११९

दुकान माजवणें--दंगा मांडणें, गलबा करणें?

१ रघुराम नामे वकील तुम्हाकडून बंगालियास जावयास आले ते प्रयागास आले. त्याणी एथें लबाडी बहुत केली. प्रयागवळास व यात्रकरास ध्यानास लागून दक्षिणा चुकवितो म्हणन दुकान माजिवला.

—पे. द. भाग २७ पत्र नं. २७

दुकित्ता--दुहेरी.

२ तुम्ही सांडणीस्वाराबरोबर व खिज्मतगाराबरोबर अशीं दुकित्ता पत्रें पाठविलीं.

—खरे १० पृ. ५५०८

३ तुम्हांकडील दुकित्ता पत्रें आलीं, त्याचे जाब मागाहून लिहून पाठवितों.

--ऐ. ले. सं. ३३४५

दुकित्ता—दुवार.

एकदां शिंदे व एकदां आंग्रे यांजकडील लोक येऊन दुकित्ते खंडण्या घेऊन मनस्वी उपसर्ग केला.

--ऐ. ले. सं. ५९९४

दुकित्ता पत्र--(१) एकाच मजकुराचें दुसरें पत्र (२) खरेशास्त्री यांनीं या शब्दाचा पुरवण्यासहित पत्रें असा अर्थ दिला आहे. (३) दुहेरी.

१ वातमीचीं पत्रें दुकित्ते पाठविलीं तीं वडिलांकडे आलीं, त्यांतील वर्तमान सविस्तर कळलें.

—ऐ. ले. सं. ४०६२

२ चि. बाबाकडून दुकित्ता पत्रें छ २६ जमादिलाखर व छ २७ मिनहूचीं आलीं.

--ऐ. ले. सं. ७१८१

दुकोळ—दुष्काळ.

त्याजवर वणगोजी नाईक देसाई यांचेवेळेस दुकोळ पडल्याकारणें उठोन परागंदा होऊन गेले. त्याजवर दरम्यान लोखंडे धनगर दरफिरोज पटेलगी खाऊ लागले; त्यावर आपण झोंबलो.

—मरा. कु. इ. ढवळ पवार पृष्ठ २४

दुखणें घेणें—दुखणें लागणें.
रघोजी करांडे व तुलजोपंत याणी तो दुखणे घेतले आहे.
—पे. द. २० पृ. ३४

दुखन्—धूर. यावरूनच मराठींतील धुकं, धुकें हा शब्द आला असावा.

दुखम—वीर्य.
१ गोपालसेटी पेठ मजकुरास येऊन बोलिला जे आपण बाजीच्या दुखमाचा आहे सेटीयेपण आपलें आहे. —शि. च. सा. खं. २ पृ. १३५
२ यास जो दिगर करील तो आपले बापाचे दुखमाचा नव्हे.
—ऐ. ले. सं. ८३७३

दुःखाचे पर्वत होणें—पर्वतप्राय दुःख होणें.
सरखेल साहेबासी कैलासवास जाहला येणें करून आम्हां सेवक लोकासी दुःखाचे पर्वत जाहाले ते श्री जाणें. —पे. द. ३३ पृ. ८१

दुगण—घाट.
यंदा सावंताची धामधूम जाहली परंतु दुगणीवरती जाहली. खाली नाहीं (खाली कोंकणांत नाहीं.) —वै ४ स १७४४ पृ. ११

दुगाणी—दहा कासांच्या किंमतीचें किंवा अर्ध्या पेशाच्या किंमतीचें एक तांब्याचें नाणें. —विल्सन.

दुघोसी बोट—दोन डोलकाठ्यांचें जहाज
५ जमादिलावल रोजीं इंग्रेजी लढवाई दुघोसी बोट १ बतेला १ व सिबाडा ३ असे ५ दागिने जंगी सरंजाम भरून मुंबईहून जात होते.
—ऐ. ले. सं. ४१९८

दुचते—अचानक; नकळतां.
गोवलास आयुर्भाव (आविर्भाव) दाखवून अंजनवेलीचें दुचते काम करावें असें प्रतिनिधींचें मानस आहे. —पे. द. ३ पृ. ६७

दुचंद—दुप्पट, भरपूर.
(अवतरणासाठी ‘ जरब ’ शब्द पाहा)
—पुणें अखबार भाग ३ पृ. २५

दुचंद घेणें—दुप्पट घेणें.
काय चिंता आहे ? गोविंदरायाचाही सूड घेतील, रुपयेही ज्यांनीं लुटीले असतील त्यांस ठिकाणी लावून दुचंद घेऊन शासनही करतील.
—हिं. द. खंड १ पृष्ठ ५२

दुचाला, दुचाळा—दुचाळा, दुटप्पी वर्तन.
अब्दालीची बोलावणी सुजाला बहुत उमेद लावून गेली परंतु तो त्याज-

कडे येत नाहीं वरकड लहान मोठे (संस्थानिक) दुचाल्यांत आहेत तर ते बुडते पहातात.
—ऐ. ले. सं. पृ. ३४

दुचित—दुश्चित्त; कष्टी.

गढींत शिरून दोनतीनशे काटकास ठार मारिले त्या दिवशी दुचित होऊन पदरच्या लोकांस बहुताप्रकारे समाधान करून बंदोबस्त केला.
—म. द. रु. २ पृ. ११

दुजागी—जुदागी; विभक्तपणा.

१ सबब गुलामकादरासी तुम्ही दुजागी न करिता त्यास सामील असोन आमचे मसलतींत यावे.
—जो. रा. १२६

२ शिंदे होळकर यांची दुजागी राजेरजवाड्यांत दाखवून होळकरांची कमती पाडिली.
—हो. कै. ७२

दुजाणणें—मानणें, आदर बाळगणें.

राजाजीचा आशय अंतस्थ मनांत आणिता (त्याची) विघाडाची बहुतशी खुरखुर (खुमखुमी) आहे (असें दिसतें.) नासिरजंग सेवेसी मिलाफी आहेत ऐसे लेखोन, याचें वजन बहुतभार यास्तव बाहयात्कारे यासी बहुतसी लोलिंगता करितात. परंतु अंतर्यामी यासहि दुजाणत नाहींत !
—राजवाडे १ पृ. १९

दुटक—(तुटक ?) गरीब, विपन्न.

आपली माणसें दुकालाकरितां बहुत मेलीं आपनही बहुत दुटक जालों. खावयास कांहीं नाहीं याबदल आपली खेडी मुलेपनाची देहे तीन तुम्हार विकत दिधली.
—शि. च. सा. खं. २ पृ. २९स

दुडु—२० कासांच्या किंमतीचें एक तांब्याचें नाणें. ४ दुडुंचा एक पैसा होई.
—विल्सन

दुडकी—घोडयाची एक विशिष्ट चाल.
—पे. द.

दुडाण—(उडाण, उड्डाण ?) घोडयाच्या चालीचा एक प्रकार.

शहाजी राज, दहा हजार घोडे, दुडाण सात्रक घोडे चालून पहाटेचे दोन घटका पोचून हल्ला केला. ('सात्रक' ही सुद्धा एक घोडयाची चाल आहे.)
—शि. प्र. ब. पृ. ५८

दुंडी—दंगा, बंडाळी, चढाई.

१ अहिरानी वगैरे जमीदारांनी या प्रांते दुंडी करावयास सिध जाले होते.
—चं. चू. द. पृ. १४१

२ परगणें महतपूर चंदेरीकराने दुंडी करून घेतला होता त्याविसी पाटीलबावा यांस विनंती करून सोडविला
—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १२०

३ भूपाळसिंग राजे यांचा कनिष्ठ नातू यांस सिरउपस्थाई करून पांच सातशें स्वार जमा होऊन दुंडी केली. वोडशाचे राजांचा मुलुख ताराज केला. —राजवाडे खंड ११ पृ. ६७

दुणावणें—पुष्टी मिळणें. दुजोरा मिळणें.

येथेंहि वर्तमान त्यांचा गळाठा जाला म्हणोन उडालें होतें. परंतु वातल आहे. पट्टणचीं बातमीचीं पत्रें आलीं तीं आपणांकडे पाठविलींच आहेत. अद्याप पक्कें दुणावत नाहीं. —ऐ. ले. सं. ६०००

दुतर्फा—दोन्ही बाजूंचा; दुटप्पी; दुलग.

दुतीघर—द्वामुषायण, दुदील, दोहींकडे अंग देणारा, बेभरंवसेशीर

जयपूरवाल दुतीघर त्यांनी जिउबा-दादाच्या गोडींत शिरून हिमायत केली (वशीला लावला) व वसुलासाठीं तुम्ही तगादा करूं नये असें पत्र घेतलें. —हो. कै. पृ. ११२

दुतु—अश्रा; आच्छादन, एक प्रकारचा अंगरखा.

'निचोलो दुतुनामक: —रा. व्य. को.

दुंदाई –तुंदाई (?)—जबरदस्ती; दांडगेपणा.

बाजी चौक्या बसविल्या तर आमची दुंदाई जबरदस्ती दिसेल या गोष्टीचें कसें करावें ? —पुरं. द. भाग १ पृष्ठ १६९

दुदिला; दुदील; दोदील—दुलग; दोहींकडे संधान बांधणारा; साशंक; चंचल.

१ व-येथें जे दुदिले आहेत तिकडील दंगियामुळें उठोन येतील; त्यांची गुंज मोडेल. —राजवाडे १ पृ. ३३९

२ दुदिल (इ. म. २५४)

३ लटक्या कल्पना मनांत घालून दोदील करावें ऐसें करणार करितात. —राजवाडे १९ पृ. ८५

दुदुसा—एक प्रकारची तरवार. —रा. व्य. को.

दुधती—हत्तीच्या किलाव्यावरून बांधलेला जाड दोर

दूध हा खावची—दुधाधायेची ? दुधदाईची ? दूध पाजण्याकरितां ठेविलेल्या दाईची? मो. वा. चूक असावी

जिजावा आऊसाहेव यांचा हुकुम जाला आणिध राई आवाला दाई करून प्रतापगडास नेले. महाराज शिवाजीराजे यांचें स्त्रीस दूध नव्हत म्हणवून दाई केली आणि संभाजी राजे यासी दूध लाविलें. पाजीत असतां राजे थोर जाले व मग दूध हा खा व ची आसामी दिधली. —ऐ. सं. सा. खं. १ पृ. १३३

दुन्बालह—हवाला, दुमाला.

दुनवी—व्यावहारिक, व्यवहारदक्ष, फायदा-तोटा आधीं पाहणारा.

सांप्रत कृष्णरावजी हुजूर आले आहेत त्यांचे बोलण्यांत (आपण) हुजूरचे दौलत ख्वाह व दूरअंदेश सलाहकार यकता (एकटे ?) आपण आहोत व याचप्रमाणें त्यानी अर्जमारूज केला असेल व करतीलहि परंतु दुनवी. मकार (कपट) हिला रावजीस बहुत हिफज (पाठ) आहे.

—पुणें अखबार भाग २ पृ. ८६

दुनयवी—दुअन्वयी, द्वामुष्यायणी, दोहीकडे अंग देणारा, लबाड.

मीही किसा (तक्रार, तंटा, गोष्ट) सेवेसी लिहीन दुनयवी लोक, सर्व काबूचे यार, यांत संशय नाहीं.

—पुणें अखबार भाग १ पृ. २०१

दुनयादार—श्रीमंत, संपत्तिमान.

दुफासला (मुफासला ?)—फासला किंवा अंतर.

नवाब कूच करून निघाले ते मडकशिऱ्याचे पश्चिमेस किलेयाजवळोन कोशाचे दुफासलेयावर आले. तेथें पहाडांचा खोंड (कोंड) आहे. तेथें फौज उभी केली. —पे. द. २५ पृ. ७४

दुर्निमित्य—टेपर, आरोप.

मशारनिल्हे यांनीं उत्तर केलें की, माझे दुर्निमित्य कोणावर नाहीं, मी जातों. —पे. द. ४० पृ. ११३

दुंवल, दुबाल—सुकाणू.

दुबारें—लढाऊ गलबताचा एक प्रकार.

जहाजें नवीं तयार महाराजांनीं करविलीं. त्यांचीं नांवें गुराब, तरांडी, गलबते, दुबारे, शिबारे, पगार, मचवे, बाथोर, तिरकटा, पाल अशा जातीचीं चारपांचशें तयार करविलीं.

(चिटणीस सप्तकरणात्मक शिवचरित्र) —म आ पा पृ. ८

दुभतें—दुभतें जनावर.

धर्गी खर्चास व दुभतें पाठविलेंच असेल.

—ऐ. ले. सं. २४९५

दुभासी—दुटप्पी.

यांचा कारभार तो दुभासी आहे. अंतःकरणापासून नाहीं.

—पे. द. १२ पृ. ७७

दुम्दारी—पिछाडी, पिछाडीची फौज.

१ कडपेकरांचें पथक दुम्दारीस होतें. —खरे ४ पृ. १८३७

२ पाठीमागील दुम्दारी अस्तमानचे सुमारास जागा सोडन गेली.

—खरे ८ पृ. ४०२६

दूम—शेपूट.

दूमची—घोड्याच्या शेपटा खालून जाणारा बंद; लेंडी.

अवतरणासाठीं 'तुराटचाचा जीन' पाहा.

दूमतवजे—दुरोख.

येविषयी दुमुतवजे करितात. —साने प. या. व. १३३

दूमदारी—पिछाडी.

दुमदारीस चंदाखान व फिरंगी, मध्यें खुद्द आपण व आपले हारोलीस सैद करीमखान असा बंदोबस्त मुजफर-जंघानें केला होता.

—पे. द. २८ पृ. ७८

पिछाडीस शत्रूकडील २--३ शें बेदडे छापा घालावयास आले होते, परंतु दुमदारीस आमची फौज होती, तेव्हां ४ घटका उभें राहून बेदडे माघारे गेले. —ऐ. ले. सं. ३०८७

दूम्बाला; दूमाला—मागे; पाठलाग; ताकूब.

१ एक ससा पैदा जाला त्यानें कुतरियाचा दुमाला घेऊन कुतरा मारिला.

--भा. इ. सं. मं. १८३४ पा. वृ. २०८

२ दुम्बाला करणें राजवाडे ८ पृ. १

३ परत हवाली करणें. दुमाल्यास (मराचि थोशा ६९)

४ मागाहून दुमांल्यावर (पाय १२) पाठीशी मदतनीस.

दुमल--दुंबल, दुमाला, पाठलाग करणें, ध्यास, त्वष्ट.

थोडेबहुत तरी चाकरमानें पाटील सत्वर पाठविले पाहिजेत. येथें राजेश्री स्वामीनी बहुतच दुमल केली आहे. --पे. द. ८ पृ. २२

दुमादरम्य न—मध्यस्त, वशिला.

खंडणी करून गोदगावडी यानें सूर्याजी बडदे पाटील मोकदम मौजे कोलहीत दुमादरम्यानें घालून आपले तर्फेची पाटीलकी सोडवूं घेऊनू करूं लागला. —म. द. रु. ३ पृ. ३६

दुमाला—पाठपुरावा, साहाय्य, पाठलाग. इनामाचा एक प्रकार

शत्रूकडील फौज जितकी यमुना उतरत होती तितकी ठार जाली. मागील दुमाल्यावर जी फौज होती त्या फौजेने भाऊसाहेबांकडील मारगिरीची दहशत खाऊन पलोन गेली. —पाणि. बख. १६

बाईच्या पठाणांचे दुमालियावर बारभाई व गवळी आहेत, त्यांनींहि खंडण्यांची यथानुक्रमें पाठ चालविली आहे !

—ऐ. ले. सं. ५९९४

दुमाला (तोफेचा)—तोफेच्या पाठीमागील भाग.

६२॥ गुजारत बाळाजी दादाजी, सरनागीण तोफेचा दुमाला जाया

झाला सबब नवा ओतला त्याचे कामावर कांसार यास दरमहा तैनात.
—पे. सा. पृ. ९२

दुमाला—गलवताच्या एका भागाचें नांव.

सेनाधुरंधरांनीं फारस्तर फिरंग्याकडून नांव किस्तीवजा करून घेतली ती तयार झाली पुढें बारदावन सीड लहान व मधी दोन शिडे मोठी मागे सुकाणूचें शीड लहान एकूण चार शिडे मागे दुमाला दोन गज लांव व दीड गज रुंद तेथें तक्तपोशी करून वरते छपर पलंगासारखें केलें आहे ती नाव छ १ जिल्हेजी तळचांत घातली.

—नाग २ पृ. १६४

दुमाला—(?)

आबा न आल्याच्या पूर्वी २ दिवस साहित्याची तरतूद दुमाल्यावर टाळाटाळ केली.
—ऐ. ले. सं. १७४५

दुर्गाडी दुरगाडी—१ गढी,किल्ला (?) २स्मशान.मसणवट, ३लहानशी टेकडी.

१ शहापुर किल्ल्याच्या दरवाजांत दांडगाई होतांच दरवाजकरांनीं दरवाजा लोटला व टोपांनीं वगैरे लोक होते. त्यांची लढाई होऊन २–४ असामी ठार झाले. इकडे नारोपंत दुरगाडीच्या दरवाजांत शिरोन मारीत वाडयाकडे चालले. त्यांचे पिच्छावर जिभींतील रायचंदाकडील लोकांनीं चाल केली. दरवाजास अग्न दिली होती, परंतु जिभींतील लोकांनीं विझविली.
—ऐ ले. सं. ६८२५

२ सासबडी आपणास दुर्गाडीवरी वाडा बांधावयास ठिकाण देशमुख मुकादम कुलकर्णी याणी पत्र लेहून दिल्हे आहे त्याप्रमाणें जमीन आपले स्वाधीन करावी.
—पुरं. द. भाग १ पृष्ठ १८

३ फिरंग्यानें कल्याणास येऊन दुर्गाडीवर हल्ला केला. (कल्याणच्या छोटया टेकडीवरील किल्यास दुर्गाडी म्हणत.)
—साष्टीबखर

दुर्गी—होनाचा एक प्रकार.

सरकारांत मानाजीकडील ७० हजार होन दुर्गी, वगैरे नाणें सरकारांत लागलें.
ऐ. ले. सं. ३११५

दुर्भीनळी—दुर्बीण.

—म. आ. पा. पृ. ६५

दुरं—मोती.

दुऱ्हाई—१ द्वाही २ राजाच्या नांवानें 'समन्स' काढणें.

चिमणाजी बापोजीस देशमुखी (देशमुखानी) येकदोनदा बोलाऊं पाठविले परंतु तो न येच मग आपण नायेगावास जाऊन त्यास दुऱ्हाई देऊन त्यास ठाणियास घेऊन आलों.
—पुरं. द. भाग ३ पृ. १३४

दुरंगी—दुदील.

दिवाकरपंत दुरंगी होते. सांप्रत तुम्ही राज्याचे इष्टचिंतक आहांत याकरिता बंगाल्याचे मोहिमेस मातबर फौज पाठवावी.

—पुणें अख० भाग १ पृ. २३९

दुरटा—ताशेरा, फैर, सलक.

वाजी देशपांडे याणी मोगली फौज झिडीनजीक आली पाहून झाडीत लोक उभे करून गोळया व जेजालाचे दुरटे चालविले तेणे फौज करून तुंबऊन राखिली. —चि. शि. च. पृ. १३९

दुरदराज—दुरीदराज, अस्ताव्यस्त, परंगदा होणें; पांगलेला, दूरदूर गेलेला. बेचिराखी,

१ सहल मुकदमा (गोष्ट) दुरदराज न पोहचे, ते करावें म्हणोन खान मोमीइलै (मशारनिल्हे) याहीं लिहिलें.

—पे. द. २५ पृ. ४

२ मोरोबादादावर उगाच शब्द ठेवितील. उगेच दुरदराज लागेल.

—पे. द. भाग २० पत्र नं. २८७

३ रयेता बेदिल होऊन वाडी पडते; वाडी पडली म्हणजे दुरीदराज लागेली. —इ. म. ४८

दुरन्देश, दुरन्देशा, दुरन्देशी—दूर दृष्टी; दूरवर विचार करणारा; धूर्त.

१ आपण दाणा व दुरंदेश आहेत. —राजवाडे १० पृ. २१३

२ बाळाजीराव काय दुरंदेश होते. —राजवाडे ५ पृ. ८६

दुरस्ता—दुतर्फा; रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं.

डावे बाजूस नारायणराव यांची फौज. उजवे बाजूस रास्त्यांची फौज होती. दुरस्ता कोरवंदीनें गाडदी उभे होते.

—ऐ. ले. सं. ४८३४

दुराई—द्वाही. राजा अगर सरकार यांच्या नांवानें एखाद्यास बेकायदा चाल-लेलें काम थांबविण्यासाठी शपथ घालतात ती.

तुम्ही खाडी बंद करीत नाहीं तुम्हास दुराई आहे.

—पे. द. ३३ पृ. २२२

दुराटी—दोन नळयांची बंदूक.

भोर्चे मात्बर खार्डीवरी दुराटीचे टपीयाचे मानीं गेले परंतु फौज भारी असलियाविना, कार्य होत नाहीं. —पे. द. ३३ पृ. १७४

दुराद्रष्ट—दुर्दैव.

त्यास श्रीचे चित्तास येऊन लोकांचे प्रजेचें दुराद्रष्ट तदनुरूप यैसा विचार घडोन आला. होणीरास यत्न नाहीं. —पे. द. ३ पृ. ७३

दुराशा—लोभ.
अवतरणासाठीं 'नियतशाबुदी' पाहा. —हौ. कै. पृ. १५

दुरित—पाप.
अद्यापि दुरित सरत नाहीं. ईश्वरकृपा करील तो सुदीन. —ऐ. ले. सं. ५३४८

दुरुई—दुरोखी, दुदील.
सेवकाची रीत येकनिष्ठतेची. दुरुई नाहीं. —पुणें अखबार भाग ३ पृ. ७२

दुरूक दुरोख—दोन्हीकडचा.
१ बाळापुरास मोर्चे बसवावे तरी शत्रूचीं ठाणीं जवळ आहेत. दूरुक शह न सोसे, तेव्हां तो मजकूर राहिला. —ऐ. ले. सं. १२२२
२ इकडील मातबराचीं लक्ष्यें दुरोख झालीं आहेत. —. म. द. बा. १ पृ. ३१

दुरुस्त—व्यवस्थित; बराबर; निर्दोष; अचूक.
नेमिला जागा दुरुस्त मारणार असे. —म. रा. आ. ३५

दुरुस्त—तरबेज; वाकबगार.
बारकवाइतीचा ५ घटकांपर्यंत तमाशा जाला. कसबांत फार करून लोक दुरुस्त आहेत, असें बोलतात. —ऐ. ले. सं. ४७१६

दुरुस्तंदाज—बरोबर नेम मारणारे.
या वेगळे बंदुखी दुरुस्तंदाज, कानडे, तोरेखली, व जांगडे बंदुखी व तिरंदाज यांची संचणी केली. —आज्ञापत्र पृ. ७ (राज. सं. मं. आवृत्ति)

दुरुस्ताई—दिलसफाई.
परस्पर दुरुस्ताई होय तर उत्तम आहे. —जो. रा. ५

दुरोखी पातळ—पातळाचा एक प्रकार.
सणगांपैकीं पातळ दुरोखी गंगाजमनी व दुपट्टा पाठवून देतों. जाळीच्या चोळचा करविल्या आहेत त्या आम्ही घेऊन येतों. अखंड चोळचा तयार नाहींत. एक महिन्यांत तयार होतशा असल्यास येतांना इकडून (काशी वाराणशी येथून) घेऊन येतों. —ऐ. ले. सं. ४१५३

दुरोजा—दोन दिवसांचा खर्च.
चाळीस-पन्नास हजाराचे जवाहीर व कापड याणे फौजेस दुरोजा पुरणार नाहीं. —राजवाडे १२ पृ. ९०

दुल्ला—नवरदेव किंवा नवरा. दुल्लन—नवरी.

—विलसन

दुलकता—दुलगता, दुदीलपणा.
श्रीरंगपटणवाले याचा दुलकता अद्याप चुकला नाहीं.
—पे. द. २५ पृ. ८२

दुलगपणें असणें—दोन्हीकडे हात देणें; दोन्ही दरडींवर हात ठेवणें; दोन्ही पक्षांकडे अंग ठेवणें.
सर्व संकटें निवारण होतील. दुलगपणें आहेत तेच फजित पावतील, यांत संशय नाहीं. —ऐ. ले. सं. २५५८

दुलनगीर—दोहीं पक्षांस सामील असणारा; फितुरी.
काशीराव होळकर हे सेंधव्यास स्वस्थ दोन प्रहरची खातरजमेवर (दुपारीं भोजन मिळेल एवढ्यावर) दृष्टी देऊन दुलनगीर शिपाई होऊन आहेत.
—ऐ. ले. सं ७१३७

दुली—दुलई.
चंदावरचे सखापा नाइकांनीं धोतरजोडा १ दुली २ यैस दिल्ह ते पाठविले आहे. —E. M. P. पृ. १५४

दुव्वल—रुपयाचा सोळावा भाग म्हणजे एक आणा.
दालीम पोतापैकी ८ ≡ अक्षरी तीन दुव्वल दिल्हे आहेत.
—पे. द. १८ पृ. ९९

दुव्वुम—दुसरा, दुय्यन.
दुवल—वराही होनाच्या १६ वा हिस्या इतक्या किमतीचें नाणें.
—रा. व्य. को.

दुवस्वा—दोन घोडे ठेवणारा
दुवस्वा स्वार. (दुअस्पी ?) —वाडमा १ पृ. ३३३

दुवा—भले होवो अशी ईश्वरास प्रार्थना; आशीर्वाद; विज्ञापना
१ "द्वा" —राजवाडे १५ पृ. १३९
दुवा आं की (ती की)
२ जर वजीर कबूल करतील तर दुनिया आपल्यास दुवा देईल.
—राजवाडे ६ पृ. ६९१

दुवाई—द्वाही; सरकारच्या नांवानें दिलेला बंदीचा हुकूम.
मेस्तर वैट याचें म्हणणें श्रीमंतांकडून राजश्री आबा काळे आले आणि त्यांणीं दुवाई सरकारची घातली, म्हणोन आम्ही किनारा पिच्छाडीचा केला. सबब, आरबांनीं आगळीक करून आमचें माणूस मारलें त्याजपक्षीं आम्ही आरबांचें पारिपत्य करणार. —ऐ. ले. सं. ५१३३

दुवागीर—हितेच्छु; निष्ठावंत.
१ आम्ही हुजरतीचे दुवागीर.
२ तुम्ही बादशाहीचे दुवागीर. —चित्रगुप्त ४३
३ फकीर दुवागीर. —पाय ९
—वाड स. मा. ३ पृ. १८६

दुवागु—आशीर्वाद देणारे. दुवा देणारे.
यामध्यें मोहीबापन्हाचा नामोष आहे. आम्ही दुवागो असो.
—शिं. च. सा. खं. ५ पृ. २६

दुवागुवा—आश्रित किंवा उपकृत. आशिर्वादित.
आम्ही कदीम त्याचे दुवागुवा असो. तरी आमोहिबापन्हा आमचा वसीला ते जागा आहेत.
—शि. च. सा. खं. ५ पृ. २५

दुवाज्दह—बारा.

दुश्चित्त—खिन्न; सचिंत.
लष्करांचें पत्र काल अस्तमानीं आलें. त्याजवरून महाराज बहुत दुश्चित होते.
—ऐ. ले. सं. ५६९६
अबदुल्ल्याची खबर ऐकता मनांत झाले दुश्चित.
—ऐ. पो. के. भाग १ पृ. १३२

दुश्नाम—अवमान, अपमान.

दुश्मनगी; दुस्मानगिरी—वैर; शत्रुत्व.
ज्याप्रमाणें पानिपताचे समयीं सर्व हिंदुस्थान मिळून दक्षण्यासी दुश्मनगी केली तेच अवस्था आतां जाली आहे.
—दि. म. रा. १ पृ. २२६

दुश्म, नसूझी—शत्रूला वाळविणें, शत्रूला मारणें.

दुशाखा; दुशाखी—अनेक काकडे लावतां यावे म्हणून एका काठीच्या टोकास लोखंडाचीं शिंगें लाविलीं असतात अशी दीपयष्टी.
हिलाल काठ्यासुद्धा व दुशाखी तेल व चिंधडे पोत व पलिते.
—लेख पृ. १४०

दुशाल—तट.
भांडीयाचें माराखालें विजयगडाची दुशाल पाडिली.
—पे. द. ३३ पृ. ५६

दुशोला—जोड शामदान.
मोमबत्तीचे दुशोला, येक शोला याप्रमाणे जिन्नस.
—राजवाडे ७ पृ. १५६

दुस्त (तुस्त ?) तुस्त बादली—भरजरी, ज्यांत दाट जर विणला आहे असे (?)

१ संभाजी महाराज यास शाहू महाराजांनीं बसता हत्ती, दोन रंगविलेले घोडे, एक रुप्याचे जिनाचा व एक जरीबादली जिनाचा व दुस्त बादली व जडजवाहीर व ढाल तरवार याप्रमाणें दिले. जातांना पुन्हा हजार रुपये सत्का करून बादली दुस्त दिले.

२ सईबाईसाहेब यांनीं महाराजास षोडशगुणी तांबुलें दिधलीं व पुढां भरजरी दुस्त आणून ठेविला. —चित्र ५८

दुसग—(स्त्री.) मत्सर, द्वेष, भांडण, कचाकची.

हंसाजीची बायको राणावा व सून पारावा या दोघी रांडवा जाहल्या. त्यांचे पालग्रहण करावयास कोणी नाहीं याजकरितां गणोजीबावानी त्या दोघीस वेगळे ठेवून रांडरोटी जन्मवर खायाची बेगमी देऊन वेगळ्या ठेवल्या कीं आपले दोघी बाईकाची दुसग. बायेकापुत्र कोणी त्यांच्या कामास येतील न येतील याजकरितां जन्माची बेगमी करून वेगळ्या ठेविल्या. —ऐ. सं. सा. खं. ४ पृ. १३२

दुसरे ठायीं धरणें (एकाद्यास)—दुजा भाव धरणें.

त्याणेही मजला कधीही दुसरे ठायीं धरलें नाहीं. —पे. द.

दुसरें दाखविणें—वैषम्य, विरुद्धपणा, नापसंती दाखविणें.

मुधोसिधो बावाजीनें वाद सांगितला व हरकी दिल्ही ते वेलेस वरकडा बेलसरियानी दुसरें दाखविलें नाहीं. --शि. च. सा. खं. २ पृ. १४३

दुहज्बी—दोन कामास येणारा.

दुहराऊन गोष्ट बोलणें—१ बदलून गोष्ट सांगणें, २ बोलांत बोल नसणें, ३ दुसऱ्यांदा, पुन्हा बोलणें.

१ थोराची बोलणी काही दोन नसतात. जे जाले ते जाले. आतां आपण दुहराऊन गोष्ट बोलता याजवरून श्रीमंतांचे ध्यानांत आपले काबूचीपण (कपट; लुच्चेगिरी) येईल. —राजवाडे खंड १२ पृ. २२

२ तेव्हा बहुतेक ममतेनें पूर्वीं वचनें दिधलीं आहेत तीं दुहराहून बोलोन त्यांणीं उत्तर दिलें कीं, बादज बरसात काय घडून येते तें प्रत्ययास येईल. —राजवाडे खंड १२ पृ. १५

दुहल (फा. श)—ढोल.

दुहाई, दोहाही—द्वाही.

दुहाही पातशाही (पातशहाची द्वाही) फिरवून सर्व मुलखांत ठाणीं ठेवून बंदोबस्त केला. --दस. शि. मो. इ. पृ. १३

दुहितार्थ—द्वैतार्थ, द्वैत, भांडण, विरोध.

शामलाचा आणि सरखेलीचा येक विचार जाला दुहितार्थ राहिला नाहीं. —पे. द. ३३ पृ. ३०२

दुहेरी—डबल.

श्रीमंतानीं फरासखान्याचें सामान दुहेरी, नवे डेरे व राहुटचा व चांदण्या वाडाच्या कनाथा वगैरे करविले आहे. पर्वतीचे उत्तरेस फरासखाना उभा केला आहे परवा मंदवारी श्रीमंतांची स्वारी पाहण्याकरतां आली होती.

—पे. द.

दुहेरी पोषाख—? डबल पोषाख ?

नारायणरावसाहेबास घोडा, पदक, दुहेरी पोषाख दिला.

—ऐ. ले. सं. १४९३

दुवमान—कुल.

दूदो—दोन.

दूम—मध्यम, दुय्यम, दुसरी.

निवड करून दोन टोळया केल्या. येक निवडीची व येक दूम. निवडीत आपण होतो. —पे. द. १६ पृ. ३२

दूरअमल (दुर् अम्मल)—बद अमल, व्यभिचार.

यावरी आपला भोग वाइटाचा उभा राहिला आपणावरी परशरामपुरी जोशी याचा अभिप्राय आला. त्याणी धरून दिवाणांत नेले. तेथे वाजपुसी करितां आपण कबूल जाले कीं त्यासी दूरअमल जाले. यावरी आपण आपले जातीमधून वेगली पडले.

—शि. च. सा. खं. २ पृ. ३०२

दूर्दस्त—दूर; दूरचा.

१ लाहोर प्रांत दूर्दस्त आहे. —इ. म. २६७

२ ल्याहावे की आम्ही दूर्दस्त होतो. —राजवाडे १ पृ. ४८

दूर आलोचणे करून—दूरदृष्टि देऊन.

सेवक दौलखाई केवल अमर्यादेनें विनंती केली आहे ती दूर आलोचणें करून ध्याणास आणावी. —पे. द. भाग ३८ पत्र नं. २८

दूर धरणें (एकाद्यास)—एकाद्याबद्दल उदासीन राहणें किंवा त्याला उडवून लावणें.

आम्हीही जितकी रामराव याची मर्यादा करणें (आदरभाव दाखविणें) ती करीतच गेलों परंतु त्याचे मनास न आलें आम्हांस दूर धरीतच चाललें. —ऐ. जु. ले. चि. घ. सं. मा. पृ. २०

दूरशी—विटाळशी, अस्पर्श.

श्रीमंतास सेंडी राखावयाचे मोहर्त माहे मजकुरी पंचमीचे होते ते रहित जाले कारण कीं बाई (आई गंगाबाई) दूरसी जाली. म्हणौन राहिले.

—पुणे. अख. भाग २ पृ. ४

देऊ दिलाऊ करणें—'देऊ देऊ' म्हणून दिरंगाईवर टाकणें; थापा देणें, लांबणीवर टाकणें.

१ त्यानीं 'देऊ दिलाऊ' करून आजीपर्यंत रुपये दिल्हे नाहींत.
—पे. द. १३ पृ. २१

२ राव खंडणी करून गेले त्याविषी प्रत्यहीं खंडेरायास मागतो. तेही देऊं दिलाऊं करितात. परंतु येथें जबरदस्तीशिवाय पैसा निघत नाहीं.
—पे. द. ४० पृ. ११०

३ अद्यापि एका कामाची वाट जाली नाही. देऊ दिलाऊ ऐशा लबाडीच्या गोष्टी बोलितात. —पे. द. भाग २७ पत्र नं. २०

देखणा, देखणाऊ—डोळ्यांत भरेल असा. धडधडीत.

१ नाना फडणवीस यांच्या सांगण्यावरून आम्ही बरकंदाज पाठवूं म्हणून कबूल केलें. याकरितां विश्वासु, मर्द व देखणे असे माणूस पाहून पाठवून द्यावे. —ऐ. ले. सं. २०९२

२ गरुड, आंबाडचे मुकामी येऊन भेटले परंतु त्यांचे सामान, घोडेमाणूस देखणाऊ नाहीं. रुपये देऊन फसलो. आता जे सामान घेऊन आलेत त्यातील त्यातच कर्तव्यता ते केली जाईल. —चं. चू. द. पृ. ९४

देखला देख—तावडतोब, त्वरित.

नाहींतरी आम्हास साफ आज्ञा करावी त्याप्रमाणें देखलादेख मनसुबा करावा लागेल. —पे. द. ३३ पृ. १२८

देखे वळखे—माहितीचे, ओळखीचे.

मुख्य गोष्ट कीं याणी दोहीं दिल्ही होती हे जबरीचे पाटील व देखेवलखे सोयरेधायरे पुण्याचे देशमुख देशपांडिये यासी शृत जाले.
—पुरं. द. भाग १ पृष्ठ ५३

देग—१ एक मोठें धातुपात्र २ समाराशेंतील किंवा लंगरांतील अन्न शिजविण्याची मोठी कढई. ३ मॉर्टर तोफ ४ हातगोळा, हँड ग्रेनेड.

देगतेग—देग म्ह. तोफ आणि तेग म्ह. तलवार. लक्षणेने लष्कर किंवा लढाई. आपली देगतेग नेहमी फत्ते होईल. —पे. द.

देठी आणणें—आपल्या हातीं किंवा कबजांत आणणें.

धर्मकुवरानें सर्वांवर पलटणी छाप ठेवून (पलटणाची दहशत दाखवून) कारभाराची मुखत्यारी आपले देठीं आणिली.
—हो. कै. पृ. १७५

देर; देरी; देरकशी—उशीर, दिरंगाई, विलंब.

१ मार्ग लांब व सर्कार थोर याजमुळें देरी जहाली.
—पद. म. व. ८०

२ एक घडीचे देर न करणें. —राजवाडे १५ पृ. ३६०

३ अशी देरकशी होणे खुश्नुमा दिसण्यांत येते की काय ?

—राजवाडे ७ पृ. ८१

४ पातशाही फर्मान शेवेसी पाठविला असे कासीद मार्गात आजारी असता-पावयास (पावावयास) देर जाली.

—पे. द. भाग २९ पत्र नं. १४३

देवआध्यान—देवाधीन, मृत.

पुढें कांही दिवसांनी गदाधरपंत प्रतिनिधी हे देवआध्यान जाले.

—म. द. रु. १ पृ. १०९

देवठिके—दोन गांवच्या शिवांचा वाद पडला असतां दिव्य स्वीकारून जो महार दिव्यास खरा ठरतो, व त्या गांवच्या म्हणण्याप्रमाणें हद्दींचा निर्णय मिळवितो अशा महारास गांवानें कृतज्ञताबुद्धीनें जो करमाफ जमिनीचा तुकडा बक्षीस दिलेला असतो, त्याला देवटिके, देवटिक्का किंवा दिव्यटक्का म्हणतात.

—विलसन

देवढ देणें—एकसारखा भडिमार करणें.

तीन हजार स्वारांनीं एकदाच पिस्तोलांची देवढ दिल्ही. त्यांत (त्यामुळें) सरकारी सरंजामीयांचे पाय उठले. —हो. कै. पृ, १९१

देवढामार—लागोपाठ एकसारखा केलेला मार.

देवढामार करणें म्हणोन लिहिले तरी आज देवढामार करावा म्हणून प्रातःकाली प्रारंभ केला परंतु तोफ थोरली जाया जाहली.

—पे. द. १६ पृ. ७६

देव देवराव—(?)

गोविंदराव तो आईसाहेबाचे आहेतच दाभाडियाची ममता करूं लागतील बाबूजी नाइकास उडवून देतील देव देवराव उडवितील, इतका विकल्प, आईसाहेब कष्टी आहेत त्याजमुळें वाटतो.

—ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ १०

देवबलेंकरून—(?)

चतुःसीमा लिहोन दिल्या आहेत त्यास सुकोंडी कोंगळेकरांनी मुरडी निराळी म्हणोन लिहून दिलें आहे परंतु मुरडी आंजलें याचे सीमेची ठाऊक (माहिती) नाही तेव्हां एकत्र आंजलें याच्या मौजे पाडले,आडे,लाणवडी, सुकोडी, कोंगणे पावेतो टाकल्या आहेत. त्या एकत्र आंजलें याच्या ऐसे दिसोन येते. मुर्डीचे सीमेतील मुर्डीस जाते म्हणोन पेंडसे म्हणतात त्यास मनास आणिता कानोजी सांवऱ्या याचे बापापासून अलीकडे **देवबलेंकरून** काही नेत होता.

—पेंडसे कु. पृ. ३४

देवराई—होनाचा प्रकार. —चित्र १२१

देवलाई—देवालयीं, देवळांत.

उभयता वाद्यापासून जामीन घेतले आणि श्रीसोमेश्वर देव मौजे घामापूर याचे देवलाई साक्षीदाराच्या सड्या घेतल्या —ज्यू ३२५

देवस्तान पडणें—भुतें घालणें, अभिचार होणें.

पुढें महाजनकीचा कारभार करावा तो विसो हरी महाजन व कृष्णाजी-पेंडसे याची कलागत जाहली. कलागतीस विसो हरी कडून देवस्तान पडोन आपला चुलता रामाजी पेंडसा मृत्यु पावला त्याजवर रामाजी वर्तक व विसो हरी भट यांची भुताविसी मनसुभी होत होती तेव्हा आम्हा कडेस भूत पडोन नाश जाला हे गोष्ट निघाली होती.

—पेंडसे कु. वृ. पृ. २९

देवाना पावणें—देवाज्ञा होणें.

राजश्री महाराज जानोजी निंबाळकर यासी आषाढ व. १२ शनिवारी देवाज्ञा झाली त्यांची स्त्री समागमें गेली. जानबा निंबाळकर यांचे पुत्र दाजी यांस फार बरें वाटत नव्हते याजकरिता मोगलापासून निरोप घेऊन ते बिडास आले होते तेथे तेही देवाना पावलें.

—ऐ. ले. सं. पृ. ५६५

देवारघर—देवघर. —पे. द.

देवाळ—देणेंकरी.

तुमची दोघांची हत्तीची लढाई तुमचे तुम्ही जाणा. आम्ही पैसा कबूल केला तो देऊं— आम्ही त्याचेही देवाळ व आपलेही देवाळ. जबरदस्त असेल तो घेईल!

—हो. कै. पृ. ११३

(एकादा माणूस) देवाज्ञा होणें—(एकादा माणूस) मरणें किंवा मृत्यु येणें. वाड्यांतील कृष्णाप्पा मोघ्या ब्राह्मण यास फोड्या आल्या होत्या. तो काल रात्रीं देवाज्ञा झाला.

—ऐ. ले. सं. ३५०८

देशक—१ महालांतील सर्व मोकदम, गांवगांवकीचे वतनदार २ देसाई, जहागिरदार

ज्यू. १६७। १६८

तमाम देशकांच्या वोली, खंडण्या केलेल्या ऐवजाकरितां बंकापुरास ठेविल्या आहेत.

—ऐ. ले. सं. २६४५

देशधडी करणें—मुलुख मारणें, लूटमार करणें.

थोरली विशाळ। बैसावया घोडी। त्यावरी देशधडी। करीतसे.

—नामदेव गाथा

देशभरी होणें—परागंदा होणें.
त्याजवर गांव वोस होऊन गेला. आपण देशभरी जालो.
—ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ ६२

देश लागणें—देशाची लावणी होणें.
सलूख होईल तेव्हां देश लागेल, द्रव्य प्राप्त होईल.
—ऐ. ले. सं. ५२८

देशलीक—देशाधिकार; देसाईपण.
मग सोम ठाकुर व शिवठाकूर देशलीक चालवूं लागले.
—पा. क्ष. ज्ञा. इ. पृ. १९

देशाधिकारी—Chief or Governor or Superintendent of a given tract of country एकाद्या विशिष्ट प्रदेशाचा गव्हर्नर.
'श्री. स. गु. अ. ल. अ. रा. रा. अंताजी विठ्ठल देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी प्रांत कुडाळी गोसावि यांसी—"
—के. सं. भट्ट दप्तर मालवण

देशावर, देशाउर—परमुलूख, परका मुलुख. —विलसन

देशावर जाणें—देशोधडी परागंदा होणें.
त्याणी उत्तर केले कीं तुम्ही देशावर गेला सबब आपण (तुमच्या वतनाची) वहिवाट करतो हल्ली तुम्ही आला. तुमचे तुम्ही करावे आमचे तर्फेने अडथळा नाहीं. —इ. सं. पे. द. स. प. मा. पृ. ८०

देशकत वतन—देसाईपणाच्या अधिकाराबद्दल दिलेली इनाम जमीन.
प्रांत मजकूरचें देशकत वतन तुमचे व बहाद्दूर हा किताब अजरायत चालेल. —को. प्रा. १५४

देसक—१ देसाई २ राजे ३ संस्थानिक.
तमाम देसक, कित्तूर, नवलगुंद आदि करून आणवावे. याप्रमाणें झाल्यास हैदरास बुरोंख राह पुरवणार नाहीं. —ऐ. ले. सं. १५२७

देसमत—ज्योतिषांचा (पंचागांचा) निर्णय (?)
फालगुन शु. ११ स मुहूर्त जावयास पाहिला होता त्यास हुताशनी समीप पुढें असता निघणे आसोनच देसमत निघालें त्यावरून तो मुहूर्त राहिला.
—नाग २ पृ. १३३

देसूर—एतद्देशीय, गांवठी.
घोडे अरबी, इराणी, हबशी, मारवाडी, देसूर व कच्छी.
—चित्र ११२

देह—गांव.

देह देणें—ठार होणें.

महादजी बावर यांचे बाप गंगाजी बाबर देशमुख कर्याती नाणे घोळ याणी आपल्या समागमे येऊन छ १४ रजबी झुलपीकारखानाची गांठी पडिली ते समई समरांगणीं युद्धी स्वामीकार्यावरी देह दिल्हा. बरा मर्दाना माणूस होता. —मा. स. प. पृ. १७५

देह व देह— गांवोगांव.

देह व देह—लावणी करील. –राजवाडे १६ पृ. ४२

देह विसर्जन होणें—मरणें; मृत्यु पावणें

आपाजीपंत भाऊ यांचे शरीरी समाधान नवते यत्न करावयाचा तितका केला परंतु गुणास न येतां वैशाख व ॥ ३० देह विसर्जन झाले.

—हो. इ. सा. प. खंड १२ पृ. १३६

देहादर आणणें—शुद्धीवर, समजुतीवर आणणें.

१ येणे प्रमाणें विचार, त्यास साम्योपचारें सांगोन, देहावर आणून, स्वामीकार्य कराराप्रमाणें अमलात येई, ते गोष्टी करणें.

—शि. शा. इ. सा. भाग १ पृ. ३०

२ ऐशास सफदरजंग यांस स्नेहाविशी सांगून देहावरी आणिले.

—हिं. द. खंड १ पृष्ठ २८

३ त्यांत गृहस्थ गेला त्याणें सांगितल्यावरी ते देहावर आले तरी उत्तम. नाहींतर परिणाम शुद्ध नाहीं. —ऐ. ले. सं. ५३८

देहावसान पावणें—मरणें.

त्यास शंकराजी राजे महाडिक देहावसान पावले भवानीबाई यानी सहगमन केले. —इ. सं. प्रा. मरा. सर. पृ. २०

देहास संकल्प घालणें—देहावर उदार होणें, जीवित्वास पाणी घालणें.

यासमयांत महाराज दया करतील तरी उत्तम आहे, नाहींतरी सेवकानें तो देहास संकल्प घातला आहे. —पे. द. ३३ पृ. ९२

दैत्यगुरुवासर—शुक्रवार. (दैत्यगुरु–शुक्राचार्य)

विज्ञापना. दैत्यगुरुवासर पावेतों कुशल आहे.

—ऐ. ले. सं. ५३२३

वास ठाकून येणें—दैवयोगे वांट्यास येणें.

तुम्ही लेकरे (लहान) ये गोष्टीची काळजी तुम्हास नसावी. परंतु दैवास ठाकून आलें तें केलें पाहिजे. —चं. चू. द. पृ. १३५

दैवीगत—दैवगती.

खेदाचें परिमार्जन व्हावें ते गोष्टी न होतां या थरास आलें. बरें दैवीगत विचित्र आहे ! —पे. द. ३३ पृ. १२७

दोआंगबाजी—दोन हातांत दोन तरवारी किंवा पट्टे घेऊन लढण्याचा प्रकार.

दोकडा—अर्ध्या पैशाइतक्या किमतीचें तांब्याचें नाणें.

—विल्सन

दोडका—तांदुळाची एक जात.

आंपण सांगितल्याप्रमाणें तांदूळ व मटकी घेतली. दोडके तांदूळ घेणें ऐसे सांगितले त्यास दोडके मिळत नाहींत म्हणून कोकणे दर चार प्रो घेतले.

--राज १९ पृ. ११७

दोडे तोफा—मोठ्यातोफा.

त्याजवरून तजवीज ठहरली होती कीं नाइकावर दोडे तोफा व सरकारची फौज जाधवरायासमागमें देऊन पाठवावे हा मनसुबा जाला होता. —पे. द. भाग ३८ पत्र नं. ८

दोणी—गलबताचा एक प्रकार.

निष्ठुरता करून तरीचा बंद करावा. रातबिरात होडी दोणी आली तरी दस्त करावी. —पे. दे. ३३ पृ. १६

दोणे—ढोणे (डॉन्स किंवा डॉम्स म्हणजे उच्च कुलीन गोरे, पोर्तुगीजलोक.)

मनास आणिता ते महांगिरी मुंबईहून, वर्ते सहा दोणे घालून पाणी जोखावयास पाठविली. मागे मार्गशीर्षमासीं नवा कपितान पाठविला. त्याज बरोबर पांचसे ढोणे आहेत. —पे. द. ३४ पृ. ५२

दोदेश—दुदीलपणा; दोन्ही दरडींवर हात ठेवणें; दुटप्पीपणा.

त्यांनीं दादासाहेबांकडे बोली लाविली आहे. प्रस्तुत दोदेश तेथें आहेत.

—ऐ. ले. सं. ९०६

दोन वार—दोनदा.

शिवाजी थोरात स्वामींकडे होता त्यास पंतांकडून निरोप दोन वार आला आहे. —ऐ. ले. सं. २५५२

दोनविडे—निरोपाच्या वेळीं दोन पानांचा विडा देण्याची पद्धत होतीसे दिसते. ऐतिहासिक वाङ्मयांत पांच विडे असाहि कोठे कोठे उल्लेख आलेला सांपडतो. त्यावरून तीन पोशाख, पांच पोशाख याप्रमाणेंच दोन विडे-पांचविडे या वाक्प्रचारांत अर्थाचा कांहीं सूक्ष्म भेद असावेसें वाटतें.

लिहिले असें कीं भावसिंग स्वामीजवल आला. त्यास दोन विडे देऊन निरोप द्यावा. चाकरीस न ठेवावा. —पे. द. १० पृ. ७२

दोमुहना--तीराच्या फाळाचा एक प्रकार

दोर—हा शेपटाखालून घेऊन हत्तीच्या गळ्याशीं बांधलेला असतो भोई त्याचाच आधार घेऊन बसतो शिवाय इतर साजसामानही अडकविण्यास या दोराचा उपयोग होतो.

दोरडा किंवा दोरडी—जाड लांबलचक दोर.
कसबे जंबूसर येथील पंधरा गाडे सरंजाम दोरडीसुद्धा बैल चांगले मजबूत गाड्यावर छत्र्या बांधवाव्या छत्रीं उपर ढाला, बाजा, आखर नवा चांगलें या प्रमाणें बेत करून ठेवावा. —पे. द.

दोरणी—दोरी, दोऱ्या.
पुण्याहून सामान पालख्यांचें, दोरण्या, मुलामे, कोर,दाल, पिंजरीचे गोप व राजगोंडे, इलाखे व सांगचें सामान पाठविलें आहे.
—ऐ. ले. सं. ९३५

दोरास आधार नसणें—कोठेंहि आधार किंवा आसरा नसणें.
घाटगे, भानूच्या स्त्रियांसहि सती जाऊं देईना. ५ लक्ष रुपये द्यावे म्हणजे अस्थी देतों म्हणतो ! काय भोवतत्त्व आहे न कळे. प्राण जाऊन हा भोग भोगावा, दोरास आधार नाहीं, ऐसें निर्मित दिसतें.
—ऐ. ले. सं. ५३८७

दोले—एक तऱ्हेचें कापड.
पांच शालजोड्या व तिवटें, किनखापे व दोले झग्याचे पाहिजे.
—ऐ. ले. सं ७७५७

दोशंबा—दोसंवा, सोमवार —विलसन

दोष—१ दंश २ आंतल्या नाजुक गोष्टी.
आम्ही यावयाचे कितेक दोष आहेत ते बाळाजीपंत आपणांस लेहून पाठवितील. —पे. द. ३३ पृ. ८

दोष खाणें—दंश खाणें, त्वेष येणें, राग येणें.
दुसरें दिवशीं मातोश्रींनीं राजश्रीस हमवार करावयाचे रीतीनें केलें; परंतु राजेश्रीनीं न आईकले. दोष खाऊन दरवाजीयाजवल आले, तेथे गडकरी आडवे होऊन त्यास उभें केले.
—पुरं. द. भाग १ पृष्ठ १७७

दोषगुण—गुणदोष. (व्युत्क्रमाचें उदाहरण)
असे पूर्वापार दोषगुण मनांत आणून खंडणीच्या तीन वांटण्यांचा दर्जा कबूल करावा हा बरा. —ऐ. ले सं. ४३१८

दोस्तदार—दोस्ती धरणारा, मित्र, सोबती.
तुम्ही यैसच दोस्तदार आहा त्याचे लढाईस सामील होऊं म्हणता.
—E. M. P. पृ. १३५

दोस्ती मनावणें—दोस्ती जमविणें.
वडिलीं तेथें जाऊन इंग्रजांची दोस्ती मनावून ठीक करावें.
—ऐ. ले. सं. ६६८०

दोहार ढोर—एक जात. कातडी कमावणारा.

—विलसन

दोही कतार—दोहों बाजूनीं.
पेशव्यांची स्वारी हडपसरपावेतों गेली. बाबुराव गणेश काळे वगैरे यांणीं लोक ठेविले आहेत, त्याची नजरपाहणी केली. दोही कतार स्वार उभे करून पाहात जाऊन पाहात माघारें आली.

—ऐ. ले. सं. ७४९६

दोहीदुहवी—द्वाही, दुराही.
त्यास आपण सांगितलें कीं, देवास निवेद घातला आहे तो देवास दाखवणें आणि बाळगोपाळ आहेत त्यासी प्रसाद देणें, जत्रेस कांही दोहीदुहवी केली नाहीं (फक्त) फळकुटीयास दोही दिली त्यावर त्यांणीं देवदेव केला, मग ते मास व फळकुटें तैसेच तीन दिवस राहिले.

—रा. १ पृ. २०

दौड करणें, दौडेस जाणें—छापा घालावयास जाणें, स्वारी करणें.
गणेशपंताचे हजार बारासे स्वार सुरत प्रांतात दौडेस गेले होते.

—पुणें अखबार भाग ३ पृ. ८४

दौडधूप—स्वारी शिकारी, धावाधावेची कामगिरी.
सेवकाचें वृद्धपण. दौडधूप करावयाचें सामर्थ्य नाहीं. यांजकरितां तुंगारतन व आवुरवलीत या दोन परगण्यांची मामलीयत सेवकास सांगावी.

—पे. द. २५ पृ. ८७.

दौडा करणें—दौड करून छापा घालणें.
सर्जाखाने दौडा केला। सातशे वणजारा लुटला।

—ऐ. पो. के. खं. २ पृ. २२

दौर—१ राजवट २ पुष्कळ वर्षांचा काळ.
रघुनाथरायाचे दौरांत व मोरोबाबूराव याचे हंगाम्याचे बाद सखाराम-पंतास कैद केल्यानंतर फिदवीसी जें बोलिले वगैरे.

—पुणें अखबार भाग १ पृ. १०९.

दौर, दौरा—क्रांति, बंड, दंगा.

दौरेजमा—कालचक्र.

दौलत्‌खा—दौलतीचा हितेच्छु; हितेच्छु; स्नेही.
महाराव जानोजी केवळ निखालस सर्व प्रकारे दौलतखा स्वामीचा आहे.

—राजवाडे १ पृ. १४८

दौलत्‌बंकी—महाद्वारपाल.

रा. व्य. को.

दौलत—राज्य.

दौलतकाहिरा—विजयी राज्य.
दौलतकाहिरेमधे मुलूक आला. —राजवाडे १८ पृ. ५५

दौलत्खाई—हितेच्छुता; हितेच्छा.
नजबखान सर्कारचे दौलत्खाई व इकडील दोस्ती ठेवितात.
—दि. म. रा. १ पृ. ४७

दौलतखाना—राहता राजवाडा.
कितेक समाधानाच्या गोष्टी बोलून नबाब स्वार होऊन आपल्या दौलत खान्यास आले. —पे. द. भाग २५ पत्र नं.१९६
हल्लीं विश्रामबागांत दौलतखाना बांधावयाची आज्ञा श्रीमंतांची जाली. काम पायाचें चालतें. —ऐ. ले. सं. ७०२२

दौलतज्यादा—तमाशा आटोपल्यावर नाच्या पोराशी अगर कलावंतणीशी भरसभेंत केलेली शृंगारचेष्टा.

दौलतदार; दौलतवन्त—श्रीमंत; सत्ताधीश.
१ पाहते अर्थी दौलत्वंतास कोणी एक गोष्टीनें सूख नाहीं.
—खरे १२१५

२ दौलतदार यास योग्य नाहीं तो धर्म होत चालला.
—राजवाडे ५ पृ. १४०

दौलतमंगल—ऊर्फ भुलेश्वर.
येदलशाहीतर्फेनें विजापुरीहून मुरारी जगदेराऊ सुभा येऊन पुणें जाळून लुटून तलफ केले ते वख्ती दौलतमंगल उर्फ भुलेस्वर येथें मुरारीनें किला बांधोन शाहर वसविले. —पे. द. ३१ पृ. १७२

दौलतीखेरीज करणें—पदभ्रष्ट करणें, पदच्युत करणें.

दृढोत्तर—बलवत्तर, बळकट, दृढतर.
जाटाचा उपमर्द करावा हा दृढोत्तर विचार करून वकिलाबरोबर गुर्मीचें बोलणें सांगून पाठविलें. —पाणि. बख. पृ. १२
नबाबाचा व सरकारचा स्नेह वेकिलाफ दृढोत्तर चालावा येविषीं वारंवार लिहितात. —ऐ. ले. सं. ९७३

दृष्ट चोरणें—उपेक्षा करणें, दुर्लक्ष करणें.
हे दरबारांत दर एकाशी बोलत बसतात किंवा काय मसलत करीतात हें न कळे असा आरोप पंतसचिवाकडील गृहस्थावर आणला आहे हें योजून मर्जी कडवी करून दृष्ट चोरून बोलतात. —नाग १ पृ. ३२२

दृष्टि अस्मानास जाणें—गर्विष्ट, बेदरकार होणे.
यैसा दुराभिमानास बहूत चढोन दृष्टी अस्मानास गेली आहे.
—पे. द. भाग २८ पत्र पं. ९

द्यावे देणें—कुलमुखत्यारी. 'द्यावे' असा शेरा दिवाणानें लिहावयाचा व 'देणे' असा शेरा खुद्द मालकानें लिहावयाचा असतो.

—हो. कै. पृ. ७५

द्रम, द्राम—सोळा पणांच्या किंमतीचें किंवा १२८० कवड्यांच्या किंमतीचें एक नाणें.

—विलसन

द्रवळणें—द्रवणें, द्रवविणें, द्रव आणणें.

आमृतरावजीनीं कितेक ममतेनें रायाचे चित्त द्रवळून खामखाये जावेसे करारवचन करून गुत्तीहून कूच करून कुडतनीस आले.

—पे. द. २८ पृ. २०७

द्वंदी—द्वेष्टे.

महाराष्ट्राचे तों ते परमद्वंदी, त्यास पथ्यावर ठेवावे.

—हिं. द. खंड १ पृष्ठ ३९

द्वयामुष—द्वामुष, द्वामुष्यायणी, दोन्हीकडे अंग देणारा, फितुरी.

रा. बाजीरावसाहेब द्वयामुष आहेत. कोणीकडे अंग आयतेवेळीं देतील याचा प्रकार कळतच आहे. —ऐ. ले. सं. ५५०८

द्वा—दुवा

—राजवाडे १५ पृ. १३९

द्वागीर—दुवागीर, आशीर्वाद देणारा. हितेच्छु, हितास्तव ईश्वरप्रार्थना करणारा.

ऐसेंच खतकिताबत पाठवून फकिराचे खबर घेत असले पाहिजे. आम्ही द्वागीर असों.

—ब्र. च. पृ. ३०७

द्वागो—दुवा गो. दुवा देणारे. फकीर. संत, सत्पुरुष.

रामजी गोसावी व वरकड द्वागो आहेत त्याचे फर्मान इनामाचे करून घ्यावे.

—पे. द. १० पृ. ३

द्वादशनगरी—बार्शी (बारामती नव्हे)

—ऐ. ले. सं. ३०८–३०९

द्वामांश—द्वामुषी; दोहोंकडे रोख ठेवणारा, दुदील.

कंपूवालेचा रोख द्वामांश आहे.

—ऐ. ले. सं. ६४७४

द्वामुष्यायण—सामान्यतः दोहीकडे अंग देणारा, अविश्वसनीय असा अर्थ होतो. परंतु असा अर्थ निष्पन्न झाला तो निराळ्याच कारणानें. दत्तक विधींत सामान्यतः दत्तक गेलेल्या मुलाला जुन्या जनक घराण्यांतील वारसा हक्क मिळत नाहीं परंतु दत्तक देण्यापूर्वी मुलाची मुंज झालेली असेल तर किंवा मुलगा दत्तक देणाऱ्या बापाला दुसरा पुत्रच नसेल तर

कांहीं शर्ती घालून दत्तक देतात तेव्हां दत्तक पुत्राला नव्या घराप्रमाणें जुन्या घरचाहि वारसा मिळतो. अशा रीतीनें दोहीकडून फायदा उपटू पाहाणारा तो द्वामुष्यायण. एकाद्या मनुष्याला त्याच्या विधवा भावजयीकडुन मुलगा झाला तर त्यालाही द्वामुष्यायण अशी संज्ञा असे.

देव सत्याकडे आहे असें पुरतें समजले जे द्वामुश्यायणी होते त्यांची देखील खातरजमा झाली. —ऐ. ले. सं. २१५९

मग स्वामींस भारी पडेल. गड, कोट किले त्याचे लगामी लागतील. जे द्वामुशायेण आहेत ते त्याजकडे जातील.

—पुरं. द. भाग १ पृष्ठ २४१

द्वामोशाचे बोलणें—दुटप्पी, अनिश्चित, दुहसवी.

यैसे द्वामोशाचें बोलणें बोलून निरोप दिल्हा.

--स. ब. पृ. २६

द्वारदेवता—लक्षणेनें वडचा लोकांचे द्वारपाळ. त्यांचा हात भिजविल्याखेरीज खाशाचीं भेटच होत नाहीं. —विलसन.

द्वाही; दोही—राजाची शपथ घालून केलेला अडथळा.

२ बहिणीनें आपलें घर शेकारिलें त्यास मल्हारजीनें द्वाही दिली.

--राजवाडे ६ पृ. ८

२ दोही दिली. —राजवाडे ६ पृ. ११६

द्वाही घालणें—राजाच्या किंवा अधिकाऱ्याच्या नांवानें हुकूम जाहीर करणें.

अल्लीभाई लष्कराहून घरास येतांच वसगडेस जाऊन राहिले होते. त्याणीं सुजालखानाचा आसरा करून मिराभाईस आपले वांटणीचा फडशा करून मिरजेस जाणें म्हणोन द्वाही घालोन राहविलें.

—ऐ. ले. सं. ३६८०

ध

धक—धडधाकट, धकण्यासारखे.

फिरंगणातून काफरी पलोन आले. आसामी तीन, हे काम करावयास धक आहेत. तरी यास वाडीयाचे कामावरी ठेवून घ्यावें.

—पे. द. ९ पृ. ३

धकावणें—धक्कावणें, धक्का देणें, बिघडवणें.

आपण जाऊन बैसले आण साहेबकाम धकाविलें यैसे सर्वजन म्हणेल.

—पे. द. ३४ पृ. २३

धकेबुचे—धक्केबुक्के.

धकेबुचे व जेरबंदाखाले माणूस सोमवंशी यानें जाया केले आहे.

—पे. द. १७ पृ. ११७

धगी—धग; आग; धगधग.

यंदाचा उष्णकाळ अतिशय कागदीं लिहितां पुरवत नाहीं. आम्हांस फारच श्रम होतात. प्रहर दिवस प्रात:काळचा आला म्हणजे दोन प्रहर रात्र पावेतों मोठी धगी शरीराची होती. यामागें असें उष्ण पाहिलें नव्हतें.

—ऐ. ले. सं. १६१५

धज धरून काम करणें—नेटानें, धैर्यानें शौर्यानें काम करणें.

इतके सारे होईल असे मला पहिलें वाटत नवते धज धरुन काम केलें फार उत्तम जालें.

—पुरं. द. भाग १ पृष्ठ १३०

धटाई—उर्मटपणा; जोरा.

चव्हाण सोनीस आले. ते वाडियांत नगारानिशाण ठेऊन जावे, ते परभारें धटाई करून आपले घरांत जाऊं लागले. त्यासी नगारानिशाण आम्ही वाडियांत सालाबादप्रमाणें ठेऊन घेतलें.

—ऐ. ले. सं. ४२१२

धडका—भडाभड तडक, धडाधड.

पैका त्यानी बाहेर काढीला आहे. नालबंद्या धडका लोकांस देतात. पैका घेऊन आले तेच बोलतात.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ४६

धड कांटचावर घालणें—शरीर काटचावर घालणें, आत्मघात करणें.

कोन्हेरराव, कृष्णराव, शिवराव, यांणीं जुनें भांडणें (हातघाई, चकमक लढाया) पाहिलीं होतीं. कुमदानावर सारी हुजरात राजश्री त्रिंबकराव मामा घेऊन गेले होते ते समयींची अवस्था साऱ्यांनींच पाहिली होती, (असें असतां) धडच कांटचावर घालून असी अवस्था केली !

--ऐ. ले. सं. २७९६-९७

धडवाई—जमातदारी.

मुकुंदजी साळोखी यांसी पेटा मजकुरी धडवाईचा अंमल सांगितला.

—ऐ. सं. सा. खंड ५ पृष्ठ ६३

धडसोबती—शेवटपर्यंत टिकणारे सोबती, विश्वासू माणूस.

द्वारकोजी राऊ पाटणकर यांस सत्वर रवाना करावें. तेहि आमची धडसोबती आहेत.

—पे. द. ३ पृ. १५

धडा—जोर.

यांसी खंडणीचे जाबसाल लावावे तरी गांवांत रयत नाहीं. त्याचा बोलणेचा धडा भारी. बोलणेंचे निभाव न पडे.

—ऐ. ले. सं. ५९५५

धडा—१ किनाऱ्यावर गलवत किंवा पडाव आच्छादित करून ठेवण्याची जागा किंवा ठिकाणा. २ समुद्रकांठ.
येथून (समुद्रकांठी असलेल्या बाणकोटाहून) फौजेचा उलगडा होईल तर थोडी वाचतात नाहींतर धड्यावर सफा होतो.
—पे. द. ३३ पृ. १५२

धडा—गुर्गुजासारखें एक हत्यार.

धडा-पेंडवळा :—हद्द, सीमा, सीमादर्शक बांध, कड, रस्ता, रेषा इत्यादिक.
समाकुल पांढर व बारा बलुते जमा करून काळी व पांढर निम्मे प्रमाणें धडेपेंडवळे करार करून घेतले.
—ऐ. सं. सा. खंड ५ पृष्ट ६६

धडाका—धडावयानें; एकसारखी; लोटानें.
शिद्याचें पेंढार आलें त्याजवरून गृहस्थांनी कुटुंबें धडाका खालीं कोकणांत रवाना करतात. —ऐ. ले. सं. ८२४५

धणीकाम—साहेबकाम, मोठी कामगिरी.
मुख्य गोष्ट कोणतेही धणीकामें या प्रांतीची आपण करावी आणि निसबतदार इतर होतात ! तेव्हां याचा अभिमान स्वामीस असावा. आपला हेत जे धणीकाम करून मजुरा करून घ्यावा हाच.
—पे. द. २८ पृ. १४२

धणी होणें—जोखीम पतकरणें; जबाबदारी स्वीकारणें.
अटकेंतील कानडे माणसांनीं भोजन करून परत अटकेंत यावें तरी त्यांनीं भोजन करून यावें असा धणी कोण होतो ?
—ऐ. ले. सं. ४९७४

धतरफतर—थातुरमातुर, कशीतरी तात्पुरती समजूत.
भोई पालखिया तळांवर टाकून गेले. मग लोकांचा हंगामा झाला. यास्तव त्यानीं आम्हास बोलावून नेले होते. आम्ही लोकांस चार गोष्टी सांगोन धतरफतर करून कूच मात्र करविलें. —पे. द. २८ पृ. १७०

धंदरी लावणें—नादी लावणें.
धातूपोषणाच्या गोष्टी बोलून यानी आम्हास धंदरी लाविले आहे.
—राजवाडे खंड १२ पृ. २३

धंदा—हुद्दा, अधिकार, कामगिरी.
येणे प्रमाणें सहा कलमी स्वामींनीं धंदा तुम्हास सांगितला असे.
—को. प्रा. १५६

धंदाबंदा—धंदाबिंदा नोकरीचाकरी, रोजगार.
१ श्रीमंतांची भेट घेतली होती ते समई आज्ञा जाली कीं समागमे चला

धंदावंदा सतत वाटे तो सरकारात जागाजुगा तूर्त नाही तिलातील तेल तिलात तुमची सोय केली जाईल.

—ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ ४१

२ वडिलांसहि ते समयीं धंदांवंदा चांगलाच होता.

—ऐ. ले. सं. ३८८०

धंदीर—१ कठीण, आशेपलीकडचे. २ कालावधीचे (धंदर-आशा) लोक बोलतात कीं निंबाळकर एकाएकी ठाणे देतील हे होणे नाहीं ठाणे हस्तगत व्हावयाचे धंदीरच आहे. —पे. द. ३० पृ. १८१

धन्य होणें—संतुष्ट, कृतकृत्य.

घोरपड्याचा मुलूख अगदीं हैदरनायकाच्या स्वाधीन जाहला. पुढें त्याचें पारिपत्य करणार ऐसें तूर्त या रानांत कोणी दिसत नाहीं. कडपेकर व करनोळकर धन्य होऊन आपले स्थळीं बसले आहेत.

—ऐ. ले. सं. ५५

धनाचा चरू—संपत्तीचा ठेवा, कुणगा, गुप्त जीवापाड जतन केलेला धनाचा हंडा.

भाऊसाहेबांनीं मला मागें टाकून, आपण स्वर्गवास केला. माझे आंधळ्याची काठी चोरून नेली माझे धनाचा चरू चोरून नला. आता देहत्याग करावा असा शोक नानासाहेबांही आरंभिला.

—पाणि. बख. पृ. ४६

धनीजोग—हुंडीचा एक प्रकार. या हुंडीचे पैसे हुंडी धारण करणारास मिळतात. उलटपक्षीं शहाजोग हुंडीचे पैसे धारण करणाराखेरीज दुसऱ्यालाच द्यावयाचे असतात.

हुंडी विकत घेणारास ज्याच्या नांवाची ती असेल त्यास-जिचे पैसे द्यावयाचे असातात अशी (हुंडी) (इं) ऑर्डर याच्या उलट शहाजोग ज्याच्या हाती ती असेल त्यास द्यावयाची (इं) बेअरर (धनी—योग्य.) (महाराष्ट शब्दकोश).

तुमचे आम्हांकडे रुपये पांचशे आहेत त्या यैवजी हुंडी रुपये सातशाची देवभुकनजी काशीदास याजवरील धनी जोग पाठविली आहे हे घेऊन रुपये जमा करणें तुमचं उत्तर आलियावरी २०० रुपयाची चिठी करून यैवज उतरून घेऊं —चं. ४ स १७४४ पृ. १५

धनुष्याची आढी काढणें—धनुष्याची कांब वाकवून त्याला दोरी जोडणें (बाण मारण्यासाठीं).

केळ्यास झुंज जालें माणसें बहुत मेलीं पोमदे पाइकानें धनुष्याची आढी

काढून राया भोजाची दांडी छत्राची वेधली दुसऱ्या तीरें शीरचा मुगुट वेधिला मग भोजराजाचे सैन्यानें काढावा काढला. —विंब ८

धपका—जबरदस्त, प्रचंड.

यानीं बादशहाची नजर व घासदाणा व वाहाले याचा जागा व गुदस्ताची बाकी मिळून ती करोडीची बेरीज धपका टाकिला आहे.

—म. शि. यां. का. पृ. ६४८

धबक, धबका—मार धपका. धक्का, टप्पा.

१ धारराव सिंदे यास गोली पाठीस लागली परंतु थोडी धबक बसली निवायेवढा गोळा मात्र आला. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ४९

२ मिरु नागारचीस गोळीचा धबका लागल्याचा मजकूर लिहीला तो कळला. —ऐ. ले. सं. ३५०६

धमक—धमकी; जाब.

विसाजीपंतास व तुळजोपंतास यैसी बरे प्रकारे धमक देऊन ताकीदपत्रें महाराजांचीं पाठवून द्यावी की उत्तम प्रकारे यांचे रुपये देणें नाहीतर हुजरे येतील आणि तुम्हास श्रमी करतील.

— वै ४ स.१७४५ पृ. ३७

धमक—ईर्षा; अवसान.

आजी ४ दिवस आमच्या घोड्यावरील जीन निघत नाहींत. शत्रूची धमक फार दिसते. —ऐ. ले. सं. ४१३२

धमणें— (?) फुंकणें किंवा फुंकणीनें फुकणें. धमनी—फुंकणी.

क्रियेनें फार सोनें करावें अची इच्छा दमाजी गायकवाडांनीं धरून खंडी मणाची मूस करून पारा सोमल मुशींत भरून जातीनें दमाजी धमावयास बसले. फकीर जिन्नस घालून धुमाळा उठतांच झाड्याचे मिषानें निघून गेला. खोलीचें दार कडी आंतून लावून घेवविली, त्यांत धूर सोमलाचा लागून डोळे जाऊन आगींत पडून दमाजी शांत जाहले.

—काय. प्रभु. इ. सा. पु. १ अं. ९ पृ. ५१

धमधमा—उंचवटा; तोफा चढविण्याकरितां केलेला चबुतरा.

१ वसईकडील वर्तमान तरी मोर्चे लागले आहेत. दोन तीन सुरंगाजवळही गेले आहेत व पांच धमधमे तयार जाहले आहेत.

—ब्र. च. पृ. ८९

२ मोर्चे निकडीनें चालतात. धमधमा तयार होत आहे.

—ऐ. ले. सं. २००५

धमाका—तोफेचा एक प्रकार.

अवतरणासाठीं होका शब्द पाहा —पे. द.

धर्मद्वार मागणें—जिवास अपाय न होईल अशी हमी मागून घेऊन पळून जाणे.
गुलोलीं आज शनवारी मध्यरात्रीं धर्मद्वार मागोन निघोन गेले. दोन गढी आणीक सुटलीं. दोन राहिली तेहि आज सुटतील.

—राजवाडे १ पृ. ३५५

धर्मपुत्र—दत्तक.
रघुपतराव राजेबहाद्दर वारले. त्यांस धर्मपुत्र दुसऱ्याचा द्यावा तें राजेश्री नाना असतांच राहिले. —ऐ. ले. सं. ४९९०

धर्म वाटणें—धर्म करणें; धर्मादाय देणें.
पोटी पुत्रफल नाहीं म्हणोन पुत्रयाग केला. धर्म बहुत वाटिला.

—बिब पृ. १

धर्मवाट मागणें—जीवदान मागणें, दीन होऊन पळून जाण्यासाठीं मार्गाची याचना करणें.
सर्व फौज भुकेचें मारें मेलीं. ज्यानें हत्यार सोडून धर्मवाट मागितली त्यास वाट दिली. —भा. व. गो. वुं. कै पृ. ३

धरण—१ चोवीस गुंजांचें एक वजन, २ नऊ आणे. —विल्सन
तीन वराही होनाच्या चौथ्या हिश्शाचें नाणें. —रा. व्य. को.

धरणें—उपास; चणचण; अनुत्पत्ती; दुष्काळ.
दाण्याद्रुष्यानें धरणें, परंतु आजपर्यंत कसेंही चाललें.

—ए. ले. सं १५७४

धरणेपारणें—आपला पैसा वसूल करण्याकरितां देणेदाराच्या दारीं आपण स्वतः उपास करीत बसावयाचें व घरांत त्या देणेदारासही उपास पाडावयाचें अशा रीतीनें त्याला हैराण करून वठणीवर आणण्याची जी सर्रास रूढ अशी पद्धत जुन्या काळी होती तिला धरणे देणें म्हणत. तोड पडून पैसा वसूल झाल्यानंतर दोघे उपवास सोडून जेवीत त्याला पारणें म्हणत सर्व मिळून **धरणे** पारणें.
१ पुढें शिद्याकडील पांच लक्षाचा तगादा लागला. धरणे पारण्याचा प्रारंभ झाला. शेवटीं रामचंद्र शिवाजीकडून अडीच लक्ष रुपये पटवून दिल्हे तेव्हां तगादा कांहीं शम (शमन) जाला. —हो. कै. पृ. १२८
२ नबाब मुजफर्जंग याचेथे (याचे येथे) आठ दिवस शिबंदीनें दंगा करून धरणीपारणी फार जाली कांहीं तबा राहिला नवता.

—पे. द. २८ पृ. ७५

धरती—धरण्यासारखी, जमा होण्यासारखी.
आम्ही आपले उपासानें व सिबंदीनें हैराण आहों. आम्हापासी पैकाहि नाहीं. फौज कांहीं धरती नाहीं. —पे. द. १६ पृ. ९५

धरती उदक—उदकदत्त, दान दिलेली जमीन.
धरती—जमीन, उदक घालून दान दिलेली.
बाळ किसन त्रिवाडी यास पूर्वी दलेलसिंग हाड्यानी धरती उदक विघे सुमार ५० मौजे अरनिठा येथे दिली होती.
—शि. शा. इ. सा. भा. १ पृ. १८०

धरनधुरन—धरणेपारणें.
त्याहीमध्यें आपण याहासी (यांसी) धरनधुरन केले दोन उपोशन आहा (आम्ही) केली.
—पुरं. द. भाग ३ पृष्ठ ९३

धरबंद—बंदोबस्त, उपक्रम. सूतौवाच, व्यवस्था, आळाबांधा, करार, मनोधारण, सूत्र जोडणे, वशिला लावणे.
१ यास्तव नासरजंग यांजकडील धरबंद करावा या उद्देशे मुरारराव याणीं मुजरद पत्रें स्वामीकडे रवाना केली आहेत.
—पे. द. २५ पृ. ५५
२ तेवढी मनोळी हवालीं केल्यावर त्यांनीं तुमचे खेड्यास घेऊं नये, येणेंप्रमाणें धरबंद करून देतों.
—ऐ. ले. सं. ६९५६
३ दरबारचा धरबंद करणे तो आपले विचारे करावा यैसा मातोश्रीचा हेत मन:पूर्वक आहे.
—पे. द. १२ पृ. ८२
४ बालंभट प्रथम उपाध्यायासी धरबंद करून त्याजकडून राजश्री कान्होजी आंग्रे, सरखेल याचा काल जालियावर सेखोजी आंग्रे याजवरी रघुनाथजी परभू होते ते समयीं त्याजवल साक्ष दिली कीं वतनी दोतर्फाचे कुलकर्णाचे कागद आपल्यापासी होते ते राजक्रांतीनें गेले कुलकर्ण आपले वतनी म्हणून साक्ष पुरवून परभू परभू येक (होऊन) सरखेलीचे पत्र करून घेतले.
—पे. द. ३१ पृ. १४१
५ ज्या समयीं घाटगे सुटले, तेव्हांपासून धरबंद बोलणारानें केला असता तर ठीक पडतें.
—ऐ. ले. सं. ६६४९

धरबिगार—सक्तीनें वेठीस किंवा बिगारीस लोक धरणें.
—विलसन

धरभार—आटोप. आवाका, कारभार.
आम्ही झासीस आल्यामुळें वेर्थ बुडालों. धरभार कोन्हासहि न जाला.
—पे. द. भाग २९ पत्र नं. १८५

धरसावर—भरंवसा; निश्चय.
श्रीमंतांचा प्रकार क्षणभंगुर; कोणें गोष्टीचा धरसावर नाहीं. शिवाय जवळ उशेपायगतीं विरुद्ध भासविणारे बसलेच आहेत.
—ऐ. ले. सं. ८०८

धरून—पासून (उदा० दिल्लीधरून = दिल्लीपासून)
यैसा नोकर दिल्ली धरून या बादशाहीमधें महताब लाऊन हुडकिलियाने (हि) मिळणार नाही. —E. M. P. पृ. १४३

धसपैंठ—शिरकाव, पायरव. प्रवेश, स्नेह.
१ जाटाकडीलही मामिलतेत राहून कार्य साधून सरदारांचेथेहि (शिंदे होळकराकडे) धसपैठ करावा हा त्यांचा मनोदये दिसोन आला.
—हिंगणे द. भाग २ पृ. ३०
२ अंताजी माणकेश्वर व खानखाना यांजकडील सूत्र त्यांजकडे बहुता दिसापासून आहेच. दुसरे जाटाकडील व वजिराकडीलही बहुत गर्मी ठेवितात. राजश्री लाला नरसिंगदासजीचा व यांचा जोडजोड आहेच. जाटाकडीलही मामिलतेत राहून कार्य साधून सरदारांचे येही धसपैठ करावा हा त्यांचा मनोदये दिसोन आला.
—हिं. द. खंड २ पृष्ठ ३०

धसाव—ईर्षा ? अंतस्थ हेतु; रोंख, जोरा.
मोगल जागा धरून बसला आहे. कूच करावयाचा प्रकार दिसत नाहीं. धसाव बाहेर यावयाचा आहे. याजकरितां मुक्काम, असेंही बोलतात.
—ऐ. ले. सं. २०९९

धाऊ—गलबताचा एक प्रकार.
—कु. आं. ढ. ३७८

धाटा—लढाईंत पागोटें पडूं नये म्हणून पागोटयावरून व हनुवटीखालून कपडयाचा किंवा शेल्याचा पट्टा आवळतात त्याला धाटा म्हणतात. अवतरणासाठीं बदिमाख पोषाख शब्द पहा.
—हो. कै. पृ. १६८

धाडधडसपणा—धाडस.
ही कर्मे धाडधडसपणाची आहेत. केवल आज्ञाप्रमाण म्हटल्यानें कार्य कसें होतें ?
—पे. द. १६ पृ. १३

धाडस—धाडशी, शूर, साहसी.
पानशे यांचे घराण्यांत जयवंतराव फार धाडस असून शरीरानेंहि मोठे बळकट होते. —भा व. स. पा. घ. कै. पृ. ७

धांडोरा—दवंडी, नगारा.
दररोज धांडोरा पिटींत गिलच्यावर चालोन जावें लागतें. त्यासमयीं त्यांणीं (अब्दालीनें) तयार होऊन यावें. तेव्हां फौजा (मराठयांचें घोडदळ) पुढे जात. परंतु तो (अब्दाली) जागा सोडोन चालोन न ये. तेव्हां झुंजास अनुकूल पडलें नाहीं. —भा. कै. पृ. १४

धांत—धांदोटी, चिन्धी.

मोज गोपाचें चिरगुटाची धांत पाठविली असे, तर, गोप तयार करून पाठविणें. —पे. द. १८ पृ. ९५

धातुपोषण करणें—थापा मारून दिरंगाई लावणें, आजचे उद्यांवर लोटणें. काळ काढणें.

तेथून कायेतो हुकूम येई तो पर्यंत आपण धातुपोषण रोज उठोन जातो जातो म्हणतो. —पे. द. ३३ पृ. २८३

धातू—द्रव्य; पैका, नाणें.

आपल्या भरंवशावर येथें दिवस घेत आहोंत. धातूची सत्वर रवानगी व्हावी. खर्चाविशीं खोळंबा आहे. —ऐ. ले. सं. ७१४४

उभयतापक्षी सल्ला झाला ।
पुढें मग महालमुलख कांहीं देतो घेतो श्रीमंताला ।।
ते आपल्याला
कोण सांगतो आता ।
पुढे जे उडेलमातु तेव्हां कळेल की अमके महाल अमके धातु
पडली पांतु नबाबाला ।।

—अनंतफंदी खडर्याचा पोवाडा के. ऐ. पो. पृ. २५३

धांदल करणें—हल्ला करणें, दंगा करणें, छापा घालणें, तसदी करणें.

मागे राजमंडळकरासंमंधीक तोरगलकर वगैरे देऊन आमचे गांवास धांदल केली तेव्हा श्रीमंताचे हुकमावरून कोन्हेरीराव पटवर्धन यानी भवानराव लोखंडे यांस सरंजामसुद्धा रवाना करून तगादा उठवून बंदोबस्त करून दिला. —द. स. कै. या. पृ. ८७

धांदली कारभार—दगेखोर प्रकार.

आम्ही निपाणकराचा निरोप घेऊन गोकर्णयात्रेस गेलो, तेव्हा निपाणीकराचा धांदली कारभार. त्यानी आम्ही यात्रेस गेल्या पाठीमागे आमचे इनामगांव ठाणें घालून कुटुंब बाहेर घातले. जीनजितरावें झाडून घेतलीं. —द. स. कै. या. पृ. ८८

धान धानें; धानी :—दैना.

लढाई बुधवारी जाली. खंदारवालियाची फार धानें जाली. तीनशें चारसें माणूस पडले. —पे. द. भाग ३८ पत्र नं. २४

धानमटी—धान्याची काडी.

मुलुखात कही घालून राशीची शेते व धानमटचा कापून आणून गांव लुटुन आणतात. —पे. द. २८ पृ. २८६

धाम—साथ.

१ पुण्यामध्यें दुखण्याची धाम बहुत आली आहे. सरकारांत शांती केल्या. बळी टाकिले. लहानथोर दुकानदार, बोहारी वगैरे झाडून दुखणें आहे.
—ऐ. ले. सं. ७३३५

२ येथें फोडयांची धाम आली आहे. उद्यां परवां सखूबाईचा ज्वर फोडयांचा असल्यास समजेल. —ऐ. ले. सं. ४८३१

धायेभाई—दायभागी ? भाऊबंद? दूधभाऊ ? एकाच दाईचें दूध प्यालेले म्हणून भाऊ भाऊ ? धाई–दाई.

संग्रामसिंगाचे जेष्ठ पुत्र महाराजा जगत्सिंग यांस राज्याभिषेक केला. म्हणून राऊनगराज महाराजाजीचा धायेभाई यांनी स्वामीस लिहीले.
—पे. द. १४ पृ. २६

धार—बाजू.

हैदर जडेअणवटीस बातेरा दोनी धारे बांधवीत आहे.
—ऐ. ले. सं. १४४९

धार कबूल करणें—हल्ल्यांतली आघाडी कबूल करणें.

किल्ला हस्तगत करणें त्यास प्रथक् धारकरी हशमाच्या सरदारामध्ये नेमिता मशारनिल्हे नावजी बलकवडे याणी मर्दमकीच्या जोमें धार कबूल केली. —शि. च. सा. खं. ५ पृ. १८९

धारकरी सर्वमान्य—आघाडीचें पहिलें मानपान, हक्क.

हल्ली नूतन सरदेशमुखी व सावोत्रा सरपाटिलकी व धारकरी सर्वमान्य तुम्हास व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम करून दिल्हा.
—पुरं. द. भाग ३ पृ. २२

धारकाव—(?)

महारांनीं धारकाव घालावी त्यास आसवद द्यावें.
—ऐ. सं. सा. खं ३ पृ. १२८

(एखाद्याशी) धार घेणें—सामन्यास किंवा मुकाबल्यास उभें राहणें; सामन्यास उभें राहण्याइतकें सामर्थ्यवान असणें.

इराणकरासी (नादीरशहाशी) धार कोणी घेतोसे दिसत नाहीं. जिकडील तिकडे विराम पावतात.
—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १९६

धारण—टेकू किंवा आधारस्तंभ, मोठा खांब.

पुणियात राहावयास घर ४० हात व नव हात रुंद धारणाचे तयार करवणे म्हणून लिहिले यैसी यास लाकूडतोड या प्रांती नाहीं.
—पे. द. ३० पृ. ५०

धारवाडी—होनाचा प्रकार.

सावकाराचें कर्ज घेऊन १४ हजार होन धारवाडी पाठविले आहेत.

—ऐ. ले. सं. २२२२

धारागिरी—वांगणी (गांवाचें नांव)

मौजे धारागिरी उर्फ वांगणी मुरूम खोरे उर्फ गुंजणमावळ यांत आहे.

धारें—छोटेसे गवाक्ष ठेवलेला टेहळणीचा छोटा बुरूज (नगरप्रांती झरोक्यास धारें म्हणतात.)

हैदर नाईक जडे अनवडीजवळ टेकडीवर बातेरी धारे बांधून टेकडीखालीं दक्षिणेकडे लष्करसुद्धां मुक्काम करून छावणीस राहिला.

—ऐ. ले. सं. ९२३

धारेवट—धोरवट, धोरण.

त्यावर पुढील धारेवट मनसव्याचें अंगे बांधून करावें ते सारेच एकीकडे राहात गेले.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १०९

पाटीलबोवांचे म्हणणे कीं हें अगोदर कळतें तर धारेवट बांधून दिला असतां आता मसलतीचें तोंडावर हें करणें बरोबर होणार नाहीं.

—म. शि. यां कां. पृ, ७८

धावड काटा व वाकनकाटा—(?)

मौजे मजकुरी इनामजमीन कास टक्के ९७।। दिल्हे तें देशमुख देशपांडे यांनीं धावडकाटा १५ टक्के व वाकन काटा टक्के २।। येकूण १७।। टक्के जमीन अनुभवीत आहोत.

—शि. च. सा. खं. ५ पृ. १९

धावण निघणें—धावणीस किंवा रक्षणार्थ दौड करून निघणें.

महाराजांच्या लष्करानें गलदगेच्या रानांत ४–५ शें गुरें वळलीं, तेव्हां गावांतील प्यादे व गांवकरी ऐसे मिळोन धावण निघाले.

—ऐ. ले. सं. ६०४२

धावणी—गोव्याकडील प्रभू लोकांना म्हणतात. —विलसन

धावणें—१ स्वारी, २ संरक्षण, ३ पाठलाग.

गांवांतून बाहेर पडले. दावा करावयासी नवलाईच्या टेंकावरी आले तो गावांतून धावणें निघाले आणि हार्जी व सुर्याजी यांसी सांपडून मारिले.

—ऐ. सं. सा. खंड ५ पृष्ठ ६७

यामध्यें जिकडून धावणें यावें तिकडून आगी आलियावर लोक जीव वांचवायांस परकीयांचे पक्षरीं पडतील.

—पे. द. १२ पृ. ७

श्रीमंतांनीं सांगून पाठविलें, कीं 'जाट कोणाचे हुकमानें गेला?' सुभेदाराचे उत्तर गेले काल दरवारीं बोलणें झालेंच होतें त्यावरून तो उठून गेला आतां आज्ञा झाल्यास मागें धावणें करतों.

—हो. कै. पृ. ३०

धावत, धावती--उद्योग, तजवीज. महत्त्वकांक्षा, सामर्थ्य, शक्ति. प्रयत्न, मसलत, प्रकार, कारस्थान, खटपट.

फिरंगी बंदुखा बंदरास माणसे पाठऊन खरेदी करून आणवितो. फिरंगेची सलाबत त्या लष्करावरो बहुत आहे, त्याचाच सरंजाम नीट करावा येणेप्रमाणें धांवतीस लागला आहे. पृ. १०७

फार करून बाबाची मर्जी मजविशी बरीच आहे. नानाची धावत मात्र पुरावी अशा भावें नानानीच कारभार करावयाचा डौल आहे, किंवा कांहीं फिके पडावयाचें तऱ्हेने हें हि लिहून पाठविणें.

--पुरं. द. भा. १ पृ. १८०

आईसाहेब आपली धावत असेल तेथवरी करतींलच (प्रयत्न)

—पुरं. द, भाग १ पृ. १३४

मातु:श्रीचें व कारभारी यांचें ठीक करून द्यावे याच धावतीचा प्रकार आनंदराव रास्ते करितात. --ऐ. ले. सं. ६३०

मुराररराव याचा कारकून करवीरास आणवून आपली पत्रें व राजपत्नीची जाधवराव व मोंगल यास पाठविलीं. तिकडून वस्त्रें यांस आलीं. याप्रमाणें धावतीत आहेत. --पे. द. २८ पृ. ३३५

अस्या प्रसंगांत गोविंदरावजी आले आहेत. हे आपल्या ब्रुद्धियुक्तीनें धावती करणें ते करितात नवी जिनसी तयार करवितात. जागा किल्ल्यांनीं गाडे व तोफा तयार करवितात. बहुतसे साशंक होऊन धांवतींत आहेत. —पे. द. भाग २५ पत्र नं. ७५

स्वामीच्या प्रतापामुळें सर्व शत्रू हतवीर्यच आहेत. सलाबती खादे भयेकडोन जबरदस्ताकडे मुलुक होऊ नये म्हणून लटिकीं धावती करिताहेत.

--पे. द. ११ पृ. ४६

हे आपल्या बुद्धियुक्तिनें धावती करणें ते करितात. आम्हीहि दमाजी गायकवाड यास आणून मामलत विल्हे लावून उलगाडा करून यावयाच्या धावतीत आहों. —पे. द. २५ पृ. ८५

धावा करणें—धावणी करणें, संरक्षणार्थ धावून जाणें.

कोणास दु:ख सांगावे ? श्री देवास संकट आमचें पडलें आहे तो धावा करील. —वै. ४ स १७४३ पृ. २३

धास्तदपट---दपटशा, धाकदपटशा.

यद्यपि येखादे अंतर जाहाले असले तर धास्तदपट करून त्यास बंदावरी आणावा. --पे. द. ३३ पृ. १२

धासण, ढासण—माऱ्याची नाक्याची जागा.

उपरान्त बावा तळ सोडून फौजसुद्धां बाजूस उभे राहिले आपल्या फौजा-

तील लोकांनीं जाग जागा धासणें धरून उभें राहिले होते.

--म. शि. यां. का. पृ. १०३

धिग असणें—क्रुद्ध, नाखूष असणें.

तुम्ही परागंदा होऊनु बाहेर गेलेसि तरी याचे सिरी साहेब धिग असतां येसा हैफ जाहला आतां त्याची द्वाही घेऊनु फरजंद हाती धरुनु सरफराज केला पाहिजे व वेरीस दारानीं ज्यानीं लाधून देऊन सीर कापविले आहे त्यासी गोसमाल देवया साहेबी पाठी राखली पाहिजे.

—शि. च. सा. खं. ५ पृ. २

धिगाई धिगाई—दंगा; जबरदस्ती.

१ देवब्राह्मणाचाहि त्यांनीं उच्छेद आरंभिला आहे. याप्रमाणें धिगाई आरंभिली आहे. —पे. द. ४०, पृ. ६९

२ करवीरकरांच्या पारिपत्यास्तव आम्हींच तिकडे येणार होतों, परंतु इकडे बेरड वगैरे मिळोन धिगाई मांडिली होती, यास्तव इकडे येणें प्राप्त झालें. —ऐ. ले. सं. ३४१२

धिगावणें—गजबजणें, घाबरणें धास्ती घेणें.

नारायणगडास खासा न लागतां जुन्नरकर दोगे खाली मोर्चास ठेविले होते तेच धास्तीनें धिगाऊन संभाजीराजे याचे निशाण घेतलें.

—पे. द. १० पृ. ४२

धिंड भोवंडणें—धिंड ओवाळणें, धिंड काढणें.

उद्यां दोन प्रहरी पुण्यास बुधवारांत कोतवाळचावडीजवळ याचे पांच (पाट) काढून गाढवावर बसवून शहरभर धिंड भोवंडावी, आणि मग हत्तीचे पायीं बांधून मारून टाकावा.

—खर्डा. स्वा. व. पृ. ७

धिंवसा—धीर, आशा.

आपले पत्र आलें कीं आम्ही येतों त्या धिंवश्यानें दिवस काढिले.

—म. शि. यां. का. पृ. ५९०

धीर भरंवसा—धीर, आश्वासन.

असी धीरभरवशाची पत्रें दररोज येक यैसी दोन-तीन पत्रें गाईकवाडास रवाना केली. —ऐ. ले. पा. स्मृ. प्र. पृ. ७९

धुइ—धुकें किंवा धुकट. —पे. द.

धुडावणें—उधळून देणें; धुडकावून लावणें.

१ लढाई होऊन यांनीं त्यांचे १०—२० लोक मारिले. त्यांचा कर्णा व निशाणें आणिलीं. त्यांस धुडावून घाटाखालीं घालविलें. पळोन गेले.

—ऐ. ले. सं. २६७९

२ दिल्लीहून फौज बाहेर निघाली त्यासी युध्यप्रसंग बरासा जाहाला मोंगल मारून धुडाऊन दिल्लीत घातले. मातबर मोगल जिवेच पाच चार मारिले.
—पे. द. ३० पृ. १५३

धुंडाळा काढणें—शोधून काढणें, धुंडाळून काढणें.
रात्रीस लढाईत कोणकोण पडले म्हणून कारकून हवालदार शिपायी मशाली लावून धुंडाळा काढीत आले तों तिसरे दिवशीं सुभेदार उमगले.
—काय. प्र. इ. सा. पु. १ अं. ९ पृ. ५४

धुणींपाणी—ऋणानुबंध, मैत्री. धुणीपाणीचा सोबती—अगदीं सलगीचा मित्र, (म. श. को.)
१ एक पैशास ठिकाण नसतां भिडेसावकाराकडून व बोहरी कापडकरी व गोसावी व जिनगर वगैरे जे जिकडून सामान मिळेल तें मिळवून रावबांनीं लाखो रुपयांचें साहित्य केले. असा पुरुष धुंडल्यानें मिळावयाचा नाहीं. परंतु धुण्यापाण्याचा योग म्हणून साहित्य झाले!
—कायस्थ प्रभूच्या इति० साधनें पुस्तक १ अंक ६ पृ. १०

२ आमचे डोळे झाकल्यावर या उभयतांची तुमची धुणींपाणी असल्यास आमचे नांव राखतील, नाहींतरी जें त्यांच्या प्रारब्धीं असेल तें होईल.
—हो. कै. पृ. ४०

धुतारा—किमया करणारा.
किमयेच्या योगानें हलक्या धातूचे सोनें करावे असे मला वारंवार वाटत असे व ते करण्याचे कित्येक प्रयोगहि करून पाहिले परंतु ईश्वरकृपेनें मला कोणा धुताऱ्याची सोबत लागली नाहीं म्हणून बरें झाले.
—अरुणोदय पृष्ठ ७५ ७६.

धुतोंड, धुताडा—सावकार किंवा राजा यांचा अत्यंत उग्र असा जो दूत, तो. ढालाईत.
बेदरास कळताच धुतोंड शिपाई आले आवळायाला ।
चलवे बम्मन म्हणुन ओढिता अश्रु लागले गालाला.
—ऐ. पो. के. खं. २ पृ. २५४

धुंद—दंगा; गर्दी; अत्याचार.
तमाम मुलख जाळून लुटून खराब केला देवगड प्रांताचेही दोन तीन परगणे शिवणीछपार वगैरे लुटून फना केले. मंडलेकर राजा याणी जोहार करून तो मृत्य पावला. या रीतीनें धुंद त्याणी करून मुलुकाची खराबी केली.
—वै. ४ स. १७४२ पृ. १०

धुंदाई—दंगा.

रघुजी भोसले यानीं वराडप्रांते बहुतच धुंदाई मांडली आहे.

—पे. द. २८ पृ. ४१

धुम, धूम—हल्ला, धावणी. धुमा हें धूमचें अनेक वचन.

खाडीपलाड लोक जाताच चहूकडून धुमाहि आल्या तेच जाऊन मेढचास लागलो.

—पे. द. ३३ पृ. १४१

धुमधाम—(धामधूम शब्दांचा व्युत्क्रम.) धामधूम, दगा.

१ बांडे व गायेकवाड गुजरातेस धुमधाम करतील.

—पे. द. १० पृ. ५६

२ यैसीयासी जाधवापासी चार पांचशे स्वार आहेत ते धुमधाम करून आपला जप्त बसवितील.

—E. M. P. पृ. १७

३ धुमधामेकरितां पावेल न पावेल याजकरितां दुसरी जोडी रवाना केली आहे.

—पे. द. भाग ४३ पत्र नं. ७५

धुमसाधुमसी—धुमस ज्याप्रमाणें कुटतांना खालींवर होतो तसा प्रकार म्ह. प्रत्यक्ष अंगास अंग न भिडविता लांबून लांबून चाललेले हल्ले प्रतिहल्ले.

दयाबहादर जातीने अवसान धरून पाच हजार पठाण हमराह करून (बरोबर घेऊन) लढाई सुरू झाली. एक प्रहर धुमसाधुमसी होऊन शेवटी प्रहर दिवस राहताना घोडीं घातली.

—हो. कै. पृ. १०

धुमा—धामधूम.

पुढें जयसिंग जयपूरवाले यांचे विचारे राजवाडा (रजपुताना) पार होऊन दिल्लीचे आसपास खूब धुमा चौकडे केली.

—हो. कै. पृ. ११

धुरंग—शेत, जमीन ? जमीन मोजणीचे परिमाण ?

१ भोगवटा पुरातन प्राचीनचा लिहिला आहे. त्यास तुमचें वतन पुरातन धुरंग दीड पाव चावर दिलें असे. तुम्हांस १५ बिघे दिलें आहे.

—ऐ. ले. सं. ८१७१

२ मुलखाची जमीन मोजणी करून धुरंग झाड चावर करून आकार केला.

—सभासद पृ. २६

धुरफोड्या—खाणकरी, दगडफोड्या,

धुरा—हद्द, सीमा. —विलसन

धुरा—तोफेच्या एका भागाचें नांव. —विलसन

वऱ्हाणपुरी तोफेचा धुरा मोडून कागवाडावर राहिल्याचा प्रकार लिहीला तो कळला.

—ऐ. ले. सं. ३४८३

घुलई—(?)

आपले बाप बहीरहै खोमणा यांसी कथला मांडीला आहे. धुलई मारीत नाही.
—ऐ. सं. सा. खंड ५ पृष्ठ २०

धूज—महत्त्वाकांक्षा; ईर्षा.

हल्लीं इकडील फौजा आपले जाग्यावर असतां हा गलबा इंग्रजांचा टिपुवर गुजरला, हें मनसब्यास विरुद्ध. तोंडानें बोलत नाहींत, परंतु इंग्रजाचे मगजांतील बोय येती कीं, 'तुम्हीं कुमकेस न आलां तरी काय गेलें? आम्हीं पट्टणसुद्धां घेतों!' हें धूज आहे.

—ऐ. ले. सं. ४३५२

धून—सूर, एकसारखा चालणारा सूर, लक्षणेने पालुपद. दृढ मनीषा.

अबदालीची धून तो यैसी आहे की चमेलपार यांस पिटून उजनीपर्यंत यावे यैसे बहवहे आहेत.
—हिंगणे द. भाग २ पृ. ३९

धूप, घोप—तरवारीचा एक प्रकार. हिला बाक नसतो व हिचें पातें रुंद असतें. हिची लांबी चार फूट तरी असते. पराक्रम केलेल्या सरदार शिपायादिकांचा गौरव करण्याचे वेळीं मोगल बादशहा त्यांस ही धोप देत. हिला 'आसासमशेर' म्हणूनहि म्हणत.

४१ तरवारा, धोपी व निमचे (१२ धोपी २८ निमचे १ सुरा = ४१)
—पे. द. भाग ४५ पत्र नं. ५०

धूम (अनेक **वचन धुमा**)—धाड, हल्ला.

—ऐ. पो. के. खं. २ पृ. ९८

धूर—१ जमीन मोजण्याचें एक माप. २ विश्व्याचा एक-विसांश हिस्सा.
—विलसन

धूल—धुळधाण.

डाहाणु प्रगणीयाची धल रामनगरकरांनीं मांडली आहे.

—पे. द. ४० पृ. १००

धूळदर्शन—धूळभेट.

येसाजी भोसले व सरलष्कर व आम्हीहि आजीच महाराजांची भेट घेतली. अग्रघीयांचीं धूलदर्शनें.
—E. M. P. पृ. ३३

धूळ धुमासा करणें—उद्धवस्त करणें, बेचिराख करणें, लुटणें, पाटावरवंटा करणें, वाटोळें करणें, वर्तुळाकार करणें.

अवतरणासाठीं पुरकस शब्द पाहा.
—हो. कै. पृ. १२४

घेडचा जोड—एक अलंकार विशेष.

—म. सा. छो. ब. पृ. ५४

घेडवाला--जमातदार.

मागें त्याजकडील गदग्याप्पा पाटील म्हणून हजारपाचशे लोकांचा घेडवाला होता, तो सांपडला. जखमी आहे.

—ऐ. ले. सं. ७८७९

(एखाद्यास) धैर्य करविणें—धीर देणें.

थोरांचे आशीर्वादपत्र आलेलें यजमानास सांगून, धैर्य करविलें. श्रीच लवकर चिंता परिहार करणार आहे.

—ऐ. ले. सं. ५६९६

घोटें लावणें--जनावरांना मोठ्या प्रमाणांत औषध पाजावयाचें असतां त्याच्या घशांत जें नळकांडें किंवा फनेल घालतात तें.

कैदी जेवण करीत नाहीं, त्यास जेवण करावें अशी आज्ञा करावी. न केल्यास जबरदस्तीनें घोटें लावून अन्न घालावें लागेल.

—ऐ. ले. सं. ३७४७

घोंडवन--धोंडवाण, घोंडवायन, निरनिराळ्या ३३ पदार्थांची वायनें अधिक महिन्यांत ब्राह्मणांना दान देतात.

छ १४ रोज सोमवारीं रा. नानाफडणनवीस यानी धोंडवन केलें शंभर दीडसे ब्राह्मणास भोजन व आधेली दक्षणा दिल्ही.

—पुणें अखबार भाग ३ पृ. १३६

धोडी—ध्वाडी, गायकांची एक जात २ गायनाचा एक प्रकार.

४७॥ धोडी गाणार आसामी २ यास एकूण सनगें ३.

—इ. सं. पे. द. स. प. मा. पृ. १५७

भांड भाट भालदार भवय्ये । सुस्वर गाती धाडि गवय्ये ।
शिरापुरीचे सदा खवय्ये ।

—प्रभाकर शाहीर ऐ. पो. के.
खडर्याच्या लढाईचा पोवाडा

धोंडेबाजी—धोंड्याचा मार.

बरकन्दाजीखाले दाहावीस माणुस व धोंडेबाजीखाले शंभरेक माणूस नाईकाकडील जखमी झाले.

--पे. द. भाग २५ पत्र नं. ६२

धोत्री—डॉक्टर; शस्त्रवैद्य.

रात्रीं एकाणे सांगीतलें कीं, दुलेखान यास गोळी लागली. तेव्हां धोत्रीकडे घेऊन चालले तेव्हां वाटेंतच काळ झाला.

—पे. द. भाग ४१ पत्र नं. २१०

धोप—रोंख, आवाई, मोहरा, झोक.

१ सारा वाटा चुकवून छबिन्यास व बातमीस दगा देऊन हैदर अचानक

आला. धोप एकीकडील दाखवून कावा करून समूळ बुडवावें म्हणूनच आला होता, परंतु श्रीनें खैर केली. —ऐ. ले. सं. १५५९

२ खासा महाराजच बाहेर निघणार. जावयाची धोप शिराळच्याकडे बोलतात. नंतर कोणीकडे जातात पहावें. —ऐ. ले. सं. ८१२५

३ निपाणीवर जाण्याची धोप घातली. परंतु अंतर्गत बातमी इचलकरंजी-वरच यावें असें वर्तमान आहे. —ऐ. ले. सं. ५१३९

धोप संभाळणें—बाणी, प्रसंग किंवा नड संभाळणें.

मला म्हटल्यासहि मीं ५,००० रु. मुक्ततेसाठीं देईन. आज त्या मंडळी-पासून उत्पन्न होणें कठीण. परंतु (म्हणून) आज धोप संभाळावी. —ऐ. ले. सं. ५२५७

धोरिणता—धुरीणता, पुढाकार.

धोरिणता हरयेक प्रसंगास बाबूराऊ याजवरीच आहे. —पे. द. ३ पृ. ७

धोवभाव—नवरेपणाचा आविर्भाव म्ह. वरचष्मा. आपलीच गालिबता अस-ल्याचा आविर्भाव.

हैदरअल्ली यास श्रीमंतांनीं छावणी केली यामुळें मसलत भारी पडली. परंतु तूर्त तो काटचादाटचानें धोवभाव दाखवून त्यास (आपण) भारी ऐसा विचार त्याणें दाखविला आहे. —ऐ. ले. सं. ८४०

धोशा—नगारा; लक्षणेनें कीर्ति.

तुम्ही नबाबासुद्धां यांचे पाठीवर यावें म्हणजे हे न झुजतां सहजच उध-ळोन जातात ! प्रस्तुत तुमचे आवईचा धोशा असाच आहे. —ऐ. ले. सं. ३२३

धोशा घालणें—छापा घालणे, हल्ला करणें.

त्याची बातमी बारग्यांचे फौजास लागताच एकाएकी जाऊन धोशा घालून खजीना लुटून नेला. —पाणि. बख. पृ. १५

धौस—दौड; स्वारी; छापा.

१ इमादुल्लानीं येकायेकी चेतसिंगावर धौस पाठविली. —नाग १ पृ. ४०

२ भिल्लांचे पारिपत्यास शहरीहून सुभ्याकडून कांहीं धौस गेली यैसे वर्त-मान आहे. —पुणें अखबार भाग ३ पृ. ६९

ध्याजती—फजिती, निर्लज्जपणा.

एखाद्या जागा सेवक जातीनसी खर्च होईल परंतु ध्याजतीनें तोंड दाखवील ऐसें नाहीं. —पे. द. १६ पृ. ६३

ध्वनी (स्त्री लिंगी)—आवाज; वार्ता; तर्क; बोलणें; सूर.

१ मातोश्री यशोदाबाईस वाड्यांतून काढून सिंहगडास पाठविण्याचा बेत आहे. आपणहि (बाजीराव) शहरांत राहू नये, बाहेर निघावें, अशीहि ध्वनी निघते. परंतु अद्याप कोणतें एक ठरलें नाहीं.

—ऐ. ले. सं. ५५११

२ त्यांनीं पत्र लिहीलें तेव्हां तर कोपळ ठाणें गेलें नव्हतें; परंतु कालपासून गेल्याची ध्वनी उठली आहे. —ऐ. ले. सं. ३२४७

ध्वात—सिद्धान्त; करार.

चिरंजीवाचा त्यांचा ध्वात झाला यैसे असोन विश्वासघात करून आठा कोसावर येवोन राहिले व पहाटे वुणगीयावर येऊन घातले.

—वै. ४ स. १७४६ पृ. १३

ध्वाही गाणें—ध्वाडी गवयांचें गाणें.

सहा घटका रात्रपर्यंत चंद्रज्योती, नळे, ध्वाहीगाणें, गवई, हजारों फकीर फकरा, एकच कोलाहल होतो. —ऐ. ले. सं. ६९६४

न

नईस—तिरडी.

नईस न्यावयास ब्राम्हण तेलंग केले. राजवाडे ६ पृ. ५

नक्कारह—नगारा, नकारा.

नक्त आणि निशापाती--रोख भरणा आणि भरण्याविषयीं हमीपत्र.

खंडणी मात्र त्याचे माथां मारिली. रुपया नक्त अगर निशापाती कांहींच होत नाही. —पे. द. भाग ३८ पत्र नं. ६

नक्ब--किल्ल्याला सुरुंग लावणें; सुरुंग.

नक्र—१ आजार २ अपघात.

येथील कलकत्त्याकडील वातमी आली कीं मिस्तर इष्टीन यास काही नक्र होऊन वेडा जाला. —राजवाडे खंड १२ पृ. ११

नक्श—प्रतिष्ठा; लौकिक; कीर्ति; वजन.

१ आपला नक्श राहून योजिला मन्सुबा सिद्धीस पावे ते गोष्ट करणें

—इ. म. २०२

२ व नक्श सर्वांवर अवघ्या हिंदुस्थानाचा बंदोबस्त होऊन येईल

—इ. म. २७४

३ नरगुंदचा मोठा नक्श जाहला. —खरे ८ पृ. ३९२४

नक्श—आकृति; नकाशा.

नक्श—चित्र, पेंटिंग, तसवीर.

नकच—नक्ष, पराक्रम.

तर चिंतामणराव यास कसें करून आणोन अवसान पाहोन नकच करा. देव फत्ते करील. —पु. द. भाग. २ पृष्ठ ११५

नकटा--तीराचा एक प्रकार. या तीराला फाळ नसतें.

नकड—निकड.

मोड मिळेल तशी सवंग महाग घेऊन येथें द्यावी लागेल. यैसी नकड येथील आहे. यास्तव लवकर मोड येईल ते करावे.

—पे. द. १७ पृ. २७

नकलनकान—हद्दपार; घरांतून हाकून लावलेला. जलावतन.

नकश—नक्ष, अब्रू, कीर्ति.

१ महाडावर जाओन आपल्या फौजेचा नकश राहणार नाही.

—पे. द. ३३ पृ. १२९

२ महमदअलीखानास सर्वप्रकार साहित्य पुरवोन त्याचा नकश दिली पावेतो केला. —E. M. P. पृ. ९८

नकशा--योजना.

हुजुरीहून पूर्वी नकश (योजना) इंग्रेजाचे तंबीचा जाहला व हजरत खुदावंद न्यामत यानी सिकाकोल राजबंदर प्रांताचे तसखीर (नाश) करावयाचा अज्म (निश्चय) केला. —पुणें अख० भाग २ पृ. १३४

नकारा—नगारा

जामनेरा जजाला व नकारा निशाण आहे जर पागा येईल तर नकारा निशाण आणूं. —केळकर संग्रह स. ग. जोशी दप्तर

नकारी—नाकारी, वाईट, वांकडी.

त्रिंबकजी डेंगलेकडून लक्ष्मणपंतास आम्हास द्यावा असें बोलणें आलें परंतु मजला विश्वास नाहीं. त्याची (त्रिंबकजीची) चाल नकारी. त्याचे कसें करावे ? त्याचे उत्तर साहेबी दिले कीं तुम्ही अकलवंद आहा नजरेस चांगले येईल तें करावे. --शा. द. वे. पृ ९८

नकाल—नकल्या.

नकाश—नक्षी खोदणारा; हकाक.

नकाश्गार--कोरीव नक्षीकाम करणारा.

नकास काम—कोरीव कलाकुसरीचें काम.

नकाहत—अशक्तपणा.

आमचे प्रकृतीस आतां कांहीं येक आराम आहे परंतु नकाहत फार.

—राजवाडे २२ पृ. २१

नकीब—राजाचे किताब ललकारणारा आणि राजाची भेट घेऊ इच्छिणारास राजासन्मुख नेणारा खास हुजऱ्या.

१ खिजमतगारास आज्ञा केली कीं नकीबास बोलावणें करून हुकूम द्यावा कीं लहानथोर सरदारांनीं तयार होऊन लढाईस चलावें.

—पाणि. बख. पृ. ३६

२ सैनेत फिरे हलकारी ।
नकीब चोपदारी आणिक हुलशारी ।
सैनेनें बांधिल्या कंबरा झालि तयारी । —ऐ. पो. के. पृ. ४२९

नकीबान—नकीब, व्यवस्थापक.

नकुच, नकुंच—क्षुल्लक.

१ तुकोजी होळकरानें उत्तर केलें महापाना वेगळें (दारू पिणे) माणूस वांचणार नाहीं यास्तव नर्मदा उत्तर तीरीं सुटत नाहीं. तेव्हां म्यां उत्तर केलें की सुभेदार! तुम्ही शपथा पुत्रासहित कोणकोणाच्या वाहिल्या आणि त्याचें उतर हें! खासें! सरदार व हे निघाले तेव्हां नकुच गोष्टींवर क्रिया तुमची ठीक न राहिली तेव्हां तुमची शपथ किंवा क्रिया मोठे कामांत राजकारणांत कशी पथ्य पडेल. —हो. कै. पृ. २२०

२ अभिमान नकुंच मानसाचा धरावा! ते वडिलच आहेत.

—पे. द. भाग २९ पत्र नं. १८५

नग—मराठशाहींत कांहीं विशिष्ट वस्तूंची संख्या मोजतांना कांहीं विशेष शब्द वापरीत. उदा० घोडेसंख्या २५ म्हणावयाचे ऐवजीं घोडी रास २५ म्हणत. याप्रमाणेंच बकऱ्यांच्या मोजदादीचे वेळीं बुध, उंटाचे वेळी नफर शब्द वापरीत. त्याचप्रमाणें हत्तींच्या मोजदादीचे वेळी **नग** शब्द वापरीत-

१२०० रु. हत्ती नग १ यासी सालीना, दरमहा १०० रु. प्रमाणें.

—ऐ. सं. सा. खंड ११ पृ, ५४

टिपूकडील वकील एक नग नजर देऊन ठिकाणास उतरावयास गेले.

—ऐ. ले. सं. ४१७५

ढमढेरे याजकडून हत्ती नग १ किंमत ४५०० रु. स विकत घेतला.

—पेठे दप्तर भाग २ पृ. ६६

नंग—प्रतिष्ठा; कीर्ति; ख्याति, पराक्रम.

१ तुमचे नंगनामोश तुमच्या वडिला प्रमाणे व्हावे, हेच स्वामीस अगत्य.

—राजवाडे ८ पृ. १३६

२ त्याप्रमाणें आमचे बापांनीं राजश्री राणवा साहेब नेणते होते त्यास हातीं घेऊन भाऊपणें चालोन नंगनामोश करून सेवा केली.

—इ. म. १८८

३ इतुके दिवस आवे करून श्रमसाहास करून फौजेचा नंग राखिला तैसा पुढें राहणार नाहीं. —पे. द. ३३ पृ. १५१

नगदोशिरस्ता–मराठी राज्यांत निरनिराळ्या रोखीनें वसूल करावयाच्या ज्या पट्ट्या वगैरे असत त्यांचा वरील शब्दानें मोघम उपयोग करीत असत. —विलसन

नंगनामोश—लौकिक, कीर्ति, पराक्रम.

त्यामागें आमचे बापांनीं रावसाहेब नेणते होते त्यांस हातीं घेऊन भाऊपणें चालोन नंगनामोश करून सेवा केली त्यामागें रा. पीरसाहेब लहान असतां आमचे बापांनीं त्याचे नांवे दौलत करून श्रमसाहास बहुतच केला नंग (लौकिक) राखला. —इच. सं. इ. पृ. ३

नगारची—नगारा वाजविणारा.

नगारश—निगारिश, लेखन.

आमेहरबाची येकदिली व येकसूई कसी आहे याचा बयान नगारश काय करावा ? —हिं. द. खं. २ पृ. ७८

नगीन, नगिना—१ आंगठींतला खडा २ उत्कृष्ट अपूर्व अशी वस्तु.

केले तयार समशेर जंग (जहाजाचें नांव) वसई ठिकाणा साचांत ओतून काढिला जसा नगिना ।

—ऐ. पो. के. खं. २ पृ. २१०

नज्दीक—जवळ.

मोहरमचा आशुरा नज्दीक पोहोंचला.

—साने प. या. व. ३८५

नज्म—१ ज्योतिष २ कुंडली ३ तारा किंवा ग्रह.

नजर, नदर—दृष्टि, इच्छा, हाव, अनुकूल्य, निगा.

१ अवरंगजेबास ठायीं ठेवावें हो नजर शिवाजीची

२ नजर भारी! होनाचें नाणें ! लकाराशिवाय (लक्ष संख्येशिवाय) बोलीच नाहीं असा प्रकार.

—खरे ७ पृ. ३२५९

३ विचारास त्या लोकांची नजर पावली नसली तर अवहेलना न करिता गुणदोष बोलावे. —म. रा. आ. १६

नजर अस्मानास जाणें—गर्विष्ठ होणें, हांवभरी होणें.

शत्रूस अस्मानी फत्ते ईश्वरें दिली ! आतां तो गोकाक, मनोळीं हीं दोन ठाणीं घ्यावीं म्हणतो. नजर अस्मानास गेली !

—ऐ. ले. सं. २७६४

नजरआली—(?)

कृष्णराव वल्लाळ यानी जिवाजी रघुनाथ यांस हुजूर पाठविलें व फिदवीनेहि अर्जी लिहिली ते मंजूर नजरआली जाहली.

—पुणें अखबार भाग १ पृ. १०६

नजर एनायत—कृपादृष्टि.

नजर एनायत फर्माऊन —राजवाडे १५ पृ. १३८

नजर करणें—निगा ठेवणें.

संग्रह करावा. याची वरी नजर करावी. —म. रा. आ. २२

नजर गुजराईष करणें—अवलोकन करणें, अवलोकनांत आणणें.

आमचे किताबाविषयीं इतिहासाचा दाखला पेशवे सरकारचे दप्तरीं आहे तो आणवून मेहरबानगीनें नजर गुजराईष केला असतां सर्व आंसाहेबाचे दिलांत येईल. —द. स. कै. या. पृ. १०२

नजर गुजार—परीक्षा, पहाणी.

१ आपण राजियांनीं नजरगुजार करून एक एक माणूस पाहून ठेवावें.

—सभासद २१

२ तसेंच तटसरनोवत जे ठेवणें ते वरे, मर्दाने, कबिलेदार, विश्वासू असे पाहून नजर गुजार करून ठेवीत जावें. —म. रा. आ. २९

नजरज्यान करणें—नजरा करणें. (मो. वा. चूक. मूळ शब्द नजरन्याज असावा).

काशींत फिरंग्यापाशीं एक शहाजादा होता, त्यास शिंद्यांनीं आणून फिरंगी आपण मिळून दिल्ली अलीकडे ६ कोसांवर खुरशीवर शहाजादेस बसवून तमाम सरदारांनीं नजरज्यान केले.

—ऐ. ले. सं. ४२२५

नजर तोफेंजात, तोहफेजात—नज्राणा.

इंग्रेज नजर तोहफेजातशिवाय सब्वीस लक्ष रुपये दर्साल हुजुरांत देत होते.

—ऐ. टि. १८

नजर दाखविणें—अभिवादन करणें, नजरा करणें.

मग मसनदेवर जाऊन बैसिले तमाम अमीर अकारिवांहीं नजरा दाखविल्या

—पे. द. २५ पृ. ९५

नजरंदाजी—दृष्टिक्षेप, पहाणी.

फीलखान्यातील हथी आणऊन नजरंदाजी करून सात मजली बंगल्यावरते जाऊन अस्मानपर्यंत चवसर खेळून रात्रौं संध्या भोजन केले.

—पुणें अखबार भाग ३ पृ. १०५

नजर धरणें—१ नजर करणें. २ इच्छा करणें.

१ हैदरखानानें निजामअल्ली खानाची भेट घेतली १०१ मोहरा नजर धरल्या. —ऐ. ले. सं. १२८४

२ कदाचित त्याचे वंशजांनीं त्यामागे हरामखोरीची नजर धरली तर त्यास त्याच वृत्तीचे फल होणार. —म. रा. आ. ३५

३ नजरेंत धरणे = पर्वा करणें.

हंबीरराव याणी दिलेलखान नजरेत धरिला नाहीं. —सभासद ६४

नजरन्याज—नजर किंवा नजर करण्याच्या वस्तु, नजराणा.

नजरन्याज जे पाठविली होती ते त्याचेच मार्फतीनें गुजरिली. —पे. द. भाग २९ पत्र नं. १४३

नजर नियाज, नजरनयाज, नजरन्याज—नजराणा.

१ खुर्शीवर शहाजादेस बसवून तमाम सर्दारांनीं नजरन्याज केले. —खरे ८ पृ. ४२२५

२ त्याणी नजरनयाज केली. —दि म रा १ पृ. २७३

३ हल्ली तुम्हाशी भेटीचा पैगाम करितील व नजरनियाज कबूल करतील. —साने प या व ८१

४ श्रीजी डिगेस जाऊन भरतपुरी जाऊन मेजमानी घेऊन शेपन्नास मोहरा नजरनियाज संपादून जयपुरी दाखल जाले. —हिं. द. खंड १ पृष्ठ ७१

नजरबाज—हेर; टेहळणी करणारा. —ऐ. टि. १ पृ. ४४

नजरबलंद—उच्चदृष्टि; कृपादृष्टि.

गरिबावर नजरबुलंद झाल्यानें आपलेंच गांव आहे. —प. द. म. व. १७

नजरमान—नजरेचे मापाने केलेली मोजदाद, डोळ्यानी पाहून केलेला अजमास.

यामध्यें बकाजी कोली व वडगाऊकर मोकदम भेटावयास म्हणोन आले. कारकुनाची मुलाकती घेऊन पानें घेतली तों मागिलीकडे बोंब करून स्वार ३०।४० व पाईचे लोक नजरमान सेपाचसे येऊन येकायेकी वेढा घालून दरम्याने लोक सिरोन कडेगाऊकरांचे खून केले. —शि. च. सा. खं. २ पृ. ११६

नजरमिठारु—मीठ नेणाऱ्या गलबताकडून घ्यावयाची फी. —म. आ. पा. पृ. ५६

नजरमुबारक, नजरमुबारकी, नजरमुबारखी—१ मंगल अभिनंदनपर भेट २ शुभदृष्टि, कृपादृष्टि.

ह्याजपासून नजरमुबारखी घेऊन पुढें मुलुकास कौल सादर केला.
--इ. सं. १ चान्दबिबी १०

नजरमोखरा—नजरनियाज, नजराणा.
त्याकडे जे नजर मोखरा करणें ते रुबरु करवून याचे काम करविलें जाईल. —पे. द. भाग २७ पत्र नं. ८३

नजरमोजना—नजरपहाणी, किंवा नजरेनें केलेली मोजणी.
आपले लोक दाखवावे या करिता तमाम लोक सिद्ध करून उभे केले ते रामाजी आत्माजी याणी नजरमोजना मोजिली ते सवासे दीडसे जाहले.
—पे. द. ३३ पृ. २७८

नजरमोजबा—चौकशी; पाहणी. —वाड स. मा. २ पृ. २३५

नजरयैनायेंत, नजरइनायत, नजरएनायत—कृपादृष्टि.
तरी साहेबी नजरयैनायेत करून आपली पटेलगी आपले दुमाले करावया रजा (परवानगी) होय. --शि. च. सा. खंड ५ पृष्ठ १६६

नजरेनें पहाणें—आढळांत येणें.
कोणाचीहि हिंमत दरमजल जाऊन पोचतीलशी नजरेनें पाहिली नाहीं.
—पे. द. भाग २९ पत्र नं. ३७

नजरेस येणें—पसंत पडणें.

न जाणून— न जाणों.
न जाणून कोण समय कसा. —पे. द. भाग ३८ पत्र नं. ३

नजाफत—सुबकपणा.
नजाफत व कारागिरी व चांगली वस्त पूर्वी आपण पाहिली आहे, तशी आतां कांहीं दृष्टीस पडत नाहीं. —ऐ. टि. २९६

नजावत—उमरावी, उदारता, महत्त्व.

नजाला--डोळ्याचा रोग.
नवाबास नजाला जाला आहे. बाहेर वसत नाहींत. येकांत खाली बसोन कार्यभाग (कारभार) करीत आहेत. —पे. द. ३० पृ. ८९

नजीक; नझ्दीक—जवळ; सन्निध.
१ नजीक नदी.
२ नजीक समाधी (समाधी जवळ) —राजवाडे १५ पृ. २५२
—राजवाडे १५ पृ. १५४
३ आजी तागाईत दूर कर्नाटकांत होतों हाली नज्दीक आलों असों.
—राजवाडे १५ पृ. २१
४ ते तर्फेस मैसूरकराचीही सर्हद्द नज्दीक़ आहे.
—इ. म. ६६

नजीब—१ बिनकवायती पायदळ शिपाई. हे बंदूक-तरवार घेऊन लढत. ते पहारेकऱ्याची वगैरे कामें, कमी दर्जाचीं समजून कधींही करीत नसत. आपल्या मालकाजवळ नेहमीं राहून, त्याच्या करितां लढून जीव देण्या-सही मागें पुढें पहावयाचे नाहीं असा या नजीबांचा बाणा असे. मराठी लष्करांतील एकांडे मानकऱ्यासारखेच हे. फरक इतकाच की, एकांडे मानकरी हे घोडेस्वार शिलेदार असत, तर हे मोगल बादशाही लष्करां-तील नजीब पदाती म्ह. पायदळ असत.

नजीर—१ देखरेख करणारा, २ तपासनीस.

नजुमी--ज्योतिषी.

नजुमियास बोलावून साअत (मुहूर्त) पांच घटका रात्रीची ठरली.

—राजवाडे ५ पृ. २७

नजूम—ज्योतिष; ग्रहस्थिति.

आमचे येथें नजूम विशेष करून जाचून पाहण्याचा सांप्रदाय नाहीं.

—राजवाडे ७ पृ. १९३

नटनागर--घोड्याचा एक अलंकार.

असे शहाण्णव कुळीचे मराठे, घोड्यास नटनागर, जरीबादली पाखरा व शिऱ्या व सडका व पायीं तोडर बांधून, घोड्यांस थापटून उभे राहिले.

—पाणि बख. पृ. २३

नणगाडी—(?)

धारवाडास मोर्चा काल लाविले. दबादबे (धमधमे?) सलाबत टेकडी-वरी बांधून ५ तोफा ठेविल्या आहेत. आजि तोफांचा मार अतीशय जाहले मोर्चाचा सामान अतीशय केला आहे. नणगाडी ३०० हे केले आहे. कामाठी दोन्ही तिन्ही हजार आहे. २०० बैलांवरी पखाली पाणी घालतात. पाणी घालून चिखल करून मोर्चा फार त्वरेनें चालवितात.

—ऐ. ले. सं. २८०२

नतीजा देणे--पारिपत्य करणें, शिक्षा करणें, शासन; परिणाम; फळ; शिक्षा.

१ गोहदवाल्याशी काही तह मामला जाला तर उत्तम. न होय तर बळें करुन नतीजा द्यावा. ---चं. चू. द. पृ. ९५

२ कुर्डा घाटाखाली उतरून गनिमासी गाठी घालून नतीजा पावला.

--शि. च. सा. खं. ५ पृ. १९१

३ त्या संधींत हैदरअल्ली काबू करून आला त्यास नतीजा दिला.

—ऐ. ले. सं. ८४७

४ त्याणी बिघाडाचा डौल धरिल्यास नतिजा द्यावा, मुकावल्यास जावें.
—खरे १ पृ. २७२

५ सावंतास तुम्ही आम्ही मिळोन नतिजा द्यावा.
—राजवाडे ८ पृ. १३०

नदर—नजर; संधान; संधी.
नबाब तर्वारीस हात घालावयासी गेला ती नदर राजियाने धरून वार केला.
—सभासद २८

नदाभ, नदाफ—पिंजारी. —रा. व्य. को.

नदारद—कुल फडशा.
नदारदची याद दफ्तरची भरण्याची सर्कारचे मोर्तवानसी होती ते मशार-निल्हेनी दाखविली.
—राजवाडे ६ पृ. ५१८

ननवाद—बाल (अल्पवयी). —रा. व्य. को.

नपूषेक, नकुषक—नपुंसक, हिजडा, खोजा.
शिवाजी महाराजानी जेजिया पट्टीविरुद्ध औरंगजेव पातशाहास पत्र लिहिले तें पाहोन पातशाहास पछ्यात्ताप जाला आणि जेजिया पट्टीचा (वसुलाचा) अमल नपुषेक हिजडियांचे स्वाधीन केला.
—म. द. रु. १ पृ. १०२

नफर—व्यक्ति; जण; इसम; हलका शिपाई. उंटाची मोजदाद करतांना वापरावयाचा संख्यादर्शक शब्द.

१नफर मज्कूर हुजूर आल्यावर जें द्यावयाचें तें पावेल.
—राजवाडे ३ पृ. ३८७

२ हिलालखोर साहेबाचा। नफर आहे इतबाराचा। मज राती जागावयाचा। हुद्दा दिधलाजी.
—समर्थकृत दिवटा ३

३ उण्ट नफर पंचवीस. —साने पयाव ३

४ याकरितां उंट नफर ३०० शे चांगले लदु, चौकशीनें खरेदी करून हुजूर रवाना करावें.
—म. द. रु. ३ पृ. १७८

नफराई—नोकरी, चाकरी.
देसमुखपणा नोकर केलिया विलायेति मामुर करील वा नफराई करील तरी बरोये मालुमाति खातिरेस आणून तुमचे देसमुखपण तुम्हासी मोकरर केलें असें.
—शि. च. सा. खं. ५ पृ. ४

नफरागी—नोकरी, चाकरी.
पेठ कालवटेचे सेटियेपण वीठ सेठी वाघ सेठी यानें चालउनु दिवाणीचे नफरागी करुनु लेकुराचे लेकुरी सुखें असावें.
—शि. च. सा. खं. ५ पृ. ८८

नफरी--हलकी सेवा, मोलकऱ्यासारखी भाडोत्री.

लश्कर चाकरी नफरी; काम्रम नाजोगें होणार नाहीं याजकरिता जावें. तरी खासा लष्कर घेऊन जावे.

साहेबी आपणास हाती धरून पांढरीवरी बैसवून आपल्या हाते नफरी घेतली पाहिजे. —वाड सनदा १८४

न फावणे—उपयोग नसणें, जरूर नसणें.

दसरा आलीकडे मामलीयेतीच्या सनदा आम्हास पोचतील तरी मामला विल्हेस, लागेल मागाहून सनदपत्र आलिया आम्हास फावत नाहीं,

—वै. ४ स. १७४२ पृ. १७

नफी—रद्द; बडतर्फी.

यामुळें शंकरराव याजवर दौलाची मर्जी खफा होऊन तालुकियाची (अधिकाराची किंवा संबंधाची) नफी करविली.

—राजवाडे ७ पृ. ७२

नफूस—माणसें.

नफेरी—एक प्रकारची तुतारी.

सनया नफेरिया बुरंगें. —मुक्तेश्वर, वनपर्व १२५९.

नफेरी--एक चर्मवाद्य. पडघम. —रा. व्य. को.

नब्विस्यह—प्रेषितासंबंधीं.

नबादीज—(?)

चाकण किल्ला शके १२१२ वरया अरब याणी बांधली नबादीज करुन मुलूख करून तेथें होता त्याणे मसीद बांधली असे.

—पुरं. द. भा. ३ पृ. १२९

नबाबात--वजिरी

सादत कुलीखानास नबाबात सांगितली.

--पारसनीस ब्र. प.६६

नबीरगान---(अ) नबीरह, नातू.

नबीशहा दुर्ग—पन्हाळ्याचे औरंगजेबाने १७०१ सालीं केलेलें नवें नामकरण.

--म. दि. ४ पृ. ११७

नम्दा, नमदा—लोकरीचा रांधा करून दाबून लाटून तयार केलेले जाड कापड; फेल्ट, जाड बुर्णूस हत्तीसाठी किंवा घोड्यासाठीं वापरावयाचे.

१ हत्तीचे गाशे व नम्दे व भार्कस वगैरे आहे नाहीं पाहोन नवे तयार करावे. —खरे ७ पृ. ३३४७

२खोगरे व नमदे वगैरे फुरसाव्याचे (फर्श—बिछायत. त्यावरून खोगीर) सामान पाठविलें आहे. —ऐ. ले. सं. ९०२

नमस—(स्त्री.) देवालयांतील मूर्तीचा नैवेद्य इत्यादिकांचा खर्च करतां यावा म्हणून देवालयाला इनाम दिलेली जमीन.

सेत तुम्हासी वृत नमस करून अभिषेकाबद्दल दिले असे तरी देवाचा अभिषेक पुत्रपौत्रादि चालविणें. —के. सं. भट दप्तर मालवण

नमुदांत आणणें, नमुदात येणे—अमलांत आणणें, अमलात येणें.

१ बापूजीपंत बापट यांजकडून लोकांस तगादे होतात, ते होऊं नये; हे सर्व प्रकार मशारनिल्हे यास लिहावे. त्याणीं रा. नानांस विनंती करून नमुदांत आणावे. ––ऐ. ले. सं. ५७१९

२ गमाजी पाटील हे मानाजी गायकवाड याजकडील बोलणे बोलावयासी नानांकडे आले आहेत. जाबसाल सुरू जाला आहे. नमुदात आल्यावर सेवेसी लेखण केले जाईल.

—पुणे अखबार भाग ३ पृ. ९३

नमुदास—मुकाबल्यास.

उद्यांपासून २ हजार फौज मोंगलाच्या नमुदास प्रातःकाळींच पाठवीत जावी. —पे. द. भाग १ पत्र नं. ७७

नमुदास आणणें––सुप्रतिष्ठित करणें.

आमचे मनास वाटतें कीं आपण एक लक्ष धरून गर्भवासी श्रीमंतांची आज्ञा या क्रमावर दौलत नमुदास आणली ते पक्षी मुर्गीस बिसमिल्ला तो कशास ? आम्हीच आपली फौज जमा करून बोरघाट धरावा.

नमुदी—रोंख. ––हो. कै. पृ. ७७

ज्याजवर नमुदी असेल त्यास शामील होऊन त्याचा बचाव करावा.

नमूद (पु. स्त्री.) निर्दिष्ट; नोंदलेली; प्रसिद्ध; प्रसिद्धि; जाहिराणा. —राजवाडे ७ पृ ९

१ दौलतीस धक्का बसलियावर प्रस्तुत दुन्याईत नमूद तुम्ही व्हाल.

२ स्वामी ज्यास हातीं धरितील त्यास नमुदात आणतील. —राजवाडे ५ पृ. ३९

३ एक कारभारी व हिमतीचा मनुष्य नमुदास येत नाहीं. —राजवाडे १ पृ. १५४

४ आतां निश्चयच जाहला की इंग्रजाचे नमूदीस बाकी राहिली नाहीं. —दि. म. रा. १ पृ. ६७

५ बाकी तुम्ही विचक्षण रजाचा गज करून नमुदास आणाल हा मज भरवसा. —खरे ८ पृ. ४३५३

—हो. कै. ७

नमूद—उपस्थिति, हजीरी.

श्रीमंत तुंगभद्रा उतरल्यानंतर मग तुम्हांस निरोप होणार नाहीं हेंही खरें. परंतु त्या गोष्टीस अवकाश फार आहे. आम्हांसही वातमी आहे. इकडे कामही फारसें, परंतु हैदरनाईक बाहेर निघतांच चौघे चौकडे रोंख सोडून गेले (असें होईल). नमूद कांहीं दिवस असल्याने लौकीक नक्ष (राहतो) आणि मनसब्याचे गोष्टींत आपणांस सर्वही कळतें.

—ऐ. ले. सं. १७१९.

नमूदन—१ दाखविणें, २ करणें.

नमूदह—१ दाखवून २ करून.

नमूनह—नमुना, आदर्श.

नर्दबान—तट चढून जाण्यासाठीं केलेल्या शिड्या.

नर्मीना (पु.) मऊ तलम उंची रेशमी कापड.

नरगष—मूळ शब्द नरगिस, कांद्याच्या रोपासारखें एक झाड. त्याचें फळ वाटीच्या आकारासारखें असतें. कवि या फळाची डोळ्याला उपमा देतात.

दिल्लीहून नरगषचे कांदे आणविले आहेत. आल्यावर सेवेशीं पाठवून देतों.

—ऐ. ले. सं. ८१५५.

नरगा—दंगा, हल्ला, मोहीम.

दिवस थोडे राहिले यांतही सर्वांनीं नरगा एकच केल्यास काम तमाम (समाप्त) होऊन नफे फार होतील.

—इ. सं. है. टि.

नरतबेला—१घोड्यांची पागा की जींत एकही घोडी नसते (सगळे नर किंवा वळू घोडेच असतात.)

२ घोड्यातील जाति आहे उ०'कोतल नर कोतवाल घोडें मगनमस्त किंल करीत.'

—प्रभाकर शाहीर.

अवतरणासाठीं बेबस शब्द पाहा.

—हो. कै. पृ. १७५.

नरद—सोंगटी.

नरनाल—एका माणसास वाहून नेतां येईल अशी लहानशी तोफ.

नरसिंह सिक्का—रुपयाचा एक प्रकार.

शिवाजी विठ्ठल विंचुरकर यांनीं येवले पेठेंत एक टंकसाळ स्थापून नाणें पाडणें सुरू केलें त्या रुपयांवर तुळशीच्या झाडाचें चिन्ह असून त्यास नरसिंह शिक्का असें लोक म्हणत असत. ही टंकसाळ दक्षिणेंत इंग्रजी अम्मल होईतों पर्यंत चालली.

—विं. घ. इ. पृ. ११८.

नरी—बकऱ्याचें कमावलेलें कातडें.

(एखाद्यास एकादी गोष्ट) न लागणें—नको असणें; झिडकारणें.

निम्मे स्वामीनी रसद व हामी कबूल करून सनदा घेऊन आम्हाकडे

पाठविल्या तरी दसरेयासी रसदेचा झाडा करून पाठवितो (जर) ते म्हणतील की, गुदस्तास सोड देत नाही, तरी आम्हास मामला लागत नाहीं.
—वै. ४ म. १७४२ पृ. १७

नव्वाब—नवाब, अमीर.

नव—न, नच.

१ यावर प्रतिनिधी यांनीं उत्तर केले कीं तुम्ही नव जाणें.
--पे. द. ३ पृ. १८

२ याउपरी तऱ्ही परगणें मुधोळचे वाटेस नव जाणें.
--शि. च. सा. खं. ५ पृ. २४३

३ प्रतिवर्षी नूतन सनेदचा उजूर करीत नव जाणे.
—राजवाडे खं. ११ पृ. ३४

नवउरुज—नवा उत्साह.

ते समई सखारामपंताचा नवउरुज व मोठे सरदारहि त्याचे यैवयतेत याकरिता सखारामपंतानी हिकमतीने रघुनाथराव यास पुण्याहून काढून दिधले.
—पुणें अखबार भाग १ पृ. १०३

नवकीर्द; नौकीर्द—प्रथम लागवड.

नव कीर्दीस रान कोठे कोठें नांगरीत होते तें काम सोडून या धंद्यास लागले.
—खरे ९५९

नवघण—दोन चार असामींनीं उचलून न्यावयाजोगें जें ओझें त्यास उचलायासाठीं वाशाचा तुकडा बांधतात तो.

चराटे सुताची सहा व सोळंकीचें झाड व नवघणें दोन पाठविली व पाईले दोन.
—पे द. १६ पृ. ४४

(सोळंकी म्हणजे १६ लोकांनीं वहाण्यासारखें ओझें. दगड वगैरे. असा मोठा दगड वहावयाचा असतां तो मोठ्या वाशास बांधून पुढे ८व मागें ८ असे लोक पालखीप्र॥ वाहून नेतात. त्या वाशास व त्याला लावलेल्या शिकाळ्यांस मिळून सोळंकीचें झाड म्हणतात.

नवजवान; नौजवान—१ तरुण; २ अनभिज्ञ; नेणते.

बहुतकरून सर्व नवजवान आहेत. --राजवाडे ५ पृ. ५४

न वजे—न जावे, न प्राप्त व्हावें (वजणे म्हणजे जाणें किंवा प्राप्त होणें).

श्रम आपण करून येस त्यास न वजे. (न व्रजे) हे गोष्ट न करावी म्हणोन कितेक तपमिले लिहीले ते कळो आले.
—पे द. ३ पृ. १८

नवटाकी--तरवारीचा एक प्रकार.

महाराजांनीं गोविंद प्रभु सुभेदारास सिंधुदुर्ग बांधल्याबद्दल प्रासादिक वस्त्रें मंदील नावदी (?) व चादर भर्जरी, तुरा चौकडा व कडी व खासा हुदे-

तील फिरंग जेनवी (जिनोवा येथें तयार झालेली) नवटाकी अति उत्तम देऊन पाठी थापटून बहुत प्रकारें नावाजिलें. --चित्र १३४

नवटाकी--(?) नवटाक वजनाचा म्हणजे अत्यंत कमी वजनाचा पट्टा किंवा तरवारीचें पातें कीं काय ?

महाराजांनीं अफझलखानास भेटावयास जावयाचे वेळीं बिचवा, वाघनख, नवटाकी तरवार मजबुतीनें घेतली.

--म. सा. छ. ब. पृ. २३

नवटाके--शेराचा अष्टमांश भरणारें माप.

नवती—जवान.

आप्पास वन्याबा मेहेंदळे यांचा पुत्र दिला. (दत्तक). त्यास सर्जेराव घाटगे यांजकडील कारकून व नवती २५ इसामी जाऊन आप्पाचे घरीं बसले कीं, पुत्र घेतला त्यापक्षीं सरकारांत ५ लक्ष रुपये द्यावे.

—ऐ. ले. सं. ५३८७

नवदाई—नवदिगर, विरोध, भलतेंसलतें.

जावजी काकडा मुकदम मौजे मजकूर पैका सुरलीत देत नाहीं. नवदाई करितो कुले फितावितो यैसे जाहीर जाहले तरी त्यास ताकीद करावी.

—पे. द. ३१ पृ ९

नवदिगर; नौदिगर—भलतें सलतें, अडथळा, विरोध, अडवणूक.

१ कांहीं नौदिगर करून बिघाड करू म्हणाल तर आम्ही तुमचे रफीक नाहीं. —राजवाडे १ पृ. ५२

२ करार जाहला असता त्यास नवदिगर करावे हें कसें ठीक पडेल.

—राजवाडे ३ पृ. २०६

३ मुलुख तुमचाच आहे. कोणी तुम्हासी नवदिगर गोस्ट सांगेल कीं काये. ?

—पे. द. १७ पृ. ३४

नवनिगादास्त; नौनिगादास्त, नवनिगाहदास्त—नवी फौजबंदी, नवीन ठेविलेली फौज.

परंतु प्रस्तुत नौनिगादास्त करीत आहेत. —राजवाडे १ पृ. ५६

(अधिक अवतरणासाठी पुणे अखबार भाग १ पृ २६५ पाहा)

२ असफजा बऱ्हानपुरी नवनिगादास्त करीत होते, हें वर्तमान तुम्हांस कळलेंच होतें. —हिं. द. खंड १ पृष्ठ २१

नवनिहाल—कोंवळें झाड.

नवरसतारा—उर्फ परळी (किल्ला) --म. रि.४ पृ. १२१

नवरोज; नौरोज—पारशांचा पाडवा.

नवलाव—नवलाईचे किंवा विशेष.

इकडोनहि जें नवलाव अधिकोत्तर वर्तमान होईल ते लेहून पाठवीत जाऊ.
—पे. द. ३४ पृ. ७७

नवली फिरवणें—मोहरा वदलणें; वेइमान होणें.

निजामल मुलक नरखेडावर श्रीपतराऊ भेटले ते पासून किंबहुना श्रीरंगपट्टनापासून नवली फिरऊन वेइमान जाहला आहे.
—पे. द. १० पृ. ५१

नवली बदल खादणें—नवली पालटणें, चर्या वदलणें.

कंठाजी बांडे दाहा हजारानसी येताती. त्यामुळें नवलीवदल खादला आहे.
—पे. द. १० पृ. ६०

नववारद—नवीन आलेला.

—बंदगान अलीनी इंगरेजाकडील मिस्तरज्यान हालन व नववारद इंगरेजाकडील वकील जो आला आहे त्यास साफ सांगावे कीं सिकाकोल मछलीबंदर तालुका वमये किला (किल्ल्यासुद्धां) सोडणें. न सोडाल तर तंबी वाकई होईल.
—पुणें अख. भाग २ पृ. १२८

नवस पुरवणें—नवस फेडणें.

सेनाधुरंधर यांनीं दुखण्याच्या दिवसांत देवाचा नवस केला होता यास्तव गीरड जागा पिराची आहे तेथे नवस पुरवावयास काल प्रातःकालीं गेले.
—नाग २ पृ. १७

नवसारणें, नवसर—नीटनेटके करणें, दुरुस्त करणें. दुरुस्ती.

१ ऐशीयास बदामीचौ जागा अलीकडे टिपूनें नवसारून मजबूत केली होती.
—ऐ. ले. सं. ४११४

२ (मोगलानें) गणेशवागाची वहुत खरावी केली होती परंतु आम्हीं आलियावरी नवसर थला करू (न) पूर्ववत्प्रमाणें केले.
—चं. चू. द. पृ. २३३

नवाजखानी—तीक्ष्ण धारेचें.

नवाजणें—लालन पालन करणें; परामर्श घेणें; स्तुति करणें; पारितोषिकें देणें.

१ त्याणी ऐसा सिष्ठाचार केल्यानंतर याणी त्यासच नवाजिले.
—राजवाडे ६ पृ. ३१४

नवाजश नामा—कृपापत्र.

नवाजस; नवाजीस—वाखाणणी; परामर्श

नवाजी—बोलवा. बभ्रा.

स्वामींनीं राजपुरीस तेथील अनुसंधानी माणस मातबर आहे त्यासी

कांहीं दिल्हे म्हणून नवाजी आहे तवताक कांहीं नाहीं.

--रा. खं. ३ पृ. ३

नवाजी—नवाजीस, सन्मान, गौरव.

तुमची उमेद नवी नवाजी केल्यास करून दाखवाल. पैका मवलक मेळविण्यांत येईल व मुलुख सोडवाल.

—ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ ४३

नवाजीस, नवाझीस--आश्रित, वाढविलेले. गौरविलेले, नांवारूपास आलेले किंवा आणविले गेलेले.

१ आम्ही लोक सरखेलीचें नवाजीस, खावंदाचा (धन्याचा) नकश होई तितके गोष्टीस अंतर किमपि पडणार नाहीं.

---पे. द. ३० पृ. ६९

२ आपलें वडिलावडील यांणीं भोसल्यांची सेवा निष्ठेनें केली आम्ही अवघे जाचक नवाजीस भोसले यांचें ऐसे असतां लक्ष्मणजी खंडागळा याणें खावंदास कितेक बदगोईच्या गोष्टी समजावून आम्हात व खावदात विरुद्ध पाडिलें. --वै. ४ स. १७४७ पृ. ३

३ संताजी घोरपडे पूर्वी महाराजांचे नवाजीस.

—म. रा. चि. थो. रा. ४६

नवाडी—एक प्रकारची नाव.

सिकंदरे याचे बागेंत जाऊन भोजन केले आणि नवाडियांत बसून यमुनेमध्यें सेर करीत येऊन किलेदाखल झाले.

--पे. द. भाग २९ पत्र नं. १६७

नवायें -न होय तें.

मूलुख तीनदां लुटीला. थोर थोर सावकार बंदर धरून बसले आहेत. नवाये (ज्या लोकाना हें करणे झाले नाही तें) ते लोक थोर थोर कबिले घेऊन वेलूरचे आसरेंस जाऊन बसले आहेत.

—ऐ. सं. सा. खंड ६ पृष्ठ २५

नवार; नुवार—पलंग विणण्याची जाड सुती पट्टी.

नवाह—सांनिध्य.

नवाहीस--मुलकास, जनलोकास.

गिर्द नवाह गांव

दरोबस्त गांव बदस्तुर दखणीयाचा लेहावयाचा तमाम नवाहीस जाहीर व तहकीक मोकरर असे. —मा. स. प. मा. पृ. १४०

नविश्तह—१ लिहून २ लिहिलेलें.

ऐ. श. ४५

नविस्तरवाद—पत्र, लिखित.

नासरजंगाचे स्त्रीने श्रीमंतास वीस लक्ष या शर्तीवर देऊं केले कीं, फेरोजजंगाची बलायेश करावी हे नविस्तरवाद सलाबतजंगाचे हातास आली. त्याने नासरजंगाचे स्त्रीस पुसले तिनें साफ सांगितले कीं, हे गोष्ट खरीच परंतु इतका ढवळा करावयास सांगितलें नव्हते.

—हिंगणें दप्तर खंड २ पृष्ठ २१

नविस्ता, नाविस्ता—लिखित; पत्र.

१ याचा नविस्ता आला असेल. —साने प. या. व. ४८८

२ साहेबास, जासूद घेऊन आला ते कागद नावेत भिजले, तो नाविस्ता वजिन्नस पाठविला आहे. —पे. द. ३१ पृ. ९८

नवीसिंदा, निविसिंदा, नवीसंदा—कारकून, लेखक.

१ कारभाऱ्यांनीं खुफिया बातनीकरता नवीसिंदा व हरकारे मुंबई कल्याणास पाठविले आहेत. —पुणें अख. भाग १ पृ. २४९

२ पागेवर सरदार व नवीसिंदे कदीम आहेत त्याजवर नजर तीन लाख रुपये मोकरर करून हरयेकाचे कामाप्रमाणे पट्टीची तकसीम केली आहे (मर्यादा ठरविली आहे) —पुणें अख. भाग २ पृ. १८०

३ एक नवीसन्दा .... दिनचर्येची अखबार लिहिण्याकरितां रवाना करून.

--राजवाडे ५ पृ. १०५

नवेगज—(नगवज)—जवाहीर, दागिने, अलंकार वगैरे.

टिपूनें नवेगज व रुपयांचें व मोहरांचे शिक्के आपले नवें केले. तख्त करावयास लाविलें आहे. —म. शि. यां. का. पृ. ४४२

नवे हुकेरी—होनाचा एक प्रकार.

—ऐ. ले. सं. ५६२७

नश्यत; नशियत—उपदेश, शिक्षा.

रीतीच्या गोष्टी सांगून नशियत करावी, ऐकिल्यास उत्तम.

--राजवाडे ५ पृ. ८७

नश्रुड—एखाद्या क्षुल्लक माणसाचा उल्लेख तिरस्कारपूर्वक करतांना वापरण्यांत येणारें विशेषण.

प्रसंगच प्राप्त जाला तरी नश्रुडास नतीजा धण्याचें पुण्यप्रतापें देतच आहो. —पे. द. ३३ पृ. ५५

नशद--निषेध; पारिपत्य.

आम्हींच चुकलों असिलों तरी तुम्हीं धावडशीस नेऊन काय नशद करावयाची असेल ते केली पाहिजे. —रा. खं. ३ पृ. ७६

नशयत—नशीहत, निक्षून आज्ञा.
स्वामीनीं आज्ञापत्री नशयत केली हे उत्तम जाहले.
--पे. द. ३३ पृ. ९७

नशिस्त—बसला. (नशिस्तन)
नशिस्तह—बसून.
नशीन—आरूढ. **तख्तनशीन**—सिंहासनारूढ.
गादी नशीन जहन नशीन वगैरे.
नशीहतपूर्वक—निकडीचा; निक्षून.
म्हणून नशीहतपूर्वक आज्ञा केली. —साने प. या. व. ६६
नशोकची, नशीकची—लष्करी पोलीस.
नशीकची येऊन लोथ परतोन नेले. --राजवाडे ६ पृ. ४७२
नशोत—नशीयत, निषेध.
दुर्गकर राजे यांनीं परशुरामपंतास बहुत नशोत करून लिहिलें आहे.
—ऐ. ले. सं. १५६७

नष्ट—कपट; बेइमानी.
दुभती म्हैस चांगली मागाहून पाठवित्तों म्हणून पत्रीं लिहिलें होतें, तें तरी कोठें पाठविलीत ? आम्हांसी नष्ट करावें ऐसें तुम्हांस उचित नाहीं.
—रा. खं. ३ पृ. ५

नष्टाई नस्टाई--खोटेपणा, हरामखोरी, फितुरी.
१ तैसेच रा० माहारायाकडे दोन हप्ते येणे त्याची काय गत जाली ते नकळे. ते नष्टाई करिता राहात नाहीत.
--शि. शा. इ. सा. भा. १ पृ. ९
२ राणोजी बर्गे व खेतरोजी आनपट वगैरे कित्येक समजाविसी घेऊन नस्टाई करून मागे राहिले आहेत. अद्याप आले नाहींत त्यांचे पारपत्य केले पाहिजे. —पे. द. ३० पृ. १७९
नस्त—खाडीचें तोंड; खाडीचे तोंडासमोरील मुख्य समुद्राचा भाग.
किनाऱ्यापासून आंत समुद्रांत दूरवर जाणें मानाजी आंग्रे यांची गलबतें माहीमाचें नस्तावर येऊन नाट (भर दर्यात) गेली.
--पे. द. १६ पृ. ७४

नस्तर--शस्त्रक्रियेचा लहान चाकू.
नस्तर मारणे—नस्तरानें लहान काप काढणें.
नस्राणी—ख्रिस्ती, लुच्चा; काफर.
नसणे कडून--नसल्यामुळें.
दलेरजंग तक्तनसीन जाले नंतर सुमारे दोन महिन्याने त्याचा अंतकाळ

जाला. त्यांचे पोटी फर्जंद (पुत्र) नसणेकडून दुसरे वडील बंधू २९ वे खुरशीचे नवाव मुनवरखां गादीनिशीन जाहले. त्याचे पोटीही फर्जंद न होणे कडून (न झाल्यामुळें) इंजानिवास गादीनिषीन केले आहे.

—द. स. कै. या. पृ. २३९

नसब्—कुळी, वंश.

नसरताबाद—उर्फ सागर. (शहराचें नांव)

—भा. व. द. दे. भू. पृ. ३

नसरूड, नसरूट—नस्रूड, फिरंगी किंवा युरोपियन लोकासांठीं वापरलेली शिवी. कोटांतील कांहीं नसरुटाचें कविले रांडा पोरे यैसी घेऊन गलबतात चढलें.

—पे. द. ३४ पृ. १६४

नसल—प्रजा किंवा बीज.

१ किलिचखानाजवली पातशाही नसल आहे यैसेहि खबर आहे.

—पे. द. १० पृ. ८

२ राजाचें नसल नाहीं म्हणोन आईसाहेबानी साफ व सांगितले.

—राजवाडे ६ पृ. ३४९

३ पादशाही नसल यासी व खासा यांस नसीयत केली.

—म. रा. चि. धा. शा. ५५

नसीब—उच्चकुलीन मनुष्य.

नसीम—मंद वाऱ्याची झुळूक.

नसीहत, नशेत—उपदेश, समजावणी, शिक्षा.

१ साम सांगतां नायकत....तेव्हां दंडे सांगावें....यास्तव सबूरीच केली आहे पुढें राजदर्शन जाल्यावरी जे नसीहत करणे ते हुजुरून करूं.

—राजवाडे ३ पृ. ३३२

२ दुर्गकर राजे यानीं परशुरामपंतास बहुत नसेत करून लिहिलें आहे.

—खरे ४ पृ. १५६७

३ हाली तो दुष्ट त्या प्रांते गेला आहे त्या बरीशी नशेदच करणें.

—राजवाडे ३ पृ. २९५

४ फते पावलो व नोकरलोकास धरून नसेती केल्या.

—राजवाडे १५ पृ. २९८

नसीहतशिक्षा—शिक्षा, तंबी.

वासुदेवपंत कानोजीचा वकील आनंदरायानीं आम्हा देखता बोलावून आणून बहुत चढउताराच्या गोष्टी नसीहतशिक्षा करून म्हणो लागले कीं तुम्ही मोंगलाईत याल तर खापर हाती घेऊन भीक मागाल.

—पे. द. १० पृ. ६८

नसेकची, नशेकची—शिस्त किंवा कैद आणि जरब राखणारा लष्करी शिपाई. नादिरशहाच्या सैन्यांत असे हजारो नशेकची असत व लष्करी शिक्षा त्यांच्या मार्फतच बजावल्या जात. या नसेकची लोकांचे आणखी एक महत्त्वाचें काम म्हणजे हल्ला सुरू झाला असतां हल्ला करणाऱ्या जमावाच्या पिछाडीस उभे रहावयाचे आणि हल्ल्यांतून जो कोणी परत माघारा येईल त्यास तावडतोब तेथल्या तेथे ठार करून टाकावयाचें.

नहंग—सुसर.

नहर—पाट; नळ; कालवा.

१ दिल्लीचा नहर दरोबस्त तयार करवून पुन्हा नहर जारी करावा.
—दि. म. रा. २ पृ. ३९

२ नहर शुष्क जाहले ते जारी जाले नाहींत.
—राजवाडे ५ पृ. १११

नहून—एरवीं; तथापि, कदाचित, कोणीं सांगावें ?

१ पहिले श्रीमंत सर्वजाण होते त्यामुळें निभावण्या पडल्या. प्रस्तुत श्री निभावील तें प्रमाण ! नहून तुम्हांस सावनुरास पाठविलें हा दबाव शत्रूवरी चांगला पडला. —ऐ. ले. सं. ८४२

२ खुद्द आपण स्वारीस जावें तरी जातां येत नाहीं नहून शास्तीखानासारखे झालिया काय करावें. —चित्र ८९

नहोन—नहून; एरव्हीं; अन्यथा.

१ अशा तीनचारे प्रसंगांमुळें एकास एक व्यवधान पडून गोष्ट दिनमेकावर आली. नहोन बसल्यास जागा हस्तगत करांवी तरीच सर्वांचा कर्तेपणाचा ठसा. —ऐ. ले. सं. १७१३

२ आतां जिवांत जीव आहे तों चिरंजिवाचे सुटकेची काळजी लागली आहे. नहोन दुसरें नाहीं. —ऐ. ले. सं. २८४९

३ गुंता नाहीं वसईंत ठाणें पडेल. श्रीमंतांच्या येण्यामुळें ४ दिवस अधिक उणे लागतील. न होन बोलण्यांत ठरावांत लढा राहिला नाहीं.
—ऐ. ले. सं. ३७०१

नळी किंवा नली :—१ बंदुक २ बंदुकवाले.

१ दोन अडीच हजार फौज व गाडदी प्यादे मिलोन तीनचार हजार नली त्याजवल जमा जाली. —पे. द. भाग ३८ पत्र नं. १२

२ तेथून कूच होऊन पुढील मुक्कामी गेले तों हिंदुस्थानांतून शिंदे यांची फौज सरदार जिवबादादाबरोबर फौज पंचवीस हजार कंपू दोन, नळी बेवीस हजार व तोफखाना तीनशें यैसे सामोरे येऊन भेटले.
—खडर्याच्या स्वा. ब. पृ. ८

नक्ष—प्रतिष्ठा; लौकिक; वजन; जोरा.

१ खटपट केली तर नक्ष आणि फौजेंतील शिलेदारांस घोडींहि मिळतील. परंतु जपून केलें पाहिजे. —ऐ. ले. सं. ७०५१

२ मावळें व हशमी कोकणें लोक हेच युद्धास पुढें होताती त्यांचें पाठीवर करनाटकी आहेत म्हणून दिष्टावा दाखविताती त्यास यृद्धाचे प्रसंगी मागें गच्छन्ती करीताती! हेच मावळे लोक व कोंकणे लोक युध्यास निभाव होताती. स्वामीचा नक्ष तों मावळे व कोकणें करिताती.

—पे. द. १६ पृ. ९८

नक्ष जमणें—जोरा किंवा वरचष्मा बसणें.

अवतरणासाठीं झामडणें पाहा. —हो. कै. पृ. ८४

नक्षनामोस—नंगनामोश, कीर्ति.

जे चाकरी पडेल ते चाकरीस स्वामीचे पुण्ये करोन चुकू यैसे नाहीं परंतु नक्षनामोस स्वामीचा आहे. जेणेकरून नक्षनामोस होये असे साहित्य रवाना करणार स्वामी आहेत.

—पे. द. ३३ पृ. २२४

नक्षा—नक्त ? रोख ?

आम्हा बरोबर हुंडी सहा हजारांची तेहि सकारली व नक्षा रुपये वीस हजार त्यांची यादी आलाहिदा आहे.

—राजवाडे १ पृ. ३८९

नक्षा—योजना, तजवीज, नकाशा.

१ बापू नानास म्हणाले आतां ही गोष्ट न फोडावी. चुकली खरी. आतां दुसरा नक्षा ठहरावूं. —स. ब. पृ. ३८

२ किल्ले वज्रगड, व बहादुरपुरीयाचा नवा मेढा होत आहे त्याचा नक्षा घेऊन येणें. —पे. द. १६ पृ. ९६

नाइत्तेफाकी—वैर, वैमनस्य.

नंतर सरकार कुंपणीशी व भोसल्याशी नाइत्तेफाकी येऊन आजंठ्याचे घाटावर लढाई जाली. —द. स. कै. या. पृ. ११६

नाईकवाडी—कांहीं पायदळ शिपायाचा नाईक.

—रा. व्य. को.

नाक घेणें—नाक कापणें.

पांचदहा कुटुंबें सांपडलीं त्यांचीं नाकें घ्यावीं, कोणी म्हणतात कीं हात तोडावे, कोणी म्हणतात कीं कोल्हापुरचें दरवाजापाशीं नेऊन बायका मुलें मारावी. ठरतां काय ठरेल ते पहावे.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ४०

नाकंद—शिंगरूं.

—रा. व्य. को.

नाकरेपणा—नाकर्तेपणा; वाईटपणा, नाकारेपण.

इकडून पैका पाठवावा तर सरकारांत ओढ कशी आहे हे तुम्हास माहितच आहे. तेव्हां तुम्हाकडे नाकरेपण येईल.

—म. द. रु. ३ पृ. ६१

नाकाबली—नाकाबिलात, नादानपणा, कर्तृत्वशून्यता.

नित्य गांड्घोडे खर्चाची अनुपत्य जाणोन येथें राहण्यांत आपली पुरे पडत नाहीं. महेश्वरास उठून जावें तर नाकावली येती. तेव्हां ही मसलत कबूल करून दरकूच जयपुरास आले.

—हो. कै. पृ. ८४

नाकाबील—नादान, गैरहुशार.

यैसे न होये जे इंग्रेजाचा परवर्दा नाकाबील म्हणून पसंद न करीत.

—पे. द. ३३ पृ. ७३

नाकार—नादान, कर्तृत्वशून्य.

वाटणीचा तपशील श्रीमंत ४५ शिंदे २२॥ होळकर २२॥ व पवार १० असा ठरला याप्रमाणें प्रकार पाहून उदाजी पवार यास वैशम्य वाटले कीं आम्ही काय नाकार म्हणून आम्हास दहा ?

—हो. कै. पृ. १२

नाकारा, नाकारी, नाकार—वाईट, कठीण अयोग्य, अनुचित, कमजोर.

१ ऐसा नाकार कशास पाहिजे म्हणून दिला.

—राजवाडे ५ पृ. २०

२ वरून जुडी चांगली दिसते परंतु आंत बहुत नाकारी.

—खरे ११ पृ. ६०११

३ दिवस बहुत नाकारे आले आहेत. वंदोबस्त होईल तो दिवस सुदीन.

—ऐ. ले. सं. ७१३४

४ नाकारी तोफा असेल त्यास नेऊं देणें.

—पे. द. भाग २९ पत्र नं. १७२

५ फार नाकारी गोष्ट केली. चिंता नाही.

—पे. द. ४२ पृ. २२

६ शत्रूचा मार भारी, जरब मोठी, व हे स्थल नाकारें. पांच दिवस झुंज मेहेनत केली तीं परस्परें स्वामीस कळेल.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १७८

नाकावर जीव येणें—नाकी नळ येणें, कंठाशी प्राणें येणे, कमालीचे कष्ट पडणे.

नक्ष—प्रतिष्ठा; लौकिक; वजन; जोरा.

१ खटपट केली तर नक्ष आणि फौजेंतील शिलेदारांस घोडींहि मिळतील. परंतु जपून केलें पाहिजे. —ऐ. ले. सं. ७०५१

२ मावळें व हशमी कोकणें लोक हेच युद्धास पुढें होताती त्यांचें पाठीवर करनाटकी आहेत म्हणून दिष्टावा दाखविताती त्यास युद्धाचे प्रसंगी मागें गच्छन्ती करीताती! हेच मावळे लोक व कोंकणे लोक युध्यास निभाव होताती. स्वामीचा नक्ष तों मावळें व कोकणें करिताती.

—पे. द. १६ पृ. ९८

नक्ष जमणें—जोरा किंवा वरचष्मा बसणें.

अवतरणासाठीं झामडणें पाहा. —हो. कै. पृ. ८४

नक्षनामोस—नंगनामोश, कीर्ति.

जे चाकरी पडेल ते चाकरीस स्वामीचे पुण्ये करोन चुकू यैसे नाहीं परंतु नक्षनामोस स्वामीचा आहे. जेणेकरून नक्षनामोस होये असे साहित्य रवाना करणार स्वामी आहेत.

—पे. द. ३३ पृ. २२४

नक्षा—नक्त ? रोख ?

आम्हा बरोबर हुंडी संहा हजारांची तेहि सकारली व नक्षा रुपये वीस हजार त्यांची यादी आलाहिदा आहे.

—राजवाडे १ पृ. ३८९

नक्षा—योजना, तजवीज, नकाशा.

१ बापू नानास म्हणाले आतां ही गोष्ट न फोडावी. चुकली खरी. आतां दुसरा नक्षा ठहरावूं. —स. ब. पृ. ३८

२ किल्ले वज्रगड, व बहादुरपुरीयाचा नवा मेढा होत आहे त्याचा नक्षा घेऊन येणें. —पे. द. १६ पृ. ९६

नाइत्तेफाकी—वैर, वैमनस्य.

नंतर सरकार कुंपणीशी व भोसल्याशी नाइत्तेफाकी येऊन आजंठ्याचे घाटावर लढाई जाली. —द. स. कै. या. पृ. ११६

नाईकवाडी—कांहीं पायदळ शिपायाचा नाईक.

—रा. व्य. को.

नाक घेणें—नाक कापणें.

पांचदहा कुटुंबें सांपडलीं त्यांचीं नाकें घ्यावीं, कोणी म्हणतात कीं हात तोडावे, कोणी म्हणतात कीं कोल्हापुरचें दरवाजापाशीं नेऊन बायका मुलें मारावी. ठरतां काय ठरेल ते पहावे.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ४०

नाकंद—शिगरूं.

—रा. व्य. को.

नाकरेपणा—नाकर्तेपणा; वाईटपणा, नाकारेपण.

इकडून पैका पाठवावा तर सरकारांत ओढ कशी आहे हे तुम्हास माहितच आहे. तेव्हां तुम्हाकडे नाकरेपण येईल.

—म. द. रु. ३ पृ. ६१

नाकाबली—नाकाबिलात, नादानपणा, कर्तृत्वशून्यता.

नित्य गांडघोडे खर्चाची अनुपत्य जाणोन येथें राहण्यांत आपली पुरे पडत नाहीं. महेश्वरास उठून जावें तर नाकाबली येती. तेव्हां ही मसलत कबूल करून दरकूच जयपुरास आले.

—हो. कै. पृ. ८४

नाकाबील—नादान, गैरहुशार.

यैसे न होये जे इंग्रेजाचा परवर्दा नाकाबील म्हणून पसंद न करीत.

—पे. द. ३३ पृ. ७३

नाकार—नादान, कर्तृत्वशून्य.

वाटणीचा तपशील श्रीमंत ४५ शिंदे २२॥ होळकर २२॥ व पवार १० असा ठरला याप्रमाणें प्रकार पाहून उदाजी पवार यास वैशम्य वाटले कीं आम्ही काय नाकार म्हणून आम्हास दहा ?

—हो. कै. पृ. १२

नाकारा, नाकारी, नाकार—वाईट, कठीण अयोग्य, अनुचित, कमजोर.

१ ऐसा नाकार कशास पाहिजे म्हणून दिला.

—राजवाडे ५ पृ. २०

२ वरून जुडी चांगली दिसते परंतु आंत बहुत नाकारी.

—खरे ११ पृ. ६०११

३ दिवस बहुत नाकारे आले आहेत. वंदोबस्त होईल तो दिवस सुदीन.

—ऐ. ले. सं. ७१३४

४ नाकारी तोफा असेल त्यास नेऊं देणें.

—पे. द. भाग २९ पत्र नं. १७२

५ फार नाकारी गोष्ट केली. चिंता नाही.

—पे. द. ४२ पृ. २२

६ शत्रूचा मार भारी, जरब मोठी, व हे स्थल नाकारें. पांच दिवस झुंज मेहेनत केली तीं परस्परें स्वामीस कळेल.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १७८

नाकावर जीव येणें—नाकी नळ येणें, कंठाशी प्राणें येणे, कमालीचे कष्ट पडणे.

फौजेस पांच वर्षे जाली तिकडे राहिले त्यांची दुचित्तें जाली नाकावर जीव आले इतके, फिरोन द्रव्यदर्शन नाही. पोट पुरतें भरणें संकट !

—हिंगणे द. भाग २ पृ. ७३

नाकुस्ती, नाखुस्ती—प्रकृतीची तकार.

नाख—उंटाची मादी.

नाखुदा—जहाजावरचा अधिकारी तांडेल.

नाखोडा—नाखुदा, नाखवा, गलबतावरील मुख्याधिकारी.

—कु. आं. ढ. ३७९

नागफणी—खिळयाचा एक प्रकार. —पे. द.

नागफणी—डालीचा एक प्रकार.

नांगऱ्या—मानकरी; नांगर घालण्याचा मान असलेला पाटील.

वेडे साळोंखे पाटील यांत वडीलधाकटेपणाचा कजिया लागोन इन्साफ पंचमतें होऊन सुलतानजी पाटील वडील नांगऱ्या ठरला राणाजी निम्मेचा भाऊ धाकटा ठरला, तो नांगराविषयीं कजिया सांगत होता, तो खोटा जाहला.

—ऐ. ले. सं. ३४३७

नांगरवाडा—नांगर सोडून गलबतानें केलेला मुक्काम.

सरकारचे खाडियाची नस्ते आहेत त्याजवर नांगरवाडा त्यांनीं आपले आरमारचा न करावा. —पे. द. ४० पृ ५५

नागवण—दंड.

(अवतरणासाठी 'बजाज' शब्द पाहा)

—पुणें अख. भाग २ पृ. ११०

नागवणा—सरकारी दंड

त्याच्या बापानें बाद सांगोन वतनाचे कसाले सोसून त्या दिवाणांत वतनामुळें नागवणा पडल्या त्या दिल्या.

—ऐ. सं. सा. खं. ४ पृ. ७८

नागहान—एकदम.

नागा—उपास; फाका.

१ धारण ३ । ३।। पायली जोरी बाजरीची आहे पोटासाठी जिकीर. येथेही सरकारास कधी नागा होतो कधी निमचंदी होते. कारण की येथें कोणी साऊ, सावकार बरावर नाहीं. —नाग २ पृ. १९५

२ त्याचें घरी चंदीचे देखील नागे पडतात म्हणून तें सांगतात व आपण ऐकतात ! यास मात्र उपाय नाहीं.

—म. शि. यां. का. पृ. ३००

नागावा—नागवणूक; लूट.

१ होळकर जेजुरीहून आल्यावर नागाव्याचें व घोड्यांचें वगैरे मनास आणोन सुटतील तीं सोडवितों. —ऐ. ले. सं. ३०२२

२ शत्रूची फौज आली तेव्हां अनागुंदी प्रांतांत गुळयांस कोपळचे लोक गेले त्यांस नागावा बस्तभावेस केला आहे. —ऐ. ले. सं. ७६६

नाचाखी—बोलाबोली; भांडण.

१ सावकार आम्हांशीं खटखट करूं लागले त्यावरून त्यांची आमची नाचाखी जाहली —ऐ. ले. सं. ८८०

२ हिंमत बहादूर गोसावी व गनीम वेग एक विचारें होते, इतक्यांत समशेर बहादूर देशींहून आल्यानंतर आपसांत नाचाखी जाली. —ऐ. ले. सं. ७९३८

नाचार—लाचार; असमर्थ.

नाचीज—फुकट; अपकीर्ति.

पुरुषार्थ व कीर्ति अर्जणें. रिकामे बैसोन लोकाहातीं नाचीज खाववून काल व्यर्थ न गमावणें. --इ सं. तं. रा. घ. पृ. ४३

नाजर; नाजीर—न्यायाधीशाचा चिटणीस.

नाजरी बाजार—मिनाबाजार.

तमाम पुरुषांनीं घरांत रहावें व बायकांनीं दुकानावर माल विकावा. बायकांनींच जाऊन खरेदी करावी पुरुष मिळून एक पातशहा निगाहबाजी त्या बाजारांत घोडीवर बसून, मोतद्दार खिस्मतगार सुद्धां बरोबर कोणी नाहीं, नसावें. त्याचें नांव नाजरी बाजार. —गो. ख. चि. शा. ब. ६

नाजल—अवतीर्ण.

त्यासही कुराण शरीफ कलामुल्ला किताब नाजल आली; त्यांत दाखला की आतां पैगंबर होणार नाहींत व किताबही येणार नाहीं. —ऐ. स्कु. ले. ६५

नाजिम—व्यवस्थापक.

नाजुक—अवघड.

येथील प्रकार तरी फारच नाजुक जाहला आहे. —ऐ. ले. सं. ७७५

नाट—दूर समुद्रांत. Out to sea; off from the land.

किनाऱ्यापासून आंत समुद्रांत दूरवर जाणें.

मानाजी आंग्रे यांची गलबतें माहीमाचे नस्तावर येऊन नाट गेली. —पे. द. १६ पृ. ७४

नाट—सर्वस्वी नष्ट बेपत्ता किंवा फरारी झालेल्या गांवांतील कुळाची मालमत्ता स्वतःकडे घेण्याचा हक्क.

तरी शिक्का, मानपान, नाट, तश्रीफ, तहरह जें उत्पन्न होईल तें येणेंप्रमाणें खाऊं. बितपशील कलम. —रा. खं. ३ पृ. ५८

नाडगीर—एक वसुली अधिकारी.

नाडेबहुरूपी—दोरावर चालणारे डोंबारी.

नात—नातू.

त्या उपरी भगवंतराव चिंचोरे प्राचीन संमधी (संबंधी) याजकरतां त्यांचे नाताची (वर म्हणून) योजना केली.

—पुणें अख. भाग २ पृ. १९८

नातवान—गरीब; कंगाल; नादार असमर्थ.

१ नारोपंत दाते वगैरे यांजकडील ऐवज फार दिवस ठेवूं नये. वरकड कुळें नातवान असतील त्यांजकडील ऐवज घ्यावा.

—ऐ. ले. सं. ४२२१

२ रयत नातवान असलिया दाणे पैके द्यावे.

—चित्रगुप्त ३९

३ ये गोष्टीस गडकिल्ले तूर्त ना-तवान पडले आहेत त्यांचे बेगमीस दहा हजार रुपये द्यावे. —राजवाडे ८ पृ. ८९

नातवानी, नातवानकी, नातवानगी—दुर्भिक्ष्य, चणचण, वाईट दशा, दुबळेपणा, दुर्दशा, असमर्थपणा.

१ त्या प्रांते गल्ल्याची नातवानी जाहाली. याकरितां थोडाबहुत गल्ला वसूल घेतला. वरकढ उपसर्ग कोणेविसीचा दिला नाहीं.

—पे. द. ३ पृ. ४१

२ परंतु ते आपली नातवानी बहुत सांगतात. यांची पांचशे रुपयांची रदबदल आहे. —खरे ७ पृ. ३५१५

३ नातवानगीचा वक्त आपला व मुलखाचा ऐवज कोठे दिसों नये.

—राजवाडे ३ पृ. ५७

४ याचे नातवानकीचा प्रसंग लिहावा यैसे नाही.

—पे. द. ३३ पृ. २९८

५ आपली नातवनगी फार याबदल आपला बाप माणकोजी बाजी पुसेंसावलीस गेले. —शि. च. सा. खंड ५ पृ. २३३

नातुपणा—कर्तृत्व.

या प्रकारें हिदायेत मोहिद्दीन खानाचें चित्तीं नातूपणाचा (?) अहंभाव होतो. घोरपडे व सेसआपा तो मिलोन आहेत. —पे. द. ८ पृ. ४६

नाते करून घेणें—हक्क मिळविणें, अधिकार मिळविणें.
जर अवघेच कर्नाटक तुंगभद्रेपलीकडील सर्व जिला राजेश्री स्वामीकडोन करोन घेतला तर फारच उत्तम आहे. नाहींतरी कांहींतरी थोडेबहुत नातें करून घेतल्यास ये प्रांती फार दहशत पडेल.
--पे. द. २५ पृ. ३२

नादगिरी—उर्फ कल्याणगड.
—पे. द. ३१ पृ. १४७.

नादर—१ दुर्मीळ; अजब; अमोल, अमोलिक. २ कमयाब, असमर्थ, नादान.
१ गुलगुलीत जशी नादर विरळा. —प्रभाकर ९३
२ साता लक्षांचा तोफामाफे.... बहुत नादर तयार करवून.
--दि. म. रा. १ पृ. ७९.
३ तनु नादर नाजुक कोम, अंगामधे जोम, नूतन कवळी.
—प्रभाकर १८६.
४ हा समय इंगरेजाचे पारपत्याविषयी बहुत नादर प्राप्त जाला आहे.
—पुणें अख. भाग २ पृ. ७४.
५ या गोष्टीस नादर कोण आहे ? तुमचे दबावणीस आम्ही कां भिऊं ?
—ब्र. च. पृ. ४१

नादानगी—मूर्खपणा, अविचार.
बहिरो सिवदेव याणें नादानगी करून तुमच्या घरास दहावीस प्यादे पाठविले, त्यावरुन तुम्ही शक धरून बाहीर गेलेसी.
—शि. च. सा खं. २ पृ. २५३

नादिम,नादीम—जीवश्च कंठश्च स्नेही.
ना-दौलतखाही—अनहिताची इच्छा; अहितेच्छुता.
—राजवाडे ५ पृ. ८

ना-दौलत-ख्वाह—राज्याविषयीं अनिष्ट इच्छिणारा.
नान्-पर्वेशी—संगोपन; पालन. लढाईत कामास आलेल्यांच्या बायकास करून दिलेली नेमणूक.
नानकार—निर्वाहासाठी जहागीर किंवा इनाम.
राजधर गुजर इंग्रजांचें लढाईत तीन चारशे स्वारानसी सामील जाला होता. त्याजवर कृपा करून परगणा मह्रू मोहनी तालुके भांडेरपैकी त्याजला नानकार लिहून दिली.
—म. शि. यां. का. पृ. ४७६.

नान—कुराण; नानकुराण, नानोकुराण—इमान प्रमाण; बेलभंडार, भाकर व कुराण याची शपथ घेणें.

१ नबाबांनीं निखालसपणें नानकुराण द्यावे.

—राजवाडे ६ पृ. ३५८

२ अहद–पैमान व नान–कुरान घेऊन पाठवावे.

—दि. म. रा. १ पृ. ३१

३ जे जे अर्ज आम्ही मध्यस्थावरावर सांगून पाठविले आहेत ते ऐकून सर्व प्रकारे आपलें नानोकुरान करून देतील तेव्हां आम्हीही किल्ल्याखिसी इमान देणे तें देऊं

—राजवाडे ६ पृ. ३५६

४ तेव्हां नजफखानानीं कौलनामा व नानुकुराण देतो म्हणून कबूल केले आहे.

—म. शि. या. का. पृ. १५०

नानपरवेशी—सरकार चाकरीवर कोणी प्राणास मुकला असतां, त्याच्या वायकामुलांकरितां, निर्वाहासाठीं उत्पन्न देतात तें. (उलटपक्षीं, जान परवेशी म्हणजे तहाहयात निर्वाहासाठीं उत्पन्न देतात तें).

संभाजी घोरपडे झुंजांत पडला. तरी कसबे देशिंग त्याच्या नान परवेशीस द्यावें.

—ऐ. ले. सं. ९३७

नानरोटी—नान म्ह भाकर, अन्न. ज्याचेकडून शपथ घ्यावयाची त्याजकडे अन्नाचें ताट किंवा भाकरी पाठवीत त्यास नानरोटी म्हणत.

आपण तेथे आलीयावर गनीमास मारावयाची काये हजत (कठीण) आहे? यैसे निजामानें लिहिल्यावरुन सार्वभौमानें त्यास नानरोटी पाठविली.

—पे. द. १५ पृ. २३

नाफा—कस्तुरीची पेशी असलेला हरणाचा नाभिकोश.

कस्तुरीचे नाफे व विलाईतचे तोफे पाठविले.

—प. द. म. व. ९७

नाफूमाना—(?)

रामचंद्र गोसावी सुरापुरास जाणार ते वसंतऋतूच्या रगाचा व बागांतील गुलाला व नाफूमाना वगैरे नाच रागरंग पहावयाचें चाललें आहे.

—ऐ. ले. स. ७२९३

नाबाद,नो—आबादानीच्या उलट. आबादानी म्हणजे वस्ती, समृद्धि उलट नाबादानी म्ह. वस्ती उठणें नुकसानी होणें.

कृष्णेस पूर येऊन नाबादावी जाहाली.

—पे. सा. पृ. २३७

नाबालिक—वयांत न आलेला.

नाबूत; ना–बूद—नव्हता असा. नष्टप्राय; अविद्यमान; जाया, पराभूत.

१ नजीबखानास नाबूद करावे हें मस्लत त्यांनी केली.

—म. द. बा १ पृ. ६९

२ खरीफ नाबूद जाले व रबीचे बाड जाले.

—राजवाडे २ पृ. २८

३ तोफाच्या आवाजानें पाणी किल्ल्यांतील नावूद जाले.

—म. द बा. १ पृ. २०५

४ रयत शाबूत तर त्यांत आमचे कल्याण ती नाबूद झाल्यास आमची हक्कदारी आम्ही कोठे पाहावी? —भा. व. जु. ऐ. गो २५

५ पळती फौज पाणी पंधरावीस कोस नाबूद —हो. कै. ६४

६ आजी तीन वर्षें परगणे खराब होतात. त्याहीमध्में या प्रांती हींव अतिशय जाले. त्यामुळे रबी व उंस नाबूद जाले.

—पे. द. १२ पृ. ४७

७ ती खबर पातशहास मालूम होताच पातशहा फार कष्टी झाले आणि बोलिलें कीं, तीन सरदार शिपाई चांगले तरवार बहादुर ठार होऊन लष्करसुद्धां नाबूद कोळीयानें केलें!

—द: शि. मो. यांचा इतिहास, पृष्ठ १२

८ नंतर होळकराकडील पठाणांनीं शिंद्याच्या पलटणावर चाल करोन समशेरची लढाई दोन घटकांपर्यंत शिंद्याकडील कंपूवर जाहली. त्यास शिंद्याकडील कंपू नाबूद करोन ते सायंकाळीं वानवडीस शिंदे यांचे हवेलींत मुक्काम झाला. —ऐ. ले. सं. ७५५८

९ शहासखा दरम्यान येत नाहीं हें दरमीयान न ये यास प्रयोजन हे बेमान आहेत. याच्या चित्तांत जे राजा व बारकी व्यंकटराव व श्रीनिवासराव या तघांस नाबूद करावें, या गोष्टीस हे चुकनार नाहींत, यास्तव हे मध्यें येईनात. —पे. द. ४० पृ. १०८

नाभ—तलवारीच्या पात्यावर जे पन्हळ असतात तें.

नाम्ना—नांवलौकिक किंवा गौरव

खडोजी कारंजकर येही स्वामीसेवा करून कृपा संपादून आपली नाम्ना करून घेतली. —मा. स. प. मा. पृ. २०३

—हि: ब. २६१

नाम्वर— प्रसिद्ध.

नाम—श्रेष्ठ, नामदार.

नाम रघुनाथराव पंडित (राघोबा) यांची स्थापना व्हावी हा औदालत (?) यंदाचा आहे. —को. प्रां. पृ. १८७

नामजा—मान ; महत्त्व; ख्यात.

वडील वडिलापासून स्वामीकार्य प्रसंगे धण्यास संतोषी करून आपली नाम—जा संपादीत आलेस. . . .

—राजवाडे ८ पृ १३९

नामजाद; नामजात; नामजादी—नियुक्त; नियोजित; अधिकारी; नेमणूक; जागीर; स्वारी.

१ ते लोक किल्ल्यावर ठेवावयाचे उपयोगी नसल्यास त्यास दुसरे जागा नामजाद पाठविणें.

—वाडसमा १ पृ. २७८

२ तेव्हां त्यांनीं शिकर्यावरी नामजात रवाना केली.

—राजवाडे १५ पृ. ६

३ पुढें लखम सावंतावरी राजियांनी नामजादी केली.

—सभासद ५४

४ किल्ले मज्कुरी हुजूर हशमाकडील लोक नामजादीस आहेत.

—वाडसमा १ पृ. २७९

५ कांहीं नामजादा चारपांच लक्ष रुपये मिळतील ऐसे आहे.

—साने प या व ९४

(एकाद्यावर) नामजादी पडणें— स्वारी होणें.

रुपाई हाटकररावापासी जाऊन राहिली. त्यास हाटकररायावर दादो कोंडदेवाची नामजादी पडली. हाटकरराव मारिला.

—ऐ. सं. सा. खं. ४ पृ. ७४

नामजोग हुंडी—या हुंडीमध्यें पैसे कोणाला द्यावयाचे त्याचे विविक्षित नांव लिहावयाचें असतें.

—स. का. ८९

नामंद—नांव देतात. (नामीदन).

नामदारी—लौकिक.

यामध्यें बुंदेल्यांची फौज टाकून यावे तरी निभाव इतक्या बुनग्याचा कैसा होतो? बुंदेल्यांची फौज समागमें होती. त्यामुळें भारदारीनें चालले. आम्हाबरोबर फौज म्हणावयास एक राणोजी भोसले. कोठे नामदारीस (लक्षणेनें प्रतिष्ठा किंवा मातबरी दाखविण्यापुरते) अगर कामकाजास पाठवावयास व समागमे चालवावयास इतकेच.

—पे. द. १५ पृ. ३५

नामर्दुमी—नामर्दी.

नामा—पत्र; खलिता.

तैमूरशाहानी पातशहास नामा स्नेहवृद्धीचा पाठविला आहे.

—दि. म. रा. १ पृ. २१८

ना-माकूल—मूर्ख; बेवकूब.

ना-माफकत—बेदिली; बेदिल.

१ यासी व त्यासी ना-माफखत पटली.

—चि. रा. २४

२ मुत्सद्दी हे सर्व नामाफकत कोणाचीही चित्तशुद्धता नाहीं.
—दि. रा. १ पृ. २०५

३ नबाब मौसूफ व नबाब बहादूर याची तर्फेन नामाफकत.
—राजवाडे १९ पृ. १६

ना-मुनासब—अयोग्य; अनुचित, बेकायदा.

१ ही गोष्ट हिंदूचे महजबात बहुत ना—मुनासब.
—खरे ७ पृ. ३५६७

२ ही शकल ना—मुनासब जाणन. —राजवाडे १९ पृ. ८

नामुराद—विफल मनोरथ झालेला; इच्छा अतृप्त राहिलेला, हताश.

१ गफरखान पातशहापासोन आला तोही नामुराद होऊन राहिला.
—पे. द. ४० पृ. ४७

२ जयाजी तर मुत्लख नामुराद आहे. —राजवाडे ६ पृ. ६१७

नामुसाअदत—मदत नसणें.

नामोश—कीर्ति.

स्वामीचे राज्य वृद्धीस पावऊन आपलाही नामोश करून घेतील.
—शि. च. सा. खं. ५ पृ. १०१

नामोशी—नामोसी, नामोष, दुर्लौकिक, बेअब्रू.

१ तुम्ही बादशाही खजिना लुटावयास सिद्ध जहाले असतां पुढेमाग आम्हास नामोशी येईल.
—पाणि. बख. पृ. १२

२ स्वामीसेवा घडेल, सेवक लोकांस नामोसी न ये तो विचार ध्यानास आणून वर्तणूक केली जाईल. —पे. द. १५ पृ. ६

३ तें न झाले तर नामोसी पुर्तेपणें आपले माथां येईल. यैसे न करणें.
—पे. द. भाग २९ पत्र नं. ६२

४ फत्ते झाली तर येशास पात्र ते होणार. मागें हटली फौज तर नामोष आपला! —ऐ. ले. सं. ६४००

नामोसी—नामांकित, नांवाजलेले.

तुम्ही लोक कामाचे नामोसी असां, ऐसे खातीरेसी आलें. हा वक्त कामाचा, तरी जावळीस लोक देखील येउनु नेकखोही जाहीर करणें.
—रा. १७ पृ. ३१

नामोहरम—निराश; अपेशी; अयशस्वी; पराभूत.

१ सोबतीच्या लघुपुरुषाच्या बुद्धीस लागोन नसती कल्पना वाढवोन धण्याचा मन्सबा नामोहरम केला. —राजवाडे ८ पृ. १२६

२ हगलवाडीवर शत्रू चालून आला तेव्हां आंतील लोकांनीं सावध होऊन मारामार करून नामोहरम करून दिले. —ऐ. ले. सं. १६२२

नायका—(वायका ?).

खबरदारी करावी ते न केली. गढींत दारू नायका दिवसाचे भक्षावयाचें ऐसे बेवकूफ ! —ऐ. ले. सं. ८८९

नायब; नैब—१ बदली काम करणारा; २ दुय्यम अधिकारी; नैब. मददगार —इस. ३३

नायबत—मुतालिकी.

त्यांची नायबत आम्ही तुम्हास देतों. —दि. म. रा. १ पृ. १०९

नायबमुनायब—नायब; प्रतिनिधि; मुतालीक.

नायबमुनायबी—प्रतिनिधित्व.

नायब–मुनायबी म्हणजे वकील–मुतलकीची गुमास्तगिरी. —ऐ. टि. २ पृ. ८९

नार्यन—घोडा, Stallion.

नाऱ्याच्या तोफा—मूळ शब्द नरनाल. ही तोफ हलकी असून एक माणूस वाहून नेऊ शके (धि आर्मी ऑफ् इंडियन मोगलस् पृष्ट १३५) शुतरनाल गजनाल, नरनाल इ. तोफाचे प्रकार असत. त्यांना सामान्यतः नाराच्या किंवा नाऱ्याच्या तोफा म्हणत

नाऱ्याच्या तोफा पाहाण्य विशी स्वामींनी आज्ञा केली होती. त्यावरून तोफा पाहिल्या. परंतु जंबुरे बांगडी आपल्या कार्याचे नाहींत —पे. द. भाग २५ पत्र नं. १९३

नार करणें—बहाणा करणें.

रायाजी पाटील व लखबा यास हिम्मत बहादर यांजकडे बोलावयास म्हणून पाठविले याणी बोलण्याचा नार करून त्यास धरावा ही बातमी त्यास कळली. नंतर तो तयार होऊन गोटाबाहेर आला तो हे हेर जाऊन पोहोंचले —म. द. रु. ३ पृ. ८१

नारा नाचणें (एक द्याचा)—एकाद्याचा वरचढ पक्ष होऊन त्याचाच गोंधळ सुरू असणें. क्षुद्र लोकांना महत्त्व येणे व त्यांचाच कारभार सुरू असणें.

नारा नाचूं लागला यामुळें सर्व राज्यांत बदवक्र हलकेंपण होईल, कोणी भय मानणार नाहींत. —ऐ. ले. सं. ११९

नाल—बंदुक, बंदूका.

दोन हत्ती व पाचसहा तोफा व नाल वगैरे सरंजाम इंगरेज वेलुरास नेत होते तो समग्र खानमजकुराकडे लुटींत आला. —पुणें अख. भाग २ पृ. १५७

नाल--(?)

मुल्लाना हसनाचें गलबत पनेलीस जात होते. ते आंग्र्यानें फिरवून नेलें. त्याचें नाल व वरें दुसरें घालोन मचु करून काल येथें खाडींत आणिले होते. ते आमचे लोकांनीं वळखिलें.

—पे. द. ३४ पृ. १६४

नालकी—पालखीसारखें एक वाहन; परंतु नालकीचा मान पालखीपेक्षा फार मोठा.

१ या दहशतीने पुरुसमात्रानें दिल्लीचा रस्ता धरला! असेच पातशाई नालखीत बसोन दिल्लीस गेले. मग फौज लुटावयास सुरवात जाहली.

—हो. कै. पृ. १९

२ श्रीमंती राज्यामधी पुण्याची महिमा कशि होती।
कशा नालख्या पालख्या घरोघर फिरती।

—ऐ. पो. के. खं. १ पृ. १५५

३ कितिकांची वाणी मृषा वदुनी हालकी।
धनियास पालकी चाकरास नालकी।

—ऐ. पो. के. खं. १ पृ. ३६९

४ वकील मुतलख व अमीरउल् उमरावची खिलत चारकुवा व जीगा व शिरपेंच व परिंदा कलगीमय लटक व माला मकरवारी व कलमदान ढाल तलवार मोर्चेल नालकी पालखी शिक्केकटयार माहीमरातब, तमनतोग हत्ती घोडासुद्धां बहुत आदरें करून श्रीमंतांनीं घेतलीं.

--ऐ. ले. सं. ४६२३

नालडबा—घोडयांच्या पायांना मारावयाच्या नालांची जुडी. ही चार किंवा अधिक नगांचौ असते.

१ सावजी तुपे याजबराबर नालमेख नालडबे ८० व मेखा ४००० व नालबंद रवाना केला.

—पे. द. ३३ पृ. २९९

२ ६॥ रु. नालदबे २०, दर ३ प्रमाणें —ऐ. ले. सं. २८६८

नालडब्बा—कँनिस्टर आतीचा तोफेचा गोळा.

बेंगरुळांत इंग्रजांस सामान सांपडलें ६० हजार मण भात, २४,००० मण दारू, ५ लक्ष नालडबे, आणि १३० पंचरसी तोफा.

--ऐ. ले. सं. ४५१५

नालतनामा—मो. वा. चूक ? (आलतगमा ?)

पुरातन वजिरांनी याचे नफरागी देखोनु नफर मजकुरासी हाती धरोनु याची मिरासी पेठ मजकुरीचें सेटियेपण नालतनामा करुनु दिले असे.

—शि. च. सा. खं. ५ पृ. ८८

नालबंदी—नोकरींतील शिलेदारास त्याच्या ठरलेल्या पगारापैकीं कांहीं भाग आगाऊ तयारीसाठीं म्हणून देण्याची पद्धत असे तिला नालबंदी देणें म्हणतात. या पैशांतून शिलेदारानें आपल्या घोड्यांना नालबंदी करून तीं सज्ज ठेवावी अशी अपेक्षा असे.

सुभेदार इंदुरास आले. फौजेची दिलजमाई केली तोंडानें मागितली ती नालबंदी देऊन बाजबरसात इंदुरी येऊन हजर व्हावे या बेताने फौज रवाना करून देऊन देवदर्शनास गेले. —हो. कै. पृ. ३५

नालमेख—घोड्यांचें आवश्यक सामान.

घोडीयास नालमेख मुतलख नाहीं चाकरास धडुत पांघरुण नाहीं म्हणून लोकांनी गवगवा केला आहे. —पे. द. १६ पृ. ९९

नालसाहेब—मोहरमांत हुसेनच्या घोड्याचें प्रतीक म्हणून घोड्याचा नाल हातांत घेऊन धांवणारा इसम.

नाला—तोफ, गनाळ.

१ तीन नाला त्यापैकीं दोन पंचरसी हातभर लांब व येक अडीच हात लांब येशा तीन सांपडल्या. —पे. द. ३४ पृ. ४८

२ रोज बरोज तोफांचा व नालांचा मार होतो. —ऐ. ले. सं. २४७

नालिस्त—नालस्ती; चहाडी.

तासगांवकर नाहीं ते नालिस्त लिहितील आणि उपसर्ग करितात. याचा धरबंध करणें. —ऐ. ले. सं. ४६६८

नाली—तोफ. हा शब्द नेव्हल गनचा मराठी अपभ्रंश असावा.

आंग्रे यास व चेऊलच्या कपितानास पत्रें लिहिली होती कीं येकमेकावर नाली न माराव्या तकूब करावें. —पे. द. ३३ पृ. १४०

नालीश—निंदा, चहाडी, तक्रार, फिर्याद.

१ खुबनाई कलवांतिणीची पोर पाठऊन दिली पाहिजे. (दरबारांत) आमची नित्य नालीश होती. —पे. द. ३ पृ. २

२ आपण व बाजीपंत अण्णा व राघोबापूजी ऐशा त्रिवर्गांच्या नालीशी श्रीमंतांशीं सांगून जरबेंत आणावें हाच प्रकार फारसा दिसतो. —ऐ. ले. सं. १७४०

नालीसकुची—आवाडाव, नालस्ती, चहाड्या.

तुम्हीही तेथें तुम्हाकडील असतील त्यांस लेहोन त्याचा अंमल चालेल आणि नालीसकुची न करीत ते गोष्टी करणें. —पे. द. भाग २८ पत्र नं. १३

नांव करणें—सबब सांगणें.

धोंडजी वाघ अनेगुंदी प्रांतीं आहे, त्याचे नांव करून इंग्रज हल्ल्याळपर्यंत येत आहे. —ऐ. ले. सं. ६३३४

नांवकरी—लौकिकवान.

१ ते समई नांवकरी कोण्ही पाग्या मेला त्यावरून प्रथम वासुदेवबाबा मेल्याची अफवा उठली परंतु आता तहकीक ऐकिले की वासुदेवबाबाच मृत्यु पावला. —पुणे अख. भाग १ पृ. २७८

२ वडिल नांवकर मल्हार ऐका गर्दी झाली त्यावरती ।
बेसावध होते परंतु शर्यत केली सरतासरती ।
—ऐ. पो. के. खं. १ पृ. ३५८

नावडतीचें मीठ खारट—(?)

नावडीतीचें मीठ खारट असे, असा आहे परंतु येथें तो आवडतीचेंच मीठ खारट म्हणतात ! असा उफराटा न्याय नसावा.
—धा. प. इ. सा. ३ पृ. १८८

नावनंग—लौकिक, कीर्ति.

१ राजेश्री चिमाजी आप्पानीं खासाच कोंकणांत उतरावे हबसीयास नतिजा द्यावा यांत नांवनंग सर्व गोष्टी आहेत, यैसे राजेश्री बोलिले.
—पे. द. ३ पृ. ११८

२ तेथें साहेबकाम आहे. नांवनंग आहे. हे गोष्ट खरीच आहे.
—पे. द. ३३ पृ. १४९

नावनवेशी, नावनवेसी—नांवनिशी.

इंग्रज वकिलाकडील पाचसहा असाम्या आहेत त्याची नावनवेसी व त्याजबरोबर सरंजाम आहे त्याची याद अलाहिदा करुन पाठविली आहे.
—पुणें अखबार भाग ३ पृ. ३४

नावबनाम—नांवाचे, लौकिकवान, नामांकित.

नवाब निजामत अलीखान राक्षसभुवनावर गंगा उतरून पलीकडे गेले. अलीकडे विठ्ठलदास (विठ्ठलसुंदर) वगैरे नावबनाम सरदार राहिले त्यास जाऊन गाठिले. —हिंगणे द. भाग २ पृ. ४९

नांवबिनांव—नांवलौकिक, कीर्ति, पराक्रम.

बेवीस उमराव पिढीजादे, नांवबिनांव केलेले, तुमच्या दहशतीने आपल्या जागा सोडून फकीर होऊन देशांतरास गेले.
—पाणि. ब. पृ. २०

नांव बुडणें—सर्वनाश होणें. नांव म्ह. होडी. गलबत बुडालें तर आंतील माणसें मालमत्ता सारेच एकदम नष्ट होतें.

या उपरी फार काय लिहावें ? नांवच बुडाली.

—ऐ. ले. सं. पृ. २७८१

नावाकिफ—गैर माहितगार.

(एखाद्याच्या) नांवें पाण्यांत दिवा जळणें—एखाद्यास अशी सद्दी प्राप्त होणें कीं, तेलावांचून पाणी घालूनहि त्यानें दिवा लावला तर तो जळावा. रामाच्या नांवानें समुद्रांत टाकलेले दगड तरंगून त्याचा सेतु जाहला ही रामाच्या नांवाची सद्दी, तशांच अर्थी हा वाक्प्रचार आहे.

तें त्याजविषयीं काय म्हणोन वोभाटा करितात ? असो. आज त्याचे नांवें पाण्यांत दिवा जळतो. काळाची गती विपरीत आहे.

—ऐ. ले. सं. ८८५

नाशायिस्त—नालायक, अयोग्य.

नास्तिपक्षी—अगदी नाहीं तरी, किमान.

बंगालियास फौज पाठविली तिच्या रवानगीस पांच सांत लक्ष नास्तिपक्षी पाहिजेत.

—पे. द. २० पृ. ८१

नासकती—ना शक्ति, कमजोरी, पराजय, अपमान.

१ हिंदुस्थान प्रांती प्रथम स्वाऱ्या विठ्ठ शिवदेव यांनीं केल्या. हरवक्त लढाई परंतु कोणे समयी कधी नासकती ज्या (या) पुरुषाची जाली नाहीं.

—विं. ब. का. सं. पृ. ८

नासमज—अडाणी, नादान.

सेवक युक्तिप्रयुक्तिस चुकला नाहीं. परंतु नासमज माणसाशीं काम पडलें आहे. काजीकोतवालास खातरेस आणित नाहीं.

—पे. द. १५ पृ. ६८

नासरदार:— (?)

पेशजी खंडोजी दाभाडे वगैरे नासरदार संगमनेरावर येऊन उतरले होते.

—पुरं. द. भाग १ पृष्ठ ६३

नासवणी:— अवकाळीं पडून पिकांचें नुकसान करणारा पाऊस.

नासवाब—अशुद्ध. बरोबर नसलेलें. उन्मार्ग.

नासार—अस्वस्थ.

नासियह—तेजस्वी.

नासिर—मददगार.

नासूर—नेहमी वाहणारा व भरून न येणारा व्रण.

नाहक्क—बेकायदा, हराम.

(एखाद्यावर) नाहक घेणें—वालंट, आरोप.

मोंगलाच्या तालुक्याविसी श्रीमंतांनीं थोडसें नाहक त्यावर घ्यावे म्हणजे

आम्ही गंगथडीचा घांसदाणा जेथवर मोंगलाच्या तालुक्यांत हात पोंचेल तेथवर घेऊं. --पे. द. भाग २० पत्र नं. २८७

नाहबी—लूट; जाळपोळ.

नाळ--जहाजावरील तोफ ठेवण्याच्या ठिकाणाचें एक पारिभाषिक नांव. --म. आ. पा. पृ. ५२

निक्रश्य--निकर्श, हट्ट, निर्धार.

आम्हाकडील निक्रश्य देखोन त्यानी मुजरद आम्हाकडे माणूस पाठविले. --पे. द. ३३ पृ. २८२

निक्रष--निकर्ष, निकड.

फिरंग्याचा स्नेह संपादून वर्ते येणार किंवा निक्रष करून मोर्चे चालवून स्थले काईम करणार हा अर्थ लिहिला पाहिजे. —पे. द. १५ पृ. ३८

निकटीचें धरणें—निकडीचे धरणें. निकडीचें धरणें असले म्हणजे धरणेकठू देणेदारास जेऊ तर देत नाहींच परंतु देहधर्मासाठींही जाग्यावरून उठूं देत नाहीं.

महत्पुरी वाघानें वैराग्याशीं पैगम (बोलणें) लावलें की तुम्ही आता धरणें निकटीचे देऊन यशवंतराव होळकर आमचे हातीं द्यावा. —हो. कै. पृ. १३७

निकड—हल्ला.

१हैबतराव गाइकवाड पाचशें प्यादे व दोनशें स्वार असे मिलोन मंगळवार पेठेकडे निकड केली. —इच. सं. इ. पृ. ३०२

२ वाघिनगिरा किल्ल्यावर लोक चढून निकड करून अर्धा किल्ला घेतला. —ऐ. ले. सं. ३४५५

निकर—निकर्ष, निकड.

पदाजी यशवंत राऊ सिवतरकर याणे कितीयेक बेसंगपणाची वर्तणूक केली याबदल साहेबी त्यावरी निकर करून डोले काढून गडावरी अदबखाना घातले. —शि. च. सा. खं. २ पृ. २५३

निकसी—घासाघीस; चौकशी.

असो. चालतें तें चालतें. बारिकाची मात्र निकसी फार होते. —पे. द. ४०. पृ. १२५

निका—चांगला, सुंदर, उत्कृष्ट.

निका--विवाह (मुसल्मानाचा).

निकाह. --दि. म. रा. २ पृ. ९५

निकावत--मोठेपणा.

निकारणी—निरुपयोगी; कचरा.

किल्ल्यावर निकारणी माणूस व गुरें व घोडीं बहुतच आहेत. तीं काढून आणावयास लिहिलें आहे.

--ऐ. ले. सं. ३९३०

निःकारणीक--निष्कारण.

निःकारणीक आतां लष्करांत खर्च खात फिरण्याचें कांहीं प्रयोजन दिसत नाहीं.

—ऐ. ले. सं. १९७५

निकासी—१ निकास. म्ह. बाहेर पाठविणें, जाणें, २ निर्गत होणाऱ्या मालावरची किंवा यात्रेवरची पट्टी किंवा कर.

यास्तव कृपा करून सर्वांस थैल्या पाठवाव्या, कीं, यात्रेचे निकासीविसी (यात्रेची रवानगी) धोंडो खंडेराव सांगतील त्याप्रमाणें यात्रेस उपद्रव न लागतां सुखरुप जाऊ येऊं देणें.

—पे. द. भाग २९ पत्र नं. ११०

निकाहत—आजारानंतरचा अशक्तपणा.

चेतसिंगाचा वकील आजारी होता छ २४ मजकुरी पुण्यांत आला. मंगळवार पेठेत उतरला आहे. निकाहत अद्यापि आहे सबब म्याना व दोन घोडी व उंट वगैरे सरंजाम आहे.

—पुणें अखबार भाग ३ पृ. २०

निकीबदार—नकीब, राजविरुदे ललकारणारा; भालदार.

इटेकरी, पट्टेकरी, हुद्देदार, निकीबदार १००, अंबाऱ्या नव्या ३ असें जुन्नरास पाठविलें.

—ऐ. ले. सं. ४८२३

निःकेवल—निखालस, संपूर्ण, निःशेष.

जरी यानी निःकेवल बकशीकडेच चित्त दिधले तर ते वजीराकडे लागतील. यास्तव वजीराकडीलहि सूत्र हातीं ठेवावे.

—हिं. द. खंड २ पृष्ठ २६

निख्लाब—गवस, पकड.

निखार वोहट—पूर्ण ओहोटी.

मग सायंकाळच्या चार घटका दिवसा निखार ओहट जाहला तेव्हां पश्चिमेच्या खाडीच्या तोंडी बाहेर नांगर टाकून राहिला आहे.

—पे. द. १६ पृ. ५०

निगळणें--निखळणें, उपटून काढणें.

पातशहास लिहीले जे मी येक बिलस्तभर (वीतभर) जमीन देणार नाही. त्यामधें किल्ल्याखालील जागा मराठ्यास दिधल्यानें येक अंगोली-

बराबर दस्तावेज दिधला म्हणजे पोहच्यासुद्धां हात निगळू म्हणतील.
--हिंगणें दप्तर खंड २ पृष्ठ २२

निगा—प्रेम, ममता.

झुल्पुकार बेगमसाहेब इणे औरंगजेब बादशहास अर्ज केला कीं संभाजी महाराज याणी मजवर निगा ठेवली तोच माझा खावंद. इतर पुरुष जितके पृथ्वीत आहेत तितके मज ला औरंगजेब पातशाहासमान. माझें लग्न तुम्ही करूं नये. —म. द. रु. १ पृ. १११

निगादास्त; निघादास्त--१ शुश्रूषा; २ फौजभरती, फौजबन्दी.

१ तूं त्याची निगादास्त करणें. —पे. द. स. मा. ४

२ फौजेची निगादास्त जारी केली आहे.
--दि. म. रा. २ पृ. ९

निगाबानी ; निगेबानी ; निगावानी ; निगेवानी—संरक्षण; बंदोबस्त.

१ शहरची निगावानी मात्र करतात.
—दि. म. रा. २ पृ. १५०

२ निगेवानी शहाणा कोणी योजून ठेवून बंदोबस्त असावा.
--खरे १० पृ. ५५०६

३ हल्ली चहूंकडे चौकी पहारा निगाबानी लश्करांत आहे.
—दि. म. रा. २ पृ १६४

४ वाड्याची व देवाची व वरलचे बागाची तितक्यांतच निगेवानी करणें.
—राजवाडे १२ पृ. १३६

५ मुराररावजीस खिदाडून मुलकातून बाहेर काढून मुलुकचे निगाबानीस महमदअलीखानाचे भाऊ ठेऊं. --E. M. P. पृ. १२२

निगारश--लेखन.

त्याचा दर्जबाब. . . .कलकत्तेकर यांनीं निगारश केला.
--राजवाडे १० पृ. १६४

निगाह-दाश्त—लक्ष ठेवणें.

निगाहबाजी—पाहणारा.

निगेंबान—पहारेकरी, हितरक्षक.

आमचा खाविंद पातशाहाच्या म्हटल्यावर जुंजले असता त्याचे तजविजेनें दक्षणची सुबेदारी मुकरर न केली तर पातशाहाचा निगेबान कोण?
—हिंगणे दप्तर खंड २ पृष्ठ १९

निगेबानी; निगेबन्दी--निगेबानी; संरक्षण.

१ आपलियासी दोन कामें जरूर; एक आपली हद्द कायम राखणें आणि वजिराची निगेबंदी करणें. --राजवाडे ६ पृ. ३८३

२ मालाची निगेबानी.
—वाड. स. मा. २ पृ. ६६
३ आपले समागमी तोफखान्याचे सरदार विस्वासुख गडमजकूरचे निगेबानीसाठीं ठेविले.
—पे. द. भाग २९ पत्र नं. ७३
४ करवीरकर महाराजांनीं ४ मारेकरी आपल्यास दगा करावयाकरितां पाठविले आहेत. सावधता असावी निगेबानीस शहाणा कोणी योजून ठेवून बंदोबस्त असावा.
--ऐ. ले. सं. ५५०६

निघाल्कत—टेहेळणी.
महागिऱ्या निघाल्कतीच्या चलाक ऐशा
—वाड स. मा. २ पृ. ७८

निघोर धोंडा--कातळ.
रायगडाचे कडे तासल्याप्रमाणें, पर्जन्यकाळीं गवत देखील उगवत नाहीं. (किल्ला) निघोर धोंडियाचा दौलताबादेसमान.
—चित्र. ८८

निजगृह—राजवाडा, सरकारवाडा. निज हा शब्द ‘ मोठा ’ ‘ महत्त्वाचा ’ ‘ अत्यंत प्रतिष्ठेचा ’ अशा अर्थीं प्राचीन मराठी वाङ्मयांत शेकडो वेळा आलेला आहे उदा० निजगुज. निजगुह्य म्ह. अत्यंत महत्त्वाचें गुपित. कलावंत धाडी गवई, निजगृहीं यांचे नृत्यनायन महोत्सवाविरहित दरबारीं करूं नये.
—आज्ञापत्र–धुळे प्रकाशन पृ. १२

निजसुरा—सुस्त किंवा आळशी.
याउपरी निजसुरे न रहाणे आम्ही रुपये घेऊं यैसे साफ सांगोन पाठविले आणि पत्र त्यास दिल्हे.
—पे. द. ३३ पृ. ३१८

निजाम—१ व्यवस्था; व्यवस्थापक; २ दक्षिण हैदराबादचे अधिपति.

निजाम-उद-दौलह—राज्यव्यवस्थापक.

निजाम-उल-मुल्क—देशव्यवस्थापक.

निजेली गांधले (गांधीलमाशा) उठवणें—निष्कारण संकट ओढवून घेणें. गांधील माशांचे मोहोळास चाळवणें
यानीं उत्तर दिले कीं मोंगल मातबर सामानानसी येत तो आहे. मग त्याचा मगज काये हे कलत नाहीं. त्यावर राजेश्री बोलीले कीं उगीच निजेली गांधले तुम्ही उठविली. याउप्पर निवारण कोणे रीतीनें करीतां ?
—पे. द. १७ पृ. ४८

निझोल हत्ती--ज्यावर बसलें असतां झोल किंवा झोके बसल्यासारखे वाटत नाहींत अशा चालीचा हत्ती.
अमृतराव साहेबाकडे २ अंबाऱ्या निझोल हत्ती व ५ घोडे बहुत शिरा ऐसे रवाना केले.
—ऐ. ले. सं. ४९५५

निटाऊन जाणें—नेटानें उरकणें.

तुरकताजखान यांस जे परगणे जाहले आहेत तेथील अंमल निटाऊन जाणें जर अंम्मल सुदामत प्रमाणें निटावेना तरी बेमुरवत घासदाणें घेणें.

—पे. द. १३ पृ. १४

निटावणें—नेट करणें, साहस करणें.

त्यासी फजीत करून इकडे लाऊन देणे. त्याचे मारफतीचीं कामें इकडे फार आहेत यासाठीं लावणे. लोकहि कोणी निटावले तरी लावणें. सोबतीची चिंता नाही. वाट चालती.

—पुरं. द. भाग ३ पृष्ठ ६

निटोप्याची गोष्ट--सरळ प्रकार, सरळ गोष्ट.

बापू त्रिंबकराव सामास बोलिले की, तुम्ही मागणे मागावयासी आला मागूं ते बक्षीस द्यावें (कबूल करावे) म्हणता ऐसियास बक्षीस मागावयाची गोष्ट निटोप्याची असल्यास बक्षीस आहे.

--नाराणराव पेशव्यांची बखर
काव्येतिहास संग्रह पृष्ठ ८

निटोप्याची वाट--जवळची वाट. शॉर्टकट.

मूळ शब्द निटोपा त्याचा अर्थ थेट, सरळ असा आहे.

(अवतरणासाठीं खातरतसलीम पाहा) —हो. कै पृ. ९

नित्य कृत्य—दिनचर्या; दैनंदिन उपजीविका.

१ या प्रांतांत महागाई फार. लोकांचें नित्य कृत्य चाललें पाहिजे. पोटास पाहून दिलें पाहिजे, यास्तव ऐवजाची तरतूद पाहिजे. मग सावकार पैजारा मारतील तेव्हां मारोत. परंतु या शिलेदारांच्या पैजारा न बसत तें करणें. —ऐ. ले. सं. १६२५

२ स्वामीच्या नांवावरून उभयेतांहि मजवर दया करितात. नित्येकृत्यास सामग्री पाठवितात. —पे. द. २८ पृ. १२६

३ भाऊबंद मुलाची हेळसांड करू लागले बाईचे काही चालूं दिले नाहीं वतनवाटा आपणच दाबून वहिवाट चालविली बाईस नित्यकृत्याचाहि आधार नाही म्हणून माहेरी भावापाशीं येऊन राहिली.

—हो. कै. पृ. १

नित्याची संभूत—उदर निर्वाह.

लाइलाजास्तव (नाइलाजास्तव) विनंती लिहिली ती मान्य केली पाहिजे. येथून शिंदे याजपावेतोही जावयास कर्जदारांचे ताडातोडीमुळे न बने. नित्याची संभूत चालवणें —राजवाडे खंड १२ पृ. २४

नित्यानी—नित्य; सारखी; एकसारखी.

नारोबाबाजी बंकापुरास येऊन त्यांनीं आम्ही धारवाडाकडे जावें म्हणून

नित्यानीं आक्षेप करून धारवाडाकडे आणिलें.

—ऐ. ले. सं. १६७१

निदान करणें—जिवावर उदार होणें, निर्वाण करणें.

ते समयी पांगेरा यांणीं लोकांस विचारिलें " यांत कोणीं या वेळीं निदान करावयाचे सोबती असाल त्याणीं उभें रहावें " म्हणोन निवड करितां ७०० माणूस निघाले. —चित्र ९०

निदानचे माणूस—जिवास जीव देणारा माणूस.

हैदरखानाचा मोड झाला. तो सडा पळून पट्टणांत गेला. कांहीं निदानचें माणूस होतें तें डोंगराचे आसऱ्यास जाऊन मारामार करूं लागलें. ते समयीं निकड झाली. तेव्हां नीळकंठराव दादा गोळी लागून ठार पडले.

—ऐ. ले. सं. १७७७

निदानवख्त—निर्वाणीची वेळ.

केवल निदानवख्त त्यास मोड जाहाला तो सावर करून तैसेच गनीमावर घालोन घेतले. —पे. द. ३ पृ. १३

निदानसमय—निर्वाणीची वेळ; आणीबाणीचा प्रसंग.

आपले भरंवशावर आम्ही उद्योग केला. असें असतां अद्याप आपली फौज येऊन पोंचली नाहीं. त्यास हल्लीं निदानसमय आहे. फौज न आल्यास आपला प्राण रहात नाहीं. —ऐ. ले. सं. ५५२६

निधड्याची—निधड्या छातीची शेवटपर्यंत टिकणारी.

समागमे सामान म्हणावे तरी ३००० फौज व २००० गाड्यांची फौज चांगली निधड्याची राहिली. —म. शि. यां. का. पृ. ५

निधांत—उध्वस्त.

प्रांताची खरावी करून दक्षणदेश निधांत केलात. जे खरावी केली व खंडण्या घेतल्या तो पैका हिशेब समजावणें म्हणोन सांगितलें.

—ऐ. ले. सं. ६०४१

निधान गतीस पावविणें—ठार मारणें.

संभाजी महाराज बादशहाचे हस्तगत जाहले, त्यास बादशहानी निधान गतीस (निधनगतीस) पावविले.

—दाभाडे सेनापती यांची बखर पृ. १

निप्रांजल—निष्कपट.

घोरपड्यांचा समजाविसीचा विचार निप्रांजल करून पुसिला.

—पे. द. ११ पृ. २५

निपट—विलकूल, निखालस, यत्किंचित्.

आम्हाजवळ गोळ्याचे सामान निपट नाहीं काल हजार बाराशें गोळ्या

होत्या त्यांतील लहान निवडून काम चालविलें आतां निपट नाहीं तर पांचहजार गोळी एकदांच पाठविली पाहिजे.

—पे. द. १६ पृ. ५०

निपल किंवा निपाल जागा—कोरडी.

१ त्यावरुन येथें डेऱ्याभवतीं चिखल भारी पडिली. म्हणून जवळचे लोक निपल जाग्यावर उतरले होते. त्यास आजच प्रातःकाळीं ताकीद झाली कीं जवळ येऊन उतरणें.

—पे. द. भाग २० पत्र नं. १९५

२ होळकर पर्वतीच्या पश्चिमेस निपाल जागा पाहून राहिले आहेत.

—ऐ. ले. सं. ३३४०

३ निपाल जागा स्वच्छ सभोवति सपाट पाटांगणें.

—प्रभाकर १५४

निपुण—पूर्ण किंवा उत्तम प्रकारें.

१ रघुनाथ पंडित त्या प्रांती आहेती. ते कांहीं इतर नव्हेती आपले पुरातन.. तुम्हासी कोणे रीतीनें वार्तावें हे निपूण जाणितात.

--इ. सं. तं. रा. घ. पृ. ४३

२ सारांश बाबाची कृपा निपूण स्वामीचें ठायीं आहे कांहीं चिंता नाहीं.

—पे. द. ८ पृ. ३१

निफाक—खलश; वैर.

१ नवाब श्रीमंत उभयतांत निफाक येणें ठीक नाहीं.

—साने प. या. व. १०९

२ खुलास दुनियाईचे आलमात जितक्या तवक्याच्या शकला आहेत त्या तर्फेत दाखवून हर तदबिरीने निफाक पाडावयासी कसूर करणार नाहीत.

—साने प. या. व. ४७८

निफाशी पुतळी—पुतळीचा एक प्रकार.

नवस देवाचा सवाशें पुतळी निफाशी (फासा नसलेली) व १२५ रु. मुकुटाचे पाठविले.

—ब्र. च. पृ. २६२

निबंध—न फुटणारा; निघोर, अखंड कातळ.

सुरुंगाचे काम राहिले, निबंध खडक लागला.

—पे. द. ३४ पृ. १६४

निबीसिंदगी—लेखकाची वृत्ति.

हुद्दे निबीसिंदगी.

—राजवाडे २० पृ. ३०४

निमकपरवर्दा:— विश्वासू नोकर.

निमचा—आखूड तरवार.

१ निमचा पान जनेवी नीट परज मुल्हेरी कोरीव जाळीदार व मुलामा गंगाजमनी तहनाल रुपे तोळे १॥। वर मुलामा सोनेरी मेण मखमली.

—पे. डा. IV Vol पृ. २४९

२ तोफखाना फोडून निम्चाची लढाई झाली.

—राजवाडे ६ पृ. १२८

३ श्रीमंतांनीं आपले खास निमचे व हत्ती आणून दाखविला.

—ऐ. ले. सं. ३४९६

४ दंगा झाला, म्हणतांच खाशांनीं हातचा निमचा घेऊन दादासाहेबांकडे गेले.

—ऐ. ले. सं. २०४३

निमरझ्—मध्यान्ह (दिवसाची).

निमशाब—मध्यरात्र.

निमस्तिन—जाकीट, निमस्तनी. (निम्म्या अस्तनीचे)

निमा—१ अर्धा २ आंतून घालावयाचा अर्धा अंगरखा.

निमाज—१ नमाज. २ आंगलट आलेली किंवा गळयांत पडलेली अनिष्ट गोष्ट, लचांड, लिगाड, भार, संकट.

परंतु या उत्तरानीं येथें निभाव कैसा होतो ? बाणकोटची निमाज कैसी उठते ? याउपरी हे लष्करचे घोडे तो आगदी बुडाले ! सर्वहि सुख आहे. कोणी पदार्थ नून आहे ऐसें नाहीं ! त्यास पुढें हे निमाज गडाची निघती कैसी आणि स्वामीच्या फौजेचा आब कैसा राहातो ?

—पे. द. ३३ पृ. १६१

निमाजमत—प्रार्थना.

शहरात जुमियाची (शुक्रवारची) निमाजमत यास आले होते.

—राजवाडे १ पृ. १९५

निमाणसी—निर्मनुष्य.

रयत झाडून येथवर नेली कीं एक एक गांव निमाणसी जाला.

—म. शि. यां. का. पृ. ८९०

निमित्यधारी—निमित्तास कारण,

न्यून पडल्यास निमित्यधारी तुम्ही आम्हीच होऊ. याजकरिता तरतुदेस आळस न करणें.

—चं. चू. द. पृ. १६०

निमेचा डेरा—कनाथ किंवा कापडी भिंत नसलेला व वर तेवढें कापडाचें आच्छादन किंवा छत असलेला डेरा.

सलाबतजंग शिकारीस जाऊन निमेचा डेरा देऊन परस्परें भेटी वस्त्रें भूषणें दिधली.

—हिं. द. खंड १ पृ. २७

नियत—१ निश्चय, २ वार्षिक खंडणी; खंडणीचा वाटा, ३ करार, ४ अढळ सद्बुद्धि, ५ नेम, ६ शपथप्रमाण, ७ विश्वास ८ प्रामाणिकपणा ९ वायदा १० संकेत वचन, नियेत.

१ सरकारचे कारकुनासहि कारकुनीचा ऐवज कोठील कोठील जमा जाला आहे तो देत नाहीत मग आमची कथा काय ? याची नियत या प्रकारची आहे. —हिंगणे द. भाग २ पृ. ६८

२ सोंधे संस्थानची नातवानी जाणोन आम्ही आपणाकडील नियत केला होता तो त्यास माफ केला असे. तरी तुम्ही त्यास त्वष्ट न लावणे त्याचें सर्व प्रकारें चालविणें. ---पे. द.

३ पंत प्रधान यांनीं अपणांसी नियत केलियावरी ते गोष्टी सिद्धीस पावतील. --ब्र. च. पृ. १८९

४ अवतरणासाठी होळकर कैफीयत पृष्ठ १३ पाहा

५ सांप्रत उज्जयनीस आलों आहों. येथील बोली (खंडणीची) लागली आहे. परंतु नियेत जाहला नाहीं. —पे. द. १३ पृ. २०

६ दोन मासांनीं द्रव्य प्रविस्ट करू म्हणून तुम्ही नियेत केलात त्यास नियेत केल्याप्रमाणें द्रव्य प्रविस्ट केले नाही. हे गोष्ट तुम्हास उचित कीं काये ? —पुरं. द. भाग १ पृष्ठ ३४

नियत शाबुदी—अढळ सद्बुद्धि, वचनाची दृढता, दिलेला शब्द पाळणारा. दरवाजे उघडून आत जाऊन राजास अग्निसंस्कार करून, नियतशाबुदी व पुढे होतकाळाचें लक्षण, जयपुरासारखे राज्य बैतन हाती लागले असता दुराशा रतिमात्र न धरतां माधोसिंगास आणून त्याची चिरंजीव म्हणून राज्यावर स्थापना केली. --हो. कै. पृ १५

नियाज--समर्पण.

यासबब सतरा लाखाचे माहाल गुजास्त करून हुजूर नियाज केले. --पुणें अखबार भाग १ पृ. १०७

नियाजमंद :--विनंति करणारा; अर्जदार.

१ नियाजमंद सर्वप्रकारें पदरचा आहे. साहेबासिवाये नियाजमंदाची कोन्हास (आशा) असावी ?

--पे. द. भाग ३८ पत्र नं. १४२

२ नियाज्मंद बाळाजी नारायण नातू.

---भा. इ. सं. मं. १८३८ अहवाल पृ. ८

नियाबत, नियाबती, न्याबत--नायबी; मुतालिकी; प्रतिनिधित्व. --दि. म. रा. २ पृ. १७

१ न्याबतचा खिलत.

२ गाजिऊद्दीखानाकारणेही कांहीं फौजेचा खर्च म्हणून व कांहीं साल दर-साल ठैराऊन नियावतीवर राजी करून भावाचा स्नेह करून देऊ.

—हिंगणे दप्तर खंड २ पृष्ठ १७

३ त्यांतील मजकूर असा कीं सुभेदारीची नियावत तुम्हाकडे मुकरार केली.

—पे. द. १५ पृ. ८६

निर्यैबजी—उत्पन्न किंवा वसूल न मिळणारा.

गांव तो तांबारियामुळे (धान्यावर पडणाऱ्या एका रोगामुळें) निर्यैबजी याजमुले परागंदा जाला. —चं. चू. द. पृ. १००

निर्गत होणें—निकालांत निघणें.

याप्रमाणे किस्सा निर्गत होऊन (भांडण निकालात निघून) स्वारी माघारी फिरली. —हो. कै. पृ. ४

निर्गम—निकाल.

आमच्या जावसालाचा प्रथम दिवसच आहे बोलतात, परंतु निर्गमाजोगें बोलणें नाहीं. आफती दरोबस्त मजुरा देत नाहीं म्हणतात. त्यापक्षीं कसा निर्गम पडेल ? --ऐ. ले. सं. १९८५

निर्दाळा--निर्दालन, सर्वनाश.

रक्षरक्ष महाराज समर्थ, सर्वास आला निर्दाळा ।

दामाजीपंताच्या लागले ब्राह्मण द्वारीं लोळायाला ।

--ऐ. पो. के. खं. २ पृ. २५४

निर्मानसी—निर्मनुष्य.

वैजापूर परगणीयांतील गांव वीस व गांडापूर परगना तो आर्धा केवल निर्मानसी गांव जाले. —पे. द. १५ पृ. ६३

निर्मित--भविष्य; वाढून ठेविलेलें.

घाटगे, भानूच्या स्त्रियांसहि सती जाऊं देईना. ५ लक्ष रुपये द्यावे म्हणजे अस्थी देतों म्हणतो. काय भोक्तृत्व आहे न कळे. प्राण जाऊन हा भोग भोगावा, दोरास आधार नाहीं, ऐसें निर्मित दिसतें.

--ऐ. ले. सं. ५३८७

निव्हां—निर्वाह, निकाल, शेवट.

सेखमिऱ्याच्या राऊताचा घोडा लाखपुरीवर पडला त्याची मुनसीबी स्वामीकडे आली. त्याचा करीणा मनास आणिता निव्हां गोहीवरी आला (म्ह. चौकशी प्रकरणांत शेवटीं साक्षी पुरावा घ्यावा असेच ठरलें)

--पे. द. ७ पृ. ११

निर्वाण—निरवण, निव्रंणूक, सोपवणूक; शिफारस.

लोणकरानें आपणांजवळ प्रसंग केला, त्यावरून त्याची निर्वाण आपण

बाजीरायास केली. परंतु खरा प्रकार असा आहे.

--ब्र. च. पृ. १५

निर्वाह--निकाल, उच्छेद.

याची त्यांची गांठ पडली ते समयीं याचा निर्वाहच करीत होते. परंतु नवाबाचे लस्कराहून आले याजकरितां धरुन मडकसिरेयांत कैदेंत ठेविले. चौथे दिवसी सोडिलें. —पे. द. २५ पृ. ७२

निर्वाहकता---निभावणी.

येथें पडल्या प्रसंगाची निर्वाहकता प्राप्त जाहाली ते करून अविलंबेच स्वामीचें सेवेसी येतों. ----पे. द. ३३ पृ. ४२

निर्विघ्न----विघ्ननाशक. विघ्नहरण.

श्रीचा भंडार कपाली लावावा. रिकीबीस पाय देते समई मार्तंडजीचे स्मरण करून घोडयावर बसत जावे; हें मोठें निर्विघ्न आहे.

----पुरं. द. भाग ३ पृष्ठ ५९

निरख----किंमत; भाव.

शेळीचें दूध एकवीस शेर याप्रमाणे लष्करांत निरख आहे.

----खरे ८ पृ. ३९७६

निरखबंद----भावाचा तक्ता.

----खरे ७ पृ. ३७९१

निरन्यायी—निरपराधी.

देशपांडे यांचें वतन निरन्यायी अमानत जालें. यास्तव श्रीमंतांस विनंती करून जप्तीची मोकळचिठ्ठी घेऊन पाठविणें.

--ऐ. ले. सं. ९४१

निरपावणें—देऊन टाकणें, निशेःष देऊन टाकणें, बाकी न ठेंवतां देणे.
(अवतरणासाठी 'अजहदअदीक' शब्द पाहा)

—E. M. P.

निरवणें—पुरें पाडणें, निकालांत काढणें.

स्वामीनें तेथें वैसोन आपला पैका बाकीचा घ्यावा. अमलाचे निरवावें (खंडणी घेण्याचें काम उरकावे) ऐसे असतां दसऱ्यास कूच न जाहाले.

—पे. द. २५ पृ. ४

निराशा करणें—सर्वस्वावर उदक सोडणें.

या अर्थे तुमचे भरोशावर सर्व निराशा करून आलों, याची शरम असावी.

—नाग. १ पृ. ४८

निराळी—नीळ पिकविणारा किंवा निळीनें कपडे रंगविणारा.

निरुत्तर—प्रत्युत्तर; पत्रोत्तर.

वोरगांवकर माघ शुद्धांत लग्न करणार असें लिहून पत्र गेलें आहे. निरुत्तर काय येतें पहावें. —ऐ. ले. सं. २७६१

निरोत्तर—उत्तर, पत्राचें उत्तर.

पत्रें लिहीली त्याचे निरोत्तर सेवकास आले जे 'त्याची मुरवत न धरता पका घेणें.' —E. M. P. पृ. २१८

निरोपाईक—निरुपायाची.

नारायणरावाचा शोक सर्वांस सारखा. निरोपाईक गोष्ट. सर्वांनीं विवेक करावा. —ऐ. ले. सं. ९६१

जगदीश्वर कोपला गोष्ट झालि खरीच निरुपाई।
म्हणुन एकाएकि सबळ बुडाली ब्राह्मणपाच्छाई।

—प्रभाकर.

निरोपी--निरोप आणणारा पोचवणारा, निरोप्या.

आपटणाच्या व माचीवाल्याच्या (पुरंदरच्या माचीवर राहणारे पेशव्यांचे कारभारी नाना बापू) भेटी दोन वेळा जाहल्या. आपटणाकडे निरोपी माधवराव जाधवराई केले आहेत, ते निरोप सांगतात. ते ऐकोन येतात (अपटणांचे उत्तर ऐकून येतात.)

--राजवाडे खंड १२ पृ. १६८

निलकी थैली—लाख न लावलेला लखोटा किंवा पिशवी.

थैल्या निलकी सुमार २५ देखील दोरण्या व लाख वजन पक्की येकसेर येसे जरूर जाणोन सत्वर पाठविणें. —म. रिया. ५ पृ. ६४

निलखी--पूर्णपणें, निःशेष.

७००१ बाबती सरदेशमुखीचे महाल ३.
१ पोा हरसूल
१ पोा सातारे पैकी काा सातारे
१ पोा हवेली अवरंगाबाद सरदेशमुखी निलखी.

—ना. दी. पा. पृ. ६९

निवड—निवडक; शेलके.

संनिध शत्रूच्या राहून कांहीं उपयोग नाहीं. निवड माणूस मात्र जाया होतें. रात्रंदिवस काळजी लागली आहे.

—ऐ. ले. सं. ४१४४

निवडक करणें—निवडक करणें; निवड करणें.

स्वारांपैकीं हजार दीड हजार स्वार निवडक करून हेबाळेहून निघाले, तों सूर्योदय झाला.

—ऐ. ले. सं. २६६३

निवडुंगा—घोड्याच्या लगामाचा एक प्रकार.
खर्च जिन्नस पागा हुलीकर याजकडे तर्फे नयूजी शिंदे रथाच्या कुमाईत घोड्यास लगाम निवडुंगा सुमार १ —पे. द.

निवडूक—निवडक.
निवडूक माणूस बिरवाडीस नेले होते.
—पे. द. ३३ पृ. १२३

निवतपत्र—सनद, निवाडपत्र.
मोरो हरी याणी दगड्या खोटा ठरवून गव्हाणे यास सरकारचे निवतपत्र करून देविलें. —ज्यू. ३३०

निवल--निवळ; खरें; निष्कपट.
आम्हीं गृहस्थपणें त्याजला निवल सांगितलें असतां त्याणीं इतका उपद्वाप करावा यैसें नाहीं. --पे. द. ४० पृ. ६

निवाती—शांतपणा, स्तब्धता, वादळी हंगाम संपून जाणें.
१ चार्तुमास ममता दाखऊन पुढें समुद्रास निवाती जाल्यावरी दुतर्फा शह देऊन माघारे फिरोन जात ऐसे करावे ऐशा कितेक गोष्टी त्यानें योजिल्या असेत. —पे. द. ३ पृ. २०
२ नारेली पोर्णिमे आतबाहेर निवाती पडतील. त्या संधीस उंदेरीची गलबते मान्यांत गवसऊन पछाडितो.
—पे. द. ३३ पृ. २५

निवाली गोली—१नेम धरलेली ? २ STRAY ?
या उपरी तात्या भाऊजवळ खालीं मोर्चांत आले, बसले. रा. रघुनाथराव यांच्या उजव्या हाताच्या पोटरीस निवाली गोली गावांतील येऊन धक्का बसला मोठी खैर ईश्वरें केली. —नाग २ पृ. ५२

निवाले—(?)
झुंजारराव देशमुख यासी इसाफती अजराम-हामतीबद्दल निवाले दिधला असे. —रा. १ पृ. ३५

निविश्तन, निविस्तन—लेखन.
आं शहामतपन्हा यांहीं किताबत निविस्तन केली पोहोचून त्यामधील मजमून जाहीर जाहला. —प. द. म. व. ३४

निविष्ट—निर्णायक; निश्चित.
त्याचीं उत्तरे त्यांजकडून काय येतात तीं पाहून मग तुम्हासी निविष्ट बोलणे तसें बोलू. —नाग २ पृ. २६

निविष्टपणें—निर्भीडपणें, निस्पृहपणें.
आहो इतक्यांचे आधीं मुर्दे होतील मग होणार तसें घडेल. मधीं दुसरी

वर योजना होईल कशी ? असें निविष्टपणें हिमतीचें उत्तर सांगोन पाठविलें.
—शि. प्र. व. पृ. १९

निविस्ता--लेख; पत्र.
निविस्ताही मर्सूल जाहला होता अम्मा जवाब घेऊन पोहोचला नाहीं.
--राजवाडे ३ पृ. ९०

निविसिंदगी—कारकुनी, लेखनाचा धंदा.
आज कृष्णाजी द पिसर बनाम बालाजी व नामाजी व अज विठोजी येक पिसर नरसावा हुनर निविसिंदगी मस्तुद होवयाबद्दल लिहीत असत.
--पे. द. ३१ पृ. ४३

निश्चक्र—कडकडीत उपास.
ते दिवशीं सदाशिवपंत व विश्वासरायांनी कडकडीत निश्चक्र केलें, उदक ही घेतलें नाहीं. रात्रींचे ठायीं साखर बत्तासे फळफळावळ मात्र भक्षिलीं.
--पाणि. बख. पृ. ३६

निश्चय देंणें--वचन देणें.
स्वामी या प्रांतास आलीयावरी सदरहू वतन अगदी दुमाले करावे ऐसा निश्चय दिला होता. परंतु पत्रें करून द्यावी तो राजेश्री स्वामीनी वैकुंठवास केला.
—शि. च. सा. खं. ५ पृ. २४

निश्य--अर्धे.
याशी त्याशी लढाई होऊन निश्य जमीयेत मारून घेतली.
—साने प. या. व ४८१

निशस्त—बैठक.
१ खिलवतेचे डेऱ्यांत गेले, दोन घटकापर्यंत निशस्त जाली.
—पुणें अखबार भाग ३ पृ. ३२
२ दीड प्रहर पावेतो निशस्त राहिली —राजवाडे ५ पृ. १४१

निशा—खात्री, उधारीची पत, वचन, सावकाराचा ऐवज पोंचता करून देण्याची जामीनकी; खातर्जमा.
१ पर्यायिकडून आम्हीहि निशा करून घेतो.
—पे. द. ३ पृ. ११४
२ पत्रें पाठविलीं प्रविष्ट होऊन आमचे चित्ताचा निशा जाहला.
—पारसनीस ब्र. प. ३०१

निशा करणें—पारिपत्य करणें, अद्दल घडविणें.
सुरतेचे हकीमास पत्रे लिहावी कीं सुरतेहून संचणी करून हबसी लोक ठेविले ते येऊ देऊं नये जर येऊ दिल्हे तरी सुरतेचा निशा केला जाईल.
—पे. द. ३३ पृ. ६२

निशाचरी विद्या--रात्रीं बेरात्रीं छापा घालणें.
धवशा आला तर तो निशाचरी विद्या करावयास चुकणार नाहीं असें म्हणतात. —ऐ. ले. सं. २१००

निशाज, निशाद—कालवा.
(निशादबाग—कालव्याच्या कांठी केलेली बाग.)

निशाण—चिन्ह; खूण; ज्या ठिकाणी नेम मारावयाचा ती जागा; झेंडा. सील, सिक्का.

१ आमचे व आपले इत्तिफाकानें (ऐकमत्याने) इंग्रजाचे नांव व निशाण नाहींसारखे नेस्तनाबूत होतील.
—राजवाडे १० पृ. १८२

२ न्यायाधिशांचें पत्र लिहोन घेतलें. फडणीसांची तेरीख आदिकरून जाहली. परंतु मजमदार निशाण करीत नाहीं.
—ऐ. ले. सं. २८८५

३ पहिला गोळा निशाणाच्या उरावर लागला.
—पे. द. भाग ४१ पत्र नं. १६३

निशाण हटणें—नेम मारणें; लक्ष्यवेध करणें.
खंडोजी भोसले यांनीं बंदुकीनें निशाण पाच सात हटली.
--नाग १ पृ २८८

निशाणी—होनाचा एक प्रकार. निशाणी हें नाण्यावर खूण करण्याचें पंच-सारखें एक हत्यार आहे. त्यावरून पंच केलेले होन.
यास धर्मादाऊ सालीना होन निशाणी १० दाहा रास नेमून दिल्हे आहेत.
—के. सं. भट दप्तर मालवण

निशात—आनंद, सुख.

निशान—खूण.

निशापात—खंडणीच्या पैक्याच्या वसुलीसाठी हमीदार किंवा जामीन घेणें.
झांशी प्रांतीचा बंदोबस्त करून दतियावोडशांची मामलत ठराऊन तेथील निशापात होत आहे. —पे. द. भाग २९ पत्र नं. १०२

निशिंदा—निविसिंदा, लेखक, कारकून.
जसाजी प्रभु सबनीस व दादाजी प्रभु निशिंदे वसनागार.
—चित्र १०३

निशेंडा, निसेंडा—मुसलमान.
निशेंडाचा विश्वास धरून मनसबा करूं म्हणाल तरी परिणाम कलतच आहे. --पे. द. ३३ पृ. ८६

निशेदार—पतदार; साखदार.

निष्क--निस्फ, अर्धी.
तेव्हां यास त्यास लढाई होऊन जनरल मजकूर याचे हमराई होते निष्क जमीयत मारून घतली. —लेख. पृ. ९६

निष्टंक—निष्कंटकता, निकाल.
मागाहून सविस्तर लिहितो किंवा निष्टंक करून येतो.
—पे. द. २८ पृ. २००

निष्ठपणें--एकनिष्ठपणें
पहिलेपासून स्वामीचे पदरीचे आहेत. निष्ठपणें सेवा करतात.
—पे. द. भाग २७ पत्र नं. १३४

निष्ठ—निस्पृह.
बाबुराव परम निष्ठ. सखारामास एवढें दिवाणगिरीचें पद आलें तें नकोसें आहे कीं काय? —ऐ. ले. सं. ७६

निषन जोग हुंडी—जो कोणी हुंडी हजर करील त्याला पैसे द्यावयाचे असतात अशी हुंडी. --स. का. ८९

निस्तरा--झाडा.
रघुनाथ प्रभु याणेही दोन वेळा वेल काढून दिला आणि बेइमानी करून खादल्या अन्नाचा निस्तरा देतो आहे! याचाही परिणाम श्रीकृपेने होईल तो आपणास कळों येईलच. --रा. ८ पृ. १७५

निस्तुक होणें--निस्तोप होणें, निकाल लागणें, पार पडणें.
१ सलाबतजंगाचा व महाराजाचा सुला निस्तुक जाहलेवरी कोणी सरदाराबरोबर फौज देऊन या मुलकास पाठविल्यानें मुलकाचा बंदोबस्त करूं.
--E. M. P. पृ. १४१
२ आजपावेतो वसूल देऊन बाकी निस्तुक रुपये ३५१४ राहिले.
--पे. द.

निस्तोष---निखालस; निश्चित.
याउपर बहुत दिवस लागणार नाहींत. काय तें निस्तोप आठ दिवसांत कळेल. ---ऐ. ले. सं. २१८७

निस्फ----अर्धी.

निस्बत; निस्पत; निस्बती----१ संबंध, पक्ष. २ तर्क; ३ शिफारस; ४ योग्य.
१ हिगुलगिरी मानभाव येऊनु हर्कती करुनु यास बाहीर घालावयास त्यास काय निस्बती आहे? —राजवाडे १५ पृ. १४०
२ तुम्हांस निस्बत नाहीं. —इ. म. १३०

३ तसाच सदरसर्नोबत म्हणजे निस्पृह, कोणाचे निस्पतीचे अथवा एकाचे आर्जवामुळें ठेवावे असे नाहीं. —म. रा. आ. २९
४ कोणी दिकहर्कत करणें निस्वत नाहीं. —राजवाडे ३ पृ. ५०२
५ फंदफितुरी केल्यास आपण हजर करूं, न करूं तर त्याचे निस्बतीचा जाब करूं. —भा. इ. सं. मं. तृ. सं. वृ. ६५

निस्वत (पूर्वगामी अव्यय)—च्या तर्फेचे, दिमत. जसें गानु निस्वत खैरे.

निस्बती—संबंधी.
जे कोणी हमदानीचे निस्बती लोक असतील त्यास कैद करावे. —दि. म. रा. १ पृ. २०८

निसनाबूद—नेस्तनाबूद, नष्ट.
नगारे निशाणे पालखी रथ घोडे वगैरे डेरा सर्व लुटले. सैद निसनाबूद केला. —ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. २०७

निसपत्ती—संबंध किंवा हक्क.
त्या दिवसापासून ती स्थळें वोस पडिलीं आहेत तेथें येरंड धोतरे आहेती. त्या स्थळावरी मनास येई तो नांदे त्या स्थळाशीं आम्हास निसपत्ती नाहीं. —शि. च. सा. खं. ५ पृ. २२५

निसबत—गरज, कारण.
मान पान दो जणानी बराबरीच घेवे येक पुढे येक माघे घेवयासी निसबत नाहीं. —शि. च. सा. खंड ५ पृष्ठ १६९

निसबत—भीड.
राजेश्री स्वामींनी अंताजी सिवदेऊ यांस बोलावून आज्ञा केली कीं तुम्ही पांचाडी जाऊन राहाणें. हुजुरचे निसबतीनें त्यांनीं मान्य केले. अगोदर मान्य केले नवते. —पे. द. ३ पृ. १४१

निसबत—वशिला.
आबा शेलूकर यांणीं आपले निसबतीचे ब्राह्मणास भारी दक्षणा दिली, सबब, श्रीमंत दंड मागतात. —ऐ. ले. सं. ५२३१

निसबतसुद्धा—निसबतीचे लोकांसुद्धां.
भाऊंनीं आम्हांस पुढें चला म्हणून सांगितलें. त्याजवरून आम्ही निसबतसुद्धां आघाडीस चालिलों. —ऐ. ले. सं. २४९२

निसबती—गरज किंवा संबंध.
महजर दखल केला त्यावरून वतन शंकराजी फरजंद याचें असें तहकीक कलो आले. गवरोजी लोहकरा यास निसबती नाहीं. —शि. च. सा. खं. २ पृ. २८२

निसवती—संगत किंवा आश्रय.

किलिचखान गेलियावरी सल्ला जाला ते समयीं संभाजी जाधव पुण्याच्या ठाणीयांत आले त्याजबरावर नारोबाहि पुणीयासी आले. हा कालवरी त्याची निसवती सोडिली नाहीं. —पे. द. १० पृ. १५

निसरसांड:—उपेक्षा, अवहेलना, अपमान.

१ निजामअल्लीनें कुरकुंबच्या देवीचा उच्छेद करू नये तो केला तर तुमचा आमचा बेबनाव, असे चंद्रसेन जाधवाने सांगून पाठविल्यावर निजामअल्ली याने यासी जाबसाल निसरसांडीचा केला तुम्ही बदले तरी माझे वमयेसतीयाज प्रो। हिंदूंच्या देवधर्माचा मजला उछेद करणें जरूर आहे. —ऐ. सं. सा. खंड ३ पृष्ठ २०९

२ सर्व कारभार आपले जोरीयावरी आहे. आणि केवळ त्यांची निसरसांडहि करावीसे नाहीं. यास्तव त्याजवळ येकजण ठेऊन आपण लस्करास यावे. —पे. द. १२ पृ. २२

निसळ—व्यवस्था, शिस्त, मिसल.

ते समयी खंडो आवजींनीं बहुत प्रकारें राववांची खुशामत केली व भिडे यास जामीन राहून तुम्ही खर्चाची निसळ लावून ध्यावी अशी गळ घातली. —काय. प्र. इ. सा. पु. १ अं. ९ पृ. ५७

निंसिदगी—निविसिंदगी, कारकुनीचा दरक.

पेसजी निंसिदगी सरकारातून मुशाहिरा देऊन चालवीत असत. —राजवाडे २० पृ. ३०४

निसिदा, निंसिदा—लेखक, कारकून.

महाल मजकुरी निसिदा असतो ते येकसाल असतो दुसरे सालीं दुसरा निसिदा होतो याकरिता बाकी कुलारगी मुकाबला होत नाही. —शि. च. सा. खंड ५ पृष्ठ १५४

निंसिदा, नविसिंदा—लेखक.

१ बालाजी निंसिदा पूर्वी सरकारतर्फेनें होता. —राजवाडे २० पृ. ३०५

२ नविसिंदा. —राजवाडे २० पृ. ३०५

निसूर—स्वस्थ किंवा बेगुमान.

१ आनंदरायानीं भेटीचे रोजीं पातडे वाचिलें व दुसरीयानें गयासखानाजवळीं बकवाद केला. आता निसूर बैसला. —पे. द. १० पृ. ६५

२ त्रिंबकपंतहि तेथे आहेत. ते केवल निसूर राहाणार नाहीत. —पुरं. द. भाग १ पृष्ठ २११

निहंग—द्वंद्वयुद्ध खेळणारा.
निहमत—धैर्य.
निहादह—ठेवून.
निहायत; न्यहायत—सीमा; पराकाष्ठा; निःसीम.
महाराजांनीं अंग्रेजीची व जातीनिशी मर्दुमीची निहायत केली.
—चित्रगुप्त १३

निहुफ्त—लपणूक.
निक्षुन—निक्षुणपणें; बिलकूल; स्पष्टपणें.
वडिलांचे शरीरीं अद्याप निक्षुन उतार पडला नाहीं. ईश्वरदयेंकरून लवकरच पडेल.
—ऐ. ले. सं. ८२७

निक्षूणपणें, निक्षूनपणें---स्पष्ट; स्वच्छ; निस्पृहपणें, पक्का, निक्षुणपणे, निखालसपणें.
१ चिमाजी महादेव यास निक्षूणपणेंच लिहावें, म्हणोन पत्रीं लिहिलें, त्याजवरून हल्लीं निषेधून बेदिकत लिहीलें आहे.
—ऐ. ले. सं. २९०५

२ रा. मुधोजी भोसले याचें लक्ष इकडे निक्षुनपणें आहे.
—ऐ. ले. सं. २३४२

३ शहापूरकरांचा बंदोबस्त कर्तव्य असेल तसा निक्षूनपणें केला पाहिजे.
—ऐ. ले. सं. ४७२४

निक्षेप—निक्षून.
गोपाळ गिरिधर यास निक्षेप सांगावे कीं गुदस्ताचा ऐवज उगवून देणें.
—पे. द. २८ पृ. २९२

नीचपथरूप—खालील वाटेनें (?)
घोरपडे वगैरे त्रिवर्ग एकत्र होऊन मुधोळाहून कूच करून करवीराकडे जाण्याकरितां गेले. नीचपथरूप जातां गुंतां नाहीं, म्हणोन लिहिलें त्यास संकराजीचा बंदोबस्त, मालोजी घोरपडे यांचे विद्यमानें जाहला आहे, मग काय करतो, पहावे.
—ऐ. ले. सं. २८५७

नीट—नेट, किंवा निकड.
जे जागा आपण आज्ञा करितील तेथे नीट व्हाव्या (व्हावया) अंतर करितील यैसी गोष्टी कदापि होणार नाहीं.
—पे. द. ३३ पृ. १७

नीत—गणित, गणती, संख्या.
१ त्याजकडील याजखेरीज सात आठ मातबर सरदार मारिले गेले. गाडदी प्यादे यास नीत नाहीं.
—राजवाडे १ पृ. २५७

२ जे दिवसी वस्त्रें दिल्ही ते दिवसाचा महोछाव काये काये म्हणून लिहावा? दाजी घरास आले, तो दोनीगे ग्रहस्त, से दोंनसे मागतेकरी व से दीडसे येकामे (?) लोटले. ते समई कारखानियाच्या (मजमूच्या) लोकांस वस्त्रें व रु॥ दिल्हे. ब्राह्मणास तिसा रुपयाचा खर्दा लागला. वस्त्रांस व पांघुरणास नीत राहिली नाही; असी धूम जाली.

—पुरं. द. भाग १ पृष्ठ २८६

नीम-रजावंद— थोडेबहुत प्रसन्न.

सफ्दरजंग यास नीमरजावंद करून आपले लगामी लावावयाचा विचार केला आहे.

—साने प. या. व. ७५

नीयेत, नियत—नेम, निश्चय, संकेत.

धामधूम सन्निध आल्यावरी यावयाचा नियेत होता. त्यास धामधूम १०।१२ गावावरी आली आहे.

—पे. द. ३३ पृ. ३३७

नीर आणणें—झाडून काढावा काढणें.

दो ती कोसावरून रानाचा नीर आणिला परंतु कांहींच व।वरांत लागलें नाहीं.

—नाग २ पृ. १६५

नीर काढणें--निकाल करणें, निर्णय घेणें, तडजोड करणें.

अखेर पातशहांनीं नीर काढिला जे आपला निशा व्हावा लागतो. तो त्याचा पुत्र असलिया त्याणें पुढें एक ताटांत घेऊन जेवावें, तेव्हां खात्री होईल.

—चित्र ७५

नीर काढणें—झाडून सर्व काढणें; नीर निधणे म्ह. निःशेष करणें.

१ आज्ञापत्र सादर जाहालें तेथें आज्ञा कीं, कृष्णाजीपंतास सामील होऊन माहितगिरीनें कोल्याचा नीर काढून कोल्याचें पारिपत्य करणें.

—पे. द. ४० पृ. १०२

२ अवघेजण मिळोन गजराबाईचे घरांत बैसले आणि मागती नाईक मशार निल्हेचा मजकूर इस्तकबील पासोन आजपावेतो कोणे कोणे प्रकारे कैसा जाला याचा नीर काढावयास लागले.

—पे. द. २८ पृ. २

३ हिंदुस्थानांतून इंग्रज इकडे येणार त्यांचें पारपत्य करून पुढें अंतरवेदीत जाऊन इंग्रजांचा नीर काढीत काशीपर्यंत जाऊन इंग्रजास ताण बसवितो.

—म. शि. यां. का. पृ. ११०

४ पलटणवाले यांचे रोखे तमाम प्रांतांत जाहले. नीरच प्रांताचा निघत चालला आहे. पुढें लावणीचें संकट ईश्वरें आणिले आहे.

—ऐ. ले. सं. ६४३२

नीर फुटणें—झाडून सारे लोक पळून जाणें.
सोडुन किल्ला झाला वायला
निर फुटला लोकाला। —ऐ. पो. के. खं. २ पृ. १३६

नीर येणें—कोळयांचे मासे पकडण्याचें प्रचंड जाळें पसरत येते त्याप्रमाणें संकट येणें. भावार्थानें संकट, स्वारी, पाश, शह.
या चार महालावर श्यामलाचा नीर आला. रयेतीच्या वतनदाराचें जीवासी गांठ पडली आहे का कोण वेळेस काये होईल ते श्री जाणे!
—पे. द. ३३ पृ. ४३

नीळ—एक जातीचा वानर. या जातींचीं वानरें ज्या अन्नाला विषाचा संपर्क झाला आहे, त्याकडे ढुंकूनसुद्धां पहात नाहींत. यामुळें दौलतवंत अन्नपरीक्षेसाठीं असे नीळ पाळीत.
नीळ २ आपणांकडे पाठविले आहेत. मातबर किल्ल्यांत असावे. दूध पाजवीत जावयास सांगावें. —ऐ. ले. सं. ५७०३

नीळकंठी, नीलकंठराई, नीळकंठरायी— रुपयाची एक जात. यालाच तुरागळ नीलकंठी रुपया असेंही म्हणतात.
१ १२० रु. पुतळी ताटे १५
६ रु. नीळकंठी.
१४॥ = रहिमतपुरी. —पे. सा. पृ. १४७
२ रुपये पाठवा म्हणोन लिहिले त्यास नीळकंठराई रुपये आहेत. पाठवा म्हणाल तर पाठवून देऊं. —ऐ. ले. सं. पृ. २०७

नुक्ता—टिंब.

नुक्ता—खुबीदार वाक्य; सुभाषित.
पत्र लिहिलीं त्यांतील नुक्ते व चुटके उत्तरें यावयाजोगे बहुत लिहिण्यांत आली. —राजवाडे ७ खलप २ पृ.२६

नुत्का, जुत्का—नुत्का, बिंदली, कडी.
उंटासाठी लागवड
३ चरसे
२॥ पलाणे ८ झुली ४ .॥. जुत्के —राज. खं. ६ पा. ४२०

नुक्ता—बाणाचा एक प्रकार.

नुक्र, नुक्रा—रुपें, चांदी. नुक्राई—रुप्याचे.

नुक—पक्ष्याची चोंच, टोंच.

नुकस—दुर्लौकिक, शरम.
अजीतागाईत नेकनामी घेऊन शेवट बदनाम होणे (हे) सरदारास नुकस आहे. —E. M. P. पृ. १३२

नुज्मी—ज्योतिषी. —रा. व्य. को.

नुज्दहुम—एकोणिसावा.

नुमायद—दाखवावें, करावे (नमूदन)

नुमायान—दाखविणारा.

नुर्चश्म—नयनाल्हादक, दृष्टिप्रिय. --रा. व्य. को.

नुरिया—पोपटाच्या जातीचा एक पक्षी.

तैशीच पक्षिकुळे, मैना, नुरिया, बदके, रावे, वहिरी, बाज, कबुतरे, लगड, ल्हावे, तित्तूर, मूझिया, चंडोल, कांडेसर, चितारली.

--चित्र ९९

नुस्रत—मदत, विजय.

नुस्रतकरीन——विजययुक्त.

नुसरताबाद—उर्फ परळी.

—भा. व. द. दे. भू. पृ. ६

नूर—तेज; तजेला; प्रसन्नता.

नूरजहान—जगत्द्युति;
(जहांगीर बादशहाच्या बेगमेचे नांव)
कोहि-नूर--तेजाचा पर्वत.
(एका जगप्रसिद्ध रत्नाचें नांव.)

नूर—बाजू, लक्ष किंवा अन्न.

त्याउपरी हबशाची मदत करून हबशीहि (हबशाकडीलहि) नूर राखावाच राखावा असा गोव्याचा विचार आहे.

—पे. द. ३ पृ. ४२

नूरबारी—हुरूप, आवेश, तेज, प्रसन्नता.

आम्हीच आघोदर गेल्यास जमावाचें बल थोडकें याकरितां जमाव आला म्हणजे नूरबारीनें जाऊन धडकेच सारीखा रेवसचा कोट घेऊं

—पे. द. ३३ पृ. ३२

नेक-किर्दार—सत्कर्मी.

नेकखाही (नेकखोही)—हितेच्छा.

नेकखोई जाहीर करणें. —राजवाडे १७ पृ. ३१

नेकदार—प्रामाणिक; प्रामाणिकपणें.

१ तो पुरुष चाकरीस नेकदार आहे.

—गोख. चि. शा. ब. ३७

२ असे कामदार नेकदार वागले, म्हणून राज्य चाललें.

—राजवाडे ६ पृ. ५११

नेकनजर-- कृपादृष्टि.
साहेबाचे नेकनजरकरून सेरीकराची बखेर सलामत असे.
—राजवाडे १५ पृ. ७६

नेक-नाम्‌वरी—सुकीर्ति.
—जो. रा. १२९

नेकनाम—सुकीर्तिमान्.
आणि सर्वांत नेकनामही असावें. —राजवाडे ६ पृ. ३७७.

नेक नामदार—प्रामाणिक व नामांकित. (एक पदवी)

नेकनामी—सुकीर्ति.
गाजुद्दीखान यांचे वय काय परंतु जसा खानदान तशीच हिंमत या समयांत चालविली व नेकनामीही संपादिली.
—हिं. द. खंड १ पृष्ठ ६७.

नेकनियत—सद्‌बुद्धि; सद्‌बुद्धीचा.
टोपीवाल्यांत इंग्रजी बादशहा बहुत नेकनियत.
—खरे ७ पृ. ३५६४

नेकबंद—नेकीबदी किंवा हलालीहरामी.
चंदाखानाच्या पुत्रास गोरंदार म्हणू. लाग हो कीं बाहीर फितूर मोठा आहे. तुम्ही धाकटे, नेकबंद जाली तर काये करावे ?
—पे. द. २८ पृ. १३०

नेकबदी—हरामी.
दादोराम रत्नाकरपंतावरि जफरतो हे तेथे पाठविले आहेत. यांस नेकबदी झाली म्हणजे तुम्हास जाब करणे लागेल.
---पुरं. द. भाग १ पृष्ठ २९

नेकबाद----(?) हरामखोरी.
जगदीशकृपेने अबदालीही गेला आणि मोहीमहि सर जाली म्हणोन उत्तम जाले. येकादी नेकबाद होय तरी कैसे ?
----राजवाडे १ पृ. १२४

नेकमंदी----चांगुलपणा.

नेक--राह----चांगली चाल.
नेक--राह चाल दाखवून आमच्या राज्याचा आसरा पुरता केला.
---ऐ. टि. ५७.

नेक--सल्ला----चांगला विचार.
१ टोपीकराचे वकिलास रुखसत दिली हे फार नेक सलाह केले.
—दि. म. रा. १ पृ. ३७.

२ ऐशास विचार आचार कर्तव्याकर्तव्य राजश्री मुरारराव घोरपडे यांचे विचार करता बहुत उत्तम आहे ते सांगतील ते नेकसल्लाच सांगतील.

नेकसात—सुमुहूर्त. —साने. प. या. व. ८१

श्रीधर लक्ष्मण निसबत रघोजी भोसले पंतप्रधानापासून रुकसत जाले नेकसात पाहून नागपुरास जाणार.

नेकीबदी—हलाली हरामी. —पुणें अखबार भाग ३ पृ. १९६

नेकी बदीचा अन्देशा दोहीकडून सेवकाकडे नसावा.

नेजदार—कुंतधर, भाला धरणारा शिपाई. राजा तख्तावर बसला असतां हा त्याच्या सन्निध उभा असतो. —साने प. या. व. २५६

नेजदार—कुंतधर (रा. व्य. को.) बाणदार, बाणेकरी, भालेकरी. —रा. व्य. को.

चाहुजी कंक सुभाचा कारभार चालवावया हुजरून दिल्हा त्यास वेतन केले सालीना देखील पालखी होन पातशाही ४०० बि॥

खासा जातीस होन

२००८ चाकर १४ यो॥

१५० भोई १० यो॥

३० दिवटये २ यो॥

२० अफतागिऱ्या व नेजदार ना॥ २ यो॥

——

२००

नेझ, नेझा—भाला. —शि. च. सा. खं. २ पृ. ४००

नेटबाजी—जोर.

गनीमाची नेटबाजी भारी. --पे. द. ४० पृ. ७५

नेटबाजी करणें—हल्ला करणें, जरब देणें, बदला घेणें.

यथाकथंचित घाटगा व माहाडकरी उपद्रव फारच देऊं लागले म्हणजे नेटबाजी करावी लागेल. —वै. ४ स. १७४३ पृ. ४०

नेत—नियत, बुद्धि, निष्ठा.

१ ज्याची जशी नेत तसी त्यास बर्कत. —इ. म. १०७

२ दौलतराव बाबा यांची नेत धन्याजवळ तशीच असेल. —खरे १२ पृ. ६८१७

नेफसाद—'नेषजन' चा अपभ्रंश किंवा चुकीचें वाचन. नेषजन म्ह. दंश करण्यास उद्युक्त किंवा आगलाव्या.

ऐशास नजीबखान मृत्यु पावला. मोठा हारामजादा. फंदीफितीं नेफसाद (नेषजन--नेषजैद या शब्दाचे चुकीचेंवाचन) हरामखोर होता. लवकरच वारला मोठी व्याधी गेली.

--ऐ. सं. सा. खंड ७ पृष्ठ ४४

नेफा—विजारींत नाडी घालण्यासाठीं दुमडून केलेली माया.

नेब गैबत—वरिष्ठाच्या गैरहजिरींत त्याचें काम करणारा दुय्यम अधिकारी. —इ. ऐ. ५ पृ. १०१

नेबाद—शिलेदारांच्या पगाराच्या हप्त्यापैकीं एक बाब.

१ बारमाही चाकरी दसमाही कबज. पैकीं दीडमाही रोजमरा. गैरहजेरी होईल ते वजा करून बाकी नेबाद पावेल. --पे. द. ४५ पृ.४३.

२ सरकारची शागीर्द पेषाचीं माणसें खासगीकडील वगैरे यांचे नेबाद श्रीमंत नानासाहेब यांच्रे कारकीर्दी पासोन राहिले होते.

—हरिवंशबखर पृ. ५९.

३ मराठे व गारदी यांचा नेबादपैकी देविले रुपये २६७॥

—ऐ. ले. सं. ४७४७.

नेमस्त—पक्के, निश्चयरूप.

(अवतरणासाठीं 'कुसूर' शब्द पाहा)

--मा. स. प. मा. पृ. १६१

नेमानें—नेमल्याप्रमाणें; संकेताप्रमाणें.

अशांत नरसिंगराय धायगुडे जलद आल्यास ठीक आहे. त्यास पत्र लिहिलेच आहे. २–४ मजली नेमानें आले असल्यास मग दिवगसत लागणार नाहीं. —ऐ. ले. सं. २८०४

नेमित--नेम, ठरविलेली योजना.

फिरंग्याचे पारिपत्य करावे दुसरे कुंभेरीस खंडेराव होळकर कामास आले त्याचा मुबदला जाऊा नाहीं तो करावा. या दोन गोष्टी अंत:करणीं डाचत होत्या. त्या मनचे मनांत राहून ईश्वरनेमितानुसार शके १६८७ भाद्रपद वद्य ११ प्रहर दिवस चढता पंचत्व पावले.

—हो. कै. पृ. ४१

नेशनाबुद—नाश.

महिना पंधरा दिवस जाजती लागतील परंतु याचा नेशनाबुद केलियावांचून बनारच नाहीं की हा विस्वास देईल. कोणे समयी काय करील हे न कळे. —पे. द. २० पृ. ११८

नेंशा--नेस, वंश.

आपणांस दखल आहे की बाजीसेटिया सेटीयेपण करीत होता त्याचे नेशा नखल जाले.

—शि. च. सा खं. २ पृ. १३५

नेषजन असणें—दुष्टबुद्धि किंवा द्वेष असणें.

हरिपंत, दादाचे, स्नेहाविषयीं नेषजन आहेत. या करितां मोरोबासी ऐक्यता करून दादाचा स्नेह करावा हें मुख्य मानस बापूचें आहे.

—पुणें अखबार भाग १ पृ. ६३

नेष मारणें—आपटी देणें, अडथळा करणें.

आम्हांकडील कार्यभागास मधोजी नेप मारितो तरी माहाराजांनीं ऐसे समयीं निजामन मुलुकाकडून हरईलाजेंकरून येकदां रकारपूर्वकाचें दंत भग्न करविले पाहिजे.

--पे. द. भाग २० पत्र नं. २१

नेसनाबूद--नेस्तनाबूद किंवा नष्ट.

सर्व प्रकारें यंदा आपली जबरदस्ती. मोगलाचें बळ कमी. परंतु केवळ त्यास बुडवून नेसनाबूद करूं म्हणतील तर मोगलांस आगीचें बळ फार आहे.

—पे. द. २६ पृ. १६०

नेहमी—कायमचा, कायमची.

१ संताजी सूर्यवंशी लस्करांतून राजेश्री स्वामीस न पुसतां उठोन गेला आहे. मागती येईल कीं नेहमी गेला? हें वर्तमान चौदिवसांनीं तहकीक जालीयावर लेहून पाठवूं.

—पे. द. ११ पृ. ५

२ अजमीरासाठीं पाटीलबावांची मोठी जीद होती. ते जागा नेहमीं घेतली. बिजयसिंगानें दिली. याप्रमाणें होऊन सलूख जाहला.

--ऐ. ले. सं. ४४३५

नै-शकर--ऊंस.

नैषधदेश--नरवर प्रांत.

--पे. द. १४ पृ. ९

नोक--१ टोचणी. २ टोक, अणी.

१ भवानीपंत आबा यांसी पत्रें नोक लावून लिहित गेलों त्याजप्रमाणें त्यांनीं फौजेची समजावीश काढून कूच केलें.

--नाग १ पृ. ७४

२ सखें तूं पातळ पुतळी फोक । नको मारूं नयनाची नोक.

—होनाजी बाळा १७८

नोकझोक—**नरमीगरमी.**

अशीं भाषणें नोके झोकेचीं जाटांनींही भाऊसाहेबाकडे सांगून पाठविलीं.

--पा. ब. ७

नोकानोकी--झटापट, चकमक.

इंग्रज बहादूर याची बाजीरावसाहेब याची फौजेची नोकानोकी होऊन आपले जागी आनमान राहिले.

----पे द. भाग ४१ पत्र नं. १९६

नोकेझोकेची भाषणें----टोंचतील बोचतील अशीं भाषणें (नोंक----टोंक) अशीं भाषणें नोकेझोकेची जाटानीही भाऊसाहेबांकडें सांगून पाठविलीं तीं सर्व श्रवण करून भाऊसाहेब सावध जाहले आणि चित्तांत समजले कीं हा कार्यवादू, समयास फिरून पडेल!

----पाणि. बख. पृ. १३

नोबत गुदरणें----अरिष्ट येणें; प्रसंग गुदरणें.

सर्जेराव जप्ती करीन म्हणतच आहे. त्यांत श्रीमंतांची अवकृपा. इतक्या नोबती गुदरल्या आहेत. यांत ईश्वर कशी लज्जा रक्षितो समजत नाहीं.

—ऐ. ले. सं. ६५२७

नोबती—हत्तीकडील एक कामगार.

नोबती गजपालकः —रा. व्य. को.

नोबतीवर गुजरणें—संकटांत पडणें.

जों जों इंग्रज मकानें घेईल, इकडून फौजा चढतील, गलबा उठेल, ते समयीं सवदा होईल, काय करूं काय न करूं, या नोबतीवर गुजरेल.

—ऐ. ले. सं. ४३५६

नोर—१ गलबतांतून केलेल्या प्रवासाचें भाडें किंवा गलबतांतून पाठविण्यात येणाऱ्या मालाचे भाडे. २ नोरी—भाडे घेऊन गलबतातून पाठविण्यात येणारा माल किंवा उतारू.

२३।॰ भाडें मुंबईहून पुणे पावेतो. ६ गलबतास नोर पेटचा ६ व माणसे आसामी ५. —पे. द.

नोरी—भाड्यानें.

नोरी सिवाडी करून लाकडे पाठवावी, म्हणून लिहिले ऐशास येंदा गुजराथप्रांते दुकाळ पडिला आहे याजमुळें गलबतें गल्ला भरून ते प्रांतें जातात तथापि भिडें करून सिबाड नोरी करून लाकडें भरावीं तरी दर मुड्यास रुपये ८ प्रमाणें नोरी पडेल (जल वाहतुकीचा दर).

—वै. ४ स १७४३ पृष्ठ ३५

नोरी देणें—गलबतें भाड्यानें देणें.

तुमची तरांडीं आहेत तीं आम्हांस नोरी द्या. सालीना ३०,००० रुपये देऊं. —पे. द. ३३ पृ. २००

नौ—नवीन.

शावदीखान कोंकणांत उतरला त्या प्रसंगें हशमांचें बहुतच प्रयोजन आहे. याकरितां राजश्री संताजी येमाजी याला **नौ संचणीचा** हशमांचा जमाव करावयाबद्दल वरघाट प्रांतें पाठविले असे.

—शि. च. सा. खं. ५ पृ. १९७

नौखंडा—नवखणी, नवगजी, डेऱ्याचा एक प्रकार.

तेवीस रोजी शनिवारी नवाब नौखंडे यांत दरबार करून बैसले होते.

—पे. द. २५ पृ. ९६

नौगजी—राजाचा डेरा, खाशाचा डेरा.

—रा. व्य. को.

नौबत—पाळी, संकट.

आता नौबत आमच्यावर गुदरली, त्याला सादर झालेच पाहिजे.

—पे. द.

नौबत उपटणें—नौबत गुदरणें, संकट कोसळणें.

वडिलां तागायत श्रीमंतांची सेवा केली येथपावेतों. आतां नौबत असी उपटली !

—ऐ. ले. सं. ३१६४

नौबत येणें—नौबत गुदरणें, स्वारी होणें.

गतवर्षीचा विचार आणीखच (निराळाच) होता यंदाचा आणीखच आहे! नासकापर्यंत ईश्वरकृपेने यंदा नौबत येणार नाहीं खुशाल राहाणें काडी-इतकी चिंता न करणें.

—हिंगणे द. भाग २ पृ. ७

नौबत वाजविणें—चालून जाण्याची, एकाद्यावर हल्ला करण्याची सिद्धता करणें.

सोळावे रोजीं नौबत वाजविली आणि गोविंद केशव यास सांगोन पाठविलें कीं तुम्ही उठोन जाणें नाही तर तुम्हांसी कजिया होईल.

—चं. चू. द. पृ. १२४

नौबद येणें—प्रसंग ठेपणें, नौबत गुदरणें, संकट प्राप्त होणें; स्वारी होणें.

पाटीलबावा रागानें मजला म्हणू लागले जे जमा दाखवितील ती पाहणें. कांहीं तजावत तफावत मनांत येईल तर ओली कातडी या ब्राह्मणाचे डोईवर ठेवावी. म्हणजे असेल तें सांगून देतील. मीं उत्तर केलें कीं ओले कातड्यापावेतों नौबद आल्यास ठेवावी. आणि ठेवली तर आपले ब्राह्मणाचें डोईवर किंवा बादशाही मंडळांतील ब्राह्मणाचें डोईवर ठेवावी.

—म. शि. यां. का. पृ. ५१९

नौरोज—पारशांचा पाडवा.

नौल—वादळ, तुफान.

समुद्रास नौल सुटलें तारूं चालेना असें असतां तारवांची बंदोबस्ती करून जरूरीच्या कामास ढकलून दिल्हें ते कोणे बंदरास लागेल हें न कळे ऐसा अर्थ जाहला आहे. —पे. द.

न्यवत—मुतालिकी.

सलाबतजंगानीं आबदुलखैरखानाचे नांवीं बुऱ्हानपूरचे सुभेदारीची न्यवत पाठविली. —पे. द. २६ पृ. १३८

न्यहायत; निहायत—अत्यंत.

१ हें ऐकून निहायत खुशी झाली. —साने प. या. व. ४६४

२ असा न्यहायत क्रम राहिला. —राजवाडे १९ पृ. ८

न्यहाल—गादी.

१ म्हणून अशा महाली । होता काहेली । पराच्या न्यहालीवर खेळले ।
—प्रभाकर २२९

२ न्यहालौ अत्लसी. —वाडसमा २५५

३ हंसिणी कधिंग करिशिल न्यहाल हंसाशी ?
—प्रभाकर २०८

४ गाईम्हशी शालदुशाल पलंग न्हयाल्या तबक देविले । ब्राह्मणाच्या हवालीं केलें । बाईने तीर्थ घेतलें ।
—ऐ. पो. के. खं. २ पृ. २२६

न्यायमधेस्त—न्यायमध्यस्थ, मध्यस्ती करणारे पंच.

आपली बायको बेफंदी करोन तुम्हासमागमें मौजे मजकुरास आली. मग आम्ही तिच्या शुद्धीस पुणियास आलों. तिजला माघारे न्यावयास लागलों परंतु ते राजी होईना मग पंचात न्यायेमधेस्त राजश्री पांडावा नाईक वाडेकर व संभाजी मल्हार पडोन करार किंमत ७५ रु. केले ते आपण घेतले तुम्हासी कांहीं दावादंड राहिले नाहीं.
—पुरं. द. भाग १ पृष्ठ ९७

न्यारगीर ; न्याहारगीर—मिश्रपदार्थांतून शुद्ध धातू काढणारा.

न्यावत—मुतालिकी.

न्यावतचा (न्याबतचा) खिलत. —दि. म. रा. २ पृ. १०७

न्याहाली—गादी.

पालखींत घालावयासी न्याहाली व पलंगपोस पाहिजे.
—पे. द. १८ पृ. १०५

न्यूनपदार्थे—किमानपक्षीं, कमींत कमी, गेला बाजार.

हल्लीं द्रव्य साष्टीमध्यें म्हणाल तरी २५ लक्ष रुपये हे न्यून पदार्थें ऐ श. ४८

स्वामीचे पदरी पडतील. येकसे सतावन गांव त्याचे वगत जात आहे ती पाहाणें. —पे. द. १६ पृ. २०

न्यूनपूर्ण—कमी अधिक.
खानानें लिहून दिल्हें आहे त्याप्रमाणें करार करितात अगर कांहीं न्यूनपूर्ण करितात. —पे. द. २० पृ. १३१

प

पईवादी—पश्चिमवादी, प्रतिवादी.
जमीनदारानी देहाये (यांच्या) विद्यमाने आग्रवादी (वादी) लुमाजी बिन तेजजी पाटील व पईवादी कोंडाजी बिन लखमोजी पाटील, कारणे निवाडपत्र केले यैसे जे. —शि. च. सा. खं. २ पृ. १२५

पकडी—(?)
श्रीमंत बाजीरावसाहेबांस (झगा) हिरवा बऱ्हाणपुरी बुटेदार आसवली किनारा व पकडी पट्टयांस (?) येणें प्रमाणें दिलें.
—ऐ. ले. सं. ४९२५

पकायत—दृढता.
होळकर व्यास नदी उतरून मार्गशीर्ष वद्य षष्ठीचे दिवशीं अमरसरास (अमृतसरास) गेले तेथें शिकाची सासू व गुरु यांशीं स्नेहाची पकायत करून त्यांचे विद्यमानें रणजितसिंग शिकाची भेटी जाली.
—हो. कै. पृ. १७०

पखला—पखाल या शब्दाचें अनेकवचन.
हुजुरपागेकडे पखला पाहिजेत तरी दोन बैल पखलासु॥ सिताबीनें पाठवून देणें. —पे. द. ७ पृ. ६

पखी—(?) (मो. वा. चूक, मूळ शब्द वरदी असेल काय ?)
ऐसीयास साहेबापासी उभे राहिलो. तेथें साहेबापासी सांगितले कीं, देशमुख व तिम प्रभु व गदाजी ऐसे मोगलासी मिलोन बाहेर पडोन मारा केला आहे. ऐसियासी साहेबी आम्हास पुसिले की देशमुखानी मारा केला खरें कीं काय ? त्यास आपण जाब दिधला की देशमुख वतनदार त्यापासून हें घडणार नाहीं. साहेबाच्या पायापासी येतील ते वख्ती आपली पखी देतील ऐसा जाब दिल्हा. —रा. खं. १ पृ. ४६

पगडबंद—टोपीवाले. इंग्रज. इंग्रजांचें सांकेतिक नांव.
ऐसे बोलणे ऐकोन श्रीमंतानी आनुभविक (अनुभवलेल्या) पगडबंदाचें आचरणें, (इंग्रजांच्या मदतीमुळें) जुनराहून पुण्यास येवोन स्वस्थता

पावले तावत्कालपर्यंत नाना फडणीस, परशरामभाऊ, सिंदे होलकर, भोसले वगैरेंच्या कृति सांगितल्या. पगडबंदाचे कारणात (इंग्रजाशी केलेल्या तहात) सरकारचे किल्लेकोट मुलूख किती गेला पहावे.

--शा. द. वे. पृ. १३७

पगडीबद्दल भाईचारा—एकमेकांच्या पगडया बदलून दोस्ती करण्याचा विधी किंवा संकेत.

१ गायकवाड यांचा एकच निश्चय कीं इंग्रजासी पगडीबद्दल भाईचारा केला आहे तो टाकून तुम्हांकडे यावें.

—म. शि. यां. का. पृ. ८३

२ आला जाटाचे मुलासी (व) नजबखानासी पगडीबद्दल भाईचारा आहे यामुळे त्याचीही मर्जी जुजावयाची नाही.

—हिंगणे. द. भाग २ पृ. १०७

पगदंडी—पाऊलवाट.

पगबदला—पगडीबदल, भाईचारा, स्नेह.

छत्रसालानें बाजीरावसाहेबांस तिसरा पुत्र म्हणून राज्याचे हिस्से करून लेखपट झाले. हिरदेसा वडील पुत्र त्याचा व रावसाहेबाचा पगबदला झाला उपरांत हिस्से.

४२ हिरदेसा
३६ लक्ष जगतराज
३३ लक्ष बाजीराव

—भा. व. गो. बुं. कै. पृ. ५

पगला—चोर किंवा फरारी लोकांचा माग त्यांच्या पावलांच्या खुणांवरून लावणारा व दुसऱ्या गांवापर्यंत तो माग नेऊन पोचविण्याचें काम असलेला. ज्या गांवानजिक माग संपे त्या गांवाला चोरी भरून द्यावी लागे.

पगार—गलबताचा एक प्रकार.

गुराबा, तरांडी, तारवें, गलबतें, पगार अशी नाना जातीची जहाजें करोन आरमार सजिलें.

--सभासद पृ. ५६

पंगुवार—शनिवार.

पच्ची करणें—पक्कें बांधून घालणें, जखडून टाकणें.

(अवतरणासाठी 'वाघरा' शब्द पाहा)

—राजवाडे खंड. १२ पृ. १९८

पंच पावणें—पंचत्व पावणें; मृत्यु पावणें.

रामोजी बावाही षष्टीचें रात्री पंच पावले.

—पे. द. ८ पृ. ४४

पंचयात्रा—पेशव्यांची स्वारी डेरेदाखल झाली म्हणजे पुण्याच्या आसपास, पर्वती, थेऊर, जेजुरी, मोरेश्वर, कुरकुंब या पांच देवस्थानांची दर्शनें पेशवे घेत. यासच पंचयात्रा अशी संज्ञा होती.
आश्विन व ॥१ स डेरादाखल होऊन पंचयात्रा करून श्रीमंत फौज जमा करीत करीत महादेवावरून गलगल्याच्या सुमारें जाणार.
--ऐ. ले. सं. १०७९

पंचयाती—बारभाई.
कार्य होणें तर यामध्यें खासा सरदार मेढा पाहिजे ऐसे आहे. पंचयातीनें स्वामिकार्य होत नाहीं. —पे. द. ३३ पृ. १३६

पंचरूढ—शस्त्रसज्ज. विविध हत्यारांनिशी सज्ज.
किल्ल्यांत दारूगोळा वगैरे सरंजाम वराच आहे. लोकहि पंचरूढ आहेत.
—ऐ. ले. सं. २८०४

पंचरूढ—बिनकवायती शिपाई. (ते अनेक हत्यारें बाळगीत असत व जरुरी प्रमाणें त्यानिशी लढत)
पठाण, गाडद, हबशी, चट्टेकरी व प्यादे पंचरूढ माणूस, असें असतां यांणीं निकडीनें स्थळ घेतलें. —ऐ. ले. सं. ९७२

पंचोत्रा—मालाच्या किंवा इमारतीच्या किंमतीवर घेण्यात येणारा शेंकडा ५ टक्के कर. राज्यात तटबंदी, गढी वगैरे बांधल्यास हा कर छत्रपतींकडे द्यावा लागे.
मल्हारजी होळकर यानी मौजे वाहूगांवी गांवकुसूं बेलदार यांजकडून बांधविलें त्यांस हुजूरचा पंचोत्रा होळकर यानी द्यावा याकरितां नथू चौधरी याणी रा. स्वामीस विनंति करून राजपत्र सहीचे घेऊन पाठविले. (परंतु) त्याणी उत्तर दिल्हे कीं आम्ही पंचोत्रा देत नाहीं चाकर रा. पंतप्रधान याचे आहो त्याजकडे जाणे ते तुम्हास पैका देतील.
—पे. द.

पछाडणें—छापा घालणें; हल्ला करणें.
नारेली पोर्णिमेआतबाहेर निवाती पडतील. त्या संधीस उंदेरीचीं गलबतें मान्यांत गवसऊन पछाडितो.
—पे. द. ३३ पृ. २५

पंजरा—पंधरा.
आता गडावरी धाहा पंजरा लोक असतील.
—शि. च. सा. खं. ५ पृ. २९

पंजा—धनुष्याची दोरी खेचताना बोटाना घालावयाचे चामडी अंगुस्तान.
--रा. व्य. को.

पट्टा—सनद.
निदानची गोष्ट सांगितली कीं विजयादशमी जालियावर आमच्या देशच्या फौजा येतील मग तुम्ही पट्टा द्याल तेव्हा येश तुमचे हातचे परिच्छिन्न गेले. जर पंतप्रधानस्वामीशी स्नेह पूर्ववत राखणे तर फौजा जोवर आल्या नाहींत तोवर सनदा देणें. --पे. द. ३० पृ. ९९

पट्टी पळगी—जादा बसविलेला कर.
सावनुरीं गोखले यांणीं पट्टीपळगी इत्यादि बहुत उपद्रव केले आहेत.
—ऐ. ले. सं. ५६६८

पट—कॅटलॉग, यादी; वसुली अधिकाऱ्यासाठीं तयार केलेला नियमांचा तक्ता.

पटकाल—फटकाळ, वाईट, शोचनीय, निषेधार्ह.
जाहिराणा जालीयानें ठाण्यास हिसका बसेल तें पटकाल.
--पे. द. भाग २९ पत्र नं. १७२

पटकी, पटकी देणें, पटकी बसणें, पटकी बसवणें—दगा; आपटी, गोता देणें, नाश होणें, धोका येणें, आपटी देणें, गचका देणें, तोंडघशी पडणें.
१ सर्व प्रकारें विश्वास देऊन आपणांस पटकी त्याणीं दिली आहे. त्यास आपण पटकी द्यावी. —ऐ. ले. सं. ११९
२ अकारपूर्वकास पटकी द्यावी.
—पे. द. भाग २९ पत्र नं. १८१
३ येवंच कर्नाटकाचा मजकूर असा नासला फत्तेसिंगबावा तोंडघसी पडले. थोरले बाईनें केले ते मोडले चालले नाहीं. बाईसहि पटकी बसली परस्परे कलहे माजला आहे. —पे. द. २८ पृ. ५
४ वकील हल्लीं बोलतात तें लटीक. अंतरंगें पैका देतात. पर्जन्यकाळीं पटकी बसेल म्हणून आंतले आंत कबूल करितात.
—ऐ. ले. सं. १४६०
५ इंग्रजानी ज्यास धरला तो सोडला नाहीं ऐसा त्यांचा लौकिक ऐकत आलो, ऐसे असतां सांप्रत आम्हास पटकी बसविली.
—राजवाडे खंड १२ पृ. ९७

पटगारी—(?) पद (?).
यास्तव राणाजीहि मेजमानीचा सरंजाम करितात व पटगारी देतीलच.
—पे. द. १४ पृ. ५५

पटवारी—गांवचे हिशेब ठेवणारा एक ग्रामाधिकारी. याचें काम चौगुल्यासारखें च असे.

पटाईत—मांडलीक असा सरदार किंवा संस्थानिक.
(विशेषत: राजपुतान्यांतील संस्थानिकास हा शब्द लावीत)
१ बाकी रुपयाच्या भरण्यास मुलुख दहा लक्षांचे महाल दिल्हे व सहा-सात लक्ष रुपये आपले पटाईतावर नेमून दिल्हे.

—म. शि. यां. का. पृ. ५७३

२ कुली फौज मलजी दिवाण वगैरे त्रिवर्ग बिकानेर प्रांतीहून आले. वकंड या प्रांतीचे रजपूत पटाइत जागाजागा होते ते कुली आले.

—E. M. P. पृ. ४२

पटापटी—ज्यावर पट्टे काढलेले आहेत असें कापड.
१ धोरपड्यानीं कनमडी किल्यांवर आपली पटापटीची वैरग (निशाण) लाविली.

—पे. द. २५ पृ. ७४

२ दिल्लीच्या मोगल बादशहाचा खास डेरा अशा तांबड्या, पांढऱ्या पटापटीचा असे.

—अर्यविन

पटू—कापडाचा एक प्रकार, भरड लोकरी कपडा ब्लँकेट.
कवाइती लोक यांस आंगरख्याबद्दल आठशे आंगरखे होत ऐसा पटु लाल वखारीतून चौकसीने खरेदी करून पाठविणे.

—राजवाडे खंड १२ पृ. १४३

पठारा—तांडा. सैन्यास धान्य आणून पोचविणाऱ्या लमाण चारणादिकांचा बैलांचा तांडा.

—पे. द. ३ पृ. १४७

पुढें प्रजन्यकाळीं दाणा मिळणार नाहीं तरी आपण वाणीउदमीयाकरवी पांच सातशे बैलांचा पठारा येथें पोहचे ते करावे.

—पे. द. ३ पृ. १४७

दठारा—एक गलबताचा प्रकार.

—कु. आं. ढ. ३८१

पडक—ओसाड, मशागत नसलेली जमीन. पडीक.
पडघोडी—लढाईत शिलेदारांची घोडी पडल्यास त्यांस सरकारातून पेसा मिळत असे तो.
कालपर्यंत फौजेचा दंगा होता (पगारबाकी वगैरेसाठी) पडघोडी व रोजमरे तटले या करितां शिलेदारांनीं चार रोज अडवून बसवले होते.

—इच. सं. इ. पृ. १५४

पडथल—भारवाहक, पडथळाचे बैल. (पडथळ—ओझें, पडथळाचा—ओझें वाहणारा.)
१ शामलाकडील महंमद हुसेन वगैरे नफर दहा याबरोबर घोडे दोन व पडथल तीन येणेप्रमाणें पुणियास आले आहेत.

—पे. द. ३३ पृ. ३९३

२ सदाशिवपंताचा तट्टू पडथळाचा, ताटवाट्या वगैरे वस्तभावसुद्धां गेला!

—ऐ. ले. सं. १८३७

पडथल—परस्थल. एखाद्या कज्ज्याचा निकाल करण्यासाठीं नेमून दिलेलें कोर्ट किंवा पंचायत.

प्रस्तुत त्या ठिकाणाबद्दल परांजपे यास ताकीद करून पडथली त्याचीं भुतें निवडोन आली तरी वारावार करावी. भुताविसी चार गांवचीं पडथलें नेमून देणें.

——केळकर संग्रह, लेले दप्तर.

पड्याने गोष्ट सांगणे—निःसंदेह सर्व न सांगणें. कांहीं लपवून ठेवणें.

सारांश त्यानी पड्याने छपाऊन गोष्ट सांगितली.

——पुणें अख. भाग २ पृ. १९२

पडदल——पडथळ, Baggage, सामानसुमान, ओझें.

१ कपितान कबिलासुद्धां साष्टीस जात आहे. बरोबर माणसें पडदले आहेत त्यास दस्तक.

—पे. द. ४५ पृ. १००

२ अवतरणासाठीं पालपडदा पाहा.

—हो. कै. पृ. ९

पडदा—आडवस्त्र; यवनिका; गोशा; मर्यादा; शरम; भीति; स्वर; सतारीचा स्वरविभाग; आड पडदा; दुजाभाव. कपट करणें, संशय येणे, अबोला.

१ कोणतेंही एक पडलें अंतर धन्यास कळलें नाहीं इतका पडदा आहे तोंच बरे, इतक्यानें माणूस मर्यादवंत असतें. —म. रा. आ. १६

२ आपल्याशीं पडदा स्वप्नींही नाहीं.

—साने प. या. व. ३०९

३ प्रस्तुतहि बाबाचे गोविंदरायाचे वगैरे सर्व भाव तुम्हांस स्पष्ट दिसून मजसी पडदा करता असें वाटतें.

—पुरं. द. भाग १ पृष्ठ २२०

४ स्वामीनी याजवल कोणेविसी पडदा धरिला न पाहिजे.

—पे. द. ३४ पृ ४७

५ तधीपासोन बाबांचा पडदाच चालत होता. नारोपंतावर व मजवर बाबांची मर्जी नाखूष जाली. —म. शि. यां. का. पृ. ४१९

पडदादा——चुलत घराण्यांतील पूर्वज; चुलता, आजोबा वगैरे.

इंजानिबाचे पडदादा नबाब अबदुल मजीदखां यांस व श्रीमंत बाळाजी बाजीराव पेशवे यांस (यामध्यें) तहनामा झाला त्याची नकल.

—द. स. कै. या. पृ. २३९

पडप, पडपण—आवरण, आधार, शोभा, प्रतिष्ठा.

गंगू हैबती म्हणती, । हिच्या पुण्याची कोण करिल गणती। राज्यास होती पडपण ती (अहल्याबाई). —ऐ. पो. के. खं. २ पृ. २३३

पडमूत—नादान, अकर्तृत्ववान. मूळ अर्थ थोडीशी मजल पडली असताही तेवढ्या धावणीने मुतणारा अशक्त घोडा.

या करितां कुसाजी गणेशाचे सर्वाविसी अभिमान धरून चालविले पाहिजे. केवल पडमूत नाहींत ज्या कार्यावर ठेवाल तेथे तत्पर राहातील.
—पे. द. १२ पृ. १६

पडलें पान—अगदीं क्षुल्लक, बिनमहत्त्वाची गोष्ट, बारीक सारीक सुद्धा, झाडून सर्व.

१ पावती आदा मिळकत अकृत्रिम दोघांच्या विद्यमानें करून येणे प्रकारें दर शेकडा रु ॥

५५	गंगाधर यशवंत
४५	रामाजीपंत
१००	

पडल्या पानास तफावत करू नये.
—चं. चू. द. पृ. ११४

२ आम्ही आजतागाईत चाकरीस आऊबाचे आज्ञेखेरीज तिळमात्र अंतर करीत नाहीं परंतु त्यापासून येक रुपया प्राप्त होत नाहीं. आजीतागाईत आठ दहा हजारच रुपये साता महिन्यात पडले पान आदा जाला आहे. अशा स्थितीत येवढी सरदारी महीनेमहाल लोक, कैसी जिनगानी रक्षावी? --पे. द. १५ पृ. ४३

पडसर, पडसरी—पाऊसकाळ.

पडसरीचे दिवस. पर्जन्य इकडे अतीशय पडतो. सध्या धायगुडे, आम्ही व काळे इतके मात्र आहों. घोड्यांत एका म्हटलें तरी जीव नाहीं, या प्रकारची अवस्था आहे. --ऐ. ले. सं. १६७२

पडसरी, पडसार, पाडेसर--ओसाड पडलेलें शेत, लागवड न झालेले शेत, पडीक ओसाड जमीन.

नानांचें मानस शेतें यांनीं केलीं आहेत त्यांचा आकार होईल तो (यांनीं मिरजकरांस) द्यावा. जीं शेतें पडलीं व रयताव्यास लाविलीं, त्यांचा पैका मिरजकरांनीं स्वतःपासून द्यावा. पडल्या पडसरीचा पैका यांजवळ मागों नये. —ऐ. ले. सं. ३०२३

पडसा—फडसें; थेटें.

नबाबाचे शरिरी आज दोन तीन दिवस स्वस्थता नाहीं. पडसा जाला आहे व आंगास मांदगी आली आहे.

—पे. द. भाग २५ पत्र नं. ६८

पडसाक्ष, परसाक्ष—उपोद्बलक पुरावा, त्यावरून पडसाक्षी म्ह. तसा पुरावा देणारा साक्षीदार.

पडसी—धान्याची पोतीं; लक्षणेनें ती पोतीं आणणारे लमाण; लष्करांना धान्यपुरवठा लमाणांचे तांडे करीत.

समलपूर यैवज मिलणें कळतच आहे दुसरे मार्गही बंद केला याप्रमाणें वर्तमान आहे. फौजेत महर्गता फार. पडसी आली तरी चार शेर पांच शेर नाहीतरी दोन सेर तीन सेर चालिलेच आहेत. —नाग १ पृ. २३४

पडाऊ—१ पाडाव, पकडून आणिलेला ? २ बोल, ओलीस घेतलेला इसम ?

चंदीचे किलेचे फिरंग्यानीं रस्त पाठविले होते. ते वर्तमान नासरजंगानीं यैकून जानोजी निंबालकर याजबराबरी दाहा हाजार फौज पाठऊन रस्त परतून त्याजकडील सरदारास पडाऊ घेऊन आले.

—पे. द. २८ पृ. ८२

पंडितखाना--कैदखाना, तुरुंग.

दक्षणी ब्राम्हण डोचकी मारण्यायोग्य आहेत तत्राप त्यातहि हे दोघे हरामजादे आहेत. एक मोरू व एक रामदास. हे दौलतीचे नाशकर्ते जाणोन त्यांस बाहेर अहमदनगरचे किल्ल्यांत कैद केले आहेत. त्यांचा तेथें बंदोबस्त ठेवण्यांत आपले कामाचा बंदोबस्त समजावा. कैदखान्यास पंडितखाना नांव त्यामुळें आहे. —इ. सं. पे. द. स. प. मा. पृ. ३२०

पडीचे दिवस—पाऊसकाळ.

जाधवराव यांचे व आमचे विचारें येकच विचार कीं शत्रूवरी जाणें अगर भलताहि विचार करणें तो आपले कुवतीवरी आहे. पुढें पडीचे दिवसांत होतोसें नाहीं. यास्तव स्वामींनीं लस्करांत यावें.

—पे. द. १२ पृ. २२

पडीथळ—पडथळ, पाल राहुटी व इतर प्रवासाचें सामान.

—चं. चू. द. पृ. १३७

पडीबार, पडिभार—प्रतिष्ठा.

इतके वचन ऐकितां भाऊला ईर चढली फार ।
चंदीचंदावर दिल्ली औरंगाबाद शहर ।
उंदड घेतले किल्ले काय या खेड्याचा पडिबार ?

—ऐ. पो. के. खं. २ पृ. १०१

पडीवार—पडिभार, मोठेपण, प्रतिष्ठा, लौकिक, दिमाख.
येकूण मानसी विचार हा कीं सर्वसिद्धी जालीया उद्योग तुमचा करावा. याकरितां याचे पडिवार व मायावी कर्मावर असावध राहावेसें नाहीं.
—पे. द. १७ पृ. ७

पडेंगोसावी—(?) नेहमी भूमीजवळ पडून राहणारा.
येथे एक पडेगोसावी बेगमीपुरियात आहे खानाकडे जातां वाटेवर आडळतो. त्याणे अकस्मात् एक दिवस सेवकास सांगितले कीं तुम्ही पेशवे यांचे वकील आहा. आम्ही स्वप्न पाहिलें कीं बारामतीवाला कोणी आहे तो घालमेलीत आहे तरी हें वर्तमान श्रीमंतास लेहून पाठविणें.
—राजवाडे १ पृ. ३४

पडोसी—निकटचे; शेजारी.
पातशाहाचे पडोसी आम्ही आहों. उगाच पातशाहाचें नांव घेऊन इंग्रज शिद्यास मदत करीत असतील तर सुखें करोत.
—पे. द. ३ पृ. ५६

पढंगी, (किंवा पडंगी)—गलबताचा एक प्रकार.
सुरतेहून फिरंगीयाच्या पढंग्या वगैरे गलबतें पंचवीस वसईस आलीं.
—पे. द. ३४ पृ. २९

पढणें लिहिणें—लिहिणें पढणें. व्युत्क्रमाचे उदाहरण
पहिले दिवसापासून पढणें लिहीणें हास्यविनोद मुस्तईदखानासी निभिडता जाली आहे. —पे. द. भाग २५ पत्र नं. १९२

पत्ता—१ फत्ता किंवा फत्या (तोफेच्या गोळ्याचा कपरा) २ जामगी. म्हणजे तोफ किंवा बंदूक उडवितांना दारूला लावावयाचा काकडा. हा उदवत्तीसारखा संथपणें अंगाबरोबर जळत असतो.
जखमी तीन निसवत जमाव येसाजीपंत हरजो इंगळें, पत्त्यानें.
—पे. द. ३३ पृ. १४२

पत्र—चिलखताची उरावर येणारी पट्टी.
—रा. व्य. को.

पत्रकेणी—(?) भारेवाले ?
मौजे नसरापूर येथील पेठेचे आठवडेकरी दुकानदार कापडकरी व पसारेकरी व पत्रकेणी व खांदाडकरी बाजारात जातील त्यास हाशिल जकातीचा न घेणें.
—पुरं. द. भाग ३ पृ. १००

पत्र चालविणें—पत्र रवाना करणें.
म्हणून मी निरोप मागितला. पत्र चालऊन निरोप देतो म्हणाले.
—ऐ. सं. सा. खंड ६ पृष्ठ २३

पत्रवार—लेखी; विश्वसनीय.

वर्तमान बाजारीच हिंदुस्तानांतून व कासीहून आले आहे. कोणाचे लिहिलें पत्रवार नाहीं. —नाग १ पृ. १४९

पत्र सुटविणें—पत्र पाठविणें किंवा रवाना करणें.

तुम्ही रुद्रो मेलगीर यासमागमें पत्र सुटविलें तें सुसमयीं प्रविष्ट होऊन लेखनार्थ कळों आला. --रा. खं. ३ पृ. ६

पत्राचा पूर करणें—पत्रावर पत्रें पाठविणें. पत्राचा श्वेत लावणें.

तुम्ही वरचेवर पत्राचा पूर केला.

—पे. द. भाग २९ पत्र नं. ४३

पत्रावळ होऊन बसणें—निरुपयोगी, महत्त्वहीन ठरणें.

केवळ पत्रावळ होऊन बसण्यांत सखाराम बापूचा संतोष किती राहील हें स्वामीनीं चित्तांत आणावें. --ऐ. ले. सं. १४६६

पत्रिकाप्रेषण—पत्र पाठविणें.

गोसावीयानीं क्षणाक्षणा येणारावरावर पत्रिकाप्रेषण करून सांभाळ करीत जाणें. पे. द. ३ पृ. १५२

पतपाव—अब्रू; वजन.

मामला झाल्याखेरीज पतपाव होऊन आम्हास अन्न मिळत नाही करिता मामला हर एक होऊन येईल यैसें करावें.

—वै. ४ स. १७४५ पृ. २७

पत बांधणें--ओळख वशीला लावणें.

चौ रोजांनीं देशमुखाचे ७ जण पुत्र व लोक मिळोन पत बांधोन किल्ल्यास गेले व म्हणाले आम्हापासोन तक्सीर जाली. आम्ही शिव्यागाळी दिल्या परंतु त्या वरातदारास हकिमास नाहीं.

—रा. १ पृ. ४

पतमारी—फत्तेमारी (गलवताचा एक प्रकार).

वलंदेज निघोन गेला यैसे वर्तमान इंग्रेजाची पतमारी आली तिणें सांगितले. —पे. द. १६ पृ. १२२

पतिंगे—(पु.) कोंकणी शब्द. १ मोठे वल्हे २ वल्ह्याचा दांडा, उथळ-पाण्यांत लांब काठी जमिनीस टेकून नाव चालवितात ती काठी. ताज.

शंकराजीपंताकडे गल्ला व लाकूड वोंडे व पतिंगे ऐसे आज्ञेप्रमाणें रवाना करितो. —पे. द. ३४ पृ. १०९

पंतो—पंत या शब्दाचें संबोधन.

वासुदेव पंतो ! आपले आमचें भाषण श्रीमंतांसमक्ष होत होतें, त्याविशीं लिहिलें, उत्तम आहे. —ऐ. ले. सं. २७२५

पथ्यावर ठेवणें—१ वर्ज करणें. २ काबूत ठेवणें ३ कैद करून ठेवणें.

१ महाराष्ट्राचे तों, ते परमद्वंदी, त्यास पथ्यावर ठेवावे.

—हिं. द. खंड १ पृष्ठ ३९

२ येमाजीपंत वलकल करणार होते त्यास आम्ही पथ्यावरी येके पर्वतावरी ठेवले. —पुरं. द. भाग १ पृष्ठ २३१

पथ--वहिवाट; प्रथा. पंथ

नालबंदी द्यावयाचा पथ पडल्यामुळें जो इच्छावा तो सरदार सव्या तयार होतो. --ऐ. ले. सं. ५२८

पंथ—मार्ग, वहिवाट, व्यवस्था, क्रम.

सदाशिवपंत भाऊ व विश्वासराव साहेब या उभयतांनी जखमी लोकांच्या दिवसांतून एक वेळ, राहुटीस जाऊन समाचार घ्यावा, याप्रमाणें पंथ चालविला. —पाणि. बख. पृ. ३१

पथ घालणें--दडंक घालणें.

त्या प्रांतीं गांवगन्ना जमेप्रमाणें आकाराची चवथाई खडंणी घ्यावी, यांप्रमाणें पथ घातला आहे. —ऐ. ले. सं. ६१८८

पंथ घालणें—वहिवाट ठेवणें.

बिनहत्यारें शिंदे यांचे वडियांत सर्वत्रांनीं यावें हा पंथ घातला होता.

—भा. कै. पृ. ३

पथरबाजी—दगडफेक.

खान अलीशान गोरीखान फौजदार ठाणे मजकुरास येऊन पोहचले पाहाड मजकुरे दरवाजे बंद करून सिदती जंग केली किल्यावरून पथरबाजी केली खानाचे लोक असर जखमी जाले. जरूर जाणोन खानाचे लोकांनी तीरतुफंगाची मार केली.

—शि. च. सा. खं पृ. १३२

पदर—पिता.

१ किल्लेगाह रघुनाथराव यांनीं आमचे पदर किल्लगाह नारायणराव यांसी दगा केला. --ऐ. टि. ५८

२ विठोजी नाईक देशमुख यांजमध्ये व बयाजीराव आपले पदर यामध्यें निफाक (लढा; वैर) होता. --वाड सनदा १४०

डोईवरचा पदर टाकणें— प्रकटपणें एखादा निश्चिय जाहीर करणें. स्त्रिया सती जाण्याचे ठरवीत तेव्हा डोक्यावरचा पदर काढून टाकीत असत.

जानबाखानाची सरदाराची मसलत जाली आणप्रमाण जाली मल्हारबाचे बाबूजी नाईकास बल पाडावे हेहि घाटते. बाकी डोईवर पदर टाकावा याप्रमाणें खबरी आईकल्या त्यांत मोगलहि माघारा चालेना यामुलें

फारच गपा उठू लागल्या परंतु आम्ही सर्व जाले उगीच दिसतील कोणही गोष्ट ठरावयाची नाही. सरदारास आम्ही बाहेर घातले नाही ती डोईवरचा पदर कां काढितील? —पुरं. द. भाग १ पृष्ठ२१०

२ मल्हारराव होळकर लढाईंत कामास आले. तेथून पांच कोस लोणी. तेथें बायकांनीं खांद्याखाली पदर टाकून बसल्या. सासूसासऱ्याने निषेध केले की 'तुम्हास कशावरून समजलें' तों दोघांची माणसें आली त्याणीं वर्तमान सांगितले, नंतर बायांनी सहगमन केलें.

—हो. कै. पृ. १२८

पदरास झोंबणें—तोशीस लागणें.

दौलत मुक्रर आपले पदरास झोंबली. या दौलतीच्या पायी आपणास फार तोशीस लागली. —पे. द. २२ पृ. १६७

पदार्थ—गणनीय, लक्षांत घेण्याच्या योग्यतेचा.

परंतु हे काही आपनापुढें पदार्थ नाहीत. परंतु दूरचा डोंगर सोभिवंत दिसत आहे. —पे. द. भाग २९ पत्र नं. ८३

पन्ज—पांच.

पन्हा, पन्ना, पनाह, पन्हाई—आश्रय, आश्वासन.

१ आपले ज्यानइजत मात्र राखणेबद्दल पन्ना घेतला.

२ आम्ही रामचंद्रबाबा व मल्हारराव यांचा पन्हा घेतला.

—पे. द. २८ पृ. २४३

३ प्यार मोहबत मेहेरचा पन्हा फकिरावर असो दिला पाहिजे.

—पारसनीस ब्र. प. ३०८

४ अखेर जमीन्दारांचा जोर पाहून पुन्हा किल्ल्यांत पनाह घेतली.

—दि. म. रा. २ पृ. १९४

५ सरकारच्या दुस्मनास पन्हा न द्यावी.

—खरे ७ पृ.३५६७

६ जीं इंग्रजांच्या पन्हाईत असतील.

—वाड. स. मा. २ पृ. ६५

७ रघुनाथराव यांची फते जाली त्याउपरी बाबूराव फडणीस हुजूरचे पन्हात आले. —पुणें अखबार भाग १ पृ. १०४

पन्हेरी—वाटसरांकरिता घातलेली पाणपोयी.

—विल्सन.

पनरा—पंधरा.

१ याजकरितां पनरा सोला रोज मुकाम येथें करून राहिले.

—ऐ. सं. सा. खं. ३ पृ. २५

२ रामजी धोंडदेव यास पनरा दिवसाचा निरोप देऊन लग्न करावयास पाठवणें. —पे. द. ९ पृ. ३१

३ गंगाधर पंडित विशाळगडाहून धणी यांनीं बोलावून आणिले होते आठ पनरा दिवस राहिले. —वै. ४ रा. १७४७ पृ. १९

पनाह्--पन्हा, आश्रय.

इंगरेज माघारे गेले व महमदअल्ली, मही बंदराचे पनाहास जाऊन राहिले. —पुणें, अखबार भाग १ पृ. १९२

पनीर, पनेर, पनेरी—दुधापासून तयार केलेला एक पदार्थ.

पयट करणें—काबीज करणें (?)

अजमीरच्या किल्ल्यांतील लोक फिद्रू फिरंगी याणें फितूर करून पयट केला, अशी वदंता बाजारी आहे. —ऐ. ले. सं. ७१०७

पयदरपय—पैदरपै, लागोपाठ, एकामागून एक अशा रीतीनें.

हैदरअलीखानाकडील वर्तमान व पत्रे येथील कारपरदाजास येक महिना येत नाहीत म्हणोन पूर्वी दोन तीन अखबारेत पयदरपय लिहिले आहे. —पुणें अख. भाग २ पृ. १२९

पयहम—वारंवार, पाठोपाठ.

या दिवसास कृष्णराव बल्लाळ याची पत्रे डाकेवर पयहम आली. —पुणें अख. भाग २ पृ. १४१

पया करणें—मागून पाय कापणें.

आपण तो आम्हास पुढें करून मागून पया केल्या. असो. हा बोल आमच्या प्रारब्धास. —पे. द. ३३ पृ. १२८

पयादरयया—पै दर पै; तावडतोब; टाकोटाक; पाठोपाठ; वारंवार.

पुण्यास पया दर पया वर्तमानास पादचारी जावें. तिकडील वर्तमान येत असावें. —ऐ. ले. सं. ६५९६

पयेबीन—'पैहम'चा अपभ्रंश तर नव्हे ? पैहम किंवा पैहाम म्हणजे वारंवार, पै दर पै.

हकीकत मालूम जाली आंयेदे पयेबीन हकीकत मुफसल लेहून पाठवीत जाणें. —पे. द. ३० पृ. १७१

पर्गनह्—पर्गणा, विषय.

पर्गरी—कंठी. —दि. म. रा. १ पृ. ७५

पर्णग्राम—पानगांव.

पर्णग्रामीहोऊन कांहीं वार्तासिंभुतीश्रवणें साशंक होऊन ही पत्रें स्वामीस पाठविली आहेत. —पे. द. ८ पृ. ४६

पर्दाख्तन—गढणें.
पर्दाख्तह—गढून, गडलेला.
पर्बान—शीड ज्यास लाविलेलें असतें तो वांसा.
—वाड. मा. १ पृ. २३६

पर्मानगी—भेट करून देण्याबद्दल बक्षीशी किंवा लांच.
नाना जवळ उभे रहावयाचे प्याद्याचे नाईक आहेत, पर्मानगी ज्ञावितात. पर्मानगीखेरीज पालकीपदस्थांची देखील गांठ पडत नाहीं.
—खरे ११ पृ. ६०५९

पर्याय—सबब.
उभयता बाह्यात्कारे सामेल (सामील.) सुभेदाराच्या बोलण्यास रुकार मात्र परंतु कूच करण्यास अनेक पर्याय दाखवूं लागले.
—हो. कै. पृ. ६२

पर्वणा—(स्त्री व पु.) वखर, वांका, हकीकत.
१ प्रारंभी दिलेला पर्वणा मूळ प्रतीवरून नकल करून घेतला.
—व्यंकटेश बालाजी संस्थानचा इतिहास पृ. १
२ प्रथम दिलेली पर्वणा व त्यानंतर इतिहासाच्या दृष्टीने लिहिलेले तिमय्या महाराजाचे चरित्र हीं वाचकांनी ताडून पाहावी.
—व्यं. बा. सं. इ. पृ ४३

पर्वत—किल्ला किंवा गड.
याचा भाव ध्यानास येईल राज्याचा बंदोबस्ताचा प्रकार घडावा हे मानस व आस्था पर्वत व हिंदुस्थानची मुतालकी या दों कलमाचेंविसी अत्यत्कट आहे
—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. ४
पर्वतगड—ऊर्फ हडसर.
—सभासद पृ. ८२
पर्वतावर ठेवणें—डोंगरी किल्ल्यावर कैदेंत ठेवणें.
याउपरी रदबदल कराल तर पर्वतावर ठेऊं. —पे. द. ३१ पृ. ९८
पर्वदा करणें—परवर्दा करणें, वाढविणें, सांभाळ करणें.
चिरंजीवास पर्वदा करून अन्नवस्त्र देणार खावंद समर्थ आहेत.
—पे. द. ३३ पृ. ५

पर्वर्दा—१ वयांत आलेला; सज्ञान २ पाळलेला ३ पालन.
१ आपले आजे सोनोपंत तान्हें मूल होतें त्यास घेऊन नारोपंताची स्त्री पळवून पुणियासी आली त्यावर सोनोपंत पर्वर्दा जाले परंतु वतनावर गेले नाहींत.
—रा. ८ पृ. ३३
२ स्वामी कृपादृष्टीनें पालन करून पर्वर्द करीत आहेत.
—राजवाडे १ पृ. ३२

पर्वरदिगार—पोषण करणारा; ईश्वर.

पर्वर्श; पर्वरीस, पर्वरीश, पर्वरिशी, परिवरीश—पोषण; निभावणी.

१ आमची पर्वर्श करणार धनी समर्थ आहेत.

—प. द. म. व. ७४

२ माझी पर्वर्श आपणांस कबूल आहे की नाहीं.

—राजवाडे ५ पृ. ७१

३ भावावंदांची परिवरीश करीत असावी.

—साने प. या. व. ४३८

पर्वानगी—अनुमति.

पर्वानह—अनुमतिपत्र.

पर्वाना—आज्ञापत्र; अनुज्ञापत्र; पास.

पर्वांना-अल्तग्मा—राजानें दिलेली जमीन बक्षिसाची सनद.

पर्वांना अल्तग्मा करून घेतले आहेत. —साने प. या. व. २३

पवशी—पर्वरिशी; पोषण; पेन्शन.

परकृत—पिशाचबाधा; जादूटोणा, अभिचार.

वडिलांची प्रकृति तर रोगाची भावना अगदीं नाहीं. परंतु परकृतें करून व्यापून गेली. याचा उपाय शिवशास्त्री आदि ब्राह्मणांस गुप्तरूपें विचारणा होऊन लवकर झाला पाहिजे.

—ऐ. ले. सं. ५९८३

परकत—१ बैल व मजूर एका शेतकऱ्यानें दुसऱ्या शेतकऱ्यास कामासाठीं उसनें देणें २ अशा रीतीनें जो नड भागवितो त्याला **परकत** अशी संज्ञा आहे.

परकीय—शत्रु.

सांप्रत आपण कोणे जागा आहेत. कोणे मार्गे येणार ? परकीयाकडील बातमी सांप्रत येका दो दिवसांत कांहीं आली असेल ते सविस्तर लिहिले पाहिजे.

—पे. द. १२ पृ. १७

परचरण—मोड, परचुरण.

सदरहू येक लक्ष पंच्यासी हजार याच्या पदरी पडेत तो पावेतो दुसऱ्याकडे येक रुपया न देणे रुपये फिटें तो पावेती सरकारच्याच कारकुनास पवाराच्यां वाटणीचा यैवज देणे. यास परचरणाचा येका पैष्याची न करणे.

—शि. शा. इ. सा. भा. १ पृ.१५६

परज—तुरुंग किंवा दिवाणी तुरुंग.

आम्हांस तर लोकांचें देणें. ते लोक परजात बसवून आपला ऐवज मागतात.

—पे. सा. पृ. १३०

परजा—प्रजा (?).

कटका मोकदमी करीत असता काळादुकाळामुळे गाव खराब पडिला परजालोक परागंदा जाले. —शि. च. सा. खं. ५ पृ. १२३

परत—पर्वा किंवा आठवण.

महाराजाची भेटी जाहाली, महाराजांनीं वस्त्रें दिलीं. वस्त्राचे समयीं ० ० महाराजास आर्जी केली तेव्हां महाराजांनीं आज्ञा केली कीं, रा. कानोजी मोहिते हंबीरराव याचे ताबिनात केलें. महाराजाचे आज्ञा प्रमाणें त्याचे कसबतीस असतां गडावर जाऊन बैसले. आम्हांस दुग्घा वाटली. फिरोन कांहीं आमची परत केली नाहीं. आम्ही उठोन आपले घरास आलों.

—पे. द. २६ पृ. १७७

परत—पुरती; आवश्यक असेल तितकें.

तेथें ठाण्यापरत दोनचार मनुष्य राहून बाकी पलटणे ममई व वसईकडे गेली यैसी वदंता आहे. —पुणें अखबार भाग २ पृ. ५९

परतण—सुमारें४ किंवा ५ बिघ्यांइतकी जमीन.

(एकदां जाऊन परत येतांना नांगरानें जेवढी जमीन नांगरली जाईल तितकी असा मूळ अर्थ होता.)

परतणी—उलटणी, पळतां पळतां तोंड फिरवून चढवलेला हल्ला.

गोळ्यांचा भरावा येतांच स्वार पेंढारी पळाले परंतु रंगराव जातीनें मर्द पांच पन्नास स्वार पागेचा होता तो घेऊन एक दोन परतण्या केल्या परंतु तोफेपुढें जुमस न खातां पाहून, निघोन उज्जनीस गेले.

—हो. कै. पृ. १३६

परतपाळ—प्रतिपाळ.

त्यास (त्या सर्वांस) माझ्या पणजीनें व आजीने हात जोडून अशी विनंती करावी कीं आम्ही तुझ्या पोटपाखांत आहो आमचा परतपाळ कर.

—अरुणोदय पृष्ठ ७०

परतीपर—पराकाष्ठेनें, जीवापरती, परात्पर.

आपण पेशव्यासमोर शिपाईगिरीची चाकरी पराकाष्ठे परतीपर लढाईंत करीत आलों. त्यांनींही बहुत कृपा केली.

—वि. शि. विं. ब. पृ. १४

परतून—शिवाय, खेरीज.

कुरणाचा मजकूर तरी कुरण श्रीमंत भाऊसाहेबी करार करून दिल्हा आहे त्याप्रमाणेंच आहे. परतून जामीन कडियाची आहे. यास्तव कजिया, कडेकराची गढी पक्की बांधो नये म्हणजे ते कजिया करीत नाहीं. असा भावार्थ दिसोन आला. —पे. द. २० पृ. १३६

परतंत्र—बेहोष, बेशुद्ध.
महाराज पंजाबहून स्वारी फिरल्यावर परतंत्र (दारू वगैरे अमली पदार्थामुळे) व्हावयास प्रारंभ जाला दिवसंदिवस परतंत्रता गालब होत चालली.
—हो. कै. पृ. १७३

परंतु—याशिवाय, खेरीज, दुसरें असें कीं.
वरकड हिंदुस्थानांत कोठे जीव दिसत नाहीं. (फक्त) जाटांत जीव आहे. द्रव्यवान आहे, परंतु (खेरीज) किल्ले मातबर आहेत व मोठा काबूकार आहे. —राजवाडे १ पृ. १३९

परद्वार—दुसऱ्याच्या स्त्रीशीं व्यभिचार.

परदाख्त—बरदास्त, व्यवस्था, शुश्रूषा.
पेशजी सरकाराचें आमील आलें तेहि रयेतीवर नजर देऊन परदाख्त न केली. —शि. च. सा. खं. ५ पृ. २४२

परनिष्ठ—स्पष्ट; स्वच्छ; पक्कें, खरें, सत्य, निस्पृह.
१ प्रथमतः २–४ वेळां तुम्हींच संदिग्ध लिहिलें त्यावरून वराता आल्या त्या ठेवून परनिष्ठ लिहून पाठविणें म्हणोन तुम्हांस पत्रें पाठविलीं, तेव्हां तुमचेंच उत्तर आलें कीं, वरातेपैकीं रुपये द्यावे.
—ऐ. ले. सं. ८८५
२ जे माणूस परनिष्ट बोलणार त्यास दापादापी (दमदाटी) करीत आपणासारखी गोही (साक्ष) देणे म्हणोन दबावीत.
—पुरं. द. भाग ३ पृ. १३७
४ मध्यस्थपैकीं रघोजे करांजे यासी परनिष्ठ बोलणे प्राप्त जाले की प्रारंभी निश्चयात दृढीकरण काये आणिले आण आता काय बोलता ?
—पे. द. २० पृ. ८८
५ तंटयाचे जाबसालास चार वतनदार व शाहाणे माणूस तिराईत परनिष्ट बसून इनसाफ होत असे. —पे. द. ४५ पृ. १४०
६ ते म्हणतात तसें ऐकून आम्हास सांगून पाठवितात. पत्रें पाठवितात. परनिष्टपणें त्यास आम्हास सांगत नाहींत अशी भवती न भवती फारच जाली. असेंहि वर्ण निघाले कीं तुकोजीबाबा सरदार, भिन्न वाटेकरी होत असें नाहीं. माझीच सरदारी तेहि मीच रूपास आणिले.
—म. शि. यां. का. पृ. २६८

परबशाही—कागदाचा एक प्रकार.
—पे. द.

परबाण—१ पडबांध २ मोठ्या शिडाचें लाकूड, ३ दोऱ्यानें शीड ज्या लाकडास बांधतात तें.

रेजगिरी साखळी मारुन उडविला पडदा ।
मारली थोरली काठी (डोल काठी) गावी परवाणसुद्धा.
--ऐ. पो. के. खं. २ पृ. २१२

परभाराहक्क—धान्याच्या वसुलांतून ग्रामाधिकाऱ्यास मिळणारा एक हक्क. हा नेहमी वसूल करण्यांत येत नाहीं, प्रसंगविशेषी केला जातो.

परभिकीचें शेत—(?)
मौजे मजकुरी परभिकीचें सेत आहे, तें सरकारांत अनामत ठेविलें आहे. तरी कुळें लावून त्याची लावणी करणें. —रा. १ पृ. ७७

परमाणगी --परवानगी.
मंडळी घेऊन जावयाचें, असें बोलिलों. परंतु नानांची परमाणगी होत नाहीं. —ऐ. ले. सं. ५७७१

परयंत—परंतु.
किल्ला जाता बाकी राहिली नव्हती परयंत स्वामीचे पुण्यप्रतापें लज्जा राहिली. —पे. द. ३४ पृ. ३

परलोकसाधन करणें—मरणें.
सबब ती जहागीर भोसल्यानी घेतली. तितक्यांत असफजहांनी परलोकसाधन केलें. --द. स. कै. या. पृ. १११

परवदी—परवदा, परवर्दा, परवर्दी, पालनपोषण २ पोष्य, पोषित.
१ पुढें सर्व उर्जित करावयास व परवदी करावयास स्वामी समर्थ आहेत.
—पे. द. २८ पृ. २१

२ राजेश्री पंतप्रधान येकनिष्ठ स्वामीकार्यतत्पर हे सर्वतोमुखी यैकत होतो. परंतु तुम्ही पुरातन आमचे परवादी यैशाचा शोध करून जे सुकार्य यापासोन घडोन येईल म्हणून तुमचा संग्रह केला.
—पे. द. ३३ पृ. ७३

३ सेवक अज्ञान आहे, परवर्दा करणार स्वामी समर्थ आहेत.
--पे. द. ४०, पृ. ३०

४ तुझे बापाने साहेबाचेथे कस्टमशागत व चाकरी केली आहे तूंहि साहेबापासी परवर्दा होऊन कस्टमशागति, साहेब कामावर करतोस त्याकरिता साहेब तुजवरी मेहरवान आहेती.
—शि. च. सा. २ पृ. २७२

५ बेकैद करावी हे गोष्ट आपणापासून (आम्हापासून) व्हावी यैसे नाहीं. स्वामीजीचे परवरदा आहो. --पे. द. १५ पृ. ४१

परवर्ष (षि)—पोषण, आश्रय.

यजमानाचे परवर्ष अन्नवस्त्राचा निर्वाह होतो.

—पुणें अखबार भाग १ पृ. ७०

परवरी—पाळलेली.

आधीच मुसलमानांचा अंमल सख्त रयत परवरी नाहीं म्हणून ठाणीं उजाड·

—म. शि. यां का. पृ ५७३

परवाडी—परवारी (?) पटवारी की काय (?)

ते समयीं देशमुख, देशपांडे किल्याचे हकीम व गडकरी लोक व देशक व पाटील परवाडी समस्त मिळोन ४ गावचे २० गांव केले.

—रा. १ पृ. ३

परवानगी—तोंडीं दिलेली अनुज्ञा किंवा हकूम (रसानगीच्या उलट).

जिऊबा अण्णा यांचीं घोडीं पागेंत बांधो द्यावीं म्हणोन बोलणें पडलें. तेव्हां दाजीबा म्हैसकर यांनीं सांगितलें कीं, मी परवानगी सांगणार नाहीं.

—ऐ. ले. सं. ५२३०

२ नानांचें दर्शन परवानगी लागोन जाहलें.

—ऐ. ले. सं. ५६०८

३ जामदारखानेवाल्यास, लाख रुपयेपावेतो परवानगी कीं, पाटिलबावांनी लाख रुपये कोणास देवविले असता, द्यावे. आमचे परवानगीचा आक्षेप घेऊं नये.

—हो. कै. पृ. ७५

परवानगी रसानगी—तोंडी व लेखी आज्ञा. (लक्षणेने बंदोबस्त)

१ दरवाजे मोकळे झाले. आतां परवानगी रसानगी दरवाजास गाड्याची नाहीं.

—ऐ. ले. सं. १९९०

परस—चाल, हल्ला.

संध्याकाळच्या प्रहर दिवसापासून अर्ध रात्र पावेतों जुंज जाहलें दिवाण पहाडसिंग याणी हत्तीवर बसोन परस केली. दिवाण खुमानसिंग गुमानसिंग यांचा मोड जाहला.

—ऐ. ले. पा. म्यु प्र. पृ.२१४

परसावा—‘ फरसावा ’ पाहा

खोगिरें परसावाविशीं पेशजीं लिहिलेंच आहे. पाठवावीं.

—ऐ. ले. सं. १६६५

परा—पर्वा

सलाबतजंग ३५ हजार स्वारानिशी होता. त्या फौजेची परा न करिता सुजऊन मारिलं सेवट अजीज होऊन सुला केला.

—E. M. P. पृ. १३६

पराजित सेवा— ? नुकसान सोसून सेवा ?
आम्हांपाशी पैका नाहीं आमचे घरांत जें असेल तें महाराजांनीं घ्यावें परंतु यांत लौकिक दुर्लौकिक मात्र कोणाचा हें महाराजांनी पहावें व इतके पराजित सेवा करीत आले चाळीस वर्षें कसें नुकसान भोगिलें हें ध्यानांत येईल. आमचा जीर्णोद्धार व्हावा हें एकीकडेच राहून महाराज पैक्याची आज्ञा करितात! —काय. प्र. इ. सा. पु. १ अं. ९ पृ. ५२

पराजु करणें—बदलणें.
प्रस्तुत चौक्या मेटे व पहारे नवे जुने सर्व पराजु करून पक्या बंदोबस्ताने राहाणे. —पे. द.

परापर—परंपरेने, पूर्वीपासून.
श्रीमंत बाबा कैलासवासी हिंदुस्थानचे राजकारणापासून राहिल्यानंतर, मुख्य रघुनाथरावजी आले असताही कोण कोण सरदार येके विचारे राहिले! कीं आता राहतील? दुही तर परापर चालत आलीच असे. तथापि सरदार ते सरदार. शिंदे तर मोहीमकार व बाकी मदतगार! मगर शमशेर धुगीचा गुमान वागवितेत त्यास (तर) शमशेर गाजवितील तर स्वरूपास येतील. विना साहस व हातपाय हलविल्यावाचून स्वरूप कलतच असे. —हिंगणे द. भाग पृ. ३६

(प्रसंग) पराभव करणें— संकटाचा परिहार करणें; प्रसंग निभावून नेणें.
पूर्वी २–४ वेळां याप्रकारें तवाई पडली. परंतु स्वामींचे पुण्यप्रतापें निभावणी पडली. हल्लींचा प्रसंग पराभव करणार स्वामी समर्थ आहेत. —ऐ. ले. सं. ५०८९

परास्त— ?
राव मजकूर यानी मामलेपर्यंत येऊन जानोजीस मनस्वी अपशब्द बोलूं लागला हें त्यानीं ऐकून परास्त करून वराड घेण्यास उद्युक्त जाले —द. स. कै. या. पृ. ११३

परिछिन्न—निश्चित; निखालस; स्पष्टपणें, निःसंदेह, बिलकूल.
१ कृष्णाजी राम यापासून यैसे कर्म होणारच नाहीं हे परिछिन्न वर्तमान आम्हास कलल्यावर आम्ही जाऊन रायाजी बावास पुसिले. —पे. द. ३३ पृ. ९१

२ हे बोलणें सर्व मायावी लबाड. परिछिन्न उपयोगी नव्हे यैसें बोलिले. —ऐ. ले. पा. म्यु प्रं. पृ. १४२

३ त्यास परिछिन्न सांगणें कीं तुम्ही आपल्या मनांत किमपि संदेह न आणावे. —पे. द. ३३ पृ. ९५

परिछिन्नवादे—स्पष्टपणें, निखालस.
आम्ही परिछिन्नवादे पातशाहास व जावेदखानास अर्ज केला.
--हिंगणे दप्तर खंड २ पृष्ठ १७

परिणामपर्यंत—अखेरपर्यंत; शेवटपर्यंत.
विश्वास आम्हांवर असावा. आम्ही आपल्या बऱ्यांत आहोंत. परिणामपर्यंत चांगलें तेंच सांगूं. —ऐ. ले. सं. २४७७

परित्वा—प्रसर (?) फैलाव (?) फितुर (?).
इकडील प्रांतांत येकंदर परित्वा त्याचा जालाच होता.
—पे. द. भाग २५ पत्र नं. १६२

सावाजी भोसले मोंगलांकडे यावयाचा प्रकार दिसत नाहीं. परित्वाच करावें असा त्याचा प्रकार दिसतो. —ऐ. ले. सं. २०९५

परिंद, परंद, परिंदा—पक्षी.
१ पांच परिंदांची शिकार करून आंबराईंतून आले.
—राजवाडे ७ पृ. १०४

२ वकील मुतलख व अमीरउल् उमरावची खिलत चारकुबा व जीगा व शिरपेंच व परिंदा कलगीमय लटक व माला मकरवारी व कलमदान ढाल तलवार मोर्चेल नालकी पालखी शिक्केकटचार माहीमरातब, तमनतोग हत्ती घोडासुद्धां बहुत आदरें करून श्रीमंतांनीं घेतलीं.
—ऐ. ले. सं ४६३३

परिशान, पेरोशान, परेशान—पीडित, अस्वस्थ.

परिस्पंद—शिरकाव.
आपणहि प्रसंगी जे बोली कर्तव्य ते दुसरीयाचा परिस्पंद न होये यैसे करोन सत्वर आले पाहिजे. —पे. द, १२ पृ. ६

परिहार—सबब, कारण, खुलासा.
१ आम्ही दमाजी गाइकवाड याचे फौजेच्या शहावर. त्याचा मुकामे थाळनेरानजिक (होता) तो पावेतो होतो ते (गाइकवाड) दरमजल प॥ नंदुरबार येथे गेलियाबर आम्ही पा। चोपडे व येरंडोल येथील जप्तीचा बंदोबस्त करून आलो उगाच परिहार न लिहिणे म्हणोन आज्ञा. त्यास परिहारायोग्य जाहालियासी सेवक लोकांचा उपाय काय आहे?
—E. M. P. पृ. ८५

२ प्रसंग साधावयाचा आहे तरी जाधवराऊ यास अगत्य पाठवून द्यावे. पत्रीं परिहार लिहिला न पाहिजे. —पे. द. ३३ पृ. २८८

३ यैवजाचा मजकूर तपसिले ल्याहावा तरी स्वामी क्रोध करतील. परिहार लिहितात म्हणतील. —पे. द. भा २७ पत्र नं. १४६

परीघ—वेढा.
जमाव अंताजी शिवदेऊ या समागमे पाठवून किल्लेमजकुरास परीघ घातला.
—पे. द. ३१ पृ. १०८

परीवख्त, पिरावख्त—मृत ? संन्यास घेतलेला ?
हल्ली नरसिंहभट बिन विस्वनाथभट पिरावख्त जाली आहे व केशवभट विश्वनाथभट हाली आहे तरी आपलेनी नांवे फर्मान बसिके खास मऱ्हामती होये नरसिंहभट विद्यार्थी केशव चैतन्य महानुभाव हा परीवख्त जाला आहे याचा रोजमुरा सदरहू बरा हुजती सदरहू चालिला आहे.
—शि. च. सा. २ पृ. १९७

नरसिंहभट पिरीवख्त आहे व केशवभट मयेत जाहला आहे तरी आपलिया नांवे हुजती मऱ्हामत होवे.
—शि. च. सा. २ पृ. १९६

परेशानी—संकट; काळजी.
दाण्याची महर्गता याजमुळें बहुत परेशानींत आहे.
—प. द. म. व. ७०

परोचा—पारचा; वस्त्र.
भेटीचे समयीं नबाबांनीं रायास १ हत्ती २ घोडे व ७ परोचे वस्त्रें दिल्हीं.
—रा. खं. ३ पृ. ८६

परंतु—अथवा.
यांणीं एक तों आमचा मतलब करून देऊन दक्षणेस सुखरूप जावयाचें होतें परंतु दुसरे बाहेर निघोन झुंझावयाचें तरी होतें, परंतु दोन्ही गोष्टी न करितां अडचणींत राहिले हें अनुचित केलें.
—ब्र. च. पृ. ४९

पल्या—पळचा; पळांतला, पळून आलेला.
त्याचा पोरगा पल्या आला त्याणे वर्तमान सांगितले की श्रीमंत कुशाबा तात्यापासी नाहीत ते चुकले (पानपत पळा संबंधीचे पत्र)
—चं. चू. द. पृ. १४५

पल्याण—पालाण; उंटावरचें खोगीर.
उंटहि एक येथें आहे तो पाठवून देतों. पल्याण तेथें तयार करवावें.
—ऐ. ले. सं. ४१६८

पल्ल्यावर असणें—१ एखाद्याचे पक्षपाती असणें, सहायकर्ते असणें, २ एकाद्याचे वाईटावर असणें.
खान वेसावकराचे पल्यावर आहेत मग (म्हणून) कोण्ही न बोलत.
—पा. क्ष. ज्ञा. ई. खं. १ पृ. २६

पल्ला--निकाल; शेवट.

जिवबा पोतनीस येथेंच (कैदेंत) आहेत. पर्वतास गेला नाहीं. दुसरेचे हातीं हस्तगत जाहला. गृहस्थ याचा पल्ला श्री काय करितो न कळे.

—ऐ. ले. सं. ५२४५

पल्ला—ठरविलेला कार्यक्रम किंवा नकाशा.

श्रीमंत भाऊसाहेबांशींहि बिघाड करावा, करवीरकरांची भेट जाहल्यावर मिरज प्रांत मारावा, असे त्यांचे पल्ले आहेत.

--ऐ. ले. सं. ५८७६

पल्ला--अपेक्षित सुक्कामाचें स्थळ.

२९ हजार रुपये द्यावे आणि जिवास दरम्यान (जामीन) द्यावा म्हणजे महाराजास (कोल्हापूरकर) सोडून आम्ही बाहेर जाऊ, आम्हास पल्ल्यास पोहचाऊन द्यावे, येणे प्रमाणे करार करून नंतर महाराजास सोडवून घेऊन भाऊ, महाराजाचे वाड्यास आले. --पे. द.

पल्ला येणें--काम होणें, कार्य सफळ होणें, व्यवस्था लागणे.

अवतरणासाठी 'डोई देणे' पाहा.

—खडर्याच्या स्वा. ब. पृ. १०

पल्ल्यावर ठेवणें—विचारांत घेणें, लक्ष देणें; मनावर घेणें.

मी त्यास कांहीं म्हणणार नाहीं परंतु तुम्ही त्याजकडे जाऊन बहुत विचारे सहल घ्यावी ते पल्ल्यावर ठेवणार नाहींत परंतु तुम्ही बहुत विचारे त्यासी मजकूर विचारावा. पल्ल्यावर न आले तरी न येवोत परंतु ही बातनी (बातमी) तरी (त्याजकडून) न फुटावी एवढेतरी व्हावें.

—स. ब. पृ. २६

पल्ला राखणें—पक्कें जाणणें.

अवतरणासाठीं गुमराई शब्द पाहा. —हो. कै. पृ. १६१

पल्ल्यावर आणणें—वाटेवर, समजुतीवर, शुद्धीवर आणणे.

चौथाईबाबत तट पडिला होता दुतरफा ऐकत नवते तेव्हा श्रीमंत रा. सुभेदार याजपासी बहुताप्रकारे बोलून पल्ल्यावर आणिले. येक खेडे न द्यावे ऐसा आग्रये (आग्रह, हट्ट) होता परंतु श्रीमंतांचें समाधान असावे यास्तव समजाऊन सांगोन दोन महाल द्यावे ऐसा इत्यर्थ ठरोन निरोप घेतला.

--चं. चू. द. पृ. ७८

पल्ले लावून पाहणें—रेंज किंवा किती लांबीवर गोळा पडतो त्याचा अजमास.

१९ तोफा गुलटेकडीजवळ नेऊन निशाण पल्ले लावून पाहिलें.

—ऐ. ले. सं. ४७६१

पल—२८ ढब्बूंचें एक वजन. लोणी, तूप वगैरे मोजतांना पूर्वी दक्षिणेंत उपयोग करीत.

—विलसन

पलखदंती—हत्तीचा एक विशिष्ट प्रकार. प्रशस्त किंवा लांबलचक दांत असलेला.

मोरो त्रिमलास तुरा, कलगी, घोडा अरबी व गज पलखदंती असे दिले.

—चित्र. ५

पलजार—दाणा न भरलेलें कणीस, लक्षणेनें घोड्यासाठीं उपयोगी पडणारा कोवळा शाळू.

षष्ठीस कूच जाहाले पाऊस फार पडत होता तो उघडला पलजार नाही यामुळे वाटेचे फार श्रम जाहाले.

—पुरंदरे द. भाग ३ पृ. १७२

पलांग—चित्ता.

पलाण—उंटाचें खोगीर.

१ उंटास पलाणें, झुली नसतील त्या करून देवऊन रवानगी करणें.

—पे. द. ३४ पृ. ८

२ उंटें दोन पाठविलीं. त्यास पलाण, झुली, सर्व साहित्य केलें.

—ऐ. ले. सं. ९१३

३ आम्हांकडील उंट नफर ३ पाडाव गेले, व सलिते सुमार ८ व भारकस गेले व पलाणे १ व झूल १ गेली. सारवान असामी १ ठार पडला.

—ऐ. ले. सं. ६३२८

पलाण; पालाण—खोगीर. लक्षणेनें पूल, बांध किंवा सेतु.

दर्यास पलाण (शिवाजी) राजियांनीं घातलें.

—सभासद ५१

पलाणणें—सज्ज करणें.

पलापटडी—(मद्रासकडील शब्द) ज्या ठिकाणीं निरनिराळ्या जातीजमातींचे लोक एकत्र वस्तीस असतात असें स्थळ.

—आर्यविन

पलारक—तरवार.

पलिता—पेटलेली वात; बत्ती; तोडा; काकडा.

पली—पळपुटी, पळी.

आपले फौजेचे वर्तमान तर राजश्री रायांची फौज तो पली यैसी सर्वांनीं केली आहे.

—पुरं. द. भाग ३ पृष्ठ ५

पव्हई—पवई, पाणपोयी.

मौजे कळंब येथें मार्गावर पव्हई घालून मार्गस्थास पाणी पाजावे.

—शा. रो. पृ. ३०८

पव घालणें—परिपाठ घालणें ?

सोमवंशीचे क्षत्री आपले वळखीचे पाचारिले. मंडण घातले मग समर्थ देश व देसाई व दिघी पालीचे राऊत व सोमवंशाचे क्षत्री वोडणे मिळविले वाडिया राहण्याचा पव घातला सैन मोजवें नाहीं दहा वाडियाभरोन सैन्य मिळविले.

—बिंब ७

पश्चमवादी—प्रतिवादी.

(अवतरणासाठीं 'अग्रवादी' शब्द पाहा)

—मा. स. प. मा. पृ. ११७

पश्म—लोकर. **पश्मी, पश्मीना**–लोकरीचें कापड.

पश्मी; पस्मी—लोंकरी.

१ आज्ञेप्रमाणे पश्मी दुलाई, अस्तर तापत्याचें,संजाब तापत्याचा सोमाजीचे गुजारतीनें तयार करून सेवेसी पाठविली आहे.

—पारनीस ब्र. प. १७

२ पश्मी रुमाल १ तांवडा . . . पाठविला आहे.

—खरे ११ पृ ५७०१

पश्मीना—लोंकरी वस्त्र.

पशम—गुह्य भागावरील केस; शष्प; कःपदार्थ.

१ ते आमचे स्नेही असतां त्याणी तेथें पत्र पाठविले तर काय पशमं उखडली ?

—राजवाडे ६ पृ .६१९

२ आम्हीं बोलिलों कीं, कोल्हापूर मिरजेच्या किल्ल्यापुढें पशम आहे.

—ऐ. ले. सं. ६३९६

पशमीं—कापडाचा प्रकार.

त्या प्रांतीहून उत्तम सकलाद लाखी, रेशमी, व पशमी थाने दोन मेलऊन पाठऊन देणें.

—पे. द. ३३ पृ. ३६८

पशेत—चौकशी, (?) इलाज, (?) निषेध. (?)

हें वर्तमान आपणांस कळलें, कांहीं उपाय नाही. आपले खासनीस खंडो मल्हार यांणीं ये गोष्टीचा पशेत करावा तो न केला.

—रा. १ पृ. १६

पशेमान—पस्तावलेला; दुःखी.

पशेमानी—पस्तावा; दुःख.

पशरफ्त—परिणामकारक, सफळ.
(अवतरणासाठीं 'बफजलइलाही' शब्द पाहा)
—पुणें अखबार भाग १ पृ. ११०

पष्टवादे—स्पष्टवादे, साफ.
नाहींतर जातो ऐसे पष्टवादे सांगितले. —पे. द. ३ पृ. १८

पस्त—फस्त; उध्वस्त.
अजंट्याच्या घाटापासून भागानगरसुद्धां ताहात श्रीरंगपट्टणपावेतों मुलूख जाळून पस्त करावा, ही मसलत ठरली आहे.
—ऐ. ले. सं. ७९१५

पस्ताई पडणें—पस्ताव्यांत पडणें.
मोगलानें विघाड केला म्हणून तेच थोडेसे पस्ताई पडले आहेत.
—ऐ. ले. सं. ३५९

पस्पा—पिच्छेहाट; पसार.
तेव्हां फलटणें फौजेच्या मुकाबल्यास ठरूं न सकता खाडींत पस्पा झाली
—साने प. या. ब. ४७९

पस—नंतर.

पसअंदाज—धैर्यहीन, गर्भगळित.
माधवराव यास कोणी पुसणार नाहींत; व पसअंदाज होतील याकरितां रघुनाथराव यांस कैद करावे.
—पुणें अखबार भाग १ पृ. १०३

पसगयबत—पसगैबत, पाठीआड, अपरोक्ष.
आपल्याकडून सिष्टाचार पत्रीवेव्हारी का चुकावे ? श्रीमंत दादासाहेबा-कडून सिष्टाचारयुक्त पत्र लिहून पाठवावे. नकले माझे पसगैबतही सिष्टाचार पत्रे येत जात दस्तावेज मात्र स्वामीनी न गोवावा.
—हिंगणें द. भाग २ पृ. २९.

पसणें—प्रसवणें; विणें.
तुम्ही घोड्या पाठविल्या त्यांपैकीं निळी घोडी मेली. एक पसली, तिचें शिंगरूं मेलें.
—ऐ. ले. सं. ९५८

पसंद—पसंत.

पसपा होणें—पिछेहाट होणें, पळून जाणें.
(अवतरणासाठीं 'शलक' शब्द पाहा)
—पुणें अखबार भाग १ पृ. १६२

पसर करणें—परस करणें, हल्ला करणें.
तेव्हां सर्व लोकांस सांगोन स्वामीचे चरणाचे चित्तांत स्मरण करून

मोंगलावर पसर केली. दोन घटका भलीसी तरवार चालली.

—ऐ. ले. पा. म्यु प्र. पृ. २०७

पसवणें—प्रसूत होणें. हा शब्द घोडीला लावतात.

इंगलाज घोडी निळी काली पसविली, सिंगी झाली.

—पे. द. ३० पृ. १९३

पसार—फज्जा, दुर्लौकिक.

विना रघोजीचे पारपत्य केलियावेगळे फौजेस फिरता न ये. जरी पारपत्य न करिता फौज फिरली तरी पुरता पसार होईल.

—पे. द. ३० प, १५८

पसीना—घाम.

श्रीमंत, भोसले मजकुराचा पालखीतून हात धरून डेऱ्यापर्यंत आले. पसीना वगैरे येण्याचे आयासाकरितां बेचोव्यात अर्धघटका विश्रांती करून सदरेस येऊन बसले.

——पुणें अखबार भाग १ पृ. ७८

पसुमार—बेसुमार.

हैदरखानाकडील उमदे सरदार पडले व घोडी माणसे पसुमार कामास आली.

—पुणें अख. भाग २ पृ. १३०

पसोपिश, पसोपेश—भांडण, तंटा, अनमान, संकोच, हर्कत, अडचण.

१ बाळाजी जनार्दन यानी कृष्णराव बल्लाळ यास पैगाम केला कीं लाख रुपये तुम्ही दस्तगर्दा देणे. कृष्णराव बल्लाळ यानी पसोपेश अंदेशा करून पगाम कबूल केला नाहीं.

—पुणें अखबार भाग १ पृ. १०७

२ मुलाकातही होण्यास काय पसोपेश आहे ?

——राजवाडे १ पृ. १४५

३ त्यापक्षी सर्कारची खातर्जमा होय ऐसे अहदपैमान द्यावयास पसोपेश करणार नाहींत.

—राजवाडे १२ पृ. २२

पहाण्या——चोरी वगैरे झाली असतां चोरीस गेलेला माल कोठें आहे तें आन्तरदृष्टीने आपण जाणतो अशी बतावणी करून धंदा करणारा माणूस.

पहाता अर्थी—विचार केला असता.

साहेबानी सांगून पाठविलें त्यास पहाता अर्थी पांच वर्षे केशव नारायण यानी अम्मल केला. त्या अन्वये म्हटलें तरी साहेबाकडीलच गांव असा अर्थ होतो. तो साहेबी आपले सरकारांत घ्यावा.

—को. प्रा. १७६

श्रीमंत ईश्वरी अंश धन्य तो वंश परमपुरुपार्थी । बरोबरी तयांची कोण करिल पहातार्थी ।

—प्रभाकर

पहारा गाजविणें—दरारा राखणें.
गोपाळराव याणीं तो आपला पहारा गाजवून वक्रांतच गेले.
—ऐ. ले. सं. १७६०

पहिल्या किता—पूर्व प्रघातानुरूप.
आपल्या आब्रू व जिंदगनीस पहिल्या किता सत्व बाकी असावे म्हणोन मल्हारजी होळकर जरूर पाहिजेत. —पे. द. २० पृ. ५५

पहेला पहिल—तत्काळ, झपाट्यास.
चित्तांतील उर्म हें की पहेला पहिल तोंड लावावे मग जे होता होईल ते हो. —पे. द. २० पृ. १५८

पळण—पळापळ; पळपट.
पुण्यांत पळणीची गडबड आहे. दोहों दोहों रोजीं आवाई पडत्ये. लोक तमाम पळतात. —ऐ. ले. सं. २०८५

पळणा—उंटाचे पलाण, खोगीर.
उंटास पळणा वगैरे सरंजाम लेश राखावा.
—इ. सं. पु. ६ अं. ७ ते ९ भो. कु. पृ. ५४

पळपट, पळपुटी—पळण, पळापळ, पळ.
१ ११ रु॥ पळपटीमुळें वस्तवानी साष्टीस नेल्या त्यास खर्च हेल वगैरे (हेल म्हणजे ओझें, ओझें वाहतुकीचा खर्च.)
२ २। मजुरी तोतयाच्या पळपुटीमुळें सामान साष्टीस रवाना केलें सबब.
—पे. सा. पृ. ९६

३ भोंसल्याच्या धास्तीनें पुणें निम्मे रात्रींमध्यें फुटलें. दमाजीचे पळपटीची गत जाली. —ऐ. ले. सं. १३५७

पळव करणें—पळवून लावणें, दाणादाण करणें.
बाजी व भिवजी याणी जुंजावरी जुंजे करून पुनाजीस पळव केला. तेव्हां त्याणें सिलीमकर पाटलास गांव देऊ करून मदतीस आणिले.
—रा. १७ पृ. ४

पा—पाय.

पाइकी, पायकी—सेवा.

पाईकी—शिपाईगिरी.
शत्रूस मारून काहाडीतच आहेत, लोकांनीं पाईकीची शर्थ केली. पुढेंहि करावयास चुकत नाहीं. —पे. द. १६ पृ. ५०

पाईची धांपा देणें—धावडवून घामाधूम करणें, दमछाक करणें.
आम्हांमागे मोगल आले तरी, त्यांस हैरान पेरोसान करून, पाईची घांपा

देऊन धांवतां धांवतांच खराब होत तेच करून, दावांत आणून, गांठ घालून त्यांस वुडवितों.

—ब्र. च. पृ. २९

पाईटचे रुपये—(?)

पाईटचे रुपये पांचसे घेणें म्हणून आज्ञा.

—पे. द. १३ पृ. ४३

पाईन :—१ एका इंचाच्या चतुर्थांशाचें एक परिमाण.

२ तीस विघ्यांइतक्या जमीनीचें मोजणीचें एक परिमाण.

—विलसन

पाईन—(?) मो. वा. चूक (?) (येऊन?)

तो सुभे मिर्जा राजा पाईन किल्ले पुरंदर बमय लस्कर घेरा घालून सिकंदा केला ते वख्ती सिवाजीराजे मुलाजमतीस येऊनु किल्ले व मुलुख दौलत काइरे मुबारक दाखल जाला.

—पे. द. ३१ पृ. ४३

पाईले—(?)

चराटें सुताचीं सहा व सोळंकीचें झाड व नवघणें चाकास दोन पाठविली व पाईले दोन.

—पे. द. १६ पृ. ४४

पाईसर—पायउतार, पायदळ.

महाराजांनीं समाचार घेतां खानाचे बरोबर सैद बडा पटाईत मोठा धारकरी पाईसर आहे ऐसे देखोन राजे उभे राहिले.

—म. द. रु. १ पृ. २९

पावट, पाकट—पाकीट (?) पोस्ट (?) टपाल.

प्रस्तुत इलायतेचा पाकट आला त्यात नवाब इमाजुद्दवला यास खातरजमेस्तव चकती (हुकूम) आली. विलायतेच्या पाकटची रवानगी आहे यास्तव खलित्याच्या प्रत्युत्तरास विलंब जाला उदईक पाकट रवाना होईल.

—नाग २ पृ. ४

पाखनिशी—तपासणी, शोधकता, शुद्धीकरण.

—रा. व्य. को.

पाखर—हत्तीचे पोलादी चिलखत. सोंडेचें व डोक्याचे चिलखत निराळें असते. सोंडेच्या चिलखतास "बरगस्तवन" व शिरस्त्राणास "शिरी" म्हणतात.

पाग—१ मुख्य गलबताबरोबर नेण्यात येणारी दुसरी लहान होडी, २ मुख्य गलबताला ज्या दोरानें ती होडी बांधतात त्यासहि पाग म्हणतात.

फरासिसानें इंग्रजांचें गलबत शिकस्त केलें. पागेस लावून घेऊन जात होता.

—ऐ. ले. सं. ३५५४

पाग—जाळें, विभु, कारस्थान, मसलत, व्यूह.

त्यास सध्या तुम्ही जो पाग रचिलात तो सिद्धीस गेला तरी सर्वांचे ऊर्जित आहे. —पे. द.

पागडबदली—पगडीबदल, भाईचारा, स्नेह.

कै. श्रीमंत रावसाहेबांची व गुमानसिंग यांची पागडबदली मशारनिल्हेचें विद्यमानें कांहीं नजर देऊन भाऊपणा जाला.

—ऐ. ले. पा. म्यु. प्र. पृ. १५२

पागनीस—रिसाल्याकडील कारकून.

पांगूळ:—१ एक जात, २ त्या जातीचा भिकारी.

पागोटें टाकणें—न्याय मिळेपर्यंत डोक्यास घालावयाचें नाहीं अशी जुन्या काळीं वैताग दर्शविण्याची खूण असे.

गुरप्पास व व्यंकट रंगय्यास वागवाद जाहला. गुरप्पानें पाहरेकऱ्यांशीं भांडून बुरानुद्दीन याजपांशीं फिर्याद देऊन पागोटें टाकिलें.

—ऐ. ले. सं. ३९७९

पागोटें डोईत घालणें—पागोटें डोईस घालणें.

किंवा आपल्या घरचे पागोटे मोलवान ज्याची संभावना करणे असेल त्याच्या डोईत घालावे.

—अरुणोदय पदमनजी पृष्ठ १५

पागोरा—पांगोरा. झाडांच्या किंवा वनस्पतींच्या मुळ्या. २ पीक कापून नेल्यानंतर राहिलेल्या खुंटाना किंवा ठोंबांना पुन्हा फुटलेले अंकुर: फूट, पात, काडी.

तमाम फौज उठत चालली. घोडी नित्य मरतात. कांहीं खर्चास पाठवावें म्हणजे कुचे होईल. चार दिवस लोटतील. मागे चवलपावल दिल्यानें (आणि) राणात कर्णास (शामकर्णास घोड्यास) पागोरा त्या अर्थानें चालत होते, आतां बिकतासी समंध (म्हणजे वैरण विकत ध्यावी लागणार !) —ऐ. ले. सं.

पांघरूण—छत्र; आश्रयस्थान.

श्रीमंत गंगाबाईस पुत्ररत्न झालें. ईश्वरकृपेंकरून राज्यास पांघरूण केलें.

—ऐ. ले. सं २१४८

पांच—पांचेचा खडा, पांचूचा खडा. यांचा मोहराप्रमाणेंही उपयोग होई.

१ एका भक्तानें पद्म, देवास दिलें आहे, त्यास पांचा पाहिजेत. इतकें जवाहीर तुम्ही हत्ती भरून राजास आणून दिलेंत. पांचा जर दहा दहा रुपयांच्या आठ पाठवून द्याल तर पद्मास लावून देवास अर्पण करूं.

—ब्र. च. पृ. २५६

२ आठ पांचा दर रुपये १५ प्रमाणे व मोहरा आठ पाठविणें, म्हणून आज्ञा त्यावरून सोमाजीबरोबर रुपये १२० पांचा आठ दर १५ प्रमाणें ११२ मोहरा आठ दर १४, येणें प्रमाणें २३२ पाठविले आहेत.
—ब्र. च. १७०

पांच—शिष्ट बोलणेकरी, मुत्सद्दी, पंच.
त्यास पत्रें पाठवून त्याजकडील पांच आले त्यांचा याचा तह वैसला नाही. श्रावणमासीं सिवराजसा याचा भाऊ निजामशा यानें दुर्गनशा यासी मारुन आपण राजीं वैसलिया उपरांतिक त्यानें आपले पांच रा० गोविंद बल्लाळ याजकडे पाठविले. —पे. द. भाग २७ पत्र नं. ३

पाचकणी (पु)—एक रत्नविशेष.
विशेष. जवाहीर दागिने पाठविले आहेत त्याची याद अलाहिदा आहे व नथीची मोत्याची जोडी, पाचकणी यादी सिवाये पाठविला आहे.
—नित्सुरे कु. वृ. पृ. १४४

पाचंग—पचंग, पासोडी कांवळे इ. वस्त्र मानेपासून कमरेपर्यंत पाठ पोट झांकेल असे गुंडाळून गळ्यामागे गांठ देअन बांधण्याला पचंग घालणें किंवा बांधणें म्हणतात.
मल्हाररावाने पांच सात पेंढारी आपल्या हातानें तोडून बाईजवळ गेले. बाई परजात नग्न उभी. तेव्हा दोरव्याच्या शेल्याची पाचंग होती तो शेला सोडून तिच्या अंगापर टाकला. —हो. कै. पृ. १९

पांच पोषाख—पांच वस्त्रे.
मोत्यांची कंठी, तुरा, जेगा, शिरपेंच याखेरीज पांच पोषाख उंच दिले.
—ऐ. ले. सं. १९७४

पांच विश्वे—थोडे तरी. मूळ शब्द विस्वा म्ह. रुक्क्याचा विसावा हिस्सा.
१ दौलत ईश्वरइच्छेनें आपण आपले हाते दुसऱ्याच्या घरांत घातली (खरी) तथापि कारभारी त्यांचा माझाच कारकून केला कीं पांचविस्वें तरी त्याचें मन माजेकडे ओढेल. म्हणुन हा बेत केला. पण त्यानें कारभाऱ्याची वस्त्रे घेतांच चांचणूक दाखविली. —हो. कै. पृ. ५८
२ हें बोलणें पांच विश्वे महादजी बावासहि रुचलें.
—इ. सं हो. कै. पृ. १०

पांच संदी मनसब—पाच सदी मनसब. सदी म्ह. शंभर. अर्थात पाचशे स्वारांची मनसबदारी.
पुरणचंद दिवाण यासी पाच संदी मनसब नवाबाहीं दिधली.
—पे. द. २५ पृ. ८३

शुद्धिपत्र

पृष्ठ	शब्द	अशुद्ध शब्द	शुद्ध शब्द
५	अज्याईब	पे. द. २५ पृ. ११	पे. द. २५ पृ. १०
१२	अद्मीयेत	पे.द.भा.१०पृ.५८	पे. द. भा. १० पृ. ५७
१८	अनोपाय		पृष्ठ ९३
२२	अफरातफरी होणें	पत्र नं. १३०	पत्र नं. १३२
२३	आफ्लाद	मलीची प्रजा	मुलीची प्रजा
२३	अफलातून	ॲरिस्टॉटल	प्लेटो
२९	अमारतपन्हा या शब्दाचे अवतरण गळले आहे. ते असे. 'प्रांत मजकुरास ठाणे बैसावयास अमारतपन्हा न्याहारखान गोरी फौजदार पाठविले."		
३०	अर्गानर्गा	अर्गानर्गा (मो. वा. चूक)	अर्गाजर्गा
३१	अर्जवस (?)	अर्जवस (?)	अर्जवास पाहून होते. म्ह आर्जव करून होते. मोडीत व आणि वा सारखे वाटतात.
३५	अल्बिदा	अखेरवा	अखेरचा
४२	अष्टमांगल्य	पृष्ठ ३३	पृष्ठ ३२
४३	अस्तन	फकीक	फकीर
५४	अंदाजा	नावतीवयास	ना वर्तावयास
५५	अंबुवाची	मभि	भूमि

पृष्ठ शब्द	अशुद्ध शब्द	शुद्ध शब्द
५५ आइबदार	माहागही	माहातारी
५९ आंच निघणें		पृष्ठ १७९
७६ मलाफैला	मलाफैला	आमलाफैला
८१ आलिकाव	दौलतरखाह	दौलतख्वाह
८५ आसताइ	आसताइ	आसताहि (आस्थाहि) मूळ पे. दफ्तर खंडात 'आसनाइ' असे झालेले वाचन चुकीचे वाटल्यामुळे 'आसताइ' असे दुरुस्त करून घेतले.
८५ आसल	पृष्ठ ३६	पृष्ठ ३७
९० इजतआसर	शदाजाबादेहून	शाहाजाबादेहून
९४ इदमथ	इदं १ हें; इत्थं १ या रीतीनें	इदं–हें; इत्थं–या रीतीनें.
१०३ इस्कील	ढेकोरीचे	देकोरीचे
१०३ इस्कील	दबिल	देविला
१०४ इस्तकामत ?	इस्तकामत (?)	या शब्दाचा अर्थ दृढ, एकनिष्ठ असा आहे.
१०६ इगळास वळवे लागणें.		" इंगळास बोळंबे तैसे जाले आहे. " (हे अवतरण गळले होते.)
११७ उतरवा	दक्षणवा	दक्षणवारा
१२१ उधार-उद्धार	सदा असता	सनदा असता.
१२७ उभे धावेने	फुलवणी	फुलमरी
१३४ उसाचे थळ		'उसाची थळें मोडून खराबी केली' (अवतरण

पृष्ठ	शब्द	अशुद्ध शब्द	शुद्ध शब्द
			गळलें आहे तें)
१४३	ओटेंखोंडे	तप्यांध्ये	त्यामध्यें
१५०	कटक ज्योतिष-पणाची वृत्ति	ज्योतिषणाची	ज्योतिषपणाची
१५७	कदीमी	पृ. ११९	पृ. ११८
१६०	कफावत	शिलेरादाने	शिलेदारानें
१६१	कबज	पृ. ११	पृ. २१
१६३	कमजवाद	पृ ११३२	पृ. १३२
१६४	कमरछोडी	घासदाप्याचे	घासदाण्याचे
२०७	कावेरीपाक	फुलस	फुल्म
२२२	फुल्बखाना	फुल्बखाना	कुल्बखाना
	फुतरबा	फुतरबा	कुतरबा
	फुद्रत	फुद्रत	कुद्रत
२२४	फुफ्रान	फुफ्रान	कुफ्रान
	फुबल	फुबल	कुबल
२२६	क्रुर्बा	क्रुर्बा	कुर्बा
२३२	कुळिप्त	कुळित्प	कुळिप्त
२३८	कोती अंदेशा	पृष्ठ ६५	पृष्ठ ३५
२४५	खटपट	टखट	खटखट
२४७	खडळ	खडळ	खड्ळ
२४९	खता	जोतीपंत	जोतीपंती
२५२	खबर एकधार	खबर एकधार	खबर एकबार
२५६	खल्क	कुर	कुल
	खलद्ल	घेमे	घेणे
	खलबती लोक	कलबती	खलबती
२५८	खलास करणे	बंदरखानीची	बदखानीची
	खलेत	सईयदमालखानाचे	सैदजमालखानाचे
२५९	खलेल	पृ. १८०	पृ. १७९

पृष्ठ शब्द	अशुद्ध शब्द	शुद्ध शब्द
२७३ खास्त	वस्तीवर	खास्तीवर
२८३ खुशम	पृ. १२९	पृ. १२३
२८७ खेडी झोपडी	वोरी	वोली
२९९ गन्तव्य	पृ. १३६	पृ. १४६
३११ गहदम	तख्त	नख्त
३१३ गळे कापून नेणे	मले	नेले
३२१ गिर्दावरी		ऐन जिनसांची गीर्दवारी कैसी करिता ? (अवतरण गळले होते)
३२२ गिराशीचा शिरस्ता	बुडग्यांतून	बुनग्यातून
३२६ गुंजासी	पे. द.	पे. द. २५ प. नं. २७६
३२६ गुंज फोडणे		अवतरणातील 'आधीचे मुकामी पलीकडे' हे शब्द गाळावे.
३२८ गुढे-करी	गुढे मात्र	गुरे मात्र
३३१ गुमर	ते	तेढ
३३३ गुरुचे सीख	नं. १०५	पृ. १०४
३३४ गुल्वांग	गुलूवांग	गुल्बांग
३२९ गुंताराडा		'या उपर गुंताराडा फार करून राहिला नाहीं'(अवतरण गळलें होतें)
३३७ जिगर जाटले	जिगर जाटले	जिगर—काळीज. जाटणें-पिळणे. घाण्यात घालून पिळणे. त्यावरून जिगर जाटणे म्हणजे काळीज काढून देणे,काळीज पिळवटून देणें.

पृष्ठ	शब्द	अशुद्ध शब्द	शुद्ध शब्द
३३९	गैर महसर्दार	रा. खं. ८ पृ. ४३	हुजूर पादशाह या नजीक जाऊन आपले वर्तमान वतनाचे साकल्य जाहीर करावे तरी आपण गैर महसरदार रा. खं. ८ पृ. ४३
३४०	गैरमजुरा		गैरमजुरा कल्मे (अवतरण गळले होतें.)
३४०	गैरराह	पृ. १४०	पृ. १३९
३४४	मोरी	मोरी	गोरी
३४५	गील	गील	गोल
३४५	गोवर्धनदेवी	सूसराग्रीन	सुसराग्लीन
३४५	गोवरपा	गोवरप्याचे काम	मूळ शब्द गोहर असा आहे त्याचा अर्थ मोती, jewel$_3$ जडावयाचे काम असा स्टेनगॅस देतो त्यावरून जडावाचें काम असलेला सोन्याचा किंवा रत्नखचित कळस असा समजावा.
३४७	गोसमाल		अवतरणांत ' सीर ' या शब्दापुढे शब्द गळले आहेत. ते असे ' कापविले आहे. त्यासी गोसमाली देवया '
३५२	घडेबाजी	डेबाजी	घडेबाजी
३५४	घाट	कालतीचा	कालपीचा
३५६	घावडाव	लागाग	लागभाग

पृष्ठ	शब्द	अशुद्ध शब्द	शुद्ध शब्द
३५९	घोडीतलब खरी होणें	करावो	करावी
३६६	चर्क	Fixe	Fixed
३६९	चलचलाव	पृ. २१	पृष्ठ २९
३७९	चित्तांत कुन्हा जाणें		'त्याच्या चित्तांत कुन्हा जाईल' पे. द. भाग २०. पत्र २८७.
३८६	चीकस	चीकस	चोकस
३९०	चौका	पृष्ठ ११	पृष्ठ १०
३९३	छबिना	पे. द. पृष्ठ २	पे. द. १३ पृष्ठ २
३९८	जखमाना आणि मयताना		आधारांत अवतरण गळले आहे ते असे 'तेव्हां लोकानी धरणे बसून त्याजकडून २९००० रु. ची जखमान्याबद्दल मयतान्याबद्दल सावकारी निशा घेतली.'
४०५	जनेश्वर	संपूणे	संपूर्ण
४०७	जंबुऱ्याचे भारकस	पे. द. भा ४१ पत्र नं. ८७	पे. द. भा. ४१ पृ. ८८
४१२	जर्दोजी	पे. द. म. व. ९४	प. द. म. व. ९४
४१८	जलाली	मीठी	मोठी
४२०	जवार	Vicinily	Vicinity
४२४	जागाजुगा	जागागा	जागाजुगा
४२६	जाजमे हंथरणें	याजवडील	याजकडील
४२६	जाणो जन्माचा	हिकारपूरकाने	हिकारपूर्वकाने
४२७	जात ऊजहम	नवलपूर्व	नवलअपूर्व
४३३	जमीनतलब	जमीनतलब	जामीनतलब
४३७	जिगर जाटले		अर्थ काळीज पिळून टाकले.

पृष्ठ शब्द	अशुद्ध शब्द	शुद्ध शब्द
४३८ जिदन्यायें	पे. द. ३६	पे. द. ३३
४३८ जितारोटी सेलीथा माती	अन्न न मेल्यावर	अन्न व मेल्यावर
४३९ जिन्नसवार	जिन्ननवार फुलें	जिन्नसवार फुलें
४४४ जिलदी	जिलदी	जिलबी
४४८ जुज्रसी	जजरसी	जुजरसी
४५० जुपरात	जुपरात	जुमरात
४५१ जुवे	पृष्ठ ११५	पृष्ठ ११४
४५२ जूज़	नवाबाचा	नवाबास
४५७ जोडा धरणें	जोडा घरणें	जोडा धरणें
४५८ जोरबजोर	नटानें	नेटानें
४६१ ज्याहाजाती पैदास्त	पैदास न होये	पैदास्त न होये
४६३ झडका	कलागत	क्षते
४६९ टका	चाण आणे	चार आणे
४७५ टोपी वसणें	टोपी वसणें	टोपी बसणें
४७५ ठकणें	Attank	Attack
४८४ डांभिक	पृ. ७८	पृष्ठ ८८
४८७ डोके देणें	घवका	धक्का
४८९ डोही पडणें	ढल्याचे	लढल्याचे
४९५ तंइ	ते येऊन पोहोचतील	हे येऊन पोहोचतील
४९६ तंग	जेरवंद	जेरबंद
४९७ तजवज	तजवज	तजवीज
५०१ तख्तिरावन्	आहून	वाहून
५०१ तरवाल	तखाल	तरवाल
५०१ तख्तपादाबूद	तख्तपादाबूद	अर्थ तक्ताबद्दल निष्ठा दाखविणारा
५०३ तगाद्याची आयुधें	शेलकी समर्पक करून	शेलकी समर्पक करून

पृष्ठ	शब्द	अशुद्ध शब्द	शुद्ध शब्द
		तेल तोबरा वगैरे	तगाद्याची आयुधें आणली.तेलतोबरा वगैरे
५०५	तजावज	महकूम अक्दसासी	मुहकम अक्दखासी
५०७	तट होणें	पे. द. ३	पे. द. ३३
५१६	तवखिल	तवखिल	तवखिल
५२०	तर्क, तरफ	तर्क, तरफ	तर्फ, तरफ
५२४	तरांडे	— — — — —	अवतरण गळाले आहे ते असे " त्यास मा॥ नी रसदेविसी आर्ज करितील ते ध्यानारूढ करून शेवकाचा तराणोपाय होये ते करणार स्वामी खावंद आहेत.
५२५	तरीक, किंवा तरीका	सदन	सनद
५२६	तलग	पृ. ५.	पृ. ३.
५३६	तसदूक	हे महाल सरदारखास पातशहाचे	हे महाल सरखाखास (जात खर्चाकरितां तोडून दिलेले)पातशहाचे
५३८	' तसली ' ह्या शब्दावरील दुसरे अवतरण 'पृष्ठ ५३९' च्या सुरुवातीस चुकून लागले आहे ते ह्या शब्दाखाली वाचावे.	—	—
५४१	तह देणे	सरळ याचा प्रसंग	सरळ्याचा प्रसंग
५४४	तहात	पे. द. पृ. २९७	पे. द. २८ पृ. २९७
५४७	तरवीर	तरवीर	ताखीर
५५९	तावडा	पृष्ठ २९८	पृष्ठ २९५.

पृष्ठ शब्द	अशुद्ध शब्द	शुद्ध शब्द
५६१ ताहाड	ताहाड	ताहाल
५६४ तिहाई	घ्वावा	घ्यावा
५६८ तुमनदार	तुमनदार	तुमानदार
५६९ तुरकस्वार	ट्रप	ट्रुप
५७१ तूतै	तूतै	तूर्त
५७२ तैवज	मागवीत	वागवीत
५८३ थळभरीत	विससन	विलसन्
६०३ वरजवाब	वरजवाब	दरजवाब
६०७ दरावी होळकर कैफीयतीतील अवतरण गळाले आहे ते असे 'तिसरे दिवशी चार तोफा दरावीवर धरून हल्ला करून दतिया घेतला.'		
६१३ दल्तचप	दल्तचप	दस्तचप
६१३ दस्तदराजो	दस्तदराजो	दस्तदराजी
६१७ दस्तीमोहोर	माठी	मोठी
६१९ दाइमुदइ	पृ. १४१०	पृ. १४१
६२८ दाबदूब	दाबादुबाक रावी	दाबादुबा करावी
६२९ दामाशाई	कर्चे	कर्जे
६३० दायेऊपाये	पृ. ६४८	पृ. ३४८
६३३ दाव	पृ. २८	पृ. १९
६३६ दासबगल	पृ. १०६	पृ. १०५
६४९ दुकान माजवणे	लागून	लावून
६५९ दुष्म, नसूझी	दुष्म, नसूझी	दुष्मनसूझी
६६६ देहादर आणणे.	देहादर आणणें	देहावर आणणें.
६७१ द्यावें देणें. अवतरण		

पृष्ठ	शब्द	अशुद्ध शब्द	शुद्ध शब्द
	असे पाहिजे 'दुसरे दिवसापासून संपूर्ण कारभार द्यावे देणें मुद्दा सोपला.'		
६७६	धमणें	अची	अशी
६७९	धाटा. अवतरण असे 'महाराजांचे अंगांत १० शेर रईचा डगला सफेत शेल्याचा धाटा'		
६८३	धावत	सलामती खादें	सलावती खाले
६९४	नजरअली		मूळ शब्द अलीनजर त्यावरून नजरेअली म्ह. कृपादृष्टीचा –'मंजूर नजरेअली जाहला' म्ह. श्रीमंतानी कृपादृष्टीने मंजूर केला.
६९५	नजर धरणें	नजर घरणें	नजर धरणें
६९९	नफरी	कामम नाजोगे	काम मनाजोगे
७०४	नवाजशमामा	नवाजशमामा	नवाजशनामा
७०७	नस्त		नाट जाणें म्ह. किनाऱ्यापासून आंत समुद्रात दूरवर जाणें 'मानाजी आंग्रे' पासून अवतरण सुरू
७१०	नक्ष जमणे	अवतरण गळलें तें. असें	'नक्ष जमला असता महादजी शिंदे यांनी हैबत खाल्ली'
७११	नाकारा, नाकारी	पृ. २२	पृ. १८

पृष्ठ	शब्द	अशुद्ध शब्द	शुद्ध शब्द
७१६	नाबादानी	नाबादाची	नाबादानी
७२२	नालमेख	पृ. ९९	पृ. १००
७२९	निटोप्याची वाट		अवतरण असें 'तुम्ही आम्हास घाटावाट निटोप्याची दाखवून दोन प्रहरचे संधीस त्याजवर नेऊन सोडावे.'
७५३	न्यहाल		या शब्दाचा खूष करणें असा आणखी एक अर्थ हवा. त्याचे अवतरण असें 'न्यहाल केलें सरदारानां' प्रभाकर पोवाडा
७७३	परापर	भाग पृ. ३६	भाग २ पृ. ३६

★

भाग.....१

ंपर छपाई व्ही. राजेन्द्र आर्ट प्रेस पुणे २